# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• समग्र वाङ्मय •

खंड-२

## भाषणसंग्रह (व्यक्ती व विचार)

**संपादक**

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

खंड - २

# भाषणसंग्रह

(व्यक्ती आणि विचार)

संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

**सन २०२४**

वाय १७४-१

▶▶ **पुस्तकाचे नाव :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड -२ भाषणसंग्रह (व्यक्ती आणि विचार)

▶▶ **संपादक :** डॉ. सुनीलकुमार लवटे

▶▶ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-९०-२

▶▶ **प्रथमावृत्ती -** २०२४

▶▶ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रविंद्र नाट्य मंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५

▶▶ **© प्रकाशकाधीन :**

▶▶ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

▶▶ **मुखपृष्ठ :** गौरीश सोनार

▶▶ **किंमत :** रुपये ३३३/-

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होत. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध विषयांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी

देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ, आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे. यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासूंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

**डॉ. सदानंद मोरे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# संपादकीय

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पान्तर्गत प्रकाशित होणारा दुसरा खंड. हा भाषण संग्रह आहे. तर्कतीर्थ मुख्यतः वक्ते, प्रवक्ते आणि प्रबोधक होते. त्यांच्या जीवनाचा मोठा अवकाश भाषणांनी भरलेला होता. या प्रकल्पात चार भाषणसंग्रह नियोजित आहेत. पैकी हा 'व्यक्ती व विचार' खंड आहेत. तर्कतीर्थांची साहित्य संपदा म्हणून जे ग्रंथ आपणापुढे येतात, त्यापैकी अधिकांश भाषणसंग्रहच आहेत. त्यांच्या भाषणसंग्रहांना साहित्यिक ऐवज म्हणून मान्यता मिळणे हे मराठी भाषा व साहित्याचे उदारपण होय.

या खंडात तर्कतीर्थांनी ज्या महनीय व्यक्तींवर व्याख्याने दिली त्यांचा समावेश आहे. महात्मा ज्योतिराव फुले, महात्मा गांधी, संत रामदास, आचार्य प्र. के. अत्रे, आद्य शंकराचार्य प्रभृती मान्यवरांच्या जीवन, कार्य आणि विचारांची मीमांसा करणारी व्याख्याने गतकालात ऐकणे ही श्रोत्यांच्या दृष्टीने पर्वणी होती. सुदैवानं तर्कतीर्थांनी महत्वाची भाषणे लिहून त्याकाळात प्रकाशित केल्याने वर्तमान वाचकांना ती वाचण्यास उपलब्ध झाली आहेत. अशी व्यक्तीभाषणे यात आहेत.

त्यांच्या प्रकाशित भाषणांपैकी सर्वांनाच काही ग्रंथरूप लाभले नाही. अशा असंकलित भाषणांना या खंडात स्थान देण्यात आले आहे. या प्रकल्पान्तर्गत धर्म, साहित्य, संस्कृतीसारखा विषयांवरील भाषणांचे स्वतंत्र खंड प्रकाशित होत आहेत. या शिवायची जी वैचारिक भाषणे होती त्यांना इथे स्थान देण्यात आले आहे. विषयांची विविधता हे या खंडाचे त्यामुळे वैशिष्ट्य झाले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील सन १९२६ ते १९४२ असा जो आहे तो तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीनी वक्ता घडण्याचा काळ असल्याने त्या भाषणांचा विषय व आशय पुस्तकी, सैद्धान्तिक राहिला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील १९४८ ते १९९४ अशी पाच एक दशकातील ऐंशी भाषणे या संग्रहात आहेत. हा 'भाषणसंग्रह' (व्यक्ती व विचार) स्वरूपाचा आहेत. जी भाषणे या खंडात आहेत, ती आशयसंपन्न, विचारोत्तेजक व प्रबोधनक्षम म्हणून महत्त्वाची ठरतात. खंडातील सर्वच भाषणे वाचकांना नवे विचार व नवी दृष्टी देतील अशी आशा आहे. तर्कतीर्थांची भाषणे म्हणजे काळाला कान नि डोळे देण्याचे महत्कार्य असते.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**
**संपादक**

# अनुक्रमणिका


❍ अध्यक्षीय मनोगत तीन
❍ संपादकाचे मनोगत पाच
❍ प्रस्तावना - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: वक्तृत्व आणि कार्य अकरा

**१) व्यक्तीसंबंधी भाषणे**

१) ज्योति-निबंध १
२) गांधी आणि ख्रिस्त २५
३) महात्मा गांधी ३०
४) श्रद्धाशील बुद्धिवादी : मानवेंद्रनाथ रॉय ३५
५) काश्मिरकवी राजानक रत्नाकर ३७
६) रामदासांचे जीवनकार्य ४५
७) बागलाण सिंह : नरहर गोपाळशेठ नामपूरकर ६८
८) मांगल्याचे, प्रकाशाचे दरवाजे उघडणारे : साने गुरुजी ७०
9) M. N. Roay : A tribute 72
१०) आचार्य अत्रे : विनोद सामर्थ्याची प्रचिती ७७
११) शंकराचार्य ८०
१२) रामानुजाचार्य ९५
१३) भारतातील संगीताला नवा मार्ग दाखवणारा कलाकार : कुमार गंधर्व १०२

**२) वैचारिक भाषणे**

**अ) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भाषणे** (१९२६ ते १९४७)

१४) भारतीय तर्कशास्त्राची वाढ १०९
१५) धर्मशास्त्र विरुद्ध धर्मसुधारणा १११

| | | |
|---|---|---|
| १६) | धर्मनिर्णयाचे साधन : मीमांसापद्धती आणि बौद्धिक पद्धती | ११६ |
| १७) | महाराजा सयाजीराव गायकवाड सत्कार समारंभ प्रसंगीचे स्वागतपर भाषण | १२६ |
| १८) | हिंदू धर्मविकास व सर्वधर्मांचा समन्वय | १२८ |
| १९) | महात्मा फुले पुण्यतिथी व्याख्यान | १३४ |
| २०) | मानसशास्त्रातील दोन आधुनिक संप्रदाय | १३५ |
| | **ब) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भाषणे** (१९४८ ते १९९४) | |
| 21) | All India Conference of the Radical Democratic Party : Presidential Address | 143 |
| २२) | नवमानवतावादाची गरज | १६६ |
| 23) | From a Party to a Moment | 186 |
| २४) | आत्मशुद्धीच्या कामाला लागा | १९१ |
| २५) | मानवी बंधुत्व हाच नव्या राजनीतीचा पाया हवा | १९५ |
| २६) | निधर्मी राज्य | २०० |
| २७) | विविध संस्कृतींचा संगम आवश्यक | २०६ |
| २८) | ब्राह्मणेतर चळवळींचे उत्तर पर्व : शुद्ध सामाजिक चळवळच आता हवी | २०९ |
| २९) | भारतीय राष्ट्रीयत्व | २१७ |
| ३०) | भारताचा इतिहास आणि इतिहास तत्त्व | २३१ |
| ३१) | विकेंद्रित लोकशाही | २३९ |
| ३२) | मराठवाडा विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ हवे | २४२ |
| ३३) | भारतीय नीतिविकास : वेदकालीन नीती | २४७ |
| ३४) | प्राचीन भारतातील वादविद्या | २५२ |
| ३५) | लोकमान्य टिळकांचे ‘गीतारहस्य’ | २५८ |
| ३६) | आमच्या काळाने आम्हास घडवले | २६३ |
| 37) | प्राज्ञ पाठशाला की राष्ट्रीय एवं धार्मिक परंपरा | 267 |
| ३८) | भारताच्या ऐक्याची घडण व हिंदू धर्म | २७० |
| ३९) | पंचांग विद्या सर्वांगीण बनली जावी | २७५ |
| ४०) | अमेरिकेतील लोकशाहीचा यशस्वी प्रयोग | २८७ |
| ४१) | लोकशाही आणि समाजवाद | २९० |
| ४२) | गोवध बंदी कायदा : गरीब शेतकऱ्यांवर भार | २९४ |
| ४३) | शिक्षणाला वैज्ञानिक अधिष्ठान हवे | २९६ |
| ४४) | भारतीय संस्कृती : शोध व बोध | ३०३ |

४५) हिंदुधर्म :  तत्त्व आणि व्यवहार ३०८
४६) लोकशाहीचे तात्त्विक अधिष्ठान ३१०
४७) मी परिवर्तनवादी शास्त्री ३१२
४८) श्रमातून येणारे जग मोलाचे ३१७
49) Freedom and Social Responsibility 320
५०) संपूर्ण राजकीय क्रांती ३२८
५१) हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास ३३४
५२) लोकशाहीसाठी सत्तेवर अंकुश ठेवणारे गट हवेत ३४४
५३) अध्यक्षीय पद्धत भारताला उपयुक्त आहे का? ३४७
५४) विज्ञाननिष्ठ मानवतावाद हाच सत्याप्रत जाण्याचा मार्ग ३५०
५५) ज्ञान व वस्तुस्थिती समन्वयक आचरणाची सवय हवी ३५३
५६) जीवविज्ञानात दिसणारा मानव ३५५
५७) विज्ञान व संस्कृती ३६६
५८) भारतीय संस्कृतीच्या विकासाची दिशा ३७७
५९) विश्वधर्माशी समन्वित राष्ट्रीय एकात्मता ३९०
६०) भविष्यकाळ घडविणारा माणूस दिसावा ३९६
६१) संभवामि युगे युगे ४००
६२) महाभारतातील धर्मशास्त्र, प्रवृत्ती मार्ग, राजकारण व व्यवहार नीती ४०५
६३) भारत : राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया ४२३
64) भारतीय संस्कृति और भारतीय राष्ट्रीयता का निर्माण 438
६५) धार्मिक पुनरुज्जीवन व त्यांचे परिणाम ४४६
६६) बौद्ध धर्म व भारतीय संस्कृती ४५३
६७) बुद्धिप्रामाण्य चळवळ निर्माण करण्याचे कर्तव्य ४७९
६८) उच्च शिक्षणाचे तत्त्वज्ञान ४८२
६९) धर्म आणि नीती ४८८
७०) वैश्विक जाणिवेवर आधारलेली संस्कृती हवी ५०२
७१) एकाच प्रकाराच्या विचाराने भारत रशिया होईल ५०७
७२) मानवतावादी समाजनिर्मितीसाठी वृत्तपत्राने झटावे ५०९
७३) वर्णाधारित उच्चनीचतेस आव्हान आवश्यक ५१०
७४) हुंडा निर्मूलनामुळे स्त्रियांचा सन्मान ५११
७५) मंदीर-मशीद प्रश्नावरील डोकेफोड हा निर्बुद्धपणा ५१२

७६) आर्थिक जीवन मजबूत करणे महत्त्वाचे ५१३
७७) राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्याची जरुरी ५१५
७८) सर्वधर्मसमभावाची गरज ५१६
७९) भारतीय तत्त्वज्ञानात विश्वव्यापक विचार ५१८
८०) उच्च मूल्यांच्या चिंतनाची गरज ५१९
८१) जो तत्त्वभ्रष्ट, तो पदभ्रष्ट असे समीकरण साधले पाहिजे ५२०

**समारोप** ५२३

○ **लेखांची पूर्वप्रकाशनसंबंधी संदर्भ सूची** ५२५ ते ५३३

**परिशिष्टे**

१) ऋणनिर्देश ५३७
२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परिचय ५४१
३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भग्रंथ सूची ५४५ ते ५५४
४) संपादक परिचय ५५५

***

## प्रस्तावना
# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : वक्तृत्व आणि कार्य

*** पार्श्वभूमी**

माणूस आणि प्राणी यांच्यात फरक आहे. हा फरक भाषा, हसणं, विचार क्षमता, बुद्धी इत्यादींमुळे आहे. यांच्यामुळेच माणसात अभिव्यक्ती आणि आविष्कार क्षमता विकसित झालेल्या आहेत. अनुभूती आहे म्हणून अभिव्यक्तीची ओढ, ऊर्मी आणि ऊर्जा आहे. संवाद, देवाण-घेवाण ही सांस्कृतिक आणि सामाजिक विकासकाळात माणसाची गरज बनून पुढे आली. प्रारंभीच्या काळातलं माणसाचं व्यक्त होणं, गुणगुणणं, चित्र चितारणं हा स्वांत:सुखाय असा व्यक्तिगत उपक्रम होता. त्याला त्याच्या समाजशील वृत्तीतून सार्वजनिक रूप आलं. पुकारा, आरोळी, शीळ, आक्रोश, छाती बडवून घेणं, टाळी वाजवणं ही एकेकाळची माणसाची सूचक अशी भाषाच होती. तिला लोकव्यवहारातून सांकेतिक रूप आलं. सुपारी, नारळ, अक्षता, राख, कोळसा, अग्नी ह्या वस्तू शुभ- अशुभ, शपथ, वचन इत्यादींच्या प्रतीक बनत माणसाची अभिव्यक्ती सार्वजनिक बनत गेली. माणूस देहबोलीतून बोलायचा. पुढे त्याला वाचासिद्धी लाभली. तो बोलू लागला. चित्र सूचक बनत लिपी झाली. लिखिताला सूचक उच्चारण आलं. वर्ण, स्वर, व्यंजनं तयार झाली. 'ग' म्हणजे गमन. 'ज' म्हणजे जल आणि 'ल' म्हणजे लय झालं. सूक्ष्म भाव व्यक्त करायच्या गरजेतून काना, मात्रा, वेलांटी, उकार, ऋकार देत शब्दसामर्थ्य वाढलं. 'खग', 'मग', 'बघ'चं खगोल, मागील, बघू झालं. भाषा समृद्ध नि प्रभावी बनली. तिला उच्चार, लय, ताल, सौंदर्यांनी कलात्मक रूप आलं. भाषणकला विकसित झाली. श्रृती, स्मृती, वाक्चातुर्य नि चमत्काराने नेतृत्व, गुरुत्व प्रदान केलं. बहुभाषिकतेनं माणूस ज्ञानी झाला. सांगणं, बोलणं, भाषण, प्रवचन, उपदेश, शास्त्रे शस्त्र बनली. बोलीची भाषा झाली. वाङ्याचे साहित्य झाले. कला आणि विज्ञानाने जग जिंकता येतं, हे कळल्यावर माणूस त्यांची साधना करू लागला. प्रावीण्य, चातुर्य, पारंगतता, वक्रता, वक्रोक्ती, वक्तृत्व, वाक्पटुता यांना सामाजिक महत्त्व आलं. नेता, कार्यकर्ता, वकील,

शिक्षक, विक्रेता अशा सर्वांना भाषणावर जगता येऊ लागलं नि समाजाला जागंही करता येऊ लागलं. बोलणारा 'जागल्या' झाला. 'बोलणाऱ्याची माती विकते, न बोलणाऱ्याचे मोती पडून राहतात', हे जितकं खरं तितकं 'माती नि मते जगवेल त्याला मत' असा काळ येऊन ठेपला हेही तितकंच खरं!

**वक्तृत्व :**

यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे भाषण ही कला आहे. ती श्रोत्यांना प्रभावित आणि प्रबोधित करते. भाषणात श्रोत्यांवर आपल्या वक्तृत्वातील विचार नि भावनांद्वारे प्रेरणा देता येते. विचार पटवून देण्याचं सामर्थ्य ज्या वक्त्यात असतं, तो प्रभावी व्याख्याता मानला जातो. 'वाक्' हा शब्द भाषा, वाणी आणि उच्चार व्यक्त करतो, त्यामुळे वाणी उच्चारण नि व्यक्त होण्यातून विचाराचं संक्रमण घडविणारी कला म्हणून वक्तृत्व ओळखलं जातं. 'भाषा' या शब्दात वचन, आश्वासन, प्रभावाचा अर्थ भरलेला आहे. त्यावरून भाषणात आश्वासन येतं नि ते ऐकणाऱ्यांवर आपला ठसा, प्रभाव उमटवतं. भाषण, वक्तृत्व, व्याख्यान, संभाषण, संवाद, उद्बोधन, प्रबोधन, प्रवचन, हितोपदेश हे भाषणाचे नुसते पर्यायी शब्द नसून, ते भाषणाचे कार्य आणि स्वरूपभिन्नता व्यक्त करण्याचे द्योतक होत.

वंचित आणि पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या गरजेतून जगात भाषणकला उदयास आली. इसवी सन पूर्व पाचव्या शतकात सिराक्यूझ (सिसिली बेट) नामक ग्रीक वसाहतीत हद्दपार करण्यात आलेल्या लोकांवर अन्यायाने खटले भरण्यात आले. तेव्हा अत्याचार पीडितांची बाजू मांडण्याचं काम कोरॅक नावाच्या संवादकाने केले. तोच भाषणकलेचा जनक मानण्यात येतो. पेरिक्लिझ, डिमॉस्थिनिज हे त्याच काळातील प्रभावी वक्ते. ॲरिस्टॉटलही चांगला संभाषक होता. पेरिक्लिझचं एका अंत्येष्टीच्या वेळी दिलेलं भाषण 'फ्यूनरल ओरेहान' जसं प्रभावी तसं शेक्सपिअरच्या 'ज्युलियस सीझर' नाटकातलं अँटोनीचं 'ब्रुटस् यू टू'!

भारतीय इतिहासातही अगदी 'रामायण' आणि 'महाभारत'मध्ये प्रभावी संवाद का कमी आहेत? 'संजय उवाच', हा संवाद भाषणच. गेल्या शतकात लोकमान्य टिळक, 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी असेच. 'लाल, बाल, पाल' शब्द भाषणांमुळेच स्वातंत्र्य इतिहासात रूढ झाला. जगात सत्तांतरे घडली ती भाषणांमुळेच. 'आय कांट ब्रीथ'या जॉर्ज फ्लॉइडच्या (२०१४) एका वाक्यामुळे हजारो कृष्ण-श्वेत अमेरिकन नागरिक रस्त्यावर येतात. एक वाक्यही समाज, निवडणुका, क्रांती, संघर्षात प्रभावी ठरतं ते शब्द नि संदर्भ सामर्थ्यामुळं! स्वातंत्र्य आंदोलनातून महाराष्ट्राला लोकमान्य टिळक लाभले. गांधीयुगात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींसारखा तरुण जो वेद, पुराण, व्याकरण, न्याय जाणणारा, त्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता, क्रांती शब्द, मूल्ये समजून घेतली आणि तो स्वातंत्र्यपूर्व काळातला क्रांतिकारक नवमहाराष्ट्राचा प्रवक्ता बनला.

लक्ष्मणशास्त्री जोशींचं 'तर्कतीर्थ' बनणं आधुनिक महाराष्ट्रातील थोर विचारवंत, राष्ट्रीय संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे संस्थापक संपादक, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतरकार, शास्त्र-पुराणांतील कथनांना आधुनिक पुरोगामित्वाची जोड आणि दृष्टी देणारे धर्मसुधारक म्हणून लक्ष्मणशास्त्री जोशी यांना ओळखले जाते.

संस्कृत साहित्याचा अभ्यास करण्यासाठी ते पिंपळनेर (जि. धुळे)हून वाई (जि. सातारा) येथील नारायणशास्त्री मराठे यांच्या प्राज्ञपाठशाळेत वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे सन १९१४ मध्ये दाखल झाले. प्रज्ञापाठशाळा ही त्यावेळी धर्मसुधारणा आणि राष्ट्रीय भावना निर्माण करणारे विद्याकेंद्र म्हणून ओळखली जायची. त्यांचं प्राथमिक शिक्षण पिंपळनेरच्या प्राथमिक शाळेत झालं. तिथं ते लिहायला आणि वाचायला शिकले. पिंपळनेरच्या त्यांच्या घरासमोर बाबासाहेब देशमुखांचा वाडा होता. ते धर्मानुरागी गृहस्थ होते. 'एकनाथी भागवत', 'तुकारामांचे अभंग', 'कबीर भजने' यांचे वाचन, गायन, पारायण चालायचे. वाड्यात दर मंगळवारी प्रसिद्ध होणारे साप्ताहिक 'केसरी' गुरुवारी यायचे. त्याचे नियमित, सार्वजनिक, जाहीर वाचन होत रहायचे. या सर्वांतून बाल लक्ष्मणावर धर्म नि राष्ट्रीय भावनेचे संस्कार होत गेले. सन १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यात अटक करून त्यांची मंडालेच्या तुरुंगात रवानगी केल्याचा विलक्षण प्रभाव अन्यजनांबरोबरच्या वातावरणाने बाल लक्ष्मणावर पडल्याचे त्यांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे.[१]

प्राज्ञपाठशाळेत येऊन प्रथम ते व्युत्पत्ती शिकले. 'शास्त्रसेवामधारय' म्हणत व्याकरण, न्याय, वेदांत शिकले. 'न्याय-मुक्तावली'च्या अभ्यासातून तर्कशास्त्र, न्याय वैशेषिक शिकले. पुढे 'वेदान्तसार', 'पञ्चदशी', 'लघुसिद्धान्तकौमुदी', 'तर्कदीपिका'चे अध्ययन झाले. त्याबरोबरीने इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र, व्याकरण, गणितही त्यांना शिकविले गेले. प्राज्ञपाठशाळा केवळ संस्कृत पाठशाळा नव्हती, तर राष्ट्रीय शिक्षण देणारी माध्यमिक शाळासुद्धा होती. तिच्यात आधुनिक शिक्षणही देण्यात येत असे.[२] ही शाळा पूर्वी जरी मठ असली तरी तिला आता आश्रमाचं रूप आलेलं होतं.

आश्रमाचा दिनक्रम म्हणजे परिपाठ असायचा. प्रात:काळी ५ वाजता उठणे. नंतर सामूहिक प्रार्थना, स्नानसंध्या, सूर्यनमस्कार, योगासने होत. अध्यापनात चमत्कार, अवतार, कार्मकांडापेक्षा विवेकवाद, बुद्धिवाद, राष्ट्रवादावर भर असायचा. ब्रह्मचर्य विद्याध्ययनाची अट होती. पूर्वावलोकन, पाठ, चिंतनिका असा घडणीचा क्रम असे. परीक्षा व्हायच्या. "प्रत्येक सोमवारी सुटी असे. सुटीत सकाळपासून दुपारपर्यंत अंगमेहनतीची कामे विद्यार्थी व शिक्षक करीत. त्यात सारवणे, शौचकूप साफ करणे इत्यादी कामे व्हायची. सायंकाळी ४ ते ६ पर्यंत व्याकरणे आणि पुराण प्रवचने चालत. संध्याकाळच्या सुमारास दोन तास मंत्रपुष्प आणि शास्त्र चर्चा चाले. ही चर्चा संस्कृतमध्ये होई. मी न्यायवैशेषिक दर्शनाचे अध्ययन करू शकलो. तेव्हा म्हणजे १९२३ मध्ये या शास्त्र चर्चेत भाग घेऊ शकलो. व्याख्यानांमध्ये मला गुरुवर्यांनी बराचकाळ शेवटून पहिला क्रमांक दिला. परंतु, शास्त्र चर्चेत वरून पहिला दिला."[३] अशांतून एक बटू विद्याभ्यासी पंडित बनला.

अशा शास्त्र-चर्चांमधील प्रावीण्यपूर्वी लक्ष्मण जोशी यांचा परिचय सन १९१६ मध्ये विनोबा भावे यांच्याशी झाला. ते प्राज्ञपाठशाळेत शांकरभाष्य शिकण्यासाठी बडोद्याहून आले होते. सुमारे दहाएक महिने ते वाईच्या प्राज्ञपाठशाळेत होते. विनोबांचा वाचन, अध्ययनाचा व्यासंग मोठा होता. गीर्वाणवाणी (संस्कृत)वर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचे संस्कृत पठन-पाठन ऐकून साक्षात स्वामी केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) जे लक्ष्मण जोशींचे गुरू होते, ते एकदा म्हणाले होते की, 'गीर्वाणवाणीचे इतके सुंदर उच्चारण ऐकले म्हणजे ही देववाणी आहे, असे प्रत्ययास येते; आद्य शंकराचार्यांची ही वाणी आहे, अशी ओळख पटते.'[४] विनोबा भावे यांचे वक्तृत्व लक्ष्मण जोशी यांच्यापेक्षा तेव्हा सरस होते. त्यासंबंधीचा प्रसंग मुळातूनच वाचला पाहिजे.[५] शास्त्रार्थ स्पर्धा आणि अशा वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, खंडनमंडन इत्यादींतून लक्ष्मण जोशी या तरुण विद्यार्थ्याचे वक्तृत्व संस्कारित होत फुलत गेले. पुढे इंग्रजी शिकायचे म्हणून लक्ष्मण जोशी यांनी आपले सहाध्यायी दामोदरशास्त्री कोनकर आणि धुंडिराज देव यांच्यासह वाईहून गुरुजींना न सांगता पलायन केले. यामागे अमेरिकेत जाऊन आधुनिक शिक्षण घेण्याचे स्वप्न होते. पण ते अपूर्णच राहिले.[६]

नंतर लक्ष्मण जोशी यांनी पदवी शिक्षण घ्यायचे म्हणून १९१८ मध्ये वाराणसी (काशी) ला प्रस्थान ठेवले. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे शिष्य योगानंद यांच्या मठात राहून ते तिथे नसल्याने लक्ष्मण जोशी यांनी मठाजवळील लक्ष्मणशास्त्री द्रविड यांच्या पाठशाळेत पदवी शिक्षणाचा अभ्यास पूर्ण केला. या पाठशाळेत लक्ष्मणशास्त्री द्रविड, त्यांचे चिरंजीव राजेश्वरशास्त्री, नित्यानंद पर्वतीयशास्त्री प्रभृतींकडून शिक्षण पूर्ण केले. नित्यानंद पर्वतीयशास्त्री 'चतु:शास्त्री' म्हणून विख्यात होते. ते व्याकरण, न्याय, मीमांसा आणि अलंकारशास्त्र या चार विषयांचे अधिकारी होते. प्राज्ञपाठशाळा, वाई येथील गत चार-पाच वर्षांचे (१९१४-१९) अध्ययन-अध्यापन उत्तम झाल्याने वाराणसीत फारशी अडचण आली नाही. इथेच राजेश्वरशास्त्रींचे गुरू महानैयायिक वामाचरण भट्टाचार्य यांचे सान्निध्य आणि मार्गदर्शन लाभले. त्याकाळी काशीत (वाराणसी) संस्कृत महाविद्यालय होते; पण लक्ष्मण जोशी यांनी त्याऐवजी गुरुकुल शिक्षण पसंत केले. हा प्राज्ञपाठशाळेच्या अनौपचारिक शिक्षणाचा प्रभाव आणि परिणाम होता.

सन १९१९ ते १९२१ अशी तीन वर्षे काशीत राहून पदवी परीक्षा देण्यासाठी म्हणून रेल्वेने ते सन १९२२ मध्ये कलकत्त्याला निघाले होते. वाटेत बारडोली स्टेशनवर गाडी थांबली होती. स्टेशनवर प्रचंड गर्दी पाहून ते गर्दी कशासाठी झाली, हे पाहण्यासाठी उतरले. तेव्हा कळले की, स्टेशनजवळच असलेल्या बारडोलीच्या स्वराज्य आश्रमात महात्मा गांधी असून, त्यांनी चौरीचौरा (जि. गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथील आंदोलनाला हिंसाचाराचे गालबोट लागले म्हणून उपोषण सुरू केले होते. २ फेब्रुवारी, १९२२ रोजी चौरीचौरा येथे झालेल्या निदर्शनात पोलिसांनी क्रूर लाठीमार केला. त्याचा निषेध म्हणून ५ फेब्रुवारीला

सुमारे अडीच हजार निदर्शक जमले होते. पोलिसांनी निदर्शक सत्याग्रहींवर गोळीबार केला होता. तीन सत्याग्रही हुतात्मा झाले होते. उग्र झालेल्या निदर्शकांनी पोलीस ठाण्यालाच आग लावली. त्यात २२-२३ पोलीस मृत झाले. संचारबंदी लागू करण्यात आली. गांधीजींनी हिंसेचा विरोध म्हणून ५ दिवस उपोषण सुरू करून नंतर आंदोलन मागे घेतले होते.

तरुण लक्ष्मण जोशी यांची घडण ज्या राष्ट्रीय वृत्तींच्या वातावरणात झाली होती, तिचा प्रभाव इतका प्रखर होता की, त्यांनी परीक्षा, प्रवास सोडून महात्मा गांधींच्या आश्रमाचा रस्ता धरला. इथे ते दोन महिने आश्रमात राहिले. सन १९२० ला महात्मा गांधींनी प्राज्ञपाठशाळेस भेट दिली होती. तोही प्रभाव होता. पुढे वर्षानंतर सन १९२३ मध्ये त्यांनी कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी संपादन केली. त्यानंतर ते प्राज्ञपाठशाळा, वाई येथे विधिवत अध्यापक म्हणून कार्य करू लागले. न्याय, वेदान्त हे त्यांचे अध्यापनाचे विषय होते. तेव्हापासून ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणून ओळखले जाऊ लागले.

**वक्तृत्वाद्वारे धर्मसुधारणेचे कार्य**

प्राज्ञपाठशाळा, वाई; योगानंद मठ, काशी येथील अध्ययन, अध्यापन, शास्त्रार्थ संगती, व्याख्याने, चर्चा, वादविवाद, चिंतनिका, व्युत्पत्ती, मीमांसा, पंक्ती लावणे, अर्थसंग्रह, तर्कसंग्रह इत्यादी ज्ञानसाधना आणि उपक्रमांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वक्तृत्वकौशल्य दिवसागणिक विकसित होत गेले. वाचन, चिंतन, मनन, इ. प्रक्रियेतून तर्कतीर्थ स्वमत तयार करीत. 'बाबा वाक्यं प्रमाणम्'च्या विरुद्ध 'विद्यावता भागवते परीक्षा' अंगिकारून त्यांनी स्वत:ची अशी प्रतिपादन, चिकित्सा, मीमांसाशैली विकसित केली, त्यामुळे सनातन वा पारंपरिक पंडितांशी वादविवाद आता नित्याचीच गोष्ट होऊन बसली होती.

सन १९२३ ला वाईमध्ये ब्राह्मण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेत ब्राह्मण पोटजातींच्या एकीकरणाचा मुद्दा उपस्थित झाला. मुळात या पोटजाती आख्यायिकांवर आधारित आहेत. तर्कतीर्थांनी परिषदेत आख्यायिकांच्या आधारे पोटजाती करणे वा मानणे आणि त्याआधारे आचारप्रामाण्य सिद्ध करणे चुकीचे असल्याचे प्रतिपादन केले. त्यावर परिषदेत प्रक्षोभ तयार झाला. परिषद उधळायची वेळ आली. स्वामी केवलानंद सरस्वतींनी तर्कतीर्थांचा प्रतिवाद हा धर्मशास्त्रानुसार अर्थवाद असल्याचे स्पष्ट केले. अर्थवाद मानू नये, असे धर्मशास्त्रात म्हटलेले जाहीर आहे. त्यावर एवढा गहजब करण्याचे कारण नाही. या पहिल्या जाहीर वादविवादामुळे तर्कतीर्थ हे स्वतंत्र विचाराचे शास्त्री असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. तद्वतच आपली मते धीटपणे व्यक्त करण्याच्या त्यांच्या बाण्याचा परिषदेवर प्रभाव पडणे (जरी त्यांचे मत स्वीकारार्ह ठरले नाही तरी) स्वाभाविक होते.

सोनगीर हे धुळे जिल्ह्यातील एक ऐतिहासिक गाव. तिथे सन १९२६ (माघ, शके १८४७)मध्ये केशवदत्त महाराज यांच्या पुढाकाराने धर्म परिषद योजण्यात आली होती. या परिषदेस सर्व धर्मपीठांच्या शंकराचार्य यांना आणि धर्म निर्णय, शास्त्रार्थ करणाऱ्या पंडित, पुरोहितांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर परिषद कुकरमुंडा (जि. सूरत, गुजरात) येथील वैष्णव संस्थानचे अधिपती यांनी योजली होती. गुजरातेतील वल्लभ संप्रदायाचे पुष्टिमार्गी आचार्य शारदापीठाचे शंकराचार्य, पुरीचे शंकराचार्य, करवीरपीठाचे शंकराचार्य कुर्तकोटी इत्यादींना आमंत्रित करण्यात आले होते. काशी, कलकत्ता, मद्रास येथील मोठ्या पंडितांना बोलाविण्यात आले होते. काशीचे लक्ष्मणशास्त्री द्रविड, राजेश्वरशास्त्री द्रविड, कलकत्त्याचे महावेदांती अनंतकृष्ण शास्त्री इ. उपस्थित होते. स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही परिषदेस उपस्थित होते. परिषद ही धर्मसुधारणेबाबतची विविध आचार्य, पंडित इत्यादींची मते जाणून घेण्यासाठी योजण्यात आली होती. या परिषदेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रतिवाद केला.[७] चर्चा मीमांसा पद्धतीविरुद्ध ऐतिहासिक पद्धतीच्या दृष्टिकोनावर आधारित अशी झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मानवी बुद्धीला धर्मपरिवर्तन करता येते,' हे ऐतिहासिक पद्धतीने सांगितले. वेद, स्मृती, पुराणादींमध्ये ऋषी-मुनींनी परस्परविरोधी जे आचार सांगितले आहेत, ते सप्रमाण सादर केले, शिवाय वेद हे 'अपौरुषेय' नाहीत, असे ठाम प्रतिपादन केले. वेद पौरुषेयच आहेत, अनंतकृष्ण शास्त्री यांनी तर्क स्पष्ट केले. मग तर्कतीर्थांनी 'शंकराचार्य ईश्वर नसून माणूसच आहेत,' असे आपले मत मांडले. ऋषी, मुनी, आचार्य त्रिकालदर्शी नसून माणसंच आहेत. सबब वेद पौरुषेयच आहेत म्हटले म्हणून परिषदेत क्षोभ निर्माण झाला. त्यावर स्वामी केवलानंद सरस्वतींनी आपली वादपद्धती दार्शनिक आहे. चार्वाक, शंकराचार्य, बुद्ध या सर्वांचे विचार पूर्वपक्ष होत. वैदिक-अवैदिक चर्चा हा नित्यक्रम आहे, त्यामुळे मत स्वातंत्र्य पूर्वापार आहे, हे सिद्ध केले.

त्यामुळे परिषद चर्चा सुरू राहिली; पण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित आचार्य, पंडितांच्या परिषदेपुढे प्रगत, पुरोगामी दृष्टिकोन मांडून आपण पढीक पंडित नसून, नवविचारक धर्मसुधारणावादी आहोत, हे आपल्या वक्तृत्व, विवेचनातून स्पष्ट केले. त्याची ऐतिहासिक नोंद महत्त्वाची आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सहाध्यायी श्री. शं. नवरे यांनी म्हटलेले खरे आहे की, 'जुन्या पंडितांचे वादविवादाचे विशिष्ट आडाखे ठरलेले असतात. त्या परंपरेतच शास्त्रीबुवा वाढलेले असल्यामुळे केवळ या आडाख्यांच्या चापांत पकडून त्यांना कोणीही आडवू शकत नाही'.[८]

यानंतर सन १९२७ ला हैदराबाद येथे हिंदुधर्म परिषदेचे अधिवेशन झाले. त्यात वरील विचारांचाच आढावा घेण्यात आला. कै. वामनराव नाईक यांनी ही परिषद आयोजित केली होती. पुढे याच वर्षी डिसेंबरमध्ये अकोला येथे ब्राह्मण परिषदेचे आयोजन करण्यात आले

होते. स्वामी केवलानंद सरस्वतींची या परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. महादेवशास्त्री दिवेकर (प्राज्ञपाठशाळा शिक्षक) यांनी परिषदेत मोठे कार्य केले. त्यांनी ब्राह्मणांच्या पोटजातींची माहिती गोळा करून पुस्तिका प्रकाशित केली. पोटजाती एकीकरणाच्या कार्यास यामुळे गती आली आणि बळही मिळाले. परिषदेस 'ब्राह्मणपत्रिका' इस्लामपूरचे वासुदेवराव मुंडले, बापूजी अणे, डॉ. मुंजे, हैदराबादचे वामनराव नाईक, कानडे शास्त्रीप्रभृती उपस्थित असल्याची नोंद स्वामी केवलानंद सरस्वतींच्या आत्मचरित्र हस्तलिखितात आढळते.[९]

प्राज्ञपाठशाळेच्या पुढाकारातून स्वामी केवलानंद सरस्वती आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९२० पासून जे प्रयत्न सुरू केले होते. त्यास सन १९२५च्या 'धर्मकोश' १७ खंड आणि सन १९५२ नंतरच्या 'मीमांसाकोश'च्या ७ खंडांमुळे गती येत गेली, हे जरी खरे असले तरी अशा परिषदांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भीडभाड न बाळगता जे बिनतोड युक्तिवाद केले, ते त्यांच्या संस्कृत भाषेवरील अधिकार, सभाधीटपणा आणि प्रभावी वक्तृत्वचातुर्य यांमुळे धर्मसुधारणेचे कार्य समाजमान्य आणि स्वीकृत होत गेले.

सन १९२८च्या २८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर असे सलग दहा दिवस काशी येथे जे 'अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासंमेलन' संपन्न झाले. ते तर्कतीर्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे बहुचर्चित झाले. या महासंमेलनासाठी केवळ संस्कृत पंडितांनाच आमंत्रित करण्यात आले होते. संमेलन चर्चेसाठी समयबंध निश्चित करण्यात आला होता. तो पक्षपाती असल्याने के. ल. दप्तरी, मुरुडकर शास्त्री, सिद्धेश्वर शास्त्री चित्राव प्रभृतींनी महासंमेलनातून सभात्याग करीत बहिष्काराचे अस्त्र अवलंबिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वादविवाद करून चर्चा घडवून आणण्याचे धोरण अवलंबिले. या संमेलनात धर्मशास्त्राचे जाणकार आणि विशेषाधिकारी गणले गेलेले सर्वश्री महामहोपाध्याय पंचानन शास्त्री, तर्करत्न भट्टाचार्य, महामहोपाध्याय वामाचरण भट्टाचार्य, महामहोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रविड, महामहोपाध्याय अनंतकृष्ण शास्त्री, न्यायाचार्य राजेश्वरशास्त्री, ताराचरण भट्टाचार्य, शिरोळकर शंकराचार्य यांच्यासारखे अनेक मान्यवर, पीठासीन पंडित, शास्त्री असे ७०० विद्वान जमले होते. एकट्या बंगालमधूनच १५० पंडित आले होते. तर्कतीर्थांनी संमेलनाच्या प्रारंभीच नियमांतील पक्षपातीपणा लक्षात आणून देऊन खुलासा मागितल्याने एकच गोंधळ उडाला. पहिल्या दिवशी संमेलन संपल्यावर काशीच्या टाऊन हॉलमध्ये सनातनी वर्चस्वास आव्हान देऊ पाहणाऱ्या पुरोगामी पंडितांची स्वतंत्र बैठक बोलविण्यात आली होती. त्यास सुमारे ३५ पंडित उपस्थित होते. या दबावगटाने पुरोगामी धोरणावर दृढ राहण्याचे ठरविल्याने पुढे संमेलनात खडाजंगी चर्चा होत राहिल्या. संमती वय, विवाह वय, पोटजाती, जातिद्वेषमूलक ग्रंथांचे अप्रामाण्यत्व, पोटजाती विवाह अशा अनेक विषयांवर तर्कतीर्थांच्या नेतृत्वाखाली वादळी चर्चा झडत राहिल्या, त्यामुळे यापूर्वी संमेलनावर असलेले सनातनी

ब्रह्मवृंदाच्या एकांगी वर्चस्वास आव्हान दिले गेले. एक विरुद्ध ७०० असेच ते स्वरूप होते. शंकराचार्यांनी अधिकाराचा वापर करीत सनातनी ठराव केले तरी वृत्तपत्र इ.मधून चर्चेस मोठी प्रसिद्धी मिळाल्याने धर्मसुधारणा विचारांचा व्यापक प्रचार, प्रसार देशभर होण्यास साहाय्य झाले. धार्मिक क्षेत्रात धर्मसुधारणेसंबंधी लोकजागृती करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य स्वामींच्या नेतृत्वाखाली तर्कतीर्थांनी केले.

पुढील वर्षी लगेचच सन १९२९ मध्ये पंडित मदनमोहन मालवीय यांनी प्रयागला सनातन धर्मपरिषदेचे आयोजन केले होते. त्यात अस्पृश्यांच्या मंत्राधिकारावर चर्चा झाली. 'नम:शिवाय' की 'शिवाय नम:' म्हणायचे, यावर वादंग झाले. तर्कतीर्थ या संमेलनास गेले नव्हते, तर पंडित मालवीय यांनी पुण्यास चित्रशाळेच्या पत्त्यावर तार करून मत मागविले. ही होती तर्कतीर्थांच्या व्यासंगी धर्मसुधारणा प्रयत्नांना मान्यता आणि पावती.

या सर्व धर्मसुधारणांच्या पार्श्वभूमीवर पुढे सन १९३२-३३ मध्ये महात्मा गांधींनी सुरू केलेल्या अस्पृश्यता निवारण, नंतर मंदीर प्रवेश अशा उपक्रमांना समाजाचा पाठिंबा चढत्या भाजणीने मिळत राहिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी न थांबता पुढे वृत्तपत्रांतून लेख लिहिले. निबंध प्रकाशित केले. 'शुद्धिसर्वस्वम्' (१९२८), 'भारतेतिहासतत्वम्' (१९३३), 'अस्पृश्यत्वमीमांसा' (१९३४) सारखे साहित्य म्हणजे धर्मसुधारणा चळवळीसंदर्भातील सप्रमाण संशोधनपर लेखनच होय. ते आज सुमारे शतकानंतर वाचत असताना तर्कतीर्थांची भविष्यवेध घेत केलेली पुरोगामी भरारीच वाटते. सन १९३० मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'नवामनु'[१०] मासिकातून 'धर्मशास्त्र विरुद्ध समाजसुधारणा' या शीर्षकांतर्गत लेखमालिका लिहून एकप्रकारे धर्मसुधारणेसंबंधी आपली प्रतिबद्धता आणि प्रतिज्ञाबद्धताच जाहीर केलेली दिसून येते.

**स्वातंत्र्य चळवळीतील जनजागृती व जनसंघटन**

वेदविद्या शिकण्याच्या हेतूने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत सन १९१४ ला दाखल झाले होते. तेव्हाची प्राज्ञपाठशाळा केवळ वेदाध्ययनाचे धडे देणारी वेदशाळा राहिली नव्हती. स्वत: नारायणशास्त्री मराठे हे राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते होते, त्यामुळे प्रा. वि. गो. विजापुरे यांनी पुण्याजवळील तळेगाव दाभाडे येथे सन १९०६ ला राष्ट्रीय शिक्षण देण्याचे हेतूने सुरू केलेले समर्थ विद्यालय ब्रिटिश सरकारने नाशिक येथील ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन यांची हत्या होताच, सन १९१२ ला तडकाफडकी बंद केले. ब्रिटिशांचा संशय होता की, तिथे सशस्त्र क्रांतीचे धडे दिले जातात. अचानक समर्थ विद्यालय बंद झाल्याने तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांपुढे पर्याय शोधणे अनिवार्य झाले. समविचारी शाळा म्हणून त्यांनी प्राज्ञपाठशाळेची निवड केली. नारायणशास्त्री मराठी यांनी त्यास संमती दिली. सन १९१२ लाच दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर हे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसह प्राज्ञपाठशाळेत आले. 'त्यांना असे वाटत असे की, क्रांतीच्या मागे वेदांताची

प्रेरणा पाहिजे.'[११] खुदीराम बोस हा क्रांतिकारी फाशीला जाताना 'भगवद्गीता' घेऊन गेला होता, ही घटना यामागची प्रेरणा होती.

"प्राचीन गुरुकुल पद्धतीचा पुनरुद्धार व्हावा आणि तिच्याद्वारे मातृभाषेचे माध्यम धरून नव्या आणि जुन्या विद्यांच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, भारतीय आध्यात्मविद्येची महती वाढावी, स्वदेशाच्या स्वाभिमान पोषक इतिहासाची मांडणी व्हावी आणि उत्तम धर्मनिष्ठ सेवकांची निर्मिती व्हावी असा विचारप्रभाव गाजवू लागला. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'ने स्वभाषेचा अभिमान उत्पन्न केला होता. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीयत्वाची प्रेरणा उत्पन्न केलेली होती आणि बाबू अरविंद घोष, विवेकानंद व रामतीर्थ यांनी भारतीय अध्यात्मविद्येचा महिमा वाढविला होता. या सर्व गोष्टींचा संकलित प्रभाव आमच्या आश्रमावर पडला होता. स्वधर्म आणि स्वदेश यांची सेवेची दीक्षा घेतलेले लोक पाहिजेत, अशी अपेक्षा त्यावेळच्या राजकीय चळवळीत निर्माण झाली होती."[१२] या वर्णनातून तर्कतीर्थ स्वातंत्र्य चळवळीत कसे ओढले गेले हे स्पष्ट होते.

धर्मसभा नि धर्म परिषदांतील एकांगीपण आणि हेकेखोरपणा यांचा वीट येऊन तर्कतीर्थांनी स्वत:ला स्वातंत्र्य चळवळीशी बांधून घेण्याचे ठरविले अन् सन १९३०च्या महात्मा गांधींच्या कायदेभंग आंदोलनात ते सक्रिय झाले. वाईतील त्यांची व्याख्याने प्रभावित करणारी ठरत होती, ते लक्षात घेऊन कराड येथे प्राज्ञपाठशाळेच्या वतीने तेथील विद्यार्थी 'आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू' असं आश्वासन देत प्रभातफेऱ्या काढत. याच सुमारास कृष्णेच्या घाटावर कराड येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची सलग आठ-दहा भाषणे झाली. ४-५ मे, १९३० ला मिठाच्या सत्याग्रहात महात्मा गांधींना अटक झाली. जनतेतील क्षोभ टोकाला गेला होता. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या भाषणांच्या अनेक आठवणी यशवंतराव चव्हाण यांनी लिहून ठेवल्या आहेत. अनेक लेख आणि 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रात यांच्या नोंदी आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी "शेतकऱ्यांत जाऊन एकंदर पंचेचाळीस भाषणे दिली. कराडच्या घाटावर सतत सात दिवस कायदेभंगावर व्याख्याने दिली. दहा दहा हजार लोक व्याख्यानासाठी जमत. 'काय नाटकावानी बोलतुया' असे उद्गार काही शेतकऱ्यांनी काढले, तेव्हा तेथील प्रसिद्ध वकील आळतेकर, पांडुआण्णा शिराळकर, राघुअण्णा धोपाटे वगैरे मंडळींनी शास्त्रीबुवांना सांगितले, 'हे उद्गार म्हणजे तुम्हाला कॉम्प्लिमेंटस् आहेत, गैरसमज करून घेऊ नका."[१३] यातून तर्कतीर्थांच्या वक्तृत्वाचे प्रभावीपण स्पष्ट होते.

कराडच्या कृष्णा नदीच्या घाटावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेल्या भाषणांमुळे कराड परिसरातील जनतेत कायदेभंग चळवळीच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती संदर्भाने मोठी जनजागृती घडून आली. त्यातून जनता ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी संघटित आणि कटिबद्ध झाली. या त्यांच्या भाषणांना परिसरातील शेतकऱ्यांसह सर्व

सुशिक्षित, व्यापारी आणि इतर मंडळी तोबा गर्दी करीत. तीस वर्षांच्या तरुण, चेहऱ्यावरती बुद्धिमत्तेचे प्रखर तेज, अंगावर बंगाली पद्धतीने घेतलेली शाल या तर्कतीर्थांच्या यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या व्यक्तिमत्त्व वर्णनास[१४] भाई माधवराव बागलांनीही आपल्या एका लेखात दुजोरा दिलेला आहे.[१५] ही भाषणे जनतेच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरली. आपल्या या भाषणांमधून तर्कतीर्थांनी पारतंत्र्याची खूप नवी मीमांसा केली. ते आपल्या भाषणांतून देशातील क्रांतीची उदाहरणे देऊन लोकमत चेतवत असत. या भाषणांचा वैचारिक प्रभाव सामान्य माणसावर आणि विशेषत: तरुणवर्गावर जास्त पडला. तर्कतीर्थांच्या भाषणाची शैलीच आगळी-वेगळी होती. त्याला देशभक्तीची धार होती. विचारांची पकड होती.

सन १९३०च्या मे महिन्याची संध्याकाळ असेल. कृष्णाघाटावर सभा होती. हजारो माणसे उन्हात तापलेल्या घाटावर बसली होती. उन्हाने तापलेला कातळ त्यावर बसणाऱ्या माणसाला भासेल इतका गरम होता. शास्त्रीबुवा बोलण्यासाठी उभे राहिले. आणि त्यांनी पहिले वाक्य उच्चारले ते असे-

"तुम्ही बसला आहात, तो घाट असा गरम झाला आहे, तशी तुमची बुद्धी व मनं गरम झाली पाहिजेत. देशाची तुमच्याकडे आजही मागणी आहे.[१६] तरुण शास्त्र्यांचे हे एकच वाक्य सभा जिंकून गेल्याची नोंद यशवंतराव चव्हाण यांनी 'कृष्णाकाठ'मध्ये जशी करून ठेवली तसेच एक वाक्य आपल्या मनात कायम घर करून राहिले असल्याचे सांगत त्यांनी ते नोंदवले आहे. ते असे-

"मी माझ्या गुरूंच्या पायाशी बसून सहा शास्त्रांत[१७] पारंगत झालो आहे आणि आता मला या शास्त्रांचे रूपांतर शस्त्रांमध्ये करायचे आहे. ही मोठी शास्त्रे आता शस्त्रे बनली नाहीत, तर हिंदुस्तानात कायमची गुलमागिरी राहील."[१८]

वरील भाषणानंतर कराड ब्रिटिश पोलिसांनी तर्कतीर्थांवर खटले भरले. या खटल्यांमुळेही लोकजागृती होण्यामध्ये भरच पडली. याची चक्षुर्वैसत्य नोंद करीत यशवंतराव चव्हाण यांनी लिहिले आहे की, "या दोन्ही खटल्यांच्या वेळी मी मॅजिस्ट्रेट कचेरीमध्ये हजर राहून या खटल्यांची संपूर्ण हकिगत आणि कामकाज ऐकले व पाहिले आहे. सरकारी रिपोर्टरने त्यांच्या भाषणातील त्यांना वाटणाऱ्या आक्षेपार्ह मजुकरांची साक्ष द्यायची आणि वक्त्यांनी आपण हे बोललो आहोत आणि बचावाच्या कामात आपल्याला भाग घ्यावयाचा नाही, असे ठामपणे निवेदन करायचे, हाच परिपाठ पडला होता. माझ्या आठवणीप्रमाणे दोघांना (तर्कतीर्थ व काकासाहेब गाडगीळ या उभयतांची त्यावेळी भाषणे झाली होती.) सहा सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली, तरीसुद्धा दोघेही हसतमुख होते. ते लोकांना नमस्कार करीत आपल्या कोठडीत शिरल्याचे मी पाहिले आहे."[१९]

या खटल्याची आणि अन्य शिक्षा भोगून परत आल्यावर ब्रिटिश पोलिसांनी तर्कतीर्थांवर पुन्हा खटला भरला. त्याची नोंद तत्कालीन साप्ताहिक 'केसरी'मध्ये आढळते. 'वाईचे

बातमीपत्र' (दि. १३-१-१९३१)मध्ये खालील मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्याने त्याची पुष्टी होते.- "येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांची नाशिक जिल्ह्यातील शिक्षा भोगून सुटका झाली असून, सातारा जिल्ह्यातील पर्वाच्या गुन्ह्याबद्दल येथे त्याजवर खटला भरण्यात आला आहे. त्याची तारीख २३-१-३१ ही नेमली असून, ते जामिनावर खुले झाल्यामुळे आजच ते वाईस आले. मोटार स्टँडवर डिक्टेटर[२०] श्री. वेलणकर यांनी त्यांस पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले व गांधी चौकात झेंडावंदन होऊन ते आपल्या बिऱ्हाडी गेले."[२१]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भारतीय स्वातंत्र्य वक्ते, प्रबोधक, संघटक, मार्गदर्शक अशा विविध भूमिकांतून कार्य केले. या कार्यामुळे ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेते म्हणून पुढे आले. केवळ सातारा जिल्हाच नाही तर नाशिक, धुळे, नंदुरबार, बागलाण, कळवण, संगमनेर, अकोले, अहमदनगर इ. परिसरात त्यांनी अनेक भाषणे देऊन विविध सत्याग्रहांचे नेतृत्व केले.

**बागलाणचा जंगल सत्याग्रह व तुरुंगवास**

कायदेभंगाच्या चळवळीचा प्रारंभ मिठाच्या सत्याग्रहाने झाला. दांडी यात्रेद्वारे मीठ लुटल्यानंतर महात्मा गांधींना अटक झाली. महाराष्ट्रात सविनय कायदेभंग चळवळ चालू ठेवण्यासाठी राज्यस्तरीय समितीच्या मार्गदर्शन आणि नियंत्रणाखाली महात्मा गांधींच्या संमती व मार्गदर्शनाने समित्यांचे गठन करण्यात आले. समित्या 'वॉर काऊंसिल्स' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या, तर समितीचे प्रमुख संघटक 'डिक्टेटर' म्हणून ओळखले जाऊ लागले. डिक्टेटर जिल्हा, तालुका पातळीवर नेमून आंदोलन भारतभर पसरेल. परंतु, नियंत्रण व मार्गदर्शक तत्त्वांनुसार चालेल, याची खबरदारी घेण्यात आली. आंदोलन सर्वत्र व्हावे म्हणून केवळ मिठाचा सत्याग्रह होऊन चालणार नाही. कारण, समुद्र सर्व ठिकाणी नाही. अशा समुद्र नसलेल्या ठिकाणी लुटलेले मीठ विकून स्वराज्य फंडासाठी निधी संकलित करण्याची मोहीम कार्यकर्त्यांनी राबविली. महाराष्ट्र राज्यासाठी ज्या प्रमुख समर्पित कार्यकर्त्यांची राज्यस्तरिय समिती नेमण्यात आली, तिचे प्रमुख शंकरराव देव आणि आचार्य शं. द. जावडेकर होते. समितीत ज्या समर्पित आणि प्रमुख नेत्यांचा अंतर्भाव करण्यात आला होता, त्यात सर्वश्री गंगाधरराव देशपांडे, प्रा. धर्मानंद कोसंबी, अच्युतराव पटवर्धन, लालाजी पेंडसे, श्री. शं. नवरे, कमलादेवी चटोपाध्याय, द्वा. भ. कर्णिक, धनाजी नाना चौधरी प्रभृती मान्यवरांच्या बरोबरीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही होते. तशी नोंद मुंबई इलाखा गुप्तचर पोलीस नोंदीत आढळते.[२२]

ही चळवळ पुढे जंगल सत्याग्रह, अटकसत्र, विदेशी कापडावर बहिष्कार, दारूबंदी आंदोलन, मेळावे, मोर्चे, मिरवणुका, सभा, प्रभातफेऱ्या इ.च्या रूपाने शहरे, गावे, वाड्या, वस्त्या, पाडे इ.पर्यंत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले होते. या आंदोलनात सर्व

थरांतील जनता, मध्यमवर्गीय, शिक्षित-अशिक्षित कामगार, शेतकरी, विद्यार्थी, आदिवासी, महिला सर्वांचा सहभाग राहील. आंदोलन सर्वव्यापी आणि सर्वसमावेशक होऊन ते राष्ट्रीय आंदोलन बनेल, असे नियोजन करण्यात आल्याची नोंदही पोलीस अहवालात दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहाची जबाबदारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर सोपविण्यात आली होती. तर्कतीर्थांनी बागलाण, कळवण, चांदवड, मालेगाव, नांदगाव, साक्री, चाळीसगाव इ. अनेक ठिकाणी सभा घेऊन प्रभावी लोकजागृती आणि लोकसंग्रह घडवून आणला. त्यांचे शस्त्र होते भाषण. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शेठ गोविंद, देवचंद भिका पाटील प्रभृती कार्यकर्ते टांग्याने खेड्यापाड्यात फिरून सभा घेत. हा सत्याग्रह ८ ऑगस्ट, १९३० रोजी आयोजित करण्यात आला होता. त्याची पत्रके छापून गावोगावी वाटण्यात आली होती. जंगल सत्याग्रहासाठी भिलवाड या गावाची निवड करण्यात आली होती. कारण, तेथील जंगल ब्रिटिशांनी पूर्णपणे राखीव घोषित केले होते. ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्यपूर्व काळात वनचराईचा कायदा केला होता. प्रत्येक शेतकऱ्याला जुलै आणि ऑगस्ट महिन्यात नोटिसा निघत. १५ ऑगस्टपर्यंत वनचराई कर भरणे अनिवार्य असे. एवढे करूनही जनावरे जंगलात गेली की, ब्रिटिश वनरक्षक जनावरे पकडून कोंडवाड्यात ठेवत. त्यांचा लिलाव करीत. या आंदोलनात तर्कतीर्थांनी भाषणे देऊन कोंडवाडे फोडण्याची, सारा न भरण्याची मोहीम राबविली. सरकारला विरोध दर्शविण्यासाठी २७५ गावकामगार पाटलांचे राजीनामे[२३] गोळा करण्यात आले. ते नाशिकचे तत्कालीन कलेक्टर आर. जी. गार्डन यांच्याकडे पाठविण्यात आले. नाशिक जिल्ह्याचे काँग्रेस नेते दादासाहेब गद्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सीताराम शास्त्री प्रभृतींनी बागलाण जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व केले. जून महिन्यापासून जनजागर करण्यात आले होते. प्रत्यक्ष सत्याग्रह ५ ऑगस्ट, १९३० रोजी मांगी-तुंगी डोंगर येथे पार पडला. तिथल्या जैन मंदीर परिसरात शेतकरी, कातकरी, आदिवासी असे लाखभर सत्याग्रही जमले होते. त्यात २००० आदिवासी स्त्रिया होत्या. प्रत्येक सत्याग्रहीच्या हाती विळा, कोयता इ. हत्यारे होती. गवत नि झाडे तोडण्यासाठी प्रत्येकाने मूठभर पेंडी कापून कायदेभंग करण्याचे ठरविण्यात आले होते. प्रारंभी गो पूजा करून चांदीच्या कुऱ्हाडीने झाडांवर घाव घालण्यात आला. चांदीच्या विळ्याने गवत कापण्यात आले. ‘भारतमाता की जय’, ‘महात्मा गांधी की जय’, ‘चले जाव’ घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. नाशिक जिल्ह्याचे उपपोलीस अधीक्षक मोठी कुमक, बंदुका घेऊन तैनात होते; पण सत्याग्रहींच्या संख्येपुढे पोलीस कुमक मूठभरही नव्हती.

तर्कतीर्थांच्या वक्तृत्व आणि संघटन कौशल्याने यशस्वी झालेल्या या सत्याग्रहाची संशोधक इतिहासकारांनी नोंद घेत लिहून ठेवले आहे की, "Forest Satyagrah in Baglan taluka recieved considerable importance. Baglan had earned reputation

of being a 'Mini Bardoli' in those days."[24] १७, १८ आणि १९ ऑक्टोबर, १९३० या तीन दिवशी कळवणजवळ सलग सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात पोलिसांनी धरपकड सुरू केल्यानंतर गोळीबार झाला. तर्कतीर्थ जंगलात फरार झाले. जंगलात त्यांची शाल सापडली; पण ते मिळून आले नाहीत. ते पोलीस गोळीबारात ठार झाल्याची अफवा पसरली. दुसऱ्या दिवशी वाईत केवलानंद सरस्वतींच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाली. स्वामी केवलानंद सरस्वती शोक व्यक्त करून उद्गारले होते, 'एकेकाच्या नशिबी काय लिहिलेले असते.' नंतर फंदफितुरी होऊन तर्कतीर्थांना अटक झाली. त्यांच्या अटकेचे वृत्त तत्कालीन साप्ताहिक 'केसरी', पुणेच्या अंकात सचित्र प्रसिद्ध झाले होते.[२५]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जंगल सत्याग्रहातील कार्य, भाषणे, फरार होणे, फंदफितुरीने अटक, त्यानंतर तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा आणि ५० रुपये दंड.[२६] सुटकेनंतर नवनव्या खटल्यांचा ससेमिरा या सर्व गोष्टी त्यांना स्वतंत्रता सेनानी ठरविण्यात खरे तर पुरेशा आहेत. या सर्व घडामोडींतून तर्कतीर्थ तावून सुलाखून निघाले. त्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अधोरेखित करत द्वा. भ. कर्णिकांनी लिहिले आहे की, "१९३० सालच्या सत्याग्रहाचे एक पुढारी म्हणून ते महाराष्ट्रात अग्रगण्य झाले. त्या सत्याग्रहात ते सामील झाले, त्याचवेळी त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. कारण, त्या सत्याग्रहामुळे ते प्राज्ञपाठशाळेच्या वैराग्यशील वातावरणातून बाहेर पडले आणि बऱ्यावाईट, त्यागी आणि सुखलोलुप, श्रद्धावान आणि नि:श्रद्ध, भावनोत्कट आणि विचारशील अशा सर्वप्रकारच्या मंडळींच्या जीवनाशी समरस झाले."[२७]

**गांधीवाद ते रॉयवाद प्रवास**

"गांधीजींनी १९३० साली कायदेभंगाची मोहीम सुरू केली तेव्हा शास्त्रीबुवांनी आपल्या परंपरेचा, तसेच संस्थेच्या (प्राज्ञपाठशाळा) भवितव्याचाही विचार न करता या संग्रामात उडी घेतली. शास्त्रीबुवांचे वैशिष्ट्य असे की, कोणतेही कार्य वा चळवळ हाती घेतल्यानंतर हातचे राखून काम करावयाचे नाही, असा त्यांचा मन:पिंड आहे. कायदेभंगाच्या या चळवळीत त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने उभा ग्रामीण महाराष्ट्र चेतविला आणि पेटविला. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध ते नुसती आग ओकत गेले आणि सत्याग्रहासाठी त्यांनी प्रक्षुब्ध वातावरण तयार केले."[२८] हे निरीक्षण नोंदविले आहे त्यांचे कायदेभंग चळवळीतील आणि नंतर रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीतील सहकारी द्वा. भ. कर्णिक यांनी. या कर्णिक बंधू (द्वा. भ. कर्णिक आणि वसंतराव कर्णिक) मुळेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मार्क्सवाद, मार्क्सवाद साहित्य, मानवेंद्रनाथ रॉय, रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी इ. क्रांतिकारी वाचन, विचार नि व्यवहाराच्या अंगाने परिचय झाला, ते डाव्या विचारांकडे ओढले गेले.

सन १९३०च्या कायदेभंगाची चळवळ पुढे १९३४ पर्यंत सक्रिय राहिली. तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९३२ मध्ये पुन्हा पकडले जाऊन त्यांच्यावर खटला दाखल झाला. परंतु, दहा महिन्यांसाठी धुळ्याच्या तुरुंगात त्यांची रवानगी करण्यात आली.[२९] धुळे कारागृहात त्यांना भेटलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे विनोबा भावे, जमनालाल बजाज, साने गुरुजी, गुलझारीलाल नंदा, पुरुषोत्तमदास त्रिकम या होत.'[३०] फेब्रुवारी, मार्च १९३२ साली त्यांना अटक झाली होती. नोव्हेंबर १९३२ मध्ये ते तुरुंगातून बाहेर आले. या काळात ते पुण्यात अधिक असत.

धुळ्यातील तुरुंगात असताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कलकत्त्याच्या माधवजी सेठ यांना 'उपनिषद' शिकवत असत. माधवजी सेठ त्याची टिपणं काढत. त्यात अस्पृश्यतेसंदर्भात झालेल्या चर्चेची टिपणे होती. ती जमनालाल बजाज यांच्या पाहण्यात आली होती. ती टिपणे पुरोगामी होती. तुरुंगातून सुटका होताच निरोप देत जमनालाल म्हणाले होते की, 'तुमची अस्पृश्यतेवरील मते महात्माजींपर्यंत कशी पोहोचवावी याबद्दल विचार करतो.[३१] त्यानुसार त्यांनी पुढे ती महात्मा गांधींपर्यंत पत्राद्वारे तो पोहोचविली. तर्कतीर्थ तुरुंगातून येऊन वाईस प्राज्ञपाठशाळेत येऊन-जाऊन अध्यापन कार्य करीत असत. तर्कतीर्थांचे मित्र धुंडिराजशास्त्री देव महात्मा गांधींचा निरोप घेऊन वाईस आले. त्यानुसार तर्कतीर्थ महात्मा गांधींना भेटण्यासाठी म्हणून येरवडा (पुणे) कारागृहात गेले. १३ डिसेंबर १९३२ ते ३१ डिसेंबर १९३२ या पंधरवड्यात सात-वेळा महात्मा गांधींशी भेट होऊन चर्चा झाल्याच्या नोंदी आहेत.[३२] त्यांच्यासोबत के. ल. दप्तरी, श्रीधरशास्त्री पाठक, कोकजे शास्त्री, आनंद शंकर वैद्य, भगवानदास, हरिभाऊ फाटक प्रभृती मान्यवर वेळोवेळी उपस्थित असत. महात्मा गांधींनी मंदीर प्रवेश आणि अस्पृश्यता निवाराणाचा जो कार्यक्रम पुढे हाती घेतला, त्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, स्वामी केवलानंद सरस्वती यांची भूमिका मोठी होती. पुढे महात्मा गांधींनी आपल्या 'हरिजन' पत्रात अस्पृश्यता निवारण कार्यक्रमासंबंधी शास्त्री-पंडितांचा अभिप्राय स्पष्ट करणारे पत्रक[३३] प्रसिद्ध केले होते, तो हरिजन पत्राचा पहिलाचा अंक होता. त्यावर ज्या सात पंडितांच्या स्वाक्षऱ्या होत्या, त्यापैकी एक लक्ष्मणशास्त्री होते. ते पत्रक तर्कतीर्थांनीच तयार केले होते. यातून तर्कतीर्थांची वाक्पटुता, तर्कबुद्धी आणि मीमांसा कौशल्य स्पष्ट होते.

त्यानंतर भारतात हरिजनांना मंदीर प्रवेश मिळावा म्हणून आंदोलन सुरू झाले. नाशिक, त्रावणकोर, वायकोम इ. ठिकाणी सत्याग्रह झाले. मंदीर प्रवेश कायदा करण्याचं आश्वासन देण्यात आलं. या नियोजित कायद्याविरोधात सनातनी मंडळींची मोठी सभा पुण्यातील शिवाजी मंदिर येथे झाली. सनातन्यांच्या विरोधार्थ भाषण करण्यासाठी तर्कतीर्थ उभे राहिले, तेव्हा चाळीसएक लाठीबंद तरुण गरजले. 'तुम्ही खाली बसा, नाही तर तुम्हास आम्ही मारू.' शास्त्रीबुवा त्यांना घाबरले नाहीत; पण मारणाऱ्यांना एकप्रकारचे आव्हान देऊन ते तेथेच अखेरपर्यंत बोलत उभे राहिले. ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते हरिभाऊ फाटक यांनी ही

गोष्ट नंतर महात्मा गांधीजींच्या कानावर घातली, तेव्हा गांधीजी उद्गारले, 'He is the greatest satyagarhi.'[34] वक्ता म्हणून आपल्या मताशी प्रतिबद्ध राहून अत्यंत नीडरपणे आपली मते मांडण्याच्या त्यांच्या या स्वभावामुळेच ते पुढे गांधीवादाकडून सशस्त्र क्रांतीच्या विचारांकडे आकर्षित झाले.

सन १९३४-३५ च्या दरम्यान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मार्क्सवादाचे विधिवत वाचन, चिंतन, मनन सुरू केले. याला तुरुंगातील दिवसांची पार्श्वभूमी होती. सन १९३०च्या तुरुंगावासात त्यांची द्वा. भ. कर्णिकांशी गाठ पडली. सन १९३२च्या तुरुंगावासात मानवेंद्रनाथ रॉय यांची सशस्त्र क्रांतीसंबंधीची पत्रे येत. त्यामुळे तर्कतीर्थांच्या मनात मार्क्सवादाबद्दलचे कुतूहल जागे झाले. त्यांनी एंगल्स वाचला. 'अँटी- ड्युरिंग', 'डायलेक्टिस ऑफ नेचर' वाचले. रायझानोव्हच्या भाष्यासह कार्ल मार्क्सचा 'मॅनिफेस्टो ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी' वाचला. नंतर सबंध प्लेखानोव वाचला. प्लेखानोव हा लेनिनचा गुरू, रशियन मार्क्सवादाचा संस्थापक. स्टेसचे 'हेगेल'वरचे पुस्तक वाचले. यातून त्यांचे मार्क्सवाद, क्रांती, समाजवाद इ.बद्दलचे आकर्षण वाढले. त्याची परिणती मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'मध्ये सक्रिय होण्यात आली. फैजपूर काँग्रेस अधिवेशन (१९३६) मध्ये झाले. त्यात मानवेंद्र रॉय यांचे भाषण सर्वांपेक्षा वेगळे वाटले. विशेषत: त्या भाषणातील समांतर सत्ताकेंद्रे (States within a state) निर्माण करण्याचा विचार अभिनव होता. पुढे सन १९४०ला मानवेंद्रनाथ रॉय यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गांधीवादाला रामराम ठोकून नव्या पक्षात सक्रिय झाले.

'मी रॉयवादी का झालो?'[३५] शीर्षक लेख लिहूनच तर्कतीर्थांनी पक्षांतरविषयक आपली भूमिका विशद केली आहे. हे दिशांतर सहज घडले नाही. त्यामागे त्यांना मोठ्या वैचारिक झगड्यातून जावे लागले. ते या लेखातून स्पष्ट होते. 'मूलत:च विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारपंथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास प्रवृत्त करते,'[३६] याची कबुली तर्कतीर्थ प्रस्तुत लेखात देतात. 'मौलिक विलक्षणता' हे पक्षांतराचे कारण असल्याचे त्यांनी या लेखात नमूद केले आहे. मेळावे, निवडणुका, संघटन अशा सर्व आघाड्यांवर तर्कतीर्थ सक्रिय सहभागी असत. अभ्यास शिबिरे (स्टडी कॅम्प्स) होत. जत, वज्रेश्वरी, अंत्रोळी, कुंड, कुलाबा, कराड, पोयनाड, अलिबाग, कणकवली इ. शिबिरांत वक्ते म्हणून तर्कतीर्थांनी केलेल्या कार्यामुळे रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीला शेतकरी, तरुण विद्यार्थी यांचे मोठे पाठबळ लाभले.

**लेखन प्रारंभ**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या लेखन, संपादन, समीक्षा कार्याचा प्रारंभ प्राज्ञपाठशाळेतच झाला. स्वामी केवलानंद सरस्वती हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू. त्यांनी २२ ऑक्टोबर, १९३१ मध्ये संन्यासदीक्षा घेतली; पण त्यापूर्वी त्यांनी सन १९२५ मध्ये प्राज्ञपाठशाळेतून अंग काढून आपले सारे लक्ष धर्मसुधारणांकडे केंद्रित केले.

जानेवारी, १९२६ मध्ये सोनगीर (खान्देश) येथील वै. केशवदत्त महाराज यांच्या मठात ह.भ.प. संतोजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली गोविंद महाराज यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने जो अर्चामहोत्सव संपन्न झाला होता, त्यानिमित्ताने जी पंडित परिषद बोलविली होती, त्यास ते लक्ष्मणशास्त्रींसह उपस्थित होते. नंतर सन १९२७ मध्ये हैदराबाद येथे हिंदू धर्म परिषद झाली. त्यालाही ते उपस्थित होते. सन १९२८ मध्ये अखिल भारतीय ब्राह्मण परिषदेतही ते सहभागी होते. सनातनी पंडित 'बाबा वाक्यं प्रमाणम्'चा ठेका सोडायला तयार नव्हते. स्वामी केवलानंद सरस्वती कालानुसारी धर्मसुधारणेचे पक्षधर होते. धर्मसुधारणा आणि धर्मजागृतीच्या उद्देशाने स्वामींनी सन १९३४ मध्ये तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद गठित केली. नंतर त्याचे रूपांतर सन १९३४ मध्ये धर्मनिर्णय मंडळात केले. सन १९२५ पासून एकीकडे 'धर्मकोश' निर्मितीचे कार्य, तर दुसरीकडे 'मीमांसाकोश' रचना असे करीत स्वामींनी काया, वाचा, मने, धर्मसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्याला तर्कतीर्थांचा सक्रिय सहयोग असे. यातून सन १९३२ नंतर तर्कतीर्थांच्या लेखन, वाचन, अध्यापन, संशोधन आणि समीक्षा कार्यास खरी उभारी आली.

**आनंदमीमांसा** (१९२८)

तर्कतीर्थांनी 'लेखसंग्रह'च्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे की, 'आनंदमीमांसा' हा निबंध म्हणजे माझे अगदी पहिले लेखन होय.[३७] हे या ग्रंथसंदर्भातील विधान म्हणून पहावे. कारण, याच दरम्यान साप्ता. 'केसरी'मध्ये 'निर्णयाची शास्त्रशुद्धता' शीर्षकांतर्गत सलग ५ लेख काशी येथे संपन्न झालेल्या ब्राह्मण महासंमेलनाच्या अनुषंगाने प्रसिद्ध झालेले दिसतात.[३८] 'आनंदमीमांसा' या ६८ पृष्ठांच्या निबंधामध्ये प्रपंचविषयक दु:खवाद आणि आनंदवाद यांचे ऐतिहासिक व तात्त्विक संक्षिप्त समालोचन करण्यात आलेले आहे. आनंदसिद्धांताचे मूळ उगमस्थान उपनिषदात सापडते.

हे लिहिणाऱ्या ऋषींनी आनंदसिद्धांताच्या नावाखाली दु:खवादच सांगितला असल्याचे तर्कतीर्थांनी या ग्रंथात स्पष्ट केले आहे. दु:खवाद हा धर्म, नीती आणि मानवी प्रगतीस मारक असल्याने त्याज्य समजला पाहिजे. आनंद-सिद्धांतच प्रगतिपोषक आहे. आधिभौतिक आणि आध्यात्मिक सुखवादच (सात्त्विक सुखवाद) भारतीय समाजहिताचा आहे. सदर ग्रंथ मराठीत लिहिला आहे.

**शुद्धिसर्वस्वम्** (१९२८)

'आनंदमीमांसा'नंतरचा हा तसाचा छोटा अवघा ३७ पृष्ठांचा निबंध होय. संस्कृतमध्ये लिहिलेल्या या निबंधात सनातन धर्मानुसार हिंदू धर्मेतरांच्या हिंदू धर्म प्रवेशासंदर्भातील प्रायश्चित्तांची चर्चा आहे. म्लेच्छपदार्थ, म्लेच्छसंसर्ग झाल्यास प्रायश्चित्त, पतित संतती, शिष्टाचार प्रामाण्य, व्रात्यशुद्धी, म्लेच्छ इत्यादींचे सनातन धर्माधिकार, अत्यंजविषयक अस्पृश्यता इत्यादी विषयांची सदर निबंधात चर्चा करण्यात आली आहे.[३९] थोडक्यात

हा ग्रंथ म्हणजे धर्मशुद्धी सातत्य राखण्यासाठीच्या विविध मार्गांची चर्चा करणारा एका अर्थाने 'प्रायश्चितविधान ग्रंथ' होय. सन १९२८च्या काशी येथे संपन्न ब्राह्मण महासंमेलनात झालेल्या निर्णयांच्या पार्श्वभूमीवर लिहिण्यात आलेला हा ग्रंथ होय.[४०] तो त्या वादाचा सार संग्रह होय.[४१] यात तर्कतीर्थांनी लोकसंग्रहाच्या हेतूने धर्मशुद्धीचे समर्थन आणि पुरस्कार केला आहे. यात 'चांडाल' शब्दाची मीमांसा करण्यात आली आहे. हिंदुधर्मीय सार्वजनिक ठिकाणी अन्य धर्मियांना अस्पृश्य मानत नाहीत, तर मग स्वधर्मियांना अस्पृश्य मानण्यात काय अर्थ आहे? अशी पृच्छा करणारा ग्रंथ तर्कतीर्थांना पुरोगामी पंडित सिद्ध करतो. या ग्रंथाच्या मराठी भाषांतराची योजना होती; पण ती फलद्रुप झालेली दिसत नाही. ते लक्षात घेऊन या प्रकल्पाच्या १२व्या खंडात या प्रबंधाचे मराठी भाषांतर देण्यात आले आहे.

**भारतीयधर्मेतिहासतत्वम्** (१९३३)

प्राच्यविद्या परिषद, बडोदा (गुजरात) येथे सादर करण्यासाठी म्हणून तयार करण्यात आलेला हा शोधनिबंध. अवघ्या १६ पृष्ठांच्या या संस्कृत निबंधात ऐतिहासिक पद्धती आणि मीमांसा पद्धतीचा समन्वय करून तिचे फलित शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रबंधाचेही मराठी भाषांतर सदर प्रकल्पाच्या १२ व्या खंडात देण्यात आले आहे.

सदर निबंधात बदलता काळ आणि परिस्थितीसंदर्भात धर्माचा विचार करण्याची आवश्यकता तर्कतीर्थांनी स्पष्ट केली आहे. धर्मस्वातंत्र्य ही गोष्ट सनातन (शाश्वत) मूल्य, आहे. राज्याचा कोणताही धर्म असो, प्रजेच्या विविध धर्मांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे हे राजसत्तेचे कर्तव्य असते. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो)सारखी संस्था अस्तित्वात येऊनही तिला हे करणे शक्य झाले नाही. हे लक्षात घेता आणि धर्माचा समाज जीवनावर असलेला पगडा लक्षात घेऊन यापुढे संकुचित अशी कोणतीही धार्मिक आणि सामाजिक परंपरा यापुढे आत्मोद्धारास व विश्वोद्धारास समर्थ ठरेल असे वाटत नाही. म्हणून धर्मातील शाश्वत मूल्ये अंगिकारून कालोचित धर्मसुधारणा करणे, यातच मानवाचे कल्याण सामावलेले आहे. ते भारतीय धर्माचे खरे मर्म आहे.

**जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** (१९४१)

जडवाद हे एक तत्त्वज्ञान आहे. तत्त्वज्ञान हे जीव आणि जगत किंवा आत्मा आणि सृष्टी यांच्या संबंधांचा अभ्यास करते. जडवाद हे तत्त्वज्ञान विज्ञानपूरक आहे; पण विज्ञान ही स्वतंत्र व तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ गोष्ट होय. जडवादानुसार द्रव्याच्या तीन श्रेणी होत. जड, जीव आणि चेतन शरीर. आत्मा आणि बुद्धी यांचा विचार करता विज्ञान व ईश्वर यातील सत्य काय हे तर्क, अनुभव आणि नियम याआधारे स्पष्ट होते. जीवनात असलेली ईश्वरीय संकल्पना ही आइन्स्टाईननी म्हटल्याप्रमाणे, केवळ वाङ्मयीन कल्पनाविलास आहे. नियमबद्ध पद्धतीने जे सत्य सिद्ध होत नाही, ते व्यक्त करणे म्हणजे मानवी दौर्बल्याचेच प्रकटीकरण असते. आत्मा, ईश्वर या केवळ कल्पना, तर्क होत. ते गूढ यापलीकडे त्याचे अस्तित्व नाही. विज्ञान

गूढ उकलून सत्य रूप नियम, सूत्र पद्धतीने अनुभवजन्य बनविते. ते सार्वजनिक सत्य असते. कणाद, कपिल, बुद्ध, चार्वाक हे श्रेष्ठ तत्त्वज्ञ अशासाठी त्यांनी ईश्वरीय सत्ता नाकारून माणूस आणि त्याचा लौकिक आचार, विचार प्रमाण मानला. विज्ञानात अलौकिक, चमत्कार अवतारास वाव असत नाही. 'चक्षुर्वेसत्यं प्रमाणं'च्या कसोटीवर उभा असलेला जडवाद हा अनीश्वरवाद अशासाठी की, तो ईश्वरीय सत्ता नाकारून भौतिक विश्व प्रमाण मानतो. मानवी जीवन, चरित्र आणि वर्तन व्यवहारासाठी ईश्वराची गरज नाही. ईश्वरी संकल्पनेच्या आधारे मानवी जीवन वेठीस धरणे म्हणजे पारलौकिक, गूढ, अलौकिक सृष्टीचे समर्थनच असते. जडवाद त्यास छेद देणारे आणि बरोबर त्याच्याविरुद्ध सत्य सांगणारे वैज्ञानिक तत्त्वज्ञान होय.

**प्रकाशित भाषणसंग्रह**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९५३ मध्ये अनंत विष्णू पाटणकरांना दिलेल्या मुलाखतीत 'आजपर्यंत आपली सामान्यपणे जाहीर व्याख्यानांची संख्या कुठेपर्यंत पोहोचली आहे?' हे विचारल्यानंतर त्यांनी उत्तर दिले होते की, 'एक सहस्रापेक्षा अधिक भाषणे आजपर्यंत दिली असतील.'[४२] या उत्तरानंतर तर्कतीर्थ चार दशके भाषणे देत राहिले. सन १९२३ मध्ये तर्कतीर्थ जाहीर भाषणे देऊ लागले. ३० वर्षांत हजार भाषणे. नंतरचा काळ तर त्यांच्या सामाजिक मान्यता नि वक्ते म्हणून लोकमान्य होण्याचा. 'साहित्य संमेलनाला अध्यक्ष म्हणून ते दिल्लीला जेवढ्या सहजपणे गेले, तेवढ्याच सहजपणे एखाद्या छोट्या दुकानाच्या उद्घाटनालाही जात राहिले.'[४३] 'तर्कतीर्थ : एक व्याख्याते' म्हणून प्रा. रा. ग. जाधव यांच्यासारख्या त्यांच्या सहकारी, चरित्रकार, संपादक, समीक्षक म्हणून अनेक वर्षे सहवासात राहिलेल्या सव्यसाची साहित्यिकांनी नोंदविलेली पुढील निरीक्षणे खरोखरीच लक्षवेधी होत.- "शास्त्रीजींना लिहिण्यापेक्षा बोलणे अधिक प्रिय होते... ते जसे लिहीत तसेच बोलत... त्यांची बोलण्याची शैली पुस्तकी नसे... लिहिण्याची शैली बोलकी असे... वाणी आणि लेखणी यांच्यातील आशय-अभिव्यक्तीचे अद्वैत हे शास्त्रीजींचे वैशिष्ट्य होते. बहुधा महिन्याच्या तीस दिवसांपैकी जवळजवळ वीस-बावीस दिवस शास्त्रीजी व्याख्यानांच्या निमित्ताने महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही संचार करीत असत. सुमारे अर्धशतकभर आणि त्यातील दोनतृतीयांश काळ समाजाचे नानाप्रकारे वैचारिक उद्बोधन करण्यासाठी व्याख्यानव्रत चालविणे, ही सोपी गोष्ट नाही. शास्त्रीजींच्या व्याख्यानकलेत पारंपरिक आचार्यवंशाच्या खुणा अधिक दिसून येतात."[४४] "तर्कतीर्थांनी वर्षानुवर्षे प्रसन्न अशा व्याख्यानांच्या धारा नित्य बरसत ठेवल्या.

**'वाग्वै तत्सर्व विज्ञापयति वाचमुपास्स्वेति स यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते!**
**यावद्वाचो गतं तत्रास्य यथा कामचारो भवति यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते!!'** (उपनिषद)
वाणीमुळे सर्वज्ञान प्राप्त होते, म्हणून वाणीची बह्म समजून उपासना करावी. ती केली."[४५]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या जीवनकाळात वरील सर्व पार्श्वभूमीवर अक्षरश: हजारो व्याख्याने दिली असतील. त्यांच्या नोंदींची जंत्री उपलब्ध नाही. हे जरी खरे असले तरी उपलब्ध व्याख्यानसंहिता, वृत्ते, पुस्तिका, भाषणसंग्रह यांच्या आधारे त्यांच्या भाषणांचा स्थूल असा आढावा घेणे शक्य आहे. एकतर त्यांनी विविध विद्यापीठे, संस्था, स्मृतिव्याख्यानमाला, साहित्य संमेलने यांमधून जी विद्वतपूर्ण भाषणे दिली, त्यांचे संग्रह उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ साहित्य म्हणून जे ग्रंथ समोर येतात, त्यातील अधिकांश भाषणसंग्रहच आहेत. हिंदुधर्माची समीक्षा (१९४१), ज्योति-निबंध (१९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत (१९७३), सर्वधर्मसमीक्षा (१९७६), शिखांचा पंथ व इतिहास (१९८४), आद्य शंकराचार्य : जीवन आणि विचार, संपा. अरुंधती खंडकर (१९९७), साहित्याचे तर्कशास्त्र, संपा. सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे (२०१२), या संग्रहांमधून दीर्घ अशा ३२ भाषणांच्या संहिता आपणापुढे येतात, याशिवाय सुमारे शंभरएक व्याख्यानांच्या पुस्तिका, संहिता, वृत्तांत, हस्तलिखिते इ. संशोधन, संग्रहाच्या निमित्ताने हाती आल्या आहेत. भारतात स्वातंत्र्यलढ्यापासून वक्तृत्व कलेस विशेष स्फुरण चढल्याचे दिसते. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा, प्रबोधन, स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, आणीबाणी, मंडल आयोग, दलित चळवळ, राजकारण इत्यादींमुळे वक्तृत्व कला उजळत गेल्याचे दिसते. गेल्या शतकात शि. म. परांजपे, नाथ पै, स्वातंत्र्यवीर सावरकर, साहित्यिक आचार्य प्र. के. अत्रे, प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, समाजसेवक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्यासारख्या वक्त्यांची भाषणे गाजली. त्यांच्या गाजलेल्या भाषणांचे संग्रहही मराठी साहित्यात उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच पठडीतील वक्ते होत. 'स्वप्नसृष्टी', 'अत्रे उवाच', 'हशा आणि टाळ्या,' चिंतन', 'जागर', 'तीन भाषणे', 'शतकातील दलित विचार', 'शतकाची विचारशैली (चार खंड), 'संमेलनाध्यक्षांची भाषणे' असे अनेक भाषणसंग्रह आणि या भाषणखंडात संग्रहित तर्कतीर्थांची अन्य सुमारे पन्नासएक भाषणे, त्यांचे वक्तृत्व समजून घ्यायला म्हणून आपल्या हाती आहेत. ती तर्कतीर्थांच्या विचारधारेची निदर्शक होत.

**१) व्यक्ती आणि विचारसंबंधी भाषणे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची व्यक्ती आणि विचारसंबंधी सुमारे एक्याऐंशी भाषणे दिल्याचे दिसून येते. त्यातील व्यक्तीसंबंधी दिलेली भाषणे तेरा आहेत. त्यात महात्मा फुले, महात्मा गांधी, येशू ख्रिस्त, मानवेंद्रनाथ रॉय, काश्मिरी कवी राजानक रत्नाकर, समर्थ रामदास, बागलाण सिंह नरहर गोपाळशेठ अलाई तथा नामपूरकर, साने गुरुजी, आचार्य प्र. के. अत्रे, गायक कुमारगंधर्व, आद्य शंकराचार्य, आचार्य रामानुज यांचा समावेश आहे. प्राचीन, मध्य आणि आधुनिक अशा तीनही काळातील या व्यक्ती होत. त्यांच्यावरील

भाषणांचा विचार येथे भाषणे ज्या कालानुक्रमे दिले गेली, त्या क्रमाने त्यांचा विचार या भाषणसंग्रहात करण्यात आला आहे. ही भाषणे, व्याख्यानमाला, विविध उत्सव, प्रकाशन समारंभ, शिबिरे, श्रद्धांजली सभा, अनावरण समारंभ इत्यादींच्या निमित्ताने दिली गेलेली आहेत. काही आकाशवाणीवरून प्रक्षेपित, प्रसारित केलेलीही भाषणे आहेत. ती विविध वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तिका, ग्रंथ, स्मरणिका इत्यादींमधून येथे उद्धृत केलेली आहेत. एकच भाषण संक्षिप्त आणि विस्तृत स्वरूपात प्रसिद्ध झालेले आढळल्यास त्यापैकी विस्तृत भाषणाचा समावेश या संग्रहात प्राधान्याने केला आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ही भाषणे व्यक्तीविषयी आदर व्यक्त करत केलेली वा दिलेली आहेत. त्यात त्या  त्या व्यक्तीच्या जीवन, कार्य, विचारास प्राधान्य दिल्याचे दिसते. एकाच व्यक्तीवरच्या अनेक भाषणांचा विचार करता लक्षात येते की, ती त्या व्यक्तीच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकतात. त्यामुळे त्या व्यक्तीची सर्वथा नवी माहिती त्यातून वाचकांच्या पदरी पडते. यातील सर्व भाषणे त्या त्या व्यक्तींप्रती आदर व्यक्त करीत दिली गेली होती. काही भाषणांच्या लिखित संहिता तर्कतीर्थांच्या भाषणांनंतर प्रकाशनाच्या उद्देशाने तयार केल्या. त्यामुळे मूळ मौखिक भाषणापेक्षा वेगळा नि विस्तृत आशय अशा भाषणातून व्यक्त झाला आहे. आकाशवाणीवरील भाषणे पूर्वलिखित संहितेवर आधारित असतात, कधी कधी त्यांचे थेट प्रक्षेपण होत असते.

**१) ज्योति-निबंध** (१९४७)

(अर्थात् जोतीराव फुले : हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड पुकारणारा पहिला पुरुष)

सन १९४६ मध्ये सत्यशोधक समाज, वाई (जि. सातारा)चा रौप्यमहोत्सव ब्राह्मसमाज वाईतर्फे साजरा करण्यात आला. त्यानिमित्त १८, १९ आणि २० जून, १९४६ या दिवशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची तीन व्याख्याने झाली. 'सत्यशोधक समाज व महात्मा फुले', 'सत्यशोधक समाज व ब्राह्म समाज', 'शेतकरी व कामकरी जनतेचे स्वराज्य' या विषयांवर ती व्याख्याने बेतलेली होती, पैकी पहिले व्याख्यान प्रभावी झाले होते नि ते बहुप्रसारित व्हावे म्हणून नोव्हेंबर, १९४७ मध्ये 'ज्योति-निबंध' नावाने प्राज्ञपाठशाळा, वाईतर्फे प्रकाशित करण्यात आले. दुसऱ्या व्याख्यानाच्या विषयावर आधारित एक लेख फेब्रुवारी, १९५४ ला 'नवभारत'मध्ये प्रकाशित झालेला दिसतो. तो तर्कतीर्थांच्या नियोजित 'महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या चळवळीचा इतिहास' या ग्रंथातील एक प्रकरणरूपात प्रकाशित आहे. त्यावरून त्या विषयासंबंधीचा तर्कतीर्थांचा दृष्टिकोन आजही आपणास समजून घेत येतो. रा. ना. चव्हाणलिखित 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन ग्रंथासही तो अंतर्भूत आहे. तिसऱ्या विषयाचे भाषण संशोधनाचा विषय होय.

'ज्योति-निबंध' अर्थात 'जोतिराव फुले : हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीच्या

विरुद्ध बंड पुकारणारा पहिला पुरुष' शीर्षकांतर्गत हे भाषण माननीय आहे. त्यानंतर तर्कतीर्थांनी महात्मा फुले स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने (१९९०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीचे औचित्य साधून सन १९९१ मध्ये नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्लीकरिता 'जोतिचरित्र' लिहिले असून ते हिंदी, इंग्रजी भाषेतही उपलब्ध आहे. सन १९४५ पासून जवळजवळ पाच दशके महात्मा फुले यांचे जीवन, कार्य, विचार हा तर्कतीर्थांच्या चिंतन, मननाचा विषय असून, त्यातून बहुजन समाजाच्या हिताप्रती त्यांची आस्थाच स्पष्ट होते.

आपल्या या व्याख्यानात तर्कतीर्थांनी धर्म व समाजसुधारणांची पार्श्वभूमी स्पष्ट करीत म्हटले आहे की, भारतात ब्रिटिश सत्तेचा उदय होण्यापूर्वी ३०० वर्षे पोर्तुगीज भारतीय किनाऱ्यावर येऊन धडकले होते; पण राजसत्तेमुळे जे बदल झाले, ते त्या व्यापारी संबंधाने शक्य नव्हते. पाश्चात्य सत्तेने इथल्या सर्वप्रकारच्या सुधारणाचां पाया घातला. इथे ब्राह्म समाज, प्रार्थना समाजकार्य सुरू झाले ते धर्मसुधारणांचेच होते. जडवादी विचार रुजून 'सुधारक'कार आगरकरांच्या नेतृत्वाखाली वैचारिक जागृती सुरू झाली. ब्राह्मणेतरांच्या चळवळीस प्रारंभ होऊन त्याचे नेतृत्व महात्मा जोतिराव फुले यांच्याकडे गेले. ब्राह्मणेतरांच्या सुधारकांचे प्रश्न मागासलेल्या बहुसंख्य जनतेच्या जीवनाशी निगडित होते. शेतकरी, स्त्रियांचे प्रश्न समाजाच्या ऐरणीवर आले. विवेक आणि बुद्धिवादाच्या आधारावर समाजरचनेचा विचार प्रभावी बनत गेला. त्यातून पारंपरिक सत्ताकेंद्र असलेल्या ब्राह्मण वर्गाच्या एकाधिकाराला आव्हान मिळत गेले. स्वत:च्या परिस्थितीची जाणीव होणारा समाज आत्मप्रत्ययशील बनत आत्मोन्नती करू शकतो, ही भावना समाजात दृढमूल बनत गेली.

सत्ताधारी ब्राह्मण वर्ग प्रजेस जनावरांप्रमाणे वागवत होता. रमणा, दान, दक्षिणा याआधारे रोज श्रीमंत होणाऱ्या या वर्गाने ऐष आणि अत्याचाराची सीमा गाठली होती. ब्रिटिशांच्या समन्यायी कायदा व्यवस्थेमुळे पेशवाई वर्चस्व, वैषम्य व पक्षपातास चाप बसला. मानवी स्वातंत्र्याच्या आकांक्षा सर्वसामान्यांच्या जीवनात नवा प्रकाश देऊन गेल्या. महात्मा फुले यांच्या लक्षात आले की, सर्व प्रश्नांचे मूळ विविध प्रकारच्या गुलामगिरीत आहे. म्हणून त्यांनी 'इशारा', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' इ. लेखनातून जागृती घडवून आणली. इथे मिळणारे शिक्षण अंधश्रद्धा आणि भोळेपणा नष्ट करणारे असले पाहिजे. याची खात्री पटून त्यांनी बहुजन आणि स्त्रियांसाठी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. शेतकी क्रांतीचे प्रयत्न सुरू केले. सन १८५७ चे बंड अयशस्वी झाले; पण त्यापेक्षा इथला समाज जागा होणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटू लागले. बंड यशस्वी होते तर परत पेशवाईचे दिवस आले असते. असे महात्मा फुले यांचे आकलन होते. त्यात तथ्यही होते. वेद, आर्य, हिंदू इ. कल्पना म्हणजे परत गुलामी, अशी धारणा असल्याने ते सुधारणावादी मार्गांचा पुरस्कार करीत राहिले. सत्यशोधक समाजाची स्थापना महात्मा फुले यांनी याच धारणेने केली होती.

त्यांनी आपल्या या भाषणात स्पष्ट केले आहे की, ''सर्व मानवाचे ऐक्य हे एक श्रेष्ठ सत्य आहे आणि सत्याचा अपलाप व नाश धर्माभिमान करतो. धर्माभिमानाने मनुष्यजातीची प्रगती करावयाचेऐवजी आणि तिची आत्मशुद्धी व आत्मोद्धार करावयाचेऐवजी महान अध:पात केला आहे. म्हणून प्रचलित सगळे ऐतिहासिक धर्म मनुष्यजातीत सत्याची संपूर्ण स्थापना करू शकत नाही.''[४६] त्यासाठी त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' स्थापन केला होता. सगळी मनुष्यजाती एक आहे आणि सगळ्या मनुष्यजातीचे स्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे हेच मनुष्यत्वाचे ध्येय होय, असे महात्मा फुले मानत. समाजातील मुख्य झगडा (संघर्ष) सामाजिक किंवा राजकीय दास्यनाशाचा व मानवी स्वातंत्र्याचा आहे, ही कल्पना महात्मा फुले यांनी वारंवार मांडली आहे.

महात्मा फुले यांनी जी सत्यशोधक चळवळ निर्माण केली, तिचा हेतू मागासलेल्या जनतेच्या हितसंबंधांचे रक्षण करणारा जागरूक, बुद्धिवादी, लढाऊ, कर्तबगार शिक्षकवर्ग निर्माण करणे हा होता. जनतेत क्षोभ निर्माण करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करण्यावर त्यांची खरी भिस्त नि मदार होती. ज्या दिवशी अशा स्वातंत्र्याचा सूर्य उगवेल, तो दिवस त्यानंतर कधी मावळणार नाही, याची त्यांना खात्री होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर भाषणातून सम्यकपणे महात्मा जोतिराव फुले यांच्या समाजधारणेसंबंधी अत्यंत समर्पक शब्दात मांडणी करून त्यांना गुलामगिरीविरुद्ध लढणारा पहिला पुरुष सिद्ध केले आहे.

तर्कतीर्थांनी महात्मा जोतिराव फुले यांच्यावर दहा-बारा भाषणे केल्याच्या नोंदी सापडत असल्या तरी प्रत्यक्ष दोन-तीनच भाषणे हाती लागली आहेत. पैकी 'ज्योति-निबंध' (१९४७) एक होय. महात्मा फुले यांचे जीवन व कार्य तर्कतीर्थांच्या जिव्हाळ्याचा विषय असण्याची अनेक कारणे आहेत. तरुण वयात ते महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळीत सक्रियपणे सहभागी झालेले होते. या काळात त्यांचा समाजातील सर्व थरातील लोकांशी संपर्क आला. या लढ्यात ते एकीकडे भाषणांद्वारे जनमानसात ब्रिटिश अन्याय्य सत्तेविरुद्ध क्षोभ निर्माण करीत स्वातंत्र्याविषयी जनजागरणाचे कार्य करीत होते. या काळात सन १९३०च्या कायदेभंग चळवळीच्या जागृतीच्या निमित्ताने कराडला सलग आठ-दहा दिवस त्यांनी भाषणे दिली. ब्रिटिशांनी त्या भाषणासंदर्भात त्यांच्यावर खटला दाखल केला होता. या भाषण आणि जनसंघटनकार्यात ते खेड्यापाड्यात, वाड्या-वस्त्या, आदिवासी पाडे, धनगरवाडे, जंगले पायी तुडवत शेतकरी, कामकरी, मजूर, दलित, आदिवासी अशा मोठ्या उपेक्षित बहुजन समाजाचे जगणे जीवन-मरणाचा प्रश्न असल्याचे अनुभवत होते. कळायला लागल्यानंतरचा एक दशकाचा तर्कतीर्थांचा जीवनकाळ ब्राह्मण पंडितांच्या वाद-सभांत नि धर्मपरिषदांमध्ये गेला. त्या पार्श्वभूमीवर बौद्धिक नि शाब्दिक कसरतीपेक्षा जंगल सत्यागृहाच्या निमित्ताने त्यांनी नगर, नाशिक, धुळे असा जो प्रवास केला, त्यातून

त्यांना खऱ्या भारताचे दर्शन घडले. त्यातून कधीकाळचा स्नान, संध्या, पूजापाठ करणारा ब्राह्मण पंडित जनसंपर्काने नि भारत दर्शनाने समाजपरिवर्तन करणारा सुधारक, साहसी, सक्रिय कार्यकर्ता झाला. महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवन, कार्य आणि विचारांच्या आकर्षणाची ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्याशिवाय तर्कतीर्थांना अभिप्रेत महात्मा फुले कळणे कठीण.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९१४ मध्ये वाईच्या प्राज्ञपाठशाळेत नारायणशास्त्री मराठे यांना वेदांग पंडितीचा लौकिक ऐकून आलेले. सन १९२४ पर्यंत त्यांनी आपल्या गुरू नि अन्य अध्यापक शास्त्री-पंडितांकडून शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिषसारख्या वेदांगांचा अभ्यास केला. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद यांची मीमांसा ते शिकले. श्रृती-स्मृती-पुराणे-उपनिषदे यांचा अभ्यास करीत ते शास्त्री झाले. काशी, कलकत्त्याला जाऊन अनेक वेदसंपन्नमूर्ती, महामहोपाध्याय, तर्कशास्त्री यांच्याकडून संस्कृत साहित्याचा उच्चतर व्यासंग संपादन केला आणि विधिवत 'तर्कतीर्थ' बनले ही उपाधी (पदवी) धारण करून. पुढे त्यांनी प्राज्ञपाठशाळेत येऊन सन १९२१ ते १९३० असे सलग दशकभर अध्यापक म्हणून कार्य केले. अलंकारशास्त्र, न्याय आणि वेदांत हे तीन विषय ते शिकवत असत. संस्कृत अभ्यासानंतर तर्कतीर्थ 'मराठीचे अवांतर' (मराठी गद्याचा इंग्रजी अवतार) वाचन करू लागले. रियासतकार गो. स. सरदेसाई 'मराठी रियासत'चे खंड, विष्णुशास्त्री चिपळूणकरांची 'निबंधमाला', 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर यांचे 'निवडक निबंध' वाचले. आगरकरांच्या वाचनाने त्यांचे विचारविश्व बदलले. केशवसुत, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, अनिल, बा. भ. बोरकर ते वाचत गेले.

सन १९३० ला कायदेभंगाच्या चळवळीत तर्कतीर्थांना तुरुंगवास भोगावा लागला. या काळात त्यांचे इंग्रजी वाचन विधिवत सुरू झाले. बकलचा 'हिस्टरी ऑफ सिव्हिलिझेशन इन इंग्लंड' वाचला नि नागरी समाज प्रगल्भतेची एक जाण त्यांच्या मनात बसत गेली. गिबनचे दि हिस्टरी ऑफ दि 'डिक्लाइन अँड फॉल ऑफ दी रोमन एम्पायर' वाचले नि इंगजी साम्राज्याचा अस्त होऊ शकतो, असा विश्वास दुणावला. हिप्पोलाइट तेन (Hippolyte Taine) लिखित 'हिस्टरी ऑफ इंग्लिश लिटरेचर' वाचून संस्कृतच्या पार्श्वभूमीवरील पाश्चात्य साहित्याचा भौतिकवादी वा इहवादी दृष्टिकोन लक्षात आला. तर्कतीर्थांच्या वाचनाची अभिरूची रंजकतेपेक्षा प्रबोधनाकडे होती. त्यांचा ओढा कठीण पुस्तकांकडे होता. हे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या लक्षात आले. ते तर्कतीर्थांना एकदा म्हणाले होते की, 'तू न्याय[४७] इतका शिकला आहेस तर युरोपियन न्याय वाच की.' या संवाद, सल्ल्याने तर्कतीर्थांच्या वाचनाचे वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहू लागले होते. इतिहासाचार्य राजवाडे यांची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांनी जॉन स्टुअर्ट मिलचे 'ए सिस्टिम ऑफ लॉजिक' वाचले. नंतर त्याचेच 'ऑन लिबर्टी' त्यांना आठवले. मग मिलचे 'कन्सिडरेशन्स

ऑन रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्न्मेंट' हाती लागले. धुळयाच्या तुरुंगात असताना द्वा. भ. कर्णिकांचा परिचय दृढ झाला. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. त्यावेळी तुरुंगात विविध मतप्रवहांचे, मतभिन्नतेचे कार्यकर्ते येत; पण स्वातंत्र्याबद्दल त्यांचे एकमत असे. द्वा. भ. कर्णिकांमुळे कार्ल मार्क्सची ओळख झाली. 'मॅन्युफॅस्टो', 'दास कॅपिटल'चे वाचन, चर्चा नित्याची झाली आणि तर्कतीर्थांचा ओढा गांधी, काँग्रेसकडून हळूहळू मार्क्सवाद, क्रांती इत्यादींकडे झुकू लागला, तरी स्वातंत्र्य, देश, परिवर्तन यांवर त्यांची श्रद्धा अढळ राहिली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९३०च्या कायदेभंगाच्या चळवळीत अहमदनगर, नाशिक, धुळे जिल्ह्यांच्या परिसरात शेतकरी, कातकरी, कोळी, आदिवासी यांचे साराबंदी विरोधात जनमत जागृत करून जनसंघटनेद्वारा ब्रिटिश अन्यायाच्या विरोधात केलेल्या सत्याग्रहात गोळीबार झाल्यानंतर काही दिवस फरार होते. परंतु फितुरीने नंतर त्यांना अटक झाली.

खटला भरून त्यांना ५० रुपये दंड आणि तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा झाली. त्यांची धुळे तुरुंगात रवानगी करण्यात आली. ऑक्टोबर १९३० ते जानेवारी १९३१ अशी तीन महिने शिक्षा भोगून ते वाईस परतले. प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक आणि तर्कतीर्थांचे गुरू नारायणशास्त्री मराठे यांनी काही मतभेदाने संन्यासाश्रम ग्रहण केला आणि ते स्वामी केवलानंद सरस्वती झाले. त्यामुळे प्राज्ञपाठशाळा संचालनाची जबाबदारी तर्कतीर्थांवर येऊन पडली. ती त्यांनी आयुष्यभर पेलली आणि सांभाळली.

एकीकडे प्राज्ञपाठशाळा, हरिजन विद्यार्थ्यांसाठीचा एकलव्य वसतिगृहाचा संसार, तर दुसरीकडे स्वातंत्र्य चळवळ अशी त्यांची तारेवरची कसरत होत होती. सन १९३२च्या सत्याग्रहात त्यांना ब्रिटिश पोलिसांनी मार्चमध्ये अटक करून खटला दाखल केला. त्यावेळी त्यांना दहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावून धुळयाच्या तुरुंगात पुन्हा डांबण्यात आले. इथे त्यांना जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंद, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, अण्णासाहेब दास्ताने, भय्या मुधोळकर प्रभृती मान्यवरांचा सहवास लाभला. इथल्या दहा महिन्यांच्या वास्तव्यात त्यांनी भरपूर चिंतन, वाचन आणि मनन केले. आचार्य विनोबांची 'गीता प्रवचने' ऐकली. साने गुरुजी ती लिहून काढत. फेब्रुवारी १९३३ मध्ये त्यांची तुरुंगातून सुटका झाली आणि ते परत वाईस येऊन प्राज्ञपाठशाळेच्या कार्यात गर्क झाले.

**२) गांधी आणि ख्रिस्त** (१५ मे, १९४९)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी व्यक्तींसंबंधी केलेल्या भाषणांपैकी आरंभिक भाषण हे महात्मा जोतिराव फुले यांच्यावर देण्यात आले होते. त्याची चर्चा या प्रस्तावनेत 'ज्योति-निबंध' (१९४७) मध्ये करण्यात आली आहे. तर्कतीर्थांनी व्यक्तींवर सुमारे १५ भाषणे केल्याच्या नोंदी आढळतात. एखाद दुसरा अपवाद वगळता आपण सर्व भाषणे संकलित करू शकलो. त्यांचा इथे विचार करीत आहोत.

महात्मा जोतिराव फुले यांच्याशिवाय तर्कतीर्थांनी सन १९४७ ते १९९१ या कालखंडात सर्वश्री महात्मा गांधी, महात्मा गौतम बुद्ध, कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय, काश्मिरी कवी राजानक रत्नाकर, बागलाण सिंह नरहर गोपाळशेठ नामपूरकर, साने गुरुजी, आचार्य अत्रे, गायक कुमार गंधर्व, जगद्गुरू शंकराचार्य, आचार्य रामानुज प्रभृती मान्यवरांवर प्रसंगोचित विविध पैलूंवर भाषणे दिलेली आढळून येतात.

'गांधी आणि ख्रिस्त' या शीर्षकांतर्गत तर्कतीर्थांनी ब्राह्म समाज, वाईसाठी भाषण दिले होते. ते भाषण २५ फेब्रुवारी, १९४९ रोजी टिळक स्मारक मंदिर, वाई येथे संपन्न झाले होते. ब्राह्म समाज, वाई यांनी हे भाषण महात्मा गांधींच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त योजले होते. साप्ताहिक साधना, पुणेच्या २८ एप्रिल, १९४९ रोजीच्या अंकात विस्तृतपणे, तर प्रार्थना समाज, मुंबईचे मुखपत्र असलेल्या 'सुबोध पत्रिका'च्या १५ मे, १९४९च्या अंकात या भाषणाचा त्रोटक वृत्तांत प्रकाशित झाला होता. ब्राह्मो समाज, वाईचे कार्यकर्ते आणि समाजसेवक रा. ना. चव्हाण यांनी तो सारांश पाठविलेला होता. मात्र साप्ताहिक साधना, पुणेच्या २८ एप्रिल, १९४९च्या अंकात हे भाषण विस्तृत रुपात प्रकाशित झाला होता. त्याभाषणाची विस्तृत संहिता या खंडात देण्यात आली आहे. प्रस्तुत भाषणात ख्रिस्त, बुद्ध आणि गांधी अशी तुलना आहे. ही तुलना समजून घ्यायला वि. स. खांडेकरांची रूपककथा 'बुद्ध, ख्रिस्त आणि गांधी' उपयोगी ठरली. तर्कतीर्थ आपल्या भाषणात महात्मा गांधींची तुलना येशू ख्रिस्तांशी करतात, ती साम्यस्थळांमुळेच. दोघांत तात्त्विक साम्य असले तरी परिस्थिती भिन्न आहे. दोहोंतील कालांतर मोठे आहे. एक राजकारणी, तर दुसरा धर्मोपदेशक, संस्थापक. ख्रिस्त प्रभाव गांधींवर आहे. तो पतित, दरिद्री, गरीब लोकांविषयीच्या करुणा नि आस्थेसंबंधात दोहोंची हत्या स्वकीयांनी केली. दोघे सर्वोदयी विचारांचे होते. महात्मा गांधी राजकारणात असल्याने साधुत्व राखणे अशक्य होते, असे मत तर्कतीर्थ या भाषणात व्यक्त करतात. त्या मताशी सर्वच सहमत होतील असे नाही. महात्मा गांधींच्या जीवनाचा उद्देश 'रामराज्य' स्थापनेचा होता. त्यांचे साम्य आपणास ख्रिश्चन धर्मातील 'देवराज्य'(Kingdom of God)मध्ये पहावयास मिळते. हे सर्व भाषण महात्मा गांधींवरील येशू ख्रिस्तांच्या जीवन व विचार प्रभावास अधोरेखित करीत दोहोंची एकमेकांशी तुलना करणारे आहे.

**३) महात्मा गांधी** (ऑक्टोबर, १९४८)

गांधी स्मारक निधीतर्फे आयोजित नागपूर येथील कार्यकर्ता शिबिरात ऑक्टोबर, सन १९४८ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी हे भाषण केले होते. त्या शिबिराचे स्वरूप महात्मा गांधी स्मृतीस अभिवादन असे होते, हे या भाषणावरून स्पष्ट होते.

महात्मा गांधींची हत्या झाली, तेव्हा तर्कतीर्थ कलकत्त्यात होते. सन १९३५ मध्ये पुण्यात त्यांच्या हत्येचा प्रयत्न झाला. तेव्हाही ते योगायोगाने पुण्यात होते. तेव्हा पुण्यात निषेध सभा झाली होती. आपला स्वभाव दु:ख करण्याचा नाही. परंतु, महात्मा गांधींची हत्या एका मानवजातीच्या इसमाने करणे, याचे त्यांना दु:ख झाल्याचे ते भाषणात स्पष्ट करतात.

मनुष्य भौतिक साधनांद्वारे आपले प्रश्न सोडविण्यास असमर्थ आहे. महात्मा गांधी असे प्रश्न सोडविण्यात गुंतलेले होते. त्यांचा मार्ग मानसिक सामर्थ्याचा होता.

श्रद्धावाद हा बुद्धिवादापेक्षा कमी दर्जाचा आहे. बुद्धीस सत्य गम्य नाही. तिच्या पलीकडे स्फूर्तिमय प्रज्ञा सत्यास आकलून ठेवत असते. अलौकिक बुद्धिमत्ता आणि अप्रतिम कर्तृत्व यांचे रहस्य विलक्षण शक्तीमध्ये भरून राहिलेले असते. अशी प्रचीती (Intuition) काही व्यक्तींच्या ठायी असते. महात्मा गांधी अशांपैकी एक होते. महात्मा गांधी, कार्ल मार्क्स नीती आणि सत्य समजावणारे होते. महात्मा गांधी हिंदुस्थानात जन्मले तरी ते जगाचे होते. 'मी इंग्रजांचा मित्र आहे,' असे ते म्हणत. महात्मा गांधींची थोरवी इंग्रज शास्त्रज्ञ व्हाईटहेडनी 'ॲडव्हेंचर्स ऑफ आयडिया'मध्ये लिहून ठेवली आहे; पण त्यांचे मोठेपण त्यांच्या अनुभवात होते. पक्ष, संघ, दल यापलीकडचं त्यांचं मोठेपण होतं. प्रेमापासून मिळणारी प्रेरणाच खरी! प्रेमाने न वागणाऱ्या संस्कृतीचे परिणाम आज आपण पहात आहोत. गांधीजींना आपण या देशातून ज्यांना निर्वासित केलं, त्यांना इथे श्वास घेण्यास जागा नाही यांची खंत होती. ख्रिस्ताचा पुनर्जन्म तिसऱ्या दिवशी झाला होता, असे आपण ऐकतो. महात्मा गांधींचे पुनरुज्जीवन व्हावे, अशी परिस्थिती येथे निर्माण व्हायला हवी. त्यांच्या दिव्य स्फूर्तीचा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे. मृत्यू अमरत्नाचे झाकण होय. त्यांच्या आत्म्यास मी अभिवादन करतो. असे म्हणत त्यांनी या अभिवादनपर भाषणाचा समारोप केला आहे.

**४) श्रद्धाशील बुद्धिजीवी : मानवेंद्रनाथ रॉय** (३० जानेवारी, १९५४)

महात्मा गांधींप्रमाणेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावर दोन व्यक्तिभाषणे दिली होती; पैकी एक मराठी असून दुसरे इंग्रजी आहे. त्यांपैकी मराठी भाषण ही मानवेंद्रनाथ रॉय यांना वाहिलेली श्रद्धांजली होय. ती त्यांनी मुंबईतील ३० जानेवारी, १९५४ च्या श्रद्धांजली सभेत वाहिली होती. या भाषणाचे शब्दांकन तर्कतीर्थांचे शारदाश्रम, बोर्डी (जि. पालघर)तील स्नेही श्री. ग. मळेकर यांनी करून 'नवभारत' मासिक, वाईस पाठविले होते. ते त्या मासिकाच्या एप्रिल, १९५४ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. खरं तर मानवेंद्रनाथ रॉय प्रखर बुद्धिवादी गृहस्थ होते; पण या व्याख्यानात तर्कतीर्थ त्यांना श्रद्धाशील रूपात प्रस्तुत करतात. रॉय हे संकटांवर मात करणारे गृहस्थ होते. स्वातंत्र्यशोध (Quest of Freedom) हा त्यांचा ध्यास होता. त्यासाठी ते आजीवन झटले. ऐन कौमार्यात त्यांनी आपल्या श्रद्धेचा उन्मेष दाखविला आणि ते क्रांतिकारी बनले. ते मार्क्सवादी होते; पण कट्टर समर्थक (Conformist) नव्हते, म्हणून तर त्यांनी आपल्या जीवनाच्या उत्तरार्धात नवमानवतावाद (New Humanism) मांडला. मूलत: ते लोकशाही मानणारे (Radical Democrate) गृहस्थ होते. ते स्वयंसिद्ध, स्वयंप्रज्ञ होते. त्यांची स्वत:ची अशी जीवनदृष्टी होती.

**५) काश्मिरी कवी राजानक रत्नाकर** (फेब्रुवारी १९५५)

व्यक्तिभाषण शृंखलेतील सर्वथैव नवा प्रकाश टाकणारे आणि अनवट माहिती देणारे भाषण आहे. 'काश्मिरी कवी राजानक रत्नाकर'. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे भाषण पुणे आकाशवाणीवरून प्रक्षेपित झाले होते. ते मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबादचे मुखपत्र असलेल्या 'प्रतिष्ठान' मासिकाच्या फेब्रुवारी, १९५५ च्या अंकात प्रकाशित झाले होते. यात तर्कतीर्थ आपणास काश्मिरी कवी राजानक रत्नाकर यांच्या जीवन व काव्याबद्दल सांगतात. हा कवी काश्मीरमध्ये इ.स.८४०च्या सुमारास होऊन गेला. तो काश्मिरी नरेश अवंती वर्मा (इ. स. ८५५ ते ८८४) यांचा समकालीन कवी होय. तो काश्मिरी नरेश चिप्पड जयापीड यांचा दरबाराश्रित कवी. तो आपले काव्य 'बालबृहस्पती' नाव धारण करून करीत असे. त्याने 'हरविजय', 'वक्रोक्ती पंचाशिका' आणि 'ध्वनिगाथापंजिका'. ही तीन काव्ये रचली. त्यापैकी 'हरविजय' या महाकाव्यामुळे तो प्रसिद्ध झाला. हे पन्नास श्लोकांचे काव्य आहे. 'रघुवंश', 'किरातार्जुन'पेक्षा ते दुप्पट आकाराचे आहे. त्यात ४,३२१ श्लोक आहेत. हा भाषाप्रभू कवी. त्याची शैली प्रासादिक होती. महादेव या काव्याचा नायक होय. त्याची ही कथा वीररसयुक्त आहे. शृंगाररसही यात आहे. या काव्याची अशी महती सांगितली जाते की, 'या काव्याचे सम्यक अध्ययन करणारा विद्यार्थी अकवी असेल तर कवी बनेल आणि जो कवी असेल तर तो महाकवी बनेल.' कवी राजानक रत्नाकरची दुसरी काव्यरचना 'वक्रोक्ती पंचाशिका' ही पन्नास श्लोकांचे लघुकाव्य आहे. ''हरविजय' हे ठरावीक ठशाचे महाकाव्य असल्यामुळे त्यात षड्ऋतुंची वर्णने, पुष्पावचय, वनक्रीडा, दिवसावसान, चंद्रोदय, पानगोष्टी, रती, उष:काल इत्यादी वर्णने आली आहेत. शिवपार्वती हे विश्वसम्राट म्हणून राजाचे सर्व उपचार आणि अंगे त्यात आली आहेत. विविध रत्नांचे, समुद्राचे अलंकारपूर्ण वर्णन हे या काव्याचे एक निराळे वैशिष्ट्य आहे,'' असे तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात नमूद केले आहे. या भाषणामुळे वाचकांना एक नवा कवी आणि त्याची काव्यवैशिष्ट्ये लक्षात येतात व काश्मिरी काव्याची उंची लक्षात येते.

**६) रामदासांचे जीवनकार्य** (२७ मार्च, १९५८)

आकाशवाणी हे व्याख्यानास व्यापक श्रोतृवर्गापर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी साधन आहे. दूरदर्शन अविर्भावानंतरही आकाशवाणीने आपले हे वैशिष्ट्य अबाधित ठेवले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची अनेक भाषणे आणि मुलाखती महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, औरंगाबाद, जळगावसारख्या केंद्रांनी ध्वनिमुद्रित करून प्रक्षेपित, प्रसृत केल्या आहेत. आकाशवाणीच्या स्वत:च्या व्याख्यानमाला असून, त्यांचे प्रसारण राज्यस्तरावर होत असते. ही व्याख्याने नंतर आकाशवाणी पुस्तिकेच्या रूपाने प्रकाशितही करीत असते. पु. मं. लाड व्याख्यानमाला ही अनेक आकाशवाणी केंद्रे आयोजित करीत असतात. पुणे, मुंबईसारखी व्यापक प्रसारण केंद्रे ती योजून प्रक्षेपित करीत असतात. अशांपैकी 'रामदासांचे

जीवन-कार्य' हे एक व्याख्यान होय. ते २७ मार्च १९५८ रोजी मुंबई आकाशवाणी केंद्रावरून प्रथम प्रक्षेपित झाले होते.

संत रामदास सतराव्या शतकातील कवी होत. चक्रधर हे द्वैती संत, तर रामदास यांनी अद्वैतवादी प्रपंचात राहून परमार्थाची शिकवण दिली. असे अनेक संत मराठीत आढळतात. वारकरी संप्रदायाचे जीवनदर्शन याच पठडीतील आहे. संत रामदास यांनी लिहिलेल्या 'दासबोध' या काव्यात त्यांचे अल्पचरित्र आहे. अनेक समकालीन आणि उत्तरकालीन चरित्रकारांनी संत रामदास यांची चरित्रे लिहिली आहेत. त्यांच्याइतकी चरित्रे अन्य संतांची दिसत नाहीत. संत रामदास यांच्या चरित्राचे चार कालखंड पडतात, पैकी पहिले तीन कालखंड हे एकेक तपाचे (बारा वर्षे) आहेत. १) शैशव, २) तपश्चर्या, ३) तीर्थाटन, ४) कृष्णाकाठाचे जीवन (उत्तरार्ध). नाशिक, सज्जनगड (सातारा), आब (संत रामदास जन्मभूमी, घनसावंगी तालुका, जि. जालना, मराठवाडा, महाराष्ट्र), चाफळ (जि. सातारा), टाकळी बुर्द (ता. नांदगाव, नाशिक) ही समर्थ रामदासांची वास्तव्य स्थळे होत. छत्रपती शिवाजी महाराजांचे ते समकालीन असून, त्यांच्याशी ते संबंधित होते. 'दासबोध', 'मनोबोध', 'उपदेश साहस्री' या त्यांच्या काव्यरचना आहेत. त्यांचे 'मनाचे श्लोक' सर्वश्रुत आहेत. तर्कतीर्थांनी आपल्या या व्याख्यानातून संत रामदासांच्या जीवन आणि कार्याचे विस्तृत विवेचन केले आहे. समर्थ-साहित्य आणि समर्थ-चरित्र त्यांनी रामदासांच्याच खालील शब्दांत करीत या व्याख्यानाचा समारोप केला आहे.

'उमजणे-समजणे आधी!
प्रवृत्ती-निवृत्तीकडे!
भाग्यश्री मोक्षश्री होते!
विवरतां पुढे!!' (मनोबोध-३३२)

मानवी समाज हा सज्जनांचा अभेद्य किल्ला (सज्जनगड) बनावा, त्यांत सतत भाग्यश्री, मोक्षश्री (समृद्धी व मुक्ती) नांदावी, अशी अपेक्षा रामदासांनी वरील श्लोकातून व्यक्त केली आहे. एका परीने या पदातून त्यांनी मानवी जीवनाचा उद्देशच विशद केला आहे. या व्याख्यानाचे पुन:प्रक्षेपणही झाले आहे. त्यातून व्याख्यानाचे महत्त्व आणि साफल्य स्पष्ट होते.

**७) बागलाण सिंह : नरहर गोपाळशेठ नामपूरकर** (जून, १९५९)

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील नामपूर हे गाव स्वातंत्र्यलढ्यात आघाडीवर होते. शेतसाऱ्याचा लढा, असहकार चळवळ, विदेशी कापडाची होळी, जंगल सत्याग्रह, खादीनिर्मिती केंद्र, स्वातंत्र्य चळवळीतील भूमिगतांचे आश्रयस्थान आणि संघटन केंद्र म्हणून सन १९३०च्या आसपास हे गाव प्रसिद्धीस आले. तेथील नरहर गोपाळशेट नामपूरकर हे या सर्वांचे आश्रयस्थान होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय

असताना त्यांचा नरहर गोपाळशेठ नामपूरकर यांच्या वाड्यातच दोन महिने मुक्काम होता. पुढे ३१ मे, १९५९ रोजी त्यांच्यावरील एका चरित्राचे प्रकाशन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते झाले. त्या भाषणाचा सारांश 'उन्नती' मासिकाच्या जून, १९५९ च्या अंकात प्रकाशित झाला.

आपल्या या भाषणात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीच्या स्मृती जागवत 'बागलाण सिंह: नरहर गोपाळशेठ अलई तथा नामपूरकर यांचे कार्य सांगितले. त्यानुसार त्यावेळी संगमनेर हे स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र होते. तिथे शिबिरे होत. अशात नरहर गोपाळशेठ यांचा परिचय झाला. ते या लढ्याचे मोठे आधारस्तंभ होते. त्यांचे चरित्र हे त्यांच्या कार्याचे दिग्दर्शन आहे. शुद्ध आचरण, नि:स्पृहपणे कार्य करणे या गोष्टी त्यांच्या ठायी वास करीत होत्या. श्रीमंतीत जन्म होऊन ते गरिबांना मदत करीत राहिले. बागलाण हा भाग इतिहासकाळापासून प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरी ही बागलाणी मराठीत लिहिली गेली आहे. नरहरशेठ यांनी स्वातंत्र्य चळवळीस मोठी साथ दिली. त्यांच्या या वाड्यातच स्वातंत्र्य चळवळीच्या बैठका, नियोजन होत असे. भूमिगत असताना मी दोन महिने याच वाड्यात रहात होतो. या चरित्र प्रकाशनाने आज ते ऋण फेडण्याची संधी मिळते.

हे भाषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सक्रिय योगदानाची साक्ष म्हणून महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्य चळवळीत तर्कतीर्थांनी कार्यकर्ते प्रशिक्षण, प्रबोधन आणि संघटन कार्य केले. या लढ्यात पोलीस पाटलांचे राजिनामे घेणे, साराबंदी सत्याग्रह, आदिवासी-कोळी संघटन इत्यादी अनेक कार्ये बागलाण परिसरात केली. हा त्यांचा सत्याग्रह इतिहासात 'मिनी बार्डोली सत्याग्रह' म्हणून ओळखला जातो. नामपूर सत्याग्रहींचे गाव म्हणून परिचित आहे.

**८) मांगल्याचे प्रकाशाचे दरवाजे उघडणारे : साने गुरुजी** (११ जून, १९७५)

११ जून, १९५० रोजी साने गुरुजींचे निधन झाले. ११ जून, १९७५ हा त्यांचा रजत स्मृतिदिन. त्या दिवशी त्यांचे शिष्य राजा मंगळवेढेकर यांनी महत्प्रयासाने सिद्ध केलेले 'साने गुरुजींची जीवनगाथा' हे बृहत्चरित्र रायगड जिल्ह्यातील कुलाबा तालुक्यातील गोरेगाव येथे प्रा. वामन मल्हार जोशी यांच्या घरी संपन्न झाले. प्रमुख पाहुणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. त्यांची निवड पाहुणे आणि प्रकाशक म्हणून एवढ्याचसाठी करण्यात आली होती की, कायदेभंगाच्या चळवळीत धुळे कारागृहात तर्कतीर्थ साने गुरुजींबरोबर सहा महिने होते. पुस्तक प्रकाशन समारंभानंतर केलेल्या भाषणात तर्कतीर्थांनी साने गुरुजींचा महिमा वर्णन करीत त्यांच्या स्मृती जागवल्या.

धुळे कारागृहात साने गुरुजी सक्तमजुरीची शिक्षा भोगत होते. अशी शिक्षा भोगणारे अन्य सत्याग्रहीसुद्धा होते. शिक्षा म्हणून जात्यावर दळणे सक्तीचे होते. ज्यांना हे जमत नसे, त्यांचे दळण साने गुरुजी दळून देत. साने गुरुजी प्रकाशाचा ध्यास लागलेले गृहस्थ होते. भारतात

कथाकथनाची परंपरा पूर्वापार; पण तिचा आधुनिक काळात सामाजिक जाणीव विकास आणि राष्ट्रप्रेमासाठी पुरेपूर उपयोग जर कुणी करून घेतला असेल, तर तो साने गुरुजींनी. या माध्यमातून साने गुरुजींनी असंख्य धडपडणारी मुले घडविली. त्यांच्या साहित्यावर रडवे साहित्य, दुबळे साहित्य म्हणून केला जाणारा आरोप खोटा आहे. त्यांचे रडू, अश्रू हे नैतिकता आणि सात्विकतेच्या ओढीतून निर्माण झाले आहे, हे आपणास विसरता येणार नाही. त्यांचे साहित्य वाचून जिव्हाळ्याचे अश्रू ओघळतात. या अश्रूंनी मन पवित्र होते. त्यातून पावित्र्याचा अट्टहास निर्माण होतो.

साने गुरुजींनी सामाजिक समतेसाठी पंढरपूर येथे मंदीर सत्याग्रह आणि उपोषण केले. हरिजनांच्या कळवळ्यातून हे घडले. राष्ट्रीय एकात्मतेचे आजही कागदी धिंडवडे पाहिले की, त्यांच्या 'आंतरभारती'चे महत्त्व पटते. आजच्या शिक्षणात श्रमाची प्रतिष्ठा होते. उत्पादक श्रमाशिवाय तरुणोपाय नाही, हे सानेगुरुजी समजावतात. आपल्या देहत्यागाने त्यांनी सत्तालोलूप, भ्रष्टाचारी विषवृक्षाविरुद्धचा आपला निषेध नोंदविला आहे.

**9) M. N. Roy : A Tribute** (May 1978)

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'चे महाराष्ट्रातील जे शिलेदार होते, त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींशिवाय वसंतराव कर्णिक, द्वा. भ. कर्णिक, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शहा, न्यायमूर्ती व्ही. एम. तारकुंडे, बा. र. सुंठणकर, व्ही. आर. जवाहिरे, डॉ. नलिनी तारळेकर, मणिबेन कारा, इत्यादींचा अंतर्भाव होता. त्यांपैकी वसंतराव कर्णिक यांनी 'M. N. ROY : POLITICAL BIOGRAPHY' हा चरित्रग्रंथ २५ जानेवारी, १९७८ रोजी प्रकाशित केला. या प्रकाशन समारंभाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल सादिक अली होते. याप्रसंगी दिलेले हे तर्कतीर्थांचे इंग्रजी भाषण. या भाषणात तर्कतीर्थांनी मानवेंद्रनाथ रॉय भारतात आल्यावर त्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून लोकशाहीच्या खऱ्या अंमजबजावणीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेत स्पष्ट केलं की, भारतीय लोकशाही ही लोकप्रतिनिधींमार्फत राबविली जाते. मतदानाच्या अधिकाराशिवाय सामान्य माणसांच्या पदरात लोकशाहीचे फायदे आणि फळे पडत नाहीत, त्यामुळे मानवेंद्रनाथ रॉय या निष्कर्षाप्रत आले होते की, 'Unless a strong foundation of radical democracy is organised at the grassroot, democracy would always remain feeble.' यासाठी मानवेंद्रनाथ रॉय यांनी लोकसमितींद्वारे लोकशाही रुजविण्याची कल्पना मांडली होती; पण ती महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद मात्र या विचाराशी सहमत नव्हते. त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी आपले मूलभूत मतभेद असल्याचं स्पष्ट केलं. ते लक्षात घेऊन मानवेंद्रनाथ यांनी काँग्रेस सोडली आणि आपल्या वरील व अन्य समविचारी मित्रांशी विचारविनिमय करून सन १९४० मध्ये 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'स्थापन केली. या भाषणास ही सर्व पार्श्वभूमी असून, ती तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संक्षेपाने विशद केली. कारण, या राजकीय चरित्राचे ते नेपथ्य होते. तर्कतीर्थांनी आपल्या या भाषणात मानवेंद्रनाथ रॉय आपल्या जीवनाच्या पूर्वार्धात क्रांतीचे समर्थक होते, तेच उत्तरार्धात नवमानवतावादी बनत अहिंसक परिवर्तनाचे खंदे समर्थक बनल्याचे स्पष्ट केले. वसंतराव कर्णिक यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सदर राजकीय चरित्रात या सर्वांचा ऊहापोह केल्याचेही तर्कतीर्थांनी या प्रसंगोचित भाषणात स्पष्ट केले आहे. हे भाषण, 'M. N. ROY - A Tribute' या शीर्षकांतर्गत 'दि रॅडिकल ह्युमॅनिस्ट' मासिकाच्या मे, १९२८ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. मानवेंद्रनाथ रॉय यांचा गौरव करीत त्यांना अभिवादन करीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी समारोप करताना भाषणात म्हटले होते की, "He also believed that man is essentially in the quest of freedom. He thought that essential rationality of man, if properly guided by inner light, could find the way to develop his potentialities. Roy's mature mind endowed with Socratic scepticism of current beliefs and a Socratic faith that knowledge is vertue." मानवेंद्रनाथ रॉय यांचा तर्कतीर्थ आदर करीत ते त्यांच्या सॉक्रेटिस वृत्ती आणि निरपेक्षतेमुळे.

**१०) आचार्य अत्रे : विनोद सामर्थ्याची प्रचिती** (१ ऑगस्ट, १९८०)

पत्रकार, संपादक असलेल्या माधव गडकरी यांनी 'सभेत कसे बोलावे?' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकात त्यांनी काही आदर्श भाषणसंहिता संग्रहित केल्या आहेत. त्यापैकी हे एक भाषण होय. तर्कतीर्थांचे हे भाषण आचार्य आत्रे यांच्या मुंबईतील पुतळा अनावरणप्रसंगीचे आहे. १३ ऑक्टोबर, १९८० रोजी आचार्य अत्रे यांची ८२ वी जयंती होती. (जन्म १३ जून, १९६९) या समारंभाचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अध्यक्ष होते. त्या अर्थाने या समारंभाचे ते अध्यक्षीय भाषण म्हणून उल्लेखनीय ठरले.

या भाषणात तर्कतीर्थांनी आपली आचार्य अत्रे यांच्याशी असलेली घनिष्ठ मैत्री प्रतिपादली आहे. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात हे दोन्ही मित्र परस्पर विरुद्ध पक्षात होते. मंचावर विरोधक; पण नंतर एकमेकांच्या घरी जाणं, रहाणं, जेवणं नित्याचं. हैदराबाद येथे १९६५ मध्ये मराठी समीक्षक प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या ४६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कृ. पां. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली सन १९६२ मध्ये प्रकाशित 'पदनाम कोश' भाषा संचालनालय व भाषा सल्लागार समितीने तयार केला होता. त्यावर 'बदनाम कोश' अशी टीका या संमेलनातील एका परिसंवादात आचार्य अत्रे यांनी केली होती. त्यावेळी त्यांच्यासमोर प्रेक्षकांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी उपस्थित होते. लोकाग्रहार्थ तर्कतीर्थांनी उत्स्फूर्त भाषण करून हा हल्ला परतवला होता. त्याचे सविस्तर वर्णन या भाषणात आहे.

या भाषणात तर्कतीर्थांनी आचार्यांची आपल्याशी आणि डॉ. आंबेडकर यांच्याशी कशी घनिष्ठ मैत्री होती ते स्पष्ट केले आहे. शिवाय आचार्य अत्रे यांच्या विनोद आणि शब्दसामर्थ्यांचं तोंडभरून कौतुक केलं आहे. 'त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे सुंदर रंगांचे अष्टपैलू झुंबर होते', 'साहित्यकाराला विश्वमैत्री हवी असते.' त्यात मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा सारे असते. ही मैत्री सार्वभौम असते. त्याला अपवाद नसतात. श्रेष्ठ साधूच्या आणि साहित्यकाराच्या ठिकाणी तादात्म्य वृत्ती असते. ती वृत्ती आणि जिव्हाळा या दोन्ही गोष्टी अत्र्यांकडे फार मोठ्या होत्या. अशा शब्दांत त्यांची प्रशंसा केली आहे.

**११) शंकराचार्य** (१९८७)

प्राचार्य राम शेवाळकर विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष असण्याच्या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची दोन भाषणे, दोन व्याख्यानमालांतर्गत परंतु सलग दोन दिवस योजली होती. नंतर त्या भाषणांच्या लिखित संहिता संग्रहीत करून 'दक्षिणेतील दोन आचार्य' या शीर्षकांतर्गत पुस्तिकेच्या रूपात सन १९८७ मध्ये प्रकाशित केली होती. त्यापैकी पहिले 'शंकराचार्य' हे भाषण 'कै. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास व्याख्यानमाला'अंतर्गत ११ ऑगस्ट, १९८७ रोजी संपन्न झाले होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'शंकराचार्य' या भाषणात शंकराचार्यांच्या जीवन, कार्य, विचार आणि योगदानाची मीमांसा केली आहे. भारतीय संस्कृती विकासात दक्षिणेतील दोन आचार्य (शंकराचार्य व रामानुजाचार्य) महोदयांचे योगदान असाधारण आहे. पैकी शंकराचार्य हे संस्कृत भाषेचे विद्वान. दक्षिणेत इ.स. ७०० ते १५०० काळात वेद, वेदांग आणि वेदांत यांचे भाष्यकार झाले; पण तत्पूर्वीचा या शंकराचार्यांचा अविर्भाव (इ.स.पू. ५०८ ते इ.स.पू. ४७६). दक्षिणेतील आचार्य परंपरेत शंकाराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, विद्यारण्य आणि सायणाचार्यांचे महत्त्व आगळेच आहे. पैकी शंकराचार्य यांचे चरित्र कुमारिलभट्ट यांनी लिहिले आहे. सुरेश्वराचार्य शंकराचार्यांचे समकालीन मानले जातात. त्यांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'नैष्कर्म्यसिद्धि', 'तैत्तिरीयभाष्यवार्तिक' आणि 'बृहदारण्यकभाष्यवर्तिका'. शंकराचार्यांची विजयगाथा गाणारी सुमारे पंचवीस संस्कृत पुस्तके उपलब्ध आहेत. शंकराचार्यांच्या जीवनातील तीन कार्ये महत्त्वाची ठरतात.- १) प्रस्थानत्रयीवरील भाष्य, २) बुद्धकालापासून चालत आलेल्या आस्तिक-नास्तिक तत्त्वज्ञानांचा परामर्ष होऊन मांडलेला समन्वय, ३) भारताच्या सर्व दिशांना मठांची केलेली स्थापना. आचार्यांनी परस्परविरोधी असलेले द्वैती कोण, याचा उलगडा केला आहे. त्यांनी तर्कशुद्ध पद्धतीने विरोध करण्याचा दृढ दृष्टिकोन भारतीय बौद्धिक संस्कृतीमध्ये स्वीकारला आणि रुजविलाही. त्यांचे भाष्यग्रंथ आणि प्रकरणग्रंथ यांची स्पष्ट उदाहरणे होत.

या भाषणात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी शंकराचार्य चरित्रातील प्रक्षिप्त हटवून मांडलेल्या चरित्रामुळे ते पारदर्शी आणि वस्तुनिष्ठ होण्यास मदत झाली आहे. संशोधनपूर्ण सप्रमाण विवेचन या भाषणाचे वैशिष्ट्य होय.

**१२) रामानुजाचार्य**

विदर्भ साहित्य संघ, नागपूर आयोजित 'दक्षिणेतील दोन आचार्य मालिका'मधील 'रामानुजाचार्य' हे दुसरे व्याख्यान १२ ऑगस्ट, १९८७ रोजी झाले. हे व्याख्यान 'कै. शिवदास कृष्ण बारलिंगे व्याख्यानमाला'अंतर्गत झाले. याचे अध्यक्षस्थान प्राचार्य राम शेवाळकर यांनी भूषविले होते.

दक्षिणेतील दुसरे आचार्य रामानुज यांचा अविर्भाव आद्य शंकराचार्यांनंतर तीनशे वर्षांचा (इ.स. १०१७ ते ११३७). त्यांनी वैष्णव संप्रदायास 'ब्रह्मसूत्र'वर भाष्य लिहून वेदांताचा आधार दिला. त्यांनी भक्तिमार्गास ज्ञान आणि कर्म यांच्यापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त करून दिले. त्यामुळे रामानुजाचार्यांना भाष्यकार आणि वैष्णव संप्रदायाचे श्रेष्ठ तत्त्वज्ञ म्हणून स्थान मिळाले. त्यांनी आळवार संताना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. रामानुजाचार्यांना दीर्घ जीवन (आयुष्य) मिळाले. या काळात त्यांचे अनेक शिष्य झाले. वैष्णव धर्माचा त्यांनी भारतभर प्रचार-प्रसार केला. त्यांनी आपल्या संप्रदायात बौद्ध आणि जैनधर्मीय अनुयायांना प्रवेश देण्यात उदारता दाखविली. ते स्वत: शूद्र गुरूंचे शिष्य बनले. ते अस्पृश्य मित्रांच्या झोपडीमध्ये दीर्घकाळ चर्चा करीत. ७४ मठांवर त्यांचे पूजोत्सव अभिषेक झाले. ७०० गोसावी, १२००० संन्यासी, ३०० संन्यासिनींचा त्यांच्या अनुयायांमध्ये समावेश होता. अनेक राजे, धनिक त्यांचे शिष्य झाले. कुरेश, दाशरथी, नडाडूर, अम्माळ, पराशर भट्ट हे त्यांचे पट्टशिष्य शास्त्रार्थात प्रवीण होते. त्यांच्यात त्यांनी धार्मिक कर्मकांड, मुदपाकखाना, द्रव्यनिधी, भोजनालय असे कार्यविभाजन करून शिष्यांवर विविध जबाबदाऱ्या सोपविल्या, त्यामुळे दीर्घायुष्य लाभूनही त्यांच्या धर्म, संप्रदाय कार्यात कुठेही अनागोंदी, बेदिली माजली नाही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या भाषणातून रामानुजाचार्य यांचे पुरोगामीपण अधोरेखित केले आहे. ते उदारमतवादी, सहिष्णू आणि सर्वसमन्वयी संत होते. त्यांची समदर्शी दृष्टी अनुकरणीय होती. म्हणूनच त्यांना व्यापक जनसमर्थन लाभले.

**१३) भारतीय संगीताला नवा मार्ग दाखविणारा कलाकार : कुमार गंधर्व** (८ मे, १९८४)

८ मे, १९८४ रोजी देवास (मध्यप्रदेश) येथे प्रख्यात गायक कुमार गंधर्व यांचा षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ संपन्न झाला. त्या कार्यक्रमात प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईतर्फे कुमार गंधर्व यांची मैफल योजली होती. त्यावेळी प्रास्ताविकपर केलेले हे भाषण. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या भाषणात गायक कुमार गंधर्वांच्या गायकीचे एकप्रकारे रसग्रहण, समीक्षण नि आस्वादन केल्याचे लक्षात येतं.

त्यांच्या मतानुसार, कुमार गंधर्व भारतातील श्रेष्ठ गायक असून, त्यांची कीर्ती सर्वत्र पसरलेली आहे. कुमार गंधर्व यांनी नवे राग निर्मिले. नवीन बंदिशी बांधल्या आणि गायकीला

नवा आकृतिबंध दिला. अशा त्यांच्या रचनांचा संग्रह आहे. 'अनॅपरागविलास'. (तो हिंदी ग्रंथ असून मौज प्रकाशनगृह, मुंबईने तो प्रकाशित केला आहे.)

संगीताच्या चीजांना काव्य म्हणून महत्त्व नसतं. परंतु, अपवाद म्हणून रचलेल्या बंदिशीमुळे ते येतं. कुमार गंधर्व यांनी संत कबीर, मीरा, सूरदास, तुकाराम, रामदास, गुरू नानक यांच्या अभंग, रचना अशा रूपात सादर केल्या नि त्यांना मान्यता मिळाली. काव्यास सूर, ताल, संगीत लाभलं की, त्याचा आविष्कार आपणास अनुभवास येतो. कुमार गंधर्वांच्या गायनात मोक्षानुभूती असते. ती ते स्वत: अनुभवत श्रोत्यांना देतात. नृत्य, संगीताची देवता श्री नरनारी-नटेश्वर होय. ईशस्तवन, शंकराराधना, सरस्वतिस्तवन, गुरूभजन, संगीतमहिमा, ऋतुवर्णन, विराणी, बासरी इ.द्वारे त्या देवतेची पूजा गायक, नर्तक, वादक करतात.

कुमार गंधर्व यांच्या गायनातून भारतीय संगीताचा विकास झाला आहे. माळव्याच्या लोकसंगीतास त्यांनी गानबद्ध करून त्यास प्रतिष्ठा दिली. आज पाश्चात्य संगीतात त्याचे स्वर उमटत आहेत. कुमार गंधर्व यांच्या गायन आविष्कारातून नवं विलक्षण विश्व आकारलं आहे. गोऱ्या अमेरिकनांनी काळ्या आफ्रिकी गुलामांना पळवून नेलं; पण अमेरिकन संगीतात निग्रोंचं संगीत एकरूप झालं. कुमार गंधर्वांनी तोच आदर्श भारतीय संगीतातून निर्माण केला. त्यांनी भारतीय संगीतास नवा मार्ग दाखविला. या भाषणातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कुमार गंधर्व यांच्या गायनाचं सामर्थ्य आणि वैशिष्ट्य विशद केलं आहे.

**व्यक्तीसंबंधी भाषणांची मीमांसा**

या भाषण संग्रहात व्यक्तीसंबंधी १३ भाषणे आहेत. ती १९४६ ते १९९१ अशा पाच दशकांच्या कालखंडातील आहेत. ती भाषणे वाई, पुणे, मुंबई, नागपूर, नामपूर (बागलाण, जि. नाशिक), गोरेगाव (जि. रायगड), देवास (मध्यप्रदेश) येथे दिली गेली. ती व्यक्तीसंबंधी असल्याने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यांच्या जीवन, कार्य, विचार आणि योगदानाचा अभ्यास करून दिली गेली. अधिकांश भाषणे संशोधनपर आहेत. मौखिक दिलेल्या भाषणांच्या तर्कतीर्थांनी कष्टपूर्वक लिखित संहिता तयार केल्याने ती आज प्रकाशनरूपात आपणासमोर आहेत.

महात्मा फुलेंवरील भाषण 'ज्योति-निबंध' स्वरूपात पूर्वप्रकाशित होते. महात्मा फुले यांच्याबद्दल सन १९४६ च्या काळात अपवादाने लिहिले गेले होते. नंतर तर्कतीर्थांनी महात्मा फुले स्मृतिशताब्दी वर्ष (१९९०) आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्षाचे (१९९१)औचित्य साधून 'फुलेचरित्र' लिहिले आणि महात्मा फुले यांच्या जीवन, कार्य, विचारांप्रती त्यांच्या मनात असलेला आदर व्यक्त केला. महात्मा गांधींचा तर्कतीर्थांना सहवास लाभला. वैचारिक मार्ग बदलल्यानंतर त्यांनी गांधी विचारांवर कोरडे ओढले; पण अंतिमत: ते महात्मा गांधींचेच वैचारिक वारसदार बनले. येथील दोन भाषणे एकाच वर्षातील आणि महात्मा गांधींच्या पहिल्या स्मृतिवर्षातील. या भाषणात तर्कतीर्थ महात्मा गांधींची

महत्ता विनापूर्वग्रह व्यक्त करतात. ज्यांच्या राजकीय नि क्रांतिकारी विचारांनी 'प्रक्षुब्ध' होऊन (हा तर्कतीर्थांचाच शब्द पण तो ते 'प्रभाव' अर्थाने वापरतात.) तर्कतीर्थांनी गांधीवादी विचारांशी फारकत घेत रॉयवाद अंगिकारला, त्या मानवेंद्रनाथ रॉय यांचे ते १९३६ ते १९४८ पर्यंत सरळ समर्थक होते. मानवेंद्रनाथ रॉय निवर्तल्यानंतरचे हे श्रद्धांजली भाषण होय. याच खंडात वैचारिक भाषणांमध्ये रॉयवादी कार्यकर्ते, पदाधिकारी, रॉय समर्थक म्हणून दिलेली चारएक इंग्रजी भाषणे आहेत. या सर्वांतून मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचे गारूड, क्रांतीचे आकर्षण आणि साम्यवादी विचारांबद्दलची आस्था पुरेशा प्रमाणात व्यक्त होते.

प्रकाशन समारंभाच्या निमित्ताने केलेली दोन गौरवपर भाषणे यात आहेत. पैकी एक 'बागलाण सिंह: नरहर गोपाळशेठ अलाई ऊर्फ नामपूरकर' यांच्यावरील असून, दुसरे साने गुरुजींवरील आहे. हे दोघे स्वातंत्र्यसैनिक, शिवाय दोघेही कायदेभंग चळवळीतील तर्कतीर्थांचे सहकारी आणि धुळे तुरुंगातील बंदीबांधव. या उभयतांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचे तर्कतीर्थ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि सहकारी. साने गुरुजींबद्दल त्यांचं मत - 'गुरुजींचे साहित्य वाचल्यावर माणुसकीचा गहिवर उफाळून येतो,' हे तर्कतीर्थांचं आस्वादक निरीक्षक होय.

आचार्य प्र. के. अत्रे आणि तर्कतीर्थ यांचं नातं म्हणजे विचार वैभिन्यातही मैत्रीचं अद्वैत राखता येतं, याची साक्ष होय. गायक कुमार गंधर्वांच्या गायकीचं तर्कतीर्थांना काय वेड? एक संस्कृत वेदांती शास्त्रोक्त संगीताचा चाहता कसा हे शोधायचं, तर तर्कतीर्थांच्या गुरूंपर्यंत म्हणजे स्वामी केवलानंद सरस्वतींपर्यंत जावं लागतं. केवलानंद सरस्वती न्याय, वेदांत, व्याकरणाचे सर्वज्ञ, तितकेच संत साहित्य विशेषत: अभंग, गायक. त्यांना शास्त्रीय संगीताची बैठक होती. ती तर्कतीर्थांनी अंगिकारली. कुमार गंधर्व, पु. ल. देशपांडे यांची तर्कतीर्थांशी मैत्री केवळ संगीत, गायनामुळं झाली. खरं नाही ना वाटत?

आद्य शंकराचार्य यांच्यावरील या विभागात चार व्याख्याने आहेत. शंकराचार्य यांनी प्रतिकूल काळात हिंदू धर्माचे रक्षण केले नाही, तर भारतात चारही दिशांना मठांची उभारणी करून त्यांनी हिंदू धर्माचा प्रचार, प्रसार केल्याचा त्यांना कोण आनंद नि अभिमान होता. तर्कतीर्थांनी ही भाषणे दीर्घ संशोधनांती दिली. शंकराचार्यांवरील २५ चरित्रांतील अनेक प्रक्षिप्त मजकूर गाळून त्यांनी शंकराचार्यांचे वस्तुनिष्ठ चरित्र आणि सामायिक योगदान अधोरेखित केले आहे. ही गोष्ट रामानुजाचार्य यांच्यावरील भाषणातून व्यक्त होते.

कमी-अधिक फरकाने ही सर्व भाषणे म्हणजे तर्कतीर्थांच्या वाचन, मनन, चिंतनाची, फलश्रुती म्हणून पाहता येते.

### २) वैचारिक भाषणे

### अ) स्वातंत्र्यपूर्ण कालखंडातील वैचारिक भाषणे

वैचारिक भाषणे मूलत: प्रसिद्ध वा प्रतिष्ठित व्यक्तींकडून दिली जातात. अशी व्यक्ती

समाजासाठी आदर्शभूत असेल, तर तिच्याकडून दिल्या गेलेल्या भाषणातून श्रोते वा प्रेक्षकांत कृतिशील परिवर्तन होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून अनुकरणीय व्यक्तींकडून प्रेरणादायी, परिवर्तनशील भाषणांची अपेक्षा समाज करीत असतो. अशा भाषणांतून ऐकणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्व आणि विचारधारेत परिवर्तन घडून येऊन त्याच्या किंवा तिच्या व्यक्तित्वाचा विकास घडून येतो, शिवाय ती व्यक्ती अशांतून सक्रिय होत रहात असते. त्या व्यक्तीच्या जीवनविषयक दृष्टिकोनात अशा भाषणांतून सकारात्मक बदल घडतो. पूर्वग्रह दूर होतात. व्यक्ती आत्मविश्वासी होतात. त्यांच्या क्षमतांचा विकास होतो. असे अनेक लाभ वैचारिक, प्रेरक भाषणांचे असतात.

अशी भाषणे उद्देशप्रधान, ध्येयप्रेरक असतात. ती माणसास प्रतिबद्ध बनवितात. जीवनाबद्दलची आस्था वाढविणे, आकांक्षावर्धन हे अशा भाषणांतून होत असते. वैचारिक भाषणे प्रगल्भ समाजनिर्मितीचे सशक्त संस्कारसाधन होय. स्वप्नांना सत्यात उतरविण्याचे प्रचंड सामर्थ्य वैचारिक भाषणात असते. जगातील अनेक क्रांत्या या अशा भाषणांतून घडून आल्या आहेत. हृदयपरिवर्तन, समाजसुधारणा, धर्मसुधारणांचा इतिहास लक्षात घेता, ते सर्व अशा भाषणांतून निर्माण झाल्याचे दिसून येते. अशी भाषणे जनसमुदाय, समाज, राष्ट्र, जग यांना प्रेरित करण्याची क्षमता बाळगून असतात. विचारांमध्ये अण्वस्त्रांपेक्षा अधिक शक्ती असते. ती प्रक्षोभक असतात, तशीच रचनात्मकही! वैचारिक भाषणे जितकी सहभागी करून घेणारी, जितकी संवादी तितकी ती परिणामकारक असतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात दिलेली भाषणे सामाजिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची होती. स्वातंत्र्योत्तर काळातील भाषणात विचार, विषय, तर्कवैविध्य राहिल्याने महाराष्ट्रात प्रबोधन युग अवतरले, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.

या प्रारंभिक असंकलित भाषणांशिवायची सुमारे पंचवीसएक जी भाषणे आहेत. त्यापैकी अधिकांश धर्म, ज्योतिषशास्त्र, साहित्य, संस्कृती, राजकारणासारख्या विषयांवर बेतलेली आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर्कतीर्थांच्या मनात धर्मातीत वा धर्मनिरपेक्ष देशाची अपेक्षा (Secular) होती. ती अनेक भाषणांतून व्यक्त होते. रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी आणि मार्क्सवादाचा अभ्यास, काँग्रेसमधील समाजवादी गटाचे साहचर्य याची पार्श्वभूमी अशा भाषणांना आहे. भाषावार प्रांतरचनेचा त्या वेळचा संघर्ष लक्षात घेता भाषा आणि साहित्याने राष्ट्रीय एकात्मतेसंदर्भात साध्य-साधन अशा दोन्ही भूमिकांतून कार्य करावे, अशी त्यांची भूमिका भाषणांतून वारंवार व्यक्त होताना दिसते. शिक्षण आणि विज्ञानाने आधुनिक समाज बनविण्याचे कार्य करावे, अशी त्यांची धारणा भाषणांतून व्यक्त होते. समाज बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ व्हावा, असा तर्कतीर्थांचा आग्रह अनेक भाषणांतून व्यक्त होताना दिसतो. महात्मा गांधी, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, शंकराचार्य, रामानुजाचार्य यांच्या जीवन, कार्य

आणि विचारांवरील त्यांची असंकलित भाषणे त्या व्यक्तीवरील त्यांचे प्रेम आणि आस्था व्यक्त करणारी आहेत. राष्ट्रीय एकात्मतेची भावना तर्कतीर्थांना विश्वधर्म भावनेशी सुसंगत आणि समन्वय करणारी वाटते. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली समग्र क्रांतीचा विचार जेव्हा पुढे आला, तेव्हा ते काँग्रेस समर्थक असूनही आणीबाणीविरोधी भूमिका घेत ते लेखन स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहतात. कराड येथे भरलेल्या ५१ व्या अखिल भारतीय नि त्याकाळात साहित्यिकांनी काढलेल्या पत्रकावर तर्कतीर्थांची व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी स्वाक्षरी होती. यातून त्यांची स्वतंत्र भूमिका स्पष्ट होते. अशा काही प्रातिनिधिक भाषणांचा इथे विचार केला आहे.

**१४) भारतीय तर्कशास्त्राची वाढ** (१९२६)

प्राप्त भाषणसूचीतील हे पहिले भाषण सर्वाधिक जुने. सन १९२६ च्या वसंत व्याख्यानमाला, पुणे अंतर्गत दिलेले हे व्याख्यान त्या व्याख्यानमालेचे १९ वे पुष्प होते. ‘भारतीय तर्कशास्त्राची वाढ’ या विषयावर ते २५ मे, १९२६ रोजी टिळक स्मारक मंदिरात झाले. वेदशास्त्र संपन्न श्रीधरशास्त्री पाठक या व्याख्यानाचे अध्यक्ष होते. याच दिवशी या व्याख्यानापूर्वी टिळक स्मारकात बाजीराव पुण्यतिथीनिमित्त महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार यांचे व्याख्यान होऊन मग तर्कतीर्थांचे भाषण होणार होते; पण त्या दिवशी पुण्यातील किबे वाड्यास दुपारी अडीच वाजता आग लागली. तिची भीती निर्मूल होईपर्यंत सायंकाळ झाली. ते भाषण सायंकाळी साडेसहाऐवजी सात वाजता सुरू झाले. ते रात्री सव्वाआठला संपले. त्यानंतर तर्कतीर्थांचे भाषण झाले. ते त्यांनी झालेला उशीर लक्षात घेता प्रस्तावना करून आटोपते घेतल्याची नोंद आहे.[४८]

**१५ धर्मशास्त्र विरुद्ध धर्मसुधारणा (१९३०)**

धर्मविषय अन्य पाच भाषणांपैकी तीन भाषणे बहुधा मार्च, १९३० मध्ये राजाराम ग्रंथालय, नागपूर येथे संपन्न झाली. त्यांचे विषय होते 'धर्मशास्त्र', 'समाजसुधारणा' 'धर्मनिर्णयाचे साधन'. ही भाषणे त्या वेळी महाराष्ट्र साप्ताहिकाच्या ९ आणि १६ मार्च, १९३० आणि 'नवा मनू', एप्रिल, १९३० च्या अंकात प्रकाशित झाली होती. यापैकी 'धर्मशास्त्र' शीर्षक प्रथम व्याख्यानात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्पष्ट केले आहे की, आज हिंदुधर्म सुधारणांचे वारे वहात आहेत. त्यात सांगितले जाते की आता धर्मात सुधारणा होणार आहेत. ते होणे काळाच्या संदर्भात अटळ आहे. हिंदुधर्मावर आधारित समाज रचनेचा पाया आर्थिक आहे. तो हजारो वर्षे चालत आलेला समाज आहे. त्यात रशियादि देशांत यशस्वी ठरलेल्या मार्क्सवादावर आधारित नवे विचार जुन्या समाज व्यवस्थेचा पाया उखडून टाकत आहे. यूरोपमध्ये याच विचारांच्या आधारे परिवर्तन घडून आली आहेत. तशी ती येथेही घडून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे जुन्या धर्मशास्त्राचा विचार नव्या समाजशास्त्राच्या संदर्भात करणे आवश्यक होणार आहे. अशा स्थितीत जुन्या नव्याचा संघर्ष स्वाभाविकच म्हणायला हवा. याबाबतीत धर्मशास्त्राकडे पहाण्याच्या शुद्ध दृष्टीची गरज आहे.

दुसरे व्याख्यान ज्या समाजसुधारणा विषयावर केंद्रित होते, त्यात तर्कतीर्थांनी विशद केले आहे की पूर्वमीमांसा पद्धतीचाही इतिहास लक्षात घेता जैमिनी, बादरायण, ऐतिशायन, शबर स्वामी, कुमारिल भट्ट प्रभृतींनी जे विचार व्यक्त केले त्यांचा आढावा घेत स्पष्ट होते की नव्या-जुन्यांतील मतभेद विचारात घेता बुद्धी, तर्क, विवेक इ.च्या कसोटीवर उतरते व ज्याची कार्यकारणमीमांसा करता येते, तेच सत्य होय. विज्ञानाचा पाया हाच आहे. धर्मग्रथांत मात्र कल्पना, भासाच्या आधारे भाष्य केले जाते. धर्मशास्त्रसंबंधी सुधारणांमुळे समाज रसातळाला जाईल, असे पुराण मतवाद्याना वाटते; तर सुधारकांना सुधारणांमुळे समाज पुढे जाईल असे वाटते. वस्तुतः विचार करता असे दिसते की समाजात कालसंगत सुधारणा होतात. धर्म तसाच राहिला तर तो कालविसंगत बनतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

**१६ धर्मनिर्णयाचे साधन : मीमांसा पद्धती विरुद्ध बौद्धिक पद्धती (१९३०)**

अशा भाषणांपैकी 'धर्मनिर्णयाचे साधन: मीमांसा पद्धती विरुद्ध बौद्धिक पद्धती' हे एक होय, ते राजाराम ग्रंथालय, नागपूर येथे दि. ११ मार्च, १९३० रोजी देण्यात आले होते. ते भाषण 'महाराष्ट्र' च्या १६ मार्च, १९३० च्या अंकात प्रकाशित झाले होते. त्यात थोडा फरक करून ते पंडित तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांच्या 'धर्मनिर्णयस्वरूप' (१९३३) ग्रंथातील परिशिष्ट-४ मध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे. हा ग्रंथ परचुरे-पुराणिक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई-४ यांनी प्रकाशित केला होता. प्रस्तुत भाषणात धर्मस्वरूप विशद करत तर्कतीर्थ यांनी सांगितले आहे की धर्मशास्त्र हे मानवी अनुभव व बद्धीतून निर्माण होत असते. प्रत्येक धर्मग्रंथांची निर्मिती प्रक्रिया लक्षात घेता ते दिव्य, अलौकिक, स्वतःप्रमाण, पवित्र मानले गेले आहेत. कारण ते दिव्य पुरुषांच्या अनुभव व विचारातून निर्माण झाले. त्या अनुभव नि विचारांना समाजमान्यता मिळाली, अनुयायी मिळाले. त्यातून धर्म संप्रदाय तयार झाला. कालांतराने असा पारंपरिक संप्रदायात नव विचारांचे महापुरुष जन्मतात. त्यांच्या विचारांतून नवसंप्रदाय तयार होतो. धर्मस्थापनेनंतर या धर्माचे विशिष्ट समाजावर अधिराज्य निर्माण होते. त्यातून धर्मसत्ता उदयाला येते. ती नीती, व्यवहार, उपासना, आचारपद्धती निश्चित करून यांचे नियंत्रण करते. यातूनच धर्म, धर्मग्रंथ, धर्माधिकारी स्वतःप्रमाण होत सर्वश्रेष्ठ होतात. धर्मग्रथांना स्वतःप्रमाण मानण्यातून ते अपरिवर्तनीय ठरतात. पण त्यातून ते कालबाह्य ही बनतात. ज्ञान विकसित होत राहते तर धर्मग्रंथ तसेच राहिल्याने कालांतराने ते जीवन विसंगत बनतात. ख्रिश्चन, इस्लाम इ. याची उदाहरणे होत. त्यातून धर्मशास्त्र विरुद्ध विवेक वा बुद्धिप्रामाण्य अशा संघर्षात धर्माचा पराभव अटळ बनतो.

हिंदुधर्माच्या संदर्भात धर्मसुधारणांचा विचार बुद्धिप्रामाण्यातूनच सुरू झाला. त्यातून पारंपारिक श्रद्धांना तडे गेले. एकोणिसाव्या शतकातील वैचारिक परिवर्तन आणि विसाव्या शतकातील यंत्र क्रांतीने धर्मसुधारणा विचारांना बळच मिळाले. यातून धर्मचिकित्सा अटळ बनली. त्यातून मीमांसा पद्धती व बुद्धी पद्धती निर्माण झाल्या. मीमांसा पद्धतीचे चौदा सिद्धांत म्हणजे धर्मास अपरिवर्तनीय ठरवणारी बंधनेच होत. तिचा बुद्धीवादी विरोध करतात. कल्पनेच्या आधारावर उभे विचार विवेकवादी नाकारतात. कार्यकारण मीमांसेच्या निकषावर उतरते ते सत्य

मानायाच्या विचारधारेतून परंपरेस विरोध होत गेला. सृष्टीत कोणतीही गोष्ट अंतिम असत नाही, हा बुद्धी पद्धतीचा पायाभूत विचार सिद्धांत होय. प्रत्यक्ष, कल्पना आणि भास यातील अंतरावर सत्य, असत्य स्वरूप निश्चित होत असल्याने त्या निकषांवरच धर्मनिर्णय होणे जरुरीचे असल्याचे प्रतिपादन बुद्धी पद्धती करते. प्रत्यक्ष धर्म हा खरा धर्म होय. तो आत्मशुद्धी, आत्मोद्धारांवर अवलंबून असून तो माणसास स्थितप्रज्ञावस्थेस नेतो.

**१७) महाराजा सयाजीराव गायकवाड स्वागत समारंभ, (१९३३) :**

(स्वागतपर भाषण)

बडोदे संस्थान गुजरात राज्यात असले, तरी तेथील नरेश महाराजा सयाजीराव गायकवाड हे मूळ मराठी भाषी असल्याने त्यांनी मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्र संस्कृतीवर्धनाचे असाधारण कार्य केले आहे. त्याबद्दल महाराष्ट्रीय समाजात सदैव कृतज्ञता आणि आदरभाव वसत आला आहे. १४ एप्रिल १९३३ मध्ये ते महाराष्ट्रातील महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी काही काळ स्वास्थ्यलाभाकरिता म्हणून विश्रांतीसाठी आले होते. आपला तेथील मुक्काम आटोपून परतीच्या प्रवासात त्यांनी कृष्णा नदीच्या तीरावर वसलेल्या तीर्थस्थळ असलेल्या वाई (जि. सातारा) गावास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी वाईमधील विविध सांस्कृतिक संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला होता. या सत्कार समारंभप्रसंगी वाईकर गावकऱ्यांतर्फे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वागतपर भाषण केले.

त्या भाषणात तर्कतीर्थ म्हणाले की, इतक्या वृद्धापकाळात आपण वाईस येण्याची तसदी घेतल्याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत. वाई गावावरून अनेक लोक रोज जा-ये करीत असतात. पैकी आपलाच सत्कार का? तर आपण आपले राज्य सुस्थित चालविले आहे. आपण आपल्या राज्यात सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा करून जनतेस साक्षर केले आहे. हिंदुस्थानातील समाज आणि धर्मसुधारणेत आपले राज्य अग्रणी आहे. आपण ज्ञानियांचा गौरव करण्याची परंपरा अंगिकारली आहे. भारतीय स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीस होकार देऊन आपण आपले अधिकार संकुचित करण्यास सहमतीचा उदारपणा दाखविला. मातृभूमी गौरवाच्या आपल्या भक्तीने आम्ही प्रभावित आणि प्रेरित झालो आहोत.

या समारंभातून तर्कतीर्थ आणि महाराजा सयाजीराव गायकवाड जवळ आले. त्यांनी तर्कतीर्थांना भाषणासाठी बडोद्याला आमंत्रित केले. तर्कतीर्थ संपादित असलेल्या 'धर्मकोश' प्रकल्पास अर्थसहाय्य दिले. तर्कतीर्थ करीत असलेल्या प्राच्यविद्याप्रसार कार्याबद्दल महाराजा सयाजीराव गायकवाड यांना रस नि आदर होता. आपल्या संस्थानामार्फत त्यांनी अनेक प्राच्य ग्रंथ प्रकाशित केले.

**१८) हिंदू धर्म विकास व सर्वधर्माचा समन्वय** (१९३६)

महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या वाई भेटीत ते तर्कतीर्थांच्या पांडित्य आणि कार्याने प्रभावित झाले होते. त्यांनी तर्कतीर्थांना या भेटीत बडोदा भेटीचे निमंत्रण दिले

होते. त्यानुसार झालेले हे व्याख्यान. ते २ मार्च, १९३६ रोजी बडोद्याच्या कीर्ती मंदिरात सायंकाळी ५.१५ वाजता झाले. मूळ व्याख्यान 'विश्वधर्म अथवा सर्वधर्मांचा समन्वय' या विचारसूत्राधारे तयार करण्यात आले होते. तर्कतीर्थांनी नंतर त्याचे शीर्षक बदलून 'हिंदू धर्म विकास व सर्वधर्माचा समन्वय' असे केल्याचे मूळ टंकित प्रतीतील दुरुस्तीवरून स्पष्ट होते. 'हिंदू धर्म' या विषयावर तर्कतीर्थांनी यानंतरच्या काळात जी अनेक व्याख्याने दिली, जे विपुल लेख लिहिले, त्या सर्वांची गंगोत्री म्हणून या भाषणाचे असाधारण असे महत्त्व आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या व्याख्यानात स्पष्ट केले आहे की, धर्म हा मानवाबरोबरच अस्तित्वात आला आहे. सृष्टीकर्त्याने प्रज्ञा यज्ञास निर्माण केल्याचे उल्लेख प्राचीन ऋचांमध्ये आढळतात. मानवी संस्कृती धर्माच्या छायेतच विकसित झाली. माणसाच्या प्रगतीमय जगण्याच्या कांक्षेतून त्याची नि समाज, संस्कृतीची प्रगती घडून आली. हिंदू धर्म आणि संस्कृती विकाससंबंधी जगभर अभ्यास, संशोधन झाले आहे. त्यानुसार कर्मकांडाचा धर्मात प्रवेश आल्यावर त्यात दोष निर्माण झाले. कालौघात हिंदू धर्मावर अन्य अनेक धर्मांचा परिणाम झाला. सर्व धर्म हे मानव प्रगतीचे मार्गच होत. या मार्गातील दोष परस्पर सहानुभूतीने आणि सामोपचाराने नाहीसे करता येतील. त्याकरिता स्वधर्म अहंकार आणि परधर्माचा मत्सर सोडणे आवश्यक आहे. "सारे जग जवळ जवळ येत आहे. नवी संस्कृती उत्पन्न होऊ पहात आहे. त्या संस्कृतीत सर्व मानव भागीदार होणार आहेत. सर्व मानवसमाजाच्या सहकार्याच्या आणि बंधुत्वाच्या पायावर उभी राहिलेली शास्त्रीय संस्कृती जन्म पावणार आहे. त्या संस्कृतीच्या जन्माच्या पूर्वीच्या प्रसववेदना पावणार नाहीत, तर त्यातील दोष गळून जाऊन आकाशातील तार्यांप्रमाणे त्यांचा या विशाल संस्कृतीत समावेश होईल. मानवजातीला ते धर्म शोभा देतील, त्या धर्मांचा समन्वय होईल." हा या भाषणातील तर्कतीर्थांचा आशावाद एकप्रकारे त्यांचा आधुनिक धर्मदृष्टिकोनच होय.

**१९) महात्मा फुले पुण्यतिथी व्याख्यान** (१९३७)

२७ नोव्हेंबर, १९३७ रोजी पुणे येथील शनिवार वाड्यासमोर तत्कालीन काँग्रेसतर्फे महात्मा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली होती. ही पुण्यतिथी काँग्रेसच्या पुढाकाराने असली तरी त्यात अन्य पक्ष आणि संस्था सहभागी होत्या, त्यामुळे त्या समारंभास सर्वपक्षीय सार्वजनिक समारंभाचे स्वरूप प्राप्त झाले होते. या समारंभाचा वृत्तांत 'ज्ञानप्रकाश'मध्ये प्रकाशित झाला होता. तो बेळगावच्या 'राष्ट्रवीर' साप्ताहिकाने पुनर्प्रकाशित केला होता. (दि. ७ डिसेंबर, १९३७ चा अंक) या समारंभाचे अध्यक्ष तत्कालीन पुणे काँग्रेसचे अध्यक्ष न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ होते. याप्रसंगी सर्वश्री सेनापती बापट, केशवराव जेधे यांच्याबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही भाषणाद्वारे अभिवादन केले होते.

आपल्या भाषणात महात्मा जोतीराव फुले यांच्याबद्दल आदर व्यक्त करीत तर्कतीर्थांनी स्पष्ट केले होते की, गेल्या साडेतीन हजार वर्षांच्या इतिहासात ब्राह्मण्याविरुद्ध आवाज

उठविण्याचे क्रांतिकार्य महात्मा जोतिराव फुले यांनी केले. जातिसंस्थेवर आधारलेली सामाजिक न्यायव्यवस्था मुसलमानी अमलात कायम होण्यास कारणीभूत झाली होती. ही विषम न्यायव्यवस्था पुरोहित कार्य करणाऱ्या ब्राह्मणवर्गाने निर्माण केली होती. तिच्याविरुद्ध बंड करणारे महात्मा फुले पहिले होते, त्यामुळे त्याविरोधाचे महत्त्व असाधारण आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संस्कृत पंडित, वेदांती असले तरी न्याय वेदांताचा त्यांचा विशेष अभ्यास होता. त्यांनी जे लेखन केले, भाषणे दिली, त्यावरून हे स्पष्ट होते की, ते पुरोगामी विचारांचे भोक्ते आणि समर्थक होते. ब्राह्मण्याविरुद्ध त्यांनी नेहमी आवाज उठविला. सामाजिक न्याय्य राज्याची स्थापना जातिनिर्मूलनानेच शक्य आहे, अशी त्यांची पक्की धारणा होती. ती या भाषणातून अधोरेखित होते. सन १९३७च्या काळात तर्कतीर्थ पुण्यात रहात आणि तेथील सार्वजनिक कार्यात सक्रिय असत.

**२०) मानसशास्त्रातील आधुनिक दोन संप्रदाय** (१९४२)

हे भाषण कुठे आणि केव्हा झाले, याचा संदर्भ शोधूनही मिळू शकला नाही. परंतु, 'भिषग्विलास'सारख्या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दीर्घकाळ प्रकाशित होत राहिलेल्या मासिकाच्या सप्टेंबर, १९४२ (वर्ष ४१, अंक ५, पृ. २०१ ते २०६)च्या अंकात ते प्रकाशित झालेले असल्याने त्याचे अधिकृतपण वादातीत राहते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यवसायी वृत्तीचा (Scholarly Attitude) नमुना म्हणून या भाषणाकडे पहावे लागते. मानसशास्त्र विकासात वेळोवेळी अनेक विचारप्रवाह निर्माण झाले आहेत. मानसशास्त्राचा उगम हा शरीर विज्ञान(Physiology) आणि जीवशास्त्र (Biology) यांच्या सूक्ष्म विकासाची परिणती होय. मानसशास्त्रात वर्तनशास्त्र (Behaviarism) आणि मनोविश्लेषणशास्त्र (Psycho-analysis) हे दोन आधुनिक संप्रदाय उदयाला आले आणि त्यांनी व्यवहारामागील अंत:प्रेरणांचा शोध घेणे शक्य झाले. मानवी व्यवहाराची चिकित्सा करण्यासाठी शास्त्रीय बैठक प्राप्त झाली. सामान्यांप्रमाणे रुग्ण, गुन्हेगार, विक्षिप्त यांच्या वर्तनाचा अभ्यास शक्य झाला. मानसशास्त्राचा प्रवास संभाव्यतेकडून निश्चिततेकडे होणे, या दोन आधुनिक संप्रदायांमुळे (विचारधारा) शक्य झाले, हे तर्कतीर्थांनी या भाषणातून अधोरेखित केले आहे.

ते दोन संप्रदाय पुढीलप्रमाणे आहेत.-

१) अंतर्निरीक्षणामुळे सापडणारे सूक्ष्म मन मानून त्यांचा विचार करणारा आणि मनाचा गुणधर्म ठरविणारा एक संप्रदाय आहे. यास 'देहांतर्गत सूक्ष्म मनवादी संप्रदाय' असे म्हणता येईल.

२) सूक्ष्म मन न मानता मेंदू आणि शरीर याच दृश्य गोष्टी मानून त्यावर घडणाऱ्या अंतर्बाह्य परिणामांचा विचार करून तेच ग्राह्य मानणारा संप्रदाय.

फ्रॉईड पहिल्या संप्रदायात, तर पॉवलॉव्ह दुसऱ्या संप्रदायात मोडतात.

पॉवलॉवची प्रवर्तनवादी विचारसरणीच आधुनिक विज्ञानशास्त्राला मान्य आहे.

तर्कतीर्थांचे हे भाषण त्यांच्या विज्ञानविषयक जिज्ञासा आणि अभ्यासाचे प्रतीक म्हणून पाहता येते.

**ब) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भाषणे** (१९४८ ते १९९४)

**21) All India Conference of the Radical Democratic Party : Presidential Address (26th December, 1948)**

या इंग्रजी भाषणाचे मराठी भाषांतर म्हणजे 'नवमानवतावादाची गरज' हे व्याख्यान होय.

**२२) नवमानवतावादाची गरज (२६ डिसेंबर, १९४८)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेल्या ऐतिहासिक भाषणांपैकी हे एक होय. मानवेंद्रनाथ रॉय यांनी भारतात येऊन सन १९४० मध्ये 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' नावाचा डाव्या विचारसरणीचा पक्ष स्थापना केला. त्यात तर्कतीर्थ सक्रिय होते. सुमारे ८ वर्षांच्या कार्यानंतर डिसेंबर, १९४८ मध्ये हा पक्ष बरखास्त करण्यात आला. त्यासंबंधीचे अधिवेशन कलकत्त्यात झाले. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. त्या अधिवेशनातील त्यांचे हे अध्यक्षीय भाषण होय. मूळ इंग्रजी भाषेत दिलेल्या भाषणाची ही मराठी मीमांसा.

या भाषणात त्यांनी म्हटले आहे की, भारतास नुकतेच स्वातंत्र्य मिळाले आहे. देश आपली घडी बसवत असून, त्यास नवनव्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत देशाच्या उभारणीसाठी नव्या तत्त्वज्ञानाची गरज आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसमध्ये सत्ताधारी बनल्यानंतर तिच्यामध्ये वृत्तीगत बदल झाल्याचे दिसून येते. देशास असलेला भविष्यकाळातील फॅसिझमचा धोका महात्मा गांधींच्या हत्येने स्पष्ट झाला आहे. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश सत्तेची सरशी झाल्याने त्यांचे साम्राज्यवादी धोरण सिद्ध झाले आहे. तिकडे रशियात कम्युनिस्ट शासन क्रांतीचे सत्तेवर आले, तरी सत्ता टिकविण्यासाठी ते व्यक्तिस्वातंत्र्याचा गळा घोटत आहेत. संघभावनेचा अभाव आणि सर्वसामान्यांचे जीवन गरिबी, दारिद्र्य इत्यादींमुळे दु:खी बनत आहे. जग तिसऱ्या महायुद्धाच्या भीषण छायेत मार्गक्रमण करीत आहे. ज्या ११ राष्ट्रांमध्ये कम्युनिस्ट शासन आहे, तिथे क्रांतीचे स्वप्न भंग पावून जनमन पराभूत मानसिकतेत जीवन कंठत आहे. तिथे धर्मांचे पुनरुज्जीवन झाले असून, नवी सरंजामशाही अस्तित्वात आली आहे. नवे जग घडवायचे असेल, तर मनुष्य हेच साऱ्या कसोटीचे परिमाण असलेल्या नवमानवतावाद (New Humanism) या तत्त्वज्ञानाची गरज आहे. रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी विसर्जित झाली, तरी पक्षाच्या तत्त्वज्ञानाशी कार्यकर्ते बांधिल राहून त्यांनी भविष्यात नव्या तत्त्वज्ञानाधारे परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. "New Humanism must replace old religon. That is the need of our times and let us forge ahead to fulfill that need." या सामारोपाच्या वाक्यातून ते स्पष्ट होते.

**23) From A Party To A Movement**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी रॉयवादी सक्रिय कार्यकर्ते होते. कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली भारतात स्थापन झालेल्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या महाराष्ट्र शाखेचे ते पदाधिकारी होते. न्यायमूर्ती व्ही. एम. तारकुंडे, प्रा. गोवर्धन पारीख, श्रीमती मणिबेन कारा, वसंतराव कर्णिक, द्वा. भ. कर्णिक, श्री. जवाहिरे, भाई भोसले प्रभृती मान्यवर त्यांचे सहकारी होते. सन १९४० मध्ये स्थापन करण्यात आलेला हा पक्ष २६ ते ३०, डिसेंबर १९४८ मध्ये कलकत्ता येथे संपन्न पक्षाच्या अधिवेशनात बरखास्त करण्यात आला. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ होते. २६ डिसेंबर, १९४८ रोजी झालेले अध्यक्षीय भाषण नवमानवतावादाचा पुरस्कार करणारे होते, ते यापूर्वी आपण पाहिले आहे. याच अधिवेशनाचा समारोप करीत केलेले हे इंग्रजी भाषण ३० डिसेंबर, १९४८ रोजी कलकत्त्यात झाले. ते इंग्रजी भाषण 'इंडिपेंडन्ट इंडिया' या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे मुखपत्र असलेल्या साप्ताहिकाच्या १६ जानेवारी, १९४९ च्या अंकात पान क्र. ७ वर प्रकाशित झाले होते.

'पक्षाकडून चळवळीकडे' या शीर्षकांतर्गत समारोपपर भाषणात तर्कतीर्थ म्हणतात की, माणूस जसा फाटके कपडे निरुपयोगी झाल्यानंतर फेकून देऊन नवे धारण करतो, तसे आपल्या पक्षाने कालबाह्य ठरलेले विचार त्यागून नवमतवादाचा पुरस्कार केला आहे. विकोने म्हटल्याप्रमाणे, मनुष्य इतिहास निर्माण करतो. आपण एक नवा इतिहास घडवू. मानवी इतिहासात रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी हा बहुधा एकमेव असा पक्ष असेल की, ज्याने कायद्याला सर्वोच्च महत्त्व दिले. पक्ष विसर्जनाचा आपला निर्णय पराभवातून आला नसून, पुनर्विचारातून आला आहे, हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. 'जुने टाकुनी नवे स्वीकारा' हा निसर्गक्रम आहे. क्रांतीचा मार्ग नवसाधनांच्या शोधाचा असतो. बदलात माणूस काही गमावतो नि काही कमावतोही. समाज, धर्म, राज्य, राष्ट्र यांसारख्या संस्था या समाजाच्या आदिबंध (Archetype) असतात. ते जगात विचार, तत्त्वज्ञानाचे नवे आदर्श निर्माण करीत असतात. कालसंगत विचार, तत्त्वज्ञानाचे नवे आदर्श निर्माण करीत असतात. कालसंगत विचार स्वीकारण्यासारखे दुसरे शहाणपण नाही. आपले ध्येय मानवताधारित अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संस्कृती व शिक्षण व्यवस्था, संस्था निर्माण करणे हे आहे. ते येथून पुढच्या काळात आपणास चळवळीतून निर्माण करावयाचे आहे. ते केवळ आर्थिक आणि राजकीय क्रांतीनेच शक्य आहे. हिगेलने मानवी इतिहास हा मानवी स्वातंत्र्याचा इतिहास म्हणून शिरोधार्य मानला होता, तसेच आपणास आपली चळवळ ही शिक्षण, लोकशिक्षण आणि जागृतीद्वारे राजकीय तत्त्वज्ञान-नवमानवतावाद रुजविण्यासाठी योजावी लागेल. आत्मीयतापूर्ण बंधुत्व निर्मितीसाठी आपली ही चळवळ असली पाहिजे.

अधिक जिज्ञासा आणि विजिगिषु वृत्ती निर्मिण्यासाठी आपण नवमतवादाचा पुरस्कार

केला आहे. धार्मिक संघटनांद्वारे जसा पूर्वकाळात धर्मप्रसार घडून आला, तसेच आपणास कुशल सामाजिक संघटन, प्रबोधन, प्रचार, प्रसार इ.द्वारे आपल्या विचारधारेचा भविष्यात विस्तार करणे क्रमःप्राप्त आहे. 'मूलगामी मानवी चळवळी' (Radical Humanist Movement)ची गुढी आज आपण उभारत आहोत. मुक्त मानव आणि समाजनिर्मितीची ही चळवळ आहे. वाईटाचे निर्दालन आपले लक्ष्य आहे. कालच्या मानवेंद्रनाथ रॉय यांच्या भाषणात त्यांनी हे पुरेशा विस्ताराने सांगितले आहे. ही दुर्भाग्याची गोष्ट आहे की, मानवेंद्रनाथ रॉय यांना नि त्यांच्या अनुयायांना महात्मा गांधी आणि त्यांच्या अनुयायांविरुद्ध संघर्ष करावा लागत आहे. आपणास महात्मा गांधींच्याही पुढे दोन पावले जायचे आहे. आपल्यावरील जबाबदारी वाढलेली आहे. महात्मा गांधी रामराज्य (Heaven)साठी प्रार्थना करीत आहेत; पण असा काल्पनिक स्वर्ग पृथ्वीतलावर नाही. आपणास मानवासच सशक्त बनवावे लागेल. तो केव्हा नि कसा घडेल, याचे सूतोवाच आज कुणालाच करता येणार नाही, पण त्याचे उत्तर देण्याचे उत्तरदायित्व मात्र काळाने आपल्यावर सोपविले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे भाषण रॉयवादी कार्यकर्त्यांमध्ये नवा प्राण फुंकणारे होते. ते नव्या विचारांचे सूचन होते, तसे ते नव्या जबाबदारींचा ओनामा म्हणूनही पाहता येते. एक विचार पूर्ण संबोधन म्हणून रॉयवादाच्या इतिहासात या भाषणाचा अंतर्भाव करावा लागेल.

**२४) आत्मशुद्धीच्या कामाला लागा** (२२ जानेवारी, १९४९)

भारत स्वतंत्र झाल्यानंतर नवभारत रचनेचा विचार कार्यकर्त्यांमध्ये आणि विचारवंतांमध्ये सुरू झाला. याच काळात सेनापती बापट आदी मंडळी नवभारताच्या रचनेचा गांभीर्याने विचार करीत होती. त्यामध्ये तर्कतीर्थही होते. त्यांच्या अशी धारणा होती की, जोवर आपल्यातील सामाजिक, जातीय, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय दोष दूर होणार नाहीत, तोवर आपली आत्मशुद्धी होणार नाही. आत्मशुद्धी व्हायची तर धर्मनिरपेक्ष व जातीनिरपेक्ष समाज लोकशाही मार्गाने विकसित करण्याचा कार्यक्रम देशाने स्वीकारला पाहिजे. कोणताही धर्म एकात्मता व सामंजस्य याच्या विरुद्ध असत नाही. आज भारतात भाषावार प्रांतरचनेचा विचार सुरू झाला आहे. तो विचार संघराज्याच्या दिशेने झाला, तरच देशाचे स्वातंत्र्य स्वराज्यात रूपांतरित होईल. यासंबंधीचा विचार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या भाषणात मांडला आहे. हे भाषण सानेगुरुजी संपादित करीत असलेल्या व मुंबईतून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक 'साधना'मध्ये शनिवार, दि. २२ जानेवारी, १९४९ रोजी पृष्ठ १० वर प्रकाशित झाला आहे.

**२५) मानवी बंधुत्व हाच नव्या राजनीतीचा पाया हवा** (१७ फेब्रुवारी, १९४७)

१७ फेब्रुवारी, १९४९ रोजी सोलापूर येथे 'नवयुग व्याख्यानमाला' संपन्न झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या व्याख्यानमालेत 'नीती आणि राजनीती' या

विषयावर व्याख्यान दिले. आपला विषय मांडत ते म्हणाले की, नीती आणि राजनीती हा विषय पुरातन आहे; परंतु शिळा नाही. यांना एकमेकाच्या शेजारी उभा केले तर सती आणि वारांगनेचीच उपमा द्यावी लागेल. नीती सतीसारखी पवित्र, तर राजनीती सुलभ खरी. ज्याला चातुर्याने फसविता येते, त्याला राजकारणी समजले जाते. तो सत्यासत्यची तमा बाळगत नाही. वस्तुत: राजकारण म्हणजे राज्य सुस्थित करण्याची व्यवस्था, तर सर्व सामाजिक व्यवहार समुच्चयित मूल्याने करणे म्हणजे नीती. अलीकडे तात्पुरत्या लाभाकडे लक्ष देण्याच्या वृत्तीने सामाजिक दुर्गती झाली आहे. मानवहित मूल्यनीतीत असते. मानवी हिताला गौण मानणारी वृत्ती अनैतिक होय.

संस्कृतीविरुद्धचे राजकारण हे अनीतीच्या पायावर उभे असते. आज यामुळे तिसऱ्या महायुद्धाचा धोका उभा आहे. हिंदी राजकारणाची गेल्या पन्नास वर्षांतील बैठक त्यामुळे डळमळीत झाली आहे. अध:पतनाचा वेग वाढला आहे. जुने आदर्श लोप पावत आहेत. राज्यकर्ता तत्त्वज्ञ हवा, असे प्लेटो म्हणतो. कारण, तत्त्वावर व्यवहार हवा. बुद्धिवाद श्रेष्ठ, पण तो थोड्यांना समजतो. जनसामान्य सुलभ समजतात आणि अपेक्षितात. अन्यायी राज्य अधिक काळ चालत नाही. औरंगजेबाचे उदाहरण समोर आहे. हिटलर, मुसोलिनी, टोजो समोर आहेत. नीतिमत्ता जिवंत मानवी रक्ताचे मूल्य ओळखण्यात भरलेली आहे. साधू, मठवासी, विरक्त, प्रौढ, गृहस्थ, विधवा, कुमारी आणि सौभाग्यवती गृहिणी यांनाच स्वस्थ, शांत आणि निर्वेध जीवन चालविण्याची गरज असते, राजकारण्यांना नाही. नीतीची दोन उगमस्थाने आहेत. १) समाजस्वास्थाची आकांक्षा. २) साहसी शौर्याची नैसर्गिक प्रेरणा. आज शौर्य आंधळे झाले आहे. त्याला विवेक, बुद्धी, विज्ञानाने शुद्ध करण्याची गरज आहे.

या भाषणात तर्कतीर्थांनी नीतीचे मानवी जीवनातील महत्त्व असाधारण असल्याचे सांगत अनैतिक राजकारण, युद्ध, उन्माद इ.पासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

**२६) निधर्मी राज्य** (२८ एप्रिल, १९४९)

दादर (मुंबई) येथील अमरहिंद मंडळाची 'वसंत व्याख्यानमाला' प्रसिद्ध आहे. २६ जानेवारी, १९४७ रोजी या मंडळाची स्थापना झाली. प्रकाशभाई मोहाडीकर, काकासाहेब गाडगीळ प्रभृती मान्यवरांनी व्याख्यानमाला उपक्रमाने मंडळाचे कार्य आरंभिले. तिसऱ्या वर्षाच्या व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे २८ एप्रिल, १९४९ रोजी 'धर्मातीत राज्य' या विषयावर व्याख्यान झाले. 'वादगंगा' शीर्षक भाषण संग्रहात ते आहे. अमरहिंद मंडळाने १९५० मध्ये प्रकाशित केलेला हा भाषणसंग्रह मधुसुदन खोपकर आणि त्र्यंबक तर्टे यांनी संपादिला आहे.

भारताला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. देशाची घटना तयार होत होती. स्वतंत्र देश धर्माधारित असावा की धर्मातीत, हा त्याकाळात कळीचा मुद्दा होता. विशिष्ट धर्मांचे राष्ट्र झाल्यास ते पुरोहित तंत्राने चालवावे लागेल. धर्मातीत झाले तर लोकतंत्र ते चालवेल, अशी

मांडणी तर्कतीर्थांनी आपल्या व्याख्यानात केली. ते म्हणाले की, माझा व्याख्यानाचा विषय 'Secular State' असा आहे. त्यावेळी 'निधर्मी राज्य' असे याचे भाषांतर प्रचलित होते. त्यांनी आपल्या भाषणात ऐहिक राज्य, अधर्मी राज्य, विधर्मी राज्य इ.चा ऊहापोह करीत राज्यविषयक आपली संकल्पना स्पष्ट केली. देशाच्या निर्मितीचा इतिहास विशद केला. हिंदू राज्याचे वैशिष्ट्य सांगितले. देव, धर्म, पुरोहित इ. तत्त्वे तसेच धर्मगुरूंचे राज्य इ. संकल्पना स्पष्ट केल्या. राज्यावर कोणाची सत्ता इष्ट ते सांगितले. स्वतंत्र राष्ट्रातील नागरिकांची कर्तव्ये सांगितली. लोकशाहीत मताचे मूल्य अधोरेखित केले.

राज्यविषयक आपली संकल्पना सांगत ते म्हणाले की, नव्या राज्याचा उत्कर्ष व्हायचा असेल, तर शाश्वत मूल्यांची आवश्यकता आहे. त्यासाठी लोकशिक्षण हवे. धर्मावर राज्ये अधिष्ठित करण्याची कल्पना आता जगात मागे पडत चालली आहे. धर्माधिष्ठित राज्ये यशस्वी होण्याची शक्यता यापुढे नाही. तेव्हा हिंदुस्तान हे निधर्मी (Secular) राज्य होण्यात हित आहे, यामुळेच ते प्रगतीपर राज्य होऊ शकेल. त्यामुळे प्रसंगी प्राणार्पण करण्याची भावना लोकांत वाढीस लागेल.

या भाषणातून तर्कतीर्थांनी ज्या प्रकारच्या राज्याची कल्पना केली होती, तिचा स्वीकार करीत भारतीय घटना परिषदेने धर्मनिरपेक्ष राज्याचा अंगिकार करीत त्याचा अंतर्भाव भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात केला.

**२७) विविध संस्कृतींचा संगम आवश्यक** (३० ऑगस्ट, १९४९)

छत्रपती शिवाजी मंदिर, पेरूगेट, पुणेमार्फत गणेशोत्सवानिमित्त व्याख्यानमालेची परंपरा सर्वश्रुत आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या व्याख्यानमालेंतर्गत ३० ऑगस्ट, १९४९ रोजी पुण्यात 'हिंदू धर्म व सांस्कृतिक चळवळीची दिशा' या विषयावर भाषण दिले.

यात त्यांनी समकालीन दलितांचा प्रश्न उपस्थित करीत विवेचन केले होते की, आज जगात विविध संस्कृती आहेत. त्यांच्यात समन्वय आवश्यक आहे. संस्कृती संगम व संवाद निर्माण न झाल्यास आज असणारा संघर्ष उद्याही कायम राहील. मी तत्त्वज्ञानी नाही. परंतु, तत्त्वजिज्ञासू जरूर आहे. सर्वज्ञता एका माणसात अशक्य. धर्मज्ञान प्रेषितापाशीच पूर्ण होत नाही. ते व्यापक असते, म्हणून हिंदू धर्मास कोणी एक प्रेषित नाही. धर्म व्यक्तीस मोक्ष देतो, समाजास नाही. आज मनुष्य समाजापलीकडे व्यापक झाला आहे. मानवजाणीव, बुद्धी, श्रद्धा असलेला जीव आहे. बौद्धिक अध:पतन व्हायचे नसेल, तर श्रद्धा आवश्यक असते.

झगडा, संघर्ष यांमधून विकास होतो हे खरे; पण विनाशही संभव असतो. संस्कृती समन्वयाने तो टाळणे शक्य असते. कार्ल मार्क्सने अर्थ हे सत्य मानले. शंकराचार्यांनी याउलट आत्मा सत्य असल्याचे सांगितले. विश्वास आभास मानले. त्यांनी अंतरंगास महत्त्व दिले. अंतरंग बदला म्हणजे बाह्यांग आपोआप बदलेल असे समजावले. आत्मशक्ती, आत्मप्रवण असते, तशीच बाह्यप्रवणही. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य'मध्ये कर्मयोग

वर्णिला आहे. कर्मयोगाने समन्वय शक्य असतो. आत्मसंस्कार आणि विश्वसंस्कार दोन्ही आवश्यक, तसेच भौतिक आणि आध्यात्मिक संस्कृती आवश्यक. धर्माची भुरळ अनेकांवर असते. आपल्याकडे जो वर्गविग्रह झाला, त्याला अर्थव्यवस्था कारणीभूत आहे. हे खरे असले तरी सांस्कृतिक भिन्नता त्याचे मूळ कारण होय. चातुर्वर्ण्याने समाज विग्रह झाला. इथे शूद्रत्व होते; पण गुलामी नव्हती. जे होते त्यामागे अज्ञान होते, म्हणून शैक्षणिक प्रगती आवश्यक आहे.

या भाषणातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा संस्कृतीविषयक व्यासंग स्पष्ट होतो. त्यांना जागतिक समाजभान होते. त्यांचा विश्वपरिवर्तनविषयक अभ्यास होता. विषमतेचे मूळ अज्ञानात आहे, हे ते जाणून होते. म्हणून ते शिक्षण समर्थक राहिले.

**२८) ब्राह्मणेतर चळवळीचे उत्तर पर्व : शुद्ध सामाजिक चळवळच आता हवी**

(२०, २१ व २२ सप्टेंबर १९५२)

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे प्रतिवर्षी 'गजेंद्रगडकर व्याख्यानमाला' आयोजित केली जाते. २०, २१ व २२ सप्टेंबर, १९५२ रोजी 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ' या विषयावर सलग तीन दिवस तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी व्याख्याने दिली. त्याचा सारांश नंतर त्यांनी 'मौज' साप्ताहिक, मुंबईसाठी उपलब्ध करून दिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या चळवळीचा इतिहास' हा ३०० पानांचा मजकूर लिहिला होता. तो आचार्य अत्रे यांना 'महात्मा फुले' चित्रपट काढण्यासाठी दिला होता. तो गहाळ झाल्याची नोंद दलितमित्र रा. ना. चव्हाण यांनी आपल्या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: परंपरा, प्रबोधन आणि परिवर्तन' या ग्रंथात केली आहे. (पृ.२१२). 'ब्राह्मणेतर चळवळ' या शीर्षकांतर्गत एक लेख 'भारतीय प्रबोधन' या शीर्षकाने ग्रंथात (शंकरराव देव गौरव ग्रंथ) लिहिला आहे. या सर्व संदर्भांमधून तर्कतीर्थांचा या चळवळीसंबंधीचा व्यासंग स्पष्ट होतो.

हजारो वर्षे सत्तेत असलेल्या सामाजिक व्यवस्थेत मौलिक रूपांतर करणाऱ्या दोन चळवळी स्वातंत्र्यपूर्ण काळात झाल्या. उत्तरेत हिंदू-मुस्लिम चळवळ, तर दक्षिणेत ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ. स्वातंत्र्योत्तर काळात उत्तरेत हिंदूंचे वर्चस्व निर्माण झाले, तर दक्षिणेत ब्राह्मणेतरांचे. या परिवर्तनाचा अर्थ सामाजिक शास्त्रांनी सुसज्य विचारसरणीच्या साधनांनीच शक्य आहे. भाववादी तत्त्वे या संदर्भात निरुपयोगी ठरतात. प्रत्यक्ष तथ्यांच्या आधारेच याचा उलगडा शक्य आहे.

हिंदू समाजात वर्णाश्रम व्यवस्था होती. ती हजारो वर्षांची असल्याने समाजमनावर त्या व्यवस्थेचा पगडा होता. ब्रिटिश राजवटीतून आलेल्या सुधारणांमुळे भारतीय समाजास नैतिक पावित्र्य आणि विवेकाची बूज आली. हिंदू समाजात विधिनिषेध भाव पूर्वापार होता. स्पृश्यास्पृश्य, भक्ष्याभक्ष्य विचारांतून उच्चनीच भेदसूचक जातिव्यवस्था अस्तित्वात

आली. ती पाप-पुण्य भावनेच्या आधारावर उभी होती. त्याला धर्मभावनेची जोड होती. त्यातून विशिष्ट वर्गास अधिकार प्राप्त झाले. त्यातून वर्चस्व नि सत्ता निर्माण झाली. ती जात, धर्म आधारित असली, तरी तिचे समाजावर नियंत्रण होते. त्याआधारे विषम स्थान, अधिकार निर्माण झाले. गावगाड्यांची ही चाकं जीर्ण समजुतींच्या चिखलात रुतलेली होती.

ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीची मुळे जातीय व्यवस्थेत आहेत, हा संघर्ष अंतर्गत विग्रहाचा आहे. तो समजून घ्यायचा तर चार गोष्टींचा उलगडा होणे आवश्यक आहे. १) वंशभेद, २) वर्गविग्रह, ३) सांस्कृतिक संदर्भ, ४) वर्ण्यव्यवस्थेशी संबंधित जातिभेद. यांपैकी जात ही ग्रामव्यवस्थेत अस्तित्वात आली. गावगाडा पुरातन आहे. तो अज्ञान, दैन्य, कर्मशून्यता इ.वर आधारित होता. यात अग्रणी ब्राह्मण जमात कालौघात पथभ्रष्ट झाली.

ब्रिटिश अमदानीत या जमाती नगरात सुशिक्षित म्हणून शिक्षक, वकील, डॉक्टर इ. व्यवसायात अग्रणी झाल्या, तर खेड्यातील अशिक्षित ब्राह्मण भट, भिक्षुकीच्या आधारे सत्ता ठेवून राहिले. हे वर्चस्व पिढ्यान्पिढ्या राहण्यातून ब्राह्मणवर्ग पांढरपेशा आणि बहुजनवर्ग श्रमिक राहिला. ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय, शुद्र वर्ण्यव्यवस्थेस ब्रिटिश आल्यानंतर त्यांचा सुधारित दृष्टिकोन आणि हिंदू समाजात शिक्षणाने येत गेलेली जागृती आणि सजगता यामुळे बहुजनवर्गात अस्मिता जागी झाली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वातंत्र्याबरोबर समाज आणि धर्मसुधारणांमुळे पारंपरिक व्यवस्था नि वर्चस्वाविरुद्ध असंतोष व्यक्त होणे आणि तो संघटित होणे स्वाभाविक होते. सत्यशोधक समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, इ.तून जी जागृती झाली, त्यातून स्त्रीसन्मानविरोधी रूढी, परंपरांना विरोध, मूर्तिपूजा विरोध, पुरोहितशाही विरोध प्रखर झाला. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व प्रभावी झाले. वेदोक्त चळवळीमुळे पुरोहितशाहीचे बिंग उघडे पडले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्ष तीव्र झाला. स्वराज्यानंतर भाषावर प्रांतरचनेतून महाराष्ट्र उदयाला आला. राजकीय सत्ता ब्राह्मणेतर बहुजनांकडे आली; पण त्यातून समाजात ऐक्य आले नाही. त्यासाठी शुद्ध सामाजिक चळवळ आवश्यक आहे.

**२९) भारतीय राष्ट्रीयत्व** (१९५३)

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी संस्थापक रावबहादुर रावजी रामचंद्र काळे स्मृतिदिन साजरा करण्यात येत असतो. १४ मार्च, १९५३ रोजी संपन्न झालेल्या या दिनाचे प्रमुख पाहुणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. त्या दिवशी त्यांनी 'भारतीय राष्ट्रीयत्व' या विषयावर भाषण दिले. ते साररूपाने 'नवभारत'च्या जून, १९५३च्या अंकात प्रकाशित झाले आहे. त्यात तर्कतीर्थांनी राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद इ. संकल्पनांचा जागतिक आढावा घेत भारतीय राष्ट्रीयत्वाचे स्वरूप विशद केले आहे.

तर्कतीर्थांच्या विचारानुसार, भारत हा देश १९४७ मध्ये परतंत्र्यातून मुक्त होऊन स्वतंत्र

देश झाला खरा; पण ते एक राष्ट्र होऊ शकले नाही. कोणताही देश राष्ट्र म्हणून उदयास यायचा असेल, तर त्यासाठी राजकारण प्रगल्भ असणे आवश्यक असते. अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, इटली इ. देश ही राष्ट्रे झाली. आपल्या देशात 'राष्ट्र' संकल्पनेचा उदयच मुळी सन १८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामातून झाला. इतिहासपूर्व काळात भारताच्या राष्ट्रीयत्वाचा पाया घातला गेला खरा; पण स्वातंत्र्यपूर्व काळात त्याची घडण राष्ट्र म्हणून झाली नाही आणि होऊ शकली नाही. युरोपमध्ये जर्मनीसारख्या देशात जसा प्रखर राष्ट्रवाद जन्माला आला, तसा तो आपल्याकडे निर्माण होऊ शकला नाही.

'राष्ट्र', 'राष्ट्रीयत्व' आणि 'राष्ट्रवाद' या संकल्पना मुळात आधुनिक आहेत. त्यांचा उगम होण्याची कारणे जशी सांस्कृतिक आहेत, तशीच ती युद्धजन्य आहेत. कुलाभिमान, प्रदेशाभिमान, देशाभिमान, जमातनिष्ठा यांसारख्या तत्त्वसमन्वयाचे रूप म्हणजे 'राष्ट्र' संकल्पना होय. जगात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. तिथे पार्लमेंट संस्थेचा प्रथम उदय झाला. यातून हे घडले. नंतर फ्रान्समध्ये राज्यक्रांती घडून आली. सतराव्या शतकात स्कॉटलंड आणि इंग्लंड एक झाले. अनेक राष्ट्रांमध्ये युद्धातून राष्ट्रीय भावना विकसित झाली. भारतात राष्ट्रीय भावनेचा आधार सांस्कृतिक असल्याने इथली राष्ट्रीयत्वाची गती, स्थिती मंद आहे. इथले राजकीय स्वरूप आणि वैभिन्य त्याचे खरे कारण आहे.

युरोपमध्ये छोटी-छोटी अनेक राष्ट्रे आहेत. ती भूगोलनिर्मित आहेत. राजकीय भावनेने त्यात उलथापालथी घडल्या तरी अंतिमत: भूगोल तेथील राष्ट्रीयत्व निश्चित करते. रुसोच्या या मतापेक्षा फिक्टे (Fichte)चे मत यापेक्षा भिन्न आहे. भाषा हा घटक त्याच्यानुसार महत्त्वाचा आहे. हर्डरने राष्ट्रास 'एक महान कुटुंब' मानले आहे. इ. रेनाँ (E. Renan)च्या मतानुसार, 'एका विशिष्ट केंद्रामध्ये केंद्रित होणाऱ्या अनेक सामाजिक घटनांच्या मालिकेतून 'राष्ट्र' अस्तित्वात आले आहे.' इ रेनाँने 'राष्ट्र हे आध्यात्मिक तत्त्व किंवा एक आत्मा' मानले आहे. (A Nation is a soul, a spirtual principle)

तर्कतीर्थांनी हे भाषण विसाव्या शतकाच्या मध्यास दिले होते. तेव्हा त्यांनी युरोपसंदर्भात त्याचे संघराज्य (Europian Union) झाल्यावर राष्ट्रे नष्ट होतील, असे म्हटले होते. परंतु, 'आज जी राष्ट्रे स्वतंत्रपणे अस्तित्वात आहेत, त्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य सुरक्षित राहणार नाही, स्वातंत्र्य नष्ट होईल,' असे भाकीत केले होते. आज २०२० मध्ये आपण पाहतो आहोत की, युरोपीय संघ झाला तरी इंग्लंडसारखे राष्ट्र त्यातून बाहेर पडते ते 'स्वातंत्र्य' या तत्त्वावरच. यातून तर्कतीर्थांची राजकीय मीमांसा आणि क्षमता अधोरेखित होते.

तर्कतीर्थांच्या दृष्टिकोनातून "राष्ट्र भावना ही स्वातंत्र्यपोषक नैतिक भावना आहे. जनता जेव्हा जाणूनबुजून भावनाबद्ध होऊन समान राजकीय संघटनेकरिता एकजीव होते, तेव्हा राष्ट्रीयत्व आधुनिक अर्थाने वाढीस लागते. राष्ट्रीयत्व म्हणजे लोकांच्या राजकीय

संघटनेची लोकांच्या हृदयात वसत असलेली अंतिम निष्ठा (Supreme Loyalty) होय. राष्ट्रवाद ही एक मनाची अवस्था आहे. बहुजनांच्या मनाची पकड घेणारी ही अवस्था आहे." आक्रमक राष्ट्रवाद हे मानव्यावरील संकट होय. भारतीय राष्ट्रवादाची उभारणी आध्यात्मिक आणि सांस्कृतिक तत्त्वावर आधारित आहे. स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेतून जन्माला आलेल्या राज्यांचे हे संघराज्य आहे, त्यामुळे संघ भावनेवर आधारित राष्ट्रीय एकात्मता हेच येथील राष्ट्रीयत्व होय. राज्य की राष्ट्र, यात राष्ट्राचा क्रम वरचा मानत राहण्यावर येथील राष्ट्रीयत्व अवलंबून आहे. लोकराज्य हाच आधुनिक राष्ट्रत्वाचा मध्यबिंदू आहे.

**३०) भारताचा इतिहास आणि इतिहास तत्त्व** (१२ जुलै, १९५३)

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणेची स्थापना ७ जुलै, १९१० रोजी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी इतिहास साधनसंग्रह, संशोधन, प्रकाशनार्थ सुरू केली. या संस्थेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून ही संस्था प्रतिवर्षी एक व्याख्यान योजत असते. सन १९५३ मध्ये ४३ व्या वर्धापनदिनी या संस्थेने 'भारताचा इतिहास आणि इतिहास तत्त्व' या विषयावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे व्याख्यान योजले होते. त्याची लिखित संहिता 'अलका' मासिकाच्या सन १९५३ मध्ये दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती. इतिहासलेखन हे शास्त्र असून त्याची तत्त्वे असतात. देशांचे इतिहास त्या त्या देशांच्या सांस्कृतिक घडणीवर आधारून लिहिले पाहिजेत, असे प्रतिपादन तर्कतीर्थ या भाषणात करताना दिसतात.

त्यांच्या मतानुसार, भारताच्या इतिहासलेखनात पश्चिमी मानसिकता दिसते. भारतीय इतिहासलेखन युरोपच्या प्राचीन, मध्य आणि आधुनिक युगत्रयीच्या आधारावर झालेले आहे. एकतर हा आधार चुकीचा आहे, शिवाय भारतीय इतिहासकारांच्या युग विभाजनात शीर्षकांबरोबर काल तफावत दिसून येते. यांचे सप्रमाण विवेचन तर्कतीर्थांनी आपल्या या भाषणात विस्ताराने केले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, युरोप आणि भारत यांच्या इतिहासाचे कालखंड, लक्षणे, प्रसंग, घटना, परिस्थिती भिन्न आहे. चुकीच्या आधारावर इतिहास लिहिला गेल्याने त्यात शीर्षक, कालवैचित्र्य आलेले आहे. ती सुधारायची तर भारतीय इतिहासकारांनी कालखंडांची सामान्य, व्यवस्थित आणि व्यक्त गमके निश्चित केली पाहिजेत. त्याकरिता भारतीय इतिहासांची अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संस्कृती मीमांसा आणि समाजरचनाशास्त्र यांच्या आश्रयाने तत्त्वमीमांसा करणे गरजेचे आहे. भारतीय इतिहासाची युगांतर सूचक लक्षणे निर्धारित करून लेखन होणे आवश्यक आहे. आपल्याकडे ऐतिहासिक घटनांची जंत्री आहे; पण त्यांची तत्त्वचिंतनात्मक प्रक्रिया घडून ती प्रगल्भावस्थेस पोहोचलेली नाही. भारतीय इतिहासाच्या तात्त्विक भूमिकेची विस्तृत मांडणी झाल्यावरच भारताच्या सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाच्या इतिहासाची रचना होऊ शकते. तर्कतीर्थांचे हे भाषण इतिहासलेखन पद्धती आणि तत्त्व या दृष्टींनी पथदर्शक प्रमाण आहे.

**३१) विकेंद्रित लोकशाही** (१६ जानेवारी, १९५४)

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर लगेचच आपण घटना परिषद तयार करून राज्यघटना तयार केली. त्यानुसार २६ जानेवारी, १९५० रोजी भारत हे प्रजासत्ताक संघराज्य बनले. १९५१ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक होऊन १७ एप्रिल, १९५२ रोजी लोकसभा अस्तित्वात येऊन आपण आपल्या देशाचा कारभार पाहू लागलो. सन १९५३ मध्ये आपण 'सामूहिक विकास कार्यक्रम' राबविला, तर १९५४ मध्ये 'राष्ट्रीय विस्तार योजना'. त्यानुसार राष्ट्र, राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर विकेंद्रित लोकशाही पद्धतीचे प्रशासन क्रियान्वित झाले. या काळात सन १९५३च्या डिसेंबर आणि १९५४च्या जानेवारीदरम्यान तत्कालीन उत्तर सातारा जिल्हा ग्रामपंचायत परिषद योजण्यात आली होती. नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना पंचायत राज्यव्यवस्थेचे स्वरूप, कार्य आणि पद्धती समजावून देणे हा या परिषदेचा हेतू होता. या परिषदेचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात यासंदर्भात मार्गदर्शन केले. ते शनिवार, दि. १६ जानेवारी, १९५४च्या साप्ताहिक 'साधना'मध्ये प्रसिद्ध झाले होते.

त्यात त्यांनी म्हटले होते की, ग्रामपंचायत ही लोकशाही संस्था आहे. तिची प्रगती जितक्या प्रमाणात होईल, तितकी देशाची लोकशाही समर्थ होईल. ग्रामपंचायत हे ग्रामराज्याचे सरकार होय. राज्याची रचना दोन प्रकारची असते. एक कायदेमंडळ, नोकरशाही व लष्कर संघटित. तिथे लोकमतास वाव नसतो. दुसरी लोकसंघटित गणराज्य. इथे लोकमत श्रेष्ठ असते. पहिली पद्धत केंद्रित असते, तर दुसरी विकेंद्रित. आपण दुसरी पद्धत स्वीकारली आहे. यात ग्रामस्वराज्य आहे. आपण आपला कारभार निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींमार्फत करतो, म्हणजे अप्रत्यक्षपणे जनताच राज्य करीत असते. आज खेडी उद्ध्वस्त आहेत. ती समृद्ध करण्याचे कार्य ग्रामपंचायतींना करायचे आहे. त्यासाठी समाजरचना करायली हवी. आपणास आर्थिक स्वातंत्र्य मिळेल; पण विनियोग, विनियोजन विवेकाने केले पाहिजे, तरच नागरिक जबाबदार बनतील. बौद्धिक शिक्षण आणि ग्रामरचना यांचा व प्रत्यक्ष लोकशाही प्रयोगाद्वारे आपणास विकेंद्रित लोकशाही यशस्वीपणे अमलात आणता येईल. तर्कतीर्थ स्वतंत्र्यसेनानी असल्याने त्यांचे भारत रचनेचे स्वप्न होते. ते या भाषणात प्रतिबिंबित आहे.

**३२) मराठवाडा विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ हवे** (७ नोव्हेंबर, १९५४)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १ ऑक्टोबर, १९५४ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या ३७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. या निवडीप्रीत्यर्थ त्यांचा मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे औरंगबाद येथील सरस्वती भुवन हायस्कूलमध्ये सत्कार सोहळा संपन्न झाला होता. यावेळी तर्कतीर्थांनी केलेल्या भाषणाचा वृत्तांत 'मराठवाडा' अर्धसाप्ताहिकाच्या हैदराबाद येथून प्रसिद्ध झालेल्या रविवार, दि. १४ नोव्हेंबर, १९५४च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.

आपल्या या भाषणात तर्कतीर्थ म्हणाले होते की, राजाश्रयाने भाषा विकसित होते, ही भाबडी कल्पना आहे. भाषेचा खरा विकास लोकसहभाग आणि लोकाश्रयातून होतो. विद्यापीठे विकसित झाल्याने त्यास गती येते. सध्या भाषावार प्रांतरचनेनुसार स्वतंत्र मराठी राज्यासाठी चळवळ सुरू आहे. मराठवाडा हा आदि (प्रारंभिक) महाराष्ट्र आहे. मराठवाडा महाराष्ट्रात येण्याने त्यास काही मिळेल, यापेक्षा त्याचा मागासपणा दूर व्हायचा तर त्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ पाहिजे. येथे प्राचीन समृद्ध संस्कृतीच्या खुणा चारी दिशांनी दिसून येतात. बुद्धी, अर्थ, संस्कृती, परंपरा यांचा संगम विद्यापीठाने शक्य आहे. कवी, साहित्यिकांनी शास्त्रज्ञ बनले पाहिजे. अनुभूतीशी प्रामाणिक राहिले पाहिजे. आपली अनुभूती शास्त्राच्या प्रकाशात तपासून घेतली पाहिजे.

विशेष म्हणजे हा काळ मराठवाडा विद्यापीठ मागणीचा होता. तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात त्या मागणीचे समर्थन केले. पुढे १९५८ मध्ये 'मराठवाडा विद्यापीठ' स्थापन झाले. १९९४ मध्ये नामविस्तार होऊन आज ते 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' नावाने प्रसिद्ध झाले आहे.

**३३) भारतीय नीतिविकास : वेदकालीन नीती** (११ जुलै, १९५६)

अखिल भारतीय नभोवाणीवरून प्रक्षेपित झालेले हे भाषण ते साप्ताहिक 'साधना', पुणेच्या ११ जुलै, १९५६च्या अंकात प्रसिद्ध झाले होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या व्याख्यानातून वेदकालीन नीती समजावत भारतीय नीती विकासावर प्रकाश टाकला आहे. मानवाला अन्न, पाणी आणि हवा आवश्यक असते, ही भौतिक तत्त्वे होत. याप्रमाणेच नैतिकतेचीही त्यास गरज असते. ती आचरणातून पूर्ण होते. आचरणाच्या व्यापक नीतीलाच नैतिक मूल्य मानले जाते. नैतिक मूल्य नसलेला समाजच जगात अस्तित्वात नाही. नीतीचा उगम वेदकाळात झाला. नीती म्हणजे सदाचरण. सर्व थोर ते करीत. सदाचारी वर्तन माणसाला मार्गदर्शक असते. नीतीचा पाया सहानुभूती होय. परस्परांबद्दलच्या सामुदायिक सद्भावनेतून ती जन्मते. मानवी गरजा परस्पर सहकार्यातून भागविल्या जातात, म्हणून परस्परांबद्दल सहानुभूती, समान भावना किंवा अंत:करणातील समानता हे मूलभूत नैतिक तत्त्व होय.

समाज, कुटुंब, आश्रम इ. संस्थांमध्ये नगरपाल, पालक, गुरू इ.चे आचरण नैतिक असते, म्हणून ते पूज्य व अनुकरणीय असतात. नैतिक कल्पनांनाही ऐहिक आधार असतो. जीवन साफल्याचे गमक नियम, बंधन, नियंत्रणातून येणाऱ्या सदाचारात आहे. ऋग्वेदात ऋत कल्पना आहे. तिचा संबंध ऋतू आणि निसर्गाशी आहे. सत्य आणि असत्य त्यातून आले आहे. सृष्टिचक्र, सृष्टिक्रम सत्य हे नित्य आहे. सत्याप्रमाणेच दम, दान, दया, अहिंसा इ. तत्त्वे नैतिकवाचक होत. थोर हितांचे हे आदेश होत. त्यातून सद्भाव जन्मतो. सामवेदात क्रोध,

कृपणता, अंधश्रद्धा, असत्य इ. अनुल्लंघनीय अडचणींचे परिगणन आहे. यांचा परिहार करण्याकरिता साधनशुचितेचा पुरस्कार करण्यात आला आहे. दुश्चरित्रापासून निवृत्ती नैतिक. मगच मोक्षप्राप्ती संभव. ही वेदकालीन जीवन रीती म्हणजेच भारतीय नीतिविकास कल्पना होय. हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध आणि जैन धर्मातही ही तत्त्वे शिरोधार्ह आहेत. तर्कतीर्थांचे हे भाषण म्हणजे सदाचाराचा पुरस्कार आणि समर्थन होय.

**३४) प्राचीन भारतातील वादविद्या** (१४ सप्टेंबर, फेब्रुवारी, १९५७)

कोणत्याही ज्ञानजिज्ञासेचा सोक्षमोक्ष लावायचा तर त्याच्यावरचा उपाय म्हणजे त्या विषयावर सर्वांगीण चर्चा, वादविवाद करणे होय. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या सूत्रानुसार तर्कतीर्थांनी मुंबई आकाशवाणी केंद्रावरून प्रक्षेपित व्याख्यानात भारतीय वादविद्येचे स्वरूप विशद केले आहे. सत्यासत्य विवेक अशा चर्चेतून जन्म घेत असतो. मतभेदांना घाबरून जर आपण मत व्यक्त करणे टाळले, तर समाजात कधीच विचार विकास होणार नाही. मतभेदात परमत आदराची भावना असली पाहिजे, तरच अशा वादविवादांना सकारात्मकता लाभते. प्राचीन भारतीय वादविद्या याचे अप्रतिम उदाहरण होय.

**३५) लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य'** (१ ऑगस्ट, १९६०)

लोकमान्य टिळकांच्या ४०व्या पुण्यतिथीनिमित्त १ ऑगस्ट, १९६० रोजी आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित झालेले हे भाषण 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड-१)'मध्ये संग्रहित आहे. (१९८२)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या भाषणाचा प्रारंभ हेगेलच्या तत्त्वज्ञान आणि इतिहासाच्या अन्योन्य संबंधास अधोरेखित करीत भारतातील तत्त्वज्ञानात मोलाची भर घालणाऱ्या अनेकांपैकी लोकमान्य टिळक एक असल्याचे सांगितले आहे. ब्रिटिशांच्या आक्रमणाने झालेल्या पराभवाने भारतात नवजागृती घडून आली. त्यातून इथे आधुनिकता आली. त्यातून योगी अरविंद, महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळकांनी येथील हिंदू धर्म तत्त्वज्ञानाची जी चिकित्सा केली, ती ग्रंथप्रमाण नसून स्वत:प्रमाण आहे. अशा भाष्यांपैकी टिळकांचे 'गीतारहस्य' उत्कृष्ट आहे. त्यात त्यांनी निवृत्तीवादाचे खंडन करीत प्रवृत्तीवाद वा कर्मयोग मांडला आहे. तो कसा ते तर्कतीर्थांनी या भाषणात विस्ताराने सांगितले आहे. निवृत्तीवादी तत्त्वज्ञान माणसास संन्यस्ताकडे नेते, तर कर्मवाद माणसास सक्रिय ठेवतो. शंकराचार्यांचे गीतेवरील भाष्य हेच समजावते. लोकमान्य टिळकांनी 'केल्याविन होत काही नाही' हेच 'गीतारहस्य'मध्ये प्रतिपादले आहे. ते विचार 'संन्स्यास व कर्मयोग' आणि सिद्धावस्था व व्यवहार' दोन प्रकरणात त्यांनी विवेचित केले आहेत. चित्तशुद्धी येते ती निष्काम कर्मयोगातून. तो अखेरपर्यंत टिकायला हवा. लोकमान्य टिळकांनी समाजधारणेकरिता 'गीतारहस्य'मध्ये कर्मसातत्याचा आग्रह धरला आहे. निर्मम बुद्धीने लोकसंग्रहाचे महत्त्व त्यांनी यात विशद केले आहे. निष्काम कर्म हेच खरे ज्ञान होय. यज्ञादिकर्माचे समर्थन टिळक

करीत नाहीत. 'भगवद्गीतेत' यज्ञ, दान, तप हेच कर्म आहे. तसे 'गीतारहस्य'मध्ये नाही. मोक्ष, माया ते सांगत नाहीत. सांगतात ते कर्म.

आकाशवाणीवरील हे व्याख्यान 'गीतारहस्य' शिकवण समजावते. ते 'भगवद्गीता'पेक्षा सर्वथा वेगळे आहे. केवळ ज्ञानसाधना, चिंतन, मनन, भक्ती इ. स्वात:सुखाय असते. समाजकल्याणार्थ केलेले कर्म लोकहितार्थ असते. जे लोकहितार्थ ते खरे कर्म!

**३६) आमच्या काळाने आम्हास घडविले** (१ नोव्हेंबर, १९६०)

हे आकाशवाणीवरून प्रक्षेपित झालेले. याला निमित्त होते महाराष्ट्र स्थापना. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती स्थापना तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची षष्ठ्यब्दिपूर्ती. ते महाराष्ट्राचे सांस्कृतिक नेतृत्व करीत होते. त्यांचा भूतकाळ, घडण, प्रभाव इ.वर या भाषणातून प्रकाश पडतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अधिकृत आत्मचरित्र लिहिले नसले तरी भाषण, लेख, पत्रे, मुलाखती, मते यांतून ते प्रगट झाले आहे.

हे भाषण म्हणजे त्यांच्या जीवनाची एका अर्थाने 'कालकथा'च म्हणायला हवी. यात ते कथन करतात की, ''माझ्या जीवनावर काळाची सूक्ष्म चित्रे कोरलेली आहेत. मी ज्या पिंपळनेरमधून आलो, तिथे बालपणी सनातनी वातावरण होते. आधुनिकतेचा लवलेष नव्हता. पदवीधर सणावारी दिसत. टिळकांचा प्रभाव मोठा इतका की देवघरात टिळकांची तसबीर होती. त्यांच्या 'केसरी'नामक खिडकी (साप्ताहिक)तून जग आम्ही पहात असू. घरी वाईचं लेले शास्त्रींचं 'धर्म' मासिक येत असे. ते वाचत असू.''

सन १९१४ मध्ये मी प्राज्ञपाठशाळा, वाई येथे नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे वेद, न्यायशास्त्र शिकलो; पण कानडे शास्त्री, आचार्य विनोबांनी माझ्या जगाची कक्षा रुंदावली. मी इंग्रजी वाचू लागलो. आगरकर वाचला. पंडिताचा क्रांतिकारी, समाजसुधारक झालो ते स्वातंत्र्य चळवळ आणि महात्मा गांधींमुळे. मी धर्मसभा गाजवत असे. आता स्वातंत्र्य सभा गाजवू लागलो. पुढे सत्यशोधक चळवळीच्या प्रभावाने पुरोगामी झालो. माझी खात्री झाली की धर्मशास्त्रातील जातिभेद समर्थक कायदे, समता आणू शकत नाहीत. मी बुद्धिवादी झालो. मार्क्सवाद, रॉयवाद, गांधीवाद, मानवतावाद असा प्रवास होत राहिला. माझ्या मनोग्रंथी भेदत राहिल्या. काळाने मला विश्वयात्रा घडविली. मुळात काळाच्या फार मागे असलेला मी काळाच्या अद्ययावत क्षणांवर आता उभा राहिलो आहे.

हे भाषण त्यांचे प्रांजळ आत्मकथन होय. ती कालकथा खरीच. तसाच तो एक कबुलीजबाबपण आहे. आत्मसाक्ष्य साधन म्हणून त्याचे ऐतिहासिक मूल्य असाधारण आहे.

**37) प्राज्ञ पाठशाला की धार्मिक एवं राष्ट्रीय परंपरा और स्वामी केवलानंद सरस्वती** (13 दिसंबर, 1960)

ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती याचं १ मार्च, १९५५ रोजी निधन झालं. त्यांच्या स्मरणार्थ

त्यांनी स्थापन केलेल्या प्राज्ञपाठशाळेतर्फे त्यांचं स्मारक म्हणून 'प्रणव मंदिर' उभारलं. त्याच्या उद्‌घाटनास भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद, महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्रीप्रकाश, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. या उद्‌घाटन समारंभावेळी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईचे अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. या समारंभप्रसंगी दि. १३ डिसेंबर, १९६० रोजी वाई येथे तर्कतीर्थांनी स्वागतपर भाषण केले. ते हिंदीत होते. ते त्यावेळी मुद्रित स्वरूपात वितरित करण्यात आले होते.

आपल्या या स्वागतपर हिंदी भाषणात तर्कतीर्थांनी या स्मारकामागची भूमिका विशद करून या स्मारकाद्वारे केल्या जाणाऱ्या अध्ययन, अध्यापन, संशोधनाचे स्वरूप मांडले. प्राज्ञपाठशाळेची परंपरा सांगितली. प्राज्ञपाठशाळेमार्फत स्वामी केवलानंद सरस्वती यांनी निर्मिलेल्या 'मीमांसाकोश' आणि 'धर्मकोश' योजनेची माहिती सादर केली. प्राज्ञपाठशाळा आणि वाई गावची संस्कृत अध्ययन, अध्यापन परंपरा काशीच्या तोडीची असल्याने सांगत येथील पंडित काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे कसे श्रेष्ठ होते ते स्पष्ट केले. प्राज्ञपाठशाळेने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात नि राष्ट्रीय शिक्षणात दिलेले योगदान आधोरेखित केले. संस्थेच्या ग्रंथसंग्रहाचे असाधारण रूप विवेचित केले. संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या 'नवभारत' मासिकाचा महिमा सांगितला. प्राज्ञपाठशाळा एकेकाळी ग्रामोद्योग शिक्षण देत असे, हे सांगण्यासही तर्कतीर्थ विसरले नाही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वामी केवलानंद सरस्वती यांचे उभारलेले हे स्मारक म्हणजे गुरूदक्षिणा होती. हे स्मारक उभारण्यास मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र शासनातर्फे मोठे अर्थसाहाय्य (एक लाख एकोणऐंशी हजार रुपये) दिले होते. या समारंभात 'मीमांसाकोष', 'धर्मकोश'चे काही खंड, 'नवभारत'चे विशेषांक प्रकाशन करण्यात आले होते. या समारंभास मोठा जनसमुदाय लोटला होता.

**३८) भारताच्या ऐक्याची घडण आणि हिंदू धर्म** (२३ ऑक्टोबर, १९६१)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे आकाशवाणीवरील भाषण होय. ते २३ ऑक्टोबर, १९६१ रोजी प्रक्षेपित झाले होते. ते 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह' (खंड-१) मध्ये (१९८२) संग्रहित आहे.

या भाषणात ते भारताचा प्राचीन इतिहास सांगत भारतवर्ष (देश) निर्मिती, सिंधू-आर्य संस्कृती, हिंदू धर्म, प्राचीन ग्रंथांतून साकारलेला भारत आपणापुढे दृश्यमान करतात. आज भारताची जी सांस्कृतिक, धार्मिक एकता हिंदू धर्मरूपात आपणास पहावयास मिळते, त्यामागे हजारो वर्षांचा प्राकृतिक इतिहास आहे. 'विश्वमित्र स्तोत्र' भारतीय जनांचे रक्षण करतात, असे उल्लेख आहेत. 'भारतवर्ष' हे नाव प्राचीन साहित्यात भारत देशासाठी वापरलेले दिसून येते. प्राचीन काव्यात आकाश, ज्योती, अंतरीक्ष, वायू, पर्जन्य, नद्या, पर्वत,

समुद्र, वन इ. रूपात भारताचे आदिरूप प्रत्ययास येते. ऋग्वेदात सप्तसिंधू महानद्या जशा आहेत, तशाच दक्षिणेतील नद्यापण प्राचीनांच्या लेखी गंगाच होत्या, असे लक्षात येते. यातून एकात्मता लक्षात येते. 'रामायण', 'महाभारत'मध्ये असे वर्णन आहे. भारतातील विभूतीवाद म्हणजे पूर्वीचा अद्वैतवादच. वैदिक धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म साम्यस्थळे हिंदू धर्मरूप होत. त्याकाळी ख्रिश्चन, मुस्लीम धर्मसंपर्क नव्हता, नसावा. विभिन्नतेत एकता हे आपले सांस्कृतिक सूक्त नि सूत्र आहे. भारतीय एकात्मतेची निर्मिती प्रथम निसार्गाने, नंतर तत्त्व साहित्याने (वेदाने) आणि त्यानंतर धर्माने केली आहे. सर्वधर्म समन्वयाची बीजे आपणास वैष्णव प्रार्थनेत दिसून येतात. शिव, ब्रह्म, बुद्ध, तीर्थंकर, विधाता सर्व हरिरूप अर्थात ईश्वर होय. 'अनेकानाम् एक' असे त्यांचे रूप आहे. देव, धर्म, देश सर्व इथे एकच आहेत.

आपल्या या भाषणातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भारतीय एकतेची विविध रूपे निसर्ग, साहित्य, तत्त्वज्ञान, धर्म, ईश्वर इ.मधून विस्ताराने मांडली आहेत. देश स्वतंत्र होऊन भाषावार प्रांतरचना पूर्ण झाल्यावर राज्य सरकारे सक्रिय झाली. केंद्र आणि राज्य संघर्ष व समन्वय यातून देश पुढे जात होता. तो शंकांचा काळ. अशावेळी हे भाषण सकारात्मकता वाढीस उपकारक ठरले.

**३९) पंचांग विद्या सर्वांगीण बनली जावी** (२५ नोव्हेंबर, १९६१)

महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदेच्या विद्यमाने आणि ज्योतिर्विद्या मंडळ, मुंबई यांच्या पुढाकाराने २५ ते २७ नोव्हेंबर, १९६१ या काळात झालेल्या 'महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदे'चे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अध्यक्ष होते. त्यांनी या परिषदेत केलेले भाषण तेव्हाच पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित झाले आहे.

धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्राचा निकटचा संबंध आहे. तर्कतीर्थ स्वत:ला धर्मशास्त्राचे विद्यार्थी मानत. आधुनिक काळाप्रमाणे पंचांगे हवीत, ही कल्पना लोकमान्य टिळकांची. सन १९०४ मध्ये टिळकांच्या पुढाकाराने ज्योतिष संशोधन परिषदेचे अधिवेशन झाले होते. सन १९१७च्या परिषदेचे टिळक अध्यक्ष होते. पंचांग निर्मितीत महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. पूर्वीच्या काळी पंचांगे ही 'नॉटिलक आल्मनॅक'वरून तयार केली जात असत. त्यांना सायन गणना मान्य असे. आठराव्या शतकात (१७९१) दृक् गणित आधारित पंचांग बनविले जाऊ लागले. सर्वश्री केरोपंत छत्रे, शंकर बाळकृष्ण दीक्षित, व्यं. बा. केतकर, के. ल. दप्तरी प्रभृतींच्या पुढाकाराने महाराष्ट्रात समन्वय घडून येऊन पंचांग तयार होऊ लागले. सन १९५२ मध्ये भारत सरकारने पंचांग सुधार समिती नेमली होती.

ज्योतिष हे आद्यशास्त्रांपैकी एक होय. ज्योतिष आणि गणित ही परस्परपूरक शास्त्रे होत. प्रत्यक्ष, अनुमान आणि शास्त्रग्रंथ यात अंतर आहे. आर्यभट्ट (इ.स. ५००)पासून पंचांग परंपरा दिसून येते. त्यात वराहमिहीरचे महत्त्वाचे स्थान आहे. रोम (इटली), पोलंड इ. देशांतही

पंचांग निर्मितीची परंपरा दिसून येते. फलज्योतिष ही ज्योतिषशास्त्राची एक शाखा आहे. इतिहासशास्त्रात ज्योतिषशास्त्राचे प्रतिबिंब आणि प्रमाण आढळते. मुहूर्तशास्त्र हा ज्योतिष शास्त्राचाच एक भाग आहे. ज्योतिषशास्त्राने खगोल, भूगोल इ. शास्त्रास स्वत: जोडल्याने त्याचा प्रवास अनुमानाकडून अचूकतेकडे सरकत आला असला तरी गणितासारखे ते अचूक आणि पूर्ण विज्ञान नाही. गणित आणि ज्योतिष यातील अंतर कमी होण्यावर आणि नव्या अल्मनॅकशी जुळणारी नवी पंचांगे हवीत.

**४०) अमेरिकेतील लोकशाहीचा यशस्वी प्रयोग** (जुलै/ऑगस्ट, ६४)

जून-जुलै, १९६४ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रथमत: अमेरिकेस गेले होते. हा त्यांचा दोन महिन्यांचा दौरा होता. तो आटोपून ते नवी दिल्लीस उतरले. थोडी विश्रांती घेऊन ते मुंबईला परतणार होते. ही गोष्ट लक्षात घेऊन दिल्लीतील साहित्य मंडळाने त्यांचे अमेरिकेतील अनुभवांच्या आधारे अनुभव कथन योजले होते. ते नवी दिल्लीस्थित दिल्ली प्रादेशिक हिंदी साहित्य संमेलनाच्या दिवाणखान्यात संपन्न झाले. साहित्य मंडळाच्या निवडणुका होऊन नवे कार्यकारी मंडळ अधिकारारूढ झाले होते. पदाधिकाऱ्यात उत्साह होता. श्रोत्यांची उपस्थिती आणि उत्साह मोठा होता. भाषणानंतर प्रश्नोत्तरे झाली. परंतु, रात्रीच्या बोईंगने तर्कतीर्थ परतणार असल्याने कार्यक्रम आटोपता घ्यायला लागला, हे दै. 'केसरी'च्या ३० ऑगस्ट, १९६४ च्या अंकात पृ. ३ आणि ५ वर प्रकाशित 'लाल किल्ल्याच्या परिसरात' या शीर्षकांतर्गत गो. वि.वैद्य यांनी लिहिलेल्या वृत्तातून स्पष्ट होते.

तर्कतीर्थ आपल्या भाषणात म्हणाले की, 'माणसास ग्रंथ वाचून जे कळत नाही, ते प्रत्यक्ष दर्शनाने अधिक उमजते. 'चक्षुर्वैसत्यम्' असे त्यामुळेच म्हटले आहे. अमेरिकेतून परतताना मी युरोपच्या काही देशांना भेटी दिल्या. सन १९६० मध्ये मी रशिया पाहिला होता. मला अमेरिकेचा लोकशाही प्रयोग यशस्वी वाटला. हे सर्व ४०० वर्षांतले यश होय. अमेरिकेने केलेली प्रगती केवळ भौतिक नाही, तर सर्वांगीणही आहे. अमेरिकेत युरोपच्या तुलनेने धार्मिकता अधिक आहे. ती वृद्धांपेक्षा तरुणांमध्ये अधिक आहे. शिकागोच्या रामकृष्ण मठास मी भेट दिली. तेथील संन्यासी मी सुटाबुटात पाहिले. मी अमेरिकेतील हॉर्वर्ड विद्यापीठ पाहिले. तिथे जगातील अनेक भाषांचा अभ्यास होतो. बहुधा प्रतिस्पर्धी देश म्हणून असावे. अधिक विद्यार्थी रशियन भाषा शिकतात. तिथे मराठी फक्त पेन्सिल्व्हिया विद्यापीठात शिकविली जाते. तिथे स्वयंचलितता कारखान्यात आहे, तशी शेतीतही. शिवाय टेलिफोन, टेलिव्हिजनमुळे ३००० मैलांवरचा माणूस दृश्यात्मक संवाद करू शकतो, हे पाहून आश्चर्य वाटले. आपण अमेरिकेकडून ज्ञान, विकास आणि अन्न उत्पादन क्रांतीचे अनुकरण केले पाहिजे, असे तर्कतीर्थांनी भाषणानंतर झालेल्या प्रश्नोत्तरात सांगितले.

'केल्याने देशाटन, पंडित मैत्री सभेत संचार'ची अनुभूती देणारे हे भाषण सन १९६४ ची अमेरिका समजावते.

**४१) लोकशाही आणि समाजवाद** (२४ एप्रिल, १९६५)

रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या विसर्जनानंतरच्या काळात (१९४८) म्हणजेच स्वातंत्र्योत्तर काळात रॉयवादी विचारवंतांनी साम्यवादाऐवजी लोकशाही राज्यपद्धतीचे समर्थन करत आपली वैचारिक वाटचाल सुरू ठेवली. त्याचाच एक भाग म्हणून ही मंडळी लोकशाही अभ्यास मंडळ, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंजसारख्या संस्था समाज प्रबोधन व परिवर्तनाचे कार्य करत राहिल्या. व्याख्याने, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद, स्वयंसेवी संस्थांचे संचालक इ. माध्यमांतून हे कार्य होत राहिले. लोकशाही अभ्यास मंडळ, इंडियम कमिटी फॉर कल्चरल फ्रिडम अशा संस्थांनी हे कार्य नेटाने पुढे नेले. त्या सर्व कार्यांमध्ये इतर रॉयवादी कार्यकर्त्यांबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सक्रीयपणे सहभागी असत.

लोकशाही अभ्यास मंडळ, पुणेमार्फत व्याख्याने, शिबिरे, प्रकाशन, नियतकालिकाचे कार्य चाले. सन १९६५ मध्ये या मंडळातर्फे दि. २४ ते २७ एप्रिल, १९६५ या काळात 'लोकशाही' विषयासंबंधी विविध समस्यांचा ऊहापोह करणारे शिबिर शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे येथे आयोजिण्यात आले होते. त्यात तर्कतीर्थांचे 'लोकशाही आणि समाजवाद' या विषयावर दि. २४ एप्रिल, १९६५ रोजी व्याख्यान झाले. सदर शिबिराचा वृत्तांत व भाषणे संकलित करून मंडळाने 'काही समस्या : लोकशाही दृष्टिकोन' शीर्षकाने एक पुस्तिका (पृष्ठे -७५, मूल्य २.५० रु.) प्रकाशित केली होती. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे व्याख्यान संकलित आहे.

त्यात त्यांनी म्हटले आहे की, अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती झाल्यानंतर लोकशाहीचा उदय झाला. या लोकशाहीस पुढे समाजवादी अधिष्ठान लाभले. स्वातंत्र्य, समता, बंधुता मूल्ये लाभली. या काळात पूर्व युरोपात रशिया, पोलंड, हंगेरी, चेकोस्लोव्हाकिया आदी देशांत साम्यवादी, समाजवादी, राज्यसत्ता विशेषत: विसाव्या शतकात पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर मजबूत झाल्या. लोकशाहीची भांडवलवादी व समाजवादी रूपे विविध देशांत विकसित झाली. ग्रीसमधील लोकशाहीच्या प्रारंभिक काळात १० पैकी ९ लोकांनाच मताधिकार होता. कालपरत्वे पुढे तो सर्वांना मिळाला, तशी लोकशाही विकसित व प्रगल्भ होत गेली.

प्रारंभीच्या काळात जी भांडवलवादी लोकशाही होती, तिचे तीन दोष समाजवादी विचारक व सत्ताधीश मांडत- एक म्हणजे या राज्यपद्धतीत श्रीमंत अधिक श्रीमंत होत राहतात, तर दुसरीकडे गरीब अधिक गरीब होतात. दुसरा दोष म्हणजे भांडवली व्यापारात तेजी-मंदीचे दुष्ट चक्र कायम राहते. तिसरा दोष म्हणजे कामगार वर्गाची गरिबी निरंतर वाढत रुंदावत जाते. मार्क्स व अन्य टीकाकारांनी सांगितलेले हे दोष लोकशाहीच्या विकासकाळात कमी होत गेले व सामान्यांचे जीवन अधिक सुखपूर्ण झाले. उलटपक्षी साम्यवादी राजवटीत संघटना स्वातंत्र्य, प्रचार स्वातंत्र्य, सभा स्वातंत्र्य लोप पावले. कायद्याचे राज्य येण्याऐवजी

पक्षाचे व पक्षप्रमुखांचे स्वैर व जुलमी राज्य प्रस्थापित झाले. भांडवली लोकशाहीतून जी संसदीय लोकशाही विकसित झाली तिने समता, बंधुता व व्यक्तिविकास मूल्ये जोपासली. पश्चिमी युरोपात संमिश्र अर्थव्यवस्था आली. भविष्यकाळात यातून शांततामय सहजीवन अस्तित्वात येईल, असे वाटते.

संसदीय लोकशाही व्यवस्थेतील समाजजीवन साम्यवादी राजवटीच्या तुलनेत दारिद्र्य, अज्ञान, बेकारीविरुद्धचा लढा यशस्वीपणे करू शकली असे दिसते. त्याठिकाणी मुक्त निवड (निवडणूक) अस्तित्वात आली. विरोधी पक्ष राहिले. असे साम्यवादी देशात (समाजवादी) चित्र नाही. कल्याणकारी राज्याची शाश्वती नाही. समाजवादी राजवट नसतानाही नागरिकांचे सौख्य पुष्कळ प्रमाणात संसदीय लोकशाहीतून सर्वत्र साध्य होताना दिसते.

या व्याख्यानातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समाजवाद, साम्यवाद इ. नावांवर अस्तित्वात आलेली राज्ये व राज्यसत्ता यांची तुलना संसदीय लोकशाही राज्यांशी करतात आणि ही राज्ये कल्याणकारी कार्य करीत असल्याचे दाखवून देतात. रशियातील स्टॅलिनची राजवट व जगातील लोकशाही राष्ट्रातील राजवट आपल्यापुढे ठेवत सांगतात की, भविष्यकाळात साम्यवादी राष्ट्रातील जनता आणि व्यक्तिस्वातंत्र्यमूलक संसदीय लोकशाहीची मागणी केल्याशिवाय राहणार नाही. हे भाषण म्हणजे तर्कतीर्थांच्या चाळीसच्या दशकातील विचार परिवर्तनाचे द्योतक म्हणून पाहता येते.

**४२) गोवध बंदी कायदा : गरीब शेतकऱ्यांवर भार** (८ फेब्रुवारी, १९६७)

फेब्रुवारी, १९६७ मध्ये महाराष्ट्रात सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रचारसभा सुरू होत्या. काँग्रेस विरुद्ध जनसंघ अशी लढत होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी काँग्रेसच्या बाजूने समर्थन करीत राज्यभर प्रचारदौरा करीत होते. मलकापूर (वऱ्हाड) जि. बुलढाणा येथील प्रचारसभेतील भाषणाचा संक्षिप्त वृत्तांत तर्कतीर्थांनी नामदार यशवंतराव चव्हाण यांना पत्राद्वारे कळवून सोबत संक्षिप्त भाषणाचा मसूदा पाठविला होता.

त्यानुसार तर्कतीर्थ या भाषणात स्पष्ट करतात की, जनसंघाला विवेकवादावर आधारलेला धर्म नको आहे. जनतेच्या परंपरागत तर्कदुष्ट अंधश्रद्धेवर आधारलेल्या भावनांचा प्रक्षोभ करून बुद्धिवादावर आधारलेल्या लोकशाहीस धोका निर्माण करावयाचा आहे. त्याकरिता साधू-संत, शंकराचार्य आणि इतर धर्मपीठे राजकारणात ओढण्याचा उपद्व्याप करीत आहेत. ख्रिश्चनसदृश धर्मगुरूंची संस्था हिंदू धर्मात नव्हती. शंकराचार्य हे संन्यासधारी मठाधिपती होत. पूर्वकाळात त्यांना धर्मनिर्णयाचा अधिकार नव्हता. आपल्या धर्मगुरूंना जनसंघ पोपसदृश बनविण्याचा प्रयत्न करीत आहे.

गोहत्या बंदीची उकल इतिहास वा अर्थशास्त्राच्या आधारे होऊ शकत नाही. कारण, धार्मिक प्रश्न हे धर्मशास्त्र आणि नीतिशास्त्राच्या आधारे सोडवायचे असतात. गोहत्या बंदी कायदा केला, तर धर्म नि नीतीवर काय परिणाम होतो, याचा अभ्यास जनसंघाने केलेला

नाही. हिंदू हा जोपर्यंत गोसंवर्धक होत नाही, तोपर्यंत गोहत्या बंदी कायद्याचा परिणाम दंभ माजविण्यातच होईल.

गरीब शेतकरी गाय आणि बैल पाळतो. चांगली आणि भाकड दोन्ही जनावरे पाळणे त्याच्या कुवतीबाहेर जाते तेव्हा तो ते विकतो. माणसं जगवायची की जनावरे, याचे प्राधान्य धर्म आणि नैतिकतेच्या आधारे ठरवावे लागेल. गोहत्याबंदी कायद्याचा भयंकर भार गरीब शेतकऱ्यावर पडेल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे भाषण म्हणजे धर्म, नैतिकता आणि व्यवहार अशा त्रिकोणात्मक द्वंद्वात व्यवहार्य बाजूचे आणि शेतकरीहित पाहणारे आहे, हे निश्चित करायला कोणा ज्योतिष वा पंडिताची गरज नाही.

**४३) शिक्षणाला वैज्ञानिक बुद्धिवादाचे अधिष्ठान हवे** (२ डिसेंबर, १९६७)

विज्ञान या विषयावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक लेख लिहिले आहेत, तसेच भाषणेही दिली आहेत. २ डिसेंबर, १९६७ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या मराठी विज्ञान परिषदेच्या दुसऱ्या संमेलनाचे तर्कतीर्थ अध्यक्ष होते. त्यांचे हे भाषण त्याचवेळी परिषदेतर्फे पुस्तिकारूपाने प्रकाशित झाले होते.

भारताच्या आणि महाराष्ट्राच्या शिक्षितांमध्ये विज्ञानाबद्दलचे आकर्षण गेल्या दीडशे वर्षांतले आहे. विज्ञान चमत्काराचे नव्हे, तर चमत्कार चिकित्सा करणारे शास्त्र होय. चमत्काराविषयक जिज्ञासेतून विज्ञान जन्माला आले आहे. निसर्ग कुतूहलातून अनेक कोडी माणसाने उलगडली आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनाची बीजे वाढीस लागण्यातून विज्ञानाचा विकास घडून आला आहे. बुद्धिवादी नवे युग आणि श्रद्धाजड जुने युग यांमध्ये मूलत: अंतर आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन विश्वव्यापी हवा, तर तो मानवाच्या अंतिम हिताचा ठरतो.

जगात विज्ञानाचा विकास उपयुक्ततेच्या अंगाने झाला; पण जगात वैज्ञानिक चिकित्सा पद्धती रुजली नाही. वैज्ञानिक संशोधनाचा प्रारंभ कुठून करायचा, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तसाच महत्त्वाचा प्रश्न विज्ञानाचा उपयोग कशासाठी करावयाचा हाही आहे. फ्रान्सिस बेकन, रेन देकार्त, मॉरिस कोहेन, जॉन ड्युई प्रभृती मान्यवरांनी जे सांगून ठेवले आहे, ते विचारणीय आहे. फ्रान्सिस बेकनने पूर्वश्रद्धांना तडे देत सांगून ठेवले आहे की, 'वास्तविक तथ्यांचे अवलोकन आणि मूर्तिभंजन ही संशोधनाची पूर्वअट होय.' प्राचीन विविध शास्त्रांचे अवलोकन करता आपणास दिसून येते की, गणित सोडल्यास सर्व पारंपरिक विद्या आणि शास्त्रे सदोष आहेत. विज्ञान हे सत्य आहे. जी गोष्ट कोणत्याही प्रकारे संशयातीत करता येत नाही, तीच सत्य म्हणून स्वीकारली पाहिजे. शंका आणि आक्षेपांच्या प्रखर चाचणीतून (अन् चाळणीतूनही) जे शिल्लक राहते ते नि:संदिग्ध, नि:संशय ज्ञान म्हणजे विज्ञान. त्याला बुद्धिवादाची जोड असते, असे विज्ञान आपल्या शिक्षणाचे अधिष्ठान हवे. वर्तमान राजकारणी अजून मांत्रिकांच्या संगतीत दिसतात. त्यांच्या हाती शिक्षणाची सूत्रे आहेत,

म्हणून आपले शिक्षण अंधश्रद्धेच्या पाशात बद्ध आहे.

**४४) भारतीय संस्कृती : शोध आणि बोध** (२० मे, १९७०)

भारतीय संस्कृतीचे सामर्थ्य तिच्या अभिजात साहित्यात आहे. त्याचा शोध आणि बोध मानवी उन्नयनाकडे आपणास घेऊन जातो, असा विचार देणारे हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण आकाशवाणी, पुणे केंद्राने २० मे, १९७० रोजी ध्वनिमुद्रित केले होते. त्याच्या प्रक्षेपणाचा संदर्भ उपलब्ध नसला, तरी ते लगेचच प्रसारित झाले असावे.

प्रस्तुत भाषणात तर्कतीर्थांनी साहित्याच्या दोन परी विशद केल्या आहेत. १) चिरंतन, २) मर्यादित वा प्रासंगिक. चिरंतनमूल्य असलेले साहित्य सार्वकालिक, सार्वदेशिक या अर्थाने वैश्विक आणि कालजयी असते. ते संस्कृती प्रभावित असते. प्राचीन साहित्य असे होते. त्याने भारत, ग्रीक, रोम या देश नि संस्कृतींना प्रभावित करीत आपली संस्कृतीविनिमय आणि आदानप्रदानाने उन्नत केली होती.

भारतीय प्राचीन साहित्य हे भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. 'रामायण', 'महाभारत', अश्वघोषाचे 'बुद्धचरित्र', 'धम्मपद', 'बौद्ध जातककथा', भर्तृहारीचे 'शतकत्रय', 'पंचतंत्र', 'मृच्छकाटिक', 'शाकुंतल' इ. साहित्यकृती कालातीत आहेत. सांस्कृतिक भेदभावाच्या अहंकारिक भावना अशा साहित्याची उपेक्षा करू शकत नाही. अशा भारतीय संस्कृतीचा बोध देणाऱ्या 'वेद', 'उपनिषद', 'रामायण', 'महाभारत', प्राचीन नाटके संस्कृती शोधाची साधने असणे, यातच त्यांची महत्ता आहे. वेद आणि उपनिषद साहित्याने पाश्चात्य विचारकांना प्रभावित केले होते. 'रामायण'ची भुरळ होती. त्याची तुलना होमरच्या 'इलियड'शी झाली. बौद्ध साहित्याने आशिया खंडास प्रभावित केले. भारतीय नाट्यपरंपरा नाटकसुखांत समर्थक, तर पाश्चात्य नाटके शोकांतिका असत. दोन्ही परंपरांनी एकमेकांना श्रेष्ठ मानले आणि त्यांचे अनुकरण केले. गेल्या दीड-दोनशे वर्षांत भारतीय भाषांतील साहित्य वैश्विक अनुभूती देणारे सिद्ध झाले. कवींद्र रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, शरदचंद्र चटोपाध्याय यांचे साहित्य वैश्विक बनले आहे.

या भाषणातून तर्कतीर्थ भारतीय साहित्यास भारतीय संस्कृतीचा चेहरा मानून चर्चा करतात. त्यातून त्यांना साहित्य आणि संस्कृतीची अभिन्नता सूचित करायची असून, दोन्हींचे महत्त्व वैश्विक असल्याचे सिद्ध करायचे आहे. हाच या भाषणाचा शोध आणि बोध होय.

**४५ हिंदुधर्म: तत्त्व आणि व्यवहार (१९७१)**

पुणे येथे दि. ५ मे, १९७१ ला 'आन्तरभारती युवक स्नेहमीलन' संपन्न झाले होते. त्यातील पहिल्या उद्घाटनपर सत्रात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी युवक-युवतींना मार्गदर्शन करत 'हिंदुधर्म: तत्त्व आणि व्यवहार' विषयावर आपले विचार व्यक्त केले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, हिंदु धर्मचिंतन श्रुती-स्मृती आधारित आहे. त्यांचे मूळ वेदात आहे. प्रत्येक धर्मांचे ग्रंथ असतात. तसेच हिंदुधर्माचेही वेद, वेदांत, श्रुती, स्मृती, पुराण हे आधारभूत धर्मग्रंथ होत. कारण ते लोकाचार सांगतात. वेदात मूर्तीपूजा नाही. हिंदू धर्माचा इतिहास वेदांपासून सुरू होतो. योग

याचाच एक भाग होय. भारतीय धर्मचिंतनात धर्म, अर्थ, काम, मोक्ष अशा पुरुषार्थांची चर्चा आढळते. कर्मावरून चातुर्वर्ण अस्तित्वात आले. पुढे त्याचे रुपांतर जातीत झाले. पुढे जाती जन्मसिद्ध बनल्या. यातून विषम व्यवहार सुरू झाला. तो धर्मग्रंथाधारित नसून व्यवहाराधरित आहे. त्याचे वर्णन नंतरच्या धर्मसाहित्यात आढळते. मूलतः सर्व ईश्वरपुत्रच (ब्राह्मण) होते. नंतर भेद निर्माण झाले, ते आचारावरून. त्यामुळे त्याला धर्माधार नाही. हिंदुधर्म तत्त्व म्हणून वेगळा आहे. त्याचे आचार, व्यवहार भिन्न आहेत. भेद मिटायचे तर व्यवहार परिवर्तन आवश्यक आहेत.

**४६) लोकशाहीचे तात्त्विक अधिष्ठान** (२६ जून, १९७४)

तीर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी प्रवासाच्या अनुषंगाने विचारचिंतन करणारा एक लेख 'विचार मंथन' या विशेष अंकासाठी लिहिला होता. हा लेख म्हणजे मूलतः श्री शाहू महाविद्यालय, पुणे यांच्या वतीने अयोजित 'लोकशिक्षण व्याख्यानमाला'न्तर्गत २६ जून १९७४ रोजी दिलेले व्याख्यान होय. त्यात त्यांनी लोकशाही मजबूत व्हायची तर ती लोकांनी लोकांसाठी चालविलेली असली पाहिजे, असा विचार व्यक्त केला होता. अशा लोकशाहीमध्ये मानवतावाद आधारित समाजवाद आला, तर ती लोकशाही प्रगल्भ ठरेल. लोकशाहीचे तात्त्विक अधिष्ठान मनुष्य व त्याचे कल्याण असले पाहिजे, असा विचार या लेखात प्रकट केला आहे.

**४७) मी परिवर्तनवादी शास्त्री** (१५ फेब्रुवारी, १९७५)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अमृतमहोत्सव १५ फेब्रुवारी, १९७५ रोजी वाई येथे संपन्न झाला. या सत्कार सोहळयास उत्तर देताना केलेले हे भाषण मुद्रित करून समारंभात वितरित करण्यात आले होते.

'मला या क्षणी प्रश्न पडला आहे की, मी कोण? तुम्ही कोणत्या कारणाने माझा सत्कार करीत आहात? माझ्यात गुणदोष भरलेले आहेत. तुम्ही गुणांचा सत्कार करीत आहात नि दोषांवर शाल पांघरत आहात. जीवनाचे सत्यरूप गुणदोषात्मकच असते. पु. ल. देशपांडे यांनी मला एका खासगी समारंभात आत्मकथा लिहा असे सुचविले होते. आत्मचरित्रापेक्षा परचरित्र लिहिणे सोपे, आपले गुण आपणास कळतात, दोष नाहीत. सत्यरूप कळले तरच ते लिहिणार. आत्मचरित्र ही लेखनकला आहे. भूतकाळ हा आत्मचरित्राचा विषय असतो. दोष प्रगट करण्यास नैतिक धैर्य लाभते. ते सर्वांत असते असे नाही.

माझ्या आयुष्याचे सिंहावलोकन करताना लक्षात येते की, माझ्यात अनेक परिवर्तने घडून आली. मी परिवर्तनवादी शास्त्री आहे. माझ्यात मतांतरे झाली. नंतर वेषांतरेही. संस्कृत पंडित, स्वातंत्र्य चळवळीतील सत्याग्रही, परिवर्तनवादी शास्त्री, रॉयवादी, मार्क्सवादी झालो. वेगाने बदलणाऱ्या जगाच्या प्रवाहात पहिल्या उमेदीत पाऊल टाकले. केव्हा वाहत, तर केव्हा

पोहत राहिलो, कोठेच पाय टेकले नाहीत. टेकायला जागाच सापडली नाही. जगाबरोबर माझ्यातही खूप बदल होत गेला. तीन आयुष्यांचे बदल एका जीवनात अनुभवले.

मी दोन कामांची जबाबदारी स्वीकारलेली आहे. एक यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी सोपविलेली. ती म्हणजे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ. दुसरी माझे गुरू केवलानंद सरस्वतींनी सोपविलेले 'धर्मकोश' संपादन कार्य. भारताच्या धार्मिक आणि सामाजिक संस्थांच्या हजारो वर्षांच्या इतिहासाचे 'धर्मकोश' हे एक श्रेष्ठ साधन आहे. याची जाणीव भारत आणि महाराष्ट्र शासनास झाली, तर ही दोन्ही कार्ये पूर्ण होतील.'

प्रस्तुत भाषण म्हणजे जाहीर, मौखिक, सिंहावलोकनात्मक आत्मकथनच होय. या आत्मकथनात अंतर्मुख होऊन स्वयंमूल्यमापन करण्याचा भाव आहे.

**४८) श्रमातून येणारे जग मोलाचे** (१५ फेब्रुवारी, १९७५)

वाणिज्य व मानव्य महाविद्यालय, वाई (सध्याचे किसन वीर महाविद्यालय, वाई)मार्फत या महाविद्यालयाचे संस्थापक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ३ फेब्रुवारी, १९७५ रोजी सत्कार समारंभ योजला होता. त्याचा वृत्तांत त्या महाविद्यालयाचे प्रा. विजयकुमार फरांदे यांनी साप्ताहिक 'साधना'कडे प्रकाशनार्थ पाठविला होता. तो त्या साप्ताहिकाच्या १५ फेब्रुवारी, १९७५ या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यातील तर्कतीर्थांच्या सत्कारास उत्तर देणाऱ्या भाषणाचा हा सारांश.

जगाच्या स्वरूपाबाबत विचारवंतांचे मतभेद आहेत. वेदांतात जगास भ्रम संबोधिले आहे. बर्टार्ड रसेलने जगास स्वप्न मानले होते. मार्क्स अधिक लिहू शकला नाही. त्याच्यापुढे अनेक अडचणी होत्या. त्याच्या मतानुसार, जग प्रश्नांनी भरले आहे खरे; पण श्रमाने ते सुटू शकतील. मस्तक नि हस्तक यांच्यात सांधा अथवा समन्वय हवा, त्याशिवाय जगात समता येऊ शकणार नाही.

तर्कतीर्थ कबूल करतात की, मी खासगीत व्यक्तिगत जीवनात विकारवश (दु:खी) होतो. ती माझ्या आयुष्याची वा जीवनाची लंगडी बाजू होती. मी स्थितप्रज्ञ नाही, होऊ शकलो. स्थितप्रज्ञ स्थिती म्हणजे विकार, भाव, प्रेममुक्त जीवन स्थिती. विवेकवृद्धीने माणूस स्थितप्रज्ञ स्थितीप्रत पोहोचू शकतो. विवेक नसणे म्हणजे विकारवश असणे होय. मग माणसं शाप देतात. त्यात काही तथ्य असत नाही. मी पूर्वी सनातनी होतो. माझी भ्रमंती अव्याहत सुरू आहे; पण गृहस्थीचा खूंट इथे आहे. स्थलांतरित पक्षी मूळ निवासी परततात, तसा मीही परततो. माझ्या घरी जात, धर्मभेद नाही. माझं वाचन शिळोप्याचा उद्योग नाही. वाचन दृष्टी देणारे असते. तुमचे शिक्षक, प्राध्यापक शिकवितात. त्यावर फार अवलंबून राहू नका. छांदोग्य उपनिषदातील कथेप्रमाणे ते आपले डोळे उघडतात, दिशा देतात. मार्ग आपणच निवडायचा असतो.

तर्कतीर्थांचे प्रत्येक भाषण म्हणजे एखाद्या प्रेषिताचे प्रवचनच असते. कोणत्याही

प्रसंगाचे भाषण असो, ते दृष्टान्तांनी, उदाहरणांनी भरलेले असते. ते नवे विचार, दृष्टी, दिशा देते. शिवाय ते ऐकणाऱ्यास विचारप्रवण करीत अंतर्मुख करते.

**49) Freedom And Social Responsibility** (26th December, 1975)

अखिल भारतीय रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन संस्थेची द्वैवार्षिक परिषद अहमदाबाद (गुजरात) येथे २६ डिसेंबर, १९७५ रोजी संपन्न झाली. तिचे उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. द्वैवार्षिक परिषदेचे हे त्यांचे उद्घाटनपर भाषण रॅडिकल डेमॉक्रॅटिक विचाराचे मुखपत्र असलेल्या 'दि रॅडिकल ह्युमॅनिस्ट' मासिकाच्या फेब्रुवारी, १९७६च्या अंकात प्रकाशित झाले होते. पूर्वीच्या 'इंडिपेंडंट इंडिया' मुखपत्राचे हे वर्तमान रूप. तर्कतीर्थांनी हे भाषण इंग्रजीत सादर केले होते.

'आपण दर दोन वर्षांनी अंतर्मुख होत सिंहावलोकन करीत असतो. गेल्या द्वैवार्षिक परिषदेचे उद्घाटन लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी केले होते. आज तो सन्मान तुम्ही मला दिला आहे. आज जगात लोकशाहीपुढे दडपशाहीचे संकट उभे आहे. अशावेळी वैचारिक आदान-प्रदान ही त्यास एक पर्याय म्हणून उभा राहू शकते. जेव्हा लोकशाही संकटात येते, तेव्हा अंतर्गत दबाब आणि देखरेख नि हस्तक्षेप तिचे रक्षण करू शकते. लोकशाही ही मूलत: लोकजागृती आणि लोकसंघटनेचे लोकशिक्षण आहे. सन १९३०च्या दरम्यान जर्मनीत राष्ट्रीय समाजवादी, जर्मन राष्ट्रवादी आणि साम्यवादी एकत्र आले आणि त्यांनी दडपशाहीला पर्याय उभा केला. रुसोचा दृष्टिकोन यासंदर्भात लक्षात घ्यायला हवा. व्यक्तीपेक्षा पक्षाच्या सार्वभौमिकतेत वा नियंत्रणात नाही म्हटले तरी एकाधिकारशाहीपेक्षा कमी धोके राहतात. निरंतर स्वयंशिक्षणातून येणारी जागृती महत्त्वाची. स्वातंत्र्य ही शक्ती आहे. लोकशाहीत ती लोकप्रतिनिधींमध्ये असते. सत्ता ही शक्तीच असते. ती कोणत्या रूपात कोणास देतो, हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे. आजच्या आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्कांचे संरक्षण हा कळीचा मुद्दा आहे. संस्थात्मक रचना सुरक्षित राहणे लोकशाहीसाठी आवश्यक असते. सध्याच्या वातावरणात झुंडशाहीचा प्रत्यय येतो. निवडणुकीत समाजवाद आणि समृद्धीच्या घोषणा वेगळया नि प्रत्यक्ष कारभार पद्धती महत्त्वाची. पक्षीय स्पर्धेच्या राजकारणात विवेक सुटतो. तत्त्वापेक्षा व्यवहारास महत्त्व येते. मूलभूत पुनर्रचनेकडे लक्ष हवे. मानवेंद्रनाथ रॉय यांनी दाखविलेल्या नवमानवतावादी विचारांना घेऊनच समाज पुढे गेला, तर त्यात समाजहित आहे. त्यातच स्थैर्य आणि समृद्धी शक्य आहे. हे सांगून या परिषदेचे उद्घाटन झाले असे जाहीर करतो.'

**५०) संपूर्ण राजकीय क्रांती** (१० नोव्हेंबर, १९७७)

स्वतंत्र भारताच्या राजकीय वाटचालीतील सन १९७५-७७ या कालखंडातील २१ महिन्यांचा काळ (२५ जून, १९७५ ते २१ मार्च, १९७७) हा राजकीय आणीबाणीचा होता. याच काळात जयप्रकाश नारायण यांनी समग्र क्रांतीचे आवाहन लोकशाही आणि मूलभूत

हक्क रक्षणार्थ केले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे भाषण आकाशवाणी, पुणे केंद्रावरून १० नोव्हेंबर, १९७७ रोजी प्रसारित झाले होते.

'भारताला तीस वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळाले, ती शांततापूर्ण क्रांतीच होती. तीमधून लोकशाही संघराज्य उदयाला आले. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांवर ते आधारित होते. पूर्वी पाश्चात्य देशांत याच तत्त्वांवर लोकशाही अस्तित्वात आली आणि विकसित झाली. लोकशाही प्रयोगावस्थेत असल्याने तिला वारंवार धोके निर्माण होत आहेत. संपूर्ण क्रांतीविचार त्या धोक्याच्या दूर करण्याच्या विचारातून आला आहे. क्रांती म्हणजे वर्तमान समाजव्यवस्थेत करण्यात आलेला मूलभूत बदल. कोणत्याही बंधनाशिवायचा मानवी सामाजिक आणि सांस्कृतिक विकास संपूर्ण क्रांतीत अपेक्षित आहे. जनतेची शास्य आणि शासकगटात विभागणी न करता नागरी सत्तेतील जनतेची भागिदारी संपूर्ण क्रांतीत अपेक्षित आहे.

संसदीय लोकशाहीत आपण लोकप्रतिनिधींद्वारे सत्तेचे विकेंद्रीकरण करीत असतो. सत्ताभिलाषी राजकीय पक्ष हे जनगणना आणि पक्षीय लोकप्रतिनिधींवर कब्जा करून निरंकुश नेतृत्व मिळवितात. संपूर्ण राजकीय क्रांती म्हणजे सत्तावादी राजकीय पक्ष आणि वर्ग राहणार नाहीत, अशी शास्त्र-शासक व्यवस्था निर्माण करणे होय. हे कार्य लोकशिक्षण, लोकजागृती, लोकसंघटनातूनच शक्य आहे. ते महात्मा गांधींचे सूत्र आणि स्वप्न होते. शेतकरी, माळी, कामगार, शिक्षक, सरपंच, ग्राहक, नागरिक या सर्वांच्या सहकार्य आणि सहभागातून तयार झालेले गणराज्य. ही मूलगामी लोकशाही रचना पिरॅमिडसारखी असली पाहिजे. भारतातील पूर्वीची रचना अधिकारकेंद्रित होती. ती लोकानुर्ती, बांधिल रचना करणे हे संपूर्ण क्रांतीचे ध्येय आहे. पक्षातीत स्वातंत्र्यवादी, लोकशिक्षकांची आज त्यासाठी गरज आहे. ध्येयवादी शिक्षक निर्माण करणे हेच आजचे खरे क्रांतिकार्य आहे.'

तर्कतीर्थांनी आपल्या या भाषणातून संपूर्ण राजकीय क्रांतीचे स्वरूप, रचना आणि कार्यपद्धतीचे विवेचन केले आहे.

**५१) हिंदूंच्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणांचा इतिहास** (८ मे, १९७८)

एशियाटिक सोसायटी, मुंबई ही एकोणिसाव्या शतकापासून कार्यरत ग्रंथालय, संग्रहालय संचालन करणारी संस्था होय. या संस्थेमार्फत भारतरत्न डॉ. पां. वा. काणे यांच्या वर्षदिनानिमित्त (७ मे) व्याख्यानमाला होत असते. ८ मे, १९७८ रोजी संपन्न असे वर्षदिन व्याख्यानपुष्प गुंफण्याचा मान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मिळाला होता. यावेळी त्यांनी 'हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास' या विषयावर इंग्रजीमध्ये भाषण केले होते. त्याचे मराठी भाषांतर स्वत: तर्कतीर्थांनीच केले होते. ते 'नवभारत' मासिकाच्या जुलै, १९७८च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. डॉ. पां. वा. काणेंचा याच विषयाचा सर्वांगीण व्यासंग होता.

‘एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात सन १८१३ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी आपल्या सहाकार्यांसह हिंदू धर्मसुधारणा कार्यक्रम हाती घेतला. आजवर भारतात धर्म ही अपरिवर्तनीय बाब मानली गेली होती, त्याचं कारण समाजावर असलेलं धर्मग्रंथांचं शब्दप्रमाण प्राबल्य. वेदादी साहित्य मनुष्यनिर्मित आहे. जे. जे. मनुष्यनिर्मित आहे त्यात कालौघात परिवर्तने अटळ असतात. जे कालबाह्य ते त्याज्य, हे सती प्रथेने सिद्ध केले. पुढे महात्मा फुले यांनी मूर्तिपूजा, कर्मकांड, पुरोहितशाहीला शह देत सत्य हाच ईश्वर असल्याचे आपल्या ‘सार्वजनिक सत्यधर्म’मधून स्पष्ट केले. गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर प्रभृती मान्यवरांनी विवेक, बुद्धिवाद प्रमाण मानत रूढी, परंपरा त्याज्य ठरवत आजवर धर्मशास्त्रोक्त मानल्या गेलेल्या ५५ चाली वर्ज्य ठरविल्या आणि ‘पूर्व बदलत नाही’ हा समज खोटा ठरविला. याला ‘कलिवर्ज्य प्रकरण’ उपयोगी सिद्ध झाले आणि हिंदू धर्म व समाजात सुधारणांचा मार्ग प्रशस्त झाला.’

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या भाषणद्वारे भारतीय समाज, साहित्य आणि संस्कृतीचा विस्तृत इतिहास विशद करीत ब्रिटिशांच्या आगमनाने, विशेषत: विको, स्लेंगर, टॉयन्बी, सोरोकिन यांची सरळ रेषेतील ऐतिहासिक आकृतिबंध मान्य केल्याने पारंपरिक चक्रनेमी सिद्धांतास शह दिला गेला, हे विविध तर्क आणि प्रमाण यांच्या आधारे यातून पटवून दिले. तर्कतीर्थांची व्याख्याने नेहमीच तर्क आणि प्रमाण प्रमेयाद्वारे खंडनमंडन करीत नवे विचार रुजवतात.

**५२) लोकशाहीसाठी सत्तेवर अंकुश ठेवणारे गट हवेत** (२० सप्टेंबर, १९७८)

दैनिक ‘सकाळ’, पुणेचे संस्थापक संपादक डॉ. ना. भि. परुळेकर यांच्या जयंतीनिमित्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे ‘देशापुढील आव्हाने’ या विषयावर व्याख्यान दिले. आणीबाणी संपून सन १९७७च्या निवडणुकीत जनता पक्षास बहुमत मिळून नवे विविध पक्षीय एकात्म सरकार आले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील हे पहिलेच बिगरकाँग्रेस सरकार होते. या भाषण विषयाची ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन हे भाषण वाचले पाहिजे.

आपल्या भाषणात सत्तेपासून अलिप्त असलेले, परंतु सत्तेवर अंकुश ठेवू शकणारे गट लोकशाहीच्या समर्थनासाठी आजच्या परिस्थितीत समाजात आवश्यक असल्याचे प्रतिपादन करीत तर्कतीर्थ पुढे म्हणतात की, ‘स्वातंत्र्यानंतर आपण घटना स्वीकारली. नेहरू घराण्याचे तीन पिढ्यांचे वर्चस्व मान्य केले; पण झालेल्या घटनांमधून व्यक्तिपूजा करू नये, हे आपल्या लक्षात आले. जिवंत माणसाला देवपण देऊ नये असा अनुभव आला. रशियन क्रांतीचे उदाहरण आपल्या समोर आहे. हुकूमशाही जाऊन हुकूमशाहीच तिथे आली. राजकीय पक्षात शिथिलता, मतभेद आज दिसतात. राजकीय पक्षात लोकशाही रुजली नसल्याचे आपल्या लक्षात येते. घराणेशाही सर्वत्र आहे. राजकीय पक्षात लोकशाही रुजणे

महत्त्वाचे.

महाराष्ट्रात नामांतराच्या निमित्ताने दलितांचा प्रश्न ऐरणीवर आला. लक्षात काय आले? साठलेले संस्कार वर आले. जातिभेदाचे समूळ उच्चाटन अद्याप झालेले नाही. आपल्यासमोरील प्रश्नांना कार्यक्रम आणि योजनांमधून उत्तरे मिळाली पाहिजेत, तेव्हाच आपले खरे प्रश्न सुटतील.

पक्ष फुटले तर बेबंदशाही येईल. हुकूमशाही येण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. लोकशाहीची नैतिक मूल्ये समाजात रुजली नसल्याने हुकूमशाहीचेही स्वागत होण्याची शक्यता आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विचाराने काँग्रेसी असले तरी राजकीय अंधळेपण त्यांच्यात नव्हते. आणीबाणीच्या काळात कराड साहित्य संमेलनात (१९७५) त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य संकोचाला विरोध करीत साहित्यिकांच्या मतस्वातंत्र्याचे समर्थन त्यांच्या उद्घाटक म्हणून केलेल्या भाषणात दिसून येते. [पहा, खंड क्र.४ भाषणसंग्रह (साहित्य)]

**५३) अध्यक्षीय पद्धत भारताला उपयुक्त आहे का?** (२४ जानेवारी, १९८१)

सन १९८१च्या प्रारंभी सोलापूर येथे रॅडिकल ह्यूमॅनिस्ट असोसिएशनचे अधिवेशन संपन्न झाले. त्या अधिवेशनास आनंद कोठडिया उपस्थित होते. ते या अधिवेशनातील चर्चेने प्रभावित झाले होते. त्यांनी ४ व ५ ऑक्टोबर, १९८१ रोजी करमाळा येथे नवयुवकांमध्ये नवमानवतावादी विचारांचा प्रचार, प्रसार होऊन प्रबोधन घडावे म्हणून एक शिबिर योजले होते. त्या शिबिराचे उद्घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. त्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी रॅडिकल डेमॉक्रॅसी तत्त्वज्ञानाचे प्रणेते भाई मानवेंद्र रॉय यांच्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येस विचार व्यक्त करीत सांगितले की, फ्रेंच राज्यक्रांतीने जसे युरोपात प्रबोधन घडवून आणले, तशा प्रबोधनाची भारतीय समाजास आवश्यकता आहे. भारतात जाती व धार्मिक ऐक्य घडवून आणून विषमता नष्ट केली पाहिजे. हे काम तरुणच करू शकतील व त्यासाठी भारतात अध्यक्षीय लोकशाही की संसदीय लोकशाही असा वाद सुरू आहे. भारताची समाजरचना लक्षात घेता, इथली प्रांतरचना लक्षात घेता, इथे विचारपूर्वक लोकशाहीचे स्वरूप निश्चित करणे आवश्यकच नाही, तर अनिवार्य आहे.

**५४) विज्ञाननिष्ठ मानवतावाद हाच सत्याप्रत जाण्याचा मार्ग** (२५ जानेवारी, १९८१)

उपरोक्त शिबिराच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २५ जानेवारी, १९८१ रोजी सोलापूर येथील टिळक स्मारक मंदिरात सायंकाळी सहा वाजता एम. एन. रॉय स्मतिदिनी सर्व नवमानवतावादी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन मानवेंद्रनाथ रॉय यांच्या जीवनकार्य व विचारांचे स्मरण केले. या स्मृतिसभेचे प्रमुख वक्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. या समारंभाचे अध्यक्ष डॉ. निर्मलकुमार फडकुले होते. तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात भारतीय समाजात बुद्धिगम्य विज्ञाननिष्ठ विचारपद्धतीत रुजविण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, भारतात

विज्ञाननिष्ठ मानवतावाद रुजविण्याचा सत्यान्वेषी एकमेव मार्ग म्हणजे नवमानवतावाद होय.

**५५) ज्ञान व वस्तुस्थिती समन्वयक आचरणाची सवय हवी** (१२ मार्च, १९९१)

४ व ५ ऑक्टोबर १९८१ रोजी रॅडिकल ह्यूमॅनिस्ट असोसिएशनचे जे शिबिर संपन्न झाले होते, त्यानंतरचे हे शिबिर या शिबिरास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, न्यायमूर्ती वि. म. तारकुंडे, प्रा. मोकाशी, 'सकाळ'चे संपादक एस. के. कुलकर्णी, डॉ. इंदुमती पारीख, सांगोल्याचे भाई एम. एस. ढोले, श्री. रानपारखी, ॲड. काणे, भाई अनंत केरुजी भोसले, मॅगेसेसे पारितोषिक विजेते डॉ. रजनीकांत आरोळे आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिराच्या शुभारंभप्रसंगी केलेल्या भाषणात तर्कतीर्थ म्हणाले की, प्रा. गोवर्धनदास पारीख स्मारक प्रबोधन संस्थेच्या वतीने होणारे हे शिबिर म्हणजे ज्ञान व वस्तुस्थिती समन्वयक आचरणाचा संस्कार रुजविण्याचा उपक्रम आहे. याबाबत जाणीवपूर्व कार्य करण्याची गरज आहे. जगाचा विकास विज्ञानाने घडवून आणला तो स्थल, काल व गती यांच्या मापनाच्या शोधाने. हे लक्षात घेऊन आपण परिवर्तनातही काळ, काम व वेगाचे गणित पाळले पाहिजे.

**५६) जीवविज्ञानात दिसणारा मानव** (१२ मार्च, १९९१)

नगरपरिषद, कराडमार्फत अनेक वर्षे यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित केली जात असते. सन १९९१च्या या व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'विज्ञान आणि मानवी मूल्ये' या विषयशृंखलेत तीन पुष्पे गुंफली होती. पैकी दोन व्याख्याने 'नवभारत' मासिकाच्या फेब्रुवारी-मार्च, १९९१ च्या अंकात प्रकाशित आहेत. १) जीवविज्ञानात दिसणारा मानव, २) विज्ञान व संस्कृती. तिसऱ्या व्याख्यानाचे प्रकाशन एप्रिल, १९९१च्या अंकात प्रकाशित होईल, अशी सूचना दुसऱ्या भाषणाच्या शेवटी (नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९९१; पृ. ८७) संपादकांनी प्रकाशित केली खरी; पण तदनंतर अपरिहार्य कारणामुळे जवळजवळ एक वर्ष (१९९१) 'नवभारत' मासिकाचे अंक प्रकाशित होऊ न शकल्याने 'मनुष्य व नैतिक मूल्ये' हे तिसरे भाषण प्रकाशित झाले नाही आणि शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकले नाही.

या पहिल्या व्याख्यानात ते म्हणतात की, हा कठीण विषय आहे. माणूस समजून घ्यायचा प्रयत्न पूर्वापार आहे. वेद-उपनिषदात 'कोऽयमात्मा'-आत्मा म्हणजे 'मी' म्हटले आहे. सॉक्रेटिस, येशू ख्रिस्ताने 'Know thyself' म्हणत स्वत:स जाणून घेण्याचे आवाहन केले आहे. तर्कशास्त्र मानवाच्या असण्याला ठाम स्वीकृती देत 'I think, therefore I am' म्हणतं. जीवशास्त्र परिभाषेत माणूस 'होमोसेपिअन' म्हणजे शहाणा, प्रगल्भ जीव होय; पण तो खरंच शहाणा का, ते अजून ठरायचे आहे. कारण, त्याने जी संहारक अस्त्रे निर्माण केली, त्यातून त्याचं श्रेष्ठत्व सिद्ध झालं, पण शहाणपण नाही.

जीवविज्ञानाने त्याला विकसित जीव मानले आहे. काव्यात आणि साहित्यात त्याच्यापेक्षा श्रेष्ठ जीवांची-गंधर्व, अप्सरा इ. वर्णने सर्वधर्म नि भाषा साहित्यात आहे. सर्वांत

जुनं विज्ञान ज्योतिर्विज्ञान. भौतिकीमधला जुना शास्त्रज्ञ न्यूटन. भौतिकशास्त्राचा आज खूप विकास झाला आहे. जीवविज्ञानात डार्विनने क्रांती केली. त्याच्या संशोधनाने धर्मग्रंथातील मनुष्यजन्म, विकास, कल्पना खोट्या ठरल्या. मनुष्य बुद्धिजीवी ठरला. म्हणूनही श्रेष्ठ. त्याने विविध ज्ञान-विज्ञाने बुद्धीने विकसित केली. जनुकाचा शोध लावून जीवविकासाचे रहस्य शोधले. माणसातील माहिती केंद्रे शोधली. मानवी वंशांचा अभ्यास झाला. जात, वंश संबंध तपासले गेले. सर्वांत माणुसकीचा भाव श्रेष्ठ ठरला. त्याआधारे माणसाचे श्रेष्ठत्व ठरले, ते संस्कृती विकासामुळे.

**५७) विज्ञान व संस्कृती** (१३ मार्च, १९९१)

हे नगरपरिषद, कराडच्या यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला (१९९१)मधील दुसरे पुष्प.

माणसाला मेंदू आहे, म्हणून तो माहिती साठवू शकतो. ही मेंदूची शक्ती सर्व प्राण्यांमध्ये नाही. असेल तर इतकी उन्नत नाही. बैजिक, सोमेटिक आणि एक्ट्रासोमेटिक अशा वेगवेगळ्या प्रकारची माहिती केंद्रात साठविली जाते. त्याआधारे तिचे प्रकार ठरतात. माणसाच्या पंचेंद्रियांचा विकास त्याला उन्नत ठरवतो. विज्ञान विकासात लहान मेंदू, मोठा मेंदू, त्यांची कार्ये शोधली गेली. मेंदू आणि मन वेगळे असा शोध लागला. ज्ञान साठविण्याच्या कलेने माणसाने कलहांवर विजय मिळविला. त्याची मिथक कथा तर्कतीर्थांनी आपल्या या भाषणात सांगितली.

मंत्र-तंत्रावर जग बदलत नाही. ते बदलतं केवळ विज्ञानामुळे. माणूस जिज्ञासू असल्याने सतत शोध घेत राहतो. आत्मा म्हणजे काय? सृष्टीचक्र कसे आहे? तारांकित आकाश कसे? नैतिक प्रज्ञा म्हणजे काय? आध्यात्म काय आहे? विवेकशक्ती कशी आली? एक ना अनेक प्रश्नांचा भुंगा माणसाचा पाठलाग करीत असतो. या सर्वांत तो शोधत असतो ते सत्य (Fact). न्यूटनला या जिज्ञासेमुळेच सफरचंदाच्या निमित्ताने गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला. चंद्र खाली का येत नाही ते उमगलं. कशाने काय घडतं ही कारणमीमांसा माणसास विज्ञानाने समजावली. कार्यकारणभाव त्याला कळला. ऋतुचक्राचा उलगडा झाला. आग कशी निर्माण करायची, याचे तंत्र हाती आले. विजेमुळं जग खेडं बनलं (Global Villege). टेलिफोन आला. संवाद सुदूर झाला अन् वाढला. मातीतून (खनिज) धातू निर्माण झाले. यंत्रयुग अवतरले. हे सर्व ज्ञानोपासकांमुळे घडले.

वीज, अग्नी, चुंबक, वाफ, पाणी ही शक्तीची विविध रूपं माणसाला लाभली. त्यातून आर्थिक सुबत्ता आली; पण लक्षात ठेवले पाहिजे की, भौतिक आणि आध्यात्मिक शक्ती भिन्न आहेत. त्यांच्या समर्थ, मर्यादा भिन्न आहेत. भौतिक समृद्ध संस्कृतीला आध्यात्मिक, नैतिक अधिष्ठान असेल तर अर्थ राहतो. आध्यात्मिक आणि बौद्धिक संस्कृतीत विरोध नसावा, तादाम्य असावे. चिंतन महत्त्वाचे. त्याशिवाय सत्याची उपासना अशक्य.

या भाषणातून तर्कतीर्थांनी भौतिक, आत्मिक आणि नैतिक समन्वय म्हणजे संस्कृती

समजावत विज्ञान त्याचे साधन असल्याचे स्पष्ट केले आहे.

**५८) भारतीय संस्कृतीच्या विकासाची दिशा** (७ मार्च, १९८२)

समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी (जि. कोल्हापूर) ही जनजागृती, समाज प्रबोधन, कार्यकर्ता प्रशिक्षण, वाचनवृद्धी इत्यादी कार्य करणारी संस्था. या संस्थेच्या एका कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे ७ मार्च, १९८२ रोजी 'भारतीय संस्कृतीच्या विकासाची दिशा' या विषयावर भाषण झाले. ते त्या संस्थेने त्यावेळी पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित केले होते.

या भाषणात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले की, भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक होय. अनेक संस्कृती उदयाला आल्या, विकसित झाल्या आणि र्हासही पावल्या. परंतु, चीन आणि भारतीय संस्कृती मात्र आजवर टिकून आहे. या संस्कृतीला हिंदू, सिंधू, हडप्पा, भारतीय अशी अनेक नावे आहेत; पण त्यातील 'भारतीय' नाव योग्य. कारण, ते देशवाचक आहे. ही संस्कृती वेदपूर्व कालापासून अस्तित्वात असल्याने तिचा काळ ४००० वर्षांपूर्वीचा आहे. मानवी संस्कृतीत अग्नीच्या शोधाने बदल घडून आले. आपल्या संस्कृतीस अग्नीची पूजा ही ऊर्जा म्हणून होते. विकासाला ऊर्जा आवश्यक असते. आधुनिक काळात वीज ही ऊर्जा आहे. प्रगतीच्या वाटचालीत माणसाने नांगरापासून ते अण्वस्त्रापर्यंतची मजल गाठली आहे.

भारतातील संस्कृती विकास अनेकवंशीय संकराने घडून आला आहे. भारतीय संस्कृतीत बहुवंशीय मानवजाती आहेत. या संस्कृतीत भौतिकतेबरोबर अध्यात्मिकतेस महत्त्व आहे. मंत्र, तंत्र, यंत्र असा क्रमानुगतित विकास भारतीय संस्कृतीत आढळतो. आज जातीय विषमता नष्ट करून समानतेचा विकास भारतीय समाजात व्हायला हवा. युरोपीय इतिहासातील प्रबोधन इथे व्हायला हवे. मानवाच्या विकासाचा आधार विज्ञान आणि प्रगत विचार आहे. जगातील सर्वच संस्कृतीत दोष आहेत. आपल्या संस्कृतीतील दोष दूर करून ती उन्नत करण्याची दिशा आपण धरली पाहिजे. माणसात जगण्याच्या वासनेबरोबर मरणाचीही असते; पण जगण्याची वासना बलवत्तर हवी. जीवशास्त्र आज आयुष्यवर्धनाचा विचार करते. आरोग्यसंपन्न जीवनाने भारतीय संस्कृती संपन्न होईल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'हिंदुधर्माची समीक्षा', 'सर्वधर्मसमीक्षा'सारखे ग्रंथ वाचले की, त्यांचा संस्कृती व्यासंग स्पष्ट होतो. हे व्याख्यान त्या व्यासंगाची पुन:प्रचिती देणारे आहे.

**५९) विश्वमानवधर्माशी समन्वित राष्ट्रीय एकात्मता** (२० मार्च, १९८२)

२० मार्च, १९८२ रोजी पुण्यात राष्ट्रीय एकात्मता परिषद योजण्यात आली होती. तिचे अध्यक्षस्थान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भूषविले होते. अध्यक्षपदावरून केलेले हे भाषण विषय म्हणून अत्यंत महत्त्वाचे आहे. 'नवभारत' मासिकाच्या एप्रिल, १९८२च्या

अंकात ते प्रसिद्ध झाले होते.

भारताचे स्वातंत्र्य आंदोलन शतकापेक्षा अधिक काळ चालले. त्याची परिणती म्हणजे इथली राष्ट्रीय एकात्मता. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, यहुदी, शीख, आदिवासी इ. भिन्न धर्म, वंश, भाषा, जातीच्या लोकांना सामील करून इथले स्वातंत्र्य आंदोलन झाले. स्वातंत्र्योत्तर काळात इथे राष्ट्रीय एकात्मतेचा आविष्कार झाला. त्याचे कारण भारताचे संविधान. भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना जात, धर्म, प्रांत, भाषा, प्रदेश इ.चा विचार न करता सर्वांना समान अधिकार दिले. भारतीय राज्यघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंधमोचक बनविली आहे. भारत हे बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुजातीय, बहुप्रांतिक राष्ट्र असूनही एक आहे, ही महत्त्वाची गोष्ट होय. युरोपीय राष्ट्रे ही एकभाषिक, एकवंशीय असल्याने तिथे उपजत एकता असण्यात आश्चर्य नाही. रशिया, स्वित्झर्लंड, इटली, कॅनडा इ. बहुभाषी राष्ट्रे आहेत.

‘माझे राष्ट्र कसेही असले तरी सर्वश्रेष्ठ आहे’ ही भारतीयांची भावना प्राचीन साहित्यातील विश्वबंधुत्व भावनेच्या आधाराने अडथळे आले तरी विकसित होत राहिली. त्यात अनेक विचारवंत, समाजसुधारक यांचा वाटा आहे. त्यात महंमद इकबाल, अब्दुल कलम आझाद, हकीम अजमल खान, टिळक मित्र बाप्तिस्टा, सी. एफ. ॲन्ड्रयूज, रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक, ‘सुधारक’कार गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, महात्मा ज्योतिराव फुले, लोकनायक जयप्रकाश इतकी मोठी परंपरा योगदान देताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारून परागंदा झालेला तो धर्म पुनरुज्जीवित केला. द्विराष्ट्रवादातून भारत तावून सुलाखून निघाला आहे. आता आहे त्या राष्ट्रात विश्वधर्माशी समन्वित राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे. आधुनिक मानवी समानतावादी मूल्यांच्या आधारावरच भारतीय राष्ट्रीय एकात्मता जगू शकेल. त्यासाठी सांस्कृतिक समन्वय गरजेचा आहे. इथल्या एकतेपुढे फुटीरतेची आव्हाने आहेत; पण येथील शिक्षणपद्धती नवी आर्थिक रचना त्यांच्यावर मात करील, असा विश्वास देऊन आश्वस्त करणारे तर्कतीर्थांचे हे भाषण त्यांच्या महत्त्वपूर्ण भाषणांपैकी एक होय.

**६०) भविष्यकाळ घडविणारा माणूस दिसावा** (२८ ऑगस्ट, १९८२)

लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथसंग्रहालय, वाईची स्थापना जुनी आहे. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख हे वाईमध्ये मुन्सफ म्हणून कार्यरत असताना त्यांनी १८५२ मध्ये ‘नेटिव्ह जनरल लायब्ररी’ सुरू केली होती. सन १९११ मध्ये काही ग्रंथप्रेमींनी एकत्र येऊन ‘वाई ग्रंथसंग्रहालय’ स्थापन केले. या दोन्ही संस्थांचे विलीनीकरण होऊन सन १९२९ मध्ये लोकमान्य टिळक स्मारक संस्थेमार्फत ‘लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय’ अस्तित्वात आले. त्याचा सुवर्णमहोत्सव २८ ऑगस्ट, १९८२ रोजी संपन्न झाला. या समारंभाचे स्वागताध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मोहन

धारिया उपस्थित होते, तर समारंभाचे अध्यक्षस्थान जयवंतराव टिळक यांनी भूषविले होते.

तर्कतीर्थ आपल्या भाषणात म्हणाले की, अनेक प्रसंग येऊनही मी वाई सोडली नाही. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' ग्रंथ लिहिला, तेव्हा त्याच्या दोन प्रती वाईस भेट स्वरूपात आल्या होत्या. एक भाऊशास्त्री लेले यांना, तर दुसरी नारायणशास्त्री मराठेंना. लेले प्रथम टिळक समर्थक; पण नंतर त्यांनी 'गीतारहस्य'विरोधी लेखन केले.

'गीतारहस्य' पारंपरिक निवृत्तिवादविरोधी कर्मयोग सांगतो. माझे गुरू टिळक समर्थक होते. महात्मा फुले पारंपरिकताविरोधी होते. फुले नि टिळकांनी नैतिक असंतोष निर्माण केला. माणुसकीचा उदय या दोघांचा विचार होता. 'गीतारहस्य'मधून लोकमान्य टिळकांनी उच्च दर्जाचे नीतिशास्त्र सांगितले आहे. राज्यशास्त्र नीतिशास्त्राकडे पाहते. लोकमान्यांचे स्मरण करायचे ते त्यासाठी. आज त्यांच्या नावे स्थापन केलेल्या या ग्रंथसंग्रहालयात रेडिओ, दूरदर्शन संच, ग्रंथ अशी आधुनिक साधने आहेत. या शहराचे हे सांस्कृतिक आणि बौद्धिक स्थान आहे. आजचा काळ माहितीचा आहे. अधिकाधिक माहिती तितका माणूस संपन्न. इथे भविष्यकाळ घडविणारा माणूस दिसावा, निर्माण व्हावा अशी अपेक्षा आहे.

या भाषणातून तर्कतीर्थांनी लोकमान्यांचा कर्मवाद आणि नैतिकवाद विशद करून संस्थेमार्फत भविष्यकाळात तसा माणूस घडवावा, असे केलेले आवाहन कालोचित म्हणावे लागेल. तर्कतीर्थांचे लोकमान्य प्रेम अनेक भाषणे, लेख नि मुलाखतींतून स्पष्ट होते.

**६१) संभवामि युगे युगे** (काळ अप्राप्त)

पुणे आकाशवाणी केंद्रावरून प्रक्षेपित झालेले हे भाषण 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड पहिला)'मधून इथे उद्धृत करण्यात आले आहे. 'संभवामि युगेयुगे' व्याख्यान भारतीय धर्मसाहित्यातील अवतार कल्पनेचे विवेचन करते. यातील तर्कतीर्थांच्या विचारानुसार हिंदू धर्मातील अवतार कल्पना सुमारे अडीच हजार वर्षांतील आहे. जेव्हा धर्माला ग्लानी येते, अधर्म बोकाळतो तेव्हा साधूंच्या रक्षणासाठी आणि दुष्टांच्या निर्दलनासाठी भगवंत अवतार घेतो. युगानुयुगे असा अवतार ईश्वर घेत आला आहे. पुराणातील युग कल्पना भिन्न कालदर्शक आहे. तर्कतीर्थांची तर्काने आणि चिंतनाने या भाषणात स्पष्ट केले आहे की, धर्मस्थापनेपासून ते धर्मग्लानीपर्यंतचा काळ म्हणजे युग होय (Time Unit). यापूर्वी अनेक अवतार झालेत नि भविष्यातही असा अवतारांचा प्रादुर्भाव होत राहणार आहे. हे भाषण एका अर्थाने सृष्टीतील क्रम, विचार, प्रस्थापना, विध्वंस, पुनर्मांडणीचा विचार सांगते असे वाटत राहते. कार्ल मार्क्सने हेच सांगितले जे पुराणांनी सांगितले होते. भावार्थ असा की, वैश्विक विचार शाश्वत असतो, कालौघात तपशील बदलतात इतकेच.

हिंदू धर्मशास्त्रात वा साहित्यात दशावतार सांगितले गेले आहेत. मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, दशरथी राम, कृष्णवासुदेव, बुद्ध, कल्की पैकी मूळ वेदात चार अवतार आहेत. वेद विस्तरात अवतार विस्तार होत गेला आहे. अवताराची मूळ कल्पना

विष्णूच्या वासुदेवभक्ती संप्रदायापासून सुरू होते, ती बुद्धापर्यंत विस्तारित होत जाताना धर्मशास्त्र इतिहासात दिसून येते. बुद्धाने यज्ञविरोध केला तो यज्ञातील पशुबळी, हिंसेमुळे. श्रीमद्भागवतात अवतार संख्या विस्तारत बावीस झालेली दिसते. ख्रिस्त आणि महंमद २ हजार वर्षांपूर्वी भारतात जन्मले असते, तर त्यांचा समावेशही अवतारांमध्ये झाला असता. चोवीस तीर्थंकरांपैकी पहिले तीर्थंकर ऋषभदेव या अवतार शृंखलेतीलच एक सारांशत: जे जे ईश्वर ते ते अवतार. ते युगानुयुगे येत राहतात, ते हे विश्व अधिक चांगलं व्हावं म्हणून.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा पैस नेहमी प्राचीनातील शाश्वताचा आणि चिरंतनतेचा शोध असतो, अशी माझी धारणा बनत चालली आहे. ती त्यांच्या समग्र लेखन, चिंतनाची फलश्रुती म्हणून सांगता येते.

**६२) महाभारतातील धर्मशास्त्र, प्रवृत्तिमार्ग, समाजकारण आणि व्यवहार नीती** (काळ अप्राप्त)

हे व्याख्यान पुणे आकाशवाणीवरून प्रक्षेपित झाले होते. ते 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड पहिला)'मधून इथे संग्रहित करण्यात आले आहे. भाषणाचा विषय 'महाभारत' आहे. तर्कतीर्थांनी 'महाभारत' काव्याच्या चार पक्षांवर या भाषणात आपले विचार व्यक्त केले आहेत.- १) धर्मशास्त्र, २) प्रवृत्तिमार्ग, ३) समाजकारण, ४) व्यवहारनीती.

'महाभारत' प्रामुख्याने भरतकुलाचा आणि विशेषत्वाने कौरव-पांडवांचा इतिहास आहे. राजधर्म या काव्याचा केंद्रीय विषय आहे. धर्मरक्षणाद्वारे प्रजापालन हा राजधर्म इथे वर्णिला गेला आहे, त्यामुळे यात धर्मशास्त्राची विस्ताराने चर्चा झालेली आहे. 'मनुस्मृती' इत्यादी ग्रंथ वा स्मृती धर्मशास्त्रांचे विवेचन करतात. यात १६ संस्कारांचे वर्णन आहे. इथे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा चातुर्वर्ण्याचा ऊहापोह आहे. पुराणांचे धर्मशास्त्रही 'महाभारत' मध्ये आहे. त्यानुसार व्रत, उपवास, दान, गोदान, गोमहिमा, शिवलिंगपूजा, विष्णुपूजा यांत तपशीलवार सांगितली गेली आहे. स्मृतिपुराणात धर्मशास्त्राची तात्विक आणि ऐतिहासिक चर्चा नाही; पण 'महाभारत'मध्ये ती आढळते. यात धर्मविषयक प्रमाणमीमांसा आहे. आचार, द्रोह, पाप-पुण्य, संत, सत्य, सेवा, कर्तव्य, लोकसंग्रह यात समजाविला आहे. लोकसंग्रहाची चर्चा आहे. धर्माचे स्वरूप विवेचन यात आहे. त्यानुसार समाजधारणा म्हणजे धर्म. स्वत:स आणि इतरांना समान लेखण्याची जी आत्मौपम्य दृष्टी आहे, तिचे समर्थन यात आहे. यात गुणधर्म चर्चा आहे. धर्मशास्त्र इतिहास 'महाभारत' आहे. तो स्मृतिपुराणात दिसत नाही, म्हणून हा ग्रंथ हिंदू धर्मेतिहासाचे साधन म्हणून पाहता येतो. यात विवाहधर्माचाही इतिहास आढळतो. मद्यपान संहिता यात आहे. यात कालनिहाय बदल होत गेल्याने 'महाभारत'मध्ये बदलत्या काळाचे चित्रण धर्म इतिहास म्हणून येते.

दुसरे म्हणजे 'महाभारत'मध्ये प्रवृत्तिमार्ग सांगितला गेला आहे. निवृत्ती समजून घेतल्याशिवाय प्रवृत्ती कळत नाही. जीवनाचे जे चार आश्रम आहेत, ब्रह्मचर्य, गृहस्थ,

वानप्रस्थ आणि संन्यस्तपैकी प्रथम दोन प्रवृत्तीदर्शक, तर उर्वरित दोन निवृत्तीपरक आहेत. शंकराचार्यांनी प्रतिपादिलेला निवृत्तीचा मार्ग 'महाभारत' सांगत नाही. कारण, त्यांचा आधार 'श्रीमद्भगवतगीता' आहे. ज्ञाननिष्ठा, कर्मनिष्ठा, योगनिष्ठा या प्रवृत्तिसूचक आहेत. प्रवृत्तीच्या बद्धावस्था, मुमुक्षू, कुवतावस्था आणि चौथी परमावधी म्हणजे स्थितप्रज्ञावस्था. ती ज्यास प्राप्त होते, तो सत्पुरुष सांगितला गेला आहे.

तिसरी गोष्ट, समाजकारणाची. 'महाभारत' समाजविचार करणारे महाकाव्य आहे. यात चार जीवनाश्रम चर्चा येते. चार आश्रमांबरोबर (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यस्त) इथे चातुर्वर्ण्य व्यवस्थेचीही चर्चा येते. इथे तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, आज जातिव्यवस्थेवर समाजसुधारक जे आक्षेप घेतात, ते २००० वर्षांपूर्वीही घेतले जात होते. खरी जात 'मनुष्यत्व' हे 'महाभारत'मध्ये स्पष्ट होते.

या भाषणात शेवटी तर्कतीर्थांनी व्यवहारनीतीविषयी 'महाभारत' काय सांगते हे स्पष्ट केले आहे. त्यानुसार अध्यात्मवादी नीतिशास्त्र आणि नैतिक आदर्श मनुष्याने आपल्या जीवनात कसा उतरवावा, याचे मार्गदर्शन 'महाभारत' करते. अभय, अंत:करण शुद्धी, तत्त्वज्ञान, दान, दमन, यज्ञ, अध्ययन, तप, ऋतुजा, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, निंदावर्जन, प्राणिमात्रावर दया (भूतदया), अलोलुपता (अलोभ), मार्दव, लज्जा, अचांचल्या, तेजस्विता, क्षमा, धैर्य, शुचिता, अद्वैष, नम्रता इ. गुणसंचय यात दैवी संपत्ती मानली गेली आहे. ती नैतिकतेचे अंग होय. इथे पंडित आणि मूर्ख चर्चा आहे. ती विदूरनीतीचा भाग आहे. 'दासबोध'मधील अशा चर्चेचा आधार ही विदुरनीतीच आहे. यात बाहुबल, धनबल, कुलीनता, प्रज्ञा आणि अमात्यबल विवेचन आहे. त्याच्या विधिनिषेधाची चर्चा आहे. 'महाभारत' सत्य आणि अहिंसेस शाश्वत मूल्य मानते. नीतितत्त्वांना मुरड न घालण्याचा उपदेश यात आहे. संपत्ती व इंद्रिय सुखार्थ नीतीपतन निषेधार्ह मानले गेले आहे, त्यामुळे जीवन पापमय होण्याचा इशारा 'महाभारत' देते. तारतम्य, विचार, निर्णय यांचे महत्त्व यात सांगितले गेले आहे. विवेकाने तत्त्वाचे संदर्भ बदलतात, हे लक्षात घेऊन जीवन जगण्याचे मार्गदर्शन म्हणजे 'महाभारत' होय. नैतिक, अनैतिकतेच्या सापेक्षतेची 'महाभारत'मधील चर्चा म्हणजे कर्तुम-अकर्तुम विवेक होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हे भाषण म्हणजे 'महाभारत मीमांसा' होय. त्याहीपेक्षा साहित्य आणि जीवन संबंधाने यात अनुबंध मांडला गेला आहे, तो अधिक महत्त्वाचा. धर्म म्हणजे कर्मकांड नसून, सद्सद्विवेकी जीवनपद्धती होय, ही या भाषणाची खरी शिकवण होय.

**६३) भारत : राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया (पूर्वार्ध-उत्तरार्ध)** (१ फेब्रुवारी, १९८३)

केशवराव गोरे स्मारक ट्रस्ट, मुंबई ही समाजवादी, धर्मनिरपेक्ष संस्था असून, ती स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांच्या आधारे समाजप्रबोधनाद्वारे समाजवादी, धर्मनिरपेक्ष,

लोकशाहीधिष्ठित भारत घडविण्यास प्रतिबद्ध आहे. या संस्थेमार्फत वेळोवेळी समाज प्रबोधनार्थ व्याख्याने योजून प्रकाशित केली जातात. या उपक्रमांतर्गत संस्थेने १ आणि २ फेब्रुवारी, १९८३ या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या दोन व्याख्यानांची शृंखला 'भारत : राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया' या विषयावर योजून ते प्रकाशित केले होते. तेव्हा साथी विनायकराव कुलकर्णी ट्रस्टचे कामकाज पहात होते. संपूर्ण क्रांतीने देशात झालेल्या दुसऱ्या लोकशाही स्वातंत्र्यलढ्यात लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली डाव्या आणि पुरोगामी विचाराने प्रेरित होऊन आणीबाणीविरोधात एकवटलेल्या संस्था, संघटना, पक्षांच्या एकजुटीतून जनता पक्ष देशात सर्वत्र सत्तेवर अधिकाररूढ झाला. सन १९७५-७७च्या आणीबाणीविरोधात सत्तेवर आलेल्या जनता पक्षाने सन १९७७ ते १९८० या काळात भारत सरकारचे नेतृत्व केले; पण आंतरिक वैचारिक विरोधामुळे जनता पक्ष विभाजित होऊन सन १९८०च्या सार्वत्रिक निवडणुकीत परत इंदिरा गांधी काँग्रेस केंद्रीय सत्तेवर आली. ही सर्व पार्श्वभूमी या विषयनिवडीमागे असल्याचे लक्षात घेतल्याशिवाय या विषयाचे महत्त्व अधोरेखित होणार नाही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी आपल्या दोन भाषणांतून विषयाचा पूर्वपक्ष आणि उत्तर पक्ष मांडला. या भाषणाच्या प्रकाशित पुस्तिकेत स्वतंत्र भाषणे देण्यात आली असली, तरी येथे त्यांचा एकत्र परामर्ष घेण्यात आला आहे. तर्कतीर्थांनी आपल्या या मांडणीत स्पष्ट केले आहे की, एक भाषा, एक धर्म, एक सलग भूभाग अगर समान मूल्याधारित विचारसरणी यांच्या आधारांवर सार्वभौम राष्ट्रनिर्मिती होऊ शकते, ही धारणा युरोपीयन राष्ट्रांच्या संदर्भात खरी असली, तरी ती भारताला लागू होत नाही. कारण, भारताच्या राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेच्या आणि उभारणीच्या वाटचालीत सर्वधर्म समन्वय, इहवादी समाजपरिवर्तन, मूलभूत मानवी हक्क, सामाजिक न्याय, आर्थिक समता, मतस्वातंत्र्य या घटकांचा विचार आणि प्रभाव आहे, हे विसरून चालणार नाही, त्यामुळे या विषयाचा ऊहापोहही याच मुद्द्यांवर केल्याशिवाय हा विषय स्पष्ट होणार नाही.

आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, भारताचा राष्ट्रवाद हा लोकशाही अधिष्ठित असल्याने त्याला हिंदू राष्ट्रवादाची संज्ञा देता येत नाही. इथे एकतर धर्मनिरपेक्ष इहवादी राष्ट्रवाद तरी मान्य केला पाहिजे किंवा हिंदू समाजाची दृढ एकता तरी विसरली पाहिजे; पण त्याअगोदर राष्ट्रवाद संकल्पना आणि तिचा जागतिक इतिहास डोळ्यांखालून घातला पाहिजे. तो करीत असताना लक्षात येणारी बाब ही आहे की, भारताचा राष्ट्रवाद हा विश्वमानवतावादाशी संवादी स्वरूपात निर्माण झाला आहे. भारताबाहेरच्या मुसलमान समाजाला जागतिक मानव समाज परिवारात समरस होण्याला त्यांचा धर्मनिष्ठ राष्ट्रवाद हा मोठा अडथळा आहे.

भारतात राज्यघटनेने सन १९५० ला १४ प्रादेशिक भाषांना (आता ती संख्या २२ झाली आहे.)

राजभाषा म्हणून ८व्या परिशिष्टानुसार मान्यता दिली असून, येथील राज्यरचना स्वातंत्र्यानंतर भाषावर प्रांतरचना तत्त्वावर आधारित आहे. त्यामुळे इथे राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणापेक्षा विकेंद्रीकरणामुळेच प्रादेशिक राज्यांचे आणि केंद्र राज्यांचे सामर्थ्य वाढू शकेल. नुकत्याच झालेल्या लोकशाही रक्षक संपूर्ण क्रांती आणि जनता पक्ष फुटीनंतर परत इंदिरा काँग्रेसचे सत्तेवर येणे या घटनांतून जनता सार्वभौम असल्याचे रेखांकित झाले आहे. परंतु, लोकशाही राज्यपद्धतीला आवश्यक असलेला लोकशाही जीवनपद्धतीचा सामाजिक पाया निर्माण होतो आहे का, याचा विचार होणे आवश्यक नसून अनिवार्य आहे, तसेच राष्ट्र म्हणून भारताच्या नियोजनात दैन्यात जगणारे जनतेचे मोठे स्तर, शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, हस्तव्यवसायी, हरिजन, गिरिजन, आदिवासी, भटके-विमुक्त यांच्याकरिता डोळयांत भरण्यासारखे नियोजन आणि विकासात प्रतिबिंब दिसते का? हेही पाहणे तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळेही संसदीय लोकशाही आणि परंपरागत समाजरचना यांच्यातील अंतर्विरोध या राजकीय लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. इथे व्यक्तिकेंद्रित मानसिकता आहे. विशिष्ट व्यक्तीच्या अभावी ही टिकून राहण्याची हमी प्रत्यक्ष पक्ष वा सामाजिक संघटनेच्या गाभ्यात असणे तितकेच गरजेचे आहे. प्रांतिक स्वायत्ततेतून विभक्त होण्याची वृत्ती वाढण्याचा धोका आज नाही. हा धोका केंद्रपरावलंबित्व वाढीस लागल्यास वाढू शकेल.

तर्कतीर्थांचे हे विवेचन त्यांच्या राजकीय चिंतनाचे प्रकटीकरण आहे. त्यात तटस्थ निरीक्षण आणि विश्लेषण आहे. इतिहास अभ्यासाची त्यास पार्श्वभूमी आहे आणि भविष्यवेधाची प्रज्ञाही त्यामागे आहे. देशहिताच्या भावनेतून झालेले हे विचारमंथन पथदर्शक आहे.

**64) भारतीय संस्कृति और राष्ट्रीयता का निर्माण** (3 March 1983)

भारतीय संस्कृती संसद, कलकत्ताद्वारा 'राष्ट्रीय संस्कृती'वर आधारित द्विखंडात्मक ग्रंथाची निर्मिती केली होती. त्याचा प्रकाशन समारंभ ३ मार्च, १९८३ रोजी कलकत्ता येथे संपन्न झाला. त्या समारंभाचे अध्यक्षस्थान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भूषविले होते. त्या समारंभाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण प्रारंभिक आणि शेवटचे प्रासंगिक परिच्छेद वगळता केशवराव गोरे ट्रस्टमध्ये केलेलेच भाषण होय. फक्त कलकत्ता इथे ते हिंदी भाषांतरित करून सादर करण्यात आले होते. हे दोन्ही भाषणे ताडून पाहता सहज लक्षात येण्यासारखे आहे, यामुळे त्याची पुन:चर्चा म्हणजे द्विरुक्ती ठरेल.

**६५) धार्मिक पुनरुजीवन व त्याचे परिणाम (१९८४)**

टाऊन हॉल, हिराबाग, पुणेची शताब्दी सन १९८४ साली साजरी झाली. या वर्षीच्या वर्धापन दिनी (शंभरावा वाढदिवस!) दि २८ जून, १९८४ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'धार्मिक पुनरुजीवन व त्याचे परिणाम' या विषयावर व्याख्यान झाले. त्यात विचार व्यक्त करत त्यांनी समजावले आहे की, धर्म हे समाज संघटन करणारे तत्त्व आहे. सर्व धर्मांच्या इतिहासात ते पहाता येते. त्याच्या दोन पद्धती आहेत. एक भिन्न धर्माचा बिमोड करून भिन्न भिन्न धार्मिक

प्रथांच्या समाज गटांना एकत्र करण्याचा यशस्वी प्रयत्न करणारे धर्म. दुसरी पद्धत म्हणजे खालच्या अवस्थेत असलेल्या समाज गटांना वरच्या समाज समूहात समाविष्ट करून त्यांना उन्नत जीवन जगण्याचे आश्वासन देणारे धर्म. इतिहासात ख्रिश्चन आणि इस्लाम धर्म विश्वधर्म होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगत रखडत, झगडत राहिले, युद्ध करत राहिले. धार्मिक पुनरुज्जीवनवादी विचार मूलतत्त्ववादी (फंडामेंटालिझम) विचार होय. इतिहासात पुनरुज्जीवनवाद दिसतो, तसाच नवजीवन वादही दिसून येतो. नवजीवनवादामध्ये धर्मसुधारक परंपरागत धर्मस्वरूपात मूलभूत परिवर्तन घडवून आणू इच्छित असतात. हिंदुधर्मातल एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राजा राममोहन रॉय, माहत्मा जोतिबा फुले, महात्मा गांधी, रामकृष्ण परमहंस प्रभृतींनी हे कार्य केले. तिकडे युरोपात रुसो, गटेसारखे विचारक नवमतवाद समर्थक दिसून येतात. पाकिस्तान, बांगला देशांसारख्या राष्ट्रांमध्ये पुनरुज्जीवनवादी विचारसमर्थक अवतरले. त्यातून धर्मगर्व प्रमाण मानणारा समाज गट उदयास आला. आपल्याकडे पंजाबमध्ये अलीकडच्या काळात निर्माण झालेली खालीस्तानवादी चळवळ पुनरुज्जीवनवादाचेच अपत्य होय. मुस्लीम समाजातील धर्मगर्व मानणाऱ्या विचारांनी नवमातवादी सुधारणा व सुधारकांना नाकारले. न्यायमूर्ती ए.ए.ए. फैजी, एम्.आर. बेग, हमीद दलवाई यासंदर्भातील प्रमुख नेते होत, की ज्यांना पुनरुज्जीवनवादी, परंपरावादी समाजगटाने नाकारले. भारतात विश्वहिंदू परिषद, हिंदु एकता, इ. गट हिंदू राष्ट्रवादाचे समर्थक म्हणून पुढे आलेत. त्यांचा राष्ट्रवाद पुनरुज्जीवनवादच होय. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा विचारांची समर्थक संघटना होय. अलीकडच्या काळात भारतात राहणारे सर्व हिंदू असा उदारमतवादी विचारही दिसून येतो. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातून निर्माण झालेल्या राष्ट्रीय एकात्मतवादी विचारांचे काय होणार हा खरा चिंता नि चिंतनाचा प्रश्न व्हायला हवा. हिंदू-मुस्लिम द्वैत शमायला हवे.

**६६) बौद्ध धर्म आणि भारतीय संस्कृती** (१८ फेब्रुवारी, १९८७)

केंद्रीय उच्च तिब्बती शिक्षा संस्थान, सारनाथ, जि. बनारस, उत्तर प्रदेश ही भारत सरकारद्वारा स्थापित संस्था. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाला नेहरू यांनी दलाई लामा यांच्या विनंतीवरून ही संस्था सुरू केली. या संस्थेचा उद्देश भारतात आलेल्या तिबेटी निर्वासित विद्यार्थ्यांना त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि परंपरेचे उच्च शिक्षण देणे हा आहे. आता या संस्थेस केंद्र सरकारने अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला आहे. या संस्थेमार्फत सन १९८४ पासून प्रतिवर्षी 'लाल मणी जोशी स्मृतिव्याख्यानमाला'चे आयोजन होत असते. त्यात राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांना व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात येत असते. सन १९८६ची तृतीय व्याख्यानमाला १८ फेब्रुवारी, १९८७ रोजी सारनाथ येथे संपन्न झाली. मूळ हिंदी भाषणाचे मराठी भाषांतर 'नवभारत' मासिकाच्या मे-जून, १९८८च्या जोडअंकात प्रसिद्ध झाले होते.

भारतीय संस्कृतीत हिंदू, बौद्ध, जैन इ. धर्म अंतर्भूत आहेत. या धर्मांचा परस्परपूरक संबंध आहे. त्यांचे साहित्यही तसेच आहे. भारतीय संस्कृतीतील विविध दर्शने यातही अंत:संबंध

शोधणे शक्य आहे. हिंदू धर्मातील असहमत तत्त्व नि आचारांचा निरास व्हावा म्हणून बौद्ध धर्म, जैन धर्म उदयाला आले; पण त्यांचा मूळ पाया, तत्त्वज्ञान एकच आहे. कारण, ते शाश्वत होते आणि आहे. कर्मावरून वर्णनिश्चय करता येतो, जन्माने नाही, हे भगवद्गीतेने सुचविले आहे. भारतीय चार आश्रमांपैकी संन्यास म्हणजे बौद्ध धर्मातील परिव्रजा. अशी अनेक साम्यस्थळे दाखविता येतात. त्यांची चर्चा म्हणजे हे विस्तृत भाषण होय. ते तर्कतीर्थांनी सोदाहरण सादर केले होते. भारतीय संस्कृतीतील उच्च मूल्ये आणि बुद्धाने सांगितलेली चार आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग स्थूल रूपांनी एकच आहेच. उच्च नीतिशास्त्र हे सर्व धर्मांनी अंगिकारलेले एकच एक नीतिशास्त्र होय. कारण, ते वैश्विक आहे. सर्वांचा मूलाधार विवेक आहे. तपशील भिन्न आहेत हे खरे. भारतीय वैदिक दर्शनांचा दोन हजार वर्षांचा इतिहास संघर्षाचा आहे. तो संघर्ष वैदिक आणि बौद्ध दर्शनातीलच आहे. पुढे त्यात जैन दर्शनाचे अनेकांत वादाचे योगदान मिळाले आहे. तर्कतीर्थ ही मांडणी इतिहास, वाङ्मय, दर्शन, कला इ. माध्यमांतून करतात. त्यातून त्यांचा सर्वधर्म, संस्कृती, दर्शने यांचा व्यासंग लक्षात येतो.

**६७) बुद्धिप्रामाण्यवादी चळवळ निर्माण करण्याचे कर्तव्य** (जानेवारी, १९८८)

वेरळा विकास प्रकल्प, सांगली निर्मित 'डॉ. वि. कृ. गोकाक भवन' नामकरण समारंभ १६ जानेवारी, १९८८ रोजी सांगली येथे संपन्न झाला. त्याचे प्रमुख पाहुणे होते, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. या समारंभातील हे भाषण माझे स्नेही कै. प्रा. अरुण चव्हाण यांनी आस्थेने उपलब्ध करून दिले. ते दै. 'राष्ट्रशक्ती', सांगलीच्या २० जानेवारी, १९८८च्या अंकात प्रसिद्ध झाले होते.

इतिहास हे सामाजिक शास्त्र आहे. ते मानवाचा ६००० वर्षांचा विकास विशद करते. पुराणातही ते आहे; पण समजुतीवर आधारित असल्याने त्यास इतिहास म्हणता येत नाही. समाज आणि देश पुढे जायचा तर वैचारिक परिवर्तन झाले पाहिजे; पण केवळ वैचारिक परिवर्तन पुरेसे नाही. आचार परिवर्तन त्यापेक्षा महत्त्वाचे. त्यावर भर हवा. गेल्या १५० वर्षांच्या परिवर्तनामुळे आपणास राजकीय स्वातंत्र्य मिळाले; पण आपण अजून अंधश्रद्धांमधून स्वतंत्र झालो नाही. विवेक आणि विज्ञानाधारित बुद्धिवादाच्या अंगिकारानेच ते शक्य आहे. वैज्ञानिक क्रांतीशिवाय समाजात मूलभूत परिवर्तन केवळ अशक्य. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले यांची विचारधारा पुढे न्यायला हवी. आज त्याला विरोध करणाऱ्या नव्या विचारधारा डोकेवर काढू पहात आहेत. त्यांचा विरोध केला पाहिजे. कारण, भाकड कथांवर समाजाची घडण होत नसते. होते ती केवळ नि केवळ बुद्धिवादाच्या आधारावर. या प्रकल्पाने ते कार्य करायला हवे. प्रबोधनाचे कार्य हे नेतृत्त्वाचे असते. मानवाचा भौतिक आणि आर्थिक विकास म्हणजे सर्वस्व नाही. वैचारिक नेतृत्त्व समाजाला देण्याची आज गरज आहे. विसाव्या शतकातील उच्च प्रेरणा जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. मानवी विकासाचा अंतिम हेतू अखिल मानवजातीच्या क्रांतीत

असला पाहिजे. विज्ञानाने मानव समाजास जवळ आणले आहे; पण अद्याप मानव जात विचाराने व आचाराने एक झालेली नाही आणि जवळही आलेली नाही. ते कार्य या संस्थेपुढचे आव्हान असायला हवे.

तर्कतीर्थांनी या भाषणातून केलेले आव्हान म्हणजे बुद्धिवादी, पुरोगामी समाजनिर्मितीची धडपड होय. स्वातंत्र्यलढ्यात ते सक्रिय होते. भारताचे त्यांचे स्वप्न असणे स्वाभाविक म्हणायला हवे.

**६८) उच्च शिक्षणाचे तत्त्वज्ञान** (२३ जानेवारी, १९८८)

'निबंधमाला' कार विष्णुशास्त्री चिपळूणकर हे 'शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे'च्या संस्थापकांपैकी एक. त्यांच्या 'निबंधमाला' मासिक स्थापनेचे १९७४ हे शताब्दी वर्ष. त्यानिमित्त मंडळाने सुरू केलेल्या 'विष्णुशास्त्री चिपळूणकर व्याख्यानमाले'चे सन १९८८ हे चौदावे वर्ष. यावर्षी या व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'उच्च शिक्षणाचे तत्त्वज्ञान' या विषयावर रामनारायण रुईया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई येथे पुष्प गुंफले. ते व्याख्यान या व्याख्यानमालेतील व्याख्यानसंग्रह 'सुभाषिते'मध्ये संग्रहित आहे. हा ग्रंथ २००५ मध्ये विजय तापस नि वर्षा माळवदे यांनी संपादिला आहे.

शैक्षणिक तत्त्वज्ञान हा मूळ तत्त्वज्ञानाचाच एक भाग आहे. मातृ, पितृ, आचार्य, अतिथी सर्वांना देवसदृश मानलेलं प्राचीन साहित्यात आढळतं. ज्ञान साध्यही आहे नि साधनही. 'थिंग्ज लिव्ह इन सोसायटी' म्हणणारा व्हाईटहेड समाज नि शिक्षणाचा अन्योन्याश्रित संबंध स्पष्ट करतो. शिक्षण, ज्ञान कळायचं तर भाषा हवी. त्याने संपर्क, संवाद होत मनुष्य समाजशील होतो. व्यक्तिस्वातंत्र्य असावे की नसावे म्हणणारी वेगवेगळी तत्त्वज्ञाने आहेत; पण शिक्षण माणसाला स्वतंत्र करतं, याबाबत दुमत नाही. शिक्षणाने माणसात विवेचन, विश्लेषण, चिकित्सासामर्थ्य येतं. शिक्षण ग्रहण करता येतं नि देताही. म्हणून शिक्षकास 'दिशिक' म्हटलं गेलंय. देणारा नि दिशा दाखविणारा यांचा परस्परपूरक अनुबंध हवा. एकांगी शिक्षणातून एकांगी माणूसच घडणार. शिक्षणातून ज्ञान मिळविण्याची ईर्ष्या, कल्पकता, निर्मितीची घडण झाली पाहिजे. 'एज्युकेटर्स टू बी एज्युकेटेड'मध्ये मोठा गर्भितार्थ भरलेला आहे. तो खरं तर 'एज्युकेट दाय मास्टर्स'चंच विकसित रूप होय. ज्ञान निरंतर विकासनशील असल्याने शिक्षक विकसनशील हवा, तर शिक्षण विकसित होणार.

हा विचार व्यक्त करीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी शिक्षणविषयक आधुनिक दृष्टिकोन व्यक्त केला आहे. 'Knowledge for knowledge sake'चा काळ गेला असून, 'Knowledge for Creation'चं युग अवतरलं आहे. ज्ञान जिज्ञासा, कल्पकता व निर्मिती असा गोफ गुंफला, तर ते जीवनदायिनी (Life Line) ठरणार!

**६९) धर्म आणि नीती** (२१ फेब्रुवारी, १९८८)

भानुभाई अध्वर्यु हे गुजरातमधील शिक्षक, पत्रकार. दैनिक जनसत्तामध्ये ते

‘दुनिया : जैसी हमने देखी’ स्तंभ लिहीत. त्यात ते वंचित, उपेक्षित, विस्थापितांबद्दल लिहीत. शेतकरी, श्रमजीवी वर्गाबद्दल त्यांना आस्था असे. गुजरातमधील सेंटर फॉर सोशल चेंज अँड ॲक्शन, अहमदाबाद; गुजरात शेती विकास परिषद, अहमदाबाद; श्रमजीवी समाज भिलोडासारख्या स्वयंसेवी संस्था मिळून त्यांच्या जीवन, कार्य, विचार जागरणार्थ व्याख्यानमाला चालवितात. ‘श्री भानुभाई अध्वर्यु स्मारक व्याख्यान श्रेणी’ नावाने प्रसिद्ध व्याख्यान शृंखलेत २१ फेब्रुवारी, १९८८ रोजी दुसरे पुष्प गुंफले होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी. व्याख्यानाचा विषय होता ‘धर्म और नीती’. मूळ हिंदी व्याख्यानाचे मराठी भाषांतर ‘नवभारत’ मासिकाच्या फेब्रुवारी, १९८८च्या अंकात प्रसिद्ध झाले होते.

‘धर्म आणि नीती’ संबंध विशद करीत तर्कतीर्थ म्हणतात, धर्म नाही असा समाज जगात नाही, त्यामुळे धर्माच्या आधारेच जगातील समाज विभागला गेला आहे. राष्ट्रवाद आणि धर्मसंस्थांचा प्रभाव या समाजांवर दिसून येतो. आधुनिक वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान क्रांतीमुळे हे विभाजित समाज आज एकत्र आले आहेत. आज धर्मनिरपेक्ष जग घडते आहे. ते इहवादी आहे नि मानव हक्क समर्थकही. उच्च नैतिक मूल्य प्रस्थापित होण्याचा आज प्रभावी काळ आहे. धर्म उपकारक आहे तसा उपकारकही. त्याचे हे स्वरूप लौकिक, अलौकिकवर आधारित आहे. धर्म कर्मकांडी आहे नि आत्मिकही. धर्म जीवाचे अमरत्व, मृत्यूनंतरचे जीवन आणि ईश्वर-मनुष्य संबंधांची चर्चा करतात. आजची विज्ञाने धर्मप्रभावांचा अभ्यास करीत आहेत. मनावर होणारा धर्मप्रभाव शोधू पाहतात. फ्राइडच्या मतानुसार, धर्म भावनाग्रस्त मनाच्या विकृतीतून निर्माण झाला आहे. धर्मग्रंथाधारित नसलेला व्यापक, मानवी प्रेमाधारित धर्मकल्पना शक्य आहे. आज मानव एकता आणि समता निर्माण करणाऱ्या नीतिधर्माची खरी आवश्यकता आहे.

धर्म म्हणजे ईश्वरपूजा, कर्मकांड, स्वर्गप्राप्ती, मोक्ष, पाप-पुण्य यांची चर्चा. सर्व धर्मांच्या या प्रचलित रूपापलीकडे नव्या विवेकाधारित, ऐहिक, कर्मकांडमुक्त, नैतिक आचरणावर भर देणाऱ्या समता आणि एकतेच्या धर्माची तर्कतीर्थांची कल्पना आदर्श म्हणून अनुकरणीय ठरते. प्रश्न आहे प्रगल्भ समाज असण्याचा. तो निर्माण करणे हे आपल्यापुढचे खरे आव्हान आहे.

**७०) वैश्विक जाणिवेवर आधारलेली संस्कृती हवी** (२३ मार्च, १९८९)

सन १९८९ मध्ये साहित्य अकादमी, नवी दिल्लीच्या वतीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना ‘महद्त्तर सदस्यत्व (फेलोशिप)’ बहाल करण्यात आले. त्यानिमित्त महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे यांच्यातर्फे बाबा आढाव यांनी २३ मार्च, १९८९ रोजी सत्कार समारंभ योजला होता. त्या सत्कारास उत्तर म्हणून दिलेले हे भाषण रा. ना. चव्हाण यांच्या ‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: परंपरा, प्रबोधन आणि परिवर्तन’या ग्रंथात समाविष्ट आहे.

त्याचे संपादन रमेश चव्हाण यांनी केले आहे. (जुलै, २०१०). ते मुळात महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणेचे मुखपत्र असलेल्या 'पुरोगामी सत्यशोधक' षण्मासिकाच्या जानेवारी-जून, १९९८च्या अंकात प्रसिद्ध झाले होते.

या भाषणात तर्कतीर्थ सांगतात की, माझ्या आयुष्यात मी साम्यवादी झालो ही क्रांती आहे. हा विचार मी स्वीकारला खरा; पण वारंवार मी तो तपासत राहिलो. माणूस मुळात श्रद्धाळू आहे. श्रद्धा तीन प्रकारची असते. राजस, तामस आणि सात्विक. जगामध्ये धर्मात अंधश्रद्धांचे प्राबल्य आहे. शब्दप्रमाण, ग्रंथप्रमाण धर्मापेक्षा विवेकप्रमाण धर्म श्रेष्ठ होय. आज धर्मात मूलतत्त्ववाद बोकाळला आहे. आपल्या देशाला महात्मा गांधींसारखा वेगळे राजकीय दर्शन देणारा नेता मिळाला, त्यामुळे आपण अहंकारमुक्त झालो. आज विज्ञान प्रभाव, प्रचार, प्रसार आहे. 'Let Newton be, and it was all light.' जग अंधारलं असताना प्रकाश पाडणं विज्ञान कार्य. आधुनिक ज्ञानाने नवे जग, संस्कृती निर्माण होते. आजचा माणूस न हिंदू, न मुसलमान, तो वैश्विक मानव झाला आहे. म्हणून वैश्विक धर्म, संस्कृती, समाज साकारेल, अशी अशा करता येते. त्यासाठी मानवी ऐक्याची गरज आहे. त्यासाठी जातिधर्मांचे भेद गाडले पाहिजेत. ते केवळ वैचारिक आणि वरवरचे नको. कृती हवी. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना माझ्या या जातनिरपेक्ष जीवनाचे आश्चर्य वाटले नि ते सर्वत्र तो जीवन व्यवहार सांगत सुटले, हे आपण करू शकतो.

या भाषणातून तर्कतीर्थ कर्ते सुधारक होते, तसेच पुरोगामी विचारक होते, हे सिद्ध होते. 'इष्ट असेल तेच बोलणार व साध्य असेल तेच करणार' हा आगरकरी बाणा तर्कतीर्थांनी बाणला होता नि जपलाही! तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची भाषणे म्हणजे नवा आचारधर्म असतो.

**७१) सर्वधर्म समभावाची गरज (१९९४)**

प्राज्ञपाठशाळा, वाईच्या अमृत महोत्सवाचा शुभारंभ समारंभ वाई येथे दि. २५ जानेवारी, १९९४ रोजी संपन्न झाला. सदर समारंभाचे प्रमुख पाहुणे तत्कालीन मुख्यमंत्री नामदार शरच्चंद्रजी पवार होते तर समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले होते माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी. या प्रसंगाच्या अनुषंगाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वाईत प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या वतीने 'सर्वधर्मसमभाव अध्ययन केंद्र' सुरू करण्याचा संकल्प सोडला होता. त्यावेळचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रस्तुत भाषण वर्तमानकाळात 'सर्वधर्मसमभावाची गरज' अधोरेखित करणारे होते. त्यात ते म्हणतात, प्राज्ञपाठशाळा वाई आज अमृत महोत्सव साजरा करत असली तरी मूलतः ती १०० वर्षापूर्वी स्वामी प्रज्ञानंदांनी वेदशाळा म्हणून सुरू केली होती. पुढे त्यांचे शिष्य नारायणशास्त्री मराठे उपाख्य स्वामी केवलानंद सरस्वती यांनी तिचे रूपांतर राष्ट्रीय शाळेत केले. त्यांनी 'धर्मकोश', 'मीमांसा कोश' संपादिला. त्यांचे अनेक खंड प्रकाशित केले. ते धर्मसुधारणावादी होते. कालानुरूप धर्म बदलायला हवा. रितीरिवाज आणि रूढी, परंपरा बदलल्या त्या तरच समाज पुरोगामी होणार, याबद्दल त्यांची खात्री होती. भारतात अनेक धर्म

असल्याने येथील समाज गुण्यागोविंदाने नांदायचा तर सर्वधर्मसमभावाची आवश्यकता आहे. त्यासाठी सर्वधर्मसमभाव अध्ययन केंद्र स्थापले जावयाचे आहे. त्याद्वारे राष्ट्रीय एकात्मता व धर्मसुधारणा कार्य हाती घेतले जाईल. ती आता काळाची गरज बनली आहे.

**अन्य भाषणे** (७२ ते ८१)

वरील चर्चित भाषणांशिवाय या भाषण खंडात अन्य अशी १० संक्षिप्त भाषणवृत्ते संग्रहित आहेत. ती विविध समारंभांमधून दिली गेली आहेत. ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या आयुष्यातील नव्वदीनंतरची भाषणे होत. त्यांचे विषय 'वैश्विक जाणिवेवरील संस्कृती', 'मानवतावादी समाजनिर्मिती', 'वर्णाधारित उच्चनीचतेस आव्हान', 'स्त्री सन्मान', 'मंदिर-मशीद प्रश्न', 'राष्ट्रीय एकात्मता', 'उच्च मूल्यांची गरज' असे मूल्याधारित आहेत. तर्कतीर्थ थकलेले आहेत. वृद्धावस्था, आरोग्य इ.मुळे पूर्वीचा झंझावती संचार मंदावला आहे. सावल्या लांब पडताहेत, याची जाणीव या सर्व विषयांच्या विवेचन, विस्तारात प्रकर्षाने जाणवते. पूर्वीची अधिकांश भाषणे तर्काधारित, बुद्धिवादी, विस्तृत असत. ती आता संक्षिप्त, आध्यात्मिकस्पर्शी झालेली दिसून येतात. 'नेत्र लागले पैलतिरी' असे संकेत देणारी भाषणे चिकित्सा न करता उपदेश शैलीची जवळीक साधणारी झालेली दिसतात. अधिकांश समारंभ हे उत्सवी असल्याने या भाषणांना औपचारिकता आलेली दिसते. चर्चासत्रे, परिसंवादातील वा परिषदांतील भाषणांचा बाज नाही तरी उपजत बुद्धिवादी असतो. 'बौद्धिक' असं त्याचं रूप असतं. 'बौद्धिक'ची जागा 'उपदेश' घेऊ लागला की ओळखावं, आयुष्याचा वानप्रस्थ संपून स्वारी संन्यास धारणकरती झाली आहे. मानवी आयुष्याची ही अवस्था स्थितप्रज्ञ होय. प्रज्ञा स्थिरावणे, अंतर्मुख होणे, समाजशीलता जाऊन एकांती समाधीप्रिय वाटू लागणे, हे बदल दिवा विझू विझू झाल्याच्या पाऊलखुणाच ना! त्या त्या भाषणांमध्ये अधिक गडद होत आहेत. याची जाणीव त्या भाषणांच्या उपलब्ध वृत्तांमध्ये आहेत. यांच्या लिखितसंहिता नाहीत. या भाषणांना 'Sermon on the mountain'चं आलेलं स्वरूप विश्वव्यापी खरंच! पण त्यास विचारगर्भतेचं वा नवनीताचं लाभलेलं रूपडं अधिक हृद्य नि लोभस!! त्यात धर्मतत्त्वज्ञान, शिक्षण, निष्कर्ष, प्रेरणा सारी ऊर्जा तत्त्वे सत्त्व म्हणून उभारून येतात. त्यांना धर्मतत्त्वांचं अमरत्व आपसूक येतं. अशी व्याख्यानं माणसानं वाचायची नि डोळे निपचित करत, अंतर्मुख होत श्वसन नियंत्रण करीत समाधी अनुभवायची. हेचि देही....हेचि डोळा!!

**उपर्युक्त भाषणांची मीमांसा**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९३० ते १९९४ अशा सहा दशकांहून अधिक काळात 'धर्म' विषय केंद्रभूत ठेवून जी पाच भाषणे नागपूर, पुणे, वाई येथे दिली ती विविध प्रसंगांच्या निमित्ताने. पण त्यांचे सूत्र पारंपरिक धर्मस्वरूप व पद्धतींची चर्चा, चिकित्सा करून धर्मसुधारणांचे समर्थन करत धर्मास मानवी प्रगतीतील धोंड बनवून न ठेवता ते मानवी समाज हितकारी असले पाहिजे यावर ते भर देताना दिसतात. तर्कतीर्थांचा वेद वाङ्मयाचा गाढा अभ्यास

असल्याने ते या भाषणांमधून धर्म अध्ययन पद्धती, धर्मस्वरूप इत्यादीची चर्चा सोदाहरण करतात. हिंदू धर्माच्या स्वरूपाची चर्चा त्यांचे लक्ष्य असले तरी ते हिंदू धर्मास पारंपारिक, स्वतःप्रमाण ठेवू इच्छित नाहीत. त्यांचे आकलन स्पष्ट आहे की जगातील सर्व धर्मात पुनरुज्जीवनवादी व नवमतवादी विचारधारांचा संघर्ष दिसून येतो. जे धर्म वा त्यांचे समान पुनरुज्जीवनवादी विचारांचे समर्थक राहतात, त्याच्यात धर्मगर्व मानणारा समाजवर्ग उदयाला येतो. तो अंतिमतः धर्मास मूलतत्त्ववादी (फंडामेंटलिझम) विचारधारेकडे नेतो. म्हणून धर्माचे सुधारणावादी रूपच मानवकल्याणी ठरते. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम, यहुदी इ. सर्व धर्मात साचलेपण येण्यातूनच नवे धर्म, पंथ निर्माण झाले आहेत, असे जागतिक धर्मशास्त्र इतिहासावरून स्पष्ट होते. धर्म विकल्प, समुच्चय वा समन्वय यात समन्वयी वृत्तीच हितकारक. म्हणून सर्वधर्मसमभाव हा गरजेचा आहे. यासाठी सर्व धर्मांचे अध्ययन झाल्यास आपला समाज धर्म संघर्षाकडून धर्मसमन्वयाकडे अग्रेसर होईल. त्यासाठी बुद्धिप्रामाण्यवृत्ती, विवेकवाद, अंधश्रद्धा निर्मूलन, धर्माप्रती पुरोगामी दृष्टिकोन अंगिकारणे आवश्यक नाही तर अनिवार्य ठरते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची या धर्मग्रंथसंग्रह खंडातील सर्व भाषणांची वैचारिक बैठक एकच आहे. ती विश्लेषणातून प्रागतिक निर्णयाकडे आपणास नेतात. धर्म शब्दप्रामाण्यात अडकून न राहता सुधारणावादी बनेल तरच तो कालसंगत राहील व यामुळेच धर्माद्वारे मानवकल्याण शक्य आहे.

### व्याख्यानव्रती : लक्ष्मणशास्त्री जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पहिल्या सार्वजनिक व्याख्यानाची नोंद आढळते ती सन १९२३-१९२४ ची. शेवटचे व्याख्यान मिळते १९९४चे. त्यांच्या व्याख्यानांचा कालखंड सुमारे सात दशकांचा. या काळात त्यांची अनेक व्याख्याने झाली असतील. परंतु, संहितेच्या रूपात उपलब्ध होणारी भाषणे शंभरहून अधिक आहेत. काही संक्षिप्त, कात्रणरूप आहेत; पण ज्यांना पूर्ण संहितारूप (लिखित/प्रकाशित) भाषणे म्हणता येतील अशी सुमारे ८१ भाषणे हाती आली. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पाच्या या संकलन, संपादन, प्रकाशन प्रकल्पात त्यांचाच विचार करण्यात आला आहे. पैकी त्यांचे जे सहा-सात भाषणसंग्रह प्रसिद्ध आहेत, त्यात ३६ वर भाषणे आहेत. असंकलित संहिता भाषणे ४३ च्या घरात आहेत. ही बहुतांश दीर्घ आणि सुनियोजित अशी भाषणे होत.

### विषयवैविध्य

या भाषणात विषयवैविध्य आहे. तर्कतीर्थांचा व्याख्यानपट हा अनेकविध शास्त्रांत त्यांची असलेली गती सिद्ध करणारा ठरतो. मानसशास्त्र, तर्कशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, गणितशास्त्र, विज्ञान (भौतिक, जीव, इ.) इ. शास्त्रांवर आधारित त्यांची भाषणे त्या शास्त्रांसंबंधी तर्कतीर्थांचा व्यासंग, अभ्यास, संशोधन, वाचन सिद्ध करणारी आहेत, शिवाय त्या शास्त्रांचा अन्य ज्ञान-विज्ञानाशी अन्वय जोडून ते करीत असलेले विवेचन वाचताना लक्षात येणारी गोष्ट अशी की, ते पुस्तक-पंडिती मांडणी न करता नेहमी स्वत:च्या

चिंतन, मननातून आलेले विचार व्यक्त करीत असल्याने त्यांची भाषणे नेहमीच विचारणीय वाटत आली आहेत.

तीच गोष्ट तत्त्वज्ञानाची. तर्कतीर्थ हे मूलत: धर्मशास्त्राचे अभ्यासक असल्याने वेद, उपनिषद, षड्दर्शने, न्यायमीमांसा इ.मध्ये त्यांना रस नि रूची होती. वाद-विवाद हा त्यांच्या आवड नि स्फूर्तीचा विषय. वादविवादात प्रारंभीच्या काळात हिरीरिने ते भाग घेत. द्वैतवाद, अद्वैतवाद, विशिष्टाद्वैतवाद, मायावाद, केवलाद्वैतवाद, बुद्धमत, जैनमत इ.सारख्या तत्त्वज्ञानावर जसे त्यांनी विपुल लेखन केले आहे, तसेच आपल्या अनेक भाषणांतून त्यांनी उपरोक्त वाद नि मतांची मांडणी करून त्यावर साक्षेपी विवेचन केल्याचे दिसून येते. हे जसे धर्म, अध्यात्मसंबंधी वा जीव-सृष्टी, आत्मा-परमात्माविषयक वादांच्या संदर्भात, तसेच तर्कतीर्थ राजकीय, समाजवैज्ञानिक वादातही अहमिकेने सहभागी होतात. भाषणांमध्ये मार्क्सवाद, गांधीवाद, रॉयवाद, नवमतवाद इ.वरील त्यांचे विवेचन त्यांना सनातन विचार प्रवाहांइतकेच आधुनिक विचारधारांचे आकर्षण आणि रस असल्याचे सूचित करतात. या राजकीय, सामाजिक विचारधारांसंदर्भात लक्षात घ्यायची गोष्ट अशी की, ते केवळ वाचावीर, चिंतक, बुद्धिवादी म्हणून याकडे पहात नाहीत, तर सक्रिय राजनीती, सामाजिक परिवर्तन इ.संदर्भात तर्कतीर्थांची भूमिका कर्त्या सुधारकाची राहिली आहे. यासंदर्भातील त्यांची भाषणे वादग्रस्तही झाली आहेत. अनेक प्रसंगात त्यांना मानहानी, मारहाण, अपमान सहन करावा लागला. तो सहन करीत तर्कतीर्थ त्या त्यावेळी आपल्या मतावर दृढ राहिले आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, मंडल आयोग इ. घटना यासंदर्भात उदाहरण म्हणून सांगता येतील.

साहित्य, काव्य, रससिद्धांत, समीक्षा, कवी, अभिजात साहित्याचे भाषांतर या विषयांवरील त्यांची व्याख्याने त्यांना बहुश्रुत ठरविणारी आहेत. संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी भाषांमध्ये त्यांनी केलेली भाषणे त्या भाषांवरील तर्कतीर्थांचे प्रभुत्व सिद्ध करणारी आहेत. महाराष्ट्राबाहेर बनारस, कलकत्ता, अहमदाबाद, हैदराबाद, नवी दिल्ली येथे जशी त्यांनी भाषणे दिली, तशी अमेरिका, रशियामध्येही. महात्मा गांधी, कार्लमार्क्स, बा. भ. बोरकर, प्रा. बा. सी. मर्ढेकर त्यांनी वाचला होता. तसाच टागोर, बर्टार्ड रसेल, रेनाँ, कोंम्त, फ्रान्सिस बेकन, रेन देकार्त, मॉरिस कोहेन, जॉन ड्युई इ. विचारकांचे त्यांचे वाचन व्याख्यानांना रंगत आणत. श्रोत्यांना निरंतर नवं ऐकविण्याचा ध्यास त्यांना चिरंजीव अभ्यासक, चिंतक, संशोधक बनण्यास उद्युक्त करीत रहायचा. ते केवळ संदर्भ देऊन थांबत नसत, तर उदाहरणे आणि उद्धरणांनी त्यांची भाषणे समृद्ध आहेत. त्यातही तुलनात्माक विवेचन करीत ते आपल्या भाषणांत आपले निष्कर्ष मांडत. म्हणून त्यांची भाषणे श्रोत्यांना मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरायची.

धर्म हा तर त्यांच्या आस्थेचाच विषय. हिंदू धर्म, वैदिक संस्कृती, सर्वधर्म समन्वय, बौद्ध धर्म, जैन धर्म, शिख धर्म यांवरील त्यांची व्याख्याने त्यांना 'व्याख्यानव्रती' ठरवून थांबत

नाहीत, तर ती त्यांना खऱ्या अर्थाने 'शास्त्री', 'पंडित', 'तर्कतीर्थ' उपाधी बहाल करतात. धर्मासंदर्भात 'चोदना लक्षण' असं पारंपरिक विवेचन एकीकडे अन् दुसरीकडे 'सर्वप्रकारची समीक्षा प्रथम धर्मसमीक्षेतून सुरू झाली' हे सांगायला, मांडायला ते विसरत नाहीत. सनातन धर्माबद्दल त्यांना आस्था जरूर आहे. ते ईश्वर मानत या अर्थाने ते आस्तिक. परंतु, त्यांचा धर्म कर्मकांडात अडकत नाही. 'बाबा वाक्यं प्रमाणम्'चे समर्थन करीत नाहीत. 'समाज धारयति धर्म:' अशी व्यापक दृष्टी ठेवत ते उदारवादी आणि पुरोगामी मांडणी करतात. इथेही हरिजनांना मंदिर खुले होणार म्हणून पौरोहित्य करणारे लक्ष्मणशास्त्री जोशी सुरटी सोमनाथ मंदिरची प्राणप्रतिष्ठा करून सनातनी ब्रह्मवृंदांचा बहिष्कार सहन करतात, तसेच महात्मा गांधींचे सर्वांत धाकटे चिरंजीव देवदासचा विवाह राजगोपालाचारींची कन्या लक्ष्मी यांच्या प्रतिलोम विवाहाचे पौरोहित्य करून आपले पुरोगामीपण सिद्ध करतात, त्यामुळे कर्मठ महात्मा गांधी प्रागतिक बनून प्रतिज्ञा करतात की, 'मी फक्त आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांनाच उपस्थित राहीन. त्याचे कठोर पालन आपले स्वीय्य सहायक, सचिन महादेवभाई देसाई यांच्या मुलाच्या लग्नास आत्मीय संबंध असूनही तत्त्व प्रमाण मानत अनुपस्थित राहतात. आश्रमातील विवाह आंतरजातीय, आंतरधर्मीय होतील असे प्रयत्न करतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महात्मा फुले, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांच्या 'गीतारहस्य'मधील कर्मयोग, शंकराचार्य, रामानुजाचार्य, कवी बा. भ. बोरकर, बालकवी, संत रामदास प्रभृतींवर भाषणे दिली. या भाषणांतून त्या व्यक्तीच्या जीवन, कार्य, विचारांची महती स्पष्ट करीत नवी मांडणी करतात. व्यक्ती आणि विचार यांचा अन्वय लावत तर्कतीर्थ त्या व्यक्तिमत्त्वातील कितीतरी नवे पैलू श्रोत्यांच्या निदर्शनास आणत. अगदी अभ्यासू, जिज्ञासू, व्यासंगी श्रोतेही त्यांच्या नव्या मांडणीने विस्मित होत आपल्या प्रतिक्रिया लेखरूपाने व्यक्त करताना दिसतात. के. ल. दप्तरी, दि. के. बेडेकर, श्याम भट, रा. ना. चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, एम. एन. रॉय, प्रा. व. वि. आकोलकर, यशवंतराव चव्हाण, द्वा. भ. कर्णिक प्रभृती मान्यवर यासंदर्भात नोंदविता येतात. या प्रतिक्रिया बऱ्याचदा असहमती व्यक्त करणाऱ्या जशा असत, तशाच त्या प्रशंसा करणाऱ्याही रहात.

**भाषणांचे स्वरूप**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेली बहुसंख्य भाषणे ही पूर्वनियोजित, विधिवत, निमंत्रण देऊन, पूर्वतयारीला वेळ देऊन योजलेली असत. अधिकतर व्याख्याने विद्यापीठांच्या वार्षिक व्याख्यानमाला, वसंत व्याख्यानमाला, स्मृतिव्याख्याने, आकाशवाणी, साहित्य संमेलने, परिषदा, चर्चासत्रे, महोत्सव यांमध्ये दिलेली दिसून येतात. त्यातूनही त्यांचा श्रोतृसमूह बुद्धिजीवी वर्गातील अधिक असत; पण त्यांची जी राजकीय व्याख्याने चळवळी,

निवडणुका, प्रसार-प्रचार इ. उद्देशांनी झाली, त्यांचा श्रोतृवंद सर्वसामान्य नागरिक असत. याचाच अर्थ ते आमजनतेचे जसे प्रिय वक्ते होते, तसेच अभिजनवर्गाचेही. त्यामुळे साध्या साध्या प्रकाशन, उद्घाटक, स्वागताध्यक्ष, प्रमुख पाहुणे म्हणून झालेली भाषणे तर असंख्य आहेत. वक्ते म्हणून असलेली तर्कतीर्थांची लोकप्रियता मात्र वादातीत होती खरी. त्या अर्थानेही ते व्याख्यानव्रती सिद्ध होतात.

साहित्यिक तर्कतीर्थ म्हणून त्यांच्या ग्रंथसंपदेची जी सूची पुढे येते, त्यातील अधिकांश ग्रंथ म्हणजे त्यांचे भाषणसंग्रहच आहेत. त्यांना मिळालेला मराठीसाठीचा पहिला साहित्य अकादमी पुरस्कारही. 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'हिंदुधर्माची समीक्षा', 'ज्योति-निबंध', 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत', 'सर्वधर्मसमीक्षा', 'शिखांचा पंथ व इतिहास', 'आद्य शंकराचार्य-जीवन आणि विचार' व 'साहित्याचे तर्कशास्त्र' या ग्रंथांना तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहून भाषणांविषयीची आपली धारणा आणि भूमिका स्पष्ट केली आहे. काही संग्रहातील भाषणे नंतर मजकुरांची भर घालत अद्यावत केलेलीही दिसतात. यातून तर्कतीर्थांची निरंतर ज्ञानलालसा स्पष्ट होते.

**पुरातनास पुरोगामी बनविणारा पंडित**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची काही व्याख्याने मी प्रत्यक्ष ऐकली आहेत. काही भाषणांच्या ध्वनिमुद्रित संहिता मी ऐकल्या आहेत. ते लक्षात घेता त्यांची भाषणे विवेचक, तर्कसंगत असत. मांडणीची योजना स्वाध्यायाधारित असायची. भाषणात आत्मविश्वास असायचा; पण अभिनिवेश नसायचा. भाषणात नवे देण्याची धडपड असायची. तर्कशुद्ध मांडणी आणि बिनतोड निष्कर्ष हे त्यांच्या भाषणाचे वैशिष्ट्य असे. प्रबोधन हा त्यांच्या भाषणांचा उद्देश असायचा. पुरातनास पुरोगामी अंगाने मांडण्याची तर्कतीर्थांची शैली ही खास त्यांची होती. ती अनेक व्याख्यानातील अनुभवांमधून विकसित झालेली होती. व्याख्या, उद्धरणे, सुभाषिते, श्लोक, ऋचा इ. मुखोद्गत असल्याने त्यांच्या भाषणांना एखाद्या धर्मोपदेशक, चिंतक, तत्त्वज्ञाचे रूप घेऊन जायचे. सुश्राव्य गायनाप्रमाणे श्रोत्यांना मंत्रमुग्ध आणि मोहीत करण्याची तर्कतीर्थांची वक्तृत्वकला अनुभवसंपन्न आणि कसलेल्या कलाकाराची करामत वाटायची. विस्मित करणारी प्रज्ञा नि गूंग करणारी प्रतिभा यांच्या संगमाने त्यांची भाषणे नेहमी श्रोत्यांवर गारूड करीत रहात.

त्यांच्या भाषणात विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ असायचा. शास्त्री आणि तर्कपंडित अशा रसायनाचे त्यांचे वक्ता म्हणून असलेले व्यक्तिमत्त्व नेहमी शास्त्रास शस्त्र बनविण्यास तत्पर नि सज्ज असायचे. त्यांची अधिकांश भाषणे पूर्वलिखित असत. त्यामुळे अनेक भाषण पुस्तिका आढळतात तशी ती लेखरूप प्रकाशित झालेली दिसतात. वृत्तपत्रे आणि नियमकालिकांमधून त्यांच्या भाषणांना निरंतर प्रसिद्धी मिळालेली आहे. सर्वत्र 'सकाळ', 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता', 'नवशक्ती', 'नवयुग', 'अग्रणी', 'कल्पना',

'प्रभात', 'काळ', 'विवेक' इ. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके त्यांच्या भाषणांना प्रसिद्धी देण्यास उत्सुक असत. तसा वाचक त्यांनी निर्माण केला होता. साप्ताहिक 'मौज', 'माणूस' असो वा मासिक 'सत्यकथा', 'किर्लोस्कर', 'नवभारत', 'वाङ्मय शोभा', 'धनुर्धारी', 'भिषग्विलास' इ.तून त्यांची भाषणे प्रसिद्ध झालेली आहेत. अनेक दिवाळी अंकांमधील परिसंवादात तर्कतीर्थांची हुकमी उपस्थिती त्यांना मराठी चिंतकांच्या, विचारवंतांच्या श्रेणीत विराजमान करणारी होती खरी! 'मार्तंड जे तापहीन' असा तर्कतीर्थांनी कमावलेला लौकिक अविश्रांत व्याख्यान सत्रांची परिणती होती.

विसाव्या शतकातील गांधी युगाबरोबर किंवा पहिल्या महायुद्धानंतरचा सुमारे सात दशकांचा काळ हा तर्कतीर्थांच्या वक्तृत्वाचा काळ होय. त्यातील स्वातंत्र्यपूर्व काळ त्यांच्या या केलेल्या विकासाचा काळ मानला, तर स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरचा काळ त्यांच्या भाषणांचे सुवर्णयुग म्हणता येईल. सन १९५४ चे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्लीचे अध्यक्षपण नि पाठोपाठ सन १९५५ ला त्यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' भाषण संग्रहास लाभलेले मराठीचे पहिले साहित्य अकादमी पारितोषिक, यामुळे तर्कतीर्थ मराठीच्या नामवंत नि मान्यवर साहित्यिकांच्या पंक्तीत विराजमान झाले. त्यानंतर ते महाराष्ट्राचेच नव्हे तर देशातील विचारवंत वक्ते म्हणून गणले गेले. तो काळ (जीवनाचा उत्तरार्ध) व्याख्याने म्हणून समाजावर प्रभाव टाकण्याचा कालखंड होय. या काळात त्यांच्या मतांनी महाराष्ट्राचे समाजमन बदलल्याचे राज्याने अनुभवले आहे.

**सृजनसंवादी भाषणे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भाषणांकडे सृजन साधना म्हणून पाहिले. त्यांची अधिकतर भाषणे पूर्वतयारीने होत. भाषण करण्यापूर्वी ते टिपणे काढत. वाचन करीत. संदर्भाची जुळवाजुळव करीत. विनातयारीची भाषणे उथळ होतात असे त्यांचे म्हणणे होते. भाषणांनंतर त्यांनी आपली अनेक भाषणे लिहून काढली. काही भाषणे ती होण्यापूर्वी लिहून काढून मुद्रित केली गेली (आयोजकांकडून). भाषणाच्या वेळी ती वितरित केली जात असे. अशा अनेक पुस्तिका माझ्या संग्रही आहेत. त्या या भाषणखंडात प्रकाशित केल्याजात आहेत. बोललेले लिहिण्याचा आणि लिहिलेले प्रकाशित करण्याचा प्रघात त्यांनी बऱ्याचदा पाळल्यामुळे आपणापुढे त्यांच्या शंभरएक भाषणांच्या पूर्ण संहिता उपलब्ध असून, इतकी काटेकोर शिस्त पाळणारे ते महाराष्ट्रातले पहिले वक्ते असावेत. त्यांच्या भाषणांचा साहित्य, भाषा, भाषणकला, शैली, मांडणी इ. अंगांनी संशोधनपर शिस्त नि पद्धतीने शास्त्रीय अभ्यास होण्याची गरज आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या मराठी अधिविभागांनी संशोधन क्षेत्रात या पंडिताने केलेल्या ज्ञान-विचारांची दखल फारशी घेतल्याचे दिसत नाही. मराठी भाषा व साहित्याचे संशोधन आणि समीक्षा नेहमीच कथात्मक साहित्य व काव्याभोवती घुटमळताना दिसते. तिने वैचारिक साहित्य समीक्षेस आपली वहिवाट न बनविल्याने

मराठी साहित्य संशोधन व समीक्षा लोक प्रबोधनपर न होता लोकानुरंजक असाच तिचा तोंडावळा राहिला आहे. मराठी साहित्य संशोधन ललित साहित्य संशोधनातच अडकून आहे. वैचारिक साहित्य, कोश वाङ्मय समीक्षा व संशोधन खरे तर उच्चतर संशोधन होय, याचा विसर पडल्यासारखी स्थिती आहे.

तर्कतीर्थांच्या व्याख्यानांचा उगम आणि विकास हा वादविवादाच्या प्रसंगाने होत राहिला. त्यांचा पाया वादविवाद राहिल्याने त्यावर उभे त्यांचे वक्तृत्व हे विचारप्रवण होत राहिले. वक्ते म्हणून तर्कतीर्थ प्रवचक न होता प्रबोधक बनले, याचे कारण त्यांनी भाषणांकडे ज्ञानोपासना, ज्ञानसाधना म्हणून पाहिले. ते मूलत: शास्त्री, पंडित असल्याने त्यांना शास्त्रीय, तात्त्विक विषयांवर भाषणे देणे आवडत असे. ते भाषण विषयांवर नजर फिरविताना लक्षात येते. तत्त्वचिकित्सा करण्याच्या हेतूनेच ते भाषण करीत. त्यांची ही मौखिक मुशाफिरी एक गंभीर असा सृजन संवाद असायचा. त्यांचे विचार, वाचन, चिंतन, मनन, चर्चा, वादविवादातून प्रगल्भ होत गेले, तसे वक्तृत्वही. देशभक्ती आणि धर्मश्रद्धा या त्यांच्या भाषणाच्या मुख्य प्रेरणा होत्या. त्यामुळे त्यांची अधिकांश भाषणे या विषयवर्तुळात घुटमळताना आढळतात. ते फड गाजवणारे शब्दप्रभू वक्ते नसले तरी त्यांची सर्वच भाषणे सभा जिंकणारी ठरायची. त्यांच्या भाषणांची मदार शब्दसौंदर्य, लालित्य यापेक्षा वैचारिक प्रगल्भतेवर असायची. प्रतिपाद्य विषय मनोज्ञ पद्धतीने सादर करण्यावर त्यांचा भर आणि लक्ष असायचे. भाषणांतून श्रोत्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या तळमळीमुळे त्यांच्या भाषणांकडे समाज, माध्यमे, शासन, बुद्धिजीवी शिकवण आणि शिकवणी (Lesson and Learning) म्हणून पाहात.

**भाषण शैली**

तर्कतीर्थांची भाषणे पुस्तकी नसत. वक्ता नि श्रोता यांमधील ते हृदगत असे. 'हे हृदयिचे ते हृदयी' असा भाव त्यात भरून असायचा. भावनिक आवाहनापेक्षा वैचारिक आव्हान करणारी त्यांची भाषणे मोहक असायची. ती एक बौद्धिक मेजवानी ठरायची. तर्कतीर्थ आपल्या भाषणांतून श्रोत्यांना नवी जीवनदृष्टी प्रदान करीत असत. शैली म्हणून ती विचारविश्लेषक होत. तुलना, इतिहास, तर्क, तत्त्वज्ञान इ.मुळे त्या भाषणांना तत्त्वमीमांसा, चिकित्सा, समीक्षा असे रूप आल्याने त्यांची शैली प्रबोधनपर होऊन जायची. आपल्या भाषणांतून ते संज्ञा, संकल्पना, व्याख्या, उद्धरणे यांच्या ज्या फेकी करीत, फैरी झाडत त्यामुळे त्यांच्या व्याख्यानांना एकप्रकारची वैचारिक धार येत असे. आपल्या भाषणातून पूर्व आणि पश्चिम अशी तुलना करीत विकासाची नवी क्षितिजे, श्रोत्यांना दाखवत असत. नवं मिळण्या-मिळवण्याची आकांक्षेने, उत्सुकतेने श्रोते तर्कतीर्थांच्या व्याख्यानांना गर्दी करीत, आवर्जून हजेरी लावत. त्यांचे भाषण ही नेहमी श्रोत्यांना श्रवणीय पर्वणी वाटत रहायची. भाषणातील त्यांचे दृष्टांत, उदाहरणे, चपखल असत. बिनतोड तर्क त्यांच्या भाषणशैलीचा अंगभूत भाग

असायचा. ते वक्ते असण्यापेक्षा व्याख्याते म्हणून पुढे येत. व्याख्यात्यास साजेसा त्यांच्या व्याख्यानांचा बाज असायचा. त्याला एक शिस्त होती.

**समारोप**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'व्यक्ती आणि विचार' केंद्र करून केलेल्या या ८१ भाषणांच्या संग्रहाचे विहंगमावलोकन करीत असताना लक्षात येते की, व्यक्तिविषयक त्यांची अधिकांश भाषणे पूर्वसुरींच्या जीवन व विचाराची मीमांसा करतात. तर्कतीर्थांना आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य, रामदास यांचे आकर्षण, ते पुरातनास नव्या विचारांची जोड देतात म्हणून. महात्मा फुले यांचे आकर्षणही सुधारवादी समाजसेवक म्हणूनच. महात्मा गांधी स्वातंत्र्य, समता, बंधुतेचे समर्थक, म्हणून तर्कतीर्थ त्यांचे अनुयायी बनतात नि स्वातंत्र्य आणि समतेच्या लढ्यात सक्रिय राहतात. आचार्य प्र. के. अत्रे समकालीन; पण महाराष्ट्र निर्मितीत ते छातीचा कोट करतात, म्हणून आकर्षण. या सर्वांचे आपण देणे लागतो, या कृतज्ञ भावनेने ते भाषणांद्वारे आदरांजली वाहतात.

विचार केंद्री काही भाषणे स्वातंत्र्यपूर्व काळातील. ती अधिकतर नव्या विचारांचा धांडोळा घेणारी. स्वातंत्र्योत्तर काळातील भाषणांत विचार नि विषयवैविध्य दिसून येते. भाषणांमधून समाजाला नवा दृष्टिकोन, विचार देण्याची धडपड असल्याने ते पूर्वाभ्यास करून योगदानाचे नियोजन करतात. समाजाशी सतत संपर्क ठेवण्याची, संवाद करण्याची तर्कतीर्थांची असोशी हा त्यांच्या समाजशील व्यक्तिमत्त्वाचा भाग होय. सतत समाज, राज्य, राष्ट्राचा विचार करणारे तर्कतीर्थ त्यांच्या व्यक्तीचे पूर्णतः समाजात विसर्जन झाल्याचे दिसून येते. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास विचारविस्तारामुळे शक्य झाला. विश्वातील सर्व ज्ञान-विज्ञानाविषयी चिरंतन जिज्ञासा धारण करणारे तर्कतीर्थ प्रथम ज्ञानार्थी आहेत नि नंतर वक्ते. आपल्याकडचं सर्वस्व समाजधन मानून ते भाषणांतून आपलं सर्वतोपरी ज्ञान समाजास देण्याची त्यांची धडपड एका निरपेक्ष ज्ञानतपस्वीची ज्ञानसमाजास लाभलेली देणगी होय.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे,**
संपादक

**संदर्भ :**


१) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **माझ्या शब्दात मी**, पाक्षिक रूद्रवाणी (१५ जानेवारी, १९७२)-पृ. ७

२) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (मुलाखत), **अध्ययन आणि वैचारिक वाटचाल**, नवभारत/फेब्रु.-मार्च, १९८१ पृ. ७

३) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **माझ्या शब्दात मी**, साप्ताहिक रूद्रवाणी (१५ जानेवारी, १९७२)- पृ. ८

४) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **गुरुवर्य विनोबा यांच्यासंबंधी काही स्मृतिशेष**, जन्मशताब्दी विशेषांक (२००५)- पृ. ५४

५) ----तत्रैव------------ पृ. ५५

६) रेगे, मे. पुं. प्रा., **अध्ययन आणि वैचारिक वाटचाल**, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मुलाखत, नवभारत/फेब्रुवारी, मार्च/१९८१- पृ. ११

७) (अ) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **स्वामी केवलानंद सरस्वती व प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ** (मुलाखत), (नवभारत, डिसें.-१९७८, जाने. -१९७९) पृ. १०

(ब) पाटणकर, अनंत विष्णू संपा., **मी व माझे वक्तृत्व**, (१९५३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. १२ ते १४

८) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **साप्ता. मौज** (१३ डिसेंबर, १९४४), पृ. ५

९) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री व अन्य मान्यवर, **श्री. गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती**, प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा, पृ. ५२

१०) खंडकर, अरुंधती, **डॉ. तर्कतीर्थः एक प्रज्ञाप्रवाह**, पृ.८०

११) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (मुलाखत), **स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणेची चळवळ**, नवभारत/डिसें. ७८, जाने. ७९, पृ. ३

१२) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **कृष्णातीरावरील प्राज्ञमठात**, 'सत्यकथा', सप्टेंबर, १९६०, पृ. ३३

१३) देव, दि. वि., **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**, नवयुग, २६ नोव्हें., १९४४, पृ.२

१४) चव्हाण, यशवंतराव, **कृष्णाकाठ**, पृ. ६५

१५) बागल, भाई माधवराव, **माझ्या सहवासात आलेल्या तीन व्यक्ती**, नवभारत, जुलै १९६६, पृ. ४७

१६) चव्हाण, यशवंतराव, **कृष्णाकाठ**, पृ. ६६

१७) सहा शास्त्रे (षडंगवेद), शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद

१८) चव्हाण, यशवंतराव, **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : शास्त्र आणि शस्त्र**, नवभारत, फेब्रु.-मार्च, १९८१, पृ. ४५

१९) चव्हाण, यशवंतराव, **कृष्णाकाठ**, पृ. ६६

२०) त्या काळात राष्ट्रीय चळवळीमार्फत गाववार संघटक नेमले जात. त्यांना 'डिक्टेटर' असे संबोधले जायचे.

२१) साप्ताहिक केसरी, पुणे, मंगळवार, तारीख २०, माहे जानेवारी, सन १९३१ इसवी. पृ. ४

22) **Bombay Presidency Police Abstracts of Intelligence**
Part II-pg-574- Cultural.Maharashtra.gov.in
२३) देव, दि. वि., **लक्ष्मणशास्त्री जोशी**, नवयुग, २६ नोव्हेंबर, १९४४, पृ. २
२४) जंगल सत्याग्रह वृत्तांत खालील संशोधन प्रबंधांवर आधारित आहे-
1) **Forest Satyagraha** - Chapter III- shodhganga.inflibnet.ac.in, pg. No. 110
अ) **वाईचा राजकीय इतिहास**, प्रकरण २, पृ. ११०
ब) **स्वातंत्र्यचळवळ व राष्ट्रसेवा दलातील कार्य**, प्रकरण २, पृ. ६४, ६५. Lib.unipune.ac.in 8080, pg. No. 35 to 37
क) पडवळ, रमेश, **सत्याग्रहींचे नामपूर**, महाराष्ट्र टाइम्स, १२ नोव्हें. २०१७
२५) **साप्ताहिक केसरी**, पुणे, मंगळवार, तारीख २८ ऑक्टोबर १९३० इसवी, पृ. १०
२६) -- तत्रैव --
२७) कर्णिक, द्वा. भ., **आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदांती : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**, मनोहर, मे, १९५१, पृ. १४९, १५०
२८) कर्णिक, द्वा. भ., **शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ,** नवभारत, फेब्रु. १९७५
२९) देव, दि. वि., **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**, नवयुग, २६ नोव्हेंबर १९४४, पृ. २
३०) खंडकर, अरुंधती, **डॉ. तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह**, पृ. १०५
३१) -- तत्रैव -- पृ. १०५
32) **The collected works of Mahatma Gandhi, vol. 58**, pg. 326 to 330
३३) गांधी, महात्मा, संपा., **'हरिजन'**, दि. १० फेब्रुवारी, १९९३, पृ. ६
३४) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **नवयुग**, दि. २६ नोव्हेंबर, १९४४, पृ. १५
३५) **धनुर्धारी** (दिवाळी), ऑक्टोबर, १९४६
३६) तत्रैव --"-- पृ. १३२
३७) **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड १)**, प्रस्तावना, (श्री. विद्या प्रकाशन, पुणे), १९८२
३८) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, **निर्णयाची शास्त्रशुद्धता**, साप्ता. केसरी, दि. २५ डिसें., २८ ते २९ जाने. २९
३९) **'आनंदमीमांसा'** मलपृष्ठ मजकुराच्या आधारे
४०) नवरे, श्री. शं., **शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे**, लोकमान्य, दि. १५ डिसें., १९४४, पृ. ६
४१) देव, दि. वि., **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**, नवयुग, दि. २६ नोव्हें., १९४४ पृ.१५

४२) **'मी आणि माझे वक्तृत्व'**, पृ. २०८
४३) गोडबोले, अरुण, **अक्षरधन**, वृ. १४८
४४) **शास्त्रीजी**, प्रतिमा प्रकाशन, पृ. ४२ ते ५२, पृ. २१३, २१४
४५) खंडकर, अरुंधती, **तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह**,
४६) **ज्योति-निबंध**, पृ. २८
४७) **न्याय वेदांत**
४८) **साप्ताहिक केसरी**, पुणे, दि. ८ जून, १९२६, पृ.११

❍❍❍

# १.

# व्यक्तींसंबंधी भाषणे

–

# ज्योति-निबंध

## जोतीराव फुले

सत्य सत्यासी मन केले ग्वाही । मानियेले नाही बहुमता ॥

तुकाराम

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

–

# ज्योति-निबंध

## जोतीराव फुले

हिंदुस्थानांतील सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध
बंड पुकारणारा
पहिला पुरुष

लेखक
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
वाई

१९४७

किं. १२ आणे

पुस्तक मिळण्याचे ठिकाण
म. शं. साठे
दी प्राज्ञप्रेस, वाई जि. सातारा

Prlnfed at tho Prajna Press, 315, Gangapuri, Wai and Published by
V.G.Joshi for Prajana Pathashala Mandal, Wai, Dist Satara

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे
यांच्या स्मृतीस

# प्रास्ताविक

गेल्या वर्षी वाई सत्यशोधक समाजाचा रौप्य महोत्सव वाई ब्राह्म समाजामार्फत साजरा करण्यात आला. या उत्सवानिमित्त जून महिन्याच्या १८, १९, २० या तीन दिवशी तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री यांची तीन व्याख्याने ब्राह्म मंदिरात झाली. 'सत्यशोधक समाज व म.फुले', 'सत्यशोधक समाज व ब्राह्म समाज', 'शेतकरी व कामकरी जनतेचे स्वराज्य' असे विषय व्याख्यानास घेतले होते. ही व्याख्याने सर्वांना फारच आवडली. कारण विचारसरणी शुद्ध बुद्धिवादी होती. या व्याख्यानांपैकी 'म. फुले व सत्यशोधक समाज' या महत्त्वाच्या विषयावर व्यक्त केलेले मौलिक विचार पुस्तकरूपाने जनतेपुढे येणे जरूर आहे असे पुष्कळांनी मत व्यक्त केले व पुढील पुस्तक हे ती उणीव भरून काढण्यासाठी प्रकाशित करण्यात आले आहे. वाईसारख्या पवित्र क्षेत्रात प. वा. महर्षी विठ्ठलराव शिंदे यांनी इ.स. १९३७ साली वाई ब्राह्म समाजाची पायाशुद्ध अशी घटना करण्याचे कार्य चार वर्षांच्या अविश्रांत परिश्रमानंतर पुरे केले. तर्कतीर्थांचा व वाई समाजाचा संबंध प्रथमपासूनच आला. खुद्द प. वा. कर्मवीर शिंदे मंदिर प्रवेशाच्या वेळच्या महत्त्वाच्या व्याख्यानात म्हणतात, ''टिळक मंदिर व प्राज्ञपाठशाळा यांच्या चालकांनी आम्हाला खुल्या दिलाने जवळ केले. टिळक मंदिरात भजन, व्याख्याने झाली. प्राज्ञपाठशाळेच्या पवित्र जागेत सहभोजने झाली.''

महर्षी शिंदे याच व्याख्यानात सत्यशोधक समाजाच्या प्रभावाबद्दल म्हणतात, ''सत्यशोधक समाजाच्या शिकवणीने खडकाळ जमीन नांगरली गेली. रूढीचे तण उपटले, भेदाचे खडक फोडले, अहंकाराची नांगी मोडली, नवीन पिकाची तयारी झाली.'' याच वेळी 'जोतिबा फुल्यांच्या इच्छेचे पांग फिटो' अशी कर्मवीरांनी सदिच्छा व्यक्त केली. तर्कतीर्थांचे प्रस्तुत पुस्तक जोतिबांच्या इच्छा काय होत्या हे पूर्णपणे स्पष्ट करणारे आहे व नांगरल्या गेलेल्या जमिनीत कोणते पीक पेरावे याचीही स्पष्ट जाणीव चिकित्सक वाचकांना सुलभतेने होणार आहे. वर वर्णन केल्याप्रमाणे साहजिकपणे हे पुस्तक कर्मवीर विठ्ठलरावांना अर्पण करण्यात आले आहे. म. जोतिबांच्याबद्दल शिंद्यांना पराकाष्ठेचा अभिमान वाटत होता.

आपल्या ओजस्वी शब्दात शिंदे म्हणतात, ''गेल्या शतकाचे शेवटी उत्तरार्धात महाराष्ट्रात धर्मसुधारणेची जी लाट उसळली तीतही जनतेने आपला प्रतिनिधी उभा केलाच. रानडे, भांडारकर, मोडक आणि चंदावरकर या विद्वानांप्रमाणेच किंबहुना त्यांचे आधी स्वतंत्रपणाने धर्मस्वातंत्र्याचा दिवा महात्मा जोतीराव फुले यांनी लावला आणि आपले नाव व आडनाव सार्थ केले.'' इतकेच नव्हे तर कर्मवीर शिंद्यांनी फुल्यांचा गौरव पुढील पद्यांत केला आहे. सत्याचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला ॥ पतिताचा पालनवाला । हा धन्य महात्मा झाला ॥ जन्माचा मालाकार । कर्माची खडी तलवार ॥ जनतेचा जागा शेर । त्या समान कोण तो बोला? ॥१॥ बोलीचा रोकड मेख । चालीचा कणखर रेख । सत्याचा पाठीराखा । धर्माचा की जिव्हाळा ॥२॥ धन्य धन्य जोति फुलारी । शाब्दिकासी झाला भारी । दीनदुबळयाचा कैवारी । किती वानू त्याच्या लीला ॥३॥ किती झाले जे छळ सगळे । परि हांसूनि ते गिळियेले । लोकभ्रम निर्दाळीले । ... शहाण्याशी संशयो झाला । मग धन्य जोति उदेला ॥५॥ कुणी शिकून शहाणे ठरले । कुणी विकून पुढारी बनले । कुणी भिकून महात्मे झाले । परी सरळा सेवक विरळा ॥६॥ ... जोतिबा हा लोकाचा । महाराष्ट्र सुधारक आगळा ॥७॥

वरील प्रकारे एका सर्वश्रेष्ठ असलेल्या सुधारकाची शिकवण, श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी मराठी वाचकांना मूलभूतप्रकारे विशद करून दिली आहे. याबद्दल महाराष्ट्रातील सत्यशोधकांना संतोष झाल्याशिवाय राहणार नाही. कारण सत्यशोधक वाङ्मयात ही मोठी भर पडली आहे. कै. वामन आबाजी मोडक यांनी रचलेल्या कीर्तनांच्या व आख्यानांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाला शास्त्रीबोवांनी अत्यंत महत्त्वपूर्ण व मननीय प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत शास्त्रीबोवा म्हणतात, ''राममोहन रॉय, न्या. मू. रानडे, जोतिबा फुले, लोकहितवादी, डॉ. भांडारकर, प्रिं. आगरकर इ. सुधारकांनी निर्मिलेल्या बुद्धिवादी परंपरेचा मी अनुयायी आहे आणि स्वत:स महाराष्ट्रातील सत्यशोधकांचा चाहता समजतो.'' प्रस्तुत पुस्तक म्हणजे सत्यशोधक समाजावरील प्रेमाचे सक्रिय द्योतक आहे. सत्यशोधकांनी यापुढे हरएक बाबतीत रॅडिकल झाले पाहिजे व भांडवलशाहीचे निर्मूलन करणे ही आता महत्त्वाची कामगिरी दत्त म्हणून त्यांच्या पुढे उभी राहिली आहे. शास्त्रीबोवांची विचारसरणी त्यांना दीपगृहाप्रमाणे मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे. तिचे सक्रिय स्वागत केल्याखेरीज जनता उद्धाराचा प्रश्न सुटणार नाही. शास्त्रीबोवांची इतर अनेक व्याख्याने व लेख जनतेपुढे पुस्तकरूपाने आले पाहिजेत.

ज्योतिरावकृत 'इशारा', 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' या तीन पुस्तकांतले सार पुढील पुस्तकात विवेचक प्रकारे दिले आहे. जोतिरावांचे चरित्र लिहिण्याचाही शास्त्रीबोवांचा संकल्प आहे. हेही महत्त्वाचे वाङ्मयकार्य त्यांच्याकडून तडीस जावो अशी सदिच्छा प्रगट करून, त्यांचे अंत:करणपूर्वक आभार मानून हे प्रास्ताविक निवेदन संपवितो.

ब्राह्म मंदिर, वाई — **रामचंद्रराव नारायणराव चव्हाण,**

ता. १०/११/४७ — सेक्रेटरी, वाई ब्राह्म समाज

# १
# ज्योति - निबंध (१९४७)
# जोतीराव फुले

*(सन १९४६ ला सत्यशोधक समाज, वाई (जि. सातारा) चा रौप्य महोत्सव ब्राह्म समाज, वाईतर्फे साजरा करण्यात आला. त्यानिमित्त १८, १९ आणि २० जून १९४६ ला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची तीन व्याख्याने झाली. 'सत्यशोधक समाज व महात्मा फुले', 'सत्यशोधक समाज व ब्राह्म समाज', 'शेतकरी व कामकरी जनतेचे स्वराज्य' या विषयांवर ती व्याख्याने बेतलेली होती.)*

## हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारणारा पहिला पुरुष

इंग्रजी राज्याच्या स्थापनेबरोबर हिंदुस्थानात पाश्चात्त्य संस्कृतीच्या व पाश्चात्त्य सुधारणेच्या संगमास प्रारंभ झाला. पाश्चात्त्यांचा संबंध हिंदुस्थानशी इंग्रजी राज्याच्या स्थापनेपूर्वी कित्येक शतके आला होता; परंतु तेव्हा ही गोष्ट घडू शकली नाही. इंग्रजी राज्याच्या स्थापनेपूर्वी पाश्चात्त्य लोक व्यापाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात अनेक शतके आले होते. त्यांचे व्यापारी दळणवळण सारखे वाढत होते. पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्लिश यांचे व्यापारी व राजकीय संबंध त्यावेळीच पक्के झाले होते. पोर्तुगीजांचा अंमल पश्चिम किनाऱ्यावर ३०० वर्षे गाजत होता. इतके होऊनही पाश्चात्त्य संस्कृतीच्या व सुधारणेच्या महान प्रकाशाने भारतीय लोक जागृत झाले नाहीत. ही गोष्ट केवळ इंग्रजी राज्याच्या स्थापनेमुळेच शक्य झाली.

इंग्रजी राज्याने पाश्चात्त्य सुधारणांचा पाया तयार केला. पाश्चात्त्य सुधारणेचा खोल परिणाम होऊन तेथील बुद्धिमानांचे ठिकाणी जबरदस्त प्रतिक्रिया उत्पन्न झाली. ती इतकी झाली की, ती प्रतिक्रिया आजतागायत सारखी टिकून राहिली आहे आणि विकासही पावत आहे. ही प्रतिक्रिया दोन तऱ्हेने घडून आली. एक अनुकूल व दुसरी प्रतिकूल. अनुकूल प्रतिक्रियेमुळे

अंतर्मुख वृत्ती उत्पन्न झाली आणि त्यातून बुद्धिवाद, शास्त्रीय चिकित्सा, इतिहाससंशोधन, सुधारणांची आकांक्षा आणि सांस्कृतिक व सामाजिक पुनर्विधानाची तृष्णा निर्माण झाली. परंपरेच्या विरुद्ध टीका करण्याची प्रवृत्ती सुधारणेच्या वाढत्या आशेमुळे वाढीस लागली. अनेक मोठमोठे धीर सुधारक हिंदुस्थानच्या इतिहासाला नवीन गती देण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित झाले. वस्तुत: गेल्या दोन हजार वर्षांचा इतिहास त्यांच्याविरुद्ध होता. दीर्घकालच्या अंध:श्रद्धेने जड व अगतिक झालेली समाजरचना त्यांना पदोपदी अडथळा करीत होती. सामाजिक संस्था, दृढमूल झालेल्या सनातन चालीरीती आणि पुराणमताभिमानी लोक पर्वतप्राय अडचणीच निर्माण करीत होते. भूत व वर्तमानकाळ जरी दुर्दशेने ग्रस्त होता तरी तो त्यांचा वैरीच होता. अशा स्थितीत समुद्रापलीकडून आलेले नवे जगच फक्त त्यांना अभयतेचे आश्वासन देत होते.

पाश्चात्त्य सुधारणेच्या सर्वस्वी विरुद्ध अशी एक दुसरी प्रतिक्रिया येथील शिकलेल्या लोकांच्या ठिकाणी त्याच वेळी उत्पन्न झाली. अर्थात ही प्रतिक्रिया सुधारणेच्या विरोधी जशी होती तशी ती इंग्रजी राज्याच्याही विरोधी होती. पाश्चात्त्य सुधारणेच्या विशाल वैभवाचा मत्सर आणि हजारो वर्षे श्रद्धेने पूजिलेल्या प्रिय व पवित्र अशा ईश्वरदत्त पुराण संस्कृतीच्या विनाशाची भीती या दोन भावना या प्रतिक्रियेच्या मुळाशी होत्या. पाश्चात्त्य सुधारणा असे उघड रीतीने सूचित करीत होती की, ''तुमची दिव्य ज्ञानाची भांडारे म्हणून जी प्रसिद्ध आहेत, त्यात ज्ञान असे अल्प असून भ्रम, निराधार कल्पना, दंतकथा व विशिष्ट देशकालाच्या मर्यादेतच महत्त्व असलेली मूल्येच अधिक साठलेली आहेत. तुमची समाजरचना इतकी जुनी व जीर्ण झाली आहे की, तिच्यात आमूलाग्र बदल केल्याशिवाय तुम्हास प्रगतीच्या पंथांत पाऊल पुढे टाकता येणार नाही. आजपर्यंत तुमच्या समाजात ज्या साधनांनी माणसे (जाती व वर्ण) उच्च स्थानावर चढली ती साधने टिकाऊ नाहीत. एवढेच नव्हे तर, ती अयोग्य आहेत. तुमचा मोठेपणा बऱ्याच बाबतीत बेगडी आहे!" सुधारणेचा हा आवाज ऐकून ज्यांनी आत्मसंशोधन सुरू केले आणि नवसुधारणेस अर्थपूर्ण महत्त्व दिले, त्यांचा धिक्कार वर सांगितलेल्या प्रतिकूल प्रतिक्रियेमुळे होऊ लागला. सुधारक लोक पाश्चात्त्य सुधारणेच्या बाह्य देखाव्याने दिपले आहेत असे त्यास सनातनमतवादी लोक हिणवू लागले. इंग्रजी राज्यामुळे पाश्चात्त्य सुधारणा येथे दृढमूल होणार अशी साधार भीती उत्पन्न झाल्यामुळे त्या राज्याच्या विरुद्ध असंतोषाची आणि बंडाच्या प्रवृत्तीची बीजे या प्रतिक्रियेने खोल रुजली. पूर्वपरंपरेचे अवास्तव समर्थन करणारी विचारपद्धती लोकप्रिय होऊ लागली. इतिहास, धर्म, चालीरीती, जातिभेद, मूर्तिपूजा इत्यादी सर्व परंपरेची आणि परंपरागत मूल्यांची दोषस्थाने झाकून मिथ्या समर्थन करणारे लोकाग्रणी बनू लागले. या प्रतिक्रियेचे मुख्य वैशिष्ट्य हे की, ही प्रतिक्रिया परंपरा, संस्कार व इतिहास यांच्याशी संवादी होती. त्यामुळेच सुधारणावाद व बुद्धिवाद यांना पराभूत करण्याची ताकद तिच्या ठायी जबरदस्त होती.

या दोन प्रतिक्रियांचा झगडा म्हणजेच इंग्रजी राजवटीतील हिंदी समाजाचा इतिहास होय. हा झगडा समाजकारण, राजकारण, धर्म आणि वाङ्मय या सगळ्या क्षेत्रात प्रकट झालेला दिसतो. हा झगडा कित्येक वेळा अत्यंत स्पष्ट व निर्भेळ स्वरूपाचा दिसतो तर कित्येक वेळा संकुल, संमिश्र किंवा अस्पष्ट स्वरूपाचा दिसतो. जीवनाकडे पाहण्याचे दोन विरुद्ध दृष्टिकोन या झगड्यात उत्पन्न झाले. प्रतिगामी प्रतिक्रियेने पुराणमताभिमानी राष्ट्रवादाला जन्म दिला आणि पाश्चात्त्य सुधारणेचे स्वागत करणाऱ्या प्रतिक्रियेने बुद्धिवादी मानव्यवादाच्या उदयाला अनुकूल परिस्थिती निर्माण केली. प्रतिगामी प्रतिक्रियेने गतेतिहासाचे व भूतकालाचे शोचनीयत्व दडविले आणि अधोगतीला नेणाऱ्या शक्तीचे समर्थन केले. सुधारणाप्रिय प्रतिक्रियेने भूतकालाचा व इतिहासाचा वास्तविक अर्थ दाखवून दिला आणि प्रगतीचे रहस्य समजावून सांगितले.

सर्व हिंदुस्थानभर या दोन प्रतिक्रिया प्रथम उत्पन्न झाल्या नाहीत. प्रथम बंगाल व महाराष्ट्र यातच या स्पष्ट रूपाने उदयास आल्या. पाश्चात्त्य सुधारणेचे स्वागत करणाऱ्या प्रवृत्तीचे तीन प्रवाह झाले. हे तीन प्रवाह महाराष्ट्रात विलग स्वरूपात प्रभावीपणे वाहत असलेले दिसतात. पहिला प्रवाह धार्मिक सुधारकांचा. ब्राह्म समाज व प्रार्थना समाज यांच्यामध्ये हा पहिला प्रवाह व्यक्त स्वरूपात आला. न्या. मू. रानडे, डॉ. भांडारकर, मोडक, श्री. विठ्ठलराव शिंदे, न्या. मू. चंदावरकर इत्यादी मंडळी या विचारप्रणालीचे महाराष्ट्रातील अग्रणी होत. दुसरा प्रवाह बुद्धिवादी ब्राह्मण सुधारकांचा. हे लोक अस्सल जडवादी किंवा अज्ञेयवादी होत. प्रिन्सिपॉल आगरकर हे त्यांचे अग्रणी होत. तिसरा मोठा प्रवाह ब्राह्मणी संस्कृतीच्या विरुद्ध बंड करणाऱ्या ब्राह्मणेतरांच्या चळवळीचा. या प्रवाहाचे आद्य जनक जोतीराव फुले हे होत. या तिन्ही सुधारणा प्रवाहांचे सर्वसंमत साधारण वैशिष्ट्य थोडक्यात असे सांगता येईल. (१) पाश्चात्त्य विज्ञान हे संपूर्ण स्वागतार्ह आहे, (२) धर्माशी प्रत्यक्ष संबंध नसलेले आधुनिक शिक्षण हाच सुधारणेचा खरा पाया आहे, (३) जातिभेद ही संस्था व्यक्तिविकासाचे महान बंधन असल्यामुळे ती समूळ नष्ट व्हावयास पाहिजे, (४) चातुर्वर्ण्याचे तत्त्वज्ञान समाजविकासास प्रतिबंध करणारे आहे, (५) व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर लोकसत्तात्मक राज्यव्यवस्था हिंदुस्थानात निर्माण होण्याची गरज असल्यामुळे तत्पूर्वी सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता आहे, (६) या सामाजिक परिवर्तनास कुटुंबसंस्थेत व विवाहसंस्थेत बदल करण्यापासून खरा प्रारंभ होतो आणि त्याकरिता स्त्रीशिक्षण आणि स्त्रीस्वातंत्र्य यांचा पुरस्कार पहिल्यांदा केला पाहिजे.

वरील साम्य सुधारणेच्या तिन्ही चळवळीत दिसून येते. परंतु महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर सुधारक यांच्यामध्ये मुख्य तफावत अशी होती की, ब्राह्मणेतर सुधारकांचे प्रश्न मागासलेल्या बहुसंख्य जनतेच्या जीवनाशी निगडित होते, तर ब्राह्मण सुधारकांचे प्रश्न पांढरपेशा उच्चवर्णीयांच्या जीवनाशी संबद्ध होते. ब्राह्मणेतरांच्या विचारसरणीतून हिंदू धर्माच्या

पूर्वपरंपरेवर मूलोच्छेदी प्रहार करण्याची तीव्र आणि कठोर प्रवृत्ती निर्माण झाली. ती इतक्या तीव्र व कठोर स्वरूपात ब्राह्मण सुधारकांच्या विचारसरणीतून उद्भवू शकली नाही. या उच्छेदक प्रवृत्तीला जी अनेक महत्त्वाची कारणे झाली त्यात अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्रजी राज्यस्थापनेच्या पूर्वीचा महाराष्ट्रातील देशी राज्याच्या आमदानीचा उत्तरार्ध हे होय. त्या राज्यातील जातिभेदाची तीव्र अंमलबजावणी, ब्राह्मणेतर जातींना दडपण्याची राज्यकर्त्यांची सवय, कायद्याच्या अंमलबजावणीतील पक्षपात, लाचलुचपत आणि सर्वसाधारण बेबंदशाही यांचा खोल परिणाम ब्राह्मणेतर चळवळीच्या मुळाशी दिसून येतो. ब्राह्मणप्रणीत धर्मग्रंथ, त्यांवर आधारलेली हिंदूंची समाजरचना व त्या समाजरचनेस पोषक असलेली धार्मिक परंपरा या सर्वांच्या विरोधाने भारलेल्या त्वेषाने ही चळवळ उभारली गेली.

ब्राह्मण सुधारकांच्या सुधारणेचा पल्ला पांढरपेशा समाजाच्या मर्यादेबाहेर पोहोचला नाही. ब्राह्मणांचे व पांढरपेशांचे आचार व चालीरीती नव्या इंग्रजी राज्यांतील नव्या व्यवसायास आणि पेशास जुळणारे नव्हते. यांत्रिक व औद्योगिक परिवर्तनाशी ते जमणारे नव्हते. म्हणून त्यात बदल करण्याच्या मुद्याला सुधारकांनी फार उचलून धरले. सोवळे-ओवळे, खाण्यापिण्याचे निर्बंध, पोशाखाची पद्धती, श्राद्ध, सुतक, मूर्तिपूजा इत्यादी सामाजिक, धार्मिक चालीरीतीत बदल करणे जरूरीचे वाटू लागले. इंग्रजी नोकरीत आणि शहरी व्यवसायात त्यांची लडथड वाटू लागली. एकत्र कुटुंबसंस्थेत मौलिक परिवर्तन करण्याच्या कल्पनेला केंद्रस्थान सुधारकांच्या चळवळीत प्राप्त झाले. सुधारकांची सर्व चळवळ एकत्र कुटुंबसंस्थेच्या परिवर्तनाभोवती केंद्रित झाली. वाहतुकीच्या नवीन साधनांनी आणि इंग्रजी राज्यातील नोकऱ्या व व्यापारी व्यवहार यांनी एकत्र कुटुंबसंस्थेत विस्कळीतपणा निर्माण केला. आपल्या स्वत:च्या पिढ्यान् पिढ्या एकत्र राहिलेल्या कुटुंबातून निघून दूरच्या जिल्ह्यात, शहरात किंवा प्रांतात पांढरपेशे लोक जाऊ लागले. खेड्यातील शेतीचा, सावकारीचा, भिक्षुकीचा किंवा इतर प्रकारचा व्यवसाय या नव्या परिस्थितीत एकत्र कुटुंबसंस्थेच्या परिवाराला अपुरा पडू लागला म्हणून वकील, सरकारी नोकर, डॉक्टर, शिक्षक इत्यादी नात्यांनी कुटुंबातील माणसे एकमेकांपासून दूर होऊ लागली. खेड्यातील जुनाट परिस्थितीचा या दूर गेलेल्या माणसांच्या मनावर पूर्वीसारखा दाब राहिला नाही. त्यामुळे नवे प्रश्न उत्पन्न झालेले दिसू लागले. मुलांना मोठ्या वयापर्यंत शिक्षण घ्यावे लागल्यामुळे त्यांच्या लग्नाचा काळ लांबू लागला. बालविवाहाची जुनी प्रथा या नव्या परिस्थितीत अर्थातच अडचण उत्पन्न करू लागली. आणखी असे की, कुटुंबसंस्थेतून दूर गेलेल्या नवशिक्षित तरुणाला एकत्र कुटुंबसंस्थेच्या छायेच्या अभावी बावळट दिसणाऱ्या अशिक्षित स्त्रीचे आकर्षण वाटेनासे झाले. पाश्चात्त्य देशांतील शिक्षित स्त्रियांचे आदर्श त्यांना मोहक वाटू लागले. म्हणून स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाचे महत्त्व वाटू लागले. त्याबरोबरच

बालविवाहाचा प्रश्न जाचावयास लागला. स्त्रीजीवनविषयक पुराणा आदर्शच दृष्टीसमोरून लुप्त झाला. स्त्रीजीवनविषयक अत्यंत क्रांतिकारक मूल्याचा प्रवेश यावेळी झाला. स्त्रीचे वैयक्तिक स्वातंत्र्य ही कल्पना वैयक्तिकदृष्ट्या श्रेष्ठ ठरू लागली. भारतीय संस्कृतीच्या परंपरेत पुरुषपराधीनता हा स्त्रियांचा आदर्श मानला आहे. सतीची चाल, आमरण वैधव्यव्रत, विधवावपन, बालविवाह, लग्नविच्छेदबंदी, संपत्तीच्या वारसाहक्काचा अभाव, पडद्याची चाल, तोंडावरील घुंगट, परपुरुषाशी संभाषण करण्यास प्रतिबंध इत्यादी स्त्रियांची दास्यचिन्हे नष्ट करण्याची चळवळ सुधारकांनी हाती घेऊन भारतीय संस्कृतीतील कौटुंबिक तत्त्वज्ञानाचा उच्छेद आरंभिला. स्त्रीशिक्षण हा त्याचा विधायक पाया होय. एकत्र कुटुंबसंस्थेचा आधार व अंगभूत असलेल्या चालीत आणि कायद्यात परिवर्तन करण्याची चळवळ ब्राह्मण सुधारकांनी हाती घेतली, हे त्यांचे मुख्य वैशिष्ट्य होय.

जुन्या चाली, जातिभेद, अस्पृश्यता, वारसाहक्काचा कायदा इत्यादिकांचा आधार हिंदू धर्म होय. सर्व जुन्या परंपरेचे तत्त्वज्ञानात्मक समर्थन हिंदू धर्म करतो. रूढीच्या सामर्थ्याचे मानसिक उगमस्थान हिंदू धर्म होय. हिंदू धर्मातच सुधारणा केल्याशिवाय सामाजिक सुधारणा करणे अशक्य आहे ही गोष्ट ज्या आधुनिक विद्यावंतांच्या निदर्शनास आली, त्यांनी धार्मिक सुधारणेचा प्रयत्न केला. बंगाल्यांत ब्राह्म समाज आणि महाराष्ट्रात त्याचीच एक शाखा प्रार्थना समाज त्यांनी स्थापन केला. त्यांनी जुन्या सर्व धर्मसंस्थांचा संकुचितपणा ओळखला आणि सर्व जुन्या धर्मातील मूलभूत तत्त्वे शोधून धार्मिक आग्रहीपणाला आळा घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनी असे पाहिले की, एकोणिसाव्या शतकातील मानवसंस्कृती अशा एका उच्च पातळीवर पोहोचली आहे की, तेथे धर्मभेद, राष्ट्रभेद, खंडभेद यांच्या मर्यादा निरर्थक ठरत आहेत. सदसद्विवेकबुद्धी हीच यापुढे धर्माचे प्रमाण मानणे भाग होय. विशिष्ट धर्मग्रंथ, विशिष्ट प्रेषित, विशिष्ट धर्मसंस्थापक यांना ऐकांतिक प्रामाण्य देणे अयोग्य आहे, असे त्यांना दिसले. म्हणून विवेकबुद्धीवर आधारलेला नवा धर्म निर्माण करून पाश्चात्त्य सुधारणेचे स्वागत करण्यास अनुकूल अशी मनोभूमिका निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

ब्राह्मणेतर चळवळीची स्थापना करणारे जोतिबा फुले यांच्याभोवती नवशिक्षित सुधारकांच्या चळवळीचे बीजारोपण सुरू होते. त्याबरोबर त्यांना पुणे शहरातील व मुंबईतील युरोपियन विद्वान व ख्रिश्चन मिशनरी यांचाही सहवास घडला व त्यापासून त्यांच्या विचारांना चांगलीच सामग्री लाभली. महाराष्ट्रात जेव्हा इंग्रजी राज्याची स्थापना झाली व पेशवाईचा अंत झाला, त्यानंतर पहिल्या दहा वर्षांतच जोतिबा फुले यांचा जन्म झाला. पुणे शहराच्या आसपास त्यांचा जन्म झाला. त्यामुळे तेथील पाश्चात्त्य सुधारणांचा परिणाम त्यांच्यावर झाल्याशिवाय राहिला नाही. शिक्षणाच्या दृष्टीने मागासलेल्या अशा माळी जातीत त्यांचा जन्म झाल्यामुळे त्यांच्या शिक्षणात पुष्कळच अडचणी आल्या. परंतु परिणामक्षम सूक्ष्म मन असल्यामुळे आणि बुद्धी विचारशील आणि चौकस असल्यामुळे बदललेल्या परिस्थितीचा

अर्थ अत्यंत व्यापकपणे जोतिबांना समजल्याशिवाय राहिला नाही. इंग्रजी राज्याच्या आगमनाने झालेल्या क्रांतीचा अर्थ त्यांना जितका त्यांच्या काळात समजला तितका फारच थोड्यांना समजला होता. स्वत:च्या परिस्थितीचा अर्थ समजणारे आत्मप्रत्ययशील लोकच स्वतंत्र होऊ शकतात आणि आत्मोन्नती करू शकतात. त्यांच्यातच गुणांचा विकास होतो आणि कर्तृत्व विकास पावते. ज्या लोकांना स्वत:चे समाजातील स्थान काय आहे हे कळत नाही असे आत्मप्रतीतिशून्य मानव समाजात दासच राहतात. सांस्कृतिकदृष्ट्या ते हीन स्थितीतच सरपटत राहतात. हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे जोतिबा फुले होय. हिंदी बहुजन समाजाच्या सामाजिक गुलामगिरीचा प्रथम प्रत्यय किंवा पहिली ओळख झालेला, बहुजन समाजातला पहिला माणूस जोतिबा फुले हा होय. ज्यांना स्वत:ची गुलामगिरी समजत नाही ते गुलामगिरीतून कधीही मुक्त होत नसतात. शतकानुशतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृतीने ग्रासलेल्या हिंदू समाजातील जनतेला आत्मपरीक्षण करण्याचा पहिला आदेश जोतिबांमुळे मिळाला. महाराष्ट्रातच असा माणूस का उत्पन्न झाला याला ऐतिहासिक कारणे जबाबदार आहेत. देवाविरुद्ध, धर्माविरुद्ध, तीर्थस्थानांच्याविरुद्ध, गुरुंच्याविरुद्ध, धर्मग्रंथांविरुद्ध आणि सर्व पवित्र वंद्य परंपरेच्या विरुद्ध बंड करणारा, बंडाचा उठाव करणारा असा माणूस पहिल्यांदा महाराष्ट्रातच का उत्पन्न झाला या प्रश्नाला ऐतिहासिक पार्श्वभूमीचे संशोधन केल्यास योग्य उत्तर मिळते.

ही ऐतिहासिक पार्श्वभूमी स्वत: जोतिबा फुले यांनीच सांगितली आहे. ब्राह्मणी वर्चस्व, जातिभेदातील उच्चनीचतेचा कठोर अंमल, धर्मसंस्थेच्या छत्राखाली अज्ञान व भोळेपणा यांनी भरलेल्या कल्पनांचे प्रस्थ, अंधश्रद्धेने पाठिंबा दिलेल्या मौर्ख्यपूर्ण चालीरीती इत्यादी हिंदू समाजातील सामाजिक दोष त्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत आहेतच; परंतु या गोष्टी आजपर्यंत हिंदू समाजात तशाच कायम आहेत. ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विशिष्ट संबंध अवनत झालेल्या मराठी राज्याच्या उत्तरार्धाशी पोहोचतो. या उत्तरार्धात ब्राह्मण पेशव्यांच्या हातात मराठी राज्याची सगळी सूत्रे आली होती. यावेळी त्या राज्यपद्धतीत असलेली अवनतीची बीजे फोफावली(१) (१) उत्तर पेशवाईतील राज्यकारभारात जातिभेदाचे प्रस्थ माजले, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष राज्यकारभारात इतर जातींपेक्षा ब्राह्मणांचे स्तोम फार वाढले ही गोष्ट शास्त्रीय रीतीने इतिहास संशोधन करणारे कै. न्या. मू. रानडे यांनी पेशव्यांच्या डायरीच्या प्रस्तावनेत प्रामुख्याने मांडली आहे. Caste ascendency म्ह. जातिवर्चस्व या सदराखाली ते म्हणतात -''शिवाजी आणि शाहू यांच्या कारकीर्दीपेक्षा निराळेपणा दाखविणारे असे सर्वसामान्य दुसरे एक स्वरूप पुण्याच्या पेशवाईचे सांगता येते. त्यावेळी ब्राह्मणांचा जास्तीत जास्त भरणा सेनापती पदावर व लष्करी अंमलदारात झालेला दिसतो. साताऱ्याहून पुण्यास राजधानी आल्यावर १७६० सालानंतरच्या काळात असे स्पष्ट दिसते

की, कीर्तिशाली व मुलूखगिरी करणाऱ्या लष्करी सरदारांत निखालसपणे ब्राह्मण लोकच प्रामुख्याने झळकू लागले. प्रभू, शेणवी इत्यादी पांढरपेशा ब्राह्मणेतरांचाही पुणे दरबारात टिकाव लागेनासा झाला. याचा परिणाम पक्षोपपक्षांची बजबजपुरी माजण्यात झाला. समाजातील सगळ्याच वर्गात सक्रिय सहानुभूतीचा अभाव दिसू लागला. शिवाजी, राजाराम आणि शाहू यांच्या काळात हे समाजातील वर्ग एकोप्याने राहावे अशी राजकीय दृष्टी होती. ब्राह्मणांना पेशवाईत असे वाटू लागले की, आता आपणच खरेखुरे राजे आहोत. ब्राह्मणांना स्वतंत्र सवलती भोगावयास मिळू लागल्या, त्यांना अनेक बाबतीत इतरांना लागू असलेल्या कायद्याची बंधने लागेनाशी झाली. पेशव्यांच्या दरबारातील कोकणस्थ ब्राह्मण कारकुनाची मिजास तर और वाढली. इतमामास भरपूर योग्य असा पगार मिळे. त्यांच्या मालावर आयात निर्यातीच्या बाबतीत जकात माफ होत असे. कल्याण प्रांतातील व मावळांतील ब्राह्मणांच्या जमिनीवर इतर जातीच्या मानाने निम्यापेक्षाही कमी कर पेशवा सरकारने ठेवला होता. फौजदारी न्यायालयात ब्राह्मणांच्या बाबतीत कायदेशीर दंड व शिक्षा शक्य तितकी मऊ केली जात होती. किल्ल्यातील बंदिखान्यात इतरांपेक्षा ब्राह्मणांना उदार वागणूक मिळत असे. आणखी असे की, सरकार दरबार ब्राह्मणांना फार मोठा दानधर्म सरकारी खजिन्यातून करीत असे. विद्या असो नसो ब्राह्मणांकरिता दक्षिणा आणि जेवण यांची भरपूर तरतूद सरकारने केली. त्यामुळे पुणे शहर हे ब्राह्मण भिकाराचे मोठे जंगी केंद्रच बनले. तीस ते चाळीस हजार ब्राह्मण ओळीने कित्येक दिवस पक्वान्नांची भोजने झोडीत राहत असत. या व अशा प्रकारच्या गोष्टीमुळे ब्राह्मणशाहीचे वर्चस्व अठराव्या शतकाच्या शेवटच्या विभागात पराकाष्ठेस पोचले आणि हेच वर्चस्व अवनतीस कारण झाले, याची कल्पना फार थोड्या लोकांस असेल." [The Miscellaneous Writings by Mr. Justice M. G. Ranade, P. 350-352]

हिंदू समाजरचनेचे अंगभूत व स्वाभाविक असलेले दोष अधिक उग्र व घृणित स्वरूपात प्रकट झाले. कायद्याचे स्वरूप अगोदरच अस्पष्ट ओबडधोबड व अशास्त्रीय होते. त्याच्या अंमलबजावणीची पद्धत मागासलेली होती. सारावसुली, कर्जवसुली व मजुरीची पद्धत तर शेतकऱ्यास, ऋणकोस व मजुरास फारच जाचक स्वरूपाची होती व त्यात गोंधळही फार होता. यासंबंधी जोतिबा फुले यांनी 'इशारा' या त्यांच्या निबंधात मार्मिक चित्र रेखाटले आहे. ते म्हणतात, ''थोडकेच दिवसांमागे आर्य पेशवे यांचे शेवटील कुलदीपक पुरुष राव बाजी यांचे कारकीर्दीचा अस्त होईपर्यंत शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडेसे चुकले तर त्यास उन्हामध्ये ओणवे करून पाठीवर एक मोठा दगड देत किंवा त्याची बायको पाठीवर बसवीत आणि खालून मिरच्यांचा धूर देत असत. ते प्रजा म्हणजे एक प्रकारची जनावरेच समजत. त्यांचा उपयोग म्हटला म्हणजे त्यांनी राजाकरिता व त्यांचे जातीचे लोकांकरिता, त्यांच्या स्त्रियांकरिता व मुलाबाळांकरिता धान्य उत्पन्न करावे, वस्त्रे विणावीत, उन्हातान्हात

खपावे, ऐषारामाच्या सर्व गोष्टी पुरवाव्यात... आता हे (इंग्रजी) राज्य झाल्यामुळे प्रजेस पूर्वीच्या राज्यात द्वेषामुळे नीतिसंबंधी, राज्यसंबंधी आणि अनेक गोष्टींसंबंधी जुलूम होत असत. त्या सर्वांतून ती एकदाची सुटली.'' महाराष्ट्रात पावसावरच बरीचशी शेती त्यावेळी अवलंबून होती. त्यामुळे मधूनमधून पावसाने धोका दिल्यामुळे शेतकऱ्यास कर्ज फेडणे कठीण जात असे. ती स्थिती अजून कायम आहे; परंतु त्यावेळी सरकार सावकाराच्या बाजूचे सर्वस्वी होते. त्यामुळे ऋणकोची दैना फार होत असे. सर्वस्व गमावण्याची पाळी त्याच्यावर फार वेळा येत असे. यासंबंधी ज्योतिबा म्हणतात, ''त्या वेळेस त्या सरकारात फिर्याद वगैरे करावी लागत नसे. कारण त्यांचे (सावकारांचे) घरातच सरकार होते. मनास वाटेल त्याप्रमाणे कुळास मारावे, झोडावे, त्याचा सर्व माल हिसकावून घेऊन जावा, त्याची बैल ढोरे विकावी, त्याचे मुलामाणसाचे हाल हाल करावे, त्याचे डोक्यावर अथवा पाठीवर मोठे थोरले धोंडे देऊन भर उन्हामध्ये उभे करावे, शरीराचे नाजूक भागास चाप लावावेत, कोलदांडा घालून मार द्यावा... सात-आठ रुपयाचे रकमेकरिता शेत जाई, गुरे ढोरे जाई, विहीर व मळे जाई आणि सरतेशेवटी तोही देशोधडीस जाण्यास अथवा प्राणत्याग करण्यास सिद्ध होई.''

त्या देशी राज्यात जातिभेदाला अधिक तीव्र स्वरूप प्राप्त झाले होते. ब्राह्मणांचा अहंकार व दांभिकपणा पराकाष्ठेला पोहोचला होता. यासंबंधी जोतिबांनी अनेक उदाहरणे दिली आहेत व त्यात फार मोठा सत्यांश आहे. उदाहरणार्थ जोतिबा म्हणतात, ''कोणी शूद्र नदीकाठावर आपली वस्त्रे धूत असता तेथे एखादा भट आला तर शूद्रास (ब्राह्मणेतरास) आपली सर्व वस्त्रे गोळा करून भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही अशा स्थळी जाऊन ती वस्त्रे धुवावी लागत असत. तेथून जर भटाच्या अंगावर पाण्याचा शिंतोडा आला तर त्या भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन जवळचे भांडे त्याचे मस्तक रोखून मोठ्या त्वेषाने मारावे. त्यामुळे मस्तक रक्तबंबाळ होऊन मूर्च्छा येऊन जमिनीवर त्याने धाडकन पडावे. शुद्धीवर आल्यावर आपली रक्ताने भरलेली वस्त्रे घेऊन निमूटपणे घरी जावे, सरकारात कळवावे तर भटशाही पडली. उलट कळविणारासच सजा व्हावयाची.'' अस्पृश्यांचे हाल तर कल्पना करविणार नाही इतके होत. ब्राह्मणावर आपली सावली पडू नये, याची दक्षता त्यांना बाळगावी लागे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ ज्या वेळी उन्हाच्या सावल्या लांब पडतात त्यावेळी अस्पृश्यांच्या व विशेषत: ब्राह्मणांच्या वस्तीतून जाण्यात फारच धोका असे. स्पृयश्य व ब्राह्मण ज्या रस्त्यातून जात त्या रस्त्यात त्यांना गळयात मडकी बांधून जावे लागे. तसेच त्यांना कमरेला झाडाची फांदी लोंबती बांधली तरच रस्त्यातून फिरण्याची परवानगी असे. कारण त्यामुळे त्यांची पापी पावले उमटलेल्या मातीवरून ती फांदी फिरली म्हणजे पावलाच्या उमटलेल्या खुणा बुजून जात. अस्पृश्यजाती जनावरांपेक्षा नीच स्थितीला पोचली. ब्राह्मणजाती देवाच्या पदवीला पोचली व मध्ये इतर जाती सोपान परंपरेप्रमाणे

राहिल्या. पेशवाई राज्यात सरकारी खजिन्यातून फार मोठा पैसा ब्राह्मणांच्या भोजनात व दक्षिणेत खर्च होत असे. त्याबद्दल जोतिबांनी फार मोठी तक्रार केली आहे. ऐतखाऊ वशिलेबाज पुष्ट झालेला ब्राह्मणवर्ग आणि दारिद्र्याने धुळीस मिळालेला ब्राह्मणेतर बहुजन समाज यांचे तुलनात्मक हृदयद्रावक वर्णन जोतिबांनी आपल्या निबंधातून केले आहे. देशी कायद्याच्या रानटी कठोरपणासंबंधी त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. फौजदारी गुन्हा करणाऱ्यांना अंगभंगाच्या शिक्षा दिल्या जात. हात तोडणे, पाय तोडणे अशा प्रकारच्या शिक्षा त्यावेळी कायद्याप्रमाणे दिल्या जात. अवयव तोडण्याची शिक्षा ब्राह्मणी राज्याचाच मात्र विशेष नव्हे. कारण हिंदुस्थानात सर्वत्र हजारो वर्षे या तऱ्हेची शिक्षा फौजदारी गुन्ह्यास सर्व प्रकारच्या राजवटीत दिल्या जात. हाल हाल करून देहांत शिक्षा करण्याचा प्रकार व अंगभंगाचे शासन पेशवाईतही चालू राहिले, हा पेशवाईचा दोष नव्हता, तर तो हजारो वर्षांच्या परंपरेचा दोष होता. परंतु इंग्रजी राज्यात अशा प्रकारच्या क्रूर शिक्षा बंद झाल्या. जुन्या व नव्या राजवटींची तुलना नि:पक्षपाती बुद्धी असलेला मनुष्य करू लागला तर त्याला इंग्रजी राज्याचा कायदा सुधारलेला व अधिक उन्नत अशा न्यायतत्त्वावर उभारलेला आहे असे दिसणे स्वाभाविक मानले पाहिजे. सुळावर देणे, उलटे टांगून अंगातून रक्त गळेपर्यंत चाबकाने फोडून काढणे, राखेचा तोबरा देणे, हत्तीच्या पायाखाली तुडविणे, तोंडात तेल शेंदूर किंवा धातूचा तप्त रस ओतणे, कडेलोट करणे या गोष्टी इंग्रजी राज्याच्या कायद्यात गुन्हेगाराच्या शिक्षेच्या कलमातून गाळल्या गेल्या. त्याचप्रमाणे जातिभेदाप्रमाणे मानलेला उच्चनीच भाव व पक्षपात इंग्रजी कायद्यातून नष्ट झाला आणि मनुष्य या नात्याने सगळे प्रजाजन समान होत हे तत्त्व इंग्रजी कायद्यात दाखल झाले व त्याची अंमलबजावणी झाली. तशी गोष्ट पेशवाईत नव्हती. पेशवाईत जातिभेदातील वैषम्य व पक्षपात हा कायदा समजून कडक रीतीने अमलात आणणे हे राज्यकर्ते आपले कर्तव्य समजत व राहणी, पोषाख चालीरीती या बाबतीत ब्राह्मणांचे अनुकरण करून त्याची बरोबरी करणे हा कायदेशीर गुन्हा समजला जात असे. त्याची अंमलबजावणी पेशवाईच्या उत्तरार्धात अधिक करडेपणाने होऊ लागली. मुसलमानी अमदानीत या बाबतीत पुष्कळ शैथिल्य आले होते. परंतु पेशवाईच्या उत्तरार्धात ब्राह्मणमहात्म्य शिखरास पोहोचल्यामुळे जातिभेदाच्या मर्यादा व निर्बंध अधिक कठोर बनले. ते निर्बंध कडक रीतीने पाळणारा ब्राह्मण जादा दक्षिणा व मानमान्यता यास पात्र होऊ लागला. या गोष्टीची आठवण जोतिबांच्या काळी अगदी ताजी होती आणि जातिभेदाची तीव्रता ब्रिटिशांच्या राज्याच्या कायद्यात जरी कायदेशीर नव्हती तरी परंपरेच्या दृष्टीने ती पेशवाईइतकीच अमलात होती. त्यामुळे जातिभेदाच्या अवजड यंत्राखाली ते दडपले गेले. त्यांच्या हीन स्थितीचा व दुर्दैवाचा अर्थ जोतिबा फुले यांस चांगला उमजला, कारण ते त्यांच्यातच जन्मास आले होते.

पूर्वीच्या राज्यात एक प्रकारची बेबंदशाही वाढीस लागलेली होती व तिचा अतिरेक होऊ लागला होता. त्याचे ताजे स्मरण जोतिबांना होते. पेंढारी लुटारू लोक व गावगुंड यांचे प्रस्थ वाढल्यामुळे प्रजेतील उमेद नाहीशी झाली होती. सरकारी अधिकारीवर्ग लुटारू व पेंढारी यांच्या प्रमाणे हम करे सो कायदा अशा रीतीने वागत असल्यामुळे प्रजेत कष्ट करून धनार्जन करण्याचा उत्साह राहिला नव्हता. मालमत्ता असुरक्षित होती म्हणून मेहनत करून मिळविलेले फळ जर भोगण्याची शाश्वती नाही तर मेहनतच का करावी अशी वृत्ती उत्पन्न झाली होती. म्हणून नवीन इंग्रजी राजवटीचे स्वागत नकळतपणे प्रजा करू लागली. त्यात जोतिबा फुलेंसारखे सुधारक विचारपूर्वक भूतकाळातील इतिहासाचा अर्थ करू लागले आणि इंग्रजी राज्यातही भूतकाळातील समाजरचना टिकून राहत आहे हे पाहिल्यामुळे ते मूलगामी पद्धतीचा विचार करू लागले. सुधारलेल्या इंग्रजी राज्याच्या आगमनाने त्यांना भारतीय इतिहासाचा आणि जीवनाचा नवा अर्थ कळला आणि त्या राज्याचा परकीय म्हणून विरोध करण्याच्या ऐवजी सुस्वागतम् म्हणून त्यांनी स्वागतच केले. त्यांना इंग्रजी राज्याने आपल्या बरोबर आणलेल्या पाश्चिमात्य संस्कृतीतून जीवनाचा नवीन संदेश मिळाला, तो म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा. आजपर्यंत हिंदुस्थानातील जनता सामाजिक गुलामगिरीत बद्ध असल्यामुळे तिचा भौतिक व आध्यात्मिक अध:पात हजारो वर्षे होत आला असून ती जनता त्या गुलामगिरीची जाणीव होऊन तिचा नाश करण्यास उद्युक्त व्हावी, अशी उत्कट इच्छा जोतिबा फुले यांच्या ठिकाणी उत्पन्न झाली.

सुधारलेले इंग्रजी राज्य स्थापन झाले; परंतु हिंदी समाजात शतकानुशतके दृढमूल झालेले जातिभेद, अज्ञान, दारिद्र्य आणि अंधश्रद्धा हे दोष पूर्ण नाहीसे होतील अशी लक्षणे दिसेनात. सुधारलेल्या इंग्रजी राज्याच्या अनुषंगाने या भूमीत पाऊल ठेवलेल्या उदारमतवादी विचारसरणीने आणि पाश्चात्त्य संस्कृतीने या देशातील जनतेचा आत्मोद्धार होईल अशी मोहक आशा हृदयात सकृद्दर्शनी निर्माण केली; परंतु समाजसुधारणेला जितका जोम यावयास पाहिजे होता तितका जोम येईलसा दिसेना. या परिस्थितीची जाणीव जोतिबा फुले यांच्या ठिकाणी उत्पन्न झाली. इंग्रजी राज्याने आपल्या राज्याबरोबर आणलेल्या पाश्चात्त्य संस्कृतीतील उदार मूल्यांचाच खोल परिणाम होऊन ज्योतिबा फुले व तत्कालीन इतर सुधारक अंतर्मुख बनून हिंदी समाजाच्या सामाजिक दुर्गतीचे मनन करू लागले. जोतिबा फुले यांनी पहिल्यांदा जो आढावा घेतला त्यात त्यांना हिंदू समाजाच्या अधोगतीचे मूळ हिंदू समाजात हजारो वर्षे खोल रुजलेल्या सामाजिक गुलामगिरीत दिसले आणि ही गुलामगिरी सुधारलेल्या इंग्रजी राज्यातही तशीच कायम आहे असे त्यांनी पाहिले. या गुलामगिरीच्या मूळ कारणांचा शोध त्यांनी केला व त्यात त्यांना असे आढळले की, ब्राह्मणांनी आपल्या नेतृत्वाखाली निर्माण केलेला धर्मच यास जबाबदार आहे. म्हणून त्यांनी पहिले जे पुस्तक लिहिले त्यास 'सुधारलेल्या इंग्रजी राज्यात ब्राह्मणी धर्माच्या आडपडद्यात गुलामगिरी' असे

नामाभिधान केले. त्यांना विचारांची स्फूर्ती पाश्चात्त्य लोकसत्तावादी तत्त्वज्ञानाने दिली. म्हणून त्यांनी हे पुस्तक निग्रोंना दास्यमुक्त करण्याची चळवळ करणाऱ्या अमेरिकन नागरिकांना अर्पण केले.

त्यांनी आपल्या पुस्तकात त्यावेळच्या परिस्थितीस अनुसरून असे विधान केले आहे की, ''ब्रिटिश लोकांचे राज्य असूनही प्रत्यक्ष राज्यकारभाराची अंमलबजावणी करणारे लोक प्रामुख्याने ब्राह्मणच आहेत. म्हणून ब्राह्मणेतर अशिक्षित बहुजन समाजाची हरएक बाबतीत नाडणूक होत आहे. जातिभेदातील उच्चनीच भाव पूर्वीइतकाच कठोरपणाने पाळला जातो. पुण्यासारख्या शहरातही ब्राह्मणांच्या पाणवठ्यावर किंवा हौदावर ब्राह्मणेतरांचा शिरकाव होऊ शकत नाही. शिक्षण संस्थांतून ब्राह्मणांचाच भरणा अधिक होतो. शिक्षणातील क्रमिक पुस्तकात ब्राह्मणांनी लिहिलेल्या धर्मग्रंथातील दोषांवर पांघरूण घातले आहे. खेड्यातील बहुजन समाज व विशेषत: शेतकरी शिक्षण घेऊ शकत नाही. तो निरक्षर आहे, त्यामुळे तो सगळ्या व्यवहारात ठोकर खातो व त्याची फसवणूक निरनिराळ्या तऱ्हेने करण्यास शिक्षित लोक तयार असतात. बहुजन समाज दरिद्री असल्यामुळे त्याला शिक्षण घेणे परवडत नाही. धार्मिक भोळ्या भावामुळे त्याने निढळाच्या घामाने मिळविलेला पैसा अनाठायी खर्चिला जातो. त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाची त्याला एक तर जाणीवच नसते व जाणीव झाली तरी अज्ञानामुळे व दारिद्र्यामुळे त्याला आपल्यावरील अन्यायाचे परिमार्जन करून घेता येत नाही. त्याच्या गाऱ्हाण्याची दादच कोठे लागत नाही.'' अशा तऱ्हेने सर्वसामान्य परिस्थितीचे वर्णन ज्योतिबांनी 'गुलामगिरी' या पुस्तकात केले आहे. बहुजन समाजाच्या मानसिक गुलामगिरीबद्दल ते असे म्हणतात की, ''जनता गुलामगिरीत असते; परंतु ती गुलामगिरी नष्ट करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्यामध्ये असते असे नाही. स्वत: गुलाम मालकाच्या बाजूचे असतात. अमेरिकेतील निग्रो गुलामांना दास्यनाशाचे इतके महत्त्व वाटले नाही जितके स्वतंत्र गोऱ्या अमेरिकनांना वाटले. इंग्लिश अधिकाऱ्यांनी कोकणातील खोतीबद्दल कुळांनी योग्य त्या तक्रारी कराव्यात अशी एक योजना केली. कोकणात खोत-जमीनदार कुळाला चोवीस तास राबवत आणि जगण्यापुरते अन्न देत. खोत मालक कुळांना झोडपूनही काढीत. परंतु इतकी स्थिती असूनही कुळांनी जेव्हा साक्षी दिल्या तेव्हा त्यांनी आपल्या मालकांचीच बाजू घेतली. म्हणून जनतेला शिक्षणाची आवश्यकता आहे व ते शिक्षण अंधश्रद्धा व भोळा भाव नष्ट करणारे असले पाहिजे. असे शिक्षण म्हणजे आधुनिक शिक्षणच होय. आपल्या हितसंबंधास जागृत असणारे व बहुजन समाजाच्या अज्ञानावर व मागासलेपणावर ज्यांचे प्रस्थ व वैभव अवलंबून आहे असे ब्राह्मण इत्यादी लोक असे शिक्षण प्रजेला मिळण्याच्या विरुद्ध असतात. इंग्रजी राज्यात असे शिक्षण जनतेला मिळू शकेल व ते मिळाल्यावर जनता जातिभेद, अस्पृश्यता आणि इतर प्रकारची आर्थिक व सामाजिक बंधने नष्ट करण्यास समर्थ

होईल अशी आशा जोतिरावांनी प्रगट केली आहे. इंग्रजी राज्याचा कायदा, न्यायपद्धती व शास्त्रीय सुधारणा यांचा उपयोग जनतेला आत्मोद्धाराकरिता करून घेता येईल; परंतु जनतेत आधुनिक बुद्धिवादी शिक्षणाचा प्रसार व्हावयास पाहिजे, असे जोतिरावांना वाटत होते.

ब्रिटिश राज्यव्यवस्थेत आशा उत्पन्न करण्यास अनुकूल अशी काही लक्षणे होती; परंतु ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या अंगी हिंदी समाजात मूलभूत फरक घडून आणण्यास आवश्यक असलेली क्रांतिकारक बीजे नव्हती. कारण परंपरागत सामाजिक व्यवस्थेच्या पायावरच ब्रिटिश राज्याची उभारणी झाली होती. ही गोष्टच ती राज्यव्यवस्था क्रांतिकारक होऊ शकत नाही हे समजावून देण्यास पुरेशी आहे. जनतेला सुसंस्कृत व्हावयास जी आर्थिक सुबत्ता व्हावयास पाहिजे ती उत्पन्न करण्याची ताकद ब्रिटिश राज्याच्या अंगी नव्हती. ब्रिटिश राज्यापूर्वी येथील बहुजन समाज जितका दरिद्री होता तितकाच ब्रिटिश राज्यातही दरिद्री राहिला. काही अंशी त्यांची परिस्थिती सुधारली; परंतु मूलत: जो फरक व्हावयास पाहिजे तो झाला नाही. त्यामुळे ब्रिटिश राज्यापूर्वी हिंदी जनता जितकी अज्ञानी व मागासलेली होती तितकीच त्या राज्यांतही राहिली. कारण शेतकरी क्रांती (Agrarian Revolution) म्हणून जी व्हावयास पाहिजे होती ती झाली नाही. शेतकरी क्रांतीच्या कल्पनेत तीन गोष्टींचा समावेश होतो. एक म्हणजे जमीनदारी पद्धतीचा नाश व त्याचबरोबर सरंजामदार वर्गाचा नाश, दुसरी गोष्ट शेतकऱ्यांच्या हातात त्याने केलेल्या श्रमाचा मोबदला मोठ्या प्रमाणात शिल्लक राहिला पाहिजे आणि तिसरी गोष्ट म्हणजे हा श्रमाचा मोबदला अधिकाधिक राहण्याकरिता शेती आधुनिक शास्त्रीय पद्धतीने करावी लागते. या तिन्हीही गोष्टी हिंदुस्थानात त्या राजवटीत घडल्या नाहीत. जमीनदार, संस्थानिक व सरंजामदार कायम राहिले. शेतकऱ्यांस पिळणारी सावकारी राहिली आणि शेती करण्याची पद्धत मध्ययुगीन व मागासलेली राहिली. जोतिबा यांस शास्त्रीय आधुनिक पद्धतीच्या शेतीची कल्पना पुरेपूर आली होती. त्याचप्रमाणे सावकारी पाशाच्याही विरुद्ध त्यांनी ओरड केली होती. परंतु इंग्रजी राज्याची उभारणी जुन्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक परंपरेला मूलत: नष्ट करू शकणार नाही ही गोष्ट त्यांच्या ध्यानात फारशी आली नाही. कारण इंग्रजी राज्याच्या बरोबर आलेल्या पाश्चात्त्य संस्कृतीचे महत्त्व अत्यंत आशादायक आहे असे त्यांना दिसले व यामुळे या मूलभूत वैगुण्याकडे त्यांचे लक्ष गेले नाही.

फुले यांच्या तारुण्यातच म्हणजे अठराशे सत्तावन्न साली उत्तर हिंदुस्थानात शिपायांच्या बंडाचा वणवा पेटला व त्या वणव्यात इंग्रजी राज्याची विशाल व नुकतीच उभारलेली इमारत खाक होते की काय अशी परिस्थिती उत्पन्न झाली. हे बंड अयशस्वी झाले. इंग्रजी राज्य त्यातून शिरसलामत बाहेर पडून अधिक भक्कम बनून भरभराटीस येऊ लागले. ही वेळ म्हणजे १८५८ पासून १८८५ पर्यंतचा काळ होय. याच सुमारास जोतिबा फुले

यांनी सत्यशोधक चळवळीस सुरुवात केली. यावेळी हिंदुस्थानातील सुशिक्षितांत इंग्रजी राज्याच्या विरुद्ध असलेला असा मोठा भाग होता. देशभक्तीची भावना पाश्चात्त्य शिक्षणामुळे त्यांच्या ठिकाणी उत्पन्न झाली. ५७ सालचे बंड फसले याबद्दल त्यांना विषाद वाटत होता. हे लोक खाजगी रीतीने व वृत्तपत्रांतून लोकांची मने इंग्रजी राज्याविरुद्ध बिथरविण्याचा प्रयत्न करू लागले. या प्रयत्नासंबंधी जोतिरावांनी सकृद्दर्शनी अत्यंत विलक्षण वाटणारे मत व्यक्त केले व ते त्यांचे मत आजसुद्धा बहुमतास आवडणार नाही. परंतु हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीने त्या मताचे मूल्य समजून घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ५७ सालाचे बंड फसले याबद्दल जोतिरावांना यत्किंचितही विषाद न वाटता आनंदच वाटला. त्यांनी त्याची कारणमीमांसा जी केली आहे ती शुद्ध शास्त्रीय दृष्टीला महत्त्वाची वाटेल अशीच आहे. ते म्हणतात, ''त्या बंडात इंग्रजी राज्य गेले असते तर इतिहासाची पुनरावृत्ती घडली असती. ब्राह्मण पेशव्यांच्या राज्याचा पुन: अवतार झाला असता. श्रुती स्मृती पुराणातील हिंदू संस्कृतीला पुन: जोर चढून शूद्र व अतिशूद्र असलेल्या बहुसंख्य जनतेची उद्धाराची आशा जी इंग्रजी राज्यामुळे अंकुरित झाली आहे, ती पार ठार झाली असती. सामाजिक अन्याय हा हजारो वर्षांचा आहे. याची मुळे फार खोल गेली आहेत. इंग्रजी राज्य आज आहे आणि उद्या नाही. मुख्य प्रश्न सामाजिक गुलामगिरी कशी नष्ट होईल हाच आहे.''(२)
(२) लोकांच्या श्रद्धेला असाच धक्का देणारा दुसरा विचार जोतिरावांनी शिवाजीबद्दल मांडला आहे. ते म्हणतात, ''शिवाजीराजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले व नवीन हिंदू राज्य स्थापिले याची काही गरज नव्हती. मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते. मुसलमानी राज्यात जातिभेदाचे प्रस्थ कमी होत चालले होते. जातिनिष्ठ पक्षपात नाहीसा होत चालला होता.'' जोतिरावांचे हे म्हणणे ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर दिसत नाही. कारण दक्षिणेतील बहामनी राज्य शिवाजीच्या काळात डबघाईस येऊन, प्रजेचा संसार नीट चालेनासा झाला व बेबंदशाही माजली. त्याकरिता शिवाजीराजाने नवीन राज्य स्थापना केली हे यथायोग्यच झाले. कार्यक्षम नसलेले राज्य नष्ट करणे हे एक थोर ऐतिहासिक कर्तव्यच ठरते. या सामाजिक गुलामगिरीचे मूळ ब्राह्मणी धर्मात व ब्राह्मणांनी निर्माण केलेल्या धर्मग्रंथात आहे.

फुले यांनी 'गुलामगिरी' या पुस्तकात पहिल्यांदा प्रामुख्याने हिंदू समाजावर हजारो वर्षे असलेल्या ब्राह्मणी विचारांचे, संस्थांचे आणि ब्राह्मणजातीचे वर्चस्व कसे स्थापन झाले याचा शोध लावण्याचा प्रयत्न केला आहे. कारण त्यांच्या मते हिंदू मनुष्याच्या जीवनावरील सामाजिक बंधने निर्माण करणारे अज्ञान वा अंधश्रद्धा ही ब्राह्मणनिर्मित आहे. भ्रामक, थोतांडी, अतिशयोक्तीपूर्ण, थापेबाज, अद्भुत, चमत्कारपूर्ण कल्पनांचे मायाजाळ उत्पन्न करून ब्राह्मणांनी हिंदू मनुष्यास जखडून टाकले आहे. या ब्राह्मण वर्गाने त्या समाजावर केव्हा व कसे आक्रमण केले व आधिपत्य स्थापन केले याचा इतिहास शोधणे

हे समाजसुधारणेचे महत्त्वाचे अंग आहे असे त्यांचे मत होते. हा इतिहास प्रत्यक्ष अधिकृत स्वरूपात उपलब्ध होत नाही; परंतु श्रुतिस्मृतिपुराणांतील कथांवरून त्याचे अनुमान काही प्रमाणात करता येईल म्हणून त्यांनी त्या कथांचा ऐतिहासिक अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. मुख्यत: दशावतारांपैकी परशुराम अवतारापर्यंतच्या कथांचा अभिप्राय ब्राह्मणी आक्रमण व विजय याचाच इतिहास असा त्यांनी काढला. त्यांनी त्या कथांचे सार असे काढले. (१) आर्य लोक इराणांतून जलमार्गाने हिंदुस्थानात दोनदा आले व त्यांनी येथील शेतकरीप्रधान समाजावर आक्रमण करून त्यांना जिंकण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट मत्स्य व कच्छ या दोन अवतारांवरून सूचित होते. हे दोन्हीही प्राणी जलचारी आहेत. (२) इराणांतील आर्यांना पूर्ण यश अजून लाभले नव्हते म्हणून त्यांना स्थलमार्गाने स्वाऱ्या कराव्या लागल्या. या स्वाऱ्यांचा इतिहास वराह, नारसिंह व वामन या तीन अवतारांनी सूचित केला आहे. वामन अवताराच्या काळात आर्य ब्राह्मणांना हिंदुस्थानावर अंमल बसविण्यात पूर्ण यश आले म्हणून त्यांनी परशुरामाच्या नेतृत्वाखाली आपला अंमल शाश्वत काळ टिकविण्याकरिता येथील लढवय्या म्हणजेच क्षत्रिय असलेल्या शूर लोकांची भयंकर कत्तल केली व त्या शूर लोकांचे वंशच निर्मूल करण्याकरिता त्यांच्या गर्भवती स्त्रियांचाही त्यांनी नाश केला. (3) आर्य ब्राह्मणांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे येथील लोकांवर राज्य केले व ते राज्य टिकविण्याकरिता जनतेस अज्ञानी व मूर्ख बनविणाऱ्या चालीरीती व कल्पना शिकविल्या. पुराणातील कथा म्हणजे लुच्चेगिरी, फसवणूक आणि थापेबाजी यांचे विशाल प्रदर्शनच होय. जातिभेदातील उच्चनीचता बहुजन समाजात कायमची फूट निर्माण करण्याकरिता उत्पन्न केली. कारण जित लोक आर्य ब्राह्मणांपेक्षा संख्येने जास्त असल्यामुळे त्यांच्यात फूट पाडूनच त्यांच्यावर स्वामित्व गाजविणे शक्य होते. अस्पृश्यता निर्माण केली; याचे कारण जे लोक आर्य ब्राह्मणांशी लढण्यात पुढे होते त्यांना पूर्ण शासन करण्याकरिता अस्पृश्यता निर्माण केली. खरे पाहिले तर वंशदृष्ट्या अस्पृश्य आणि स्पृश्य यांच्यात कसलाही फरक दिसून येत नाही.

वैदिक आर्यांचे विशेषत: ब्राह्मणांचे हिंदू समाजात श्रेष्ठ स्थान कसे निर्माण झाले याचे संशोधन गेल्या शतकात अनेक पाश्चात्त्य विद्वानांनी करण्याचा प्रयत्न केला आहे. वैदिक आर्य लोक हिंदुस्थानात बाहेरून आले व त्यांनी एतद्देशीय लोकांशी लढाया केल्या आणि त्यांस जिंकून त्यांच्यावर सामाजिक, धार्मिक व राजकीय आधिपत्य स्थापित केले असे त्यांचे मत आहे. त्याच मताशी जुळेल अशी कल्पना जोतिराव फुले यांनी अवतारकल्पनेवर बसविली आहे. ब्राह्मणांचे व तत्प्रणीत धर्माचे श्रेष्ठत्व स्थापित करण्याचा जो प्रयत्न इतिहासपूर्व काळात झाला असेल तो प्रयत्न सूचित करणाऱ्या अवतारविषयक बऱ्याच पौराणिक कथा आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु फुले यांनी त्या कथांतून तपशीलवार

इतिहास काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात त्यांना यश आले आहे असे म्हणता येत नाही. कारण त्या कथांमध्ये असंभवनीय अद्भुतपणा भरला आहे. मत्स्य, कच्छ, वराह व नारसिंह अशी रूपे धारण करणारा परमेश्वर पुराण कथांत सांगितला आहे. जोतिबांच्या मते ही रूपके आहेत. मत्स्य व कच्छ या एक प्रकारच्या नौका असाव्यात व त्यांच्यातून समुद्रावरून इराणी ब्राह्मण आर्यांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या असाव्यात अशी कल्पना फुले करतात; पण अशा कल्पना करावयास सूचक असे आधार सापडत नाहीत. दुसरे असे की, ब्राह्मण किंवा आर्य यांनी परदेशातून येऊन या देशावर आक्रमण केले हासुद्धा एक संभवनीय कयास आहे; परंतु निश्चित प्रमाण त्याबद्दल सापडत नाही. हिंदुस्थानातील ब्राह्मण हे वंशत: इतरांच्यापेक्षा निराळे आहेत याससुद्धा फारसे महत्त्वाचे प्रमाण सापडत नाही. म्हणून हिंदुस्थानातील ब्राह्मणी वर्चस्वाचे मूळ भिन्न वंशांच्या संग्रामात आहे किंवा एतद्देशीय व परदेशी यांच्या झगड्यात आहे ही कल्पना सिद्ध करण्यास फारशी प्रमाणे सापडत नाहीत. एकाच वंशातील किंवा एकाच देशातील समाजात व्यवसायभेद, आर्थिक उच्चनीचता आणि सांस्कृतिक उच्चनीचता ही पिढ्यान् पिढ्या दृढमूल झाली म्हणजे वर्गभेद उत्पन्न होऊन वर्गमूलक उच्चनीचभाव खोल रुजतो आणि कालांतराने त्याला जातिभेदाचे स्वरूप येऊ शकते. व्यवसायभेद, संस्कृतिभेद व आर्थिकभेद हा पिढ्यान् पिढ्या एकसारख्या स्वरूपात त्याच कुळामध्ये राहिला तर त्यास जातिभेद किंवा वंशभेद असे नाव प्राप्त होऊ शकते. ब्राह्मण व आर्य विरुद्ध ब्राह्मणेतर आणि अनार्य किंवा शूद्र असा फरक अतिप्राचीन काळी हिंदुस्थानात जो निर्माण झाला तो मुळात वर सांगितलेल्या सामाजिक कारणामुळेच उत्पन्न झाला असावा. माझ्या या विवेचनास पुष्टी देणारेही विधान फुले यांनी 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' या दोन्ही पुस्तकात केलेले आढळते. ते तेथे म्हणतात की, ''देशस्थ ब्राह्मण, मराठे, माळी इ. स्पृश्य जाती व महार, चांभार इ. अस्पृश्य या सर्व महाराष्ट्रीय जमाती एकाच वंशाच्या आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही.''

परदेशातील भिन्न वंशाच्या लोकांनी हिंदुस्थानच्या मूळच्या रहिवाशांवर आक्रमण केले व त्यामुळे हिंदू समाजात ब्राह्मण-ब्राह्मणेतर अथवा आर्य व शूद्र असे भेद उत्पन्न झाले, असे जे म्हटले जाते त्यास इंग्रजांच्या व मोगलांच्या इतिहासात घडलेल्या आक्रमणाचे उदाहरणच कारण झाले असावे असे दिसते. फुले हे ब्राह्मणच केवळ परदेशातून आले असे म्हणतात व पाश्चात्त्य विद्वान वैदिक आर्य परदेशांतून आले असे म्हणतात. वैदिक आर्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तिन्ही वर्णांचा समावेश ते करतात. फुले यांची कल्पना महाराष्ट्रातील वर्तमान सामाजिक रचनेवरून निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात व दक्षिण हिंदुस्थानात सनातनी मताच्या ब्राह्मण लोकांच्या मताने केवळ दोनच वर्ण आहेत. ते म्हणजे ब्राह्मण व शूद्र. ब्राह्मणाशिवाय बाकीचे सगळे हिंदू शूद्र होत अशी दक्षिणी ब्राह्मणांची

रूढ समजूत आहे. उत्तर हिंदुस्थानात, उदाहरणार्थ संयुक्त प्रांतात स्वत:स क्षत्रिय व वैश्य म्हणविणाऱ्या जाती आहेत. तेथील ब्राह्मणही त्यांना वेदाधिकारी आर्य समजतात. म्हणून दक्षिण हिंदुस्थानातील दोन वर्णांच्या अस्तित्व कल्पनेवरून फुले यांनी बांधलेले अनुमान टिकाव धरणारे नाही. परशुराम अवताराची कथा फुले यांच्या म्हणण्यास पुष्टी देणारी आहे, हे मात्र इथे ध्यानात ठेवले पाहिजे. कारण परशुराम हा ब्राह्मण असून त्याने क्षत्रियांच्या एकवीस वेळा कत्तली केल्या आहेत म्हणून क्षत्रिय हे ब्राह्मणांच्या आर्य वंशापैकी नव्हेत अशी फुले यांनी कल्पना केली असावी.

फुले यांचा ब्राह्मणी धर्मग्रंथावरील हल्ला मात्र अचूक होता असे म्हणण्यास हरकत नाही. चातुर्वर्ण्याची उत्पत्ती ब्रह्मदेवाच्या निरनिराळ्या अवयवांपासून झाली या कल्पनेवर त्यांनी झोड उठविली. दुसरे असे की, ब्राह्मणांच्या पावित्र्याच्या दंभाचा स्फोट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला तोही त्यांनी धर्मग्रंथांच्या आधारेच केल्यामुळे तो बिनचूक होता असे म्हणता येते. उदाहरणार्थ वेदकाळातील ब्राह्मण घोड्याचे व बैलाचे मांस खात होते आणि सोमाची दारू पीत होते ही गोष्ट कोणताही तज्ज्ञ अमान्य करू शकणार नाही. जोतिबा यांची धर्मग्रंथावरील टीका कठोर व जहरी आहे; परंतु त्यांनी इतिहाससंशोधन करीत असताना संस्कृत शब्दांची व मराठी शब्दांची व्युत्पत्ती लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात ते सपशेल फसले आहेत. त्यांनी त्या विषयात पडण्याची काही जरूरी नव्हती. कारण शब्दव्युत्पत्ती शोधणे हे भाषाशास्त्रज्ञाचे काम आहे. सामाजिक सुधारकाने त्या विषयाचा आपल्या कामास फायदा जरूर करून घ्यावा; परंतु तो विषय शक्य तितका टाळावा. श्री. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी याच छिद्राचा फायदा घेऊन फुले यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. चिपळूणकर त्या काळचे प्रतिगामी विचाराचे अध्वर्यू होत. खोटा देशाभिमान, अंधराष्ट्रभक्ती आज आपल्या देशात फार माजली असून विवेकबुद्धीने परंपरेची बंधने तोडण्याचे सामर्थ्यच लोकांच्या ठिकाणी दिसत नाही. या प्रवृत्तीचे महाराष्ट्रातील पहिले जनक म्हणून चिपळूणकरांचे नाव चिरस्थायी झाले आहे. चिपळूणकरांना जोतिराव फुल्यांच्या लेखनातील मूळ महत्त्वाची विधाने मुळीच खोडता आली नाहीत. एवढेच नव्हे तर ते त्या मुद्यांचा परामर्श सुद्धा घेण्यास धजले नाहीत.

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास म्हणजे ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यामधील झगड्यांचा इतिहास होय, असे ऐतिहासिक रहस्य फुले यांनी सांगितले आहे. आज जे शूद्र व अतिशूद्र म्हणून गणले जातात ते सर्व पूर्वी अतिप्राचीन काळी क्षत्रियच होते म्हणजे लढवय्ये लोक होते; आणि आर्यांनी म्हणजे ब्राह्मणांनी परदेशांतून येऊन या लोकांवर स्वाऱ्या केल्या, त्या स्वाऱ्यांत आर्यांचा जरी अनेक वेळा पराभव झाला तरी ते लोक अधिक कपटी आणि मायावी असल्यामुळे त्यांना एतद्देशीय शूर प्रजेवर आधिपत्य स्थापन करता आले असे

फुले यांचे म्हणणे आहे. येथील शूर क्षत्रियांनाच(४) (४) असीरियाच्या प्राचीन संस्कृतीचे ऐतिहासिक संशोधन अलीकडे बरेच झाले आहे. त्यावरून असीरियांतील प्राचीन लोकांची म्हणजे असुरांची संस्कृती जगातील अत्यंत प्राचीनतम होय, असे बहुतेक संशोधकांचे मत झाले आहे. हिंदूंच्या वेदांत असुर हे प्रजापतीचे ज्येष्ठ पुत्र होत, असे वारंवार म्हटले आहे. याच संस्कृतीशी समान असलेली संस्कृती सिंधू नदीच्या तीरावर पाच हजार वर्षांपूर्वी होती, असे निदर्शित करणारे पुरावे मोहोंजोदारो व हराप्पा येथे सापडले आहेत. यावरून हिंदुस्थानातील वैदिकपूर्व काळातील संस्कृती मानवदेहपूजक असुरांनी निर्माण केली असल्याचा फार संभव दिसतो. जोतिरावांच्या कयासास यामुळे दुजोरा मिळतो. असुर असे ब्राह्मणांच्या ग्रंथात म्हटले आहे, असे सांगून फुले यांनी पुराणातील प्रल्हाद व हिरण्यकश्यपु त्याचप्रमाणे बली व वामन यांच्या कथांचा अर्थ लावून त्यातून ब्राह्मण- ब्राह्मणेतरांचे द्वन्द्वयुद्ध या देशात प्राचीनकाळी कसे घडले याचे चित्र रेखाटले आहे. या फुले यांच्या विधानात सत्यांश असला तरी त्याचे तपशीलवार वर्णन बरेचसे काल्पनिक आहे, असे दिसून येते. बळी व वामन यांच्या कथेचे तात्पर्य सत्य असावे असे म्हणावयास हरकत नाही. ब्राह्मणेतर प्रजेमध्ये ज्या प्राचीन धार्मिक चालीरीती, उत्सव, सण, व्रते रूढ आहेत त्यांच्या समुच्चयास फुले यांनी येथील प्रजेचा मूळ धर्म असे म्हटले आहे. फुले हे ब्राह्मणेतरांच्या अवैदिक देवतांचा जो अर्थ लावतात तो भारतीय समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या देवतांपैकी व तत्संबद्ध चालीरीतींपैकी महत्त्वाच्या देवता व चालीरीती ब्राह्मणांनी सुद्धा स्वीकारलेल्या दिसतात. ब्राह्मणांनी अथवा वैदिक आर्यांनी जो धर्म स्थापिला त्या धर्माचे आणि ब्राह्मणेतरांच्या मूळ धर्माचे पुष्कळशा बाबतीत बेमालूम संमिश्रण झालेले दिसते. किंबहुना अनेक महत्त्वाच्या बाबीत एकजीवपणा आलेला दिसतो. त्यामुळे अवैदिक ब्राह्मणेतरांचे मूळचे धर्माचार, मूळच्या धार्मिक कल्पना व देवता कोणत्या हे शोधून काढणे मोठे गुंतागुंतीचे काम आहे. फुले यांनी दसरा व दिवाळी हे सण, रविवारची पवित्रता, खंडोबा-जोतिबा-बहिरोबा-मल्हारीमार्तंड इ. देव या गोष्टी ब्राह्मणेतरांच्या मूळच्या धर्मांतील आहेत असे ठरविले आहे. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांची उच्च संस्कृती धर्म आणि राज्यपद्धती बुडविण्याचा प्रयत्न केला आणि जन्मसिद्ध उच्चनीचभाव, अंधश्रद्धा, दाससंस्था आणि मनुष्यामनुष्यामधील समतेचा नाश करणारे तत्त्वज्ञान निर्माण केले. ब्राह्मणांच्या खऱ्या वर्चस्वाला बळीराजाच्या पाडावापासून सुरुवात झाली. ब्राह्मणेतर बहुजन समाजाच्या दुर्दैवास तेव्हापासून प्रारंभ झाला. बळीराजाच्या काळात न्याय व समता यांचे राज्य होते. जनता शांती आणि वैभव त्यावेळी भोगत होती म्हणून बलिप्रतिपदेच्या दिवशी कार्तिक महिन्यात त्याचप्रमाणे भाऊबीजेस ब्राह्मणेतर भगिनी 'इडापिडा जावो व बळी राजाचे राज्य येवो' अशी अमर आशा व्यक्त करीत असतात. बळीराजा व त्याच्या पूर्वीची राजसत्ता जेव्हा हिंदुस्थानात होती तेव्हा त्या राजसत्तेचे कार्य लोकांच्या स्वातंत्र्याचे

व समतेचे रक्षण करणे हेच होते. म्हणून फुले असे म्हणतात की, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका येथील लोकसत्ता व नागरिक समतेचे हक्क या दोन तत्त्वांचा विजय म्हणजे बळीराजाच्या राज्यपद्धतीचा विजय होय. ब्राह्मणधर्माचा म्हणजे वर्णाश्रम, जातिभेद श्रुतिस्मृतिपुराणे आणि संतांचा भागवतधर्म यांचा अंमल जोपर्यंत हिंदुस्थानातील जनतेच्या मनावर आहे, तोपर्यंत नागरिक समता किंवा मानवी समता या देशात स्थापित होणार नाही. फुले असे म्हणतात की, वेदविद्या ही जादूमंत्रांची विद्या आहे आणि ब्राह्मणांनी वेदांचे महत्त्व वाढवून जादूटोण्याच्या नादी समाजाला हजारो वर्षे लावले आहे. मंत्रसामर्थ्याचे खोटे महात्म्य इतके वाढविले की, त्याच्यापुढे जगातील सगळी सामर्थ्ये निस्तेज पडतात अशी मिथ्या कल्पना लोकांच्या ठायी रुजविली. त्यामुळे लोक अधिक भोळे बनले आणि कोणत्याही गोष्टीचा तारतम्य विचार आणि सत्यासत्याची परीक्षा करावयास लावणारी मनोभूमिकाच लोकांच्या ठिकाणी राहिली नाही. वेदविद्येतील जादूचे थोतांड ब्राह्मणेतर जनतेच्या समोर उघडकीस येऊ नये आणि त्यामुळे आपले प्रस्थ कमी होऊ नये याकरिता ब्राह्मणेतरांना वेदपठणाची बंदी केली. भ्रमाच्या साम्राज्यात लोकांना ठेवून त्यांची मनसोक्त लूट करण्याचा एक महत्त्वाचा उपाय जादूमंत्राच्या विद्येत दिसून येतो. फुले यांच्या या विधानात बराच सत्यांश आहे; परंतु वेदविद्या म्हणजे केवळ मंत्रतंत्रांच्या जादूंची विद्या होय असे म्हणता येणार नाही. त्यात सुंदर काव्य आहेत, उदात्त प्रार्थना आहेत आणि आध्यात्मिक तत्त्वज्ञानही आहे. जादूचा भाग त्यात पुष्कळ आहे ही गोष्ट मात्र खरी आहे. पाऊस, संतती, धन व पशू इत्यादिकांच्या लाभार्थ आणि रोग, शत्रू आणि इतर अनेकविध आपत्ती नष्ट होण्याकरिता वेदशास्त्रात अनेक क्रिया सांगितल्या आहेत व त्यास जादू म्हणता येते. अथर्ववेद तर जादूचा खजिनाच आहे.

बौद्ध धर्माबद्दल फुले यांचे म्हणणे शास्त्रीय इतिहासाची दृष्टी असलेल्या विद्वानास मान्य होण्यासारखी आहे. ब्राह्मणांच्या यज्ञप्रधान धर्माविरुद्ध बुद्धाने प्रचंड आंदोलन करून संयम आणि नीती यांना प्राधान्य देणारा धर्म स्थापिला; परंतु शंकराचार्य व इतर ब्राह्मणांनी पराभूत ब्राह्मण धर्मात काही फेरबदल करून पुन: रचना केली असे फुले यांचे म्हणणे आहे. भक्तिप्रधान भागवतधर्म हा जनतेचा खरा धर्म आहे अशी अनेक विद्वानांची समजूत आहे. त्याबद्दल फुले यांचे म्हणणे असे की, भागवतधर्म व त्याचा पुरस्कार करणारे संत कवी यांनीसुद्धा अप्रत्यक्षपणे ब्राह्मणधर्माच्याच बंधनांना सबळ केले. कारण त्यामुळे कर्मविपाकाचा म्हणजेच दैववादाचा सिद्धांत लोकांच्या मनावर पक्का ठसविला. भगवत्‌गीता व भागवत यात ब्राह्मण धर्माचे म्हणजे जातिभेद, पुनर्जन्म, कर्मविपाक इ. सिद्धांत सांगितले असल्यामुळे त्याचाच पगडा लोकांच्या मनावर पक्का बसला. त्यामुळे लोक हतबुद्ध, कर्तृत्वशून्य व दास्यप्रिय राहिले. कारण भागवत धर्माप्रमाणे ‘देवाने ठेविले तैसेचि राहावे’ असा नेभळेपणाचा उपदेश केला असल्यामुळे लोक परंपरागत समाजरचनेचे बंदे गुलाम राहिले. फुले यांचे हे म्हणणे कटू

असले तरी सत्य आहे. भागवतधर्मात मूर्तिपूजेचे सर्व प्रकार आहेत. तीर्थयात्रा, मंदिरसंस्था, जप, अनुष्ठान, व्रते, भजन, अन्नसंतर्पण, गुरु व बुवा यांची सेवा इत्यादी व्यर्थ धर्माचार भरले आहेत. फुले यांच्या मते, या गोष्टीत मनुष्याच्या वेळाचा, श्रमाचा आणि धनाचा अपव्यय होतो. स्वर्ग, नरक, पुनर्जन्म इत्यादी भ्रामक कल्पना भागवतधर्मात सुद्धा भरपूर आहेत. मनुष्याने निर्माण केलेले धर्मग्रंथच ईश्वरनिर्मित म्हणून भागवतधर्म प्रमाण मानतो. यास्तव भागवतधर्म मानवाला शुद्ध सत्य शिकवत नाही असे म्हणावे लागते.

फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून ब्राह्मण धर्माविरुद्ध मोहीम सुरू केली. ब्राह्मणांनी स्थापित केलेल्या हिंदू धर्मापेक्षा श्रेष्ठ, किंबहुना जगातील प्रचलित कोणत्याही धर्मापेक्षा उच्चतर व श्रेयस्कर तत्त्वांच्या आधारावरच ब्राह्मणप्रणीत हिंदू धर्माविरुद्ध चळवळ करणे हे सफल होऊ शकेल अशी कल्पना त्यांना पूर्णपणे होती. त्यांनी जाहीर केले की, जगातील प्रत्येक प्रस्थापित व प्रचलित धर्म हा मनुष्यावर होणाऱ्या काही अन्यायावर तरी आच्छादन घालतो व सत्याचा काही अंश तरी लपवू इच्छितो. सर्व मनुष्यजातीचे बंधुत्व व शुद्ध सहकार्य यांच्या आड आजच्या जगातील धर्मभेद येत आहेत व विशिष्ट धर्माच्या अभिमानाने मनुष्यजातीचे तुकडे पडले असून वैराचे बीज कायमचे रोवले गेले आहे. धर्माभिमानाने मनुष्यजातीचे रक्त अनेक वेळा वाहिले आहे. सर्व मानवांचे ऐक्य हे एक श्रेष्ठ सत्य आहे आणि सत्याचा अपलाप व नाश धर्माभिमान करतो. धर्माभिमानाने मनुष्यजातीची प्रगती करावयाच्या ऐवजी आणि तिची आत्मशुद्धी व आत्मोद्धार करावयाचच्या ऐवजी तिचा महान अध:पात केला आहे. म्हणून प्रचलित सगळे ऐतिहासिक धर्म मनुष्यजातीत सत्याची संपूर्ण स्थापना करू शकत नाहीत. जी धर्माभिमानाची गोष्ट तीच राष्ट्रवादाची किंवा देशाभिमानाची गोष्ट होय. देशाभिमान हा अत्यंत अपवित्र आहे. देशाभिमानाने किंवा राष्ट्रवादाने एक मानव संघ दुसऱ्या मानव संघावर आक्रमणास नेहमी सज्ज राहतो. त्याच्यामुळे युद्धे होतात आणि मनुष्याचे कर्तृत्व वाया जाते. लढाईकरिता राष्ट्रांना सज्ज राहावे लागते व त्यामुळे प्रचंड लष्करी खर्च करावा लागतो. त्यामुळे देशातील लोकांवर, विशेषत: शेतकऱ्यांवर कराचा फाजील बोजा पडतो. मनुष्यजातीतील युद्धे आणि आक्रमणे बंद पडली पाहिजेत व त्याकरिता धर्माभिमान-राष्ट्राभिमान या विकृत व हीन मनोगंडरूपी भावना नष्ट केल्या पाहिजेत.

फुले यांनी नव्या विधायक तत्त्वांची मांडणी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात केली आहे. या पुस्तकाच्या द्वारे फुले यांनी सत्यशोधक समाजास जीवनाचे नवे तत्त्वज्ञान दिले आहे. धर्मभेद व राष्ट्रभेद यांच्या विरुद्ध महान सत्य पहिल्यांदा फुले यांनी असे सांगितले आहे की, सगळी मनुष्यजाती ही एक आहे आणि सगळ्या मनुष्यजातीचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे हेच मनुष्यत्वाचे ध्येय होय. सर्व मानव स्त्री

किंवा पुरुष यांचे हक्क सारखे आहेत. मानव किंवा कोणताही मानवसमुदाय यास दुसऱ्या मानवावर व मानवसमुदायावर स्वामित्व गाजविण्याचा किंवा जबरदस्तीचा अधिकार नाही. परमेश्वराने सर्व मानवांना जन्मत:च धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य दिले आहे. त्याच्यावर आक्रमण करणारा सत्याचा शत्रू होय. राजकीय व धार्मिक मतामुळे कोणतीही व्यक्ती उच्च किंवा नीच मानून तिचा छळ करणे म्हणजे सत्याचा द्रोह करणे होय. प्रत्येकास आपल्या धार्मिक, राजकीय इ. संबंधीच्या मतांचा प्रचार करण्यास संपूर्ण अधिकार आहे. सर्वांना ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेष्ट उपभोग घेण्याचा सारखाच अधिकार आहे. शेतकी, कलाकौशल्य, मजुरी इत्यादी कामे मनुष्यास हीनपणा आणीत नसून त्यांच्यायोगे मनुष्याची थोरवीच सिद्ध होते. सृष्टीच्या कार्यकारणभावाचा अर्थ समजून घेऊन त्या सृष्टीचा किंवा निसर्गशक्तीचा मनुष्याच्या गरजा भागविण्याकरिता उपयोग करणे हा मनुष्याचा मूलभूत अधिकार व कर्तव्य होय. ईश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीत प्रयत्न केल्यास, सर्व मनुष्यास त्याचा स्वर्ग बनविता येईल. या विश्वात जगण्याकरिता आणि उपभोगाकरिता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळविणे हे मनुष्याचे पहिले कर्तव्य आहे आणि त्याकरिता परस्परांना साहाय्य करणे हा मनुष्याचा श्रेष्ठ धर्म आहे. एवढेच नव्हे तर हीच ईश्वराची पूजा आहे. भजन, नामस्मरण, जप या गोष्टींची ईश्वराला गरज नाही. कारण तो सर्व विश्वाचा स्वामी आहे. त्याला माणसाच्या स्तुतीची, पूजेची, भक्तीची मुळीच गरज नाही. बायबलमध्ये येशू ख्रिस्ताने माणसाने माणसाशी कसे वागावे यासंबंधी जो पर्वतावर उपदेश केला आहे तो जर माणसाने अमलात आणला तर मनुष्यजातीचे जीवन पूर्ण सफल झाले असे समजावे.

फुले यांनी वर सांगितलेले सत्य म्हणजे मनुष्याच्या हजारो वर्षांच्या परिश्रमाने संपादन केलेल्या संस्कृतीचे आणि ज्ञानाचे सार आहे, असेच म्हटले पाहिजे. फुले यांनी सत्यज्ञानाचे साधन किंवा प्रमाण कोणते याच्यासंबंधी चर्चा केली आहे. शुद्ध सत्य जर धर्मग्रंथांमध्ये नाही; ऋषी, गुरू, अवतार व ईश्वर प्रेषित यांच्यामध्ये सापडत नाही तर ते सापडावे कोठे? फुले म्हणतात, ते मनुष्याच्या विवेकबुद्धीत सापडते. निसर्गातील सत्य व नैतिक सत्य ही दोन्ही प्राप्त करून देणारी बुद्धी (Reason) मनुष्यात स्वाभाविकपणे वसत आहे. सृष्टिकर्त्यानेच मनुष्यजातीला ती नैसर्गिक देणगी दिली आहे. ईश्वराने धर्मग्रंथ दिले नाहीत, तो अवतार घेत नाही, ऋषिमुनी, साधूसंतांना दर्शन देऊन उपदेश करीत नाही किंवा कोणत्याही एका भाग्यवान तपस्वी व्यक्तीच्या हृदयात तो स्फूर्ती उत्पन्न करीत नाही, त्याने मनुष्याला एकदाच एकच एक ज्ञानाचा दिव्य ठेवा दिला आहे, तो म्हणजे बुद्धी होय.

फुले हे ईश्वराची कल्पना सोडल्यास इतर सर्व बाबतीत पूर्ण बुद्धिवादी दिसतात. त्यांना कोणतीही धर्मसंस्था मान्य नाही. विवेकबुद्धी (Conscience) आणि बुद्धी (Reason) यांचे अत्यंत पृथक अस्तित्व ते मान्य करीत नाहीत. पूजा, भक्ती, प्रार्थना, नामस्मरण, जप इत्यादी गोष्टींची त्यांच्या ईश्वराला गरज नाही. एवढेच नव्हे तर मनुष्याने या गोष्टी

करण्याची आवश्यकता नाही, त्या निष्फल आहेत, असे त्यांचे मत आहे. परलोक, पुनर्जन्म, स्वर्ग, मोक्ष, कर्मविपाक इत्यादी गोष्टी त्यांना मान्य नाहीत. याचा अर्थ असा दिसतो की, कोणत्याही प्रकारची धर्मसंस्था उत्पन्न होईल अशा तऱ्हेचा ईश्वर त्यांना मान्य नाही. ईश्वराचा साक्षात्कार होणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे तो ईश्वर कोणास तारीत नाही व मारीतही नाही. तो कोणावर अनुग्रह करीत नाही किंवा कोणावर कोपतही नाही. त्याने विश्व निर्माण केले, विश्वाचे नियम केले आणि ते नियम जाणू शकेल असा मानव त्याने निर्माण केला. मानवाला बुद्धी दिली व त्या बुद्धीचा उपयोग करण्याचे सामर्थ्य दिले. त्या माणसाने स्वर्गमोक्षाकरिता किंवा ईश्वरदर्शनाकरिता प्रयत्न करू नये. कारण त्या सगळया गोष्टी अशक्य आहेत. मनुष्याने या जगातील जीवनच उत्तम तऱ्हेने भोगता येईल असा प्रयत्न करावा. ईश्वराची कल्पना फुले यांना त्यांच्या स्वत:च्या तार्किक व तात्त्विक समाधानाकरिता आवयक वाटली असे दिसते. ज्या ईश्वरातून मंदिरे आणि पुरोहितवर्ग उत्पन्न होईल असा ईश्वर त्यांनी अमान्य केला. फुले हे माळी असल्यामुळे त्यांना निसर्ग सुपीक बागायत जमिनीसारखा वाटला. ज्या जमिनीच्या पृष्ठभागावर पाणी वाहत नसून आतून खोलात पाण्याचे प्रवाह आहेत अशी ही जमीन आहे. मनुष्याने श्रम केल्यास ती बाग - ती सृष्टी पुष्पित व फलित होईल. त्याची सुंदर बहरलेली बाग बनेल - नव्हे त्याचे नंदनवन बनेल. मात्र त्याकरिता ज्ञान आणि प्रयत्न यांची जोड पाहिजे. त्यावाचून निसर्ग म्हणजे मनुष्याचे मृत्युस्थान आहे. तहान, भूक व रोग हे त्याचे दूत या निसर्गात माणसाचा बळी घेण्यास टपले आहेत. बुद्धी व प्रयत्न हेच माणसाला त्याच्यापासून सोडवितात.

फुले यांचे वरील विचार उदात्त व शाश्वत मानवी मूल्यांनी भारलेले आहेत यात शंका नाही. त्यांनी हे विचार मांडीत असता जी भाषा वापरली त्या भाषेत जळजळीत भावनांचा आवेश भरला आहे. वर्तमानकाळाच्या मर्यादा उल्लंघून अत्यंत पुरातन भूतकाळात आणि दूरच्या भविष्यकाळात अवलोकन करण्याची ताकद असलेली प्रतिभा त्यांच्यात आहे. अन्यायाविरुद्ध व जुलुमाविरुद्ध भयंकर चिडून जाऊन त्यांची ब्राह्मणजातीवर व ब्राह्मणी हिंदू धर्मावर सूड उगविण्याची महत्त्वाकांक्षा धगधगलेली त्यात दिसते. परंतु या कार्याकरिता आवश्यक असलेल्या विविध विद्याविषयक पांडित्याची सामग्री फारच तुटपुंजी आहे. या दोषास मात्र स्वत: ते जबाबदार नाहीत. कारण त्या काळी समाजाच्या ज्या थरात ते उत्पन्न झाले व वाढले त्यात शिक्षणप्रवृत्तीचा संपूर्ण अभावच होता. त्यांच्या लेखनात अश्लील शिव्याशाप आहेत आणि भाषेत बोजडपणा व ओबडधोबडपणा आहे. त्यामुळे त्यांचे लेखन सुशिक्षित वर्गात प्रतिष्ठा पावू शकले नाही. कै. अण्णासाहेब शिंदे हे त्यांच्या लेखनाबद्दल असे म्हणत की, - ''हे रानफळ आहे.'' तात्पर्य हे रसाळ नाही; परंतु त्यात औषधी गुणधर्म फार आहेत. फुले यांच्या लेखनातील हिंदूंच्या प्राचीन सामाजिक इतिहासासंबंधी महत्त्वाच्या सूचक कल्पनांच्या आधारे शिंदे, बी. व्ही. जाधव आणि डॉ. आंबेडकर यांनी समाजशास्त्रीय

इतिहास संशोधनपर ग्रंथ व निबंध लिहिले आहेत. यावरून नैसर्गिक बुद्धिमत्ता विद्वत्तेच्या अभावीसुद्धा किती लांब पल्ला गाठू शकते याची कल्पना करता येईल.

दक्षिण हिंदुस्थानात ब्राह्मणेतर चळवळीचा पाया फुले यांनी घातला. ती चळवळ 1935 सालपर्यंत टिकून होती; परंतु ती चळवळ आज ओसरली आहे. याचे कारण त्या चळवळीचे सामाजिक कार्य संपले, असेही कोणी म्हणू शकेल. फुले यांनी ज्या व्यापक उद्देशाने त्या चळवळीला प्रारंभ केला त्या उद्देशाचे आज साफल्य झाले आहे असे जर कोणी म्हणेल तर ते मुळीच यथार्थ नाही. सरकारसंस्थेमधील आणि समाजातील उच्च व्यवसायातील ब्राह्मण जातीचे महत्त्व नष्ट करणे हाच या चळवळीचा उद्देश होता असे जर म्हटले तर तो उद्देश 1935 सालच्या राज्यघटनेनंतर मोठ्या अंशी सफल झालेला आहे असे म्हणता येते. परंतु त्या चळवळीचा उद्देश हिंदी समाजात बुद्धिवादाच्या युगाची स्थापना करून जनतेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दास्याचा अंत करणे हा होता असे म्हटले तर तो उद्देश सफल होण्याच्या ऐवजी फार दुरावला गेला आहे असे म्हणण्यास फार मोठा पुरावा आपल्या सामाजिक जीवनात सापडतो.

वर सांगितलेल्या विशाल ध्येयाच्या स्फूर्तीने प्रवृत्त होणाऱ्या नेतृत्वाच्या ऐवजी आत्यंतिक जातिवादी व ब्राह्मण जातीच्या विरुद्ध संकुचित स्पर्धेने प्रेरित झालेल्या नेतृत्वाने सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ पराभूत झाली असेच इतिहास सांगतो. मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा आणि 1935 सालचा घटना कायदा यांच्या योगे लोकलबोर्ड, म्युनिसिपालट्या आणि कायदेमंडळे यांच्यात मागासलेल्या ब्राह्मणेतरांच्या प्रतिनिधींचे बहुमत सगळीकडे होऊ लागले. त्याचप्रमाणे गेल्या तीस वर्षांतील सरकारी धोरणात मागासलेल्या वर्गांना सरकारी नोकरीत मोठ्या प्रमाणात भरणा करावयाचा हे तत्त्व गोविले गेले. यामुळे मागासलेल्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची महत्त्वाकांक्षा पुरी झाली. सरकारी कारभारात मोठ्या प्रमाणात त्यांना जागा मिळू लागल्या, त्यामुळे त्यांच्या अल्पसंतुष्ट वृत्तीचे समाधान झाले. ब्राह्मणेतर चळवळ मारून टाकण्याचे श्रेय दुसऱ्या एका महत्त्वाच्या संस्थेकडे व चळवळीकडे जाते; ती संस्था म्हणजे काँग्रेस होय व ती चळवळ म्हणजे इंग्रजी राज्याविरुद्ध निर्माण झालेली राष्ट्रीय चळवळ होय. काँग्रेसने व राष्ट्रीय चळवळीने ब्राह्मणेतर पुढारीपण मोठ्या प्रमाणात गिळून टाकले आणि बहुजन समाजास मोहक अशा राष्ट्रीय विचारसरणीने भाळून टाकले. मूलभूत मानवी हक्कांच्या कल्पना व लोकसत्तेची तत्त्वे यांचा योग्य अर्थ सांगून जनतेत लोकसत्तात्मक क्रांतीस आवश्यक असलेली जागृती व मानवी हक्काची खोल जाणीव ब्राह्मणेतर चळवळ जनतेत उत्पन्न करू शकली नाही. याचा फायदा भांडवलदार व देशातील इतर प्रतिगामी वरिष्ठ वर्ग यांच्या हितसंबंधांना संपूर्ण संरक्षण देणाऱ्या राष्ट्रीय चळवळीने घेतला. त्या चळवळीने असा एक खोटा भ्रम जनतेत उत्पन्न केला, की तुमच्या सर्व अवनतीस इंग्रजी राज्य जबाबदार आहे. ते गेले म्हणजे आपण सगळे एकाच राष्ट्रभूमीचे पुत्र असलेले बंधू

बंधू एकत्र राहू आणि आपल्या जीवनातले सगळे प्रन आपसात सलोख्याने सहज सोडवू. जनता 'हुरळली मेंढी व लागली लांडग्यापाठीमागे' अशा रीतीने स्वातंत्र्याच्या चळवळीचा खरा अर्थ विसरून जाऊन एतद्देशीय वरिष्ठ वर्गाच्या हातात सत्ता संक्रमण करणाऱ्या चळवळीत बेगुमानपणे सामील झाली. हा धोका फुले यांनी ओळखला होता. म्हणून त्यांनी देशाभिमानावर जागोजागी टीकास्त्र सोडले आहे. त्याकरिता त्यांनी राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेवरच शस्त्र उचलले आहे. इंग्रज व मुसलमान हे परके लोक आहेत ही कल्पना अत्यंत दुष्ट आहे, सगळी मानवजात एकच आहे. मुख्य झगडा सामाजिक किंवा राजकीय दास्यनाशाचा व मानवी स्वातंत्र्याचा होय, ही कल्पना त्यांनी वारंवार सांगितली आहे.

खडकाला अंकुर फुटणे जितके अशक्य, तितकेच राष्ट्रीय चळवळीला शेतकरी-कामकरी राज्याचे फळ येणे अशक्य आहे. शेतकरी-कामकरी राज्याच्या चळवळीला लागणारी विचारसरणी किंवा तत्त्वज्ञान आणि राष्ट्रीय चळवळीचे तत्त्वज्ञान यांच्यातील विरोध अत्यंत मूलभूत असतो. शेतकरी-कामकरी राज्याची स्थापना मानवी समानता व स्वातंत्र्य या तत्त्वावर होत असते. राष्ट्रीय स्वराज्याची स्थापना पूर्वपरंपरेचा अभिमान व राष्ट्रांतील उच्चनीच सर्व वर्गांच्या हितांचा वंचनापूर्ण समन्वय या कल्पनांवर होत असते. शेतकरी-कामकरी राज्य सनातनी परंपरा नष्ट केल्याशिवाय आणि देशातील उच्चनीच वर्गांची रचना उच्छिन्न केल्याशिवाय होऊ शकत नाही. हिंदी राष्ट्रीय चळवळ ही पूर्वपरंपरेच्या अभिमानावर आणि चालू समाजरचनेला कायम ठेवण्याच्या भावनेवर उभारली गेली आहे. म्हणून ती चळवळ जे स्वराज्य उभे करीत आहे त्यात बहुजन समाज हा सामाजिक व आर्थिक दास्यात तसाच कायम राहील अशाच मूलभूत कायद्याच्या घटनेवर उभारले जात आहे. कारण या देशातील वरिष्ठ भांडवलदार व कारखानदार यांचा त्या स्वराज्याला जो पाठिंबा आहे तो त्यांच्या अस्तित्वाची शाश्वती देणाराच स्वराज्याचा मूलभूत कायदा होणार आहे, असा त्यांना विश्वास आहे. म्हणून जनता अज्ञानी असल्यामुळे तिची फसवणूक होऊ शकते व खोट्या समजुतीने ती कोणत्याही चळवळीत सामील होऊ शकते. गुलाम आपल्या गुलामगिरीचा पाश निर्माण करणारी चळवळ करण्यास मागे पुढे पाहत नाही, ही गोष्ट फुले यांनी अनेकवार सांगितली आहे. परंतु वरिष्ठ वर्ग हे शिक्षित आणि व्यवहारात मुरलेले असल्यामुळे ते स्वत:ची फसवणूक होऊ देत नाहीत. त्यांचा स्वत:च्या हितसंबंधांवर जागरूक पहारा असतो. फुले यांनी जी सत्यशोधक चळवळ निर्माण केली तिचा हेतू मागासलेल्या जनतेच्या हितसंबंधांचे रक्षण करणारा जागरूक, बुद्धिवादी, लढाऊ, कर्तबगार शिक्षक वर्ग निर्माण करणे हा होता. सत्यशोधक चळवळ निमाली आहे, याचा अर्थ उघड आहे. बहुजन समाजाला अजून कित्येक वर्षे शेतकरी-कामकरी राज्याचे नुसते स्वप्नच पाहावे लागेल. कदाचित ते स्वप्नसुद्धा दिसू नये असा बंदोबस्त करणारे स्वराज्य लवकरच उत्पन्न होईल. त्या स्वराज्यात अज्ञानाच्या मोहनिद्रेत गाढ झोपलेली जनताच

आपणास पाहावयास सापडेल. माझे काम धोक्याची सूचना देणे एवढेच आहे. मी फुले यांचे विचारात ती धोक्याची सूचना आहे हे पाहिले म्हणून फुले यांच्या थोर विचारांचा परामर्श घेतला. जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे व कठीण कार्य आहे. खरा विचार जर उत्पन्न झाला तर ती जनता हजारो वर्षांच्या सामाजिक बंधनांचा नाश करून अभूतपूर्व प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याचे दिव्य युग निर्माण केल्याशिवाय राहणार नाही. त्याकरिता जनतेच्या खऱ्या शिक्षकांची वाण आहे. ते ज्या दिवशी जनतेत सर्वत्र संचार करू लागतील त्या दिवशीच स्वातंत्र्याचा सूर्य उदय पावेल व तो कधीही मावळणार नाही. त्याच्या प्रकाशात जोतिबांची विचारमूर्ती शाश्वत काळपर्यंत तळपत राहील.

ooo

२

# गांधी आणि ख्रिस्त

(* ब्राह्म समाज, वाई; तर्फे दि. २५ फेब्रुवारी, १९४९ रोजी लोकमान्य टिळक स्मारक मंदिर, वाई येथे दिलेले व्याख्यान.)

## बुद्धापेक्षा ख्रिस्ताशी साम्य

बुद्धांचा अहिंसा सिद्धान्त गांधींच्या योगाने आधुनिक जगात पुन्हा दुमदुमू लागला. परंतु बुद्ध आणि गांधी यांच्यात तात्त्विक साम्य असले तरी दोघांच्या जीवनांत फारसे साम्य नाही. बुद्ध हा तत्त्ववेत्ता होता. गांधी बुद्धासारखे साधु होते, पण तत्त्ववेत्ते नव्हते. त्यांचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जीवनात प्रकट होत असे.

गांधींची तुलना ख्रिस्ताशी केली जाते. ख्रिस्ताचं तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनात भरून राहिले होते. तत्त्वज्ञान म्हणजे सूक्ष्म अशा मूलभूत तत्त्वांची सविस्तर सूत्ररूप मांडणी. मूलभूत अव्यक्त कल्पना ख्रिस्ताने मांडल्या नाहीत. ख्रिस्तामध्ये व गांधींमध्ये कालाचे महदंतर पडलेले आहे. ख्रिस्ताच्या भोवती असलेल्या सामाजिक वातावरणात तत्त्ववेत्ता तयार होणे अशक्य होते. गांधींच्या भोवतालचे वातावरण ख्रिस्ताभोवतालच्या प्रमाणे नव्हते. परंतु तात्त्विक अनुभूती गांधीजींच्या जीवनात प्रत्यक्ष वर्तनांत प्रकट झाली. त्यामुळे आधुनिक मानव विस्मित झाले. ख्रिस्ताची आणि गांधींची तात्त्विक अनुभूती फार खोल व समान स्वरूपाची होती. म्हणून अनेकांनी गांधींची ख्रिस्ताशी तुलना केली. अशी तुलना करून नकळत गांधींच्या वधाचेही भविष्य ध्वनित केले गेले असे म्हणावे लागते.

## ख्रिस्ताच्या जीवनाचा परिणाम

ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा गांधींच्या जीवनावर खूप परिणाम झालेला दिसतो. गांधींनी बायबलचे नीट मनन केले होते. टॉलस्टॉय आणि रस्किन या दोन ख्रिस्त भक्तांच्या विचारांचेही

गांधीजींनी परिशीलन केले होते. टॉलस्टॉय आणि गांधी यांचा पत्रव्यवहारही झाला होता. गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील आपल्या प्रयोगवस्तीस टॉलस्टॉय फार्म असे नाव दिले होते. शत्रुचीही सद्बुद्धी जागृत होऊन त्याचे कल्याण व्हावे अशी ख्रिस्ताची सदैव इच्छा. मरताना ख्रिस्त म्हणाला, "देवा, ज्यांनी मला देहान्त शासन दिले, त्यांना क्षमा कर. कारण आपण काय करतो, हे त्यांना कळत नाही." लोकांच्या पापाचे स्वतः प्रायश्चित घेऊन लोकांना पापमुक्त करावे ही उदार तपश्चर्येची भावना ख्रिस्ताच्या जीवनापासून गांधी शिकले. असहकारितेच्या चळवळीत १९२१ साली चौरी चौरा येथे अत्याचार झाले. पोलिसांचे खून झाले, त्या वेळेस आपल्या राजकीय इभ्रतीची पर्वा न करता गांधींनी असहकारितेची चळवळ थांबविली. अत्याचाराचे प्रायश्चित्त म्हणून त्यांनी पाच दिवस उपवास केला. आश्रमातील अनुयायांचेही काही निषिद्ध वर्तन घडले तर ते उपवास करीत. आपल्या सभोवतालच्या

लोकांच्या पापाची जबाबदारी कर्तृत्ववान पुरुषांवर येऊन पडते. ही कल्पना ख्रिस्ताची आहे. हिंदू-मुसलमानांच्या एकीकरता मी माझे रक्तही अर्पण करीन असे गांधीजी कित्येक वर्षांपासून म्हणत. ख्रिस्ताने धर्मेतिहासातला शेवटचा यज्ञ केला. तो म्हणजे आत्मयज्ञ. माणसाच्या अनादी पापांची निष्कृत्ती व्हावी म्हणून तो आत्मयज्ञ असे ख्रिस्ताचे चरित्र सांगते. गांधींच्याही चरित्राची परिसमाप्ती हिंदी लोकांची जातीय द्वेषापासून मुक्तता करण्याकरता केलेल्या आत्मयज्ञाने झाली. दुःख सहन करण्याची आणि नैतिक ध्येयाकरिता आत्मयज्ञ करण्याची महती यांचा प्रतिध्वनी गांधींच्या जीवनात निरंतर घुमून राहिलेला दिसतो.

## दीनदरिद्र सेवा

दरिद्री, पतित आणि बहिष्कृत यांचा पक्ष घेऊन त्यांच्या सेवेत जीवन घालविणे हे तत्त्व ख्रिस्तोपदेशामुळेच गांधींना अत्यंत उत्कटपणे पटले होते. गरीब आणि पतित हेच स्वर्गाचे खरे वारसदार, तेच स्वर्गाला पात्र, असे ख्रिस्ताच्या पर्वतावरील उपदेशाचे सार आहे. अस्पृश्योद्धाराच्या गांधीप्रणीत चळवळीत हेच सार प्रतिबिंबित झाले आहे. गरीब व पतित हे ईश्वराचे लाडके, हे वायबलमधील धर्ममत गांधींनी अस्पृश्यांना दिलेल्या 'हरिजन' या संज्ञेत प्रतिबिंबित झालेले दिसते.

## संन्यासवादी नीतिशास्त्र

अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, इंद्रियनिग्रह, अपरिग्रह इत्यादी तत्त्वांचा निरपवाद पुरस्कार हिंदू धर्माने, बुद्ध धर्माने आणि ख्रिश्चन धर्माने सारखाच केला आहे. प्रेमाने क्रोधास जिंकावे, असत्यास सत्याने जिंकावे, दुष्टास साधुत्वाने जिंकावे असा बुद्धधर्म व हिंदुधर्म यांचा उपदेश आहे. परंतु या बाबतीत गांधींच्या विचारात ख्रिश्चन शिकवणीचा परिणाम अधिक दिसून येतो. स्त्री आणि पुरुष यांचा म्हणजे पती आणि पत्नी यांचा शरीरसंबंध गृहस्थ धर्माप्रमाणे अपवित्र नाही असे हिंदुधर्म समजतो. गांधींजी पतिपत्नी यांचा संबंधदेखील विवाहबाह्य

लैंगिक व्यवहाराप्रमाणे अपवित्र मानतात. १९३७ साली गांधीसेवासंघाच्या अधिवेशनसमयी झालेल्या गांधींनी जो उपदेश केला, त्यात ते म्हणतात की, “पतिपत्नींनी फार तर एकाच संतानाची इच्छा करावी. परंतु संततीची मुळीच इच्छा नसणे तर फारच चांगले.” एकाच संतानाकरिता जो कामोपभोग करावा लागेल, तोही विषयप्रतीवाचूनच केला पाहिजे. ख्रिस्ताच्या दृष्टीशी या दृष्टीचे पूर्ण साम्य आहे. ख्रिश्चन धर्माप्रमाणे सर्व प्रकारचा स्त्री-पुरुष संग पाप होय. म्हणूनच ख्रिस्ताची उत्पत्ती अंगसंगावाचून कुमारीपासून झाली असे ख्रिश्चन धर्म सांगतो. नाही तर ख्रिस्त पापसंभव म्हटला गेला असता. वैराग्यपर संन्यासवादी नीतिशास्त्र ख्रिस्ताने सर्वाकरिता पुरस्कारिले. गांधींच्याही मते, असे संन्यासवादी नीतिशास्त्र हेच खरे. परंतु हिंदुधर्म असे सांगत नाही. हिंदुधर्म चार पुरुषार्थ मानतो. गृहस्थाश्रमाला मोक्षाधिकार देतो.

### रामराज्य स्थापना

गांधींच्या सर्व जीवनाचा अंतिम उद्देश रामराज्याची स्थापना हा होता. माऊंटबॅटन करार झाल्यानंतर गांधी म्हणू लागले की हे जे स्वराज्य आले आहे ते खरे स्वराज्यच नव्हे. रामराज्याची स्थापना करायला हवी. रामराज्य म्हणजे ईश्वराचे राज्य प्रेम आणि सत्य हे ईश्वराचे स्वरूप ईश्वरी राज्याची ही कल्पना हिंदुधर्मात नाही. देवाचे राज्य स्थापणे (किंगडम ऑफ गॉड) हे ख्रिश्चन धर्माचे, यहुदी धर्माचे ध्येय असे. हिंदुधर्माप्रमाणे ईश्वरी अवतार भूतलावर धर्मस्थापना करतात, राज्यस्थापना नव्हे. हिंदुधर्म राज्यसंस्थेला दुय्यम स्थान देतो. म्हणून धर्मस्थापना या कल्पनेला राज्यस्थापनेच्या कल्पनेपेक्षा हिंदुधर्म अधिक महत्त्व देतो. ख्रिश्चन धर्मातील ईश्वरी राज्याची स्थापना आणि हिंदुधर्मातील धर्मस्थापनेची कल्पना यांच्यात बरेच साम्य आहे. रामराज्याचा आदर्श हिंदुधर्मात प्रसिद्ध आहे परंतु ख्रिश्चन धर्मात हा आदर्श पराकोटीला नेलेला आहे. ख्रिश्चन धर्माचे ते अंतिम ध्येय आहे.

### दोघांची हत्या स्वबांधवांकडून

ख्रिस्त आणि गांधी दोघांचे हनन स्वजातीयांकडून झाले. दोघांच्या चरित्रातील हे साम्य ध्यानात भरण्यासारखे आहे. ख्रिस्ताच्या वेळेस यहुदी लोकांवर रोमन साम्राज्य होते. आर्य राजनीतीप्रमाणे रोमन लोक त्या त्या देशांतील धार्मिक आणि सामाजिक प्रथा व कायदे यांना मान्यता देऊन त्याप्रमाणे त्या त्या देशांवर राज्य चालवीत असत. ख्रिस्त यहुदी होता. तो स्वतःला यहुदी धर्मात वर्णिल्याप्रमाणे ज्यूंचा धर्मप्रशासक राजा म्हणून संबोधू लागला. यहुदी लोकांच्या धार्मिक व सामाजिक संस्थांत श्रीमंतांचे व पुरोहितांचे प्रस्थ होते. ख्रिस्त त्यांच्या अन्यायी वर्तनाचा निषेध करी. मंदिरातील कर्मकांडाचे स्तोम प्रभूस मंजूर नाही, असे ख्रिस्त प्रतिपादी. प्रतिष्ठित पॅरिसी वर्ग यामुळे संतापला. ख्रिस्ताला त्यांनी धर्मद्रोही ठरवून देहान्त शासन द्या, अशी प्रस्थापित सरकारजवळ मागणी केली. रोमन अधिकाऱ्याने

नाखुशीने लोकमताला मानून येशूला क्रॉसवर चढवून खिळयांनी डांबून त्याला देहान्ताची शिक्षा दिली. गांधींनी हिंदी स्वराज्यातील अल्पसंख्याक अत-एव दुर्बल अशा मुसलमानांची बाजू घेतली आणि पाकिस्तान पवित्र आर्यभूमीत स्थापू दिले, म्हणून हिंदुत्ववादी माणसाने धार्मिक त्वेषाने भडकून गांधींची हत्या केली. ख्रिस्ताच्या वधाप्रमाणेच गांधींचीही हत्या धार्मिक कारणास्तवच झाला.

## सर्वोदय मठाची स्थापना

ख्रिस्ताचे पुनरुत्थान त्याच्या हत्येनंतर तिसऱ्या दिवशी झाले दिव्य देहाने तो पुन्हा अवतरला. महात्माजींचे असे पुनरुत्थान शक्य आहे का. खिस्ताचा दिव्य देह म्हणजे त्याने उपदेशिलेला धर्म होय. ख्रिश्चन धर्माचा इतिहास म्हणजे पाश्चिमात्त्य समाजाचा इतिहास होय, असे अनेक नावाजलेले इतिहासकार सांगतात. हिंदुस्थानचा या पुढचा म्हणजे हिंदी लोकांचा सर्वोदयाचा इतिहास व्हावयास पाहिजे. सर्वोदय मठाची स्थापना हाईल. त्यासाठी मोठा धनसंचयही होईल. परंतु त्या तत्त्वांचा विजय होईल की नाही, हे निश्चित सांगता येत नाही. त्याची स्पष्ट चिन्हे आणि पुरावा उपलब्ध व्हायला अवकाश आहे.

## ख्रिस्त व गांधी यांच्यातील फरक

ख्रिस्त आणि गांधी यांच्यात एक महत्त्वाचा फरक आहे. ख्रिस्त राजकारणी साधू नव्हता. उलट गांधी हे एक राजकारणी मत होते. राजकारण विचित्र प्रकृतीच्या लोकांचे कार्यक्षेत्र असते. गुंड, धूर्त, आपमतलबी, व्यवहारचतुर, संधिसाधू अशा लोकांच्या स्पर्धेचे मैदान म्हणजे राजकारण अशा नाना तऱ्हेच्या भानगडींनी भरलेल्या कुटिल आणि कारस्थानी लोकांच्या डावपेचांची आणि हिमकतीची कसोटी बनलेल्या राजकारणाच्या व्यवहारात साधू व तत्त्ववत्ते पडले आणि त्या व्यवहाराच्या अंगभूत दोषांपासून अलिप्त राहिले तर तो एक चमत्कारच होय. महात्माजींनी या चमत्कारात बरेच यश मिळवले. संपूर्ण यश नाही. त्या यशाचं स्वरूप तंत्रदृष्ट्याच महत्त्वाचे आहे. त्यांच्या तीस वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत प्रचंड प्रमाणात देशव्यापी चळवळी झाल्या. त्यात गांधींच्या अहिंसेचा प्रभाव तंत्रदृष्ट्या का होईना फारच चांगला पडला. राज्यकर्त्यांची प्रत्यक्ष हिंसा अपवादात्मकच झाली. अशी अहिंसा गांधींच्या अभावी इतकी प्रभावी झाली नसती.

## राजकारणात पवित्र राहणे

राजकारण साधुतेसही प्रसंगी मलिन करते. गांधी हे मनुष्यच होते. स्फटिकाप्रमाणे निरंतर शुद्धता राखणे ही गोष्ट राजकारणाबाहेर कदाचित साधेल. परंतु राजकारणात साधुत्वाच्या भीष्म प्रतिज्ञेसही क्वचित डाग लागतो. फैजपूर कॉंग्रेसच्या वेळेस १९३५ चा कायदा राबवायचा नाही, असे गांधींनी ठरवले होते. परंतु निवडणुकीत बहुमत मिळाल्यामुळे निश्चय बदलला. परंतु या बाबतीत चुकीच्या निर्णयाची दुरुस्ती केली असे म्हणता येईल.

परंतु महायुद्ध सुरू झाल्यावर ब्रिटिशांना संकटाच्या वेळेस भी विरोध करणार नाही, असे महात्माजींनी लिनलिथगोस सांगितले होते. परंतु १९४२ चा लढा सुरू करून दिलेल्या वचनाला त्यांनी बाधा आणली. स्वराज्यस्थापनेनंतर काश्मीरचा प्रश्न आला तेव्हा लष्करी शक्तीने तो निकालात काढायला त्यांनी परवानगी दिली. अहिंसेवरचा भरवसा का डळमळला? संस्कृत कवीने म्हटले आहे, "वनराज ऐन उमेदीत डोंगरांनाही टक्कर देतो, प्रसंगी त्या टक्करीत त्या गजाचा दातही तुटतो. गिरि-विदारण करणाऱ्या गजाचा दात भंगला तरी त्याची प्रशंसाच केली पाहिजे." राजकारणात धुरिणत्व पत्करणाऱ्या साधूला क्वचित प्रसंगी सत्त्वापासून च्युत व्हावे लागले तरी त्याबद्दल त्याला दोष न देता राजकारणाला दोष दिला पाहिजे. कारण राजकारणात पावित्र्य राखणे हे एक अघटित शौर्य आहे!

**(सुबोधपत्रिका १५ मे, १९४९) (संक्षिप्त भाषण)**
**(साधना २८ एप्रिल, १९४९) (विस्तृत भाषण)**

○○○

३

# महात्मा गांधी

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नागपूर येथे बहुधा ऑक्टोबर १९४८ मध्ये गांधी स्मारक निधीच्या कार्यकर्त्यांसमोर केलेल्या भाषणाचा प्रस्तुत लेख हा सारांश आहे.)*

## मनुष्यजातीचे दुर्दैव

म. गांधी अमर स्वरूपात विलीन झाले त्या वेळी मी कलकत्त्यास होतो. त्यानिमित्त मी आपल्या मुलाला एक पत्र लिहिले. त्यात जे लिहिले ते असे की, म. गांधींचा वधकर्ता मनुष्यजातीत जन्मास आला हे मनुष्यजातीचे फार दुर्दैव आहे. म. गांधींच्या मर्त्य शरीरावर ते हरिजन दौऱ्यावर असताना १९३५ साली पुण्यास बॉम्बचा हल्ला झाला; पण सुदैवाने तो चुकला. त्यावेळी मी पुण्यास होतो. ते हल्ल्यातून सहीसलामत बाहेर पडल्याबद्दल पुणे शहरात सभा घेण्यात आली. त्याही सभेत अशाच तऱ्हेचे वाक्य बोलल्याचे मला आठवते. गांधीजींच्या मृत्यूमुळे मला अतिशय दु:ख झाले. माझा स्वभाव दु:ख करण्याचा नाही. त्यांच्या मृत्यूमुळे दु:ख झाले त्याचे कारण असे की, माझ्या जातीच्या माणसाने त्यांचा खून केला! माझी जात याचा अर्थ ब्राह्मण जात नव्हे, तर मानवजात. मानवात जन्म घेण्याचे भाग्य ज्याला लाभले अशा व्यक्तीने तो केला म्हणून मला फार दु:ख झाले. कारण गांधीजींचा जन्म, मानवजातीचे महत्त्वाचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी झालेला होता.

मानवजातीचे मुख्य प्रश्न अद्ययावत भौतिक शास्त्रे, शस्त्रास्त्रे म्हणजे केवळ बाह्य साधने सोडविण्यास असमर्थ आहेत. ते प्रश्न शस्त्राने सुटू शकत नाहीत. ते सोडविण्याकरिता माणसाजवळ अंत:करण व बुद्धी यांच्या प्रत्ययास आलेली उच्चतर मूल्ये आहेत व ती माणसाची श्रेष्ठ व प्रभावी साधने आहेत. याच विलक्षण मार्गाने गांधीजी चालले होते. तो मानव्याचा मार्ग होता. श्रेष्ठ व महान असा मार्ग होता. मनुष्य पशू नाही. त्याला जीवनावरील व विश्वावरील अधिकार अध्यात्मामुळे म्हणजे मानसिक सामर्थ्यामुळे प्राप्त झाला आहे.

## नैतिक नियमांचा साक्षात्कार

संस्कृतीचा इतिहास हा मनुष्याच्या मानसिक सामर्थ्याचा विकास आहे असे दिसून येते. माझी काही वर्षांपूर्वी अशी समजूत होती, की गांधीजी श्रद्धावादी आहेत. श्रद्धावाद हा बुद्धिवादापेक्षा कमी दर्जाचा आहे. बुद्धी ही काहीही झाले तरी श्रेष्ठ आहे. हे खरे असले तरी बुद्धिवादाचे आरंभस्थान कुठे आहे, हा प्रश्न ज्ञानशास्त्रात उत्पन्न होतो. बुद्धी तरी कुठून येते? श्रद्धा हे बुद्धीचे फळ आहे. श्रद्धा म्हणजे ज्ञात सत्याविषयी जिव्हाळा. बोधाचा उगम अनुभवातून होतो. अनुभव हा सर्व ज्ञानाचा पाया आहे. अनुभवातून शास्त्र निर्माण होते. ज्याचे शास्त्र अनुभूतीतून अवतीर्ण होते तेच शास्त्र सच्छास्त्र ठरते. ज्यांचा अनुभव दांडगा त्यांची बुद्धी श्रेष्ठ. फ्रेंच तत्त्ववेत्ता बर्गसॉ यांचे तत्त्वज्ञान अनुभूतीच्या पायावर रचलेले आहे. तो बुद्धीस गौण स्थान देतो. बुद्धीस सत्य गम्य नाही, तिच्या पलीकडे स्फूर्तिमय प्रज्ञा सत्याला आकळून ठेवते असा त्यांचा सिद्धांत आहे. पण स्फूर्तिमय प्रज्ञा आणि तर्कात्मक बुद्धी ही एकमेकांशी पूरक आहेत. या दोन्ही मानसिक अवस्था एकमेकांच्या संगतीने कार्य करतात.

बेथोवेन हा जर्मन संगीतज्ज्ञ होऊन गेला. संगीताचा आस्वाद तर सर्वच घेतात; पण त्याला नादाची सूक्ष्म संवित्ति येत होती. त्याला उच्चतर नादाचा साक्षात्कार होत होता. प्रज्ञा, साक्षात्कार किंवा अनुभूती ही एक श्रेष्ठ शक्ती आहे. ही एक विलक्षण गोष्ट आहे. अलौकिक बुद्धिमत्ता व अप्रतिम कर्तृत्व यांचे रहस्य या विलक्षण शक्तीमध्ये भरून राहिले आहे. ज्यांना ती प्राप्त होत नाही त्यांचे क्षेत्र मर्यादित आहे असे समजावे. हा साक्षात्कार जगद्विजयी धुरंधर सेनापतींना होत असतो. नेपोलियन लढाईच्या अगोदर पंडितांशी सल्लामसलत करी व काही निश्चित असे बेत ठरवीत असे. पण एकदा रणांगणावर तो उतरला की पूर्वी केलेले आपले बेत तो बदलूनही टाकी. त्यामुळे विजयश्री त्याला वश होई. हीच गोष्ट महान कलाकार, तत्त्ववेत्ते, कवी, विज्ञानवेत्ते यांनाही लागू पडते. साक्षात्कार किंवा प्रतीती (Intuition) हिचे स्वरूप काही व्यक्तींच्या ठायी अत्यंत विलक्षण असते. गांधींना धर्माच्या द्वारा मानवी जीवनातील नैतिक नियमांची प्रतीती आली होती. धर्मसंस्थेने माणसाचा नैतिक प्रत्यय तेजस्वी ठेवण्याचा प्रयत्न केला, म्हणून आजही काही थोर विज्ञानसंशोधक धर्माची कास धरण्याचा पाश्चात्त्य देशांत प्रयत्न करीत आहेत.

## महान वादळी देवाचे जीवन

म. गांधींच्या चळवळी व लढाया आपण डोळ्यांनी पाहिल्या आहेत. आपण त्या दृष्टीने अत्यंत भाग्यवान आहोत. त्यांच्या जीवनाचा अर्थ कित्येक मोठमोठ्या बुद्धिमान पंडितांना कळला नाही. 'बुद्धिमतां वरिष्ठं' लो. टिळक गांधींना एकदा म्हणाले, ''तुमच्या सत्याग्रहाला हजार माणसे लागतात ती द्यायची कशी? जिथे लोकच तयार नाहीत तिथे हे शक्यच कसे होईल?'' बोटाने करावयाच्या गणनेवर व हिशेबावर अवलंबून राहणाऱ्यांना कल्पनांच्या

सामर्थ्याचा प्रभाव प्रतीत होत नाही. शौर्याचा उगम हिशेबात नसतो. त्याला स्फूर्ती, प्रतीती लागते. गांधींचा प्रत्यय अतिशय अद्भुत होता. वादळाच्या पूर्वी झाडाचे एक पानदेखील हलत नाही; पण थोड्याच वेळात झो झो वाहणारा प्रचंड झंझावात महावृक्षदेखील उन्मळून टाकतो, पर्वतांचा विश्वास डळमळतो. अशीच गोष्ट गांधींच्या बुद्धीची होती. त्यांचा प्रत्यय फार मोठा होता. तो महान प्रत्यय पंडितांच्या प्रज्ञेला देखील कित्येकदा मागे टाकतो. १९२० साली 'एक वर्षात स्वराज्य मिळवून देतो' ही घोषणा गांधींनी केली. कित्येक हसले. बुद्धिमानांना वाटले स्वराज्य इतक्या लवकर कसे मिळू शकेल? 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले?' असा या बुद्धिमानांचा घोष होता. हिंदुस्थानला खरोखर एका वर्षातच स्वराज्य मिळाले असे म्हटले पाहिजे. राष्ट्राच्या आयुष्यात २५ वर्षे एका वर्षापेक्षा लहान होत. आपण पाहिलेच आहे की, १९२०, ३० साली देश खडबडून उठला. बुद्धिमतांना याची काही कल्पनाच नव्हती. असेच गांधीजींचे सारे जीवन होते. त्यांचे जीवन म्हणजे महान वादळी देवाचे जीवन होय.

आजपर्यंत गांधींसारख्या ज्या महान व्यक्ती होऊन गेल्या; मग त्या आस्तिक असोत किंवा नास्तिक असोत - या मानव्याच्या गाभ्याजवळ जाऊन पोचल्या. कार्ल मार्क्स हा मूलत: मानवतावादी होता. तो मनुष्यव्यापी ध्येयवादी होता. कार्ल मार्क्सच्या विचारांनी अनेक माणसे अतुल स्वार्थत्यागाला प्रवृत्त झाली आहेत, क्रांतीच्या अग्नीत भस्मसात झाली आहेत. ही प्रेरणा मार्क्सच्या अर्थवादातून निर्माण होऊ शकत नाही. तिचा उगम नीतिशास्त्रात आहे. कॅपिटल हा ग्रंथ फार थोड्या लोकांस समजतो. कम्युनिस्ट पक्षामध्येही जगात तो ग्रंथ अध्ययन करून समजलेले हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत, असे मी नम्रपणे म्हणतो. मार्क्सने जग इतक्या मोठ्या प्रमाणात का भारून टाकले? त्याच्या शास्त्रज्ञानाने ही किमया घडवलेली नाही, तर मानवी दास्याला अंत:करणाचा स्फूर्तिदायी संदेश, आश्वासन, भविष्यकालीन आशा मार्क्सने दाखविली म्हणून हे जागतिक उत्पात घडून आले. असा ध्येयवाद हा नैतिक असतो. कारण तो सर्व मानवांना व्यापून राहतो. मनुष्य हा मूलत: नीतिमान आहे व व्यापकता हा नीतीचा स्वभावधर्म आहे. बुद्धीचे तत्त्व हेही व्यापक असते. विशेषाकडून सामान्याकडे हे बुद्धीचे कार्य आहे. व्यापकतेची पूर्णता म्हणजेच ब्रह्मरूपता. हेच जीवनाचे अबाधित तत्त्व आहे. नीती व सत्य हा मानवी जीवनाचा आधार आहे. नीती ही मातेत प्रथम प्रकट होते, म्हणून गांधीजींनी स्त्रियांना अधिक मानले. मनुष्यप्राण्याच्या जन्माबरोबर जगात धर्मशास्त्रदेखील जन्मास आले. नीतीचे नियम तोडले तर त्याचे परिणाम मानवांना भोगावे लागतात. (Inductive Logic) विगमनात्मक तर्कशास्त्रापासून खरे ज्ञान निर्माण होते. कारण विगमनाची (Induction) सुरुवात साक्षात्कारापासून होते. विशेषाकडून सामान्याकडे जाणे ही गोष्ट तेव्हाच शक्य आहे. सृष्टी-नियम मानवी जीवनाच्या कक्षेत नीतीच्या रूपाने प्रकट होतात. सृष्टी-नियमाचे पालन मानवाला करावेच लागते.

## प्रेम हा जीवनाचा मध्यबिंदू

गांधी हिंदुस्थानात जरी जन्माला आले होते तरी निव्वळ हिंदुस्थानी नव्हते. 'मी इंग्रजांचा मित्र आहे' असे गांधी म्हणत ते पूर्ण सत्य आहे. हे सत्य न ओळखता इंग्रजद्वेषाने प्रेरित होऊन लोक गांधीजींचे अनुयायी बनले. त्या द्वेषाचा विषय नाहीसा झाल्यामुळे आज कर्तव्यतत्परता मूळ धरीत नाही. द्वेषाच्या जागी प्रेमाने स्थान मिळविले पाहिजे. प्रीती शुद्ध व अगाध बनली पाहिजे. द्वेषाने होणारे पराक्रम हे मनुष्याला प्रगत करीत नाहीत. प्रेमाने होणारे पराक्रम मनुष्यजातीची अचल, अविनाशी सोपानपरंपरा निर्माण करतात. अशी सोपानपरंपरा निर्माण करणाऱ्यांमध्ये महात्मा गांधी विराजमान होतात, म्हणून त्यांच्या मृत्यूमुळे आपले अपरिमित नुकसान झाले असे जगाला वाटले.

इंग्लंडमधील थोर प्रज्ञावंत शास्त्रज्ञ व्हाइटहेड यांनी 'ॲडव्हेंचर ऑफ आयडिया' नामक पुस्तकात गांधींच्या हृदयपरिवर्तनाच्या चळवळीचा अत्यंत आदराने उल्लेख केला असून हा मानवी इतिहासातील एक महान प्रयोग आहे म्हणून त्यांनी या चळवळीचा गौरव केला आहे. लोकांच्या विचारात मौलिक परिवर्तन घडविणे हे एक महान तत्त्व आहे व त्या तत्त्वानुसार लोकशाही राज्य निर्माण होते. त्यात मानवी पराक्रम आहे. या पराक्रमाची स्फूर्ती गांधींना लाभली.

डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, ''गांधींच्या हत्येला आपले पाप कारणीभूत झाले.'' हे खरे आहे. गांधी निव्वळ राजकारणी नव्हते तर प्रामुख्याने साधुपुरुष होते. जरी त्यांच्या शरीराचा नाश कोणी केला, तरी म. गांधी शरीरानेच नव्हे तर आत्म्यानेही निघून गेले. गांधीजींच्या मृत्यूपूर्वी आपला देश द्वेषाच्या पापाने बुडालेला होता. या देशात त्यांना राहावयास जागा नव्हती. प्राणदेवाचे ते उपासक होते. प्राण ही सर्वात महान एकच एक देवता आहे असे उपनिषदात याज्ञवल्क्य म्हणतो. त्या प्राणदेवतेच्या मंदिरात म्हणजे मानव समाजात व विशेषत: हिंदुस्थानात त्या देवतेचे विरोधी पातक आपला प्रभाव गाजवू लागले. त्यामुळे हा प्राण देवतेचा भक्त देवतेच्या पावित्र्याकरिता लढत लढत या जगातून निघून गेला. पण तो शरीरानेच निघून गेला नाही तर त्याच्या आत्म्यासह, नैतिक स्फूर्तीसह निघून गेला आहे.

गांधीजी म्हणतात, ''नीतीला अपवाद जरी असला तरी तो दोष आहे!'' 'जशास तसे' हे अपथ्यकर तत्त्व आहे. 'द्वेष करणाऱ्यांशी प्रेमाने वागा' असे गांधी म्हणत. प्रेम हा जीवनाचा मध्यबिंदू आहे. त्यातच मानवी पराक्रम आहे. जे लोक, जे धर्म, ज्या संस्कृती या मार्गावरून दूर गेल्या, त्यांचा मागमूसही सापडत नाही. त्या नेहमीकरिताच नष्ट झालेल्या आढळून येतात. गांधींचे तंत्र व मंत्र यांचा अर्थ नीट लक्षात घेतला पाहिजे. लोक निव्वळ तंत्राला चिकटून बसतात व मंत्राला सोडून देतात. राग, द्वेष, मत्सर इत्यादी विकारांविरुद्ध जे लढतात ते खरे पराक्रमी आहेत. या सर्व शौर्याचा महामेरू महात्मा गांधीजी होते. त्यांना सत्य दिसत होते व त्यामुळे ते सारखे त्यांच्या पाठीमागे पुढे पुढे जात होते. ते थकले नाहीत. सत्याचा

शोधक थकत नसतो. शास्त्रांचा व कलांचा विजयी इतिहास न थकणाऱ्या सत्यशोधकांनी बनविला आहे.

महात्मा गांधी यांची गणना पंडित व बुद्धिवादी यांच्यात कोणी करू नये. बुद्धी व पांडित्य यांचा पाया अनुभव (Intuition) होय. गांधीजी अनुभवसागर होते. माणसाला द्वेषापासून जी स्फूर्ती मिळते ती त्याला मृत्यूकडे नेते, अमरत्वाकडे नव्हे. पक्ष, संघ, दले द्वेषाच्या प्रेरणेने वाढताना दिसतात; परंतु ती अखेर मृत्यूला आलिंगन देतात. प्रेमापासून मिळणारी प्रेरणा हीच सत्य प्रेरणा होय. या प्रेरणेप्रमाणे आचरण न करणाऱ्या संस्कृतीची कब्रस्थाने आज दिसत आहेत. द्वेषाच्या मदतीने आपल्या संस्कृतीचीही तीच गती होईल.

गांधीजी या देशातून निर्वासित झाले आहेत. त्यांना वास करण्यास येथे जागा नाही. ख्रिस्ताचा तिसऱ्या दिवशी पुनर्जन्म झाला असे ऐकतो. महात्मा गांधींचे असे पुनरुत्थान होण्यास अनुकूल परिस्थिती उत्पन्न होईल काय? त्यांच्या दिव्य स्मृतीचा अर्थ समजून घ्या. मृत्यू हे अमरत्वाचे झाकण आहे. त्यांच्या आत्म्यास मी अभिवादन करतो.

**(पूर्वप्रसिद्धी : नवभारत, जानेवारी १९४९)**

○○○

४

# श्रद्धाशील बुद्धिवादी: मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय हे केवळ बुद्धिवादी नव्हते तर ते श्रद्धाशील बुद्धिवादी होते. बुद्धिवादी आपले विचार मांडतो आणि त्या विचारप्रतिपादनाने संकट निर्माण होतांच तो दूर पळतो! परंतु श्रद्धाशील मनुष्य हा विचारांशी एकरूप झालेला असतो, तो संकटाला भीत नाहीं. प्रसंगी, तो विचारप्रसारासाठी आपली आहुतीही देतो. हीच श्रद्धा होय, ही श्रद्धा प्रचलित धर्मांना मागे टाकते व नवीन धर्म निर्माण करते, जीवनांतील प्रत्येक स्पंदन, हृदयांतील प्रत्येक ठोका आणि रक्ताचा प्रत्येक थेंब ज्या जीवनशक्तीचा या ध्येयासाठी अर्पण करतो, रॉय याच अर्थानं श्रद्धा शील होते.

स्वातंत्र्याचा शोध (Quest of Freedom) हा त्यांच्या जीवनाचा संदेश आहे. मार्क्सवादाच्या पलीकडे ही ते गेले. कां ? मार्क्सवादानें "मानवाचा एक अंतिम जीवनहेतु निश्चित केला. जणूं मानवाचा प्रवास संपला! जणू मानवी जीवनाची कृतार्थता झाली! - त्यामुळेच या विचारांतून सुटका करून घेणे आवश्यक झाले. विचारांचा शोध अनंत आहे. पण त्यासाठी जिज्ञासायुक्त मन पाहिजे आणि जुने विचार टाकून देण्याचे धैर्य पाहिजे, रॉय" यांनी आपले जीवन व राजकारण यांच्या विषयींचें सिद्धान्त धैर्यानं मांडले. आपल्या देशांतील लोक श्रद्धा व परंपरागत विचारांच्या बंधनांत आहेत हे त्यांनी ओळखले. आपला विचार हा पुन्हा पुन्हा तपासून त्याच्या सत्यस्वरूपाचा सतत शोध केला पाहिजे. रॉय यांचा 'नवजीवना' ('Renaissance') वर तर विश्वास होता. माणसा कायमचा जागृत रहा. तुला विश्रांती घेता येणार नाही. सारखा शोध घेत रहा.

जीवनपुष्पाच्या नुकत्याच पाकळया उमलूं लागण्याच्या कालात, ऐन १४ व्या वर्षी त्यांनी श्रद्धेचा तेजस्वी उन्मेष दाखविला, स्वातंत्र्यसूर्याकडे त्यांनी झेप घेतली, परंतु जन्मभर ते त्यांच ध्येयाला कवटाळून बसले नाहीत. याचे कारण ते अंधश्रद्ध नव्हते. पुढे त्यांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला. मार्क्सवादाच्या थोर थोर पुढाऱ्याशी त्यांचा संबंध आला.

जगत्प्रसिद्ध विचारवंतांशी त्यांनी याविषयी वादविवाद केला. कोणताही विचार घेतांना हा विचार परदेशी की स्वदेशी आहे याचा कधीच ते विचार करीत नसत ! वैचारिक भूमी ही विश्वव्यापी आहे.

तथापि ते मार्क्सवादाला शरण गेले नाहीत इ.स. १९३७ मध्ये त्यांची व व माझी भेट झाली होती. त्यावेळी मी त्यांना एक प्रश्न केला : तत्त्वज्ञानाच्या अभ्यासानंतर असे आढळून येते की मनुष्य ज्ञान मिळविण्याची जशी साधने निर्माण करतो तसाच तो अडचणीही निर्माण करतो ! मग हे तत्त्वज्ञान कोणत्याहि क्षेत्रांतील असो, मी रॉयना विचारले : "मार्क्सवाद हे अंतिम तत्त्वज्ञान आहे का ? त्यात काही मूलभूत दोष नाहीत का ?" रॉयनी उत्तर दिले: "I am a non conformist Marxist!"

ते सांप्रदायिक मार्क्सवादी नव्हते. म्हणूनच त्यांच्या विचारांत क्रांती होत गेली, हा गुण फारच थोड्या लोकांच्या अंगी आढळतो. मग तो रोमन कॅथॉलिक, ख्रिस्ती, हिंदू, मुसलमान अगर कोणत्याही धर्माचा असो! माणसाने निर्माण केलेले तत्त्वज्ञान अपूर्णच असणार, ही कबुली द्यायला कित्येकांना लाज व भीती वाटते. स्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाचा शोध घेणाऱ्या मार्क्सवादाच्या विचारवंतांनीही आपल्या भोवती शेवटी तुरुंग निर्माण केला!

सुरवातीला रॉय मार्क्सवादी होते. नंतर ते 'रॅडिकल डेमोक्रॅट' झाले आणि शेवटी ते पक्षातीत होऊन मानवतावादी बनले, "सर्व जगांतील मनुष्यमात्र एकच आहे. आणि त्याची स्वातंत्र्याची आकांक्षा हे एकच ध्येय आहे" असे ते मानीत.

त्यांची लोकांनी उपेक्षा केली असे मी मानीत नाही, कारण रात्री आकाशांत स्वयंतेजाने प्रकाशणारे तारे झोपी गेलेल्या माणसाच्या दृष्टीने उपेक्षितच असतात तथापि ते स्वतःच स्वयंसिद्ध तेजस्वी असतात. त्या उपेक्षितपणाची कोणीच तक्रार करीत नाही, रॉय ह्याचे तेजही असेच आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांची जीवनदृष्टी अजरामर आहे व राहील,

**(* तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मानवेंद्रनाथ रॉय श्रद्धांजली सभेतील भाषण * शब्दांकनः श्री.ग मळेकर शारदाश्रम, बोर्डी**
*** ३० जानेवारी, १९५४, मुंबई**
*** प्रसिद्धी : मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक; नवभारत, एप्रिल, १९५४)**

ооо

५

# काश्मीरकवी राजानक रत्नाकर

राजानक रत्नाकर हा महाकवी इ. स. ८४० च्या सुमारास काश्मीरमध्ये झाला. याच्या काव्यकृतीमध्ये हरविजय महाकाव्य हे श्रेष्ठ होय. या काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या समाप्तीदर्शक वाक्यांतील उल्लेखावरून हा कवि बालबृहस्पति अशी पदवी धारण करणाऱ्या काश्मीरराज चिप्पड जयापीडाचा आश्रित होता असे ध्यानांत येतें. ते वाक्ये असे - "इतिश्रीबालबृहस्पत्यनुजीविनो वागीश्वरांकस्य विद्याधिपत्यपर नाम्नो महाकवे राजानक रत्नाकरस्य कृतो रत्नांके हरविजये महाकाव्ये". यांतील बालबृहस्पती हा चिप्पड जयापीड राजा होय, असे राजतरंगिणीवरून सिद्ध होते. परंतु कल्हण कवीने रत्नाकर काश्मीरच्या अवन्तिवर्म्यांचा आश्रित होता, असे म्हटले आहे. इ. स. ८५५-८४ हा अवन्तिवर्म्याचा राज्यकाल होय.

रत्नाकर कवीचे तीन ग्रन्थ, हरविजय, वक्रोक्तिपंचाशिका व ध्वनिगाथापंजिका हे प्रसिद्ध आहेत. कल्हण, राजशेखर व क्षेमेंद्र यांनीं राजानक रत्नाकर हा थोर कवी होता, अशी प्रशंसा केली आहे. राजशेखर म्हणतो- 'विधात्याला वाटले की, पृथ्वीवर चारच समुद्र म्हणजे रत्नाकर आहेत; आणखी पाहिजेत, म्हणून त्यानें कवी रत्नाकर निर्मिला.' सुवृत्ततिलक या पुस्तकांत क्षेमेंद्र म्हणतो, 'रत्नाकर कवीच्या आननकाननांतील वाग्वल्ली वसंततिलकावर फुलली आहे.' या कवीने वसंततिलक वृत्ताचा अधिक उपयोग केला आहे. राजानक रत्नाकराचे श्लोक काव्यप्रकाशांत उद्धृत केलेले सापडतात. रत्नाकराच्या हरविजयाचा टीकाकार अलक याने मंमटाचा अपुरा राहिलेला काव्यप्रकाशाचा भाग पूर्णतेस नेला. तो परिकरालंकारापर्यंतच मंमटाने लिहिला होता; अलकाने शिल्लक भाग पुरा केला. अलकाची हरविजयावरील टीका विषमपदोद्योत त्रोटक आहे. महाकाव्यांवरील मल्लीनाथीसारखी समाधानकारक नाहीं.

राजानक रत्नाकराची मुख्य कृती हरविजय महाकाव्य होय. हे काव्य वक्रोक्तिपंचाशिका वोषितपचाक्षिका ही काव्यमालेत निर्णयसागराने प्रसिद्ध केली आहेत. हरविजय हे पन्नास सर्गाचे आहे. रघुवंश, किरातार्जुन शंकिरातार्जुनीय, इत्यादी काव्यांपैकी कोणत्याही काव्याच्या दुपटीपेक्षा अधिक आहे. त्याची श्लोकसंख्या ४३२१ आहे. हे काव्य प्रचारात फारसे नसले तरी ते पंचमहाकाव्यांच्या पेक्षा गुणांनी यत्तींचितही कमी नाही. ते प्रचारात नाही, याचे कारण त्यावर चांगलीशी टीका नाही हे होय. याची शैली संपन्न व प्रसन्न आहे. भाषा ओघवती आहे. भारवी किंवा माघ यांच्यापेक्षा भाषाप्रभुत्व व प्रसन्नता अधिक आहे. कवीचा शब्दालंकार व अर्थालंकार यांच्यावर सारखाच अधिकार आहे श्रीहर्षाचे नैषध काव्य सोडल्यास शास्त्रे व षड्दर्शने यांच्यातले प्रावीण्य हरविजयाइतके दुसऱ्या कोणत्याहि महाकाव्यात सांपडणार नाही. संगीत व नृत्य यांचे ज्ञान माघ कवी प्रकट करतो, परंतु हरविजयांतील अनेक संदर्भ संगीत व नृत्य यांच्यांतील परिभाषा चांगली अवगत असल्याशिवाय उलगडणारे नाहीत. साक्षात् नृत्यदेवता शंकरच चरित्रनायक आहे. त्यामुळे संगीत, नृत्य यांचा संदर्भ औचित्यपूर्णरीतीने घातलेला आहे. इतर ललितकला देखील चांगल्या ज्ञात असल्या तर या काव्याचे मर्म अधिक उलगडते. स्थापत्य, चित्र, उद्यानरचना, पुष्पावचितो याचीही वाचकास प्राथमिक चांगली माहिती पाहिजे. याही गोष्टीचा तपशील हा कवी सांगतो. दीर्घ वृत्ते व लघु वृत्ते यांचा यथोचित उपयोग कवीने केलेला आहे. काही संगती अनुष्टुप् छन्दही कवीने सरळपणे वापरला आहे शैवागम, धर्मशास्त्र व राजनीती यांचाही परामर्ष या काव्यात सापडतो. पुराणात देवासुरांची द्वादश महायुद्धे निर्दिष्ट केली आहेत. विशेषतः वायुपुराणात व मत्स्यपुराणात हा निर्देश आहे. अंधकासुर हा त्रैलोक्य विजयी झाला व त्याचा पराभव व नाश शंकराकडून देवांनी करविला. हे वे देवासुरमहायुद्ध होय. ही कथा हरिविजय काव्याचा मुख्य विषय.

शब्दार्थाची अनुरुप योजना वर्णचातुर्य, कल्पनासामर्थ्य, वृतवैपुण्य, अलंकारांचा याथोचीतविण्यास, भावनांचा व रसांचा परिपोष, सुष्टी सौंदर्य व विश्वगंभरतेचे दर्शन मनुष्य स्वभावातील सूक्ष्मतेचा अनुभव आणि विविधकलांच्या लालित्याचा सर्वांचा संगम हरविजय महाकाव्यात झाला आहे परंतु हे रघुवंश, किरातार्जुनीय, इत्यादी पंचमहाकाव्यांच्या प्रमाणेच विशिष्ट ठशाचेच महाकाव्य आहे. हे मात्र मान्यच केले पाहिजे. हे मुख्यत: वीररसाचे काव्य काव्य आहे. त्या वीररसांत भावनगंभीर व भक्तिपूर्ण शांतरसही मिसळून राहिलेला आहे. शिवपार्वती संबंध असल्यामुळे दिव्य शृंगारासही अवसर त्यात आहे. मंदर पर्वतावरील शिवपार्वतीची राजधानी ज्यो ज्योस्नावती व अंधसुराची राजधानी सुमेरुशृंग यांचे वर्णन यात येणे स्वाभाविक असल्यामुळे सृष्टिसौंदर्य, निसर्गभव्यता व नागरिक तरुण-तरुणीच्या जीवनातील रतोत्सव यांचा उजाळा काव्यास देण्यास कवीस पूर्ण अवसर आहे. अंधकासुरासारखा त्रैलोक्यविजयी असुर हा मुख्य नायकाचा म्हणजे शिवाचा प्रतिस्पर्धी

असल्यामुळे भयानक रसालाही वाव आहेच. देवासुराचा संसार म्हणजेच विश्व विस्तार. देवासुरांच्या जगपराजयाची कथा हाच या काव्याचा मुख्य विषय असल्यामुळे, देवासुरांच्या अधिराज्यासबंधाच्या घडामोडी त्यांत वर्ण्यर्श्यं बनल्या मुळे अद्भुत रसाचा उल्हास या काव्यांत येणें हें प्रस्तुतच आहे. तात्पर्य शृंगार, हास्य, शांत, भयानक व अद्भुत हे रस या काव्यांत गुंफलेले असून त्यांचें मुख्य सूत्र वीररसाचे आहे. हे ठराविक ठशाचें महाकाव्य असल्यामुळे षड्ऋतूची वर्णने, पुष्पावचय, वनक्रीडा दिवसावसान, चंद्रोदय, पानगोष्टी, रती, उषःकाल, इत्यादी वर्णने आली आहेत. शिवपार्वती हे विश्वसम्राट म्हणून राजाचे सर्व उपचार व अंगें त्यांत आली आहेत व विविध रत्नांचे, समुद्राचे अलंकारपूर्ण वर्णन हे या काव्याचे एक निराळे वैशिष्ट्य आहे. याचे कारण हेही संभवते की, कवीचे नांवच रत्नाकर आहे. म्हणूनच कवी प्रत्येक सर्वाच्या अखेरच्या श्लोकात एकदा रत्न हे पद गुंफल्याशिवाय राहत नाही.

शब्दालंकार व श्लेष यांनाही या काव्यांतील कांही सर्गात खूप ऊत आलेला दिसतो. श्लेषामुळे शब्दालंकार निर्माण होण्यास पुष्कळ अनुकूल संधी मिळते. अर्थालंकार, अर्थाची प्रसन्नता व प्रस्तुत वर्ण्य विषयाचे अनुसंधान न सोडताही शब्दालंकार साधता येतात. परंतु त्यास अर्धानुसंधानाचा नियम पाळल्यास मर्यादा पडते. अशी मर्यादा निक्षून संभाळणारे कालिदासासारखे महाकवी कालिदासानंतर थोडेच झाले आहेत. शब्दाक्रीडेची हौस वा शब्दचमत्कार किंवा भाषावशीकरण विद्याप्रदर्शित करण्याचा मोह हे कालिदासोत्तर संस्कृत कवियुगाचे लक्षण किंवा अवलक्षण म्हणा, आहे. रत्नाकर कवी शब्दालंकारांत भारवी व माघ यांनाही मागे सारतो. याचे उत्कृष्ट निदर्शन हरविजयाच्या ५, ६, ४६, ४७ व ४८ या सर्गात मिळतें. पुष्कळ श्लोकांत दुसरा व चवथा श्लोकचरण एकच असतो. परंतु अर्थ अगदी वेगळा करावा लागतो. यास चरणयमक म्हणतात श्लोकाचे पूर्वार्ध उत्तरार्ध एकच परंतु अर्थ भिन्न. तोच श्लोक दोनदा ओळीनें येतो परंतु अर्थभेदाने. अशी अनेक उदाहरणे आहेत. संबंध मोठया श्लोकात एकच ‘र’ किंवा ‘स’ सारखे अक्षर असायचे, दुसरे अक्षर नसायचे; यास एकाक्षर श्लोक म्हणतात. असेच द्व्यक्षरावली त्र्यक्षरावली, एकाक्षरपाद, पादाभ्यास, इत्यादी शब्दचमत्कार किंवा पदलीला दाखविणारे श्लोक वर उल्लेखिलेल्या सर्गात अाले आहेत. षोड्शदल पद्मबंधासारखे अनेक बंधेही आले आहेत. अशा ठिकाणी चांगली टीका असल्याशिवाय अर्थाचा उलगडा होणे जवळ जवळ अशक्य असते. अर्थ सुद्धा फारसा महत्त्वाचा नसतो. सकल युद्धवर्णनाचे वेळीच अशा प्रकारचे शब्दचमत्कार दाखविण्याचा कविसंप्रदाय आहे.

हरविजय काव्याचे सर्वसाधारण स्वरूप साहित्यशास्त्र दृष्ट्या कशा प्रकारचें आहे हे सांगितल्यावर त्यांतील कथानकाचें स्वरूप सांगतों.

मंदरपर्वताच्या शिखरावर शिवपार्वतीनी ज्योत्स्नावती नामक सुंदर नगरी राजधानी म्हणून

बसवून तिच्यांत जगाच्या उद्धारार्थ वसती केली. एकदा असे झाले की अंकासुर नामक दैत्य त्रैलोक्यांत प्रबळ झाला. त्याने सर्व देवांसह इंद्राला जिंकून स्वर्गावरही अधिराज्य स्थापले. त्यानें मेरूच्या शिखरावर आपली राजधानी वसविली. तो अंधकासुर ब्रह्मदेव व विष्णु यांनाही भारी झाला. हरीचे सुदर्शन चक्रसुध्दा त्याच्यापुढें प्रताप शून्य झाले. त्याने देवांना अधोवदन करून लज्जास्पद जीवन कंठण्याची पाळी आणली. हा अंधकासुर इतका प्रतापी झाला याचे कारण, तो शिवपार्वतींच्या शरीरांतूनच जन्मला होता, हे होय. एकदा पार्वतीने महादेवाशी क्रीडा करीत असतां महादेवाचे डोळे थट्टेने घट्ट झाकले नव्हे बांधले. त्या अवस्थेत अंधकासुर जन्मला. जन्मतःच तो अंध होता. अंधकासुराने महत्तप आचरून नेत्र प्राप्त करून घेतले. दितिसुत हिरण्यकशिपूने महादेवाकडून दत्तक पुत्र म्हणून अंधकासुराचा स्वीकार केला. त्रैलोक्यात त्याच्या तोडीचा वीर शिल्लक राहिला नाहीं. देव संत्रस्त झाले. त्यांनी आपले प्रतिनिधी आपले संकट निवेदन करण्याकरितां महादेवाकडे ज्योत्स्नावती नगरीत पाठविले. हे प्रतिनिधी म्हणजेच षड्ऋतु होत. अशा प्रतिनिधींचें स्वागत कोणत्या देशांत वा नगरीत होणार नाही? या षड्ऋतूंच्या मध्ये वसंताला प्रमुखत्व आले. संताने जगावर व देवांवर आलेल्या अंधकासुराच्या संकटाचे निवेदन महादेवापुढे राजसभेत म्हणजे दरबारात केले. अंधकासुराच्या प्रतापाची हकीकत ऐकून महादेवाच्या सभेत प्रचंड खळबळ उडाली. गणेश, कालमुसल, भैरव, नलकूबर, चण्डेश्वर कुमार कार्तिकेय, चण्डानन, अग्निकेतु, त्रिशिस, नंदी इत्यादि थोर थोर शिवगण खवळून उठले. ब्राह्मी माहेश्वरी, चण्डी, वैष्णवी, भद्रकाली इत्यादि सप्त लोकमाता सुद्धा क्षुब्ध झाल्या. गणश्रेष्ठांनी सल्लामसलतीची भाषणे केली. कालमुसलाने त्वरित आक्रमण करून अंधकासुराचे पारिपत्य करावे, म्हणून आत्मविश्वासाने भाषण केले. प्रभामय गणेशाने योग्य राजनीतीचे अनुसरण करूनच काय ते करावे, एकदम साहसी हल्ला करू नये, असा विवेकाचा सल्ला दिला. तो म्हणाला, 'प्रेक्षावतां जगति तन्त्र यदस्त्यसाध्यम्' विचारवंतास असाध्य काही नसते. वन्हिगर्भ गणेश म्हणाला की क्रोधात वश होऊ नये त्याने बुद्धी पराभव पावते व त्यामुळे सर्वत्र पराभव होतो. अग्निदष्ट्राने शत्रुदमनच केले पाहिजे असे गर्जून सागितले. चणुश्वराने दंडाचेच समर्थन केले. पुष्पहास नन्दिषेम इत्यादिकांनी राजनीतीच्या विविध उपायाचा परिस्थिती पाहून अवलंब करण्याचा विचार सांगितला. सविस्तर चर्चा झाल्यावर अंधकासुराकडे दूत पाठवून देवासुरांत संधी घडवून आणण्याचा निर्णय घेण्यात आला. महादेवाने कालमुसल नामक गणेशास अंधकासुराच्याकडे स्वतःचा संदेश देऊन पाठविले. कालमुसलाने अंतराळ मार्गाने भारतवर्षाच्या प्रदेशाचे निरीक्षण करीत उल्लंघन करून मेरुपर्वतावर तो येऊन पोचला. विनयाने नम्र होऊन अंधकासुराच्या सभेत प्रवेश केला. दूत कालमुसलाने सभेत सांगितले की तूं सुरासुरांच्या संग्रामाचा प्रसंग आणू नये. त्यांत विश्वाची व्यवस्था नष्ट होऊन महासंहार होईल. विश्वाची जी सनातन पद्धती प्रथमपासूनंच मान्यता पावली आहे तीच

मान्य कर. स्वर्गाचे राज्य इंद्राचें व पातालाचे राज्य असुरांचे. हीच व्यवस्था चालावी. यावर अंधकासुराच्या वतीने शुक्राचार्यपुत्र उशना हा उपसुरगुरु बोलला. तो म्हणाला की आहे ही अंधकासुराची साम्राज्यसत्ताच लोकव्यवस्थेला समर्थ आहे. परिवर्तन करण्याची काही गरज नाही. जरूर पडल्यास आम्ही देवाने महादेवासह आव्हान स्वीकारण्यास सज्ज आहोत. यावर कालमुसलाने या मृगुपुत्र असुरगरूची खूप निर्भर्सना केली. त्यामुळे सर्व असुरांची सभा क्षोभ पावली. कनक, वज्रबाहु इत्यादी अनेक असुरसेनानींची भाषणे झाली. वीरभोग्यच विश्व, असा सिद्धान्त मान्य झाला. देवांना पुनः सामना देण्याचाच निर्णय घेण्यांत आला. महादेवदूत कालमुसलाने फार मोठे नीतिशास्त्र समजावून सांगितले, परंतु उपयोग झाला नाही. दूत कालमुसल महादेवाकडे परतला. महादेवाने मेरुपर्वतावर चतुरंग सैन्यानिशी स्वारी केली. देवदानवांची अत्यंत तुमुल युद्धे झाली. इंद्र, ब्रह्मा, वासुदेव इत्यादी देवांनाही जेरीस आणणारे समर प्रसंग झाले. प्रत्यक्ष रक्तसेवन करणारी चण्डी रणांगणांत उतरली, तरी अंधकार टिकाव धरून राहिला. महादेवाशी सामने झाले तरी तो पुरुन उरला. नंतर देवांच्या मृत सैन्यास अमृतसिंचनाने पुनरूजीवित करणाऱ्या चंद्राने सुशोभित अशा महादेवाच्या मुकुटाचाच अपहार करण्याची कल्पना अंधकासुरास सुचली. त्याने अंतराळात उड्डाण करून महादेवाच्या मस्तकाकडे झेप घेतली. महादेवास हे अपमानाचे कृत्य असहय होऊन या अंधकासुराच्या वक्षस्थलाल त्रिशूल भोसकला व त्याचा अखेर अंत केला.

हे महाकाव्य अत्यंत विस्तृत आहे. त्याचें रसग्रहण समाधान होईल इतके करावयाचे तर ते थोड्या जागेत होणे शक्य नाही परंतु त्याचे काही नमुने मात्र दिग्दर्शनार्थ येथे उद्धृत करूनच विषय संपविणे योग्य होईल.

कवीने ज्योत्स्नावती नगरीचे वर्णन पहिल्या सर्वात मोठे बहाराचे केले आहे. तेथे विश्वावर अनुग्रह करण्याच्या उद्देशाने महादेवाने तनु धारण करून वसती केली आहे. महादेव हा मदनान्तक म्हणून विख्यात आहे. परंतु ज्योत्स्नावती नगरीत मदनाचा शृंगार नसेल तर श्मशान हे त्याचे नित्य व मान्य क्रीडास्थान महादेवाने सोडण्याची काही गरज नव्हती. कवी म्हणतो की, महादेवाच्या किरिटांतील चंद्रानेच हे मदनान्तकाने निर्मिले नोंद करून काढले ते असे

**सीमन्तिनी जनमनःसु समाधिभङ्ग -**
**कोपानलेन चिरदग्षमोन्दुमोलेः ॥**
**उत्थापयन् मदनमाशु करैविभाति ।**
**यस्मा हिमांशुरवलवितजालमार्गः ॥१॥८॥**

"चंद्रशेखराच्या समाधीचा भंग केल्यामुळे त्याने फार पूर्वीच कामिनीच्या मनातील मदनाला दग्ध केले होते. परंतु चद्राने महालातील खिडक्यांतून प्रवेश करून आपल्या करांनी कामिनी वनांच्या मनातूनच मदनाला उठविले, असे दिसते."

महादेवांच्या जटाजूटांत गंगा आहे, हे खरे, परंतु यमुना कोठे आहे? याबद्दल कवीला प्रश्न पडला. परंतु त्याला लगेच यमुना महादेवाच्या तनुशी संलग्न असलेलीही दिसली; ती अशी

**यस्यानुरागवशतः स्फुटकालकूट -।**
**च्छायाछलेन कुतकेलिकचावमर्दाम् ।।**
**ईर्ष्यानुबन्धकलुषं प्रसमीक्ष्म गङ्गा -।**
**मालिङ्गितो यमुनेमव विभाति कंण्ठ ॥१॥३९॥**

"यमुनेचेही गंगेप्रमाणेच शंकरावर प्रेम होते. प्रणयक्रीडेत वेणी विस्कटलेल्या गंगेला त्याबद्दल मत्सर वाटतो हें पाहून कालकूटछटेच्या मिषाने यमुनेने नीलकंठाच्या गळ्यालाच आलिंगन दिले." कालकुटाचे प्राशन केल्यावर शंकराच्या कंठात कालकूटविषाच्या अग्नीचा ओघ अडकून कां राहिला? शंकराच्या हृदयापर्यंत तो का नाही पोचला ? याचे कारण कवी सांगतो-।

**प्रेमामृतेन गिरिराज सुताश्रयेण ।**
**न प्लाविते ऽ व हृदयेऽस्ति ममावकाशः ॥**
**यस्याधिकन्धरमितीव पदं नबन्ध |**
**संधुक्षितत्रिभुवनाग्निशिखो विषौधः ॥ १॥५०॥**

"त्या विषाग्नीच्या ओघाला असे दिसले की, गिरिराजसुता जी पार्वती, तिच्याविषयीचे प्रेमामृत शंकराच्या हृदयांत भरून राहिले आहे. तेथे मला रिती जागाच शिल्लक नाही; असे म्हणून तो त्रिभुवनास जाळून खाक करणाऱ्या अग्नीच्या ज्वाळांनी भरलेला विषाचा ओघ खांद्यांच्या वर कंठीतच स्थान बांधून स्थिरावला."

या कवीच्या कल्पनाशक्तीच्या विलासाची वाटेल तितकी उदाहरणे या महाकाव्यांत पदोपदी आढळतात. त्यांत भव्यता व सौंदर्य हे गुण सारखेच प्रतीत होतात. निसर्गाच्या भव्यतेत अद्भुताचा संगम झाल्यामुळे ती अधिक प्रभावी होते.

ज्या पुराणप्रसिद्ध मंदराचलावर ही महादेवाची ज्योत्स्नावती नगरी वसली होती, त्याच्या उंचीची कल्पना कवी रंगवीत आहे.-

**अभ्याहताहिमकरः स्फुरदच्छतारा-॥**
**प्रत्तारतार किरणोत्करदन्तुरश्रीः ॥**
**मूलेन यस्य मथितः सकलोम्बुराशि -|**
**रत्युन्नतेन शिखरेणच नाकमार्गः ॥४॥२॥**

"या अद्रीच्या बुंध्याच्या योगाने सगळा सागर देवासुरांनी घुसळला; तो त्याचा बुंधा किती खोल असेल ! याचा माथा स्वर्गातल्या मार्गावर शिरलेला, म्हणजे पाहा, किती उंच असावा! सूर्याला हा अडथळा आणीत असतो; याच्या शिखराला लखलखणारा तारांचा

पसारा अडलेला असतो, त्यामुळे हा उत्कट हास्य करीत असल्याची शोभा येते."

या कवीच्या काव्यांत प्रसादगुणही पुष्कळ आहे. त्याची प्रतीती अनुष्टुप् छन्दांतील सर्गात सहज येते. चतुर संवादाचे अत्यंत महत्त्वाचे प्रसंग यांत आहेत, त्यात वैचारिक सुभगता दिसून येते; सुंदर सुभाषिते त्यांत आहेत कालमुसल नामक गणेश शंकराचा दूत म्हणून अंधकासुराच्या दरबारांत संदेश सांगतांना भाषण करतो. त्यांत प्रथम तो असुरसम्राट अंधकासुराच्या भाषणाची स्तुती करतो. त्यांत वक्तृत्त्वाचा आदर्शच कसा असतो हे कवी दूतमुखानें सूचित करतो-

**कल्याणीं गिरमुत्स्रष्टुं विरला एव जानते ।**
**सत्यां रेखां विलिखितुं चित्रकर्मविदो यथा ।। ३२ । ७० ।।**

"कुशल चित्रकार ज्याप्रमाणे सत्यारेखा कशी रेखाटावी हे जाणतात, त्याप्रमाणे कल्याणी वाणी कशी बोलावी हे थोडेच लोक जाणतात."

या ठिकाणी भाषणास चित्ररेखेची व वक्त्यास चित्रकाराची उपमा दिली आहे, ती फारच सूचक आहे. --

**त्वया नैयायिकेनेव सत्पक्षाश्रयशालिना । हेतौ विदधता यत्नं परपक्षो निराकृतः ।। ३२।७४।**

"नैयायिक म्ह० न्यायाचे म्ह० सत्यानुगामी विचाराचे समर्थन करणारा सत्पक्षाचाच आश्रय नेहमी करतो व युक्तिप्रयोग करतो. त्यामुळे परपक्ष पराभूतच होतो; तूंही तसाच सत्पक्षाचा स्वीकार करून युक्तिप्रयोग करतोस."

दूतमुखानें अंधकासुराच्या प्रजाविषयक वर्तनाचे वर्णन करतांना सज्जनाचा आदर्श कवी दर्शित करतो-

**क्रूरेऽपि मार्दवोपेता वामाचा रेऽपि दक्षिणाः ।**
**पापेऽपि शुद्धमतयस्त्वादृशा भुवि दुर्लभाः । ३२।७९**

"क्रूर व्यक्तींविषयीं देखील मार्दव बाळगणारे वाकडे वागणाऱ्यांच्या बाबतींतही सरळ व पाप्यांच्या बद्दलही शुद्धबुद्धीचे असे तुझ्यासारखे जगांत दुर्लभ आहेत."

हरविजय महाकाव्यांतील ही मुख्य कथा होय. या काव्याच्या शेवटीं स्वतः रत्नाकर कवीनें स्वतःच्या या काव्याची महती अशी सांगितली आहे की या काव्याचें सम्यक अध्ययन करणारा विद्यार्थी अकवी असेल तर कवी बनेल व जो कवी असेल तो महाकवी बनेल.

रत्नाकर कवीचें वक्रोक्तीपंचविशिका हे पन्नास श्लोकांचें लघुकाव्य आहे. यांत शिवपार्वतीचा वक्रोक्तिमय विनोदपूर्ण असा संवाद आहे. समाधानी व उल्हसित वृत्तींत शंकरपार्वती हे पति-पत्नी एकमेकांवर कोटी करून हसून खेळून एकमेकांवर ताण करण्याचा

व एकमेकांना बावळट ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत; असे या काव्याचे वातावरण आहे. ही वक्रोक्ती केवळ शब्दश्लेषावर म्हणजे नानार्थक शद्बांच्या उपयोगावर आधारलेली आहे. प्रत्येक श्लोकाच्या शेवटी कवी वाचकास आशीर्वाद देतो की अशा रीतीने हरास हरविणारी पार्वती किंवा पार्वतीस हार खावयास लावणारा हर तुमचे कल्याण करो. यांतील विनोद शब्दनिष्ठच आहे; तरी त्यात शृंगारिक प्रणय, मैत्री, लज्जा, सूक्ष्म असूया व भक्ती या भावना चातुर्यानें सुरेख रीतीनें व्यक्त होतात. अनेकदा संस्कृत शब्दांची समासांची वा संधींची फोड करण्याकरितां बुद्धीस ताण पडतो किंवा तापही होतो, हे मान्यच करावे लागते. संस्कृतमध्येच समजावून घेण्यांत स्वारस्य टिकते. भाषांतरांत रस पार निघून जातो, गंमत रहात नाही म्हणून एकच उदाहरण येथे देतो-

**त्वं हालाहलमृत् करोषि मनसो मूर्च्छा ममलिंगीतो**
**हालां नैव विभर्मि नैवच हलं मुग्धे कथं हालिकः ॥१॥**
**सत्यं हालिकतैव ते समुचिता सवतस्य गोवाहने**
**वक्रोक्त्येति जितो हिमाद्रिसुतथा स्मेरो हर पातुवः ॥२॥**

पार्वती :- देवा, माझ्या मनास तुझ्या आलिगनानें मूर्च्छा का बरे यावी ? अस का होत? आलं लक्षांत माझ्या तू हालाहल घेतल आहेस; हेच कारण.

देव म्हणतो :- अंः, माझ्यापाशी हाला म्ह. दारू नाही किंवा हल म्ह. नांगरही नाही, मला नांगऱ्या समजतेस काय ?

पार्वती:- नांगऱ्याच, नाही तर काय तुझी ही बैलाची नित्यसंगत काय दाखविते । हर हरला व हसला. तो तुमचे पालन करो.

**(मुंबई नभोवाणीच्या सौजन्याने)**

**(प्रतिष्ठान, फेब्रुवारी, १९५५ पृ. १७ ते २२२)**

ooo

## ६

# रामदासांचे जीवनकार्य

श्रीचक्रधरस्वामी, ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ, दासोपंत, वामन व रामदास यांनीच विशेषत: आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची रचना मराठीत मध्ययुगात केली आहे. त्या मध्ययुगीन मराठी तत्त्वज्ञान्यांच्या परंपरेतील अखेरचे श्रेष्ठ संत रामदास होत. श्रीचक्रधरस्वामींचे द्वैती तत्त्वज्ञान मराठी समाजात प्रसृत होण्यात यशस्वी झाले नाही. बाकीच्या संतांचे भागवतधर्मीय अद्वैत तत्त्वज्ञान सर्वत्र फैलावले. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व दासबोध ही जुन्या मराठी साहित्यातील प्रस्थानत्रयी होय. प्रपंचात राहूनच परमार्थाची सिद्धी करता येते, हा पुराणप्रसिद्ध भागवतधर्मीय सिद्धांत या प्रस्थानत्रयीने मराठी भाषेच्या द्वारे समाजात प्रस्थापित केला. या विचारानेच महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाची शुद्धी केली व त्याच्यात जोम राखण्याचे कार्य केले ते आतापर्यंत सुरू आहे.

ज्ञानेश्वरांपासून चालत आलेले भागवतधर्मीय तत्त्वज्ञान रामदासांनी स्वत:च्या चिंतनाने, प्रतीतिबलाने व प्रतिभेने अधिक समृद्ध केले. भगवद्गीता, भागवत व योगवासिष्ठ यातील अनेक कल्पनांमध्ये नवीन गंभीर अर्थ रामदासांना दिसला. प्रपंच व परमार्थ यांच्यातील विसंगती पूर्ण दूर करून त्यांच्यात पूर्ण सुसंगती तात्त्विक दृष्टीने दाखविण्यात अपूर्व यश रामदासांनी मिळविले आहे. शंकराचार्यांच्या मायावादी अद्वैतदर्शनाला एक निराळा संस्कार प्रथम ज्ञानदेवांनी दिला आणि नंतर रामदासांनी त्याला आणखी दुसरा संस्कार दिला. रामदासांनी अद्वैतदर्शनाला प्रवृत्ती-निवृत्तीच्या द्वंद्वातून सोडवून घेतले, प्रपंच व परमार्थ यांच्यातील विरोध मोडून काढला आणि परमार्थाच्या सिंहासनावर उत्तम पुरुषाच्या प्रपंचाला मूर्धाभिषेक केला. हे अस्सल वैचारिक कार्य इतर कोणालाही मध्ययुगात इतक्या यशस्वी रीतीने करता आले नाही. या कार्याचे विहंगावलोकन या भाषणाच्या उत्तर भागात करू.

रामदासांच्या आत्मचरित्राचे व कार्याचे उत्कट, भव्य व सुंदर चित्र त्यांच्या साहित्यात जागोजागी प्रतिबिंबित झाले आहे. त्यांच्या स्वत:च्याच शब्दात त्याचे सार 'संकेते' म्हणजे सूचित रूपाने, असे आहे -

बहुजनांस चालवी । नाना मंडळें हालवी । ऐसी समर्थपदवी । विवेकें होते । विवेक एकांती करावा । जगदीश धारणेनें धरावा । लोक आपुला आणि परावा । म्हणोचि नये ॥ (दासबोध १८-१०) हे प्रचीतीचे बोलिले । आधीं केले मग सांगितलें । मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणी एकें ॥ महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें मरावे । जाणते करूनि विखरावे । नाना देशीं । (दासबोध ११-१०) शहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टिमध्ये भगवद्भजन । वाढवावें ॥ (१४-६). आत्मोन्नती ज्यांनी केली आहे आणि सर्वत्र समभावनेने सर्वांची उन्नती सतत करण्यास जे उद्युक्त झाले आहेत अशा महंतांची, परमार्थी लोकशिक्षकांची संस्था उत्पन्न करणे व ती चालविणे, हे रामदासांचे मुख्य जीवितकार्य होते. समाजधारणेचे राजकारण हे त्याचे प्रधान साधन होते. तत्त्वज्ञानी व परमार्थी पुरुषांच्या शिकवणीने चालणारा, विवेक, विचार व सावधपणा यांच्या योगाने महाकाळासही धाक वाटेल अशा प्रयत्नात रत असलेला मानवी समाज उत्पन्न करणे हे रामदासांचे उद्दिष्ट होते. त्याप्रमाणे त्यांनी स्वत: आचरले व नंतर लोकांस बोधिले, 'आधीं केलें मग सांगितलें'. सर्व जनांना सुखी करण्याकरिता प्रबोध शक्तीची द्वारे उघडणारे महंत मिळावे म्हणून रामदासांनी जन्मभर खटपट केली.

स्वत:चे दिव्य जीवन निर्मिण्याकरिता रामदासांनी अचाट साहसात आयुष्य व्यतीत केले. माणसांना युगानुयुगे गाढ निराशेतून ओढून व विवेकी बनवून अदम्य उत्साह देत राहील असेच त्यांच्या भव्य जीवनाचे चित्र आहे.

संतचरित्र म्हणून इतके मोठे चरित्रवाङ्मय मराठीत प्रथम रामदासांचे उपलब्ध होते. इंग्रजी राज्य होण्यापूर्वीच्या मराठी साहित्यात रामदासांची चरित्रे जितकी सापडतात, तितकी कोणाही संताची सापडत नाहीत. समर्थशिष्य तंजावर मठाधिपती भीमस्वामी, तिसगाव मठपती, दिनकरस्वामी, मेरुस्वामी, हरिहरस्वामी, उद्धवसुत, राजाराम प्रसादी व चरेगावकर आत्मारामबुवा यांनी लिहिलेली छोटी चरित्रे समग्र किंवा त्रुटित अशी उपलब्ध होतात. समर्थशिष्य गिरिधरस्वामी, हनुमंतस्वामी व महिपतीबुवा यांनी लिहिलेली विस्तृत चरित्रे मिळतात. आत्माराम महाराज यांनी लिहिलेले 'दासविश्रामधाम' हा तर चरित्रसागरच आहे. ही मध्ययुगीन वातावरणात लिहिलेली चरित्रे पौराणिक पद्धतीची आहेत. त्यात अद्भुत चमत्कारपूर्ण कथांचा फार सुकाळ झाला आहे. त्यातून वास्तविक चरित्राची कथा ऐतिहासिक पुराव्यांच्या व देशकालपरिस्थितीच्या अनुसंधानाने हुडकून काढावी लागते. त्यामुळे अर्वाचीन काळात रामदासचरित्र हा आधुनिक इतिहासज्ञ पंडितांच्या वादाचा सततचा विषय बनला आहे. किंबहुना त्यांनी खूप वादग्रस्त करून सोडला आहे. त्यातील अत्यंत वादग्रस्त मुद्दा म्हणजे रामदास व शिवाजी यांची भेट केव्हा झाली व शिवाजींच्या राजकारणाशी रामदासांचा काय संबंध होता हाच होय. हा अत्यंत वादग्रस्त मुद्दा बाजूला काढला तरी रामदासांचा धर्मसंस्थापनेचा उद्योग अनन्यसामान्य होता हे मान्य होण्यासारखे

आहे. त्याचप्रमाणे अध्यात्मज्ञान आणि प्रासादिक व ओजस्वी शैली यांनी संपन्न असलेले सारस्वत रामदासांनी निर्मिले याबद्दलही वाद होण्यासारखा नाही.

श्रीरामदासांच्या त्र्याहत्तर वर्षांच्या कारकीर्दीचे ४ भाग पडतात. त्यातील पहिले तीन भाग नेमके बारा बारा वर्षांचे आहेत. बारा वर्षे शैशवावस्था, बारा वर्षे गोदाकाठी तपश्चर्या व बारा वर्षे तीर्थाटन, चौथ्या उरलेल्या भागात कृष्णेच्या परिसरात राजकारण व धर्मसंस्थापनेचे कार्य अवतार समाप्तीपर्यंत त्यांनी केले.

ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम यांच्याप्रमाणेच शुचिष्मंत भगवद्भक्तांच्या कुळात, 'जे समजले व वर्तले ।' (दासबोध २-६) अशा भाग्यपुरुषांच्या घराण्यात रामदासांचा जन्म झाला. अशा जन्मास भगवद्गीतेत 'दुर्लभतरम्' म्हटले आहे. बेदर प्रांतातून इसवी सनाच्या दहाव्या शतकात रामदासांचे मूळ पुरुष कृष्णाजीपंत ठोसर औरंगाबाद प्रदेशात आले. कृष्णाजीपंतांपासून रामदासांचे वडील सूर्याजीपंत बावीसावे पुरुष. जांब गावचे कुलकर्णपण वंशपरंपरागत या घराण्याकडे होते. रामदासांची माता राणूबाई. सूर्याजीपंतांची सूर्य व श्रीराम यांची उपासना नित्य चाले. त्यात राणूबाईचे साहाय्य असे.

**गृहस्थाश्रमी असोनि जाण । परमार्थ साधनीं त्यांचे मन ।**
**वाचेसी नेम केला त्यानं । असत्य वचन न बोले ॥**

असे महिपतीने त्यांचे वर्णन केले आहे. सूर्याजीपंतांचे शरीर नित्य सहस्र सूर्यनमस्कारांनी तेज:पुंज झाले होते. सूर्यनारायणाच्या वरदानाने त्यांना दोन तेजस्वी पुत्र झाले. पहिला गंगाधर व दुसरा नारायण, म्हणजेच रामदास. रामदासांच्या ज्येष्ठ बंधूस श्रेष्ठ म्हणून संबोधित असत. जांब या गावी शके १५३० (इ.स. १६०८) चैत्र शुद्ध नवमीस म्हणजे रामनवमीस मध्यान्ही रामजन्माच्या वेळी रामदासांचा जन्म झाला. नारायण हे जन्मनाम. नारायणाच्या प्रत्येक वाढदिवशी प्रतिवर्षी रामनवमीचा उत्सव भजन-कीर्तनाच्या गजरात साजरा होई. त्याचा नारायणाच्या बालमनावर खोल भावनामय ठसा उमटला. राणूबाईंच्या माहेरी एकनाथांचा भक्तिसंप्रदाय होता. त्याचाही प्रभाव नारायणावर पडून घरी पडलेला ठसा अधिकच दृढ बनला. एकनाथी रामायणाचे सतत श्रवण घडून रामभक्तीचे बीज पेरले गेले. पिता, माता व ज्येष्ठ बंधू या तिघांच्या वात्सल्याच्या ओलाव्याने रामभक्तीच्या बीजाला बाळपणीच अंकुर आला. एकनाथांच्या परंपरेशी असे नाते जुळले, त्यामुळे पुढे रामदास हे एकनाथांचे अवतार होत, असेही संप्रदायात म्हणू लागले.

नारायणाचे शरीर मुळातच चपळ, सोशिक व आरोग्याचे निधान होते. ही निसर्गाची विलक्षण देणगीच होती. स्वभाव अवखळ व साहसी, बुद्धी ग्रहणपटू, स्मृती दृढ व कल्पना विस्तारशील होती. चरित्रकारांनी रामदासांच्या अनेक अद्भुत बाललीला वर्णिल्या आहेत. त्यातील वास्तविक सार असे निघते. बाळपणी रामदासांना क्रीडेची अपरंपार हौस होती. अचूक नेमबाजी असल्यामुळे गोट्या व विटी-दांडू यात हार होत नसे. सुरपारंब्याचा खेळ

खेळताना झाडांच्या फांद्यांवरून वानरासारख्या अचूक झेपा टाकता येत होत्या. पोहणे, घोड्यावर बसणे, तिरंदाजी इत्यादी गोष्टीत ते लवकर पटाईत झाले. घोड्यावर बसण्याची सवय म्हातारपणापर्यंत टिकली. समर्थ वयाच्या ६६ व्या वर्षी हेळवाकच्या घळीतून घोड्यावर बसून चाफळास डोंगरकपारी ओलांडून आले असा तत्कालीन पत्रात उल्लेख आहे. रामदासांच्या बाललीलेत अपार शरीरसामर्थ्याच्या खुणा उमटू लागल्या होत्या.

रामदासांचे प्राथमिक शिक्षण फार जलद पूर्ण झाले. बालबोध व मोडी अक्षरांचे लेखन, वाचन, अंकगणित या गोष्टी झपाट्याने ते शिकले. त्यामुळे उपनयनही लवकर पाचव्या वर्षी झाले. व्युत्पन्न व ज्ञानी वडील व ज्येष्ठ बंधू यांची शिकवण मिळाल्यामुळे ब्रह्मकर्म व पुराणेतिहास अधिगत केले. रामदासांचे शिक्षण कशा पद्धतीने झाले असेल याची कल्पना त्यांच्या साहित्यातील शैक्षणिक उपदेशावरून चांगली येते. ''सुंदर अक्षर ल्याहावें । स्पष्ट नेमस्त वाचावें । विवरविवरो जाणावें । अर्थान्तर ॥ मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट । करू नये ॥ प्रात:काळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें । यथानुशक्ति आठवावे । सर्वोत्तमासी ॥

धार्मिक शिक्षणाचा प्रभाव रामदासांवर फारच खोल झाला. वडील मुमुक्षूंवर अनुग्रह करून मंत्रोपदेश देत असत. रामदासांनी आपला तसा मनोदय वडिलांस कळविला. बालवय म्हणून त्यांनी उपेक्षा केली. आठव्या वर्षी वडील निवर्तल्यावर श्रेष्ठांनी वडिलांची तीच पद्धती चालविली. ज्येष्ठ बंधूंपाशी रामदासांनी अनुग्रहाची याचना केली; परंतु त्यांनी 'धीर धर, योग्य वेळी सर्व काही होईल' असे सांगून मुद्दा टाळला. रामदासांना परमार्थाचा अनिवार ध्यास लहानपणीच लागला. चित्त परमार्थाच्या तृष्णेने तळमळत होते. मार्ग कसा सापडेल? कोणाकडे जावे? हा विचार घोळू लागला. आठवले, मोक्षाच्या मार्गातील वाटाड्या हनुमंत. मारुतीच्या देवळात जाऊन करुणा भाकली. उदासपणे पडून राहिले. खेदाने थकून झोप लागली. प्रत्यक्ष रामचंद्रांनी स्वप्नात भेट देऊन, 'श्रीराम जयराम जयजयराम' हा त्रयोदशाक्षरी मंत्र उपदेशिला. पातंजल योगसूत्रात म्हटले आहे की, 'स एष पूर्वेषामपि गुरु: कालेनान्च्छेदात्', सर्वांत प्राचीन जे त्यांचाही गुरू तो आहे. ईवराने स्वत:च मार्ग दाखविला. नारायणाने या क्षणापासून रामाचे दास्य पत्करून 'रामदास' ही पदवी धारण केली. शके १५३८, श्रावण शुद्ध अष्टमीस मध्यरात्री हा अनुग्रह झाला. ध्रुव व प्रल्हाद यांनाही याच कौमार्यावस्थेत ईश्वरानुग्रह स्वत: श्रींनी प्रकट होऊन दिला, तसे झाले. रामदासांनी आपली गुरुपरंपरा एका अभंगात सांगितली आहे. त्यात हा मुद्दा आला आहे.

'आदि नारायण सद्गुरु आमुचा । शिष्य जाला त्याचा महा विष्णू । तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस । तेणें ब्रह्मास उपदेशिलें ॥ उपदेश केला त्यावरीं वसिष्ठा । तेथें धरा निष्ठा शुद्ध भावीं । वसिष्ठें उपदेशिलें रामरायाशीं । रामें रामदासी उपदेशिलें ॥' केव्हा व कोठे याचा येथे

निर्देश नसला तरी दुसऱ्या अभंगावरून बालपणी घरीच उपदेश घडला, असे अनुमान करणे अधिक उचित वाटते. 'आमचे वंशीं आत्माराम । एक पिंडीचे निष्काम । रामदास्य जालें आतां । अवघा वंश धन्य आतां ।' 'बापें केली उपासना । आम्ही लाधलों त्या धना । पोर संकळां संकोचलें । एक सुखा उधळलें । रामी रामदासी स्थिति । पाहिली वडिलांची रीति॥'. बालपणीच स्वत:च्या जनक परिवारात ईश्वरानेच स्वत:चे दर्शन देऊन मार्गही दाखविला. तो राघवाचा मार्ग अनंत आहे ही खूणगाठ बांधून पुढे सतत न थांबता, अखेरपर्यंत चालतच राहिले पाहिजे, क्षणभरही थांबता कामा नये, वा क्षणभरही विस्मृती अयोग्य होय; म्हणून तो प्राप्त प्रत्यय अंगी बाणावा, स्वरूपी राहण्याचा स्वधर्म हा टिकावा, मोक्षदशेची पहाट फुटली तरी तिचा शाश्वत मध्यान्ह व्हावा, म्हणून घरातून निसटले. राघवाच्या अनंत मार्गाला लागले. गोदेत उडी टाकून पैलतीर गाठले. वस्तुत: अगोदर उद्धृत केलेल्या अभंगांत वर्णिल्याप्रमाणे घरच तपोभूमी होती. श्रेष्ठ बंधूंप्रमाणेच माताही ईश्वरनिष्ठ होती. मातेबद्दलचा अभिप्राय असा होता. 'विवेकाची दृढ बुद्धी । तुझेनि गुणें । श्रेष्ठतर संतच.' 'विमल ब्रह्मपरायण । सकलभक्ति संरक्षण । विशेष वैराग्यलक्षण । तुमचे ठायीं ॥ दक्षता आणि चातुर्यता । व्युत्पन्नता आणि लीनता । उत्तम गुण सर्वज्ञता । तुमचे ठायीं ॥' असा समर्थांनी श्रेष्ठांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांचा महिमा वर्णिला आहे. तपोभूमीत ती होती. ती सोडून नाशिकच्या जवळील टाकळीस विजनवास का पत्करला? त्या मधुर वात्सल्याच्या शीतल छायेत ममतेचा मृदू बंध होता, तो नकळत संपूर्ण विळखा घालून टाकतो. योगसूत्राच्या व्यासभाष्यात म्हटले आहे तद्वत योग्याचे मन अक्षिपात्रकल्प डोळ्याला रेशमाचा धागाही खुपतो असे विषयस्पर्श असहिष्णू व संवेदनशील असते. मातेने लग्नाचा आग्रह करून नाखुशी असताच लग्नमंडपात उभे केले. 'सावधान' म्हणून इशाऱ्याने शब्द ऐकताच वेदीवरून उडी ठोकून पलायन केले. मनाला मागे पाहू नकोस असे बजावले -

**सदा सेवि आरण्य तारुण्य काळीं । मिळेना कदा कल्पनेचे नि मेळीं ।**
**चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

अनेक गडी धावले. कसे सापडणे शक्य? ब्रह्मपिशाच्च ते. समर्थांना नाशिकचे लोक 'ब्रह्मपिसा' म्हणत. ते महाभूत कोणालाच हाती लागत नाही. ईशोपनिषदात म्हटले आहे की, 'तद् धावतोऽन्यानत्येति' धावणाऱ्या इतर सर्वांच्या पुढे जाते ते.

नाशिक हे रामोपासनेस अत्यंत अनुकूल स्थान. रामायणाने नाशिक हे रामकथेत राक्षससंहाररूप अवतारकार्याचे प्रारंभस्थान म्हणून दर्शित केले आहे. दुसरे, नाशिक हे वैदिक, शास्त्री, पंडित, पुराणिक, कीर्तनकार, कलावंत यांचे महाराष्ट्रातील विद्येचे माहेरघर, दक्षिणकाशी म्हणून अनेक शतके प्रसिद्ध. विद्यारूप तपाला तर जांबचा उपयोगच नव्हता. रामदासांच्या मते स्वत:च्या गावी राहून माणसे संकुचित बनून घरकोंडे बनतात. पराक्रम, विद्या व भाग्योदय याकरिता आपले गाव सोडणे उत्तम. 'गावीच वाढती । ते तो करंटे होती


वाय १७४–११

। कोणी विद्या सीकताती । तरी विदेशा जाती । आपुल्या लोकांमध्ये । भाग्य वैभव आले । परंतु ऐसा थोडा । प्रचीतीने निवडा ।' याप्रमाणे किती सांगावे, सांगता सांगता दमलो. लोकांच्या पाठीस लागून सांगावे तर लोक आणखी रागावतात, असा या पदाचा शेवट आहे. सलगीच्या माणसात सारखे राहून वाढ खुंटते. मेंचटपणा अंगी येतो. झाडाखाली झाड वाढत नसते, 'झाडाखाली झाड नव्हे । सलगीमध्ये कांहीं नव्हें', असे दुसऱ्या पदात रामदासांनी बजावले आहे. दासबोधातही हा विचार पुन्हा आला आहे.

नाशिकजवळ टाकळी गाव आहे. तेथे गोदावरी व नंदिनी या नद्यांचा संगम झाला आहे. रामदास टाकळीस एका गुहेत राहत. तेथे त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. तेथे नित्यक्रम कसा होता याची कल्पना त्यांच्या काही उपदेशपर कविता व दासबोधातील शिक्षणाचे वर्णन यावरून येते. चरित्रकारांनीही त्यांचा नित्यक्रम सांगितला आहे. त्रयोदशाक्षरी राममंत्राचा तेरा कोटी जप करण्याचा संकल्प शके १५४२ माघ शुद्ध सप्तमीस गोदासंगमावर केला व तो पुढील बारा वर्षांत पुरा केला. अनेक गायत्री पुरश्चरणेही त्याबरोबर केली. स्नानसंध्या आटोपल्यावर कमरेभर पाण्यात दुपारी १२ वाजेपर्यंत उभे राहून जप व पुरश्चरण ते करीत. नंतर ब्रह्मयज्ञ आटोपून पंचवटीत मधुकरी मागून व भोजन करून गुहेत विश्रांती घेत. एका कवितेत त्यांनी असा उपदेश केला आहे : 'करावे अलोड्ये वेद आणि शास्त्रें । मंत्र, स्तुतिस्तोत्रे, नानापरी । तपे पुरश्चरणें ध्यानस्थ बैसावें । सांग संपादावे देवार्चन । धरणीपारणीं नित्य उपोषणें । तेणे होती क्षीण महादोष ॥ काव्यें अभ्यासावीं पुराणें सांगावीं । कवित्वे करावीं सावकाश ॥' दासबोधातील समर्थांच्या लक्षणांत म्हटले आहे की, 'अक्षर सुंदर लिहो जाणें । चपल शुद्ध वाचू जाणें । अर्थान्तर सांगो जाणें । सकळ कांहीं ॥ राखे सकळांचे अंतर । उदंड करी पाठांतर । नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥' (दासबोध १९-४). यावरून रामदासांच्या अध्ययनाचे जे विषय सूचित होतात त्यात त्यांच्या फार आवडीची गायन-वादन-कलाही अंतर्भूत होते. श्रवणभक्तीच्या उपदेशांत दासबोधात (४-१) वेदान्त पुराणेच नव्हे, तर अनेक भौतिक विद्या आणि भौतिक कला यांचाही अंतर्भाव केला आहे. रोज सहा तास सकाळी कंबरभर किंवा गळाभर पाण्यात उभे राहून रामदासांनी बारा वर्षे पुरश्चरण केले. या त्यांच्या भोळ्या चरित्रकारांनी वर्णिलेल्या गोष्टीवर, रामदासांचा नेमस्तपणावर जो सर्वत्र कटाक्ष दिसतो त्यावरून, विश्वास ठेवण्यास पंचाईत होते. त्यांच्याच भाषेत हेकाड वैराग्याच्या कोटीत हा तपश्चर्येचा प्रकार पडतो. भगवद्गीतेत शरीरशक्तिघातक अशी तामसी तपश्चर्या निंदिली आहे, हे रामदासांना माहीत होते. रामदासांनी संस्कृतमधील उपनिषदे, महाभारत, रामायण, योगवासिष्ठ, भागवत, योगसांख्यादि दर्शने मार्मिकपणे अभ्यासिली होती व त्याबरोबर ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ, दासोपंत इत्यादिकांच्या प्रासादिक मराठी ग्रंथांचाही उत्कृष्ट व्यासंग केला होता, हे दासबोध व स्फुट कविता यावरून पदोपदी ध्यानात येते. तीक्ष्ण तर्कशक्ती, समतोल विचार व व्यवहारचातुर्य या गुणांची मूर्ती असलेल्या रामदासांनी

आयुष्याचा अमोल सर्वोत्तम भाग पाण्यात राहून शरीरमनाच्या शक्तीची उधळपट्टी करीत घालविला हे पटूच शकत नाही. परंतु त्यांना लहान वयात टाकळीस एकांतवासात मुनिवृत्तीने भजनात दंग होऊन राहू लागलेले पाहून भोवतालच्या लोकांच्या तो चर्चेचा विषय झाला. रामदासांनीच आपल्यासंबंधी या वेळी लोक काय चर्चा करीत याचा नमुना सांगितला आहे. 'विषयांची सोयरी प्रपंचाची सखी। मिळोनी एकमेकी करिती मात। यासी काय झालें। धडचि काय बिघडलें। वयेवीण लागले देवपिसें। यासी कोणी मोहाचे, वडिलधारें नाहीं। म्हणऊनी पाही छंद करी।' यावर रामदासांनी आपणास खरोखर पिसें लागले आहे असा कबुलीजबाब दिला आहे. रामदासांना उपजत सर्व विषयी सावधपण असल्यामुळे त्यांनी या बारा वर्षांच्या काळात नाशिक क्षेत्रात बहुश्रुतपणा मिळविला व अध्ययनाच्या आणि श्रवणाच्या प्रसंगाने अनेक प्रकारच्या लहानमोठ्या सज्जनांच्या संगतीचा लाभ घेतला. त्यात गाढ निराशेचेही क्षण अनेक वेळा आले. प्रबल मोहादि विकार, ध्येयाची विशालता व त्याच्या प्राप्तीबद्दल संशय, विद्यांचा प्रचंड व्याप, स्वत:चे एकाकी निराश्रित जीवन, आयुष्याची अल्पता आणि मानवी शक्तीचा अपुरेपणा यांच्या विचाराने अपार धीर असलेलेही ते मन भांबावून मधूनमधून सचिंत होत असे. त्यांच्या करुणाष्टकांमध्ये अशा प्रासंगिक निराशेचे व उद्वेगांचे अत्यंत प्रामाणिक चित्र प्रतिबिंबित झालेले दिसते.

**युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचिता।**
**नेणता भक्त मी तुझा बुद्धि दे रघुनायका॥**
**मन आवरेना कीं वासना वावडे सदा।**
**कल्पना धांवते सैरा बुद्धि दे रघुनायका॥**
**अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, सौख्य नाहीं जनामधे।**
**आश्रयो पाहता नाहीं, बुद्धि दे रघुनायका॥**
**संसार नेटका नाहीं, उद्वेगू वाटतो जिवीं।**
**परमार्थ कळेना कीं बुद्धि दे रघुनायका॥**
**उदास वाटतें जीवीं आतां जावे कुणीकडे।**
**तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे रघुनायका॥**
**उदंड भक्त तुम्हांला आम्हांला कोण पूसतें।**
**ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे रघुनायका॥**
**रामदास म्हणे माझा संसार तुज लागला।**
**संशयो वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका॥**

अगाध श्रद्धेच्या जोरावर उपासना व व्यासंग केला, प्रगती होत गेली, प्रगतीची अंतर्बाह्य लक्षणे प्रकट झाली, विश्वास वाढला. 'कोसळोन पडो हें आकाश' तरी राघवाची कास धरली ती सोडणार नाही, अशा प्रकारे प्रतिज्ञा दृढ होत गेली. 'दाता येक रघुनंदन', असा प्रत्यय आला.

'पावनभिक्षा, अभेद भक्ती, सज्जनसंगती, कोमळ वाचा, प्रसंग वोळखी, विमळ करणी, संगीत गाणे, आलाप गोडी, बहु पाठांतर, मनोहर शब्द, विद्यावैभव, अर्थारोहण, अलिप्तपण, जन-सुखकारक गुण, सावधपण, धूर्तकळा, आत्मनिवेदन, तद्रूपता व ब्रह्मानुभव', असे जे जे मागितले ते ते प्राप्त होत आहे असा अनुभव येत गेला. वादविवाद सोडून सुखाचा संवाद करण्याची हातोटी साधली. भक्तिरंगात सर्वकाळ अंत:करण रंगू लागले, विरक्ती बाणली. जेणे सबुद्धी उपजेल, पाखंड भंगेल, विवेक जागेल, देहबुद्धी तुटेल, भवसिंधू आटेल, ज्ञान उजळेल, सद्वस्तू भासेल, भास निरसेल व भगवंत प्रकटेल असे निर्मळ, सरळ, कोमळ, रसाळ व विशाळ कवित्व स्फुरू लागले.

हा प्रसाद कोणाचा? शब्दसृष्टीचे ईश्वर, विवेक निधीचे मनुष्याकार झालेले भांडार व अमृताचे मेघ जे वाल्मीकव्यासादिक कवीवर त्यांचा. त्यात रामदासांनी संस्कृत कवी व प्राकृत कवी असा भेदभाव केला नाही. '... भाषा प्राकृत । अर्थ वेदान्त आणि सिद्धान्त । नेणोनि त्यागी भ्रांत । मंदबुद्धीस्तव ॥ भाषा पालटे कांहीं । अर्थ वाया जात नाहीं । कार्यसिद्धी सर्वही । अर्थाचपासी ॥' (दासबोध ७-१). भाषेचा पक्षपात नको, भाषा कोणतीही असो, अर्थाशी गाठ पडली की संपले. प्राकृतातही संस्कृतासारखे खोल बोल व अनुभवाची ओल असल्यामुळे त्याचा त्याग करणारे मूर्खच होत, अशी मराठीतील ग्रंथांची तरफदारी रामदासांनी केली. यावरून त्यांनी प्राचीन मराठी साहित्याचा चांगला व्यासंग केला होता, हे आपोआप निर्णीत होते.

गोदातटी आरंभलेले विद्यामय तप तेथेच सफल झाल्याची पावती कालांतराने रामदासांनी पंचवटीच्या एका रामभक्तातर्फे पाठविलेल्या ओवीबद्ध पत्रात दिली आहे ती अशी : 'जनस्थान गोदातटीं । परमपावन पंचवटी । जेथें पडली कृपादृष्टी । रघुत्तमरायाची ॥'

गोदातटी बारा वर्षे तप सफल झाल्यावर रामदासांना एका स्थळी घट्ट आसन मांडलेले सोडण्याची इच्छा झाली. 'जें वडिलीं निर्माण केलें । तें पाहिजे पाहिलें' (दासबोध १५-९) असे मनात आले. वडील म्हणजे सर्व विश्वाचे वडील, चिन्मय जगदात्मा. त्याची ही सृष्टी हिंडून पाहावी हे भक्तीचेच एक अंग. जनस्थान पाहिले; परंतु त्यात पुन: वाल्मीकी रामायणात वर्णिलेले स्वत:च्या उपास्य देवाचे जन्मस्थान चर्मचक्षूंनी पाहून सर्वेंद्रियांचे समाधान होईल, असे वाटले. अयोध्येस केव्हा जाईन असे झाले. 'पांगुळ' या कवितेत रामदास म्हणतात - 'भरत गा । खंडामाजी । शरयूतीरचा गांव । धर्माचें नगर तेथें । राज्य करी रामराव । पांगुळा पाय देतो । देव जानकीचा नाथ । जाईन मी तया ठाया । देवा उत्तम तो ठाव ॥ राघवाचा धर्म जागो । सर्व अधर्म भागो । अज्ञान निरोनियां । विज्ञानीं लक्ष लागो।' रामदासांनी यात्रेचे प्रस्थान ठेवले. उद्धवनामक आठ-दहा वर्षे वयाचा शिष्य बरोबर घेतला असे म्हणतात. आणखी इतर कोण कोण बरोबर गेले याचा पत्ता लागत नाही. शके १५५४ (इ. स. १६३२) फाल्गुनामध्ये अखिल भारताच्या यात्रेस प्रारंभ झाला.

काशीच्या रोखाने निघाले. काशी, प्रयाग, गया करून अयोध्येकडे गेले. काशीत हनुमान घाटावर मुक्काम केला. तेथे मारुतीची स्थापना केली. अयोध्येस सर्वात जास्त वेळ म्हणजे ११ महिने राहिले. 'रामदासीं तीर्थविधि केला । रामीं पिंड समर्पिला ।' हा तीर्थविधी द्वारकेस राममंदिर बांधून केला असेही म्हणतात. हे पिंडसमर्पण वस्तुत; बालपणीच झाले होते. काश्मिरात श्रीनगरलाही रामदासांनी भेट दिली, असेही लिहिले आहे. पंजाबातही गेले. तेथे शीख धर्मगुरुंची भेट झाली. हिमालयातही बद्रीनारायण व केदारेश्वर येथपर्यंत मजल मारली. तेथे श्वेतमारुतीचे ध्यानस्थ स्थितीत दर्शन घडले. हिमालयाच्या या उंच ठिकाणी शैत्यबाधा झाली. श्वेतमारुतीने ती बाधा निवारण्याकरिता टोप, वल्कले, हुरमुजी रंगाची वस्त्रे, मेखला, जपमाळ, खडावा व कुबडी असा वेश देऊन सजवून पाठविले. हा रामदासी वेश नंतर कायम राहिला. नंतर पुढे हिमालयात मानससरोवरास प्रदक्षिणा करून स्वामी परतले. जगन्नाथपुरीचीही यात्रा पुरी केली. नंतर दक्षिणेस गेले. सेतुबंध रामेश्वरापर्यंत मजल मारली. किंकिंधा, श्रीशैलमल्लिकार्जुन, शेषाचल, गोकर्णमहाबळेवर इत्यादी तीर्थे संपवून करवीर क्षेत्री पोहोचले. तेथून कोकणात परशुरामक्षेत्राचे दर्शन घेऊन कृष्णेच्या उगमस्थानी क्षेत्र महाबळेश्वरास आले. तेथून सर्व महाराष्ट्रात पर्यटन केले. पैठण येथे काही दिवस राहिले. अखेर मातेचे स्मरण होऊन त्या मुख्य तीर्थाचे दर्शन घेतले व तीर्थयात्रेची समाप्ती केली.

वृद्ध मातेस (दंडवत) प्रणाम केला. तिची दृष्टी अधू होऊन दिसेनासे झाले होते. या पतितपावन बनलेल्या पुत्राची, सिद्ध पुरुषाची भेट झाल्याने दिव्य वात्सल्याने ऊर भरून आले. सर्व शरीर व सर्व इंद्रिये यात प्रकाश भरला. डोळ्यांना दृष्टी आली. असा चमत्कार असंभवनीय नाही. सध्या गंगातीरावर वास करीत असलेले संन्यासी पूर्वाश्रमीचे महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांना एकदा दृष्टी गेली असता ते नर्मदातीरावर असताना एकदम पुन: दृष्टी आली! रामदासांच्या मातेने दृष्टी आल्याबरोबर त्या पुण्यपुरुषाला विचारले की, ''भूतचेष्टा शिकलास काय? पिशाचवत् लहानपणापासून हिंडत आहेस. मध्येच कित्येक वर्षे गुप्त होतोस व पुन: प्रकट होतोस!'' रामदासांनी उत्तर दिले, ''होय आई, मला एक भूत कायम लागले आहे. ते कधीच सोडणार नाही. ते अद्भुत आहे.'' 'होतें वैकुंठीचे कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं । लागे कौसल्येच्या स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥' असा प्रारंभ करून भरतभेटीपर्यंतची सगळी रामायणकथा मातेला थोडक्यात ऐकविली व शेवटी म्हटले की, 'सर्वांभूतांचे हृदय । नाम त्याचें रामराय । रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे माय ॥' असे म्हणून मातेच्या चरणांना पुन: मस्तकाने स्पर्श केला व वडील बंधूंना दंडवत घातले आणि संमती घेऊन सप्त गोदावरीपर्यंत गेले. गोदेस प्रदक्षिणा घालून पुन: नाशिक -त्र्यंबकेश्वरास परतले. काही दिवस तेथेच विश्रांती घेतली.

या बारा वर्षांच्या तीर्थयात्रेत उत्तरेत व दक्षिणेत ठिकठिकाणी साधू-संतांच्या, महंतांच्या गाठीभेटी घेतल्या, मैत्री केली, शिष्यशाखा वाढविल्या व मठांची स्थापना केली. 'फिरणें व विवरणें' हे समर्थांचे जीवनसूत्र होते. विवरणें म्हणजे विचार, विश्वाचे अवलोकन व विश्वाचा

विचार. दासबोधात म्हटले आहे की, ‘कुग्रामें अथवा नगरें । पाहावी घरांचीं घरें । भिक्षामिसें लहान थोरें । परीक्षूनि सोडावीं ॥ बहुती कांहीं तरी सांपडे । विचक्षण लोकीं मैत्री घडे । उगेच बसतां कांहींच न घडे । फिरणें विवरणें ॥’ (१५-६) ‘एखादा आढळे गाजी । सकळ लोक अखंड राजी । सदासर्वदा आवडी ताजी । प्राणिमात्रांची । चुकोन उदंड आढळतें । मनुष्य दृष्टीस पडतें । महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात् ॥ ऐसा आढळता लोक । चमत्कारे गुणाग्राहिक । क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचे ॥’ सकळ लोकांस राजी राखणारा गाजी कोण त्यांना भेटला असेल? शिवाजी काय? होय, अखेर शिवाजीच. तो अर्थात नंतर भेटला. कृष्णातीरी फिरस्ती सुरू केल्यावर.

रामदास तटस्थपणे जग पाहत फिरले, ‘फिरे दास उदास लोकांस पाहे । मनामाजिं थक्कीत होऊनि राहे ॥’ रामदासांना भारताच्या या दीर्घकालीन तीर्थयात्रेत भारताच्या लोकस्थितीचे विराट दर्शन घडले. उद्ध्वस्त सामाजिक जीवन किंवा सामाजिक बेबंदशाही असे या लोकस्थितीचे दारुण लक्षण होते. दु:ख, दारिद्र्य व उद्वेग यांनी लोकांची दैना उडाली होती. रामदासांचे ‘अस्मानी सुलतानी’ हे प्रकरण देशस्थितीचे हृदयविदारक चित्र दाखवते. निसर्गाचा कोप व मुसलमान अमदानीतील जुलमी सुलतानी या दोन्ही गोष्टींचा तो परिपाक होता. अनेक राजवटींचा आपसात झगडा चालू असल्यामुळे अराजक वाढीस लागून, ‘बळी तो कान पिळी’ या न्यायाने राजसत्तेचा धाक न राहिल्यामुळे जबरदस्त गावगुंडांनी धुमाकूळ माजविला. कौटुंबिक जीवनाची घडीच बिघडली. गरीब प्रजा लुटली जात होती. पिके कणसाला आल्याबरोबर कोणीही कापून नेई. व्यापाऱ्यांचा धीर सुटला. उद्योगधंद्याच्या वाटाच बंद होऊ लागल्या. शेती, विणकाम, सुतारकाम, गवंडीकाम इतर कोणताही जो जो धनोत्पादनाचा धंदा करावा त्याचे फळ हाती पडता पडता कोणीही ज्याच्या हाती सापडेल तो ते लुबाडून न्यावयाचा. त्यामुळे सुलतानी संकटाने उग्र रूप धारण केले. महर्घता खायला उठली. कुटुंबे देशोधडीला लागली. ग्रामत्याग, देशत्याग, निराधार स्थितीत मृत्यू, गावेची गावे ओस पडणे, परसैन्याच्या धाडी येणे, लढणाऱ्या उभयपक्षीय सैन्याकडून लूटमार होणे अशी अरिष्टपरंपरा प्रजेवर सारखी कोसळू लागली. मुसलमान, मराठे सरदार व पोर्तुगीज या सर्वांचा असह्य जाच होत होता. मुसलमान व पोर्तुगीज हे तर लोकांच्या देवाधर्मावर हल्ला करून मानवी अंत:करणाचे लांडग्याप्रमाणे तुकडे तोडीत. घरात नांदणाऱ्या साजऱ्या गोजिऱ्या पोरींचे हात धरून बाहेर काढीत व धर्मभ्रष्ट करून पळवीत. अन्नाची वाण पडल्यामुळेही परधर्मांत लोक प्रविष्ट होत. कुलवंतांनी व धर्मनिष्ठांनी आत्महत्या केल्या. भकास दारिद्र्य व कुटुंबाची प्राणांतिक दैना पाहून कंटाळून भरल्या नदीत लोक उड्या टाकून प्राण देत, अग्नीत जाळून घेत किंवा विषभक्षणही करीत. सर्वत्र चौर्य माजले. कोठेही उपाय दिसेना. ‘मोठी फजिती फजिती । सांगावें तें किती ॥’ असे रामदास म्हणतात. जगण्यात अर्थ राहिला नाही. जीव परत घे देवा । दास म्हणे रे भगवंता । किती पाहासी सत्त्व । काय वांचोनी

वांचोनी? ते परतें जीवित्व ॥ 'परचक्रनिरुपणात' स्वामी म्हणतात, 'कांहींच पाहतां धड नाहीं। विचार सुचेना कांहीं । अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडले लोक ॥'

हे सर्व सामाजिक घडी विस्कटल्याचे परिणाम म्हणून रामदासांनी वर्णिले. मूळ कारण नीतिमर्यादा उडाली हे होय. सामाजिक आचार किंवा कर्तव्ये यापासून लोक च्युत झाले. आपसात कलह माजला, ईवरभक्तीचे रूप विकृत झाले, अज्ञान माजले, अशी मुख्य कारणे रामदासांनी सांगितली. 'विप्रीं सांडिला आचार । क्षेत्रीं (म्हणजे क्षत्रियांनी) सांडिला विचार । नीतिमर्यादा उडाली । भक्ति देवाची बुडाली ॥ नाहीं ज्ञानाचा विचार । केला अज्ञानें संचार।' ऐहिक व पारलौकिक अशा दोन्ही प्रकारच्या जीवनाची अवनती ज्या गोष्टीत दिसते ते सर्व करंटपण होय. रामदासांनी तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत - अविद्येची ही लक्षणे असे म्हटले आहे. आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा इतका जीवनव्यापी तपशीलवार अभिप्राय इतर कोणाही भारतीय अध्यात्मवाद्याने समर्थांपूर्वी काढला नव्हता. 'प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीवीण अवघे व्यर्थ । प्रत्ययज्ञानीं तो समर्थ । सकळांमध्यें ॥' (दासबोध २०-३) अशी जीवनव्यापी प्रत्ययाची राखण करण्याची जबाबदारी वर्णाश्रमधर्मी समाजव्यवस्थेत मुख्यत: ब्राह्मणांची. परंतु तो ब्राह्मणवर्णच भ्रष्ट झाला. त्यामुळे सर्वत्र अनास्था माजली. अनास्थेस रामदासांच्या मते मुख्य जबाबदार ब्राह्मण व क्षत्रिय. त्यातल्या त्यात ब्राह्मण. 'ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासूनी भ्रष्टले । गुरुत्व सांडुनि झाले । शिष्य शिष्यांचे ॥ हें ब्राह्मणांस कळेना । त्याची वृत्तीच वळेना । मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ आतांचे ब्राह्मणीं काय केले । अन्न मिळेना ऐसे जालें । तुम्हा बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाहीं?॥' असा रामदास जाब विचारतात.

रामदासांचे टीकाकार, रामदासांस ब्राह्मणांचा बडेजाव वाढविणारे संत म्हणून इतर संतांपासून वेगळे काढून दोष देतात. वस्तुत: वर्णाश्रमव्यवस्थेचीच तरफदारी रामदासांनी केली असे म्हणता येईल. इतर सर्व संतांना - ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतच्या सर्व संतांना - चातुर्वर्ण्य व्यवस्थेशिवाय दुसऱ्या प्रकारची अधिक चांगली समाजरचना होऊ शकते हे माहीत नव्हते किंवा मान्यही नव्हते. म्हणून रामदासांवर या बाबतीत वेगळी टीका करणेही वैचारिकदृष्ट्या चूक होय. अध्यात्माचा व मोक्षाचा अधिकार मनुष्यमात्रास समानच आहे व शुद्ध नीतीचा आचार करणारा कोणत्याही जातीचा असो, तो श्रेष्ठच होय, हा संतसिद्धांत रामदासांनीही अत्यंत मनापासून मांडला आहे. इतर कोणत्याही संतापेक्षा रामदासांचा विशेष हा होता की, ते सामुदायिक जीवन, ऐहिक व्यवहार व ऐहिक कल्याण यांचे एका निराळ्या दृष्टीने परमार्थाइतकेच महत्त्व मानीत, म्हणून ते वर्णव्यवस्थेच्या पालनासंबंधी अधिक कसोशीने विचार करीत होते.

मानवी समता पाळणे हाच सज्जनपणा व संतपणा, असे रामदास इतर संतांप्रमाणे समजत. मानवी समता व वर्णसंस्था यातला विरोध इतर संतांप्रमाणे रामदासांनाही जाणवत होता. म्हणूनच भेद मानू नये, परंतु वर्णसंकर करू नये असे रामदासांनी म्हटले आहे. सर्व मानवांचे

अंत:करण समाधानी राखणे, विशेषत: हीन व दीन यांना सर्वांचा अंतरात्मा एकच समजून दु:खातून सोडविणे, हेच खरे भजन, असे रामदास मानीत. 'भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार। त्याचें राखावे अंतर। याचें नांव भजन॥ दु:ख नेदावें कोणाला। उंच नीच जरी झाला। अंतरात्मा ओळखिला। तोचि जाणावा सज्जन। मिळाला तो भक्त झाला। दोष मिळेना तयाला। देव प्रत्यक्ष कोपला। अहंभाव दुर्जन॥ राजी राखावे सकळ। बरेंपण सर्वकाळ। नित्य आनंदाची वेळ। काळ करी वंदन॥' (करुणाष्टके पृ. १६६). उच्चतम मानवी नीती व भगवद्भक्ती यांचे असे अद्वैत समजणे, हेच संतजीवनाचे परमवैशिष्ट्य होय. रामदासांनी भजन, भक्ती वा पूजा यांचा व्यापक मानवी प्रेम व भूतदया हा अर्थ अनेक ठिकाणी सांगितला आहे. कर्मकांड, मूर्तिपूजा, टाळमृदंगांनिशी भजन हे बाह्य आचार दुय्यम साधन होय, मुख्य साधन नव्हे, असा रामदासांचा अभिप्राय अनेक ठिकाणी व्यक्त झाला आहे.

भटक्या गोसाव्या - बैराग्याप्रमाणे तीर्थयात्रा करण्याची रामदासांना हौस नव्हती. त्यास ते अविवेकी समजत. रामदासांचा हेतू निराळा होता. तीर्थयात्रा रामदासांनी केली ती केवळ तेथील देवळांचे, मूर्तीचे व पाणवठ्याचे दर्शन घेऊन पावन होण्याकरिता नव्हे. सज्जन पाहावे, त्यांची मैत्री करावी, धर्मप्रसार करावा, हाच तीर्थयात्रेचा मुख्य हेतू होता. 'आत्मा वर्तवितो शरीर। तोचि देव उत्तरोत्तर। जाणीव रूपे कळिवर। विवेकी वर्तवी॥ तो अन्तर्देव चुकती। धावा घेऊन तीर्था जाती। प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणतां। मग विचारिती अंत:करणी। जेथें तेथें धोंडा पाणी। उगेंच वणवण हिंडोनि। काय होतें॥ ऐसी ज्यासी विचार कळला। तेणें सत्संग धरिला। सत्संगें देव सांपडला। बहुत जनांसी। ऐसीं हे विवेकाचीं कामें। विवेकीं जाणतो नेमें। अविवेकी भुलले भ्रमें। त्यांस हें न कळेना॥' (दासबोध १८-८) ही तीर्थयात्रेची फलश्रुती होय.

तीर्थयात्रेने समाजस्थिती रामदासांच्या अवलोकनात आली, सामाजिक दुरवस्था जाणवली. ऐहिक जीवनाच्या यशावरच पारमार्थिक कल्याण अवलंबून आहे, याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. सामाजिक जीवनाची घडी बसविणारे धर्मनिष्ठ सज्जन हुडकले व त्यांना शिक्षण देऊन, शिष्य बनवून मठस्थापनेच्या द्वारे जगदुद्धारास लागले. दीर्घ तपश्चर्या, भजन, अवलोकन, पर्यटन व परमार्थचिंतन यांच्या योगाने मन पावन झाल्याची, विश्व पावन करण्याचा अधिकार मिळाल्याची प्रचीती आली. अगाध आत्मश्रद्धा उत्पन्न झाली. रामदास म्हणतात, 'राघवाचा दास। मी झालो पावन। पतित तो कोण। उरो शके॥ उरो शके ऐसें। कल्पांती घडेना। जो कोणी पुसेना। त्यासी उणें॥ किती एक जन। ज्ञानें उद्धारिले। कृतकृत्य जाले। तत्काळचि॥ येणें काळें मोक्ष। मी जरी देईना। दास म्हणवीना। राघवाचा॥ राघवाचा वर। पावलों सत्वर। जनाचा उद्धार। करावया॥' दुसरे असे की 'सेवकु मानवीयांचे। कष्टती बहुतापरी। सेविला देव देवांचा। तेणें मी धन्य जाहलो॥'

तत्कालीन भारतातील सामाजिक बेबंदशाही नष्ट करून न्यायनीतीची स्थापना करण्याचा

म्हणजे रामराज्याचा उपाय रामोपासनाच होय, अशी खूणगाठ रामदासांनी बांधली होती. त्यांना राम व हनुमान यांच्या उपासनेत ऐहिक वैभवी जीवन व परमार्थप्राप्ती असे दोन्ही पुरुषार्थ दिसत होते.

रामराज्य म्हणजे आत्मारामाचे राज्य. ‘रामराज्य’ या संज्ञेत हे दोन्ही अर्थ समर्थांनी दाखवून दिले आहेत. ब्रह्मांडांची व्यवस्था म्हणजे रामराज्य, असा एक अर्थ आहे व उत्कर्षशाली सर्वांगीण प्रगती करणारे सामाजिक जीवन म्हणजे रामराज्य, असा दुसरा अर्थ आहे. समर्थांना अद्वैत तत्त्वज्ञानाच्या पारमार्थिक अधिष्ठानावर रामोपासनेचा प्रसार करून तत्कालीन देवाधर्मांचे अराजक मोडावयाचे होते व ऐहिक पुरुषार्थ साधणारी समाजव्यवस्था निर्माण करावयाची होती. हे दुहेरी साध्य सिद्ध करण्याकरिता तीर्थयात्रा संपवून ते कृष्णातीरावर आले. कृष्णातीराच्या परिसरात राहून आणखी एक महत्त्वाची गोष्ट रामदासांना साधता आली, ती म्हणजे शिवाजींच्या राज्य संस्थापनेच्या प्रयत्नास अनुकूल अशी लोकमनोवृत्ती निर्माण करणे. हिंदूंना व हिंदू धर्म व्यवस्थेला मुसलमानी राजवटीत नमून राहणे भाग पडत होते. मुसलमानी सत्तेपुढे पडते घेऊन निमूटपणे तग धरणे एवढे कार्य हिंदू व हिंदू धर्म यास शक्य झाले. प्रसंगी मुसलमान राज्यसत्ता हिंदू धर्मावर जबरदस्त टोलेही लगावत होती. हिंदू समाजसंस्थाही तिच्या तारक राज्यसंस्थेच्या अभावी विस्कळीत होऊन डबघाईस आली होती. याची प्रखर जाणीव श्रीसमर्थ रामदासांना झाली होती. ‘म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुतां दिवसांचें बंड।’ या निर्देशांत हा सर्वत्र समदृष्टीचा संत सात्त्विक संतापाने कसा जळत होता याची कल्पना सहज करता येते. संताचे चित्त स्वजन परजन या भेदाने विटाळत नसते. परंतु सज्जन व दुर्जन हा फरक दृष्टोत्पत्तीस येऊन मन तळमळते. म्लेंच्छ या शब्दाला अधिक महत्त्व आहे. देवाधिदेव अंतरात्मा हा मनुष्यात जाणिवेच्या रूपाने प्रकट झाला आहे व तोच शुद्ध जाणिवेच्या स्वरूपात उपास्य व प्राप्तव्य आहे, असा समर्थांचा जागोजागी उपदेश आढळतो. ‘सकळां धर्मांमध्ये धर्म। स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ॥’ कोणताही विशिष्ट संस्थारूप धर्म नव्हे; हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादी भेद स्वरूपी राहण्याच्या स्वधर्मात येत नाही. मानवी देहात ज्ञानशक्ती हे अस्सल वस्तू-स्वरूप प्रकट झाले आहे, त्यात म्हणजे विवेकसंपन्न जीवनात माणसाची स्थापना हे सर्व जागतिक धर्माचे कार्य आहे. तेच स्वामींच्या शिकवणीचे मर्म आहे म्हणून म्लेंच्छांच्याही थोर मानव्याचे अध:पतन दुर्जन शब्दाने सूचित केले आहे, असे म्हणावे लागते. मुसलमानी अधिकारी व मुसलमानी बादशाहीचा दरबार यांच्यावर समर्थांचे वजन होते व ते अनेक महत्त्वाची कामे त्यांच्याकडून करवून घेत; एवढेच नव्हे तर त्यांच्याकडून देवस्थानी इनामेही स्वीकारीत, असे इतिहास सांगतो. म्हणून जातिद्वेषापेक्षा त्या मुसलमानी राज्यसत्तेच्या दुष्परिणामांचीच चिंता समर्थांना होती असे सिद्ध होते. म्हणून न्यायनीतीचे रामराज्य समर्थांना स्थापावयाचे होते व त्याचेच राजकारण त्यांनी चालविले होते.

परमार्थाचा संस्थापक, उद्धारक व पक्षपाती राजा समर्थांना पाहिजे होता. 'परमार्थ' मनुष्यमात्राच्या अंतिम ध्येयाचा वाचक शब्द आहे. 'रामराज्य' म्हणजे केवळ परमार्थ वा मोक्ष नव्हे. किंवा या शब्दाने केवळ देवाधर्माची उपासना व सनातनी आचारधर्म एवढाच अर्थ अभिप्रेत नाही, तर ऐहिक, आर्थिक व सामाजिक ध्येये सिद्ध करणारी राजसंस्थाही त्यात अभिप्रेत आहे. 'उद्वेग पाहता नाहीं । चिंता मात्र नसे जनीं । व्याधि नाहीं रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥ युद्ध नाहींच आयोध्या । राग ना मत्सर नसे । बंदनिर्बंदहि नाहीं । दंड दोष कदा नसे ॥ बोलणें सत्यन्यायाचें । अन्याय सहसा नसे । अनेक वर्तती काय । एक जीव परस्परे ॥ दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हो तो असेचिना । परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥ उदंड वसती ग्रामें । नगरें पुरेंचि पट्टणें । तीर्थक्षेत्रें नानास्थानें । शिवालयें गोपुरें बरें । मठ, मठ्या, धर्मशाळा । ऋषिआश्रम साजिरे ॥ वेदशास्त्र, धर्मचर्चा । स्नानसंध्या तपोनिधी । चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे । संतोष समस्त लोकां । रामराज्य भूमंडळीं ॥' (मानपंचक-१)

अशा रामराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी निर्माण करणे म्हणजे धर्मसंस्थापना करणे हे समर्थ रामदासांचे अंगीकृत मुख्य कार्य होते. त्याकरिता व दुर्जनसंहार व भक्तजनांसी आधार व्हावा म्हणून 'रामकथा ब्रह्मांड भेदूनि । पैलाड न्यावी ।' असा आदेश त्यांनी आपल्या शिष्यमहंतांना दिला व महाराष्ट्रातील क्षत्रियांना सांगितले की, रामवरदायिनी तुळजाभवानी पारघाटी येऊन प्रतापगडावर विराजमान झालेली आहे. तिच्या वराने रामाने रावण मारला. तिचे स्मरण करून तुम्हीही धर्मसंस्थापनेसाठी संघटित होऊन 'मारिता मारितां मरावें । तेणे गती पावावें ।' अशा वीरधर्माचा आदेश दासबोधात दिला. त्या तुळजाभवानीला रामदासांनी स्फुट कवितेत अनन्यभावे प्रार्थना केली की, 'एकचि मागणें आतां । द्यावें तूं मजकारणें । तुझाच वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ॥ दुष्ट संहारिले मागें । ऐसे उदंड ऐकतों । परंतु रोकडे कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ रामदास म्हणे माझे । सर्व आतुर बोलणें । क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥'

प्रतापगडाच्या तुळजाभवानीचा हा राजा शिवाजीच जे सांगण्याची गरज नाही. शिवाजीच्या राज्यस्थापनेच्या प्रत्यक्ष उद्योगात म्हणजे युद्ध, कारस्थाने, हल्ले इत्यादी हालचालींत व तत्संबंधी मसलतीत रामदासस्वामींचा हात होता की नाही याबद्दल अजून वाद आहे. स्पष्ट प्रमाण मिळत नाही. एवढेच नव्हे तर शिवाजी व रामदास यांची प्रथम भेटच मुळी शके १५९४ (इ.स. १६७२) मध्ये झाली, असेच ऐतिहासिक प्रमाणांची छाननी करून निघते, असे म्हणणाऱ्यांविरुद्ध निश्चित कागदोपत्री पुरावा सापडत नाही. 'लोक संकल्पविकल्प करिती । ते अवघेच निर्फळ होती । जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हा योगेश्वर ॥ परंतु तो आपुली स्थिति । अनुमाना येवोच नेदी । तेथे कोणाचें चालेना । अणुमात्र अनुमानेना । उदंडकरी गुप्तरूपें ॥' गुप्तरूपे राजकारण करावे म्हणजे त्याचा कसलाही पुरावा ठेवू नये, असा जर संकेत रामदासांचा होता तर इतिहास संशोधकास पुरावा कसा सापडणार?

शिवाजीच्या राज्यविषयक उलाढालीत रामदासांचा प्रत्यक्ष हात नव्हता हे जरी खरे मानले तरी रामदास राजकारणी संत नव्हते, ते इतर संतांसारखे केवळ परमार्थी व केवळ भगवद्भजनात दंग होते, हे मुळीच मान्य होण्यासारखे नाही. सर्व परंपरागत भक्तियोग व त्याचे अद्वैत तत्त्वज्ञान यांच्यात रामदासांनी ऐहिक, सामाजिक जीवन भाग्यशाली व्हावे या ध्येयास अनुसरून तात्त्विक अर्थ व्युत्पादून दाखविला आहे, तसा इतर कोणत्याही ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतच्या संतांनी दाखविला नाही. ज्ञान, नित्यानित्यविवेक, बुद्धियोग, अहंता, निरास, सत्त्वगुण, सद्विद्या, योग, विरक्त इत्यादी पारमार्थिक पदार्थांचा अर्थ सांगताना त्यांची प्रपंचात परमार्थाइतकीच उपयुक्तता, आवश्वकता रामदासांनी प्रतिपादिली आहे. असे प्रतिपादन अन्यत्र आढळत नाही. ऐहिक समाजजीवन म्हणजे ईश्वरी राज्य, असा अर्थ दाखविणाऱ्या जर्मन तत्त्वज्ञ हेगेलशी रामदासांचे वैचारिक साम्य इतिहाससंशोधक राजवाडे यांना दिसून आले, ते महत्त्वपूर्ण मानावे लागते. हेगेल व रामदास यांच्यात महत्त्वाचे अनेक फरक आहेत, त्यांच्याकडे मात्र राजवाडे यांचे लक्ष गेले नाही. हिंदूंची देवळे व धर्म यास ज्यात धोका होता अशा मुसलमानी राजवटीच्या सरहद्दीत धर्मप्रचारकांचे मठ व देवळे बांधून त्यांचे सार्वजनिक उत्सव रामदासांनी सुरू केले, हे त्या काळचे महत्त्वाचेच राजकारण होय, असेही म्हणता येते. मुसलमान राज्यकर्त्यांच्या व अधिकाऱ्यांच्या भीतीने लोकांनी डोहात बुडविलेली दैवते बाहेर काढून डौलाने स्थापणे हे केवढे राजकारण आहे! परंतु या राजकारणाचे अंतरंग म्हणजे सामाजिक जीवनाची नैतिक परिशुद्धी हेच होते, असे रामदासांच्या अनेक स्फुट कवितांवरून व दासबोधातील राजकारण शिकवण, येत्नसिकवण, निर्मळ लक्षण, जाणपण निरूपण, नि:स्पृह शिकवण, नि:स्पृह लक्षण, चातुर्यलक्षण, महंतलक्षण, नि:स्पृहव्यापलक्षण इत्यादी समास प्रकरणांवरून सिद्ध होते.

कृष्णेच्या परिसरात आल्यावर समर्थ रामदासांनी जे उघड उद्योग केले त्यात मारुतीची मंदिरे, महंतांचे मठ, चाफळ येथील राममंदिराची प्रतिष्ठा व देवोत्सव यांची विशेष महती होती. शिष्य, मठ व मंदिरे यांच्या द्वारे परमार्थविवरण व हरिकथानिरूपण करीत देवधर्मांचे अराजक नष्ट करणे, शुद्ध आध्यात्मिक जाणीव निर्माण करून नैतिक जीवनाची शिकवण देऊन सर्व मानवांची उन्नती करणे, हा त्यांचा उद्देश होता.

शके १५६६ (इ.स. १६४४) च्या वैशाखात कृष्णातीरी रामदास आले. प्रथम महाबळेवर येथे चार महिने राहून नंतर वाई व माहुली करून कराडजवळील शहापूरच्या पर्वतावर राहावयास गेले. दोन प्रहरी शहापूर किंवा मसूर येथे कोरडी भिक्षा मागून स्वयंपाक करून भोजन करीत. नाना अडचणींत व संकटांत सापडलेल्या माणसांना त्यातून सोडविण्याचे काम स्वामी करीत. शहापूरचे बाजीपंत कुलकर्णी हिशेबाच्या भानगडीत सापडले व त्यांना सरकारने अटक करून नेले. रामदासांनी त्यांना निरपराधी ठरवून सोडून घेतले. त्यांनी व त्यांच्या पत्नी सईबाई यांनी रामदासांचा अनुग्रह घेतला. समर्थांनी स्थापिलेल्या अकरा

मारुतींपैकी पहिला मारुती शहापूरला स्थापिला. काही काल शहापूरला घालविल्यावर स्वामींना चाफळखोरे अधिक पसंत पडले. तेथे ते कायम वस्तीस गेले. स्वामी कीर्तनद्वारा लोकांस प्रपंचपरमार्थाचा बोध करीत. त्यामुळे ज्यांच्या हृदयात पश्चात्ताप होऊन पालट होई ते स्वामींचे शिष्य बनत. मठ चालविण्यास योग्य शिष्यांकरिता मठाची योजना करून देत. शिष्यवर्गांत पुरुषांबरोबर स्त्रियांचाही समावेश करीत. गृहस्थाश्रम उत्तमोत्तम असे उपदेशून तो आदर्शरूप व्हावा म्हणून अनेक पतिपत्नी जोडपी स्वामींनी परमार्थाच्या मार्गाला लावली. परमार्थाच्या मार्गास स्त्रिया व पुरुष सारखेच अधिकारी, मानवी देह दोघांचाही सारखाच श्रेष्ठ, असे स्वामी मानीत. अनेक बालविधवा अनुग्रह करून परमार्थाच्या मार्गावर आणल्या. त्यात अक्काबाई व वेणूबाई यांची नावे सुप्रसिद्ध आहेत.

परस्त्रियांचा बालब्रह्मचाऱ्याने सहवास करू नये खरे, परंतु जितेंद्रिय महापुरुषाला तो अधिकार प्राप्त होतो. 'श्रीरामभजनें तरल्या गतभर्तृका', हे स्वामींनी जाणून विधवांना परमार्थाची दीक्षा दिली. या संबंधात स्वत:बद्दल स्वामींनी अशी ग्वाही दिली आहे. 'कदा मी विधवा अनाथा न्यस्तकामा । सुशीला भजविल्या श्रीरामा । विजितेंद्रिये यथान्याये तरी क्षमा । करील जानकीनाथ ॥' माझ्यासारख्या जितेंद्रियाने सुशील विधवांना यथान्याय दीक्षा दिली तर श्रीराम क्षमा जरूर करील. समर्थ शिष्यांत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे स्त्रीपुरुष होते. मुसलमान फकीरही होते. कारण समर्थ ग्रंथप्रामाण्यवादी नव्हते. प्रतीतींचेच मुख्य प्रामाण्य ते मानीत असत. अंतिम तत्त्व नामरूपातीत असल्यामुळे तेथे भाषेच्या व संज्ञेच्या मर्यादा व हिंदू-मुसलमान इत्यादी भेद निरस्त होत. अशा 'अजब महजब' विलक्षण धर्मात हिंदू व मुसलमान असा भेद खोटा ठरतो. म्हणून स्वामी एका उर्दू पद्यात सांगतात - 'भाई काहकु लढते । लढते सो पडते भाई' 'बंधूंनो, कशाला भांडता? भांडतात ते पडतात.'

अनेक विद्वान व कर्तृत्ववान मंडळी स्वामी समर्थांच्या शिष्यगणांत समाविष्ट झाली होती. त्यात खास स्वामींच्या तैनातीस प्रत्यक्ष मदतनीस म्हणून काम करणारेही अनेक होते. परंतु स्वामींचा पट्टशिष्य कल्याण. तो स्वामींची कोणतीही आज्ञा पडू देत नसे. त्याचे मूळचे नाव अंबाजी. त्याचे अक्षर उत्तम, स्मरण बळकट व शरीर दणकट होते. दमाचा व धीराचा गडी होता. सावध व दक्ष, जीव धोक्यात घालून काम करी. स्वामींनी मोठा रामजन्मोत्सव मसूर गावी सुरू केला. तेथे रामाच्या मिरवणुकीला अडथळा आणणारी विशाळवृक्षाची भली मोठी आडवी फांदी तोडण्यास अंबाजी पुढे सरसावला. खाली विहीर अशा जागी फांदी होती. तोडता तोडता फांदी तुटली व कोसळली. खूप दमल्यामुळे तोल जाऊन अंबाजीही नेमका विहिरीत पडला. ही गोष्ट स्वामींच्या त्वरित ध्यानात येऊन विहिरीत डोकावून पृच्छा केली की, ''कल्याण आहे ना?'' खालून आवाज आला, ''महाराज, कल्याण आहे.'' तेव्हापासून अंबाजीचे नाव कल्याण पडले. 'मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनी विश्वास पूर्ण । अनन्यभावे शरण । त्या नाव सच्छिष्य ॥' असे धर्मसंस्थापनेस सहकारी झालेले

अगणित शिष्य भारतात स्वामींना मिळाले. भरतखंडात ते विखरून राहिले होते. महाराष्ट्र व विशेषत: वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा प्रांत यात त्यांचा भरणा विशेष होता. चाफळचा मठ हे त्यांचे आदिपीठ होते.

स्वामी समर्थांची निवडलेली उपास्य दैवते मुख्यत: तीन - श्रीराम, हनुमान व तुळजाभवानी. 'तात्त्विक अशा खोल भावार्थाची सूचक' अशी ही प्रतीके होत. हे खोल भावार्थ स्वामींनी संक्षेपाने वा विस्ताराने त्या त्या प्रसंगी निरूपिले आहेत. त्याकरिता स्वामींनी पौराणिक कथांचा आधार घेतला. पौराणिक कथांचा स्थूल अर्थ हा प्रथम मनात येतो, तो त्यांनी सांगितला. त्याच्याच जोडीला ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा अव्यक्त व सूक्ष्म अर्थ प्रतिपादिला. वाल्मीकी रामायण व योगवासिष्ठ यावरून दुर्जननाशक, सज्जनरक्षक, आदर्शभूत उत्तम पुरुष, धर्मस्थापनकार ईश्वरावतार असा रामाचा अर्थ घेतला. दुष्टसंहारक राम, हे एवढेच दाखवण्याकरिता युद्धातला राम मराठी रामायणात रामदासांनी वर्णिला व त्याचे जागृत सद्गुणी, विवेकी व प्रयत्नशील माणसाचे, न्यायनीतीचे राज्य म्हणजे रामराज्य, असा भावार्थ आपल्या तत्संबंधी साहित्यात सूचित केला. सूक्ष्मार्थ असा: अध्यात्मरामायणात राम हा आत्माराम व निर्गुण परब्रह्म म्हणून निरूपिला आहे. त्यामुळे राम म्हणजे परमार्थ असे सूक्ष्म समीकरण स्वामींनी गृहीत धरले व विश्व म्हणजे रामाची पदार्थमात्रांत व प्राणिमात्रांत विभागलेली 'राजसत्ता', असा दासबोधात अर्थ विवरिला आहे. विश्वाचे प्राणतत्त्व म्हणजे वायू. त्याचा अत्यंत प्रिय सुत हनुमान ही पौराणिक कथा मुळात धरून व रामायणातील हनुमानाचे कार्य 'रामायण ज्याचेंनियोगे' हे लक्षात ठेवून अचूक कार्यसिद्धी साधणारा महावीर, बुद्धिशाली अशी चपल शरीरबलाची देवता, असा अर्थ उघडा करून दाखविला आणि परमार्थात साक्षात्कार घडवून आणणारा भक्ताचा मध्यस्थ असा सूक्ष्म अर्थही स्पष्ट केला. तुळजाभवानी ही रामवरदायिनी म्हणून पुराणकथा प्रमाण मानून रामराज्याची अधिष्ठात्री विश्वशक्ती, असा अर्थ केला. मानवी प्रपंचातील हिचे रूप शक्ती व युक्ती होय. ही या लक्षणांनी मानवांना राज्याच्या उभारणीस व वैभवी जीवनास साहाय्यभूत होते.

रामदासांनी कोणते व कोठे ११ मारुती स्थापिले याबद्दल मतभेद नाही; परंतु अन्यत्रही असंख्य स्थापिले असे मानण्यासही पुरावे मिळू शकतात. स्वामींनी श्रीरामाची चाफळ येथे स्थापना केली व त्यामुळे त्यांना फार धन्यता वाटली. मनात फार दिवस घोळत असलेला तो कार्यक्रम होता. 'अंतरीं कल्पना केली । एकांतीं बोलिलों बहु । रक्षिता देव देवांचा । त्याचा उच्छाव इच्छिला ॥' असे स्वामींनी एका स्फुट कवितेत नोंदून ठेवले आहे. चाफळच्या देवस्थानास हिंदूंप्रमाणे विजापूरच्या मुसलमानी राज्याचीही इनामे मिळाली. शिवाजी महाराजांकडून प्रथमपासून दोनशे होन वार्षिक इनाम मिळू लागले. नंतर शिवाजी महाराजांनीही अनेक गावे इनामी दिली व आदिलशाही इनाम कायम राहीलच, असेही

आश्वासन दिले.

शिवाजींचे चरित्र लिहिणारा मार्मागोव्याचा शिवकालीन पोर्तुगीज लेखक कास्मडगार्डा, रामदास व त्यांचा मठ याबद्दल लिहितो - ‘‘या प्रांतात एक ब्राह्मण असून त्याचे नाव रामजी (रामदास या शब्दाचा संक्षिप्त किंवा चुकीचा उच्चार). त्याला जमीनजुमला फार आहे. त्याजविषयी मुसलमान व सर्व जातीचे हिंदू यांना फार आदर आहे. या प्रांतात नेहमी युद्धे चालतात. परंतु कोणत्याही धर्माचा वा जातीचा सैनिक असो, तो त्याच्या जहागिरीस धक्का लावीत नाही. या आश्रमात (settlement) हिंदुस्थानातील सर्व लोकांचा परामर्श घेतला जातो. कारण तो म्हणतो की, मला देवाने दिलेले द्रव्य सर्वांकरिता दिलेले आहे. याला पूज्य मानीत नाही, असा एकही मानव हिंदुस्थानात नाही. त्यास जगातील अद्वितीय पुरुष समजले जाते. त्याच्या मठातील अन्नग्रहण कोणासही नाकारणे शक्य नाही. कोणी एखादा त्याचे आदरातिथ्य चुकवून जाऊ म्हणेल तर त्याचे हेर त्याला अगत्यपूर्वक ठेवून घेतात. पहिल्या खेपेस शिवाजी याच्या मठावरून जात असता त्यास मठात पाहुणचार घेण्यास बोलाविले. पण त्याने ते नाकारले. तेव्हा रामजीने आपल्या मनुष्याबरोबर त्याजकडे शिधा पाठवून निरोप दिला की, ‘सर्वच लोक गरीब आहेत; तू आपणास श्रीमंत न समजता पाठविलेल्या शिध्याचा विचार कर. हे धन माझे नसून सर्वांचे आहे.’ हे वर्णन फार सूचक अर्थाने भरले आहे.

शिवाजीने स्वामी रामदासांचा उपदेश घेतला व स्वामींचा तो शिष्य बनला. शिवाजीने अनेक साधुसंत महंतांचे धार्मिक उपदेश घेतले. त्यातीलच हा एक होय, असे म्हणता येत नाही. चिंचवडचे मोरया गोसावी, केंजळचे केवलभारती, जालन्याचे तानपाठक, मुदलगावचे देवभारती, स्वानंदस्वामी, बाबा याकूत, मौनीबुवा, महाबळेवरचे गोपाळभट, चाकणचे सिद्धेवर ब्रह्मे इत्यादी बहुत गुरू शिवाजीने केले. परंतु रामदासस्वामींचा अधिकार न्यारा होता. दासबोधकारांचा महिमा शिवाजीसच काय; परंतु बहुश्रुत शिक्षितांसही दासबोधावरून अलौकिक म्हणून सहज प्रत्ययास यावा असा आहे. ‘परमार्थनिष्ठा राखा व राज्यसाधना करून धर्मसंस्थापना करा’, असा आदेश स्वामींनी शिवाजीस दिला, हे शिवाजीने स्वामींना स्वत: लिहिलेल्या पत्रात स्पष्ट निर्दिष्ट केले आहे. स्वामी रामदासांना स्वत:च्या रामराज्यविषयक आदर्शाची पूर्ती करणारा शिष्य मिळाला तो शिवाजी. शिवाजीने राज्यस्थापनेच्या उलाढाली केल्या. त्यात रामदासांचा हात किती होता, हा प्रश्न दुय्यम महत्त्वाचा आहे. त्या राज्यस्थापनेचे विशाल वैचारिक अधिष्ठान केवळ स्वामी समर्थांनीच दिले. मानवी आदर्शाचे, समाजरचनेचे व राज्याचे इतके गंभीर अध्यात्मवादी तत्त्वज्ञान महाभारतानंतर दासबोधातच मिळते; दुसरीकडे कोठेही मध्ययुगीन भारतीय साहित्यात मिळत नाही. शिवाजीने त्याची थोडक्यात दखल त्या पत्रात दिली आहे. एवढेच नव्हे तर ‘मी संपादिलेले राज्य चरणी समर्पण करून आपलीच चरणसेवा घडावी’ अशी मनीषा व्यक्त केल्याचेही तो निर्दिष्ट करतो. राज्यधारी तत्त्ववेत्ता म्हणजे परमार्थी असावा, तरच माणसाचे सर्व पुरुषार्थ

साधणारे न्यायनीतीने राज्य निर्माण होऊन चालू शकते. राज्यसंस्थेचा अंतिम उद्देश त्यामुळे पूर्ण होतो, हा फार प्राचीन असा पौर्वात्य व पाश्चात्त्य राज्यतत्त्वचिंतकांचा सिद्धांत आहे. मनु, भरत, जनक, रामचंद्र, अशोक यांची ही परंपरा आहे. स्वत: रामदासांनी 'मनु चक्रवर्ती जाले येणेंचि न्याये' (दासबोध १५-३) असा जाणिवेच्या अधिष्ठानासंबंधी दृष्टांत सांगितला आहे. स्वामी रामदास हे अशा जाणिवेचे अधिष्ठान होते. त्यांनी ते अधिष्ठान राज्यकर्ता शिवाजी याच्यात जागृत केले. म्हणूनच समर्थांना राजगुरु, शिवाजीचे राजकारणाचे गुरू असे म्हणणे सार्थ ठरते.

स्वामी रामदासांना आपल्या तात्त्विक आदर्शाचे प्रात्यक्षिक उदाहरण म्हणजे रामराज्याचा स्थापक कर्मयोगी शिवाजीच वाटला, हे त्यांनी शिवाजीस लिहिलेल्या ओवीबद्ध संदेशातही स्वच्छ जाहीर केले. त्यातील काही उदाहरणादाखल पाहा - ''निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ धीर उदार गंभीर । शूर क्रियेसि तत्पर । सावधपणे नृपवर । तुच्छ केले ॥ तीर्थक्षेत्रे मोडिली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ या भूमंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले । कित्येकांस आश्रय जाले । शिवकल्याणराजा ॥ सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हां प्रती । धर्मस्थापनेची कीर्ती । संभाळिली पाहिजे ॥''

भारतीय संस्कृतीतील उच्च राजकारणाचे स्वरूप शिवाजीच्या कृतीत व व्यक्तित्वात प्रकट झाले, ते यात रामदासांनी वृत्तकथनाने चित्रित केले. स्वामींना कसे राजकारण व कसा राजा पाहिजे होता, हे त्यांच्या पुढील ६ ओव्यांत साररूपाने समजून येते.

'गनिमाच्या देखता फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा । ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षीं परमार्थी ॥ तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचें तडाखे । बडपाखंडाचे वाखे । सहजचि होती ॥ हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ कोठेंचि पडेना दृष्टी । ठाई ठाई त्याच्या गोष्टी । वाग्विलासें सकळ सृष्टी । वेधिलीं तेणें ॥ जैशास तैसा जेव्हा भेटे । तेव्हां मज्यालसी थाटें । इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस नच पडे ॥'

हे समर्थांचे राजकारण महाराष्ट्रात शिवाजीच्या प्रतापाने सफळ झाल्याचा आनंद, 'आनंदवनभुवन' प्रकरणात त्यांनी स्वत: फार उल्हासात येऊन व्यक्त केला आहे - 'स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तेतें तैसेचि होतसे । हिंडतां हिंडतां गेलों । आनंदवनभुवना । स्वर्गीची लोटली गंगा । रामगंगा महानदी । तीर्थासी तुळणा नाहीं । आनंदवनभुवनीं ॥ कल्पान्त मांडला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया । कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभुवनी ॥ बुडाले सर्वही पापी । हिंदुस्तान बळावले । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनी ॥ बुडाला औरंग्या

पापी । म्लेंच्छ संहार जाहला । मोडिली मांडिलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनी ॥ आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिली सीमा । सारसर्वस्व देवाचें । आनंदवनभुवनी ॥ सामर्थ्य यशकीर्तीची । प्रतापे सांडिली सीमा । रामकर्ता रामभोक्ता । रामराज्य भूमंडळी ॥ सर्व सद्या सर्व विद्या । न भूतो न भविष्यति । वैराग्य जाहलें मोठें । आनंदवनभुनी ॥'

शिवाजीराजे निवर्तल्यावर संभाजीराजे यास जे उपदेशपर पत्र स्वामींनी लिहिले, त्यात शिवाजीबद्दल स्वामींनी जो निर्देश केला आहे त्यातही शिवाजीच्या कर्तृत्वात स्वामींना ध्येयसिद्धीचा अनुभव आला, असे दिसते. जणू ईश्वर समजून त्याचा आदर्श मनात वागव, असा सल्ला स्वामींनी दिला आहे : 'बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे । कष्ट करूनि घसरावे । म्लेंच्छावरी ॥ लोकी हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी । चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥ शिवराजास आठवावें । जीवित तृणवत् मानावें । इहपरलोकीं राहावें । कीर्तिरूपे ॥ शिवराजाचे आठवावे रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप । शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ शिवराजाचें कैसें बोलणे । शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाची सलगी देणें । कैसी असे ॥ सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग । राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ॥ त्याहून करावें विशेष । तरीच म्हणावे पुरुष । या ऊपरी आतां विशेष । काय लिहावें ॥'

स्वामी समर्थांचे सर्वात श्रेष्ठ कार्य म्हणजे दासबोध इत्यादी ग्रंथसंपत्ती होय. थोर साहित्य हे माणसांत संपूर्ण पालट घडवून आणते, असा स्वामी समर्थांचा साहित्याच्या सामर्थ्यावर विश्वास होता. खल, लंपट, पाखंडी अशा लोकांची मने बदलून त्यांना पुण्यशील, नीतिमान, सज्जन बनविण्याचे कार्य अस्सल गुणांचे साहित्य करू शकते, असे स्वामींनी अनेक प्रसंगी श्रवणाचा प्रभाव सांगताना म्हटले आहे. हा केवळ श्रवणाचा अत्युक्तिपूर्ण गौरव नाही. त्याची उपपत्तीही त्यांनी तेथेच सांगितली आहे. मुळात सर्व मानवांत भेद न करता जाणीव म्हणजे विवेक शक्ती प्रकट झाली आहे. तिला चेतविण्याचे काम साहित्य करते. ठिणगी असली तरी तिची प्रळयाग्नी बनेपर्यंत वाढ होऊ शकते, तसे आळशी, करंटे, महापातकी व दुराचारी यांच्यातली जाणिवेची ठिणगी चेतली म्हणजे सर्व जीवन घेरते, ब्रह्मांड गिळते व मायानिरास करून शुद्ध चैतन्यरूपाने स्थिरावते.

समर्थाने समर्थ करावे । तरीच समर्थ म्हणवावें । त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य जयाचें ॥ हे सामर्थ्य समर्थांच्या ग्रंथात असते, असे स्वामी रामदासांचे सांगणे आहे. स्वामी रामदासांचे साहित्य बहुविध व विशाल आहे. ज्ञान, भक्ती व वैराग्य यांचा त्रिवेणीसंगम होऊन समर्थ वाङ्मय हे प्रयाग बनले आहे. भारतीयांच्या धार्मिक व आध्यात्मिक विद्यांच्या संस्कृत व प्राकृत ग्रंथांचे आलोडन करून काढलेले विचार प्रत्यक्ष प्रत्ययाची कसोटी लावून तपासले आणि नंतर ते मांडले असे स्वामी उच्चरवाने अनेक ठिकाणी सांगतात.

आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या उपपत्तीने प्रपंच व परमार्थ यांच्यात सुसंगती स्थापन करणे,

हे समर्थ वाङ्मयाचे मुख्य वैशिष्ट्य होय. प्रपंच हा असारच आहे; परंतु तो सारवान् ज्याच्या योगाने बनतो, प्रपंचच परमार्थ ज्याच्या योगाने होतो असा असाधारण विचार स्वामींनी आपल्या उपदेशग्रंथात मांडला आहे. प्रपंच व परमार्थ यांच्यात विरोध नाही, दोन्हीकडे यत्न, विवेक, विचार, सद्गुण व प्रतीती यांची समान आवश्यकता आहे, असा अभिप्राय रामदासांनी वेदान्ताची गंभीर मीमांसा करून प्रतिपादिला आहे. सृष्टीची उभारणी व व्यवस्था ज्या मूळ अंतरात्म्यामुळे, जाणिवेच्या अधिष्ठानामुळे होते, तीच जाणीव फळांत म्हणजे मानवात सर्वात अधिक उमळली आहे. सृष्टीची धारणा करणारा अंतरात्मा होय. तोच मानवात उत्कट रूपाने भासमान झाला आहे. ती जाणीव शुद्ध होऊ लागली की, सद्गुणांचा विकास होतो, कर्तृत्व वाढते, दारिद्य्र नष्ट होते, वैभव येते. ती जाणीवच सारासार विवेक होय. त्यामुळे अखेर परमार्थ प्राप्त होतो व तो सारासार विवेक प्रपंचासही शुभ व सुंदर बनवितो. सृष्टीची उत्पत्ती होण्यास मूळ कारण यत्न. म्हणून यत्न हा प्रपंच यशस्वी करावयास लावणारा देव होय. यत्नदेवाची तात्त्विक उपपत्ती समर्थांनी योगवासिष्ठातील दैवपौरुषविषयक विवेचनावरून घेतली असे दिसते. विवेकाला यत्नाची किंवा यत्नाला विवेकाची जोड दिली की यत्न अचूक होतो. जाणीव, विवेक, विचार, यत्न ही मूलभूत ईश्वरी तत्त्वाची मानवातली लक्षणेच होत. म्हणून ती ज्या मानवात दिसतात तो सदैव मानव होय. नारायणाची प्राप्ती प्रथम पाहिजे, त्यामुळे प्रपंचाचा उत्कर्ष होऊन मोक्षही याच देही अनुभवावयास मिळतो. 'अंतरी असतां नारायणें । लक्ष्मीस काय उणे । ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट करावा ॥' (दासबोध १७-५) नारायण बळकट करणे म्हणजे विचार, यत्न व सद्गुण हे ईश्वरी गुण बळकट करणे होय. 'संसारा आलियाचे सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक । येहलोक परलोक । दोन्हीं साधिले ।' (दासबोध १७-१) समर्थांच्या सर्व तत्त्वज्ञानाचे, सर्व भावार्थाचे हे सूचक सूत्र आहे.

विश्वाचा अनंत पसारा आहे. त्यात गोंधळ नाही, अव्यवस्था नाही. उत्पत्ती व लय यांचा क्रम अगदी व्यवस्थित रीतीने बांधला गेला आहे. अनंत प्राणी व अनंत मनोवृत्ती आहेत; परंतु त्यातही न्यायी, दक्ष व पराक्रमी राजाच्या राज्यापेक्षा अधिक नियमबद्धता आहे. कारण या विश्वव्यवस्थेचे सूत्रसंचालन गुप्तपणे चालणारे राजकारण होय, वस्तुमात्रांत व प्राणिमात्रांत ही ईश्वरी सत्ता विभागून जाते व राजकारण गुप्तपणे करते, असे स्वामी म्हणतात. 'अनंत राजकारणें धरणें । कुबुद्धी सुबुद्धी विवरणें । कळो न देणें चुकावणें । प्राणिमात्रासीं ॥' (दासबोध १६-८). अशा त्या परमेश्वरी सत्तेचे अनुकरण करून मनुष्यमात्राशी निष्काम मैत्री ठेवून मानवी समुदाय न्यायनीतीने वर्तविण्याचा, सामुदायिक जीवन पवित्र ठेवण्याचा, सामाजिक अनवस्था व बेबंदशाही नष्ट करण्याचा विवेकविचार सावधपणे दीर्घ प्रयत्न करणे म्हणजेच राजकारण होय, असे समर्थांचे राजकीय तत्त्वज्ञान आहे. महंतांचे राजकारण आणि शस्त्रधारी व राज्यधारी क्षत्रियांचे राजकारण यांच्यातला समान अर्थ हाच होय. महंताला दुर्जनसंहाराचा मात्र प्रत्यक्ष अधिकार नाही. त्याचे राजकारण मानव्याच्या श्रेष्ठतेवरील श्रद्धेचे

आहे. क्षमेचे, स्वत: सर्व आघात सोसून दुर्जनांच्या हृदयात परिवर्तन घडवून आणण्याचे आहे. महंताने समाजधारणेचे राजकारण हे नि:स्पृह वृत्तीने अलिप्तपणे सर्वत्र समभाव, अद्रोह व अहिंसा यावर अवलंबून करावयाचे; परंतु ते फार गुप्त रीतीनेच करावे, तरच त्याला साफल्य व यश येते, असा स्वामींचा अभिप्राय आहे. तात्पर्य, स्वामींचे दासबोध व इतर अनेक प्रकरण ग्रंथ हे वेदान्तावर आधारलेले राजनीतीचे नीतिशास्त्र आहे, याबद्दल वादच संभवू शकत नाही.

स्वामी समर्थांचे व त्यांच्या दासबोध या ग्रंथाचे मराठी भाषेवरील ऋण कधी न फिटणारे आहे. मराठी भाषेच्या दृष्टीने शब्दसृष्टीचे ईश्वर कवीश्वर स्वत: स्वामी होत. मराठीचे अपार शब्दवैभव व विविध अर्थांची बोधक शब्दसामर्थ्ये समर्थांच्या ग्रंथाइतकी प्राचीन वा अर्वाचीन अशा कोणत्याही मराठी साहित्यात आढळत नाहीत. प्रत्येक शब्द खणखण वाजवून घ्यावा, बद्द आवाज निघावयाचाच नाही, अशी शब्दांची टाकसाळ समर्थ साहित्यात उघडली आहे. त्या साहित्याने रोकडी ब्रह्मप्रचीती येते, केवळ शाब्दिक ज्ञान होत नाही. श्रुतिवाक्याचे, महावाक्याचे हेच महत्त्व आद्य शंकराचार्यांनी सांगितले आहे. त्याचेच प्रत्यंतर दासबोधात मिळते. परंतु दासबोधाने अधिक एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे ती ही की, ब्रह्म साक्षात्कार घेऊन स्वस्थ बसू नका, सिद्धाने साधकाची कर्तव्ये कडक रीतीने पाळली पाहिजेत. दासबोधात तसेच इतर रामदासवाङ्मयात तर्कशुद्ध विचारसरणी व साहित्यसौंदर्य यांचे हृद्य मीलन झाले आहे. सृष्टीचे व मानवी व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण त्यात प्रतिबिंबित झाले आहे. मानवी मनाचे व जीवनाचे सूक्ष्म पदर त्यात उकलून दाखविले आहेत. त्रिगुणात्मक मायेने चालणाऱ्या सृष्टीच्या उभारणीचे व संहाराचे चित्र मांडत असता रुक्षता व नीरसपणा येऊ दिला नाही. परमार्थी लोकसंग्रही महंताला मार्गदर्शक असा हा ग्रंथ आहे. त्याची मांडणी सुबोध व प्रसन्न झाली आहे. मानवी सद्गुणांची जोपासना करणारा ईश्वरोपासक लोकशिक्षक म्हणजेच महंत. हाच मानवी समाजधारणेचा आधार होय, असा दृष्टिकोन गृहीत धरून दासबोधाची रचना स्वामींनी केली आहे. स्वामींचे सूर्यासारखे देदीप्यमान पुण्यमय व्यक्तिमत्त्व या ग्रंथात ठायी ठायी बिलोरी आरशातल्याप्रमाणे प्रतिबिंबित झाले आहे.

दासबोध व दोन कांडांचे रामायण हे स्वामींचे मोठे प्रबंध होत. याशिवाय स्वामींची मोठीच ग्रंथसंपत्ती आहे. वयात आल्यापासून म्हणजे नाशिक येथे तपश्चर्येस बसल्यापासून सतत विद्याव्यासंग व लेखन शेवटपर्यंत करीत राहिले म्हणून हे दिव्य भांडार ते निर्माण करू शकले. स्फुट कविता, अभंग, प्रासंगिक कविता, लोक, स्तोत्रे, करुणाष्टके, आरत्या, भूपाळ्या, वेदान्त-प्रकरणे यांचा त्यांनी केलेला मोठाच विस्तार सहस्रावधी पृष्ठांचा मिळतो. त्यातील 'मनोबोध' हे श्लोकात्मक प्रकरण लोकप्रसिद्ध आहे. आद्य शंकराचार्यांच्या 'उपदेशसाहस्री'त शेवटचे प्रकरण मनोबोधाचे आहे, परंतु ते छोटेसे आहे. 'मनोबोध' या

नावावरून मनुष्याने स्वत:च स्वत:ला शिकवावे, असा अर्थ सूचित होतो.

समर्थांची अध्यात्मसंबंधी स्फुट प्रकरणे पाहून शंकराचार्यांच्या पंचीकरण, शतश्लोकी यांसारख्या प्रकरणांची व स्तोत्रे, आरत्या व भूपाळया वाचून शंकराचार्यांच्या स्तोत्रांची आठवण होते. कफदोष व खोकला यांनी समर्थ फार बेजार झाले होते. तेव्हा त्यातून बरे होण्याकरिता हनुमानावर त्यांनी कविता लिहिली. ती वाचताना शंकराचार्यांची आनंदलहरी मनासमोर येते. त्यात शेवटी आनंदलहरीच्या पठनाने ‘ज्वरजनितपीडा न भवति’ असे म्हटले आहे. समर्थकालीन समाजातील सर्व थरांतील व्रते, कुळाचार, विविध देवतांच्या उपासनांचे प्रकार, भिन्न जातींचे उद्योगधंदे, व्यापार, बाजारपेठांतील माल यांची चपखल वर्णने समर्थांच्या कवितेत सापडतात. समर्थांचे अभंग व करुणाष्टके हे भक्तिवाङ्मय ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम यांच्या वाङ्मय पंक्तीत शोभणारे आहे. एवढेच नव्हे तर, काही ठिकाणी स्वत:च्या विशिष्ट ओजाने अधिक चमकणारे आहे.

समर्थसाहित्य व समर्थचरित्र यांचा सांधा अनुस्यूत ठेवून हे विवेचन केले आहे. समर्थांच्या जीवनाचा व वाङ्मयाचा अविभाज्य संबंध कसा आहे, हे या भाषणावरून कळून येईल. स्वामी रामदासांच्या ग्रंथवाचनाची फलश्रुती त्यांच्या शब्दातच सांगावयाची तर - ‘उमजणें समजणें आधीं। प्रवृत्ति - निवृत्तींकडे। भाग्यश्री मोक्षश्री होते। विवरतां पुढें॥’ (मान. तृतीय ३३२). मानवी समाज हा सज्जनांचा अभेद्य दुर्ग, सज्जनगड बनवा. त्यात निरंतर भाग्यश्री व मोक्षश्री नांदावी, हाच समर्थांचा जीवनोद्देश होता.

**(कै. पुं. म. लाड व्याख्यानमाला, मुंबई, आकाशवाणी केंद्र, ‘साहित्याचे तर्कशास्त्र’, संपा. सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे, प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, २०१२, पृ. १८८ ते २१२)**

ooo

७

# बागलाण सिंह : नरहर गोपाळशेठ नामपूरकर

२९ वर्षांपूर्वी सत्या ग्रहाचा स्वयंसेवक म्हणून नामपूरला आल्याचा उल्लेख करून म्हणाले, ''कायदेभंगाच्या चळवळीचे केंद्र त्या वेळी संगमनेरला होते. त्या चळवळीत अनेक कार्यकर्त्यांच्या भेटी होत. त्याच वेळी के. नरहर शेटजींचा परिचय झाला, थोर नागरिक म्हणून त्यांच्या सहवासात गेलेल्या दिवसांवरून आम्ही त्यांना ओळखू लागलो. बागलाण भागांतील सत्याग्रहाच्या चळवळीचे ते मोठे आधारस्तंभ होते. 'प्रसंगी जो उपयोगी पडेल तोच खरा मित्र' ही गोष्ट त्यांच्या कृतीने त्यांनी दाखवून दिली. मनुष्य दिवंगत झाल्यावर त्याचे काम पूर्ण होते. आज शेटजींचे खाते पूर्ण झालेले आहे.'' कन्यादानासारख्या मंगलप्रसंगी त्यांच्या चरित्रप्रकाशनाच्या कार्यक्रमाचा आनंद व्यक्त करून त्यांनी चरित्राचे प्रकाशन केले व ते पुढे म्हणाले, ''चरित्र हे त्यांच्या कार्याचे दिग्दर्शन आहे. त्यांच्या सान्निध्यातील बांधवांनी जर माहिती पुरविली असती तर हे चरित्र बरेच मोठे दिसू शकले असते. शेटजीच्या पुण्यस्मरणाने त्यांच्या शीलाची पारख होते. शुद्ध आचरण, निःस्पृहपणे काम करणे ह्या गोष्टी'' त्यांचे ठायी वास करीत होत्या. त्यांचा जन्म अतिशय मोठ्या श्रीमंतीत झाला असतांना देखील अनेक संकटांना आपल्या कुटुंबियासह त्यांनी तोंड दिले होते. ''शेटजीच्या वाड्याचे महत्त्व फार मोठे आहे, असे सांगतांना ते म्हणाले, ''सत्याग्रहाच्या चळवळी, प्रभातफेऱ्या, भूमिगत कार्यकर्त्यांना आश्रय एवढेच नव्हे तर २-३ हजार माणसे ह्याच वाड्यात जमून निर्णय घेत. पोलीस पाटील राजिनामे देत. एवढेच नव्हे तर मुसलमानांना सुद्धा स्थान दिले जात असे. बागलाण भागाविषयी बोलताना ते म्हणाले, ''बागलाण हे बागायतींनी भरलेले आहे. ह्या भागातील मोसम नदीला मोक्षगंगा म्हणतात. मुल्हेर राजधानीचे गाव साधुसंतांविषयी प्रसिद्धच आहे. राजवाडे यांचे संशोधनावरून ज्ञानेश्वरी ही देखील बागलाणी मराठी भाषेत लिहिली आहे. तिच्या तोडीचा दुसरा ग्रंथ नाही. या भागांत ३०० वर्षे बागलाणांचे राज्य होते. त्यावरून बागलाण नाव पडले. जहांगीर बादशहाने ह्या भागाविषयी 'फळाफुलांचा

विपुल असा प्रदेश' असे वर्णन केले आहे. अशा ह्या बागलाण भागातून चळवळीला योग्य साथ सात्त्विक, कठोर पण मधुर अंशा नरहर शेटजींनी दिली होती. अशा व्यक्तींच्या चरित्रापासून काही शिकावयाचे असेल तर 'सावधपण'. तसेच त्यांच्या कार्यापासून आपण स्फूर्ति घेतली पाहिजे. कै. केशवशेट खुटाडे, कै. नरहर शेटजी ह्यांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले व स्वातंत्र्य पाहिलेही पण तेवढ्यावर भागणार नाही; तर सुजला-सुफला अशी ही भूमि झाली पाहिजे. भुकेने व्याकुळ अशी माणसे असतांना नवीन परिवर्तन होण्याचा आदेश त्यांनी दिला. "शेवटी सद्गुणाची प्रेरणा देणारे भारताचे पंतप्रधान नेहरू यांविषयी ते म्हणाले, "लष्करांत रशिया, घनाढ्यांत अमेरिका, तर थोर भावना व थोर कल्पना त्यांचे नेतृत्व म्हणून पंडित नेहरू मानले जातात. त्यांनी सहकारितेची चळवळ सुरू केली आहे त्यास साथ देण्याबद्दल विनंती आहे. शेटजींनी मी भूमिगत असताना दोन महिने ह्याच वाड्यात स्थान दिले होते. ते ऋण फेडण्याची त्यांच्या चरित्रप्रकाशनाने संधी मिळाल्याबद्दल धन्यता व्यक्त करून टिळकांच्या चळवळीपासून त्यांनी दिलेल्या स्वदेशभक्तिप्रिय कै. नरहर शेटजींच्या जीवनांतून नवे वातावरण निर्माण करण्याचे या पवित्र प्रसंगी शिकले पाहिजे."

**(नरहर गोपाळशेट नामपूरकर चरित्र प्रकाशन सोहळ्यात नामपूर ता. बागलाण जि. नाशिक येथे ३१ मे,१९५९ रोजी दिलेले भाषण, प्रसिद्धीः उन्नती मासिक, जून, १९५९)**

❍❍❍

८

# मांगल्याचे, प्रकाशाचे दरवाजे उघडणारे : साने गुरुजी

"साने गुरुजी हा विषयच मुळी प्रकाशाचा ध्यास लागलेल्या माणसाचा विषय आहे. गुरुजीबद्दलचा अपरंपरा जिव्हाळा व त्यांच्या सहवासाने प्रेरणा घेतलेला मंगळवेडेकरांसारखा समर्थ लेखक यामुळे साने गुरुजींची हे जीवनगाथा मराठी साहित्यातील चरित्र- ग्रंथात उत्कृष्ट चरित्र कसे असावे याचा एक आदर्श बनून राहील इतके हे चरित्र वाङ्मयीन दृष्ट्या संपन्न झालेले आहे."

साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे व साहित्याचे विश्लेषण करताना तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणले, "भारतात कथाकथनाची परंपरा होती, परंतु तिचा सामाजिक जाणिवा व राष्ट्रप्रेमासाठी गुरुजींनी जितका उपयोग करून घेतला तितका क्वचितच कोणी केला असेल कथाकथनाचे माध्यम पकडून गुरुजींनी असंख्य धडपडणारी मुले महाराष्ट्रात निर्माण केली. कथाकथनाच्या परंपरेला नैतिक अधिष्ठान, हीतात्म्याची ओढ समर्पणाची वृत्ती निर्माण करण्याचे, माणूस बदलण्याचे सामर्थ्य साने गुरुजींनी प्राप्त करून दिले."

## पवित्र कर्माचा अट्टाहास शिकवला

"साने गुरुजींच्या साहित्यावर रडवे साहित्य, दुबळे साहित्य म्हणून आक्षेप घेण्यात येतो. हा आक्षेप खोटा आहे. गुरुजींचे रडू, गुरुजींचे अश्रू नैतिकतेच्या, सत्विक्तेच्या, मांगल्याच्या ओळीतून निर्माण झालेले आहेत. गुरुजींचे साहित्य वाचल्यावर माणुसकीचा गहिवर उफाळून येतो. माणसाबद्दल जिव्हाळा निर्माण होतो. गुरुजींचे साहित्य वाचल्यावर निर्माण झालेल्या माणुसकीच्या जिव्हाळयापासून अश्रू ओघळतात. यां अश्रूंनी मन पवित्र होते, त्यामुळे पवित्र कर्माचा वट्टाहास निर्माण होतो. गुरुजीचे साहित्य वाचून ओघळणारे अश्रू अंधाराकडून प्रकाशाकडे नेतात, म्हणून साने गुरुजींचे रडवे साहित्य हे मांगल्याचे, प्रकाशनाचे दरवाजे उघडणारे साहित्य आहे."

## समतेचा दुनिवार कळवळा

साने गुरुजींच्या पळेरपूर उपोषणासंबंधी बोलताना तर्कतीर्थ जोशी म्हणाले, साने गुरुजीची मागणी केवळ मंदिर-प्रवेशाच्या देखाव्याची नव्हती, तर सामाजिक प्रगतीचे पाऊल पुढे टाकण्याचे ते प्रयत्न होते. हरिजनांसारखा वर्ग दुबळा, उपेक्षित राहिला तर त्यामुळे राष्ट्र दुबळे राहील ही तळमळ त्यांना होती. यामुळेच गुरुजीचे उपोषण राष्ट्रीय एकात्मतेच्या, सामाजिक समतेच्या कळवळयातून घडलेले होते. राष्ट्रीय एकात्मतेचे आजचे कागदी धिडवडे पाहिल्यावर गुरुजींचा आंतरभारतीचा विचार श्रेष्ठ वाटतो. राष्ट्रीय एकात्मतेच्या परिषदा जे करू शकणार नाहीत ते आन्तर भारती करून जाईल इतके सामर्थ्य आन्तर भारतीच्या साने गुरुजीप्रणीत आंदोलनात आहे.

## उत्पादक श्रमाशिवाय तरणोपाय नाही

"आजच्या समाजव्यवस्थेत शिक्षणात श्रमाची अप्रतिष्ठा होत आहे. आजचे शिक्षण माणसाला पांडरपेशे करून श्रमाला कमी लेखते. श्रमाला कमी लेखणारे शिक्षण आर्थिकदृष्ट्या राष्ट्रालाही मागासवलेले ठेवते. राष्ट्रीय उत्पादन श्रमांतून होते. परंतु थमाबद्दलच्या तिरस्कारायामुळे आपण चातुवर्ण्य निर्माण केले हे लक्षात घेऊन गुरुजींनी श्रमप्रतिष्ठेला महत्त्व प्राप्त करून दिले. साने गुरुजी सेवा पथकासारखे उपक्रम आज लाख मोलाचे आहेत. साने गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांनी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी मरगळ झटकली पाहिजे. तरच हा गाथा प्रकाशन समारंभ उपयुक्त ठरला असे म्हणता येईल."

## गुरुजींनी प्राणत्यागाने इषारा दिला

"साने गुरुजींचा देहत्याग १९५० सालच्या भ्रष्टाचाराच्या, बत्तासीनतेच्या परिस्थितीतूनच निर्माण झाला होता. १९५० पेक्षा आज भ्रष्टाचारांचा, सत्तापिपासेचा विषवृक्ष, अपरंपार फोफावला आहे. आज गुरुजी असते तर यांनी जाहीर आत्मदहन केले असते, किंवा तरुणांच्या मनाला हात घालून जयप्रकाशप्रणित क्रांतीला तयार केले असते." प्रचलित परिस्थितीतबाबत बोलताना शास्त्रीजी म्हणाले, " जयप्रकाशजींना या देशाच्या दुखण्याचे निदान झाले आहे; परंतु त्यांच्याजवळ कार्यक्रम व उपाय नाही. सर्व पक्षांचे नेतृत्व विचाराने मनाने म्हातारे होऊ लागले आहे. त्यामुळे या राष्ट्राच्या समस्यांचा सर्वांनी एकत्र येऊन विचार करण्याची गरज उत्पन्न झाली आहे. गोरेगावसारख्या एका खेडेगावात जनसंघ, समाजवादी, काँग्रेस, या सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी कोठेही जाहिरात न करता आपले पक्षीय झेंडे गुंडाळून विनोबांना अभिप्रेत असलेली ग्रामपरिषद स्थापून गाव पंचायत सांगेल ते करण्याचा प्रारंभ करून आजच्या सर्वच नेत्यांना आदर्श घालून दिला आहे."

**(राजा मंगळवेढेकर लिखित 'साने गुरुजी जीवनगाथा' प्रकाशन समारंभ,**
**गोरेगाव जि. कुलाबा-भाषण .**
**साप्ताहिक साधना, पुणे. शनिवार, दि. २१ जून, १९७५ पृ. १४ व १५.)**

○○○

9

# M N Roy : A tribute

Honourable Shri Sadiq Ali Sahib, the Governor of the Maharashtra State and friends,

THE publication of the political biography of M.N. Roy, written by my great friend, is a very important event in the Radical Humanist Movement. The writer of this biography Shri V.B. Karnik is exceptionally qualified for such a task in many ways. As one of the closest associates and friends of Roy, Karnik always stood by him with unswerving devotion till the end.

When Roy returned to India, secretly and was travelling, incognito, in the country in 1930 to observe the political situation in the country and to find like-minded intellectuals, wedded to the Marxist ideal of world revolution and ready to dedicate their life for that great cause, he was fortunate enough to meet in Karnik, his permanent host in Bombay. In the same year, Roy was arrested and sent to jail by the British regime for six years. In the absence of Roy, Karnik, along with his brothers and friends, worked along the lines indicated by and consistent with Roy's thoughts till he was released from jail. After his release, Roy started and published a weekly journal "Independent India" in 1937, and Karnik joined him and undertook all the responsibility of the journal's editing and publishing. Roy, at that time, joined the Indian National Congress

as he could see that the Congress was guiding the people's movement for independence and thought and that every freedom-lover had a sacred duty to participate in it. He chalked out and enunciated a new radical programme for the Congress to bring about a democratic revolution from the point of the Marxist world-view; and organised a group of congressmen of common approach and established the League of radical congressmen. V.B. Karnik became its General Secretary.

When the second world war broke out Roy and his colleagues had to leave the Congress due to serious fundamental differences as to whether or not to support the Allies. According to Radical Democrats, world democracy was in danger at that juncture. They thought that if the Fascists and the Nazis succeeded, all the existing democracies of the world would be wiped out from the face of the earth. This view of the Radicals was very unpopular. Despite the unpopularity in this critical situation, Radical Democrats ventured to organise an independent party called the Radical Democratic Party under the guidance of Roy. Miss Maniben Kara, Karnik, Barrister Tarkunde, J.B.H. Wadia, the late Prof. G.D. Parikh, Prof. Sibnarayan Ray, Prof. A.B. Shah and others- all politically mature thinkers carried the responsibility to propogate the ideas of Radical Democracy on behalf of the party. In this context, it should be noted, that Roy published a short thesis in which he observed that the war, if continued long, was going to exhaust all the resources of the nations involved; especially of the imperial world powers; and if democratic forces ultimately succeeded and won the war against the Fascists, the era of the liquidation of Western Empires would immediately follow and colonies like India would be emancipated. This prophetic prediction was proved to be correct by the events after the Second World War.

At the beginning of the Second World War, I remember that Roy was a very tormented soul. He was very much disturbed by the non-aggression pact concluded by comrade Stalin with the Fascist powers. He began to ponder over the Communist strategy and its basis of Marxist philosophy. He began to doubt the strategy of a Communist world revolution and

realised that man cannot achieve his freedom and dignity without doing away with Marxist strategy. After India achieved Independence, he analysed and evaluated the role and structure of political parties of the parliamentary democracies as well as those of the socialist and communist countries. He came to the conclusion that structurally and essentially political parties are oriented on authoritarian principles as all the decisions are taken at the top and orders are issued for execution to the lower levels of the organization. The people send their representatives to the centres of power and the people, between the period of elections, live at the mercy of delegates. People use their sovereignty only at the time of voting. Real political power is exercised only by the delegates. In the ultimate analysis, the fundamental principles of democracy remain only a formality. Consequently, all the political parties in a crisis degenerate into authoritarian organizations; as they try to concentrate all power in their own hands and their political activities are debased into a scramble for power, using people as pawns in the game which is also apparently clear in the present elections. Eventually, people or citizens lose their fundamental rights. This is amply demonstrated, during the present century, by history. By this kind of rethinking, Roy came to the conclusion that unless a strong foundation of radical democracy is organised at the grassroots, democracy would always remain feeble.

M.N. Roy, as is well-known, originally Narendra Bhattacharya, changed his name to Manavendra Nath Roy when he entered the United States of American during the period of the First World War. As Narendra Bhattacharya, a school boy of about fourteen, he joined a revolutionary movement in Bengal. He left the country in disguise to secure arms for overthrowing alien rule. In 1930, Roy returned to India with arms of a different kind, nearly sixteen years after his departure. He came back with a new vision and with a new philosophic outlook. He had outgrown the native traditional mythico religious approach to life with the help of new ideas and values opened to him by Marxism. The Marxist ideology, however, did not make him spell-bound as it usually happens to others

in general. Knowing well the mental conditions of Indian Society, he thought that the survival of political democracy would remain doubtful unless as the mythico-religious outlook ingrained in the unconscious mind of the people from time immemorial is changed. The political democracy here is without its real foundation. The cultural pattern here is hierarchical i.e., authoritarian, which is amply demonstrated by the recent events in the last decade. Unless the ideas and values of the democratic way of life become meaningful to millions of this country, the super-structure of political democracy would remain shaky. With a view to making the super-structure firm, Roy insisted upon a Twentieth Century renaissance, in other words, a philosophical revolution. If this approach is neglected, the progressive political and economical programmes and activities carried on by the Government and by a democratic ruling party are bound to fail. The Indian society is divided into religious communities with contradictory religious loyalties. Communal strife, hidden or open, goes on. Casteism in the guise of democracy has become rampant. Atrocities against the scheduled castes are continied. The only way out of these discouraging phenomena is a kind of radical transformation in the mythico-religious mentality of the people. Mere laws promulgated by the State would always remain ineffective.

M.N. Roy was, I think, the first Indian political thinker who appreciated clearly the significance of the forces generated by the Second World War. He was the first to maintain that the issue of Capitalism vs. Socialism was bound to make way for that of democracy vs. totalitarianism, a fact supported by many and amply testified, too, by the history of the post-war period. Roy was, again, one of the very first few to recognise fully and clearly the implications of the enormous destructive power released during the war and their bearing on the idea and the technique of revolution. The insurrectionary methods adopted by the revolutionaries, in the past, have been clearly rendered out-dated. Roy re-asserted the potentialities of a non-violent democratic movement free from the distorting influences of power politics of parties. He was

both an activist and a thinker of academic temperament. Inspite of many reverses suffered by him in his political life, he withstood them all with the detachment of a yogi. He never lost his optimistic attitude towards life. Reason was the sole guide that Roy accepted in his quest for truth. He believed that reason alone, operating in the light of experience, could solve the problems of human life. He believed that educability of man is grounded in his capacity to interprete and to learn from his experience. He also believed that man is essentially in the quest of freedom. He thought that the essential rationality of man. if properly guided by inner light, could find the way to develop his potentialities. Roy's mature mind was endowed with Socratic scepticism of current beliefs and a Socretic faith that knowledge is virtue.

The biography written by Karnik does not include the aspects of Roy's private life which could have been narrated, by himself, alone. But he did not like to tell the stories of his private life because according to him it is a kind of an expression of Narcissus complex, a kind of perverted self-love. By this biography, Karnik has made a great contribution to the Humanist movement of the world, I am sure.

**(* Speech on the ocassion of Publication of 'Political Biography of M. N. Roy' - by V. B. Karnik. * The Radical Humanist Vol 42, No- 2. Page-11, 12, 32 May, 1978)**

❍❍❍

१०

# आचार्य अत्रे : विनोद सामर्थ्याची प्रचिती

*(दि. १३ ऑगस्ट १९८० या आचार्य अत्रे यांच्या जन्मदिनी त्यांच्या पुतळ्याचे अनावरण मुंबईत झाले. त्यावेळी समारंभाच्या अध्यक्षपदावरून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण झाले. नर्मविनोद व विचार यांचा उत्तम संगम त्या भाषणात झाला होता.)*

‘‘माझा व अत्र्यांचा फार जुना संबंध. आमचे संबंध दुहेरी असत. आम्ही एकमेकांच्या बाजूचे आहोत की विरुद्ध आहोत असा भ्रम पडावा असं हे नातं होतं. असं हे दुहेरी जीवन प्रकट होत असलं तरी मैत्री कायम होती. ते माझ्यावर जोरदार हल्ला चढवीत. लोक म्हणत, ‘उत्तर द्या!’ मी म्हणे, ‘माझ्याकडे उत्तर आहे पण देण्याची गरज नाही.’ ते माझे कायमचे मित्र आहेत आणि ती मैत्री जुनी आहे. त्यांचा ‘ब्रँडीची बाटली’ हा चित्रपट निघाला. पुण्यातील अश्लील मार्तंड मराठे, श्रेष्ठ साहित्यिक माटेमास्तर यांनी निषेधाची सभा भरविली आणि मला अध्यक्ष केले. त्यावेळी मी टोपीसुद्धा घालीत नव्हतो. सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणे शेंडी, जानवं, एक उपरणं अंगावर घालून पुण्यात वावरत असे. १९३७-३८ च्या सुमाराची ही गोष्ट, आणि सगळे फसले. त्या ‘ब्रँडीच्या बाटली’मध्ये जो भगवान श्रीकृष्ण दाखविलेला आहे त्याविरुद्ध आक्षेप होता. मी आचार्य अत्रे यांचे समर्थन केले व तो यथायोग्य दाखविला आहे असं म्हटलं. माटे बुचकळ्यात पडले. याला कशाला अध्यक्ष केले असं म्हणाले (हशा). तेव्हा हे संबंध दृढ झाले.

हैदराबाद साहित्य संमेलनात आचार्य अत्रे यांनी आमच्यावर फार जोरदार हल्ला केला. आम्ही तयार केलेल्या ‘पदनाम’ कोशाचा निषेध करणारा ठराव संमेलनात मांडण्यात आला. पाच हजार लोक समोर बसलेले. खोचक, बोचक बोलण्यात अत्र्यांचा हातखंडा. नाव ठेवण्यात त्यांचा कुणी हात धरणार नव्हतं. त्यांनी भाषणात सांगितलं की, हा ‘पदनाम’ कोश नसून ‘बदनाम’ कोश आहे (हशा). माझे मित्र श्रीपाद शंकर नवरे आले आणि म्हणाले,

''तुम्ही आता बोललंच पाहिजे.'' त्या पाच हजार लोकांपुढे उभं राहून अत्रे म्हणाले होते, ''अग्निरथ गमनागमन निर्देशक' असं हा बदनाम कोश म्हणतो. तुम्हाला काय कळलं घंटा!'' (प्रचंड हशा). मी भाषणाला उभा राहिलो व म्हणालो, ''आचार्य अत्रे यांच्याकडे जी शस्त्रे आहेत मी माझ्यापाशी नाहीत. माझ्याकडे शास्त्रे आहेत. शास्त्रे ही माझी शस्त्रे आहेत. शब्दशास्त्राचे ते अधिकारी आहेत; परंतु शास्त्रात शब्द कमी, अर्थ जास्त असतो. या शास्त्रानुसार माणसाला जन्मजात भाषा कोणतीही येत नसते. जी भाषा आई उत्तम तऱ्हेने शिकवते ती मुलाला येते. आचार्य अत्र्यांपेक्षाही आई ही चांगली शिक्षक असते, म्हणून ती शिकवते. अत्र्यांना मराठी पाठच करावी लागली. त्यांनी जो घंटा काढला तोही त्यांना शिकूनच आलेला आहे! (प्रचंड हशा). बर्ट्रांड रसेलनेही हा मुद्दा मांडला आहे. भाषा ही एकच गोष्ट अशी आहे की, त्यामुळे मनुष्यप्राणी सामाजिक बनतो. त्याबद्दलची एक गोष्ट सांगतो, 'एका शास्त्रज्ञाकडे कुत्रा होता. त्याला ब्रेड व मांसाचा तुकडा देण्यासाठी तो हाक मारायचा. नंतर तो घंटा वाजवत असे. घंटा वाजली की कुत्रा धावत यायचा. याचा अर्थ घंटा म्हणजे ब्रेड असा त्या कुत्र्यासाठी अर्थ झाला!' (हशा). कुत्र्याला शिकवावं लागतं. तिथं 'कंडिशन रिफ्लेक्स' आहे. मनुष्य तसाच शिकतो, असा या घंटेचा अर्थ आहे, असं संमेलनात सांगितलं व टाळ्यांचा कडकडाट झाला. बदनाम कोश हा शुभनामकोश आहे. जी माणसे व जे देश आपल्या जीवनात, आपल्या सर्व शिक्षणात, महाविद्यालयीन शिक्षणातही मातृभाषा वापरत नाहीत ते देश कधीही वर आणणार नाहीत हे लक्षात ठेवा (प्रचंड टाळया). कठीण शब्द शिकविले पाहिजेत, भाषासंपत्ती वाढविली पाहिजे, असे सर्व भाषण संमेलनात झाले, सावट दूर झाले, मग अत्रे भेटले. म्हणाले, ''जेवायला कुठे जाणार?'' मी एकाचं नाव सांगितलं. अत्रे म्हणाले, ''पाला खायला जाणार काय?'' (हशा). असे प्रेम होते. वृत्तपत्रकार व राजकारणी यात फरक असतो. राजकारणी माणसाचे आजचे मित्र हे उद्याचे शत्रू होतात, तर शत्रू हे केव्हा मित्र होऊन जातात ते कळत नाही. एक मंत्री मला माहीत आहे. जाहीर भाषणात तो म्हणाला, ''यांना ब्रह्मदेवाने मुख्यमंत्री घडविलेले आहे!'' (हशा). आमची मैत्री अशी आहे, की जी शेवटपर्यंत संपणार नाही. सभा संपली आणि बाहेर पडल्यावर पाठीवर हात मारून म्हणाला - चव्हाणासारखा पाठीवर हळूच हात मारून नाही - (हशा) ''हा माणूस हरामखोर आहे. मला मुख्यमंत्रीपद मिळवून देत नाही'' (प्रचंड हशा). आकाशातील ढगांप्रमाणे यांचे मित्र व शत्रू बनत असतात. साहित्यकाराचे तसे नसते. त्याला विश्वमैत्री हवी असते. त्यात मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा - सारे असते. ही मैत्री सार्वभौम असते. त्याला अपवाद नसतात. श्रेष्ठ साधूच्या व साहित्यकाराच्या ठिकाणी तादात्म्य वृत्ती असते व ती वृत्ती आणि माणुसकीचा जिव्हाळा अत्र्यांकडे फार मोठा होता. त्यांची महाराष्ट्राची निष्ठा, भारताची निष्ठा व मानवनिष्ठा विलक्षण होती. डांग्यांची - त्यांची एकीकडे मैत्री होती व आंबेडकरांशीही होती. अत्र्यांचा पुतळा आंबेडकरांसारखा दिसतो असं कुणीतरी म्हणालं. याचं कारण त्यांचा जीव त्यांच्या अर्थाशी एकरूप झाला होता.

विनोदाची मीमांसा साहित्यसम्राट केळकरांनी केली आहे. विनोदी साहित्य हे लिहायला सर्वात कठीण साहित्य आहे. विनोदी वृत्ती माणसाला द्वंद्वाच्या बाहेर काढते. सुखाच्या बंधनात पडू देत नाही. दु:खातूनही बाहेर काढते. विनोदाचे श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे अनेक प्रकार आहेत. गांधीलमाशीचा चावरा विनोद, तर मधमाशीच्या विनोदात माधुर्य निर्माण होण्याची ताकद असते. श्रेष्ठ विनोद माणसाला पराभवातून बाहेर काढतो. विजयाच्या बंधनातून बाहेर काढतो. धुळ्याच्या तुरुंगातील एक घटना सांगतो. दिवाळीचा दिवस होता. आम्ही लवकर उठून अभ्यंगस्नान करीत होतो आणि त्याचवेळी फाशीच्या कैद्याला वधस्तंभाकडे नेले जात होते. प्रार्थनांना आम्ही एकत्र येत होतो. तो आम्हाला चांगला ओळखत होता. तो कैदी त्याही स्थितीत म्हणाला, ''शास्त्रीबुवा, तुमची अंघोळ इथं, आमची वर,'' आणि छान हसला. विनोदाने त्याला अंतिम पराभवातून प्रत्यक्ष मृत्यूतून बाहेर काढले होते. त्याचे ते बोलणे ऐकून आम्ही अवाक् झालो. विनोदाच्या सामर्थ्याची ती प्रचिती होती व अशी प्रचिती असलेले आचार्य अत्रे होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे सुंदर रंगाचे अष्टपैलू असलेले झुंबर होते. ते पेटविले म्हणजे प्रकाश कसा आसमंतात पसरतो, तसे त्यांचे होते. आणि म्हणून त्यांच्या मोठेपणाने आपण भारावून जातो. राग विसरतो, चिरंतन मैत्रीचा ठेवा जतन करतो.''

**(पूर्व प्रसिद्धी : सभेत कसे बोलावे? - माधव गडकरी पृ. १०२ ते १०५)**

❍❍❍

११

# शंकराचार्य

*(विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या विद्यमाने दि. ११ ऑगस्ट १९८७ रोजी साहित्याचार्य कै. बाळशास्त्री हरदास व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेले यथामूल व्याख्यान)*

भारतीय संस्कृतीच्या प्राचीन इतिहासामध्ये आणि सांस्कृतिक विकासामध्ये दक्षिणेतील दोन आचार्यांची, म्हणजे आद्य शंकराचार्य आणि रामानुजाचार्य यांची कामगिरी सर्वात महत्त्वाची आहे. या सबंध इतिहासाचे रहस्य उलगडून दाखविणारी आहे. मानवी इतिहासामध्ये अतिप्राचीन काळी जगात अनेक मोठ्या संस्कृतीचा इतिहास घडला आहे. त्या इतिहासात भारतीय संस्कृतीला वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. एकंदर मानवी संस्कृतीच्या विकासाला शाश्वतकाळ टिकणारे असे योगदान या संस्कृतीने दिलेले आहे.

आर्यपूर्वकालीन द्राविड संस्कृती या देशात सिंधू नदीपासून बंगालच्या उपसागरापर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरली आणि स्थिरावली. इ.स. पूर्व 2000 वर्षापासून आर्य संस्कृती पचिमेकडून सिंधुतीरापासून बंगालच्या उपसागरापर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरली आणि स्थिरावली. भारतातील भाषांचा इतिहास असे सांगतो की, भारतात मुख्यत: साक्षर आणि साहित्यिक बनलेले दोन भाषासमूह आहेत. द्राविड भाषाकुल आणि संस्कृत भाषाकुल. संस्कृत भाषेचा अभ्यास दोनशे वर्षांपूर्वी पश्चिमी पंडितांनी सुरू केला. पश्चिमी पंडितांच्या एकदम लक्षात आले की, ग्रीक, लॅटिन, जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, रशियन इ. युरोपीय भाषा आणि वेदांची संस्कृत भाषा या एकाच कुळातील आहेत. परंतु तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम इ. भाषांचा समूह हा निराळ्या कुळातील आहे. प्राचीन इतिहासावर संस्कृतच्या अध्ययनाच्या प्रभावाने नवा प्रकाश पडला. भारताचा सांस्कृतिक इतिहास म्हणजे द्राविड संस्कृती आणि आर्य संस्कृती यांच्या समागमाचा आणि संगमाचा इतिहास दिसू लागला.

भारताच्या उत्तरेत अफगाणिस्तानात, पंजाबात आणि गंगा-यमुनांच्या परिसरात, थोडक्यात नर्मदेच्या उत्तरेत इ.स. पूर्व २००० ते इ.स. ६०० पर्यंतच्या महान कालावधीत वेदवेदांगे, उपनिषदे, सांख्यादी षड्दर्शने, रामायण, महाभारत, पाणिनीय व्याकरण म्हणजे जगातील पहिले शास्त्रीय व्याकरण, कात्यायनाचे वार्तिक, पतंजलीचे व्याकरण - महाभाष्य, जैन धर्म आणि बौद्ध धर्म इत्यादी घटकांनी प्रगल्भ बनलेल्या या धार्मिक आणि बौद्धिक संस्कृतीचा उदय व अभिवृद्धी झाली. वसिष्ठ, विश्वामित्र, कपिल, कणाद, कृष्णद्वैपायन व्यास, बादरायण व्यास, महावीर इ. तीर्थंकर, वाल्मीकी, भास, कालिदास इ. तत्त्वज्ञ, कवी व शास्त्रज्ञ जन्मले.

दक्षिणेत इ.स. ७०० ते इ.स. १५०० पर्यंतच्या कालावधीत वेदवेदांगे व वेदान्त यांचे भाष्यकार झाले. शंकराचार्यांपासून विद्यारण्यांपर्यंतचे प्रज्ञासंपन्न आचार्य या बौद्धिक संस्कृतीचे प्रस्थापक झाले. त्या संस्कृतीला या परंपरेने उज्ज्वल स्वरूप दिले. त्याबरोबरच त्या संस्कृतीच्या प्रतीक असणाऱ्या मूर्त प्रतिमा दक्षिणेतील भव्य विशाल मंदिरांच्या बौद्ध, जैन व हिंदू लेण्यांच्या रूपाने उभ्या राहिल्या. त्या साक्षर-निरक्षरांना निरंतर आश्चर्याने भारून टाकीत आहेत. दक्षिणेतील वरील आचार्यपरंपरेत उत्तरेने प्रदान केलेल्या बौद्धिक व आध्यात्मिक वैभवाने संपन्न अशी निरनिराळ्या आचार्यांची पीठे निर्माण झाली. त्यामुळे उत्तरेतील विद्यापीठांची परंपरा अखंडपणे दक्षिणेतही समर्थपणे स्थिरावली.

उत्तरेत इ.स. पूर्वकाळी तक्षशिला हे विद्यापीठ होते. हे बुद्धपूर्वकालापासून सु. १५०० वर्षे चालू होते. वेदवेदांगे यांच्या अध्ययनाबरोबरच आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद म्हणजे संगीत, ज्योतिष, अनेक शिल्पे आणि कला यांचेही अध्ययन या विद्यापीठात सुरू होते. इ.स. ७ व्या शतकापर्यंत नालंदा विद्यापीठ हे उच्च विद्या आणि कला यांचे केंद्र बनले. आद्य शंकराचार्यांच्या उदयापासूनचा इतिहास पाहिला म्हणजे लक्षात येते की, उच्च दर्जाच्या बौद्धिक संस्कृतीची केंद्रे त्या सुमारास दक्षिणेतील निरनिराळ्या राजधान्यांमध्ये स्थापन झाली.

शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यामध्ये देवताधिकरणात असे एक विधान केले आहे की, आज चक्रवर्ती राजा नाही आणि वर्णाश्रम व्यवस्था विस्कळीत झाली आहे, म्हणून चक्रवर्ती राजा कधीच झाला नाही आणि वर्णाश्रमव्यवस्था कधीच नव्हती, गोंधळच होता; असे मानायचे काय? शंकराचार्यांच्या कालखंडात म्हणजे इ.स. सातव्या-आठव्या शतकात तीन राजघराणी म्हणजे बदामीचे चालुक्य, कांचीचे पल्लव आणि मदुरेचे पांड्य यांचे संघर्ष सुरू होते. परंतु सांस्कृतिक जीवनाच्या प्रेरणा आपल्या सामर्थ्याने कार्यक्षम राहिल्या होत्या. त्या क्षीण झाल्या नाहीत. मौर्य अशोकापासून दक्षिणेमध्ये बौद्ध धर्माचा प्रवेश झाला, प्रसार झाला, तो दृढमूल झाला. त्याच सुमारास जैन धर्मदेखील दक्षिणेत अवतरला आणि शंकराचार्यांच्या उदयापर्यंत प्रभाव गाजवीत राहिला. सातव्या शतकात द्राविड संस्कृतीत जोपासले गेलेले

शैव संप्रदाय आणि वैष्णव संप्रदाय आचार्यांच्या प्रभावाखाली अधिक सतेज बनू लागले. विशाल मंदिरे, भव्य व सुंदर मूर्ती, चित्रे, नृत्य आणि संगीत यांना बहर आला. ही दक्षिणेतील मूर्तिपूजकांची संस्कृती, कला आणि साहित्याच्या आविष्काराने समृद्ध झालेली संस्कृती दक्षिणेतूनच इंडोनेशियापर्यंत भारताबाहेर त्याच कालखंडात पसरली.

सातव्या शतकात चिनी प्रवासी न्यूऑन चांग याने दक्षिणेचा प्रवास केला. तो स्वत: बौद्ध होता. त्याच्या हे लक्षात आले की, बौद्ध धर्माला आता उतरती कळा लागलेली आहे. बौद्ध धर्माचा पुरस्कर्ता हर्ष उत्तरेत राज्य करीत होता. त्याने दक्षिणेवर स्वारी केली. नर्मदेच्या तीरावर चालुक्य राजा पुलकेशिन् याने त्याला थोपविले. चालुक्याने त्याचा पराभव केला व परत उत्तरेत परतविले. त्याचे हत्तीचे दळ काबीज केले. बदामी ही चालुक्याने आपली राजधानी केली आणि आपण कोणाचे मांडलिक नाही, स्वतंत्र राजे आहोत, हे सिद्ध करण्याकरिता अश्वमेध केला. त्याने नवा किल्ला बांधला. ऐहोळ येथे सुंदर मंदिरे बांधली. त्यात कोरीव शिलालेख मांडले. कांची येथे पल्लववंशीय राजवटीने आपली राजधानी चांगल्या बंदोबस्ताने संघटित केली. सातवाहनांचा धार्मिक वारसा चालविला. यज्ञसंस्थेला ऊर्जितावस्था आणिली. शैव व वैष्णव संप्रदायाप्रमाणे पूजाअर्चा उत्साहाने साजऱ्या होऊ लागल्या. मदुरा येथे पांड्यवंशीय कडुंगोत याने आपली राजधानी सुसज्ज केली. बौद्धधर्मीय कलभ्र राजांना जिंकून सिंहविष्णूने कावेरीच्या तीरापर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. तो विष्णुभक्त होता. तो आणि त्याचा पुत्र महेंद्रवर्मन (१) यांच्या मूर्ती महाबलिपूरम येथील वराहगुहेमध्ये पाहावयास मिळतात. महेंद्रवर्मनने मंदिरे, उद्याने, मार्ग, पाठशाळा यांची निर्मिती केली. तो स्वत: प्रथम जैन धर्माचा पुरस्कर्ता होता. कालांतराने तो शैव बनला. त्याने कृष्णेच्या पलीकडे आपल्या राज्याची सीमा नेऊन पोचविली. महेंद्रवर्मनशी फुलकेशिन् (२) याची स्पर्धा सुरू झाली. ही स्पर्धा अनेक वर्षे चालली. महेंद्रवर्मनचा पुत्र नरसिंहवर्मन याने पुलकेशिन् (२) याच्याशी अनेक लढाया करून त्याला परतविले. त्याने पुलकेशिन्च्या बदामी राजधानीवर हल्ला करून किल्ल्यासह ती राजधानी जिंकली. चालुक्यांच्या सत्तेला उतरती कळा लागली. पल्लवांचे आक्रमण सुरू झाल्यावर चालुक्यांच्या राज्याचे अनेक तुकडे झाले; परंतु पुलकेशिन्च्या अनेक पुत्रांपैकी विक्रमादित्य याने आपल्या पित्याची राजधानी बदामी परत जिंकली. विक्रमादित्य व पल्लव राजा महेंद्रवर्मन (२) यांचा संघर्ष सुरू झाला. सातव्या शतकाच्या अखेरीस चालुक्य आणि पल्लव यांच्यात शांततेचा तह होऊन दोन्ही राज्यांची भरभराट होऊ लागली. विक्रमादित्याचा मुलगा विनयादित्य (इ.स. ६८१ ते ९६) याची कारकीर्द चांगली गाजली. त्याने उत्तर भारतावर स्वारी केली. त्याच्या पाठीमागून त्याचा मुलगा विजयादित्य गादीवर आला. ही कारकीर्द सुखसमृद्धीची मानली जाते. यावेळी उभारलेल्या मंदिरांच्या रचनेवरून वैभवाचे अनुमान होते. विजयादित्याचा मुलगा त्याच्यानंतर गादीवर आला. तो विक्रमादित्य (इ.स. ७३३-४४) दुसरा होय. याच्याच

कारकीर्दीत अरबांनी सिंधवर स्वारी केली. भोवतालचा प्रदेश जिंकला. ते दक्षिणेकडे वळले. त्यांना जयसिंहवर्मनचा मुलगा पुलकेशिन् याने परतविले. चालुक्य राजांचा पल्लव राजवटीवर वारंवार हल्ला होत होता; परंतु कांचीपूर ही राजधानी पल्लवांनी अनेक वेळा परत जिंकून घेतली. विक्रमादित्य (१) यास परमेश्वरवर्मन (१) याने पराभूत करून कांचीचा ताबा मिळविला. त्याच्यानंतर त्याचा पुत्र नरसिंहवर्मन दुसरा (इ.स. ६८० ते इ.स. ७२०) आपल्या राजसिंहासनावर दीर्घकाळ स्थिरावला. प्रचंड आणि सुंदर मंदिरे याच्या कारकीर्दीत उभारली गेली. कैलासनाथ आणि मामल्लपुरम्च्या किनाऱ्यावरील मंदिर याच्याच कारकीर्दीत बांधले गेले. कवी आणि काव्यशास्त्रकार दंडी याच्या दरबाराचे भूषण होते. याला राजसिंह हे बिरुद होते. दर्यावर्दी व्यापार याच्या प्रोत्साहनाने भरभराटीस आला. याने चीनच्या दरबारातही आपली वकिलात स्थापली होती.

इ.स. सातवे ते आठवे शतक निरनिराळ्या राज्यांच्या संघर्षाचा काळ असला तरी भारताची धार्मिक आणि बौद्धिक संस्कृती अनेक मार्गांनी संपन्न बनत होती. याचा अर्थ असा की, सत्तेवर आलेले राजपुत्र हे धार्मिक आणि बौद्धिक संस्कृतीचे पोशिंदे होते. ज्याप्रमाणे काशी हे अनेक सहस्र वर्षे धार्मिक आणि बौद्धिक संस्कृतीचे महाविद्यापीठ म्हणून अखंडपणे चालू राहिले, त्याचप्रमाणे दक्षिणेत कांचीपूरम् हे चालू राहिले. कांची हे बौद्ध, जैन, शैव व वैष्णव यांच्या मठांनी आणि मंदिरांनी गाजत होते. आद्य शंकराचार्य यांच्या प्रेरणेने शिवकांची आणि विष्णुकांची अशी मांडणी झाली.

इ.स. सहाव्या आणि सातव्या शतकांचा दक्षिणेचा इतिहास भारताच्या बौद्धिक संस्कृतीची पार्वभूमी म्हणून नीट तपासणे आवश्यक आहे. सातव्या शतकात कुमारिलभट्ट व शंकराचार्य यांच्यापासून ते १४ व्या शतकातील विद्यारण्यांपर्यंत ही आचार्यपरंपरा अखंडपणे बौद्धिक संस्कृतीचे उज्ज्वल रूप प्रकट करीत आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाला बौद्धिक आव्हान देणारा, बौद्ध तत्त्वज्ञानातील अवांतर चारी तत्त्वदर्शने तपासून त्यावर हल्ला करणारा बौद्धांचा पहिला मोठा प्रतिस्पर्धी कुमारिलभट्ट होय. कुमारिलभट्ट हे दक्षिणेतलेच. त्यांच्या नावातील कुमार हा शब्द दक्षिणेतील सुब्रह्मण्य किंवा कार्तिकस्वामी यांचा बोधक आहे. सुब्रह्मण्य हे नाव दक्षिणेतील व्यक्ती नावांपैकी अतिशय रूढ असलेले नाव आहे. दुसरे असे की, कुमारिलभट्ट हे द्राविड भाषा चांगल्या प्रकारे जाणत होते. याचे प्रत्यंतर मीमांसेवरील त्यांच्या तंत्रवार्तिक या ग्रंथातील द्राविड भाषांच्या निर्देशांवरून आणि त्यातील शब्दांच्या उद्धरणांवरून लक्षात भरते. कुमारिलभट्टांशिवाय द्राविड आणि प्राकृत भाषांचा परामर्श करणारा एकही संस्कृतमधील शास्त्रग्रंथ आढळत नाही. दक्षिणेत मोठे पाच आचार्य महान ग्रंथकार झाले. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, विद्यारण्य अथवा माधवाचार्य आणि त्यांचे बंधू सायणाचार्य. कुमारिलभट्टांशिवाय मीमांसेचा दुसरा नवा संप्रदाय स्थापन करणारे प्रभाकरगुरु केरळातले होत. त्यांचाच पुत्र हस्तामलक शंकराचार्यांच्या प्रसिद्ध चार शिष्यांपैकी

एक होय. मंडनमिश्र हे उत्तरेतील की दक्षिणेतील या बाबतीत निश्चित असे काही सांगता येत नाही; परंतु मंडनमिश्र हे कुमारिलभट्टांचे शिष्य होत यात शंका नाही. मंडनमिश्रांच्या मीमांसाविषयक आणि वेदान्तविषयक प्रबंधांमध्ये कुमारिलभट्टांच्या लोकवार्तिकातील वचने उद्धृत करून त्यांचे आदराने विवरण केलेले आढळते. मिश्र या उपपदावरून मंडनमिश्र उत्तरेतील असावेत असा काहींचा कयास आहे. अनंतानंदगिरी या लेखकाच्या शंकरविजय या ग्रंथात कुमारिलभट्टांनी आपल्या बहिणीचा पती म्हणून मंडनमिश्रांचा निर्देश केला आहे. विद्यारण्याचे म्हणून आनंदाश्रम ग्रंथावलीत छापलेल्या माधव नावाच्या पंडिताच्या १७ व्या शतकातल्या सुप्रसिद्ध शंकर विजयनाम पुस्तकात मंडनमिश्रांचे निवासस्थान नर्मदेच्या किनाऱ्यावरील माहिष्मतीनगरी सांगितले आहे. याच स्थानाला हल्ली मांधाता असे म्हणतात. कुमारिलभट्ट, मंडनमिश्र व प्रभाकरगुरु हे समकालीन होत हे अनेक प्रमाणांवरून सिद्ध झाले आहे.

शंकराचार्यांचे अनेक चरित्रकार कुमारिलभट्ट आणि शंकराचार्य यांच्या भेटीचे प्रभावीपणे वर्णन करतात. त्याचा संदर्भ असा : शंकराचार्यांनी प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिले. उपनिषदे, भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्र हे तीन ग्रंथ म्हणजे प्रस्थानत्रयी होय. आपल्या ब्रह्मसूत्रभाष्यावर अधिक विस्ताराने साधक-बाधक चर्चा करणारा वार्तिक ग्रंथ कोणातरी मोठ्या सर्वश्रेष्ठ पंडिताने लिहिणे आवश्यक आहे, अशी आचार्यांची भावना झाली. अशा अधिकाराचा उत्कृष्ट योग्यतेचा तत्कालीन विद्वान म्हणजे कुमारिलभट्ट होय हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून ते दिग्विजयार्थ निघाले असताना प्रथम कुमारिलभट्टांची भेट घेण्याकरिता प्रयाग येथे आले. कुमारिलभट्टांना ब्रह्मसूत्रभाष्य हा ग्रंथ दाखविला तेव्हा शैली आणि विचार पाहून ते प्रसन्न झाले आणि म्हणाले की, 'याच्यावर फार विस्ताराने वार्तिक ग्रंथ लिहावयाची गरज आहे; परंतु मी हे जग सोडत आहे. देहान्त प्रायश्चित्त घेत आहे. प्रायश्चित्ताचा संकल्प सोडला आहे. म्हणून तुषानलात (भुशाच्या पेटलेल्या ढिगाऱ्यात) प्रवेश करून आत्मदहन करणार आहे. म्हणून माझा शिष्य सर्वशास्त्रपारंगत व प्रतिभासंपन्न मंडनमिश्र हा हे वार्तिकलेखनाचे कार्य करू शकेल. त्याच्याकडे जा.' या आख्यायिकेचा सूचित अर्थ असा होतो की, शंकराचार्यांच्या मायावादी अद्वैत तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून त्याचा उत्कृष्ट ऊहापोह आणि समर्थन करू शकणारे कुमारिल आणि मंडन हे दोघे होते.

कुमारिलभट्ट, मंडनमिश्र, प्रभाकरगुरु, आद्य शंकराचार्य आणि त्यांचे सुरेश्वराचार्यादी चारी शिष्य समकालीन होत आणि ते सगळे दक्षिणापथातच होते. सुरेश्वराचार्यांचा कालखंड निश्चित करण्यास अनेक प्रमाणे उपलब्ध होतात. त्यामुळे त्यासंबंधी मतभेद राहू शकत नाहीत. शंकराचार्यांच्या कालखंडासंबंधी पुष्कळ मतभेद आहेत. सुरेश्वराचार्यांचा काळ

निश्चित झाला म्हणजे शंकराचार्यांचा कालखंड निश्चित होतो. त्यामुळे त्यात मतभेदांना जागा राहत नाही. सुरेश्वराचार्यांचे जे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत, त्यातील तीन ग्रंथ अत्यंत महत्त्वाचे मानले जातात; आणि ते त्यांचेच आहेत याबद्दल विद्वानांच्या मनात यत्किंचितही शंका नाही. नैष्कर्म्यसिद्धी, तैत्तिरीयभाष्यवार्तिक व बृहदारण्यकभाष्यवार्तिक हे ते ग्रंथ होत. यापैकी नैष्कर्म्यसिद्धी हा स्वतंत्र ग्रंथ असून बाकीचे दोन शंकराचार्यांच्या भाष्यावरील टीका ग्रंथ आहेत. या तिन्ही ग्रंथांमध्ये सुरेश्वराचार्यांनी शंकराचार्यांच्या जीवनाचे सार गौरवपूर्ण रीतीने सुंदर शैलीत वर्णन केले आहे.

*** वेदान्तोदरसंगूढं संसारोत्सारि वस्तुगम् ।**
**ज्ञानं व्याकृतमप्यन्यैर्वक्ष्ये गुर्वनुशिक्षया ॥**
**गुरुक्तो वेदराद्धान्तस्तत्र नो वच्भ्यशक्तित: ।**
**सहस्र किरणव्याप्ते खद्योत: किं प्रकाशयेत् ॥**
**श्रीमच्छङ्करपादपद्मयुगलं संसेव्य लब्धोचिवान्**
**ज्ञानं पारमहंस्यमेतदमलं स्वान्तान्धकारापनुत् ।**
**मा भूदत्र विरोधिनीमतिरत: सद्भि: परीक्ष्यं बुधै:**
**सर्वत्रैव विशुद्धये मतमिदं सन्त: परं कारणम् ॥**
**विष्णो: पादानुगां यां निखिलभवनुदं शंकरो:वाप योगात्**
**सर्वज्ञं ब्रह्मसंस्थं मुनिगणसहितं सम्यगभ्यर्च्य भक्त्या ।**
**विद्यां गङ्गामिवाहं प्रवरगुणनिधे: प्राप्य वेदान्तदीप्तां**
**कारुण्यातामवोचं जनिमृतिनिवहध्वस्तये दु:खितेभ्य: ॥**

**नैष्कर्म्यसिद्धि ***

''वेदान्ताच्या उदरात झाकलेले संसारनाशक वस्तुनिष्ठ ज्ञान इतरांनी उघड करून दाखविले असले तरी मी गुरुंच्या आज्ञेने ते पुन: सांगणार आहे. वेदांचा सिद्धान्त गुरुंनी (ब्रह्मसूत्र भाष्यात) सांगून टाकला आहे. त्याबद्दल मी काही सांगणार नाही. कारण मी असमर्थ आहे. सूर्याने जे प्रकाशलेले असते, त्यावर काजवा काय प्रकाश टाकणार?'' असे प्रस्तावनेत म्हटल्यावर या ग्रंथाच्या उपसंहारात ते म्हणतात, ''श्रीमत् शंकरांच्या चरणकमलांची सेवा करून मी हे ज्ञान सांगितले आहे. हे अंत:करणातील अंधकार नाहीसे करणारे निर्मळ ज्ञान आहे. विद्वानांनी याचे परीक्षण करावे. त्यामुळे त्यातील चुकीचे मत काढून टाकता येईल. विष्णूच्या चरणापाशी गंगेसारखी असलेली संसारनाशक विद्या शंकराने योगसामर्थ्याने प्राप्त करून घेतली. त्या सर्वज्ञ ब्रह्मनिष्ठ मुनिगणांमध्ये वसलेल्या शंकराची उचित पूजा करून भक्तीच्या सामर्थ्याने मी ती विद्या प्राप्त करून घेतली. दु:खितजनांच्या जनन-मरण परंपरारूप संसाराच्या नाशाकरिता करुणेने प्रेरित होऊन मी ती विद्या येथे सांगितली आहे.''

*** यस्मेदं सकलामलेन्दुकिरणप्रख्यैर्यशोरश्मिभि**
**र्व्याप्तं यश्च कृपालुतापरवशचक्रे हितं दु:खिनाम्।**
**यद्वाणीकुलिशावरुग्णमतय: पेतुर्दिशस्तार्किका**
**भक्त्या पूज्यतमं प्रणम्य तमहं तद्भाष्यनीती यते ॥**
**मुमुक्षुसार्थनाहस्य भवनामभृतो यते: ।**
**शिष्मश्चकार तद्भक्त्या सुरेशाख्यो महार्यवित् ॥**

**तैत्तिरीयभाष्यवार्तिक ***

''ज्यांच्या चंद्रकिरणासारख्या कीर्तिकिरणांनी हे जग व्यापले आहे, दु:खीजनांवरील करुणेला परवश होऊन ज्याने भाष्य लिहून त्यांचे हित केले आहे आणि ज्याच्या वाणीरूपी वज्राने मती खंडित झालेले तर्कशास्त्रज्ञ निरनिराळ्या दिशांना (भीतीने) पसार झाले आहेत, त्या पूज्यतमाला भक्तीने प्रणाम करून त्याच्या भाष्याच्या स्पष्टीकरणाकरिता प्रयत्न करतो.''

''मुमुक्षूंचा समुदाय ज्याच्या भोवती असतो, भवाचे म्हणजे शिवाचे नाम (शंकर) जो धारण करतो, त्या यतीच्या मोठा अर्थ जाणणाऱ्या सुरेश नावाच्या शिष्याने हे विवेचन केले आहे.''

*** यां काण्वोपनिषच्छलेन सकलाम्नायार्थसंशोधिनी**
**संचकुर्गुरवोऽनुवृत्तगुरवो वृत्तिं सतां शान्तये।**
**अर्थाविष्करणं कुतार्किककृताशङ्कासमुच्छित्तये**
**तस्या न्यायसमाश्रितेन वचसा प्रक्रम्यते लेशत: ॥**
**यामस्मद्गुरुरेव वेदशिरसामैकात्म्यतात्पर्यत:**
**वृत्तिं सज्जनशंकरीं सुक्मिलां नानानयोद्योतिताम्।**
**चक्रे काण्वसमाश्रितोपनिषदो दुस्तर्कदोपापहां**
**श्रद्धामात्रबलेन वार्तिकमिदं तस्या: समासात्कृतम् ॥**
**आशैलादुदयातथाऽस्तगिरितो भास्वद्यशोरश्मिभि**
**र्व्याप्तं विश्वमनन्धकारमभवद्यस्य स्म शिष्यैरिदम्।**
**आराज्ज्ञानगभस्तिभि: प्रतिहतश्चन्द्रायते भास्कर:**
**तस्मै शंकरभानवे तनुमनोवाग्भिर्नमस्तात्सदा ॥**

**बृहदारण्यकभाष्यवार्तिक ***

''काण्वोपनिषद म्हणजे बृहदारण्यक उपनिषद (काण्वशाखा) या ग्रंथाचे निमित्त करून सर्व वेदांचा अर्थ स्वच्छ स्वरूपात मांडणारे भाष्य सज्जनांना शांती प्राप्त व्हावी म्हणून स्वत:च्या गुरुंना अनुसरणाऱ्या गुरुंनी निर्मिले. त्या भाष्यावरील कुतार्किकांनी मांडलेले आक्षेप खोडून काढण्याकरिता तर्कशुद्ध पद्धतीने अर्थाचे स्पष्टीकरण मी सुरू करीत आहे.''

वरील प्रस्तावना करून वार्तिक पूर्ण केले आणि उपसंहार करताना म्हटले, ''उपनिषदांचे अद्वैत आत्मतत्त्व हे तात्पर्य आहे, असे सांगणारे निर्मल, नाना युक्तिवाद प्रतिपादणारे, सज्जनांना शांती देणारे भाष्य आमच्या गुरुंनी लिहिले. त्यावरील कुतर्करूप आक्षेप नष्ट करणारे हे वार्तिक श्रद्धेच्या सामर्थ्याने संक्षेपाने मी लिहिले आहे... उदयाचलापासून अस्ताचलापर्यंत ज्याच्या कीर्तिरूपी रश्मींनी आणि ज्याच्या शिष्यांनी हे विश्व व्यापले आणि विश्वअंधकाररहित झाले, ज्याच्या देदीप्यमान ज्ञानकिरणांनी सूर्य चंद्रासारखा दिसू लागतो, त्या शंकररूपी सूर्याला कायावाचामनेकरून सतत नमस्कार असो.''

आधुनिक विद्वानांनी शंकराचार्यांच्या जीवनकालासंबंधी अनेक वर्षे चाललेल्या संशोधनाचा आढावा घेऊन इ.स. ७८८ ते इ.स. ८२० हा कालखंड आतापर्यंत निश्चित केला होता; परंतु तो बदलणे जरूर आहे. जिनसेन नावाच्या जैन पंडितांनी हरिवंश नावाचा ग्रंथ शके ७०५ (इ.स. ७८३) साली लिहिला. त्याने आपल्या ग्रंथामध्ये विद्यानंद या जैन पंडितांचा उल्लेख केला आहे. आठव्या शतकातील विद्यानंदांनी 'अष्टसाहस्री' या आपल्या ग्रंथात सुरेश्वराचार्यांच्या बृहदारण्यकभाष्यवार्तिकातील श्लोक ग्रंथनिर्देशपूर्वक उद्धृत केला आहे. याचा अर्थ असा की, आठव्या शतकाच्या मध्याला सुरेवर हे प्रख्यात पंडित म्हणून मान्यता पावले होते. आठव्या शतकाच्या प्रारंभीच त्यांनी आपली ग्रंथरचना केलेली असणार. सातव्या शतकाच्या निदान अखेरीस त्यांची कारकीर्द सुरू झाली असणार. यास उपोद्वलक दुसरे प्रमाण असे की, महानुभाव संप्रदायाच्या दर्शन प्रकाश (इ.स. १६३८) नावाच्या ग्रंथात 'शंकरपद्धति' नामक प्राचीन ग्रंथातील एक श्लोक उद्धृत केला आहे. त्यात शंकराचार्यांचा निधनकाळ शके ६४२ (इ.स. ७२०) सांगितला आहे. अनेक ग्रंथांमधील शंकराचार्यांचे आयुर्मान ३२ वर्षांचे निर्दिष्ट केले आहे. त्यावरून जन्मशक ६१० (इ.स. ६८८) हा सिद्ध होतो. शृंगेरी मठाच्या गुरुपरंपरेच्या गणनेनुसार आचार्यांचा जन्म १४ विक्रमाब्द आणि निधन ४६ विक्रमाब्द सांगितला आहे. हा विक्रम म्हणजे चालुक्यवंशीय विक्रमादित्य (१) होय, असे लोकमान्य टिळकांनी अनुमानिले आहे. या कल्पनेप्रमाणे आचार्यांचा जन्म इ.स. ६८४ आणि निधन ७१६ असे अनुमान काढता येते. कुमारिलभट्टांचा हाच काळ होय. महावैयाकरण भर्तृहरी यांच्या 'वाक्यपदीय' या ग्रंथातील श्लोक कुमारिलभट्टांनी आपल्या 'तंत्रवार्तिक' या ग्रंथात उद्धृत केला आणि त्याचा स्फोटसिद्धांत खोडला आहे. सातव्या शतकात इत्सिंग नावाचा चिनी प्रवासी भारतात आला होता. तो म्हणतो की, भर्तृहरीचे निधन इ.स. ६५१-५२ च्या सुमाराला झाले. परंतु भर्तृहरीचा निधनकाळ सहाव्या शतकात धरावा लागतो. कारण शतपथ ब्राह्मणाचा टीकाकार हरिस्वामी (इ.स. ५३८) हा भर्तृहरीच्या शब्दब्रह्मवादाचा त्याच्या शब्दांमध्ये निर्देश करतो. इतरही अनेक पुरावे पाहून महामहोपाध्याय पां. वा. काणे हे भर्तृहरीचा काळ पाचवे शतक मानतात. शंकराचार्यांच्या ग्रंथात भर्तृहरीच्या स्फोटवादाचे खंडन केलेले आढळते. त्याचप्रमाणे वर सांगितल्याप्रमाणे

कुमारिलभट्टांच्याही लोकवार्तिकात स्फोटवादाचे खंडन आलेले आहे. यावरून कुमारिल आणि शंकराचार्य यांची कारकीर्द भर्तृहरीनंतरची आहे, असे मानावे लागते. कुमारिलभट्टांनी भर्तृहरीच्या स्फोटवादाचे खंडन श्लोकवार्तिकात केले; तसेच तंत्रवार्तिकात (१:३:३०) भर्तृहरीच्या वाक्यपदीयातील (२.१२१) श्लोक उद्धृत केला आहे. कुमारिलभट्टांच्या श्लोकवार्तिकातील 'कर्मानेच मोक्ष मिळतो, आत्मज्ञानाने नव्हे' हा सिद्धांत मांडलेला श्लोक सुरेश्वराचार्यांनी तैत्तिरीयभाष्यवार्तिकात उद्धृत करून हा सिद्धांत लगेच विस्ताराने खंडित केला आहे. 'मीमांसकमन्य' (स्वत:ला मीमांसक मानणारा) या विशेषणाने सुरेश्वराचार्यांनी कुमारिलभट्टांचा किंचित अधिक्षेप केला आहे. सुरेश्वराचार्यांना कुमारिलभट्टांचे ग्रंथ माहीत होते, हे दर्शित करण्याकरिता या गोष्टीचा उल्लेख येथे केला. कुमारिलभट्ट धर्मकीर्तीच्या विचारांचा परामर्श आपल्या लोकवार्तिकात विस्ताराने करतात. धर्मकीर्ती आणि कुमारिलभट्ट यांचे जवळचे नाते होते असाही निर्देश काहीजण करतात. तिबेटी बौद्ध इतिहासामध्ये असाही निर्देश आढळतो की, धर्मकीर्ती कुमारिलभट्टांपाशी वैदिक परंपरेचा अभ्यास करण्याकरिता राहिले होते. धर्मकीर्तींनी वादविवादामध्ये स्वत:चे गुरु कुमारिल यांना पराभूत करून बौद्ध धर्म स्वीकारावयास लावला, असे तिबेटी बौद्ध इतिहासात म्हटले आहे. शंकराचार्यांच्या ग्रंथांमध्ये कुमारिलभट्टांचा कुठेही उल्लेख नाही किंवा त्यांच्या ग्रंथातील उताराही कोठे घेतलेला दिसत नाही; परंतु त्यांची मते मात्र खोडलेली दिसतात (ब्रह्मसूत्रभाष्य 4|3|14). आणि सुरेश्वराचार्यांच्या ग्रंथात उद्धरणे आल्यामुळे कुमारिलभट्ट आणि शंकराचार्य यांच्या संवादाचा चरित्र ग्रंथांमधील निर्देश वस्तुस्थितीला धरून आहे असेही अनुमान करता येते.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा योगायोग असा, की बौद्धांचे सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ व ग्रंथकार धर्मकीर्ती, पूर्वमीमांसेचे दोन सर्वश्रेष्ठ ग्रंथकार कुमारिलभट्ट व प्रभाकरगुरु, प्रस्थानत्रयीच्या म्हणजे वेदान्ताच्या आज उपलब्ध असलेल्या भाष्यग्रंथांचे प्रथम प्रणेते शंकराचार्य आणि त्यांचे तितक्याच योग्यतेचे शिष्य सुरेश्वराचार्य एकाच शतकात म्हणजे ७ व्या - ८ व्या शतकाच्या कालावधीत दक्षिणेत होऊन गेले. शंकरपूर्व विवर्तवादी अद्वैत वेदांताचे पुरस्कर्ते आचार्य मंडनमिश्रही याच कालखंडातले होत. हे सगळे महाविद्वान विजिगीषु होते. भारत हे तत्त्वज्ञानांचे आणि धर्मांचे मुक्त क्षेत्र आहे. केवळ वैचारिक संघर्षानेच आपल्या मताची स्थापना करायची, भौतिक बलप्रयोगाने नाही; केवळ विचारांच्या बळावरच प्रतिपक्षावर विजय मिळवायचा, हे भारतीय संस्कृतीचे रहस्य आहे आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे आद्य शंकराचार्यांचे चरित्र होय.

शंकराचार्यांची विजयगाथा गाणारी सुमारे पंचवीस पुस्तके आज संस्कृतमध्ये उपलब्ध आहेत. त्यातील अनेक चरित्रांच्या नामनिर्देशांमध्ये शंकरविजय किंवा शंकरदिग्विजय ही शब्दावली ग्रंथित केलेली आढळते. राज्यसंस्थापक किंवा अनेक राज्ये जिंकून आपली सार्वभौम सत्ता निर्माण करणाऱ्या एखाद्या विजयी राजाची वा सम्राटाची विजयकथा यात

असावी, असा भास या अभिधानांवरून होतो. परंतु हिंदू धर्माची पुन्हा उज्ज्वल स्वरूपात स्थापना करणाऱ्या प्रज्ञाशाली पंडिताच्या अत्यंत अल्प कालावधीत घडलेल्या जीवनाची कथा या चरित्रग्रंथांमध्ये सांगितली आहे.

शेकडो धर्मग्रंथ आणि देवदेवतांच्या उपासना विस्कळीत स्वरूपात हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या भूप्रदेशात कित्येक सहस्र वर्षे चालू होत्या वा आजही चालू आहेत. यांच्यातील काही साम्य आणि विसंगती नष्ट करून एका समान तात्त्विक अधिष्ठानावर विरोध नष्ट करून व्यापक, शांत, धार्मिक, पवित्र जीवन या सर्व उपास्य देवतांच्या परिसरात निर्माण करणे हे या श्रेष्ठ तत्त्वज्ञ साधूचे अवतारकार्य होते. म्हणून त्यांना षण्मतस्थापनाचार्य म्हणून बिरुद लावले जाते. गाणपत्य, सौर्य, शैव, वैष्णव, शाक्त आणि भैरवीय अशी ही सहा मते त्यांनी अद्वैत सिद्धांताच्या भूमिकेमध्ये आणून सोडली. सहा मते म्हणजे सहाच मते नव्हेत, एकाच तत्त्वाची भिन्न भिन्न उपाधींच्या योगाने, उपासकाला किंवा भक्ताला भिन्न भिन्न रूपे दिसतात आणि भक्त व उपासक तद्रूप बनतो. त्या सर्वांचा अविरोध आचार्यांनी सिद्ध केला. म्हणून यजुर्वेदाच्या शतपथ ब्राह्मणामध्ये म्हटले आहे की, ''तं यथा यथा उपासते, तथैव भवति'', ''त्याची ज्या ज्या प्रकाराने उपासना करतो तसाच बनतो'' या भिन्न भिन्न मतांना वेदांताचे म्हणजे उपनिषदांचे प्रामाण्य वादविवाद करून आचार्यांनी स्वीकारावयास लावले. हा मूळ सिद्धांत शारीरकभाष्यात असा मांडला आहे - ''उपनिषदांमध्ये ब्रह्मतत्त्व ज्ञेय व उपास्य अशा द्विविध स्वरूपात मांडले आहे. ज्ञेयाच्या ज्ञानानेच मोक्षप्राप्ती होते. उपास्यरूपे अगणित, त्या उपासनांची फले वा उद्दिष्टेही अगणित आहेत.'' ब्रह्मतत्त्व शुद्ध निरुपाधिक स्वरूपात आणि सगुण सोपाधिक स्वरूपात मांडले आहे. शुद्ध निरुपाधिक म्हणजे पूर्ण अंतिम सत्य होय. ते केवळ एकच आहे. त्याच्याशिवाय दुसरे काहीही सत्य नाही. म्हणजे तेच एक परमार्थसत्य म्हणून ज्ञेय होय. बाकीची सगुण व सोपाधिक रूपे ही व्यावहारिक सत्ये उपास्य होत. ती उपास्ये विविध व अगणित आहेत. म्हणून धार्मिक पंथभेद निर्माण होतात. परमार्थ सत्य एकच म्हणून बाकी जे भासते, ते मायामय म्हणून मिथ्या व अर्थात असत्य असते. जीवनव्यवहार हा जोपर्यंत चालू असतो तोपर्यंत हे मिथ्या भ्रमात्मक विश्वदर्शन अपरिहार्यपणे चालू असते.

शंकराचार्यांची जी वीस-पंचवीस चरित्रे आज उपलब्ध आहेत, त्यातील सर्वात जुने उपलब्ध चरित्र व्यासाचलीय शंकरविजय होय. तो ग्रंथ कांचीकामकोटी पीठाच्या गादीवरील पंधराव्या-सोळाव्या शतकाच्या सुमारास (इ.स. १४९८-१५०७) झालेल्या महादेवेन्द्रसरस्वती या आचार्यांनी लिहिला आहे. त्यापूर्वी जे शंकरविजयनामक चरित्रग्रंथ झाले ते उपलब्ध नाहीत. त्यांच्यातील उद्धरणे अलीकडच्या म्हणजे सतराव्या शतकानंतरच्या ग्रंथांमध्ये उपलब्ध होतात. आज सर्वमान्य म्हणून पुणे येथील आनंदाश्रम संस्कृत ग्रंथमालेतील 'विद्यारण्यप्रणीतं संक्षेप शंकरविजय' हा ग्रंथ कुणीतरी माधवनामक कवीने लिहिला आहे.

त्यामुळे माधव म्हणजे विद्यारण्य अशा तऱ्हेची कल्पना करून संपादकाने छापून घेतला. हा ग्रंथकार स्वत:ला अभिनव कालिदास म्हणून निर्दिष्ट करतो; परंतु हा माधव विद्यारण्य नव्हे. विद्यारण्य चौदाव्या शतकात झाले. उलट हा ग्रंथ व्यासाचलीय शंकरविजयानंतर झाला आहे, म्हणजे १६ व्या शतकात वा त्यानंतर झाला आहे. कारण व्यासाचलांचा अनेकदा उल्लेख हा ग्रंथकार आपल्या ग्रंथात करतो. एवढेच नव्हे, व्यासाचलीय शंकरविजयातील चारशे पंचाहत्तर श्लोक जसेच्या तसे आपल्या ग्रंथात उचलतो. या माधवीय शंकरविजयात एकंदर १८४३ श्लोक आहेत. त्यापैकी ११०० पेक्षा अधिक श्लोक इतर शंकराचार्य चरित्रांमधून उचललेले आढळतात. जवळजवळ सगळाच ग्रंथ इकडून तिकडून गोळा केलेल्या उद्धरणांनी बनवलेला आहे. तो विद्यारण्यांचा कसा असू शकेल?

दुसरे असे की, या ग्रंथात चरित्रविषय व्यक्तीचे माहात्म्य वाढविण्याकरिता वास्तव घटनांमध्ये असंभाव्य, अद्भुत, कल्पित घटना मिसळून टाकल्या आहेत. एका पाठीमागून एक असे कल्पित कथांचे ढीग रचले आहेत. पौराणिक कल्पित कथा आणि वास्तव घटना यांची गल्लत करण्याची आधुनिक कालापूर्वीच्या कालखंडातील इतिहास लेखकांची आणि चरित्र लेखकांची प्रथाच होती. वस्तुनिष्ठा हे इतिहासमूल्य त्यावेळी मान्यता पावलेच नव्हते. वाण, दंडी, मयूर, खंडन-खंडखाद्यकार कवी श्रीहर्ष, भट्टभास्कर, उदयनाचार्य असे अनेक शंकराचार्यांच्या पूर्वकाळी झालेले आणि शंकराचार्योत्तरकाली, म्हणजे पाचशे वर्षांच्या कालावधीत झालेले कवी व पंडित यांच्याशी शंकराचार्यांचा वाद होऊन त्यात शंकराचार्य विजयी झाल्याचे हा लेखक वर्णन करतो. आज भारतीय हिंदी, मराठी, बंगाली इत्यादी प्रचलित साहित्यिक भाषांमध्ये आणि इंग्लिशमध्ये जी चरित्रे झाली आहेत, त्यांचा मुख्य आधार हा माधवीय संक्षेप शंकरविजय होय. त्याच्यावर केवळ अवलंबून न राहता, आज उपलब्ध असलेल्या चरित्रग्रंथांतून आणि शंकराचार्यांच्या स्वयंप्रणीत ग्रंथांमधून जी वर्णने आली आहेत त्यांची वास्तव कोणते आणि अवास्तव कोणते याची छाननी करून शंकराचार्यांचे चरित्र नव्याने बांधावयास पाहिजे. अलीकडे गेल्या शतकात अनेक बाबतीत अनेक मुद्यांवर आधुनिक विद्वानांनी चरित्रविषयक संशोधन केले आहे. शंकराचार्यांचा जीवनकालही निश्चित होत आला आहे. आठव्या शतकाचा प्रारंभ धरला, की अनेक बाबींचा उलगडा नीट रीतीने होतो.

शंकराचार्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाची तीन कार्ये सांगता येतात : एक प्रस्थानत्रयीवर भाष्य, दोन बुद्धकालापासून चालत आलेल्या वैचारिक संघर्षाच्या परंपरेला उज्ज्वल स्वरूप देण्याकरिता आस्तिक-नास्तिक तत्त्वदर्शनांचा परामर्श घेऊन धार्मिक समन्वयाची आणि अविरोधाची केलेली स्थापना आणि तीन - भारताच्या सर्व दिशांना केलेली मठांची स्थापना. हे सर्व कार्य अवघ्या बत्तीस वर्षांचे. त्यांचा जन्म आणि बाल्यकाल केरळ प्रदेशात कालटी येथे गेला. त्यांनी अध्ययन कोठे केले याचा निर्देश कोणत्याही

चरित्रग्रंथात नाही; परंतु तामिळनाडूमधले कांचीपूर हे अनेक शतके भरभराटीस आलेले, वाराणशीसारखेच दक्षिणेतील संपन्न तीर्थक्षेत्र होते. त्या ठिकाणी बौद्ध, जैन, शैव, वैष्णव इत्यादी संप्रदायांची केंद्रे होती. आचार्यांची कुमारावस्थेतील संन्यासदीक्षा कांची येथेच झाली असावी. याला सबळ अनुमानिक पुरावा मिळतो. तेथील अनेक भव्य मंदिरांमध्ये शंकराचार्यांच्या कोरलेल्या प्रथम तारुण्यातील संन्यासदीक्षा घेतलेल्या, दंडधारी यतीच्या स्वरूपातल्या मूर्ती प्राचीन काली स्थापन झालेल्या आजही आढळतात. नर्मदातीरी गोविंदयतींपासून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली, असे अनेक चरित्रकार सांगतात; परंतु हा दंडधारी कुमार यती इतरत्र कोठेही आढळत नाही. हिमालयातील बद्रीनारायणाचे मंदिर आचार्यांनी स्थापले, असे सांगतात; परंतु तेथेही या यतीचे चित्र मिळत नाही. अनेक चरित्रकारांच्या वर्णनावरून असे निश्चित करता येते की, कांचीकामकोटी मठाची स्थापना केल्यावर आचार्यांनी या भौतिक देहाचे विसर्जनही कांची येथेच केले. हे करण्याच्या अगोदर त्यांनी शारदेच्या कांची येथील सर्वज्ञ पीठावर आरोहण केले. काश्मीर येथील सर्वज्ञ पीठ की कांची येथील सर्वज्ञ पीठ, हा हल्ली चरित्रशोधकांच्या वादाचा विषय आहे. पण कांचीचाही संदर्भ अमान्य करणे कठीण आहे. काश्मीर येथे ८ व्या शतकापासून अद्वैतवादी शैव प्रत्यभिज्ञादर्शनाचे अनेक आचार्य झाले म्हणत काश्मीरचा संदर्भ पूर्ण अमान्य करता येत नाही; परंतु काश्मीरची आचार्यपीठाची परंपरा खंडित आहे, तशी कांची येथील पीठपरंपरा खंडित नाही. शंकराचार्यांनी शृंगेरी येथे मठाची स्थापना करून त्यावर सुरेश्वराचार्यांची स्थापना केली, असेही म्हणतात. दीडशे वर्षांपूर्वी कांची मठ विरुद्ध शृंगेरी मठ असा विशिष्ट हक्कांबद्दलचा वाद त्या वेळच्या इंग्रजी न्यायालयात गेला व शृंगेरी पीठाचे मुद्दे अमान्य झाले आणि कांचीकामकोटी पीठच विजयी झाले.

दक्षिणेत वेदवेदान्ताचे अध्ययन पूर्ण झाल्यावर गुरु गोविंदांकडे योगाभ्यासार्थ नर्मदातीरी राहिले. गुरु गोविंदांचे कसलेही अध्यात्मविद्येचे साहित्य आज उपलब्ध नाही. परंतु माधवाचार्यांच्या ‘सर्व दर्शनसंग्रहा’मध्ये गोविंदभगवत्पादाचार्य यांच्या रसेश्वरदर्शनातील एक श्लोक उद्धृत केला आहे, त्यावरून अनुमान करता येते, की हे मर्त्य शरीर अमर करण्याचा उपाय गोविंदभगवत्पादांनी आपल्या ग्रंथात मांडला. ते अजरामर झाले व त्यांच्याप्रमाणेच त्यांच्या पूर्वी झालेले अनेक सिद्ध पुरुष जीवनमुक्त आणि या भौतिक शरीराने अजरामर होऊन या जगात हिंडत आहेत, असा एक उल्लेख तेथे आला आहे. गोविंदभगवत्पादांच्या आदेशानुसाराने आचार्य प्रस्थानत्रयीवर विशेषत: ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहिण्यासाठी वाराणसीला गेले. तेथे त्यांना अनेक शिष्यगण मिळाले. अनेक सुंदर स्तोत्रेही त्यांनी तेथे रचली. तार्किक विलेषणात त्यांची बुद्धी प्रखर होती हे प्रस्थानत्रयीवरून सिद्ध होते. भक्तिरसात्मक उत्कष्ट शैलीत त्यांनी स्तोत्रसाहित्य तयार केले, त्यावरून त्यांची प्रतिभाही लालित्यपूर्ण साहित्यरचनेला प्रेरणा देणारी होती, हे या स्तोत्रसाहित्यावरून लक्षात भरते.

त्यांनी ब्रह्मसूत्रभाष्याच्या प्रस्तावनेत अध्यासभाष्यात मायावादाचा सिद्धांत थोडक्यात मांडला आहे. उपनिषदातील ब्रह्मरूप परमात्म तत्त्वज्ञानाशी बौद्ध परंपरेतील मायावादाचा समन्वय सुव्यवस्थित तार्किक रीतीने शंकराचार्यांनी केला. 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' या प्रथम सूत्राचे स्पष्टीकरण करत असताना त्यांनी पूर्वमीमांसेचा आणि पर्यायाने वैदिक धर्मकांडाचा उत्तरमीमांसेशी म्हणजे पर्यायाने ज्ञानकांडाशी काही संबंध नाही, हे दाखवून दिले. म्हणजे वैदिक यज्ञसंस्थेचा अद्वैत ब्रह्मविद्येशी पूर्वाचार्यांनी मान्य केलेला संबंध तोडून टाकला. तो का तोडला याचा उलगडा ब्रह्मसूत्रातील (१।३।३४-३८) अपशूद्रादिकरणावरून नीट होतो. शूद्रांना म्हणजे अवैदिकांना अर्थात आर्येतरांना मोक्षाधिकार नाही, कारण ब्रह्मविद्येचा अधिकार नाही, असा सिद्धांत ब्रह्मसूत्रकार आचार्य बादरायण यांनी मांडला. तो मर्यादित अर्थानेच शंकराचार्यांनी स्वीकारला. शूद्रांना वेदपूर्वक मोक्षाधिकार नाही; परंतु जे अध्यात्मविद्येचे अथवा ब्रह्मविद्येचे वेदेतर साहित्य आहे, त्याच्या श्रवणाचा म्हणजे अध्ययनाचा अधिकार शूद्रांना असल्याने भगवद्गीतेसारख्या अध्यात्मविद्येच्या प्रबंधाने शूद्रांना मुक्तीचा अधिकार प्राप्त होऊ शकतो. या जन्मी वेदाचा अधिकार नसलेले किंवा वेदाध्ययन किंवा उपनयन न केलेले अनेक (विदुर, धर्मव्याध इ.) ऋषिमुनी, साधुसंत हे ब्रह्मविद्येचे गुरू म्हणून शूद्रांना उपलब्ध होतात. अशा रीतीने वैदिक यज्ञांचा अधिकार नाही तेही मुमुक्षू ब्रह्मजिज्ञासू बनून ब्रह्मविद्यासंपन्न आणि जीवनमुक्त होऊ शकतात, असा विचार शंकराचार्यांनी मांडून एक मोठे सामाजिक कार्य केले. या कार्याचे अधिक उत्कट प्रत्यंतर त्यांच्या स्तोत्रसाहित्यावरून मिळते. हे भक्तिसाहित्य आहे. शूद्रातिशूद्रांच्या उपास्य देवदेवतांची गंगा, नर्मदा, कृष्ण, विष्णू, शिव, अन्नपूर्णा, गणेश इत्यादिकांची ही भावभक्तिसमन्वित स्तोत्रे आहेत. तात्पर्य, सर्व हिंदूंच्या उपास्यांना तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान देऊन अध्यात्मविद्येच्या एका समान पातळीवर आणले. यास सुसंगत अशी त्यांच्या चरित्रात ते काशीवासाला असताना घडलेली घटना वर्णिलेली आहे. वाराणसीच्या तत्कालीन अत्यंत अरुंद बोळातून शिष्यसंघासह आचार्य चालले असताना एक भव्य आणि धिप्पाड देहाचा चांडाळ अनेक कुत्री घेऊन चालत समोर येऊ लागतो. तेव्हा आचार्य त्याला 'बाजूला सर आणि वाट दे' म्हणतात. तेव्हा तो चांडाळ म्हणतो, ''जा की माझ्या जवळून. ही कुत्री तुला काही करणार नाहीत. माझ्या लक्षात आले की, तुला माझ्या विटाळाची भीती वाटते. विटाळ कोणाला कशाचा होणार? देहाचा की आत्म्याचा? देहाचा जर म्हणशील, तर तुझा देह पंचभूतांचा बनलेला तसाच माझा! विटाळ असेल तर दोन्ही देहांमध्ये आहे. आत्म्याचा विटाळ कसा शक्य आहे? आत्मा म्हणजे शुद्ध चैतन्य. शुद्ध चैतन्यापासून दूर कसे होणार? ते सर्वत्र एकच आहे. तेथे द्वैत नाही.'' हे ऐकल्यावर आचार्यांची अंतर्दृष्टी एकदम उघडली आणि त्यांना त्या चांडाळाच्या ठिकाणी विश्वनाथाचे दर्शन झाले आणि आचार्यांनी त्याला साष्टांग प्रणिपात केला आणि म्हणाले, ''जी संवित् म्हणजे चैतन्यशक्ती जागृती, स्वप्न आणि निद्रा यामध्ये सारख्याच

उत्कट रूपाने व्यक्त होत असते, ती ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंतच्या देहांमध्ये भरून राहिलेली विश्वाची साक्षीभूत अशी आहे, तीच मी होय, दृश्य विश्व म्हणजे मी नाही, अशी प्रज्ञा ज्याची दृढ आहे, तो चांडाळ असो की द्विज असो, तो माझा गुरू व्हावा, अशी माझी मनीषा आहे. त्याचे चरण सुरेंद्रानेसुद्धा वंदावे अशी माझी मनीषा आहे.”

या मनीषेमुळेच भारतामध्ये शांकर, अद्वैत मायावादी सिद्धांताला अनुसरणारा नाथसंप्रदाय पसरला. नाथसंप्रदायाला जातिसंस्था कधीच मान्य झालेली नाही. दशनामे म्हणजे गिरी, पुरी इत्यादी सिद्धसाधुसंप्रदायांच्या दहा उपाधी पर्यायाने धारण करणाऱ्या शांकर मायावादाच्या पुरस्कर्त्या साधुसंतांचे मठ अजूनही भारतात आढळतात. नामदेव व ज्ञानदेवांपासून महाराष्ट्रात पसरलेल्या वारकरी संप्रदायाची पूर्वपीठिका ही मच्छिंद्रनाथ-गोरखनाथ यांच्यापर्यंत ज्ञानेश्वरांनीच ज्ञानेश्वरीच्या उपसंहारात पोचवली आहे. जात, वंश इत्यादी भेद येथे लागू पडत नाहीत. वेद, कृपण म्हणून ते त्रैवर्णिकांच्याच कानी लागले; परंतु वेद ज्याने झोपेत दिले, ज्याची उपासना वेद करतात त्याचा उपदेश म्हणजे गीता ती सर्वांकरिता आहे, ती भेदभाव करीत नाही असे ज्ञानेश्वरांनी म्हटले. शंकराचार्यांनी गीताभाष्यात देखील वैदिक यज्ञसंस्थेचा संबंध तोडून टाकला आहे.

शंकराचार्यांनी मायावादाचा अद्वैत ब्रह्मतत्त्वज्ञानाशी समन्वय सिद्ध करून वेदान्ताशी म्हणजे एका अर्थी वैदिक परंपरेशी अवैदिक बौद्ध धर्म जुळवून घेतला. ७ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्म सबंध भारतात पसरला, त्याचप्रमाणे भारताबाहेरील ईशान्य दिशेकडे आणि पूर्वेकडे अनेक राष्ट्रांमध्ये जाऊन स्थिरावला होता. या समन्वयामुळे वैदिक-अवैदिकांमध्ये सहानुभूतीचे संबंध निर्माण झाले. मूर्तिपूजक आणि मूर्तपूजक अशा अवैदिक धर्मसंस्था त्रैवर्णिक आणि शूद्रातिशूद्र यांच्यामध्ये दीर्घकालपर्यंत दृढमूल झाल्या होत्या. आचार्यांनी स्तोत्र साहित्याच्या द्वारा या पौराणिक धर्मसंस्थांना आत्मसात करून घेतले. एवढेच नव्हे, आगम आणि तंत्र यांच्या आधारे चाललेल्या मूर्तिपूजकांना स्वत:च्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा संपर्क देऊन त्यांच्यात सुसंगती स्थापन केली.

त्यांच्या गुरुंचे म्हणजे गोविंदभगत्पादांचे गुरु गौडपादाचार्य होत. मायावादी अद्वैत वेदान्ताची सुस्पष्ट मांडणी गौडपादाचार्यांनी आपल्या मांडुक्य उपनिषदांवरील चार अध्यायांच्या कारिकाग्रंथामध्ये केली. गौडपादाचार्यांचा ब्रह्मसूत्रभाष्यात वेदान्तार्थसंप्रदाय वित्‌आचार्य असा आदरपूर्वक निर्देश शंकराचार्यांनी करून मांडुक्य कारिकाग्रंथातील दोन कारिका उद्धृत केलेल्या आहेत. मांडुक्यकारिका ग्रंथावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा खोल परिणाम दिसतो, असे आधुनिक बौद्ध तत्त्वज्ञानाच्या पंडितांनी, विशेषत: विधुशेखर भट्टाचार्यांनी सविस्तरपणे सिद्ध केले आहे. बुद्धाचाही आदरयुक्त निर्देश अनेक वेळा या कारिकाग्रंथामध्ये आलेला आहे. त्यामुळे शंकराचार्यांना विशिष्टाद्वैतवाद्यांनी किंवा द्वैतवाद्यांनी प्रच्छन्न बौद्ध म्हणून कमीपणा देण्याचा जो प्रयत्न केला, त्याची आवश्यकता नव्हती. कारण

बौद्ध तत्त्वज्ञानाशी आपली विचारसरणी महत्त्वाच्या मुद्यावर मिळतीजुळती आहे ही गोष्ट शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यात आणि मांडुक्यकारिकांच्या भाष्यात स्पष्टपणे स्वत:च मान्य केली आहे.

गौडपादाचार्यांच्या मांडुक्यकारिकांवर शंकराचार्यांचे भाष्य आहे. ते आद्य शंकराचार्यांचे आहे की नाही याबद्दल काही आधुनिक विद्वानांना शंका आहे; परंतु ब्रह्मसूत्रभाष्यातच (१।४।१४; २।१।९) दोन महत्त्वाच्या कारिका प्रमाणभूत म्हणून उद्धृत केल्यामुळे कारिकाग्रंथातील वेदान्त शंकराचार्यांना संपूर्ण मान्य आहे, हे अर्थात सिद्ध होते. उद्धृत करताना 'वेदान्तार्थसंप्रदाय विद्भि: आचार्ये,' वेदान्ताचा संप्रदायमान्य अर्थ जाणणारे आचार्य, असा भाव व्यक्त केला आहे. गौडपादाचार्यांच्या मते अद्वैत वेदान्त हा कोणत्याही द्वैती तत्त्वज्ञानाशी विरोध करीत नाही. ते म्हणतात - ''आपापल्या सिद्धांताच्या तर्कशुद्धतेबद्दल द्वैती तत्त्ववेत्ते ठोस मताचे आहेत. ते परस्परांशी प्रखर विरोध करतात; परंतु हा अद्वैत वेदान्त त्यांच्याशी विरोधी नाही. कारण अद्वैत हा परमार्थ आणि द्वैत त्याचाच प्रकार आहे. शंकराचार्यांनी परस्परविरोधी असलेले द्वैती कोण याचा भाष्यामध्ये उलगडा केला आहे. कपिल, कणाद, बुद्ध आणि अर्हत (जैन तीर्थंकर) हे ते होत. त्यांच्याशी आमचा हा वैदिक सिद्धांत एकरूप असल्यामुळे याचे एकात्मत्वदर्शन विरोधी जाऊ शकत नाही. ज्याप्रमाणे आपल्या हातापायाशी आपला विरोध नसतो त्याप्रमाणे हा अविरोध आहे. तर्कशास्त्रदृष्ट्या हा द्वैत आणि अद्वैत यांचा अविरोध सिद्ध होवो वा न होवो, या अविरोधी भावनेमुळे आस्तिक-नास्तिक दर्शने अद्वैत वेदान्ताबरोबरच येथील अध्ययन-अध्यापनात मान्यता पावली, स्वीकार्य ठरली. एवढेच नव्हे तर या सर्व दर्शनांचे नीट आकलन न झाल्यास त्या त्या दर्शनाचे मोठे आधारभूत ग्रंथ समग्र रूपात आकलन करता येत नाहीत. येथील तत्त्वदर्शन एकमेकांच्या विरोधातच वाढत गेली आहेत. तर्कशुद्ध पद्धतीनेच विरोध करायचा असा दृढ दृष्टिकोन भारतीय बौद्धिक संस्कृतीमध्ये स्वीकारला गेला आहे आणि त्याचे उत्कृष्ट, नमुनेदार स्वरूप शंकराचार्यांच्या भाष्यग्रंथात आणि प्रकरणग्रंथात पाहावयास मिळते.

**(पूर्वप्रसिद्धी : 'दक्षिणेतील दोन आचार्य' विदर्भ साहित्य संघ, नागपूर, १९८७, पृ. १ ते २१)**

OOO

१२

# रामानुजाचार्य

*(विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या विद्यमाने आयोजित कै. शिवदास कृष्ण बारलिंगे स्मृती व्याख्यानमालेन्तर्गत दि. १२ ऑगस्ट १९८७ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी गुंफलेले व्याख्यान पुष्प यथामूल मसुदा.)*

आद्य शंकराचार्यांनंतर दक्षिणेत तीनशे वर्षांनी अकराव्या शतकात रामानुजाचार्य जन्मले. त्यांनी त्यांच्या अगोदर सुमारे दीड हजार वर्षे प्रचलित असलेल्या वैष्णव संप्रदायाला 'ब्रह्मसूत्रा'वर भाष्य लिहून वेदान्ताचा आधार दिला आणि भक्तिमार्गाला ज्ञान व कर्म यांच्यापेक्षा अधिक माहात्म्य प्राप्त करून दिले. कर्म व ज्ञान यांनी चित्त शुद्ध होते आणि भक्तियोगानेच मोक्षाधिकार प्राप्त होतो, असा शंकराचार्यांपेक्षा काहीसा वेगळा सिद्धांत त्यांनी स्थापन केला. दक्षिणेत तामिळनाडूमध्ये रामानुजाचार्यांच्या अगोदरपासून सु. ६०० वर्षे आळवार नावाच्या वैष्णव साधुसंतांचा संप्रदाय सुरू होता. त्यांचे तमिळ भाषेमधील उच्च धार्मिक आशयाचे 'प्रबंध' होते. त्या प्रबंधांना वेदांच्या इतकेच प्रामाण्य होते; म्हणून त्यांना 'द्राविड वेद' अशी पदवी प्राप्त झाली होती. या आळवारांच्या संतमालिकेत नम्माळवार किंवा शठकोपमुनी यांना सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. त्यांच्या प्रबंधाचा 'तिरुवायमोळि' वा 'दिव्य प्रबंधम्' असा निर्देश होतो. महाराष्ट्रात गेल्या सातशे वर्षांत ज्ञानदेव-नामदेव, एकनाथ-तुकाराम ही जशी संतमालिका प्रसिद्ध आहे, तशीच रामानुजाचार्यांच्या अगोदर सु. ६०० वर्षांमध्ये दक्षिणेत अनेक संतकवींची मालिका निर्माण झाली. आचार्यही अनेक झाले. नाथमुनी (नववे-दहावे, शतक), यामुनमुनी (सु. ९१८-सु. १०३८) आणि त्यानंतर रामानुजाचार्य आणि वेदान्तदेशिक वा वेंकटनाथ (सु. १२६९-सु. १३७१) झाले. यामुनमुनींचे 'सिद्धित्रय', 'आगमप्रामाण्य', 'गीतार्थसंग्रह', 'महापुरुषनिर्णय', 'चतु:श्लोकी' आणि 'स्तोत्ररत्न' हे संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. शांकर वेदान्तामध्ये गौडपादाचार्यांना जे स्थान

आहे, तेच स्थान वैष्णव संप्रदायात यामुनमुनींना आहे. रामानुजांना भाष्यकार म्हणून आणि वैष्णव संप्रदायाचे श्रेष्ठ तत्त्वज्ञ म्हणून स्थान प्राप्त झाले. त्यांच्या पाठीमागे यामुनमुनींची प्रेरणा होती.

आळवार संतांच्या परंपरेमध्ये शूद्रातिशूद्रांचाही अंतर्भाव झालेला दिसतो. मुक्ताबाईसारख्या महिला संतही या आळवारांच्या मालिकेत चमकून गेल्या आहेत. गोदा किंवा आडाळ हिच्या १७३ कविता तमिळ भाषेमध्ये अप्रतिम म्हणून गणल्या जातात. तिने मनाने देवालाच वरले होते.

तिरुप्पाण आळवार हा पंचमजातीत म्हणजे दलितात जन्मलेला चोखामेळ्यासारखा संत होता. हा सतत वीणाधारी आणि भजनात निरंतर दंग असलेला संत होता. तिरुप्पाण आळवाराची एक मोठी सूचक गोष्ट सांगण्यात येते, ती अशी : श्रीरंगम् येथे तिरुप्पाण आळवार कावेरी नदीच्या घाटावर बसून वीणेवर भक्तांच्या कविता गात बसे. एकदा तो श्रीरंगनाथ स्वामींच्या मंदिरासमोर द्वारमार्गावर वीणेच्या तारा छेडीत भजनात दंग झाला होता. येणाऱ्या-जाणाऱ्यांचे भान राहिले नाही. तेव्हा मंदिराचा लोकसारंगमुनी हा पुजारी मंदिराकडे जाऊ लागला असताना मंदिराच्या दरवाजात बेभान होऊन गाणाऱ्या तिरुप्पाण आळवाराला बाजूला होण्यास त्याने सांगितले; कारण तो अस्पृश्य असावा असे लक्षात आले. तो भजनात दंग असल्याने त्याला हे ऐकू आले नाही. लोकसारंगमुनीने त्याला दगड हाणला आणि जोराची शिवीगाळ केली. तो बिचारा काही न बोलता अधिक मार बसू नये म्हणून भिऊन पळाला. हे घडत असताना मंदिराचे दरवाजे आपोआप बंद झाले. ही वेळ देवपूजेची होती. यावेळी दरवाजे सताड उघडे राहावयाचे. लोकसारंगमुनीने दरवाजे जोरात हलवले. आतून कोणी बंद केले असतील म्हणून बाहेरून हाका मारल्या. आतून उत्तर आले नाही आणि दरवाजेही उघडले गेले नाहीत. लोक जमले. सर्वांनी प्रयत्न केला. दरवाजे उघडेनात. आतून आकाशवाणी ऐकू आली. ''मी रंगनाथ स्वामी; मला दगड मारला, शिवी दिली. म्हणून मी दरवाजा बंद केला आहे. कावेरीच्या घाटावर एक महापुरुष माझ्या नामस्मरणात तल्लीन झाला आहे. त्याला खांद्यावर घ्या, मंदिराची प्रदक्षिणा करा, तर हे दरवाजे उघडतील, नाहीतर दरवाजे उघडणे शक्य नाही.'' लोकसारंगमुनी घाटावर धावत गेला आणि तिरुप्पाण आळवाराला खांद्यावर बसण्याची विनंती त्याने केली. त्याने उत्तर दिले - ''मी अस्पृश्य, अतिशूद्र आहे. मी त्या द्वारमार्गावर भजन करीत बसलो, हा माझा अपराध आहे. मी तुमच्या देहाला दूषित करू इच्छित नाही.'' तिरुप्पाण आळवाराचे हे बोलणे न मानता क्षमा मागून लोकसारंगमुनीने तिरुप्पाण आळवाराला खांद्यावर घेतले, प्रदक्षिणा केली. रंगनाथस्वामीचे दरवाजे आपोआप उघडले गेले. तेव्हापासून तिरुप्पाण आळवाराला 'मुनिवाहन' अशी पदवी प्राप्त झाली.

आळवार संत महाराष्ट्रातील वारकरी संतांप्रमाणेच वरपासून खालपर्यंतच्या सगळ्या जातिजमातींमध्ये जन्मून प्रसिद्धीस आले. त्यांच्यात संतकवी आणि संतपंडित वा आचार्य

निर्माण झाले. यामुनाचार्य आळवार संतांच्या मालिकेतीलच संतपंडित होत. यामुनाचार्यांचे शिष्य महापूर्ण (नम्बी) यांच्या दोन बहिणी कांतिमती व द्युतिमती. वडीलबहीण कांतिमती ही रामानुजांची माता होय आणि आसुरी केशवाचार्य हे पिता होत. मद्रास शहरापासून सु. ४५ कि.मी. अंतरावर नैर्ऋत्य दिशेस श्रीपेरूंबुदूर (भूतपुरी) या छोट्या गावात रामानुजांचा जन्म झाला. महापूर्णाच्या धाकट्या बहिणीने-द्युतिमतीने-कमलनयनभट्ट यांच्याशी विवाह केला. तिला गोविंद नावाचा मुलगा झाला.

रामानुजांच्या जन्मापूर्वीची हकीकत अशी : आसुरी केशवाचार्यांना दीर्घकालपर्यंत संतती झाली नाही. त्यांनी अनेक यज्ञ केले; याचे निदर्शक म्हणून त्यांना 'सर्वक्रतु' अशी पदवी प्राप्त झाली. सागरतीरावर वृंदारण्यात श्रीपार्थसारथी म्हणजे श्रीकृष्ण याची आराधना करण्याकरिता त्यांनी अनेक यज्ञ केले. या स्थानाला हल्ली ट्रिप्लिकेन म्हणतात. त्यांना स्वप्नात पार्थसारथी श्रीकृष्णाचे दर्शन झाले. 'तुझी पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण होईल', असे आश्वासन पार्थसारथीने त्यांना दिले.

चैत्र शुद्ध पंचमी शके ९३९ ला रामानुजांचा जन्म झाला. त्याच सुमारास द्युतिमतीलाही पुत्र झाला. महापूर्ण किंवा शैलपूर्ण हे संन्यासी झाले होते; परंतु त्यांनी जवळ जाऊन आपल्या बहिणीच्या पुत्राचे अवलोकन केले. लहान बालक रामानुज याच्या शरीरावरील दिव्य चिन्हे पाहून वैष्णव पंथाचा पुरस्कर्ता महापुरुष जन्मला हे त्यांच्या लक्षात आले. असा महापुरुष जन्मेल असे नम्माळवार शठकोपमुनी यांनी भविष्य वर्तविले होते, ते त्यांना आठवले.

रामानुजांचे उपनयन झाल्यावर शिक्षण सुरू झाले. त्यांचे वडील वेदशास्त्रसंपन्न होते. तरी रामानुजांचे शिक्षण दुसऱ्या एका विद्वान गृहस्थाकडे झाले. कांचीपुरीमध्ये कांचीपूर्णनामक वैष्णव संत राहत होते. पुनुमुलाई या जवळच्या गावातील लक्ष्मीनारायणाचे दर्शन घेण्याची त्यांची परिपाठी होती. श्रीपेरूंबुदूर या गावातून त्या मंदिराकडे वाट होती. ती वाट रामानुजांच्या घरावरून जात होती. कांचीपूर्ण हे सिद्धपुरुष होते. विद्वान ब्राह्मणही त्यांना साधूपुरुष म्हणून वंदन करीत. एके दिवशी रामानुजांना पाठशाळेतून परत येत असताना कांचीपूर्णांचे दर्शन झाले. रामानुजांनी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु कांचीपूर्णांनी तो नमस्कार नाकारला आणि म्हटले, ''मी खालच्या जातीतला आहे. मी शूद्र आहे. तू ब्राह्मण आहेस, तू असा नमस्कार मला करू नकोस.'' रामानुज उत्तरले, ''मी हे दुर्दैव समजतो, की मला तुमच्या चरणाचा स्पर्श तुम्ही होऊ देत नाही. मी यज्ञोपवित धारण केले, म्हणून मी ब्राह्मण आहे हे खरे नाही. तिरुप्पाण आळवार अंत्यज होते; परंतु ब्राह्मणांनाही वंदनीय होते.'' त्या दिवसापासून कांचीपूर्ण आणि रामानुज यांचे चांगले सख्य झाले.

वयाच्या सोळाव्या वर्षी रामानुजांचे रक्षकांवळ या मुलीशी लग्न झाले. त्याच वर्षी त्यांचे वडील आसुरीकेशवाचार्य वारले. रामानुज सहकुटुंब कांचीपुरीला राहण्यास आले. कारण कांचीपूर्ण हे वैष्णव संत कांचीपुरीतच राहत होते. कांचीपुरीला तेथील सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ विद्वान

अद्वैतवादी यादवप्रकाश (अकरावे शतक) यांच्यापाशी रामानुजांच्या अध्ययनास सुरुवात झाली. यादवप्रकाश मायावादी नव्हते. त्यांच्या सिद्धांताला 'शुद्धाद्वैतवाद' अशी संज्ञा देता येते. या शुद्धाद्वैतवादाप्रमाणे परब्रह्माची नित्य परिवर्तन पावणारे आणि परिवर्तन न पावणारे अशी दोन रूपे; नित्य बदलणारे विश्व हे परब्रह्माचे एक स्वरूप आणि सच्चिदानंद केवलब्रह्म हे परिवर्तन न पावणारे दुसरे स्वरूप आहे. रामानुजांना यादवप्रकाशांचा हा शुद्धाद्वैतवाद मान्य झाला नाही; परंतु रामानुजांनी यादवप्रकाशांपाशी आपले अध्ययन सुरू ठेवले. गुरु-शिष्यांचे मतभेद होत. कित्येक वेळा ते मतभेद पराकाष्ठेचे असत. रामानुज आपली बाजू मांडत असताना गुरुंची मती कुंठित करीत. कांची येथील एका सरदाराच्या मुलीला भूतबाधा झाली होती. यादवप्रकाशांकडे आपल्या कन्येला घेऊन सरदार आले; परंतु यादवप्रकाशांचे मंत्रतंत्र विफल झाले. अत्यंत तेजस्वी शिष्य म्हणून रामानुजांची प्रसिद्धी झाली होती. त्यांच्याकडे कन्येला घेऊन ते सरदार आले. रामानुजांच्या चरणस्पर्शाबरोबर त्या कन्येची भुताटकी झटक्यासरशी उतरली.

यादवप्रकाशांनी एके दिवशी आपले पाय दाबण्याकरिता रामानुजांना बोलावून घेतले. रामानुज सेवा करीत असताना गुरुंशी शास्त्रचर्चाही करीत. 'छांदोग्य उपनिषदा'त - 'तस्य यथा कप्यासं पुण्डरीकमेवमक्षिणी' असे देवाच्या डोळयांचे वर्णन आले आहे. 'कपीच्या कमरेखालच्या भागाप्रमाणे असलेल्या कमळाप्रमाणे शोभणारे डोळे' असा अर्थ यादवप्रकाशांनी सांगितला. रामानुजांनी ही कमरेखालच्या भागाची उपमा देवाच्या डोळ्यांना शोभत नाही म्हणून निराळा अर्थ सांगितला. 'कपि' म्हणजे सूर्य; 'कप्यासं' म्हणजे सूर्याप्रमाणे विकसित आणि त्या विकसित कमळाप्रमाणे डोळे असा अर्थ केला. 'कपि' शब्दाचा 'क' म्हणजे जल, त्याचे पान करणारा म्हणजे सूर्य, असा अर्थ त्यांनी केला. यादवप्रकाशांना रामानुजांच्या विचारकुशलतेचा हेवा वाटला. असे पदोपदी मतभेद व्हायचे. 'तैत्तिरीय उपनिषदा'तील 'सत्यं, ज्ञानमनन्तं ब्रह्म' याचा सरळ अर्थ विशिष्टाद्वैत सिद्धांताशी जमणारा नाही. त्याचा सरळ अर्थ - 'सत्य, ज्ञान आणि अनंत ब्रह्म' यात 'ब्रह्मच ज्ञान आहे' हे विधान विशिष्टाद्वैताशी जुळत नाही. कारण ब्रह्माचा म्हणजे परमेश्वराचा ज्ञान हा गुण आहे, असे विशिष्टाद्वैतमताने म्हणावे लागते. यादवप्रकाशांच्या हे लक्षात आले, की हा आपला प्रखर बुद्धिमान विद्यार्थी अद्वैत वेदान्ताचे खंडन करणारा विजयी पंडित होणार आहे. हे मोठे संकटच आहे. म्हणून या जगातून त्याला कायम रजा द्यावी. प्रयागयात्रेला शिष्यगणांसह त्यांनी प्रस्थान मांडले. त्यात रामानुजाला आणि त्याचा मावसभाऊ गोविंद याला बरोबर घेतले. काही शिष्यांनी गुप्त खलबत करून प्रयागला त्रिवेणीच्या संगमात रामानुजांना जलसमाधी द्यावी, असे ठरविले; परंतु हे खलबत गुप्त राहिले नाही. ते गोविंदाला कळले. गोविंदाने अत्यंत प्रिय मित्र असलेल्या आपल्या मावसभावाला म्हणजे रामानुजांना हा कट सांगितला आणि कोणासही न कळू देता पळ काढ असे सांगितले. रामानुजांनी

पळ काढला. बऱ्याच वेळाने रामानुज दिसेनात म्हणून यादवप्रकाशांनी शोध सुरू केला. पत्ता लागला नाही. रामानुज आडवाटेने जंगलांमधून दक्षिणेकडे निघाले. फार हाल झाले. नशिबाने एका पारध्याचे कुटुंब जंगलात भेटले. त्या कुटुंबाने कांचीपुरीपर्यंत मार्गदर्शन करीत त्यांना सोबत केली. या संकटातून रामानुज उत्तीर्ण झाले. कांचीपुरीत कांचीपूर्ण या संतांना भेटले. कांचीपूर्णांनी सांगितले की, यादवप्रकाशांबद्दलचा राग मनातून काढून टाक. ही घटना सुचवते, की तुझ्यावर देवाची कृपा आहे. कालांतराने यादवप्रकाशही यात्रा संपवून सुखरूप परतले.

शिक्षण चालू असतानाच रामानुजांची एक प्रज्ञावंत, प्रतिभाशाली तत्त्वज्ञ म्हणून कांचीपुरीमध्ये ख्याती झाली. ही कीर्ती श्रीरंगम येथील वैष्णवभक्त यामुनाचार्यांच्यापर्यंत पोचली आणि त्यांना हेही कळले, की अद्वैतसिद्धांतापेक्षा द्वैतसिद्धांतच म्हणजे जीव आणि ईश्वर हे एक नव्हेत हा सिद्धांत, उपनिषदांद्वारे रामानुज सिद्ध करतात, त्यामुळे यादवप्रकाशांपासून त्यांना दूर व्हावे लागले. रामानुज हे विष्णुकथा आणि कीर्तन यांच्यामध्ये पूर्ण रममाण होतात. भजनरंगी रंगत असताना वैष्णव भक्ताचे भाव त्यांच्यात स्पष्ट दिसतात, गहिवरून येतात, रोमांचित होऊन अश्रुपात होतो, भोवतालच्या जगाचे भान नाहीसे होते व सर्व जग त्यांना विष्णुमय दिसते. ही सगळी हकीकत कांचीपूर्णांनी यामुनाचार्यांना निवेदन केली. आचार्य यामुनांनी यादवप्रकाशांच्या शिष्यांच्या मेळाव्यात रामानुजांना पाहिले होते. भेट घेतली नाही; पण दुरूनच आशीर्वाद देऊन ते श्रीरंगमला परतले.

यादवप्रकाशांशी उपनिषदांच्या अर्थासंबंधी पदोपदी मतभेद व्हायला लागल्यामुळे यादवप्रकाशांनी रामानुजांना आपली पाठशाळा बंद केली. तेव्हापासून कांची येथे हस्तिशैलावरील नारायणाच्या पूजेमध्ये ते रममाण झाले. तेथे नारायण मंदिरातच यामुनाचार्यांचे शिष्य - रामानुजांचे मामा - महापूर्ण यांच्या मुखातून यामुनांचे 'स्तोत्ररत्न' रामानुजांच्या श्रवणपथावर आले. वैष्णव संप्रदायाचे म्हणजे आळवारांचे भक्तियोग आणि प्रपत्ती यासंबंधीचे विचार सतत ऐकावयास मिळू लागले. म्हणून यामुनांचे दर्शन घेण्याकरता त्यांना उत्कंठा लागली. रामानुज महापूर्णाबरोबर श्रीरंगम येथे यामुनाचार्यांचे दर्शन घेण्याकरिता त्यांच्या निवासस्थानी गेले; परंतु त्यावेळी नेमकी यामुनाचार्यांची जीव ज्योती मालवली होती. अंत्येष्टी व्हावयाची होती. देहाचे दर्शन झाले. रामानुजांना देहाचे दर्शन घेत असताना उजव्या हाताची तीन अंगुले मिटलेली दिसली. त्याचा गूढार्थ उमगला. ती मिटलेली तीन बोटे तीन अपेक्षा सूचित करीत होती : (१) जनतेला आळवार संतांचा वैष्णव मार्ग शिकविण्याकरिता द्राविड वेद म्हणजे आळवारांचे 'दिव्य प्रबंधम्' शिकवायचे आणि प्रपत्तीचा सिद्धांत जनमनावर बिंबवायचा; (२) वैष्णव संप्रदायाप्रमाणे विशिष्टाद्वैतवादी भाष्य 'ब्रह्मसूत्रा'वर लिहावयाचे आणि (३) वैष्णव संप्रदायाच्या स्पष्टीकरणाचे अनेक 'प्रबंध' स्वत: व पराशरादी शिष्यांच्या द्वारे निर्माण करावयाचे. या तिन्ही अपेक्षा पूर्ण करीन असे

रामानुजांनी यामुनाचार्यांच्या शवापुढे जाहीर केल्याबरोबर मिटलेली तिन्ही बोटे सरळ झाली. रामानुज कांचीला परतले. तेथे यामुनांच्या कांचीपूर्ण या शिष्याच्या सहवासात काळ घालवू लागले. कांचीपूर्ण शूद्र होते. तरी त्यांच्यापाशी वैष्णव दीक्षेची रामानुजांनी मागणी केली. कांचीपूर्णांनी 'मी शूद्र आहे, मी ब्राह्मणाला दीक्षा देऊन त्याचा गुरु बनू शकत नाही' असे सांगितले. रामानुजांना हे केव्हाच पटले नाही. कांचीपूर्णांना ते गुरू मानून त्यांच्या संगतीत राहू लागले. नंतर श्रीरंगमला जाऊन तेथे वैष्णव संप्रदायाची दीक्षा महापूर्णापासून प्राप्त करून घेतली. या दीक्षाविधीचे पाच भाग म्हणजे पाच संस्कार आहेत. ताप, पुंड्र, नाम, मंत्र आणि याग हे ते पाच संस्कार होत. कपाळ आणि बाहू यांच्यावर तप्तमुद्रा, मस्तकावर आणि बाहूंवर चंदनाचा उभा लेप, नवे नामधारण, मंत्रग्रहण आणि याग म्हणजे हवन करावयाचे. पंचसंस्कार झाल्यावर महापूर्ण आणि रामानुज हे दोघेही सहकुटुंब एकत्र राहू लागले. रामानुजांची पत्नी सुंदर पण घमेंडखोर होती. ती महापूर्णांच्या पत्नीशी भांडायला लागली. कुणी दारात भिक्षुक आला, तर ती त्याचा कित्येक वेळा सत्कार न करता तिरस्कार करीत असे. ती सोवळंओवळं व जातिभेद कडक रीतीने पाळीत होती. रामानुजांना हे सर्व अमान्य होते. रामानुजांच्या लक्षात आले की या पत्नीबरोबर आदर्शरूपात गृहस्थाश्रम चालवता येणार नाही. म्हणून ऐन उमेदीतच सुमारे ३२ व्या वर्षी पत्नीला युक्तिप्रयुक्तीने त्यांनी माहेरी कायम पाठवले आणि संन्यास घेतला. यादवप्रकाशांच्या कानावर ही संन्यासाची वार्ता गेल्यावर तेच रामानुजांचे शिष्य बनले. पंचसंस्कारांमध्ये 'गोविंददास' असे अभिधाने यादवप्रकाशांना दीक्षेच्या वेळी रामानुजांनी दिले. गोष्टीपूर्णनामक एक वैष्णव संत होते. रामानुज त्यांच्याही चरणाशी बसून काही गूढ आध्यात्मिक सिद्धांत आणि मंत्र शिकले. 'नमो भगवते वासुदेवाय' इत्यादी मंत्र कोणाला ऐकू जाऊ नये, असा मंत्रोपदेश करणाऱ्या गुरुंचा निर्बंध होता. हा निर्बंध रामानुजांना पूर्ण अमान्य होता. ते मोठ्या मंदिरांच्या गच्चीवरून उच्च तारस्वरांनी मंत्रोच्चार करीत भजन करू लागले. त्या भजनात जातपात न मानता जनता सामील होऊ लागली. योगमार्गातील ही गुप्ततेची प्रथा रामानुजांनी मोडली. तेव्हापासून भक्तिसंप्रदायातील भजनांमध्ये उच्चस्वराने मंत्रजप होऊ लागला. शंकराचार्यांप्रमाणेच रामानुज अद्वैती पंडिताशी वादसभा करून विजय मिळवू लागले. यज्ञमूर्ती नावाच्या अद्वैती विद्वानाशी त्यांनी अनेक दिवस वाद करून त्याला विशिष्टाद्वैती वैष्णव संप्रदायाचा अंगीकार करावयास लावला.

'ब्रह्मसूत्रा'वरची शंकराचार्य पूर्वकालीन मायावादी नसलेली भाष्ये वा टीका यांचे अध्ययन करून नवे भाष्य लिहावे, असा विचार करून रामानुज 'बोधायनवृत्ती' नावाचे 'ब्रह्मसूत्र' भाष्य मिळवण्याकरता काश्मीरला गेले. तेथील शारदा मठात 'बोधायनवृत्ती' आहे, असे कळले होते. आपल्याबरोबर त्यांनी कुरेश वा कुरनाथ या शिष्याला घेतले. कारण त्याची स्मरणशक्ती उत्कृष्ट एकपाठी होती. ग्रंथ मिळाला नाही, तरी ग्रंथ वाचून तेथल्या तेथे परत करावयाचा, असे त्यांनी मनाशी ठरविले होते. कुरेशालाच श्रीवत्सांकमिश्रही

म्हणत. अनेक रात्री जागून कुरेशाने ‘बोधायनवृत्ती’चे अध्ययन केले. शारदा मठाचे ग्रंथपाल ‘बोधायनवृत्ती’ची पोथी देण्यास तयार नव्हते. त्यांनी ती परत मागून घेतली. रामानुजांनी त्या ‘बोधायनवृत्ती’चे सार ध्यानात धरून ‘श्रीभाष्या’स प्रारंभ केला. कुरेशाला ते तोंडाने सांगत आणि कुरेश लिहीत असे. कुरेशाच्या स्मरणशक्तीचा प्रत्यय रामानुजांना भाष्य सांगत असताना पदोपदी येऊ लागला आणि त्यांनी ‘श्रीभाष्य’ पूर्ण केले. ‘वेदान्तदीप’ व ‘वेदान्तसार’ या ‘ब्रह्मसूत्र’ भाष्यावरील संक्षिप्त टीकासुद्धा रामानुजांनी लिहिल्या. ‘वेदार्थसंग्रह’, ‘गद्यत्रय’ (‘शरणागति-गद्य’, ‘श्रीरंग-गद्य’ आणि ‘श्रीवैकुंठ-गद्य’) व भगवद्आराधनाकर्मावर ‘नित्यग्रंथ’ हा स्वतंत्र निबंध, तसेच ‘गीताभाष्य’ही त्यांनी लिहिले. रामानुजांनी उपनिषदांवर भाष्य लिहिले नाही. त्यांच्या संप्रदायातील रंगरामानुज या पंडितांनी विशिष्टाद्वैतमताप्रमाणे उपनिषदांवर टीका लिहिल्या.

वैष्णव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे आणि भक्तियोगाचे तर्कशुद्ध विवेचन केल्यानंतर प्रथम दक्षिणेच्या आणि त्यानंतर उत्तरेच्या विजययात्रा रामानुजांनी केल्या. नंतर श्रीरंगम येथे ते परतले. त्यावेळी तेथे पहिला कुलोतुंग किंवा कृमिकंठ (कार. १०७० - ११२०) हा चोल राजा राज्य करीत होता. तो कट्टर शैवपंथी आणि वैष्णवांचा द्वेष्टा होता. त्याने महापूर्ण आणि कुरेश यांच्या डोळयांना इजा करून त्यांना अंध केले. श्रीरंगमहून संन्यासवेश टाकून साध्या वेशात रामानुज बाहेर पडले. त्यांनी होयसळवंशी विट्टिदेव या जैन राजाला वैष्णव दीक्षा दिली आणि विष्णुवर्धनदेव असे त्याचे नवे नामकरण केले. या राजाच्या मदतीने मेलकोटे येथे मंदिर बांधून तेथे बारा वर्षे वसती केली. श्रीरंगमचा चोल राजा पहिला कुलोत्तुंग निवर्तल्यावर रामानुजाचार्य श्रीरंगमला परत आले. तेथेच ११३७ मध्ये (माघ शुद्ध दशमी शके १०५९) त्यांनी अखेरची समाधी घेतली. रामानुजांचा जीवनकाल १२० वर्षांचा आहे.

या दीर्घ जीवनकालात शेकडो शिष्य त्यांना मिळाले. त्यांनी वैष्णव भक्तिमार्गाचा संप्रदाय देशभर प्रसृत केला. पिढ्यान्‌पिढ्या आतापर्यंत तो चालू राहिला. जैन व बौद्ध जनांना संप्रदायात त्यांनी समाविष्ट केले. ते स्वत: शूद्र गुरुंचे शिष्य बनले. ते अस्पृश्य मित्राच्या झोपडीमध्येही दीर्घकालपर्यंत परमार्थचर्चेत काळ घालवीत होते. ७४ मठांच्या पीठांवर त्यांचे पूजोत्सव, अभिषेक झाले. ७०० गोसावी, १२००० संन्यासी, ३०० संन्यासिनी त्यांच्या अनुयायांमध्ये होत्या. अनेक राजे व धनिक त्यांच्या शिष्यगणांमध्ये समाविष्ट झाले होते. कुरेश, दाशरथी, नडाडूर अम्माळ आणि पराशर भट्ट हे त्यांचे पंडित शिष्य शास्त्रार्थचर्चेत पुढाकार घेऊन शंकासमाधान करीत. धार्मिक कर्मकांड एका शिष्याकडे, दुसऱ्या शिष्याकडे मुदपाकखाना, तिसऱ्याकडे द्रव्यनिधी, चौथ्याकडे भोजनालय, अशा प्रकारे या श्रेष्ठ पारमार्थिक आचार्यांचे धर्मपीठ मोठ्या इतमामाने या दीर्घ जीवनात चालू राहिले.

**(पूर्वप्रसिद्धी : दक्षिणेतील दोन आचार्य, विदर्भ साहित्य संघ, नागपूर (१९८७), पृ. २२ ते ३१)**

○○○

१३

# भारतातील संगीताला नवा मार्ग दाखवणारा कलाकार : कुमार गंधर्व

प्राज्ञपाठशाळा मंडळातर्फे कुमार गंधर्वांची मैफल आयोजित केली आहे. भारतातले एक श्रेष्ठ गायक म्हणून त्यांची कीर्ती सर्वत्र पसरलेली आहे. त्यांचं वैशिष्ट्य असं की, त्यांनी नवे राग निर्मिले, नवीन बंदिशी बांधल्या, गायकीला नवा आकृतिबंध दिला. हा नवा आकृतिबंध परंपरेपेक्षा अगदी वेगळा आहे, ही गोष्ट सर्वसाधारण रसिकाच्याही चटदिशी ध्यानात भरते. त्यांनी जुन्या रागांमध्येसुद्धा केलेले काही फेरबदल संगीताच्या विशेषज्ञांनी मान्य केले आहेत. त्यांनी नवीन बंदिशी, नवीन कविता रचून, त्या स्वरबद्ध करून निर्मिल्या आहेत. त्या ग्रंथरूपानंही छापल्या गेल्या आहेत - उदाहरणार्थ, 'अनूपरागविलास'.

संगीतकारांनी चीज म्हणून जी कविता रचलेली असते तिला काव्य म्हणून तितकंसं महत्त्व नसतं; परंतु अपवाद म्हणून उत्कृष्ट काव्यही बंदिशीमध्ये बसवता येतं. उदाहरणार्थ, संत कबीर, मीराबाई, सूरदास, गुरुनानक, रामदास, तुकाराम इत्यादिकांनी उच्च भावार्थाचा सागर असलेली कविताही कित्येक वेळा बंदिशीची सूर आणि लय यांची आरास सहज मान्य करते. संतांची कविता ही संगीताच्या रागविलासाकरता निर्माण झालेली नसते. ती देवाच्या आळवणीकरता असते; दिव्य अनुभवाच्या आविष्काराकरता असते; मोक्षमार्ग सहज आक्रमिता यावा, याकरिता असते. किंबहुना मोक्षमार्गातील फुलांनी भरलेली अशी ती उंच उंच जाणारी सोपानपरंपरा असते. तिला जर संगीताचा बहर आला, तर मोक्षमार्गाचा साहसी मार्ग सहज आक्रमून संगीतकार भक्त प्रत्यक्ष मोक्षाच्या परमानंद रसात मग्न होऊन जातो आणि श्रोत्या-रसिकांनाही त्या आनंदरसाच्या अनुभवाचा भागीदार बनवतो.

कुमार गंधर्व मोक्षानुकूल भावस्थिती स्वत: अनुभवतात आणि त्या तऱ्हेची श्रोत्यांची मनोभूमी निर्माण करू शकतात. त्याकरिता स्वररचनेचा आणि शब्दार्थाचा मेळही त्यांच्या कवितेत साधलेला असतो. नृत्य आणि संगीताची प्रधानदेवता म्हणजे श्रीनरनारी-नटेश्वर होय. या नटेश्वराच्या नृत्याची आपण गायकभक्त म्हणून साथ करत आहोत, अशाच भक्तिभावानं

त्यांनी आपल्या चिजा गायल्या आहेत. ईशस्तवन, शंकराराधना, सरस्वतिस्तवन, गुरुभजन, संगीतमहिमा, ऋतुवर्णन, शृंगार, विरहिणीची व्यथा, शामसुंदराची बासरी इत्यादी त्यांच्या कविता स्वररचना व शब्दार्थ यांचा सुसंवाद साधत आहेत, याचं भान रसिकांना झाल्याशिवाय राहत नाही.

भारतीय संगीत विकास आणि विस्तार पावत आहे किंवा नाही? हे केवळ परंपरागत व्यक्तिनिष्ठ किंवा व्यक्तिप्रधान ऐकांतिक बंदिशीतच बंदिस्त होऊन पडलेलं राहणार काय? या प्रनांची उत्तरं कुमारांच्या अनन्यसाधारण नवनिर्मितीनं मिळतात. त्यांनी परंपरागत भारतीय संगीताला विकासाचा मार्ग दाखवून दिला आहे. माळव्यातील सामान्य जनसंगीताच्या लयी, स्वररचना आणि भावाविष्कार यांचं सार त्यांनी आत्मसात केलं. त्यामुळे एक विशेष आविष्कार असलेली रागरचना त्यांना स्फुरली. भिन्न भिन्न जातिजमातींचे, प्रदेशांचे अथवा भिन्न भिन्न संस्कृतींचे अगदी वेगळे व विशिष्ट कलात्मक आकृतिबंध असतात. त्यामध्ये त्या जमाती, त्या प्रदेशातले लोक, त्या संस्कृतीतील समाज व राष्ट्र विलक्षण कलानुभव घेतात आणि त्यात त्यांच्या मन:प्रवृत्ती सुसंस्कृत बनून जीवन संग्रामात उत्साहानं विजय मिळवू शकतात. मनाचं यौवन चिरंतन करण्याचं सामर्थ्य संगीतकलेत जास्तीत जास्त असतं. भिन्न भिन्न संस्कृतीत - विशेषत: दूरदूरच्या प्रदेशातील प्राथमिक अवस्थेतील संस्कृतींतदेखील संगीतपरंपरा असतात; त्यांच्यात सुंदर आणि भव्य स्वरस्वारस्य असू शकतं आणि त्यातून मिळवलेल्या भिन्न भिन्न स्वररचनेची मूल्यं आत्मसात केल्यानं आजचं विद्यमान पश्चिमी संगीत समृद्ध होत आहे, अभूतपूर्व अशा आविष्कारांचं विलक्षण विश्व निर्माण करत आहे. आफ्रिकेतील शेकडो काळ्या जमाती गुलाम म्हणून अमेरिकेत गोऱ्या लोकांना पकडून नेल्या. त्यांच्या वेगळ्या वसाहती केल्या. त्यांच्याकडून जबरदस्तीनं शरीरश्रम करवून घेऊन वैभव निर्माण केलं. त्याबरोबरच त्यांच्यातील परंपरागत संगीत व स्वरसामर्थ्य स्वीकारलं. अमेरिकेतील आधुनिक संस्कृती निर्माण करणाऱ्या गोऱ्या समाजानं आपलं संगीत काळ्यांच्या स्वरसामर्थ्यानं बलशाली केलं आहे. अशी ही सांस्कृतिक देवाण-घेवाण भारतीय संगीतानं केली, तर तेही चिरविकासशील पश्चिमी संगीताच्या जोडीनं शोभू लागेल. कुमार गंधर्व या दृष्टीनं भारतीयांना एक महत्त्वाचं उदाहरण म्हणून मार्गदर्शक ठरतात.

**(मे, १९८४ मध्ये देवास येथे कुमारजींच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या वेळी केलेल्या भाषणाचे शब्दांकन)**

○○○

# २.

# वैचारिक भाषणे

# स्वातंत्र्यपूर्व कालखंड
(१९२६ ते १९४७)

१४

# भारतीय तर्कशास्त्राची वाढ

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रथम उपलब्ध भाषण म्हणून या भाषणाचे ऐतिहासिक महत्त्व आहे. ते पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत झाले होते. पुण्याची वसंत व्याख्यानमाला जुन्या व प्रारंभिक व्याख्यानमालांपैकी एक होय. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी पुण्यात 'वक्तृत्वोत्तेजक सभा' स्थापन केली. त्या सभेमार्फत सन १८७५ पासून 'वसंत व्याख्यानमाला' आयोजित केली जाते. दरवर्षी वसंत ऋतूत ही व्याख्यानमाला टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे संपन्न होत असते. त्या त्या काळातल्या नामवंत वक्त्यांनी या व्याख्यानमालेत भाषणे दिली आहेत.*

*सन १९२६ च्या वसंत व्याख्यानमाला, पुणेमध्ये १९ वे पुष्प तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दि. २५ मे १९२६ रोजी गुंफल्याची नोंद साप्ताहिक केसरी, पुणेच्या दि. ८ जून, १९२६ च्या अंकात पृष्ठ ११ वर आढळते. ती अशी - )*

### व्याख्यान १९ वे

मंगळवार, ता. २५ माहे मे रोजी 'भारतीय तर्कशास्त्राची वाढ' या विषयावर वाईच्या प्राज्ञपाठशाळेतील अध्यापक वे. शा. सं. (वेदशास्त्रसंपन्न) लक्ष्मणशास्त्री यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी वे. शा. सं. श्रीधरशास्त्री पाठक यांची योजना झाली होती. या दिवशी प्रथम बाजीराव पुण्यतिथीनिमित्त प्रो. पोतदार यांचे व्याख्यान होऊन वे. लक्ष्मणशास्त्री यांच्या व्याख्यानास ७॥ वाजता सुरुवात व्हावयाची होती. पण दोन प्रहरी २॥ वाजता किबेवाड्यास आग लागली व तिची अधिक भीती निर्मूल ठरेपर्यंत सायंकाळ झाली. या कारणाने बाजीरावांच्या पुण्यतिथी संबंधाच्या भाषणाची सुरुवातच ६॥ चे ऐवजी ७॥ वाजता झाली. त्या भाषणात प्रारंभी त्यांनी किबेवाड्याच्या ऐतिहासिक महत्त्वाचा उल्लेख केला.

हा कार्यक्रम ८। वाजता आटोपला व त्यापुढे लक्ष्मणशास्त्री यांचे व्याख्यान सुरू झाले; परंतु वेळ बराच झाला असल्याकारणाने त्यांस आपल्या विषयाची नुसती प्रस्तावना सांगून भाषण संपवावे लागले. नंतर अध्यक्षांनी शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेबद्दल प्रशंसा केली व चिटणीसांनी अनपेक्षित अडचणीमुळे व्याख्यानास पुरेसा वेळ न राहिल्याबद्दल खेद व्यक्त केला व अशा रीतीने सभेचे कामकाज आटोपले.

❍❍❍

१५.

# धर्मशास्त्र विरुद्ध समाजसुधारणा

## भाषण - १

## धर्मशास्त्र

"हिंदुसमाजांत यापुढे मोठी क्रांती घडून येणार आहे. ती क्रांती यशस्वी होऊन हिंदुसमाज जगाला आदर्श व्हावा, अशी काळजी आपण घेतली पाहिजे. हिंदुसमाजाची जुनी घटना हादरून गेली आहे. पुष्कळ सनातन्यांस असे वाटते की, अजून हिंदुधर्म जागृत आहे; पण हिंदुधर्माचे खरे स्वरूप काय आहे, हे त्यांस माहीत नाही.''

### हिंदुधर्माचा पाया आर्थिक आहे !

हिंदुधर्माची रचना ज्या पायावर झाली, तो पाया म्हणजे हिंदुसमाजाची आर्थिक व्यवस्था हा होय. हिंदुधर्म हा ऐहिक विचारपरायण धर्म आहे. तो काल्पनिक, पारलौकिक गोष्टींवर अधिष्ठित नाही. हिंदुधर्माची व हिंदुसमाजाची अनेकांनी अनेक लक्षणे सांगण्याचे प्रयत्न केले ते प्रयत्न हिंदुधर्माच्या (Religious) म्हणजे पारलौकिक अथवा पारमार्थिक संप्रदायाच्या दृष्टीने करण्यात आले. 'साधनांना अनेकता' आणि 'उपास्यांनां अनियमः' अशी एक व्याख्या एका 'बुद्धिमतां वरिष्ठाने' सांगितली. तिच्यामध्ये खोल अभिप्राय भरला आहे; पण ती व्याख्या हिंदुधर्माचे पारलौकिक दृष्टीने म्हणजे देव, प्रेषित, ऋषी, धर्मग्रंथ, उपासनामार्ग, इत्यादी प्रकारांनी विशिष्ट लक्षण सांगणे अशक्य आहे, असेच ध्वनित करिते. हिंदुसमाजाचे स्पष्ट व प्रत्यक्ष लक्षण म्हणजे एक विशिष्ट आर्थिक व्यवस्था हे होय. हिंदुस्थानात हजारो वर्षांपासून राहिलेले जे नानाविध मानववंश, ते विशिष्ट आर्थिक व्यवस्थेत व बंधनाने बद्ध होऊन, आस संस्थेच्या रूपाने परिणत झाले, त्यांनाच हिंदुसमाज हे नामाभिधान प्राप्त झाले.

## जातिभेदाचे मर्म

अप्रजापासून अंत्यजापर्यंत संस्कृतीच्या भिन्न भिन्न थरांतील मानववंशांचा ह्यात अंतर्भाव झाला. त्या समाजांत जितक्या जाती आहेत, तितक्या सर्व जातींची नावे अर्थसंपादक धंद्यावरूनच पडलेली आहेत. यांच्यामध्ये स्पर्धा व आसूया या दोन विकारांपेक्षा सहकारिता व योग्यतेनुरूप आदर या समाजपोषक गुणांचे आधिक्य होते. हिंदुस्थान कृषिप्रधान देश होता व अद्यापिही आहे, ही कल्पना आत्मवंचना करणारी आहे. यांत्रिक युगापूर्वीची कला, उद्योग, व्यापार, ज्ञान, इत्यादी रूपाने प्रकट होणारी संस्कृती या जातिभेदबद्ध समाजात हजारो वर्षांपर्यंत स्थिररूपाने नांदत होती. आर्थिक व्यवस्था हे त्याचे दृश्य स्वरूप होते. ह्याच्यामध्ये इंग्रजांनी क्रांती केली, सर्व धंदे बुडविले; हा देश केवळ कृषिप्रधान आहे, असा डांगोरा पिटला! जातिभेदाचा अर्थोत्पादन सामर्थ्य, अर्थविभाजन व तन्मूलक सहकारितारूप प्राण नाहीसा झाला व नुसता जातिभेदाचा निर्जीव सांगाडा शिल्लक राहिला. त्यामुळे जातिजातींतील वैषम्य, द्वेष, मत्सर, इत्यादी भुते नाचूं लागली.

## धर्मशास्त्रांचे परीक्षण का करावयाचे ?

ह्यापुढे जबरदस्त क्रांतीची लक्षणे दिसत आहेत. क्रांतीचे हे वारे रशियाकडून वाहणार असे म्हणतात. या भीषण क्रांतीस आपणांस धैर्याने तोंड द्यावे लागेल. समाजरचना कशी असावी त्याबद्दल शास्त्रवेत्त्यांमध्ये वाद सुरू झाला आहे. युरोपचे वातावरण ह्या वादाने हलून गेले आहे. आपणांस आपल्या प्राचीन संस्कृतीच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे, कोणी म्हणतात की, आता ते जुने विचार टाकून देऊन नवे विचार स्वीकारा; परंतु, आपला समाज दहा हजार वर्षांचा वृद्ध असून, आपले धर्मशास्त्र तितक्याच प्राचीन कालापासून बनत आले आहे. हे दीर्घकालीन जीवन फार मोठ्या जीवनशक्तीचे दर्शक आहे. भौतिक शास्त्रांतील प्रयोग थोड्या वेळात करता येतात; पण समाजशास्त्राचे प्रयोग अल्पकाळात करता येत नाहीत. मनुष्याच्या दिवसापेक्षा जसा देवाचा दिवस मोठा, तसा व्यक्तीच्या कालापेक्षा समाजाचा काल फार दीर्घ असतो. समाजशास्त्राचा एक-एक प्रयोग करण्यास कित्येक वेळा शेकडो वर्षे लागतात. हिंदुसमाजाने गेल्या हजारो वर्षांत शेकडो समाजशास्त्रीय प्रयोग केले आहेत, अनेक परिवर्तने अनुभविली आहेत, निरनिराळ्या समाजव्यवस्था व सामाजिक संस्था अमलात आणून पाहिल्या आहेत. त्या सर्वांची नोंद वेद, ब्राह्मणे, गृह्यसूत्र, शेकडो स्मृतिग्रंथ, महाभारतादी इतिहास, पुराणग्रंथ आणि परंपरागत रूढी इत्यादिकांच्या रूपाने करून ठेविली आहे. ह्या सर्व प्रयोगांचे निरीक्षण आता आपणांस नव्या दृष्टीने केले पाहिजे. जुने ठेवणे परीक्षिल्याशिवाय राहणे अयोग्य व अनुचित होय. शास्त्रीय सत्यांचा अभ्यास करीत असता पूर्वसंपादित ज्ञानाच्या भांडवलाचा उपयोग केलाच पाहिजे,

## जुन्या-नव्या मतांची भूमिका

आज समाजपरिवर्तनाची आवश्यकता निकडीने भासू लागली असून, जुने आणि नवे असे दोन पक्ष अस्तित्वात आले आहेत. जुने म्हणतात की, या धर्मग्रंथांत जे सांगितले तेच सत्य असणे अनादिसिद्ध आहे. त्यांत बदल करण्याचा आपणांस अधिकार नाही. या जुन्यांच्या पाठीमागे पूर्वमीमांसापद्धती या नावाची विचारसरणी आहे. त्या पद्धतीप्रमाणे हिंदुधर्मशास्त्रातील सर्व विचार मनुष्याच्या पारलौकिक हिताच्या दृष्टीने सांगितलेले असून, ते सर्व प्रमादरहित आहेत. मनुष्याच्या बुद्धीला कर्माकर्मांचे पुढच्या जन्मावर काय परिणाम होतील, हे आकलन करण्याचे सामर्थ्य नाही. ते सामर्थ्य केवळ जुन्या धार्मिक ग्रंथांतच आहे. ज्यांस हे सामर्थ्य नाही त्यांस धर्मात परिस्थितीनुरूप बदल करण्याचा काय अधिकार आहे? प्रत्यक्ष व अनुमान यांनी न कळणाऱ्या गोष्टी सांगण्यास शास्त्र प्रवृत्त झाले आहे, असे जुना पक्ष म्हणतो. त्याविरुद्ध नव्याचे म्हणणे असे आहे की, शास्त्र हे परिस्थितीप्रमाणे उत्पन्न झाले आहे. धर्मालाही इतिहास हा आहेच. देशकालाप्रमाणे समाजात नेहमी स्थित्यंतरे होऊन नवे आचार रूढ होतात. हिंदुधर्मशास्त्र समाजशास्त्राचे जुन्या काळात झालेले अनेक प्रयोग समजण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्यातील काही विचार पुढील काळालाही मार्गदर्शक होण्यासारखे असले तरी सर्वच विचार आज ग्राह्य ठरतील असे नाही. पुढील व्याख्यानात या जुन्या व नव्या पक्षांचे परीक्षण करून, हिंदुधर्मशास्त्राकडे पाहण्याची शुद्ध दृष्टी कोणती याचे विवेचन करू.

# भाषण - २

# समाजसुधारणा

## जगातील प्रत्येक मनुष्यास वेदाधिकार

दुसऱ्या व्याख्यानात शास्त्रीबुवांनी मीमांसापद्धतीचा इतिहास व सुधारणा प्रतिपादिली. ते म्हणाले:- "मीमांसापद्धतीलाही इतिहास आहे. पूर्वमीमांसाकार जैमिनी याच्यापूर्वी अनेक मीमांसक होऊन गेले होते. त्याच्या सूत्रात पूर्वीच्या सात-आठ मीमांसकांचा उल्लेख आला आहे. या मीमांसकांत मतभेद होते. बादरी नावाच्या मीमांसकाच्या मताने त्रैवर्णिकांनाच वेदाधिकार किंवा यज्ञाधिकार आहे असे नसून जगातील सर्व माणसांना वेदांचा व वैदिक कर्मांचा अधिकार आहे. ऐतिशायन ऋषींच्या मते स्त्रियांना वेदाधिकार किंवा संपत्तीचा अधिकार नाही. उलट, जैमिनीच्या मताने स्त्रियांस वेदांचा व संपत्तीचा पूर्ण अधिकार आहे. जैमिनी व उत्तरमीमांसक बादरायण यांच्यामते देवता व ईश्वर यांच्या अस्तित्वाबद्दल मतभेद होता. जैमिनीने असे प्रतिपादन केले की, शरीरधारिणी किंवा शरीर धारण न करणारी अशी देवताच नाही. जैमिनीच्या धर्माला या अस्तित्वाची आवश्यकता वाटत नाही. बादरायणाचार्यांनी ईश्वर व दैवता यांचे सशरीर व अशरीर अस्तित्व प्रतिपादिले आहे.



वाय १७४–१५

## सुधारणेला मीमांसकांची अनुकूलता !

जैमिनीनंतर जैमिनीसूत्रावर इ. स.च्या तिसऱ्या शतकांत शबरस्वामींनी भाष्य लिहिले त्या भाष्यांत जे विचार प्रगट केले आहेत, त्यापेक्षा आज संमत असलेल्या कुमारिल भलांच्या मीमांसापद्धतीमध्ये एका महत्त्वाच्या गोष्टीत अतिशय फरक आहे. 'हेतुदर्शनाश्च' या सूत्रावरील भाष्यांत शबरस्वामींनी असे म्हटले आहे की, भ्रांतीने, फसविण्याच्या इच्छेने व लोभाने स्मृतीतील वाक्ये लिहिली असण्याचा संभव असतो. अशी वाक्ये प्रयत्नाने हुडकून काढावीत. ती वाक्ये अप्रमाण होत. शबर स्वामींची ही कल्पना गृहीत धरल्यास सद्य:काली लागू न पडणारी व निरुपयोगी भासणारी अनेक स्मृतिवचने भ्रांतिमूलक ठरून, नवीन सुधारणा करणे शबरस्वामींच्या मीमांसापद्धतीच्या दृष्टीने चुकीचे ठरणार नाही. शबरस्वामींनंतर भर्तृमित्र वगैरे पूर्वमीमांसक होऊन गेले. त्यांनी नित्यनैमित्तिक कर्मे निष्फळ असून शिष्ट लोक ती कर्मे आचरतात म्हणूनच ती आपण आचारावयाची, असे प्रतिपादिले आहे. प्रभाकर गुरू नावाच्या पूर्वमीमांसकांचेही मत असेच आहे. नित्यनैमित्तिक कार्यात बहुतेक आचारव्यवहार व प्रायश्चित्तात्मक वर्णाश्रमधर्माचा समावेश होतो. वरील मत मान्य केल्यास वाटेल ती सामाजिक सुधारणा शास्त्राविरुद्ध ठरणार नाही.

## कुमारिल भट्टांची प्रतिगामी मते

कुमारिल भट्टांनी शबरस्वामींचे व भर्तृमित्रांचे हे मत अमान्य केले. कुमारिल भट्ट इ.स.च्या सहाव्या शतकाच्या शेवटी झाले. त्यांच्या विचारांची छाप सातव्या शतकापासून तो एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या सर्व ब्राह्मण विद्वानांच्या विचारावर पडली होती. श्रुतिस्मृति पुराणामध्ये जे जे काही सांगितले आहे, ते ते पूर्ण प्रमाण आणि सफळ होय, ही गोष्ट कुमारिलांनी आपल्या मीमांसेत निश्चित मांडली. स्मृतीतील प्रत्येक वाक्य अनादिवेदमूलक आहे. ते अप्रमाण असणे शक्य नाही. त्यात बदल करण्याचा कोणत्याही मनुष्यास अधिकार नाही. स्मृतीविरुद्ध सुधारणा हा अधर्मच होय, असे कुमारिल भट्टांच्या मीमांसापद्धतीप्रमाणे सिद्ध होते. श्रुतिस्मृतिपुराणात सांगितलेल्या विधिनिषेधांचे साफल्य किंवा नैष्फल्य मनुष्यबुद्धीला स्वातंत्र्याने ठरविता येणे शक्य नाही. त्याकरिता श्रुतिस्मृतिपुराणांनांच शरण गेले पाहिजे असे कुमारिलांचे मत आहे. कुमारिलांनी मीमांसापद्धतींचा पूर्ण विकास केला. त्यांच्यानंतर मीमांसेत बदल झाला नाही. हिंदुधर्मशास्त्रांत न सांगितलेली कोणतीही सुधारणा अधर्म होय, असे या मीमांसापद्धतीप्रमाणे ठरते.

हल्ली नव्या-जुन्या लोकांचा वैचारिक झगडा सुरू आहे. जुन्यांचे म्हणणे शास्त्रांत सांगितले ते खरे, राशी अप्रमाण आहे. ते कुमारिलभट्टांच्या मीमांसापद्धतीचा पुरस्कार करतात. नवे म्हणतात की, बुद्धीने जे दिसेल ते सत्य मानले पाहिजे. तर्काच्या कसोटीला उतरणार नाही, ते खोटे होय.

## हिंदुधर्मातील विचारस्वातंत्र्य

हा जुन्या नव्यांचा झगडा युरोपातही १६ व्या शतकात उत्पन्न झाला होता. कॉस्टेंटिनोपल मुसलमानांच्या ताब्यात गेल्यावर तेथून हुसकून लावलेले ग्रीक विद्वान युरोपमध्ये शिरले. त्यांच्या विचारांचा परिणाम युरोपवर झाला. त्या वेळी युरोपमध्ये बायबल, चर्च व पोप यांचे प्रामाण्य त्रिकालाबाधित मानले जात होते. उलट कोपर्निकस, ब्रुनो, गॅलिलिओ, इत्यादी संशोधकांच्या मते सृष्टीरूपी पुस्तकात जे जे सांगितले आहे ते सत्य व तद्विरुद्ध असत्य असे होते. बायबलमधील सृष्ट्युत्पत्ती व सृष्टिस्थितीविषयक विचार असत्य आहेत असे या संशोधकांनी सिद्ध केले. पदार्थविज्ञानशास्त्राविरुद्ध धर्मग्रंथ असा झगडा तेथे सुरू झाला. त्यात पदार्थविज्ञानशास्त्राचा साहजिक विजय झाला. आपल्याकडील झगडा मात्र तसा नाही; कारण सृष्टीविषयक कोणत्याही विचाराच्या बाबतीत हल्ली नव्याजुन्यांचा झगडा सुरू नाही. मीमांसकांनी या सृष्टीविषयक विचारांच्या बाबतीत मनुष्यबुद्धीस पूर्ण स्वातंत्र्य आहे, असे लिहिले आहे. किंबहुना हिंदुधर्मग्रंथ पदार्थविज्ञानशास्त्राशी अत्यंत अविरोधी आहेत. सृष्टिविषयक विचारांचे स्वातंत्र्य हिंदुस्थानात फार प्राचीन काळापासून आहे. षड्दर्शने याचीच साक्ष पटवितात.

## हल्लीच्या झगड्याचे रहस्य

बायबल विरुद्ध पदार्थविज्ञानशास्त्र ह्याप्रमाणे हा झगडा नसून धर्मशास्त्र विरुद्ध समाजशास्त्र व समाजसुधारणा असा हा झगडा आहे. हिंदुधर्मशास्त्र व सामाजिक सुधारणा असा विरोध आल्यास धर्मशास्त्राचा त्याग करून इष्ट ती सुधारणा हल्लीचे समाजधुरीण व राजकारणी करीत आहेत. मीमांसापद्धतीचा आश्रय करणाऱ्या काशीस्थ पंडितांचे व सर्व पुराणमतवाद्यांचे असे म्हणणे आहे की, या सुधारकांच्या प्रयत्नामुळे हिंदुधर्म रसातळाला जाईल. कोणत्याही कर्माचा कर्त्याच्या आत्म्यावर पापपुण्यात्मक काय परिणाम होतो, याचे मनुष्यबुद्धीस स्वातंत्र्याने ज्ञान होणे अशक्य आहे. वरील ज्ञान धर्मशास्त्राच्या ग्रंथांवरूनच होणे शक्य आहे. म्हणून कोणतीही धर्मशास्त्रविरुद्ध सुधारणा मनुष्याच्या अंतिम हिताच्या दृष्टीने अथवा पारलौकिक दृष्टीने अनिष्ट आहे, असे जुन्या पक्षाच्या म्हणण्याचे रहस्य आहे.

**(* 'धर्मशास्त्र विरुद्ध समाजसुधारणा' विषयावर<br>नागपूर येथे दिलेल्या काही व्याख्यानांपैकी दोन व्याख्याने<br>९ मार्च, १९३० महाराष्ट्र; नवा मनू, एप्रिल १९३०)**

०००

१६.

# धर्मनिर्णयाचे साधन : मीमांसापद्धती विरुद्ध बौद्धिकपद्धती

कोणतेही धर्मशास्त्र मनुष्याच्या अनुभवांतून ब मानवीबुद्धींतूनच उदय पावत असतें. धर्मशास्त्राच्या मुळाशी असलेल्या या विशिष्ट अनुभवाला ब बुद्धी- लाच धार्मिक लोक दिव्पानुभव किंवा दिव्यदृष्टी असे म्हणतात. उदाहरणार्थ, खिश्चन धार्मिकांची अशी श्रद्धा आहे कीं, जगाच्या पित्यानें येशूला दिव्य ज्ञानाचा ठेवा देऊन मानवांची पापापासून मुक्तता करण्याकरितां या भूतलावर पाठविलें, मुसलमानांची अशी भावना आहे की, ईश्वरानें शेवटचा संदेश महंमदाच्या द्वारेंच जगास दिला. हिंदु लोकांचा असा विश्वास आहे की, तपःसामर्थ्यांमुळे ईश्वरी प्रसाद होऊन ऋषींना अनादि व अलौकिक वेद स्फुरले. अशा रीतीने जगांतील निरनिराळ्या समाजांची अशी दृढ श्रद्धा आहे की, आपआपले धर्मग्रंथ दिव्य, अलौकिक, स्वतःप्रमाण व विशुद्ध अशा ज्ञानाचे भांडार अथवा सागर आहेत.

धर्मग्रंथांना हे दिव्यत्व का व कसे प्राप्त होते, याच्या अनेक कारणापैकी एक कारण खालीलप्रमाणें आहे असे दिसते. प्राचीन काळी मनुष्यजातींत निरनिराळ्या समाजात जे प्रभावशाली पुरुष उत्पन्न झाले त्यांनी आपल्या प्रभावाने तत्कालीन समाज भारून टाकले. कारण त्या काळांतील सामान्य समाजाच्या ज्ञानापेक्षा त्यांच्या ज्ञानात व अनुभवात जास्त सत्य होते; अथवा ते विचार अधिक उपयुक्त होते. त्यामुळे त्या विशिष्ट व्यक्तींचा उपदेश त्रिकालाबाधित व स्वतःप्रमाण होय असे लोकांनी ठरविले. खरोखर तत्कालीन समाजाची त्या ज्ञानाने पुष्कळ प्रगती झाली. त्या ज्ञानाने कित्येकांची जीवितयात्रा सुखमय झाली; कित्येकांचे जीवन सुधारले; कित्येक कृतार्थ झाले; कित्येक त्या सत्याच्या झळाळीने दिपले; म्हणूनच तो उपदेश दिव्य ठरला, आणि तो उपदेश ज्या ग्रंथांत ग्रंथित केला होता ते ग्रंथ प्रमादरहित व स्वतःप्रमाण मानले गेले.

**धर्मसंस्था व इतिहास**

कालांतराने त्या त्या धर्मसंप्रदायांत नवीन विचारांचे आचार्य उत्पन्न होतात व परंपरागत अर्थापेक्षा धर्मग्रंथांचा निराळाच भावार्थ दाखव लागतात, किंवा स्वतंत्रप्रज्ञ नवे तत्त्ववेत्ते उत्पन्न होतात व ते नवीन संप्रदायांची स्थापना करतात. हे नवीन उत्पन्न झालेले तत्त्ववेत्ते व त्यांचे अनुयायी आपण देवाचा शेवटचा संदेश सांगत आहोत असे जगास सांगतात व तसे मानणारे पुष्कळ लोक

किंबहुना जातीच्या जाती, समाज व राष्ट्रे त्या संप्रदायांत शिरतात.

समाजांत धर्मस्थापनेच्या काळानंतर बराच काळपर्यंत समाजाची व्यवस्था धर्मसंस्थेच्या हाती येते. गेल्या अनेक हजार वर्षाच्या जगाच्या इतिहासांत नीती, व्यवहार, उपासना, आचार एवढेच नव्हे तर सर्व तऱ्हेच्या सामाजिक व वैयक्तिक हालचाली यांचे नियंत्रण धर्मसंस्थेनेच केले आहे. बुद्धिमान्, सत्ताधीश व श्रीमान, लोक धर्मसंस्थेखाली संघटित होत व समाजाचे नियंत्रण करीत असत; असेच बहुतेक समाजांचा इतिहास सांगत आहे. धर्मग्रंथ, धर्मपीठ ब धर्माधिकारी स्वतःप्रमाण, सर्वाधार व सर्वश्रेष्ठ ठरत समाजसंस्थेचे नियंत्रण करीत असत असे भूतकालांतील मानवसमाजाच्या इतिहासावरून दिसते.

**धर्म व बुद्धी**

अमुक एक धर्मग्रंय प्रमादरहित व त्रिकालाबाधित आहे असे ठरविल्यामुळे नवीन ज्ञानाला व अनुभवाला लवकर अवसर मिळत नाहीं; ज्ञानाचा प्रवाहीपणा व जिवंतपणा नाहीसा होतो; त्यामुळे साठीव पाण्याप्रमाणे एखाद्या ग्रंथांत कोंडलेले ज्ञान मालीन, अप्रसन्न व रोगकारक होते; धार्मिकांच्या ठिकाणीं दंभाचा व आलस्याचा प्रवेश होऊन नित्याभ्यास, विवेचकता व शोधकता नाहींशी होते; नव्या अनुभवाची भर पडत नाहीं; त्यामुळे धर्मः ज्ञानाचा विकास होत नाहीं. ज्ञान हे नित्य विकासी असते. ज्ञानाचा विकास अनंत असतो, अशी जाणीव नष्ट झाल्यामुळे तो ग्रंथबद्ध धर्म कांहीं काळाने प्रगतीच्या रस्त्यात आडवी पडलेली धोंड होऊन बसतो. ही गोष्ट युरोपच्या इतिहासांतील धर्मसंस्थाविरुद्ध पदार्थविज्ञानशास्त्र यांच्या झगड्यात स्पष्टपणे दिसून येते.

**ख्रिश्चनधर्मशास्त्र विरुद्ध भौतिकशास्त्र**

युरोपात खिश्चनधर्माची पूर्ण स्थापना झाल्यावर बराच काळ चर्च व पोप यांची सत्ता समाजावर चालू होती. बायबल, चर्च व पोप हे अनुक्रमे स्वतःप्रमाण, सर्वाधार, सर्वाधीश मानले गेले होते. पुढे कांहीं काळाने ग्रीक तत्त्वज्ञानाचा व ग्रीक संस्कृतीचा अभ्यास युरोपांत सुरू झाला. प्रगल्भ, स्वतंत्रप्रज्ञ व विवेचक अशा ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या उज्ज्वल विचारसरणीचा परिणाम होऊन युरोपांतील बुद्धिमान् लोकांच्या ठिकाणी सृष्टिविषयक जिज्ञासा तीव्र झाली. कोपरनिकसासारखे प्रतिभाशाली संशोधक व ब्रुनोसारखे निष्ठावंत प्रचारक निपजले; व त्यांनी बायबलच्या सर्वज्ञतेला धक्का दिला. धर्माधिकारी म्हणत कीं, जगाबद्दल व मनुष्यांबद्दल सत्यज्ञान पाहिजे असेल तर एकच एक असें बायबलचे पुस्तक पहा. त्याच्या उलट सृष्टिसंशोधक सांगू लागले कीं, सत्यज्ञान पाहिजे असेल तर बायबल टाका व सृष्टीचे हे उघडे पुस्तक पहा. पदार्थीविज्ञानशास्त्रज्ञांना या सत्याग्रहाबद्दल अपमान, कारागृहवास, छळ, घोर शारीरिक यातना व देहान्त शिक्षा सोसाव्या लागल्या. बायबलमध्ये पृथ्वी चौकोनी आहे असे म्हटले आहे. संशोधकांनी ती वाटोळी आहे असे सिद्ध केले. बायबलमध्ये असे म्हटले आहे कीं, पृथ्वी येशूच्या पूर्वी ४००० वर्षे उत्पन्न झाली. संशोधकांनी पृथ्वीचे आयुर्मान कोट्यावधी वर्षांचे आहे असे सिद्ध केले. अशा अनेक सृष्टिविषयक महत्त्वाच्या बाबतीत बायबलमधील चुकलेले सिद्धान्त संशोधकांनी जनतेच्या नजरेस आणले; व त्यामुळे सृष्टिविषयक बाबतींत बायबलचें स्वतःप्रामाण्य डळमळीत झाले. युरोपांत अशारीतीने धर्मशास्त्र विरुद्ध बुद्धी यांच्यामध्ये झालेल्या झगड्यात धर्मशास्त्रांचा पराभव झाला.

**हिंदुधर्मशास्त्र विरुद्ध समाजशास्त्र**

हिंदुसमाजांत या शतकांत असाच धर्मशास्त्र व बुद्धी यांच्यांत झगडा सुरू झाला आहे. युरोपांत झालेल्या झगड्यांत धर्मग्रंथांतील सृष्टिविषयक कल्पनांचा व प्रयोगशुद्ध अनुभवाच्या द्वारे सिद्ध होणाऱ्या सृष्टिशास्त्राचा विरोध होता. या विरोधात धर्मग्रंथांचा पराभव झाला व पदार्थविज्ञानशास्त्राचा विजय झाला. हिंदुसमाजांत सध्या सुरू असलेल्या "धर्मशास्त्र विरुद्ध बुद्धी" या झगड्यांत धर्मशास्त्र व समाजसुधारणाशास्त्र यांच्यांत विरोध आहे. हिंदुधर्मात सृष्टिविषयक विचारांचे बाबतीत बुद्धीने पूर्ण स्वातंत्र्य मिळविले आहे. कारण हिंदुसमाजांत गेल्या हजारो वर्षात अनेक धार्मिक दार्शनिकांनी व आचार्यांनी जगद्विषयक परस्परविरुद्ध असलेल्या अनेक विचारपद्धतीचा प्रसार केला. त्यामुळे सृष्टिविषयक विचारांचे बाबतीत हिंदुधर्म पूर्ण सहिष्णू बनला आहे. परंतु मनुष्याच्या आचरणविषयक सर्व गोष्टींत-समाजसंस्थेच्या सर्व अंगांविषयी आचार, व्यवबहार, नीती, संस्कार, उपासना, अर्थोत्पादन इत्यादी सर्व वैयक्तिक व सामाजिक बाबतीत स्मृतिशास्त्रांचेच नियंत्रण अनेक शतके हिंदुसमाजावर चालू आहे. मनुष्याचे अमुक आचरण धर्म्य आहे की अधर्म्य आहे याचा निर्णय केवळ स्मृतिशास्त्र किंवा धर्मअधर्म्य करू शकतात अशी दृढ श्रद्धा हिंदुसमाजाचे ठायी वसत आहे. त्या श्रद्धेला धक्का बसण्याचा काळ जवळ येत चालला आहे.

गेल्या शतकांत भौतिकशास्त्र व यांत्रिक सुधारणा उत्कर्षाच्या शिखरास पोचल्यामुळे त्याचे परिणाम जगांतील सर्व समाजांच्या रचनेवर झाले आहेत. सर्व समाजांची पुरातन घटना हादरून मुळापासून खिळखिळी झाली आहे. एकोणिसाव्या शतकांत भौतिकशास्त्र प्रभावी झालें व ह्या विसाव्या शतकांत समाजाविषयक क्रांतिकारक विचार प्रभावशाली ठरत आहेत. मागील शतक भौतिकशास्त्रांचे होते व हे शतक समाजशास्त्राचे आहे. जगांतील इतर समाजांप्रमाणेंच हिंदुसमाजावरही जागतिक परिस्थितीचा परिणाम झाला आहे. श्रुतिस्मृतिपुराणांच्या स्वतःप्रामाण्याच्या कल्पनेस पूर्ण धक्का बसला आाहे. त्यामुळे हिंदुसमाजांत पारवर्तनवादी न पुराणमतवादी असे दोन पक्ष निर्माण झाले आहेत. हिंदुधर्मशास्त्राच्या अभ्यासकांतही असेच दोन पक्ष दिसू लागले आहेत. एक श्रद्धाशील अभ्यासकांचा व दुसरा बुद्धिवादी (अथवा तत्त्ववादी) अभ्यासकांचा.

**मीमांसापद्धती**

श्रद्धाशील अभ्यासकांचा संप्रदाय बराच पुरातन आहे. प्राचीन काळी धर्मशास्त्राच्या अभ्यासकांस मीमांसक असे म्हणत. या मीमांसकांमध्ये कुमारिल भट्ट नांवाचे प्रखर बुद्धीचे दिग्विजयी धर्माचार्य इ. स. च्या ७व्या शतकात होऊन गेले. त्यांनी धर्मग्रंथांचा अभ्यास करण्याची पद्धती पूर्णतेस नेली. त्यांच्या पूर्वी झालेल्या मीमांसकांपेक्षां कुमारीलभट्टांनी परिणतीला नेलेल्या मीमांसापद्धतीचा पगडा गेली बाराशे बरे धर्मशास्त्रविवेचकांच्यावर पूर्ण बसला होता. धर्माधर्म ठरविण्याची कसोटी श्रुती, स्मृती, पुराणे इत्यादी धर्मग्रंथच होत असे त्यांनी मोठ्या कुशलतेने सिद्ध केले. धर्मात बुद्धी का चालवू नये ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां त्यांनी फारच चांगल्या रीतीने बुद्धी चालविली. त्यांनी ठरविलेल्या मीमांसापद्धतीचे सिद्धान्त तर्कशास्त्रदृष्टया परिपक्व आहेत, त्यामुळे त्यांची सुसंगतता बुद्धीला मोहित करते.

धर्माधर्म ठरविण्याची कसोटी श्रुती, स्मृती व पुराण हे शास्त्रग्रंथच होत असे मानणारे मीमांसक

व धर्माधर्म ठरविण्याची कसोटी मनुष्यबुद्धीच आहे, धर्माला इतिहास आहे आणि धर्मात देशकाल परिस्थितीप्रमाणे अनेक बदल झाले आहेत असे समजणारे बुद्धिवादी यांची तुलना करण्याकरितां मीमांसकांचे सिद्धांत काय आहेत हे आपण संक्षेपाने प्रथमतः पाहू. ते सिद्धान्त पुढीलप्रमाणे आहेतः

(१) मनुष्याने आचरलेल्या कर्माकर्मांचे पापपुण्यात्मक परिणाम मनुष्याच्या आत्म्यावर होऊन त्याचे पुढील जन्मात काय फळ मिळतं आणि ते फळ कोण देतो ही गोष्ट मनुष्यबुद्धीस निश्चितपणे समजणे शक्य नाही. तसेच जीवात्मा, ईश्वर, कर्मफल व जन्मपरंपरा यांचे पूर्ण आकलन मनुष्यबुद्धीनें होणे शक्य नाहीं. (२) कर्मर्मांचे दूरवर पोचणारे व अनेक जन्मांशी संबंध असलेले परिणाम लक्षात घेऊन विधिनिषेध करण्याचे सामर्थ्य अथवा धर्माधर्मनिर्णयाचे सामर्थ केवळ वेदवाणीतच आहे, ते सामर्थ्य मनुष्याच्या बुद्धीत नाही. या परिणामासच 'अपूर्व' किंवा 'अदृष्ट' म्हणतात. (३) वेद कोणत्याही मनुष्याने किंवा मनुष्याव्यतिरिक्त व्यक्तीने अथवा ईश्वरानेही निर्माण केलेले नाहीत, ते अनादी आहेत. (४) मनुष्यप्रणीत ग्रंथांत भ्रम, प्रमाद, दुसऱ्यास फसविण्याची इच्छा इत्यादी दोषांमुळे असत्य संभवते, कारण पूर्ण निर्दोष व सर्वज्ञ मनुष्य सापडणे शक्य नाही. वेद हे मनुष्यकृत नसल्यामुळे मनुष्यप्रणीत ग्रंथांत संभवणारे दोष वेदांत असण शक्य नाहीं. (५) प्रत्यक्ष व अनुमान म्हणजे निरीक्षण व तार्किक बुद्धी यांच्या सहाय्याने जे पूर्णपणे कळत नाहीं तेच वेदांत प्रतिपादिले आहे. (६) प्रत्यक्ष व अनुमान म्हणजे इन्द्रियजन्य ज्ञान व तार्किक बुद्धी यांच्याशी पूर्णपणे विरुद्ध असलेली कोणतीही गोष्ट वेदांत प्रतिपादिली नाही. (७) रंगांच्या बाबतींत जसे चक्षूला स्वतः प्रामाण्य आहे, किंवा षड्रसांच्या बाबतीत ज्याप्रमाणे रसनेला स्वतःप्रामाण्य आहे, त्याप्रमाणे वेद हे धर्माधर्माच्या बाबतीत चक्षूप्रमाणेच स्वतःप्रमाण होत. (८) सध्या उपलब्ध असलेल्या स्मृती व पुराणे वेदांचाच पूर्णपणे अनुवाद करतात; म्हणून सर्व स्मृती व पुराणे वेदवत् प्रमाण होत. (९) स्मृतीत व पुराणांत सांगितलेल्या ज्या विधिनिषेधांना सध्या उपलब्ध असलेल्या वेदांत आधार सापडत नाहीत ते विषिनिषेध लुप्त किंवा गुप्त वेदात आहेत. (१०) श्रुती, स्मृती व पुराणे यांच्यांत प्रतिपादिलेले विधिनिषेध सप्रयोजन आहेत व सार्थ आहेत, निष्फळ नाहीत. (११) ज्याप्रमाणे वेद पूर्ण सत्य आहेत त्याप्रमाणे सर्व स्मृती व पुराणे केवळ श्रुतीचाच अनुवाद करीत असल्यामुळे, ती पूर्ण सत्य आहेत व म्हणूनच त्या सर्वात पूर्ण एकवाक्यता आहे. त्यांच्यांत परस्पर विरोध असणे शक्य नाहीं. ( १२ ) श्रुती, स्मृती किंवा पुराणे यांच्यांत समन्वय किंवा एकवाक्यता वाक्यरचनेच्या सामान्य नियमांच्या आधारे व तात्पर्यनिर्णायक उपक्रमोपसंहारादि प्रमाणांनी सिद्ध होते. पूर्वमीमांसाशास्त्रांत हे एकवाक्यतेचे नियम विस्तारानें प्रतिपादिले आहेत. (१३) श्रुती स्मृती- पुराणांत आज प्रत्यक्ष न आढळणाऱ्या ज्या शिष्ट लोकांतील रूढी आहेत त्या रूढींच्या मुळाशी अनादी व अपौरुषेय वेदच आहेत; परंतु ते वेदभाग आज उच्छिन्न झाले आहेत किंवा प्रच्छन्न आहेत. मात्र या रूढी श्रुती, स्मृती व पुराणांशी प्रत्यक्ष निरुद्ध नसल्या पाहिजेत. (१४) श्रुती, स्मृती, पुराणे व शिष्टाचार यांच्या विरुद्ध किंवा त्यांना संमत नसलेला कोणताही आचार धर्म्य म्हणता येणार नाही. म्हणून श्रुती, स्मृती, पुराणे व शिष्टाचार यांच्या विरुद्ध कोणतीही सुधारणा धार्मिक दृष्टीने अनिष्ट होय-पूर्ण अधर्म्य होय.

वरील १४ सिद्धान्त पूर्वमीमांसाशास्त्रामध्ये व हिन्दुधर्मशास्त्राच्या गेल्या १३ शे वर्षात झालेल्या भाष्यटीकादी ग्रंथांमधून धर्माचार्यानी व प्राचीन विद्वानांनी पूर्णपणे मान्य केले आहेत.

वरील सिद्धान्तांशी काही आचार्यांचे किरकोळ मतभेद आहेत; पण त्या मतभेदांमुळे एकंदर विचारसरणीमध्ये तत्त्वतः बदल होत नाहीं.

वरील मीमांसापद्धतीचे अनुसरण करणाऱ्या अपरिवर्तनवादी पंडितांचे परि वर्तनवादी बुद्धिवाद्यांवर (किंवा तत्त्ववाद्यांवर) अनेक आक्षेप आहेत; ते असे- (१) ग्रंथप्रामाण्य न स्वीकारल्यास धर्माधर्माचा निर्णय केवल ऐहिक गोष्टींवर अवलंबून करावा लागेल. त्यामुळे जीवात्मा, पुनर्जन्म, ईश्वर इत्यादी शास्त्रैकगम्य वस्तुंचा आधार न मिळाल्यामुळे, बुद्धिवाद म्हणजे केवळ नास्तिकप्रणीत चार्वाकावद होय असे म्हणावे लागते. (२) अमुक सत् आहे व अमुक असत् आहे, अमुक आचरण चांगले व अमुक आचरण वाईट यांची कसोटी केवळ मनुष्याच्या ठायी वसत असलेली विवेकबुद्धीच होय, असे म्हटल्याने एक मोठा अनवस्थाप्रसंग ओढवतो. 'विचित्ररूपाः खलु वित्तवृत्तयः' या न्यायानें निरनिराळ्या व्यक्तींची, जातींची व समाजांची विवेक-बुद्धी भिन्नभिन्न काळी निरनिराळी रूपे धारण करते. उदाहरणार्थः गोवध मुसलमानांच्या विवेकास पटतो व त्याच्या उलट हिंदुंच्या विवेकास महापाप वाटतो (३) पुष्कळांचे पुष्कळ सुख साधणे व अधिकाधिक दुःख-निवारण करणे हीही धर्माधर्मनिर्णयाची शुद्ध कसोटी मानता येत नाही. कारण सुखदुःखाच्या कल्पना कांही बाबतीत जरी सर्वांच्या सारख्या असल्या तरी त्या पुष्कळशा बाबतींत निरनिराळ्या असतात. उदाहरणार्थ, विधवा- विवाहाचे एकजण अभिनंदन करतो व दुसऱ्यास हा स्वैराचार आहे असे वाटून खेद होतो. म्हणून सुखदुःखे पुष्कळ अंशी सापेक्षच असतात.

एवंच वेळोवेळीं रंग पालटणारी विवेकबुद्धी व सापेक्ष सुखदुःखे धर्माधर्म- निर्णयाचे आत्यंतिक प्रमाण होऊ शकत नाहीत; म्हणून अतीन्द्रिय अर्थ कथन करणाऱ्या अपौरुषेय, नित्य, स्वतःप्रमाण अशा वेदवाणीसच धर्मनिर्णयाकरिता शरण गेले पाहिजे. ईश्वर, परलोक, पुनर्जन्म, पाषपुष्य इत्यादी विषयांत कुंठित होणाऱ्या व भांवावणाऱ्या मनुष्यांच्या आंधळ्या अल्पबुद्धीवर विसंबणें म्हणजे सागर तरून जाण्याकरिता फुटलेच्या नावेचा आश्रय करणे होय.

यावर बुद्धिवादी, सुधारणावादी किंवा तत्त्ववादी पक्षाचे म्हणणे असे आहे की, मीमांसापद्धतीचे सिद्धान्त दिसावयास कितीही सुसंगत व आकर्षक असले तरी त्यांची सुसंगतता व आकर्षकता स्वप्नांती सुसंगततेप्रमाणे व आकर्षकतेप्रमाणेच आहे. वज्राच्या पायावर उभारलेली इमारत भंग पावणार नाहीं ही गोष्ट खरी आहे; पण वज्र सत्यसृष्टीत सापडले पाहिजे. जरूर नसता कल्पनेच्या पायावर सत्यसृष्टीची उभारणी करणे पुष्कळवेळा अनिष्ट असते, ही गोष्ट पुढील विचारसरणीवरून दिसून येते. मीमांसापद्धतीतील कांही सिद्धान्त केवळ काल्पनिक आहेत, म्हणून मीमांसपद्धती अपूर्ण आहे.

(१) वेद अनादी व अपौरुषेय आहेत ही कल्पना, येशु, ख्रिस्त, महंमद इत्यादि धर्मोपदेशक ईश्वरप्रेषित होते या कल्पनेप्रमाणेच निराधार आहे. कारण कोणतीही भाषा मनुष्यजातीच्या विकासाबरोबरच विकास पावत असते. वैदिक भाषेचीही तीच गोष्ट आहे. ऋग्वेदादी सर्व वैदिक वाङ्मयांत ऋषी हे मंत्रकर्ते आहेत असे म्हटले आहे. (२) स्वर्गनरक, पापपुण्य, जीवेश्वर इत्यादी वस्तुंची मनुष्यबुद्धीला कल्पना करतां येते; परन्तु त्यांची सत्यता सिद्ध करण्यास पूर्ण समर्थ असें प्रमाण अद्यापि सापडले नाही; म्हणून जुन्या ऋषींना ह्या सर्व गोष्टी निश्चित कळल्या होत्या हे कोणत्या

आधारावर म्हणावयाचे ? (३) श्रुती, स्मृती व पुराणे यांच्यांत परस्परमतभेद, विरोध व विसंगतता शेकड़ो स्थळीं आढळून येते; अशा स्थितीत खेचाखेची करून ओढाताणीने एक- वाक्यता करण्याचा प्रयत्न करण्याने जिज्ञासू मनुष्याचे समाधान होत नाहीं. (४) देशकालपरिस्थितीप्रमाणें निरनिराळ्या काळी व देशीं स्मृतिकारांनी निरनिराळे सामाजिक व राजकीय निबंध सांगितले आहेत; त्यामुळे स्मृतींमध्ये परस्परविरोध आढळतो; ही गोष्ट मीमांसकांनी बिनाकारण नाकारली आहे.

मन्वादी स्मृतिकारांनी जे धर्म उपदेशिले व विधिनिषेध सांगितले, ते केवळ लोकाहितबुद्धीनेच सांगितले, यात शंका नाहीं. स्मृतिकारांच्या उपदेशांत अनेक बाबतीत जरी विरोध दिसून येत असला तरी अनेक महत्त्वाच्या सिद्धांतांच्या बाबतीत एकवाक्यता व साम्य दिसून येते. श्रुती, स्मृती व पुराणे या हिंदुंच्या धर्मग्रंथात हजारो वर्षेपर्यन्त शांतपणें वाहणाऱ्या धर्मगंगेचीं अनेक वळणे, वेग व स्थैर्य, संकोच व विस्तार आपणांस पाहावयास सापडतात. म्हणून वेद, स्मृती व पुराणे व्यर्थ आहेत यांत शंका नाहीं. पण जे जे धर्मग्रंथोक्त ते ते सत्य, व जे जे सत्य ते ते धर्मग्रंथोक्त असले पाहिजे; अशी विचारसरणी अग्राह्य आहे.

सर्व माणसांची विवेकबुद्धी अपना सुखदुःखाचे प्रमाण ही धर्माधर्मनिर्णयाची शुद्ध व पूर्ण कसोटी होय असे म्हणता येत नाही हे खरे आहे. पण तपाने, वैराग्याने आणि सत्यनिष्ठेने शुद्ध झालेली विवेकबुद्धी हीच धर्माधर्माची शुद्ध कसोटी होय असे म्हटले पाहिजे. धर्मग्रंथ अथवा आप्तवाक्य इत्यादी कसोट्या विवेकबुद्धीनीच अपत्ये होत. कारण ऋषी, धर्मसंस्थापक, ईशप्रेषित इत्यादी व्यक्तीच्या शुद्ध विवेकबुद्धीचीच प्रतिबिंबे त्यांत पडलेली असतात. विवेकवाद जसजशी विकसित होत जाईल त्या त्या मानाने धर्माधर्मनिर्णयही पूर्णलेला प्राप्त होत जाईल. धर्मग्रंथदेखील धर्माधर्माचा निर्णय करण्यास पूर्ण समर्थ नाहीत असे आपस्तंब धर्मसूत्रांतही म्हटले आहे:--

**कृछा धर्मसमाप्तिः समाम्नानेन लक्षणकरणातु समाप्यते**

अर्थः ग्रंथांत धर्माचे पूर्णपणे निरूपण करणे कठिण आहे. परंतु व्याख्येच्या योगाने धर्मांचे पूर्ण स्पष्टीकरण करता येते.

विवेकबुद्धी ही व्याख्येच्या द्वाराने अथवा लक्षणद्वारा धर्माचा निर्णय करते. ज्याप्रमाणे रत्नपरीक्षक चक्षुच्या योगाने रत्नांच्या योग्यतेची परीक्षा करून रत्नांची मूल्ये ठरवितो; पण रत्नांची योग्यता ठरविष्यास रत्नांच्या ठायी वसत असलेल्या लक्षणांचे व गुणांचे तारतम्यः त्यास पाहावे लागते; त्याचप्रमाणे चक्षुसही धर्माधर्मनिर्णयार्थ लक्षणाने अथवा व्याख्येचे साहाय्य घ्यावे लागते. धर्मांची व्याख्या महाभारतांत भीष्मांनी व कृष्णांनी सांगितली आहे. ती व्याख्या जगांतील सर्व विवेकी पुरुषांस संमत होण्यासारखी आहे. प्राणिमात्राची व विशेषतः समाजाची ज्या योगाने धारणा होते तो धर्म होय, असे भीष्मांनी शांतिपर्वांत म्हटले आहे. 'लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः ' ह्या जगात समाज उत्तम चालावा म्हणून धर्माचे नियम केले आहेत. प्रजेचे धारण, भूतांचा प्रभाव, लोकयात्रा, अहिंसा इत्यादी शब्दांनी भीष्मांनी धर्मनिर्णयाची कसोटी दर्शित केली आहे. देशकालपरिस्थितीप्रमाणे धर्म व अधर्म बदलत असतात. पण निर्णयाची कसोटी अथवा धर्मलक्षण बदलत नाही.

**स एव धर्मः स चाधर्मः देशेकाले व्यवस्थितः**

बुद्धिवाद्यांनी या धर्मलक्षणाचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे: -

(अ) प्राणिमात्रांचे संरक्षण, (आ) उत्कृष्ट गुणांच्या प्राण्यांच्या संरक्षणाकरितां निकृष्ट प्राण्यांचे साहाय्य घेणे, (इ) निकृष्ट प्राण्यांचा उत्कर्ष होईल अथवा अपकर्ष होणार नाहीं अशी उत्कृष्ट प्राण्यांनी खबरदारी घेणे, (ई) विविध, व चिरंतन अशा आनंदाच्या, दुःखनाशाच्या व शांतीच्या प्राप्त्यर्थ सम्यक् प्रयत्न करणे, असे धर्मलक्षणाचे चार भाग आहेत. प्राण्यांचे संरक्षण म्हणजे व्यक्तिशः व जातिशः टिकाव धरून राहता येणे होय. जातीच्या (Species) रक्षणार्थ व्यक्तीनें स्वसुखाचा त्याग करणे आवश्यक आहे. तसेच उत्कृष्टांच्या व श्रेष्ठांच्या संरक्षणाकरिता निकृष्टांचा त्याग अपरिहार्य असल्यास तोही आवश्यक होय. 'श्रेयसे आत्मत्यागः' श्रेष्ठांकरितां आत्मत्याग करणे धर्म होय, असे कणादांनी वैशेषिक सूत्रांत म्हटले आहे.

वरील प्रकारचे धर्मलक्षण विद्यमान धर्मशास्त्रग्रंथात विहित अशा प्रत्येक क्रियेला बरोबर लागू होते, असे म्हणता येत नाही. कारण प्रमाणशास्त्राच्या किंवा सत्यनिर्णयपद्धतीच्या दृष्टीने धर्मशास्त्रोक्त सर्वच नियम पूर्ण अनुभवाच्या पायावर उभारले आहेत असे सांगता येत नाही. सत्यनिर्णयपद्धतीत मनुष्याला प्राप्त होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या सर्व ज्ञानाचे तीन वर्ग पडतात; व त्याप्रमाणे ज्ञेय सिद्धातांचेही तीन प्रकार होतात. (१) मनुष्याला तर्कशास्त्राच्या नियमानुसारे निरीक्षण व प्रयोग यांच्यायोगे जे सिद्धांत कळतात त्यास प्रत्यक्षसिद्धांत असे म्हणतात. (२) प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या गोष्टींची जेव्हा प्रत्यक्षसिद्धांतांनी उपपत्ती लागत नाहीं अशा वेळी ज्ञानसंशोधक त्या प्रत्यक्ष गोष्टींच्या उपपत्तीकरिता अप्रत्यक्ष वस्तुची कल्पना करतात; त्यास, कल्पित सिद्धांत म्हणतात. निरीक्षणाने व प्रयोगाने सिद्ध झालेला सिद्धांत कल्पितद्धांतापेक्षा अधिक दृढ असतो. गणितशास्त्रातील व भौतिकशास्त्रातील बरेच सिद्धांत हे प्रत्यक्ष सिद्धांत होत. गती, विद्युत्, ध्वनी, द्रव्याणु, वगैरे वस्तुंच्या संबंधी असलेले सिद्धांत रासायनिक प्रक्रिया इत्यादी प्रत्यक्षसिद्धांत होत; व ईश्वर, विकासवाद इ० कल्पितसिद्धांतांची उदाहरणे होत. प्रकाशलहरींच्या व आकर्षणाच्या उपपत्तीकरितां ईश्वराची कल्पना वैज्ञानिकांनी केली आहे. वनस्पतीच्या व प्राण्यांच्या क्रमिक उच्चनीच श्रेणींच्या उपपत्तीकरितां विकासवादाच्या विशाल कल्पनेला सृष्टिशास्त्रज्ञांनी जन्म दिला आहे. अशा सत्कल्पनांचा शास्त्राच्या बाबीस फार उपयोग होतो. (३) मनुष्याच्या इंद्रियावर व मनावर बाह्य विश्वाचे व कामक्रोधमुखदुःखादि मनोविकारांचे परिणाम होऊन अनेक कल्पनातरंग व भास उत्पन्न होत असतात. त्या कल्पनातरंगांच्या व भासांच्या सत्यासत्यत्वाची परीक्षा किंवा तपासणी न करता त्यांच्या पायावर मनुष्य अनेक सिद्धांत रचतो, त्यांस सिद्धांताभास असे म्हणतात. एवंच मनुष्याच्या ज्ञानाचे सत्यासत्यनिर्णयाच्या दृष्टीनें तीन प्रकार होतात. एक प्रत्यक्षजन्य निगमन (Proper Induction); दुसरी सत्कल्पना ( Hypothesis) व तिसरा भास; हे ते तीन प्रकार होत.

श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माचेही वरील ज्ञानाच्या वर्गीकरणाप्रमाणे तीन वर्ग पडतात. (१) प्रत्यक्षसिद्ध धर्म (२) कल्पनामूलक धर्म (३) व भासमूलकधर्म किंवा धर्माभास. वर्णव्यवस्था, आश्रमरचना, राज्यसंस्था, व सत्य-अहिंसा इत्यादी मूलभूत नीती यांसंबंधीं सांगितलेले हिंदुधर्मज्ञान धर्म प्रत्यक्षमूलक धर्म होत. कारण समाजाच्या प्रत्यक्ष उन्नतीशी त्यांचा निकट संबंध आहे. प्रत्यक्ष उन्नतीचे अथवा कल्याणाचे दोन विभाग आहेत. एक बहिरंग व दुसरा अंतरंग, बहिरंग-उन्नती म्हणजे व्यक्तीचे व समाजाचे रक्षण आणि इंद्रियजन्य व कलाजन्य आनंदाच्या प्राप्तीच्या साधनांची

समृद्धी होय. अंतरंग-उन्नतीचे पूर्णस्वरूप निर्द्वंद्वस्थिती हे होय. या स्थितींत मनुष्याचे अंतःकरण सर्व विकारांतून, सर्व कल्पनांतून, सर्व विकल्पांतून, सर्व संशयांतून मुक्त होऊन आकाशवत् स्वच्छ निर्मल भ्रांतिरहित होते. या स्थितीत शुद्धतत्त्वाचा अनुभव येतो असें संत म्हणतात. या स्थितीलाच स्थितप्रज्ञता, निर्वाण, परमशांती अथवा निःश्रेयस् असे म्हणतात. ही स्थिती प्रत्यक्षसिद्ध आहे. या स्थितीचा थोडाबहुत आंशिक अनुभव विवेकी पुरुषास येत असतो. अंतःकरणाच्या समतेने आनंदाचा व शांतीचा उदय होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. ज्या आचरणाने या उभयविध कल्याणाची प्राप्ती होते तेच सदाचरण होय.

ईश्वर, पुनर्जन्म, पापपुण्य, स्वर्गनरक हे कल्पितपदार्थ होत. तत्वज्ञानावरील ग्रंथांत या गोष्टींचा पुष्कळ खल केलेला आहे. जगांतील धार्मिक वाङ्मयांत अलौकिक दृष्टी, दिव्यानुभव, दिव्यचक्षु, अंतर्ज्ञान, दिव्यसाक्षात्कार, आर्षदर्शन इत्यादी शब्दांनी बोधित केल्या जाणाऱ्या अनुभवांचे क्षेत्र हेच कल्पित पदार्थ होत. हा दिव्य अनुभव वैयक्तिक किंवा केवळ अपवादभूत व्यक्तीसच येत असल्यामुळे त्यासंबंधी अनुकूल किंवा प्रतिकूल असे कांहीच या ठिकाणी या लेखकास सांगावयाचे नाही. ही वैयक्तिक दिव्यदृष्टी जोपर्यंत वर सांगितलेल्या प्रत्यक्षसिद्ध समाजधारक धर्माशी अविरोधी असेल तोपर्यंत त्या दिव्यदृष्टीबद्दल वाद करण्याची जरूरी नाही. हा वैयक्तिक दिव्यानुभव वगळल्यास ईश्वर, जीवात्मा, पुनर्जन्म, पाप-पुण्य, स्वर्गनरक या वस्तू केवळ कल्पनागम्य आहेत. कारण मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही न मेलेला कोणीही परत आला नाहीं. या गोष्टी केवळ तर्कगम्य आहेत. पण तर्क परस्परविरुद्ध रीतीने उत्पन्न होतो. नेमक्या एकाच बाजूला तर्क उपयोगी पडत नाही. तर्क ईश्वराची सिद्धिही करतो व ईश्वराचा अभावही सिद्ध करतो. पुनर्जन्माचे समर्थनही करतो न निराकरणही करतो. तर्काचे शस्त्र जसे वापरावे तसे चालते, तर्क दुधारी व दुटप्पी आहे. म्हणून तर्कास ब्रह्मसूत्रकारांनी अप्रतिष्ठित मानिले आहे. ईश्वराची कल्पना कर्मफलाच्या व विश्वाच्या व्यवस्थित रचनावैचित्र्याच्या उपपत्तीकरितां केली आहे. या जगांतील एखाद्या सुंदर वस्तुची नुसती प्रतिकृती रेखाटण्यास जर अत्यंत कुशल चित्रकारास आपले बुद्धिसर्वस्व व कौशलसर्वस्व खर्च करावे लागते, तर या सुंदर व अनंत वस्तुंचा खजिना असलेल्या विश्वाच्या विशाल स्वरूपाचा कोणीच कर्ता नाही. याच्या निर्मितीला बुद्धीचे न विचारांचे अधिष्ठान नाही असे विचारवंतांस म्हणता येणार नाही, अशा विचारसरणीने देवाची सिद्धी दार्शनिकांनी केली आहे. स्वर्गनरकाचें द्वंद्वही कल्पनामूलकच आहे. ती कल्पना अशी आहे. सदसत्कर्मांचे फळ सत्कर्म करणाऱ्या व्यक्तीलाच मिळाले पाहिजे असा या जगांत नियम नाही, असे जर मानिले तर व्यक्तीने असत्कर्मापासून फायदा होत असेल तर असत्कर्म कां त्यागावे? व सत्कर्माने कष्ट आणि यातनाच पदरात पडत असतील तर त्या व्यक्तीने सत्कर्मच का करावे? या प्रश्नाचे समाधान होत नाही. अनेक सज्जनांना दुःखे सोसावी लागतात व अनेक दुर्जन सुखात लोळत असतात अशी स्थिती पाहिली म्हणजे जग अन्यायाने भरले आहे असे वाटू लागते. या संशयाचे निराकरण करण्याकरिता-नीतीची संस्थापना करण्याकरिता- "सर्व जगांत नीतीचेच साम्राज्य आहे; जो जसे करतो तसे फळ भोगतो." ही विशाल भावना मानवजातीच्या हृदयांत स्थिर करण्याकरिता पाप-पुण्य व पाप-पुण्य फलद्रूप होण्याचे क्षेत्र असलेले स्वर्गनरकच धार्मिकांनी कल्पिले आहे. ज्याप्रमाणे एका प्राणिवर्गातून विजातीय प्राणिवर्ग विकासनियमाप्रमाणे

उद्भवतो, असे निरीक्षणाने किंवा प्रयोगाने सिद्ध झालेले एकही उदाहरण विकासवादांत सापडत नाही, तरी वनस्पतींच्या व प्राण्यांच्या श्रेणीबद्ध तारतम्ययुक्त अशा सोपानपरंपरेच्या उपपत्तीकरिता विकासवादाचे नियम लामार्क, डार्विन व त्यांचे अनुयायी यांनी कल्पिले आहेत, त्यामुळे कितीतरी सच्छास्त्रांची वाढ झाली आहे; त्याचप्रमाणे नीतिनियम, सृष्टिरचना, विश्ववैचित्र्य व मानसशास्त्रांतील अनेक गहन कूटे उकलण्याकरिता ईश्वर, जीवात्मा, पुनर्जन्म, कर्मविपाक इत्यादी वस्तुंच्या कल्पना उत्पन्न झाल्या. या कल्पनांच्या पायावर समाजधारक संस्थांचे अनेक नियम व इतर विधि-निषेध उभारले गेले आहेत. या कल्पनांचा व भावनांचा मनुष्याच्या आचरणावर चांगला परिणाम झाला आहे. या भावनांनी मनुष्याच्या स्वार्थी प्रवृत्तीला चांगला आळा बसला आहे. म्हणून कल्पित सिद्धांतांच्या आधारावर उभारलेल्या कर्मकांडाचे व उपासनाकांडाचे पूर्वोक्त प्रत्यक्षसिद्ध धर्मास उत्तम साहाय्य मिळते असे दिसतें. Religion या शब्दाने या कल्पित सिद्धांतांच्या आधारावर अधिष्ठित आचरणांचा व भावनांचा बोध होतो. 'मनुस्मृती', 'याज्ञवल्क्यस्मृति' वगैरे धर्मशास्त्रवाङ्मयांत या कल्पितसिद्धांतांशी जोडलेल्या प्रत्यक्षसिद्ध उमाजधारक नियमांचे विवरण अधिक दिसते. मनुस्मृतीत सत्य, आहिंसा, इंद्रियसंयम, इत्यादिकांना 'यम' अशी आणि पूजा, ध्यान, उपासना इत्यादिकांस 'नियम' अशी संज्ञा आहे. यम सोडून नियमांच्या वाढीस लागणारा मनुष्य पतित होतो असे मनुस्मृतीत सांगितले आहे. याचा अर्थ असा दिसतो की, कल्पनेवर आधारलेल्या धर्मापेक्षा प्रत्यक्षसिद्ध धर्मास अधिक महत्त्व आहे. आश्रमधर्मात आश्रितधर्माचा जरी समावेश होत असला तरी प्रात्यक्षिक धर्माचा त्यांत बाहुल्याने समावेश होतो. उदाहरणार्थ, ब्रह्मचर्याश्रमांतील इंद्रियनिग्रह, गुरुशुश्रूषा व विद्यासंपादन; गृहस्थाश्रमांतील स्वदारती, अपत्यसंगोपन व अतिथिसेवा; संन्यासांतील अहिंसा, साम्यदृष्टी व तत्त्वचिंतन हे सर्व प्रत्यक्ष धर्म होत. कारण या धर्माचे आपल्या अंतःकरणावर व समाजावर होणारे सत्परिणाम अनुभवाने आकलन करता येतात. कल्पित सिद्धांतांची (हेच सिद्धांत दिव्यानुभवाचे किंवा दिव्यदृष्टीचे क्षेत्र आहेत.) प्रत्यक्षसिद्ध धर्मांना जोड देऊन जगांतील धर्मशास्त्र लिहिले गेले आहे. प्रत्यक्ष सिद्ध धर्मामध्यें पूर्वोक्त धर्मलक्षणानुसाराने वेळोवेळी बदल करणे धर्मज्ञांचे व समाजधुरीणांचं कर्तव्य आहे. पण कल्पित सिद्धांतांची (म्हणजेच दिव्यदृष्टीची, व अलौकिक आर्ष अनुभवाची) जोड देऊन प्रत्यद्बधर्म धर्मशास्त्रांत लिहिले गेलेले असल्यामुळे गतानुगतिक पंडित व जनता या प्रत्यक्षसिद्ध धर्मात धर्मज्ञांस हात घालू देत नाहीं. कारण त्यांची अशी मिथ्या भावना असते की धर्मशास्त्रांतील सर्वच वाक्ये अक्षरशः दिव्य अलौकिक, त्रिकालाबाधित अनुमवांतून अथवा ईश्वरापासून उत्पन्न झाली आहेत. जगाच्या इतिहासाची शेकड़ो पानें या कल्पित धर्माच्या फाजील अभिनिवेशाने म्हणजे धर्मवेडाने रक्तपात होऊन लाल झाली आहेत. वस्तुतः कल्पित धर्मापेक्षां प्रत्यक्ष धर्माचीच काळजी व्यासांसारख्यांना अधिक होती, उदाहरणार्थ गीतेत एखाद्या कल्पितसिद्धांतावर उभारलेल्या यशाचे किंवा व्रतवैकल्याचे कर्मयोगाच्या सिध्यर्थ उदाहरण न घेता युद्धासारख्या प्रत्यक्षसिद्ध व्यावहारिक कर्तव्याची उदाहरणादाखल निवड केली आहे.

धर्मशास्त्रोक्त कांहीं आचार मनुष्याच्या इंद्रियाला व मनाला होणाऱ्या भासावर उभारले आहेत. शकुनाच्या कल्पना, पिशाच-कल्पना, अद्भुत- चमत्कारांच्या कल्पना, चंद्रसूर्यग्रहण, धूमकेतु, वगैरे दुर्निमित्तांच्या कल्पना, चेटूक, मंत्र, जादू, गंडे, दोरे, इत्यादि वस्तुंच्या अचाट सामर्थ्यांबद्दल

असलेल्या कल्पना, पर्जन्य पडण्याकरितां, युद्धांत विजय मिळण्याकरिता, दुष्काळ, सांथीचे रोग वगैरे अनिष्टे टाळण्याकरिता, पुत्रप्राप्तीकरिता व इतर इष्ट प्राप्तीकरिता वेदांत सांगितलेल्या इष्टी होम वगैरे विधिच्या निश्चित सफलतेच्या कल्पना, हे सर्व इंद्रियांचे व मनाचे भास व निर्मूल कल्पना, तरंग होत. या कल्पनांवर उभारलेले धर्म धर्माभास किंवा मिथ्याधर्म होत. समाजाच्या अज्ञानावस्थेत या आभासमूलक धर्माचे फार प्राबल्य असते. या धर्मशास्त्रोक्त किंवा श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माभासांचा शक्य तितका उच्छेद व निर्मूलन करणे जरूर आहे. आभासमूलक धर्म हा समाजाच्या बुद्धिमाद्याचे लक्षण आहे. प्रात्यक्षिक धर्म, कल्पितधर्म व धर्माभास यांपैकी धर्माभास हे त्याज्य आहेत. कल्पितधर्म प्रत्यक्षधर्मापेक्षां गौण आहेत. प्रत्यक्ष धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म असून समाजाच्या व व्यक्तीच्या प्रगतीकरिता त्याचे संशोधन व विवरण अधिकाधिक केले पाहिजे. प्रत्यक्षसिद्ध धर्माचे ध्येय केवळ बाह्यसुखसाधनांची वाढ एवढेच नसून चित्तशुद्धी, आत्मोद्धार व स्थितप्रज्ञावस्था हे त्यांचे श्रेष्ठ ध्येय आहे. बाह्यसाधनांची वाढ हे त्याचे गौण लक्षण आहे.

व्याख्यानाचे प्रारंभी तपस्वी बाबासाहेब परांजपे यांनी असा प्रश्न विचारला की, बुद्धिवादी व पूर्वमीमांसापद्धतीचा पुरस्कार करणारे धर्ममीमांसक यांच्यांत महत्त्वाच्या मुद्यांवर एकवाक्यता होईल काय? यावर माझे असे म्हणणे आहे की, होय; मुख्य मुद्यावर एकवाक्यता शक्य आहे. बुद्धिवादी असे म्हणतात कीं, समाजाची सुस्थिती राखून ज्याच्या योगाने समाज घटक व्यक्ती परस्परांच्या अविरोधाने किंवा सहकारितेने स्वतःचा उत्कर्ष करून घेतात, तोच धर्म होय. स्थितप्रज्ञता हे या उत्कर्षांचे फलित आहे. यापुढे तर्काची एक पायरी ओलांडून बुद्धिवादी असे म्हणेल की, हे समाजधारक आचरण मनुष्यास मरणोत्तर उत्तम गती प्राप्त करून देते. मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या गतीबद्दल बुद्धिवाद्यास पूर्णज्ञान नसले तरी शास्त्रग्रंथांवर त्याबाबतीत भरवसा ठेवण्यास फारसा प्रत्यवाय नाही. समाजधारक व निःश्रेयसकारक आचरण कोणते याचा निश्चय करण्याचे सामर्थ्य मनुष्याच्या शुद्धबुद्धीत आहे, ही गोष्ट मीमांसकांनी नाकारण्याची जरूर नाहीं. समाजधारक व परमशांतिजनक आचरण कोणते याचा निर्णय सत्यनिष्ठ, अद्वेषरागी व विद्वान मनुष्यांनी करावा व ते आचरण मरणोत्तर सुगतीस प्रसवते याचा निर्वाळा वेदांनी द्यावा. जे आचरण या जगात व्यक्तीस किंवा समाजास कोणत्याही रीतीनें परमकल्याणदायी दिसत नाही असे बुद्धी सांगते, त्याच्या योगे मरणोत्तर दुर्गती प्राप्त होते असे वेदाने म्हणावे. अशा रीतीने ग्रंथप्रामाण्यवादी व बुद्धिवादी यांचा समन्वय होऊं शकेल. या रीतीनें अनुभवाला व बुद्धीला स्वातंत्र्य मिळते व धर्मग्रंथांचे पूज्यत्व कमी होत नाहीं, बुद्धीचा व अनुभवाचा पराभव होत नाहीं व विकासाचा अनंत मार्ग निर्वेध होतो.

** (ता. ११-३-३० रोजी नागपूर येथे राजाराम ग्रंथालयांत दिलेले व्याख्यान! १६-३-३० च्या 'महाराष्ट्रा' वरून थोडा फरक करून.)*

**(* संदर्भ - 'धर्मनिर्णयस्वरूप - पं. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे, परचुरे पुराणिक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई- ४ प्रथमावृत्ती - २७ नोव्हेंबर, १९३३, पृ ३३६ ते ३५२)**

ООО

१७

# महाराजा सयाजीराव गायकवाड सत्कार समारंभ प्रसंगीचे स्वागतपर भाषण

*(एप्रिल १९३३ मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड बडोदे संस्थान, गुजरात हे महाबळेवर येथे आले होते. परतीच्या प्रवासात त्यांनी वाईस भेट दिली. त्यावेळी वाईच्या विविध संस्थांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला होता. त्याप्रसंगीचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्वागतपर भाषण.)*

वाईतील सर्व संस्थांतर्फे प्राज्ञपाठशाळेचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रारंभी वाईत होत असलेल्या कार्याची रूपरेखा सांगून महाराजांचे खालील शब्दात स्वागत केले. ते म्हणाले, ''सरकार महाराज, आपण इतक्या वृद्धापकाळी तसदी घेऊन येथे आलात, याबद्दल वाईच्या जनतेस अत्यंत कृतज्ञता वाटत आहे. अनेक राजे, महाराजे वाईवरून जातात, पण आपलेच स्वागत करावे असे आम्हास का वाटले? आपण महाराष्ट्राच्या पूर्ववैभवाचे, राज्यलक्ष्मीचे व मुत्सद्देगिरीचे अवशिष्ट राहिलेले प्रतीक आहात. हिंदुस्थानातील संस्थानिकांमध्ये सुव्यवस्थितपणे राज्य चालविण्याचे अप्रतिम कौशल्य आपल्या ठिकाणी आहे. सक्तीचे शिक्षण प्रथम सुरू करून मूक जनतेस आपण बोलके केलेत. हिंदुस्थानातील समाजसुधारकांत आपण अग्रगण्य आहा. नवयुगांचे मुख्य लक्षण जी लोकसत्ता तिचे बीजारोपण आपल्या राज्यात आपण केले आहे. ज्ञानी जनांचा परामर्श व सरस्वतीची निष्काम सेवा हे गुण आपल्या ठिकाणी वास करीत आहेत. या सर्व गुणांच्यावर कळस चढविणारी गोष्ट म्हणजे हिंदुस्थानच्या राज्यघटनेच्या प्रश्नांत अत्यंत अडचणीचा प्रश्न फेडरेशनचा होता. पण मातृभूमीच्या भक्तीने प्रेरित होऊन आपण त्यास स्फूर्ती दिलीत व त्याकरिता आपले स्वातंत्र्य मर्यादित करण्यास आपण तयार झालात. आपल्या आगमनाने आम्हास यावेळी असे वाटत आहे की, आम्ही स्वराज्यातच आहोत. आम्ही राजेरजवाड्यांची स्तुती करणारे भाट नाही. पण आपले सद्गुणच आम्हास बोलावयास लावतात. वृद्ध वैद्य, वृद्ध तत्त्वज्ञानी व

वृद्ध राजा यांना जरेने वैगुण्य न येता त्यांची श्रेष्ठता व शोभा वाढतच असते. वाईची जनता अशा रीतीने आपले मन:पूर्वक स्वागत करीत आहे.''

**[‘प्रज्ञानंद’ अमृत महोत्सव स्मरणिका २५-०१-१९९४)**
**श्री. सयाजीराव गौरवग्रंथातून साभार (मूळ संदर्भ)]**

❍❍❍

१८

# हिंदू धर्मविकास व सर्वधर्मांचा समन्वय

धर्म हा मनुष्यसमाजाच्या उत्पत्तीबरोबरच उत्पन्न झाला आहे. मनुष्याला माणुसकी जेव्हापासून येऊ लागली व पशुत्व कमी होऊ लागले तेव्हापासून धर्माचा उद्भव झाला आहे. 'सह यज्ञा: प्रजा: सृष्ट्वा पुरोवाच प्रजापति: । अनेन प्रसविष्यध्वं एव वोस्त्विष्टकामधुक' गीतेत सांगितले आहे की, सृष्टीकर्त्याने प्रजा यज्ञासहच निर्माण केली. यज्ञ हा त्यावेळचा धर्म होता किंवा यज्ञ म्हणजे धर्म होय.

मनुष्यसमाजाचा प्राचीन इतिहास जर पाहिला तर त्यात मनुष्याच्या प्रगतीचे किंवा सर्व तऱ्हेच्या मानवी कर्तृत्वाचे प्रतिबिंब धर्मसंस्थेत पडलेले दिसते. धार्मिक प्रेरणेनेच प्राचीन काळच्या माणसाची भिन्न भिन्न क्षेत्रांत प्रगती झालेली आहे. धार्मिक प्रेरणा हीच प्राचीन मानवाची स्फूर्ती होती. काव्ये, शास्त्रे, तत्त्वज्ञान, नीती, संगीत, चित्रण, स्थापत्य इत्यादी मनुष्याच्या सुधारणेची साधने किंवा लक्षणे धर्मसंस्थेच्या धुरिणत्वाखालीच वाढीस लागलेली आहेत. रामायणासारखे महाकाव्य, महाभारतासारखा नीतिशास्त्राचा ग्रंथ, षड्दर्शनाचे तत्त्वज्ञान, पाणिनीय व्याकरण, पिंगलाचे छंद:शास्त्र, भरताचे नाट्य, विशाल मंदिरे, मशिदी, चर्चे, मूर्तिकला या सर्व गोष्टी धर्मसंस्थेच्या छायेत विस्तार पावल्या आहेत. चिरंतन शांतीचा मार्ग व आदर्श समाज निर्मितीचा प्रयत्न प्राचीनकालीन धर्मसंस्थांनीच केला आहे.

धर्मसंस्था उत्पन्न कशी झाली याचे उत्तर असे देता येईल - कोणत्याही जीवाचा पहिला प्रयत्न जगण्याचा असतो. त्याकरिता तो साधने शोधत असतो. यातच त्याच्या प्रगतीचे बीज असते. मनुष्याचा प्रयत्न नुसता जगण्याकरिता नसतो. त्यात त्याची प्रगतीची इच्छा प्रकट झालेली असते. बहुविध, वैचित्र्यपूर्ण, विशाल व सुंदर जीवनाची मनुष्याच्या ठायी आकांक्षा आहे. बहुस्यां, प्रजायेयेति छांदोग्य, अनेकरूप व्हावे व नवीन नवीन निर्मिती करावी, अशी आशा त्यांच्या जीवनात भरून राहिली आहे. सुप्रजास्त्वाय सुवीर्याय । (यजुर्वेद). सुप्रजा

व श्रेष्ठ सामर्थ्य त्याला पाहिजे. त्याकरिता सृष्टीतील शक्तीचे साहाय्य त्याला पाहिजे व आत्मशक्तीचा विकासही व्हावयास पाहिजे. प्राचीन कालातील मानवांचा अदृष्ट सृष्टी शक्तीचे साहाय्य मिळविण्याचा व अगाध आत्मशक्तीच्या विकासाचा एक प्रकारचा प्रयत्न म्हणजेच धर्म होय. धर्माचा इतिहास म्हणजे बाह्य सृष्टीतील अदृष्ट शक्तींच्या शोधाचा व गूढ आत्मशक्तीच्या विकासाचा इतिहास होय.

हिंदू धर्माचा इतिहास कोणत्या दिशेने बनला, हिंदू धर्माला आजचे स्वरूप कालगतीने कोणत्या पद्धतीने प्राप्त झाले, याचे सूत्र तपासणे जरूर आहे. जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल याने विश्वरचनेची व समाजघटनेची व विचारघटनेची एक सूत्रमय पद्धती सांगितली आहे. त्या पद्धतीस विरोध समन्वयपद्धती (Dialectic method) म्हणतात. हेगेलच्या तत्त्वज्ञानातील सर्वांत मोठा विशेष म्हणजे ही पद्धती होय. या पद्धतीचे तीन भाग आहेत. Thesis म्ह. पक्ष, प्रथमत: उत्पन्न होणारी स्थिती किंवा तर्कशास्त्रदृष्ट्या प्रथमत:च स्वीकारणीय अवश्य व अपरिहार्य अशी कल्पना अथवा परिस्थिती.

Antithesis म्ह. विपक्ष, पहिल्या पक्षाच्या विरुद्ध, पहिल्या स्थितीस विरोध करणारी, तर्कशास्त्रदृष्ट्या पहिल्या कल्पनेच्या निषेधार्थ उत्पन्न होणारी स्थिती किंवा कल्पना इ. Synthesis म्ह. समपक्ष. परस्परविरुद्ध असलेल्या पक्ष-विपक्षांचा समन्वय करणारी, दोन्ही प्रकारांतील तात्त्विक व सारभूत अंशाचे संगमाने बनलेली स्थिती किंवा कल्पना.

वरील पद्धतीचे स्वरूप अधिक गहन आहे. पण प्राचीन हिंदू धर्मज्ञांनी व मीमांसकांनी काही अंशी वरील पद्धतीच हिंदू धर्माला लागू केली आहे. त्यांनी विरुद्ध संप्रदायांचा अविरोध व अनेक पंथांचा समुच्चय करण्याची रीती हिंदू धर्मात आहे असे स्वीकारले आहे. या पद्धतीचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे. हिंदू धर्माच्या प्राचीन इतिहासाला ही पद्धती कशी लागू पडते याचे वेदोक्त धर्माचे उदाहरण घेऊन मी स्पष्टीकरण करतो.

निसर्गातील विविध शक्तींच्या आधारावरच मनुष्याच्या संस्कृतीस प्रथमत: आरंभ झाला आहे. हिंदुस्थानात आर्यांनी प्रथमत: वसाहत केली. येथील पर्जन्य, शीत व उष्मा यांचे सम प्रमाणाचे बनलेले सुंदर ऋतुचक्र, सुपीक भूमी, सरस्वती, सिंधू, गंगा, यमुना इत्यादी दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, निरभ्र आकाश, मंगल उष:काल, पौर्णिमेचा पूर्ण चंद्र, अमावास्येची तारकासंपन्न काळी रात्र इत्यादी निसर्ग देवतांच्या कृपेने आर्यांचे वैभव वाढीस लागले. या देवांच्या कृपेने त्यांची रचनात्मकतेने कृषिप्रधान संस्कृती स्थापन झाली. त्यामुळे ‘वेदत्रयी’त सूर्य, चंद्र, इंद्र, उषा, द्यावापृथिवी, वरुण, पूषा, सरस्वती इ. निसर्गदेवतांचे स्तवन, हवन व गानरूप यज्ञधर्म निर्माण झाला. यज्ञ हा आर्यांचा पहिला धर्म होता. तानि धर्माणि प्रथमान्यासन् (ऋग्वेद). पुरोहितवर्ग, शासकवर्ग व वणिकवर्ग असे तीन वर्ग आर्यांत निर्माण झाले. ते युद्धाच्या सुधारलेल्या साधनांनी येथील जमिनीचे स्वामी झाले. यज्ञधर्म त्यांच्या समृद्धीचा, ऐश्वर्याचा व नित्य प्रयत्नांचा अंगभूत होता. दैनिक, पाक्षिक, मासिक, वार्षिक, चतु:वार्षिक,

द्वादशवार्षिक, सहस्रसांवत्सरिक असे सोमरसाचे याग, पशुयाग व पुरोडा म्हणजे यज्ञ होय. पुरोहितवर्गाचे श्रेष्ठत्व यज्ञांत स्थापित झाले. हा वर्ग स्वत:स भूदेव समजू लागला. यज्ञाने व मंत्रानेच देवांना देवत्व आले आहे आणि यज्ञ व मंत्र ब्राह्मणाधीन आहेत असे हा वर्ग सांगू लागला. दक्षिणेशिवाय यज्ञाची पूर्तताच होत नाही असे जगाला सांगितले. शूद्रास म्ह. श्रमोपजीवी वर्गास, तो आर्यांच्या दास्यांत असल्यामुळे धर्माचा व यज्ञाचा अनधिकारी ठरविले.

कालांतराने या यज्ञसंस्थेविरुद्ध म्ह. कर्मकांडाविरुद्ध भावनेचा उदय झाला. यज्ञाचे बाह्य स्वरूप व्यर्थ अवडंबर वाटू लागले. त्याचे मानसिक उपासनेत रूपांतर होऊ लागले. आत्मा हा यजमान, सत्यावरील श्रद्धा ही पत्नी, क्रोध हा यज्ञात बळी द्यावयाचा पशू, कामविकार हे घृत, तप हा अग्नी, शरीर हे काष्ठ, अशा रीतीने नैतिक व शुद्ध जीवित हाच खरा यज्ञ होय, असे उपनिषदकार सांगू लागले. कर्मकांडातील अश्वमेधापेक्षा, सर्व ब्रह्मांड किंवा विवच एक अश्व असून या विश्वाची क्रिया हाच खरा यज्ञ होय, अशी भावना उपनिषदांत (बृहदारण्यक अ. १ खं. १) सांगितला आहे. अहिंसा, सत्य, इंद्रियसंयम, शम-दम, तितिक्षा इत्यादी आत्मगुण हीच जीवितरूप यज्ञाला पूर्णता आणणारी दक्षिणा होय असा विचार उत्पन्न झाला. आत्म्यांतच सर्व देवता आहेत. आत्मा हाच सर्व देवमय आहे, कारण सर्व कर्मकांड व त्यातील देवता मनानेच निर्मिल्या आहेत अशा विचाराने उपनिषद वाङ्मय भरलेले आहे. विश्वातील इंद्र, चंद्र, अग्नी, सूर्य इत्यादी शक्तीपेक्षा आत्मशक्तीचाच प्रभाव मानवजीवनावर अधिक आहे, असा अनुभव उपनिषदांत व्यक्त केलेला दिसतो.

या आत्मप्रवण विचारातून, आत्मनिष्ठेतून संन्यास धर्माचा उद्भव झाला. या आत्मनिरीक्षणांतूनच तप:प्रधान जैन धर्म, विचारप्रवण सांख्ययोग आणि शमप्रधान व नीतिपरायण बौद्ध धर्म उदयास आला. त्यामुळे यज्ञधर्माला व सामाजिक क्रियांना गौणत्व आले. सामाजिक जबाबदारीस व गृहस्थधर्मास कमी प्रतीचे स्थान मिळाले. मुनी, संन्यासी, श्रमण व भिक्षु यांचा दर्जा वाढला, यांना मान्यता व धन्यता प्राप्त झाली.

हिंदुस्थानात वैदिक आर्यांच्या शिवाय इतरही अनेक संस्कृतीचे लोक प्राचीन काळी राहत होते. त्यात शैव व वैष्णव भक्तीचेही संप्रदाय चालू होते. त्यांना ग्रंथांत स्थान नव्हते. वरील आत्मप्रधान धर्मांच्या उत्कर्षाचे वेळी या भक्तिमार्गीयांनी उचल खाल्ली. अहीर, द्रविड इत्यादी देशांत हे संप्रदाय होते. या भक्तिसंप्रदायास वासुदेव देवकीपुत्र कृष्णाने उचलून धरले. त्याच्या आधिपत्याखाली यज्ञधर्माच्या ऐवजी वर्णधर्मांचा पुरस्कार झाला. पोकळ याज्ञिक कर्मकांडाचे ऐवजी सामाजिक कर्मास वासुदेवाच्या संप्रदायाने प्राधान्य दिले. दैवी संपत्ती म्हणून जैन व बौद्ध धर्मात वैशिष्ट्याने पुरस्कारिलेल्या नैतिक जीवनास श्रेष्ठता दिली. यज्ञरूपी नौका जीर्ण व खिळखिळया झाल्या आहेत. त्यात धोका आहे. या उपनिषदांतील विचारांचा अनुवाद करून, भक्तीस प्राधान्य दिले. उपनिषदांतील निवृत्तीस अनासक्ती व

समचित्तत्व या रूपाने स्वीकारले. अशा रीतीने वैदिक भक्तियुक्त कर्मकांड व उपनिषदांतील, सांख्य योगातील आणि जैन, बौद्धातील ज्ञानयुक्त वैराग्ययोग यांचा समन्वय गीतेत केला. तेव्हा औद्योगिक व ललितकलांच्या संपादनाने, उच्च व हीन शिल्पांच्या साधनाने, उन्मत्त झालेला शूद्रवर्ण दास्यांतून मुक्त झाला होता. त्याचा या भागवतधर्मात समावेश झाला होता. अशा रीतीने गीता ही अनेक संप्रदाय मार्ग व निष्ठा यांच्या संगमाचे स्थान बनली.

हिंदू धर्माच्या इतिहासात या देशातील मनुष्य जातीत निर्माण झालेल्या विविध मार्गांचा, संप्रदायांचा, आचारांचा व कल्पनांचा समावेशन व एकीकरण कशा पद्धतीने झाले याचे स्पष्टीकरण करण्याकरिता, वैदिक धर्माच्या परिवर्तनाचे उदाहरण वर दिले. या परिवर्तन पद्धतीचे सिद्धांत थोडक्यात सांगतो. हे सिद्धांत हिंदू धर्मात आजपर्यंत समाविष्ट झालेल्या अनेक अंगांच्या निरीक्षणाने सूचित होतात. ते सिद्धांत येणेप्रमाणे -

अ) अगोदर एका विशिष्ट भौतिक व आर्थिक परिस्थितीत एक संप्रदाय उत्पन्न होतो. नंतर त्या संप्रदायाची पूर्ण वाढ होते. पुढे त्या संप्रदायाचे कार्य संपत आल्यावर त्यातील दोष प्रकट होऊ लागतात. तो संप्रदाय अपूर्ण व सदोष ठरतो. त्यामुळे तद्विरोधी संप्रदाय उत्पन्न होऊ लागतो. त्या दोन्ही संप्रदायात झगडा होऊ लागतो. त्या झगड्यातून दोन्ही संप्रदायातील आवश्यक व इष्ट आचारविचारांचा संग्रह करणारा तिसरा नवीन सिद्धांत स्थापित होतो. या नवीन उत्पन्न झालेल्या संप्रदायाचीही पहिल्या संप्रदायाच्या ठायी स्थापना होते व कालांतराने त्याची पूर्वीच्या संप्रदायाप्रमाणेच गती होते. असा अव्याहत क्रम सुरू असतो. मानव समाजाचे स्वरूप अतिशय गुंतागुंतीचे असल्यामुळे ही विरोधसमन्वय पद्धती ओळखणे अवघड आहे.

आ) एकाच काली किंवा भिन्न भिन्न काळी, निरनिराळ्या असलेल्या समाजात विभिन्न संप्रदाय उत्पन्न होतात. कालगतीने त्यांची गाठ पडली म्हणजे त्यांच्यात विनिमय व विरोध सुरू होतो. काही काळाने विरोध शमतो व दोन्ही संप्रदाय एकमेकात मिसळतात. यास समुच्चयपद्धती म्हणता येईल. स्मार्त व आगमिक आचारांचे संमिश्रण याच पद्धतीने झाले आहे.

इ) एकाच समाजात उत्पन्न झालेले संप्रदाय काही काळपर्यंत झगडत असतात. कालांतराने झगडा संपतो; पण ते दोन संप्रदाय मिसळत नाहीत. शैव व वैष्णव भक्तिमार्ग यांचा आज असाच संबंध आहे. भागवतात जैनांचे तीर्थंकर ऋषभदेव व बुद्ध परमेश्वराचे अवतार म्हणून मानिले आहेत, हेही याच पद्धतीचे एक उदाहरण आहे.

उ) एकाच संप्रदायात देशकालपरिस्थितीमुळे लहान लहान बदल त्या संप्रदायाचे लोक किंवा धुरीण करीत असतात किंवा हे बदल आपोआप घडून येत असतात. उदाहरणार्थ वर्णाश्रमधर्मातील मांसश्राद्ध, असवर्णविवाह, नियोगविधी इत्यादी प्रचार आज बंद पडले आहेत.

वरील चार सिद्धांत हिंदू धर्मातील सर्व अंगांना लागू पडतात. आपणापुढे पूर्वीपेक्षाही मोठे प्रश्न आज उभे आहेत. ख्रिश्चन धर्म व मुसलमान धर्म मोठे प्रभावशाली व पराक्रमी धर्म हिंदुस्थानात येऊन दाखल झाले आहेत. जैन, बौद्ध, हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी जगातील प्रसिद्ध धर्मांचे संमेलन हिंदुस्थानात भरले आहे. जगातील पहिला मोठा मिशनरी धर्म बौद्ध धर्म होय. या देशात तो फारच थोडा शिल्लक आहे. पारशी, जैन, शीख व हिंदू यांचे धर्म आक्रमणरहित व स्वस्थ आहेत. ख्रिचन धर्म व मुसलमान धर्म साऱ्या जगास पादाक्रांत करण्याचा पराक्रमी उद्देश जन्मत:च बाळगीत आहेत. मुसलमान धर्म व ख्रिश्चन धर्म इतर कोणत्याही धर्माशी सहिष्णुतेने नांदू इच्छित नाहीत. भारतवर्षात या धर्मांचा इतर धर्मांशी समागम घडला आहे. भारतवर्ष सर्व धर्मांच्या संगमाचे प्रयाग बनणार, की संग्रामभूमी बनणार, असा प्रश्न आपणास चिंताग्रस्त करीत आहे.

धर्माचा संग्राम हा शब्दसमुच्चय ऐकूनच सात्त्विक मन कंपित होते. धर्म हा मानवांच्या रक्षणार्थ उत्पन्न झाला आहे की भक्षणार्थ? मानवसमाजाच्या इतिहासाची काही पाने धर्मयुद्धाच्या रक्ताने लाल झाली आहेत. हा मानवाचा काळा इतिहास आहे. या इतिहासाची पुनरावृत्ती व्हावी काय?

धर्माचे शाश्वत स्वरूप वस्तुत: शांत व शिव आहे. मनुष्याने लोभाने त्यात दोष पैदा केले आहेत. त्यातील मुख्य दोष पुढीलप्रमाणे आहेत.

१. पुरोहितवर्गाचा स्वार्थ व अहंकार. परमार्थप्राप्तीच्या मार्गाचा हा वाटाड्या पुष्कळ वेळा वाटमाऱ्या झाला आहे. प्रतिगृही बनून अनेक वेळा सत्ताधीशांचा हस्तक व खुशमस्कऱ्या बनला होता.

२. अमुकच एक धर्मसंस्थापक निर्दोष, सर्वज्ञ आहे किंवा ईश्वराचा प्रिय प्रेषित आहे अथवा ईश्वराचा खरा अवतार आहे, दुसरे धर्मसंस्थापक सदोष, अल्पज्ञ, ईश्वराचे नावडते व भ्रांत होते, या भावनेने सांप्रदायिक आग्रह उत्पन्न झाला व जगात धर्मयुद्धे उत्पन्न झाली.

३. अमुकच एक पुस्तक पूर्ण प्रमाण व पूर्ण सत्य आहे. त्या पुस्तकाबाहेरचे सर्व अज्ञानमय व भ्रांतिमय होय, या भावनेने ज्ञानाचा अखंड वाहता प्रवाह बंद केला. ज्ञान साठवणीच्या पाण्याप्रमाणे नासले. या भावनेने जगातील अनेक अमोल ग्रंथसंग्रह जाळले आहेत. युरोपात धर्म विरुद्ध भौतिकशास्त्रे असा झगडा याच भावनेमुळे उत्पन्न झाला. त्यात अनेक तत्त्ववेत्त्यांचा अनन्वित छळ झाला.

४. चमत्कारावरील विश्वास हा धर्मसंस्थेतील सर्वात मोठा व मूलभूत दोष होय. मंत्र, जप, होम व विशिष्ट कर्म यांच्या ठायी अद्भुत शक्ती असते. सत्पुरुषांच्या ठिकाणी अद्भुत चमत्कार करण्याची शक्ती असते. तीर्थक्षेत्र, मंदिर, मूर्ती, वनस्पती, विशिष्ट स्थान इत्यादी वस्तुंच्या ठिकाणी अघटित गोष्टी घडवून आणण्याचे सामर्थ्य

असते. अशा तऱ्हेच्या भावनेने मनुष्य समाजाची प्रगती खुंटत असते. आजपर्यंत धर्मसंस्थेने या भावनेला पोसले आहे. ही भावना सर्वात अधिक घातक आहे. कारण त्यामुळे कार्यकारणभाव शोधणारी बुद्धी मंद व तमोमय बनते. वरील चार दोषांतून मनुष्यजातीस मुक्त केल्याशिवाय, वरील चारी दोष झाडल्याशिवाय मनुष्याची खरी प्रगती होणार नाही. प्रगतीतील हे सर्वात मोठे अडथळे आहेत.

'मम वर्त्मानुवर्तते मनुष्या: पार्थ सर्वश:'। (गीता). सर्व धर्मग्रंथ व सर्व धर्मसंस्थापक मनुष्यजातीच्या हितार्थच प्रवृत्त झाले आहेत. काही प्रगतीच्या क्षेत्रात मागे असतील व काही पुढे असतील - सर्व धर्म त्या त्या मानवसमाजाच्या प्रगतीचे मार्गच आहेत. या मार्गातील दोष, परस्परांच्या सहानुभूतीने व सामोपचाराने नाहीसे करता येतील. त्याकरिता मात्सर्य व अहंकार हे दोन दोष नष्ट केले पाहिजेत. बाह्य आचार व कर्मकांड यास गौण स्थान दिले पाहिजे.

सारे जग जवळ जवळ येत आहे. नवी संस्कृती उत्पन्न होऊ पाहत आहे. त्या संस्कृतीत सर्व मानव भागीदार होणार आहेत. सर्व मानवसमाजाच्या सहकार्याच्या व बंधुत्वाच्या पायावर उभी राहिलेली शास्त्रीय संस्कृती जन्म पावणार आहे. त्या संस्कृतीच्या जन्माच्या पूर्वीच्या प्रसववेदनाच मानवजात आज भोगत आहे. या नव्या संस्कृतीत जुने धर्म लय पावणार नाहीत तर त्यातील दोष गळून जाऊन आकाशातील ताऱ्यांप्रमाणे त्यांचा या विशाल संस्कृतीत समावेश होईल. मानवजातीला जे धर्म शोभा देतील त्या धर्मांचा समन्वय होईल.

या पुढील संस्कृतीत सर्व मानवजाती व प्राणिमात्र हीच आराध्य देवता होईल. एकजीव व प्रगतिक्षम मानवसमाज हाच भविष्यकाळातील देव होय. सर्व सृष्टी ही पूजेची सामग्री होय. सत्याचे संशोधन करणारी शास्त्रे हे धर्मग्रंथ होत. समाजधारणार्थ करावयाचे सर्व प्रयत्न हे कर्मकांड होय. सर्व विश्व व मानवसमाज यांच्यातील एकत्वाचा अनुभव हाच मोक्ष होय.

एका प्राचीन संताने केलेली प्रार्थना, हीच आजची धार्मिक प्रार्थना आहे. तो परमेश्वरास म्हणतो,

**न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं ना पुनर्भवम् ।**
**कामये दु:खतप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम् ॥**

मला राज्य नको, स्वर्ग नको किंवा मोक्षही नको. दु:खाने गांजलेल्या जीवांची दु:खातून मुक्तता हेच माझे साध्य आहे.

**(ता. २-३-३६ रोजी बडोदे येथील कीर्तिमंदिरात सायंकाळी ५-00 ला झालेले व्याख्यान)**

OOO

# १९

# महात्मा फुले पुण्यतिथी व्याख्यान

*(दि. २७ नोव्हेंबर १९३७ रोजी पुणे येथे शनिवार वाड्यापुढे रा. न. वि. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली पुणे शहर काँग्रेस कमिटी व इतर संस्था यांच्यातर्फे सामुदायिकरीत्या महात्मा जोतीराव फुले यांची पुण्यतिथी साजरी झाली. त्यावेळी झालेल्या निरनिराळ्या पुढाऱ्यांबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण झाले. ते वृत्त 'ज्ञानप्रकाश'मध्ये प्रसिद्ध झाले होते. या पुण्यतिथीचा तो वृत्तांत साप्ताहिक 'राष्ट्रवीर', बेळगावच्या दि. ७ डिसेंबर १९३७ च्या अंकात पुनर्प्रकाशित झाला होता. त्यातील तर्कतीर्थांच्या भाषणाचा प्रकाशित सारांश -)*

''गेल्या साडेतीन हजार वर्षांत जी गोष्ट घडून आली नाही व जी घडून येणे हिंदुस्तानच्या दृष्टीने इष्ट होती, ती क्रांतिकारक गोष्ट म्हणजे ब्राह्मण्याविरुद्ध बंड करणे ही होय. ती जोतिराव फुले यांनी केली. यात त्यांचे महात्मा पद आहे. जातिसंस्थेवर आधारलेली विषम न्यायदान पद्धती मुसलमानी अंमल चिरस्थायी करण्यास कारणीभूत झाली. ही विषय न्यायदान पद्धती पुरोहित ब्राह्मणवर्गाने निर्माण केली होती. अशा ब्राह्मण्याविरुद्ध प्रथम बंड पुकारणारा म्हणून जोतिबा फुले यांचे महत्त्व फार आहे व त्यांची पुण्यतिथी काँग्रेस संस्थेतर्फे होत आहे, हे शुभचिन्ह होय.''

या सभेत तर्कतीर्थांबरोबर सर्वश्री. सेनापती बापट, केशवराव जेधे, केशवराव बागडे आणि न. वि. गाडगीळ (अध्यक्ष) यांचीही भाषणे झाल्याचे मूळ वृत्तांतातून स्पष्ट होते.

ooo

२०

# मानसशास्त्रातील आधुनिक दोन संप्रदाय

मानसशास्त्रासंबंधी बोलताना ज्यावेळी आपण 'आधुनिक दोन संप्रदाय' असा शब्दप्रयोग करतो त्यावेळीच पूर्वी काही संप्रदाय होते हे आपण मान्य करतो आणि मग काही कारणांनी त्यात नवीन संप्रदायांचा उगम झाला असे दर्शवितो. मानसशास्त्रांत ही नवी भर शरीरक्रियाविज्ञानशास्त्र (Physiology), जीवशास्त्र (Biology) वगैरे विषयांचे द्वारा वैद्यकीशी संबंधित असलेल्या लोकांनीच घातली आहे. हे दोन नवीन संप्रदाय पुढीलप्रमाणे होत.

१) Behaviarism (क्रियावाद, आचरणवाद, चरित्रवाद वा प्रवर्तनवाद) यांचा प्रवर्तक शरीरक्रियाविज्ञान, जीवशास्त्र वगैरे विषयांचा अभ्यासू, लेनिनग्रॅडचा सुप्रसिद्ध संशोधक रशियन शास्त्रज्ञ पावलाव (Pavlova) होय.

२) Psychoanalysis (मनोविश्लेषणशास्त्र वा मनोगाहनशास्त्र) याचा संशोधक ड्रिश हा होय. मानसरोगांवर उपचार करीत असता, त्याने ही पृथक्करण पद्धती संशोधिली.

मानसशास्त्राची वाढ झाली असली तरी इतर भौतिकशास्त्रांच्या प्रगतीच्या मानाने ते शास्त्र अजून बाल्यावस्थेतच आहे असे म्हणावयास हरकत नाही. उदा. पदार्थविज्ञानशास्त्रात जितके पदार्थ सापडले आहेत व त्यांच्या गुणधर्मांचे व क्रियांचे जितके विस्तृत व निश्चयाने निरूपण करता येते, अगर ज्योतिषशास्त्रात दहा हजार वर्षांपूर्वी एखादा तारा कोठे होता व आणखी दहा हजार वर्षांनी तो कोठे व कसा असेल हे सांगता येते. उदा. कृत्तिका नक्षत्र सुमारे ३॥ हजार वर्षांपूर्वी बरोबर पूर्वेला होते; पण हल्ली ते पूर्वेकडून ७० अंशावर उगवते. मानसशास्त्रात तसे सांगणे शक्य नाही. सजीव सृष्टीत व विशेषत: मनुष्यप्राण्याच्या बाबतीत संभववाद (Law of Probability) हाच अनुसरावा लागतो. वनस्पतिसृष्टीबद्दल आपण काहीसे निश्चयाने बोलू शकतो; पण प्राणिसृष्टी ही त्याहून जास्त गूढ आहे व मानव प्राणी तर गूढतम आहे. विश्वाची माहिती असणाऱ्या मनुष्यप्राण्याला स्वत:च्या अगदी जवळ

असणारा अनुभविता, कर्ता व भोक्ता असा स्वत:चा जो आत्मा व मन याविषयी काहीही माहिती नाही.

उदा. १० वर्षांनी एखादा माणूस व्यभिचारी होईल, अगर चार दिवसांनी हा माणूस खून करील असे आपण सांगू शकत नाही. मनासंबंधी काही साधारण ठोकताळे सांगता येतील; पण स्पष्ट सिद्धांत मांडता येत नाहीत.

## अंतर्मुख मानसशास्त्र (Introspective Psychology)

अंतर्मुख होऊन आपण ज्ञान (Knowing), वासना (Willings) व विकार (Feelings) या मनोधर्मांचे काही अंशी विवरण करू शकू. त्यासच अंतर्मुख मानसशास्त्र असे म्हणतात. पण अंतर्मुख होऊन हा जो द्रष्टा (Subject) त्याला पुढे ठेवून, त्याला तोडून फोडून त्याची अंतर्रचना पाहणे शक्य नाही. मग त्याची वागणूक कशी पाहावयाची? म्हणून अंतर्मुख मानसशास्त्र फारसे पुढे जाऊ शकले नाही. सुप्रसिद्ध लोकप्रिय मानसशास्त्रज्ञ जेम्स व मॅग्डूगल 'जाणीव म्हणजे काय' हे सांगू शकत नाही. भौतिकशास्त्रांच्या प्रगतीच्या मानाने मानसशास्त्रात फक्त पुस्तकेच वाढली, त्या मानाने विचार फारसा वाढला नाही. उत्क्रांतिवादामुळे वनस्पती वा प्राणी दुसऱ्या वनस्पतीतून वा प्राण्यांतून उत्क्रांत झाला हे कळले; पण मनाच्या आचारधर्माचा पत्ता त्याने लागला नाही.

ज्ञान, वासना व विकार यांचे पृथक्करण करता येत नाही. अगर कामक्रोधादिकाचे गणित किंवा मोजमाप देता येत नाही. त्यांच्या शरीरावर होणाऱ्या अंतर्बाह्य परिणामावरूनच आपण त्यासंबंधी काही जाणू शकतो. उदा. क्रोध आला की डोळे व चेहरा लाल होणे, भुवया चढणे, सर्वांग कापणे, हातपाय आपटणे अगर भूक लागली असता तोंडाला लाळ सुटणे, तोंडातील पदार्थ चावणे, गिळणे, भराभरा एका मागून एक घास घेणे इत्यादी हालचालीवाटे वा क्रियांवाटे ती व्यक्त होते. वस्तू स्वरूपात त्यांचे ज्ञान आपणाला होऊ शकत नाही. राग आलेला अगर भूक लागलेला माणूस वरील क्रिया न करता स्वस्थ बसेल, तर त्याचा राग वा भूक आपणाला कळून येणार नाही. अशा रीतीने सर्व शरीरावर जे अंतर्बाह्य परिणाम होतात त्याचा परिणतिक्रम म्हणजे वर्तन (Behaviour) होय व त्यावरून मनाचे गुणधर्म व सिद्धांत ठरविणे यालाच प्रवर्तनवाद (Behaviarism) म्हणतात. अर्थात ज्याप्रमाणे आपण पदार्थाचे गुणधर्म पाहताना त्या पदार्थांनाच विशिष्ट परिस्थितीत ठेवून ते पाहतो व एकापासून दुसरा वेगळा (Isolate) करतो, त्याचप्रमाणे मनोधर्म पाहणे असल्यास प्राण्यालाच प्रयोगशाळेत नेले पाहिजे. मनुष्यमनाची रचना गुंतागुंतीची (Complex) असल्यामुळे पावलावने 'कुत्रा' हा साधा (Simple) प्राणी घेतला, तर डॉ. वॉटसन या अमेरिकन शास्त्रज्ञाने कोरा करकरीत मनुष्य म्हणजे 'नुकतेच जन्माला आलेले मूल' घेतले. या दोन शास्त्रज्ञांच्या मतात भेदही आहेत. पावलाव हा ज्ञान, भावना व विचार यांना मानतो; परंतु प्रयोगशाळेच्या कक्षेत त्या येत नाहीत म्हणून त्या बाजूला ठेवतो, परंतु डॉ. वॉटसन हा त्यांना स्वतंत्र वस्तू (Entities)

न मानता त्या खोट्या आहेत असे म्हणतो. पावलावची विचारसरणी हीच जास्त शास्त्रशुद्ध आहे.

अशा दृष्टीने बाह्य विश्व (दृश्य) व जीव (द्रष्टा) यांचा संबंध आल्यावर जीवावर ज्या प्रतिक्रिया होतात त्यांचा विचार करून जीवाविषयी व त्याच्या गुणधर्माविषयी विचार करणे हे प्रवर्तनवादाचे कार्य होय.

चरक, सुश्रुत वा पुराणे यांतील मानसशास्त्र प्रवर्तनवादाशी जुळते मिळते आहे. धर्मशास्त्रही मनात काय होते हे न पाहता आचरण कसे काय झाले व त्याचा परिणाम काय झाला याचाच विचार करते. सुवर्णमृग पाहून राम त्याला मिळविण्याच्या इच्छेने पत्नी सोडून त्याच्यामागे गेला. कांचनमृग हे उत्तेजन (Stimulus) मिळून त्या उत्तेजनाला प्रतिक्रिया (Response) देतो म्हणजे कार्यप्रवृत्त होतो. सुंदर सुंदर काव्ये व इतर वाङ्मयही प्रवर्तनवादावरच आधारलेले आहे. उदा. सीताहरणानंतर राम विरहाने व्याकूळ होऊन बेभान झाला असे न सांगता, 'सभोवती वनश्री फुलली होती, रात्रीच्या प्रशांत समयी हिमांशु उदयाला येत असून सौम्य सुधावर्षाव करीत होता. मंद वारा वाहत होता.' त्यावेळी राम लक्ष्मणाला म्हणतो, 'हे लक्ष्मणा, उष्मा असह्य होत आहे, तरुतळी जाऊन तरुछायेत बसू.' अशा वर्णनांनी त्याची व्याकूळता कवीने वर्णन केली आहे. तसेच शकुंतला व दुष्यंत यांचे प्रेम जमले असे सरळ न सांगता कवी कालिदासाने विशिष्ट नाट्य पद्धतीने ते सांगितले आहे. ते नाट्य म्हणजे प्रवर्तनवाद होय. नृत्यशास्त्रांतसुद्धा अंतर्गत भावना अभिनयाद्वारा जगताच्या प्रयोगशाळेत प्रकट केल्या जातात. ही पद्धतीच जास्त प्रभावी (Impressive) ठरते.

परिस्थितीमुळे जीवावर ज्या प्रतिक्रिया घडतात त्यांचे दोन भाग पडतात.

(१) सापेक्ष परावर्तन (Conditioned Reflex), नेहमीच हातापायाची वगैरे हालचालही यात येते.

(२) अनिर्बंध परावर्तन (Uncounditioned Reflex), चिंच पाहून तोंडाला पाणी सुटणे, पोटात अन्न नसता अन्नाच्या वासाने वा दर्शनाने पोटात स्राव सुटणे ही याची उदाहरणे आहेत. याकरिता पावलावने कुत्र्यांवर पुढील प्रयोग केले.

प्रयोग पहिला - कुत्र्याला मास देतेवेळी प्रथम काही दिवस घंटा वाजविली. पुढे काही दिवसांनी नुसतीच घंटा वाजविली; पण मांस दिले नाही. तरी पण पोटात स्राव होतात असे आढळले. ३-४ दिवसपर्यंत नुसत्याच घंटेच्या आवाजाने स्राव झाले (मांस न देता); पण मग स्राव होणे बंद झाले. यात जाणूनबुजून कुत्रा शिकला असे नसून परिस्थितीमुळे हे परिणाम घडले.

प्रयोग दुसरा - मास देण्यापूर्वी कुत्र्याला चिमटा घेतला. रोज चिमट्याचा जोर वाढवीत नेला. १० दिवसांनी एवढ्या जोराने चिमटा घेतला की दुसरा एखादा कुत्रा असता तर ओरडला असता; परंतु तो कुत्रा न ओरडता स्राव निर्माण झाले. या वेळी मांस मात्र दिले गेले

नाही. पुढे ३-४ दिवसांनी नुसत्या चिमट्यांनी (मांस न देता वा न दाखविता) स्राव सुटले; परंतु नंतर मात्र ते बंद पडले व कुत्रा ओरडला.

''अशा तऱ्हेने प्रतिक्रियेचे दोन भाग पडणे हा प्रवर्तनवादाचा दुसरा सिद्धांत होय.''

चौकातील पोलिस ज्याप्रमाणे एकाच वेळी एका हाताने रहदारीचे प्रतिबंध (Inhibition) वा संयमन करतो, त्याचवेळी एका हाताने एका बाजूची अडवलेली रहदारी सुरू (Release) करतो व या दोन्ही क्रिया एकाच वेळी होणे सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असते. त्याचप्रमाणे शरीरातही प्रतिबंधन व शैथिल्य (Relaxation) होणे शरीराला आवश्यक आहे. बोलत असताना जर ऐकूही आले, स्पर्शही समजला, चवही समजली, वासही आला तर एकही क्रिया नीट न होता घोटाळा होईल. तेव्हा एक क्रिया चालू असता दुसऱ्या क्रियांचा प्रतिबंध झाला पाहिजे. मानसशास्त्रात मात्र प्रतिबंधन तसेच घेऊन Relaxation ऐवजी Excitation (क्षोभ) मानले. ज्यावेळी एक विकार मोकळा होत असतो, त्या वेळी इतर विकार आवरले गेलेले असतात. उदा. क्रोधाच्या वेळी प्रेमभावना आवरली गेलेली असते. मागील कुत्र्याचे उदाहरणात त्याची दु:खाची भावना ही अन्न मिळते या भावनेने संयमित केली गेली होती. तेव्हा तिसरा सिद्धांत असा की, संयम (Inhibition) व क्षोभ (Excitation) यांचे एकाच वेळी अस्तित्व असणे स्वारस्याच्या दृष्टीने आवश्यक आहे हा होय.

चौथा सिद्धांत अंतर्मुख मानसशास्त्राच्या कोड्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न होय. ज्ञान, विचार वगैरे काय तर भौतिक हालचाल होय. आवाज न करता बोलणे म्हणजेच विचार होय. बोलताना गलगत स्नायूंच्या ज्या हालचाली होतात, त्याच जेव्हा फार तर थोड्या सूक्ष्म प्रमाणात व ओठांची मदत न घेता होतात, त्याला बोलण्याऐवजी विचार म्हणतात. ज्ञान हाही एक ज्ञानतंतूंची हालचाल होय. म्हणजे ज्ञान वा विचारादी गोष्टी याही भौतिक क्रियाच आहेत असा डॉ. वॉटसनचा सिद्धांत आहे. मॅग्डूगल मात्र याला विरोध करतो. वॉटसन Vocal Centres ची हालचाल म्हणजे विचार म्हणतो, तर मॅग्डूगल अंतर्मुख मानसशास्त्राचे सिद्धांत खोटे नाहीत असे म्हणतो. मात्र तो हे कबूल करतो की, मानसशास्त्रात प्रगती करणे अवश्य असेल तर अंतर्बाह्य होणारे परिणाम पाहावे लागतील. Battle of Behaviarism या पुस्तकात दोघांनीही आपापली मते मांडली आहेत.

याच्या उलट साधे मन मानूनही त्याच्या पलीकडे सूक्ष्म मन आहे व त्याच्यावरील संस्कार खोल असतात असे मानणारे अडलर, जुग, फ्राईड, ड्रीश (जर्मन) वगैरे शास्त्रज्ञ आहेत. पापुद्र्यात पापुद्रा असतो. तसेच साध्या मनामागे सूक्ष्म मन (Unconseious Mind) आहे व त्याचे व्यापार दिसून पडतात. विशेषत: उन्मादात (Hysteria) होणारे आविर्भाव पाहून सूक्ष्म मनाचे अनुमान करता येते.

उदा. १ ले - एक बाई सतत काही दिवस तापाने आजारी होती. थोडी बरी झाल्यावर अशक्तता फार असूनही ती स्नान करून चर्चमध्ये गेली. प्रार्थना चालू असता मध्येच पाद्री

हात वर करून म्हणाला, ‘‘हा पाहा भगवान, ज्याला प्रसाद हवा असेल त्याने हात वर करा.’’ भावनेच्या भरात या बाईने हात वर केले. तीन दिवसपर्यंत हात वर करून ती प्रार्थना करीत उभीच होती. ही शक्ती तिला बाह्य शरीराकडून मिळालेली नव्हती हे उघडच आहे. ही शक्ती तिला मनाकडूनच मिळाली असे ते म्हणतात.

उदा. २ रे - एका बाईला रशियन भाषा मुळीच येत नव्हती; परंतु मनोविकृतीत ती सफाईने रशियन भाषा बोलू लागली. तिचा इतिहास पाहता पुष्कळ वर्षांपूर्वी तिचा एक शेजारी रशियन भाषा बोलणारा होता. त्याचे ऐकून बाईच्या सूक्ष्म मनाने ती भाषा ग्रहण केली. हे सर्व तिच्या जाणिवेच्या नकळत झाले. विकृतीत ही गोष्ट उघड झाली.

याबद्दल ड्रिशने दिलेली सूचनाही पाहिली पाहिजे. हा जीवतत्त्व मानणारा असा अध्यात्मवादी शास्त्रज्ञ होता. त्याच्या मते ही लक्षणे पाशवी मनाची आहेत. मानवी मेंदूचे तो दोन भाग कल्पितो. (१) पशुसाधारण घटना व (२) मनुष्य वैशिष्ट्याला योग्य अशी घटना. याच्या योगे पशुसाधारण घटनेचे भाव दडपले जातात; परंतु संधी साधून ते व्यक्त होतात. अर्थात विकृतीत प्रतिबंधन कमी होते व तेव्हाच हे भाव व्यक्त होतात असे याचे मत आहे.

जाता जाता फ्राईडचा उल्लेख करणे अवश्य आहे. विसरलेल्या, दबलेल्या अगर रूपांतरित झालेल्या मूलभूत भावनांचा पत्ता लावून त्यांची रोग्यांना जाणीव करून देणे ही याची पद्धत आहे. त्याचा सर्वात खळबळ उडवून देणारा सिद्धांत म्हणजे सुखलोलुपतेची भावना (Pleasure Seeking Instincts) ही मध्यवर्ती असून त्यात अंगसंगजन्यसुख हेच मुख्य आहे व तेच जीवनाचा मूलाधार आहे हा होय. सुखप्रवृत्तींना अडथळा होऊन त्या पूर्ण न होता दबल्या गेल्या की, प्रसंगविशेषी जोराने वर येऊन मनाची समतोलता (balance) ढळते व विकृती निर्माण होते.

उदा. एक ४० वर्षाचा अविवाहित व अतिशय बुद्धिमान असा प्राध्यापक होता. पण त्याला रस्त्याने जाता जाता तारेच्या खांबांना डाव्या हाताने चापट्या देण्याची खोड होती. त्याचा इतिहास पाहता असे आढळले की, त्याचे त्याच्या एका मित्राच्या बहिणीवर पूर्वी प्रेम होते. प्रियाराधनेमध्ये त्याला प्रेयसीच्या गालावर, दंडावर वगैरे डाव्या हाताने (कारण, लागू नये म्हणून) थापटण्याची सवय होती. पुढे त्याचा काही कारणांनी प्रेमभंग झाला. तेव्हा पूर्वीची सवय खांबावर थापट्या देण्याच्या स्वरूपात शिल्लक राहिली.

अशा तऱ्हेने आधुनिक मानसशास्त्रातील हे दोन संप्रदाय झाले.

(१) अंतर्निरीक्षणामुळे सापडणारे सूक्ष्म मन मानून त्याचा विचार करणारा व मनाचा गुणधर्म ठरविणारा एक संप्रदाय, यांना देहांतर्गत सूक्ष्म मनवादी असे म्हणता येईल.

(२) सूक्ष्म मन न मानता मेंदू व शरीर याच दृष्ट गोष्टी मानून त्यावर घडणाऱ्या परिस्थितीच्या अंतर्बाह्य परिणामाचा विचार करून तेच ग्राह्य मानणारा हा दुसरा संप्रदाय. फ्राईड वगैरे पहिल्या वर्गात मोडतात. पावलाव वगैरे दुसऱ्या वर्गात मोडतात. पावलावची प्रवर्तनवादी

विचारसरणीच आधुनिक विज्ञानशास्त्राला मान्य आहे. सुप्रसिद्ध लेखक व शास्त्रज्ञ एच. जी. वेल्स, हक्स्ले वगैरेंनी म्हटले आहे की, ‘वॅाटसनची पद्धती (Method) बरोबर आहे. परंतु तो ज्ञानाला स्वतंत्र अस्तित्व नाही हे म्हणतो ते खोटे आहे.’ पावलावच्या विचाराला हे म्हणणे पोषक आहे.

**(‘भाषग्विलास’, वर्ष - ४१ अंक ६, सप्टेंबर १९४२, पृष्ठ १०२ ते १०६.)**

ooo

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भाषणे

(१९४८ ते १९९४)

21

# ALL INDIA CONFERENCE OF THE RADICAL DEMOCRATIC PARTY

PRESIDENTIAL ADDRESS

26th December, 1948

The attainment of National Independence is said to have opened up a new chapter in Indian History. We are meeting for the first time after that event. We are also proposing to enter into new spheres of activity on the basis of the decisions of this Conference, and with that purpose in view, we have already done a good deal of serious thinking, study and introspection. The Radical Democratic Party was founded in order to fight the greatest menace to human civilisation in the form of Fascism, so that humanity could be set firmly on the path or peaceful progress. While carrying on that struggle, we were also continually engaged in an onthusiastic manner in ideological and philosophical explorations. As a matter of fact, those explorations were not only a part of the struggle we were carrying on, but they constituted its sole inspiration. The result of those explorations eventually crystallised in the form of a 'new philosophy', which we endorsed in the last Conference at Bombay. Having thus reached a new stage in the development of our theory of life, we are naturally feeling the need for a reformulation of our programme and plan of activity as well as for a transformation of the organisation so

as to bring both of these in consistency with our ideas.

Before founding the Radical Democratic Party, we were working for the attainment of National Independence in the Indian National Congress. We had to come out of that mighty organisation after the outbreak of the Second World War. The greatest menace to human freedom and progress, in the form of Fascism, having already attained considerable strength, had then started on its plan of world conquest. Being of the opinion that India could neither become nor remain free in the midst of an enslaved world, we insisted on fighting on the side of democracy, and had eventually, for that reason, to leave the Congress and the popularity that went with it. The world has still not been freed from that danger, which continues to threaten it in a much more serious and aggravated form even today. The correctness of our characterisation of the nature and meaning of the crisis of our time is being increasingly proved every day. We have sometimes felt quite legitimately proud of our visualisation that the victory of Britain in the war would mean the end of British Imperialism. But the tremendous sense of responsibility arising out of the awareness that the menace of human civilisation still exists, and is growing in new and far more dangerous forms, driving mankind onwards on the path of self-destruction, hardly provides any room even for legitimate pride. One may feel comforted with the thought of having foreseen the dangers. But it is hardly possible to rest until they are overcome through the building up of requisite and suitable strength. Does humanity possess such strength today? The answer may be difficult to find. But the responsibility to discover the essential inspiration and attain the requisite capacity to overcome the crisis devolves upon us as a consequence of our awareness. We have fully realised that the crucial issue of our times is not National Independence but Human Freedom. And if a harmonious order based on such freedom is not built up in the near future, the futile and illusory character of National Independence will have become clearly manifest.

The idea that society has to be reorganised, that it has to pass through

a comprehensive and all-embracing revolation was already accepted by us as Marxists, even when we were in the Congress. The Marxist call to the "workers of the world" to unite is clearly a call for such revolution. As Marxists,we had also come to the conclusion that the revolution, on the order of the day in the colonies dominated by inperialism, was a democratic revolution which would lay the foundations of a socialist society. And we were endeavouring to transform the national movement into an mstrument of such a revolution. In the last. World War, the Congress sidetracked the paramount issue of anti-fascist struggle and laid all its emphasis on the altainment of national independence. This turn in the Congress politics was a natural and logical consequence of the nationalist approach. Fascism is also an outcome of nationalism. Cultural consciousness developed within particular geographical boundaries is nationalism. It is based on a collective ego, to the workship of which all are devoted and at the altar of which every individual can be sacrificed merely as a means. Every nation views its own interests as of primary Significance, while those of others are relegated to a secondary position. And nationalism in every country, therefore, takes pride in sacrificing its own individual constituents as well as the interests of others. The values of individual freedom, equality and fraternity can not be reconciled with such an outlook. In no case does nationalism honestly accept them as primary principles. Faith in tradition on the other hand continually goes on feeding the national ego. These traits of nationalism are being increasingly witnessed in India also.

The Communist or Socialist parties in different conuntries have also not been able to remain free from the influence of nationalism. On the contrary, based as their ideologies are on the emphasis on collectivity and subordination of the individual, they were easily affected by it. The nationalist outlook of the Communist Party of the U.S.S.R., for example, was clearly exposed during the last World War. It explains the failure of the Soviet Union to resist the trinmphant march of Fascism, by taking up the moral leadership of those who were prepared to fight it. Nationalism

Fosters the slavery of others and was never a progressive force. The various national states of Europe arose out of the break up of the Holy Roman Empire, but that simply signified the rise of a reactionary force in European History. It meant the rise of a force in the very heart of the modern European civilisation, which mean its ruination, a force more reactionary than religion, the decline of which hastened its rise. The different leading religions of the world recognise at least in principle the unity of entire humanity, something which is an anathema, to nationalism. We had therefore to remain away from the various political parties in the country owing to our recognition of the reactionary character of nationalism. It was at the beginning of the Second World War, that we had already reached a significant stage in the process of our development through our exposure of the reactionary character of nationalism.

Another outstanding stage in the growth of our ideas has been our critique of Marxism. The Marxian experiment is being conducted in the different countries of the world. Marxism assures that the ultimate liberation of man lies in the establishment of a communist order. Any social philosophy has to be judged by its capacities for liberating the individual and we have examined Marxian experiments with the aid of that very test. Their outstanding feature which will be clear to any impartial observer is that the state arising out of the proletarian revolution comes under the thum of a small elique, and takes the form of an all-embracing dietatorship. The same principle underlies the organisation of a communist party. The revolutionary party captures power in the name of the people and monopolises it instead of diffusing it among the people as a whole. A vested interest in power arises out of a party committed to the establishment of a classless society. It is true that the landed aristocracy and the bourgeoisie are liquidated in the name of the proletariat; but the process, instead of leading to the establishment of a classless society, results in the establishment of a powerful state which seeks to bring all ruthlessly under its total domination. People, inspired by an urge for freedom, cannot therefore welcome such a revolution.

The Soviet Union, the leader of World Revolution, emerged victorious from the Second World War. But it could not take up the moral leadership of the war-torn humanity. The expectation, that the victory of the Soviet Union would mean the opening of the gates of world revolution, was not fulfilled. The people of Western Europe have been struggling for freedom for the last couple of centuries and more. They cannot be easily deceived by capitalism in power. To admit the possibility of that, in a way, might amount to a refutation of the theory of proletarian revolution. If, as Marxism argues, thinking is conditioned by being, if in the declining period of the capitalist order, the proletariat and the oppressed messes are bound to become increasingly conscious of the need for a revolution, the entire behaviour of the working class readily serving the cause of Fascism, during the period of the Second World War, would remain fully unexplained. It was this experience which necessitated a fundamental criticism of Marxism, from which has been deduced the inference that even revolutionary parties, when they enter the game of power politics with the object of capturing power, ultimately come to monopolise that power and degenerate in the atmosphere of cultural back wardness produced by people, devoid of an active urge for freedom.

The experience of the Second World War clearly shows that the old ways of revolution have become futile. An attempt to bring about a revolution on the Marxian Pattern was made in eleven different countries in this century but it only succeeded in Russia and that too as an accident. The idea of overthrowing a modern state built up on a powerful industrial base and possessed of the machanised means of destruction, may appear as a very romantic idea; but it simply speaks of an unrealistic adventurism. The path of revolution has to be critically and scientifically examined before it is adoped. Adventurism smothers creativity instead of eneouraging it. No political party can today face the organised might of the state. Accidental situations like were might lead to opportunities for creating chaos, which are sometimes styled as revolutionary. But a revolutionary ideology cannot be based on such contingencies. In

a sense, revolution is a work of art. It can only be brought about by realistic as well as far-seeing men, who proceed on the basis of a well-thought-out plan. Creation of a political party in order to capture power cannot therefore be included in the means to future revolutions. Those who believe that the mighty Red Army will bring about revolution may organise a party, awaiting for its march; but that certainly cannot be called a revolution brought about either by the proletariat or by its party. It is as a consequence of deduction from historical experience that we have given up the idea of building up a party engaged in the struggle for power and hence that of participation in the game of power politics.

Politics, based on power and centered around that concept, has been mainly responsible for the present world crisis. The possibility of a third World War is its logical culmination. Even if a war does not actually break out it will still be difficult to say that the world has been saved from the critical situation. Economic misery, social insecurity, communal, national and cultural hatred, preparations of war, and the unscrupulous rivalries in international relationships are all obvious symotoms of the crisis and will still remain. They have been dragging the world in the direction of anarchy and stagnation and will continue to do so.

All the aformentioned dangers are a product of the present intellectual and spiritual stagnation, as a consequence of which, a number of historias, scientists and philosophers are seeking refuge in the pre-scientific or unscientific cultural life. They seem to have realised the futility of the expectation that the industrial civilisation built up by modern science can lead to a paradise or that a socialist revolution or Communist transformation can bring the Kingdom of God on earth. Freedom and Prosperity can only be attained by humanity with faith in moral values and it is this very faith which the tremendous advance of science has failed to reinforce. That seems to be the lesson of the history of the earlier half of the twentieth century. The Mahabharata narrates the tale of how the Pandavas once lost their way in the jungle and had to roam about in the scorching sun. They eventually arrived at a clean and beautiful lake

but were prevented, though intensely thirsty, from drinking the water by Yaksha. Perhaps in a similar way, science has brought humanity to the threshold of freedom and prosperity, but man somehow seems to have been prevented from entering the gate. The cause of it seems to be the intellectual and moral failare of man. The wise of this age have therefore begun to think in terms of returning back to the force that once sustained moral behaviour, namely religion. They have been giving a call for religious revival under conditions in which religion has become a spent force in the countries of the West. Just as a youth, frustrated in life, begins to remember the joys of youth and pine for parental protection of the byegone days, so is this modern wisdom seeking for the protection of religion. It would not however be possible for religion to establish its hold over the modern mind again, a fact which seems to have been conclusively proved by our recept experience in this country.

The greatest man to rovolt against modern civilisation in defence of moral values founded on religion, emerged to the forefront in our times in India. That was Mahatma Gandhi. The Mahatma stepped into Indian polities with a profound faith that religion, with the blessings of God, will eventually purify man and bring him back on the proper moral path. He led powerful political and social movements, which have been responsible for the period, of and between the two world wars, being styled as the Gandhian Age. He seems to have used in politics the Bergsonian view that intuition alone can reveal the truth, but with little success; for, religion again was found responsible for mutual killings of innumerable human beings. History has thus been repeated. When religion dominated in the pre-scientific age, wars and conflicts did take place for its defence and the sword of the Lord was seen doing its job quite smoothly and ruthlessly. The devotees of God and religion have wielded that sword again during the past few years in this country and eventually have claimed Gandhi himself as its victim. He had to experience, during the last few days of his life, a total collapse of the ideals he stood for; and not even his closest associates and followers can argue today that,

like Christ, resurrection of Gandhi is possible. His followers are loudly claiming to have established a secular state. Those who rule today may build temples of Gandhi and perhaps worship him everywhere; but it is idle to expect that the state, that has come into being mainly as a result of his efforts, shall have Gandhism as its guiding philosophy. In the absence of a broad philosophical foundation, a secular state may easily promote a vulgar materialistic outllok and opportunistic power politics. It might thus easily become devoid of all ideals or idealism and eventually have to face namesis for the same.

Some of the scientists and philosophers in the West are also looking forward to religious revival as the way out of the present crisis, but that demands renunciation of the scientific outlook and the rationalist tradition. Man's endeavour to know is as old as man himself and it is on his knowledge of the things around him, i.e. science, that his existence depends. Religion was a dominating cultural force so long as this endeavour to know could be reconciled with it. But with the attainment of a higher stage of development by science the weaknessess of religion have been exposed. Its illusory nature can now be easily seen and science has undermined its authority, both in the spheres of existence and spiritual values. Philosophy of nature came in particular as a challenge to religion in the sphere of existence. Science however, could not reinforce the moral, the aesthetic as well as the other values. Religion had made ethies immortal. The beautiful had captivated the human imagination as a miraculous divine creation. Science could not permeate in the realm of values nor sanction their significance. A gap has thus been created between values and facts. Religion had continually furnished for centuries together a brirdge between the philosophy of nature and the philosophy of life. With the loosening of its grip over nature, man has become confused regarding the meaning of life, and it is from this confusion that the present world crisis has arisen. It is essential for man today to understand life in a comprehensive sense. Those groups of humanity which had not understood the meaning of life even in the

days when religion dominated, have had their civilisations thoroughly destroyed or thrown in a stagnant condition for centuries together. The social order in Egypt, Babylon or Greece, for instance, was built up on the foundations of slavery. The pyramids today bear a testimony to their having understood the significance of the material world, but they also stand in the context of absence of man, for they were based on his slavery. Man today has to realise that "man is the measure of all things", on else his material creations may alone remain as the momories of his existence. It is idle to aruge that the Hindu civilisation has lasted for centuries because of religion. Its tenacity on the other hand, can best be explained on the basis of the absence of the institution of organised slavery in its midst as it was in the case of the other ancient civilisations. The Vedas of three thousand years ago are still there, but there is no architecture built up on the basis of the efforts of salves, for it simply did not exist in those days.

The renaissance, which led to the birth of the modern scientific age, promoted the development of reason which can explain the basis of human values. It not only added a new glory to those values but also brought into light new values and new ideals. Consequently, we find at present biology, the theory of evolution and anthropology endeavouring to coordinate the realm of values with the philosophy of existence and the result has been that the relativistic, utilitarian or intuitionistic ethics has been relegated into the background. It is being established that values such as friendship, cooperation, effort, play, preservation of tradition, freedom, beauty, truth and love are as old as man himself. And it is only is the context of their framework, that the entire organisation of his life can be explained throughout the period of his descent. Human history also corroborates the contention that any transgression of the limits of that framework leads to human misery and suffering; for, these values are natural. Pleasure and pain, desire and hatred, survival in the struggle for existence, creativity are all their partial signs. The relativity of pleasure or pain, satisfaction of desire joy of novelty or peace of mind are the

subjective aspect of values. The conceptual abstraction between subject and object, deeply embedded in thought since the time of Aristotle, has been responsible for the misconception that an aspect is the whole truth. Out of the subjective aspect of truth have emerged Idealism, Spiritualism, Solipsism and Asceticism. Mysticism is also its offspring. Both religion and philosophy had thus to suffer from this conceptual divorce between mental states and processes and objective characteristics and processes. The fallacious ethical principle of Hedonism or the cult of Asceticism have arisen out of viewing the subjective states as the ultimate vlaue. Once the unity, for example, between the flower and the joy it gives is understood, the inner and the external together will be seen to produce the realm of ideals and values. The sphere of ideals is the sphere of both man and nature. Just as the laws of logic or mathematics are not bound by time, so are the norms of human values. The norms need not change because existence changes; what may change is the knowledge about the norms. Science would not have been possible unless the continually changing aniverse was law-governed. Just as the continually changing universe has a permanent aspect, so also is there a parmanent aspect to the continually changing life. The value norms may be understood in two ways, either with the aid of intuition or with that of reason. The intuitive judgement and the intellectual inquiry both help and supplement each other. A genius inheriting the intellectual attainments of the past may intuitively comprehend truth and art without the aid of intellectual inquiry and investigation. If then like Vyasa, Valmiki, Homer, Aeschyllus, Kalidasa, Shankespeare, Bethoven, Napoleon, are taken out of their intellectual and cultural tradition, it will not be possible to distinguish them from an outstanding magician an enchanter, an archer, or a tale-teller amongst the Eskimos or the Santhals.

The world is a combination of both the desirable and the undesirable values. In the realm of both, there are various gradations. Then again there is the distinction between values as means and values as ends. Ends however are means and so are means, ends. The nature of some values

as ends and means is being continually realised by man. The natural colours, the music of the birds, fragrance of the flower, sweetness of the fruit, delicacy of the child, the love of the parents fruitful effort, courage that saves from dangers, living together of likeminded individuals are all values, the importance of which may be realised without the aid of intellectual inquiry. It is a matter of immediate experience. Where however, different values are mixed up or have to be relatively understood, an intellectual inquiry becomes essential to reach reasonable conclusions. It is essential in certain spheres like Art, for example, wherein is reflected a carefully and variedly graded organisation of values, to use cautiously and continually both intuitive and intellectual judgements. In an artist, the intuitive judgement may be prominent, while an intellectual inquiry may naturally come in to help it. In a scientist, the opposite may be the case. In a complex sphere of a number of values, related and mixed up together, it is essential to reach decisions with the aid of reason or an intellectual process. The norms of the higher moral values can be decided in the beginning for instance, only in that manner; and not with the aid of intuition. Intuition only cooperates with the intellectual judgement. An intellectual judgement may also be called intuitive, when it is an instinctive induction or deduction. Thus it is with the aid of intintive and intellectual processes that value norms are decided. Values, which are determined as permanent through an intellectual inquiry, can also be realised to be such through immediate experience. Some people, for example, may naturally like pure, nourishing and healthy food, though they may not be able to intellectually prove its healthy character; that task may be left to the nutrition expert. The same may hold good in the case of the higher moral values, but it is dangerous to rely entirely on instinctive induction or deduction. The ultimate test of truth is reason, and a Categorical Imperative can only be one, the desirability or undesirability of which can be objectively established with the aid of reason. The moral values, discovered through reason, come to belong to the sphere of the 'ought' with reference to those whose moral judgment is

likely to be clouded by temptations, fears or passions. On the other hand, those whose moral judgment invariably accepts values, decided through reason, and leads to conformity with them setting aside an considerations of a contrary nature, are the proper subject for the verb 'is'. What are instruments of one are the signs of the other, but such a purely rational soul exists only in the ideal world. As Kant has put it, what I as an empirical self ought to do is what I as a purely rational normenal self necessarily would do.

The ultimate moral value is the Individual and it is deduced from comprehension of all the natural tendencies of man. This dpes not justify, however, an unqualified Seltishness because human existence and human development are impossible in the absence of human cooperation. Therefore the term 'individual' here does not signify a particular human being, but on the contrary, it means all men or the Universal Man. As Kant has said, treat humanity, whether in thing own person or in that of another, always as an end, never as a means only. Humanity is thus the ultimate end. I or any other individual in any form, am thus the end and should never be treated as the means only. The end and the means however should be consistent. There is an identity between them. Once the adpotion of immoral means for the attainment of a moral ideal, bound by space and time, is accepted, the result is bound to be chaos, anarehy and ultimate destruction. The moral nature of a value can be established only in a general context, and not on the basis of its success or fruitfulness on particular occarions. Temporary success is a non-moral value. Morality on the other hand is an ideal and its nature can be established only with the aid of a comprehensive rational interpretation. It is only in the context of the meaning and development of human life, understood in a universal sense, that the moral or non-moral nature of a value can be established. Man is moral because he is rational and universality is the soul of reason. Moral value is thus also a rational value. The essence of morality is the individual but it is not a particular individual; it is every individual. A particular individual is the subject of moral experience or rational

thinking. Any value however based on a particular individual or group of individuals, cannot be regarded as moral. It is only a natural value; and a universal form of natural value is moral value. That is precisely why abiding moral values can always lead man to freedom, peace and progress. To overlook any contradictions between ends and means for the sake of realising a temporary ideal is to block the way towards human liberation. Moral norms are a permanent, universal necessity and it is only with their aid that man can move towards his infinite ideal.

Life has all along been composed of both the desirable and the undesirable. Knowledge of the desirable enables man to avoid the undersirable, but it is never entirely averted. Thus the purely desirable is an infinite ideal and it is always essential for man to be cautious. The infinite nature of human ideals is expressed in the term 'freedom', and because freedom is an infinite ideal, it can be the guide to man in place of religion in his march onwards in future.

The marxists argue that Communism or Socialism is the altimate ideal, but it is an ideal bound by time, something to be realised in the near future. All students of ethics accept that whatever is consistent with the ultimate ideal is moral, for that is a view free from all fallacies. All those who accept Communism or Socialism as the ulitmate liberation of man naturally believe that whatever means lead to its realisation are good. It is often complained that in the ranks of Communism, Socialism or Fascism are witnessed opportuntion treachery, exploitation, suppression of opinion, torture murder, etc., all committed for the interests of the revolutionary party and revolution. But it should not be forgotten that behaviour involved in all these is consistent with the ultimate ideal of the Communist or the Socialist. Whatever can lead to the ultimate liberation is pure; purity can have no other meaning. It is therefore essential here to pose the question of the ultimate ideal. It is a mistake to believe that an ideal bound by time and space can liberate man. The higher moral ideals of man are those which are seen consistently pursued by him since the dawn of civilisation. If it can be shown that they attain perfection in

Communism or Socinlism, it will be possible to accept it as the ultimate idea. It is not a question here of treating moral values only be means; for, from this point of view, means and ends are identical. Truth or knowledge for example, is a means but it is also an end. Peace of mind is an end but it contributes to good health and may therefore be regarded as a means. Virtue is the state of identity between means and ends. Man goes from truth to truth, from knowledge to knowledge, from beauty to beauty. That was why the materialist Epicurus, who did not believe in religion, said that I am virtuous because it gives me joy to be so. It is as an ultimate ideal that Communism or Socialism is inadequate and full of shortcomings, for though it guarantees welfare, it denies human freedom. Just as welfare is a moral value, so is freedom and its denial is immoral. It has been argued that there is a dictatorship of the proletariat only during the transitional period and once all the internal and external enemies of revolution are done away with and revolution has spread all over the world, human freedom would be possible. But just as in logic, truth canot be reached from false propositions, so also a moral ideal cannot be attained through immoral means. To entertain such a hope is to run after a mirage. Greater freedom may come out of limited freedom. A Constructor of a Utopia should therefore not forget that the invariable eternal basis of human existence lies in moral norms which ought to be preserved and fully expressed in the ideal society. It may be perhaps because Socrates was poisoned, that his idea that knwoledge is virtue came prominently in light. The crucification of Christ may perhaps have increased the appeal of the Sermon on the Mount. It may have been perhaps realised due to the martyrdom of Gandhi that communalism is an evil. But how can all this prove that the deaths of Socrates, Christ or Gandhi are justifiable. The idea that the end justifies the means is an illusion.

An examination of Marxism from the point of view of Axiology and Ethies will show that Marx treated values as the epiphenomenon of existence, and thus dissolved both axiology and ethies in the philosophy

of nature. The history of Art or itellectual development on the other hand reveals that in no period of social revolution, was earlier art or knowledge entirely negated. The various fundamental revolutionary discovcries in mathematics or science have presisted through numerous social revolutions and so have the different artistic images and ideas. Revolutions do not alter everything; on the contrary, progress is possible because of an abiding heritage. Progress in the sphere of knowledge or of morality is not merely a reflection of the development of the mode of production; and hence revolutiours are anxious to preserve and inherit the capital of the capitalists and do not wish to destroy it. The dominant classes do not merely have a valuable accumulation of power and wealth, they also possess a wealth of spiritual culture, quite valuable, worth attaining and preservation. If revolutionaries could only inherit it, the dominating sections may have to surrender to the higher spiritual culture of revolution. It is therefore as much essential for revolutionaries to inherit the idealistic superstructure as to capture its material foundations.

The history of revolutionary parties clearly shows, as we have already seen, that power, once captured, is monopolised by the parties rather than being diffused among the poeple. It might perhaps be conceded to the people in a formal way, but the formality rarely implies any substance. Constitutional guarantees of freedom tend to be qualified or negated in the name of exceptions, emergencies or unexpected situations. Russia passed through such all experience, so has America, and it is difficult to say that the rulers of India would not travel the same way. The future Constitution of India furnishes ample basis for such an apprehension. In the entire history of democratic institution, there can hardly be found a functionary possessed of powers as wide and arbitrary as the President of the Indian Union. The draft endeavours to secure the state against the people rather than ensuring their freedom through their proper and effective control over the political apparatus. The test of the desirability or otherwise of political institutions is be freedom of individuals. The success of politics should be measured in terms of how far this freedom

is realised by them. The rulers, who ignore this test in their endeavour to build up an apparatus of power, are eventually bound to fail. The creators of a new state must carefully examine not only their ends but also their means. It may be possible temporarily to fool the people, but the future rulers after all will come from among them. They will be able to shoulder the responsibility if only they are creative minds, with integrity and character. To hope to produce such men through educational, literary, philosophical or institutional endeavours of a regimentative type is to live in a fool's paradise. The creative cultural periods in history speak of the attainments of liberated minds, with a capacity to appreciate the new. Creativity bursts open all bonds and limitations in its endeavours to emerge into the realm of freedom, like a bird in the open skies. The sky is the natural symbol of freedom. Just as the sky is infinite, so is freedom. Bergson's hiological view rules out the possibility of fixing the direction of creativity and hence the removal of restrictions is the invariable indication of its existence. Constitutional frameworks confering arbitrary powers on the executive, would simply create a gurantee against the growth of a creative culture. We have often discussed the proposed Indian Constitution and shall discuss it in this Conference also. What is indicated here is simply an approach to such discussion.

The basic principle of our polities is an attempt to bridge the gulf between the rulers and the ruled through the diffusion of power. Formal democracy leads to the delegation of power of the representatives. The sovereignty of the people remains under it in abeyance during the period between two elections. The people, devoid of power, can hardly enjoy any freedom, much less can they have it extended. In the absence of effective freedom, their welfare also remains an anrealised ideal. A socialist revolution promises welfare and is thus able to attract the discontented mass towards itself. But its consequence is the creation of a state which deprives the people entirely of power. Thus philosophically and programmatically, it also fails to provide any guarantee against totalitarianism. We have therefore to create an organisation which will

not aim at capturing power but will diffuse it among the people. It is both logically and empirically wrong to argue that power must be captured in order that it may be diffused. It is a mistake to believe that a party can diffuse power only by having the intention to do so.

Any endeavour to capture power through struggle against the organised might of a modern state is doomed to failure. Power cannot be captured in our time excepting on the basis of an overwhelming support of the people. The days when a determined group of revolutionaries could successfully capture power are gone. It is but proper therefore to enable the people themselves to come into power rather than win their overwhelming support to a party that may capture it with the object of subsequent diffusion. The concept of a sentimental or emotional popular rising must be rejected as both mistaken and impracticable. The only way open now is the education of the poeple. It is a destructive way to intensify discontent against those in power. A wise and discriminating individual, capable of properly using power, cannot be produced by that way. The view advocated here is contructive in the best sense, and demands courage integrity and sincerity of purpose. If the masses in revolt will not be the creators of new values, if the rebles are not inspired by a higher cultural urge, they will not be keen that they must have power. The end - and means relationship of power and their entire civilised existence must be fully realised by them. To impart that understanding is the purpose of political education.

Diffusion of power does not mean its decentralisation. Power is indivissible and the essence of diffusion is that the people as a whole must be able to wield it. Harmony of interests is the essential principle of its structure and it should be expressed in each individual constituent of the state. The political apparatus must be so constructed that no individual or group will be able to suppress the interests of others. It matters little if it has a single centre. Does not the Earth with a single centre influence all equally through gravitation? The concept of decentralisation has not been examined so far. It seems to be the echo or mimic of economic

decentralisation. It is a paraphrase of anarehy. The Marxian or socialist conscience is often tyrannised by the oppressive nature of political power and hence seems to have advanced this illusory, romantic and fallacious concept. The state being the political organisation of society is bound to embrace the entire society. But its defect has been that it cannot be used by all. This defect can only be removed by individuals inspired by the urge for freedom, who accept the unity of humanity on the basis of reason. Decentralisation, on the other hand means a number of sovereign centres of power and is therefore anarchy. It is impossible to conceive it in the context of the closely integrated social existence.

Our ideas will appear to lead to the conclusion that we have given up the politics of struggle against established authority. This has sometimes been constructed as renuneiation of the struggle for the poeple. There is nothing wrong with the construction. It is obvious that we are leaving power politics. A struggle conducted in behalf of the people for capturing power never places the people in power. People have even struggle for dictators or exploiters. All that it shows is that any struggle imspired by a collective ego ultimately destroys individual freedom. Those who fight for freedom are seldom aware of the stake or rationally understand it, with the result that revolutions generally mean only a change of masters. Modern technology has laid the foundations of dictatorship and the individual today is over taken by a feeling of helplessness in the face of the organised might of the state. Such an atomised individual is too prone to surrender to a collective ego, continually fed by the sentiments of a class or national consciousness. Devoid of individuality, he can be an easy victim to the propaganda of the powers that be; and an aggressive communal, national or Imperialist politics can thrive in such an atmosphere. We have to carry on politics which will spiritually liberat the people from the bonds of this anti-individulistic cultural atmosphere. People will never be able to struggle for their liberation in the absence of such politics.

The Indian people are much more dominated by this anti-individulistic outlook, for they never passed through a Reniassance like the West.

The individual here is still to be born. The decline of the traditional culture has been responsible for finding the Indian people in a state of stagnation. Even the national movement carried on for the past half a century or more sustained a defeat in so far as it led to the growth of internal dissentions which eventually culminated in the establishment of the two sovereign states. The mass massacres during the past few years have shown the depth of social, religious and cultural antagonism between the Hindus and the Muslims. It made us aware of it in the form of religious and cultural intolerance which eventually resulted in claiming the Mahatma as its victim. The traditional culture indicates a total absence of any constructive moral strength. It is destined to lead only to conflicts and destruction. The superficial interpretation of these conflicts as manouverings by the vested interests with the purpose of avoiding a social revolution can hardly do. As a result of the conflicts, the vested interests themselves are caught in a critical situation. The various conflicts, eithen between the Hindus and the Muslims or between the different casts in the Hindu Society are not a creation of the vested meterests but are the symptoms of a stagnant social order. They are reflected in every aspect of our life.

The cultural differences between the Hindus and the Muslims, the caste differences amongst the Hindus and the Provincial differences amongst the people in different parts of the country, all contain the possibilites of anarchy. The very foundation of Indian nationalism is a stagnant social order, which may easily prove to be its undoing. The ego that produced hatred against the British and also roused mutual hatred of the Hindus and the Muslims and produced Pakistan is the same ego which is today seen to be rousing fanaticism based on caste or provincial differences and may eventually lead to social degeneration. It is essentially because the Indian people find themselves in such an atmosphere of cultural stagnation that the need for an intellectual movement arises. A philosophical revolution is the need of the day. It would not be a revolution producing the so-called national unity; for,

national unity is founded on a blind faith in tradition and can produce individuals always ready to surrender themselves to a collective ego. What is needed is a peaceful, creative, rational, cosmopolitan order which can produce an atmosphere in which every individual can rise to the fullest heights of his intellectual and moral personality. We have to change the ideas and the behaviour of the poeple so that they may turn to the building up of such an order. We need a human and not a national culture. The world today finds itself in a position in which unless all the nations pull together, no nation can progress. To accept the idea that we should look to our nation first, human solidarity is a distant ideal, is to postpone even the promotion of national interests to an indefinite period. The revolution in our times simply signifies laying the foundations for the universal solidarity of man.

The traditional concept of revolution is proved to be mistaken. It is futile to think that out of struggles for redressing petty day-to-day economic grievences of the masses, we can pass on to a struggle for political power, capture power, and then turn to cultural and intellectual transformations. It is logically wrong, as also impraticable; for, a revolution, born out of such struggle, only places a certain party in power; and the party organises power in a manner as would preclude the possibility of the people getting it at any time. Such a revolution arises only in the contex of an organic view of society which continually feeds the callective ego. Further we are passing through a phase of declining capitalism. No state accepts the capitalist order in an unqualified manner but a State, controlling effectively the means of production, has become for more powerful than the owners of those means. The issue therefore is not of capitalism versus socialism; it has on the contrary become the issue of Democracy versus Dictatorship. The present economic order has reached a stage where it might collapse any moment through its internal contradictions. The result is a standing threat of anarchy and cultural chaos. The state under such conditions would resist any kind of economic struggles, with the consequence that it has become impraticable to think

of a struggle for power being led through the organisation of a series of partial struggles for redressing day-to-day grievances. Even the so- called Leftist parties are not free from the influence of nationalism with the result that in a situation of so- called national emergency, they pass on to a position of support to the established authority and level people to the same. Since the established order is founded on the national sentiment, and not on capitalism, it is not merely the established authority that stands in the way of revolution but also all those leftists subscribing to that sentiment. The present rulers do not depend on the capitalists. If they find that nationalisation will serve their purpose, it is not unlikely that they might go to the stage of controlling or even eliminating Capitalism. As a matter of fact, one of the principal objects of present day state is to make the productive apparatus a part of the political apparatus. The backward people in this country can be easy victims in this game of power. For the urge for freedom conductive to individual development and social progress seems to have been mostly clouded in them. It is therefore quite possible that the gospel of power in the form of 'strengthen the nation' may take deep roots in this country.

Power politics leads to the rise of wars, and therefore to to war economy. That type of economy already seems to have come to stay in India. In such an economy, the question of satisfying the essential requirements of the people can never have a prominent place. Even in the highly industrialised and prosperous nations, the living standards of the poeple are depressed when the economic effort comes to be organised for war. It is bound to be much more so in an economically backward country like India, suffering from an exaggerated notion but an actual paucity of resoures. In the context of such a situation, any party endeavouring to challenge the established authority through economic and political struggles is bound to drive the ruling authority in the totalitarian direction. Any party, opposed to the established authority and carrying on a struggle for power is thus destined to be defeated; and will in the process, simply help and strengthen the growth of totalitarianism.

It is essential therefore to discard the traditional concept of a political party; and lay the foundations of a new kind of politics, party; and lay the foundations of a new kind of politics, political activity and behaviour. That is the purpose with which we are meeting in this conference and it may necessitate the giving up of our existent organisational pattern as a political party.

The potential supporters of humanist politics are those who have been endeavouring, individually and through institutions, to promote the common good. Our first task is to be and to produce such individuals. Men, imparting education to all irrespective of caste, creed or religion, are found to be communalists; Socialists and Communists, out to awaken the 'proletariat of the world' are seen wedded to orthodox nationalism. The Premier of a province encourages his caste more than any one else; a teacher of physics is seen to be full of faith in grand-motherly superstitions. To purify the cultural atmosphere full of such contraditions and to promote in its place, scientific outlook and the brotherhood of man is our task. Yet another and more complicated, work we shall have to do is to transform the various traditional cultural patterns into so many channels contributory to a common human and cosmopolitan culture. The Historians of Culture have often claimed that Hinduism is tolerant. If the claim is accepted,it can be explained only on the basis of a recognition of the existence of the principle of Brahman, devoid of qualities or forms, in all kinds of deities and forms of worship. The tolerance may be said to have been preserved by this metaphysical foundation. It is a mistake to expect all the different cultures in the modern world to have faith in such a metaphysical dogmatic principle. The time-worn and anachronistic traits in the different cultures can be removed and a cultural harmony can be evolved today only on the basis of universal, and abiding secular ideals, naturally acceptable to all. Cultural distinctions may remain but not cultural conflicts. A Cosmopolitan secular human culture alone can harmonise life at present. A few political parties in the West have been endeavouring to provide in the form of Christian religion, a foundation for

humanism. But that is necessitating a reinterpretation and reformulation of the doctrines of Christianity. Similar attempts may also be made in respect of other religions. But a much clearer and effective approach than that is the approach of scientific humanism. It can be promoted through the assimilation of the positive and abiding contributions of various cultures, which can serve as a permanent source of inspiration. The old civilisation has become stagnant; and has tied down groups of human beings to narrow egoism. Its progressive possibilities have been exhausted. Hence the need for 'New Humanism'. New Humanism must replace old religion. That is the need of our times and let us forge ahead to fulfill that need.

**(Presidential address deliverd in All India Confererence of the Radical Democratic Party, Culcutta on 26th December, 1948)**

❍❍❍

२२

# नवमानवतावादाची गरज

**(ऑल इंडिया रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीच्या दि. २६ डिसेंबर, १९४८ कलकत्ता येथे संपन्न अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाचे मराठी भाषांतर)**

**भाषांतरकार - प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे**

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीमुळे भारताच्या इतिहासातील एका नव्या पर्वाची सुरुवात झाली असे मानण्यात येते. या ऐतिहासिक घटनेनंतर आपण प्रथमच एकत्र आलो आहोत. या अधिवेशनातील निर्णयांच्या आधारावर आपण एका नव्या कार्यक्षेत्रातील कार्यास प्रारंभ करणार आहोत आणि या हेतूनेच आपण खूप अभ्यास, गांभीर्याने विचारमंथन आणि आत्मपरीक्षणही केलेले आहे. मानवतेला सर्वांत मोठा धोका असलेल्या राजकीय एकतंत्रवादी विचारांच्या विरोधात लढा देण्यासाठी मूलगामी लोकतांत्रिक पक्षाची स्थापना झालेली आहे. शांततेच्या मार्गाने प्रगती करण्याच्या मार्गावर मानवतेने पुन्हा वाटचाल करावी हा या पक्षाचा हेतू आहे. हा लढा देत असतानाच तात्त्विक आणि वैचारिक मंथनामध्ये आपण मोठ्या उत्साहाने सहभागी झालेलो होतो. खरे म्हणजे हे विचारमंथन आपल्या लढ्याचा एक भाग म्हणण्यापेक्षा ती या लढ्याची प्रेरणाच म्हणावी लागेल. या गंभीर विचारमंथनाची परिणती आपण आपल्या मुंबई येथील शेवटच्या अधिवेशनात जी तात्त्विक विचारधारा स्वीकारली त्यात झालेली आहे. आपण आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या विकासातील एका नव्या टप्प्यावर आलेलो आहोत. स्वाभाविकपणे आपल्या भावी कार्यक्रमाच्या आखणीची आपल्याला आज गरज भासते आहे, तसेच आपल्या भावी कृती आराखडा आणि विचार यामध्ये सुसंगती येण्यासाठी आपल्या संघटनेचे रूपांतर, त्यातील नवीन बदल यांचीही आज गरज भासते आहे.

आपल्या क्रांतिकारी लोकतांत्रिक (मूलगामी) पक्षाची स्थापना करण्यापूर्वी आपण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये कार्यरत होतो; पण दुसऱ्या महायुध्दानंतर आपल्याला त्या शक्तिशाली संघटनेतून बाहेर पडावे लागले. हुकूमशाही फॅसिझमने मानवी स्वातंत्र्य आणि विकासाला मोठा धोका निर्माण करून एक मोठी शक्ती निर्माण केलेली होतीच आणि त्याद्वारे जग जिंकण्याच्या महत्त्वाकांक्षेने त्यांची वाटचाल सुरू झाली.

गुलामगिरीच्या जगात भारत स्वतंत्र होऊ शकणार नाही आणि स्वतंत्र राहू शकणार नाही, हे लक्षात आल्यावर, आपण लोकशाहीसाठी लढा देण्याचे ठरविले. त्या ओघानेच आपण काँग्रेसमधून आणि तिच्या लोकप्रियतेतूनही बाहेर पडलो. जग अजूनही या धोक्यातून बाहेर पडलेले नाही. हा हुकूमशाहीचा (फॅसिझमचा) धोका आजही वेगळ्या स्वरूपात कार्यरत आहे. यावेळी असलेल्या संघर्षाचे आपण ओळखलेले स्वरूप आणि अर्थ दररोज सिद्ध होत आहे. युद्धातील ब्रिटिशांचा विजय म्हणजे इंग्रजी साम्राज्याचा अंत, अशा आपल्या कल्पनारम्यतेचा आपल्याला अभिमान वाटत होता. परंतु, मानवी संस्कृतीला असणारा धोका आजही अस्तित्वात आहे आणि तो नव्या अधिक धोकादायक स्वरूपाचा आहे. या जाणिवेतून निर्माण होणारी जबाबदारीची जाण या कल्पनारम्य अभिमानाला देऊ शकत नाही. भावी संकटाची चाहूल लागल्याचे काहीसे समाधान कोणाला वाटू शकते; पण त्यावर मात करण्याची शक्ती संपादन करेपर्यंत आपणास स्वास्थ्य लाभणार नाही. आज मानवजातीला ही शक्ती प्राप्त झाली आहे काय? याचे उत्तर देणे कठीण आहे. आपल्याला झालेल्या या धोक्याच्या जाणिवेतून आपल्यावर लादलेल्या संघर्षावर मात करण्याची क्षमता साध्य करण्याची आणि त्यासाठीची प्रेरणा शोधण्याची जबाबदारी आपल्यावर आलेली आहे. आपल्याला हे पूर्णपणे समजलेले आहे की, आजच्या घडीला खरा मुद्दा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा नसून, मानवी स्वातंत्र्याचा आहे. आणि जर अशा मानवी स्वातंत्र्यावर आधारित सुसंगत समाजव्यवस्था नजीकच्या भविष्यकाळात निर्माण झाली नाही, तर राष्ट्रीय स्वातंत्र्याचे निरुपयोगी आणि फसवे स्वरूप स्पष्ट होईल.

आपण जेव्हा काँग्रेसमध्ये होतो, तेव्हा मार्क्सवाद्यांप्रमाणे आपणही समाजाची पुनर्रचना अगदी समाजात क्रांतिकारी बदल व्हावेत असेच म्हणत होतो. 'जगातील कामगारांनो एकत्र या' या मार्क्सवादी हाकेला आपण क्रांतिकारी म्हणत होतो. मार्क्सवाद्यांप्रमाणेच वसाहतवादी साम्राज्यवादी समाजरचनेतील क्रांती ही लोकशाहीवादी आणि समाजवादी यांनी असेल असे आपणही मानत होतो, म्हणून आपण राष्ट्रीय चळवळीचे अशा क्रांतीसाठीच्या साधनात रूपांतर करण्याच्या कार्यात व्यग्र होतो. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात फॅसिझमच्या विरोधातील लढ्याला दुय्यम स्थान देऊन फक्त राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याला काँग्रेसने प्राधान्य दिले. काँग्रेसमधील हा बदल तिच्या राष्ट्रीय भावनेचा स्वाभाविक आणि तर्कसंगत परिणाम होता. खरे तर फॅसिझम (एकतांत्रिक हुकूमशाही सत्ता) हादेखील एकप्रकारे राष्ट्रवादाचाच परिणाम आहे. विशिष्ट भौगोलिक हद्दीतील भूभागाची सांस्कृतिक अस्मिता म्हणजे राष्ट्रवाद. तो सामूहिक अहंकारावर आधारित असतो. सर्वजण या अहंकाराला वाहिलेले असतात, ते त्याची पूजा करतात आणि त्याच्या वेदीवर केवळ साधन म्हणून आत्मसमर्पण करतात, प्रत्येक देश आपल्या हितसंबंधांना, महत्त्वाकांक्षांना प्राधान्य देत असतो आणि दुसऱ्याच्या इच्छा-आकांक्षांना दुय्यम स्थान देत असतो. म्हणूनच

प्रत्येक देशाचा राष्ट्रवाद आपल्या स्वतःच्या घटकांच्या समर्पणाचा अभिमान बाळगतो. अशा विचारप्रणालीशी व्यक्तिगत स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांचे सुसंवादी नाते जोडले जाणे शक्य नसते. कधीही राष्ट्रवाद वरील तत्त्वांना प्रमुख तत्त्वे म्हणून प्रामाणिकपणे मान्यता देत नाही. राष्ट्रवादाचा राष्ट्रीय अहंकार परंपरेवरील दृढ विश्वासावर पोसला जातो. राष्ट्रवादाची ही वैशिष्ट्ये भारतातही ठळकपणे जाणवू लागली आहेत.

वेगवेगळ्या देशांतील साम्यवादी, समाजवादी पक्षही राष्ट्रवादाच्या प्रभावापासून मुक्त झालेले नाहीत. उलट त्यांच्या तात्त्विक विचारांचा आधार सामूहिक शक्ती असल्याने व त्यात व्यक्तिगत स्वातंत्र्याला फारसे स्थान नसल्यामुळे त्यांच्यावरील राष्ट्रवादाचा प्रभाव अधिक होता. उदा. युनायटेड स्टेट्स ऑफ सोव्हिएत रशियाच्या कम्युनिस्ट पार्टीचा राष्ट्रवाद युद्धकाळात ठळकपणे उघड झाला. त्यामुळेच फॅसिझमच्या विरोधात लढणाऱ्यांचे नैतिक नेतृत्व स्वीकारून फॅसिझमच्या विजयी घोडदौडीच्या विरोधात लढण्यात रशियाला अपयश आले. राष्ट्रवाद इतरांच्या गुलामगिरीला प्रोत्साहन देतो म्हणून तो कधीही पुरोगामी शक्ती म्हणून पुढे आलेला दिसत नाही. पवित्र रोमन साम्राज्याचे तुकडे होऊन युरोपातील छोटी राष्ट्र स्वतंत्र झाली; पण त्यामुळे युरोपातील प्रतिक्रियावादी शक्तींचा उदय झाला. याचा अर्थ युरोपच्या आधुनिक सांस्कृतीच्या हृदयातच अशा शक्तींची निर्मिती झाली की, ज्यांच्यामुळे युरोपचा ऱ्हास झाला, अशा शक्ती की, ज्या धर्मापेक्षा जास्त प्रतिक्रियावादी, प्रतिगामी होत्या. धर्माच्या अस्थिरतेमुळे त्या शक्ती अधिक बलवान झाल्या. जगातील सर्व प्रमुख धर्म, निदान तत्त्वत: तरी सर्व मानवजात एक मानतात, मानवाची एकसंधता समानता मानतात आणि हे राष्ट्रवादाच्या विचारांच्या विरोधी आहे. आपणास असलेल्या राष्ट्रवादाच्या प्रतिगामी स्वरूपाच्या जाणिवेमुळे आपण या देशातील इतर सर्व राजकीय पक्षांपासून दूर राहिले पाहिजे. राष्ट्रवादाच्या या प्रतिक्रियावादी स्वरूपाची जाणीव आपल्याला आपल्या तत्त्वप्रणालीच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून दुसऱ्या महायुध्दाच्या आरंभीच आलेली प्रतिक्रियावादी होती. ती आपण राष्ट्रवादाच्या खऱ्या प्रतिक्रियावादी स्वरूपाचे दर्शन घडवून आणल्यामुळेच होय.

आपल्या तात्त्विक, वैचारिक वाटचालीतील दुसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे आपली मार्क्सवादी समीक्षा. मार्क्सवादी विचारप्रणालीचा प्रयोग जगात आज अनेक ठिकाणी चालू आहे. कम्युनिस्ट म्हणजेच साम्यवादी समाजरचना निर्माण करण्यानेच मानवसमाज जोखडांतून मुक्त होईल, याची खात्री मार्क्सवादी देतो. कोणतीही सामाजिक तत्त्वप्रणाली तिच्या व्यक्तीला स्वतंत्र करण्याच्या क्षमतेच्या कसोटीवर तपासून घेणे व त्यासंदर्भात निवाडा करणे योग्य असते आणि या कसोटीवर आपण मार्क्सवाद तपासून घेतलेला आहे. कोणाही निःपक्षपाती निरीक्षकाला दिसणारे मार्क्सवादाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे श्रमिकांच्या क्रांतीतून निर्माण होणारे राज्य अगदी लहान अशा चांगुलपणाच्या नावाखालील शक्तीच्या

आहारी जाते आणि मग ते हुकूमशहाच्या अधिपत्याखाली जोखडात पूर्णपणे अडकून बसते. साम्यवादी पक्षाच्या संघटनेत हेच तत्त्व अंतर्भूत असते. लोकांच्या उद्धाराच्या नावाखाली हा क्रांतिकारी पक्ष (साम्यवादी पक्ष) सत्ता संपादन करतो आणि ही सत्ता लोकांमध्ये विभागून देण्याऐवजी हा पक्ष स्वतःची मक्तेदारी स्थापन करतो. वर्गविरहित समाजरचना स्थापन करण्याचे व्रत घेतलेल्या या पक्षात सत्तेची लालसा निर्माण होते. श्रमिकांच्या नावामुळे जमीनदारी सरंजामी आणि श्रीमंतीचा ऱ्हास होतो हे खरे आहे. परंतु ही प्रक्रिया वर्गविरहीत समाजवादी, साम्यवादी समाजरचना निर्माण करण्याऐवजी निष्ठूर हुकूमशाहीकडे नेते. जे लोक व्यक्तिस्वातंत्र्यासाठी प्रेरित झालेले आहेत, ते अशी क्रांती स्वीकारू शकत नाहीत.

जागतिक क्रांतीचे नेतृत्व करणारा सोविएत युनियन हा देश दुसऱ्या महायुद्धात विजयी झाला; पण युद्धात होरपळून गेलेल्या मानवतेचे नैतिक नेतृत्व तो करू शकला नाही. सोव्हिएत युनियनचा विजय जागतिक क्रांतीचे दरवाजे उघडेल, ही अपेक्षा फोल ठरली. गेली दोन शतके किंवा त्याहूनही अधिक काळ पश्चिमी युरोपीय देश स्वातंत्र्यासाठी लढा देत आहेत. भांडवलशाही सत्तेत आली, तरी त्यांची सहजपणे फसवणूक होऊ शकणार नाही, तशी शक्यता मान्य करणे एका अर्थाने श्रमिकांच्या क्रांतीची विचारधाराच खोडून काढल्यासारखे होईल. जर मार्क्सवादाच्या दाव्याप्रमाणे अस्तित्वामुळे विचारधारा संकोच पावत असेल, जर भांडवलशाही समाजरचनेच्या पडत्या काळात श्रमिक आणि शोषित समाज क्रांतीच्या आवश्यकतेसंबंधी अधिकच सजग होत असेल, तर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फॅसिझमच्या विचाराला सहाय्य करणाऱ्या श्रमिक शोषित समाजाचे वर्तन पूर्णपणे उलगडत नाही. या अनुभवामुळेच मार्क्सवादाची मूलभूत समीक्षा करण्याची निकड निर्माण झाली. या समीक्षेतून निघालेले निष्कर्ष असे : सत्ता मिळविण्याच्या हेतूने जेव्हा क्रांतिकारी पक्ष राजकारणात उतरतात तेव्हा अंततः ते सत्तेचे मक्तेदार बनतात आणि ज्यांना खरे खातंत्र मिळावयाची आच नसते, अशा लोकांच्या सांस्कृतिक प्रतिगामित्वाच्या वातावरणात त्यांचा ऱ्हास होतो. क्रांतीचे मार्ग फसलेले आहेत हे दुसऱ्या महायुद्धाने दाखवून दिलेले आहे. मार्क्सवादावर आधारित क्रांती घडवून आणण्याचे प्रयत्न या शतकात एकूण अकरा (११) देशांनी केले; पण हा प्रयत्न एक अपघात म्हणून फक्त रशियात यशस्वी झाला. शक्तिशाली औद्योगिक पायावर उभारलेले आणि विनाशाच्या तांत्रिक साधनांसह सज्ज असलेले आधुनिक राज्य उलथवून टाकण्याची कल्पना ही साहसी वाटेलही; पण ती अवास्तव साहसवादाचीच भाषा बोलणारी असते. क्रांतीचा मार्ग स्वीकारण्यापूर्वी त्यांची वैज्ञानिक, तार्किक दृष्टिकोनातून योग्य अशी समीक्षा करणे आवश्यक असते. साहसवाद, सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्याऐवजी तिची गळचेपीच करीत असतो. एकाच संघटित शक्तीचा सामना कोणताही राजकीय पक्ष आज करू शकत नाही. अपघातांनी निर्माण होणाऱ्या युद्धासारख्या परिस्थितीमुळे गोंधळ निर्माण करण्याकडे वाटचाल होऊ शकते. त्यांना कधी कधी क्रांती

म्हणून संबोधित करता येते; पण खऱ्या क्रांतीचा विचार असल्या प्रासंगिक परिस्थितीवर आधारित नसतो. एका अर्थाने क्रांती ही एक कला आहे. ती दूरदृष्टी असलेल्या आणि वास्तवाचे भान असलेल्या लोकांच्या पूर्ण साकारल्याने केलेल्या नियोजनातूनच साकार होते. केवळ सत्ता मिळविण्यासाठी स्थापन झालेल्या राजकीय पक्षाचा भावी क्रांतीच्या साधनांमध्ये समावेश करता येणे शक्य नसते. लालसेना क्रांती घडवून आणेल, अशी खात्री असलेले लोक अशी पार्टी किंवा पक्ष स्थापन करू शकतात आणि तिच्या कामगिरीची वाट पाहात राहू शकतात; पण त्याला खचितच श्रमिक आणि शोषितांनी किंवा त्यांच्या पक्षाने घडवून आणलेली क्रांती असे म्हणता येत नाही. इतिहासातील अनुभवावर आधारित निगमनानुसार सत्ता बळकावण्यासाठी सत्तेच्या राजकारणात गुंतलेल्या पक्षाची उभारणी करण्याचा विचार आपण सोडून दिलेला आहे.

सत्तेसाठी चाललेले राजकारण किंवा त्या विचारांवर आधारलेले राजकारण, हेच आजच्या जागतिक संघर्षाचे खरे कारण आहे. तिसऱ्या महायुध्दाची शक्यता ही याच तर्कशास्त्रावर आधारित असणारी परिणती आहे. प्रत्यक्षात जरी महायुद्धाचा उद्रेक होत नसला, तरी जगाची संघर्षमय परिस्थितीतून सुटका झाली आहे, असे मानता येत नाही. आर्थिक दारिद्र्य, दुःख, सामाजिक असुरक्षितता, जातीय, राष्ट्रीय आणि सांस्कृतिक द्वेष, युद्धाची तयारी आणि आंतरराष्ट्रीय संबंधांमधील अविवेकी स्पर्धा, शत्रुत्व ही या संघर्षमय वातावरणाची लक्षणे असून, ती तशीच राहणार आहेत. ती जगाला बेबंदशाही आणि साचेबंदपणाकडे गतिशून्यतेकडे फरपटत नेत आहेत आणि नेत राहणार आहेत. वरील सर्व धोके आजच्या आपल्या बौद्धिक, आध्यात्मिक, कुंठित, साचेबंदपणामुळे निर्माण झालेले आहेत. त्याचा परिणाम म्हणून अनेक इतिहासतज्ज्ञ, तत्त्ववेत्ते, शास्त्रज्ञ आपल्या विज्ञानपूर्व किंवा विज्ञानावर आधारित नसणाऱ्या पूर्वीच्या काळाचा आसरा घेत आहेत. आधुनिक विज्ञानावर आधारित औद्योगिक प्रगती आपणाला सर्व सुखांच्या जगात नेईल किंवा समाजवादी राज्यक्रांती किंवा साम्यवादी क्रांतिकारी बदल या पृथ्वीवर रामराज्य निर्माण करेल, अशा अपेक्षांची निरर्थकता त्यांना मनोमन समजून आलेली आहे. स्वातंत्र्य आणि समृद्धी केवळ नैतिक मूल्यांवरील मानवजातीच्या ठाम विश्वासातूनच प्राप्त होऊ शकेल; आणि नेमका हाच विश्वास विज्ञानाने सिद्ध केलेल्या प्रचंड प्रगतीने खोटा ठरविला आहे किंवा त्याचे पुनरुत्थान विज्ञानाने केलेले नाही. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील इतिहासाचा हा धडा आहे. महाभारतातील पांडवांची एक गोष्ट आहे. त्यात पांडव एकदा एका जंगलात वाट चुकले आणि त्यांना उन्हाच्या झळा सोशित भटकावे लागले. त्यावेळी ते एका स्वच्छ सुंदर तळ्याकाठी आले; पण यक्षाने त्या तहानलेल्या पांडवांना पाणी पिण्यापासून रोखले. कदाचित तशाच पद्धतीने विज्ञानाने मानवजातीला स्वातंत्र्याच्या उंबरठ्यापर्यंत आणले; पण मानवाला समृद्धीच्या घरात प्रवेश करण्यापासून रोखले गेले आहे. त्याचे कारण मानवाचे

बौद्धिक आणि नैतिक अपयश हे असावे असे वाटते. या काळातील शहाण्यांनी म्हणूनच पूर्वीच्या नैतिक शक्तीकडे म्हणजेच धर्माकडे पुन्हा परतण्याचा विचार सुरू केला असावा. त्यांनी धार्मिक पुनरुत्थानाची हाक दिलेली आहे, ती अशा वातावरणात की ज्यामध्ये धर्मकल्पना पश्चिमेकडील देशांत जुनी, वापरून संपलेली आहे. ज्याप्रमाणे जीवनात निराश झालेला एखादा तरुण त्याच्या पूर्वीच्या प्रसन्न, सुखी वातावरणातील त्याच्या पालकांनी त्याच्या केलेल्या संरक्षणाच्या आठवणीत रममाण होतो आणि ते संपल्याचे दु:ख सहन करतो, त्याप्रमाणेच हे आधुनिक शहाणपण धर्माचे संरक्षक कवच शोधत आहे. आधुनिक मानवी मनावर पुन्हा आपला प्रभाव निर्माण करणे धर्माला शक्य होणारे नाही, ही एक अशी वास्तवता आहे की, जी पूर्णपणे सिद्ध झालेली आपल्याला आपल्या अलीकडच्या या देशातील अनुभवातून स्पष्टपणे दिसून आलेली आहे.

आधुनिक संस्कृतीविरुद्ध बंड करणारा आणि धर्मावर आधारित मानवी मूल्यांचे समर्थन, संरक्षण करणारा महामानव आपल्या देशात पुढे आला, तो म्हणजे महात्मा गांधी. धर्मावर दृढ श्रद्धा ठेवूनच गांधीजींनी राजकारणात प्रवेश केला. परमेश्वराच्या आशीर्वादाने माणसाचे शुद्धीकरण होऊन तो पुन्हा नैतिकतेच्या मार्गावर केवळ धर्मामुळेच येईल, अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांनी अत्यंत शक्तिशाली अशा राजकीय आणि सामाजिक चळवळींचे नेतृत्व केले. हा त्यांच्या नेतृत्वाचा काळ दोन महायुद्धांचा आणि त्यामधील काळ होता. या काळालाच गांधीयुग म्हणतात. 'अंतःस्फूर्तीच आपल्याला सत्याची प्रचिती देते,' या बर्गसनच्या मताचा त्यांनी राजकारणात उपयोग केला; पण त्याला फारसे यश आले नाही. कारण, धर्म पुन्हा असंख्य माणसांच्या मृत्यूला जबाबदार असल्याचे आढळून आले आहे. अशाप्रकारे इतिहासाची पुनरावृत्ती झाली. ज्यावेळी विज्ञानपूर्व काळात धर्माने सत्ता गाजविली, त्यावेळी धर्माच्या रक्षणासाठी युद्धे आणि संघर्ष झाले आणि परमेश्वराच्या तलवारीने आपले काम निष्ठूरपणे केल्याचे दिसले. परमेश्वर आणि धर्माच्या भक्तांनी गेल्या काही वर्षांत भारतात तलवारीचा वापर केला आणि त्या ओघातच त्यांनी खुद्द गांधीजींचाच बळी घेतला. त्यांच्या शेवटच्या काही दिवसांत त्यांना त्यांच्याच आदर्शाचा पराभव पहावा लागला आणि त्यांचे अगदी निकटवर्ती आणि शिष्यसुद्धा गांधींचे पुनरुत्थान ख्रिस्ताप्रमाणे होईल, याची शक्यता ठामपणे सांगू शकत नाहीत. धर्मनिरपेक्ष राष्ट्र स्थापन केल्याचे त्यांचे अनुयायी ओरडून सांगत आहेत. आज जे राज्यकर्ते आहेत, ते गांधीजींची मंदिरे उभा करतील आणि त्यांची सर्वत्र पूजाही करतील; पण ज्यांच्या प्रयत्नांमुळे आजचे राज्य मिळाले आहे, ते यापुढे गांधीजींच्या तत्त्वप्रणालीप्रमाणे वाटचाल करेल, अशी अपेक्षा करणे भाबडेपणाचे ठरेल. एका विस्तृत तत्त्वप्रणालीच्या भक्कम पाया शिवाय किंवा त्याच्या अभावात तथाकथित धर्मनिरपेक्ष राज्य अगदी सहजपणे संधिसाधू सत्तेचे राजकारण आणि चाड नसलेल्या भौतिकतेची प्रभावी निर्मिती करते. अशाप्रकारे असे राज्य आदर्श आणि आदर्शवादापासून खूप दूर जाते आणि

शेवटी त्याला याची शिक्षा भोगावी लागते.

पश्चिमेकडील काही शास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्तेसुद्धा प्रचलित संघर्षातून मार्ग काढण्यासाठी पुन्हा धर्माकडे वळण्याचा विचार करू लागले आहेत; पण त्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि बुद्धिप्रामाण्यवाद यांचा त्याग करणे भाग आहे. सत्य जाणून घेण्याची मानवाची प्रवृत्ती माणसाइतकीच प्राचीन आहे आणि त्याच्या अवतीभवतीच्या वस्तूंच्या ज्ञानावरच म्हणजे विज्ञानावरच त्याचे अस्तित्व अवलंबून आहे. जोपर्यंत माणसाची जिज्ञासा धर्मकल्पनेशी सुसंगत होती, तोपर्यंत धर्म ही एक प्रभावी सांस्कृतिक शक्ती होती; पण विज्ञानाच्या प्रगतीमुळे प्राप्त झालेल्या प्रगतीच्या उच्च टप्प्यावर पोहोचल्यानंतर धर्मसंकल्पनेतील त्रुटी, कमतरता स्पष्ट होत गेल्या. या धर्माचे भ्रामक स्वरूप आज सहज समजून घेता येते. विज्ञानाने धर्माच्या सत्तेची किंमत मानवी अस्तित्व आणि आध्यात्मिकता या दोन्ही क्षेत्रांत कमी केली. अस्तिवाच्या क्षेत्रात निसर्गाच्या तत्त्वज्ञानाने धर्मापुढे आव्हान निर्माण केले. तथापि, विज्ञान नैतिक सौंदर्यवादी तसेच इतरही मूल्याचे पुनरुत्थान करू शकले नाही. धर्माने नीतिमत्ता अजरामर केली. सौंदर्याने मानवी कल्पनाशक्तीला, परमेश्वरी अद्भुत निर्मिती या नात्याने अंकित करून ठेवले. याला विज्ञान हे आपल्या क्षेत्रात प्रवेश देऊ शकत नाही, अगर सौंदर्य आणि नैतिक मूल्यांच्या महत्त्वाला मान्यताही देऊ शकत नाही. अशाप्रकारे मूल्ये आणि वास्तवता या दोहोंमध्ये एक पोकळी (दरी) निर्माण झालेली आहे. गेल्या अनेक शतकांमध्ये धर्माने सातत्याने निसर्गाचे तत्त्वज्ञान आणि जीवनाचे तत्त्वज्ञान यामध्ये एक पूल (सांधा) निर्माण केलेला होता. निसर्गावरील आपली पकड ढिली पडत गेल्यावर माणूस जीवनाच्या अर्थाविषयी संभ्रमात पडला, गोंधळला; आणि त्या संभ्रमातून, गोंधळातूनच आजच्या जगाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. आज मानवाला आपल्या जीवनाकडे साकल्याने, सर्वसमावेशकतेने पाहणे आवश्यक आहे. धर्मसत्ता ज्यावेळी शक्तिमान होती, त्यावेळी ज्या मानवी समूहांना जीवनाचा अर्थ कळला नाही, त्यांची संस्कृती, राज्ये एकतर धुळीला मिळाली किंवा शतकानुशतके कुंठित, साचेबंद पद्धतीत राहिली. इजिप्त, बॅबिलोन किंवा ग्रीकांच्या समाजरचना गुलामगिरीच्या पायावर उभारल्या होत्या. आजची पिरॅमिडस् त्यांची भौतिक जगातील बाबींच्या महत्त्वाची जाणीव स्पष्ट करणारे साक्षीदार आहेत; पण तेदेखील माणसाच्या गैरहजेरीच्या संदर्भात उभा आहेत. कारण, ते माणसाच्या गुलामगिरीवर आधारित आहेत. आज माणसाला हे समजून घेणे आवश्यक आहे की, 'सर्व गोष्टींचे परिमाण माणूसच आहे.' नाही तर त्याच्या भौतिक कृती, त्याने निर्मिलेल्या वस्तू फक्त त्याच्या अस्तित्वाच्या आठवणीत राहतील. हिंदू संस्कृती अनेक शतके टिकून राहिली ती केवळ धर्मामुळेच, असे मानणे योग्य होणार नाही. ती टिकून राहिली याचे कारण, तिच्या काळात गुलामगिरीच्या संघटना, जशा इतर प्राचीन संस्कृतींच्या काळात प्रभावी होत्या, तशा इथे नव्हत्या. तीन हजार वर्षांपूर्वीचे वेद आजही आहेत; पण इथे गुलामगिरीवर आधारित समाजसंरचना उभी

राहिली नाही. कारण, तशी ती त्याकाळात नव्हती.

आधुनिक वैज्ञानिक युगाचा जन्म प्रबोधनाच्या काळात झाला. त्यामुळे तार्किक किंवा बुद्धिप्रामाण्यवाद वृद्धिंगत होऊन मानवी मूल्यांचा आधार सुस्पष्ट झाला. विज्ञान युगामुळे फक्त मूल्यांना अधिक वैभव प्राप्त करून दिले इतकेच नाही, तर नवीन मूल्ये आणि नवीन संकल्पनाही निर्माण केल्या. परिणामत: आज जीवशास्त्र, उत्क्रांतीवाद आणि मानववंशशास्त्र ही शास्त्रे मूल्यांचे क्षेत्र आणि अस्तित्वाचे तत्त्वज्ञान यांची सांगड घालण्याच्या प्रयत्नात दिसतात. त्याचा परिणाम असा झाला की, सापेक्षतावादी, उपयुक्ततावादी किंवा अंतःस्फूर्तिवादी नीतिशास्त्र यांचे महत्त्व कमी झाले किंवा त्यांना गौण स्थान देण्यात आले. आज मित्रत्व, सहकार्य, प्रयत्न, खेळ, परंपरांचे जतन, स्वातंत्र्य, सौंदर्य, सत्य आणि प्रेम यांसारखी मूल्ये माणसाइतकीच प्राचीन आहेत. हे स्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे. आणि या मूल्यांच्या चौकटीच्या संदर्भातच त्याच्या संपूर्ण जीवनाची रचना, त्याच्या घसरणीच्या काळातही विषद केली जाऊ शकते. या चौकटीच्या मर्यादांचे कोणतेही उल्लंघन क्लेष, दुर्दशा, हालअपेष्टांत परिणीत होते. या मताला पुष्टी देणारे पुरावे मानवाच्या इतिहासात सापडतात. कारण, ही मूल्ये नैसर्गिक आहेत. सुख आणि दुःख, अभिलाशा आणि व्देष, अस्तित्वाच्या लढ्यात टिकून राहणे, सृजनशीलता ही सर्व त्यांची अंशात्मक चिन्हे आहेत. सुख किंवा दुःखाची सापेक्षता, इच्छेचे समाधान, नावीन्याचा आनंद किंवा मनःशांती या गोष्टी या मूल्यांच्या व्यक्तिगत बाजू आहेत. व्यक्ती आणि वस्तुमधील सांकल्पिक निष्कर्ष ॲरिस्टॉटलच्या काळापासून विचारात पक्के रुजलेले आहेत. आणि एखादी बाजू, भाग म्हणजेच पूर्ण सत्य या चुकीच्या समजाला तेच जबाबदार आहेत. आदर्शवाद, अध्यात्मवाद, स्वचे अस्तित्व हेच खरे मानणारा स्ववाद (Solipsism) आणि वैराग्य या सर्व गोष्टी सत्याकडे व्यक्तिनिष्ठ भूमिकेतून पाहण्यामुळे निर्माण होतात. गूढवादही याचीच एक प्रणाली म्हणता येईल. मानवी मनाची स्थिती आणि मानसिक प्रक्रिया व वस्तुनिष्ठ वैशिष्ट्ये आणि प्रक्रिया यांच्यातील फारकतीमुळे धर्म आणि तत्त्वज्ञान या दोहोंचीही हानी झालेली आहे. टोकाच्या सुखवादाच्या नैतिक तत्त्वांचे तर्कदोष, भ्रम किंवा स्ववादाचे स्त्रोत हे व्यक्तिगत मानसिक स्थितीतून मूल्यांकडे पाहण्यामुळे निर्माण झालेले आहेत. एकदा का फूल आणि त्यापासून मिळणारा आनंद यांचे अभिन्नत्व, एकरूपत्व लक्षात आले की मग अंतर्गत आणि बाह्य हे दोन्ही संकल्पना आणि मूल्यांची निर्मिती करतात, हे लक्षात येते. संकल्पनांचे क्षेत्र हे मानव आणि निसर्ग या दोहोंचेही क्षेत्र आहे. जसे तर्कशास्त्र आणि गणिताचे सिद्धांत वेळेच्या बंधनात नसतात, तसेच मानवी मूल्यांचे रीती-रिवाजही वेळेच्या बंधनात नसतात. अस्तित्वात बदल झाले तरी मूल्यांच्या रीती-रिवाजात बदल होण्याची गरज नसते. जे बदलणे शक्य आहे, ते म्हणजे त्या रीती-रिवाजांचे आपले ज्ञान. सतत बदलणाऱ्या विश्वाचे नियंत्रण नियमांनी झाले नसते, तर विज्ञानच शक्य झाले नसते. जसे सतत बदलणाऱ्या विश्वाची

एक बाजू कायम असते. तशीच सतत बदलणाऱ्या जीवनाची एक बाजू कायम असते. मूल्यांचे रीती-रिवाजांचे आकलन दोन प्रकारे होते. एकतर अंतःस्फूर्तीमुळे किंवा तर्काने. अंत:स्फूर्तीने दिलेला निकाल आणि तर्काधिष्ठीत चौकशी, अभ्यास दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. पूर्वी तर्काने, बुद्धीने साध्य केलेल्या गोष्टीच्या वारसा वारशांमुळे अंतःस्फूर्तीने सत्य व कला जाणणे शक्य होते, त्याला बौद्धिक संशोधनाची मदत देणे जरूरीचे नसते. जर व्यास वाल्मीकी, होमर, अचिलस, कालिदास, शेक्सपिअर, बेथोवेन, नेपोलीयन यांना त्यांच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक परंपरांपासून वेगळे काढले, तर त्यांना सिद्धहस्त जादूगार, मांत्रिक, धनुर्धारी, एस्किमोमधील किंवा संथाल जमातीतील कथाकथनकार यांच्यापासून वेगळे काढणे अशक्य होईल.

जग हे हव्या असलेल्या आणि नको असलेल्या मूल्यांचे मिश्रण आहे. त्या दोन्ही प्रांतांत पुन्हा वर्गवारी आहे. शिवाय तिथे पुन्हा साधनरूप मूल्ये आणि साध्यरूप मूल्ये अशी विभागणी आहे. तथापि साध्ये हीच साधने आणि साधने हीच साध्ये असतात. काही साध्यरूप मूल्यांचे साधनरूप माणसाला सातत्याने उमजत आलेले आहे. निसर्गातील रंग, पक्षांचे संगीत, फुलांचा सुगंध, फळांची गोडी, बालकाची निरागसता, पालकांच्या यशस्वी प्रयत्नांचे कौतुक, धोक्यापासून वाचविणारे धाडस, समान अभिरूचीच्या माणसांचे सहजीवन ही सर्व मूल्ये आहेत. त्यांचे महत्त्व बौद्धिक संशोधनाची मदन न घेताही उमजते. या त्वरित अनुभवाच्या गोष्टी आहेत. तथापि, जिथे वेगवेगळी मूल्ये मिश्र स्वरूपात येतात किंवा सापेक्षतेने समजून घ्यावी लागतात. तिथे योग्य निष्कर्ष काढण्यासाठी बौद्धिक चौकशी करणे क्रमःप्राप्त असते. उदा. कलेसारख्या क्षेत्रामध्ये जिथे काळजीपूर्वक आणि विविधतेने वर्गीकरण केलेली मूल्ये संघटित झालेली असतात, तिथे बौद्धिक, तार्किक निष्कर्ष अपरिहार्य असतात. कलावंतामधील अंतःस्फूर्तीने काढलेला निष्कर्ष प्रभावी असतो, त्याचवेळी बौद्धिक किंवा तर्काने केलेली समीक्षा त्याला मदत करणारी असते. शास्त्रज्ञाच्या बाबतीत मात्र, अगदी उलट स्थिती असते. ज्यावेळी अनेक मूल्ये एकत्र मिश्रण स्वरूपात येऊन गुंतागुंतीची स्थिती तयार होते, त्यावेळी तर्काची किंवा बौद्धिक प्रक्रियेची मदत घेऊन निर्णय करणे आवश्यक असते. उच्च स्तरावरील नैतिक मूल्याचे रीती-रिवाज, सुरुवातीला निश्चित करताना हीच पद्धत वापरली जाते. तिथे अंतःस्फूर्तीचा उपयोग नसतो. अतःस्फूर्ती ही बौद्धिक निष्कर्षासाठी केवळ सहकार्य करते. एखादा बौद्धिक निष्कर्षही अंतःस्फूर्ती म्हणून गणला जातो, जेव्हा तो उत्स्फूर्तपणे निगमन किंवा विगमन स्वरूपाचा असती, अशाप्रकारे बौद्धिक आणि अंतःस्फूर्ती यांच्या सहाय्याने, त्यांच्या प्रक्रियांमुळे मूल्यांचे रीती-रिवाज ठरविले जातात. बौद्धिक, तार्किक शोधांच्या सहाय्याने जी मूल्ये कायमस्वरूपाची म्हणून मानली जातात, ती तशी त्वरित येणाऱ्या अनुभवातूनही प्रत्ययास येतात. उदा. काही लोकांना स्वाभाविकपणेच शुद्ध, शक्तिवर्धक आणि आरोग्यदायी अन्नपदार्थांची आवड

असते, जरी त्यांना ते बौद्धिक (वैद्यकीय शास्त्राप्रमाणे) पद्धतीने सिद्ध करता येत नसले, तरी ते काम एखाद्या आहारशास्त्रज्ञाला चांगले जमणारे असते, हेच उच्च दर्जाच्या नैतिक मूल्यांच्या बाबतीत घडते. परंतु उत्स्फूर्तपणे आलेल्या निगमन किंवा विगमनांवर सर्वस्वी अवलंबून राहणे धोक्याचे असते. सत्याची अंतिम परीक्षा कसोटी, विवेकबुद्धी हीच असते, आणि निश्चित तातडीचे बंधन एकच असू शकते, ते म्हणजे त्याची इष्टता किंवा अनिष्टता, जी वस्तुनिष्ठ विवेकावर ठरविली जाते. विवेकनिष्ठेवर आधारित शोधलेली नैतिक मूल्ये 'चांगले आहे', 'असे असावे' (Ought to be) या वर्गात येतात. त्यांच्यासंदर्भात नैतिक निष्कर्ष हे मोह, भीती आणि भावनिक आवेग अशा गोष्टींमुळे प्रभावित होण्याची शक्यता असते. दुसऱ्या बाजूला जे विवेकाधारित मूल्यांचा खुलेपणे स्वीकार करतात आणि त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात, या त्यांच्या वर्तनाविरोधात जे सांगितले जाते, ते सर्व मुद्दे बाजूला सारतात, ते 'आहे' (is) या क्रियापदाचे कर्ते असतात. एखाद्याची हत्यारे दुसऱ्याची प्रतीके असतात; पण असे लोक फक्त आदर्श जगातच असतात. कांट हा तत्त्ववेत्ता म्हणतो त्याप्रमाणे मी अनुभवजन्य स्व (किंवा मी) म्हणून मी जे करणे योग्य किंवा चांगले आहे, तेच मी जसा आहे त्याच्या स्वप्रेरणेनेही करणे योग्य आहे.

अंतिमतः नैतिक मूल्य हे व्यक्तिगत असते, आणि हे माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या आकलनातील निगमनाने सिद्ध होते; पण हे 'अपात्र स्वार्थी' प्रकृतीचे समर्थन करू शकत नाही. कारण, मानवी सहकार्याशिवाय मानवाचे अस्तित्व आणि मानवी विकास अशक्य आहे. म्हणूनच इथे 'व्यक्ती' ही संज्ञा एखाद्या व्यक्तीसाठी नसून उत्तर ती 'सर्व मानव' किंवा 'विश्वमानव' या अर्थाने येते. कांट म्हणतो, मानवतेला, मग ती तुमच्यामध्ये असो की दुसऱ्यांमध्ये असो, एक साध्य माना, साधन म्हणून कधीही मानू नका. मानवता अशाप्रकारे अंतिम साध्य आहे. मी किंवा इतर कोणत्याही स्वरूपातील मी अशाप्रकारे एक 'साध्य' आहे, साधन नव्हे; म्हणूनच 'मी'ला कधीही साधन म्हणून मानले जाऊ नये. तथापि, साध्य आणि साधन हे नेहमी सुसंगत असावेत. त्यांच्यात एक अभिन्नत्वाची ओळख असणे आवश्यक आहे. एकदा का नैतिक आदर्शासाठी अनैतिक साधनांचा स्थल आणि काळात, अवलंब स्वीकारला की, त्याची परिणती गोंधळ, बेबंदशाही आणि शेवटी विनाशात होणे अटळ असते. एखाद्या मूल्याचे नैतिक स्वरूप फक्त सर्वसामान्य संदर्भातच स्थापन करणे शक्य असते, आणि ते फक्त एखाद्या यशावर आधारित असणे योग्य नाही. नैतिकताविरहित (Non Moral) मूल्य आहे. दुसऱ्या बाजूला नैतिकता ही आदर्श असते आणि तिचे स्वरूप सर्वसमावेशक बौद्धिक अर्थस्पष्टीकरणाच्या सहाय्यानेच सिद्ध करता येणे शक्य असते. नैतिक किंवा नैतिकताविरहित (Non Moral) मूल्याचे स्वरूप फक्त सार्वत्रिक अर्थाने, मानवी जीवनाचा अर्थ आणि मानवविकास यांच्या संदर्भातच स्थापित करता येणे शक्य आहे. माणूस हा नैतिक आहे. कारण तो विवेकी, बुद्धिनिष्ठ आहे आणि सार्वत्रिकता हा

विवेकाचा, तर्काचा आत्मा आहे. अशाप्रकारे नैतिक मूल्य हे विवेकनिष्ठ मूल्यही असते. नैतिकतेचे मर्म व्यक्तीत असते; पण ती एखादी विशिष्ट व्यक्ती नसते, ती प्रत्येक व्यक्ती असते. एखादी विशिष्ट व्यक्ती ही नैतिक अनुभव किंवा बौद्धिक विचाराचा विषाय असतो. तथापि, कोणतेही मूल्य जे एखाद्या व्यक्तीवर किंवा व्यक्तीसमूहावर आधारित आहे, ते नैतिक आहे असे मानता येत नाही. ते फक्त एक नैसर्गिक मूल्य म्हणता येईल, आणि नैसर्गिक मूल्याचे सार्वत्रिक रूप म्हणजे नैतिक मूल्य होय. म्हणूनच ठरवलेली नैतिक मूल्ये मानवाला स्वातंत्र्य, शांती आणि समृद्धीकडे नेतात. साध्य आणि साधन यांच्यातील विरोध दुर्लक्षित करणे, तेही क्षणिक तात्पुरत्या साध्यासाठी, हे मानवी मुक्तीचा मार्ग रोखून धरण्यासारखे आहे. नैतिक रीती-रिवाज हे कायमचे सार्वत्रिक गरजेचे असतात; आणि केवळ त्यांच्या मदतीनेच मानव त्याच्या अमर्याद आदर्शाकडे वाटचाल करू शकेल.

इष्ट आणि अनिष्ट यांच्या मिश्रणाने जीवन बनलेले असते. इष्टाचे ज्ञान अनिष्ट टाळण्यासाठी उपयोगी असते; पण अनिष्ट पूर्णपणे टाळता येणे अशक्य असते. अशाप्रकारे पूर्णपणे इष्ट, भाग्यकारी हे अमर्याद असते आणि त्यासाठी माणसाला नेहमीच जागरूक राहावे लागते. माणसाच्या आशा-आकांक्षा, त्याचे आदर्श हे अमर्याद असतात आणि त्यांचे प्रकटीकरण, 'स्वातंत्र्य' या संज्ञेत होते. आणि स्वातंत्र्य हे 'अमर्याद आदर्श' असल्यामुळे ते माणसाला धर्माच्या जागी त्याच्या वाटचालीत मार्गदर्शक ठरते.

मार्क्सवादी असा दावा करतात की, साम्यवाद किंवा समाजवाद हेच अंतिम आदर्श साध्य आहे; पण हे काळाने बद्ध आहे, ते असे काहीतरी आहे की, जे नजीकच्या भविष्यकाळात साध्य करता येईल. नीतीशास्त्राचे सर्वच विद्यार्थी हे मान्य करतात की, जे जे अंतिम आदर्शाशी सुसंगत आहे ते ते नैतिक आहे. कारण, ही भूमिका सर्व भ्रामक कल्पनांपासून दूर आहे. साम्यवाद किंवा समाजवाद हेच अंतिम मुक्तीचे साधन आहे, असे जे मानतात ते स्वाभाविकपणेच त्या साध्यासाठी कोणत्याही साधनांचा उपयोग योग्य असतो असेच मानतात. अशी तक्रार केली जाते की, साम्यवाद, समाजवाद, फॅसिझममधील पदांच्या श्रेणीमध्ये संधिसाधूपणा, दगाफटका, विश्वासघात, शोषण, मतांचे दमन, छळ, खून इ. सर्व त्या क्रांतिकारी पक्षाचे उद्देश आणि क्रांतिसाठी केले जातात; पण इथे हे विसरून चालणार नाही की, या सर्वात जे वर्तन घडते, ते सर्व साम्यवादी किंवा समाजवादी अंतिम उद्देशांशी सुसंग असते, जे जे अंतिम मुक्तीकडे नेते, ते ते शुद्ध असते. शुधत्वाला दुसरा अर्थ असूच शकत नाही; म्हणून इथे एक प्रश्न विचारणे आवश्यक आहे, तो म्हणजे 'अंतिम आदर्श' म्हणजे काय? जो आदर्श स्थल आणि कालाने बद्ध आहे, तो माणसाला मुक्तीकडे नेतो. हे मानणेही चुकीचे आहे. माणसाचे जे उच्चप्रतीचे आदर्श आहेत, ते मानवाच्या संस्कृतीच्या सुरुवातीपासून आजपर्यंत अव्याहतपणे चालत आलेले आहेत. त्यांचा पाठपुरावा माणूस आजवर करीत आलेला आहे. ते पूर्णत्वाने साम्यवाद, समाजवादात संपादित झालेले आहेत,

हे दाखविता येत असेल, तर त्यांचा अंतिम आदर्श म्हणून स्वीकार करणे शक्य होईल. इथे नैतिक मूल्यांचा साधन म्हणून विचार करण्याचा प्रश्न नाही. कारण, या भूमिकेत साध्य आणि साधन एकच आहेत. सत्य किंवा ज्ञान हे साधन आहे; पण ते साध्यही आहे. मनःशांती हे एक साध्य आहे; पण ते आरोग्यदायी आहे, म्हणून साधनही मानता येते. साध्य साधनामधील सुस्थिती म्हणजे सद्गुण. माणूस एका सत्याकडून दुसऱ्या सत्याकडे जातो, एका ज्ञानाकडून दुसऱ्या ज्ञानाकडे जातो, एका सौंदर्याकडून दुसऱ्या सौंदर्याकडे जातो. म्हणून भौतिकतावादी इपिक्युरस, जो धर्मावर विश्वास ठेवत नाही, म्हणतो, ''मी सद्गुणी आहे. कारण, तसे असणे हेच मला आनंद देते.'' साम्यवाद किंवा समाजवाद हा पुरेसा नाही. हे अंतिम निष्कर्ष आहे, त्यात त्रुटी आहेत. कारण, जरी तो कल्याणकारी राज्याची ग्वाही, खात्री देत असला, तरी तो मानवी स्वातंत्र्य नाकारतो. मानवी कल्याण हे जसे नैतिक मूल्य आहे तसेच स्वातंत्र्यही नैतिक मूल्य आहे, आणि त्याचे नाकारणे अनैतिक आहे. असादावा केला जातो की, श्रमिकवर्गाची, कामगारवर्गाची हुकूमशाही ही फक्त मधल्या संक्रमणाच्या काळात असते, एकदा का क्रांतीच्या अंतर्गत आणि बाह्य शत्रूंचा निःपात होऊन क्रांती जगभर पसरली की, मानवी स्वातंत्र्य शक्य होईल. परंतु तर्कशास्त्रात जसे असत्यावर आधारित विधान किंवा प्रस्ताव सत्याकडे नेऊ शकत नाही, तद्वतच अनैतिक साधनांद्वारे नैतिक आदर्शाची प्राप्ती होऊ शत नाही. तशी आशा धड़णे म्हणजे मृगजळामागे धावणे होय. मोठे स्वातंत्र्य, सीमित स्वातंत्र्यातून मिळू शकेल. कल्पनेतील परिपूर्ण सुराज्याच्या (Utopia) रचनाकाराला हे विसरून चालणार नाही की, मानवाच्या चिरंतन अस्तित्वाचा आधार नैतिक रीती-रिवाजात आहे आणि त्यांची पूर्ण जपणूक आणि प्रकटीकरण आदर्श समाजात सातत्याने व्हावे लागते. ज्ञान हाच सद्गुण आहे, हा सॉक्रेटिसचा विचार जेव्हा मूळ धरू लागला, त्यावेळी त्यामुळे कदाचित सॉक्रेटिसवर विषप्रयोग करण्यात आला असावा. येशू ख्रिस्ताला सुळावर चढविल्यामुळे कदाचित पर्ववारील प्रवचनांचे आवाहन अधिक प्रभावी झाले असावे. म. गांधींच्या हौतात्म्यामुळेच कदाचित जातीवाद ही एक वाई गोष्ट आहे, याची जाणीव झाली असेल; पण म्हणून सॉक्रेटिस, ख्रिस्त किंवा गांधीजींच्या हत्येचे समर्थन करता येणार नाही. साध्य हे साधनांचे समर्थन करते, ही कल्पना म्हणजे भ्रम आहे.

सॉक्रेटिस, ख्रिस्त किंवा गांधीजींच्या हत्येचे समर्थन करता येणार नाही. साध्य हे साधनांचे समर्थन करते, ही कामना म्हणजे भय आहे. नीतिशास्त्र आणि मूल्यविचार यांच्यादृष्टीने मार्क्सवादाची परीक्षा केली असता असे दिसते की, मार्क्सने मानवी अस्तित्वाच्या कारणांकडे डोळेझाक केली आणि याप्रकारे नीतिशास्त्र आणि मूल्यविचार यांना निसर्गाच्या तत्त्वज्ञानात विरघळून टाकले. दुसऱ्या बाजूला कला आणि बौद्धिक विकास यांचा इतिहास असे दर्शवितो की, कोणत्याही यापूर्वीच्या सामाजिक क्रांतीच्या काळात कला आणि ज्ञान यांना नाकारण्यात आलेले नाही किंवा त्यांना पूर्णपणे प्रभावहीन करणे शक्य झालेले नाही.

विज्ञान किंवा गणितातील अनेक मूलभूत सिद्धांतांचे शोध अनेक सामाजिक क्रांतींच्या काळात निष्ठेने घेतले जात होते तसेच विविध कलांच्या आणि विचारांच्या जगातील कार्य सुरू होते. हे सर्वकाही बदलू शकत नाहीत. उत्तर संपन्न वारश्यामधूनच पुढील विकास शक्य होत असतो. ज्ञान आणि नैतिकता यांचा विकास उत्पादनाच्या पद्धतीवर अवलंबून नसतो; म्हणूनच क्रांतिकारक भांडवलदारांच्या भांडवलाचे संरक्षण आणि त्याचा वारसा मिळविण्याचा प्रयत्न करतात, त्यांचा नाश करीत नाहीत. प्रभावशाली वर्गाकडे केवळ संपत्ती आणि सत्ता असे नाही, तर त्यांच्याकडे आध्यात्मिक सांस्कृतीची श्रीमंतीही असते आणि ती अमूल्य, जतन करण्यासारखी असते. जर क्रांतिकारक फक्त तो वारसा म्हणून मिळवित असतील, तर सत्ताधारी श्रीमंतांना क्रांतीच्या उच्च आध्यात्मिक संस्कृतीला शरण जावे लागेल. म्हणूनच क्रांतिकारकांना ही आदर्श समाजरचनेची चौकट वारसा म्हणून जपणे इतके आवश्यक आहे, जितके त्या रचनेतील भौतिक साधनांचे स्रोत ताब्यात घेणे त्यांना आवश्यक वाटते. आपण याआधी पाहिल्याप्रमाणे क्रांतिकारी पक्षांचा इतिहास असे दर्शवितो की, सत्ता एकदा का ताब्यात आली की, त्या पक्षाची ती मक्तेदारी बनते. त्या सत्तेत लोकांना वाव नसतो. क्वचित लोकांना तशा प्रकारचे आमिष दाखविले जाते किंवा तसा भास निर्माण केला जातो; पण त्यात तथ्य नसते. घटनेने दिलेले स्वातंत्र्य अपवाद, आणीबाणी किंवा अनपेक्षित परिस्थितीच्या नावाखाली दडपले जाते किंवा नाकारले जाते. रशियाने हा अनुभव घेतला आहे, तसेच तो अमेरिकेनेही; आणि भारतीय राज्यकर्ते त्या मार्गाने जाणार नाहीत, याची खात्री देता येत नाही. अशा शक्यतांची कल्पना येण्याइतपत भारताच्या भावी घटनेमध्ये त्याचे आधार सापडतात. इतके विस्तृत आणि स्वैर अधिकार बहाल करण्यात आलेल्या भारताच्या राष्ट्रपतीपदासारखे पद कोणत्याही लोकशाही देशाच्या इतिहासात क्वचितच आढळेल. घटनेच्या मसुद्यात लोकांपासून राज्य वाचविण्याचाच खटाटोप करण्यात आला आहे. मात्र, त्यांचे स्वातंत्र्य शाबूत राहण्यासाठी त्यांना राजकीय सत्तासाधनांवरीत योग्य नियंत्रणाची मुभा देण्यासाठी काही विचार होताना दिसत नाही. राजकीय संस्थांचा स्वीकार किंवा अस्वीकार करण्यासाठीची खरी कसोटी, परीक्षा म्हणजे व्यक्तीचे स्वातंत्र्य होय. राजकारणाचे यश हे अशा स्वातंत्र्याचे किती प्रमाणात रक्षण करते, यावर अवलंबून असते. जे सत्ताधीश ही कसोटी दुर्लक्षित करतात आणि त्यांच्या सत्तेची संरचना उभी करण्याचा प्रयत्न करतात, ते अपयशी होणे अपरिहार्य असते. नवीन राज्याची निर्मिती करणाऱ्यांनी त्यांची साध्येच नव्हे, तर साधनेही नीट तपासून पाहिलीच पाहिजेत. अल्पकाळासाठी लोकांना मूर्ख बनविणे शक्य होईलही; पण भावी राज्यकर्तेही त्यांच्यातूनच पुढे येतील. त्यांना त्यांची जबाबदारी पेलण्याची क्षमता तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा त्यांच्याकडे सृजनशीलता, नैतिक वर्तन एकसंधता आणि प्रामाणिकता हे गुण असतील. शैक्षणिक, साहित्यिक, तात्त्विक किंवा संस्थात्मक प्रयत्नांमधून अशी माणसे

(नेतृत्व) तयार करणे हे सैन्याच्या तुकड्या तयार करणाऱ्या हुकूमशाही राज्यव्यवस्थेत शक्य होईल असे मानणे म्हणजे मूर्खांच्या नंदनवनात राहण्यासारखे आहे. इतिहासातील सृजनशील आणि सांस्कृतिक काळ हा स्वतंत्र प्रज्ञेच्या व्यक्तींच्या कर्तृत्वाच्या यशाचा आहे; आणि अशा प्रज्ञावंतांना नवतेचे आकलन करण्याची क्षमताही होती. पक्षी जसा आकाशात उंच भरारी घेतो, तद्वतच सृजनशीलता सर्व प्रकारची बंधने तोडून उत्स्फूर्त आणि स्वयंभूपणे प्रकट होत असते, ती स्वातंत्र्याच्या आकाशातच. आकाश हे स्वातंत्र्याचे नैसर्गिक प्रतीक आहे. जसे आकाश अमर्याद आहे, तसेच स्वातंत्र्यही सृजनशीलतेला ठरावीक दिशा देता येण्याची शक्यता बर्गसनच्या जीववैज्ञानिक दृष्टीने खोडून काढली म्हणून सृजनशीलतेवरील सर्व बंधने काढून टाकणे म्हणजेच तिच्या अस्तित्वाची खात्री देणे असते. ज्या घटनेची चौकट, मसुदा कार्यपालिकेला स्वैर अधिकार देते, ती सृजनशील संस्कृतीच्या विकासाच्या विरोधाची खात्री देते. आपण याआधी अनेकवेळा भारताच्या भावी घटनेची चर्चा केलेली आहे आणि या अधिवेशनातही ती करणार आहोत. इथे फक्त या चर्चेचा आपला दृष्टिकोन कसा असावा, याचा निर्देश करणे इतकाच आहे.

आपल्या राजकारणाचे मूलभूत तत्त्व/सूत्र राज्यकर्ते आणि लोक यांच्यातील दरी सत्तेच्या अभिसरणातून कमी करण्याचा प्रयत्न करणे हे आहे. औपचारिक लोकशाहीमध्ये सत्तेची वाटचाल लोकप्रतिनिधींकडे असते. दोन सार्वत्रिक निवडणुकांच्या मधल्या काळात लोकांची सार्वभौमता या प्रतिनिधींमध्ये स्थगित आलेली असते. सत्तेपासून वंचित असलेले लोक क्वचितच स्वातंत्र्याचा आनंद घेऊ शकतात. स्वातंत्र्याचा विस्तार तर ते करूच शकत नाहीत. परिणामकारक स्वातंत्र्याच्या अभावामुळे त्यांचे कल्याण 'प्रत्यक्षात नसलेले आदर्श' असे असते. समाजवादी क्रांती लोककल्याणाची खात्री देते आणि अशा नाराज, असमाधानी लोकांना आकर्षित करून घेते. परंतु, याचा परिणाम म्हणजे असे राज्य निर्माण होते की, ज्यामध्ये लोकांना पूर्णपणे सत्तेपासून वंचित ठेवले जाते. अशाप्रकारे तात्त्विक आणि योजनात्मक दृष्टीनेही समाजवादी क्रांती हुकूमशाहीविरोधाची कोणतीही खात्री देऊ शकत नाही. म्हणून आपल्याला अशी संघटना तयार करावी लागेल की, जी सत्ता बळकावणारी नसून, सत्ता लोकांमध्ये वाटली जावी यासाठी झटणारी असेल. तार्किकदृष्ट्या आणि अनुभवातूनही सत्ता ही तिच्यानंतर प्रसारणासाठी व अभिसरणासाठी आधी बळकावणे आवश्यक असते. हा दावा चुकीचा आहे. केवळ एखाद्या पक्षाचा सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा इरादा आहे म्हणून तो पक्ष तसे करेल, असे समजणे ही मोठी चूक आहे.

आधुनिक सर्वशक्तिमान राष्ट्रशक्तीच्या विरोधात लढून सत्ता मिळविणे म्हणजे सर्वनाश होय. लोकांच्या प्रचंड बहुमताच्या आधाराशिवाय आजच्या काळात सत्ता मिळविणे शक्य होणार नाही. निश्चय केलेल्या काही क्रांतिकारकांच्या गटाने यशस्वीरीत्या सत्ता मिळविण्याचे दिवस केव्हाच संपलेले आहेत. म्हणूनच लोकांना स्वतःलाच सत्तेत आणणे, हे त्यांना नंतर

सत्तेत घेण्याचे आश्वासन देऊन त्यांचे प्रचंड बहुमत मिळविल्यापेक्षा अधिक चांगले, उचित असते. भाबड्या भावनिक, लोकप्रिय भावुकता निर्माण करणे आपण नाकारले पाहिजे. कारण, ते चुकीचे आणि आवास्तव आहे. आज एकच पर्याय उरलेला आहे, तो म्हणजे लोकशिक्षणाचा. आज सत्तेत आहेत त्यांच्याबद्दल मोठा असंतोष निर्माण करणे विनाशकारी आहे. या मार्गाने सारासार विचार करणारा, सत्तेचा योग्य उपयोग करणारा, विवेकी माणूस घडविता येणार नाही. इथे जी भूमिका मांडली जात आहे, जो विचार आहे तो विधायक आहे, सर्वार्थाने विधायका आहे आणि त्यासाठी हेतूंची प्रामाणिकता, धैर्य, सुसंगतता यांची खरी गरज आहे. उठाव करणारी सर्वसामान्य जनता नव्या मूल्यांची निर्मिती करणारी नसेल, जर बंडखोर उच्च दर्जाच्या सांस्कृतिक आकांक्षांनी प्रेरित झालेले नसतील, तर सत्तेसाठी ते उत्सुक असणार नाहीत. त्यांचे संपूर्ण सांस्कृतिक अस्तित्व आणि सत्ता यांच्यातील साध्य-साधन संबंध त्यांनी नीट समजावून घेतले पाहिजेत. ही जाणीवजागृती करणे, हा राजकीय शिक्षणाचा हेतू असला पाहिजे.

सत्तेचे प्रसारण, अभिसरण म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण नव्हे. सत्ता ही अविभाज्य असते, आणि सत्तेचे प्रसारण, अभिसरणाचे मर्म म्हणजे लोकांना तिचा वापर करता आला पाहिजे. सत्तेच्या संरचनेतील आशा-आकांक्षांची सुसंगती ही त्या रचनेचे प्रमुख अंग आहे; आणि ही सुसंगती राज्याच्या प्रत्येक घटकामध्ये प्रकट होणे अगत्याचे आहे. सत्तेची, राज्याची चौकट अशी असली पाहिजे की, त्यात कोणीही व्यक्ती अगर समूह दुसऱ्या व्यक्तीच्या वा समूहाच्या आशा-आकांक्षांच्या आड येऊ नये. त्याचे एकच केंद्र असले तरी ते फारसे महत्त्वाचे नसते. पृथ्वी आपल्या गुरुत्वाकर्षणाने सर्वांना सारखेच प्रभावित करीत नाही का? विकेंद्रीकरणाच्या संकलेचे नीट परीक्षण झालेले नाही. आर्थिक विकेंद्रीकरणाची नक्कल किंवा प्रतिध्वनी असे त्याचे स्वरूप असावे असे वाटते. तो बेबंदशाहीचा अनुवाद आहे. राजकीय सत्तेच्या दमनशक्तीमुळे मार्क्सवादी किंवा समाजवादी बुद्धीवर काहीवेळा जुलूम होत असल्यामुळे ही फसवी, असत्य, काल्पनिक संकल्पना पुढे आली असावी. राज्य ही समाजाची राजकीय संघटना असल्यामुळे ती सर्व समाजाला व्यापून राहते; पण तिचा दोष असा की, तिचा सर्वजण वापर करू शकत नाहीत. हा दोष दूर करणे फक्त स्वातंत्र्याच्या आकांक्षाने प्रेरित झालेल्या व्यक्तींकडून शक्य आहे. अशा व्यक्ती मानवतेची एकात्मता आणि विवेक यांवर श्रद्धा असणाऱ्या असतात. विकेंद्रीकरण म्हणजे दुसऱ्या बाजूला अनेक सार्वभौम सत्तेची केंद्रे म्हणूनच बेबंदशाही, एकत्रित जोडलेल्या अनेक बाबींच्या सामाजिक अस्तित्वाच्या संदर्भात यांची कल्पना करणे अशक्य आहे.

आपले हे विचार म्हणजे आपण चळवळीचे प्रस्थापित सत्तेविरोधाचा लढा सोडून देण्याकडे वाटचाल आहे, असा निष्कर्ष काढण्यासारखे वाटेल. काहीवेळा लोकांसाठी लढण्यास आपण उत्सुक नाही असेही वाटेल. या मतामध्ये काही चुकीचे नाही. आपण

सत्तेचे राजकारण सोडून देत आहोत हे उघड आहे. लोकांसाठी सत्ता बळकावण्यासाठीचा लढा लोकांमध्ये सत्ताप्रसारण करू शकत नाही. लोकांनी हुकूमशहांसाठी किंवा शोषण करणाऱ्यांसाठीही लढे दिलेले आहेत. हे सर्व पाहता समूहाच्या अहंकाराने प्रेरित झालेला कोणताही लढा अंतिमत: व्यक्तिस्वातंत्र्याच्या विनाशाकडेच जातो. जे स्वातंत्र्यासाठी लढतात त्यांनाही बौद्धिकदृष्ट्या काय संकटात आहे हे कळत नाही. त्यामुळे परिणामतः क्रांती म्हणजे फक्त बदल हेच सर्वसामान्यपणे दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञानाने हुकूमशाहीचा पाया घातला असून, राज्याच्या प्रचंड शक्तीमुळे व्यक्तीला आपण अगतिक, दुबळे झाल्याची भावना व्यापून टाकत आहे. अशाप्रकारे क्षीण झालेली व्यक्ती समूहाच्या अहंकाराला सहज शरण जाते आणि हा समूह अहंकार सातत्याने एका समूहाच्या भावनिक आवाहनाने किंवा राष्ट्रीय भावनेने वृद्धिंगत केला जातो. व्यक्तीला लोप पावलेली व्यक्ती भावी सत्तेच्या प्रचाराला बळी पडते; आणि अशा वातावरणात आक्रमक जातीयवादी, राष्ट्रवादी, साम्राज्यवादी राजकारणाचे फावते, त्यांना बळ मिळते. आपल्याला असे राजकारण करावे लागणार आहे की, जे व्यक्तिविरोधी सांस्कृतिक वातावरणाच्या बंधनांपासून आध्यात्मिकरीत्या माणसांना मुक्त करेल. अशा राजकारणाच्या अभावी लोक त्यांच्या मुक्तीसाठी लढा देण्यास कधीही तयार होणार नाहीत.

व्यक्तित्वविरोधी विचारांचा भारतीय समाजावर मोठा प्रभाव आहे. कारण, पश्चिमेकडील देशांप्रमाणे भारतातील लोकांनी प्रबोधनाच्या काळाचा अनुभव घेतलेला नाही. व्यक्तित्ववादी व्यक्ती अजूनही भारतात जन्मास यायची आहे. पारंपरिक संस्कृतीच्या ऱ्हासामुळे भारतीय लोक कुंठित साचेबद्धतेत अडकून राहिलेले आहेत. अगदी अर्धशतकापेक्षाही जास्त काळ कार्यरत असलेल्या राष्ट्रीय चळवळीलासुद्धा हा पराभव सहन करावा लागला. कारण, आपापसातील मतभेदांची शेवटी दोन स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रांच्या निर्मितीमध्ये परिणती झाली. गेल्या काही वर्षांत सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक शत्रुत्वामुळे हिंदू व मुसलमानांच्या सार्वत्रिक कत्तली झाल्या. त्यांनी आपल्याला धार्मिक असहिष्णूतेची जाणीव करून दिली की, ज्यामुळे माहात्म्याला स्वतःचा बळी द्यावा लागला. कोणत्याही रचनात्मक विधायक नैतिक शक्तीचा अभाव आपल्या पारंपरिक सांस्कृतीत दिसतो, त्यामुळे शेवटी परिणाम हा संघर्ष आणि विनाशात झाला. सामाजिक क्रांती टाळण्यासाठी आपमतलबी स्वार्थी लोकांनी केलेली ही चालाखी, डावपेच असा या संघर्षाचा वरवरचा अर्थ लावून भागणार नाही. या संघर्षाचा परिणाम म्हणजे हे आपमतलबी स्वार्थी लोकच संघर्षमय परिस्थितीत सापडले. हिंदू-मुस्लिमांमधील अगर हिंदुमधील विविध जातीतील विविध संघर्ष हे या मतलबी, स्वार्थी लोकांनी घडविलेल्या कृती होत्या, असे नाही तर सर्व समाजाची जी कुंठित साचलेली अशी अवस्था होती, जी कुंठित समाजव्यवस्था होती, तिचा तो परिणाम होता. या कुंठितपणाची लक्षणे आपल्या जीवनातील अनेक अंगांत परावर्तीत झालेली होती.

हिंदू-मुस्लिमांमधील सांस्कृतिक मतभेद, हिंदूंच्या जाती-जातींमधील विवाद आणि भारताच्या विविध प्रदेशांतील आपापसातील तंटे, मतभेद या सर्वांमध्ये अराजक, बेबंदशाहीची बीजे आहेत. भारतीय राष्ट्रवादाचा पायाच मुळी भारतीय समाजाच्या कुंठित साचेबंध समाजरचनेचा आहे, त्यामुळे तो कधीही ढळू शकतो. ज्या अहंकाराने ब्रिटिशांच्या विरोधात द्वेष निर्माण केला, ज्याने हिंदू-मुस्लिमांच्यात द्वेष निर्माण केला, पाकिस्तान निर्माण केले, तोच अहंकार आज जातींवर आधारित किंवा प्रादेशिकतावादावर आधारित अराजक, पिसाटवृत्ती निर्माण करीत आहे; आणि याची परिणती अधोगतीत होणे शक्य आहे. हे सर्व भारतीय समाज कुंठित, अप्रवाही, साचेबंध राहिल्यामुळे होते आहे. म्हणून आता बौद्धिक चळवळीची गरज निर्माण झाली आहे. तात्त्विक क्षेत्रातील क्रांती ही आजची गरज आहे. ही क्रांती तथाकथित राष्ट्रीय एकात्मतेची नसेल. कारण, राष्ट्रीय एकता ही परंपरेच्या अंधश्रद्धेवर आधारित आहे; आणि त्यामुळे सामूहिक अहंकाराला बळी पडून आत्मसमर्पण करण्यास तयार असणाऱ्या माणसांची फळी तयार होऊ शकते. आज खरी गरज आहे ती शांततापूर्ण, सृजनशील, तर्कशुद्ध, सर्वधर्मीय आधुनिक समाजरचनेची. अशा स्वतंत्र वातावरणाची की, ज्यात व्यक्तीला आपल्या बौद्धिक व नैतिक व्यक्तिमत्त्वाचा सर्वोच्च विकास करता येईल. आपल्याला लोकांचे विचार आणि त्यांचे वर्तन यात बदल घडवून आणावा लागेल, ज्यामुळे ते अशी पोषक समाजरचना निर्माण करू शकतील. आपल्याला राष्ट्रीय नव्हे तर मानवी संस्कृती हवी आहे. आज जगाची अशी अवस्था झाली आहे की, सर्व देशांनी एकत्र आल्याशिवाय कोणताही देश प्रगती करू शकणार नाही. आपण प्रथम आपल्या देशाकडे पाहावे. मानवी एकात्मता ही खूप दूरची गोष्ट आहे. ही कल्पना म्हणजे अगदी राष्ट्रीय उद्दिष्टे, लाभसुद्धा अनिश्चित काळापर्यंत पुढे ढकलणे होय. आपल्या आजच्या घडीला क्रांती म्हणजे सर्व मानवजातीच्या ऐक्याचा पाया घालणे असे आहे. क्रांतीची पारंपरिक संकल्पना ही चुकीची आहे हे सिद्ध झालेले आहे. लोकांच्या दैनंदिन लहानसहान आर्थिक प्रश्नांसाठी, अडीअडचणींसाठी आपण राजकीय सत्तेसाठी लढा देऊन सत्ता हस्तगत करणे आणि नंतर सांस्कृतिक, बौद्धिक परिवर्तनाकडे वळणे, असा विचार निरर्थक आणि चुकीचा आहे. तो तार्किकदृष्ट्या आणि व्यावहारिकदृष्ट्याही चुकीचा आहे. कारण, अशाप्रकारे क्रांती करून आलेली सत्ता एका पक्षाला प्राप्त होते आणि मग तो पक्ष सत्ता अशाप्रकारे वापरतो को, लोकांना ही सत्ता केव्हाही मिळू नये. अशी क्रांती समाजाच्या अशा संघभावनेतून निर्माण होते की, जी सामूहिक अहंकाराला खतपाणी घालते, शिवाय आपण आता भांडवलशाहीच्या पडत्या काळातून संक्रमण करीत आहोत. आज कोणताही देश मूळ स्वरूपातील भांडवलशाहीचा स्वीकार करीत नाही; पण जो देश उत्पादनाच्या साधनांवर परिणामकारकपणे नियंत्रण ठेवतो, तो देश त्या उत्पादनांच्या साधनांच्या मालकांपेक्षा अधिक शक्तिशाली बनतो. म्हणून मुद्दा भांडवशादीविरुद्ध समाजवाद असा

नाही, तर उलट मुद्दा लोकशाहीविरुद्ध हुकूमशाही असा आहे. आत्ताची आर्थिक रचना किंवा स्थिती अशी आहे की, अंतर्गत विरोधांतून तो कोणत्याही क्षणी कोलमडून पडेल. परिणाम असा की, आज आपण सांस्कृतिक गोंधळाच्या छायेखाली वावरत आहोत. अशा परिस्थितीत राज्य कोणत्याही प्रकारचा आर्थिक लढा देण्यास तयार होणार नाही. परिणामी, दैनंदिन आर्थिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी सत्ता बळकावणे, त्यासाठी लहान-लहान लढ्यांची मालिका तयार करणे, असा विचार करणे अव्यवहार्य आहे. अगदी तथाकथित डाव्या विचारांचे पक्षसुद्धा राष्ट्रवादाच्या प्रभावापासून मुक्त नाहीत, त्यामुळे तथाकथित राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात ते पक्ष सत्ताधारी पक्षालाच पाठिंबा देतात आणि लोकांनाही तसेच करण्यास सांगतात. स्थापित झालेली सत्ता ही राष्ट्रवादाच्या भावूकतेवर आधारित असते, ती भांडशाही विचारावर आधारित नसते; म्हणून केवळ प्रभावित सत्ताच क्रांतीला विरोध करते असे नाही, तर सर्वच डावपेच या भावूकतेशी सहमत होतात. आताचे सत्ताधीश भांडवलशाहीवर अवलंबून नाहीत. जर राष्ट्रीयीकरण त्यांचा हेतू साध्य करीत असेल, तर ते भांडवलशाहीला काबूत ठेवण्याचा प्रयत्न करतील. एवढेच नव्हे, तर तिचे उच्चरणही करतील. खरे म्हणजे उत्पादनाची साधने ही राजकीय साधनांचा एक भाग बनविणे, ही आजच्या राज्याच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक आहे. भारतातील मागासलेले लोक हे या सत्तेच्या राजकारणाला सहजपणे बळी पडू शकतात. कारण, स्वातंत्र्याची प्रेरणा जी व्यक्तींच्या विकासासाठी आणि सामाजिक प्रगतीसाठी पोषक असते, तीच मुळे या सर्वांमध्ये झाकोळून गेलेली असते. म्हणूनच सत्तेचे ब्रीदवाक्य "देशाला शक्तिशाली बनवा" हे या देशात मूळ धरू शकेल हे अगदी शक्य आहे.

सत्तेचे राजकारण युद्धाकडे नेते; म्हणूनच ते युद्धाच्या अर्थव्यवस्थेकडे नेते. अशी युद्धअर्थव्यवस्था या देशात स्थिर होत आहे. अशा अर्थव्यवस्थेत लोकांच्या निकडीच्या गरजा भागविण्याचा प्रश्न कधीही महत्त्वाचा होत नाही. अगदी उच्च प्रतीच्या औद्योगिक विकसित देशांतसुद्धा लोकांचे राहणीमान दुर्लक्षित होते. कारण, अर्थव्यवस्था युद्धाच्या तयारीला लागलेली असते. हे भारतासारख्या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशात अधिक प्रमाणात होणे क्रमःप्राप्तच आहे.

असा देश अतिरंजित कल्पना आणि तुटपुंज्या साधनसंपत्तीतून दुःख सहन करीत राहतो. अशा परिस्थितीत प्रस्थापित सत्तेला आर्थिक आणि राजकीय लढ्याच्या माध्यमातून आव्हान देणारा पक्ष सत्ताधारी शक्तीला हुकूमशाहीकडे नेणारा ठरतो. अशाप्रकारे प्रस्थापित राज्यसत्तेला विरोध करणारा व सत्तेसाठी लढा देणारा कोणताही पक्ष पराभूत होणार, हे ठरलेले असले; आणि या प्रक्रियेत असा पक्ष हुकूमशाहीला बळकटी आणत असतो. म्हणूनच राजकीय पक्षाची पारंपरिक संकल्पना सोडून देणे अगदी आवश्यक आहे; आणि नव्या राजकारण, राजकीय कृती व राजकीय वर्तनाची पायाभरणी करणे आवश्यक आहे.

आपण या अधिवेशनात एकत्र जमण्यामागे हाच प्रमुख उद्देश आहे. आणि आपल्याला सध्याच्या आपल्या राजकीय पक्षाच्या रचनेचा त्याग करावा लागण्याचीही शक्यता आहे.

मानवतावादी राजकारणाची बाजू घेणारे व सक्षम असणारे असे लोक व्यक्ती म्हणून आणि संस्थांच्या माध्यमातूनही सर्वांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील आहेत, असे आपण बनणे आणि इतरांना बनविणे, हे आपल्यापुढचे प्रथम कर्तव्य आहे. जात, धर्म आणि पंथ निरपेक्षपणे सर्वांना शिक्षण देणारे लोकही जातीयवादी आढळलेले आहेत. जगातील कामगारांना एक होण्याची हाक देणारे साम्यवादी समाजवादी हेही कर्मठ राष्ट्रवादाशी निगडित झालेले दिसतात.

एखाद्या प्रांताचा प्रमुख त्याच्या जातीला इतरांपेक्षा जास्त प्रोत्साहन देतो. एखादा भौतिकशास्त्राचा शिक्षक त्याच्या आधीच्या अंधश्रद्धांवर विश्वास ठेवतो. अशा विरोधाभासाच्या सांस्कृतिक वातावरणाची शुद्धी करणे आणि वैज्ञानिकदृष्टीचा व मानती बंधुत्वाचा प्रसार करणे, हे आपले कठीण काम आहे आणि त्याहीपेक्षा अधिक गुंतागुंतीचे काम आपल्याला करावे लागणार आहे ते म्हणजे आपल्या पारंपरिक सांस्कृतीच्या विविध तऱ्हा, पद्धती, साचे यांचे सर्वाधिक माननी बहुसंस्कृतीच्या अनेक पद्धतींमध्ये परिवर्तन करावे लागेल. सांस्कृतीच्या इतिहासकारांनी हिंदूवाद हा सहिष्णू आहे, असा दावा केलेला आहे. हा दावा जर मान्य केला, तर त्याचे समर्थन पुढील आधारावर केले जाऊ शकेल, तो म्हणजे ब्रह्म या तत्त्वाच्या अस्तित्वाचे आकलन कोणत्यादी लक्षणांशिवाय किंवा प्रतिकांशिवाय सर्व प्रकारांच्या मूर्ती किंवा पूजा प्रकाराखेरीजही स्पष्ट करता येते. सहिष्णुता ही या आधिभौतिक, आध्यात्मिक आधारानेच जतन करून ठेवलेली आहे, असे म्हणावे लागेल. आधुनिक जगातील सर्व विविध संस्कृती या आध्यात्मिक हेकेखोर कहरतत्त्वावर विश्वास ठेवतील, अशी अपेक्षा करणे ही चूक ठरेल. विविध संस्कृतींमधील जुन्या, कालबाह्य रूढी दूर करणे आणि एकप्रकारची सांस्कृतिक एकवाक्यता सुसंगती निर्माण करणे फक्त वैश्विक, निधर्मी आणि स्वाभाविकपणे सर्वांना मान्य होतील, अशा आदर्श तत्त्वावर आधारित विचारांमुळेच शक्य होणारे आहे. सांस्कृतिक फरक राहतीलही; पण सांस्कृतिक कलह राहणार नाहीत. आजच्या काळात सुसंगत, समाधानी जीवन केवळ बहुसांस्कृतिक, धर्मनिरपेक्ष मानवी सांस्कृतीच घडवू शकेल. ख्रिश्चन धर्माच्या आधारावर मानवतावादाची निर्मिती करण्याचा काही पाश्चात्य राजकीय पक्षांचा प्रयत्न चालू आहे; पण त्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वांचे नवीन अर्थ लावणे आणि त्यांची सुधारणा करणे आवश्यक आहे. इतर धर्मांच्या बाबतीतही तसेच प्रयत्न होणे शक्य आहे; पण यापेक्षा अधिक स्पष्ट आणि परिणामकारक भूमिका ही वैज्ञानिक मानवतावादाची आहे. वेगवेगळ्या संस्कृतींच्या विधायक सहभागातून याला बळकटी येऊ शकेल आणि असा सहभाग सर्वकाळातील प्रेरणा ठरेल. जुनी संस्कृती आज साचेबंध कुटील झाली आहे; आणि त्यामुळे मानवसमूहांना तिने संकुचित अहंकारांना

जखडून टाकले आहे. तिच्या विकासाच्या शक्यता आता उरलेल्या नाहीत. म्हणूनच नव्या मानवतावादाची गरज निर्माण झालेली आहे. नवमानवतावादाने धर्माची जागा घेतली पाहिजे. ही आज काळाची गरज आहे, आणि ही गरज भागविण्यासाठी आपण सर्व प्रयत्नशील राहूया.

❍❍❍

23

# FROM A PARTY TO A MOVEMENT

Our delibrations during the past three days have shown beyond all possibility of doubt that the Radical Democratic Party is an organisation with a soul. A soulless body gets decomposed. We have on the contarary decided to transform ourselves. Just as the Bhagawat Gita observes, a man throws away the worn-out clothes and take up another, and so we decided in this conferance to transform the nature of our co-operative existance. A revolutionary needs indomitabe courage : not merely the courage to transform society or a political apparatus; not merely the form himself. An egoist can never be a revolutionary. There is a difference between egoism and self. To transform one's self and thus to recreate it, is the basic principle of the universe. That is why the Italian historian Vico said, history is humanity creating ifself. A knowing self discards of its own accord a body that has ceased to be useful. An ignorant one is compelled to do so under the force of circumstances.

The Radical Democratic Party might, probably be the first political party to decide in the entire course was not born out of defeat. On the contarary, it is a decision arising out of a desire for new triumphs on the higher plane of human freedom. When the instruments created by man take the form of fetters on his creativity, it is the cosence of human wisdom to discard them. Human progress is possible essentially because of man's capacity to discard the old and antiquated instruments and take

to new and more effective ones. The path of revolutionis the path of producing the means to control the future and it demands a continual effort to improve them.

In any change man runs a risk of losing good deal, but it is of utmost importance that he must loose himself. Humanity has reverted the idea of renunciation. Human conscience which recognises the sacredness of renunciation suggest that if society proves to be a fetter renounce it for the self, if your creation proves to be a fetter renounce it for your self. My purpose is not to defend the cult of renunciation but to understand it. The reorganisation of the Radical Democratic Party does not mean the renunciation of politics. Renunciation is an attitude arising out of total despair. This idea of reorganising the party on the contarary is born out of the immortal desire to conquer the future. If Karl Marx had even dreamt of what is today happening in the Soviet Union, he would perhaps have renounced the idea and Organisation of a Communist Party. We are indeed more fortunatly situated than he so as to get out of the idea of a political party.

The verious institutions and association like society, the state, the nation, the religion and so on are meant for man and not man for them. Man is the archetype of the society. He is the creater of culture. The history of religion amply shows that he is also the creator of God as his means. That is why the sage Yajnavalkya said, husband, wife, the priest, the king, the vedas, God or Universe is for the self and not the self for any or all of these. It is this out look that was responsible for our coming to Humanism from the Meterialistic interpritation of history. Even Marx, when he formulated the principles of historical materialism, was inspired by a profound moral urge. It was the urge to create an idealogy, which would liberates man from his slavery to other human being and the material environment. But once the material means of production are recogniseds the determinig force in history, they begin to overpower man and enslave him even after a successful revolution. It is because we have seen this both logically and as a matter of experience, that we have advocated Humanism

while assimilating the positive outcome of the idealogy. The rejection of historical materialism has been informed by the truth that man is the creator of his future destiny.

The non-marxists have been viewing Marxism as a revolt roused by the purpose of destroying the spiritual and cultural heritage of humanity handed down by the verious religious institutions and are therefore afraid of it. They fear it as the way to a fail. To remove that fear it is necessary to preserve that outcome of the glorious heritage as will stand the test of scientific examination. Search for truth and self development is that outcome. Man has to learn that God is not his saviour or protector. He has to save and protect himself. The abiding essence of religion is the reflection on and the contemplation of human mestrise. He who recognise the solidarity of the entire humanity can done be the claimant to this noble heritage. Others, whether they are communalists or nationalist, the orthodox, believers in Hinduism or Islam are out to declare the bankurptcy of man through destorying that heritage.

Our task is to build up economic, political, cultural and educational institutions on the foundation of humanism. The organisation of a political party for the purpose is not only inadequate but is also likely to create limitations perticuliar to it. It may be deduction from the history of outstanding political movements that they had also philosophical and cultural movements accompanying them. The latter might also be said to have contributed to the success of the former. It may therefore be argued quite plausibly that the humanist movement can be promoted through the political activities of the Radical Democratic Party. But the history of contemporary political movements is based on one significant assumption, namely, that the political apparatus or state is the center of the entire social and cultural life. Hence social or cultural tranformations throug capture of the political apparatus. We do not accept the sequence in which a political revolution precedes all other revolutionary transformations. We no longer accept that capture of a political power is the means of social

change. The concept of political party arose essentially in the Context of this view and exercised considerable influence in the history of the past few centuries. It is true, for example, that Hegel regarded the history of humanity as the history of liberty and made it. The central doctrine of the history of philosophy; but on the contarary curiously enough he came to the conclusion that making a political constitution was making history. In our opinion political change is a part of the wider social and cultural change and the change in the different aspects of social and cultural existance supplement each other. The concept of a political party arises in the context of the idea that a political revolution percedes social revolution and is a means to it. It leads to concentration of power in the hands of section of the society and eventually results in the postponment of a comprehensive social and cultural transformation. Having rejected the very basis of that idea we had naturally to give up that form of organisation.

The capture of political power by a party with the object of diffiusing it defeats its own purpose. Similarly a movement to promote a philosophical revolution through education of the people would be handicapped by an organisation of a party claiming the monopoly of promoting such a revolution or education. Just as a political panty would create difficulty in the way of the diffusion of power it would also create them in the way of diffusion of knowledge. A party tends to create its own sect of philosophy and programme. It is quite possible that there may be others as educated, cultured and decent, outside its ranks as in them. A party thus is likely to create difficulties in the way of a real spiritual brotherhood.

The diffusion of power is not possible through its capture but through rousing the will to power in innumerable individuals. The will to know and to live a more cultured life must also be Toused. It is a mark of egoism to refuse to recognise that the growth of knowledge and culture takes place a good deal outside the ranks of a political party. The history of religion also indicates that religious movements which preceded the institutions of organised religion were responsible to a far greater extent for liberating man from sin or evil than the institutions of organised religion. Sectarian

religions have been responsible for thwarling the growth of religion. It is equally possible that an organisation like a political party may become responsible for impeding the unlimited political and cultural development. It is because of this possibility that we had to think in terms of dissolution of the party.

The essence of the Radical Humanist Movement which we are launching todays to promote the unfoldment of all the creative potentialities of men, to bring them together in a spirit of co-operation as to increase the strength of our efforts and to encourage the use and growth of free institutions in and through which they may live and develop themselves. This is not a mere altruistic or humanitarian movement, it is on the other hand a struggle, against the evil leading to the degeneration of the entire humanity.The need to fight against that evil was emphasised by Comrade M. N. Roy in his speech yesterday. It is indeed a curious-shall I call? - irony of history that M. N. Roy should have been required to struggle against the followers and coworkers of Mahatma Gandhi in order to defend and protect the Spirit of the Mahatma. We have indeed to go much further than the Mahatma and have to use far more pure and moral means in that struggle. That increases tremendously the responsibility devolving on us.The Mahatma was praying in order that heaven may come on earth. But there is no heaven elsewhere. We shall have to see that man builds it himself and here on earth. When will he do it is a question which all of us have to answer.

**(Concluding speech delivered at the All India Conference of the Radical Democratic Party held in Calcutta on 30th December, 1948).**

***The Independent India, 9th January, 1949 Page - 7 and 12.**

❍❍❍

२४

# आत्मशुद्धीच्या कामाला लागा

**जातीयवादाचा शनी**

आज देशात जातीयवाद फार बोकाळला आहे. मी अमुक जातीचा, धर्माचा म्हणून श्रेष्ठ असा अहंभाव म्हणजे जातीयता. हिंदुस्थानच्या राशीला लागलेला हा शनि आहे. त्यामुळे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हानी झाली आहे.

**भारतीय संस्कृतीचा विशेष**

हा देश फार जुना, संस्कृतीही प्राचीन. असीरी, मिसरी संस्कृती नष्ट झाल्या. परंतु, हिंदी संस्कृती जगाला संदेश द्यायला लागली आहे. भारतीय संस्कृती बदलत राहिली म्हणूनच जगली. परंतु, आज ती मेली नसली तरी मृतप्राय झाली आहे. तिला अवकळा आली आहे.

**इंग्रज गेला तरी दु:स्थिती**

आजवर इंग्रजांवर खापर फोडीत आलो. परंतु, इंग्रज गेला तरी दुर्दशा आहेच. इंग्रज आले म्हणून दुर्दशा नाही आली, तर आपण भ्रष्ट होतो म्हणून इंग्रजी राज्य आले. इंग्रजांना सत्तेची आवड असली तरी लोकांची इच्छा ते मानतात. इंग्लंडला युद्धातून सहीसलामत पार नेणाऱ्या चर्चिलला त्यांनी वेळ संपताच 'चले जाव' म्हटले. येथेही लोकमत अनुकूल नाही पाहताच घालवून देण्याची वाट पाहात नाही बसले. रानड्यांनी इंग्रजांची ही वृत्ती बरोबर ओळखली होती. ते महान द्रष्टे होते. त्यांचेच शिष्य गोखले. गोखल्यांचे महात्मा गांधी. त्यांनी जनतेची शक्ती उभी केली म्हणून इंग्रज गेले.

**पुढारी सारे करतील नका म्हणू**

पुढारी सारे करतील, ही वृत्त घातक आहे. अमुक एक पक्ष सारे करील, अमुक जात सारे करील, हेही फोल आहे. प्रत्येकाने स्वतः उभे राहिले पाहिजे. चांगले झाले पाहिजे.

**मानव तेवढा एक**

परस्पर प्रेम, सहकारिता आल्याशिवाय तरणोपाय नाही. जाती नष्ट होऊन त्यांचा

कायापालट झाल्याशिवाय सांस्कृतिक अधःपात थांबणार नाही. मानव तेवढा एक हे हिंदू धर्माचे खरे तत्त्व न कळल्यामुळे हिंदू धर्माचा नि संस्कृतीचा ऱ्हास होत आहे.

**उत्कर्ष कशात?**

मुसलमानास चांगला मुसलमान, ख्रिश्चनाला चांगला ख्रिश्चन बनविण्यात हिंदुत्वाचा उत्कर्ष आहे. हिंदुस्थानात सर्व धर्मांचे ऐक्य बनविणे हे हिंदुत्वाचे महान कार्य आहे. प्राचीन ऋषीमुनी समाजातील विस्कळीतपणा दवडून एकता आणण्याचे प्रयोग करीत. ते प्रयोग बंद केल्यामुळे आपण मृतवत झालो आहोत. केवळ सहभोजने नकोत जाती नष्ट करा. सांस्कृतिक समता, एकता निर्मायला हवी. सर्व जाती-जमातीत सामरस्य नि सामंजस्य निर्मायला हवे. ब्राह्मणांच्या बायकांप्रमाणेच इतर जातीच्या स्त्रियाही नीट शृंगारसाज करून जातींना दिसायला हव्यात. द्वेष, मत्सर नष्ट करा. सब की एक बोली करा.

**हिंदू धर्माचे विकृत रूप म्हणजे संघ**

आर.एस.एस. द्वेषावर उभारलेला. त्यांचा लष्करी हिंदुत्ववाद आहे. आर.एस.एस.मुळे जातीयवाद निघाला नसून जातीय वादांतूनच तोही जन्मला, फोफावला.

**लोकशाही की हुकूमशाही**

आज देशात स्वराज्य आले. परंतु, लोकशाहीऐवजी हुकूमशाही निर्माण होण्याचाही संभव आहे. भारताची घटना बनविण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वाचा भाग घेतला, हे केवढे भाग्य. दलित समजलेल्या वर्गांतील एक मनुष्य हे काम करीत आहे, हे प्रगतीचे चिन्ह आहे. परंतु, जी घटना केली जात आहे, तिच्यातून हुकूमशाही जन्मण्याची शक्यता आहे. संघराज्याच्या अध्यक्षाला केव्हाही हुकूमशहा बनता येईल, इतके अधिकार दिले आहेत.

**दोष कोणाला?**

परंतु याचा दोष आंबेडकरांकडे नाही. आपला देश आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही पतित आहे. लोकसत्तेला आवश्यक असे लोकमत आज देशात आहे कोठे? मते बनवायला लागणारी मती कोठे आहे? लोकांना नागरिक स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य यांची कदर कोठे आहे? आपली राज्यसत्ता अशी होत आहे की, ना लोकशाही, ना हुकूमशाही. जनता अन्याय सहन नाही करणार. उद्या जर हुई करून उठली तर का लोकसत्ता टिकणार आहे? आणि हुकूमशाही तरी का येथे बनणार आहे? जर्मनीत हुकूमशाही झाली. कारण, तिच्यासाठी आवश्यक अशी कर्तृत्ववान माणसे बिस्मार्कच्या वेळेपासून तेथे निर्माण होत होती. संघाचे एक गीत म्हणजे ''श्वास हे श्वासले नेत्यावरी विश्वासले.'' परंतु म्हणूनच राज्य बुडाले.

**आत्मविश्वास**

माणसाचा स्वतःवरचा विश्वास उडता कामा नये. बुद्धीवरचा, कर्तृत्वावरचा विश्वास पुन्हा जागवायला हवा आहे. सुप्त मानव्य प्रकटायला हवे आहे. हे काम झालेले नाही. त्यासाठी

सांस्कृतिक नि वैचारिक क्रांतीची जरूर आहे.

**स्वराज्य साधन आहे**

स्वराज्य म्हणजे स्वतःच्या भवितव्याचे साधन. ते तुम्हाला स्वर्गास पोहोचवील वा नरकासही. नरक नको असेल, तर जातीयवाद झडझडून दूर करा. शेकडो वर्षांच्या अहंकारातून तो जन्मला आहे. आपल्या गुरुजींवर अंधविश्वास ठेवून जाणाऱ्या संघासारख्या हुकूमशाही संस्था त्यातूनच जन्मल्या. सद्सद्विवेकबुद्धी गुंडाळून ठेवली म्हणजे गुरूची जरूरी भासते. परंतु, असा गुरू माणसाला गुरू म्हणजे नंदीबैल बनवितो.

**स्वतःला आधी सुधारा**

संघ हिंदू संस्कृतीच्या पुनरुत्थानाचे ध्येय मांडतो. ध्येय ठीक, परंतु मार्ग चूक आहेत. स्वतःला आधी सुधारा, मग जगाला सुधारण्याच्या गोष्टी. जातीयवादाने समाजाचे नुसते डबके बनविले आहे, एवढेच नव्हे तर सडविले आहे.

**देशाचे तुकडे कोणी केले**

पाकिस्तान, हिंदुस्थान तुकडे जिनांनी नाही केले, गांधींनी नाही केले. गांधींना पाकिस्तानसाठी जबाबदार धरणे विवेकशून्यतेचे लक्षण आहे. हिंदू-मुसलमानांच्या ऐक्यघोषणेने त्यांनी येथील राजकीय रंगभूमीवर प्रवेश केला. त्यांना खंडित स्वराज्य नको होते. मुसलमान येथलेच. त्यांची दृष्टी मक्का-मदिनेकडे असली म्हणून काय झाले? कोट्यवधी मैल दूर असणाऱ्या सूर्याकडे तुम्ही डोळे नाही लावीत? देश दुखंड झाला. या दुखंड हिंदुस्थानातील सांस्कृतिक अधःपाताविरुद्ध गांधी झगडायला उभे राहिले आणि या अधःपाताने त्यांचा बळी घेतला. पाकिस्तान परिस्थितीतून जन्मले. ज्यांना पतित मानून दूर ठेवले त्यातूनच पाकिस्तान आले. मुसलमानी धर्मात समतेमुळे ते गेले व कडवे बनले. हिंदुस्थानातील जातिभेदाची उतरंड आणि खालच्या जातीवरील जुलूम आणि अन्याय यांनी पाकिस्तानला जन्म दिला.

**आत्मशक्ती ओळखा**

हिंदू संस्कृतीचे रहस्य आत्मशक्ती ओळखण्यात आहे. तलवारीवर ती विश्वासत नाही. मानवाची प्रगती हे तिचे ध्येय आहे. हे ज्याला कळले नाही, त्याला हिंदुत्व कळले नाही. ख्रिश्चन धर्माच्या अधःपातामुळे इस्लामी धर्माची आवश्यकताच होती असे गिबन हा महान इतिहासकार म्हणतो. अलेक्झांड्रियाचे ग्रंथालय मुसलमानांनी जाळले नव्हते. ख्रिश्चनांच्या आपसातील झगड्यात ते जाळले गेले. इस्लामने सहिष्णुतेची शिकवण दिली. परंतु, मुसलमानांना तिचा विसर पडला.

**आज मानव संस्कृतीची कल्पना**

आज हिंदू संस्कृती, मुसलमान संस्कृती या कल्पना नकोत. आता मानव संस्कृतीची कल्पना रूढ व्हायला हवी. संस्कृतीतील चांगल्या कल्पना घेऊया. हिंदुत्ववादी सत्ताधारी झाले, तर भास्कराचार्यांचेच फक्त गणित शिकविणार की या क्षणापर्यंतचे? जगातील सर्व

संस्कृती बहिणी बहिणी आहेत. हिंदू संस्कृतींचे कार्य हे की, सर्वांतील चांगले घेऊन वाढणे. आपण चिनी संस्कृतीतील चैन घेतली; पण त्यांचा अपार श्रम करण्याचा गुण घेतला नाही. ते गाढवासारखे काम करतील. गाढवातही किती गुण, ते श्रम करते, कधी गढूळ पाणी पिणार नाही, असो. संस्कृती भिन्न असल्या तरी त्यांच्यात सुसंवाद निर्मायला हवा. साऱ्या वाद्यांत आपण मेळ आणतो, साऱ्या सुरांत आणतो, तसेच हे. सांस्कृतिक सुसंवादित्व निर्मायचे साधन म्हणजे बुद्धी व आत्मा. हिंदू धर्माचा आत्मा जर जागा झाला, तर हे काम तो करू शकेल. मानवाभ्रातृत्व निर्माण करणे, हा भारताचा आध्यात्मिक संदेश आहे. हे काम न करू तर रसातळास जाऊ.

**जातीयतावाद शाप**

जातीयतावाद शाप आहे. त्यावर संघटना उभारणे म्हणजे आत्मनाश. जातीय आहोत परंतु जातीयवादी नाही, हे वकिली शब्द नकोत. ही वृत्ती नष्ट होऊ दे. मी माणूस आहे, हे जर न समजू तर येथे कोठलेच राज्य- ना लोकशाही, ना हुकूमशाही-चालणार नाही.

**सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची जरुरी**

आज सांस्कृतिक, वैचारिक पुनरुज्जीवनाची जरुरी आहे. शिस्त हवी; पण नेतृत्वशरणता नको. घाणेरडे स्वरूप दवडून समाजाला सुंदर स्वरूप द्यावयाचे आहे. झेंडे घेऊन मिरवणुका काढण्याचे दिवस गेले. विवेकसंपन्न व्यापक बुद्धीचा नागरिक तयार करण्याचे आज कार्य आहे. माणसाची मुंडी उडविणारे राजकारण बंद पाडले पाहिजे. अन्न-वस्त्र हवेच. परंतु, मनातही मांगल्य हवे. अशुभ, अमंगळ विचार मनात येणे नाशाचे चिन्ह आहे. नवी परंपरा निर्माण करा. नैतिक पातळी वाढवूया. नेते वाईट असे जनतेने म्हणण्यात अर्थ नाही. जनता वाईट असे नेत्यांनीही म्हणू नये. आत्मशुद्धीच्या कार्याला दोघांनी लागावे.

**भाषावार प्रांतरचना**

भाषावर प्रांतरचना केल्यास मध्यवर्ती सरकार दुबळे होईल, असे नेत्यांना वाटते. आपले नेतृत्व दुबळे होईल, अशी धास्ती महात्माजींना कधी नाही वाटली. भाषावार प्रांतरचनेने झगडे मिटतील. या चळवळी करणाऱ्यांनीही विवेक सोडू नये. 'कानड्यांचे मराठीवरील आक्रमण' ही भाषा नको. एखादा भाग कर्नाटकात राहिला काय, महाराष्ट्रात राहिला काय, फार बिघडणार नाही. महात्माजी साबरमती सोडून सेवाग्रामला आले. मुंबई महाराष्ट्रात गेली, तर गुजराथ्यांना अनर्थ का वाटावा? मी प्रांतीयवादाचे मुळीच समर्थन करीत नाही. इतका अभिनिवेश याबाबत धरायचे कारण नाही. स्वराज्य आले तरी देशाचे दुर्भाग्य संपले नाही, याचीच ही अवलक्षणे. इतकेच मला सांगावयाचे आहे.''

○○○

*(साप्ताहिक साधना, मुंबई / शनिवार, दि. २२ जानेवारी, १९४९, पृ. १०)*

२५

# मानवी बंधुत्व हाच नव्या राजनीतीचा पाया हवा

*(सोलापूर येथील नवयुग व्याख्यानमालेत दि. १७ फेब्रुवारी १९४९ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'नीती आणि राजनीती' या विषयावर झालेल्या व्याख्यानाचे सार.)*

नीती आणि राजनीती हा विषय फार पुरातन आहे; पण तो शिळा मात्र नाही. नीती आणि राजनीती या शेजारीशेजारी उभ्या केल्या तर कवीला जी उपमा सुचेल ती एक सती व दुसरी वारांगना अशी असेल. सती आणि वारांगना यांना एका चित्रात शेजारीशेजारी उभे केले तर ते चित्र खुलावटदार दिसेल. पण ते त्यातील विषमभावामुळे दिसेल. त्यात सहकार्याचा, संवादित्वाचा संबंध दिसणार नाही.

नीती सतीसारखी पवित्र नि दुर्लभ आहे, तर राजनीती सुलभ आहे. व्यवहारात, व्यापारात, घरच्या भांडणांत आणि इतर क्षेत्रांत जो चतुर, जो कर्तबगार तो राजकारणी असे समजले जाते. ज्याला चातुर्याने फसविण्याची कला येते, त्याला राजकारणी समजतात.

सत्यासत्याची तमा न बाळगता जेथे जे लागू पडेल ते वापरणारा म्हणजे राजकारणी असे समजले जाते. जगामधल्या राजकारणी पुरुषांच्या व्यावहारिक यशस्वी धोरणाचा सामान्य माणसाने काढलेला हा खरा निष्कर्ष आहे. म्हणजे राजकारण हे सत्याला सोडणारे शहाणपण होय. वस्तुत: राजकारणाची खरी व्याख्या ही नव्हे. ती निराळी आहे. राज्यसंस्था स्थापण्याचा, बदलण्याचा किंवा राखण्याचा योग्य प्रयत्न म्हणजे 'राजकारण' होय. हा प्रयत्न तात्पुरत्या फलसिद्धीवर नजर ठेवून केला जातो. त्यापासून च्युत होण्यात काही गैर नाही असे समजणारे ढोंगी व्यवहारज्ञ यांचेच राजकारण हे क्षेत्र होय असा इतिहासाचा आजपर्यंतचा अर्थ आहे. आणि जीवनाचे अंतिम रहस्यही त्याला समजू शकते.

राजनीती आणि इतर सर्व सामाजिक व्यवहार यांचे समुच्चयित मूल्य म्हणजे नीती होय. सगळे मोठमोठे व्यवहार अंतिम ध्येयाला धरून जर घडले तरच मानवी इतिहास हा

संस्कृतीच्या विकासाचा मार्ग आक्रमू लागतो.

तात्पुरत्या फलसिद्धीकडे लक्ष देऊन जो व्यवहार घडतो त्याचे परिणाम नजीकच्या काळात नीट कळत नाहीत; पण विश्वाची नि जीवनाची कार्यकारणभावपरंपरा अवच्छिन्नपणे चालत असते. ती कालांतराने यशस्वी पण अदूरदर्शी प्रयत्नांचे दुष्ट परिणाम उघडकीस आणल्याशिवाय राहत नाही. त्यात अदूरदर्शी वृत्तीचा अत्यंत कटू विपाक म्हणजे सामाजिक विनाश वा सामाजिक दुर्गती या रूपाने प्रकट होतो.

जी जी कृती सर्व मानवांच्या जीवनाला अंतिम मूल्य समजून घडते ती नैतिक होय. जी जी कृती एका किंवा थोड्या व्यक्तीच्या अथवा विशिष्ट मानवी गटाच्या जीवनसाफल्याला महत्त्व देते आणि काही मानवांच्या जीवनसाफल्याला गौण समजते किंवा व्यर्थ समजते ती ती कृती अनैतिक होय.

त्या कृतीचे अंतिम परिणाम दुर्गती किंवा विनाश होत, असे इतिहास सांगतो. सर्व मानवांचे जीवन हे अंतिम मूल्य होय. सर्व नीतिशास्त्राचे हेच सार आहे. ईवर हेच अंतिम श्रेय होय असे धर्म सांगतो; परंतु तो ईश्वरसुद्धा उच्च धर्माच्या दृष्टीने मानवी अंत:करणातच सापडतो. म्हणून मानव हाच अंतिम श्रेय होय. पुरुषोत्तमाची वसती ही पुरुषात म्हणजे माणसात आहे.

## प्रगतीचा मार्ग

एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध, एक जमात दुसऱ्या जमातीविरुद्ध, एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीविरुद्ध या दृष्टीने सर्व राजकारण हे अनीतीच्या पायावर उभे आहे. माणसांचे सहकार्याचे संबंध हेच मनुष्याला प्रग – पेटवीत आहेत. प्रत्येक युद्ध विजयी नि  पराभूत या दोघांना अधोगतीकडे नेत आहे. पहिले महायुद्ध साम्राज्य टिकविण्याकरिता व मिळविण्याकरिता झाले; पण त्यामुळे आर्थिक साम्राज्ये अधिक दुबळी झाली. दुसऱ्या महायुद्धात विजयी झालेल्या राष्ट्रांनी साम्राज्यविसर्जनाचा उपक्रम सुरू केलेला आपण पाहत आहोत. तिसरे महायुद्ध केव्हा निर्माण होईल याचा नेम नाही. ते सर्व जुन्या-नव्या संस्कृतीच्या ठिकऱ्या उडविल्याशिवाय राहणार नाही. या सर्व आपद्ग्रस्त जगाची राजकीय परंपरा दूषित आहे म्हणूनच प्रलयकाल जवळ येत आहे.

मानवी संबंधाच्या विरोधावर हे सर्व जुने राजकारण उभारले गेले आहे. सर्व मानवाचे सहकार्य सिद्ध करण्याच्या ध्येयाने राजकारण निर्माण केल्याशिवाय ही आपत्ती टाळता येणार नाही.

## आजची परिस्थिती

हिंदी राजकारणाची गेल्या पन्नास वर्षांची बैठकही अशीच दूषित आहे. इंग्रजी राज्यामुळे आमचा नैतिक, सांस्कृतिक व आर्थिक अध:पात झाला आहे, या एकांगी दृष्टीचा दोष आता उघडकीस येत आहे. आपल्या अध:पाताचा वेग स्वराज्यात कितीतरी पटींनी वाढला आहे.

आपण आपली संस्कृती पुन्हा नैतिक दृष्टीने पुनीत केली नाही तर आपणासही आपला विनाश टाळता येणार नाही.

आपली राष्ट्रीय वृत्ती नि धार्मिक अर्हता मानसिक रोगाचे अवलक्षण बनली आहे. तीर्थक्षेत्रे सर्वात भ्रष्ट व अपवित्र स्थाने होत. वर्तमान युगात राजकारणी आखाडे व पक्ष सामाजिक रोगांची - सर्व रोगांची अवलक्षणे दर्शित करणारी स्थाने बनत आहेत. संघ, दल, होमगार्डस् इत्यादी लष्करी प्रवृत्तीची दर्शक आंदोलने नीट तपासल्याशिवाय आपणास पुढे पाऊल टाकता येणार नाही. सांघिक उन्माद (मास हिस्टेरिया) हा दुर्विपाक जगातल्या सगळ्याच चळवळीतून भरून राहिलेला दिसतो. दारूबंदीची चळवळ आपल्या देशात सुरू आहे; पण सांघिक उन्माद निर्माण करणारे दारूचे कारखाने भरभराटीस येत आहेत.

## जुना आदर्श

मौर्य साम्राज्याचा अमात्य कौटिल्य हा हिंदी इतिहासातील राजकारणी आदर्श आहे. त्याचे चरित्र उपलब्ध नाही; परंतु त्याचा राज्य शासनावरचा ग्रंथ सापडला आहे. त्यास कौटिलीय अर्थशास्त्र असे म्हणतात. राजघराणे आणि राज्ययंत्र टिकविण्याचे काही दुष्ट व अनैतिक असे उपाय त्या ग्रंथात सांगितले आहेत. परंतु मूळ सिद्धांत उदात्त आहे. राजा जितेंद्रिय पाहिजे असा कौटिल्याचा मूळ आग्रह आहे. राज्यसंस्थेचा नियंता राजा तत्त्वज्ञ असला पाहिजे असे प्लेटो म्हणतो. दोघांच्या म्हणण्याचे सार एकच आहे. तत्त्वज्ञ व इंद्रियनिग्रही राज्यकर्ता असला पाहिजे हेच ते तत्त्व होय. कारण राज्यसंस्था हे सर्व मानवी व्यवहाराचे केंद्रस्थान होय. मानवी जीवनाची यशस्वीता त्यावर अवलंबून असते. मनुष्याची शाश्वत ध्येये व त्यांच्या अस्तित्वाचे रहस्य ज्यांना समजले किंवा समजेल तीच राज्यसंस्था यशस्वी करू शकतात. सर्व प्रकारच्या राज्यसंस्थेला हा नियम लागू आहे. फार थोड्या व्यक्ती तत्त्वज्ञानाचा भावार्थ आकलन करू शकतात. म्हणून राज्यकर्तृत्व अत्यंत निवडक लोकांनाच शक्य आहे असे कोणी म्हणेल; पण मनुष्य हा निसर्गत:च तत्त्वज्ञ आहे. बुद्धिवादाच्या उच्च शैक्षणिक पातळीवर राहून तत्त्वविवेचन करणारे थोडेच असतात हे खरे आहे, परंतु उच्च तात्त्विक अनुभूती सामान्य माणसांनाही होऊ शकते. प्रज्ञा थोड्यांचे ठिकाणी असते; परंतु प्रचीती पुष्कळांना येऊ शकते. उच्च काव्य व उच्च कला यांचे स्वारस्य अनंत लोकांचे हृदयाला भिडू शकते. ही हार्दिक प्रचीती जशी सामान्य मनुष्यास येऊ शकते त्याप्रमाणे नैतिक तत्त्वांची हार्दिक प्रचीती सामान्य मनुष्यास सुलभपणे येऊ शकते. टीकाकार आणि कलाकार थोडे असतात; परंतु कलेचे रसिक अगणित असतात.

लोकसत्ता ही जीवनाच्या नैतिक प्रचीतीवर उभारलेली आहे. प्रत्येक निरामय मनाचा विवेकी नागरिक हा नैतिक प्रचीती घेऊ शकतो. तिच्या अनंत पथावर नित्य पुढे नेत असतो; परंतु जो राजकारणी माणूस हे तत्त्व मानीत नाही अथवा पोकळ मठवासींचे व संतांचे सोवळे तत्त्वज्ञान म्हणून बाजूस सारतो तो औरंगजेबाच्या राशीतला असतो. औरंगजेबाने आपल्या

गुरुला पत्र लिहिले की, ''गुरुमहाराज, तुम्ही मला पुष्कळच शिकविले, धर्म पढविला, नीती शिकविली; परंतु या सगळ्या हवेतल्या गोष्टी झाल्या. एखाद्या शहराला वेढा कसा द्यावा आणि सैन्याचा मोर्चा कसा लावावा याबद्दल आपण मला काहीच शिकविले नाही. त्याचाच मला खरा उपयोग आहे.'' या औरंगजेबाचे साम्राज्य त्याच्या निधनानंतर वाताहत होऊन नष्ट झाले. ते फार विशाल होते. ते उन्मळून पडले याबद्दल कोणालाही फारसा विषाद झाला नाही.

इंग्रजांनी आपल्या साम्राज्याचे आपण होऊन विसर्जन केले. कारण इंग्रजांची राजकीय परंपरा नैतिक भावनांनी संस्कारिलेली होती. गांधीजी इंग्रजांशी लढले, पण ते गोखल्यांचे शिष्य होते. गोखल्यांनी - त्यांचे गुरू न्यायमूर्ती रानडे यांनी - इंग्रजी राज्याची सांस्कृतिक परंपरा अधिक चांगल्या रीतीने ओळखली होती. ''लोकांची लोकसत्तेच्या दृष्टीने तयारी जसजशी होईल त्या प्रमाणात इंग्रजी राज्याची पकड नष्ट होत जाईल'', असे न्यायमूर्ती रानडे यांचे मत होते. महात्माजींची हृदयपरिवर्तनाची कल्पना याच दृष्टीने समर्थनीय ठरली. राजकारण नैतिक दृष्टीने पुनीत झाले नाही तर त्याचे परिणाम अखेरीस भयावह होतात, ही गोष्ट इंग्रजी राज्यसंस्थेस लागू नाही. कारण इंग्रजी संस्कृती ही उदारमतवादाने पावन झालेली आहे.

## नीतिमत्तेचा आधार हवा

हल्लीचे जग विनाशाकडे धाव घेत आहे, याबद्दल जगातील सर्व क्षेत्रातील मोठ्या लोकांचे एकमत आहे. कारण जगाच्या परंपरागत राजकारणाचे नैतिक सामर्थ्य अत्यंत अपुरे आहे. परंपरागत भिन्न भिन्न संस्कृतींनी निर्माण केलेले राष्ट्रीय व सांस्कृतिक अहंकार माणसांमाणसांतला लढा, राजकीय व सांस्कृतिक चळवळी वेड्यापीरांना वीर व नेते बनवीत आहेत. राष्ट्रवाद या दारूची नशा पराकोटीस नेत आहे. हिटलर-मुसोलिनी-टोजो हे केवळ पाश्चात्त्य संस्कृतीचे प्रतीक नाहीत, तर हल्लीच्या अध:पतित जागतिक संस्कृतीचे ते आविर्भाव आहेत. हिटलर म्हणतो, जर्मन तरुणांनो, क्रूर व अमानुष बना, कारण जर्मन राष्ट्र वर आणावयाचे आहे. तरुणांनो, जर्मनीकरिता अनीतिमान बना, कारण जर्मनीचा उदय हीच सर्वश्रेष्ठ नैतिक अवस्था आहे.

राष्ट्राच्या ध्वजाकरिता रक्त सांडावयास सांगणारे मानवी रक्ताची किंमत जाणत नाहीत. जिवंत मानवी रक्त हाच विश्वातील अमोल ठेवा आहे.

## प्रेरणेचे मूळ

नीतिमत्ता जिवंत मानवी रक्ताचे सर्वश्रेष्ठ मूल्य ओळखण्यात भरलेली असते. साधू, मठवासी, विरक्त, प्रौढ, गृहस्थ, विधवा, कुमारी आणि सौभाग्यवती गृहिणी यांनाच स्वस्थ, शांत व निर्वेध जीवन चालविण्याची गरज असते. त्यांचा भीरु स्वभाव हाच मानवी नीतीचे

स्वागत करतो. शूरवीर यांची नीती ही युद्धात प्रकट होते. अशा तऱ्हेचा विचार प्रत्येक देशाच्या वाङ्मयात, काव्यात, कलेत व धर्मात भरलेला आहे.

या परंपरेचा वारसा हल्लीच्या लष्करी युद्धपिपासू तरुण मनोवृत्तीत प्रकट झालेला आहे. नीतीची दोन उगमस्थाने आहेत. एक समाज स्वास्थ्याची आकांक्षा व दुसरे साहसी शौर्याची नैसर्गिक प्रेरणा. आजचा सुशिक्षित जाणता तरुण अगणित संख्येने नेते व गुरुजी यांना शरण जातात, आज्ञाधारक बनतात, त्यांच्या आदेशाची वाट पाहत असतात. याचे कारण लष्करी प्रवृत्तीचे पर्यवसान, शौर्यप्रवृत्तीचे समाधान हे होय. मनुष्य हा जातीने लढाऊ प्राणी आहे. ही त्याची शौर्याची भावना आजच्या परिस्थितीत आंधळी बनली आहे. सगळयाच भावना सापेक्षतेने आंधळया असतात. त्यांना विवेक, बुद्धी नि विज्ञान यांच्या योगाने शुद्ध केले नाही तर मानवी शक्तीची अपरंपार उधळपट्टी केल्याशिवाय त्या राहत नाहीत.

**(पूर्वप्रसिद्धी : दैनिक काळ, पुणे, शनिवार, दि. १९ फेब्रुवारी, १९४९)**

○○○

२६

# निधर्मी राज्य

*(अमरसिंह मंडळ, मुंबई आयोजित 'वसंत व्याख्यानमाला'मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे दि. २९ एप्रिल १९४९ ला मुंबईत 'धर्मातीत राज्य' या विषयावर व्याख्यान झाले. या व्याख्यानाचा प्रकाशित संपादित अंश.)*

''आज आपल्या देशात नव्यानेच हिंदी लोकांचे राज्य स्थापन झाले आहे. या राज्याचे अधिष्ठान परंपरागत धर्म हे असावे की पुरोगामी जनसमाज हे असावे, हा आपणासमोर खरा प्रश्न आहे. परंपरागत धर्माप्रमाणे चालावे असे ठरविले तर ते धार्मिक राज्य होईल, एका विशिष्ट धर्माचे राज्य होईल व ते पुरोहितांच्या तंत्राने चालवावे लागेल. पुरोगामी जनसमाजाच्या तंत्राने म्हणजे निधर्मी राज्य म्हणून चालण्यातच त्या राज्याचे कल्याण आहे असे मलाही वाटते.''

प्राचीन काळी धर्म व राज्य संस्था एक झाल्यामुळे काय झाले, हिंदी राज्य हे हिंदू राज्य नसून लोकराज्य का आहे, राज्यासाठी प्राणार्पण व्हावे असे वाटत असेल तर लोकांच्या त्याविषयीच्या भावना काय असल्या पाहिजेत वगैरे गोष्टीही त्यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण शैलीने श्रोत्यांना सांगितल्या.

## निधर्म राज्य

''आताच आपणास माझ्या व्याख्यानाचा विषय 'धर्मातीत राज्य' असा सांगितला गेला; परंतु त्यामुळे मला जे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होत नाही. मी आज जो विषय मांडणार आहे त्याची परिभाषा अद्याप निश्चित ठरलेली नाही. तेव्हा मी 'Secular State' या विषयावर बोलणार आहे असे समजा. या शब्दाचे निश्चित भाषांतर काय केले असता इष्ट अर्थ व्यक्त होईल हे अजून सांगता येत नाही. पूर्वी बनारस विद्यापीठाचे व हल्ली नागपूर

विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक श्री. श्री. व्यं. पुणतांबेकर यांनी 'निधर्मी राज्य' हा शब्द सुचविला आहे. तोच सध्या मी वापरतो.

'ऐहिक राज्य' असे जर आपण म्हटले तर मग पारलौकिक असे दुसरे कोणते राज्य आहे की काय अशी शंका येते. 'अधर्मी राज्य' असे म्हटले तर ज्यात धर्माचा नाश केला जातो ते राज्य असा विपर्यास होण्याचा संभव आहे. 'विधर्मी राज्य' म्हणजे परधर्माचे राज्य. तेव्हा हाही शब्दप्रयोग लागू पडत नाही. आपल्या दृष्टीने पाकिस्तान हे विधर्मी राज्य होऊ शकेल.

'धर्मातीत राज्य' म्हणावे तर धर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ किंवा पलीकडे गेलेले असे राज्य असा अर्थ होतो. म्हणून 'निधर्मी राज्य' हा शब्दप्रयोग मी वापरत आहे.

## 'हिंदू राज्य' आहे काय?

हिंदुस्थानात स्थापन झालेले हिंदी राज्य हे हिंदू राज्य आहे काय? याचे उत्तर होकारार्थी देता येणार नाही. या राज्यात हिंदूंचे प्राधान्य आहे खरे. पण येथे मुसलमानांची संख्याही कमी नाही. तीन-साडेतीन कोटी मुसलमान येथे नांदत आहेत. म्हणजे युरोपातील एका राष्ट्राची प्रजा येथे नांदत आहे. या राज्याला हिंदू राज्य म्हटले तर मुसलमान, ख्रिश्चन, पारशी इत्यादी धर्मीयांना ते 'आपले' राज्य वाटणार नाही. आपल्या धर्माला येथे धोका आहे असे त्यांना वाटू लागेल. म्हणूनच हिंदी राज्य हे कुठल्याही धर्माचे राज्य नाही. सर्व धर्मीयांना येथे समानाधिकार आहेत असे आपले पुढारी सांगत आहेत. हिंदी राज्य हे हिंदू राज्य नसून लोकराज्य आहे.

## एक राज्य मागितले; पण दोन राज्ये मिळाली

हिंदू व मुसलमान या देशातील दोन मोठ्या जाती आहेत. या दोघांचे समान शत्रू इंग्रज हे होते. त्यावेळी दोघांत समान मित्रत्वाची भावना होती. पण, हा शत्रू बाजूला जाणार असे दिसू लागल्यावर दोघांतील भेद स्पष्ट दिसू लागले. अशा परिस्थितीत जर स्वराज्य मिळाले तर ते राज्य हिंदूंच्या हाती जाईल, कारण ते बहुसंख्य आहेत व आपल्यावर अन्याय होईल असे मुसलमानांना वाटले. त्याची परिणती पुढे पाकिस्तानात झाली आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्यप्राप्ती होताना त्याचे दोन तुकडे झाले. आज या दोन राज्यांपैकी हिंदुस्थानचे पुढारी आमचे राज्य 'निधर्मी' (Secular) आहे असे म्हणत आहेत, तर पाकिस्तानचे पुढारी आमचे राज्य 'धार्मिक' (Theocratic) आहे असे म्हणत आहेत. उभय देशांत हा भेद दिसत असला तरी खरी गोष्ट अशी आहे की, 'धार्मिक' राज्य आज टिकण्यासारखे नाही. 'निधर्मी' राज्य उभारण्याचाच काल आता प्राप्त झाला आहे. पाकिस्तानला आपले राज्य 'धार्मिक' आहे असे ढोंग करून पुढे जाता येईल. पण खरे पाहिले असता 'धार्मिक राज्य' तेही होणे शक्य नाही. त्या मानाने 'निधर्मी राज्य' ही भूमिका अधिक शास्त्रशुद्ध आहे.

## हिंदू धर्माचे वैशिष्ट्य

आपल्याकडे पूर्वी हिंदू धर्मीयांचे राज्य होते खरे; पण हिंदू धर्माचे एक वैशिष्ट्य असे आहे की, त्यात एखाद्या विशिष्ट धर्माचा अभिनिवेश संचरत नाही व आपल्या धर्माव्यतिरिक्त अन्य धर्मीयांचा छळ करावा अशी प्रवृत्ती हिंदूंची कधीच नव्हती. इतरांना गुलाम करावे अशी कल्पनाही आपल्याला सहन होत नाही. त्यामुळे इतर ठिकाणी धर्म राज्य स्थापन झाल्याने जसे परिणाम दिसतात, तसे आपल्याकडे दिसले नाहीत.

## राज्य आणि धर्म यांचा संगम

फार प्राचीन काळी इजिप्तमध्ये धर्माच्या आदेशावर अधिष्ठित झालेली अशी राज्य व्यवस्था होती. ख्रिस्ती धर्मही प्रथम 'लोकमान्य' धर्म झाला. त्याने जनतेच्या जीवनात खोलवर प्रवेश केला. नंतर राजाने त्या धर्माची दीक्षा घेतली व तो 'राजमान्य' झाला. असा एखादा धर्म 'राजमान्य' झाला की सामान्य लोक त्याचे चटकन अनुकरण करतात. राजदरबारी 'पांढऱ्या टोपीला' प्रतिष्ठा मिळाल्यानंतर आपल्या डोक्यावरील काळ्या टोपीला पांढरा रंग फासणारे लोक आपल्याकडेही आढळतात; परंतु धर्मसंस्थेला एकदा राजप्रतिष्ठा प्राप्त झाली म्हणजे मूळच्या धार्मिक व पवित्र आचार-विचारांना फाटा मिळत जातो. ख्रिश्चन धर्म हा पूर्वी सेवा धर्म होता. इंद्रियदमन, आत्मसंशोधन वगैरे कार्ये तो करीत असे. परंतु हातात राजदंड आल्यावर लोकसेवेऐवजी धनसेवेला आणि आत्मसंशोधनापेक्षा आत्मप्रतिष्ठेला जास्त महत्त्व आले. धर्मसंस्था ही राज्य संस्थेशी तन्मय होण्याचा प्रयत्न करते तेथे धार्मिक स्वातंत्र्याचा लोप होण्याचा संभव वाढतो. धर्मसंस्था दंडधारी झाली की तिचे आध्यात्मिक सामर्थ्यही लोप पावते.

## देवाच्या सख्यत्वासाठी

'देवाच्या सख्यत्वासाठी, पडाव्या संकटांच्या गाठी, सर्व अर्पावे शेवटी, प्राण तोही वेचावा' असे एक सूत्र आहे व त्याप्रमाणे राज्य हाच देव मानून प्राणार्पण करण्याचा उपदेश आपणास करण्यात आलेला आहे; परंतु आपण ज्यासाठी प्राणार्पण करावयाचे ती वस्तू आपल्या प्राणाहून अधिक मूल्यवान व सर्वश्रेष्ठ अशी असली पाहिजे. नाही तर एखाद्या धर्माच्या तत्त्वावर आधारलेल्या, जुन्या परंपरागत व प्रतिगामी तत्त्वांना मान देणाऱ्या राज्यासाठी प्राणार्पण करणे हे सर्वस्वी चुकीचे ठरण्याचा संभव आहे. त्यासाठी सर्व धर्मीयांना हे राज्य आपले आहे असे वाटण्यासाठी राज्यसंस्था ही सर्व धर्मांपासून अलिप्त अशी असणे अधिक हितावह आहे. देशातील राज्य एका विशिष्ट धर्मावर आधारलेले असेल तर विधर्मी लोक राज्यावरील संकटाचे वेळी राज्याला मदत करणार नाहीत. येथील राज्य हे निधर्मी राज्य झाले नाही, व त्यावर इतर धर्मीयांची नकळत निष्ठा नसली तरी प्रसंगी विधर्मी लोक

हे राज्य उलथून पाडण्याचा प्रयत्न करतील. आपल्या राज्याची पाळेमुळे अजून खोलवर गेलेली नाहीत. राज्य करणे म्हणजे खेळ करणेही नव्हे.

तेव्हा नव्या राज्याबद्दलची आपली जबाबदारी आपण नीट ओळखली पाहिजे आणि त्या राज्याला बळकटी आणण्याचे उपाय योजले पाहिजेत.

## पुरोहितांच्या हाती राजदंड

धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचा संगम झाला तर - पुरोहितांच्या हाती राजदंड आला तर - पुरोहितांच्या तंत्राने राज्यकारभार चालू लागतो, हे ख्रिस्ती धर्माच्या उदाहरणाने मागे आपण पाहिलेच आहे. आपल्याकडे बुद्धधर्मीय राज्यातही हाच अनुभव अशोकाच्या वेळेला आलेला आहे. अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्या धर्माची प्रतिष्ठा वाढू लागली. पूर्वी बुद्ध भिक्षू आणि भिक्षुणी ब्रह्मचर्य पालन करून मठात राहत व निग्रहाने वागत. पण त्यांच्यावर सुवर्णवृष्टी सुरू झाली, ते धष्टपुष्ट झाले, आणि नंतर ते मठामठांतून संसार थाटू लागले. शंकराचार्य हे प्रथम धर्माचे अधिकारी होते; पण पुढे ते संस्थानिकांसारखेच बनले आणि नंतर तेथे गादीसाठी भांडणे लागू लागली. युरोपात पोपच्या हाती राज्यसत्ता केंद्रित झाल्यावर तेथेही त्यांची आपसात भांडणे लागलीच. यावरून पुरोहिताच्या हाती राजदंड आला तर कसा गोंधळ माजतो ते प्रत्ययास आलेले आहेच! आणि म्हणूनच राजदंड आणि पुरोहिताचा दंड ही स्वतंत्र ठेवण्याची आवश्यकता वाटू लागली आहे. हिंदुस्थानात आज जर धर्मराज्य स्थापावयाचे असेल तर पुरोहित वर्गाच्या हाती सत्ता द्यावी लागेल. पण येथल्या पुरोहित वर्गाची तरी तशी लायकी आहे काय? खाडिलकरांच्या नाटकात पुरोहिताची 'भटजी' म्हणून चेष्टा आढळते. अशा भटजीच्या हाती राजदंड दिल्याने नीट राज्यव्यवस्था होईल की गोंधळ माजेल हे सांगण्यास भविष्यवादीच हवे आहेत काय? पुरोहित वर्ग तयार करावा म्हटले तर त्यास पिढ्यान्‌पिढ्या जाव्या लागतील आणि तसे करावयाचे योजिले तरी जुन्या परंपरागत मार्गाचा त्याग करायला किती लोक तयार होतील हा एक प्रश्नच आहे. 'ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ' अशातल्या कल्पना अजूनही आपल्यात रूढ आहेत. अशा परिस्थितीत पुरोहित वर्ग तयार तरी कसा होणार हा एक प्रश्नच आहे.

## राज्यावर सत्ता कोणाची?

राज्य हे धर्मावर अधिष्ठित असावे किंवा नाही याचा सरळ अर्थ राज्यातील कारभार कुणाच्या सल्ल्याने चालावा हाच होय. धर्माला जर राज्यात प्राधान्य मिळाले किंवा धार्मिक पायावर राज्य आधारले गेले तर राज्याचा कारभार धर्मातील तत्त्वांवर चालवावा लागेल. धर्माची ही तत्त्वे पुरोहितांच्या सल्ल्याने सांगितलेली असतील. अर्थात ती परंपरागत अशीच असतील. धर्माला मान्यता द्यावयाची नसेल तर मग लोकांच्या मताला मान देऊन राज्य

चालवावे लागेल व लोकमत हे प्रजेच्या मनातूनच तयार होत जाईल, त्यात परंपरागतता राहणार नाही; पण पुरोगामीपणा असेल.

## विश्वराज्य, राष्ट्रराज्य

पूर्वी जगात एकदा सर्व विश्वाचे एक राज्य करावे अशी कल्पना आली होती. नंतर विश्वाचे एक राज्य स्थापण्याची कल्पना मागे पडून डबाईसने युरोपचे एक राज्य स्थापण्याची योजना काढली होती. युरोपातील चाणक्य मॅकियाव्हिली याने मात्र राष्ट्राचे राज्य निराळेच असले पाहिजे असे सांगितले.

## हिंदू राज्य स्थापनेमागील आणखी एक अडचण

हिंदू राज्य या देशात स्थापन करायला येणारी आणखी एक अडचण म्हणजे या धर्माचा इतर धर्माप्रमाणे विशिष्ट असा ग्रंथ ठरलेला नाही, देवही ठरलेला नाही. त्यामुळे त्याबद्दलच कितीतरी वाद होऊ लागतील. हिंदू धर्म हा इतर धर्मांना आपल्याहून कमी मानीत नाही. त्यांनाही आपल्यासारखेच मानतो. हीही एक अडचण आहे. इतर धर्म आमच्या मार्गाने जाऊनच परमतत्त्वाची प्राप्ती होईल असा आग्रह धरतात, तर सर्व नद्या जशा शेवटी समुद्राला जाऊन मिळतात तशी कोणत्याही धर्माची उपासना केली तरी परमतत्त्वाची प्राप्ती होते असे हिंदू धर्म सांगत असतो.

## राज्याविषयींचे आपले कर्तव्य

नव्या राज्याविषयींचे आपले एक विशिष्ट कर्तव्य आहे, विशेष जबाबदाऱ्या आहेत हे आपण नीट ओळखले पाहिजे. आपल्या जुन्या रूढी, जुन्या समजुती, जुनी परंपरागत मूल्ये यांची कसून तपासणी करण्याचे काम आपणास करावयाचे आहे. नाना मतांचा गलबला नाहीसा करावयाचा आहे. देशात एका व्यक्तीची किंवा काही व्यक्तींची सर्वाधिकारशाही स्थापन होणार नाही याची खबरदारी घ्यावयाची आहे. सर्व मूल्यांत मानव हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे हे ध्यानात घ्यावयाचे आहे. मागासलेल्यांना पुढे आणावयाचे आहे. यासाठी प्रतिमेच्याही अगोदर प्रज्ञेची वाढ करण्यासाठी आपणास धडपडावयाचे आहे.

## मतदार आणि मती

देशात आज अज्ञानाचे सर्वत्र साम्राज्य आहे. निवडणूक हा एक 'तमाशा' झाला आहे. मतदार आपले मत देत आहे खरा, पण मती ठिकाणावर ठेवून तो मतदान करीत नाही. आज तो एकाला मत देतो तर उद्या दुसऱ्याच पेटीत मत टाकतो. फुटबॉलच्या खेळात एका पक्षात एकदा फुटबॉल येतो व दुसऱ्यांदा दुसऱ्या पक्षात जातो व दोन्ही वेळा बघे लोकांच्या हातात काहीच येत नाही. तसा प्रकार आज राजसत्तेच्या बाबतीत होऊ पाहत आहे. हे सारे थांबविण्यासाठी लोकशिक्षण हवे आहे. आपल्या नव्या राज्याचा उत्कर्ष व्हावा म्हणून

आपण नवी शाश्वत मूल्ये निर्माण केली पाहिजेत. धर्मावर राज्य अधिष्ठित करण्याची कल्पना आता जगात मागे पडत चालली आहे. ती यापुढे यशस्वी होण्यासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही. तेव्हा हिंदुस्थान हे निधर्मी राज्य होण्यातच हिंदुस्थानचे हित आहे. त्यामुळेच ते प्रभावी राज्य होऊ शकेल आणि त्यामुळेच या राज्यासाठी प्रसंगी प्राणार्पण करण्याची भावना वाढीस लागेल, हे आपण नीट ध्यानी घेतले पाहिजे.

**(पूर्वप्रसिद्धी : दैनिक प्रभात, मुंबई, ३० एप्रिल, १९४९)**

२७

# विविध संस्कृतींचा संगम आवश्यक

(३० ऑगस्ट १९४९ रोजी पुण्याच्या शिवाजी मंदिरात गणेशोत्सवानिमित्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'हिंदू धर्म व सांस्कृतिक चळवळीची दिशा' या विषयावर व्याख्यान झाले. साप्ताहिक 'विवेक'च्या १८ सप्टेंबर १९४९ च्या अंकातील प्रकाशित भाषणाचा संपादित भाग.)

''समाजातील अत्यंत दलित मनुष्याला आपल्या भवितव्याविषयी आशा कशी उत्पन्न होईल हा संस्कृतीपुढील आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. यासाठी त्वरित उपाययोजना करणे अवश्य आहे. आज जगात ज्या विविध संस्कृती आहेत त्यांच्यात समन्वय झाला पाहिजे, त्यात संवादित्व निर्माण झाले पाहिजे. ते झाले नाही व आजची संघर्षात्मक अवस्था कायम राहिली तर कधीही न संपणारे सर्वनाशक युद्ध सुरू होईल.''

माझी ओळख करून देताना असे सांगण्यात आले की, माझ्या अभ्यासाला तत्त्वज्ञानाची बैठक आहे. ती आहे की नाही, हे जरी मला सांगता आले नाही तरी त्याला तत्त्वजिज्ञासेची मात्र बैठक आहे. तत्त्वजिज्ञासा ही मानवाला पुढे पुढे नेत असते. जिज्ञासा हे तत्त्वज्ञानाचे प्रवेशद्वार आहे. जी श्रद्धा जिज्ञासेला विरोध करते ती श्रद्धा तामस व राजस श्रद्धा होय. सात्त्विक श्रद्धा ही जिज्ञासेला कधीच विरोध करीत नाही. मानवाच्या ज्ञानाला मर्यादा असली तरी त्याला अमर्याद पूर्ण तत्त्वज्ञानाची जाणीव आहे. सर्वज्ञता ही माणसाला शक्य नाही, हे हिंदू धर्माने नेमके ओळखले आहे. धर्मज्ञान हे एखाद्या प्रेषितापाशीच पूर्ण होऊ शकत नाही. विकासाचे अनंत प्रकार व शक्यता असू शकतील. म्हणूनच हिंदू धर्म कोणाला एकालाच प्रेषित मानीत नाही. अनेक अवतार मानतो. प्रमुख अवतारसुद्धा दहा आहेत. वेद अनंत आहेत; पण तो चार वेदच प्रमुख मानतो. या बाबतीत भारद्वाज ऋषीची कथा प्रसिद्ध आहे. शंभर वर्षे वेदाध्ययन केले असता इंद्र त्याच्याकडे आला आणि म्हणाला, 'तुझे अध्ययन

संपले काय?' नाही असे कळताच त्याचे आयुष्य शंभरांनी वाढविले. असे तीन वेळा झाले. तेव्हा भारद्वाज म्हणतो, 'वेद संपतील कसे? वेद अनंत आहेत.'

इतर जीवसृष्टी व मानव यात फरक असा आहे की, इतर जीवसृष्टींना सामुदायिक सहजप्रवृत्ती असतात. त्या सहजप्रवृत्ती तो मोडू शकत नाही. त्यांना वैयक्तिक सहजप्रवृत्ती अशी नसते. तसे माणसाचे नाही. त्याला वैयक्तिक सहजप्रवृत्ती असू शकते. सामुदायिक सहजप्रवृत्ती तो मोडू शकतो आणि म्हणूनच धर्माची आवश्यकता निर्माण झाली. धर्म हा व्यक्तीचा मोक्ष सांगतो; पण सामुदायिक मोक्ष सांगत नाही. मानव हा समाजापलीकडे गेला आहे. दुसरा फरक म्हणजे, बुद्धीमुळे मृत्यूची जाणीव मानवाला झाली आहे. त्या मृत्यूच्या जाणिवेनेच त्याला व्यक्तित्वाची जाणीव झाली आहे. बाकीच्या जीवांना जीवनाच्या संरक्षणाची जाणीव आहे; पण मृत्यूची मात्र नाही. जो सुरा आपली मान कापणार आहे तोच सुरा ती शेळी जिभेने चाटीत असते. इतर अवयव दुर्बल मिळाले आहेत म्हणूनच की काय मानवाला त्याऐवजी बुद्धी मिळाली आहे. संयमाचे तत्त्व शारीरिकदृष्ट्या पोषक आहे, याचे कारण मानवेंद्रिये ही निसर्गत: दुर्बल आहेत. या बुद्धीमुळेच मानव भूत-वर्त-भविष्यकालात वावरू शकतो. बुद्धीमुळे तो स्वार्थी बनला आहे व हा स्वार्थच त्याच्या प्रगतीला पोषक ठरला आहे. पण या बुद्धीमुळे मानवाचा अध:पात होऊ नये म्हणून तिला आवरण्यासाठी श्रद्धा आहे. जेथे बुद्धी कुंठित होते व जीवन अशक्य होते त्यावेळी श्रद्धा त्याचे संरक्षण करते. आइनस्टाईन, डार्विन इ. बुद्धिवान लोकसुद्धा श्रद्धावान आहेत. या बुद्धीमुळे त्याला इच्छास्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. इच्छास्वातंत्र्य आले की, नियंत्रण आलेच. म्हणून समाज रक्षणासाठी धर्मसंस्था निर्माण झाली.

श्रद्धा ही स्वाभाविक आहे. ती माणसाला सोडता येत नाही व म्हणून जिज्ञासा व श्रद्धा या बरोबरीने चालल्या पाहिजेत. तर्कातीत अनुभवांतून - पण जे तर्काने तपासता येतात - शाश्वत धर्म निर्माण होतो. ईश्वरी सत्ता तिचे रक्षण करते. महाकाव्ये ही या स्फूर्तीपासून निर्माण झाली आहेत. म्हणूनच ती महाकाव्ये ठरली. तिच्या बुडाशी मानवी प्रेम होते, इतकेच नव्हे तर विश्वप्रेम आहे. या विश्वतत्त्वाच्या स्फुरणापासूनच उच्च संस्कृती निर्माण होते. तिचे संकेत बदलतात, आकार बदलतात. ती वाच्यार्थात घालता येत नाही.

## संस्कृतीपुढील प्रश्न

या संस्कृतीने समाजातील खालच्यातला खालचा उदासीन मनुष्य आहे, त्याला निरनिराळ्या संस्कृतींचा समन्वय का व्हावयास पाहिजे व होईल काय? भौतिक संस्कृती व आध्यात्मिक संस्कृती यांचा सांधा जोडता येईल काय?

झगड्यातून नेहमी विकास होतो असे नव्हे, तर विनाशही होतो. त्यामुळे दोन संस्कृतींचा झगडा होताना विनाशही होण्याचा संभव आहे. सर्व धर्मांचे विश्वविषयक स्फुरण सारखेच आहे. सारे जग आर्थिक दृष्टीने, राजकारणाने सांधले गेले आहे. त्याचा विनिमय होत आहेच, व म्हणूनच या सर्व संस्कृतींचा समन्वय झालाच पाहिजे. त्यात संवादित्व निर्माण झाले

पाहिजे. नाही तर जगात अखंड चालणारे युद्ध होईल. समन्वय निर्माण करणे म्हणजे भेद व वैचित्र्य नाहीसे करणे नव्हे; पण भेद म्हणजे काही वैरही नव्हे.

## मार्क्स व अध्यात्म

'सृष्टी मोजावयाची व रचावयाची' हे भौतिक संस्कृतीचे लक्षण आहे. या संस्कृतीचा शेवटचा तत्त्वज्ञ कार्ल मार्क्स म्हणतो की, अर्थ हेच सत्य व बाकीचा सर्व आभास होय. शंकराचार्यांनी याच्या नेमके उलट म्हटले आहे. आत्मा हे सत्य व बाकीचे विश्व हा आभास होय. हा या दोन संस्कृतीतील विरोध आहे. बाह्यांग बदला म्हणजे अंतरंग बदलेल, अशी आधुनिक संस्कृती सांगते, तर अंतरंग बदला म्हणजे बाह्यांग बदलेल, अशी जुनी संस्कृती सांगते. असा हा झगडा आहे. पण या ठिकाणी हे ध्यानात ठेवले पाहिजे की, आत्मशक्ती ही आत्मप्रवण आहे, त्याचप्रमाणे बाह्यप्रवण आहे. कारण त्या शक्तीचे मूळ विश्वात आहे. कर्मफलासक्ती नसेल तर कर्मासाठी लागणारी हिरीरी - कर्मासाठी लागणारा पराक्रम निर्माण होणे शक्य आहे काय? कारण पराक्रम प्रवृत्तीशिवाय कोणतीही मोठी गोष्ट साधत नाही. याला उपाय म्हणजे लोकमान्यांनी गीतारहस्यात सांगितलेला भक्तियुक्त कर्मयोग हा होय. त्यामुळे समन्वय होऊ शकेल. त्यासाठी विश्वव्यापक प्रेम आवश्यक आहे. त्यासाठी परदेशात जावयास नको. घरातसुद्धा विश्वव्यापक प्रेम असू शकते. हे प्रेम जगविणे हे प्रमुख काम आहे. असा प्रेम करणारा लढूही शकेल पण वैराने नव्हे, तर निर्वैरपणे. भिन्न भिन्न धर्मसंस्था हे भिन्न भिन्न संकेत आहेत. संकेत कोणतीही गोष्ट सूचित करतात. प्रत्येक मानवी संकेत हे मर्यादित सत्य असते. म्हणूनच हिंदू धर्म इतर धर्मांना मानतो व म्हणूनच समन्वय घातला पाहिजे. भक्तियुक्त कर्मयोग हा समन्वय घडवू शकेल. आत्मसंस्कार व विश्वसंस्कार ही दोन्ही आवश्यक असल्यामुळे भौतिक संस्कृती व आध्यात्मिक संस्कृती ही दोन्ही आवश्यक आहेत. धर्मसंस्था कधीच नष्ट करता येणार नाही. जोपर्यंत प्राण-सत्याचे आकलन होत नाही तोपर्यंत धर्म राहणारच. युद्धाच्या वेळी स्टॅलिननेसुद्धा चर्चमध्ये घंटा वाजविण्यास सांगितले व राष्ट्रवादाचा उपदेश केला. धर्माने भुरळ पडते हे खोटे आहे. जगातील शेकडा नव्वद टक्के शास्त्रज्ञ धर्मनिष्ठ आहेत. Myth Making Function वर विश्वास ठेवणारा धर्म भुरळ पाडतो.

## शूद्रांचे श्रेष्ठत्व

आपल्याकडे वर्गविग्रह झाले आहेत याला अर्थव्यवस्था जरी कारणीभूत असली तरी भिन्न संस्कृती हे तिचे मूळ कारण आहे. ती नष्ट झाली की खालचा मनुष्य व वरचा मनुष्य यात फरक राहणार नाही. आपल्या समाजव्यवस्थेत दास्य कधीच नव्हते. चातुर्वर्ण्यात शूद्र होते; पण ते गुलाम नाहीत. चांभार हा शूद्र होता; पण दास नव्हता. खालच्या समाजातील माणसांचा अडाणीपणा, भोळेपणा नष्ट केला पाहिजे. त्यांची शैक्षणिक प्रगती केली पाहिजे.

**(साप्ताहिक विवेक, दि. १८-९-१९४९, पृ. १, २ भाषण दि. ३० ऑगस्ट, १९४९)**

○○○

२८

# ब्राह्मणेतर चळवळीचे उत्तर पर्व: शुद्ध सामाजिक चळवळच आता हवी

*(* ब्राह्मण-ब्राह्मणेतर या दोन्ही जीर्णमतवादी कल्पनांपासून मुक्त असलेली शुद्ध सामाजिक चळवळच आता हवी.*

** ब्रिटिश शासनसत्तेखाली दक्षिण हिंदुस्थानात सुरू झालेली सामाजिक चळवळ म्हणजे ब्राह्मणेतर चळवळ. महाराष्ट्रात ती विशेषच प्रगत झाली. स्वातंत्र्यसंपादनामुळे या चळवळीचे उत्तर पर्व सुरू झाले आहे. ब्राह्मणी नेतृत्वाच्या हातातील राजकीय सूत्रे आता मराठा व तत्सम जातीच्या प्रतिनिधींच्या हाती गेली आहेत. ब्राह्मणांचा वर चष्मा नाहीसा झाला आहे.*

** अशा महत्त्वाच्या संधिकाळी या चळवळीचा उगम, विकास, यश आणि अपयश यांचे समाजशास्त्रनिष्ठ भूमिकेवरून निरीक्षण करणे अगत्याचे आहे. याचबरोबर तिचे भविष्यकालीन स्वरूप सूचित करणेही आवश्यक आहे.)*

हजारो वर्षे सत्तेवर असलेल्या भारतीय समाजव्यवस्थेचे मौलिक रूपांतर होण्याची आवश्यकता सूचित करणाऱ्या अशा दोन महत्त्वाच्या चळवळी हिंदुस्थानात ब्रिटिश शासनसत्तेखाली निर्माण झाल्या. सगळ्या दक्षिणापथास व्यापणारी ब्राह्मणेतर चळवळ आणि सगळ्या उत्तरपथास व्यापणारी हिंदू-मुसलमानांची चळवळ अशा या दोन चळवळी होत. या दोन्ही चळवळींचा गुजरातास स्पर्श झाला नाही. ब्राह्मणेतर चळवळ उत्तरपथांत उत्पन्न होऊ शकली नाही. हा फरक अत्यंत लक्षात भरणारा आहे! कारण ब्राह्मण ही जात धार्मिक दृष्ट्या शिरस्थानी ज्या समाजव्यवस्थेत आहे, अशा प्रकारची जातिभेदसहित हिंदुसंस्था उत्तरपथातही प्रमुख आहे. वर्णाश्रमाचे धर्मशास्त्र तेथेही अंमल गाजवित आहे. परंतु ब्राह्मणविरोधी चळवळ उत्पन्न होण्याची शक्यता नर्मदेच्या पलीकडे केंव्हाच दिसली नाही. तेथे हिंदू-मुसलमानाच्या द्वंद्वाने उचल केली. या द्वंद्वाच्या मुळाशी वरवर म्हणण्यास

राजकीय कारणे दिसतात; परंतु सामाजिक शास्त्रांच्या दृष्टीने समाजसंघटनेची, भेदभावाची, धर्माची, संस्कृतीची विसंगती हेच या मागचे हिंदू-मुसलमानांच्या संबंधातील प्रत्ययकारी उत्पाती चळवळीच्या मुळाशी होते असे म्हणणे योग्य होय. या चळवळीचा परिणाम अत्यंत दु:खांतिक झालेला आहे. कितीही दूरवर पाहिले तरी विकासदर्शी ऋषिंनाही त्यांतून उच्च दर्जाचा सांस्कृतिक व सामाजिक समन्वय निर्माण होण्याची निश्चितता दिसू शकणार नाही. ही चळवळ फार खोल गेलेली आहे. विद्रोह, विप्लव, आपत्ती आणि दुर्दैवाचा भयंकर विपाक अशा परिपूर्ण पर्वात ब्रिटिशांच्या पहिल्या सुस्थितीच्या काळात दक्षिण हिंदुस्थानातील ब्राह्मण जमातीच्या राजतंत्रात स्थान मिळून सुस्थितीचे दिवस आले. वेदांतात म्हटल्याप्रमाणे एकाच वृक्षावर बसलेले दोन सुरेख पक्षी- ते कायमचे सखे; परंतु एकास स्वादुफळे भोगावयास मिळू लागली आणि दुसऱ्यास नुसते टकमक पहात बसावे लागले:- अशी बहुजन ब्राह्मणेतर समाजास शैक्षणिक मागासलेपणामुळे स्थिती प्राप्त झाली. सामाजिक दूराव कधीही नव्हते, ते निर्माण झाले. भाषा आणि राहणी यात तफावत झाली. ब्रिटिशांच्या हातात राजकीय सूत्रे होती. ब्राह्मणी नेतृत्वाचे राजकारण सुशिक्षितांचे राजकारण म्हणून हळूहळू पुढे आले. यातून स्वराज्य निर्माण झाले. आता या उत्तर पर्वात मराठा आणि तत्सम जाती यांच्यातर्फे बहुमताने निवडलेल्या प्रतिनिधींच्या हाती सरकारसंस्था देऊन ब्राह्मणांचा राजकीय वरचष्मा नष्ट झाला आहे. या उत्तरपर्वाच्या प्रारंभी ही व्याख्यानमाला गुंफली जात आहे.

### नव्या शास्त्रपूत दृष्टीची गरज

हा प्रश्न हिंदू समाजाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत निर्णायक प्रश्न आहे. या प्रश्नाचा अर्थ चांगल्या रीतीने लावता आला पाहिजे. सामाजिक शास्त्रांनी सुसज्ज विचारसरणीच्या साधनांनीच सामाजिक प्रश्नांचा अर्थ समजावून घेणे हे नवयुगीन मनुष्याचे आद्य कर्तव्य आहे. ब्राह्मण या भूमिकेतून या प्रश्नाचा अर्थ जसा काढू शकत नाही, तसा ब्राह्मणेतर या नात्यानेही या प्रश्नाचा उलगडा होऊ शकत नाही. या दोन नात्यांपैकी कोणत्याही एका नात्याने येणारा समृद्ध अनुभव दृष्टी होईलच असे नाही. त्या अनुभवाने दृष्टी बिघडते किंवा आंधळीरी होते. या अनुभव- समृद्धीला शास्त्रपूत केले तर नवीन दृष्टी लाभते.

सामाजिक शास्त्रे आपणास सामाजिक प्रश्नांचा अर्थ समजावून घेण्यास मदत करतात हे खरे. परंतु त्या शास्त्रांतील भावनादी वेदांती तत्त्वे साक्षात् उपयोगी पडत नाहीत. चिंतनपर प्रवृत्तीला त्या भावनादी तत्त्वांनी एक प्रकारची गंभीरता लाभते. परंतु त्याचा साक्षात उपयोग काही नाही. व्यक्तीच्या मनापेक्षा श्रेष्ठ असलेले सामाजिक मन किंवा सर्व व्यक्तींना शरीरपेशीच्या ठिकाणी लेखणारा समाज पुरुष किंवा साधारण इच्छाशक्ती (General Wi11), किंवा सर्वव्यापी बुद्धितत्त्व (Universal Reason) ही क्रमाने दुरखाइम, स्पेन्सर, रूसो, व हेगेल यांची भाववादी (Idealistic) तत्त्वे येथे प्रत्यक्ष निरुपयोगी आहेत. उलट

त्यांची अडचण होते. कारण सामाजिक झगड्यांना त्यात दुय्यम महत्त्व आहे. याबाबतीत वैज्ञानिक प्रत्यक्षवादी (Empirical) पद्धतीच साक्षात् मदत करते. भाववादी व प्रत्यक्षवादी अशा दोन्ही समीक्षकांना अवश्यमेव मान्य होणाऱ्या तथ्यांच्या (factsच्या आधारेच हा विषय तपासला पाहिजे. चिरकाल टिकलेले, मार्गदर्शन करणारे, सामाजिक जीवनक्रमात भिनलेले ध्येयवाद, सामाजिक संस्थांची रचना, सामाजिक कार्य सुसंवादीपणे घडण्याच्या रीती आणि त्यांच्यापासून निष्पन्न होणारे स्वास्थ्य किंवा अस्वास्थ्य या गोष्टी प्रत्यक्षपणे निर्दिष्ट करता येतात. ही सर्वमान्य सामाजिक तथ्ये.

## इंग्रजीने आणलेला नवा ध्येयवाद

हिंदू समाजाचे जीवजात ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत भिनलेला धार्मिक ध्येयवाद वर्णाश्रम संस्थेचा होता. सामाजिक श्रमविभागणीची कार्ये, वर्णाश्रमविषयक कर्तव्यबुद्धीने निर्वेधपणे हजारो वर्षे पार पडत असत. पारलौकिक श्रेय आणि मनुष्याची या जगातील जीवितमात्रा यांची सांगड धरणारा कर्मवाद आणि बंध- मोक्षाचा सिद्धांत सात वर्णाश्रम-ध्येयवाद बांधलेला होता. या वर्णाश्रम ध्येयवादाला निस्तेज करणारा पाश्चात्य संस्कृतीचा खोल परिणाम ब्रिटिश राजवटीत झाला. नैतिक पावित्र्याची आणि विवेकाची मूलभूत भावना या नव्या संस्कृतीने बदलण्यास सुरूवात झाली. हजारो वर्षांच्या एका व्यवस्थित, खोल रुजलेल्या, आदर्शाला मागे टाकणारा नवाच विवेक यामुळे मनात उदयास आला. त्यामुळे जुन्या पावित्र्याच्या विरुद्ध झगडा करण्यास आवश्यक असलेले मानसिक, नैतिक बल निर्माण झाले. ही ध्येयवादाची गोष्ट झाली.

## जातिभेदाच्या हरळीचे ऐतिहासिक मूळ

हिंदू समाजसंघटनेच्या मुळाशी असलेल्या प्राथमिक अवस्थेत (Primitive Social Conditions मध्ये) जन्मलेल्या विधिनिषेधविषयक भावना या फार महत्त्वाच्या आहेत. रोटी-बेटी व्यवहाराचे विधिनिषेध, भक्ष्याभक्ष्यविचार, स्पृश्यास्पृश्यभावना याच्यावर जातिभेद ही संस्था उभारली आहे. जातिभेदाचे संपूर्ण तंत्र हे वर्णव्यवस्थेच्या कल्पनेने उलगडता येत नाही. वर्णव्यवस्था ही कल्पना जातिभेदाची पूरक कल्पना आहे. हिंदू समाजातील ब्राह्मणात अवांतर शेकडो जाती आहेत. हीच गोष्ट क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अंत्यज यांनाही लागू आहे. तीन हजार जातींचा बनलेला हिंदू समाज कसा बनला याची कल्पना वर्णाश्रमधर्माने चांगल्या रीतीने सांगता येणार नाही. माणसाच्या रानटी अवस्थेतील समाजशासनाचे विधी त्या करिता तपासावयास पाहिजेत. विशिष्ट वस्तू पवित्र आहेत व विशिष्ट वस्तू अपवित्र आहेत; कुत्रा, कावळा, गाढव यांच्या स्पर्शाने पाप लागते आणि गाय, शंख, तुळशी, बेल, गंगाजल यांच्या स्पर्शाने पुण्य लागते; अशा कल्पनांतून जातिभेदातील भक्ष्याभक्ष, भोज्याभोज्य, विवाह्य-अविवाह्य, स्पृश्य-अस्पृश्य असे विधिनिषेध निर्माण झाले आहेत. ते रानटी अवस्थेत निर्माण

झाले. या विधी आणि निषेधास मूलभूत असलेल्या कल्पनांचे निदर्शक दोन पारिभाषिक शब्द मानवजातीशास्त्रज्ञांनी शांत महासागरातील रानटी जमातींच्या भाषेतून शोधून काढले आहेत. Taboo आणि Mana हे ते दोन शब्द होत. टॅबू शब्दाचा भावार्थ पापशक्ती असा आहे. व मॅना शब्दाचा अर्थ पुण्यशक्ती असा आहे. या प्राथमिक कल्पनांच्या बीजांतून जातिभेदाची प्रचंड व्यवस्था जन्मली आहे. मागे निर्दिष्ट केलेल्या पारलौकिक ध्येयवादाच्या आणि वर्णाश्रमतत्त्वाच्या विचारांनी व भावनांनी या प्राथमिक कल्पनांचे पोषण केले आहे. जातिभेदाचे ऐतिहासिक सूत्र किती अतिप्राचीन मानवेतिहासात गोवले गेले आहे, याची कल्पना आल्याशिवाय भारतीयांच्या सामाजिक मानसशास्त्राच्या गाभाऱ्यात प्रवेश करता येणार नाही. या भूतकाळाच्या वारशातून मुक्त होण्याची भारतीय मनाला गरज आहे. वारसा हक्क सांभाळण्याची प्रवृत्ती जितकी प्रशस्त आहे, याच्यापेक्षाही त्या हक्कावर तिलांजली देण्याचे मानसिक शौर्यही संक्रमणकाली अधिक प्रशस्त आहे.

## जीर्ण गावगाड्याची चिखलात रुतलेली चाके

ब्राह्मणेतर चळवळीच्या संदर्भात जातिभेद या संस्थेचा संबंध अत्यंत निकटचा आहे. म्हणून जातिभेदाची ही मूलगामी समीक्षा ध्यानात घ्यावी लागते. ब्राह्मणेतर चळवळीचा झगडा हा समाजाचा अंतर्गत विग्रह आहे. अंतर्गत विग्रहाची मीमांसा करीत असताना हिंदू समाजाच्या संदर्भात पुढील चार गोष्टींचा उलगडा केला पाहिजे. कोणत्याही विद्यमान काळातील सामाजिक अंतर्विग्रहाचे स्वरूप यापैकी तीन गोष्टी ध्यानात घेतल्याशिवाय उलगडता येत नाही. या गोष्टी जगातील वर्तमान समाजसंस्थेत दृष्टोत्पत्तीस येतात-

(१) वंगभेद (२) वर्गविग्रह (३) सांस्कृतिक संदर्भ - या त्या तीन गोष्टी होत. (३) वर्णव्यवस्थेशी संबद्ध जातिभेद ही चौथी गोष्ट हिंदू समाजाचा विचार करीत असताना प्रामुख्याने नजरेत येते. जातिभेद ही संस्था मुख्यतः ग्रामसंस्थेच्या रूपाने अस्तित्वात आली. यासच गावगाडा म्हणतात. हा गावगाडा हजारो वर्षांचा जुना आहे. तो आता पूर्ण जीर्ण झाला आहे. त्याची दोन्ही चाके आर्थिक अव्यवस्थेच्या, अज्ञानाच्या, दैन्याच्या आणि कर्मशून्यतेच्या चिखलात रुतून पडली आहेत. त्यांचे बैल म्हातारे झाले असून उठवणीस आले आहेत. त्यांचा पुनरूद्धार किंवा जीर्णोद्धार अशक्य कोटीत गेला आहे. चाक बाहेर येण्याऐवजी चाकाचे भाग निखळून हातात येत आहेत. या अडून पडलेल्या अगतिक ग्रामसंस्थेतून मुख्य, अग्रस्थानी असलेली जमात पथभ्रष्ट झाली आहे. ती म्हणजे ब्राह्मणांची जमात.

## ब्राह्मणांची पुरोहितशाही नव्हती

इंग्रजी राज्यात दक्षिण हिंदुस्थानातील ब्राह्मणांनी पौरोहित किंवा भिक्षुकी हा धंदा दरिद्री, खेडेगावातून निघून मोठ्या गावात किंवा शहरात जाण्यास असमर्थ अशा ब्राह्मण कुटुंबांचा

धंदा म्हणून ठेवला आणि अधिक प्रमाणात शिक्षक, वकील, डॉक्टर, सरकारी हुद्याचे नोकर, कारकून इत्यादी बौद्धिक धंदे प्रामुख्याने हाती घेतले. त्यात नवशिक्षणाच्या अनेक पिढ्या लाभ घेऊन त्यांची भाषा, पेहराव व राहणी यांच्यात इतरांपेक्षा फरक पडला. ब्राह्मण आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्टीनी पुढे गेले. त्यामुळे बहुजनसमाजापासून ब्राह्मण जाती विलग होऊ लागली. यापूर्वी ग्रामसंस्थेत एका जीवाभावाचे ब्राह्मण हिंदू समाजात नांदले. धार्मिक आणि व्यावहारिक दृष्टीने ते नेते होते. परंतु स्वामी नव्हते. सामान्य समाजाच्या धार्मिक भावना व यातना यांचे समाधान करण्याचे कार्य भिक्षूक व धर्मोपदेशक या नात्याने ते करीत होते. धर्माचार्य किंवा पुरोहित या नात्याने समाजाच्या सर्व व्यवहारावर सत्ता गाजवण्याची संघटित, बलशाली धर्मसंस्था, ब्राह्मण कधीच निर्माण करू शकले नाहीत. युरोपातील धर्माचार्यांच्या प्रबल धर्मसंस्थेशी हिंदू धर्मसंस्थेची तुलना करता येत नाही. ब्राह्मण जातीदृष्या समाजात सर्वात पवित्र म्हणून हजारों वर्षे राहिले; परंतु संघटित धर्मसंस्था ते निर्माण करू शकले नाहीत. ते लोकच्छदामुक्तीच राहिले. सामान्य लोकांचा बहुदेववाद, शेकडो प्रकारचे धर्मसंप्रदाय हजारों वर्षे ब्राह्मणांनी टिकवून धरले. एकजिनसी धार्मिक विचारांची सत्ता निर्माण करण्याचा यहुदी धर्म, ख्रिश्चन धर्म, किंवा इस्लाम यांनी जसा प्रयत्न केला, तसा ब्राह्मण करू शकले नाहीत. म्हणून युरोपातील ल्यूथरच्या काळातील प्रोटेस्टंट धार्मिक चळवळीसारखी पुरोहितशाहीविरोधी चळवळ हिंदुस्थानात निर्माण होऊ शकली नाही. ब्रह्मसमाज किंवा सत्यसमाज यांनी पुरोहितशाहीच्या विरोधी शस्त्र उचलले. परंतु पुरोहितशाहीने त्यांच्याविरुद्ध प्रचंड प्रतिकार केला नाही. याचे कारण युरोपसारखी संघटित पुरोहितशाही हिंदू समाजात कधी अस्तित्वातच आली नाही. म्हणून ब्राह्मणेतर चळवळीतील ब्राह्मणविरोधी लढ्याशी युरोपातील पोपशाहीविरोधी चळवळीचे निकटचे साम्य सिद्ध करता येत नाही. येथील ब्राह्मण विरोधाचा अर्थ एक विशिष्ट प्रकारचा आहे. तो म्हणजे जातिविशिष्ट अधिकाराचा विरोध होय. ब्राह्मणांनाच पौरोहित्याचा अधिकार न राहता इतर कोणत्याही जातीने पौरोहित्य करावे असा हट्ट ब्राह्मणेतर चळवळीने सुरू केला. त्यात ब्राह्मणेतर पुरोहित निर्माण होऊ लागले. परंतु ती चळवळ फार दिवस टिकली नाही.

## सत्यसमाज व ब्रह्मसमाज

सत्यसमाज व ब्रह्मसमाज या दोन चळवळी जातिभेदाच्या मुळाशी असलेल्या प्राचीन ध्येयवादाच्या विरोधी नव्या अधिक उच्च ध्येयवादाचा पुरस्कार करण्याकरिता निघाल्या. इंग्रजी शिक्षणाने जे नवे वैचारिक नेतृत्व निर्माण झाले, त्या नेतृत्वाने सत्यसमाज व ब्रह्मसमाज या चळवळी निर्माण केल्या. एका तऱ्हेने हिंदी नवयुगाची प्रभातच घोषित झाली. जुने संकुचित आचार आणि कृपण बंधने मोडण्यात खरे धार्मिकत्व आहे, असा विश्वास या चळवळीने निर्माण केला. स्त्री आणि पुरुष यांना समान हक्क आहेत, असे सांगून स्त्री जातीच्या उद्धाराची चळवळ या चळवळीचा भाग बनला. स्त्रीला बालपणीच अज्ञान

अवस्थेत विवाहबंधनाने बद्ध व्हावे लागे. त्यामुळे तिचे व्यक्तित्व विकसित न होता समर्पित जीवित याच नात्याने तिचा जीवनक्रम हिंदू समाजात चालतो. तिला स्वतंत्र व्यक्तित्व यावे म्हणून स्त्री स्वातंत्र्याची चळवळ निर्माण झाली. स्त्री- शिक्षणाला महत्त्व येऊन मिश्र विवाहास आणि विधवा विवाहास मान्यता देऊन स्त्री-पुरुषांचे हिंदू समाजातील बंधन नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. मूर्तिपूजा निषिद्ध ठरवून मंदिर संस्था आणि समाजास भारभूत होणारा आळशी, पुजारी वर्ग यांच्या अस्तित्वाची गरज नाही हे दाखवून दिले. एकेश्वरवादी धर्मक्रांती व्हावी, अशी धार्मिक भावना सत्यसमाज आणि ब्रह्मसमाज यांच्या मुळाशी होती. केवळ हिंदू समाजाची शुद्धी याच्या योगाने करण्याचा हेतु नव्हता. सर्व धर्मांत भ्रातृभाव वाढावा, शुद्ध धार्मिक आचाराचे, कर्मकांडाचे, मंत्रतंत्राचे, मूर्तीचे, अवतारांचे, गुरुंचे, व अद्‌भूत चमत्कारांचे वेड मोडावे, हाही त्यात हेतु होता. हिंदी समाजातील खालच्या वर्गातील आणि शूद्र व जनसामान्यांच्या प्रगतीची प्रखर वासना हे ब्रह्मसमाजापेक्षा सत्य समाजाचे वैशिष्ट्य होय. अस्पृश्याच्या अंत्योदयाच्या चळवळीस ब्राह्मणेतर चळवळीमुळे अधिक बळ लाभले. डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यांचा समान हक्कांकरिता जो विग्रही लढा उभा राहिला त्याची मूळ प्रेरणा जोतिराव फुले यांच्या चळवळीतून निर्माण झाली. हिंदू समाजाची सामाजिक सुधारणा आणि धार्मिक परिवर्तन असे जोतिरावांच्या चळवळीचे दोन भाग होत. या चळवळीमध्ये आर्थिक प्रश्नांना सुद्धा महत्व प्रथम आले होते. मुंबईतील मजुरांच्या लढ्याचा प्रारंभ सत्यसमाजाचे कार्यकर्ते के. लोखंडे यांच्या परिश्रमानी झाला. सत्यशोधक समाजाच्या अनेक कार्यक्रमास ब्रह्मसमाजाची मंडळी सुद्धा साहाय्य करीत. कै. न्यायमूर्ती रानडे, सर रामकृष्ण भांडारकर हे या समाजाच्या अनेक कार्यक्रमांना हजर असत.

## ब्राह्मणांनी केलेला सत्यापलाप

हिंदी समाजाची समतेच्या व स्वातंत्र्याच्या तत्त्वावर पुनर्घटना करणारे आधुनिक पाश्चात्य विचारांचे वातावरण या चळवळीत फार वेळ टिकले नाही. या चळवळीत जीर्णोद्धारवाद शिरला. ब्राह्मणेतर मराठा, माळी इत्यादी सरंजामदारी भावनेत वाढलेल्या जमातीतील मोठी श्रीमंत घराणी, सरदार, संस्थानिक यांचा चळवळीत प्रवेश झाला. बडोदेकर व कोल्हापूरकर यांनी धार्मिक प्रश्नांना अधिक महत्त्व दिले. चालू वर्णव्यवस्थेचे तत्त्व दक्षिण हिंदुस्थानच्या हिंदू समाजाला लागू करण्यात ब्राह्मण पुरोहितवर्गाने फार कुचराई केली. त्यामुळे धार्मिक प्रश्नांना जोरदार विवादाचे स्वरूप प्राप्त झाले. कलियुगात ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण आहेत म्हणून हिंदू समाजातच क्षत्रिय आणि वैश्य यांचे सद्यःकाळी अस्तित्व नाही असा आग्रह ब्राह्मणांनी चालविला. यात ब्राह्मणांनी वैदिक आणि हिंदू धर्माची प्रचारशक्ती कुंठित केली. ऐतिहासिक दृष्ट्याही हे तत्त्व खरे ठरू शकत नव्हते. विशेषतः महाराष्ट्राला हे लागू पडत नाही. ब्राह्मणांच्या बाहेर असलेला सगळा समाज शूद्र आहे असे लेखण्यात ब्राह्मणांनी सत्यापलाप जसा केला तसा हिंदू धर्माच्याही समाजोद्धारक शक्तीला खच्ची केले. सत्यापलाप केला असे

म्हणण्याचे कारण असे की संस्कृतमय असलेली मराठी भाषा बोलणारा महाराष्ट्र समाज हा आर्यांची दक्षिणेतील विशाल वसाहत होय. ही गोष्ट विचारवंतांच्या दृष्टीने सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे. या समाजातील ब्राह्मणच तेवढे आर्य असे म्हटल्याने येथील मराठी भाषेच्या अस्तित्वाचा उलगडा होत नाही. मूठभर बड्या लोकांची भाषा सर्व जनतेची भाषा बनणे ही गोष्ट जवळ जवळ अशक्य. दुसरे असे की येथील सव्वादोन हजार वर्षांचा राजकीय इतिहास जर तपासला, तर सातवाहनपासून देवगिरीच्या यादवांपर्यंत जी क्रमाने राजघराणी उदयास आली व अस्तास गेली, त्यांचे वंशज मराठे लोकांत सापडतात. मराठा, माळी, धनगर, कोळी, गवळी, भोई इत्यादी जमाती या क्षत्रिय जमाती आहेत असे अनेक लक्षणांवरून व भाषाशास्त्रावरून निश्चित करता येते. तिसरे असे की इतिहासपूर्वकालीन असुरवंश आणि नर्मदेत प्रथम वसाहत करणारे सहस्रार्जुनाचे हैदव नामक यादव हे क्षत्रिय वसाहतकार होते असे अनुमानिता येते. विजयनगरच्या साम्राज्याचेही स्वामी यादवकुलीनच होते. मराठी समाज हा प्राधान्याने प्राचीन काळच्या महारथी क्षत्रियांपासून निर्माण झालेला समाज आहे, असेच ऐतिहासिक अनुमान करावे लागते. हे अनुमान खरे मानले तर महाराष्ट्र वसाहतीचा इतिहास अंधारात गडप झाला आहे असे म्हणावे लागते.

## वेदोक्ताची चळवळ

आपले क्षत्रियत्व पुन्हा प्रस्थापित करण्याकरिता श्रीमंत सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूरचे छत्रपती शाहूमहाराज यांच्या प्रेरणेने ब्राह्मणेतर चळवळीला धार्मिक अधिकार वाढवण्याचे वळण लागले. आम्ही क्षत्रिय आहोत, वेदोक्त कर्माचा आम्हास अधिकार आहे, असा आपला अधिकार त्यांनी घोषित केला. या वेदोक्त चळवळीला आर्य समाजाने पाठिंबा दिला. स्वामी दयानंद सरस्वती यांचे स्वागत मोठ्या थाटाने करण्याला जोतिराव फुले हे सगळ्यात अग्रभागी होते. या गोष्टीचा खोल अभिप्राय जोतिरावांच्या पश्चात वाढलेल्या वेदोक्त चळवळीने निश्चित करता येते. ब्राह्मणांनी शुद्र, संकुचित भावनेने या चळवळीस विरोध केला, त्यामुळे ही चळवळ मागे पडली. कै. रामशास्त्री भागवत व डॉ. रामकृष्ण भांडारकर या दोघांचा जबरदस्त पाठिंबा या क्षत्रियत्व सिद्ध करण्याच्या आंदोलनाला होता.

जुन्या ध्येयांना नवे रूप देऊन हिंदुत्वाला अधिक समर्थ बनविण्याचा प्रयत्न फार दिवस टिकला नाही. या चळवळीत राजकारणाच्या हालचालींना महत्त्व येऊ लागले. इंग्रजी राज्यकर्त्यांनी माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा दिल्यानंतर या चळवळीला दैनंदिन राजकारणातले प्रश्न हाती घ्यावे लागले. सामाजिक सुधारणेचा आवेश उतरून गेला.

## पराभवाच्या गोत्यात सापडलेली आजची ब्राह्मणेतर चळवळ

महात्मा गांधींच्या ब्रिटिश सत्ताविरोधी स्वराज्य चळवळीला महत्त्व आल्यानंतर ब्राह्मणेतर चळवळीने स्वराज्याच्या लढ्यात प्रवेश केला. तो लढा आता संपला आहे. आता राजकीय

सत्तेचे महत्त्वाचे सूत्रधार महाराष्ट्रातील राजकारणात मराठा व तत्सम ज्ञातीचे प्रतिनिधी झाले आहेत. आता ब्राह्मणेतर चळवळीला व्यापक ध्येयवाद राहिला नाही. ब्राह्मण जातीच्या होती असलेली राजकारणाची सूत्रे मराठा व तत्सम या सत्तर टक्के असलेल्या जमातीच्या पुढाऱ्यांच्या हाती गेली आहे. जातिभेदाची प्रक्रिया ही आता जातिभेदाला उचलून धरीत आहे. ब्रिटिश पूर्व- काळातील जातिभेदाच्या भोवताली व अंतरंगात सामाजिक संवादित्व व सहकार्य टिकवणारी धार्मिक ध्येयवादाची दृढ भावना वसत होती. ती नाहीशी झाली आहे. त्यामुळे हिंदुसमाज शतधा विदीर्ण झाला आहे. राजकीय सत्तास्पर्धेत गुंतलेल्या ने त्यांच्या ठायी विदीर्ण झालेल्या समाजाचा कायापालट करणारा ध्येयवाद आणि कार्यक्रम सांपडलेला नाही. माळी, सुतार, सोनार, शिंपी, तेली, न्हावी, कोळी, अस्पृश्य इत्यादी अनेक अल्पसंख्य जमाती सर्व दृष्टींनी मागासलेल्या आहेत. त्यांना सर्वांना एका विशाल समाजसंस्थेत आत्मोद्धाराची आणि विकासाची साधने लाभून सामर्थ्यसंपन्न करणारी चळवळ देशात नाही. ब्राह्मण जगात पराभूत होऊन मागे पडेल आणि काही बहुमताच्या जोरावर दुसऱ्या काही जमाती राजकारणात सत्ताधीश होतील. ब्राह्मणेतर चळवळ ही आज अशाप्रकारे पराभवाच्या गोत्यात सांपडली आहे. हिंदू समाजात समता व स्वातंत्र्य स्थापन करण्याची उत्कट भावना लय पावली आहे.

ब्राह्मणेतर चळवळ या शब्दाने व्यक्त होणारी कल्पना अनेक बाजूंनी मागासलेपणाची प्रवृत्ती व दृष्टी सूचित करते. कारण ब्राह्मणेतर या शब्दाने ज्या जमातीचा निर्देश होतो, यांच्यात ऐक्य किंवा समरसता निर्माण करणारे कोणतेही तत्त्व त्यांत सूचित होत नाही. ब्राह्मण ही भावना जितकी जीर्णमतवादी आहे, तितकीच ब्राह्मणेतर हीही भावना जीर्णमतवादी आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर या दोन्ही कल्पना धरून असणाऱ्या सर्व प्रवृत्तींना संपूर्ण विराम देणारी सामाजिक चळवळच हिंदू समाजाला अगतिकतेच्या दुर्दैवातून मुक्त करू शकेल.

**(* गजेंद्रगडकर व्याख्यानमाला, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय**
**'ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ' दि. २०, २१ व २२ सप्टेंबर, १९५२.**
**प्रस्तुत व्याख्यानांचा तर्कतीर्थकृत सारांश. साप्ताहिक मौज, मुंबई.**
**बुधवार, दि. २४ सप्टेंबर, १९५२ , पृ. १, ३ व १०.)**

○○○

२९

# भारतीय राष्ट्रीयत्व

*(गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे या संस्थेचा स्थापना दिन प्रतिवर्षी १४ मार्च रोजी साजरा होत असतो. त्या निमित्त ते एक व्याख्यान योजत असतात. सन १९५३ च्या स्थापना दिनाचे पाहुणे होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. त्यावेळी त्यांनी 'भारतीय राष्ट्रीयत्व' विषयावर आपले विचार व्यक्त केले होते, त्याचा हा काही भाग.)*

भारतीय राजकारणाचे साफल्य भारतवर्षाचे एकात्मक राष्ट्र निर्माण करणे यात आहे. स्वातंत्र्यपूर्ण आणि सामर्थ्यशाली नागरिकांचे एकात्मक भारत राष्ट्र निर्माण करण्याचा प्रयत्न, हेच भारतीय राजकारणाचे आजचे मुख्य स्वरूप आहे. एकात्मक भारत राष्ट्र अजून निर्माण व्हावयाचे आहे. इंग्लंड, फ्रान्स, युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका इत्यादी पाश्चात्त्य राष्ट्रांचे राजकारण हे राष्ट्रनिर्मितीचे राजकारण नव्हे. एक संस्कृती व लोकजीवनाशी समरस असलेले राज्य यांनी त्या राष्ट्राची एकता वाढविलेली आहे. रशियन राज्यक्रांतीने नुकतेच एक विशाल राष्ट्र निर्माण केले आहे. सोवियत युनियनमधील रशिया हे नवजात राष्ट्र आहे. या पाश्चात्त्य राष्ट्राचे राजकारण म्हणजे अस्तित्वात असलेल्या थोर राष्ट्रांच्या योगक्षेमाचे व प्रगतीचे राजकारण आहे. 'राष्ट्र' संज्ञा विशिष्ट लोकसंख्या किंवा समाजसंस्था तेथे अगोदरच प्रगल्भावस्थेस आली आहे. भारतात राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया पूर्णावस्थेस आलेली नाही. ती अजून पूर्णावस्थेस यावयाची आहे. भारतवर्ष आधुनिक अर्थाने 'राष्ट्र' बनण्यास प्रारंभ गेल्या शतकात जरी झाला असला, तरी स्वराज्यप्राप्तीच्या पूर्वीच्या कालात भारताचे एकराष्ट्रत्व बनण्याची क्रिया परकीय शासनाच्या आधिपत्याखाली सुरू झाली होती. त्यावेळी एकराष्ट्रत्वाला धोके अधिक होते. कारण एकराष्ट्रत्वाच्या निर्मितीची क्रिया संपूर्ण विफल करण्याचे सामर्थ्य परकियांमध्ये होते. आता ती प्रचंड अडचण दूर झाली आहे. एकराष्ट्रत्वाच्या प्रक्रियेची सर्व जबाबदारी येथील लोकांवर व विशेषत: येथील राज्यकर्त्या

गटांवर येऊन पडली आहे. म्हणून भारतीय राष्ट्रीयत्वाची मीमांसा करण्याची ही उत्कृष्ट संधी आहे.

इतिहासपूर्व पौराणिक काळात भारतवर्षाचा सामाजिक व सांस्कृतिक रचनेचा पाया घातला गेला. बुद्धोत्तर काळात भारतीय संस्कृतीला विकसित व प्रगल्भ रूप प्राप्त झाले. भारतवर्षही एक विशाल संस्कृती म्हणून स्थिरावली. मुसलमानी काळात समानीकरणाची शक्ती दुर्बल आहे, असे ठरले. स्वधर्म व स्वसंस्कृती यांच्या अभिमानाची पुष्कळ उदाहरणे या दीर्घ कालखंडात सापडतात; परंतु भारत हे एक राष्ट्र नव्या अर्थाने ब्रिटिश राज्यापूर्वी कधीच अस्तित्वात आले नाही किंवा भारतवर्षात महाराष्ट्र, गुजरात, बंगाल, पंजाब, आंध्र, कर्नाटक इत्यादी राष्ट्रेही आधुनिक अर्थाने राष्ट्र या स्वरूपात अस्तित्वात आली नाहीत.

ब्रिटिशपूर्व युगात भारतीयांच्यामध्ये लोकभावनेत राष्ट्राभिमानाचा पूर्ण अभाव होता, ही गोष्ट सर्व इतिहास तज्ज्ञांना मान्य आहे; परंतु या बाबतीत त्या काळाला व त्या काळातील लोकांना दोष देण्यात अर्थ नाही. राष्ट्रीयत्वाचा किंवा राष्ट्राभिमानाचा सद्‌गुण हा सार्वजनिक रीतीने युरोप खंडातही नेपोलियनच्या पूर्वी मान्यतेस पावला नव्हता. मुसलमानी अमदानीत मुसलमानी राज्यांच्या वतीने हिंदू हिंदूशी लढत, रजपूत रजपुतांविरुद्ध लढत, मराठे मराठ्यांच्या विरुद्ध जात. एवढेच नव्हे तर मुसलमान मुसलमानांच्या विरुद्ध लढत. ही गोष्ट सार्वत्रिक होती, तशीच ती इंग्रजी राज्याच्या अंतापर्यंत चालू होती. युरोप खंडातही अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत असाच देखावा दिसत होता. नेपोलियनच्या दिग्विजयाच्या काळात त्या त्या राष्ट्रांतील प्रजाजनांनी, मध्यमवर्गीयांनी व सरदारांनीही स्वदेशी राज्याच्या विरुद्ध नेपोलियनला मदत केली हे सुप्रसिद्ध आहे. ‘जर्मन राष्ट्राभिमान’ हा राज्यशास्त्राचा व सामाजिक मानसशास्त्राचा एक मोठा विषय होऊन बसला आहे. जर्मन राष्ट्रीय स्वभावाची मीमांसा करण्याकरिता अनेक पंडितांनी आपले ग्रंथ खर्च केले आहेत; परंतु नेपोलियनच्या आधिपत्याखाली जर्मन सुशिक्षित वर्ग फ्रेंच बोलू लागला, फ्रेंच क्रांतीचे अनुकरण करू लागला, विवबंधुत्ववादी झाला. फ्रान्समध्येही दीर्घकालपर्यंत दक्षिण व उत्तर प्रदेशाचा विरोध टिकला होता.

## युरोपात राष्ट्रांचा उदय

प्रजांचे राष्ट्रीय राजकारण हे ज्यांचे विशिष्ट गमक आहे, अशा राष्ट्रांचा युरोपात उदय सतराव्या शतकापासून होऊ लागला. म्हणून राष्ट्रीयत्वाची, राष्ट्राभिमानाची व राष्ट्रवादाची मीमांसा करताना विशिष्ट अर्थाचा संदर्भ लक्षात घेऊन, राष्ट्र, राष्ट्रीयत्व व राष्ट्रवाद ही मानवी इतिहासातील आधुनिक काळातील आविष्करणे होत, हे ध्यानात घ्यावे लागते. राष्ट्रत्वाची बीजे मनुष्य समाजाच्या आद्यावस्थेपर्यंत पोचविता येतात. कुलाभिमान, प्रदेशाभिमान, जमातनिष्ठा इत्यादी भावनाबीजे मनुष्यस्वभावात स्वाभाविक रीतीने वसत असतात. परंतु सार्वजनिक राष्ट्रीय जाणीव किंवा सार्वजनिक राष्ट्रीय अंत:करण हा ज्याचा

परिणाम आहे, असा राष्ट्रनामक सामाजिक स्थितीविशेष, हे आधुनिक कालाचे मानवी इतिहासातील आविष्करण होय. भारताच्या एकात्मक राष्ट्रत्वाची घडण होत असता या आधुनिक राष्ट्र-कल्पनेची मीमांसा ध्यानात घेतली पाहिजे.

इतर राष्ट्रांच्या मानाने इंग्लंडला राष्ट्रीय एकता अगोदर आली. प्रो. ए. एफ. पोलार्ड म्हणतो की, ''इंग्लिश राष्ट्र व इंग्लिश राज्य निर्मितीचे संसद (Parliament) हे मुख्य साधन बनले होते. संसदेच्यापूर्वी इंग्लंड कित्येक शतके अस्तित्वात होते; परंतु त्या शब्दात भौगोलिक प्रदेशापेक्षा अधिक अर्थ अगदी थोडा होता. त्याला राष्ट्र म्हणणे कठीणच, राज्य म्हणणे त्याहून कठीण!'' पोलार्डचे हे म्हणणे खरे आहे. संसद ही संस्था मध्ययुगातील स्थानिक, प्रांतीय आणि सामाजिक बांध उल्लंघून जाण्याचा मार्ग बनली. तिने सार्वजनिक मत व समान भावना उत्पन्न केली आणि त्यामुळे लोकसंख्या 'राष्ट्र' या पदवीस पोहोचली. इंग्लिश संसदप्रमाणेच 'स्टेटस् जनरल' या लोकसभेचा फ्रान्सला उपयोग झाला; परंतु ही लोकसभा राजाच्या अधीन होती. ती दृढमूल न झाल्यामुळे तेथे राज्यक्रांती झाली. ब्रिटनमध्ये प्रादेशिक अभिमान बाळगणारी तीन जनपदे होती - वेल्स, स्कॉटलंड आणि इंग्लंड. आठव्या हेन्रीच्या वेळेस इंग्लंड आणि वेल्स हे एका समान राज्याचे भागीदार बनले. १६०३ मध्ये इंग्लिश सिंहासनावर स्टुअर्ट राजघराण्याची स्थापना होऊन स्कॉटलंड आणि इंग्लंड यांचा संयोग घडला. शेवटी तीन जनपदांचे ब्रिटन हे एक राष्ट्र बनण्याला लोकशाही राज्य कारण झाले. लोकहिताची सर्वसाधारण अभिवृद्धी करणारे लोकराज्य हेच एकराष्ट्रत्वाचे कारक बनले.

फ्रेंच राज्यक्रांती आणि नेपोलियनच्या युरोपवरील आधिपत्याचा प्रतिकार करण्याकरिता उद्भवलेली युद्धे यांच्यामुळे सार्वजनिक राष्ट्रीय भावना निर्माण होऊन युरोपातील 'राष्ट्रे' राष्ट्र या नात्याने संघटित झाली. इंग्लंडला नेपोलियनशी समुद्रात सामना करावा लागला. रशिया व जर्मनी यांचे राष्ट्रीय सामर्थ्य नेपोलियनच्या विरोधी उठावात प्रकट झाले.

## राष्ट्र म्हणजे काय?

'राष्ट्र' कल्पनेचा मुख्य द्रष्टा रुसो मानला जातो. तो म्हणतो, ''युरोपात जिवंत असलेल्या राष्ट्रांच्या भौगोलिक मर्यादा म्हणजे पर्वत, समुद्र व नद्या होत. म्हणून ही गोष्ट स्पष्ट आहे की, निसर्गानेच स्वत: राष्ट्रांची संख्या व श्रेष्ठत्व निर्धारित केले आहे. वस्तुत: आल्प्स, ऱ्हाईन, समुद्र आणि पिरेनिज हे विस्तारास अडथळा करणारे, अनुल्लंघनीय, प्रतिबंधक नव्हते. परंतु इतर काही महत्त्वाचे भाग असे आहेत की, त्यांच्या जोरावर तात्पुरत्या जबरदस्तीने नष्ट केलेल्या देशसीमा पूर्वपदावर येतात.'' रुसोचे हे राष्ट्रांच्या नैसर्गिक सीमांबद्दलचे म्हणणे अनिचित व संदिग्ध आहे. अनेक नद्या व अनेक पर्वत पोटात समावेश करणारी राष्ट्रे आहेत. भौगोलिक मर्यादांचे स्पष्ट लक्षण, इतर अंश लक्षात न घेता निश्चित करता येत नाही - हर्डरने 'एक महान कुटुंब' असे राष्ट्राचे लक्षण सांगितले आहे. त्यात काही गंभीर अर्थ

आहे. परंतु ग्राम व नगर या जनसमुदायांनाही हे लक्षण लागू पडते. सांस्कृतिक मूल्यांनी भरलेली, सर्व नागरिकांना सुसंस्कृत करण्याचे प्रभावी साधन बनलेली भाषा हे राष्ट्र लक्षण, फिक्टे (Fichte) याने सांगितले आहे. परंतु, इंग्लिश भाषा बोलणारी ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादी अनेक राष्ट्रे आज अस्तित्वात आहेत. सुसंस्कृत करणारे चैतन्य इंग्लिश भाषेत भरपूर आहे. इंग्लिश भाषेमुळे या राष्ट्राचे भेद नष्ट झाले नाहीत. म्हणून फिक्टेचे म्हणणे संपूर्णपणे सिद्ध होत नाही. त्यांच्या म्हणण्यातील इतकाच भाग खरा आहे की, राष्ट्राचे प्रगल्भ भाषा हे महत्त्वाचे तत्त्व आहे. इ. रेनाँ (E. Renan) याने राष्ट्र म्हणजे काय याची स्वतंत्र रीतीने विस्तृत चर्चा केली आहे. तो म्हणतो, ''एका विशिष्ट केंद्रामध्ये केंद्रित होणाऱ्या अनेक सामाजिक घटनांच्या मालिकांनी आधुनिक राष्ट्र अस्तित्वात आले आहे. राष्ट्र निर्माण करणारे कारण अतिशय खोल आहे. अनेक पराभवांच्या योगाने इटलीला राष्ट्रत्व आले, तर उलट, विजयाच्या योगाने टर्की विघटित झाले. एका रक्ताचा मानववंश आधुनिक राष्ट्राचा कारक म्हणून स्वीकारता येत नाही. केल्ट, ऑर्बर आणि जर्मन या वंशांनी फ्रान्सची निर्मिती केली आहे. जर्मन, केल्ट व स्लाव्ह यांचा जर्मन देश बनला आहे. इटलीमध्ये कितीतरी वंशांची खिचडी झालेली दृष्टीस पडते. ब्रिटनमध्ये अनेक मानववंश एकमेकांत मिसळून गेले असून त्यांची पृथक लक्षणेही लुप्त झाली आहेत. कोणताही वंश शुद्ध स्वरूपात सापडू शकत नाही. धर्म हे सामाजिक गट निर्माण करणारे मुख्य कारण प्राचीन इतिहासात सापडते. बरेचसे धार्मिक आचार हे कुलाचार असतात. कुलांचा विस्तार होऊनच चालीरीती अस्तित्वात येतात; परंतु युरोपचा एक धर्म असूनदेखील तेथे अनेक राष्ट्रे विद्यमान आहेत. अनेक राष्ट्रे कॅथॉलिक आहेत, तर अनेक राष्ट्रे प्रोटेस्टंट आहेत. भौगोलिक सीमा राष्ट्रभेद निर्माण करतातच असा नियम नाही. एकाच फ्रान्समध्ये पाच मोठ्या नद्या वाहत आहेत, पण त्या नद्यांनी पाच राष्ट्रे निर्माण केली नाहीत.'' म्हणून रेनाँ शेवटी म्हणतो की, ''राष्ट्र हे आध्यात्मिक तत्त्व किंवा एक आत्मा आहे (A Nation is a soul, a spiritual principle). एकत्र राहण्याची इच्छा, सहकार्याची वासना, समान परंपरेचा अभिमान, समान संकेत, पूर्वजांबद्दल पूज्य बुद्धी, महापुरुषांच्या कीर्तिशाली कृत्याबद्दल गौरवबुद्धी, महान कार्य सहकार्याने करण्याची महत्त्वाकांक्षा, स्वार्थत्यागजन्य प्रेम, दोषांचे ओझे घेण्याची तयारी, परस्परांबद्दलच्या कर्तव्याची जबाबदारी, समान सुखदु:खामधील समसंवेदना, महान संकटे व दु:खे आली असता प्रदीप्त होणारी एकत्वबुद्धी, ही या आध्यात्मिक तत्त्वाची प्रतीके होत. मानवी वासना बदलतात, म्हणून काय झाले? या जगात बदलत नाही, असे काय आहे? राष्ट्रे ही काही शाश्वत नसतात! त्यांना आरंभ आणि अंत आहे. युरोपचे संघराज्य झाल्यावर ही राष्ट्रे नाहीशी होतील; परंतु आज जी राष्ट्रे स्वतंत्रपणे अस्तित्वात आहेत, त्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य सुरक्षित आहे. जगाचा एक कायदा एक अधिपती झाला तर स्वातंत्र्य सुरक्षित राहणार नाही, स्वातंत्र्य नष्ट होईल. म्हणून राष्ट्रभावना ही एक स्वातंत्र्यपोषक नैतिक भावना

आहे. प्रत्येक राष्ट्रात काही दोष आहेत, काही गुण आहेत. प्रत्येक राष्ट्राची काही वैशिष्ट्ये आहेत व स्वतंत्र प्रकारचे कर्तृत्व आहे. त्यामुळे मानवजातीच्या समान व महान उद्देशांची साधना घडते. मनुष्य हा विशिष्ट वंश, विशिष्ट भाषा, विशिष्ट धर्म किंवा वाकड्यातिकड्या वाहणाऱ्या नद्या आणि डोंगर यांचा गुलाम नाही, या नैतिक जाणिवेचे आविष्करण म्हणजे राष्ट्र होय. निरोगी मने आणि हृदये असलेल्या माणसाच्या महान समुदायाने राष्ट्र हे तयार होते. रेनाँ यांची ही राष्ट्रमीमांसा वरवर गूढवादी दिसली तरी ती तशी गूढ नाही. रेनाँ हा ज्या काळात ही राष्ट्र-मीमांसा करतो, त्यानंतर शंभर वर्षे निघून गेली आहेत. १९१४ सालापर्यंत राष्ट्र या कल्पनेचे वरिष्ठ नैतिक मूल्य साधारणपणे मान्य झाले होते. पहिल्या महायुद्धानंतर आक्रमक राष्ट्रवादाला अधिक तेज चढले. या आक्रमक राष्ट्रवादाची मानवी हक्कास व स्वातंत्र्यास विघातक व अवनतिकारक प्रवृत्ती दुसऱ्या महायुद्धात निदर्शनास आली. म्हणून अलीकडच्या काळात राष्ट्रवादाचे अधिक शास्त्रीय समीक्षण व मूल्यमापन पाश्चात्त्य पंडितांनी केले आहे.''

## राष्ट्रीयत्वाची मीमांसा

हॅनस् कोन् (Hans Kohn) याने समतोल अशी ऐतिहासिक चिकित्सा केली आहे. त्याच्या म्हणण्याचे सार असे आहे -

''समाजाच्या ऐतिहासिक परिणतीचे कार्य राष्ट्रीयत्वे होत. एकलीन जमाती (Clans), गण (Tribes) किंवा जनसंघ (Folk-Groups) अशा प्रकारच्या एका विशिष्ट प्रदेशाच्या व वंशाच्या मानवी संघटना म्हणजे राष्ट्रीयत्वे नव्हेत. जनपदांचे अस्तित्व इतिहासात अगदी पहिल्या काळापासून दिसून येते; पण ती राष्ट्रीयत्वे नव्हेत. एका विशिष्ट परिस्थितीत त्यांचीच राष्ट्रे बनली. राष्ट्रीयत्वे ही इतिहासाच्या जिवंत शक्तीची कार्ये असल्यामुळे ती स्थिर नसून बदलणारी आहेत. त्यांचे निश्चित लक्षण सापडणे कठीण. राष्ट्र व राष्ट्रीयत्व यांचा अर्थ वारंवार बदलला आहे. अगदी अलीकडच्या ऐतिहासिक काळातच मनुष्य मानू लागला की, आपल्या राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे व प्रयत्नांचे केंद्र राष्ट्रीयत्व होय. राष्ट्रीयत्व ही स्वयंसिद्ध वस्तुस्थिती नव्हे. तिची स्वयंसिद्धता व स्वयंपूर्णता ही कल्पित असून तिची सापेक्षता ओळखली पाहिजे.''

''समान पूर्वज, भाषाविशेष, प्रदेशविशेष, संप्रदाय, चाली, धर्म व राजकीय अस्तित्व यांना राष्ट्रीयत्वात सामान्यपणे महत्त्वाचे स्थान असले तरी राष्ट्रीयत्वात या सर्व गोष्टी नियमाने समाविष्ट होतात असे नाही. समान पूर्वज किंवा वंश याला माध्यमिक रानटी अवस्थेत पूर्ण महत्त्व होते; परंतु इतिहास असे दाखवतो की, अनादि कालापासून मानवी गट स्थलांतर व देशांतर करीत आले आहेत. अनेक मानववंश भिन्न भिन्न काळी एकत्र येऊन व मिश्रण पावून वर्तमान राष्ट्रे बनली आहेत. राष्ट्रीय जीवन बनविण्यात भाषेचा भाग फार मोठा आहे. विचारांनी व भावनांनी समृद्ध भाषा ही राष्ट्रीय जीवनाची एक कारक शक्ती आहे; परंतु

लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रे स्पॅनिश किंवा पोर्तुगीज भाषा बोलत असूनही त्यांची राष्ट्रीयत्वे भिन्न आहेत. इंग्लिश बोलणारी अनेक राष्ट्रे आज अस्तित्वात आहेत. नॉर्वे व डेन्मार्क आपले राष्ट्रीयत्व भिन्न आहे, हे सिद्ध करण्याकरिता भाषा एक असूनही तिला आपापले नवे वळण देत आहेत. चालीरीती व परंपरा यांना रुसोच्या मते राष्ट्रीयत्वात मोठे स्थान आहे; परंतु प्रत्येक राष्ट्रात चालीरीतींचे स्थानिक भेद पुष्कळ असतात. धर्म हीसुद्धा राष्ट्रीयत्व बनवणारी महत्त्वाची शक्ती आहे. धर्मभेदाचा व धर्मपरिवर्तनाचा परिणाम राष्ट्रीयत्वाच्या बनण्यावर पुष्कळ होतो. कित्येक वेळा धर्मभेदाचा परिणाम भिन्न राष्ट्रे निर्माण करण्यात होतो; परंतु राष्ट्रीय भावना ही आधुनिक काळात उच्चतम नैतिक भावना वा निष्ठा जेव्हा बनली तेव्हा धर्मभावनाही दुय्यम स्थानी राहू लागली. राष्ट्रीय भावनेत ऐहिकतेचा किंवा निधर्मिकतेचा भाव मुख्य आहे. या जगातील सामाजिक जीवनावरील निष्ठा हा तिचा गाभा आहे. प्रदेशविशेषांचेही महत्त्व राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेत आहे. प्रादेशिक सीमा मर्यादांची कल्पना ही राष्ट्रीयत्वाची घटक आहे; परंतु तेवढ्याने राष्ट्रीयत्व निर्माण होत नाही. जनता जेव्हा जाणूनबुजून भावनाबद्ध होऊन, समान राजकीय संघटनेकरिता एकजीव होते, तेव्हा राष्ट्रीयत्व आधुनिक अर्थाने वाढीस लागते. आधुनिक प्रकारचे राज्य निर्माण होण्यापूर्वी हे राष्ट्रीयत्व अस्तित्वात आले नव्हते. जिवंत व कार्यपर राजकीय संजीवनीची प्रबल इच्छा राष्ट्रीयत्व निर्माण करते. १७८९ मध्ये अशाच प्रबल इच्छेचा आविष्कार म्हणून फ्रान्सचे राष्ट्रीयत्व निर्माण झाले. राष्ट्रीयत्व म्हणजे राजकीय संघटनेवरची लोकांच्या हृदयात वसत असलेली अंतिम निष्ठा (Supreme Loyalty) होय. भिन्न कालखंडात भिन्न प्रकारच्या अंतिम निष्ठा सामाजिक जीवनात प्रकट होत असतात. ही राजकीय निष्ठा विशिष्ट प्रदेशाच्या सीमा मर्यादांतील समाजासंबंधी असते. राष्ट्रवाद ही एक मनाची अवस्था आहे. बहुजन समाजाच्या मनाची पकड घेणारी ही अवस्था आहे. प्रत्येक समाज घटक व्यक्तीच्या मनात ही अवस्था असणे योग्य, अशी नैतिक आवश्यकता त्यात गृहीत धरलेली असते. राष्ट्रीयत्व ही आर्थिक स्वास्थ्य आणि सांस्कृतिक जीवन यांचे अधिष्ठान म्हणून समजली जाते. ही अंतिम निष्ठा बनवण्याचे कारण सर्जनशील सांस्कृतिक चैतन्य हे होय. आर्थिक स्वास्थ्य व आदर्श राज्य ही राष्ट्रीयत्वाची खरीखुरी परिणती होय, अशी लोकांची श्रद्धा असते.”

हॅनस् कोनने केलेल्या या राष्ट्रीयत्वाच्या मीमांसेवर वर्गविग्रहाला वर्गघटित समाजरचनेत मुख्य स्थान देणाऱ्या काही मार्क्सवाद्यांचा असा आक्षेप येऊ शकतो की, ही राष्ट्रीयता वस्तुत: राष्ट्रात त्यांचे सांपत्तिक स्वास्थ्य शाबूत आहे, अशा वर्गाचा ध्येयवाद होय. संपत्तिहीन श्रमजीवी वर्गांना राष्ट्रीयत्वाच्या भावनेपेक्षा वर्गभावनाच संघटित करते. म्हणूनच कार्ल मार्क्सने ‘जगातील कामगारांनो एक व्हा’ असा आदेश शंभर वर्षांपूर्वीच दिला - हा मार्क्सवादी आक्षेप तितकासा बरोबर नाही. ही गोष्ट गेल्या चाळीस वर्षांतील इतिहासाने सिद्ध केली आहे. स्टॅलिनचा रशिया कम्युनिस्ट असूनही पक्का राष्ट्रवादी आहे. पहिल्या

महायुद्धात जर्मन राष्ट्र सर्व शक्ती कसोटीत जगातील अशा लढ्यात गुंतले असताना, जर्मन कामगार वर्गाने हे युद्ध भांडवलदार वर्गाच्याच हिताचे आहे, असे म्हणून यादवी युद्ध सुरू केले नाही. जर्मन कम्युनिस्ट ट्रौटस्की यास यादवी युद्धाचा उठाव न केल्याबद्दल लेनिनने दोष दिला आहे; परंतु वर्गभावनेपेक्षा राष्ट्रभावना अधिक खोल व परिणामकारक असते. वर्गभावनेपेक्षा राष्ट्रभावना प्रभावी असते, हे लेनिनच्या लक्षात आले नाही. राष्ट्रभावनेचे निदर्शन १९१८ पासून १९४६ पर्यंतच्या कालखंडात अधिक झाले. जर्मनी व इटली यातील बहुजन समाज व कामगार वर्ग हिरीरीने आक्रमक राष्ट्रवाद्यांच्या झेंड्याखाली जमा होऊन, अन्य राष्ट्रातील कामगारांशी व बहुजन समाजाशी प्राणपणाने लढला. हिटलर आणि मुसोलिनी यांच्या दंडुकशाहीमुळे हे घडले, असे म्हणणे ही फसवणूक आहे. स्वयंस्फूर्तीशिवाय मोठी पराक्रमी कृत्ये लोक व सैन्ये करीत नसतात. राष्ट्राच्या स्वयंप्रेरणेवर भिस्त असलेलाच विश्वसाम्राज्य स्थापन करण्याची हिंमत करू शकतो. हिटलरला प्रचंड बहुमताने जर्मन जनतेने प्रथम निवडून दिले. नंतर तो हुकूमशहा बनला, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. आधुनिक काळातील हुकूमशहा हे संघटित लोकमताने बनलेले हुकूमशहा आहेत, हे विसरून चालणार नाही.

## आक्रमक राष्ट्रवाद हे मानव्यावरील संकट

कोन्च्या राष्ट्रीयत्वाच्या मीमांसेतील लोकांच्या अंतिम निष्ठेचे विवरण एका दृष्टीने अस्पष्ट राहिले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाहीपूर्ण जीवन अनुभवणाऱ्या लोकांची राष्ट्रीयता व हुकूमशाहीप्रधान राज्य संस्थेस वाहून घेणाऱ्या लोकांची राष्ट्रीयता अशा दोन प्रकारच्या राष्ट्रीयता मान्य केल्या पाहिजेत. इंग्लंड, फ्रान्स, स्वीत्झर्लंड, युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका इत्यादी राष्ट्रातील बहुतम व्यक्ती मानवी हक्क व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा आपल्या राष्ट्रीयतेची उच्च सांस्कृतिक मूल्ये म्हणून अंगीकार करतात. या राष्ट्रांतील लोक हुकूमशाहीप्रधान राज्यसंघटनेस आपल्या राष्ट्रीयत्वात समाविष्ट करणार नाहीत. तसे होऊ लागल्यास विरोध व प्रतिकार करतील. ही मानवी हक्कांवर आधारलेली राष्ट्रीयता विश्वबंधुत्वाच्या मार्गातील एक पायरी ठरते. फॅसिझम व नात्सीझम यांनी जो राष्ट्रवाद पुरस्कारिला, त्यात व्यक्तीच्या हक्कांचा व व्यक्तिविकासाचा सिद्धांत अमान्य केला आहे. व्यक्ती ही संघाचा अवयव मानून संघटित जीवनास ती समर्पित केली आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला वगळणारे असे हे संघाचे वरिष्ठ तत्त्व व्यक्तीच्या स्वतंत्र विकासाची व्यवस्था करीत नाही. स्वराष्ट्ररूप तत्त्व हे सर्वश्रेष्ठ मानून स्वराष्ट्राच्या स्वार्थाकरिता अन्य राष्ट्रांवर आक्रमण करणे व स्वामित्व गाजवणे हे नैतिकदृष्ट्या समर्थनीय ठरते. या आक्रमक राष्ट्रवादाने दुसऱ्या महायुद्धाचे संकट निर्माण केले. कित्येक तत्त्वविवेचकांच्या मते राष्ट्रवाद हा ध्येयवादच नैतिकदृष्ट्या हीन व त्याज्य आहे, मग तो कोणत्याही स्वरूपाचा असो. राष्ट्रवाद ही अंतिम निष्ठा हे मानव्यावरील संकट होय.

लॉर्ड ॲक्टन हा राष्ट्रवादाचा पहिला मोठा टीकाकार होय. तो म्हणतो, ''राष्ट्रवादात स्वातंत्र्य आणि समृद्धी हे उल्लेख अंतर्भूत होत नाहीत. राष्ट्र व राष्ट्रीय राज्य यांच्या उभारणीच्या आवश्यकतेतून स्वातंत्र्य व समृद्धी यांची होळी होते. आर्थिक व नैतिक विनाश हीच त्याची परिणती होय. राष्ट्रवाद ही इतिहासातील एक प्रतिगामी पायरी आहे. इतर राष्ट्रातील मानवांचे बंधुत्व, सुसंस्कृती आणि थोर मानव्य यांची जाणीव राष्ट्रवादाने स्तिमित होते. संघाचा बंदा गुलाम म्हणून माणूस वागू लागला, संघनिष्ठ इच्छाशक्तीला तो शरण गेला, म्हणजे मानव्याचा विकास थांबतो. राष्ट्रीय राज्य म्हणजे जुलमी शक्तीची पूजा बांधणारा संप्रदाय होय.'' लॉर्ड ॲक्टन अनेक राष्ट्रांचा समावेश करणाऱ्या राज्याच्या कल्पनेचा विशेष पुरस्कार करतो. त्याचे असे म्हणणे आहे की, माणसांनी एकत्र येऊन समाजरूपाने राहू लागणे ही जशी सुसंस्कृत जीवनाची आवश्यकता आहे, तशीच भिन्न राष्ट्रांनी मिळून एक राज्य निर्माण करणे हीही गोष्ट सुसंस्कृत जीवनाच्या वाढीस आवश्यक आहे. अधिक प्रगत झालेल्या मानववंशाच्या राजकीय संघटनेत सामील झाल्याने मागासलेले वंश वर येतात. अशा संबंधांमुळे अवकळा व दुर्बलता येऊ लागलेली राष्ट्रे तारुण्यपूर्ण जीवन प्राप्त करून घेतात. राष्ट्रांच्या सीमा व राज्यांच्या सीमा एकरूप असू नयेत.

हिंदुस्थानातही दोन प्रसिद्ध व्यक्तींनी राष्ट्रवादावर जबरदस्त टीका केली आहे. ते म्हणजे रवींद्रनाथ ठाकूर व एम.एन. रॉय हे होत. रवींद्रनाथांचे असे मत आहे की, राष्ट्रवाद ही हिंसक व मानव्यद्रोही विचारसरणी आहे, ते पाश्चात्त्य संस्कृतीचे राक्षसी अपत्य आहे. प्रचंड शस्त्रास्त्र सामग्री तयार करून जगाची लूट करण्याच्या आकांक्षाचेच ते मूर्तिमंत रूप आहे. विश्वव्यापी मानव्याचे प्रेम क्षीण करणारी ही भावना आहे. एम. एन. रॉय यांच्या मताने राष्ट्रवाद हा जुना पुराणा व निकामी झालेला पूजा संप्रदाय आहे. या सर्व टीकांतून जे सार निघते ते असे की, राष्ट्रीय जीवन हे विश्वव्यापी मानवी संस्कृतीशी व मानवी जीवनाशी संवादी अशा स्वरूपात निर्माण करणे ही आजच्या युगाची गरज आहे. व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित असणारे समान मानवी हक्क अमान्य करणारी किंवा डावलणारी अगर ते मर्यादित करणारी राज्यसंस्था मानवी प्रगतीस प्रतिबंध करणारी असल्यामुळे, राष्ट्र संघटनेतून ती वगळली पाहिजे.

भारतीय राष्ट्रीयत्वाच्या चर्चेच्या प्रसंगाने राष्ट्रीयत्वाची व राष्ट्रवादाची ही सामान्य मीमांसा इतक्या विस्ताराने करणे हे विसंगत नसले तरी किंचित दुरान्वित आहे; परंतु राष्ट्रवाद व राष्ट्रीयत्व हे ध्येयवाद सध्या अत्यंत विवादग्रस्त झाले असल्यामुळे, किंचित विषयांतर करूनही त्यांचा येथे परामर्श घेतला आहे.

## भारताच्या एकराष्ट्रत्वाची पार्श्वभूमी

भारत हे एक राष्ट्र की अनेक राष्ट्रांचा समुदाय, या प्रश्नाचा निर्णय करणे कठीण आहे. हा प्रश्न उत्पन्न होतो याचे कारण भारताचे एकराष्ट्रत्व हे एक सत्य आहे असे मानले, तरी ते प्रबल सत्य नाही, असे म्हणावे लागते. या एका राष्ट्राची अनेक राष्ट्रांत विभागणी होण्याचे

भय बाळगावयास कारणे पुष्कळच शिल्लक आहेत. भारत हा हजारो वर्षे सांस्कृतिकदृष्ट्या एक आहे ही गोष्ट जरी खरी असली, तरी त्यामुळे त्याची एकराष्ट्रता सिद्ध होणार नाही. युरोप एकाच ख्रिश्चन संस्कृतीचा आहे; परंतु अनेक प्रबल राष्ट्रांचे ते निवासस्थान आहे. तेथे अवांतर राष्ट्रीय संस्कृती अनेक आहेत असे म्हटले, तर हिंदुस्थानातही अनेक अवांतर संस्कृती आहेत. एका व्यापक संस्कृतीच्या पोटात अनेक अवांतर संस्कृती राहत असतात. बंगाल, महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, कर्नाटक इत्यादिकांच्या भिन्न संस्कृती गृहीत धरून अनेक विवेचकांनी विवेचने केली आहेत. यांच्यात जितका भेद आहे, तेवढा भेद धरून भिन्न राष्ट्रे निर्माण होऊ शकतात, याची साक्ष देण्यास युरोपचा इतिहास सिद्ध आहे. प्रगल्भ, लोकशिक्षणास समर्थ अशी सुसंस्कृत भाषा जेथे तयार होते, तेथे राष्ट्रीय जीवन निर्माण होते, असे फिक्टेचे मत आहे. भिन्न भाषिकांचे मिळून एक राष्ट्र बनलेले अपवादादाखलच सापडते. बंगाली, मराठी इत्यादी या देशातील प्रगल्भ भाषा होत. म्हणून भाषावारीने भिन्न असलेल्या भारतीय जनपदांत भिन्न राष्ट्रे आहेत, असे सामान्य अर्थाने जर कोणी म्हटले, तर त्यात आक्षेपार्ह काहीही नाही. भिन्न राष्ट्रांचेही एक महान राष्ट्र बनू शकते. उदाहरणार्थ, इंग्लंड इत्यादी राष्ट्रे भिन्न राष्ट्रांच्या मीलनानेच बनलेली आहेत. उपभाषा मागे पाडणारी एक सामान्य भाषादेखील तेथे कालांतरानेच निर्माण झाली. भारत हे एक राष्ट्र म्हणून अस्तित्वात येण्याची प्रक्रिया गेल्या शतकात सुरू झाली. ती प्रक्रिया अजून चालू आहे. त्या एकराष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेतूनच, त्या प्रक्रियेतील काही अंगभूत दोषांमुळे, राजकीयदृष्ट्या हिंदुस्थान व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे नुकतीच अस्तित्वात आली. पश्चिमेचा ख्रिश्चन धर्म व पूर्वेचा ख्रिश्चन धर्म अशा अवांतर भेदामुळे युरोपातही राष्ट्रभेदांच्या प्रक्रियेला प्रोत्साहन मिळालेले आढळून येते. समान जीवनमूल्ये व समान हितसंबंध यांची जाणीव ही राष्ट्रीय भावनेचा घटक आहे. इस्लाम व हिंदू धर्म जीवनमूल्यांच्या समानतेच्या कल्पनेला व्यत्यय आणतात, म्हणून गेल्या शंभर वर्षांतील एकराष्ट्रत्वाची घडण करणाऱ्या प्रयत्नांना अपयश आले आहे. ते अपयश येणे अपरिहार्य होते असे मात्र नव्हे. चीनमध्ये जी एकराष्ट्रत्वाची घडण हिंदुस्थानबरोबरच सुरू झाली आहे, तिच्यात इस्लामला अशी फूट पाडण्यात यश आलेले नाही. कारण चिनी जीवनात पारलौकिक, धर्मनिरपेक्ष, ऐहिक संस्कृतीच्या मूल्यांना भारतीय जीवनापेक्षा अधिक महत्त्व असल्यामुळे, तेथील इस्लाम पक्का चिनी बनला आहे. भेदांचा विलोप करून समान आकार देण्याची शक्ती हिंदुत्वाने न वाढवल्यामुळे इस्लामला फूट पाडण्यात यश आले. समावेशक संस्कृती प्रभावी करण्यात हिंदुत्व व मुलसमानत्वही यशस्वी झाले नाहीत. भारतीय एकराष्ट्रत्वाला त्याची गरज आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राष्ट्रीयत्वाची संवेदना विकास पावू लागली. भारत हे राष्ट्र आहे, ही कल्पना निर्विवादपणे स्वीकारूनच राष्ट्रीयत्वाची जाणीव फैलावू लागली. या जाणिवेची पार्श्वभूमी ब्रिटिश राज्य व नवशिक्षित यांनी रचण्यास सुरुवात

केली. अनेक देश, अनेक धर्म, अनेक भाषा, चालीरीती व राज्ये यांनी विच्छिन्न, विस्कळीत झालेल्या व डबघाईस आलेल्या भारतावर सर्वंकष, सार्वभौम ब्रिटिश सत्ता राज्य करू लागल्यामुळे, भारताच्या एकतेचा आकार प्रकट झाला. ब्रिटिश मध्यवर्ती सत्ता केंद्रीभूत व जबरदस्त असल्यामुळेच हा एक आकार प्रकट झाला. अनेक स्वयंपूर्ण राज्यांवर परोक्षपणे व परंपरेने अंमल गाजविणारी ब्रिटिश राज्यपद्धती नसती तर असा एकाकार आला नसता. सर्व राजकीय व्यवहार एकाच मध्यवर्ती केंद्राच्या भोवती जबरदस्त रीतीने जखडले गेले होते. मुलकी व फौजदारी कायदेसंस्था समान रूपाने संघटित केली होती. कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान मानल्या जाऊ लागल्या. धार्मिक संप्रदाय, चालीरीतींचे भेद आणि खासगी जीवन याबाबतीत हस्तक्षेप न करणारे हे शासनतंत्र झाल्यामुळे, त्या शासनतंत्राला कोठेही अडथळा उत्पन्न झाला नाही. हेच परकीय शासनतंत्र, त्यात बदल होऊन ते लोकानुवर्ती होईल अशा भरभक्कम आशेने, येथील नवशिक्षितांनी राष्ट्रीय चळवळीस प्रारंभ केला. त्यामुळे त्यांनी ध्येय म्हणून भावलेले स्वराज्याचे स्वरूपही भारतव्यापीच होते. अनेक स्वराज्ये व त्यांची अनेक राष्ट्रे ही कल्पनाच ब्रिटिश राज्याच्या एकत्वाच्या संदर्भात निर्माण होऊ शकली नाही.

भारतीय एकराष्ट्रीयत्वाच्या या पार्श्वभूमीत ब्रिटिश केंद्रवर्ती सत्तेबरोबर निर्माण होत गेलेली नवी भांडवलशाही अर्थव्यवस्था हा महत्त्वाचा घटक मानला पाहिजे. ब्रिटिश अमदानीत झालेल्या आर्थिक क्रांतीचा उत्कृष्ट अभ्यास अनेक भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी केला आहे. हजारो वर्षे दृढमूल झालेल्या अर्थव्यवस्थेत क्रांती होऊन भारतव्यापी नवी अर्थव्यवस्था निर्माण झाली. या अर्थव्यवस्थेने भारताच्या एकतेला दृढ केले. ग्रामसंस्थेतील स्वयंपूर्ण उत्पादन, विनिमय व विभाजन असे त्या जुन्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप होते. त्याच्याऐवजी राष्ट्राच्या बाजाराला मध्यवर्ती स्थान आले. शेतीचे उत्पादन हे या राष्ट्राचे उत्पादन होय. त्याच्या आधारावरच ग्रामसंस्थेतील उदीम व व्यवस्था चालत असत. त्या उत्पादनाला गावाच्या बाहेर मार्ग फुटले. आधुनिक वाहतुकीची साधने आणि परदेशातून येणारा माल यांनी एतद्देशीय, पुरातन अर्थव्यवस्था नष्ट केली व त्या जागी राष्ट्रीय आर्थिक व्यवहार निर्माण झाला.

नवी राज्यव्यवस्था व नवे आर्थिक व्यवहार यांच्याबरोबरच आधुनिक शिक्षण या देशात सुरू झाले. नव्या शिक्षितांना पाश्चात्त्य संस्कृतीतील व्यापक मानवी मूल्यांचा साक्षात्कार होऊन येथील जीवनपद्धतीच्या जीर्णतेचे दर्शन झाले व नवजीवनाची घडण करण्याची आकांक्षा उत्पन्न झाली. येथील नव्या धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास हे या आकांक्षांचे प्रतीक होय. आधुनिक, पाश्चात्त्य शिक्षण देणारी जी विद्यालये व विद्यापीठे काढली, त्यांना सरकारी नोकर तयार करणारे कारखाने म्हणून जरी राष्ट्रीय चळवळीत म्हटले जात होते, तरी त्या पाश्चात्त्य शिक्षणामुळेच राष्ट्रीय चळवळीची प्रेरणा निर्माण झाली व डबघाईस व जीर्णावस्थेस आलेल्या, अगतिक झालेल्या समाज शरीराच्या कायापालटाची, धार्मिक व

सामाजिक चळवळ निर्माण करणारी विशाल दृष्टी प्राप्त झाली. सुसंस्कृत जीवन लाभलेला व येथेच जीवनसाफल्य होईल अशी आशा बाळगणारा सर्वसामान्य नागरिक हीच आधुनिक राष्ट्राच्या अस्तित्वाची खूण होय. असे राष्ट्र भारतात अजून अस्तित्वात यावयाचे आहे. त्या राष्ट्राच्या निर्मितीचे प्रयत्न म्हणजेच धार्मिक व सामाजिक सुधारणेची चळवळ होय.

धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीचा प्रारंभ ब्राह्म समाजाच्या प्रवर्तकांनी सुरू केला. मूर्तिपूजा, लोकभ्रमाचे पोषण करणाऱ्या पुराणकथा, शब्दप्रामाण्य, अवतारवाद, प्रेषितवादावरची श्रद्धा, बाह्य कर्मकांड, परलोकवाद इत्यादी धर्मभेदांना व संप्रदायभेदांना पोषक पण पुढे निरर्थक ठरलेली अशी जुन्या युगाची धार्मिक बंधने तोडून, नैतिक कर्तव्याला, मानवी बंधुत्वाला व ऐहिक प्रपंचाला महत्त्व देणाऱ्या विश्वधर्माची स्थापना हा या धार्मिक चळवळीचा उद्देश होता. सर्वधर्मसमन्वय हे त्याचे सार होते. एकराष्ट्रत्वाच्या मांडणीला हे किती पोषक होते हे विवेकवंतास सांगण्याची गरज नाही. सामाजिक चळवळीचेही धोरण याच उद्देशाला पोषक होते. स्त्री शिक्षण, स्त्रियांच्या हक्कांची समानता, जातिभेद निरसन, अस्पृश्यतानिवारण, बालविवाह निषेध, विधवा विवाह, अंतरजातीविवाह इत्यादी सामाजिक सुधारणा समान हक्कांच्या नागरिकत्वाची घडण करणाऱ्या आहेत, हे स्पष्ट आहे.

## आध्यात्मिक राष्ट्रवाद

धर्मसुधारणेची चळवळ मंदावली व मागे पडली, सामाजिक सुधारणेच्या चळवळीला दुय्यम स्थान आले व राजकीय चळवळ महत्त्वास चढू लागली, हे एकराष्ट्रीयत्वाच्या प्रक्रियेतील दुसरे पर्व होय. हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म हीच या पर्वाची सुरुवात होय. विश्वधर्माची व समाजसुधारणेची चळवळ करणाऱ्या सुशिक्षित विचारवंतांनीच यात प्रथम पुढाकार घेतला. राजा राममोहन रॉय यांच्या वैचारिक प्रवृत्तीला पुढे नेणारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी काँग्रेसमधील प्रागतिक राजकारणाची तात्त्विक बैठक निर्माण केली. त्यांचा सर्वांगीण दृष्टिकोन थोड्याच काळात मागे पडून लोकमान्य टिळकांच्या हाती राजकीय चळवळीचे धुरीणत्व आले. केवळ राजकीय स्वातंत्र्याला महत्त्व देण्याकरिता परंपरागत संस्कृतीच्या अभिमानाचा आधार घेऊन, ही राजकीय विचारसरणी पसरू लागली हे सनातनी राष्ट्रीय राजकारण थोडक्याच काळात महत्त्वास पावले. आर्थिक विचारसरणीचा भागही त्यात महत्त्वाचा होता. दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे इत्यादिकांनी भारताच्या दारिद्र्याची मीमांसा करणारा भारतीय अर्थशास्त्रविषयक दृष्टिकोन मांडला. ब्रिटिश राज्यामुळे पुरातन उद्योग निवारले गेले. तसेच हिंदुस्थान परदेशी पक्क्या मालाच्या उठावाची बाजारपेठ बनला. त्यामुळे दारिद्र्य पराकाष्ठेला पोहोचले. या विचाराने परदेशी राज्याविरुद्ध असलेली भावना अत्यंत तीव्र होत गेली. ब्रिटिश राज्याखालील भारताची आर्थिक मीमांसा हा हिंदी राष्ट्रीय विचाराचा महत्त्वाचा भाग बनला.

राजकीय चळवळीने प्रथम महायुद्धोत्तर काळात सार्वजनिक असंतोषाचे स्वरूप धारण केले. या असंतोषाला प्राचीन परंपरेच्या अभिमानाने सातत्य लाभले. या अभिमानाच्या पोषणाचे कार्य आध्यात्मिक राष्ट्रवादाने पूर्वीच सुरू केले होते. या आध्यात्मिक राष्ट्रवादाची प्रथम मांडणी बंगालमध्ये झाली. वंगभंगाच्या चळवळीच्या प्रसंगाने उत्पन्न झालेल्या असंतोषाला तात्त्विक व आध्यात्मिक बैठक देण्यात आली. राष्ट्रीय भावना हा ईश्वरीय अवतार आहे, शक्तिदेवीचे व्यक्त रूप आहे, असे उद्‌गार योगी बाबू अरविंद घोष यांनी 'वंदे मातरम्'मध्ये काढले. ''प्रत्येक राष्ट्राला एक स्वतंत्र वैशिष्ट्य असते, या काही ऐतिहासिकांच्या सिद्धांताप्रमाणे जगाला आध्यात्मिक संदेश पोचवण्याकरिता अवतरला आहे. परमेश्वरी शक्तीने भारलेले हे राष्ट्र आहे, आत्मसाक्षात्काराचे जीवन व्यतीत कसे करावे याचा आदर्श मनुष्य जातीपुढे ठेवणे हे भारताचे कार्य आहे. पाश्चात्त्यांची संस्कृती भौतिक असून भारतीय संस्कृती आध्यात्मिक आहे. जगाच्या आत्मोद्धाराचे कार्य भारताला करावयाचे आहे.'' अशा प्रकारचे विचार विवेकानंद, अरविंद घोष इत्यादिकांनी मेघगर्जनेने प्रकट केले. या मानसिक पार्श्वभूमीवर महात्मा गांधींचे व्यक्तिमत्त्व व राजकारण सर्वात उठावदार रीतीने पुढे आले; त्यामुळे परकीय राज्याला विरोध करणारी चळवळ देशव्यापी बनली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात 'चले जाव'ची चळवळ हे या चळवळीचे शिखरास पोचलेले रूप होय.

भारतीय राजकारणाला आलेले हे धार्मिक किंवा अध्यात्मवादी स्वरूप शुद्ध निधर्मी व ऐहिक राहिले नाही. याचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे मुसलमानांच्या सवत्या सुभ्याचे राजकारण होय. आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर यांनी आपल्या 'आधुनिक भारत' या पुस्तकात या आध्यात्मिक राष्ट्रवादास उचलून धरले आहे. जगाला हा संदेश पोचण्यापूर्वी तो जनतेच्या जीवनात प्रत्यक्षात येणे हे अगोदर आवश्यक आहे. राष्ट्रीय वैशिष्ट्य हे राष्ट्रीय जीवनात मूर्तिमंत दिसले तरच ते राष्ट्रीय वैशिष्ट्य ठरते. उच्चनीच भाव, अज्ञान, जातीयता, करंटेपणा आणि अन्नान्नदशा ही अवलक्षणे जोपर्यंत आहेत, तोपर्यंत अध्यात्मवादाचे आदर्श जगविणारी भूमी भारतराष्ट्र आहे, ही कल्पित कथाच ठरेल! नाहीतर ही अवलक्षणे अध्यात्मवादाची चिन्हे मानण्याचा प्रसंग येईल! स्वत: निरोगी असल्यानेच दुसऱ्याला निरोगीपणाचा धडा देणे अधिक योग्य होय.

## भाषावार प्रांतरचनेची आवश्यकता

भारताच्या राष्ट्रीयत्वाचे नवे पर्व संघराज्याच्या स्थापनेपासून सुरू झाले. लोकांची किंवा नागरिकांची राष्ट्रीय राज्यावर जाणीवपूर्ण निष्ठा प्रकट होऊ लागली म्हणजे राष्ट्र ही अवस्था उत्पन्न होते, असे आधुनिक राज्यशास्त्राचे मत आहे. हिंदी राष्ट्रीयतेचे प्रश्न फार गुंतागुंतीचे आहेत. भारताला जे स्वराज्य मिळाले त्याची पार्श्वभूमी राष्ट्रीय चळवळीत तपासणे जरूर

आहे. शुद्ध लोकशाही हक्कांच्या मागणीवर ही चळवळ प्रामुख्याने उभारली गेली नव्हती, ती परकीय राज्याच्या द्वेषावर उभारली होती. जातिभेद, धर्मभेद व प्रांतभेद यांना समाविष्ट करणारे हे संघराज्य आहे. लोकशाही घटना टिकवून धरणारा सामाजिक व सांस्कृतिक पाया या संघराज्यास नाही.

लोकशाही राज्याचा सांगाडा येथे उभारला गेला आहे; परंतु येथील सांस्कृतिक जीवन लोकशाहीस सुसंगत असे नाही. दैनंदिन जीवनात जातिभेदाच्या व धर्मभेदाच्या भावनांची निरंतर जाणीव देणाऱ्या रूढींची व आचारांची बंधने नागरिकांच्या कौटुंबिक जीवनाला समरसता येऊ देत नाहीत.

भाषाभेदांनी भिन्न असलेले प्रांत हे युरोपातील एकेका राष्ट्राएवढे मोठे आहे. ते केंद्रवर्ती सत्तेच्या नियंत्रणाखाली जरी असले तरी त्यांचा राजकीय व्यवहार आणि कारभार दीर्घकालापर्यंत निर्दोष व सुरळीत चालणे अशक्य आहे. अवांतर राजकीय क्षेत्रांना मजबूत करणारी राज्यपद्धतीच एवढ्या मोठ्या विशाल देशावरील मध्यवर्ती सत्ता टिकवून धरू शकेल. फेडरेशनच्या तत्त्वांची कसून अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. डॉ. ए. आर. देसाई यांनी आपल्या ग्रंथात भारतातील विविध राष्ट्रे व विविध अल्पसंख्याक जमाती यांच्या प्रश्नांचे विवेचन करताना भाषिक प्रांत ही राष्ट्रे होत, असे म्हटले आहे. भारताचे एकराष्ट्रत्व व प्रांतरूप भिन्न राष्ट्रे या दोन कल्पनांतील विसंगतीचा परिहार करणे हे फार अगत्याचे आहे. आजचे राजकारण ते लोकशाही असो अथवा हुकूमशाही असो, ते जनतेचे राजकारण असते. आजचा हुकूमशहा जनतेच्या सशर्त व सक्रिय पाठिंब्यावर उभा असतो. म्हणून जनतेच्या भाषांना राष्ट्रीय राजकारणात फार महत्त्व असते. म्हणून जनतेच्या पाठिंब्यावर भारताचे राष्ट्रीय राजकारण स्थिर करायचे तर जनतेच्या भाषा सामर्थ्यशाली होतील, त्या जनतेच्या राजकारणाचे व विचारविनिमयाचे प्रभावी साधन बनतील, अशाच तऱ्हेने संघराज्याची मांडणी केली पाहिजे. ज्या राजकारणात जनता नित्य भाग घेणार नाही ते राजकारण विफल होईल, म्हणून राज्यांची भाषावार प्रांतरचना ही लोकनिष्ठ राजकारणाची गरज आहे. जर्मन तत्त्ववेत्ता फिक्टे याने राष्ट्रत्वाचे मुख्य लक्षण भाषा हे सांगितले याचे रहस्य दृष्टिआड करण्याने आत्मवंचनाच पदरात पडेल.

भाषावार प्रांतिक राज्ये अधिक सबळ करण्याकडे भारतीय संघराज्याचे लक्ष नाही. भाषिक प्रांत राज्यांच्या स्वेच्छाप्रेरित सहकार्यावरच भिस्त ठेवून संघराज्याचे राजकीय धोरण आखले जाणे आवश्यक आहे. नाही तर केंद्रवर्ती सत्तेला दिवसेंदिवस जबरदस्तीचे उपाय वापरावे लागतील. जोपर्यंत भारतीय समाजामध्ये समान संस्कृतीचे नागरिक जीवन निर्माण होणार नाही, तोपर्यंत सांस्कृतिक भेदयुक्त भाषिक प्रांतभेद हे संस्कृतिभेदामुळे भारताच्या राष्ट्रीय ऐक्याला भयकारक ठरतील. लोकशाही संस्कृतीची वाढ करण्याचे धोरण एका बाजूला आखले पाहिजे आणि दुसऱ्या बाजूला प्रांतिक राज्यक्षेत्रांची स्वायत्तता दृढ होईल

अशी राज्यपद्धती वापरली पाहिजे. सध्या केंद्रवर्ती सत्ताच सर्व प्रकारची धोरणे ठरवत आहे. त्यामुळे भारतीय राजकारणाचा पाया मजबूत होणार नाही.

जनतेची सहानुभूतीपूर्ण राज्यनिष्ठा हा आधुनिक राष्ट्रसंस्थेचा गाभा आहे. पूर्वी धर्मसंस्थेला जितके महत्त्व होते तितके राज्यसंस्थेला आज आले आहे. साधारणपणे राज्य हे ममताशून्य, रुक्ष, कायदेबाज व भावनाशून्य असते. सत्तेचा गंभीर ताठा त्यात भरलेला असतो. लोकनियुक्त प्रतिनिधी त्यांचे हे स्वरूप मुळापासून बदलू शकत नाहीत. निधर्मी राज्य हे जर लोकजीवनाचे केंद्र झाले तर त्याला नैतिक उदात्त भावना आणि ध्येयवादाचे उज्ज्वल चैतन्य लाभले पाहिजे. कवी, मूर्तिकार, स्थापत्यकार, योद्धा, ईश्वरभक्त, साधू, समाधीची साधना करणारा योगी, विद्येची आराधना करणारा पंडित यांच्यातील जिव्हाळा व आत्मनिष्ठा जेव्हा राज्यकर्त्यात येईल तेव्हाच राज्य हे राष्ट्रीय जीवनाचे केंद्र बनेल. असे राज्य हेच भारतीय एकराष्ट्रीयतेचे मानस्थान बनू शकेल. तेव्हाच भारताची एकराष्ट्रता प्रगल्भ, दृढ व अभय बनेल. आज या एका राष्ट्राची बहुत राष्ट्रे बनण्याची शक्यता फार मोठी आहे. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न निर्भयपणे सोडविला पाहिजे. तो न सोडविल्यास व दाबून ठेवल्यास तो अधिक जिकिरीचा होईल. आज राष्ट्रभेदाची कल्पना त्यात नाही, हे मोठेच सुदैव आहे.

तात्पर्य, लोकराज्य हाच आधुनिक राष्ट्रत्वाचा मध्यबिंदू आहे. हा मध्यबिंदू सर्व नागरिकांना सुसंस्कृत व स्वास्थ्यपूर्ण जीवनाचा समान पुरवठा करणारा बनला तरच एकराष्ट्रत्व अक्षत्, निर्भय व प्रगल्भ स्वरूपास पात्र होईल. सुधारलेला नागरिक वर्गच असे राष्ट्रत्व निर्माण करील. असा नागरिक उत्पन्न होण्यास समाजसुधारणा व धर्मसुधारणा यांची आवश्यकता आहे.

**(पूर्वप्रसिद्धी - नवभारत, जून १९५३, पृ. १ ते १०)**

ooo

३०

# भारताचा इतिहास आणि इतिहास तत्त्व

प्राचीन कालापासून वर्तमान कालापर्यंतच्या भारतेतिहासाची विविध कालखंडांत विभागणी करून, एका व्यापक व सर्वव्यापी संगतीत रचना कशी करावी, हा अजून न सुटलेला प्रश्न आहे. युरोपचा किंवा पाश्चात्त्यांचा अशा प्रकारचा सुसंगत इतिहास विविध प्रकारे मांडला गेलेला आहे; व तो न सुटलेला प्रश्न आहे, असे कोणही म्हणत नाही. अधिक चांगला कालविभाग व अधिक योग्य संगतितत्त्व कोणते, या बाबतीत तेवढे मतभेद, पश्चिमेच्या इतिहासाच्या बाबतीत इतिहास तत्त्ववेत्त्यांत आढळतात. परंतु भारताची गोष्ट तशी नाही. उदाहरणार्थ, युरोपच्या इतिहासाची सुप्रसिद्ध कालविभागणी सामान्यपणे निर्विवाद म्हणून मान्य झाली आहे. युरोपच्या इतिहासात प्राचीन युग, मध्ययुग व आधुनिक युग कोणते याच्या ढोबळ मर्यादा आणि सात येणाऱ्या प्रमुख घटना विशेष वादग्रस्त नाहीत; या युगाच्या कल्पनांचा विशिष्ट अर्थही पुष्कळसा निश्चित आहे. तसे भारतेतिहासाचे नाही.

भारताच्या इतिहासाची कालविभागणी व त्या कालाची सामान्य संगती ठरविण्यापूर्वी इतिहास संशोधक इतिहासातील घटनांचा शोध करीत असतात, हे आपणास माहीत आहे. कोणती गोष्ट कोठे, केव्हा व कशी घडली, हे शोधून निश्चित करणे; हे त्याचे पहिले काम आहे. काल्पनिक किंवा दंतकथेने सांगितलेले कोणते व खरोखर घडलेले कोणते, हे तपासणेही या प्राथमिक कामात येते. व्यास, ख्रिस्त किंवा बुद्ध या पौराणिक कथेत कल्पिलेल्या व्यक्ती आहेत किंवा खरोखर केव्हातरी जिवंत व्यक्ती होत्या, याचा छडा लावणे प्राथमिक कामात अंतर्भूत होत असते. व्यक्ती, संस्था, राज्ये, युद्धे, लोखंडादी धातूंचा उपयोग करण्याचा यशस्वी प्रयत्न, शेतीची स्थापना, नौकानयनाचा प्रारंभ, वाफेचा किंवा विजेचा शोध इत्यादी घटना केंव्हा, कुठे कशा रीतीने अस्तित्वात आल्या याची नोंद करणे अशा गोष्टी प्राथमिक कामाचा विषय होय. यास तथ्ये (Facts) गोळा करणे, असे म्हणता येईल, ही इतिहास रचनेची पूर्वतयारी होय. या पूर्वतयारीत किंवा पूर्व प्रक्रियेत ज्या गोष्टी तपासावयाच्या, त्यांत प्राचीन

युग, मध्ययुग, अर्वाचीन युग या ऐतिहासिक गोष्टींचा अंतर्भाव मुळीच होत नाही. मध्ययुग म्हणून काही ख्रिस्त, बुद्ध यांच्यासारखी व्यक्तिरूप किंवा राज्य, युद्ध इत्यादी संस्थारूप किंवा शेती, वाफेचे यंत्र उभारणे, धातु गाळण्याची क्रिया यांच्यासारखी कलारूप तथ्ये (Facts) नाहीत. ती इतिहाससंशोधकाने शोधावयाच्या तथ्यांच्या समुदायातली घटना नव्हे. ते एक शास्त्रीय चिंतनाने निश्चित होणारे बौद्धिक प्रमेय (Pinciple) आहे. पाषाणयुग, ब्रांझयुग, ताम्रयुग, लोहयुग, बाष्पयुग ही युगेसुद्धा अशीच बौद्धिक प्रमेये होत. ही काही उत्खननांत, लेखात, वस्तुसंग्रहात वा कागदपत्रात शोधून सापडणारी तथ्ये नव्हेत. ती एक प्रकारची तत्त्वे आहेत. पाषाणाचा हत्यार म्हणून खासगी व सामाजिक जीवनात मनुष्य सरसहा उपयोग केव्हा करू लागला. तेव्हा त्याच्या जीवनाची परिस्थिती व आकार निराळ्या प्रकारचा झाला. ब्रान्झ, लोखंड इ. धातूंच्या हत्यारांचा उपयोग करू लागल्यावर मानवी जीवनात सर्वांगीण स्थित्यंतर धडले. हीच गोष्ट बाष्पयुगालाही लागू आहे. पाषाणयुग या कल्पनेच्या सदर्शत शिकार, आत्मरक्षणाची व लढ्याची रीती, आहाराचे स्वरूप, घर, गाव, शेती इत्यादिकांची पद्धती यांचाच अतर्भाव होत नसून धर्मविधी, पारलौकिक कल्पना, पुराण कथा, काव्य, समाजसंघटन इत्यादी सामाजिक संस्था व मानसिक व्यापार यांचीही संगती अंतर्भूत होते. पोलादी तलवार व धनुष्यबाण निर्माण करणाऱ्या समाजसंस्थेतील घटनांची लोखंडयुग या एका सूचक कल्पनेने अर्थपूर्ण व वैशिष्ट्यसंपन्न संगती ध्यानात भरते. जीवनातील जयपराजय सुख दु:खे, आशानिराशा, कलात्मक आविष्कार, वैभव व दैन्य इत्यादिकांचा अभिप्रायच या निराळ्या प्रकारच्या संगतीत सापडतो. हे अनेक घटनांचे वा तथ्यांचे सामान्य आणि विशेष तत्त्वाच्या सूत्रात कथन करणाऱ्या बौद्धिक चिंतनाचे फळ असते. असे बौद्धिक चिंतन सफल होण्यावरच इतिहासरचना अवलंबून असते. ही बौद्धिक चिंतनाची प्रक्रिया इतिहासरचनेत आवश्यक असलेली उच्चार मानसिक क्रिया होय. या प्रक्रियेस उत्तर प्रक्रिया असे म्हणता येईल. ऐतिहासिक तथ्यांची किंवा घटनांची संशोधनपूर्वक मांडणी ही पूर्वप्रक्रिया होय, हे वर सांगितलेच आहे. तथ्यांच्या व घटनांची विशिष्ट देशांचे व कालाचे अनुसाधन ठेवून विशेष व सामान्य तत्त्वांच्यामध्ये विभाजन व वर्गीकरण करणे ही उत्तर प्रक्रिया होय. या दोन प्रक्रिया संपूर्ण झाल्या म्हणजे इतिहास रचता येतो. इतिहास म्हणजे केवळ घटनांची जंत्री नव्हे. सतत बदलणाऱ्या मानवी जीवनाचा तो भावार्थ आहे. अव्यक्त शास्त्रीय तत्त्वज्ञान मांडणीत विशुद्ध बौद्धिक ज्ञानाचा जसा लाभ होतो आणि एखादे महाकाव्य, विशाल स्थापत्य किंवा नैसर्गिक देखावा यांच्या अनुभवाने तसा भावुक, व विस्मयपूर्ण आनंदाचा लाभ इतिहासरचनेत होतो. ज्ञानाचा व कलेचा इतिहासरचना हा एक भव्य संगम आहे. अव्यक्त तत्त्वे आणि व्यक्त तथ्ये यांचा देशकालाच्या पार्श्वभूमीत घडविलेला समन्वय (Synthesis) म्हणजे इतिहास होय. इतिहासात जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे उपनिषद भरलेले असते व मानवी बंधमुक्तीच्या संग्रामाचे महाकाव्य समावलेले असते. इतिहास हा विश्वरूप दर्शन करून देत असतो.

संस्कृतीचे, राष्ट्रांचे व समाजांचे किंवा वाङ्मयाचे, शास्त्रांचे व कलांचे अथवा विवाह, धर्म इत्यादी संस्थांचे इतिहास रचणे हे आधुनिक युगाचे वैशिष्ट्य होय. वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या प्रक्रियांचा अवलंब करून इतिहास रचण्याची पद्धती ही आधुनिक युगातच प्रचारात आली. पूर्वी इतिहास लिहिण्याचे प्रयत्न झाले आहेत; परंतु शास्त्रीय इतिहास लिहिण्याची पद्धती त्या काळी अवलंबिली गेली नव्हती. सर्व मानवी इतिहासाची अथवा विविध प्राचीन व अर्वाचीन समाजांची प्रचंड ऐतिहासिक सामग्री आधुनिक युगानेच मोठ्या साक्षेपाने, फार मेहनत घेऊन गोळा केली. इतिहासाचे इतके महत्त्व जुन्या जगाला माहीत नव्हते. संग्रहित झालेली ही प्रचंड ऐतिहासिक साधने व त्यांच्या आधारावर रचलेले इतिहास ध्यानात घेऊन इतिहासाचे तत्त्वज्ञान नामक नवीन विद्या अस्तित्वात आली आहे. या तत्त्वज्ञानाच्या आधाराने विश्वेतिहासही रचण्याचे प्रयत्न झाले आहेत. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाने समाजाचे किंवा संस्कृतीचे इतिहास कसे घडतात आणि मानव जातीचा इतिहास कसा घडत असतो, यासंबंधी अनेक तत्त्वविचार सांगितले आहेत. त्यांतील दोन तीन मूलभूत तत्त्वांचा परामर्श घेतल्याशिवाय भारतेतिहासाच्या रचनेचा प्रश्न कसा सोडवावा, हे नीट समजणार नाही.

या तत्त्वांपैकी प्रगतिवाद (Theory of Progress) एक अत्यंत महत्वाचे तत्त्व होय. प्रगतिवाद म्हणजे मानवी इतिहासातील समग्र घटनांची परिणति, पायरी पायरीनें, मानवी प्रगति करण्यांत होत असते, निसर्गाच्या नियमाप्रमाणेच प्रगती करणे हा मानवी इतिहासशक्तीचा अबाधित नियम आहे, अशा तत्त्वावर आधारलेली मानवी इतिहासाची उपपत्ती होय. आजपर्यंत सापडलेल्या मानवी इतिहासाच्या सामग्रीवरून साधारणपणे असा निर्णय करता येतो की, मनुष्य जातीने आद्यावस्थेपासून आताच्या स्थितीपर्यंत विश्वाच्या शक्ती स्वाधीन करून घेण्यात आणि व्यक्तीचे व समुदायांचे सामर्थ्य संपादन करण्यात, क्रमाने, उन्नती-अवनतीच्या चक्रनेमिक्रमाची पर्वा न करतां, प्रगती केली आहे. यावरून प्रगती करणे हा इतिहासशक्तीचा अबाधित नियम आहे, या निर्णयाला एकोणिसाव्या शतकातील इतिहासवादी पोचले. हा नियम प्रत्येक संस्कृतीच्या किंवा राष्ट्राच्या इतिहासाला पृथकपणे लागू पडत नाही. विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रगती झाल्यावर काही प्राचीन संस्कृती वा प्राचीन राष्ट्रे, प्रगती थांबून नष्ट झाली आहेत. सुमेर, खाल्डया, क्रीट, इजिप्त, ग्रीक, अरब, इराण यांचा नाश झाला आहे. काही प्राचीन संस्कृतींची व राष्ट्रांची प्रगती अनेक सहस्र वर्षे एकाच पातळीवर स्थगित झाली आहे; उदाहरणार्थ, चीन व हिंदुस्थान होय. काही समाज रानटी अवस्थेतून कधीच बाहेर पडले नाहीत; उदाहरणार्थ, गोंड, भिल्ल, आस्ट्रेलियातील व आफ्रिकेतील आदिवासी हे होत. म्हणून असे म्हणता येते की, इतिहासातील प्रगतिवादाची कल्पना भूमध्य समुद्र व युरोप येथील अतिप्राचीन काळापासून उत्पन्न होऊन नष्ट झालेल्या विविध राष्ट्रांच्या इतिहासाची कालक्रमाने संगती लावून निष्पन्न झालेले तत्त्व आहे.

सुमेरनंतर खाल्डिया, इजिप्त व क्रीट ही राष्ट्रे झाली; त्यांच्या विनाशकालांत ग्रीस उदयास आले; ग्रीकांच्या अवनतीच्या व विनाशाच्या कालांत रोमचा उत्कर्ष झाला; रोमच्या अध:पातानंतर मध्ययुगीन युरोपचा जन्म झाला; त्यानंतर नव्या पाश्चात्त्य संस्कृतीचा विकास सुरू झाला. एका मानव समाजाकडून दुसऱ्या मानव समाजाकडे सांस्कृतिक वारसा जाऊन ही प्रगती झाली आहे. येथे तोच विशिष्ट मानव समाज प्रगतीच्या सर्व युगांचा वारसदार झाला आहे, असे दाखविता येत नाही. म्हणून प्रगतिवाद है अत्यंत अव्यक्त तत्त्व आहे; असे म्हणावे लागते. हे तत्त्व भविष्यकाळीही अवधित राहील असा भरंवसा सांगता येत नाही. क्रमविकासाच्या ऐवजी चक्रनेमिक्रमाचेही तत्त्व हिंदुस्थानसारख्या राष्ट्राच्या इतिहासांत सांपडते. उन्नती होऊन पुनः अवनति सुरू होते; प्रत्येक पोळीची उन्नती किंवा भरभराट पूर्वीच्यापेक्षा अगदी निराळ्या प्रकारची असते, असे म्हणता येत नाही. विकासक्रम खंडित होऊन पडलेला दिसतो. गुप्तांचा व भोजांचा विकास एकाच प्रकारचा दिसतो. म्हणजे अधिक उच्चतर पायरीला प्रगती गेलेली दिसत नाही चीनचा इतिहास एकाच पातळीत दीर्घकाळ स्थिरावलेला दिसतो. हीच गोष्ट जपानच्या प्राचीन इतिहासाची आहे. म्हणून असेही म्हणता येते की, भविष्यकाळी मानवी समाज अगतिक होऊन एकाच पातळीत स्थिरावेल किंवा राहाट गाडग्याच्या चक्रात खालीवर गोते खात राहील किंवा असेही म्हणता येईल की अनेक प्राचीन संस्कृती जशा नष्टचर्येत अगतिक होऊन सापडल्या, त्याप्रमाणे यापुढे मानवजात नष्टचर्येला बळी पडेल. तात्पर्य, प्रगतीचा नियम अबाधित आहे, असे निर्णयात्मक विधान मांडता येत नाही.

भारताचा इतिहास तपासत असताना प्रगतिवादाचा वरील विमर्श ध्यानात घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे इतिहासातील युगक्रमाच्या कल्पनेचा उपयोग भारताच्या संबंधात करताना एक प्रकारची सावधगिरी बाळगली पाहिजे. एका राष्ट्रातील युगाचे विशिष्ट कालखंडात जे लक्षण असेल, तेच लक्षण त्या कालखंडातील दुसऱ्या राष्ट्रांना लागू पडेल असा नियम नाही. युरोपातील अंधार युग हे इतर अनेक राष्ट्रांचे प्रकाशाचे व प्रकर्षाचे युग आहे, असे दाखवता येते. युरोपात जेव्हा अंधार होता, तेव्हाच इस्लामचा सूर्य मध्यपूर्वेत प्रकाशू लागला; तेंव्हाच कनोजचे साम्राज्य उदार व विशाल सांस्कृतिक जीवनाच्या प्रकर्षाला पोचत होते आणि तेंव्हाच चीनमध्ये कविता प्रतिभेच्या प्रभेने चीनला उजळत होती. एकाच कालखंडात भिन्न राष्ट्रात भिन्न प्रकारच्या ऐतिहासिक युगांचा प्रभाव पडलेला असतो.

भारताच्या इतिहासाची मांडणी करीत असताना ध्यानात घेण्यासारखी सर्वात महत्वाची गोष्ट अशी की युरोपच्या इतिहासातील प्राचीन, मध्य व आधुनिक अशा युगत्रयाची कल्पना व तिची लक्षणे भारताच्या इतिहास रचनेला प्रशस्तपणे व सम्यक रीतीने लागू पडणार नाही. भारताच्या इतिहासात युरोपच्या प्राचीन युगातील अर्थोत्पादनपद्धती सापडत नाही. ज्यांच्या देहावर मालकाची सत्ता आहे व ज्यांचे धन हे मालकाचेच धन आहे अशा गुलामांच्या

श्रमावर आधारलेली उत्पादन पद्धती हा प्राचीन युगाच्या आर्थिक पद्धतीचा युरोपातील पाया होय. प्राचीन हिंदुस्थानातील अर्थोत्पादनाचा मुख्य आधार गुलामांचे श्रम नव्हते, तर शूद्रांचे श्रम होते. शूद्र हे स्वतंत्र होते; त्यांच्या धनावर व देहावर त्यांची स्वत:ची मालची होती, एकत्र कुटुंबपद्धती हिंदुस्थानच्या प्राचीन युगात अस्तित्वात आली; तशी कुटुंबव्यवस्था युरोपच्या इतिहासातील कोणत्याच काळात सापडत नाही. हिंदुस्थान सारखी ग्रामव्यवस्था ही युरोपाच्या इतिहासात आढळत नाही.

युरोपच्या इतिहासात प्राचीन युग संपून मध्य युग सुरू होते, तेव्हा युरोपियन समाजात संपूर्ण बदल झाले दृष्टीस पडतो. आर्थिक, राजकीय व धार्मिक संस्थांना संपूर्ण नवा आकार प्राप्त होतो. ख्रिश्चन धर्मसंस्था किंवा ख्रिश्चन पुरोहितांची संस्था ही समाजसंस्थेची अत्यंत संघटित केंद्रभूत संस्था बनते वैयक्तिक व सामाजिक जीवनावर धर्मसंस्थेचा अंमल सुरु होतो ऐहिक राजसत्ता व पारलौकिक धर्मसंस्था यांच्यात स्पर्धा सुरू असते परंतु सामाजिक जीवनक्रमावर धर्मगुरुंचाच प्रभाव मुख्यतः राहतो. इसवी सनाच्या पाचव्या शतकापासून चौदाव्या शतकाच्या अंतापर्यंत सुमारे एक सहस्त्र वर्षे हा युरोपचा मध्ययुगाचा कालखंड होय, पुरोहित सत्तेचा प्रभाव हे त्याचे मुख्य गमक आहे. ही पुरोहित सत्ता म्हणजेच ख्रिश्चन धर्माची सत्ता होय. परलोकवादी विचारसरणी या कालखंडात, जन्मापासून मृत्युपर्यंत, मार्गदर्शन करीत होती. रोमन सम्राटाने ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली व सेंट ऑगस्टिनने ‘‘देवाचे नगर’’ हा ग्रंथ लिहिला; या क्षणापासून मध्य युगाचा खराखुरा प्रारंभ झाला; पोप ग्रेगरी दि ग्रेट याच्या अभिषेकाने मध्ययुगाची ध्वजा फडकविली. अशी सर्व जीवनक्रमावर अंमलबजावणी करणारी संघटित व सत्ताधारी पुरोहित संस्था हिंदुस्थानात कधीच भरभराटीस आली नाही. विशेषत: राजसत्तेइतकी देहदंड करण्याची सत्ता हाती बाळगण्याची कल्पनाही येथील पुरोहित संस्थेला कधीही शिवली नाही. ब्राम्हण जातीलव धार्मिक दृष्टीने समाजात सर्वोच्च स्थान अत्यंत प्राचीन काळापासून लाभले आहे. परंतु ब्राह्मण जातीला पोपसत्तेसारखे राजकीय सामर्थ्य कधीच लाभले नाही. प्राचीन युग व मध्ययुग असे दोन स्पष्ट क्रमिक विभाग इतिहासात पाडण्यासारखी पुरोहितांची धर्मसंस्थेची कामगिरी भारतीय इतिहासात सापडत नाही. जातिसंस्था ही ब्राह्मणशासित किंवा पुरोहितशासित संस्था नव्हे. ती हजारों वर्षांच्या काळात हळूहळू स्थिर व बळकट बनत गेलेली संस्था आहे. ती धर्मसंस्थेने निर्मिलेली नाही तिला धर्माचा पाठिंबा मिळाला एवढेच म्हणता येते.

युरोपच्या मध्ययुगाचे, सरंजामदारी (राजकीय व आर्थिक) पद्धती, हे एक महत्त्वाचे लक्षण आहे. सरंजामदारीत भूदास हा मुख्य उत्पादक वर्ग होय. सरंजामदारांच्या पिढ्यानपिढ्या ताब्यात असलेल्या, जमीनीवर मालकी हक्क नसलेला व सक्तीने शेत कसणारा वर्ग म्हणजे भूदासांचा वर्ग होय. हा असा भूदासांचा वर्ग व त्याच्यावर स्वामित्व गाजविणारा सरंजामदार मालकांचा वर्ग अशी समाजरचना भारताच्या इतिहासात दिसत नाही.

परलोकवादी विचारसरणी व त्या विचारसरणीने नियंत्रित असलेला जीवितक्रम हे मध्ययुगाचे एक प्रमुख लक्षण होय, असे म्हणता येते. मध्ययुगातील मनुष्य या पृथ्वीवरील जीवित, दुख:मय पापाचा शाप लागलेले व धक्क्यांनी भरलेले आहे, असे मानत होता. या जीवितापेक्षा श्रेष्ठ पारलौकिक जीविताची कल्पनाच त्याला अत्यंत आकर्षक वाटत होती. पारलौकिक मोक्ष हाच त्याच्या आयुष्याच मुख्य उद्देश होता. ऐहिक जीवित सुखमय व शुद्ध बनवण्याची कल्पना त्याला स्पर्श करीत नव्हती. परंतु हा परलोकवाद केवळ मध्ययुगाचेच लक्षण आहे, असे म्हणता येत नाही. युरोपच्या आणि हिंदुस्थानच्या प्राचीन युगातही पारलौकिकवादाचा प्रभाव होताच. प्लेटो हा इंद्रियजन्य जगाला मायात्मक समजत होता. इंद्रियजन्य जगापेक्षा श्रेष्ठ असे पारमार्थिक जीवन उपनिषदांनी प्रतिपादिले आहे. बुद्ध या विश्वास क्षणभंगुर व दुःखमय समजत होता. भगवद्गीतेमध्येही हे विश्व दुःखालय व अशाश्वत आहे. त्यामुळे मध्ययुगाची व्याप्ती प्लेटो, बुद्ध, उपनिषदे व भगवद्गीता यांच्यापर्यंत नेऊन पोहोचवावी लागेल. काही विद्वान, महाराष्ट्रीय संताच्या काळात मध्ययुग अशी संज्ञा देतात. याचे कारण संतांची पारमार्थिक किंवा पारलौकिक विचारसरणी होय. परंतु पारलौकिक विचारसरणी हे मध्ययुगाचे लक्षण नव्हें, हे ते लक्षात घेत नाहीत.

युरोपातील मध्ययुगीन धर्म प्रशासक व संत यांच्यात पारलौकिक विचारसरणीपेक्षा दुसरे कसलेही साम्य नाही. युरोपातील मध्ययुगीन धर्मप्रकाशकांच्या ताब्यात युरोपची एक चतुर्थांश जमीनदरी होती, मठाचे प्रचंड वैभव होते, निग्रहानुग्रहाची सत्ता होती, देहदंड व धनदंड करण्याचे अधिकार होते. संत हे पुरोहित नव्हते, त्यांना जमीनदारी मठ नव्हते, ते धार्मिक उत्पन्नावर कसलाही हक्क सांगत नव्हते. महार, चांभार, कुंभार, माळी, कोष्टी, शिंपी, सोनार, न्हावी, सुतार इत्यादी उदमी लोकांतूनही संत निर्माण झाले होते. संत सर्वसामान्यपणे गृहस्थाश्रमी होते. धर्मपीठाचा विशिष्ट अधिकार, धर्मग्रंथाचे कडवे शब्द प्रमाणे इत्यादी ख्रिश्चन पुरोहित संस्थेसारखी लक्षणे संतांच्या धर्मसंस्थेत सापडत नाहीत. शुद्ध ईश्वरभक्ती व व्यापक नीती धर्म हेच संतांच्या उपदेशाचे सार आहे. धार्मिक मानवतावाद असे त्यांचे स्वरूप आहे. हा धार्मिक मानवतावाद युरोपच्या मध्ययुगाच्या अंतानंतर युरोपात प्रकट झाला आहे. संतांच्या धार्मिक चळवळीशी युरोपच्या मध्ययुगीन धर्म चळवळीचे या यत्किंचितही साम्य नाही. तात्पर्य असे की, युरोपच्या मध्ययुगासारखे मध्ययुग आशिया खंडातील कोणत्याच मोठ्या देशाच्या इतिहासात दाखविता येत नाही.

भारताच्या इतिहासाची रचना प्राचीन, मध्य व आधुनिक अशा युगत्रयाच्या कल्पनेच्या अनुसाराने करण्याची पद्धती पाश्चात्य व भारतीय इतिहासकारांनी अवलंबिली आहे; ती अनेक दृष्टींनी सदोष आहे. भारताचे प्राचीन युग कोणते व मध्ययुग कोणते, यासंबंधी कालमर्यादा ठरविण्यात ऐक्यमत्य मुळीच सापडत नाही. हजार-बाराशे वर्षांची तफावत पडलेली आढळते. इतके मतवैचित्र्य असण्याचे कारण हेच मानले पाहिजे की,

युरोपच्या इतिहासाचा भारताच्या इतिहासाला लागू पडत नाही. परंतु त्या साचाची छाप इतिहासकारांच्या मनावर इतकी पडली की भारताचा इतिहास त्या त्या साच्यात बसविण्याचा प्रयत्न करणे योग्य आहे की नाही अशी शंका ही कोणाच्या मनात आली नाही. वस्तुतः साच्यांचा अभ्यास करण्याच्या अगोदर वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे, या नियमास इतिहास-चिंतनात प्राथम्य द्यावयास पाहिजे, या तर्कशास्त्राची चांगली जाणीव न राहिल्यामुळेच भारताच्या इतिहासामध्ये युगविषयक मोठी विसंगती इतिहासकारांनी निर्माण केली आहे. उदाहरणार्थ, रामचंद्र दत्तांचा प्राचीन भारतेतिहास, भारताचा केंब्रि ज इतिहास, व्हिन्सेंट स्मिथने लिहिलेला इतिहास, श्री चिंतामणराव वैद्य यांनी लिहिलेला मध्ययुगीन भारत श्री. आर. सी. मुजुमदार यांनी लिहिलेला इतिहास, पं. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचा 'चरित्रकोश', भारतीय विद्याभवनकडून प्रकाशित झालेला 'भारतेतिहास' या सर्वांची तुलना करीत असता ही विसंगती एकदम मनात भरते. रमेशचंद्र दत्त व मुजुमदार यांचे प्राचीन युग मुसलमानांच्या आक्रमणापाशी संपते. केंब्रिज इतिहासाप्रमाणे प्राचीन भारताच्या इतिहासापर्यंतची मर्यादा इसवी सनाच्या पहिल्या शतकापर्यंतच पोचते. पं. चित्रावशास्त्री यांचा 'प्राचीन चरित्रकोश' मौर्यपूर्वकालापर्यंतच येऊन पोचतो. व्हिसेंट स्मिथ इसवी सन सातव्या शतकापर्यंत प्राचीन इतिहास आणून भिडवतो, व भारताचार्य चिंतामणराव वैद्य मध्ययुगीन भारतास इसवी सनाच्या सातव्या शतकापासूनच सुरुवात करतात. आर. सी. मुजुमदार यांचे मध्ययुग हिंदु राज्यांच्या अधःपतनापासून सुरू होते व बाबरपर्यंत येऊन समाप्त होते. मोंगल साम्राज्यापासूनच आधुनिक युगास मुजुमदार प्रारंभ करतात. पं. चित्रावशास्त्री यांचे आधुनिक युग पेशव्यांच्या अंतापासूनच सुरू होते. एकंदरीत मुद्दा असा की, भारतेतिहासाचे प्राचीन युग कोणते व आधुनिक युग कोणते यासंबंधी इतिहासवेत्त्यांच्यामध्ये ढोबळ स्वरूपातही एकमत नाही. त्याचप्रमाणे त्यांनी भारतेतिहासाच्या संदर्भात प्राचीन युग, मध्ययुग व अर्वाचीन युग यांची व्यावर्तक लक्षणेही ठरविण्यास उपयुक्त अशी विस्तृत चर्चा केली नाही. आमचे म्हणणे असे आहे की, युरोपच्या इतिहासावरून घेतलेला हा युगत्रयाचा साचा भारताच्या इतिहासाला लागू करता येत नाही.

तात्पर्य असे की, युगत्रयाच्या तीन संज्ञांच्या मुळाशी युरोपच्या इतिहासात जी लक्षणे सापडतात ती भारतेतिहासात त्या सुस्पष्ट, व्यवस्थित व क्रमिक स्वरूपात मुळीच सापडत नाहीत. भिन्न अभिप्रायाने युगत्रय कल्पनेचा उपयोग करणे सोई होत असेल तर करावा, परंतु त्यामुळे सोय न होता अव्यवस्थितपणा वा गोंधळ उत्पन्न होतो. म्हणून भारतेतिहासकारांचे पहिले कर्तव्य असे आहे की, त्या त्या विशिष्ट कालखंडाची सामान्य, व्यवस्थित व व्यक्त गमके निश्चित केली पाहिजेत. त्याकरिता भारतेतिहासाची अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संस्कृती मीमांसा व समाजरचनाशास्त्र यांच्या आश्रयाने तत्त्वमीमांसा करणे अगत्याचे आहे नाही. पुढील संकलित खंडे मात्र तशी आहे. पहिल्या खंडाचे नाव वैदिक युग आहे. व त्या अत्यंत

अर्थपूर्णही आहे. पुढील खंडात साम्राज्यमूलक ऐक्य, गुप्तकालीन प्रगल्भतेचे युग, कनोज साम्राज्ययोग युग, साम्राज्यार्थ विवाह, दिल्लीतील सुलताना मोगल साम्राज्य, मराठा वर्चस्व, ब्रिटिश अधिपथ्य आणि १९१८ पासून चा भारत, असा अनुक्रम आहे. राजकीय स्थित्यंतरांच्या अनुरोधाने संग्रहित केलेला हा इतिहास त्या स्थित्यंतरांच्या योगाने भारतीय जीवनाचे सर्वांगीण स्थित्यंतर विशद करणारा भारतीय इतिहास मांडणे हे फार कठीण काम आहे. कारण युरोपप्रमाणे भारतीय संस्कृती समाजात अत्यंत मोगलगामी व पूर्वपरंपरेला समाधी देऊन, उच्चतर विलक्षण जीवन क्रमात सुरुवात करणारी क्रांतिकारक स्थित्यतरे प्रकट व निर्विवाद स्वरूपात शोधून काढणे दुर्घट आहे. परंपरेला पूर्ण रजा देऊन नवीनतम परिस्थितीस प्रसवणारी समाज प्रकृती भारतात नाही, असे म्हणावे लागते. इथे जुने संबंध शिल्लक राहून नवे तयार होतात. क्रांतिकारक परिस्थिती निर्माण होते; परंतु त्या क्रांतीच्या शेजारी परंपरागत व्यवस्थापन चिवट रीतीने तग धरून स्थिरावलेली दिसते. मूलगामी बदल करणारे अनेक प्रसंग भारती इतिहासात सापडतात; परंतु त्यांचे सर्वगामी परिणाम दृग्गोचर होत आहेत.

अशा मूलगामी परिवर्तन करण्यास प्रवृत्त होणाऱ्या प्रसंगाची अवस्था हीच भारतीय इतिहासाचे युगांतर होय. अशा प्रकारची युगांतरे राजकीय स्वरूपाचीच असतील, असे नाही. वैदिक यग ही संज्ञा सर्वांगीण प्रकल्प संस्कृतीचा प्रभाव याचे दर्शक आहे. त्याचप्रमाणे बौद्धकाल ही संज्ञा सर्वांगीण परिवर्तनाची सूचक असून धार्मिक परिवर्तन हे त्याचे मुख्य लक्षण आहे. अशी युगांतरदर्शक लक्षणे शोधून भारतीय इतिहासाची पुन्हा रचना करण्याची गरज आहे. त्यात अडचणी पुष्कळ आहेत. इतिहासरचनेस आवश्यक असलेली घटनांची माहिती पुष्कळ संग्रहित झाली आहे. त्या माहितीच्या आधारे तत्त्वचिंतनात्मक प्रक्रिया मात्र अजून चांगल्या प्रगल्भावस्थेत आलेली नाही. भारतीय इतिहासाच्या तात्त्विक भूमिकेची विस्तृत मांडणी झाल्यावरच भारताच्या सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाचे इतिहासाची रचना होऊ शकेल.

(भारतेतिहास संशोधक मंडळ, पुणे, या संस्थेच्या वर्ष दिनाच्या निमित्ताने १२ जुलै १९५३ ला दिलेल्या व्याख्याचे सार.)

**(अलका, दीपावली अंक, १९४९, पृ. ७ ते ११.)**

○○○

३१

# विकेंद्रित लोकशाही

ग्रामपंचायत ही लोकशाही संस्था आहे. या संस्थेला प्रत्येक गावात जितके महत्त्व द्यावयास पाहिजे, तितके दिले जात नाही. खऱ्याखुऱ्या लोकशाहीचे ग्रामपंचायत प्रारंभिक स्थान आहे. हे जितके दुबळे राहील तितकी आपल्या राष्ट्राची लोकशाही ही दुबळी राहील. ग्रामपंचायत असमर्थ आहे, म्हणून आपल्या राष्ट्राची लोकशाही असमर्थ आहे. एक एक कणीस भरभराटीस आले, तरच सर्व शेत भरभराटीस आले असे आपण म्हणतो. खुरट्या वृक्षाचे तनही खुरटेच राहते. ग्रामपंचायतीचा अधिकारही फार थोडे आहेत; कारण ग्रामसंस्था अतिशय मागासलेली आहे. ग्रामसंस्थेची प्रगती ग्रामपंचायत जितक्या प्रमाणात करील तितक्या प्रमाणांत ग्रामपंचायतीचे अधिकारही वादातीत व ती सर्वाधिकारसंपन्नही बनेल. त्याकरितां मतदाराचा अधिकार म्हणजे लायकी वाढली पाहिजे. विचार व कर्तव्यदक्ष मतदार हाच लायक मतदार; अशा मतदारांची सुंदर वसाहत ज्या गांवांत असते त्या गांवातील ग्रामपंचायत समर्थ बनेल. अशा समर्थ बनलेल्या ग्रामपंचायतीची संस्था मोठी बनल्यावर ग्रामपंचायतीचे राजकीय अधिकार वाढतील.

ग्रामपंचायत हे ग्रामराज्याचें सरकार बनले पाहिजे आणि गावें ही ग्रामराज्य बनली पाहिजेत, हें आपल्या भारताच्या लोकशाहीचे एक मुख्य ध्येय आहे. भारतीय लोकशाहीचा आरसा म्हणजे ग्रामराज्य, असे ज्या दिवशी आपणास दाखविता येईल, त्या दिवशी भारताची लोकशाही ही खरीखुरी व समर्थ लोकशाही झाली, असे म्हणता येईल.

## दोन प्रकारची राज्यरचना

राज्याची रचना ही दोन पद्धतीने होत असते. त्यापैकी पहिली पद्धत अधिक प्रसिद्ध आहे. ही पद्धत उंच मनोरा, पिरॅमिड किंवा यंत्र जसें असतें तशी असते. एकएक भाग पाहून मनोरा पिरॅमिड किंवा यंत्र यांची जशी कल्पना येत नाही, त्याप्रमाणे एकएक गांव पाहिले

तर सर्वच राज्याची कल्पना येत नाही. राज्य हे मध्यवर्ती सत्तेंत केंद्रित होऊन गेलेले असतें. कायदेमंडळ, नोकरशाही व सहकारी संघटना या संस्थेच्या द्वारांच या पहिल्या प्रकारच्या राज्याचे दर्शन होते. अशा राज्यांत खरीखुरी सत्ता लोकांच्या हातात राहत नसते. ती थोड्या लोकांच्या हातातच एकवटलेली असते. गाव, तालुके, जिल्हे आणि प्रांत हे अशा राज्याचे भाग बनलेले असतात; परंतु त्यांना राज्याचे खरेखुरे सामर्थ्य लाभत नाही. दुसरी राज्यसंघटनेची पद्धती म्हणजे एका मोठ्या राज्याच्या आत सामावलेली लहान लहान राज्ये ही होय. या पद्धतीप्रमाणें राज्याच्या पोटांत राज्य सांपडते. या दुसऱ्या पद्धतीप्रमाणे राजकीय सत्ता खऱ्याखुऱ्या अर्थाने लोकांच्यामध्ये सदासर्वदा राहते. सर्वच लोक राज्य चालविण्यांत भाग घेतात.

## केंद्रीभूत सत्तेचे स्वरूप

पहिल्या पद्धतीप्रमाणे सत्ता थोड्या राज्यकर्त्यांच्या हातात केंद्रित होते, त्यामुळें राज्याची खरीखुरी जबाबदारी थोड्या लोकांवर येऊन पडते. याला मध्यवर्ती प्रबळ सत्तेचे राज्य असें म्हणतात किंवा सत्तेचे केंद्रीकरण असे म्हणतात. या मध्यवर्ती केंद्रीभूत सत्तेत दोष असले किंवा उत्पन्न झाले तर त्याचा उपसर्ग राष्ट्राला बांधतो.

मध्यवर्ती सत्तेचा जर पराभव झाला तर त्या पराभावाची बाधा सगळ्या गावांना आणि नागरिकांना भोवते. सर्वच त्यात पराभूत होतात. कारण राज्याचे घटक असलेले गाव, तालुके, जिल्हे व प्रांत एकापरीने मध्यवर्ती केंद्रीभूत सत्तेवर अवलंबून असतात. विजेचा पुरवठा करणारे शहराचे विद्युत् केंद्र धोक्यांत आले की जसे सर्व शहर अंधारात पडते त्याप्रमाणें केंद्रभूत मध्यवर्ती सत्तेला धोका पोहोचल्याबरोबर सगळे घटक धोक्यात सापडतात. या पहिल्या पद्धतीत घटक हे पराधीन असतात. त्यामुळे घटक हे निर्मळ राहतात.

मध्यवर्ती राज्यसरकारांत काही दोष उत्पन्न झाले तरी ग्रामराज्यें समर्थ असल्यास राष्ट्राचा फार मोठ्या प्रमाणांत बचाव होतो. मध्यवर्ती राज्याचे सरकार बदलून नवें सरकार बनविण्याची शक्ती राष्ट्रात राहते. गांवची वेस ढासळली तरी गांवातल्या इमारती शाबूत राहतात, त्याप्रमाणें देश शाबूत राहतो. शक्तीने एक केंद्रस्थान बिघडले तरी दुसरी अगणित शक्तीकेंद्र हानी सहज भरून काढतात. म्हणून विकेंद्रीत सत्तेचे राजकारण हेंच खरीखुरी लोकशाही उत्पन्न करू शकते. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, याचा अर्थ जनतेनें म्हणजे सर्व नागरिकांनी सत्ता वापरणे होय. सर्व नागरिकांनी सत्ता वापरून राज्य चालविणें यालाच प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात, अशी प्रत्यक्ष लोकशाही ग्रामराज्यांतच नांदू शकते. आज जगात किंवा भारतांत जी लोकशाही आहे, ती प्रत्यक्ष लोकशाही नाही. प्रत्यक्ष नागरिकास राज्य चालविण्यास आपण जबाबदार आहे असे वाटत नाही. त्याकरिता ग्राम राज्याची स्थापना करणे हे आवश्यक आहे.

## अप्रत्यक्ष लोकशाही

आज निवडून दिलेले प्रतिनिधी व प्रतिनिधींनी निवडून दिलेले मंत्रिमंडळ यांच्यावरच राज्याची जबाबदारी आहे. सर्वसामान्य नागरिक जबाबदारीपासून वेगळा राहिला आहे. तो राज्यसंबंधी उदासीन आहे. ही अप्रत्यक्ष लोकशाही आहे. या लोकशाहीत सामर्थसंपन्न स्वतंत्र नागरिक निर्माण होऊं शकत नाही. नागरिक व्यक्तीशः दुबळा आहे. निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या व कायदेमंडळाच्या हाती राज्यसत्ता समर्पित करून मोकळा होऊन तो झोपी गेलेला आहे. म्हणून ही खंबीर लोकशाही आहे, असें म्हणता येत नाही. त्यामुळें लोकशाही स्वातंत्र्य नेहमी धोक्यांतच राहते.

## प्रत्यक्ष लोकशाही म्हणजेच ग्रामराज्य

दारिद्री, अज्ञानी व मागासलेले लोक ज्या देशांत अधिक संख्येने राहतात त्या देशात लोकशाही म्हणजे केवळ बाहेरचा देखावा ठरतो, कारण अशा स्थितीत लोकांना राज्याची आस्था नसते. बहुमतांत असलेले पक्ष सत्ता बळकावून बसतात व लोक सत्तेच्या राजकारणांतील त्या त्या पक्षांच्या हातांतील प्यादी बनतात. या सत्तास्पर्धेच्या राजकारणांतून लोकशाहीला मुक्त करण्याकरिता ग्रामराज्याची स्थापना केली पाहिजे. हीच प्रत्यक्ष लोकशाहीची स्थापना होय. प्रतिनिधीप्रधान लोकशाहीने जनतेचा आत्मोद्धार होऊं शकत नाही, हे आतां कळून चुकलें आहे, म्हणून प्रत्यक्ष लोकशाही निर्माण करण्याची गरज आहे. ही प्रत्यक्ष लोकशाही म्हणजेच ग्रामराज्य. आणि ग्रामपंचायत ही ग्रामराज्याचे सरकार.

## उध्वस्त खेडी

राज्य म्हणजे समाजाची राजकीय संघटना. राजकीय संघटना ही सत्ता चालवणारी संघटना असते. आपल्या देशांतील ग्रामे सत्ता चालविण्यास आज समर्थ नाहीत. कारण गांवाला समाज ही पदवी राहिलेली नाही.

ज्यामध्यें व्यक्ती व कुटुंब यांच्या देहाच्या आणि मनाच्या मूलभूत गरजांचा सतत पुरवठा केला जातो आणि अशी पुरवठा करण्यासाठी योग्य कर्तव्यें सतत ज्या ठिकाणी पाळली जातात असा मानवसमूह म्हणजे समाज होय. आजची ग्रामे एकापरी उध्वस्त झालेली आहेत! समाज या पदवीस ती पात्र राहिली नाहीत! सकस अन्न, भरपूर वस्त्र, स्वच्छ निरोगी घरे व औषध या मूलभूत शारीरिक गरजा होत. शिक्षण व मनोरंजन ही मानसिक गरज होय. याकरितां पुरवठा करणारे उद्योग, उत्पादनाचे व्यवसाय, दवाखाने आणि शिक्षण संस्था यांची नीट व भरपूर तरतूद करणारी गावे फार थोडी आहेत, शिक्षित लोक खेड्यात राहत नाहीत. चांगले कारागीर खेडी सोडून गेले आहेत. उत्तम कलाकारांचा परामर्ष खेडी घेऊ शकत नाहीत. उत्तम कारागीर तेथे जगू शकत नाही. खेडी पडीक बनली आहेत. मळकट व फाटके कपडे नेसणाऱ्या अडाणी व कळकट माणसांचा आसरा म्हणजेच खेडी होत.

धूळ, चिखल, दुर्गंधी, माशा, उंचसखल व खडबडीत रस्ते, पडकी घरे, मोडक्या झोपड्या, हाडकुळी बायकापोरे यांचे दृश्य म्हणजे खेडे होय. खेडे अमंगळ झाले आहे. गावगुंड हा तिथे छत्रपती बनू शकतो, चोर शिरजोर होऊ शकतो. या खेड्यांचा उद्धार केल्याशिवाय राष्ट्राचा उद्धार होणार नाही. खेड्याचे दौर्बल्य म्हणजे राष्ट्राचे दौर्बल्य होय.

## ग्रामपंचायत आणि समाजरचना

आपणांस खेड्यांची अर्थव्यवस्था हाती घेऊनच खरीखुरी समाज संस्था स्थापन करता येईल, असा कार्यक्रम अमलांत आणणारी ग्रामसंस्था म्हणजेच ग्रामराज्य होय. ग्रामराज्याचें मुख म्हणजेच ग्रामपंचायत होय. आपणाला याकरितां नवाच प्रयोग आरंभीला पाहिजे. नुसती ग्रामपंचायत सुधारण्याचा प्रयत्न करून ती सुधारणार नाही. जेथे सत्ता आहे तेथे प्रथम भांडण उपस्थित होण्याचा संभव असतो. म्हणून ग्रामपंचायतीला समाजरचनेचा कार्यक्रम दिला पाहिजे. आज कायद्याप्रमाणें तिला तो कार्यक्रम अमलांत आणता येतो किंवा नाही हा प्रश्न वेगळा आहे. कायद्याने बंदी नसली म्हणजे झालें. स्वेच्छाप्रेरित मोठमोठी कामे करावयास लागणाऱ्या संस्थेचे हात बांधण्याइतके आपले सरकार वेडें नाही.

## सहकारी अर्थव्यवस्थेचे महत्त्व

म्हणून ग्रामपंचायतीच्या द्वारा गांवच्या आर्थिक रचनेचा प्रश्न हाती घेतला पाहिजे. शेती सुधारण्यापासून प्रारंभ केला पाहिजे. सहकारी शेतीचा प्रयोग केला तर शेतीचे उत्पादन वाढेल. गांवांतील उद्योगधंदे दोन कारणास्तव मेले आहेत किंवा डबघाईस आले आहेत. पहिले कारण भांडवलाचा तुटवडा. हे शेतीच उत्पन्न वाढविल्यावर दोन मार्गांनी जमा होऊं लागले. त्यामुळे एक तर गांवांची क्रयशक्ती, म्हणजेच विकत घेण्याची शक्ति वाढेल. दुसरा मार्ग म्हणजे सहकारी बँक. शेतीच्या उत्पन्नाच्या वाढीमुळे सभासद होण्यास लायक असे लोक वाढतील. ग्रामोद्योग नष्ट होण्याचे किंवा डबघाईस येण्याचे दुसरे कारण उद्योगाच्या सुधारलेल्या पद्धतीचे अज्ञान हे होय. हे अज्ञान शिक्षणसंस्थेच्या पुनर्घटनेने नाहीसे करता येईल. सहकारी पद्धतीने कोणी एक व्यक्ती श्रीमंत होत नसली तरी सगळ्या गांवची अवकाळा नाहीशी होईल. सहकारी पद्धति ज्या गांवाला साधेल त्या गांवची नुसती आर्थिक स्थितीच सुधारणार नाही, तर तिथला माणूसच बदलून जाईल. माणसाची नैतिक शक्ती फार विशाल होईल. संस्कृतीचे माहेरघरच ते गाव बनेल. मग त्या गावाकडे नरकाकडे नेणारे सत्तेचें राजकारण फिरकणारसुद्धा नाही. परंतु सहकारी अर्थव्यवस्था उत्पन्न करण्याला उच्च दर्जाची, शीलाची पातळी नागरिकाला लाभावी लागते. जेथे सहकारी संस्था पूर्णपणे भराभराटीस आलेली असते, तेथे शीलसंपदा अनंत आहे, असे खुशाल समजावे.

## शिक्षण खात्याची कसोटी

शिक्षणाची पुनर्घटना ही सहकारी चळवळीच्या इतकीच निगडीची गोष्ट आहे. ज्ञान केवळ ब्राह्मण किंवा सहकारी नोकरी करणाऱ्या लोकांनीच मिळवावे, विद्येची आणि पुस्तकी शिक्षणाची इतरांना आवश्यकता नाही, असे आजपर्यंत बहुजन समाज मानत आला आहे.

म्हणून तो मागासलेला व परतंत्र आहे. कोणतेही सत्कर्म यथासांग घडण्यास विद्या लागते. विद्या आणि कर्म यांची जोडी फोडल्याने पंडित ब्रह्मराक्षस होतात आणि अपंडित मूर्ख होतात, सगळ्या धंद्यांना आणि शेतीला सुद्धा विद्येची गरज आहे. शेतीस विद्येची गरज नाही असे आपण मानत आलो म्हणूनच आपली शेती मागासली, अन्नधान्याचा तुटवडा कायम राहिला, लोक अर्धपोटी राहू लागले. विद्येने धन्य झालेले लोकच देशात धान्याची समृद्धी करतील. म्हणून बौद्धिक शिक्षण आणि ग्रामरचना यांचा सांधा नीट जुळविणे हींच आजच्या भारतीय शिक्षणखात्याची कसोटी होय. शिक्षणाचा कस कमी करणारे किंवा उपेक्षा करणारे शिक्षणतंत्र मात्र उपयोगी नाही. कर्मातून शिक्षण ही कल्पनासुद्धा वाजवीपेक्षा अधिक महत्व दिल्यामुळे खर्चिक न निरर्थक ठरेल. बौद्धिक दर्जा कभी होणार नाही, परंतु आर्थिक कर्तबगारी वाढेल, असा शैक्षणिक प्रयोग सुरू करणे जरूर आहे. कोल्हापूर जिल्हयात अशा प्रकारचा ध्येयवाद असलेली मौनी विद्यापीठ नावाची संस्था निघाली आहे. या संस्थेचे मार्गदर्शन आपल्या ग्रामसंस्थांनी प्राप्त करून घेतले पाहिजे.

आपल्या ग्रामराज्याची उभारणी करण्याचे उत्कृष्ट साधन म्हणून ग्रामपंचायतीचा उपयोग आपणास करावयाचा आहे. (१) सहकारी अर्थव्यवस्था (२) विद्या व उद्योगांची सांगड घालणारी शिक्षणपद्धती आणि (३) प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग. या तीन कार्यक्रमांनी ग्रामराज्याची उभारणी करता येईल. असे ग्रामराज्य हाच खराखुरा लोकशाहीचा बालेकिल्ला ठरेल व त्या राज्याच्या नागरिक लोकशाही स्वातंत्र्याचे रक्षण करणारा वीर बनेल. अशा ग्रामराज्यांच्या राष्ट्रव्यापी संघटनेला टिकून पराभूत करील, असा शत्रू जन्माला येण्याची शक्यताच नाही.

**(उत्तर सातारा जिल्हा ग्रामपंचायत परिषद अध्यक्षीय भाषण,**
**प्रकाशन- साप्ताहिक साधना, पुणे, शनिवार, १६ जानेवारी, १९५४ पृ. ३,१०.)**

OOO

३२

# मराठवाडा विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ हवे

*(मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद यांच्या वतीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १ ऑक्टोबर १९५४ रोजी दिल्ली येथे पार पडलेल्या ३७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याबद्दल ७ नोव्हेंबर १९५४ रोजी सरस्वती भुवन हायस्कूल, औरंगाबादच्या सभागृहात सत्कार करण्यात आला. त्याला उत्तर देणारे हे भाषण.)*

लोकशाहीच्या युगात मराठी भाषेचे भवितव्य उज्ज्वल आहे याविषयी माझ्या मनात मुळीच शंका नाही. एखादी भाषा केवळ राजाश्रयामुळे वाढते हे मला तितकेसे पटत नाही. स्वागतारंभी जे मराठी गीत गायिले गेले त्यातील आशयावर त्यांनी टीका केली. मराठी साहित्य जेव्हा साहित्य म्हणून पुढे आले तेव्हा राजाश्रय कोठे होता? ज्या संतांनी मराठी समृद्ध केली तेव्हा त्यांना कोणी आश्रय दिला? अमृताशी पैज जिंकणाऱ्या अभिनिवेशाने ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका लिहिली, अशी धमक त्यांच्यात होती. तीच गोष्ट तुकारामांची किंवा त्यानंतर इतिहासाचार्य राजवाड्यांची. याउलट इंग्रजी अमदानीत पाश्चात्त्य शास्त्राचे भांडार खुले झाले असताना त्याचा उपयोग मराठी साहित्यिकांनी करून घेतला नाही. ज्यांनी तसा प्रयोग केला त्याची संभावना या आंग्ल विद्याविभूषितांनी 'भाषांतरे' अशी केली. लठ्ठ पगार व सर्व सोयी अनुकूल असूनसुद्धा टेक्स्टस् पुस्तकांच्या 'कीज' आणि गाईडस् यापलीकडे त्यांची मजल गेली नाही. क्वचित कोणी प्रयत्न केला तर ललित लेखकांनी या ग्रंथाची भाषा बोजड की अवजड म्हणून त्याला उपेक्षिले. शास्त्रीय ज्ञान सुरुवातीच्या काळात असेच असावयाचे. मेंदूला शीण दिल्याशिवाय शास्त्र समजणार कसे? तेव्हा केवळ राजाश्रयावर भाषेची प्रगती होते अशी समजूत करून घेण्यात अर्थ नाही.

संयुक्त महाराष्ट्र होणार आहे यात शंका नाही. दिल्लीत काय होते याकडे लक्ष देण्यापेक्षा तुमच्या हृदयात संयुक्त महाराष्ट्र कितपत वसलेला आहे, त्यासाठी आम्ही काय करणार

आहोत यावर तो अवलंबून आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा हा खरा आदि महाराष्ट्र आहे. मराठवाडा महाराष्ट्रात येण्याने पुणे, मुंबईकरांकडून मराठवाड्याला काही मिळणार नसून त्याचा सन्मान या कारणाने होणार आहे. गोदावरीच्या तटाकी भारताची आद्य संस्कृती पोसली आणि वाढली. सप्तसिंधूच्या काठी जेथे वेद निर्माण झाले त्या वेदाचे सिद्धांत कोठे दिसत नाहीत. गोदावरी तीरी मात्र आजही आपणास ते जतन करीत असलेले दिसते. पंचवीस-तीस वर्षांनंतर अशी परिस्थिती कदाचित राहणार नाही हे मी मान्य करतो. मराठवाडा मागासला म्हणून सुधारलेल्या भागाबरोबर त्यांनी जावयाचे ठरविले असे जेव्हा मराठवाड्याचे एक नेते गोविंदभाई यांनी मराठवाड्याच्या निवेदनाविषयी सांगितले तेव्हा मला या गोष्टीचा अभिमान वाटला. समाजशास्त्राच्या दृष्टीने सुद्धा ही फार चांगली घटना घडली. सुधारलेल्या पाश्चात्त्य राष्ट्रांशी संबंध ठेवल्यामुळे जशी आम्ही प्रगती केली तशीच प्रगती यामुळे या भागाची होणार आहे. तसेच महाराष्ट्रालासुद्धा मराठवाड्यापासून पुष्कळ शिकता येईल. आपल्या महाराष्ट्रात ब्राह्मणेतरांची चळवळ अशीच सुरू झाली. सुधारलेल्या जातीबरोबर जाण्याची ईर्ष्या धरणे, स्पर्धा करणे ही चांगली गोष्ट आहे. साथीदार पुढे जात असेल तर त्याच्या हाताला हिसका देऊनही मला बरोबर घेऊन चाल असे सांगणे मुळीच वाईट नाही. मी महात्मा फुल्यांचा अनुयायी आहे. कारण त्यांची दृष्टी विशाल मानवतावादी होती. मागासलेल्या जमातींना रूढी व अंधश्रद्धेतून मुक्त करून जागृत करण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. मराठवाडा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असेल; पण येथल्या लोकांत जुन्या लोकांचा खानदानीपणा आहे, घरंदाजपणा आहे; आणि म्हणून औदार्य आहे. संकुचित दृष्टिकोन सोडून काही अटी न ठेवता त्यांनी जेव्हा संयुक्त महाराष्ट्रात येण्याचा निर्णय घेतला त्यात ही दृष्टी दिसते. हजारो वर्षांच्या जुन्या संस्कृतीच्या वारशामुळे ही दृष्टी त्यांना मिळाली आहे. कार्ल मार्क्सला घरंदाजपणाविषयी फार आदर असे. औद्योगिक क्रांतीच्या आधी प्रबोधन काळात ज्या खानदानी व्यक्तींनी कलेच्या क्षेत्रात फार मोठी कामगिरी पार पाडली त्यांची त्याने फार तारीफ केली. 'काय ती माणसे होती' असे तो म्हणे. येथे आल्यानंतर नेमकी तीच गोष्ट दिसते. औरंगाबादच्या परिसरात या जुन्या संस्कृतीच्या खाणाखुणा स्पष्ट दिसतात. तिचे उच्छवास ऐकू येतात. या संस्कृतीच्या वाढीसाठी मराठवाड्याला नवे विद्यापीठ असले पाहिजे असे मला स्पष्टपणे वाटते. वेरूळ आणि अजिंठा येथल्या कलेत भारताने नंतर भर टाकली नाही. तिची वाढ केली नाही. ते आम्ही साध्य केले पाहिजे. येथली फुले आणि फळे अवर्णनीय आहेत. मी आजच तुमच्या कॉलेजच्या मागे असलेल्या निजामसाहेबांच्या बागेत जाऊन आलो. मला पुणे किंवा कलकत्ता येथील बॉटनिकल गार्डनची आठवण आली. निजामसाहेबांकडून तुम्ही ही बाग देणगी म्हणून घेतली पाहिजे. वेरूळ आणि अजिंठ्यामुळे तर औरंगाबाद स्थापत्य आणि चित्रकला शिकण्याचे आद्यविद्यापीठ बनायला हवे. येथेच या कलांची वाढ होऊ शकेल. कारण या जुन्या संस्कृतीच्या उच्छवासाचे साहचर्य तुम्हास

येथेच मिळू शकेल, दुसरीकडे नाही. मागे काय झाले याचा शोक करण्यात अर्थ नाही. भवितव्याचा आधी विचार केला पाहिजे. या जमान्यात पुण्याला बुद्धिमान किंवा मुंबईला अर्थस्थान इत्यादींचे केंद्रीकरण करून चालणार नाही. बुद्धी, अर्थ आणि सांस्कृतिक परंपरा यांचा संगम येथल्या विद्यापीठात व्हायला पाहिजे.

कवी व साहित्यकारांनी शास्त्रज्ञ बनले पाहिजे. मार्क्स हा कवी होता; पण त्याला जेव्हा शास्त्रज्ञाची दृष्टी आली तेव्हा 'कॅपिटल' सारखा अद्वितीय ग्रंथ त्याच्या हातून निर्माण झाला. अनुभूतीशी प्रामाणिक राहिले पाहिजे, हे ठीक आहे; पण ही अनुभूती शास्त्राच्या प्रकाशात तपासून घेता आली पाहिजे आणि म्हणून अनुभूती आणि शास्त्रीय ज्ञान यांचे अन्योन्य संबंध आहेत. आजच्या युगात नुसत्या कल्पना अन् प्रतिमा उपयोगी पडणाऱ्या नाहीत. मी असे सांगितले की, मंडळी माझ्यावर रागावतात. प्रामाणिक अनुभूती आणि शास्त्रीय ज्ञानाची कसोटी यांच्या अभेद्य समन्वयातूनच उत्तम साहित्य निपजू शकेल असे मला वाटते. विरक्त अशा श्रमण किंवा संन्याशाला अत्यंत सौंदर्यपूर्ण अशा गुहा जुन्या राजे लोकांनी करून दिल्या. यात आमच्या भारतीय संस्कृतीचे मोठे मर्म साठविलेले आहे. भौतिक सौंदर्याच्या परिसरात आत्म्याचे स्वातंत्र्य या मर्मामध्ये आपणास दिसून येते. 'रामायण' किंवा 'महाभारता'तील पुरुषोत्तमाच्या दिव्य पराक्रमाच्या कथा आपल्याला काय सांगतात? संकटे येतात त्यांच्याशी ते सतत झगडतात. पळून जात नाहीत किंवा सुखासीन म्हणून अध:पतित होत नाहीत.

आपण सर्वांनी आपल्या सत्कारामुळे मला अक्षरश: भारावून टाकले आहे. याबद्दल मी आपला आभारी आहे.

**(पूर्वप्रसिद्धी - अर्ध साप्ताहिक मराठवाडा, हैदराबाद,**
**रविवार, दि. १४ नोव्हेंबर, १९५४)**

ooo

३३

# भारतीय नीतिविकास : वेदकालीन नीती

माणसाला जगण्यास अन्न, पाणी, हवा व प्रकाश अशा भौतिक साधनांची जशी अत्यंत आवश्यकता असते तशीच व तितक्याच प्रमाणात नैतिक आचरणाचीहि जरुरी असते. नीती व मानवी जीवन यांचा अभेद्य संबंध आहे. माणसास या जगांत यशस्वी रीतीने जगण्यास भोवतालच्या भौतिक विश्वाशी योग्य रीतीनें तारतम्ययुक्त वर्तन ठेवतां आलें, तरच जीवन सुखकर व सुसह्य होते त्याचप्रमाणे माणसाला सर्व मानवांशी योग्य रीतीने विचारपूर्वक वर्तन करता आलें, तरच जीवितयात्रा चांगल्या रीतीने पार पाडता येते. आपण ज्यांना अनीतिमान, दूर्वतनी, पापी व दुष्ट म्हणता त्यांनासुद्धा सगळयाशी दुष्टाव्याने वागून जगणे अशक्य असते. कारण कोणत्याही माणसात अत्य मानवांचे सहकार्य प्राप्त झाल्याशिवाय मनुष्य या नात्याने या पृथ्वीवर राहता येणे शक्य नाही. भोवतालच्या भौतिक नेत्याशी वागतांना, यांतील चतुरच उपयोग व त्याग करताना अगोदर परिस्थिती व पदार्थ याची योग्य व अयोग्य अशी निवड करावी लागते. त्याचप्रमाणें मानवामधील वर्तनाच्या प्रकारामध्येही हे योग्य व हे अयोग्य अशी निवड बुद्धिद्वारा करणे जरुरी असते. या वर्तनविषयक निवहित विवेक असें म्हणतात. सत् व असत् असा भेद ओळखून त्याप्रमाणे बुद्धीने केलेला योग्य निश्चय म्हणजेच विवेक, वर्तनासंबंधी निर्णय करण्याकरितां विवेकबुद्धीला आरणाची मूल्ये समजावी लागतात. दीर्घकालीन संस्कारांनीच बुद्धीस मूल्यांची पारख करण्याची योग्यता प्राप्त होते. सत् असत् व गुण-दोष ही आचरणाची व्यापक, अतएव अत्यंत सामान्य मूल्ये होत. आचरणाच्या व्यापक मूल्यांसच नैतिक मूल्ये ही संज्ञा आहे.

## व्यापक नीती हे सुसंस्कृतपणाचे लक्षण

दैनिक मूल्ये ज्या समाजास नाहीत असा असंस्कृत वा सुसंस्कृत समान अस्तिस्वात नाहीं. नीतीच्या परिपालनात कसूर होऊं लागली तर समाज डुबघाईस येऊन नष्ट होईल. व्यापक नैतिक मूल्यांचा स्पष्ट साक्षात्कार जेव्हा होतो, त्याच्यायोगाने विवेकबुद्धीस जेव्हा प्रेरणा

मिळते, भाषा व व्यवहार यांत जेव्हां नैतिक तत्त्वाचा जिव्हाळा प्रकट होतो, भाषा त्यामुळें उजळते व व्यवहार पावन होतो, तेव्हां ती भाषा बोलणारा व तशा व्यवहाराने उदात्त व धीर बनलेल्या समाज सुसंस्कृत या पदवीस प्राप्त होतो. व्यापक नीती हेच सुसंस्कृत समाजाचे मुख्य लक्षण होय.

## सज्जनांचे आचारण प्रमाणे

वेदकालीन भारतीय समाजांत या व्यापक नीतीचा उदय झाला होता. व्यापक नीतीमूल्याची प्रत्यय त्या समाजास येऊं लागला होता, याचे प्रत्यंयतर वैदिक वाङ्मय म्हणजे साहित्य ब्राह्मणे उपनिषदे यांत मिळते. माता, पिता, आचार्य, राजा यांच्याबद्दल पूज्यबुद्धि बाळगणे हा नैतिक वर्तनाचा भाग म्हणून इतिहासांतील प्राचीन समाज मानीत होते. परंतु नीति वा सदाचरणाचे नियम हें माता, पिता, आचार्य, राजा, धर्मगुरु इत्यादि पूज्य व्यक्तीपेक्षां वरिष्ठ व स्वतंत्र असतात. सदाचरणाचे नियम हे लहानमोठ्यांना, सर्वांना, बंधनकारक असतात. त्या नियमांचे उल्लघन करणारी व्यक्ति कितीहि मोठी किंवा श्रेष्ठ असली तरी निंद्य ठरते, अशा अर्थाचा विचार वेदांत व्यक्त झाला आहे. हा विचार नैतिक विचाराच्या परिपक्वतेचा दर्शक आहे. स्नातक शिष्य गुरुकुलांतून परतत असतांना गुरूनी त्यास काय सांगावे, याबद्दलचा तपशीलवार विधि तैत्तिरीय उपनिषदांत आला आहे. गुरु शिष्यांस सांगतो : "यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्थानि नो इतराणि - आमची जी सदाचरणे असतील त्यांचाच तूं अवलंब कर. इतरांचा नको." इतके जरी सांगितले तरी पुन्हां दुसरा मुद्दा सदाचरणासंबंधी राहतो. सज्जनांचे वर्तन हे माणसास मार्गदर्शक असते. त्याकरितां गुरु शिष्यास सांगतात की, तुला वर्तनासंबंधी प्रश्न उत्पन्न झाला असता विचारशील, निष्ठावंत वर्तनात दक्ष असे जे असतील ते विवक्षित प्रसंगी असे वर्तन करतील, तसे वर्तन अवश्यमेव करावे. तात्पर्य, सज्जनांचे आचरण उदाहरण म्हणून प्रमाण होय, ही गोष्ट या उपनिषदांत नमूद केली आहे.

## नीतीचा पाया सहानुभूती

परस्परांबद्दल सद्भावना हा सामुदायिक जीवनाचा प्राण आहे. माणसांचे अस्तित्व समुदायावर अवलंबून असते, माणसाचा जन्मच कुटुंबांत होतो. कुलीन हें विशेषण मान्यतादर्शक व महत्त्वसुचक आहे. जन्मतः नैतिक वातावरणांत वाढलेली ही व्यक्ती आहे असे कुलीन हे विशेषण सुचविते. मानवी मूलभूत गरजा कुटुंब, ग्राम, विविध व्यवसाय करणारे वर्ग इत्यादि समुदायानेच भागविता येतात. त्यामुळेंच जीवन पूर्ण होऊ शकते, म्हणून परस्परांबद्दल सहानुभूती, समानभावना वा अंतःकरणाची समानता हे मूलभूत नैतिक तत्त्व आहे. ऋग्वेदांच्या अखेरीस आलेल्या समाप्तिसूक्तांत अंतःकरणाच्या समानतेची अत्यंत उत्कंठतेने मागणी केलेली आहे. ती अशी... "माणसांनो, पूर्वीचे देव आपआपला भाग समानबुद्धीनें जसे स्वीकारतात, त्याप्रमाणें तुम्ही समान मनाचे बना. एकोप्याने रहा. परस्परांत

मेळ असेल असें भाषण करा. तुमची सलामसलत एक, समिति एक, मन एक असूंद्या या संकल्प समान, हृदयें समान व मन समान रहावे. त्यामुळे तुमचे सहअस्तित्व सुंदर बनेल.'' [ऋग्वेद १०.१९१ ] वैदिक भाषेत मनाची मिळणी म्हणजे संज्ञान, सौमनस्य, किंवा सामनस्य होय. अथर्ववेद व यजुर्वेद यांत संज्ञान मुक्ते अनेक आली आहेत. यजुर्वेदाच्या मैत्रायणी संहितेत सहानुभूतीचें व्यापक क्षेत्र सांगतांना म्हटले आहे की, 'संज्ञान स्वैम्यः संज्ञानमरमेम्याः' स्वकीय व परके या सर्वात सहानुभूती रहावी, असा या ओळीचा अर्थ आहे. आमचे अश्व या पशु यांच्याशीहि आमची मनाची मिळणी असावी. [मै. संहिता. २, २. ६० ] याच संहितेत मनाच्या मिळणीबरोबर तदर्थ दानबुद्धि असावी असाहि निर्देश केला आहे. यथानः सर्व इज्जनः संगत्यां सुमना असद्दानकामश्च नो भुक्तं'' [मै. संहिता. १. ११.१४].

## पंचमहायज्ञांचा अर्थ

कौटुंबिक भावनांचा परिपोष व्हावा, सामाजिक संबंध उदात्त भावनांनी दृढ व्हावें, याकरितां माता, पिता, आचार्य, अतिथि यांच्यासंबंधी पूज्यबुद्धि बाळगावी, अशा प्रकारच्या आज्ञा वेदांत सांगितल्या आहेत. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव, अतिथिदेवो भव, असा तैत्तिरीय उपनिषदांत स्नातकाला आचार्यानें आदेश दिला आहे. पंचमहायज्ञ हें गृहस्थाचे नित्य कर्तव्य होय, या शतपथब्राह्मणांतील विधानाने व्यापक सहानुभूति व विश्वव्यापी पूज्यभावना या या पवित्र भावना आहेत ही गोष्ट सिद्ध होते. पंचमहायज्ञविधानाने, नैतिक भावनेचे व श्रद्धेचे क्षेत्र विश्वव्यापी केलें आहे. देव, ऋषी, पितर, मनुष्य व प्राणिमात्र यांच्याकरिता सदबुद्धि पूर्वक त्याग, नित्य करावा आणि त्यांच्या बद्दल पावित्र्याची भावना असावी असा पंचमहायज्ञांचा भाव आहे. विश्व हें देवांची देणगी आहे, विद्या हा ऋषींनी माणसांना दिलेला शाश्वत विधी आहे, कुटुंबसंस्थेचे सातत्य हें पितरांच्या यत्नाचे साफल्य आहे. प्राणिमात्रांच्या सहवास ही या विश्वांतील अस्तित्वाच्या अविभाज्य भाग आहे. पूज्यबुद्धी, कृतज्ञता व दया या भावनांना परिपोष करणे हे पंचमहायंज्ञाचे उद्दिष्ट आहे.

आश्रमसंस्था देखील वेदांनी एका नैतिक जाणिवेच्या किंवा नैतिक जबाबदारीच्या कल्पनेवर आधारलेली आहे. आश्रमधर्माचा आधार श्रम, ही मूलभूत कल्पना यजुर्वेदांत सांगितले आहे. ती अशी: मनुष्य हा तीन ऋणांसह जन्मतो- ऋषिऋण, देवऋण व पितृऋण, चवथे मनुष्यऋणही एका ठिकाणी सांगितले आहे. ब्रह्मचार्याने म्हणजे विद्याभ्यासाच्या प्रताने ऋषिऋण, यज्ञानें देवऋण व विवाहाने पितृऋण फिटते. चवथे मनुष्यऋण दानांने फिटते.

## नीतिकल्पनांचा ऐहिक आधार

वेदांतील नीतिकल्पना माणसाच्या ऐहिक जीवितयात्रेच्या साफल्याकरितां सांगितल्या आहेत. त्या केवळ पारमार्थिक निवृत्तिमार्गी कल्पना नाहीत. वैदिक प्रार्थनांचा भर ऐहिक समृद्धीवर आहे. त्यात इहप्रधान नैतिकभावना व्यक्त होतात. या दृष्टीने यजुर्वेदांतील एक

प्रार्थना उदाहरणादाखल लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती अशी, "सर्वत्र ब्राह्मण हा ब्रह्मतेजानें संपन्न व्हावा, राष्ट्रांत सर्वत्र क्षत्रिय शूर, शस्त्रकर्मनिपुण आणि निरोगी असावा, घोडे चपल, बैल पुष्ट व स्त्री गृहाचा भार वाइण्यास समर्थ व्हावी. यज्ञ करणाऱ्याचा तरुण पुत्र हा सभ्य बनाया. पर्जन्य मनाप्रमाणे पढाया, सर्वत्र धान्यसमृद्धी व्हावी." व्यावहारिक नीतिविचारास अनुसरून ऋग्वेदांतील अक्षयसूक्त लक्षांत घेण्यासारखे आहे. त्ताचे दुष्परिणाम त्यांत काव्यपूर्ण रीतीने सांगितले आहेत. तेथे असे म्हटले आहे: "घूताचे फासे हातास थंडगार लागतात. परंतु चुकीचे पडले म्हणजे हृदयाचा जाळतात. ते खाली पडल्यासारखे दिसतात, परंतु मानगुटीस बसलेले असतात. त्यांना दात नाहीत परंतु हात असलेल्यांशी लहान त्यांचा ते पराभव करतात. सकाळी उमद्या घोड्याच्या गाडीतून ऐटीत निघणारा माणूस द्यूत खेळून झाल्यावर सर्वस्व गमावून रात्रीच्या अभावी गुलामाप्रमाणे शेकोटीशेजारी कपकपत झोपतो. दुसऱ्यांच्या सुखी संसारांतील स्त्री पाहून द्यूत खेळणाऱ्याच्या अंगात ताप भरू लागतो. म्हणून माणसा, द्युत खेळू नकोस. शेती कर स्वतः मोठेपणा मिळवून संपत्तीत रममाण हो."

## ऋताची कल्पना

ऋग्वेदांतील अत्यंत मूलभूत तात्विक कल्पनांतील ऋतांची कल्पना फार सुप्रसिद्ध आहे. ती नैतिक कल्पना आहे. ऋत म्हणजे सत्य हे केवळ मानवी जीवनाचेंच नव्हे तर विश्वशक्तीच्या व्यवहाराचेही प्रेरक तत्त्व मानले आहे. वसंत, ग्रीष्म, वर्षा, वरद, हेमंत व शिशिर हे ऋतुचक्र पूर्ण होऊन संवासारकाल पुरा होतो. या कालाचे प्रेरक तत्व ऋत होय. सगळे देव ऋतच म्हणजे ऋतांत जन्मलेले आहेत. ऋतांचे पालन हेच देवांचे मुख्य कर्तव्य आहे. सूर्य- चंद्राच्या गती, समुद्राच्या भरती- ओहटी, इत्यादी नैसर्गिक सर्व घडामोडी हे ऋताचेच निदर्शन आहे. या ऋतास मानवी व्यवहारांच्या संदर्भात विशेषेंकरून सत्य व अनृत हे द्वंद्व व ऋग्वेदापासून प्रसिद्ध आहे. असत्य म्हणजे अनृत. सत्यासत्यास निर्णय हें जोखमीचे किंवा अवघड काम आहे, अशी जाणीव ऋग्वेदांतही व्यक्त झाली आहे. किंवा जोखमीचे म्हणण्याचे अवघड कारण असल्याचे अत्यन्तमय हे होय. असल्याचे अत्यंत भय ऋषिमनास वाटते. वशिष्ठ म्हणतो: "योग्य निर्णयास पोहचण्याची इच्छा असणाऱ्या माणसापुढे सत्य व असत्य विधानांची स्पर्धा सुरू असते. त्यातील जे सत्य व ऋत असते त्याचेच रक्षण देव सोम करतो, असल्याचा तो निष्पात करतो." ऋषि सत्योक्तीच्या महिमा वर्णितो: "सत्योक्ती माझे सर्वत्र रक्षण करो. दिवस व रात्र यांचा विस्तार सत्यावर अधिष्ठित आहे. मेघांचा संचार, सूर्याचे उदयास्त, विश्वाची गती व स्थिती सत्याधर आभित आहे."

## प्रजापतीचा उपदेश

सत्याप्रमाणे दम, दान, दया, अहिंसा इत्यादी नैतिक कल्पनाचे वाचक शब्द वैदिक व्याख्यात वापरलेले दिसतात. बृहदारण्यक उपनिषदांतील प्रजापतीच्या कथेंत दम, दान व दया यांचा उपदेश केला आहे. प्रजापती हा सर्वांचा पितां त्याच्याकडे उपदेशाअर्थ देव, असुर

व मानव हे पुत्र एकदा आले, व म्हणाले: "आम्हास थोर हिताचा आदेश शिकवा." प्रजापतीने केवळ मेघगर्जना ऐकवली. त्यात 'द द द' असाच ध्वनी नेहमीप्रमाणे देवासुरमनुष्यांनी ऐकला. प्रत्येकांनी त्या 'द' च्या ध्वनीचा आपापल्या प्रवृत्तीस अनुसरून अर्थ घेतला. दान करावे, असा मानवांनी, इंदियदमन करावे, असा देवांनी व दया करावी, असा असुरांनी अर्थ घेतला.

## साधनशुचितेचा पुरस्कार

सामवेदांत माणसाच्या जीवनांतील कोष, कृपणता, अश्रद्धा व असत्य या मोठया अनुल्लंघनीय नैतिक अडचणींचे परिगणन के आहे. त्यांचा परिहार करण्याकरितां साधनशुनितेता सिद्धांत प्रथम सांगण्यात आला. हिंसेला अहिंसेने, असत्याला सत्यानेच जिंकावे, असा साधनशुचितेचा सिद्धान्त प्रसिद्ध आहे. परंतु असे म्हणतातकी, हा सिद्धान्त प्रथम बुद्धाने उपदेशिला आहे बुद्धाचे अनुकरण करून वैदिक परंपरेने तो सिद्धान्त महाभारतात उचलला. 'जशास तसे वागावे, काट्याने काटा काढावा, खलास खलपणाने उत्तर द्यावे' असा तत्पूर्वीचा सिद्धांत होता, असे सांगतात.' शांतीने क्रोध, साधुत्वाने दुष्टत्व, औदार्याने कृपणत्व व सत्याने असत्य जिंकावे, असा उपदेश बुद्धाने केलेला, हे जरी खरे असले तरी या उपदेशाचे मूळ सामवेदाच्या अरण्यगान संहितेत मिळते. तेथे सतुतरसाम या संज्ञेचे सामगीत आलेले आहे. सेतु म्हणजे अडचणींची भिंत, अडचणीस उल्लंघून कसे जावे, हा या गीताचा विषय आहे. त्या गीताचा अर्थ असा- "माणसा दुस्तर अशा अडचणीतून तू पार पड, शांतीने क्रोधातून दानाने कृपण बुद्धितून, श्रद्धेने अश्रद्धेतून आणि सत्याने अनृतांतून बाहेर पडतात"

## निवृत्तिप्रधान नीती उपनिषत्कालीन

वेदांतील नीतिविचार व्यापक रूप धारण करू लागले होते, वरील विवेचनावरून लक्षांत येईल, नैतिक विचार व मोक्ष विचार यांची सांगड उपनिषदांत घातलेली दिसते. त्यामुळे पुढे नैतिक विचार हे निवृत्तिवादी बनले, सदाचरण मुख्यतः मोक्षाचे साधन म्हणून मान्यता पावले, कठोपनिषदांत म्हटलें आहे की, दुश्चरितापासून निवृत्त न झालेला अशान्त य असमाधानी विष्णूच्या परम पदास म्हणजे मोक्षास पोचू शकत नाही. बृहदारण्यक उपनिषदांत शम, दम, उपरति, तितिक्षा, समाधि व श्रद्धा ही सहा मोक्षाची साधनें वर्णिली आहेत. असा निवृतिप्रधान नीतिशास्त्राचा पाया प्रथम उपनिषदांनी घातला. बौद्ध व जैन धर्मातही हाच निवृत्तिप्रधान विचार प्रबल झाला. वेदांतील नीतिविचार मुख्यतः प्रवृत्तिवादांत, कर्मयोगांत प्रकट झाले.

**(आकाशवाणी केंद्राच्या सौजन्याने. प्रकाशन- साप्ताहिक साधना, पुणे.**
**शनिवार, दि. २१ जुलै, १९५६ पृ. ४, १०.)**

○○○

३४

# प्राचीन भारतांतील वादविद्या

साधकबाधक चर्चा म्हणजे वाद होय. कोणत्याही विषयाची अनुकूल व प्रतिकूल प्रश्न उपस्थित करून चर्चा केल्याशिवाय त्यांतील सत्याचा शोध करणें शक्य होत नसतें. एखाद्या सिद्ध व मान्य सिद्धान्ताचा बोध होण्यासही चर्चेची गरज असते. कोणताहि विचार स्पष्ट होण्याकरितां त्याबद्दल उलट सुलट शंका उत्पन्न करणे आवश्यक असते. सिद्धान्त, सत्य किंवा महत्वाचा विचार चांगला समजण्याकरितां त्या सिद्धान्ताची, सत्याची किंवा विचाराची उलट बाजूही समजावी लागते, त्रिकालाबाधित म्हणून जी सत्ये प्रसिद्ध असतात त्यांबद्दलहि वाद उपस्थित केल्याशिवाय त्यांत मिसळलेली ग्रामक विधाने बाजूस करून ती सत्ये निवडतां येत नाहीत. सत्य व अनृत हे बेमालूमपणे मिसळलेले असतें, म्हणून मतभेद माजतात. समंजस व विचारी सज्जनांच्यामध्येसुद्धां मतभेद, तीव्र मतभेद होतात, याचे कारण सत्य व अनृत हे मिसळून राहते हे होय. द्रष्टे, साधू, पंडित व विज्ञानसंशोधक यांच्यांत मतभेद आढळतात. जगांत मोठमोठ्या धर्मात विश्वाच्या अंतिम सत्याबद्दल म्हणजे ईश्वराच्या रूपाबद्दल मतभेद आहेत, म्हणून ते धर्म भिन्न किंवा परस्परविरोधी आहेत. हीच गोष्ट समाज, जीवन व इतिहास यांतील मूलभूत व जिव्हाळ्याच्या प्रश्नावरील मतभेदास लागूं पडते. न्यायालये, पंडितसभा, विधानसभा, संसद या वैचारिक परिषदा यांचे अस्तित्व या गोष्टीनीच पुष्टी करते. मानवी विचाराची प्रगतीच मतभेदामुळे होत असते, म्हणून प्राचीन भारतीय म्हणत की, "वादे वांदे जायते तत्वबोधः" म्हणजे नित्य वाद केल्याने तत्त्वाचा उलगडा होत जातो. प्राचीन भारतीयांच्या वादविद्येतही वादाचा तत्त्वबोध हाच मुख्य उद्देश सांगितला आहे. भारतीय प्राचीन वादविद्या वाढीस लागण्यास प्राचीन भारतीयांच्या अनेक बुद्धिप्रधान विचारांची, दर्शनांचीच भौक्तिक शास्त्रांची परिणती कारण झाली. धर्मतत्त्वाची मीमांसा, विश्वाच्या तत्त्वाची चर्चा, सृष्टिरचनेची तपासणी, रोग व आरोग्य यांचे संशोधन,

न्यायालयांत न्यायनिर्णयाची पद्धती ठरविण्याचा प्रयत्न, भाषेने वाद म्हणजे व्याकरण अत्यंत खोलपणे मांडण्यात मिळविलेले कौशल्य इत्यादी अनेक बौद्धिक संस्कृतीना अंगांची वाढ होत असते, भारतीय वादविद्येने सिद्धान्त निष्पन्न होऊ लागले, वादविद्या ही बौद्धिक संस्कृतीच्या विकासाची लक्षण होय. प्राचीन भारतीयाच्या बौद्धिक संस्कृतीला प्रारंभ उपनिषदकाली झाला. पक्षांचे महत्त्व त्या वेळी कळू लागले. थोरांनी सांगावे, लहानांनी मानावें, ही आज्ञाधारक प्रथा शास्त्रवाढीस उपयोगी पडत नाहीत, हे कळून चुकले.

लहानांनी मोठ्यांना म्हणजे जाणत्यांना प्रश्न किंवा प्रतिप्रश्न विचारावे, अशा विचाराचा महिमा स्थापित झाला. अगदी मूलग्राही, प्रश्नांचा मारा लहान माणसे मोठ्या माणसांवर म्हणजेच गुरुवर करतांना उपनिषदांत दिसतात. ऋषीचे शिष्य म्हणून ज्यांचा दर्जा समाजात मानला जात होता, त्या क्षत्रिय राजाकडे उलट ऋषीच सत्य समजावून घेण्याकरितां जात आहेत, असा देखावा उपनिषदांत दिसतो. अज्ञातशत्रु राजापासून किंवा अश्वपती कैकेप राजांपासून ऋषी तत्त्वज्ञानाचा धडा घेत आहेत, असे उपनिषदांत दृश्य दिसते. तत्त्वांची चर्चा करण्याकरिता पंडितांच्या सभा भरून अहमहमिकेने वाद उपनिषत्काली होऊ लागले होते. उदा. जनक राजाने मोठमोठ्या तत्त्वदर्शी ऋषींची एक तत्त्वज्ञान परिषद भरविली, मोठा वादविवाद घडवून आणला व त्यांत याज्ञवल्क्य मुनी हे सर्वांत श्रेष्ठ वादपटू ठरले, असे बृहदारण्यक उपनिषदांत सांगितले आहे. राजे व ऋषी मोठे दीर्घकालीन यज्ञसमारंभ करीत. त्यांत तत्त्वविषयक वादाकरितां स्वतंत्र सभा भरवीत असत, असे महाभारतावरून दिसून येते. ही वादाची परंपरा बुद्धाच्या काली उत्कर्षास पोचली. बुद्धाच्या काली धर्म, ईश्वर, नीती इत्यादीविषयी परस्परविरुद्ध मतांचे साठ संप्रदाय अस्तित्वांत होते.

## धर्मशास्त्र म्हणजे काय?

सत्याचा वा तत्त्वाचा शोध करावयाचा या तत्त्वांबद्दल किंवा सत्याबद्दल शोध करणाऱ्यांनी एकत्र जमून वाद करून खऱ्याखोट्याचा निर्णय काढण्याचा प्रयत्न करावयाचा, अशा रीती प्राचीन भारतात रूढ झाल्यामुळे अनेक शास्त्रांची वाढ झाली. शास्त्रांसंबंधी वादसभा होत. ह्या वादसंभांचे वादविषयक नियम चरकसंहितेत सांगितले आहेत. वादसभेत तद्विद्यसंभाष (परिषद) असें चरकसंहितेत आहे. तद्विद्य म्हणजे तज्ज्ञ, त्यांची संभाषा म्हणजे वाद मनु, यज्ञवल्क्य, नारद इत्यादिकांच्या धर्मशास्त्रांत वादाचे शास्त्र सांगितले आहे. कारण धर्म म्हणजे कायदा, कर्ज, जमीन, व्यापार, वारसा, करारमदार, राज्याचा कारभार इत्यादींसंबंधी धर्मशास्त्र किंवा रूढी यांच्याद्वारा जे नियम समाजांत अमलांत येत त्यासंबंधी वाद उत्पन्न होई. त्याचा निवाडा न्यायालयांत होई. ही न्यायालयें एक तर राजाने नेमलेली असत, किंवा गांवे, नगरें व जमाती यांनी नेमलेली असत. त्यांच्यांत वाद होऊन निर्णय लागेल. याकरिता लागणारे वादाचे व प्रमाणाचे नियम धर्मशास्त्रांत सांगितले आहेत.

## तर्कशास्त्र: वादविद्येचा गाभा

तात्पर्य, प्राचीन भारतात तत्त्वदर्शने, धर्मशास्त्रे, व्याकरण, वैद्यक इत्यादी विद्या परिणती पावू लागल्या, त्याबरोबर वादविद्या निर्माण झाली. ही वादविद्या प्रथम अक्षपाद गौतम-मुनींनीं समय व विस्तृत स्वरूपात मांडली. वादविद्या एक स्वतंत्र दर्शन म्हणून मान्यता पावले. पुराणांत एक श्लोक आहे, "गौतमस्य कणादस्य कपिलस्य पतंजुतेः। व्यासस्य जैमिनेश्चापि दर्शनानि षडेव हि॥" गौतम, कणाद, कपिल, पतञ्जली, व्यास व जैमिनी यांची सहा दर्शने आहेत, असा या श्लोकाचा अर्थ. यांत प्रथम गौतमाच्या दर्शनाचा निर्देश केला आहे. गौतमाच्या दर्शनास न्यायदर्शन म्हणत. न्याय म्हणजे यथार्थ निर्णय किंवा यथार्थ निर्णय करण्यास उपयुक्त असे नियम. म्हणजेच वादाचे किंवा चर्चेचे नियम. यथार्थ निर्णय म्हणजे सत्याचा निर्णय किंवा ज्ञान होय. यथार्थ ज्ञानास गौतममुनींनी प्रभा अशी संज्ञा दिली आहे व यथार्थ ज्ञानाच्या असाधारण साधनांस प्रमाण अशी संज्ञा दिली आहे. म्हणून गौतममुनींच्या न्यायदर्शनास प्रामाण्यविद्या असे म्हणतात. योग्य पद्धतीचा वाद प्रमाणांचे समग्र व व्यवस्थित ज्ञान असल्याशिवाय करता येत नसतो. प्रमाणांची सविस्तर मांडणी गौतमाच्या न्याय-दर्शनांत केली आहे. प्रमाणांची म्हणजे विचार तपासण्याच्या साधनांची विद्या गौतमाची न्यायविद्या आहे. प्रमाणांच्या विद्येस तर्कशास्त्र असेही म्हणतात. वादविद्येतूनच तर्कशास्त्र उत्पन्न झाले; तर्कशास्त्र हा वादविद्येचा गाभा होय.

गौतमाचे न्यायदर्शन म्हणजेच न्यायसूत्र होय. या न्यायसूत्रांवर वात्स्यायनाचें भाष्य आहे व या भाष्यावर उद्योतकर आचार्याची वार्त्तिक नामक टीका आहे. या दर्शनाची वाट गेल्या शतकापर्यंत होत आली आहे. गेल्या ६०० वर्षांतील न्यायदर्शनाच्या शाखेस नवा न्याय म्हणतात. वात्स्यायनाच्या न्यायमाथ्याची भाषा अत्यंत प्रसन्न आहे. वात्स्यायनाने न्यायदर्शनाच्या स्तुतीचा कौटिलीय अर्थ- शास्त्रांतील एक श्लोक उद्धृत केला आहे, त्यावरून प्राचीन भारतीयांमध्ये वादविद्येची किती श्रेष्ठ प्रतिष्ठा होती, हें समजून येते. तो श्लोक असा- "प्रदीपः सर्वविद्याना उपाय: सर्वकर्मणाम्। आश्रयः सर्वधर्मांना शश्वदान्वीक्षिकी मता ॥" "आन्वीक्षिकी म्हणजे वादविद्या ही सर्व विद्यांचा प्रदीप, सर्व कामांचा उपाय व सर्व धर्माचा आधार आहे. असे मान्य झाले आहे. कौटिल्यानें वादविद्येबद्दल आणखी असें म्हटले आहे की, धर्माधर्म सांगणारी वेदविद्या, संपत्ती व दारिद्र्य यांच्याशी संबंध, व्यापार व उद्योग यांची विद्या किंवा बलावलाचा वा मुत्सद्दीपणाचा विचार सांगणारी राजनीती या सर्व विद्यांची प्रमाणांनी तपासणी करून त्यांची वाद आन्वीक्षिकी म्हणजे वादविद्या करते. ही विद्या संकटांत व उत्कर्षात बुद्धीला स्थिर ठेवते, आणि 'प्रज्ञावाक्यवैशारचं च करोति.' प्रज्ञा व भाषण यांत प्रावीण्य आणते.

## पाखंडी विचारप्रणाली

भारतीय वादविद्येच्या नियमांचे स्वरूप केवळ सत्याच्या संशोधनास उपकारक असेच असल्यामुळे प्राचीन काळी भारतीय संस्कृतीत फार मोठे विचारस्वातंत्र्य वा मतस्वातंत्र्य नांदले. भारतात त्यामुळेच चार्वाकाचे पाखंडी भौतिकवादी वा नास्तिकदर्शन, वेदांचे प्रामाण्य अमान्य करणारी किंवा ईश्वराचे अस्तित्व खंडित करणारी बौद्ध व जैन दर्शने अस्तित्वात आली, प्रसूत झाली. भारतीयांचे संस्कृतमधील दर्शन ग्रंथ हे वादपद्धतीने म्हणजे पूर्वपक्षमालिका व उत्तरपक्षमालिका यांची गुंफण करून लिहिले आहेत. ईश्वर नाहीं, वेद प्रमाण नाहीत, आत्मा नाही, परलोक नाही, अशा प्रकारचे तर्कशुद्ध पूर्वपक्ष विस्ताराने वेद ईश्वर, आत्मा, अमरत्व मानणाऱ्या शबर स्वामी, कुमारिलभट्ट शंकराचार्य, उदयनाचार्य इत्यादी भारतीय आस्तिक व सश्रद्ध आचार्यांच्या ग्रंथात मांडलेले वाचावयास मिळतात. प्रखर व सत्यशोधक असे वादशास्त्रच अवतरलेले सर्व भारतीय आचार्यांच्या भाष्य, वार्तिक, किंवा टीकाग्रंथांत दृष्टीस पडले म्हणून शिष्यादिच्छेत पराजयम्' असा उदार दण्डक भारतीयांच्या गुरुशिष्यपरंपरेत प्रमाण मानलेला दिसतो, बृहस्पतीचे शिष्य चार्वाक किंवा लोकायत यांचे ग्रंथ सध्या मिळत नाहीत. नास्तिक भौतिकवाद प्राचीन जगातील सर्वसामान्य लोकांना न पचल्यामुळे त्यांची अध्ययन परंपरा बुडाली. बौद्धांचे व जैनांचे पाखंडी ग्रंथ अजून आहेत, प्रखर बुद्धिवादाचे नमुने त्यात सापडतात. उदा. इसवी सनाच्या सातव्या शतकाल धर्मकीर्ती नामक बौद्ध आचार्य होऊन गेले. त्यांचे उद्गार येथे निर्दिष्ट करतो. त्यांचे व पूर्वमीमांसक महापंडित कुमारिलभट्ट यांचे मामा-भाचे असे नाते होते, असे म्हणतात. धर्मकीर्तीचा 'प्रमाण- वार्तिक' हा ग्रंथ पंडित राहुल सांकृत्यायन यांनी प्रकाशात आणला आहे. त्यातील एक श्लोक असा आहे -

**वेद प्रामाण्यं कस्यचित कर्तृवादः**
**स्नाने धर्मेच्छा जातिवादान लेपः|**
**संता प्रारंभः पाप हानाय चेति ध्वस्तप्रज्ञानां**
**पंचलिंगानि जाडये ||**

अर्थात् ''वेद संपूर्ण प्रमाण मानणे किंवा विश्वाचा कोणीतरी श्रेष्ठ कर्ता आहे असे मानणे, तीर्थ स्नानाने पुण्यप्राप्तीची इच्छा करणे, जातीचा अहंकार बाळगणे, पापनाशाकरिता जीवाला ताप करून घेणे, ही पांच बुद्धी नष्ट झाल्याची किंवा जडबुद्धीची लक्षणे होत.''

## विचारस्वातंत्र्य कायम राहिले

असे विचारस्वातंत्र्य वादविद्येच्या प्रभावामुळे भारतात त्या काळी प्रचारात राहिले. राजे लोकही या वेळी भिन्नभिन्न विचारांच्या पंडितांच्या वाद सभा भरवीत अशी गोष्ट सांगतात की, सुप्रसिद्ध मीमांसक कुमारिलभट्टांनी एका बौद्ध आचार्यापाशी वादविद्येचे व

बौद्धदर्शनाचे अध्ययन गुप्त- पण, गुरूंना स्वतः नेदानुयायी आहो है न सांगता बारा वर्षे केले. अखेर एका राज सभेत वैदिकधर्माचे समर्थक म्हणून ते प्रकट झाले व ज्या बौद्ध गुरुंपाशी अध्ययन केले, त्यांचाच

पराभव केला. त्यामुळे यांना राजद्रोहाचे पातक लागले, ते पातक चित्ताचा दाह करू लागले. मनाला पश्चात्ताप झाला, त्यांनी प्रायश्चित्त घेण्याचा निश्चय केला. देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरा उपाय नव्हता. भाताचा जळता मुसा ठेवून त्यांत त्यांनी आपला देह ठेवला. अशा स्थितीत आद्य शंकराचार्यांची गाठ पडली. कुमारिलांनी बौद्ध धर्माचा पराभव करण्याचा व वेदोद्धाराचा संदेश शंकराचार्यांस दिला. शंकराचार्यांनी सर्व भारतात पर्यटन करून सर्व राजसभा व पंडितसभा जिंकल्या. वैदिक धर्माचा व वैदिक आध्यात्माचा विजय स्थापित केला. हा शंकराचार्यांचा दिग्विजय इतिहासात प्रख्यात झाला. वैचारिक दिग्विजयाने निर्माण होणारे वैचारिक साम्राज्य माणसांना बंधनात टाकीत नाही, अज्ञानाच्या बंधनातून सोडविले. शंकराचार्यांच्या वाद कौशल्यासंबंधी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यातील एक सुसंगत विचारांचे उदाहरण म्हणून पक्की ध्यानात ठेवण्यासारखी आहे. एकदा काशीत पंडितांशी शंकराचार्यांचा वाद झाला. शंकराचार्यांनी हे इंद्रियांनी दिसणारे विश्व कसे आभासमय किंवा भ्रमात्मक किंवा मिथ्या आहे हे सिद्ध करून सत्य आहे असे मानणाऱ्या विरुद्ध पक्षाचा पराभव केला, सभेत उपस्थित असलेल्या राजपुत्राने यावर एक युक्ती योजली. आपला एक गज शंकराचार्य काशीच्या ज्या संकुचित मार्गाने जात होते, त्या मार्गात त्याने सोडला. गज समोरून धावत येत आहे हे पाहून शंकराचार्य पळू लागले. त्यांस राजपुत्राने अडविले, व विचारले की, गज मिथ्या, गज मिथ्या हे खरे ना? मग का पलायन करता? आचार्यांनी लगेच उत्तर दिले की, ‘गजोमिथ्या तथा पलायनमपि मिथ्या’- गज जसा खोटा तसेच पलायनही खोटे, राजपुत्राने आचार्यांचे वादिगजसिंहत्व मान्य केले.

गौतमाने न्यायदर्शनात तत्त्वचर्चेचे तीन प्रकार सांगितले आहेत. वाद, सत्य व वितण्डा, या तीन प्रकारच्या चर्चेच्या तीन व्याख्या सांगितल्या आहेत. ‘तत्त्वबुभुत्सो’, वाद, कथा: पक्ष व प्रतिपक्ष यांच्यात तत्त्वबोधाच्या इच्छेने म्हणजे सत्यशोधनाच्या इच्छेने चर्चा होते, त्या चर्चेस वाद म्हणतात.

“विजिगीषु-कथा जल्प: ” पक्ष व प्रतिपक्ष बौद्धिक विजय प्राप्त होण्याच्या इच्छेने ज्या चर्चेस प्रवृत्त होतात त्या चर्चेस ‘जल्प’ म्हणतात.“स्वपक्षस्थापनाहीनोवितण्डा” स्वतःचे विशिष्ट मत न स्वीकारला तेथे विरुद्ध पक्ष एकमेकांचे म्हणणे खोदण्यास प्रवृत्त होतात, त्यास वितण्डा म्हणतात. ‘गुरुशिष्यसब्रह्मचारिभिः वाद: प्रयोक्तव्य:’ गुरु-शिष्य व सहाध्यायी यांनी सत्याच्या बोधाकरिता वाद करावा, असे गौतममुनी म्हणतात, युक्तीने किंवा प्रमाणाने काहीच सिद्ध होत नसते, असे मानणारे संशयवादी लोक वितंड माजवितात, प्रत्ययवादी, शून्यवादी किंवा मायावादी हे वितंडवादी असतात, असे शांकर अद्वैताचे समर्थन करणारे

पंडित श्रीहर्ष यांनी 'खण्डनखण्डखाद्य' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. वाद, जल्प किंवा वितण्डा या तीन पद्धतींचे नियमन गुणदोष यांची सविस्तर मांडणी गौतमांच्या न्यायदर्शनात केली आहे. या न्यायदर्शनातून म्हणजे वादविद्येतून बौद्ध, जैन पूर्व मीमांसक व अद्वैत- द्वैत-विशिष्टाद्वैत इत्यादी वेदान्ती संप्रदाय यांची समृद्ध अशी तर्कशास्त्रे निर्माण झाली असे भारतीय वाद विद्येचा इतिहास सांगतो. भगवद्गीतेत भगवानांनी ज्या स्वतःच्या दिव्य विभूती सांगितल्या आहेत, त्यांत 'वाद: प्रयदतामहम्' म्हणजे चर्चा करणाऱ्या पद्धतीत वाद अर्थात् तत्त्वजिज्ञासेची चर्चा म्हणजे मी होय असे म्हटले आहे.

**(आकाशवाणी मुंबई केंद्राच्या सौजन्याने,**
**प्रकाशन- साप्ताहिक साधना, पुणे.**
**शनिवार, दि. १४ सप्टेंबर, १९५७. पृ. ७, ८.)**

❍❍❍

३५

# लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य'

अध्यात्मवादी जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल याने एका ठिकाणी असे म्हटले आहे की, कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासावरून त्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान कशा प्रकारचे आहे हे सांगता येते आणि उलट कोणत्याही राष्ट्राच्या तत्त्वज्ञानावरून त्या राष्ट्राचा इतिहास कसा घडला हे अनुमानिता येते. ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर नवशिक्षित भारतीयांनी भारतीयांच्या सामाजिक व तात्त्विक विचारांची मौलिक समीक्षा का प्रारंभिली याचा हेगेलच्या वरील प्रमेयाच्या झगझगीत प्रकाशाने उत्तम उलगडा होतो. ब्रिटिशांच्या विजयाची आणि भारताच्या पराभवाची कथा भारतीय नवशिक्षितांच्या मौलिक अशा वैचारिक परिवर्तनास कारण झाली. पराभवाची समस्या सुटण्यास त्यांना फारसा वेळ लागला नाही. मागासलेल्या संस्कृतीत दीर्घकाळ राहणारे भारत हे राष्ट्र नव्या संस्कृतीच्या निर्मितीशिवाय ऐतिहासिक पराभवाच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडू शकणार नाही याची पुरेपूर जाणीव फार थोड्या नव्यशिक्षितांस झाली असली तरी त्या थोड्या शिक्षितांनीच नव्या संस्कृतीचा व नव्या भारताचा वैचारिक पाया घालण्यास प्रारंभ केला. परंपरागत तत्त्वज्ञानाच्या काही सिद्धांताचा वारसा संपूर्णपणे झुगारून देणे आवश्यक असूनही त्यांच्यापैकी अनेकांना शक्य झाले नसले तरी त्यांनी केलेली वैचारिक कामगिरी मोलाची आहे यात शंका नाही. ब्राह्म समाजाचे संस्थापक राजा राममोहन रॉय, प्रार्थना समाजाचे संस्थापक महादेव गोविंद रानडे व रामकृष्ण गोपाळ भांडारकर, आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती, महाकवी रवींद्रनाथ ठाकूर, सत्यशोधक समाजाचे संस्थापक जोतीराव फुले, स्वराज्य आंदोलनाचे महान प्रवर्तक लोकमान्य टिळक, उदारमतवादी सुधारक आगरकर, राष्ट्रीय क्रांतीचे द्रष्टे योगी अरविंद घोष, नवमानवतावादी मानवेंद्रनाथ रॉय, नवबौद्ध धर्माचे प्रवर्तक डॉ. आंबेडकर व स्वतंत्र भारताचे जनक पिता महात्मा गांधी यांनी मौलिक परिवर्तनाच्या दिशेने भारताची जीवनयात्रा चालविण्याकरिता जे मार्गदर्शक विचार प्रज्वलित केले त्यापैकीच एक दीप लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य होय ही सर्वमान्य गोष्ट आहे.

ब्रिटिशांच्या आक्रमणाने झालेल्या पराभवामुळे भारतात जी नवजागृती निर्माण झाली तशी ती पूर्वीच्या अनेक पराभवांच्या मालिकेमध्ये झालेली दिसत नाही. याचे कारण मानवी विचारांना धक्का देणारी व आत्मसंशोधनास प्रवृत्त करणारी महत्त्वाची ऐतिहासिक घटना म्हणून भारतीय इतिहासात दुसरी कोणतीही सांगता येत नाही. आपल्या सामाजिक संस्थांचा तात्त्विक आधार सदोष आहे आणि आपल्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट प्रकाशित करणारे तत्त्वज्ञानही सदोष आहे अशी उत्कट जाणीव ब्रिटिशांच्या आधुनिक संस्कृतीच्या अध्ययनाने निर्माण केली.

आपल्या परंपरागत मूलभूत तत्त्वज्ञानाची समीक्षा हा आपल्या आधुनिकतेचा प्रारंभ होय. नवशिक्षितांपैकी काही संपूर्ण मूलगामी म्हणजे क्रांतिवादी होते व काही तत्त्वज्ञान तपासण्याची गरज मान्य करणारे, परंतु जुन्या तत्त्वज्ञानाचा संपूर्ण त्याग न करता त्याला नवी बैठक व नवा आकार नव्या परिस्थितीस अनुरूप असा नवा आकार देणारे होते. आगरकरांपासून मानवेंद्रनाथ रॉय यांच्यापर्यंतचे काही विचारवंत वैचारिक क्रांतीचे पुरस्कर्ते झाले. कमीजास्त प्रमाणात नवा आकार देणारे सुधारणावादी दुसऱ्या प्रकारात मोडतात. या दुसऱ्या प्रकारातील मंडळींपैकी राममोहन रॉय, रवींद्रनाथ ठाकूर, महादेव गोविंद रानडे इत्यादी नव्या शिक्षितांनी परंपरागत तत्त्वज्ञानात मौलिक सुधारणा सांगणारी विचारप्रणाली प्रतिपादली व ती प्रतिपादित असताना हिंदू धर्माच्या पवित्र ग्रंथांचे स्वत:प्रामाण्य नाकारले. योगी अरविंद, महात्मा गांधी व लोकमान्य टिळक यांचा गट हिंदू धर्मग्रंथांचे स्वत:प्रामाण्य स्वीकारणारा होता. पवित्र ग्रंथांचे प्रामाण्य संपूर्णपणे मान्य करून त्याचे नवे भाष्य या वैचारिक नेत्यांनी निर्माण केले. अशा हिंदू धर्माच्या पवित्र ग्रंथांच्या नव्या भाष्यांपैकी एक उत्कृष्ट भाष्य म्हणजेच टिळकांचे भगवद्गीतारहस्य होय. टिळकांनी शतकानुशतके रुजलेल्या निवृत्तिवादाचे खंडन करून प्रवृत्तिवादाचे या भाष्यात समर्थन केले.

बुद्धोत्तर काळापासून ब्रिटिश काळाच्या उदयापर्यंतच्या सुदीर्घ कालखंडात भारतीयांच्या जीवनमूल्यांमध्ये निवृत्तिवादाचा व संन्यासवादाचा खोल प्रभाव पडत गेला. वस्तुत: प्रवृत्तिवाद व निवृत्तिवाद हे दोन्ही मौलिक विचार भारतीय प्राचीन तत्त्वज्ञानात प्रतिपादिलेले दिसतात. वैदिक कालात तर प्रवृत्तिवादाचाच विजय झालेला दिसतो; परंतु वेदोत्तरकालीन इतिहासात बुद्धोदयापासून निवृत्तिवादाच्या आक्रमणास सुरुवात झाली व हळूहळू निवृत्तिवादाची व संन्यासवादाची सर्वोच्चता स्थापन होऊन प्रवृत्तिवादाला कायमचे दुय्यम स्थान प्राप्त झाले. निवृत्तिवादाचा अभिप्राय असा : ऐहिक विश्व हे ऐहिक मानवी जीवन असार, क्षणभंगुर व मायामय आहे व पारलौकिक इंद्रियातील जीवनातच सार व परमार्थ सामावलेला आहे. ऐहिक मानवी जीवन हे दु:खमय आहे. या जीवनातील इंद्रियजन्य सुखे ही दु:खाचीच कारणे होत. या जगात मिळविलेली संपत्ती, आरोग्य, भार्यापुत्रादी प्रियसंबंध, राजकीय सत्ता, कीर्ती, शौर्यधैर्यादी गुण, वक्तृत्व, संगीत, चित्र, काव्यादी कला, लोकप्रीती, निसर्गाचे सौंदर्य इत्यादी

सर्वच प्रिय व लोभनीय गोष्टी क्षणात नष्ट होतात. त्यांच्या अर्जनात, प्राप्तीत, संवर्धनात व विनाशात दु:खच अनुभवास येते. मनुष्यांच्या ऐहिक जीवनात यशस्वी होण्याचे सर्वच प्रयत्न इच्छा आणि द्वेष या दोन विकारांच्या उत्तेजनातून निर्माण होतात. इच्छा, द्वेष या दोन विकारांचा तृष्णा असा निर्देश भारतीय अध्यात्मवाद करतो. तृष्णेपासून प्रयत्न किंवा कर्म घडते. कर्माने पापपुण्ये निर्माण होतात. पापपुण्यातून सुखदु:खे उद्भवतात. सुख-दु:खांच्या भोगाकरिता पापपुण्यांच्या स्वरूपानुसार जन्म लाभतो. जे जन्मते ते मृत्यू पावते. मृत्यूनंतर पापपुण्यानुसार पुन: जन्म लाभतो अशी ही जन्ममरणपरंपरा अनादिकालापासून जीवाला भोगावी लागत असते. या जन्ममरणपरंपरेलाच संसार असे म्हणतात. हा जन्ममरणपरंपरारूप संसार हाच मुख्य बंध होय. हा बंध मुळात तृष्णेतून उद्भवतो. या तृष्णेचा क्षय झाल्याशिवाय हा संसारबंध तुटत नाही. तृष्णेचा उद्भव अज्ञानातून व भ्रमातून होतो. हा दृश्य देह, ही इंद्रिये, हे मन म्हणजेच मी अशी आत्मविषयक जाणीव हाच मुख्य भ्रम होय. देह, इंद्रिये आणि मन म्हणजे मी नव्हे, देहाची, इंद्रियाची व मनाची सुखे व दु:खे ही माझी म्हणजे आत्म्याची नव्हेत असे ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान होय. या तत्त्वज्ञानाने तृष्णानाश होतो. तृष्णानाशामुळे कर्मप्रवृत्ती थांबते. हेच नैष्कर्म्य होय. या नैष्कर्म्यामुळे पापपुण्ये थांबतात. पापपुण्ये थांबल्यामुळे जन्ममरणपरंपरा विराम पावते. जन्ममरणपरंपरा म्हणजेच संसार होय. या संसारातून जीव मुक्त होतो. ही मुक्ती किंवा मोक्ष माणसाचे किंवा जीवाचे अंतिम साध्य होय. यासच निश्रेयस असे म्हणतात. या अंतिम ध्येयाच्या साधकाने इतर ध्येयांची आकांक्षा बाळगता कामा नये.

ही विचारसरणी संन्यासवादाकडे नेणारी आहे. बौद्ध, भिक्षू, जैन श्रमण वा सनातन हिंदू संन्यासी हाच मनुष्याचा उत्तम आदर्श होय. याच आदर्शाकडे जाण्याचा प्रत्येक मानवाने प्रयत्न केला पाहिजे असा संन्यासवादी तत्त्वज्ञानाचा अभिप्राय आहे. आद्य शंकराचार्यांनी गीतेवर भाष्य लिहून गीतेचा संन्यासवादी निष्कर्ष काढला आहे. आद्य शंकराचार्यांचे परंपरागत भारतीय तत्त्ववेत्त्यांमध्ये उच्चतम स्थान गणले गेले असून हिंद संस्कृतीवर त्यांच्याच विचारसरणीचे १९ व्या शतकापर्यंत अधिराज्य होते. या निवृत्तिवादी विचारांच्या छायेतून हिंदू मनाची सुटका करण्याकरिता टिळकांनी गीतेचे प्रवृत्तिवादी किंवा कर्मयोगपर भाष्य लिहिले. कर्तृत्वशून्यता निर्माण करणाऱ्या निवृत्तिवादी विचारसरणीने हिंदू समाजाची प्रगती थांबवून अगतिक व दुर्बल बनविले. ही दौर्बल्यास कारण होणारी अगतिकता नष्ट करण्याकरिता गीतारहस्याचे विवेचन आहे ही गोष्ट गीतारहस्याच्या प्रस्तावनेत टिळकांनी सुचविली आहे. टिळक म्हणतात - ''केल्याविण काही होत नाही, हा सृष्टीचा नियम लक्षात आणून तुम्ही मात्र निष्काम बुद्धीने कर्ते व्हा म्हणजे झाले. निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीने संसार करून थकल्या भागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनही गीता सांगितलेली नसून संसारच मोक्षदृष्ट्या कसा केला पाहिजे व मनुष्यमात्राचे संसारातले खरे कर्तव्य काय याचा तात्त्विकदृष्ट्या उपदेश करण्यासाठी गीताशास्त्राची प्रवृत्ती

झालेली आहे. म्हणून पूर्ववयातच गृहस्थाश्रमाचे किंवा संसाराचे हे प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणे शक्य असेल तितक्या लवकर प्रत्येकाने समजून घेतल्याशिवाय राहू नये. एवढीच आमची शेवटची विनंती आहे.''

टिळकांच्या गीतारहस्याचा मोठा विस्तार असला तरी त्याचा अभिप्रेत प्रतिपाद्य अर्थ विशेषेकरून अनुक्रमे 'संन्यास व कर्मयोग' आणि 'सिद्धावस्था व व्यवहार' या दोन प्रकरणात सविस्तर समाविष्ट झाला आहे. 'संन्यास व कर्मयोग' या प्रकरणात भगवद्गीता हे कर्मयोगशास्त्रच का याचा ऊहापोह आहे. प्राचीन भारतीय परंपरेत शंकराचार्यादिकांनी ज्ञानयोग किंवा संन्यासनिष्ठा ही अंतिम निष्ठा मानली आहे आणि ज्ञानाकरिता चित्तशुद्धी लागते म्हणून चित्तशुद्धीचे बाह्य साधन म्हणूनच कर्मयोगाचा स्वीकार केला आहे. चित्तशुद्धी प्राप्त झाल्यानंतर कर्ममार्ग टाकणे म्हणजेच संन्यास होय. या संन्यास स्थितीमध्येच ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते व त्या ब्रह्मज्ञानाचे सातत्यही संन्यास स्थितीमध्ये कायम टिकविता येते. याशिवाय दुसरी एक प्राचीन परंपरेतील मतप्रणाली आहे. त्या प्रणालीप्रमाणे चित्तशुद्धीनंतर निष्काम बुद्धीने म्हणजे कलाभिलाषा न धरता कर्मयोग आचरणे शक्य आहे म्हणून विकल्पाने संन्यास स्वीकारणेही योग्य होय किंवा कर्मयोगही अखेरपर्यंत टिकविणे योग्य होय असे म्हणता येते. या प्रणालीप्रमाणे संन्यास व कर्मयोग दोन्हीही तुल्यबलच ठरतात. लोकमान्य टिळकांनी या दोन्ही पक्षांपेक्षा सर्वोत्तम म्हणून तिसरा पक्ष म्हणजे साधकावस्थेपासून ते सिद्धावस्थेपर्यंत म्हणजे जीवनसमाप्तीपर्यंत कर्ममार्गाचे सतत अनुकरण करणे अत्यंत प्रशस्त होय असा गीतेचा अभिप्राय किंवा रहस्य प्रतिपादिले आहे. त्यांच्या मते ज्ञानयुक्त संन्यास जसा मोक्षप्रद होय त्याचप्रमाणे ज्ञानयुक्त केव्हाही मोक्षप्रद होय. ज्ञानयुक्त स्थितीत कर्माचरण जनक रामचंद्रादिकांप्रमाणे शक्य आहे म्हणून संन्यासवादी शंकराचार्य ज्ञानोत्तर स्थितीतला ज्ञानोत्तर संन्यासयोग कर्मयोग नाकारीत नसले तरी कर्मत्यागरूपी संन्यासच श्रेष्ठ असा आग्रह धरतात आणि ज्ञानोत्तर कर्मयोग हे मोक्षदृष्ट्या समान मूल्यांचे असले तरी टिळकांनी समाजधारणेकरिता सिद्धावस्थेतही कर्मे आचरली पाहिजेत असा आग्रह धरला आहे. समाजधारणा हे साध्य सिद्ध किंवा ज्ञानी पुरुषाने विसरता कामा नये. एवढेच नव्हे तर ज्ञानी वा सिद्ध पुरुषावर समाजधारणेची सर्वात अधिक जबाबदारी आहे. कारण ज्ञानी वा सिद्ध पुरुषाने विकारावर विजय मिळविला असल्यामुळे लोकसंग्रहार्थ किंवा समाजधारणार्थ कर्तव्या-कर्तव्याची योग्य निवड त्याची बुद्धीच करू शकते म्हणून इतरेजनांना किंबहुना सर्वांना आदर्शभूत असे त्याचेच आचरण होऊ शकते. यासंबंधी टिळक संन्यास व कर्मयोग यांच्या तुलनात्मक पटात असे सांगतात - ''ज्ञानप्राप्तीनंतर स्वत:साठी काही प्राप्त करून घेणे राहिले नसले तरी कर्म सुटत नाही. यासाठी जे काही शास्त्रत: प्राप्त होईल ते मला नको, अशा निर्मम बुद्धीने (हे सिद्धपुरुषा) लोकसंग्रहाकडे दृष्टी देऊन करीत जा, लोकसंग्रह कोणासही सुटत नाही. उदाहरणार्थ, भगवंताचे चरित्र पाहा. कारण हे चक्र जगाच्या धारणार्थ

परमेश्वरानेच निर्माण केले आहे. सांसारिक कर्मे शास्त्रोक्तरीत्या केल्याने चित्तशुद्धी होते हे खरे. पण चित्तशुद्धी हा एकच कर्माचा उपयोग आहे असे नाही. जगाचा व्यवहार चालविण्यासही कर्माची जरूर आहे. निष्काम कर्म व ज्ञान यामध्ये बिलकूल विरोध नाही. चित्तशुद्धीनंतरही क्लेशाचा त्याग करून चातुर्वर्ण्याची सर्व कर्मे आमरणान्त निष्काम बुद्धीने जगाच्या संग्रहार्थ चालू ठेव.

टिळकांनी गीतारहस्यात मानवी बुद्धीच्या कक्षेत असलेली समाजधारक कर्मे निष्काम बुद्धीने आचरणे हाच मुख्य कर्मयोग होय असे सांगितले आहे. 'यज्ञाने पाऊस पडतो' असे गीतेत म्हटले आहे. टिळकांच्या दृष्टीने समाजधारणेचे कर्म म्हणजे यज्ञयागादी कर्म नव्हे. सृष्टिव्यापाराचा वैज्ञानिक अर्थ ध्यानात घेऊन निश्चित होणारे समाजधारणेचे कर्म हेच सिद्ध व ज्ञानी पुरुषाने आचरावयाचा कर्मयोग होय असे टिळकांना सांगावयाचे आहे.

आधुनिक युगाच्या संदर्भातील टिळकांचा कर्मयोग आणि भगवद्गीतेतील यज्ञ-दान-तप-रूप कर्मयोग हे भिन्न आहेत ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. म्हणून टिळकांनी सांगितलेला कर्मयोग भगवद्गीतेतून निघतो असे निश्चयाने म्हणवत नाही. दुसरे असे की, समाजधारक कर्मयोगाचे समर्थन करणाऱ्या गीतारहस्यात शांकरमायावादाचे समर्थन केले आहे. मायावाद हा निष्ठेने मान्य केल्यास समाजधारक कर्माची उच्चतम प्रतिष्ठा नष्टच होणार; ही गीतारहस्यातील अंतर्गत विसंगती तत्त्वचिंतकांनी ध्यानात घेणे जरूर आहे. कर्मबंधाचा व मोक्षाचा सिद्धांत, मायावाद व अनासक्ती योग हे तिन्ही सिद्धांत अंगी बाणविलेला सिद्ध पुरुष आणि ते सिद्धांत अंगी बाणविण्याचा प्रयत्न करणारा साधक मनुष्य हे दोन्हीही समाजधारणार्थ व आर्थिक विकासार्थ उत्कट इच्छेने व मोठ्या उत्साहाने झटू शकेल की नाही याबाबतीत मानसशास्त्रज्ञास शंका उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. दु:खालय आणि नश्वर उद्दिष्टांचाच एक उत्कृष्ट प्रकार म्हणजे समाजधारणा होय. मायावाद्यास हे उद्दिष्ट इष्ट वाटणे कसे शक्य आहे?

**(आकाशवाणी, मुंबई केंद्र)**

ooo

३६

# आमच्या काळाने आम्हास घडवले

ही आत्मकथा असली तरी कालकथा आहे. म्हणून आत्मकथा सांगण्यास वाटणारा संकोच कमी होतो. हा साठ वर्षांचा काळ आहे. माझे जीवन म्हणजे या काळातला सूक्ष्मातील सूक्ष्म पापुद्रा आहे. या पापुद्र्यावर या काळाची अत्यंत महत्त्वाच्या स्थित्यंतरांची पदचिन्हे अथवा हस्तलक्षणे उमटली आहेत. विसाव्या शतकाच्या पहिल्या वर्षी व पहिल्या महिन्यात माझा जन्म झाला. माझ्या घरचे वातावरण अत्यंत साधे व सनातनी व कर्मनिष्ठ वैदिक ब्राह्मणाचे होते. घरातील सर्व चिजा आणि वस्तू, छापील पुस्तके व फोटो सोडल्यास अठराव्या शतकातील घराप्रमाणे होत्या. सर्व आचार, विचार व भावना यांची घडण अठराव्या शतकातील सनातनी आकाराची होती. रेल्वेपासून व शहरापासून पंचवीस कोस दूर असलेल्या सह्याद्री लगतच्या खेडेगावी पश्चिम खान्देशातील पिंपळनेर येथे मी जन्मलो. माझ्या गावी माझ्या लहानपणी सणासुदीस एखादा पदवीधर दिसायचा. तीन हजार वस्तीचा हा गाव नवपदवीधराकडे एक नवल म्हणून पाहायचा. कथा-कीर्तनकार, भजनी बुवा व पुराण सांगणारे यांचाच मानसन्मान तेथे वारंवार चालत असे.

एका सद्गृहस्थाच्या घरी वाईच्या लेलेशास्त्री यांचे 'धर्म' मासिक येत असे. ते आमच्या घरी मोठ्या आदराने वाचले जात असे. विसाव्या शतकाची हवा या अठराव्या शतकाच्या वातावरणात मिसळून टाकणारी एकच खिडकी माझ्या घराला होती. ती म्हणजे 'केसरी' वृत्तपत्र! मंगळवारचा साप्ताहिक 'केसरी' गुरुवारी आला की धार्मिक श्रद्धेने अथपासून इतिपर्यंत वाचन आमच्या घरच्या बैठकीवर दुपारी होई. १९०८ साली लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन दीर्घ मुदतीची कारागृहवासाची शिक्षा त्यांना झाली. मी त्यावेळी आठ वर्षांचा होतो. आमच्या गावावर, विशेषत: आमच्या घरात ही कारागृहवासाची शिक्षा ऐकता क्षणी विषाद व शोक यांची छाया पसरली. ही विषण्णता टिळक सुटेपर्यंत टिकली होती. टिळकांची तसबीर आमच्या देवघरात १९०८ पासून पूजली जाऊ लागली.

मी वाईस १९१४ साली प्राज्ञमठात दाखल झालो. वडिलांनी मला एका विरक्त साधू-पंडिताच्या सान्निध्यात वेदशास्त्र अध्ययनार्थ ठेवले. ते म्हणजे स्वामी केवलानंद सरस्वती. निरोप घेताना वडील मला म्हणाले, ''टिळकांसमोर टिळकांच्या वाड्यात उपनिषदांवर प्रवचन करून आशीर्वाद मिळवण्याइतकी तयारी कर बरं.'' वेदशास्त्रांचे अध्ययन यथासांग करून जुन्या शास्त्रीय पंडितांच्या परंपरेप्रमाणे धार्मिक जीवनक्रमात उच्चस्थान मिळवावे, असा माझा मूळचा उद्देश होता. मी अत्यंत कट्टरपणे सोवळे-ओवळे पाळत असे. नियमित प्रात:स्नान, प्रात:संध्या, प्रात:वंदन, मंत्रजप, हवन, व्रत व उपोषण इ. नियम धर्म निरपवादपणे पाळत असे. मी संस्कृत विद्येत फार झपाट्याने प्रगती करू शकलो.

१९१६ साली वाईस संकेश्वरचे शंकराचार्य व उत्तराधिकारी मठाचे पंडित वैष्णवाचारी महापंडित सत्यध्यानतीर्थ यांची फेरी आली होती. त्यांच्या मठात मी संस्कृतमध्ये प्रथम पूर्वोत्तर पक्ष केले. वाईच्या प्राज्ञमठाला प्राज्ञपाठशाळेचे संस्थात्मक स्वरूप देण्यास कैलासवासी दिनकरशास्त्री कानडे हे मुख्यत: कारणीभूत झाले. १९१६ साली प्राज्ञमठाची प्राज्ञशाळा झाली तेव्हा ते गुरुजींपाशी वेदान्तशास्त्राचे अध्ययन करीत होते; परंतु त्यांचे मन व हात भारतातील सशस्त्र क्रांतिकारक चळवळीत गुंतले होते. त्यांनी गदर पार्टीशीही संबंध स्थापित केला होता. ते ज्वलंत जहाल मताचे टिळक भक्त होते. त्यांची देहयष्टी पोलादी चौकटीप्रमाणे होती. चेहरा करारी व वाणी तेजस्वी होती. मन विवेकानंदांच्या धर्मश्रेद्धेने भारलेले होते. टिळकांचा कर्मयोग हे त्यांचे जीवन तत्त्वज्ञान होते. गुप्त चळवळीस आवश्यक असे हृदयाला भिडणारे व तरुण मनाला भारावून टाकणारे अप्रतिम वक्तृत्व त्यांच्या ठिकाणी होते. दर आठवड्याला सोमवारी प्राज्ञमठाला गुरुजींची व विद्यार्थ्यांची शास्त्रचर्चेसाठी सामुदायिक बैठक होत असे. त्यात दिनकरशास्त्री कानडे यांचे अमोघ वक्तृत्व खोल प्रभाव गाजवीत असे. चर्चेची बैठक संपल्यावर कानडेशास्त्री यांच्याशी मी व आणखी एक प्रौढ विद्यार्थी त्यांनी मांडलेल्या मुद्यांवर चर्चा करीत असू. उभ्या उभ्याने चर्चा करण्यात कृष्णेच्या काठावर संध्याकाळ होऊन सामसूम होई; परंतु चर्चा आटोपत नसे. माझी संध्येची वेळही टळे; परंतु प्रायश्चित्त म्हणून माझी जपसंख्याही वाढत असे.

पाश्चात्त्य देशातील स्वातंत्र्यचळवळीतील देशभक्तांच्या कथा कानडेशास्त्री सांगू लागले म्हणजे मध्यरात्रसुद्धा उलटून जात असे. माझे सनातनी मन देशभक्तांच्या कथा व चरित्रे ऐकून बदलू लागले. माझ्या संस्कृत पांडित्याला प्रखर धार येऊ न लागते तोच माझ्या मनाची एकमार्गी दिशा एकाएकी पूर्वेकडून पश्चिमेकडे वळाली. दिनकरशास्त्री कानडे मला म्हणाले की, तू पंचाहत्तर वर्षे मागे आहे. पाश्चात्त्य जग व पाचात्त्य विद्या फार पुढे गेल्या आहेत. पंचाहत्तर वर्षांपूर्वीची गोष्ट सांगतो, ती ऐक. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर पुण्याच्या विश्रामबाग पाठशाळेत भारतीय तर्कशास्त्राचे अध्ययन करीत होते. नीळकंठशास्त्री थत्ते हे त्यांचे गुरू. त्यांनी कृष्णशास्त्र्यांची जुन्या शास्त्रातील प्रगती पाहूनही

त्यांना सावधान होण्याचा खडखडीत इशारा दिला. ते म्हणाले, 'आता संस्कृत विद्येचे दिवस राहिले नाहीत. आता खांद्यावर शालजोडी टाकून समाजात प्रतिष्ठा मिळविण्याचा काळ राहिला नाही. इंग्रजी विद्या ही राजविद्या झालेली आहे.'

नीळकंठशास्त्री थत्ते यांचे उद्‌गार सुनावून कानडेशास्त्री मला पुढे म्हणाले की, तुझी न्याय, शास्त्र, व्याकरणातील घटपटांची खटपट नि सनातनी कर्मकांडाचा कर्मठपणा या देशाच्या उद्धाराला काडीइतकाही उपयोगी पडायचा नाही. माझे निर्वेध असलेले सनातनी विचारावर आधारलेले सश्रद्ध विश्व खूपच हादरले. त्यात पुन्हा त्याच पाठशाळेत उपनिषदांच्या व शांकरभाष्याच्या अध्ययनार्थ येऊन राहिलेले गांधी शिष्य संत विनोबा भावे यांचा मी परिचय करून घेतला. त्यांची प्रखर बुद्धिमत्ता व नितांत अंतर्मुखता फार मोहक व त्यांचे वाक्‌चातुर्य मति कुंठित करणारे वाटले. ते त्यावेळी बावीस वर्षांचे असावेत. त्यांची छाप काही निराळीच होती. त्यांनी मला सुधारकांच्या साहित्य वाचनाची गोडी लावली. मी अगोदर स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जप्त साहित्य गुप्तपणे वाचत होतो. त्यांनी मला आगरकर वाचावयास दिला. रानडे, भांडारकरांची धार्मिक व्याख्याने वाचावयास सांगितली.

आगरकरांचे विचार वाचून मला नवविचार मिळू लागला. आगरकरांचे विचार वाचून मी भौतिकवादी सुधारक बनावयास पाहिजे होतो; परंतु विनोबांनी मला भारतीय अध्यात्मवादाची व गांधीवादाची उज्ज्वल बाजू सांगितल्याने माझ्या मनाची श्रद्धामय घडण घडत गेली. यावेळी स्वामी केवलानंद सरस्वती म्हणजे पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे हे मराठीतील विज्ञानावरील लेख व ग्रंथ वाचून विज्ञानाचे मूळ सिद्धांत सुटीचे दिवशी आम्हास शिकवीत होते. मिल व स्पेंसर यांचे मराठी अनुवाद त्यांनी आम्हास वाचण्यास दिले होते. १९२० ते १९३० पर्यंतच्या कालखंडात आमची संस्कृत पाठशाळा रात्रीची पाठशाळा म्हणून चालवली जात होती. संस्कृत पाठशाळा रात्रीची पाठशाळा बनल्याचे या देशातील हे एकच उदाहरण असावे असे मला तरी वाटते. याच सुमारास महाराष्ट्रात कोल्हापूर येथे श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या छत्राखाली भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली महात्मा जोतीराव फुले यांच्या विराम पावलेल्या सत्यशोधक चळवळीचे पुनरुत्थान झाले.

मी भास्करराव जाधव यांची या चळवळीतील व्याख्याने लक्षपूर्वक ऐकली. भास्កररावांची विवेचन पद्धती मार्मिक होती. मी त्यांचा मित्र बनलो. या चळवळीतील इतरांची भाषणे ब्राह्मण जमातीबद्दलच्या वास्तव व अवास्तव नालस्तीने भरलेली असत. ही नालस्तीची पद्धत मला नापसंत होती, तरी ती ऐकण्यास मला गंमत वाटत असे. मी मात्र प्राचीन धर्मशास्त्राच्या आधारे धर्मसुधारणेचे त्यावेळी समर्थन करीत होतो. त्याबद्दलची वार्ता काशीच्या संस्कृत पंडितांपर्यंत पोहोचली. काशी पंडितांच्या अनेक वादसभांमध्ये समाजसुधारणावादाचे मी अनेकदा संस्कृतमधून समर्थनही केले आहे. १९३२ साली अस्पृयता निवारणाचे शास्त्राधारे समर्थन करणारा धर्मपंडित म्हणून माझे नाव महात्मा

गांधींच्या कानावर येरवडा कारागृहात गेले.

१९२१ साली मला बारडोली आश्रमात महात्मा गांधींचा पवित्र सहवास लाभला होता. त्या ओळखीला आता चांगला उजाळा मिळाला. गांधींशी चर्चा करीत असता अखेरीस मी अशा सिद्धांताला येऊन पोहोचलो, की हिंदुधर्मशास्त्रातील मूलभूत सिद्धांत सामाजिक समतावादास अनुकूल असले तरी धर्मशास्त्रातील जातिभेदाचे समर्थक कायदे जाचक व समतावादाच्या विरोधी आहेत. धर्मशास्त्रांचा आधार समतावादाला पुरा पडत नाही, असे दाखवून दिले व मनाशी असा कबुलीजबाब स्पष्टपणे देऊन मी शुद्ध बुद्धिवादी बनलो. भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत पुष्कळ वर्षे भाग घेत होतो. माझा मन:पिंड शास्त्रीय पंडितांच्या परंपरेतील बौद्धिक चर्चेने पोसला गेल्याने विचारसंघर्षात निरंतर भाग घेत राहिलो. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय मार्क्सवाद व मानवतावाद यांच्या अद्ययावत तात्त्विक भूमिकेचे अध्ययन करणे मला अपरिहार्य नव्हे, अनिवार्य झाले. आंतरराष्ट्रीय वैचारिक संघर्षाच्या व संग्रामाच्या धामधुमीत मी शिरलो. मला १९३७ साली माझे मित्र मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मैत्रीचा लाभ झाला. त्यांची अगाध बुद्धिमत्ता, त्यांच्या मनाची गंभीरता, विश्वव्यापी क्रांतिकारी चळवळीतील वैचारिक नेतृत्व आणि विशेषत: तत्त्व संशोधकत्व या गुणांमुळे मला त्यांच्या सहवासाची धन्यता वाटते. कर्ता तत्त्ववेत्ता कसा असतो, याचे प्रत्यक्ष मला दर्शनच झाले. त्यांच्यापासूनच संकुचित जातीयता व संकुचित राष्ट्रीयता अथवा तशा प्रकारची अभिमानाची भाने नष्ट करणारा व मनोग्रंथी भेदून टाकणारा मानवतावादी विचार मला मिळाला.

या साठ वर्षांच्या काळात जगाच्या इतिहासात फार वेगाने स्थित्यंतरे घडली. ऐतिहासिक घटनांतील फेरबदल इतक्या वेगाने घडून आले की, कधीही घडले नाही ते नि इतके घडले. या काळानेच मला जातिबद्ध हिंदू समाजाच्या जीर्ण पुराणमतवादापासून बुद्धिवादाश्रित मानवतावादाकडे नेले. या काळानेच मला विश्वयात्रा घडवली. मुळात काळाच्या फार मागे असलेला मी काळाच्या अद्ययावत क्षणांवर आता उभा राहिलो आहे.

**(आकाशवाणी, पुणे भाषण, ४ नोव्हेंबर. १९६०)**

OOO

37

# प्राज्ञ पाठशाला की राष्ट्रीय एवं धार्मिक परंपरा

**पूज्य राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद जी, राज्यपाल श्री प्रकाश जी, इस समारोह के अध्यक्ष महाराष्ट्र राज्य के मुख्यमंत्री श्री. यशवंतराव जी चव्हान, तथा सभ्य भाईयों और बहनों,**

हमें अत्यंत आनंद हो रहा है कि, भारत के राष्ट्रपति जी के शुभ करकमलों से केवलानन्दसरस्वती स्वामी महाराज के स्मारक मन्दिर का अपने शुभ करकमलों से उद्घाटन करके हमें बहुतही उपकृत किया है। विद्वानों और विशेषतः विद्यार्थियों को समाजतत्त्व, सामाजिक संस्था, धर्म, संस्कृति और तत्त्वदर्शन इन विषयों के अन्वेषण और अनुसंधान में सुविधा प्राप्त करने के लिये कार्यालय और ग्रन्थालय इस मंदिर में स्थापित किया गया है। इस मंदिर की और भी विशेषता यह है कि स्वामी जी के समाधिस्थान में परम देवता प्रणवाक्षर ओंकार की स्थापना की है, जो स्वामीजी का अन्तिम लक्ष्य और ध्येय हमेशा रहा था। यह स्मारक मंदिर प्रणवमंदिर ही कहा जायगा। और यहाँपर इस बात का विशेष रूपसे निर्देश करना उचित है कि इस मंदिर का निर्माण श्री. यशवंतराव चव्हान महाराष्ट्र के मुख्यमंत्री की सहानुभूति का एक प्रतीक सा माना जायगा। आपका स्वागत करने में हमें और प्राज्ञ पाठशाला मंडल के सदस्यों को बहुत ही हार्दिक संतोष होता है। आपका इस सतारा जिले में बहुत वर्षों के बाद आगमन हुआ है। आपने अपना संपूर्ण जीवन भारत राष्ट्र की सेवा में समर्पित किया है, जिसका निर्देश किये बिना भारतीय स्वतंत्रता का इतिहास नहीं लिखा जा सकता। आज हम सब भारतीय सह मानते हैं कि भारत की राष्ट्रीय विभूति ही भारत के प्रथम राष्ट्रपति बने हैं। ऐसे राष्ट्रीय विभूति का पवित्र चरणस्पर्श इस छोटे वाई नगर को और विशेष कर के हमारी प्राज्ञ पाठशाला मंडल संस्था को हुआ, इसमें हम अपने को धन्य मानते हैं।

श्रीकृष्णा महानदी के तटपर बसे हुए इस वाई क्षेत्र को स्कंदपुराणोक्त कृष्णा माहात्म्य के अनुसार दक्षिण काशी कहते हैं। इसमें अतिशयोक्ति मानने पर भी इस नगर में काशी की एक समानता जरूर नजर आती है कि कई सदियों से इस क्षेत्र में वेदों, वेदांगों और

षड्दर्शनों की अध्ययन-अध्यापन-परंपरा अब तक अखंड प्रवृत्ति है। यहाँ के महाराष्ट्र के भी वेद तथा शास्त्रों के विद्वान अपने अध्ययन की सफलता काशी में जाकर वहीं परीक्षा उत्तीर्ण होनेपर ही मानते आये हैं। एकनाथ भागवत मराठी में वेद सा माना जाता है। संतशिरोमणि एकनाथ महाराज ने भी काशी में जाकर अपने मराठी भागवत का पारायण करके वहाँ के पंडितों की मान्यता संपादित की थी। वाई और काशी के संबंध में और भी एक ऐतिहासिक विशेषता ध्यान में रखने के लिये है कि गत शताब्दि में पाणिनीय व्याकरण के विद्वानों का विद्यावंश, जिसमें पंडित राजारामशास्त्री कार्लेकर, बालशास्त्री रानडे, गंगाधरशास्त्री तेलंग, शिवकुमारशास्त्री, दामोदरशास्त्री भारद्वाज, नित्यानंद पर्वतीय, गंगानाथ झा, मधुसूदन झा इत्यादि राजकीय संस्कृत महाविद्यालय के अध्यापक गिने जाते हैं, वाई के विद्वान् वैयाकरण पं. काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे जी ने प्रवृत्त किया था। काशी में उनके समय श्लेषालंकार से ऐसा कहा जाता था कि काश्यामेक काशिनाथः'।

महाराष्ट्र के संस्कृत विद्यावंश के ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती जी ने संस्कृत विद्या की अध्ययन तथा अध्यापन परंपरा का रक्षण करने के लिये अपना संपूर्ण जीवित ही समर्पित किया था। स्वामी जी ने संस्कृत विद्या के अध्ययन के लिये प्राज्ञ पाठशाला नामक संस्था की स्थापना की है। स्वामी जी ने अपनी संस्कृत पाठशाला को स्वतंत्रता के आंदोलन में लोकमान्य तिलक और महात्मा गांधी जी के पथपर चलाने के उद्देश से राष्ट्रीय पाठशाला में परिवर्तित किया, जिसके लिये दूसरा उदाहरण नहीं मिलता। यही स्वामी जी के कार्य की विशेषता थी। प्राचीन परंपरा से वेद तथा शास्त्रों का अध्ययन-अध्यापन करनेवाले विद्यार्थी और अध्यापकों के सामने स्वामी जी ने राष्ट्र सेवा का आदर्श रख दिया। स्वामी जी बचपन से विरक्त संत और भगवद्भक्त थे। राष्ट्रभक्ति को वे भगवद्भक्ति का ही एक प्रकार मानते रहे। अपने शिष्यों को राष्ट्रभक्ति की दीक्षा देकर उस समय महात्मा गांधीजी के नेतृत्व में चलनेवाले स्वतंत्रता के आंदोलन और विशेषतः अस्पृश्यता-निवारण के आंदोलन में भाग लेने के लिये प्रोत्साहन दिया। स्वामी जी की ऐसी श्रद्धा और धारणा थी कि बदलते देश-काल-परिस्थिति के अनुसार सामाजिक धर्म के शाश्वत सिद्धान्तों का पालन हो सकता है। सन १६३२ में येरवडा कारावास में महात्मा गांधीजी के समक्ष धर्मशास्त्रीय विद्वानों के बीच अस्पृश्यता निवारण के विषय में जो शास्त्रार्थ चला, जिसमें राज्यपाल श्री. प्रकाश जी के महादार्शनिक पिता श्री. भगवानदास जी भी उपस्थित रह कर भाग लेते थे, उसमें महात्मा गांधीजी का समर्थन इस दृष्टिकोन से स्वामी जी ने किया था।

भारतीय संस्कृति के मूल सिद्धान्त और समय समय पर परिवर्तित होनेवाले सामाजिक आचार इन दोनों का परिशीलन करने के लिये अपनी संस्कृत पाठशाला में अन्वेषण कार्य के लिये 'धर्मकोश कार्यालय' की स्थापना स्वामी जी ने की। धर्मकोश का स्वरूप धर्मशास्त्र के विश्वकोश जैसा है, जिसके कुल मिलाकर चौबीस भाग होंगे। इस समय तक धर्मकोश के व्यवहारकांड भाग-३, उपनिषत्कांड भाग-४ और संस्कारकांड भाग-१ प्रकाशित हुए हैं। धर्मकोश कार्य के संपादनकार्य में पांच विद्वानों का संपूर्ण सहयोग मिल रहा है, जो अपना

संपूर्ण समय इसी कार्य में लगाते हैं।

स्वामी जी ने अपनी आयु के बावन वर्ष पर्यन्त ब्रह्मचर्याश्रम समाप्त करके संन्यासाश्रम स्वीकार किया। और इसके बाद अकेले ही स्वयं मीमांसाकोश और अन्य अनेक वेदोपयोगी ग्रंथों की निर्मिति करते रहे। स्वामी जी ने मीमांसाकोष लिखकर पूर्ण किया, जिस के प्रथम चार भाग अब तक प्रकाशित हुए हैं और पाचवाँ भाग आज राष्ट्रपति जी के करकमलों से प्रकाशित होगा।

स्वामी जी ने अपना जीवन श्रमपरिग्रह व्रत से ही बिताया। दोपहर के समय जो भिक्षा मिलती थी उसी के ऊपर अपना जीवननिर्वाह हमेशा करते रहे। पुस्तकों का संग्रह मात्र संस्था के लिये उन्होंने किया है। इस संग्रहमें आज लगभग संस्कृत हस्तलिखित ८ सहस्र, मुद्रित संस्कृत ३ सहस्त्र, मराठी ४ सहस्त्र, हिंदी १ सहस्र, इंग्लिश ४ सहस्र पुस्तकें हैं। अन्वेषण कार्य जैसे बढता जा रहा है वैसे पुस्तकसंग्रह भी बढाना आवश्यक हो रहा है।

प्राज्ञ पाठशाला मंडल संस्था के द्वारा गंभीर विचारों की 'नवभारत' मासिक पत्रिका भी प्रकाशित होती है, जिसने हाल में चौदहवे वर्ष में पदार्पण किया है। इस मासिक पत्रिका में तत्त्वज्ञान, धर्म, सामाजिकशास्त्र और साहित्य पर मराठी विद्वानों के लेख प्रसिद्ध हुआ करते हैं, और संपादनकार्य मुंबई विश्वविद्यालय के रेक्टर प्रा. गोवर्धनदास पारीख बडे परिश्रम से करते हैं।

संस्कृत पाठाशाला के विद्यार्थियों को साहित्य, दर्शन और धर्मशास्त्र विषयों के साथ ग्रामोद्योग भी सिखाया जाता है, जो ग्रामोद्योग की शाखा सुप्रसिद्ध सत्याग्रही श्री. बाबा फाटक चलाते हैं।

प्राज्ञ पाठशाला मंडल का यह संक्षिप्त अहवाल समाप्त कर अध्यक्ष महाराज से आगे की कार्यवाही चलाने की प्रार्थना करता हूँ।

❍❍❍

३८

# भारताच्या ऐक्याची घडण व हिंदू धर्म

भारताच्या एकतेची घडण हजारो वर्षे चालली आहे. ऋग्वेदात भरतनामक मानववंशाचे अनेक निर्देश सापडतात. 'विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम्' हे विश्वामित्राचे स्तोत्र भारत जनाचे रक्षण करते असा एका मानव समुदायाचा भारतजन म्हणून उल्लेख स्पष्ट रूपाने तेथे आलेला आहे. भारतवर्ष ही भौगोलिक संज्ञा अनेक महापुराणांच्या भूगोलात एका विशाल भूप्रदेशाच्या बोधार्थ वापरलेली दिसून येते. भारताच्या भौगोलिक एकतेची कल्पना फार प्राचीन आहे. ही गोष्ट 'भारतवर्ष' या नामनिर्देशनावरून आपोआप सिद्ध होते, कारण एक शब्दही एक कल्पना दर्शित करीत असतो.

भारत देशाचे हे प्राचीन भौगोलिक ऐक्य अनेक उदात्त भावनांच्या भव्य वलयांनी गुंफलेले आहे. भारतीय संस्कृतीतील एक मूलभूत सनातन मूल्य किंवा सनातन श्रद्धा या वलयांच्या निर्मितीस कारण आहे. निसर्ग किंवा निसर्गातील शक्ती जड नसून चेतन आहे. ते चैतन्य पावित्र्याचे व सौंदर्याचे निधान आहे अशी श्रद्धा भारतीय संस्कृतीने युगानुयुगे जतन करून ठेवली आहे. सूर्यचंद्रादी आकाशस्थ ज्योती, अंतरिक्षातील वायू, पर्जन्य आणि पृथ्वीवरील नद्या, पर्वत, समुद्र, वन, वृक्ष इत्यादी पदार्थ चेतन व पवित्र अशा शक्तींची रूपे होत. असा भाव धर्मग्रंथांनी, साहित्याने व तत्त्वज्ञानाने बळकट करून ठेवला आहे. पृथ्वी व बाकीचे विशाल विश्व यांच्यातील दिव्य चैतन्य पाहणाऱ्या भारतीय द्रष्ट्याला स्वत:च्या अगदी निकट अशा भूप्रदेशात या पवित्र चैतन्याचे अधिक प्रकट असे भान होणे हे क्रमप्राप्तच आहे. निसर्ग हा दिव्य व पवित्र आहे व त्या निसर्गाचे दर्शन मला ज्या केंद्रावरून होते ते केंद्र म्हणजे भारत होय. कारण अशा प्रकारचे दर्शन घेण्याचे सामर्थ्य प्रगल्भ व परिणत अशा संस्कृतीच्या परंपरेचे संस्कार असले तरच अधिक शक्य. कारण हा संस्कृतीतील दीर्घकालीन चिंतन व मननातून निर्मिलेला असा दृष्टिकोन केवळ वैयक्तिक असू शकत नाही. ही केवळ कविकल्पना नाही. ती सर्व दीर्घकालीन इतिहासाने निर्मिलेल्या श्रद्धांचे फळ आहे. या संस्कृतीचे ऐतिहासिक कार्य ज्या भूप्रदेशात घडले तोच भारतवर्ष होय.

विष्णुपुराणात असे म्हटले आहे की, भारतवर्षाच्या भूभागात जे जन्माला येतात ते धन्य होत. ही भारतवर्षाच्या पावित्र्याची कल्पना अत्यंत समृद्ध आहे. समृद्ध म्हणण्याचे कारण भारतातील पर्वत, नद्या, ग्रामे व नगरे हीसुद्धा पावन तीर्थे होत. असा आशय पुराणकथा व इतिहास यांनी भारताच्या पावित्र्याच्या कल्पनेमध्ये अंतर्भूत केला आहे.

ऋग्वेदात (१०-७५) सिंधू नदीचे स्तवन करणाऱ्या सूक्तात काबूलची कुंभा व पंजाबमधील किंवा उत्तरापथातील सिंधू, वितस्ता (झेलम), परुष्णि (रावी), शुतूद्री (सतलज), यमुना, गंगा, सरस्वती, आसिक्नी (चिनाब) इत्यादी नद्यांचा महिमा गायला आहे. ऋग्वेदाच्या खिल सूक्तातील एका ऋचेत असे म्हटले आहे, 'शुभ्र व अशुभ्र अशा सरिता जेथे संगम पावतात तेथे निमज्जन करणारे जन स्वर्गात उड्डाण करतात.' हे प्रयागजवळील गंगा-यमुनांच्या संगमाचे माहात्म्य वर्णिले आहे. ऋग्वेदातील नद्यांचा परिसर सिंधूपासून गंगेपर्यंतचा आहे. म्हणजे ऋग्वेदकाळातच फार मोठा भूप्रदेश भक्तीचा विषय बनला होता. ही नद्यांची भक्ती उपजणे अगदी स्वाभाविक आहे. कारण प्राचीन संस्कृतींची उत्पत्ती व वाढ महानद्यांच्या परिसरातच झाली. मानवाचे जन्मदारिद्य्र नष्ट करून सुख-समृद्धीचे युग नद्यांच्या आसपास निसर्गाने निर्मिलेल्या सुपीक जमिनीवरच प्रथम उदय पावते. सर्व नद्यांच्यामध्ये गंगा अधिक पवित्र. गंगेसारखे काहीच पवित्र नाही. तिच्या तीरावरील व प्रवाहातील सर्वच वस्तू, मानव, पशू, वृक्ष, पक्षी, पाषाण, मृत्तिका इ. पवित्र! तिच्या तीरावर वा प्रवाहात पशू, पक्षी, मत्स्य वा कच्छप म्हणून जन्म आला तरी तो अन्यत्र जन्मलेल्या व राहिलेल्या नृपतीपेक्षा श्रेयस्कर होय, असे वाल्मीकी मुनी गङ्गाष्टकात म्हणतात. 'त्वत्तीरे तरुकोटरान्तरगतो गङ्गेविहङ्गो वरं । त्वन्नीरे नरकान्तकारिणि वरं मत्स्यो भवा कच्छप:।' या भारतीय संस्कृतीचा विस्तार गंगा-यमुनांच्या उत्तरापथाच्या बाहेर म्हणजे दक्षिणापथात जेव्हा होऊ लागला तेव्हा गंगेचे माहात्म्य दक्षिणेकडील महानद्यांच्यामध्येही या मानवांना दिसू लागले. म्हणून नर्मदा, गोदावरी, कृष्णा, कावेरी यांनाही त्यांच्या तीरावरील गंगाच म्हणू लागले. 'सर्वा गंगा महानद्या:' सर्वच महानद्या गंगा होत असे पुराणे म्हणू लागली. प्रत्यक्ष गंगा जेथे बंगालच्या उपसागरात मिळते त्याही प्रदेशाचे पावित्र्य स्थापित करण्याकरता पुराणांनी भगीरथाची कथा सांगितली, म्हणजे हे पावित्र्य नद्यांकडून सागरास जाऊन मिळाले.

दुर्गेने भारतातील अनेक दुर्गम पर्वत, उमामहेश्वरांनी हिमालय, रामाने चित्रकूट, परशुरामाने सह्य व मलय व विष्णूने हिंदी महासागर यांना तीर्थस्थान बनविले. आंध्र, तामिळनाडू, केरळ या हिमालयापासून दूर असलेल्या प्रांतातील शिवभक्त हिमालयाची यात्रा आयुष्यात केव्हातरी व्हावी अशी मनीषा बाळगून जगत असतो. 'काशीस जावे नित्य वदावे', अशी मराठी माणसाची म्हण आहे. कृष्णा-गोदावरीत किंवा कावेरी-तुंगभद्रेत बुडी मारणारा भाविक शत योजनांवरील गंगेचे स्मरण करीत पावन होण्याची महत्त्वाकांक्षा घोषित करीत असतो. ही शेकडो व सहस्रावधी पिढ्यांची सर्व भारतीयांची परंपरा आहे. ही देवभक्ती आहे

तशी देशभक्तीही आहे. देवभक्तीनेच देशभक्तीचे पोषण केले आहे. काशी, प्रयाग व गया ही त्रिस्थळी झाल्याशिवाय मोक्षाची द्वारे उघडली जात नाहीत.

पुराणातील देवतांच्या चरित्रांनी, रामायण कथेने व महाभारत कथेने सर्व भारतामध्ये सर्व प्रांतांत पवित्र तीर्थे निर्माण केली. अयोध्येपासून सेतुबंध रामेश्वरापर्यंत असलेला प्रदेश ही रामकथेची रंगभूमी आहे. रामकथेने गोदावरीला गंगेचे पावित्र्य अर्पण केले आहे. महाभारतातील व भागवतातील कृष्णाच्या, पांडवांच्या, ऋषिमुनींच्या कथा हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशात ऋषिमुनींची तपोवने व वीरांची शौर्यस्थळे चित्रित करतात. मथुरेपासून सौराष्ट्रातील द्वारकेपर्यंत पश्चिमेकडे आणि हस्तिनापुरापासून जरासंधाच्या नगरीपर्यंत पूर्वेकडे कृष्णचरणांनी पावन झालेला भारत भागवतात व भारतात दिसून येतो. कृष्णकथेने या प्रदेशाचे पावित्र्य पिढ्यान् पिढ्या ठसविले आहे. भृगुकच्छापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला पश्चिम समुद्रावरील किनारा ही भार्गवरामाची तपोभूमी म्हणून पुराणांनी गायिलेली आहे.

भूप्रदेशाची भक्ती शिकविणे हेच प्राचीन पुराणेतिहासाचे एक महत्त्वाचे प्रयोजन आहे. त्याचा उगम वेदांत आहे. विशेषत: अथर्ववेदातील पृथ्वीसूक्त या भूभक्तीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगता येते.

**सत्यं बृहदृतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्मयज्ञ: पृथिवीं धारयन्ति**
**सा नो भूतस्य भवस्य पत्न्युरुं लोकं पृथिवी न: कुणोतु**
**असंबाधं बध्यतो मानवानां यस्या उद्वत: प्रवत: समं बहु**
**नानावीर्या औषधीर्या विभर्ति पृथिवी न: प्रथतां राध्यतां न:**
**यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन्**
**गवामश्वानां वयसश्च विष्ठा भगं वर्ष: पृथिवी नो दधातु**
**यार्णवे धि सलिलमग्न आसीद्यां मायाभिरन्वचरन्मनीषिण:**
**यस्या - हृदयं परमे व्योमन् सत्येनावृतममृतं**
**पृथिव्या: सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे ।**

सत्य, सूक्त, कडक नियम, व्रत, तप, ज्ञान व यज्ञ ही पृथ्वीचे धारण करतात. भूत व भविष्य यांची स्वामिनी पृथ्वी आम्हास मोठा आश्रय देवो. मानवांना अडचण न होता एकत्रित संबंधित राखणारी, उंचसखल, बहुत प्रदेशांची व अनेक सामर्थ्ये असलेली धान्ये धारण करणारी भूमी आमचा विस्तार करो; आम्हास सुखी करो. जिच्या ठिकाणी मानव पूर्वजांनी पराक्रम केले, देवांनी असुरांचा पराभव केला, गायी, अश्व व पक्षी यांचा आश्रयस्थान असलेली ही पृथ्वी भाग्य व तेज आमच्यात ठेवो. जी पूर्वी समुद्रातील जलात जन्मली, जिची सेवा विचारवंतांनी कलांच्या द्वारा केली, ज्या पृथ्वीचे हृदय उच्चतम स्वर्गात आहे व जिच्यातील अमृत सत्याने झाकले ती आमची भूमी उत्तम राष्ट्रामध्ये बल व तेज ठेवो.

भारतातील सर्व धर्मांच्या व पंथाच्या जनसमुदायांना किंवा सामाजिक गटांना एकत्र शेजारधर्माने राहण्यास आवश्यक अशी औदार्याची भावना भारतीय तत्त्वज्ञानाने निर्माण केली. हे अतिशय प्राचीन तत्त्वज्ञान आहे. भू-प्रदेशाची भक्ती करावयाची म्हणजे त्या भू-प्रदेशातील मृत्तिका, वृक्ष, वनस्पती, पर्वत, नद्या, प्राणिसृष्टी आणि मानव या सर्वांचा अंतर्भाव होतो. त्यांच्यातील भेदभाव हाही त्या भू-प्रदेशांचा वैभवाचाच भाग ठरतो. त्यातील सर्व काही पवित्र ठरते; देवता-भेद, उपासना-भेद, आचार-भेद हेसुद्धा पवित्र ठरतात. भगवद्गीतेमध्ये या सर्व पंथभेदांचे समन्वय करणारे तत्त्वज्ञान 'विभूतिवाद' म्हणून आले आहे. ज्या ज्या ठिकाणी काही तेज, सौंदर्य वा उज्ज्वलता दिसते ते ते माझेच स्वरूप आहे अशा तऱ्हेचे आश्वासन भगवान श्रीकृष्ण अर्जुनास देतो. परंपरागत हिंदू धर्माच्या बाहेरील देवतांची भक्ती करणारे, अविधिपूर्वक का होईना, माझीच भक्ती करतात, असा निर्वाळा भगवान देतो.

भगवद्गीतेतील विभूतिवादाचा आधारभूत सिद्धान्त उपनिषदांतील अद्वैतवाद होय. या अद्वैतालाही आधार ऋग्वेदापासून मिळतो. 'एक सत् विप्रा बहुधा वदन्ति ।' अग्नी, यम, मित्र, वरुण, सूर्य इत्यादी देव निराळे जरी ऋषींनी स्तविले आहेत तरी ते सर्व एकच सत् होय.

सर्व धर्मांच्या समन्वयाची पार्श्वभूमी वेदांत व वेदान्त तत्त्वज्ञानात प्रथमपासून तयार झालेली आहे. वैदिक धर्माबरोबर भारतात महतीस प्राप्त झालेले प्राचीन धर्म म्हणजे जैन व बौद्ध होत. बुद्ध व तीर्थंकर यांनी सर्व-धर्मसमन्वयाला अप्रत्यक्ष रीतीने पाठिंबा दिला. नीति-धर्माचे स्थान सर्वात उच्च होय असे सांगून अहिंसा, सत्य, अस्तेय, इंद्रियसंयम किंवा ब्रह्मचर्य व अपरिग्रह या किंवा अशा पंचशीलांचे जो परिपालन करतो तोच महात्मा होय असे ते धर्म सांगतात. मनोनिग्रह व भूतदया हेच धर्माचे परमरहस्य होय असा विचार जैन व बौद्ध या धर्मांनी प्राधान्याने मांडला. त्याचा परिणाम म्हणजे धर्मभेद व पंथभेद यांचे महत्त्व कमी लेखण्यात आले. धार्मिक व सांप्रदायिक वैर वाढून धार्मिक युद्धात त्याचे पर्यवसान भारताच्या इतिहासात घडले नाही. धर्मयुद्ध हा शब्द प्राचीन साहित्यात येतो. त्याचा अर्थ भिन्न धर्मीयांचे स्वत:च्या धर्मसंप्रदायाचे महत्त्व स्थापित करण्याकरिता किंवा भिन्न धर्मीयांचा नि:पात करण्याकरिता होणारे युद्ध, असा नाही. धर्मयुद्ध म्हणजे न्याय्य पद्धतीने करावयाचे युद्ध होय किंवा युद्धाचे शिष्टसंमत नियम पाळून केलेले युद्ध होय. ज्यू, ख्रिश्चन व मुसलमान धर्माच्या इतिहासात अन्य धर्मीयांच्या नाशार्थ युद्धे वारंवार झालेली आहेत असे मानवजातीचा इतिहास सांगतो; परंतु भारतात जे धर्म निर्माण झाले किंवा उदय पावले त्या धर्मांच्या इतिहासात अशा प्रकारची धार्मिक युद्धे झालेली दिसत नाहीत याचे कारण वैदिक, जैन व बौद्ध हे जे भारतातील उन्नत धर्मपंथ आहेत त्यांच्यामध्ये अन्य धर्मविद्रोहाची भावना निर्माणच होऊ शकत नाही.

तात्पर्य, भारताच्या एकराष्ट्रीयत्वाची घडण ज्या प्राचीन काळापासूनच्या येथील संस्कृतीने केली आहे, त्यातील मूलभूत तत्त्व विभिन्नता व वैचित्र्य यास मान द्यावयास



वाय १७४–२५

शिकविते. भारतीय एकतेची निर्मिती करणारी मूलभूत तत्त्वे किंवा मूल्ये ही कोणत्याही राष्ट्रातील संस्कृतीच्या परंपरेत सापडत नाहीत. निदान अन्य राष्ट्रांतील संस्कृतीवर या श्रेष्ठ मूल्यांचा प्रभाव पडलेला नाही. भारतीय एकतेची निर्मिती करण्यात भूप्रदेशाच्या पावित्र्यावरील श्रद्धा आणि सर्वधर्मसमन्वयाची दृष्टी यांचा मोठा वाटा आहे.

सर्वधर्मसमन्वयाच्या तत्त्वाने भिन्न धर्मीय समाजांना एकाच सहकार्याच्या जीवनात गोवणे हाच भारतीय संस्कृतीचा हेतू आहे. सर्वधर्मसमन्वयाचे वर्णन वैष्णवांच्या एका सुप्रसिद्ध प्रार्थनेत सुरेख रीतीने आले आहे. ती प्रार्थना अशी :-

**यं शैवाः समुपास्ते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो ।**
**बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैयायिकाः ॥**
**अर्हन्नित्यच जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः ।**
**सोयं वो विदधातु वांछितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥**

याचा अर्थ :-

'ज्याची शैवलोक शिव म्हणून, वेदान्ती ब्रह्म म्हणून, बौद्ध बुद्ध म्हणून, तर्कशास्त्री नैय्यायिक विधाता म्हणून, जैन अर्हत् तीर्थंकर म्हणून, मीमांसक कर्म म्हणून उपासना करतात तो हरी तुमची इष्ट कामना पूर्ण करो.' ही प्रार्थना मुसलमान व ख्रिश्चन लोक भारतात प्रभावीपणे नांदू लागण्याच्या पूर्वीची असावी. या प्रार्थनेत जी तत्त्वदृष्टी सूचित केली आहे, तिच्या अनुरोधानेच अशी भर या प्रार्थनेत घालावी की पुन: श्लोक असा -

**यं शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदन्तिनो ।**
**बौद्धा बुद्धपदे कुराणशरणा अल्लेति माहंमदाः ॥**
**आकाशस्थपितेति ख्रिस्तनिरता जैना विरागं मुनिम् ।**
**सोयं वो विदधातु वांछितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥**

ज्याची आकाशस्थापिता म्हणून ख्रिश्चन व सर्वाधिपती अल्ला म्हणून मुसलमान उपासना करतात तो हरी इष्टकामना पूर्ण करो.

**(आकाशवाणी, पुणे केंद्र, दि. २३-१०-१९६१)**

OOO

३९

# पंचांग विद्या सर्वांगीण बनली जावी

माननीय ज्योतिर्विद् व अन्य सभ्य बंधुभगिनींनो

ज्योतिर्विद्या मंडळ, मुंबई या संस्थेच्या विद्यमाने भरणाऱ्या महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदेच्या अध्यक्षपदाचा बहुमान मला दिला याबद्दल ज्योतिर्विद्या मंडळाचे मी मन:पूर्वक आभार मानतो. या अध्यक्षपदी एखादा थोर ज्योतिर्विद्याविभूषित विराजमान झाला असता तर अधिक उचित झाले असते. धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांचा अविभाज्य संबंध असल्यामुळे माझ्यासारख्या धर्मशास्त्राच्या विद्यार्थ्याला हा बहुमान देण्याची कल्पना मंडळाला सुचली असावी. वस्तुत: ही गोष्ट येथे नमूद करणे माझे कर्तव्य आहे की, मी या मानास स्वत:ला पात्र समजत नाही. केवळ ज्योतिर्विद्या मंडळाच्या विनंतीला मान देण्याकरताच हा मान मी स्वीकारला आहे.

या परिषदेची 'महाराष्ट्र राज्य ज्योतिष-परिषद' ही संज्ञा जरी नवी असली तरी हिची परंपरा जुनी आहे. हे येथे प्रथम लक्षात ठेवले पाहिजे की, दृक् प्रत्ययाशी व पाश्चात्त्यांच्या प्रगत आधुनिक ज्योतिषाशी जुळणारे पंचांग तयार करावे ही चळवळ टिळकांनी प्रारंभिली. शके १८२६ (इ.स. १९०४) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय ज्योतिर्विद् संमेलन भरले होते. त्यानंतर सुमारे १२ वर्षांनी म्हणजे शके १८३९ (इ.स. १९१७) च्या आश्विन महिन्यात पुन: पंचांग संशोधन परिषद लोकमान्य टिळक यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या ज्योतिर्विचारणी सभेतर्फे भरविण्यात आली. त्यात शुद्ध पंचांग प्रवर्तक कमिटी स्थापन करण्यात आली. त्या कमिटीचे अध्यक्ष लो. टिळक, उपाध्यक्ष प्रा. वि. व. नाईक व चिटणीस पं. रघुनाथशास्त्री हे होते. पुढे शके १८४१ (इ.स. १९१९) च्या माघ महिन्यात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसरे ज्योतिष-संमेलन सांगली येथे झाले. त्याचे नेतृत्व लो. टिळकांकडेच होते. त्यानंतर इ.स. १९३५ मध्ये इंदूर येथे पं. मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली इ.स. १९४६ मध्ये अकोला येथे पत्रकार

अमृतलाल शेठ यांच्या अध्यक्षतेखाली आणि इ.स. १९५४ मध्ये जळगाव येथे प्रख्यात ज्योतिर्विद् व पंचांगकर्ते पं. कृष्णाजी विठ्ठल सोमण यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. माझ्या माहितीप्रमाणे ज्योतिर्विदांचे हे सातवे संमेलन भरत आहे. सामुदायिक रीतीने पंचांग सुधारणेच्या प्रयत्नांतील हा सातवा टप्पा आहे असे म्हणता येईल. 'सतां साप्तपदीनं मैत्रम्' या न्यायाने आधुनिक काळातील गणित-ज्योतिषाची प्रगती व भारतीय परंपरागत ज्योतिर्विद् यांची पूर्ण मैत्री झाल्याची खूणगाठ पक्की झाल्याचे दर्शन या परिषदेत होईल अशी मी आशा करतो.

पंचांग सुधारणेच्या प्रयत्नात महाराष्ट्र हा किंवा महाराष्ट्रीय हा गेल्या शतकात अग्रेसर राहिला आहे असे म्हटले तर प्रांतांतील थोर पंडितांना हे ऐतिहासिक सत्य आहे ही गोष्ट मान्य करावी लागेल. गेल्या शतकातील काशी येथे प्रसिद्धीस आलेले पंडित बापुदेवशास्त्री यांनी स्वत:चे पंचांग इंग्लिश नॉटिकल आल्मनॅकवरून तयार केले होते. त्यांना सायनगणना मान्य होती; परंतु केवळ लोक-विरोध टाळण्याकरता शके १७९८ (इ.स. १८७६) सालापासून काशी येथे ते निरयन पंचांग छापू लागले होते. दृक् प्रत्ययास जमणारे दृक-गणित पंचांग मद्रास येथील रघुनाथाचार्य यांनी शके १७९१ (इ.स. १८६९) पासून सुरू केले. त्यांच्यात सूर्यसिद्धांताशी मेळ घातला होता असे कै. शं. बा. दीक्षित यांनी म्हटले आहे. पंडित बापुदेवशास्त्री व रघुनाथाचार्य यांच्याही पूर्वी के. ल. छत्रे यांनी पंचांग सुधारण्याचा प्रयत्न केला. शके १७८७ (इ.स. १८६५) पासून केरोपंती अथवा पटवर्धनी पंचांग सुरू झाले. सुप्रसिद्ध गणितज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचे हे पंचांग होते व आबासाहेब पटवर्धन यांनी त्यांच्याकरिता द्रव्यव्यय केला होता. रत्नागिरी येथील जगन्मित्र छापखान्याचे मालक श्री. जनार्दन हरी आठले यांना केरोपंती पंचांगाचा अभिमान असल्यामुळे ते स्वत:च्या खर्चाने शके १७९१ ते शके १८११ पर्यंत रत्नागिरी येथे ते पंचांग छापून काढीत. शके १८१२ पासून पुणे येथील चित्रशाळेचे मालक कै. वासूकाका जोशी हे त्या पंचांगाचे प्रकाशक झाले. त्यामुळे त्याला 'चित्रशाळा-पंचांग' असे लोक म्हणू लागले. शुद्ध सायन पंचांग छापण्याची कल्पना विसाजी रघुनाथ लेले, जनार्दन बाळाजी मोडक व शंकर बाळकृष्ण दीक्षित या तिघांनी काढली. शके १८०४ व १८०५ साली ठाणे येथील 'अरुणोदय' पत्राच्या संपादकांनी सायन पंचांगाचे पंधरवडे प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. पुढे शके १८०६ पासून तुकोजीपंत होळकर यांच्या आश्रयाखाली सायन पंचांग प्रसिद्ध होऊ लागले. शके १८१० पासून बरीच वर्षे कै. शं. बा. दीक्षित हे सायन पंचांग स्वखर्चाने प्रसिद्ध करीत होते.

दृक्-प्रत्ययास धरून व आधुनिक पाश्चात्त्य सूक्ष्म ज्योतिषशास्त्रास अनुसरून भारतीय ज्योतिषशास्त्राची परंपरा पुढे चालू ठेवावी यात आता मतभेद राहिलेला नाही. पंचांगसुधारणेची कल्पना आता पचली आहे. भारतीय परंपरा व आधुनिक प्रगती यांचा पूर्ण समन्वय करण्याचा हा काळ आहे. हा समन्वयाचा काळ येण्यास महाराष्ट्रातील फार मोठ्या

ज्योतिर्विदांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. केरोपंत छत्रे, शंकर बाळकृष्ण दीक्षित, व्यं. बा. केतकर, के. ल. दप्तरी इत्यादी मोठमोठ्या पंडितांचे परिश्रम या समन्वयास कारण झाले आहेत. दप्तरींच्या दोन पिढ्या व केतकरांच्या तीन पिढ्या ज्योतिर्विदांच्या झालेल्या दिसतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इ.स. १९५२ मध्ये केंद्र सरकारने पंचांग-सुधारणा समिती नेमली. त्या समितीने जे निर्णय केले त्यांच्या अनुसाराने राष्ट्रीय पंचांग निघण्यास सुरुवात झाली आहे. हे अखिल भारतीय राज्यमान्य पंचांग प्रत्येक प्रादेशिक भाषेत निघू लागले आहे. त्याला लोकमान्यता प्राप्त व्हावी म्हणून प्रत्येक प्रांतातील ज्योतिर्विदांनी प्रसाराचे कार्य केले पाहिजे. या बाबतीत व्हावी तशी प्रगती होत नाही याचे एक महत्त्वाचे कारण सरकारी दप्तराची दिरंगाई होय. राज्यमान्य पंचांग बाजारात वर्षारंभापूर्वी एक महिनाभर तरी उपलब्ध व्हावयास पाहिजे. पंचांग हे विशिष्ट कालज्ञान मिळविण्याचे मुख्य साधन होय. ते साधन लोकांच्या हाती पडण्यातच कालातिपात होतो. म्हणजे कित्येक महिने निघून जातात तरी सरकारचे पंचांग बाजारात मिळू शकत नाही अशी तक्रार ऐकू येते. अशी तक्रार अनेक ज्योतिर्विदांनी केलेली माझ्या ऐकण्यात आहे. संबंधित राजकीय कर्मचाऱ्यांच्या ध्यानात काळ थांबत नसतो हे सर्व बाबतीत आले पाहिजे.

ज्योतिषशास्त्राची उत्पत्ती माणसाच्या अत्यंत मूलभूत अशा कालज्ञानाच्या गरजेतून झालेली आहे. सर्व मानवी कर्मे किंवा कर्तव्ये ही योग्य काली घडली तरच योग्य फलदायी होतात. विशिष्ट काल व विशिष्ट कर्म यांचा संबंध अविभाज्य आहे, म्हणून माणूस काळाचे रूप सांगोपांग समजण्याचा प्रथमपासून प्रयत्न करू लागला. त्याच्याकरिता आकाशातील प्रकाशपुंजांचे ज्ञान आवश्यक साधन म्हणून मानवास उपयोगी पडू लागले. कालाचे मोजमाप करण्याचे मुख्य साधन म्हणजे आकाशातील ज्योतींची स्थितिगती होय. या स्थितिगतीचे ज्ञान सूक्ष्म तऱ्हेने होण्याकरता कालाचे सूक्ष्मच्छेद पाडून माणूस मोजू लागला. हे मोजमाप म्हणजेच अंकगणित होय. ज्योतिषशास्त्र व गणित ही जुळी भावंडे होत.

शास्त्रांच्या किंवा विज्ञानाच्या इतिहासातील पहिले शास्त्र किंवा आद्य शास्त्र ज्योतिषशास्त्र होय. ज्योतिषशास्त्र हे विविध विज्ञानांमध्ये पहिल्यांदा जन्माला आलेले म्हणजे विज्ञानांचा ज्येष्ठ सहोदर होय. या सहोदराच्या पाठीमागून लगेच जन्मलेला बंधू म्हणजे गणित होय. गणित हे सर्व विज्ञानांचे अधिष्ठानभूत शास्त्र आहे.

प्राचीन भारतातील ज्योतिषाची व गणिताची वाढ एकमेकांना उपकारक अशी झाली आहे. भारतीय ज्योतिर्वेत्त्यांतील सर्वश्रेष्ठ शिरोमणी भास्कराचार्य यांनी ज्योतिर्विद्या आणि गणितविद्या या एकाच सिद्धान्तशिरोमणी या ग्रंथात गोवल्या आहेत. हे या दोन शास्त्रांच्या उत्पत्तीचे व विकासाचे परस्परसंबंध कसे आहेत याचे सूचक होय. ज्योतिषशास्त्राचे साधारणपणे ज्योतिर्विषयक गणितशास्त्र व ज्योतिर्विषयक अवलोकन करून निष्पन्न झालेले खगोलविषयक विचार असे दोन भाग होत. ज्योतिर्गणित अवलोकनावर आधारलेले आहे.

अर्वाचीन काळी स्वस्थ ज्योतींचे ज्ञान करून देणारी अत्यंत प्रभावी अशी यंत्रसामग्री तयार करण्यात आली आहे. ही यंत्रसामग्री हळूहळू प्रगत होत गेली आहे. ती प्राचीन काळी उपलब्ध नव्हती.

केवळ दृक-प्रत्ययाचा उपयोग करून प्राचीन काळी ज्योतिर्विषयक अनुमाने केली जात. अशा अनुमानांनीच प्राचीनांनी आपले शास्त्र सजविले आहे. प्राचीन संशोधकांनी दृक-प्रत्ययास साधनीभूत अशी प्राथमिक अवस्थेतील यंत्रे निर्मिण्यास सुरुवात केली. प्राचीन संशोधक ग्रहवेधांकरिता यंत्रांचा उपयोग करू लागले. तुरीय यंत्र, गोलयंत्र, चक्र यंत्र, नाडीवलय, घटिका, शंकु, फलक, चाप, यष्टियंत्र अशी मुख्यत: नऊ यंत्रे भास्कराचार्यांनी यंत्राध्यायात वर्णिली आहेत. चक्रयंत्र, चाप व तुरीययंत्र यांचा मुख्यत: वेधाकडे उपयोग आहे. गोलयंत्रावरून ब्रह्मांड गोलाची रचना कळून येते. ब्रह्मगुप्त, लल्ल व आर्यभट यांनी गोलबंध सांगितले आहेत. रविचंद्रांचे अंतर व त्यावरून तिथी काढण्यास उपयोगी पडणारी साधने ब्रह्मगुप्ताने व लल्लाने सांगितली आहेत. पंचसिद्धान्तिकेत वराहमिहिरानेही यंत्राचे प्रकार वर्णिले आहेत. प्राचीन काळी ज्योतिर्निरीक्षण करण्याकरता निरनिराळे राजे-रजवाडे यांच्या आश्रयाखाली ठिकठिकाणी वेधशाळा बांधल्या जात होत्या. जयसिंहाने बांधलेल्या दिल्ली, जयपूर, मथुरा, काशी, उज्जयिनी येथल्या वेधशाळांची माहिती त्याने स्वत:च्या ग्रंथांत दिली आहे. यापैकी चार वेधशाळांचे वर्णन हंटरने इ.स. १७९९ मध्ये समक्ष पाहून एशियाटिक रिसर्चेसमध्ये केले आहे. काशी येथील वेधशाळेचे वर्णन पं. बापूदेवशास्त्री यांनी मानमंदिरस्थ यंत्रवर्णन या लेखात दिले आहे.

प्रत्यक्ष, अनुमान व शास्त्रग्रंथ या तिघांचीही शास्त्रवाढीस सारखीच मदत होत असते. प्रत्यक्ष हे प्रमाण एका अर्थाने सर्वश्रेष्ठ प्रमाण होय. भारतीय तर्कशास्त्रांत प्रत्यक्ष हे सर्व प्रमाणात प्रबल प्रमाण म्हणून मान्य केले आहे. श्री आद्य शंकराचार्यसुद्धा प्रत्यक्ष व श्रुती यांचा विरोध आला तर प्रत्यक्षच प्रमाण ठरते, श्रुती नव्हे; असे आहत्य प्रतिपादितात. नहि श्रुतिशतमपि अग्नि: शीत: इति ब्रुवत् प्रामाण्यं उपैति । अग्नी थंड आहे असे शंभर श्रुती वचनांनी म्हटले तरी ते प्रमाण ठरत नाही, असे त्यांनी म्हटले आहे. भारतीय प्रमाणविद्येचा व पूर्वमीमांसेचा असा सिद्धांत आहे की, प्रत्यक्ष व अनुमान म्हणजे तर्क यांनी बाधित जे होत नसेल तेच श्रुतीचे प्रतिपाद्य होय व तेच श्रुती प्रतिपादन प्रमाण होय. हा दृष्टिकोन विशेषत: इंद्रियगम्य अशा भौतिक सृष्टीच्या नियमांचे ग्रथन करणाऱ्या ज्योतिषशास्त्रास अधिक लागू आहे. प्रत्यक्ष प्रयोग व तर्क यांचाच हा विषय होय. प्रत्यक्षाने व तर्काने सिद्ध झालेले नियमच गणित-ज्योतिषशास्त्रांचा विषय होय. या शास्त्रांत शब्दप्रामाण्य हे महत्त्वाचे नव्हे, ते दुय्यम होय. भारतीय ज्योतिषशास्त्राची प्रगती अनेक शतके खुंटली याचे कारण प्रत्यक्ष संशोधन करण्याची प्रवृत्ती मंदावली हे होय. भारतीयांनी गणित, ज्योतिष, वैद्यक इत्यादी विद्यांच्या रूपाने प्राचीन काळी जगाला फार मोठी देणगी दिली आहे. परंतु तो प्रगतीचा वेग सतत

टिकला नाही याचे कारण ग्रंथप्रामाण्याला किंवा शब्दप्रामाण्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिले गेले हे होय. प्रत्यक्ष वेध घेऊन शोध करीत बसण्यापेक्षा प्राचीन ग्रंथांवर टीका व उपटीका लिहिण्यातच फार मोठे परिश्रम करण्यात पंडितांनी आपला काळ घालविला आहे. भास्कराचार्यांच्या ग्रंथांवर झालेल्या ३०/३५ टीकाग्रंथांची नोंद सापडते. जुन्या ग्रंथकारांनी शोधलेल्या सिद्धांताच्यापुढे अधिक शोधण्याची प्रवृत्ती म्हणजे जुन्याच्या पुढे जाण्याची प्रवृत्ती प्रकटपणे व उत्कटपणे प्राचीन विद्वानांत फार थोड्यांच्या ठिकाणी आढळते. आपल्या पूर्वीचा प्राचीन थोर ग्रंथकार चुकू शकतो अशी कल्पना ज्या पंडिताच्या ठिकाणी होती त्यांनीच शास्त्रात भर घातली आहे.

पहिल्या आर्यभटापासून (इ.स. ५००) तो भास्कराचार्या (इ.स. ११५०) पर्यंतचा काळ भारतीय ज्योतिषशास्त्राचा पूर्ण भरभराटीचा काळ होय. या काळात जी प्रगती झाली त्याचे कारण स्वबुद्धीने आणि वेध घेऊन शोध लावावे व सारासार विचार करून पूर्वसूरींचे ग्राह्य विचार कोणते व अग्राह्य विचार कोणते याबद्दल स्पष्ट व निर्भीड विचार मांडावे असा दृष्टिकोन पंडितांनी स्वीकारला होता. पृथ्वी प्रत्यही आपल्या आसाभोवती फिरते असे म्हणणारा भारतातील पहिला ज्योतिषी आर्यभट होय. आर्यभटाने भगणादिमानात नक्षत्र परिवर्तन न सांगता भू-भ्रम सांगितले आहेत. आर्यभटानंतर सुमारे सव्वाशे वर्षांनी छिद्रान्वेषणपटू ब्रह्मगुप्ताने अनेक स्वतंत्र शोध ग्रथित करणारा ब्रह्मसिद्धांत लिहिला. ब्रह्मसिद्धांताच्या कुट्टकनामक अध्यायात बीजगणितातील बरेच विषय आले असून पहिला बीजगणितकार तोच असावा असे काहींचे म्हणणे आहे; परंतु हा नवीन विषय मी मांडला असे तो कोठेच म्हणत नाही. यावरून बीजगणित त्यापूर्वीच वाढीस लागले होते अशी कल्पना करता येते. ब्रह्मगुप्ताने खंडखाद्य हा करणग्रंथ आपल्या वयाच्या ६७ व्या वर्षी रचला. त्याच्या स्वत:च्या सिद्धांताची संक्रांती सूर्यसिद्धांताच्या व आर्यभटाच्या पूर्वी एक दिवस येत होती व अधिकमासही या दोन सिद्धांताहून भिन्न येत असे. म्हणून ब्रह्मगुप्ताच्या सुधारलेल्या शास्त्राला लोकमताचा विरोध झाला, गतानुगतिको लोको न लोक: पारमार्थिक: । या म्हणीचा प्रत्यय शास्त्रप्रगतीच्या आड येणाऱ्या लोकमतावरून येतो. लोकमताच्या अशा व्यत्ययाला रूढीचे दास असलेले पंडितही मदत करतात. आपल्या वयाची ६७ वर्षे गेली तरी आपले अनुयायी कोणी होत नाहीत असे पाहून शेवटी निराश होऊन ब्रह्मगुप्ताने आर्यभटाच्या करणग्रंथाशी जुळणारा करणग्रंथ केला. ब्रह्मगुप्ताच्या सिद्धांताची त्याच्या हयातीत चहा झाली नाही तरी पुढे भास्कराचार्यांसारख्या ज्योतिषाने त्याच्याच आगमाचा स्वीकार केला. एवढेच नव्हे तर इ. सनाच्या आठव्या शतकात ब्रह्मगुप्ताच्या सिद्धांत व खंडखाद्य या ग्रंथांची सिंधिदम् आणि अलअर्कंद नावाची अरबी भाषांतरे झाली. अल्बेरुणीच्या इंडिया ग्रंथाच्या आधारे प्रा. साचो म्हणतो की, प्राच्य देशातील शास्त्रप्रगतीच्या इतिहासात ब्रह्मगुप्ताला महत्त्वाचे स्थान आहे. अरब लोकांना टॉलेमीच्या ग्रंथाची माहिती होण्यापूर्वी ज्योतिषशास्त्र ब्रह्मगुप्ताने शिकविले.

भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासात वराहमिहीर या पंडिताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शके ४१२ (इ.स. ४९०) हा त्याचा जन्मशक मानतात. हा जन्मशक मानल्यास वराहमिहीर अत्यंत दीर्घजीवी म्हणजे ९७ वर्षे जगला असे म्हणावे लागते. कारण ब्रह्मगुप्त टीकाकार पृथुस्वामी व आमराज यांनी शक ५०९ (इ.स. ५८७) हा त्याचा मृत्युकाल दिला आहे. भारतीय ज्योतिषशास्त्राचे पहिले समग्र संकलन वराहमिहिराच्या पंचसिद्धांतिका या ग्रंथात सापडते. पंचसिद्धांतिकेतील उल्लेखांशिवाय शके ४२० पूर्वीचे ज्योतिष ग्रंथकार समजण्यास महत्त्वाचे साधन दुसरे नाही. सूर्यसिद्धांत, सोमसिद्धांत, वसिष्ठसिद्धांत, रोमकसिद्धांत आणि शाकल्योक्त ब्रह्मसिद्धांत यापैकी सोमसिद्धांताखेरीज बाकीचे सिद्धांत पंचसिद्धांतिकेत आले आहेत. भारतात प्राचीन शास्त्रप्रगतीच्या युगात जगातील दूरदूरच्या संस्कृतीतील शास्त्रीय ज्ञानांचा अन्योन्य विनिमय किंवा आदानप्रदान होत होते ही गोष्ट रोमकसिद्धांत, पुलिशसिद्धांत या दोन संज्ञांवरून अनुमानिता येते. रोमकसिद्धांत ख्रिस्तपूर्व दीडशेंच्या सुमारास होऊन गेलेल्या हिप्पारकस नामक ग्रीक ज्योतिषाच्या ग्रंथास अनुसरून केला असावा असे तज्ज्ञांचे अनुमान आहे. पुलिश सिद्धांताच्या बाबतीत अल्बेरुणी म्हणतो की, हा सिद्धांत पौलस ग्रीक याने रचला व त्याच्यावरून हिंदूंनी संस्कृत ग्रंथ केला. अल्बेरुणीच्या म्हणण्याची सत्यासत्यता ठरविण्यास प्रत्यक्ष प्रमाण मिळत नाही. वराहमिहिराच्या संबंधी असे म्हटले जाते की, त्याने यवन देशात जाऊन ज्योतिषशास्त्र संपादिले. ही समजूत उत्पन्न होण्यास एक कारण असे झाले असावे की, वराहमिहिराने असे म्हटले आहे की, यवनांच्यामध्ये हे शास्त्र प्रतिष्ठा पावले आहे म्हणून तेही ऋषिवत् पूज्य होत. वराहमिहिराचा बृहत् संहिता हा ग्रंथ विशिष्ट प्रकारचा ज्ञानकोशच होय. फलज्योतिष, नाना प्रकारचे सृष्टिचमत्कार, प्राणिलक्षणविद्या, वास्तुविद्या, वृक्षायुर्वेद, प्रतिमाकरण, रत्नपरीक्षा, धातुविज्ञान, पदार्थांचे गुणधर्म व त्यांचे उपयोग यासंबंधी पुष्कळ माहिती बृहत् संहितेत मिळते. वराहमिहिराच्या बृहत् संहितेत जी सृष्टपदार्थांच्या ज्ञानाबद्दल आस्था व्यक्त झालेली दिसते ती तशीच त्याच दिशेने पुढे अव्याहत टिकली असती तर भारतातही विज्ञानाची वाढ प्राश्चात्त्य देशांप्रमाणेच होऊ शकली असती.

प्राचीन भारतातील सर्वश्रेष्ठ ज्योतिषी म्हणजे भास्कराचार्य होत. इष्टदिक् छायासाधन व पातसाधन या दोन गोष्टींसंबंधी भास्कराचार्यांच्या ग्रंथांत नवीन माहिती आली आहे. शरासंबंधीची पूर्वीच्या ग्रंथकारांची चुकीची समजूत खोडून तो क्रांतिवृत्तावर लांब असतो असे त्यांनी स्पष्ट दाखवून दिले आहे. उदयान्तर हा एक त्यांचा नवीन शोध आहे. इष्टकाली मध्यमरवि व स्पष्टरवि यामध्ये जे अंतर म्हणजे भुजांतर नामक फलसंस्कार, त्यामानाने स्पष्टोदय मागेपुढे होतो हा संस्कार पूर्व ग्रंथकारांनी सांगितला आहे. परंतु पृथ्वी आसाभोवती फिरते ती विषुववृत्तांत फिरते, क्रांतिवृत्तांत फिरत नाही, यामुळे क्रांतिवृत्ताचे तीस अंश क्षितिजावर येण्यास जो वेळ लागतो तितकाच नेहमी विषुववृत्ताचे तीस अंश येण्यास लागतो

असे नाही. यासंबंधीच्या संस्कारास 'उदयान्तर' नाव भास्कराचार्यांनी दिले आहे.

भास्कराचार्यांनंतर या शास्त्रात महत्त्वाची भर कोणीही भारतीयाने टाकली नाही. आर्यभटापासून भास्कराचार्यापर्यंतच्या काळात जी शास्त्रप्रगती झाली तिचे ऋण पाश्चात्त्य शास्त्रज्ञास मान्य झाले आहे. हिंदूंच्या ग्रंथांची अरबीत व लॅटिन भाषेमध्ये भाषांतरे झाली आणि अरब लोक व ग्रीक लोक ज्योतिषांत हिंदूंचे शिष्य झाले ते याच कालामध्ये. याच काळामध्ये अयनगतीचाही पूर्ण विचार झाला. ही झाली प्राचीन इतिहासाची कथा! आता त्याच्या उलट झाले आहे. भारताने पाश्चात्त्यांचे शिष्य बनण्याचा हा काळ आहे. उत्तम शिष्य बनल्याशिवाय गुरू होता येत नाही. उत्तम शिष्यच उत्तम गुरू बनतो.

लोकप्रीतीस पात्र व चिकित्सकांच्या निंदेस प्राचीन कालापासून कारण असलेली ज्योतिषाची शाखा म्हणजे फलज्योतिष होय, गणितज्योतिष ऋग्वेदाइतकेच प्राचीन आहे. आकाशस्थ ज्योतींचे परिज्ञान करून घेण्याची इच्छा ऋग्वेदात प्रतिबिंबित झाली आहे. ऋग्वेदात दिवस, मास, १२ महिन्यांचा संवत्सर, अधिकमास इत्यादी सौर व चांद्र कालमाने मिळतात. पृथ्वी ही गोल व अधांतरी आहे व सूर्यापेक्षा पृथ्वी लहान आहे. सूर्य विश्वाचे केंद्र (आत्मा) आहे, अशी कल्पना ऋग्वेदिक आर्यांना आली होती; परंतु ऋग्वेदात फल ज्योतिषाचे गमक निश्चितपणे सापडत नाही. फल ज्योतिषाचे निश्चित गमक अथर्ववेद संहितेत मिळते. माणसांच्या सुखदु:खाशी नक्षत्रांचा व ग्रहांचा निकटचा संबंध आहे, किंबहुना माणसाच्या भाग्याचे व दौर्भाग्याचे कारकत्व नक्षत्रांकडे आहे, निदान त्यांचा माणसाच्या जीवनावर शुभाशुभ परिणाम होतो अशी निश्चित समजूत अथर्ववेदकाली होती. 'अष्टाविंशानि शिवानि शग्मानि सह योगं भजन्तु मे' अभिजितसह अठ्ठावीस नक्षत्रे मला सुयोग प्राप्त करून देवो, अशी प्रार्थना अथर्ववेदात आली आहे (१९-८-२). पुण्यनक्षत्र व पापनक्षत्र अशी विभागणी अथर्ववेदकाली झाली होती असे निश्चित अनुमान करता येते.

**शं नो ग्रहाश्चांद्रमसा: शमादित्यश्च राहुणा ।**
**शं नो मृत्युर्धूमकेतु: शं रुद्रास्तिग्मतेजस: ।**

चंद्रासह सर्व ग्रह, राहूसह आदित्य, साक्षात मृत्यू असलेला धुमकेतू आणि तीक्ष्ण तेजाचे रुद्र आमचे कल्याण करो, अशी प्रार्थना (१९-९-१०) आणि शं नो दिविचरा ग्रहा: (१९-९-७) अशी प्रार्थना केलेली अथर्ववेदांत आहे. ज्येष्ठा नक्षत्राचा ज्येष्ठघ्नी असा आणि मूलनक्षत्रांचा मूलबर्हण असा निर्देश करून प्रार्थना केली आहे की, ज्येष्ठा किंवा मूळ नक्षत्रावर झालेल्या या मुलाचे सर्व बाजूने अग्ने रक्षण कर, पापनक्षत्रावर उत्पन्न झालेला हा मुलगा व्याघ्र दिवशी म्हणजे क्रूर दिवशी जन्मलेला असल्यामुळे तो वाढीस लागला असता पित्याचा वा जननीचा नाश न होवो अशी अग्नीची प्रार्थना अथर्ववेदांतील एका सूक्तात (६-११०) केलेली आहे. ज्येष्ठा नक्षत्रावरचा जन्म ज्येष्ठ बंधूचा नाश करतो किंवा सर्वच ज्येष्ठांचा नाश करतो व

मूळ नक्षत्रावरचा जन्म सर्व कुळ नष्ट करतो, अशा प्रकारच्या कल्पना जातक ज्योतिषांतील मूलभूत कल्पना होत, त्या अथर्ववेदांत सांगितल्या आहेत.

प्राचीन भारतीय इतिहासात कलेच्या क्षेत्रात जातक ज्योतिष याचे प्रतिबिंब इ.स.पू. तिसऱ्या शतकाच्या सुमारास आढळते. नागार्जुनकोंडा येथील एका मूर्तिशिल्पांत बुद्धपिता शुद्धोदन याच्या समवेत ज्योतिषी व भविष्यवादी भोजनप्रसंगी भविष्य निवेदन करताना दिसतात. ते आपल्या दोन अंगुली निर्दिष्ट करून असे सुचवितात की, नवीन जन्माला आलेला मुलगा सिद्धार्थ एक तर साक्षात्कारी महापुरुष तरी होईल किंवा विश्वसम्राट तरी होईल. हाच सिद्धार्थ बुद्ध म्हणून प्रसिद्धीस आला. या मूर्तीच्या पायापाशी एक लेखक म्हणजे कारकून राजपुत्र सिद्धार्थाची तालपत्रावर जन्मकुंडली काढीत बसलेला आहे. रामाच्याही जन्माच्या वेळी ग्रहपंचक उच्चस्थ होते असा रामायणात निर्देश आहे. नागार्जुन कोंडा येथील एका मूर्तिशिल्पात असे दाखविले आहे की, आईशेजारी नुकते जन्माला आलेले मूल आहे आणि ग्रहांच्या मेळाव्यासह गणेश आणि शिव हे तेथे उपस्थित आहेत. या चित्रणाच्या मुळाशी अशी समजूत होती की, गणेश सुखप्रसूतीस कारण होतो आणि शिव प्रसूतीनंतर रक्षण करतो. वराहमिहिराच्या बृहत् संहितेत मूर्तिशिल्पाचे विवरण आले आहे. त्यात रवीचा वेष उत्तरेकडचा म्हणजे पायात कुशानी बूट, अंगात भारी कोट व डोक्यावर पागोटे असा असावा असे म्हटले आहे. गुप्तकालामध्ये मूर्तिकलेवर वराहमिहिराच्या बृहत् संहितेचा प्रभाव दिसून येतो. कुशान व गुप्त काळापूर्वीच्या सूर्य मूर्तीची घडण पाहता त्यात बूट व कोट नाही, नुसते पागोटे आहे. भाजे, बुद्धगया आणि मथुरा येथील मूर्तिशिल्पात असा सूर्य सापडतो. ग्वाल्हेर येथील प्राचीन वस्तुसंग्रहालयात गुप्त काळातील कोरलेले पाषाण किंवा स्तंभ ठेवलेले आहेत. त्यात राशी व ग्रह यांच्या मूर्ती कोरलेले स्तंभ आहेत. एका स्तंभावर केतू वगळून बाकीचे अष्टग्रह कोरले आहेत. अष्टग्रहाचे कोरीव काम साधारणपणे नवग्रह शिल्पाच्या पूर्वकालचे मानतात. उत्तर भारतातील गुप्तकलेचे काही अंशी अनुकरण व काही अंशी परिवर्तन करून दक्षिणेतील चोलकालीन मंदिरांतील ग्रहमाला कलाकारांनी निर्मिली आहे. उत्तर भारतातील गुप्तकालीन राहू हा चंद्रसूर्यांना गिळणारा भयंकर राक्षस म्हणून चित्रित केलेला असून सर्व ग्रहांना चार हात दाखविले आहेत. दक्षिणेतील राहूसह सर्व ग्रह द्विबाहू; तरुण व सुंदर दाखविले आहेत. गुप्तकालानंतर काकतियांचा काल येतो. त्यात बारा राशी व नवग्रह यांचे मूर्तिशिल्प अनुकरण व परिवर्तन या दोन्ही प्रकारच्या क्रियांनी साधलेले सापडते. त्यात सूर्य कमलाकार दाखविला असून बारा राशी त्या कमलाभोवती वर्तुळात दाखविल्या आहेत. चालुक्य, होयसळ व चोल यांच्या मंदिरस्थापत्यात चित्रशिल्पाचे जे उत्कृष्ट नमुने आहेत त्यातही राशी, दिक्पाल, नवग्रह, विराट पुरुष, रोहिणीसारखी नक्षत्रे व एकंदरीत आकाशमहापट यांची चित्रणे सापडतात. राजस्थानात तिथी, मुहूर्त, मास, वर्ष, नक्षत्र यांचीही कल्पित व्यक्तिरूप चित्रे मूर्तिशिल्पात कोरलेली सापडतात. या प्रकारच्या

मूर्तिशिल्पाचे विधान करणारे ग्रंथ तंजावर येथील मराठा राजवटीत निर्मिलेल्या सरस्वती महाल ग्रंथालयात सुरक्षितपणे ठेवलेले आजही मिळतात.

फलज्योतिष हे मुळात बाबिलोनमध्ये म्हणजे असीरियन संस्कृतीमध्ये वाढीस लागले व त्याचा स्वीकार पाठीमागून ग्रीस, भारत, चीन इत्यादी राष्ट्रांत झाला असे काही इतिहासकार म्हणतात. भारतात वराहमिहिराच्या काळी यवन जातक प्रसिद्ध होते. वराहमिहीर यवनाचार्यांचा उल्लेख करतो. बृहत् जातकावरील टीकाकार भटोत्पल याने स्फुजीध्वज नावाच्या यवनेश्वर जातकशास्त्रकर्त्याचा उल्लेख केला आहे. यावरून असे मात्र अनुमान करू नये की, फलज्योतिष अथवा जातकविद्या ही ग्रीक लोकांकडून भारताला मिळाली. वराहमिहिराने यवनाबरोबरच गर्ग, पराशर, असित, देवल, वृद्धगर्ग, कश्यप, भृगु, वसिष्ठ, बृहस्पती, मनु, मय, सारस्वत, ऋषिपुत्र इत्यादी पूर्वऋषींचा उल्लेख केला आहे. वराहमिहिराने ऋषींच्या बरोबर सत्य, मय, यवन, मणित्थ, जीवशर्मा, विष्णुगुप्त इत्यादी पूर्व आचार्यांचा उल्लेख केला आहे. वराहमिहिराच्या बृहद् जातकावरील टीकाकार भटोत्पल यानेही गार्गी, बादरायण, याज्ञवल्क्य, मांडव्य या वराहमिहीरपूर्व आचार्यांचा निर्देश केला आहे. वराहमिहिराने उल्लेखिलेला विष्णुगुप्त म्हणजे चाणक्य होय असे उत्पलाने म्हटले आहे.

हा चाणक्य म्हणजे जर कौटिल्य मानला तर त्याचा शुभाशुभ मुहूर्तावर फारसा विश्वास नव्हता असे कौटिलीय अर्थशास्त्रावरून दिसते. तो म्हणतो ‘नक्षत्रमति पृच्छन्तं बालमर्थोऽतिवर्तते । अर्थो ह्यर्थस्य नक्षत्रं किं करिष्यन्ति तारका:’ (अर्थशास्त्र २६-१२५). ‘नक्षत्राची फार चौकशी करणाऱ्या मूर्खापासून अर्थसिद्धी दूर पळत असते. अर्थ (भांडवल) हाच अर्थाचे नक्षत्र होय. तारका (बिचाऱ्या) काय करणार?’ कौटिल्याचा हा विचार गृहीत धरला तरी जातकशास्त्र त्याने लिहिले नाही असे म्हणता येत नाही. कारण तो परंपरागत समजुती व परंपरागत विद्या यांची काळजीने नोंद करणारा होता. मंगलतिथी किंवा मंगलनक्षत्र, आपत्तीचा प्रतिकार करणाऱ्या शांती यांचा निर्देश त्याने अर्थशास्त्रांत केला आहे. राजाला पारलौकिक कर्माचे अनुष्ठान त्याने सांगितले आहे. फलज्योतिषावर फाजील विश्वास ठेवू नये एवढेच त्याचे म्हणणे दिसते. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनाही फलज्योतिषाच्या यथार्थत्वाबद्दल फार शंका होती; परंतु बाबाजी काशीनाथ पटवर्धन महाडकर नामक एका ज्योतिषाने त्यांना फलज्योतिषाच्या खरेपणाचा प्रत्यक्ष प्रत्यय दिला, त्यामुळे त्यात काही तथ्य असावे असे त्यांना वाटू लागले. पटवर्धन महाडकर हे शरीरलक्षणावरून जन्मकुंडली मांडत व ती बरोबर पटत असे, असे दीक्षितांनी लिहून ठेवले आहे. या पटवर्धन महाडकर ज्योतिषाने महाराष्ट्रातील महान सुधारक व नास्तिक गो.ग. आगरकर यांनाही आपल्या ज्योतिषाने विस्मित केले होते असे आगरकरांच्या ‘सुधारक’ साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरावरून दिसून येते.

मुहूर्तशास्त्रासह फलज्योतिषाचे व इतर सामुद्रिकासारख्या लक्षणशास्त्राचे पुष्कळ ग्रंथ आज उपलब्ध आहेत. पाराशरी, जैमिनीसूत्र, भृगुसंहिता हे आर्षग्रंथ किती प्राचीन आहेत याची शंका आहे; परंतु वराहमिहिराचे बृहत्‌जातक व बृहत्‌संहिता उपलब्ध पौरुषेय ग्रंथांतील प्राचीनतम ग्रंथ होय, यांत शंका नाही. रमल व ताजिक याही होरास्कंधाच्या शाखा उपलब्ध होतात. त्या सर्वांचे व्यवस्थित आलोडन करून दृक्‌प्रत्ययाच्या दृष्टीने संशोधन केले पाहिजे. तसे केले तरच फलज्योतिष, मुहूर्तज्योतिष किंवा होरास्कंध, ही विद्या बुद्धिवाद्यांच्या बौद्धिक आघातापासून सुरक्षित राहू शकेल. अर्थात ते संशोधनाच्या कसोटीस उतरले तरच टिकेल. जितका शिक्षणाचा प्रसार अधिक होत जाईल व लोक दैववाद सोडून उद्योगवादी होत जातील तितकी राशिभविष्ये सांगणारी वृत्तपत्रे, मासिके व भविष्य वर्तविणारी वार्षिके यांना उतरती कळा येत जाईल. सध्याच्या वृत्तपत्रातील राशिभविष्ये हा होरास्कंधाचा दुरुपयोगच म्हटला पाहिजे. आज वैज्ञानिक कसोटीला जातकविद्या व लक्षण विद्या उतरेल अशी परिस्थिती नाही. तो एक उपजीविकेचा धंदा म्हणूनच चालवणारे लोक आणि दैववादी जनता यांच्या सहकार्यामुळेच या विद्यांची आज चलती आहे. या विद्येसंबंधी संख्याशास्त्राने युक्त सूक्ष्मरीत्या तपासलेली निरीक्षणे करणाऱ्या, त्या निरीक्षणाची पद्धतशीर नोंद ठेवणाऱ्या व उपजीविकेच्या धंद्याशी किंचितही संबंध न ठेवणाऱ्या अशा ज्योतिषसंस्था स्थापन करून त्या चालविल्या पाहिजेत.

जातकाची संख्याशास्त्रीय अनुभवनिष्ठ कसोटी उपलब्ध करून देणारी अद्ययावत साधनसामग्री आज मोठ्या प्रमाणात मिळू शकते. नगरपालिका व ग्रामपंचायती यांच्यात जन्ममृत्यूच्या नोंदी मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या आहेत. प्रसूतिगृहे व रुग्णालये यांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे. प्रसूतिगृहात हजारो बालके रोज जन्माला येत आहेत. सूक्ष्म कालाची नोंद करण्यास अनुकूल अशी कालज्ञापक रेडिओसारखी साधने खेड्यापाड्यापर्यंत पसरू लागली आहेत. त्यामुळे सूक्ष्म कालमापन करून योग्य व शास्त्रशुद्ध जन्मकुंडली तयार करण्यास पूर्वीसारख्या अडचणी राहिल्या नाहीत. जन्मटिपण ठीक नाही, म्हणून भविष्य चुकते, अशी तक्रार करण्यास आता अवसर राहिला नाही. पन्नास-साठ वर्षांपूर्वी खेड्यापाड्यात जन्मलेल्या स्त्रीपुरुष व्यक्तींच्या जन्मकालाची नोंद बरोबर आहे की नाही याबद्दल शंका घेण्यास पुष्कळच अवसर होता. घड्याळे क्वचित असावयाची, असली तरी ती बरोबर लावलेली नसायची, बरोबर लावलेली असली तरी प्रसूतीच्या वेळी त्यांचा कालमानज्ञानास उपयोग करणाऱ्या व्यक्ती थोड्या असायच्या. जन्मकालाची नोंद करताना हयगय व दिरंगाई व्हावयाची. पंचांग किंवा दैनंदिनी फार थोड्यांच्या जवळ असायची. असली तरी ती नीट पाहिली जायची नाही. अशा प्रकारच्या अडचणी आता राहिल्या नाहीत. स्वीत्झर्लंडची घड्याळे रेल्वेपासून व शहरापासून शंभर दोनशे मैलावरील दोन हजार वस्तीच्या खेड्यातही दहा-पाच लोकांच्या मनगटावर चमकत असलेली आता

दिसतात व रेडिओही दिवसा व रात्री न्यूयॉर्क, लंडन, मॉस्को व पेकिंग येथील बातम्या व कालमान ओरडून सांगताना ऐकू येतो. म्हणून मूळ नक्षत्र, ज्येष्ठा नक्षत्र, संक्रांती, व्यतिपात इत्यादिकांवर जन्माला आलेल्या अपत्यांच्या योगाने काय काय आपत्ती कुटुंबावर येतात यासंबंधी निरंतर निरीक्षण करीत राहणे व त्याची सतत नोंद करीत राहणे आता फार शक्य झाले आहे. दर महिन्यास मूळ, ज्येष्ठा, व्यतिपात, संक्रांती वगैरे योग येतातच. त्या योगांवर लक्षावधी बालके जन्मतात. त्यांची फलिते जातकशास्त्राशी तुलना करून पाहणे फार सुलभ झाले आहे. लोकभ्रमावर किंवा लोकांच्या अंधश्रद्धेवर भरवसा ठेवून शास्त्र टिकविण्याचा आग्रह धरणे हे योग्य नाही. सत्य हे स्वत:च्या सामर्थ्यावरच विजयी होत असते. शास्त्राने आपले प्रामाण्य लोकांच्या बुद्धिवादाला आव्हान देऊनच सिद्ध करणे हेच नैतिकदृष्ट्या योग्य होय. जातकाची वैज्ञानिक कसोटी वर्तमानकाळात सुलभ आहे; परंतु सामुद्रिकासारख्या लक्षणशास्त्राची कसोटी पुष्कळ अस्पष्ट आहे. म्हणून लक्षणशास्त्राचे प्रामाण्य स्थापित करणे अधिक कठीण आहे.

ज्योतिर्गणित या विद्येचे अध्ययन व अध्यापन पाश्चात्त्यांच्या बरोबरीला आणता कसे येईल यासंबंधी आपल्या ज्योतिर्विदांनी प्रयत्न केले पाहिजेत. अद्ययावत् साधनसामग्री निर्माण करणे हे आपल्या देशात राज्यसंस्थेसच झेपणारे काम आहे, कारण ते फार खर्चाचे आहे. परंतु ज्योतिर्विदांनी केवळ विद्येकरिता विद्या असा आदर्श पुढे ठेवून यत्न केला पाहिजे. पंचांगविद्या ही सर्वांगीण बनविली पाहिजे. पंचांग निर्मितीचे कार्य आपापल्या प्रादेशिक भाषेतून करता यावे म्हणून प्रत्येक प्रादेशिक भाषेत व संस्कृतमध्ये अद्ययावत करणग्रंथ लिहिले जावे व प्रकाशित व्हावे. त्याकरिता राजकीय प्रशासन व विद्वान मंडळी यांचे परस्परांचे सहकार्य वाढत गेले पाहिजे. त्याकरिता केंद्र सरकारने व राज्य सरकारने ज्योतिषविषयक ग्रंथनिर्मितीला व संशोधनाला उत्तेजन मिळेल यासाठी ज्योतिषविषयक तज्ज्ञांची स्थिर समिती नेमणे जरूर आहे.

प्राथमिक व माध्यमिक विद्यापीठीय शिक्षणक्रमात आकाशनिरीक्षण, तारकाज्ञान व खगोलविषयक सूक्ष्मज्ञान करून घेण्याची आवश्यक साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. हल्लीच्या पंचांगामध्ये घटिका व पळे या कालपरिमाणांचा उपयोग करीत असतात. कित्येक वर्षांपासून घटिकापळे हे कालमापन व्यवहारामधून नष्ट झाले आहे. त्यामुळे घटिका पळांच्या ठिकाणी नवे कालपरिमाण घालणे आवश्यक नाही काय याचा विचार या परिषदेतील पंडितांनी करावा. घटका पळांचे कालमापन आता गणितयुक्त अनुमानानेच करणे भाग आहे. तास, मिनिटे व सेकंदांचे अंश अशाच तऱ्हेची सूक्ष्मकाळमिती दाखविणारी साधने वा यंत्रे आता प्रचारात आली आहेत. घटिका, पळे व त्याहीपेक्षा सूक्ष्म कालांश दाखविणारे यंत्र उपलब्ध नाही. तसे यंत्र सहज करता येईल; परंतु त्याचा व्यवहारास किंवा शास्त्रसंशोधनास किंवा शास्त्रज्ञानास कोणीच उपयोग करणार नाही. आता दृक् प्रत्ययाचा

वाद आपोआप मिटला आहे. नव्या आल्मनाक्शी जुळती अशीच पंचांगे सर्वमान्य झाली आहेत. हे फारसा वादविवाद न होता घडले आहे. ज्योतिषशास्त्राच्या प्रगतीची शुभ अशी पूर्व लक्षणे दिसू लागली आहेत. त्यावरून भारतीय पंडितांतही ज्योतिषशास्त्राची उपासना अधिक प्रगतिपथावर जाईल अशी आशा करून हे भाषण संपवितो.

**(महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदेचे सन १९६१ चे वार्षिक अधिवेशन ज्योतिर्विद्या मंडळ, मुंबई यांनी दि. २५ ते २७ नोव्हेंबर १९६१ रोजी योजले होते. त्या परिषदेतील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अध्यक्षीय भाषण यथामूल रूपात.)**

OOO

४०

# अमेरिकेतील लोकशाहीचा यशस्वी प्रयोग

*(सन १९७७ च्या ८ जून ते २१ जुलै या कालावधीत अमेरिकेस गेले होते. हा महिन्याभराचा दौरा आटोपून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी भारतात नवी दिल्लीला परतले. त्यावेळी दिल्लीतील साहित्य मंडळाने त्यांच्याशी अनौपचारिक गप्पागोष्टींचा कार्यक्रम योजला होता. त्याचे वृत्त, भाषणसार दैनिक केसरी, पुणेच्या अंकात 'लाल किल्ल्याच्या परिसरात' सदरात प्रसिद्ध झाले होते. त्याचे शब्दांकन श्री. गो. वि. वैद्य यांनी केले होते.)*

ग्रंथ वाचून जेवढे कळते त्यापेक्षा प्रत्यक्ष दर्शनाने कितीतरी जास्त कळते. 'चक्षुर्वैसत्यम्' हे तत्त्व तेच सांगते. साठ दिवस अमेरिकेत राहून तेथील जीवनाचे मला प्रत्यक्ष दर्शन घडले. त्यामुळे एक प्रकारचा साक्षात्कारच झाला आहे. मला जी एक विलक्षण अनुभूती आली आहे, ती अमेरिकेबद्दल अनेक ग्रंथ वाचून आली नसती.

भारतास परतताना मी काही युरोपियन देशांना भेटी दिल्या. तेव्हा युरोप खरोखरीच अमेरिकेच्या मागे २० वर्षांनी आहे, असा माझा ग्रह झाला.

सन १९६० साली मी रशियाला भेट दिलेली होती; पण लेनिनच्या प्रयोगापेक्षा अमेरिकेतील लोकशाहीचा प्रयोग मला खूपच यशस्वी वाटतो. तेथे सामान्य व्यक्तीचा, सरासरी नागरिकाचा प्रभाव फार मोठा आहे. सत्तेचे, अधिकाराचे पद्धतशीर विकेंद्रीकरण तेथे करण्यात आलेले आढळते. अमेरिकेत खरोखरीच लोकशाही नांदत आहे. तेथे भांडवलशाही आहे असे मानणे बरोबर नाही; आणि हा सारा उत्कर्ष अमेरिकेने फक्त चारशे वर्षात साध्य केला आहे.

अमेरिकेने केवळ भौतिक प्रगतीच केली आहे असे मानू नका. तेथील आर्थिक संपन्नता व सुबत्ता प्रकर्षाने जाणवते. आज जगातील बहुतेक राष्ट्रे अमेरिकेकडे साहाय्य याचना करीत आहेत. रशियानेसुद्धा अमेरिकेकडे धान्य मागितले हे तुम्हाला माहीत आहेच.

अमेरिकन नागरिकांत धार्मिक भावनाही आहेत व त्या युरोपपेक्षा जास्त आहेत, असे मला वाटते. युरोपातील प्रार्थना मंदिरांत दर रविवारी जास्त करून वयस्कर व वृद्धमंडळींचाच भरणा जास्त असतो; पण अमेरिकेतील चर्चेसमध्ये मला वृद्धांपेक्षा तरुणांचीच गर्दी जास्त दिसली. रामकृष्ण मिशन्सचेही १५-२० मठ अमेरिकेत आहेत. या मठांतील बंगाली संन्यासी सुटाबुटात वावरतात. मठांत मोठी ग्रंथालये इ. व भोवताली उद्याने आहेत. शिकागोला गेल्यावर तेथील विद्यापीठ आणि समुद्राएवढे सरोवर पाहत असताना मला नेमकी आठवण होत होती ती स्वामी विवेकानंदांची. त्यांनी महान दिग्विजय संपादन केला तो येथेच ना?

अमेरिकेतील जगप्रसिद्ध हॉर्वर्ड विद्यापीठ. इथे परदेशी भाषांचा अभ्यास केला जातो. अशा भाषांत रशियाचा पहिला क्रमांक लागेल. जगातील आपला एकमेव तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून रशियाच्या भाषेचा अभ्यास मुद्दाम अमेरिकेत मोठ्या प्रमाणात केला जात आहे, असे वाटते. युरोपियन भाषांमध्ये स्पॅनिश भाषेचा अभ्यास जास्त केला जातो आहे असे दिसते. काही विद्यापीठांतून संस्कृतच्या अभ्यासाची सोय असून पेनिनसिल्व्हिया या एकाच विद्यापीठात मराठीच्या अध्ययनाची व्यवस्था आहे.

भौतिक प्रगतीमुळे यंत्रांकडून वैयक्तिक जीवनात व त्याचप्रमाणे व्यवसाय-उद्योगधंद्यात केवढ्या प्रचंड प्रमाणावर बिनतक्रार सेवा तेथे करून घेतली जाते आणि श्रम व वेळ वाचविला जात असल्यामुळे उत्साह टिकून मनुष्याची कार्यक्षमता कशी वाढली आहे, याचे विवरण करताना अॅटोमेशनची दोन नमुनेदार उदाहरणे सांगितली.

एके ठिकाणी पाच माणसांचे एक शेतकरी कुटुंब आपली १५० एकर जमीन कसून पुन्हा ९० गायी बाळगीत होते. एकेक गाय ६० ते ८० पौंड दूध देत असे. पण शेती व तिच्याप्रमाणेच गोपालनातील दोहनादी सर्व क्रिया यंत्राच्या साहाय्याने करून घेण्यात येत असल्यामुळे ते कुटुंब हा सगळा व्याप आनंदाने सांभाळून वर मंडळी तगडी भासत होती. दुसऱ्या एका ठिकाणी १४ हजार कोंबड्यांचे एक खुराडे याप्रमाणे ४० खुराडी केवळ एका गृहस्थानी एकट्याने चालवली होती. कारण कोंबड्यांना दाणे-पाणी सारे काही यंत्राद्वारा पोहोचविले जात होते.

भौतिक प्रगतीची नवलपूर्ण झलक तिथे डिस्नेलँडच्या रूपात दिसून आली. 3000 मैल लांबवरचा पल्ला असलेला टेलिफोन - टेलिव्हिजन सेटच्या साहाय्याने ते डिस्नेलँडमधून थेट न्यूयॉर्कच्या महिला कर्मचाऱ्यांशी जणू समक्ष व समोरासमोरच तीन हजार मैलांवरून बोलू शकले. या सेटमुळे कितपत चांगले दिसते व स्पष्ट ऐकू येते हे पडताळण्यासाठी माझ्या डोक्यावर हॅट मी कोणत्या रंगाची घातली आहे? असा प्रश्न विचारताच दुसऱ्या टोकाशी असलेल्या महिलेने तत्काळ 'गांधी टोपी' असे हसतमुखाने उत्तर दिले.

मूळ भाषणानंतरच्या प्रनोत्तरात त्यांनी भारतीयांनी अमेरिकेकडून 'अन्न' आणि 'ज्ञान' या दोन गोष्टी शिकल्या-घेतल्या पाहिजे, हे स्पष्ट केले. अमेरिकेतील वंशवादासंदर्भात ते

म्हणाले की, दक्षिणेकडील संस्थानात वांशिक वादाचा उद्रेक अलीकडे बराच झाला आहे. पण ज्या मिसिसिपी संस्थानात तो विशेष आहे, तिथे लोहियांच्या वाट्याला वेगळा अनुभव आला तरी मला मात्र तिथल्या एका गावाने आपले ‘सन्मान्य नागरिकपद’ बहाल केले.

**(दैनिक केसरी, पुणे, दि. ३० ऑगस्ट १९६४, पृ. ३ आणि ५)**

❍❍❍

४१

# लोकशाही आणि समाजवाद

काही मधल्या मधल्या लढाया गमवाव्या लागल्या तरी जागतिक लोकशाहीला समाजवादाचा पाया रचून अंतिम युद्धात विजय मिळणारच याबद्दल आता शंका राहिली नाही. मानवी प्रगतीचे व समता स्थापन करण्याचे साधन म्हणून संसदीय लोकशाही दुबळी व अयशस्वी ठरून इतिहासजमा झाल्याची भावना डावे समाजवादी व साम्यवादी निर्माण करीत असले, तरी त्याला वस्तुस्थितीचा आधार नाही. लोकशाहीचे सामर्थ्य वाढत आहे. कामगारवर्गाचा लढा लोकशाहीतच यशाची वाटचाल करीत आहे. पहिल्या महायुद्धानंतर व दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या कालखंडांत जर्मनी, ऑस्ट्रिया व जपान येथील लोकशाही आर्थिक मंदीच्या दुष्टचक्रात सापडून पराभूत झाली तरी शेवटी तीच विजयी ठरणार हे निश्चित.

हजारो वर्षांच्या मानवी प्रगतीच्या इतिहासात वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना मतदानाचा व आपली प्रशासन पद्धती ठरविण्याचा किंवा आपले सरकार निवडण्याचा व बदलण्याचा मुक्त अधिकार ज्यात आहे, अशी संसदीय लोकशाही गेल्या दोनशे वर्षांतच अस्तित्वात येऊन विकास पावली. त्यापूर्वीच्या इतिहासात ग्रीससारख्या देशात प्राचीन काळी लोकशाहीची कल्पना अस्तित्वात असली तरी तिचे स्वरूप अगदी मर्यादित होते व तिला लोकशाहीच्या आधुनिक मूल्यांचा आधार नव्हता. ग्रीसमध्ये एका नागरिकाला लोकशाहीचे अधिकार असले, तर नऊ नागरिकांना असे अधिकार बिलकूल नव्हते. स्त्रियांना तर कोणतेही अधिकार नव्हते. अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती झाल्यानंतर लोकशाहीचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीनंतर जी परिस्थिती निर्माण झाली तिच्यात लोकशाही ही जणू अपरिहार्य गरज ठरली. यावेळी काही नवीन सामाजिक मूल्ये पुढे येऊन मान्यता पावली. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या नव्या मूल्यांचा साक्षात्कार होऊन लोकशाहीची कल्पना पुढे आली.

परंतु, एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीच्या काळात राजकीय लोकशाही बहुजन समाजाचे व कामगारवर्गाचे काही काळापर्यंत हित साधण्यात अपयशी ठरली होती.

भांडवलाचे व उद्योगधंद्याचे खासगी मालक भरमसाठ नफा मिळवून बहुजन समाजाच्या हिताची पायमल्ली करीत. या उद्योगपतींच्या सामाजिक दृष्टीने अहितकारक व बेजबाबदार वर्तनावर नियंत्रण ठेवण्याची कला त्या प्राथमिक अवस्थेत राजकीय लोकशाहीला साधली नाही, त्यामुळे त्या लोकशाहीची स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही अंतिम मूल्ये अवमानित झाली व तिला 'भांडवलशाहीप्रधान लोकशाही' असे अभिधान प्राप्त झाले. त्या लोकशाहीच्या क्षेत्रात वाढणाऱ्या समाजव्यवस्थेत तीन अपरिहार्यपणे वाढत जाणारे दोष मार्क्स व अन्य प्रखर समाजवादींनी शोधून काढले. ते म्हणजे श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार व गरीब अधिक गरीब होत जाणार. गरिबीची खोली व रुंदी वाढत जाणार हा एक दोष. दुसरा दोष भांडवलशाही व्यापारात तेजी-मंदीचे दुष्टचक्र कायम फिरत राहून शेवटी समाज दुरवस्थेस पोहोचणार आणि त्यामुळे कामगार क्रांती अपरिहार्यपणे घडून येणार. तिसरा दोष असा की, Ever increasing misery कामगारवर्गाची गरिबी ही निरंतर वाढत व रुंदावतच जाणार. भांडवलशाही समाजरचना असेपर्यंत हे दारिद्र्याचे निरंतर वृध्दिंगत होणारे स्वरूप कधी क्षीण होणार नाही. म्हणून समाजवादी क्रांती व कामगार हुकूमशाही हे ऐतिहासिक भविष्य अटळच मानले पाहिजे.

मार्क्स आदी टीकाकारांनी दाखविलेले दोष आज लोकशाहीच्या प्रचंड विस्तीर्ण वटवृक्षाप्रमाणे वाढलेल्या अवस्थेत टिकू शकलेले नाहीत. लोकशाही पद्धतीत सुरुवातीच्या काळात आढळलेले दोष हे बाल्यावस्थेतील होते. लोकशाहीचे रोपटे रुजले तरी त्याने जोम धरला नव्हता, या अवस्थेतील ते दोष होते. संघटना, प्रचार, सभा इत्यादी स्वातंत्र्यांचा वापर करून राज्यावर व सरकारवर प्रभाव गाजवील एवढी जनशक्ती ताकदवान झालेली नव्हती.

सामाजिक सुस्थिती हा ग्रीकांपासून आलेला विचार हेच लोकशाहीचे उद्दिष्ट होते; पण सुरुवातीच्या काळात हे प्रत्यक्षात अनेक कारणांमुळे दिसू शकले नाही, यामुळे साहजिकच वैषम्याची भावना फैलावली. वर उल्लेखिलेले तीन दोष सुरुवातीच्या लोकशाहीत उद्भवल्यामुळे लोकशाही पद्धतीलाच दोषी ठरविण्यात येऊ लागले. ज्यांच्या हाती उत्पादनाची साधने होती, तेच भांडवलशाहीप्रधान लोकशाहीत वरचढ ठरले. साहजिकच मार्क्स आदी टीकाकारांनी उत्पादनाच्या साधनांवर समाजाचे स्वामित्व प्रस्थापित करण्याचा म्हणजेच त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा तोडगा सुचविला आणि समाजवादी क्रांती व कामगार हुकूमशाही अटळ आहे, असा सिद्धांत मांडला.

परंतु, मार्क्सनंतरचा संसदीय लोकशाहीचा इतिहास या सिद्धांताविरुद्धच ग्वाही देत आहे. औद्योगिक क्रांती एका विशिष्ट पातळीपर्यंत जात नाही, तोपर्यंत राष्ट्रीय उत्पन्न हवे तेवढे वाढत नाही व परिणामी भांडवलशाही आपले वर्चस्व राजकीय व आर्थिक क्षेत्रात राखू शकते आणि जनतेच्या नशिबी येतात फक्त कष्ट. परंतु, हा टप्पा ओलांडला की, निराळाच प्रकार घडतो. प्राथमिक अवस्थेत ज्या दोषांमुळे लोकशाही अयशस्वी, अपुरी

असल्यासारखी वाटत होती ते दोष संसदीय लोकशाही टिकवूनच दूर झाल्याचा अनुभव आला व समाजातील एकंदर सर्वांच्याच सौख्याचा मार्ग मोकळा झाला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राजकीय लोकशाहीच्या शक्ती अधिक प्रभावी होऊन भांडवलशाही समाजरचनेचे वर सांगितलेले तिन्ही दोष कमी होत गेले. लोककल्याणकारी लोकशाहीचा उदय झाला. कामगारवर्गांचे गेल्या शंभर वर्षांत जीवनमान पश्चिमी लोकशाही राष्ट्रांमध्ये तिप्पट व काही ठिकाणी चौपट वा पाचपट वाढले. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका व जपान येथील कामगार शंभर वर्षांपूर्वी जेवढे खरेदी करीत होता, त्याच्या तिप्पट, चौप्पट व पाचपट त्याची क्रयशक्ती अलीकडे वाढली आहे. श्रीमंती व कंगालीची दोन टोके कमी होऊन प्रचंड मध्यमवर्ग लोकशाही राष्ट्रांत निर्माण झाला आहे.

तीस सालच्या आर्थिक मंदीने तीन मोठ्या लोकशाह्या कोसळल्या; पण ज्या टिकून राहिल्या त्यांनी मंदीचा धडा घेतला.

व्यापारी तेजी-मंदीचे चक्र सावरून घेण्याचे सामर्थ्य आणि मंदीची लाट थोपविण्याचे सामर्थ्य पश्चिमी संसदीय लोकशाहीमध्ये नव्याने पैदा झाले आहे. त्यामुळे संमिश्र अर्थव्यवस्था निर्माण होऊ लागली आहे. भांडवलशाही नफेबाजीवर पूर्ण नियंत्रण करण्याइतके सामर्थ्य लोकशाहीच्या अंगी आले आहे. सहकारी उद्योग आणि लोककल्याणकारी सामाजिक सुरक्षिततेकरिता सरकारी उद्योग पश्चिमी लोकशाहीच्या कक्षेत उतरले आहेत. दारिद्र्य, अज्ञान व बेकारी यांच्याविरुद्ध अत्यंत यशस्वी असा लढा संसदीय लोकशाही देत असून, ती अंतिम विजय मिळविल्याशिवाय राहणार नाही.

उलट, लोकशाहीच्या प्रारंभीच्या काळातील दोषामुळे साम्यवादी दृष्टिकोनांतून तिला पर्यायी असा जो विचार मांडला गेला, त्यातून निर्माण झालेल्या साम्यवादी समाजसंस्थेत भांडवलशाही प्रधान वर्गव्यवस्था लोपली आहे आणि उत्पादनाची साधने सामुदायिक मालकीची किंवा राज्याच्या मालकीची झाली आहेत, म्हणजे समाजवादी साधनमार्ग निर्माण झाला आहे. परंतु, व्यक्तिस्वातंत्र्याचे तीन भाग- संघटना स्वातंत्र्य, प्रचार स्वातंत्र्य व सभा स्वातंत्र्य हे साम्यवादी समाजव्यवस्थेत नष्ट झाले आहेत. कायद्याचे राज्य येण्याच्या ऐवजी पक्षाचे व पक्षप्रमुख व्यक्तीचे 'जुलमी व स्वैर हुकूम' त्या ठिकाणी मानवी स्वातंत्र्यावर घाला घालीत आहेत. समता, बंधुता आणि व्यक्तित्वाचा मुक्त विकास ही मूल्ये समाजवाद व लोकशाही या दोन्हीही ध्येयवादांची कसोटी ठरविणारी मूल्ये आहेत. संसदीय लोकशाहीच्या मार्गानेच या मूल्यांची जोपासना होऊ शकते.

व्यक्तित्वाच्या विकासासाठी कर्तृत्वाचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक असते. साम्यवादी समाजव्यवस्थेतही या विचाराला प्राधान्य आता अनुभवाने मिळू लागले आहे. अर्थात, यासाठी 'नफा' असा शब्द न वापरता 'कर्तृत्वाचा मोबदला' असा शब्दप्रयोग साम्यवादी रशियात होऊ लागला आहे, हेही येथे ध्यानात ठेवले पाहिजे.

रशिया व पूर्व युरोप यामध्ये बहुजन समाजाच्या व कामगारवर्गाच्या जीवनमानाची वाढ आणि शैक्षणिक प्रगती होत आहे. त्या ठिकाणी कारखान्यांचे व्यवस्थापक व तंत्रज्ञ यांना भौतिक प्रेरणा (Material Incentive) किंवा कर्तृत्वाचा विशेष मोबदला मिळावा असे तिकडील अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादन करीत आहेत. साहित्यिक व कलाकार हे लेखन स्वातंत्र्य व प्रचार स्वातंत्र्य यांची मागणी करीत आहेत. तात्पर्य असे की, पश्चिमी लोकशाहीतील संमिश्र अर्थव्यवस्था आणि साम्यवादी राष्ट्रांतील राष्ट्रीय मालकीची अर्थव्यवस्था या दोन्ही अर्थव्यवस्था वैकल्पिकरीत्या मान्य करून त्या आधारावर शांततामय सहजीवनाचा सिद्धांत मान्य करणारी राज्यसंस्था यापुढे विकसित पावेल असे दिसते. कालांतराने साम्यवादी राष्ट्रात सामान्य जनतेचे जीवनमान व शिक्षण पश्चिमी लोकशाहीच्या पातळीवर आल्यावर व्यक्तिस्वातंत्र्यमूलक संसदीय लोकशाहीची मागणी ही साम्यवादी राष्ट्रांतील जनता केल्याशिवाय राहणार नाही. समाजवादी ध्येय आणि लोकशाही मूल्ये यांचे अद्वैत स्थापन करणारा भविष्यकाळ आपणाकडे चालून येत आहे. मार्क्स व लेनिन यांसारख्या साम्यवादी तत्त्ववेत्त्यांची संसदीय लोकशाहीबद्दलची टीका खोटी ठरली आहे, म्हणून संसदीय लोकशाही हाच समाजवादाच्या स्थापनेचा बिनधोक नैतिक मार्ग होय, असे या विसाव्या शतकातील नव्या समाजवादास मान्य करावे लागले आहे.

यानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांत कम्युनिस्ट देशांतील विशेषतः पूर्व युरोपांतील 'समाजवादी' लोकशाही व संसदीय लोकशाही यांमधील फरक स्पष्ट करताना तर्कतीर्थांनी सांगितले की, मूलभूत फरक म्हणजे पूर्व युरोपात मुक्त निर्वाचन नाही. विरोधी पक्षही तेथे नाही. संघटनेचे, प्रचाराचे स्वातंत्र्य तेथे नाही. कामगारांनाही संघटित होऊन संप करता येत नाही.

भारतीय संसदेतील खटके लक्षात घेता भारतातील लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल आहे किंवा नाही, असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला असता, व्याख्यात्यांनी सांगितले की, हे खटके म्हणजे एकप्रकारे भूषणच मानले पाहिजे. असे खटके जगातील सर्व संसदीय लोकशाहीत घडलेले आहेत व आजही घडतातच. नियम राखून खटके उडाले तर लोकशाहीला काहीही धोका पोहोचण्याची धास्ती बाळगण्याचे कारण नाही.

कल्याणकारी (वेल्फेअर) राज्य व समाजवादी रचना ह्यांतील फरक स्पष्ट करताना व्याख्याते म्हणाले, समाजवादी पद्धती आली तरी नागरिकांचे कल्याण साधले जाईलच, अशी शाश्वती मिळत नाही. समाजवादी राजवटींतही कामगारांची पिळवणूक चालू राहू शकते. रशियात स्टॅलिनच्या राजवटीतील अनुभव यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. उलट समाजवादी राजवट नसताही नागरिकांचे सौख्य पुष्कळ प्रमाणात साधता येणे शक्य आहे.

**(* लोकशाही अभ्यास मंडळ, पुणे आयोजित महाराष्ट्र प्रादेशिक अभ्यास शिबिरात २४ एप्रिल,१९६५ रोजी शिवाजी मराठा हायस्कूल येथे दिलेले भाषण.)**

○○○

४२

# गोवध बंदी कायदा: गरीब शेतकऱ्यावर भार

जनसंघाला विवेकवादावर आधारलेला धर्म नको आहे, जनतेच्या परंपरागत तर्कदुष्ट अंध:श्रध्देवर आधारलेल्या भावनांचा प्रक्षोभ करून बुध्दीवादावर आधारलेल्या लोकशाहीस धोका निर्माण करावयाचा आहे. त्याकरिता साधूसंत, शंकराचार्य व इतर धर्मपीठे राजकारणांत ओढण्याचा उपद्व्याप करीत आहेत. ख्रिश्चन धर्मात पोप व पाद्री यांची संस्था म्हणजे धर्मगुरूंची संस्था आहे तशी हिंदुधर्मात कधीही नव्हती. शंकराचार्य हे सन्यास धर्माचा आदर्श जीवनामध्ये ठेवून राहणारे मठपति होत. ब्रिटीशपूर्व काळातील कोणत्याही हिंदु राजवट मराठेशाहीत किंवा पेशवाईत शंकराचार्याकडे धर्मनिर्णयाचा अधिकार नव्हता ख्रिश्चन धमाचे अनुकरण करून पोप बनविण्याचा प्रयत्न जनसंघ करीत आहे.

या संदर्भात गोहत्याबंदीबद्दल तर्कतीर्थांनी विवरण केले की या प्रश्नाची उकल इतिहास किंवा अर्थशास्त्र यांच्या आधारे होऊ शक्त नाही. कारण धार्मिक व नैतिक प्रश्न धर्मशास्त्राच्या व नीतिशास्त्राच्याच आधारे सोडवावयाचे असतात. गोहत्याबंदीचा कायदा केला तर धर्मांवर व नीतीवर काय विपरीत परिणाम होतो, यावा जनसंघाने व महाभियान समितीने विचार मुळीच केलेला दिसत नाही. हिंदू हा गोपूजक आहे. परंतु शेकडो वर्षे त्याने खऱ्या अर्थी गोरक्षणाची पर्वा केलेली नाही, हिंदू हा जोपर्यंत गोसंवर्धक होत नाही तोपर्यंत गोहत्याबंदी कायद्याचा परिणाम दंभ माजवण्यातच होईल. गरीब शेतकरी गाय- बैल इत्यादि जनावरे पाळतो. चांगली व भाकड झालेली जनावरे दोन्ही पाळणे त्याच्या कुवतीबाहेर जेव्हा जाते तेव्हा त्याच्यापुढे प्रश्न पडतो की, पोर प्रथम जगवावयाचे की ढोर. पोर जगविण्याकरिता तो ढोर विकतो. प्रथम जन जगवावयाचा की जनावरे जगवावयाची हा खरा नैतिक व धार्मिक सवाल आहे. जनसंघ व शंकराचार्य प्रथम जनावरांना महत्त्व देतात व नंतर जनांना महत्व देतात. काँग्रेस नेत्याचें हे कर्तव्य आहे कीं, गोहत्याबंदी कायदा केल्यास त्याचा परिणाम जनावरांची उपासमार करून व उपेक्षा करून निर्घृण असा निशस्त्र वध सर्वत्र सुरू होईल

याची त्यांनी प्रथम दखल घेतली पाहिजे. सगळा गोहत्याबंदी कायद्याचा भयंकर भार गरीब शेतकऱ्यावर पडणार आहे, हे कोणीही विसरता कामा नये.

**(मलकापूर येथील ९ फेब्रुवारी, १९६७ चे भाषण)**

ooo

४३

# शिक्षणाला वैज्ञानिक अधिष्ठान हवे

*(मराठी विज्ञान परिषदेचे दुसरे संमेलन २ डिसेंबर १९६७ रोजी पुणे येथे पार पडले. मराठी विज्ञान परिषद आयोजित सदर संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाचा यथामूल मसुदा. या संमेलनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते.)*

भारतीय व महाराष्ट्रीय शिक्षितांमध्ये विज्ञानाचे आकर्षण उत्पन्न होऊन दीडशे वर्षे होऊन गेली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर विज्ञानाच्या आराधनेचा ध्यास आपणास लागला आहे. विज्ञानाची महती पटण्याचे पहिले कारण म्हणजे त्याची जीवनातील उपयुक्तता होय. पश्चिमी संस्कृतीचे भारतात आगमन झाल्यानंतर म्हणजे भारतात आधुनिक पश्चिमी शिक्षणाचा प्रारंभ झाल्यानंतर भारतीय नवशिक्षित पाश्चात्त्यांच्या विज्ञानातील प्रगतीने दिपून गेले, असे म्हणतात. सामान्य जनही पाश्चात्त्यांनी येथे आणलेल्या यंत्रविद्येने आश्चर्यचकित होऊन गेले. प्राणरहित यंत्रे अत्यंत वेगाने काम करतात हे पाहून चमत्काराचा धक्का बसला व त्याची उपयुक्तता पाहून त्याचे प्रलोभन उत्पन्न झाले. आपली संस्कृती पश्चिमी आधुनिक शिक्षणाचा प्रसार होण्याच्या अगोदर गेली पाच हजार वर्षे यातु विद्येच्याच प्रभावाखाली नांदत होती. आपली संस्कृती मुळातली मांत्रिक संस्कृती आहे. विज्ञान चमत्कार घडविते त्यामुळे चमत्कारांची पूजा करणारी माणसे विज्ञानाचा आदर करू लागली.

परंतु विज्ञान हे चमत्कार करत नाही तर ते चमत्काराचा उलगडा करून बौद्धिक उपपत्तीची स्थापना करते. आइन्स्टाईन याने म्हटले आहे की, विश्व हा मोठा चमत्कार आहे. विज्ञान संशोधनाची खरी प्रेरणा या आश्चर्यचकित भावनेतून निर्माण होते. आज आपल्या देशात विज्ञानसाधनेकरता मोठी लगबग सुरू आहे. विज्ञान संशोधन संस्था स्थापन होत आहेत. कारण त्यांची आर्थिक नियोजनाला आवश्यकता आहे. ज्ञान हे मानवी जीवनाचे अनन्यसाधारण असे साधन आहे. निसर्गशक्तीचा जीवनार्थ वाढता उपयोग केल्यामुळेच

मानव्य विकसित होत आहे. निसर्गशक्तीच्या हल्ल्यातून बचाव करणे व निसर्गशक्तींना वश करून जीवनाची साधने निर्माण करणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. विज्ञानाचे केवळ साधनमूल्य पटल्याने विज्ञानाची वाढ होते यात शंका नाही. परंतु या उपयुक्ततावादी दृष्टिकोनाचे विज्ञानाच्या वाढीला बंधनही पडते. कारण ज्या संशोधनाचा व संशोधनातून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचा जीवनसाधनेत प्रत्यक्ष उपयोग नसतो, त्या ज्ञानसाधनेची माणूस उपेक्षा करतो व त्यामुळे एकंदरीत विज्ञानाची वाढ होण्यास पायबंद पडतो. त्या करिता ज्ञानाचे सौंदर्यमूल्य संस्कृतीत स्थिरावे लागते. नाक, डोळे इत्यादी इंद्रिये, वनराजी, जलाशय इत्यादी जीवनाची साधने होत; परंतु त्यांचे सौंदर्यही मानवी जीवनाचे घटक बनते. कलेकरता कला असते. सुंदर संगीताचा उपयोग काय, सुरेल भैरवी कशाकरता ऐकावयाची, असा प्रन जसा विसंगत ठरतो तसेच ज्ञान कशाकरता हाही प्रश्न विसंगत होय. ज्ञानाकरिता ज्ञान अशी धारणा ज्या संस्कृतीत मुरते तीच संस्कृती विशाल विज्ञानाचा पाया रचते. ग्रीक संस्कृतीने ज्ञानाकरिता ज्ञान होय, अशी ज्ञानाच्या स्वयंमूल्याची स्थापना केली व ज्ञानाचे सौंदर्य ओळखले, म्हणून मध्ययुगाच्या शेवटी विज्ञानाच्या आराधनेचे पुनरुज्जीवन झाले. विज्ञान हे स्वयंसुंदर आहे, उपयुक्त आहे आणि समाजसंस्थेचा विकास करणारे आहे. या तीन बाजूने विज्ञानाचा महिमा पश्चिमी संस्कृतीने जाणला म्हणून ती आज सबंध मानवविश्वाची मार्गदर्शक बनली आहे. आर्थिक उत्पादनाची साधने वाढली म्हणजे समाजरचनाही बदलते. विज्ञानात व तंत्रात प्रगती झाल्यामुळे औद्योगिक क्रांती निर्माण झाली व औद्योगिक क्रांतीने सामाजिक क्रांती झाली. विज्ञान व तंत्र यांच्या प्रगतीबरोबरच समाजरचना प्रगत होत जाते.

विज्ञानाची साधना केवळ विज्ञानाच्या उपयुक्ततेच्या जाणिवेने पुरी होऊ शकत नसते. त्याकरिता वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा लागतो. वैज्ञानिक दृष्टिकोनाची बीजे ही मानवी स्वभावातच आहेत; परंतु ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची बीजे योग्य रीतीने वाढीस लागण्यास परंपरागत श्रद्धेची बंधने प्रतिबंध करतात. माणसाला व्यवस्थित नेटाने प्रयत्न करण्याकरिता श्रद्धेची आवयश्यता असते हे खरे, परंतु ही श्रद्धा पुन: पुन: वारंवार तपासून बदलण्याचीही तितकीच आवयश्यता असते. तपासलेला अनुभव व युक्तिवाद याच्याशी सुसंगत अशी श्रद्धा माणसाला प्रयत्नशील बनविते. बुद्धिवादी नवे युग आणि श्रद्धाजड जुने युग यांच्यात हाच मूलत: फरक आहे. मोठमोठे विज्ञानसंशोधकही परंपरेच्या व श्रद्धेच्या बंधनात बद्ध असतात; परंतु स्वत:च्या विचारक्षेत्रात ते परंपरागत श्रद्धेचा अंमल चालू देत नाहीत. त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन एका मर्यादित क्षेत्रात त्यांना काम देतो. विज्ञानावर आधारलेली समाजरचना अशा एकांगी दृष्टिकोनाने तयार होत नसते. त्याकरिता वैज्ञानिक दृष्टिकोन विश्वव्यापी व्हावा लागतो. तो तसा बनल्याशिवाय सत्याच्या म्हणजे सतत प्रगत होणाऱ्या विज्ञानाच्या पायावर मानवी संस्कृतीची स्थापना होऊ शकणार नाही.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्राचीन जगात विज्ञानाची वाढ झाली; परंतु वैज्ञानिक पद्धती त्या प्राचीन जगात निर्माण झाली नाही. त्यामुळे विज्ञानाच्या प्रगतीचे सातत्य जगाच्या कोणत्याच संस्कृतीत प्राचीन इतिहासात दिसून येत नाही. भारतातही काही मर्यादेपर्यंत ज्योतिष, गणित, वैद्यक, धातुविद्या व भाषा या क्षेत्रात प्रगती होऊ शकली; परंतु तिला सातत्य आले नाही. ती गेल्या बाराशे वर्षांत स्थगित झाली. युरोपियन संस्कृतीतही असेच घडले. वैज्ञानिक प्रगल्भ पद्धतीची प्रथम जोड गॅलिलिओने दिली. त्यामुळे गेल्या चारशे वर्षांत पश्चिमी संस्कृतीत ज्ञान सतत वाढत गेले. वैज्ञानिक पद्धतीची मीमांसा आणि प्रत्यक्ष विज्ञान या दोघांचे अव्याहत साहचर्य टिकून राहिल्यामुळेच अप्रतिबंध विकासाचे विशाल दृश्य मानवी इतिहासात निर्माण झाले.

वैज्ञानिक संशोधनाच्या पद्धतीमध्ये सगळ्यात कठीण प्रश्न म्हणजे संशोधनाचा प्रारंभ कोठून करावयाचा हा होय. संशोधनाच्या मार्गातील पुढील पायऱ्या चढण्याला उपयुक्त अशा शिस्तशीर पद्धतीमध्ये वाक्‌बगार असलेल्या संशोधकाने प्रारंभी जर चूक केली तर त्याचे संशोधनाचे आटोकाट प्रयत्न व्यर्थ जाण्याचा फार संभव असतो. बंदरातून दूरच्या प्रवासास निघणारे जहाज निघताना जर चुकीच्या दिशेने निघाले तर त्याची जी अवस्था होते तीच गोष्ट संशोधकाची होते. जहाजाचा कप्तान कितीही कुशल कर्णधार असला तरी त्याच्या पदरी निराशाच पडते. गॅलिलिओ, लव्हॉयसीर किंवा आइन्स्टाईन हे जगातील संशोधनाची योग्य दिशा प्रारंभीच ओळखणारे अलौकिक प्रज्ञावंत होत. विचारांची किंवा संशोधनाची उत्तम काटकसर कशी करावी हे त्यांना चांगले कळले होते. मुख्य अडचण कोणती, सुप्रसिद्ध वैज्ञानिक पद्धतींचा कोणत्या मुद्यांवर उपयोग करावा, हे ओळखण्यातच विज्ञानवेत्त्यांचे अलौकिक वैशिष्ट्य सिद्ध होते. मुख्य प्रश्नांचे हृदगत सापडावे लागते. विज्ञानवेत्त्यांना प्रयोगाचे तंत्र उत्तम माहीत असले तरी हे प्रयोग कोठे करावयाचे हे समजणे अत्यंत महत्त्वाचे असते. तंत्र व प्रयोग यासंबंधी पुष्कळ ग्रंथ झाले आहेत; परंतु संशोधनाच्या प्रारंभी आवयक असणारी मनोभूमिका व वैचारिक पार्श्वभूमी काय असावी याचे नीट स्पष्टीकरण मनाशी करून घेतलेले असावे लागते.

संशोधनाच्या प्रारंभी विज्ञानात वा तत्त्वज्ञानात मार्गक्रमण कसे करावे यासंबंधी तज्ज्ञांनी अनेक प्रकारची उत्तरे दिली आहेत. या तज्ज्ञांमध्ये फ्रॅन्सिस बेकन, रेन देकार्त, मॉरिस कोहेन आणि जॉन ड्युई यांनी सांगितलेला विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. यापैकी प्रत्येकाने काही मूलभूत मुद्दे सांगितले आहेत. संशोधनाच्या प्रारंभी कोणती पहिली गोष्ट केली पाहिजे याचे उत्तर थोडक्यात बेकनच्या मते असे सांगता येईल की, प्रत्यक्ष दिसणाऱ्या किंवा अनुभवास येणाऱ्या घटनांचे स्वरूप व अर्थ समजून घ्यावा व परंपरागत श्रद्धांची व मानीव कल्पनांची बंधने झुगारून द्यावीत. कारण या श्रद्धा व कल्पना प्रत्यक्ष अवलोकनात येणाऱ्या घटनांच्या योग्य अर्थाचे ज्ञान होण्यास अडथळा आणतात. या श्रद्धांना व कल्पनांना

बेकन पूज्य पुतळे (Idols) म्हणतो किंवा मूर्ती म्हणतो. मूर्तिभंजन हे संशोधकाच्या पहिल्या कर्तव्याचा भाग होय. वास्तविक तथ्यांचे अवलोकन व मूर्तिभंजन ही संशोधनाची अपरिहार्य अट होय. ब्रिटिश अनुभववादाचा मुळारंभ बेकनने केला. विज्ञानाचे तर्कशास्त्र त्याने प्रथम मांडले आणि मनुष्यजातीला आदेश दिला की, विज्ञान हीच मानवाची मोठी शक्ती होय.

विज्ञानपद्धतीचा दुसरा महान मार्गदर्शक रेन देकार्त होय. हा आधुनिक पश्चिमी तत्त्वज्ञानाचा जनक होय. हा स्वत: मोठा गणिती होता. त्याने गणिताचे पृथक्करण व बीजगणित यांच्या नव्या पद्धती बसविल्या आणि निगमनात्मक तर्कशास्त्राच्या पद्धतीची संहिता रचली. गणित सोडल्यास सर्व परंपरागत विद्यांचे आधार सदोष आहेत व शंकाग्रस्त आहेत असे त्याने प्रथम बजावले. ज्ञानाचा निश्चित पाया निर्माण करण्याकरिता ज्ञानपद्धतीच्या चार नियमांच्या अनुसार विद्येस प्रारंभ करा असे त्याने घोषित केले.

(१) जी गोष्ट कोणत्याही प्रकारे संशयित करता येत नाही तीच सत्य म्हणून स्वीकारली पाहिजे. न तपासता घाईने एखादी गोष्ट केवळ पूर्वग्रहामुळे मनुष्य सत्य म्हणून स्वीकारतो. अनेक प्रकारची रूढ झालेली मते असतात. ती मते खरी कशावरून असा प्रामाणिक संशय उत्पन्न झाल्यास त्वरित त्याज्य मानली पाहिजेत. शंकेच्या वा आक्षेपांच्या प्रखर चाचणीतून जे नि:संदिग्ध शिल्लक राहते तेथूनच ज्ञानाचा प्रारंभ होतो. बाकी सगळे विचार अविश्वसनीय ठरतात. (२) ज्ञानाच्या क्षेत्रात अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचे परिगणन व वर्गीकरण करावे आणि प्रश्नांचे उपप्रश्न कोणते तेही पृथक्करण करून काढावे त्यामुळे उत्तरे शोधण्यात गुंतागुंत कमी होते. (३) अत्यंत नि:संदिग्ध तथ्य वा तथ्ये कोणती हे प्रथम निश्चित करावे. हे तथ्य किंवा ही तथ्ये अगदी साधी व सर्वांना कळतील वा पटतील अशी साधी असतात. या साध्या तथ्यांतून निगमन निघत जाते व त्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण विशाल विद्येची निर्मिती होते. (४) शेवटचा नियम असा की, परिगणन सर्वगामी व पूर्ण व्हावयास पाहिजे. समालोचन इतके व्यापक पाहिजे की, त्यातून काहीही सुटता कामा नये.

सकृद्दर्शनी बेकन व देकार्त या दोघांचेही विचार प्रस्तुत विषयाच्या बाबतीत समान आहेत. बेकन परंपरागत श्रद्धांना प्रत्यक्ष अनुभवाची कसोटी लावतो व प्रत्यक्ष इंद्रियजन्य अनुभवाने मिळविलेल्या ज्ञानाला जाणिवेच्या केंद्रस्थानी स्थापितो. उलट देकार्तची पद्धती बुद्धिनिष्ठ आहे. तो परंपरागत श्रद्धांवर संशयांचा मारा करून जमीनदोस्त करतो व त्यापैकी संशयाच्या माऱ्यापुढे जे टिकतील तेच विचार ज्ञानाचे प्रारंभस्थान म्हणून स्वीकारतो. बेकनची विधायक अवलोकननिष्ठ पद्धती आहे. देकार्तची त्याहून निराळी नकारात्मक अंतर्मुख पद्धती (Introspective) आहे. नवीन अनुभव अवलोकनाने मिळवा असे बेकन म्हणतो. मानवी मनात असलेल्या व साठलेल्या विचारांपैकी शुद्ध स्वरूपात असलेला विचार निवडून काढा असे देकार्त सांगतो. बुद्धीच्या प्रखर तपासणीतून शिल्लक राहिलेला विचार प्रमाणभूत ज्ञान होय असा त्याचा दावा आहे. देकार्त हा गणिती असल्यामुळे 'गणिताची निगमनपद्धती'

(Deductive Formal Method) ज्ञानमार्ग म्हणून सांगतो. उलट बेकन अवलोकननिष्ठ निर्णयाकडून व्यापक सिद्धांताकडे जाणारी विगमन पद्धती (Inductive Method) प्रशंसितो. पहिल्याचे हत्यार संशय हे आहे आणि दुसऱ्याचे हत्यार शुद्ध इंद्रियजन्य अवलोकन हे आहे.

मॉरिस कोहेन दोन्हीही पद्धतींना सारखेच महत्त्व देतो. या दोन्ही पद्धतींचा उत्कृष्ट समन्वय केल्यामुळेच न्यूटनला आधुनिक भौतिक विज्ञानाच्या विशाल उभारणीत अपूर्व अलौकिक यश प्राप्त झाले. न्यूटनने आइन्स्टाईनपर्यंत दोनशे वर्षे भौतिक विज्ञानावर सार्वभौमत्व गाजविले. मॉरिस कोहेन व त्याचा शिष्य अर्नेस्ट नॅगेल यांचे असे म्हणणे आहे की, केवळ प्रत्यक्ष अनुभवाला तात्त्विक शुद्ध अनुभूती (Theoretical Intuition) साहाय्यक असल्याशिवाय चुकीचा अर्थ होऊ शकतो. प्रत्यक्ष इंद्रियजन्य अनुभवाने पृथ्वी ही सपाट आहे असा निष्कर्ष निघतो. नुसत्या घटनांचे अध्ययन करून विज्ञानाचे सिद्धांत निष्पन्न होत नसतात. घटनांच्या अवलोकनाला मार्गदर्शक म्हणून गृहीतकृत्ये (Hypothesis) घटनांना एका व्यवस्थित साच्यात बसविण्याचे व अनुमानाचे कार्य करतात. गृहीतकृत्यांनाच पुष्टी देणाऱ्या घटना अनुभवात साचत गेल्या आणि गृहीतकृत्याचे असत्यत्व ठरविणाऱ्या घटना प्रयत्नांती सापडल्या नाहीत तर गृहीतकृत्याच्या आधारावर विज्ञानाची उभारणी होते.

जॉन ड्युई याने माणसाच्या संपूर्ण परिस्थितीला विज्ञानाचा विषय म्हणून स्वीकारले आहे. माणसाच्या भोवतालचा विशाल व अनंत निसर्ग आणि माणसाचे सांस्कृतिक विश्व हे दोन्हीही त्याच्या मते विज्ञानाचा विषय होय. धर्म, नीती इत्यादी देखील विज्ञानाच्या संशोधनीय क्षेत्रात अंतर्भूत होतात. रसेलने विज्ञान आणि हित व अहित यांचा विवेक करणारी प्रज्ञा अशा मानवी ज्ञानाच्या दोन शाखा मानल्या आहेत. विज्ञानाने निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक संस्कृतीच्या उभारणीस हितविषयक प्रज्ञेची (नैतिक बुद्धीची) जोड द्यावयास पाहिजे असे रसेल म्हणतो. असा भेद ड्युई मानत नाही. मानवी इच्छा व बुद्धी या दोन्ही प्रवृत्तींचे कार्य नीती व निसर्ग या क्षेत्रात सारखेच असते असे तो सांगतो. म्हणून नीतिशास्त्रातही विज्ञानाचा मोठा भाग असतो. कारण मानस-विज्ञानाशिवाय नीतिशास्त्र तयार होत नाही अशी ड्युईची धारणा आहे. हा सूक्ष्म मतभेद बाजूला सारला तरी ड्युईचे वैज्ञानिक पद्धतीला मिळालेले नवे मार्गदर्शन रसेललाही नाकारता येणार नाही. बेकन, देकार्त व कोहेन यांनी प्रारंभ कसा करावा यासंबंधी सांगितलेली पद्धती अपुरी राहते ही गोष्ट ड्युईने स्पष्ट केली आहे. आपल्या तर्कशास्त्रात जॉन ड्युई म्हणतो की, विज्ञानवेत्त्यांच्या भोवताली पसरलेले नैसर्गिक व सांस्कृतिक विश्व अनंत व अगणित आहे. त्यातील कोणती परिस्थिती संशोधनास प्रवृत्त करते? कोणता विश्वाचा अंश संशोधनाचा विषय बनतो? याचे उत्तर वरील तिन्ही तज्ज्ञांनी दिलेले नाही. अनुभवाने वस्तुस्थितीचे ज्ञान मिळविले पाहिजे, अंधश्रद्धांची पडळे खंडिली पाहिजेत आणि अनुभव व तात्त्विक गृहीतकृत्ये यांचा मेळ घालून संशोधनास सरसावले पाहिजे, हे सर्व खरे; परंतु संशोधनाचा विषय कोणता व कसा निवडला जातो याचे

उत्तर वरील तज्ज्ञ देत नाहीत. त्याचे उत्तर न मिळाल्यास व्यर्थ, इकडेतिकडे, अमर्याद भटकत राहिल्याशिवाय गत्यंतर राहत नाही. प्रश्न निर्माण झाल्याशिवाय उत्तर शोधण्याची प्रवृत्ती होत नसते. प्रश्न उत्पन्न झाला, अडले, अनिश्चितता उत्पन्न झाली किंवा अनिश्चित अवस्थेतून मार्ग काढला पाहिजे अशी अनिवार्य उत्कंठा निर्माण झाली म्हणजे संशोधनाची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. अनिश्चित परिस्थिती (Indeterminate Situation) संशोधनाला आवयक असलेली पार्श्वभूमी होय. तेथे प्रश्न (Problem) निर्माण होतो. प्रश्न नसेल तर संशोधनाची इच्छा होत नाही. अनिश्चितता वा अडचण प्रश्न निर्माण करील तेव्हाच संशोधनाची इच्छा होईल. जी अनिश्चितता परिस्थितीत असते, तिचे बुद्धीने सम्यक् आकलन झाले व त्यामुळे प्रश्न निर्माण झाला म्हणजे संशोधनाला दिशा मिळते, असे जॉन ड्युईचे संशोधनाचे तर्कशास्त्र सांगते. नुसता प्रन घोळत ठेवून विज्ञानाचे पाऊल पुढे पडत नसते. त्याकरिता संशयग्रस्त परिस्थितीत पूर्वानुभवनिष्ठ ज्ञानसंपत्तीच्या साहाय्याने प्रतिभेचे स्फुरण निर्माण व्हावे लागते. प्रतिभेच्या स्फुरणाने मोठी दूर झेप घ्यावी लागते. या झेपेतच नवे गृहीतकृत्य तयार होते व संशोधनाचे दरवाजे सताड उघडले जातात व नवे नियमांचे जग उभारले जाते.

मराठी साहित्यात वैज्ञानिक साहित्याचे फार मोठे दारिद्र्य आहे. हे दारिद्र्य नष्ट करून वैज्ञानिक साहित्याची भर टाकणे हे फार महत्त्वाचे कार्य आहे. मातृभाषेत विज्ञान निर्माण झाल्याशिवाय भारतीय मनुष्य विज्ञाननिष्ठ संस्कृती निर्माण करू शकणार नाही. त्याकरिता केवळ निरनिराळ्या विज्ञानशाखेवरचे ग्रंथ निर्माण करून भागणार नाही. त्याकरिता वैज्ञानिक दृष्टिकोन व वैज्ञानिक पद्धती प्रतिपादणारा ग्रंथसंभार तयार केला पाहिजे. मराठीत तर्कशास्त्रावर थोडे साहित्य तयार झाले आहे. परंतु, वैज्ञानिक पद्धतीवर अपवादादाखल एकच छोटेखानी पुस्तक तयार झाले आहे, ते म्हणजे समाज प्रबोधन संस्थेचे प्रा. अ. भि. शाहलिखित पुस्तक होय. त्या पुस्तकात आम्ही सांगितलेल्या विचारांचे विवरण जिज्ञासू वाचकाला जरूर मिळेल असा आमचा विश्वास आहे.

भारतामध्ये विज्ञान निर्मितीची ओढ लागलेली दिसते; परंतु आपल्या मूळच्या अभिमानास्पद भारतीय संस्कृतीच्या काही मूलभूत मूल्यांचे अवमूलन करणे अत्यंत आवश्यक आहे. ती मूल्ये वैज्ञानिक दृष्टीचे बंधन करतात. आपली मने अजून भूतकाळाने दिलेल्या मांत्रिक संस्कृतीच्या चमत्कारयुगाने भारलेली आहेत. विज्ञान व तंत्र हे चमत्कार निर्माण करते म्हणून आपण त्यांच्या विलक्षण आकर्षणाने मोहित होतो. विज्ञान हे चमत्कार निर्माण करीत नाही तर चमत्काराचा निरास करते. बुद्धिवादी संस्कृती निर्माण करणे हे आपल्या शिक्षणसंस्थेचे महत्त्वाचे कार्य आहे. आपण लोकशाही निर्माण केली आहे. लोकशाहीचे वैयक्तिक मतस्वातंत्र्य मूलभूत तत्त्व आहे. मतस्वातंत्र्याच्या योगाने मते तपासली जातात. त्यामुळे बुद्धिवादाची धार तीक्ष्ण होते. भावनाविवशता त्यामुळे कमी होते. लोकशाही संस्कृती ही बुद्धिवादी संस्कृती होय; परंतु दु:खाची गोष्ट अशी की

आपले लोकशाहीचे सत्ताधारी प्रतिनिधीसुद्धा परंपरागत मांत्रिक संस्कृतीचे बळी आहेत. ते अजून जादूगार साधूंच्या सार्वजनिक पूजा बांधत आहेत! परंतु त्यांच्या हाती तर आपल्या शिक्षणसंस्थांची मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याचे अधिकार आहेत. हे मार्गदर्शकच अजाणपणे आपल्या परंपरागत अंधश्रद्धेच्या पाशात सापडलेले दिसतात. त्यामुळे आपल्या वैज्ञानिक प्रगतीचे भवितव्य कठीण आहे असा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही. आपण सत्तेच्या स्थानात नसलेले मोठमोठे विद्वान जर या दु:खद परिस्थितीची योग्य दखल घ्याल तरच शिक्षणक्षेत्राला वैज्ञानिक बुद्धिवादाचे अधिष्ठान प्राप्त करून देऊ शकाल. विज्ञानाचे थोर भवितव्य रचण्याचे सामर्थ्य आपल्या ठिकाणी आहे म्हणूनच मी आपणास वरील नम्रपणे इशारा देऊन या परिषदेचे उद्घाटन झाले असे जाहीर करतो.

**(मराठी विज्ञान परिषद, दुसरे संमेलन, पुणे येथे दि. २ डिसेंबर, १९६७ रोजी 'वैज्ञानिक प्रेरणा व वैज्ञानिक प्रगती' या विषयावर दिलेले उद्घाटनपर भाषण)**

ooo

४४

# भारतीय संस्कृती : शोध व बोध

सगळ्या सुसंस्कृत मानव समाजामध्ये दोन प्रकारचे साहित्य निर्माण होत असते. एक चिरंतन मूल्य असलेले आणि दुसरे देश, काल, परिस्थितीने मर्यादित मूल्य असलेले. ज्या साहित्याला देश, काल, परिस्थितीच्या मर्यादा पडत नाहीत असे साहित्य जगातील सर्व सुसंस्कृत व सद्भिरुची असलेल्या माणसाला आकर्षित करीत असते. असे साहित्य केवळ आकर्षित करीत नाही तर आश्चर्य उत्पन्न करते; नवी प्रेरणाही देते. ज्या विशिष्ट संस्कृतीच्या परिसरात ते साहित्य निर्माण होते, त्या संस्कृतीची ती सगळ्या जगाला देणगी असते. त्या साहित्याची जन्मदात्री म्हणून ती ती विशिष्ट संस्कृती, महती व कीर्तीस प्राप्त होते; परंतु त्या संस्कृतीने निर्माण केलेले साहित्य, कला, तत्त्वज्ञान, विज्ञान हे सर्व मानवांच्या समान संस्कृतीचे वैभव म्हणून मान्यता पावते. अतिप्राचीन काली भारत, ग्रीक, रोम इ. देशांमध्ये भिन्न भिन्न संस्कृतींचा वैभवशाली विकास झाला. त्या संस्कृतींनी कला, काव्य, साहित्य व तत्त्वज्ञान या संबंधी फार मोठी निर्मिती केली. त्यातील शाश्वत मूल्यांचे जे जे काही होते, त्यांचा परस्परांमध्ये विनिमय होऊन विनिमय करणाऱ्या संस्कृतींची वाढच झाली.

भारताने ही प्राचीन काळी अशी संपन्न मानवी संस्कृती निर्माण करण्यामध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. हिंदू, मुसलमान, बौद्ध, ख्रिश्चन, पारशी इ. भिन्नधर्मीय समाजाचा संकुचित दृष्टिकोन लक्षात घेऊन विचार केला असता ही प्राचीन भारतीय संस्कृतीची कामगिरी या भेदांच्या संकुचितपणाच्या मर्यादा नष्ट करते. शाश्वत मूल्यांचे साहित्य हे अभेद निर्माण करते. भेदांच्या तटांना ते टिकू देत नाही. मनुष्याच्या व्यापक नैतिक बुद्धीला व सत्य संशोधक प्रवृत्तीला अशाप्रकारे साहित्य प्रेरणा देऊन उजळवून टाकते. किंबहुना अशा तऱ्हेच्या शाश्वत मूल्यांच्या उदात्त विचारांच्या साहित्यामुळे जग आपपरभाव विसरून जाते. रामायण, महाभारत, अश्वघोषाचे बुद्ध चरित्र, धम्मपाद, बौद्ध जातककथा, भर्तृहरीचे शतकत्रय, पंचतंत्र, मृच्छकटिक व शाकुंतल यासारखी नाटके - अशा प्रकारचे साहित्य

अनेक युगे गेली, राजवटी बदलल्या, अनेक वैचारिक क्रांत्या झाल्या तरी त्यांची रहस्ये अबाधित राहतात, त्याला काळाची बाधा होत नाही. किंबहुना सांस्कृतिक भेदवादाच्या अहंकारिक भावनाही अशा साहित्याचा अव्हेर करू शकत नाही. मूर्ख, गर्विष्ठ व भ्रष्ट बुद्धीचे सत्ताधारी अशा साहित्याची उपेक्षा करू शकतात किंवा असे साहित्य दडपू शकतात, हे जरी खरे असले तरी त्यांची विवेकबुद्धी व सद्भिरुची शुद्ध राहते. ते अशा साहित्याला तारण्याचा प्रयत्न करत असतात व असे साहित्य बुडले तर मानवी संस्कृतीचे मोठे नुकसानच झाले असे मानून कष्टी होतात.

भारताच्या चिरंतन साहित्यात वेद व उपनिषदांना अग्रस्थान आहे. ऋग्वेद हा मानवी संस्कृतीतील आद्य ग्रंथ म्हणून विश्वसाहित्य इतिहासात मान्यता पावला आहे. मनुष्य सुसंस्कृत अवस्थेत पोहोचल्यानंतर त्याचे धार्मिक विचार कसे विकसित होत होते, त्याचे निदर्शन ऋग्वेदात मिळते. बहुदेवतावादाकडून एकेश्वरवादाकडे मनुष्याचा विचार कसा विकसित होत होता, याच्या प्रक्रियेचा बोध ऋग्वेदाच्या अध्ययनाने होतो. ललित साहित्याची एक उन्नत अवस्था ही ऋग्वेदाच्या काही सूक्तांमध्ये अनुभवास मिळते. विश्वाच्या शक्तीचे वैभव पाहून मनुष्याला चमत्कृतिपूर्ण अनुभव कसा येत होता, याचे प्रत्यंतर या सूक्तांमध्ये ग्रथित केले आहे. वेदांचे विकसित व प्रगल्भ व गंभीर अंतिम रूप म्हणजे उपनिषदे होय. उपनिषदे म्हणजेच वेदान्त. तत्त्वज्ञानाच्या विश्वेतिहासात उपनिषदांपासून प्रारंभ होतो. तात्त्विक विचारांचा उपनिषदांत केवळ प्रारंभ नसून एका अर्थाने तात्त्विक विचारांची परिसीमा ही उपनिषदांनी गाठली आहे असे अनेक पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वचिंतकांचे मत आहे. शोपेन हॉवेर हा जर्मन आधुनिक तत्त्वचिंतक म्हणतो की, 'उपनिषदांच्या वचनांनी मला परमशांती लाभली.'

वाल्मीकींचे रामायण प्राचीन काळी भारताच्या स्थल, काल मर्यादांच्या पलीकडच्या त्या काळच्या सुधारित जगाला माहीत झाले होते. त्या प्राचीन युगात ग्रीक लोक असे समजत, की भारतात होमरच्या इलियड महाकाव्याचे भाषांतर फार आवडीने वाचतात. ते म्हणजेच वाल्मीकीचे रामायण होय. होमरच्या 'इलियड'मधील मुख्य कथानकाशी रामायणाच्या मुख्य कथेचे काही एक वैशिष्ट्यपूर्ण साम्य आहे. त्यामुळे कर्णोपकर्णी गेलेल्या वार्तेमुळे ग्रीक लोकांची भारतीय लोक होमरचेच काव्य वाचतात अशी समजूत झाली होती. अलीकडच्या काळात म्हणजे गेल्या शतकात रामायणावर इलियडची छाप आहे, असे वेबरसारख्या पश्चिमी पंडितांनी मांडले. ते न्यायमूर्ती तेलंग यांनी महत्प्रयासांनी खोडून काढले. हा प्रश्न इथे पुन्हा एवढ्याचसाठी उपस्थित केला, की जगातील उच्च प्रतिभाशाली महाकवींची प्रतिमा काही संबंध नसताना समान दर्जाच्या व काही समान छटा असलेल्या उच्च साहित्यकृती निर्माण करीत असतात. त्यामुळे भिन्न भिन्न संस्कृतीत अशा कलाकृतींवर आपला हक्क शाबित करण्याचा प्रयत्न करीत असतात. रामायण, महाभारत, ब्रह्मांड पुराण यांचा प्रभाव

इसवी सनाच्या पाचव्या शतकापासून आतापर्यंत कंबोडिया, थायलंड, जावा, सुमात्रा, बाली, इटली, आग्नेय व पूर्व आशिया इ. देशांच्या संस्कृतीमध्ये नृत्य, नाट्य, मूर्तिकला, मंदिर यांवर पडत आहे.

बुद्धाचे चरित्र व बुद्धाचे तत्त्वज्ञान यांनी मध्य आशिया, पूर्व आशिया व दक्षिण आशिया येथील राष्ट्रांच्या साहित्यावर व आचारावर, धर्मावर व दैनंदिन दिनक्रमावर गेली दोन हजार वर्षे फार मोठा खोल परिणाम केला आहे. बौद्धांचा त्रिपिटक हा फार मोठा ग्रंथ संग्रह आहे. या धर्मग्रंथ संग्रहातील प्रकरणे पुस्तक रूपाने बरोबर घेऊन भारतीय भिक्षुक इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकापासून ते इसवी सनाच्या सातव्या शतकापर्यंत, किंबहुना दहाव्या शतकापर्यंत जगभर पसरत होते. त्यांनी बुद्धाच्या जातक कथा सांगून लोकरंजन करत लोकांना नीतीचेही पाठ दिले. विद्वानांना आणि बुद्धिवानांना तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र शिकवून विचारवंत केले. त्यामुळे दक्षिण आशियातील व पूर्व आशियातील जपानपर्यंतच्या राष्ट्रांचे वैचारिक साहित्य समृद्ध झाले. बुद्धचरित्र हे पालीमध्ये आले आहेच; परंतु अश्वघोषाने लिहिलेल्या संस्कृतमधील बुद्धचरिताला प्रसन्न अशी काव्यशोभा लाभली आहे. काही साहित्यिक, इतिहास तज्ज्ञ असे म्हणतात की, कविकुलगुरु कालिदासावर अश्वघोषाच्या बुद्धचरिताची खूप खोल छाया पडली आहे. अलीकडे एकोणिसाव्या व विसाव्या शतकात बौद्ध धर्म व बौद्ध साहित्य यांचे पाश्चात्त्य विद्वानांनी फार मोठे संशोधन करून अनेक इंग्लिश, फ्रेंच, स्पेन, जर्मन, इटालियन भाषांमध्ये लिहिले आहे. बुद्धाचा विचार हा श्रद्धेच्या पायावर उभारला नसून तो बुद्धिवादावर उभारलेला आहे, याचेच आकर्षण पश्चिमी विद्वानांना अधिक आहे. महंमद, ख्रिस्त, मोझेस यांचे संदेश हे ईश्वराच्या प्रेषितांचे संदेश आहेत. त्यांची बौद्धिक चिकित्सा करू नये. कारण ते ईश्वराच्या प्रेषितांचे उद्गार आहेत असे हे पोथीप्रामाण्य बुद्धाच्या संदेशाला लागू पडत नाही. माणसाच्या विवेक बुद्धीवरच बुद्धाचा संदेश आधारलेला आहे. ती तर्कशुद्ध विचारसरणी आहे. त्याला पारलौकिक, ईश्वरीय किंवा दैवी आधारावाचूनच प्रामाण्य आहे. हे वैशिष्ट्य जगातील विचारवंतांना मोलाचे वाटते.

बुद्धाच्या विचाराखालोखाल भगवद्गीतेचे स्थान जगाच्या साहित्यात महत्त्वाचे मानले जाते. भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान हे हिंदूंचे तत्त्वज्ञान आहे, हे जरी खरे असले तरी तो एका मानव समाजाचे, मानव समाजाने मान्य केलेला गहन असा धार्मिक, नैतिक, मौलिक असा विचार आहे. या दृष्टिकोनातून जगातील अनेक विद्यापीठांमधून भगवद्गीतेचे अध्ययन होत असते. यहुदी, ख्रिश्चन किंवा इस्लामी मोक्षाच्या कल्पनेपेक्षा एक विलक्षण असा मोक्ष विचार भगवद्गीतेत असल्यामुळे त्याचे स्वागत जगातील इतर धर्मांचे विचारवंत करीत असतात. खरे पाहता वर्तमान बुद्धिवादी व विज्ञानाच्या नावाखाली असलेली विचारनिष्ठ मानवी संस्कृती ही कोणत्याही एका धर्माची एकांगी तरफदारी करूच शकत नाही. स्वधर्माचा अभिमान बाळगणारे ख्रिश्चन किंवा यहुदी पंडित, संत, भगवद्गीतेचा सिद्धांत मान्य करीत नसले तरी

तो गंभीर चिंतनाचा विषय मानतातच. कारण कोणताही एक धर्म आता स्वत:चे वरिष्ठत्व स्थापित करू शकत नाही. याची स्पष्ट जाणीव झाल्याच्या खुणा आजच्या वैचारिक जगात वारंवार सापडतात. धार्मिक तत्त्वज्ञानविषयक साहित्य जसे आंतरराष्ट्रीय साहित्य बनते तसेच किंवा त्यापेक्षाही अधिक धर्मविषयाहून अन्य विषयांवरील साहित्य हे आंतरराष्ट्रीय बनण्याचा त्याच्यामध्ये स्वाभाविक कल असतो.

प्राचीन काळी नाट्य वाङ्मय भारतात तयार होत होते. या साहित्यावर ग्रीक साहित्याचा प्रभाव पडला आहे, असे पश्चिमी विचारवंत संस्कृत साहित्याचा अभ्यास केल्यावर म्हणू लागले. रामायण आणि महाभारत सोडल्यास त्यानंतरच्या काळात ट्रॅजिडी म्हणजे दु:खांतिका हा साहित्य वा नाट्यप्रकार भारतीय साहित्यात मूळ धरू शकला नाही किंवा वाढू शकला नाही. ग्रीक साहित्यात ट्रॅजिडी हा साहित्य प्रकार वा नाटक प्रकार अत्यंत महतीस पोहोचला होता. ग्रीकांशी भारताचा संबंध अलेक्झांडरच्या स्वारीनंतर अनेक शतके कायम राहिला होता. अलेक्झांडरने वा त्यानंतरच्या ग्रीक राजांनी भारतामध्ये येताना आपल्याबरोबर कलाकार आणले होते असे म्हणतात. ग्रीक कलाकारांचे रंगभूमीवरून नाट्य प्रयोग पाहून भारतीय साहित्यकारांनी नाट्यरचना केली असे पश्चिमी पंडित म्हणतात. परंतु ग्रीकांचा अत्यंत आवडता नाट्यप्रकार म्हणजे ट्रॅजिडी. तिची भारतीयांनी का उपेक्षा केली याचे उत्तर मिळत नाही. त्यावर पश्चिमी विद्वानांचे म्हणणे असे येते की, ग्रीकांच्या कॉमेडी म्हणजे सुखांतिकेचे अनुकरण करून भारतीय साहित्यकारांनी नाटके लिहिली. विदूषक हे पात्र ग्रीकांच्या अनुकरणाचे निदर्शक आहे, असे म्हणतात. त्याचप्रमाणे मृच्छकटिकासारखे व्यावहारिक, सामान्य जनांच्या जीवनाचे सार लक्षात घेऊन रचलेले नाटक ही आत्यंतिक यशस्वी साहित्यिक कृती झाली. मृच्छकटिकाला पूर्वेतिहास सापडतच नाही, म्हणजे त्याच्यापूर्वी अशी व्यावहारिक सामान्य जनांच्या जीवनाचे रहस्य उलगडणारी नाटकांची परंपरा सापडत नाही. याचा इतकाच अर्थ, की ते एका प्रभावी पश्चिमी नाट्यपरंपरेच्या प्रत्यक्ष अवलोकनातून स्फूर्ती घेऊन तयार झालेले नाटक असेल. कोणी कोणाचे अनुकरण केले हा मुद्दा तितका महत्त्वाचा नाही व कितीही खोलात जाऊन शोध केला तरी निर्णय होण्याचे परिणाम आता सापडणे शक्य नाही. या चर्चेतून एक व्यापक निष्कर्ष असा निघतो की, मृच्छकटिकासारखी साहित्यकृती ही आंतरराष्ट्रीय अशा व्यापक संस्कृतीमध्ये स्थान मिळवते. कालिदासाचे शाकुंतल नाटक आजही जगाच्या साहित्य भांडारातले एक श्रेष्ठ रत्न आहे असे मानले जाते. त्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी व विशिष्ट देश, विशिष्ट काल हजारो वर्षांपूर्वीचा आहे. त्यावेळचा समाज, त्यावेळचे आचारविचार, त्यावेळचे भौतिक व आध्यात्मिक जीवन याचा वर्तमानकाळाशी कसलाही संबंध राहिलेला नाही. उदाहरणार्थ शाकुंतलात वर्णिलेला गुरू-शिष्यांचा आश्रम हजार-पंधराशे वर्षांपूर्वी होता की नाही हे सांगता येत नाही; परंतु आजच्या जगाला एक नितांत सुंदर साहित्यकृती म्हणून कालिदासाचे शाकुंतल मोहून टाकते.

आधुनिक काळात गेल्या दीडशे-दोनशे वर्षांत अनेक भारतीय भाषा विचार-विकासाच्या उच्च पातळीवर वावरू लागल्या आहेत. या भाषांतही काही विचारवंत, प्रतिभाशाली, जीवनाला क्रांतिकारक वळण देऊ इच्छिणारे लेखक, कवी व लोकनेते यांनी जगाला आकर्षित करणारे व काही बाबतीत चमत्कृतिमय अनुभूती देणारे साहित्य निर्माण केले आहे. रवींद्रनाथ ठाकूर, शरतचंद्र चटोपाध्याय, महात्मा गांधी यांचे साहित्य हे अस्सल भारतीय असूनदेखील त्याला जागतिक उच्च श्रेणीमध्ये फारच असे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. गांधी जेव्हा म्हणतात की, तुम्ही हिंदू आहात की मुसलमान आहात की ख्रिश्चन आहात यामुळे तुम्ही मानवतेचे ऋण फेडू शकत नाही, तेव्हा त्या त्या धर्मालाही महत्त्व आणू शकत नाही, पण तुमचे शील व वर्तन शुद्ध असेल तर तुम्ही ज्या धर्माचे असाल त्या धर्माला तुम्ही उजाळा द्याल व ऋण फेडाल. महात्मा गांधींचे असे विचार हे आज माणुसकीची महती स्थापित करणारे विचार आहेत. अशा लेखकांमुळे भारतीय वाङ्मय हे विश्व वाङ्म्यातील चिरंतन, स्थायीस्थानी विराजमान झाले आहे.

**(आकाशवाणी पुणे केंद्र, ध्वनिमुद्रण दि. २० मे १९७०)**

ooo

४५.

# हिंदुधर्म : तत्त्व आणि व्यवहार

हिंदुधर्माचे चिंतन मुख्यतः श्रुती व स्मृतींच्या आधारे होत आहे. श्रुती व स्मृती मानल्या गेल्या. श्रुती म्हणजे चार वेध. प्रत्येक धर्मात अशा प्रकारचे प्रमाण ग्रंथ असतात. उदा. बायबल, कुराण, त्रिपिटक इ. स्मृतींमध्ये पुराणे, गीता, इ.चा अंतर्भाव होतो. जे जे वेदांत सांगितले गेले तेच कालांतराने स्मरून स्मृतींमध्ये सांगितले गेले. म्हणून स्मृती एका अर्थी वेदच आहेत. वेद सामान्यतः अपौरुषेय व अनादिसिद्ध मानले गेले आहेत. ते शाश्वत अनायन्त आहेत हा सनातनी दृष्टिकोन झाला.

ऐतिहासिकदृष्ट्या सर्व धर्मग्रंथांना इतिहास आहे. धर्मग्रंथ हे त्या त्या वेळच्या सामाजिक कल्पना, प्रेरणा, गरजा व स्थितीनुसार तयार झाले आहेत.

वेदांत मूर्तिपूजा नाही; पण यश आहे व या दोघांत विरोध नाही; कारण क्रियेत विरोध राहू शकत नाही. एका अर्थाने सर्व धर्मग्रंथ विरोधी विचारसरणीचे नाहीत; परंतु तसे भासतात. उदा. पूर्वी गोवध होत होता; कारण गो यज्ञाची परंपरा होती. त्या काळी ते योग्य मानले जात होते. कालमानानुसार गोहत्या पाप आहे, असे समजण्यात आले. म्हणजे धर्मग्रंथामध्ये कालभेदानुसार बदल झाला आहे. हा मीमांसक दृष्टिकोन. यामध्येच हिंदुधर्मातील विकला, समुच्चय व समन्वय या कल्पना अंतर्भूत आहेत.

हिंदुधर्माचा इतिहास वेदपूर्वकालापासूनचा आहे. वेदांपूर्वीची संस्कृती भारतात अस्तित्वात होती त्या संस्कृतीतील मूर्तिपूजा, लिंगपूजा, नदीपूजा इ. वैदिक परंपरेत समाविष्ट झाल्या आहेत.

योगपरंपरा हा वेदपूर्वकालीन भारतीयांचा धर्म मानला जातो. योग म्हणजे ध्यान किंवा समाधी आणि ही धार्मिक साधना विनवेदिकांकडून घेतली असे इतिहास सांगतो. आत्मिक परमशांतीचे ध्येय योगाचे साध्य होते. पुराणांच्या बाबतीतही ती वेदपूर्वकालातील आहेत असे आढळते. अठराव्या शतकापर्यंत पुराणे तयार होत होती. महाभारतालाही इतिहास

आहे आणि भागवत धर्मातील संतवाङ्मयसुद्धा प्रमाणित धर्मग्रंथ म्हणून मानले जाते. हिंदुधर्माने इतर धर्मविचारांनाही मान्यता दिली. त्यामुळे हिंदुधर्मग्रंथ अनेक निर्माण झाले. हिंदुधर्मात समावेश कथा आढळते. अवतारवाद - भिन्न धर्मांचा समन्वय होऊ शकतो याचा निदर्शक आहे. हे हिंदुधर्माचे वैशिष्ट्य आहे. सर्व भारतीय धर्मांमध्ये कर्मबंध व मोक्ष हा मूलभूत विचार आढळतो. ऐहिक जीवन दुःखमय असून सुख निश्चित मिळविण्याचे साधन माणसाजवळ नाही. म्हणून ऐहिक जीवन हा ग्रंथ मागच्या जन्माने झाला आहे ही पुनर्जन्माची कल्पना आली. ही कर्मपरंपरा अनादी आहे. जीवात्मा कर्माप्रमाणे देह धारण करतो. कर्मभूमी म्हणजे मानवी जीवन व भोगभूमी म्हणजे इतर जीव. मानवास कर्म विविध जन्म देते. जीवात्मा वेगळा अनादी अमर आहे. जन्मपरंपरेत जीवनापत्ती चिंता, मृत्यूमय आहेत. यातून सुटकेसाठी उपास, चिंतन करावयास हवे. मानवापेक्षा वरचे जन्म देवादिकांचे आहेत. परंतु स्वर्गसुद्धा शाश्वत नाही. विनाशी आहे. शाश्वत सुस्थितीचा मार्ग सत्कर्माने मिळतो. शुद्ध आत्म्याचे, परमात्म्याचे स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे. कर्मबंधने ज्ञानाने नष्ट होतात. ज्ञानात केवल्यम्. त्यासाठी मोक्षमार्ग चार- १. योगमार्ग, २. भक्तीमार्ग, ३. कर्ममार्ग, ४. ज्ञानयोग (विवेकानंद). हे चारही मार्ग वेगवेगळे असले तरी एकमेकांत मिसळलेले आहेत. प्राधान्यावरून यांत विभिन्नता आढळते.

तत्त्वचिंतनाची अंतिम पायरी म्हणजे साक्षात्कार. अंतःकरण शुद्धतेची अपेक्षा असून त्यात तत्त्व प्रतिबिंबित झाले की साक्षात्कार होतो. व्यावहारिक कर्मे पारलौकिक कर्मे नाहीत.

आत्म्याचे अमरत्व, सृष्टीची परंपरा अनादी, कर्मबंधन, कर्मातून सुटकेसाठी मार्गाचे आचरण व मोक्ष हे मूलभूत सिद्धान्त हिंदुधर्मात आढळतात.

कर्मसिद्ध चातुर्वर्ण्य व जन्मजात चातुर्वर्ण्य हे दोन प्रकार आहेत. परंपरागत दृष्टीने चार वर्ण आढळले. मुळात माणूस एक; पण व्यवहार चालविण्यासाठी कायदेभेदाने चार भाग झालेले आहेत. मुळात सगळे ब्राह्मण (ईश्वरपुत्र). जन्मसिद्ध जातिभेद चातुर्वर्ण्यातून निर्माण झाले. चातुर्वर्ण्य ही बुद्धीला पटणारी व्यवस्था आहे; परंतु जातिभेदाने ती टिकली नाही. भीतीवंदा - बेटांकी आणि रोटीबंदी ही जातिभेदाची तीन लक्षणे सावरकरांनी सांगितली आहेत. तत्त्वत: अस्पृश्यता हा एकच अर्थ यातून आहे. अपावित्र्याचे भय हे जातिभेद कायम ठेवण्याचे मूळ आहे. ही मिथ्या कल्पना असली तरी तिचा चालीरीतींशी संबंध आहे. जातिसंस्थेचे समर्थन करताना आर्थिक जीवनाची स्पर्धा कमी होते, याचा आधार घेतला जातो. तत्त्व आणि व्यवहाराच्या दृष्टीने याला विरोध आहे.

**(आंतरभारती युवक स्नेहमिलन शिबिर, पुणे, सत्र १ ले, दि. ५ मे, १९७१)**

○○○

४६

# लोकशाहीचे तात्त्विक अधिष्ठान

अठराव्या शतकाच्या सुमारास लोकशाहीचा जन्म झाला. लोक या संस्थेचे अध्ययनात तिच्या जन्माचे मूळ सापडेल, यासाठीच मानवी समूह व इतिहास यांचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. स्वतःचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्याला जास्तीत जास्त स्वातंत्र्य हवे असते.

लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्ती ही स्वतंत्र असते. प्रत्येक व्यक्तींचे स्वातंत्र्य हाच लोकशाहीचा आधार आहे. परंतु, प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये नागरिकांना आपली सत्ता दोन निवडणुकींच्या मधल्य अवधीत प्रतिनिधींना द्यावी लागते. तथापि, त्यामुळे लोकशाही म्हणजे दिल्लीमधील लोकसभा वा मुंबईमधील विधानसभा असे समीकरण करू नये. व्यक्ती केवळ कारभाराच्या सोयीसाठी आपली सत्ता आपल्या प्रतिनिधीजवळ देत असतील. परंतु, सार्वभौम सत्तेचा मालक लोक म्हणजे सर्व व्यक्तींचा समूहच असतो, हे नेहमी ध्यानात ठेवले पाहिजे. मानवी इतिहासात लोकशाहीच सर्वांत उत्तम शासनसंस्था ठरली आहे व कूर्मगतीने वाटचाल करणाऱ्या संसदीय प्रातिनिधिक लोकशाहीला पर्याय म्हणजे जिवंत व मूलगामी लोकशाहीच होय. ग्रामराज्य हा तिचा मूलघटक व्हावयास पाहिजे, ही गोष्टही आता सर्वमान्य होत आहे.

मानव व निसर्ग यांच्या संबंधाचे अध्ययन करून असा निष्कर्ष निघतो की, मानवी स्वातंत्र्यातच मानवाची वा मानवी समाजाची प्रगती होऊ शकते. मानव व निसर्ग यांच्या संबंधात बदल घडवून, मानव निसर्गाचा स्वामी बनण्याचे कार्य सत्याच्या सतत शोधाने होत असते. निसर्ग व मानव या संबंधात बंधमुक्ती ही सापेक्षा असते, तसेच माणूस हा केवळ स्वतःसाठी जगत नाही. माणसा-माणसांमधील संबंध हे विवेकमूलक सहकार्याचे असावे लागतात. या संबंधाने माणसाची शक्ती वाढते आणि विवेकाच्या मर्यादेत बुद्धी-भावना व इच्छाशक्ती काम करू लागतात.

कम्युनिस्ट हे लोकांची लोकशाही (Peopel's Democracy) ही कल्पना मान्य करतात. कार्ल मार्क्स, एंजल्स व लेनिन जेव्हा भांडवलशाही लोकशाहीवर टीका करतात, तेव्हा ते मूलगामी लोकशाहीचे निकष लागू करतात. त्यांच्या विचारामागील पोटतिडीक

ही स्वातंत्र्य, समता या संबंधीची होती. माणसाचा विकास हा त्यांच्या स्वातंत्र्याचा विकास होय. केवळ राष्ट्र समृद्ध झाले म्हणजे व्यक्तिविकास झाला असे आपणास म्हणता येणार नाही. तर त्यासाठी व्यक्तिविकास हाच महत्त्वाचा निकष मानावा लागेल. हा विकास भौतिक व आध्यात्मिक असा दोन्ही प्रकारचा असला पाहिजे.

समाजवादी समाजरचनेमध्ये राजकीय सत्तेबरोबर आर्थिक सत्ता राज्यसत्तेच्या हातात जाते. नियोजनाचा तो अपरिहार्य परिणाम असतो. सत्तेच्या या केंद्रीकरणामधून स्वातंत्र्य, लोकशाही यावर नवे आक्रमण येण्याचा संभव असतो. परंतु, लोकशाही राष्ट्रांना समाजवादी अर्थव्यवस्था अमलात आणताना याची जाणीव असते. साम्यवादापेक्षा लोकशाहीवाद्यांचे श्रेष्ठत्व यातच आहे. सत्ता व स्वातंत्र्य यांचा मेळ घालणे हे लोकशाहीत आवश्यक असते. याचे कारण, आजच्या नव्या यंत्रयुगात राज्यसत्ता अतिशय सामर्थ्यसंपन्न बनत आहे. सत्ता व स्वातंत्र्य यांचा मेळ घालण्याचे कार्य म्हणजेच लोकशाहीचे पूर्ण रूप होय. समाजवाद तेथेच थांबतो, म्हणून लोकशाहीच्या विकासात समाजवादाचे प्रश्न सुटतात.

मानवतावाद हाच लोकशाहीचा तात्त्विक आधार होय. व्यक्ती ही बुद्धिनिष्ठ आहे आणि त्यामुळेच तिच्याजवळ सृजनशील शक्ती आली आहे. व्यक्ती हेच अंतिम साध्य होय, असे मानवतावाद मानतो. व्यक्ती इतर कोणत्याही बाह्य गोष्टींचे साधन बनू शकत नाही. माणूस आपल्या इतिहासाचा आणि भविष्यकाळाचा भाग्यविधाता असतो, असे लोकशाहीत मानला जाते.

**(विचार-मंथन, संपा. मा. प. मंगुडकर, श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे - २.)**

○○○

४७

# मी परिवर्तनवादी शास्त्री

माझे मित्र, पुष्कळ वर्षांचे सहकारी व या समारंभाचे अध्यक्ष प्रा. श्री. न. र. फाटक; तसेच माझे मित्र व अनेक तपांचे राजकारणातील माझे सहकारी श्री. यशवंतराव चव्हाण, विदेशमंत्री, भारत शासन; प्रा. अ. के. भागवत; सौ. सत्यवती जोशी; वाईचे व वाईबाहेरचे मित्र व नागरिक बंधुभगिनींनो; आपण माझ्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त जो हा सत्कार केला, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. मी त्यामुळे भारावलो गेलो आहे. अशा सत्काराच्या वेळी नेहमी माझ्यापुढे 'केनोपनिषद्' वा 'प्रश्नोपनिषद' येते. 'केन' कोणत्या कारणाने हा सत्कार होतो आहे, 'केन कारणेन ?'', असा पहिला प्रश्न व दुसरा प्रश्न असा, की या सत्कारांच्या मधे जो सुंदर हारांचा भार अंगावर पडतो, त्याच्याखाली आपले दोष व आपली अपात्रता झाकली जाते, हे बरोबर आहे ? - असाही खरोखर प्रश्न पडतो. जीवनाचे सत्य स्वरूप हे गुणदोषात्मकच असते. आणि अशा सत्कारप्रसंगी दोषांवर शालीचे पांघरूण टाकतात आणि गुण तेवढे बाहेर दाखवतात, त्यामुळे अर्धसत्यच तेवढे बाहेर येते व एका इंग्रजी म्हणीप्रमाणे ते भयंकर असते. परंतु यासंबंधी गुणांची वाखाणणी करणाऱ्यांचे या भयापासून मनूने रक्षण केले आहे. मनुस्मृतीत म्हटले आहे, की 'जो चोराला चोर म्हणतो, तो अर्धा चोर होय.' म्हणजे या धर्मशास्त्राप्रमाणे चोरालाही चोर म्हणण्याची चोरी आहे. दुसऱ्याचे दोष उघडकीस आणणे पाप ! नीतिशतककार कवी भर्तृहरी म्हणतो, की 'परगुण परमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ।' - दुसऱ्याचे लहान गुणही म्हणजे परगुण परमाणूही पर्वताएवढे करून ज्यांचे हृदयकमल नित्य विकसित होते, असे सज्जन या जगात किती आहेत ? भर्तृहरीला फार थोडे आहेत, असे सुचवायचे आहे; परंतु मला तरी नेहमी उलटाच अनुभव येतो आणि त्याचा भरभक्कम पुरावा पुनः या सत्कार-समारंभात मिळाला आहे.

माझ्या सत्तराव्या वाढदिवशी झालेल्या एका खाजगी सत्कार- समारंभात श्री. पु. ल. देशपांडे व इतर अनेक मित्रांनी मी माझे आत्मचरित्र लिहावे, अशी सूचना केली होती. परंतु आत्मचरित्रापेक्षा एका अर्थाने परचरित्र लिहिणे अधिक सोपे. मात्र स्त्रीचे नव्हे ! त्याचे एक कारण असे, आपण दुसऱ्याला जितके चांगल्या रीतीने पाहू शकतो, त्याचा चेहरा व चेहऱ्यावरील हावभाव निरखू शकतो, तसे आपण आपणाला पाहू किंवा निरखू शकत नाही. स्वतःचा चेहरा आरशात पाहता येतो, हे खरे आहे; परंतु डोळयापेक्षा आरसा अधिक बेभरवशाचा; वाटोळे चेहरे लांबोडके दिसतात व लांबोडके चेहरे वाटोळे व चपटे दिसतात. दुसरे असे, की आपले सत्य स्वरूप आपणास कळले तरच आपण व आपले वास्तव चरित्र म्हणजे शब्दचित्र रेखू शकतो. त्याला सर्वात मोठी अडचण अहंकाराची. अहंकारामुळे आपले दोष गुण वाटतात व दुसऱ्याचे गुण दोष वाटतात. आत्मचरित्रात दुसऱ्याचा संबंध येतोच. माणूस एकटा असूच शकत नाही. जन्मतःच माता बरोबर असते. आणि जन्माला कारण होतात कमीत कमी दोघे. गणिती व वैज्ञानिक आधुनिक तत्त्ववेत्ता व्हाइटहेड म्हणतो, की 'थिंग्ज लिव्ह इन सोसायटीज' माणूसच नव्हे, तर अन्य प्राणी, वनस्पती, सजीव व अजीव सृष्टी ही समुदायामध्ये म्हणजे समाजातच राहते वा जगते. कृष्णपक्षाच्या रात्री विशेषतः अमावास्येला आकाशाकडे दृष्टी फेकली म्हणजे विश्वातील सर्व वस्तू सामुदायिक अस्तित्वातच निसर्गाने गुंफल्या आहेत, हे एकदम डोळयात भरते. आत्मचरित्रात आपण ज्या समुदायात व समाजात जगतो, त्याचाही जीवनक्रम व वर्तनक्रम चित्रित करावाच लागतो.

आत्मचरित्र ही एक वेगळी कला आहे. स्वतःचा अनुभव त्यात जिवंत करण्याची कला साधावी लागते. चरित्र हा व्यक्तीचा व आत्मचरित्र हा स्वतःचा इतिहास होय. कायमचा दृष्टीआड झालेला भूतकाळ हा आत्मचरित्राचा विषय असतो. परंतु भूताला प्रत्यक्ष वर्तमानाचे रूप द्यावयाचे असते, म्हणजेच गतकाळाचा गत अनुभव पुन्हा जिवंत करावा लागतो. परंतु माझ्या जीवनपद्धतीत विश्लेषणाला, पृथक्करणाला किंवा समीक्षेला महत्त्वाचे स्थान आहे. अनुभवाचे विश्लेषण करताना तो जिवंत कसा होणार ?

आत्मचरित्र लिहिण्याची मूळची श्रेष्ठ परंपरा पश्चिमी देशांची आहे. नवे ज्ञानविज्ञान जसे आपल्याकडे पश्चिमेकडून आले, तसेच अनेक साहित्यप्रकारांचे नवे आकृतिबंधही पश्चिमेकडून आपल्याकडे आलेले आहेत. अगदी उघडी, म्हणजे गुणदोषासह, आत्ममूर्ती शब्दद्वारा जगापुढे उभी करण्याची कला म्हणजे आत्मचरित्र होय. गुणदोषासह आपण जसे आहोत तसेच सजीव शैलीने जगाला दाखविणे, हे आत्मचरित्रकार साहित्यकाराचे एक नैतिक कर्तव्य होय. त्यात मानवी सत्याचे म्हणजे जीवनाचे उत्कृष्ट प्रकटन होत असते. मानव जसा आहे तसा दाखविण्याने मानवजातीची एक प्रकारची सेवाच घडत असते. त्याकरिता स्वतःच्या दोषांचे प्रकटन करण्यास नैतिक धैर्य मात्र मोठे लागते. चांगल्या प्रतिष्ठा लाभलेल्या साहित्यकारांमध्येही तसे धैर्य नसते ही गोष्ट अलीकडे २५ वर्षात मराठीत प्रसिद्ध झालेल्या

आत्मचरित्रांवरून ध्यानात येते. मला अनेक वेळा अनेक मित्रांनी आत्मचरित्र लिहिण्याची विनंती केली आहे. मी जरूर प्रयत्न करीन; मात्र उसंत मिळाली पाहिजे.

माझ्या पूर्वायुष्याचे सिंहावलोकन केल्यास मला जो विलक्षण प्रत्यय येतो, तो कशाचा तर झपाट्याने बदलत असलेल्या जगाचा. त्याबरोबर मीही झपाट्याने बदलत गेलो. माझा जन्म सनातनी, कर्मठ पुरोहितवृत्तीच्या ब्राह्मण कुटुंबात झाला. स्नानसंध्या, पूजाअर्चा, व्रतेवैकल्ये, रुद्राभिषेक, मंत्रपाठ, जपजाप्य, होमहवन यांत माझ्या वाडवडिलांचा व भोवतालच्या नातेवाईकांचा सर्व काळ जात होता. सोवळ्या- ओवळयाचे निर्बंध कडकपणे पाळले जात होते. धार्मिक साहित्याचे, पोथ्यापुराणांचे पठन मी लहान असतानाच माझ्या कानावर नित्य पडत असे. अशी १५-२० ब्राह्मण कुटुंबे असलेले, मी जेथे जन्मलो, ते गाव होते. म्हणजे धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर. काही गृहस्थ म्हणजे पुरोहिती व्यवसाय न करणारीही ब्राह्मण कुटुंबे भोवताली होती; गावच्या गल्ल्यांची रचना बहुतेक जातवार होती. एका जातीच्या आळीत दुसऱ्या जातीचे कुटुंब, वा अन्य जातीचे व्यवसाय करणारा माणूस एखाददुसराच असायचा. या सनातनी, कर्मठ सोवळ्या परंपरेचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. माझे वेदाध्ययन वयाच्या १३ व्या वर्षापर्यंत घरीच झाले. संस्कृत भाषेच्या व शास्त्रांच्या अध्ययनाकरता वयाच्या चौदाव्या वर्षी वाईस प्राज्ञपाठशाळेत आलो. येथील हिंदूंचे जग तर सनातनी, कर्मठ प्रवृत्तींचा बालेकिल्ला होता; त्यावेळी वेदशास्त्रांच्या ६-७ पाठशाळा येथे होत्या. कै. काशिनाथ वामन लेले हे शास्त्री सनातन कर्मठ रूढीचे कट्टर समर्थन करणारे धर्म नामक मासिक चालविणारे त्यावेळी हयात होते. परंतु या बालेकिल्ल्यात समाजसुधारणा, धर्मसुधारणा व राजकीय क्रांती यांची तरफदारी करणारी थोडी परंतु तडफदार, तल्लख बुद्धीची, मनस्वी स्वभावाची कणखर माणसे मला, येथे आल्याबरोबर, पहिल्या वर्षातच भेटली; ती भेटली प्राज्ञपाठशाळेत. त्यांच्या बोलण्यात व चर्चेत उदार, व्यापक भावना आणि उच्च विचार यांचे उद्रेक होत होते. माझे लहानपणीच केवळ श्रद्धेने स्वीकारलेले विचार साधकबाधक नित्य चर्चेने भराभर बदलू लागले. लोकहितवादी व आगरकर यांचे लेख, टिळकांचे लेख व गीतारहस्य व विशेषतः जॉन स्ट्युअर्ट मिल व हर्बर्ट स्पेन्सर यांचे भाषांतरित लेख व पुस्तके नित्य वाचण्यात येऊ लागली. स्पेन्सरच्या समाजविकासवादाने व मिलच्या स्वतंत्रतेच्या मीमांसेने माझ्या मनाची पकड घेतली. माझ्यात खूपच बदल झाला. माझा वेष मात्र लवकर बदलला नाही. तो वेष कर्मठ सोवळ्या ब्राह्मणाचा वा गोसाव्याचा होता. माझ्या बरोबरचे वयाने लहानमोठे वेदशास्त्रे शिकलेले शेकडो गृहस्थ मला माहित आहेत; त्यांच्यात मी जी पुस्तके वाचली. ती वाचूनही फारसा बदल झाला नाही. त्यांची कर्मठ निष्ठा अढळ राहिली. त्यांच्यापैकी अजून काही विद्यमान आहेत. या प्राज्ञपाठशाळेच्या परिसरात विनोबा भाव्यांसारखी व्यक्ती काही काळ राहिली. व लवकरच अध्ययन करून निघून गेली. सेनापती बापट व सावरकर यांच्यापासून सशस्त्र क्रांतीचे राजकीय विचार मी

शिकलो व विनोबा भाव्यांपासून अहिंसात्मक क्रांतीचे तत्त्वज्ञान मला लाभले. १९१८ पासून १९३० पर्यंतच्या कालखंडात आम्ही प्राज्ञपाठशाळेची वेदशास्त्र शिकलेली मंडळी धर्मपरिवर्तनवादाचे पुरस्कर्ते बनलो. देशकालपरिस्थितीप्रमाणे युग जसेजसे बदलत जाते तसतशी, आचारविचारपद्धतीही बदलत जाते; व बदलत जावी म्हणून वर्तमान बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीमध्ये नवीन सामाजिक व धार्मिक सुधारणांचा विचारपूर्वक स्वीकार करणे, हे धर्मशास्त्राधारेच योग्य ठरते, असा सिद्धांत आम्ही मांडू लागलो. १९३० सालापासून प्राज्ञपाठशाळेतील विद्यार्थी व शिक्षक हे मोठ्या प्रमाणात गांधीप्रणीत सत्याग्रह आंदोलनात सामील झाले. त्यामध्ये मीही होतो. १९३२ मध्ये धुळे येथील कारागृहात मी असताना विनोबा भावे, गुलझारीलाल नंदा, खंडूभाई देसाई, साने गुरुजी, जमनालाल बजाज, पुरुषोत्तम त्रिकम, भय्यासाहेब मुधोळकर इ. मंडळी सत्यागृहात भाग घेतल्याबद्दल शिक्षा भोगण्याकरता राहिली होती; मीही त्यात होतो. या मंडळींशी विचारांची वारंवार देवघेव होत होती. म. गांधींनी या सुमारास येरवडा येथील कारागृहवासात अस्पृश्यता निवारणाची चळवळ आरंभिली. तेव्हा मी परिवर्तनवादी शास्त्री आहे, ही गोष्ट कै. जमनालाल बजाज यांनी म. गांधीस कळवली. धुळे येथील कारागृहातून सुटका झाल्याबरोबर मला म. गांधींकडे आमंत्रण आले. येरवडा कारागृहात महात्माजींशी वारंवार बैठकी झाल्या. प्रा. आनंदशंकर ध्रुव, बाबू भगवान दास इ. नव्या विचाराचे संस्कृत विद्वान आणि काशी- कलकत्ता, मद्रास इ. ठिकाणचे जुन्या मताचे संस्कृत विद्वान यांच्याशीही येरवडा कारागृहात माझ्या गाठीभेटी होऊन चर्चा झाल्या. माझ्या आयुष्यातील मौलिक विचारपरिवर्तनाचा हा काळ होता. मी शास्त्राधारे सुधारणांचे समर्थन मोठमोठ्या पंडितांच्या सभेत धिटाईने करत असतानाच माझ्या लक्षात आले, की शास्त्राधार आपल्याला फार दूरच्या पल्ल्यापर्यंत जाण्याला उपयोगी पडणार नाही.

मी याच सुमारास कार्ल मार्क्सच्या पुस्तकांचे व एम्. एन्. रॉयप्रणीत मार्क्सवादी विचारांचे अध्ययन करू लागलो. आतापर्यंत माझा ध्येयवाद भारतापुरता मर्यादित होता. या अध्ययनाने माझे ध्येयवादाचे क्षेत्र केवळ भारत न राहता सबंध मानव जातीचे जग बनले. माझ्या विचारांना पुनः मोठी कलाटणी मिळाली. त्यानंतरची झालेली अनेक परिवर्तने मी येथे सांगत बसत नाही. माझ्यात सारखा बदल होत गेला; अजूनही होणार नाही असा निर्वाळा मी देऊ शकत नाही; परंतु तेव्हा लोक म्हणत हा खूप वाहवला आहे. मी प्रवाहपतीतासारखा मात्र हतबल होऊन वाहात गेलो नाही. आतापर्यंत मी उच्च नैतिक व बौद्धिक सत्याच्या ध्रुवताऱ्याकडे लक्ष देऊनच वाहत राहिलो आहे. वेगाने बदलणाऱ्या जगाच्या प्रवाहात पहिल्या उमेदीत पाऊल टाकले. केव्हा वाहत व केव्हा पोहत राहिलो. कोठेच पाय टेकले नाहीत. टेकायला जागाच सापडली नाही. जगाबरोबर माझ्यातही खूप बदल होत गेला. डॉ. के. ना. वाटवे ४० वर्षांपूर्वी मी रॉयवादी बनलो, तेव्हा मला म्हणाले, की ‘तुमच्यातले बदल

मोजले तर ते तीन प्रकारचे आहेत व त्याकरता निरनिराळी तीन आयुष्ये वस्तुतः लाभावयास पाहिजेत, ते तुम्ही एकाच आयुष्यात अनुभविले'. असो. या आत्मकथेमधे खूप आत्मस्तवन भरले आहे, त्याबद्दल तुम्ही मला या आनंदाच्या प्रसंगी क्षमा कराल अशी आशा आहे.

मी दोन कामांची जबाबदारी अनेक वर्षे स्वीकारली आहे. पहिली जबाबदारी अशी- श्री. यशवंतराव चव्हाण यांनी १४ वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना एक मौलिक कामगिरी माझ्यावर सोपविली आहे; ती म्हणजे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाच्या कार्याची. मराठी भाषेला व साहित्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाचे वाहन बनण्याचे सामर्थ्य यावे किंवा मराठी भाषा ही इंग्लिश, जर्मन, फ्रेंच, रशियन इत्यादी आधुनिक पश्चिमी भाषांच्या इतकी समर्थ व्हावी याकरिता अनेक प्रकारचे कार्यक्रम आखून मंडळाने कार्यवाहीत आणले आहेत. महाराष्ट्र शासनाचे हे महत्त्वाचे अंगीकृत कार्य म्हणून स्थिर होऊन मान्यता पावावे अशी माझी मनीषा आहे. त्यादृष्टीने फार मातबर विद्वान मला मनःपूर्वक सहकार्य अनेक वर्षे देत आहेत. त्यापैकी काही मंडळी येथे उपस्थित आहेत. दुसरे ३५ वर्षांपूर्वी श्री. गुरुवर्यांकडून माझ्याकडे आलेली धर्मकोशाची जबाबदारी. भारताच्या धार्मिक व सामाजिक संस्थांच्या हजारो वर्षांच्या इतिहासाचे धर्मकोश हे एक श्रेष्ठ साधन आहे. याची जाणीव भारत व महाराष्ट्र शासनास झाली तर ते कार्य माझ्या हयातीत पूर्ण होऊ शकेल.

मी आपला सर्वांचा शतशः आभारी आहे.

**(अमृतमहोत्सव सोहळा, वाईच्या निमित्ताने १५ फेब्रुवारी, १९७५ रोजी सत्कारास उत्तर देताना केलेले भाषण)**

ooo

४८

# श्रमातून येणारे जग मोलाचे

शास्त्रीजी सत्कारास उत्तर देण्यासाठी उभे राहतात. धीम्या शब्दांत सुरुवात करतात. हा सत्कार जिव्हाळ्याचा आहे. सर्वजण मनापासून बोलले. प्राचार्य भागवतांनी माझ्या विचारांचा प्रवास व्यवस्थितरीतीने लक्षात घेतला.

'मार्क्सवादामध्ये अडचणी राहून गेल्या. कारण, मार्क्स पुढे शिकला नाही. रसेल म्हणतो की, हे जग एक स्वप्न आहे. वेदान्तात सांगितले आहे की, विश्व हा एक भ्रम आहे. जग सत्य की खोटे हा वाद न मिटणारा आहे.

हे जग खरे की खोटे हे वादविवाद करून समजणार नाही. श्रमांतून येणारे हे जग मोलाचे आहे. मार्क्सने असे मांडले की, जगाचा प्रश्न श्रमाने सुटेल. मस्तक आणि हस्तक यांचा सांधा असल्याशिवाय समता येऊ शकत नाही.'

शास्त्रीबुवा पुढे म्हणतात, 'मी खासगीत विकारवश होतो ही माझी लंगडी बाजू. मी स्थितप्रज्ञ नाही. विकार, प्रेम, द्वेष इ. भावना नसणारे स्थितप्रज्ञ रूप काल्पनिक असले तरी आदर्श आहे. स्थितप्रज्ञाकडे जाताना माणसाचा विवेक वाढतो. विवेकाचा पगडा बसला नाही, तर संतापाचा उद्रेक होतो आणि तोंडातून शाप बाहेर पडतात. परंतु, अशा शापांना महत्त्व नसते.

'पूर्वी माझी राहणी सनातनी पद्धतीची! शेंडी-मिशा धोतर उपरणे दिसायला अगदी सोवळा ब्राह्मण! मी पूर्वी निष्ठेने सनातनी पद्धतीने राहात असे. नवा विचार पटला तर तो अंतरंगातून पटला पाहिजे. तमा नवा विचार, नवमानवतावादी विचार, अंतरंगातून पटला.'

शास्त्रीबुवा घराकडे वळतात. आपल्या नकळत सतीकाकूंनी शास्त्रीजींच्या बदललेल्या विचारांमुळे आपल्या विचारसरणीत कसा बदल केला हे सांगायला सुरुवात करतात. दुसरी आठवण (सतीकाकूंकडे मागे वळून पाहात) आमच्या दोघांची आहे. (सतीकाकूंच्या

चेहऱ्यावरचे भाव बघण्यासारखे असतात!) एकदा हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष आमच्या घरी आले. मी घरी नव्हतो. त्यांनी विचारले 'कुठे गेलेत?' सतीकाकू म्हणाल्या, (शास्त्रीजी त्यांना सतीकाकूच म्हणताहेत!) 'ते इथे राहतात; पण जगभर फिरत असतात!' या वाक्याचे शास्त्रीजी समर्थन करतात, 'मी गेली ४५ वर्षे खूप भ्रमंती केली; पण खुंट येथे आहे. हजारो मैल प्रवास करून पक्षी ठरावीक मोसमात आपल्या घराकडे परततात, तसा मी घरी परततो.'

'हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष सपत्नीक आले होते. ते आल्याची कुणकुण लागल्यामुळे एक मांग युवक त्यांना भेटावयास आला. ११॥ चा सुमार होता. तो तरुण आल्यामुळे सतीकाकूंनी त्यांचेही पान त्याच पंक्तीला इतरांच्या शेजारीच वाढले! 'हरिजन' हा चांगला शब्द गांधीजींनी दिला. दुस्थितीतील माणूस हा हरीचा! बायबलमध्ये जे दोन आहेत, त्यांना माझा दरवाजा मोकळा आहे, असाही उल्लेख आहे. म्हणून हे हरीचे जन. डॉ. आंबेडकरांना 'हरिजन' हा शब्द आवडत नसे. 'हरिजन म्हणून दया का दाखवता?' असा त्यांचा आक्षेप असे. तर आमच्याकडे स्वयंपाकघरापर्यंत हरिजनांना प्रवेश आहे. सतीकाकूंनी मेणवलीची एक हरिजन स्त्री सावित्रीबाई घरकामासाठी ठेवलेली आहे. सतीकाकूंकडून ती स्वयंपाक उत्तम शिकली आहे. सतीकाकूंचे शिक्षण फारसे झाले नाही. त्यांनी आगरकर कोतवादी वाचलेले नाहीत, पण अंधश्रद्धा नाही.

लहानपणी हृदयात लिहिलेले पुसून जात आहे. मी पूर्वी पूजा करीत असे, तेव्हा त्या पूजेचे साहित्य तयार ठेवत. मी पूजा करणे सोडून दिले. त्यांचेही विचार बदलले व देव मोडीत न देता कृष्णेच्या महापुरात सोडून दिले!

जातिभेदावर बोलताना ते म्हणतात, 'या राष्ट्रात एकी आहे की नाही, अशी अनेकदा चर्चा होते. आपण सर्व भेदात बुडालो! प्रत्येक ठिकाणी भेद मानला जातो. संकट आले असता मात्र भेद मानावयाचा नाही, ही विसंगत गोष्ट आहे.'

महाविद्यालयाने भेट दिलेल्या कांटच्या पुस्तकाबाबत बोलताना ते म्हणाले, 'मी जे वाचतो ते करमणुकीसाठी नाही.' आपण कांटचे 'क्रिटिक ऑफ प्युअर रिझन' हे पुस्तक भेट दिले त्याबद्दल आनंद वाटला. मी या पुस्तकाची दोन इंग्रजी भाषांतरे वाचत आहे, तिसरे नवे भाषांतर शोधत होतो. तेच आपण दिलेत. थोडेसे इम्यान्युएल कांटबद्दल- न्यूटन वर आला तो सूर्यासारखा! त्यापूर्वी रोमँटिसिझमचे चांदणे होते. या चांदण्याच्या प्रकाशात वाचता येत नाही. गोखले-आगरकरांनी म्युनिसिपाल्टीच्या दिव्याच्या प्रकाशात अभ्यास केला असे आपण ऐकतो; पण चांदण्यात वाचता येत नाही! न्यूटनने आघाडी मारली. विज्ञानयुग अवतरले. ग्रहणे कशी होतात ह्याची शास्त्रीय मीमांसा होऊ लागली. अजूनही चंद्र-सूर्याची ग्रहणे होताना राहू-केतू चांडाल त्यांना गिळंकृत करतात असे आपण मानतो! चांडाल म्हणजे अस्पृश्य!

अस्पृश्याचे दर्शन झाले म्हणून ग्रहणात स्नान करतात. हा एकप्रकारचा पारमार्थिक

भ्रम आहे! ज्ञानाची प्रक्रिया ‘प्युअर रीझन’पासून सुरू होते. कांटच्या या पुस्तकात शुद्ध बुद्धिवादाची मीमांसा केली आहे. आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनाकडे ते वळतात, ‘माझा दृष्टिकोन स्वच्छ आहे. विज्ञानाला उपयुक्त असा बुद्धिवादी!’

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणतात, ‘महाविद्यालय हे एक व्यापक मानव्याचे पीठ आहे. इथले गणित, अर्थशास्त्र, व्याकरण तुमच्या जीवनाला उपयुक्त होईल. विचार व ज्ञानाने दमदार व्हा. ज्ञानचक्षू हाच खरा चक्षू. तुम्हाला या निसर्गरम्य अशा महाविद्यालयाच्या वातावरणात जे अस्सल मिळते ते सोडू नका.’ आता गुरूचे शिष्यास मार्गदर्शन कसे असावे, याबाबत तर्कतीर्थ छांदोग्योपनिषदातील अंध गंधाराचा दृष्टांत सांगतात.

'छांदोग्योपनिषदातील एका कथेत, गांधार (हल्लीचे कंदाहार) देशाच्या एका व्यापाऱ्यास तो गांधारकडे परतत असताना वाटेत चोरांनी लुटले. त्याचे डोळे बांधून जंगलात सोडून दिले. सकाळ झाली. तो मनुष्य पूर्वेकडे, पश्चिमेकडे, उत्तरेकडे, दक्षिणेकडे तोंड करून मदतीसाठी ओरडू लागला. दुसरा मनुष्य तेथून जात होता. त्याने त्याच्या डोळ्यांवरील बंधन दूर केले आणि कुठे चाललास ? असे विचारले. त्याने गांधारला!’ असे सांगितले.

तेव्हा दुसऱ्या मनुष्याने ‘एतां दिशं गन्धारः एतां दिशं प्रवेति ।’ या दिशेकडे गांधार आहे तिकडे जा असे सांगितले. त्याप्रमाणे तो गावोगावी वाट पुसत आपल्या देशास गेला. या कथेप्रमाणे शिक्षक आपले डोळे बंधमुक्त करतात. वाट दाखवितात व सोडून देतात. पुढचा मार्ग आपण आक्रमावयाचा असतो. म्हणूनच प्राध्यापकांवर फार अवलंबून राहू नका. त्यांचे कार्य दिशा दाखविण्याचे असते. माझ्या जीवनाचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगतो की, मी माझ्या गुरूपाशी फार थोडे शिकलो!

एवढे बोलून शास्त्रीजी आपले भाषण थांबवितात. टाळ्यांचा कडकडाट होतो.

**(वाणिज्य व मानव्य महाविद्यालय, वाई (सध्याचे किसन वीर महाविद्यालय) च्या वतीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. त्याप्रसंगीचे तर्कतीर्थांचे सत्कारास उत्तर देणारे भाषण (प्रसिद्धी : १५ फेब्रुवारी, १९७५, साप्ताहिक साधना, पुणे)**

ooo

49

# Freedom and Social Responsibility

*[Inaugural Address of Tarkateertha Laxmanshastri Joshi, at the open Session of the All India Radical Humanist Association Conference at Ahmedabad on 26-12-1975.]*

I am deeply grateful to you all for inviting me to inaugurate this biennial conference of the Association. We meet every two years to exchange ideas and experiences so as to return with a better and clearer understanding to our work. The discussions in these meetings are conducted, as you know, in a spirit of tolerance and catholicity, more with a view to understand rather than to praise or blame, uphold or condemn. It is indicative of this non-conformist outlook that we had Shri Jayaprakash Narayan inaugurate the last conference and you have invited me to do so today.

2. Unmindful of popular reactions, we joined the global struggle for democracy against Fascism which eventually culminated in the Second World War. While conducting the struggle, we also did a good deal of fundamental thinking about Democracy under the guidance of our leader, friend and philosopher, M.N. Roy The time to go into the fundamentals has perhaps come again today. There may be some who doubt or question the wisdom of such thinking and exchange and plead for action of some kind or the other; I however submit that thinking and

exchange of thoughts and ideas is also a form of action. In fact it is a form of activity which should never stop if a strong foundation for democracy is to be laid in our society

3. It is said that democracy is passing through critical times today, that it is in a dangerous situation. In fact it is always so. Democracy is never safe or secure in an absolute sense. That is why eternal vigilance has been regarded as the price of liberty. Democracy cannot be made secure through the commitment of a few to the basic values of Liberty, Equality and Fraternity; the commitment must get increasingly diffused in the whole society. So long as that does not happen, the dangerous possibilities inherent in the functioning of the institutional apparatus of democracy will always remain. People will cast their votes and run the risk of losing their freedom. It is common knowledge that the fascist totalitarianism had the formal sanction initially of election by a majority.

4. Democracy for its successful functioning demands universal education of the people. It signifies a rule of the people in the sense of a rule of people guided by reason and under standing. People cannot rule themselves without a conscious and informed rational outlook. Their purpose of achieving equality will remain idle and unrealised unless every individual enjoys equal rights and opportunities Reason can operate through persuasion, not through force. To eliminate the use of arbitrariness and force being the function of law, democracy is described as the rule of law; and law as the measure of justice and injustice has to be the respector of human rights. Liberty which constitutes a sum total of such rights also involves responsibilities. There is no right without a responsibility attached to it, the essential responsibility of similar rights enjoyed by others. In the absence of a respect for such rights and responsibilities, majority rule becomes purely technical, largely meaningless.

5. This is what happened in Germany in the thirties, when the National Socialists, German Nationalists and Communists came together and formed an alliance. That experience raised certain basic issues of

a democratic policy. Is it right for the people themselves to have the right to destroy by a majority all human rights or democratic freedom? Can democracy in the technical or formal sense of majority rule defend effectively the democratic values? If reason ceases to prevail among the people, if irrational sentiments of all kinds become powerful, people will tend to destroy the rights of their own and of future generations. If this is to be avoided, power must pass in the hands of rational and freedom-loving leaders possessed of a sense of discrimination.

6. By acceptance of Rousseau's view that the basis of democracy is popular sovereignty, we have to concede that a totalitarian or one- party rule is also democratic. This view is increasingly put forth by a number of politi cal thinkers today. The 'People' figure essentially as an abstraction in this case, remote from reality. The reality consists of different individuals. Any idea of the 'people' without reference to concrete individuals is illusory. But Rousseau while speaking of the sovereignty of the people postulates the idea of the 'general will', which is infallible. This notion of infallibility of the 'general will' is directly opposed to the logic of a dynamic democracy. Governments, after all, are run by men; the king or the leader or the charismatic individual acceptable to the people is also a human being and as such is fallible. Similarly, truth is infinite and the whole truth is beyond the reach of any of us. Knowledge grows; the inadequacies and mistakes in what is known continue to be detected and corrected and what is known tends to be reformulated. Search for truth proceeding from generation to generation through countless individuals leads to the growth of knowledge. This search is intensified and developed as the scope of cooperation among the seekers grows. This view being the basis of a dynamic democracy, it is essential for every individual to have the right to critically examine every idea, principle or theory. Since man is the only product of Nature endowed with reason, this right is conferred on him by Nature herself. One of the important features of democracy is that every individual should use his reason in understanding the political, social and the cultural reality and

participate in making rules in its light which will be conducive to his self-development.

7. Such use of reason is possible only through continuous self-education. The voters, their representatives, ministers have all to be engaged in discussions at various levels before decisions are taken; self-education in other words is essential for all. Thus alone can mistakes get corrected and institutions and activities developed and improved on a grow ing comprehension of truth. Such improvements based on truth will enable people to use their freedom for their development.

8. Freedom is power. In a liberal or representative democracy, people do have the power to vote but real political power is vested in their representatives. It is a deduction from historical experience that this feature can put democracy in danger Power as a matter of principle should vest, in the people. But since it is vested only in the right to vote, the average citizen finds himself deprived of it. Leaders can appeal to the passions and the sentiments of the people and secure it in their name, They lose awareness of the fact that what they hold is a sacred trust. This situation has been described by Rousseau as the rule of an elected aristocracy. This is a universal experience responsible for keeping democracy eveywhere away from its basic tenets. Democracy will become real only when the average citizens will begin to participate directly in the administration of political and economic affairs. Then alone will popular sovereignty become a meaningful principle.

9. A comprehensive definition of freedom will involve the concept of power; and love of power is a natural human tendency. The positive aspect of freedom lies in the capacity or the power to realise one's purposes, objects or goals. Removal of the restrictions on this power is the extension of freedom. Freedom of the individual signifies the freedom to use such power or capacity. Such use grows as his search for truth advances and the search is not possible without reason. That is how M.N. Roy described the search for truth and the quest for freedom as the two basic urges of human beings. Constant quest of freedom is the

essense of their humanity. We, therefore, maintained that centralisation of power is limiting of human freedom. Democracy itself becomes thereby limited and political life explosive. The institutional structure of democracy has to be rebuilt so as to provide every citizen an opportunity for participation in political and economic life, if recurring dangers to it everywhere are to be avoided.

10. Leaders of the ruling party in the coun try describe the present situation as the time of emergency and maintain that since democracy itself was in danger, some of the fundamental rights had to be suspended temporarily for defending it. Mass movements leading to bandhs, gheraos, sabotage, destruction of private and public property and dissolution of elected legislatures have been going on for the past several years. Participants in such movements as well as their leaders lost sight of the obligations and the responsibilities that invariably go with the rights. These movements created innumberable difficulties in the day-to-day life and activities of the average citizen, and productive activity was hampered every now and then. Declaration of emergency had to be resorted to in order to restrain these movements. These statements and complaints of the leaders of the ruling party are true and let us agree that the remadies adopted by them are justified. Even then the need to examine the ways of promoting a sense of social responsibility in the people without qualifying their liberty does remain. Can measur calculated to restrict liberty promote such a sense of responsibility ? Can one produce responsible democratically minded citizens by restricting the freedom to write, to publish and to propagate?

11. A careful analysis of our social struc ture and conditions can show why we are tending to have the people increasingly devoid of the sense of social responsibility. We will also realise that the institutional structure of the political democracy in the country may have to be reorganised if an awareness of obligations and responsibilities is to be promoted along with that of the rights.

12. The present Indian society is increas ingly becoming a mass society. Indian society before the British came to power was a hierarchical society

with a structure of its own; what we have now is a loose and disintegrating conglomeration resulting from it. The old medieval social system was authoritarian in character, and although it has been disintegrating, the traditional authoritarian values and beliefs still persist. Large masses of people without any stable means of livelihood are seen moving about from place to place in an uprooted condition and taking to activities and occupations of a fleeting nature. The number of unemployed is steadily growing. The so- called middle class, impoverished and concerned about the futuré, is tending to take up any work that comes to hand and the steadily increasing student population at the secondary and the higher levels, more and more dissatisfied with aducation which cannot ensure earning one's livelihood, feels strongly frustrated and occasionally turns to destructive activities. Population as high as 40 to 50 per cent lives below the poverty line leading to mass discontent in both the rural and urban areas.

13. It was in this kind of heterogeneous disintegrating social system that universal franchise was introduced. Political parties, therefore, naturally began to manipulate it at the time of the elections. Promises of prosperity and slogans of socialism have been contributing to rising expectations only to be belied and frustrated by actual experience in course of time. Unaware of the high idealism or aspirations, people with destructive tendencies get into the mass movements and eventually endanger democracy.

14. Mass movements usually take place for the natural, material needs; there is hardly any awareness in them of the higher values or rights. Such awareness cannot come in the absence of reason informed through education. Revolts inspired by hunger generally have no place for it. The French Revolution, for example, carried on its banner the ideals of liberty, equalityand fraternity. But the people, as a result, had to live under dictatorship for several decades, for they were suffering from hunger, from lack of satisfaction of the basic needs. The experience of many a revolution which occurred later was similar. Indian democracy

also finds itself in danger because a large majority of the Indian people still live in the dire need of satisfaction of their basic wants.

15. Political parties engaged in the competition for power often promote this danger. These parties, in fact, have come into being because of the emergence of representative. liberal democracy, which by itself is aware of its inadequacies. It is, therefore, keen on encouraging a public debate between different ideas freely conducted so that definite gui dance may crystallise from it. Such debate is essentially a process of seeking truth and the different political parties derive their raison d'etre from the different ideas and programmes they bring as a contribution to this debate. Secondly, although the people in principle are sovereign, it is not possible for them to exercise directly their authority in a large population society spread over an extensive territory. They have, therefore, to exercise their power indirectly by entrusting it to their representatives elected, from time to time, through free and fair elections. When political parties forget this dual moral responsibility and start looking upon power as an end in itself, democracy ceases to grow and the possibilies of authoritarianism emerge. These possibilities cannot be averted excepting by citizens who are vigilant about their rights and are large enough in numbers so as to be diffused in the different strata of society. Moreover, parties differing from each other in respect of ideologies and programmes must nevertheless owe their allegiance to democracy. Indian demo cracy cannot be stabilised unless the vast Indian society begins to get transformed into a pluralist order, and the struggle for power between political parties is prevented from heading towards anarchy. It will be essential for this purpose to reduce the centralisation of power and to have instead power diffused in the people. When the political, economic and social apparatus begins to be reorganised along these lines, rights and reponsibilities will go together.

16. This fundamental reorganisation postulates participation by the people in the local organs of government, rural and urban, as well as in the economic institutions. Social justice cannot be achieved only through

socialism which emphasises nationalisation of the means of production and distribution. This was clearly understood by the first great leader of socialist revolution, Lenin himself. Lenin knew that modern scientific {technology capable of continually increasing the produc tion of wealth and diffusion of power in small units of the large Russian society were both equally necessary for the socialist revolution. He described the outcome of that revolution in the two symbols of "Electricity and the Soviets". But he could not bring about the diffusion of power. The great Indian revolu tionary philosopher, M. N. Roy, formulated eventually that the path of emancipation of human society will lead into the realm of freedom and justice only through the diffusion of power. It is only by taking to that path that Indian democracy can enter the era of steady and continual progress and have its foundation stabilised.

May I now declare this Conference as formally inaugurated..

**(*The Radical Humanist. VOL 39, No-11, February, 1976. Page 6 to 10)**

❍❍❍

५०

# संपूर्ण राजकीय क्रांती

भारतात लोकशाही राजकीय क्रांती बऱ्याचशा प्रमाणात शांततेच्या मार्गाने तीस वर्षांपूर्वी घडून आली. ही भारतीय राजकीय लोकशाही संसदीय लोकशाही आहे. लोकशाहीची उत्कृष्ट व्याख्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकनने अगदी साध्या सोप्या रीतीने सांगितली, की 'लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांची, लोकांकरिता स्थापन केलेली राज्यपद्धती किंवा राज्यशासन होय.' या शासनाचे अधिष्ठान म्हणजे मूलभूत मानवी हक्क होत. मूलभूत मानवी हक्क ही मानवी जीवनाची अत्युच्च नैतिक मूल्ये होत. सर्व मानवव्यक्तींचे स्वातंत्र्य, मानवी समानता आणि मानवी बंधुत्व यांचे सुसंगत स्वरूप म्हणजेच उच्चतम नैतिक मूल्य होय. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे कोणाही एका किंवा अनेक व्यक्तींचे स्वातंत्र्य नव्हे, तर सर्व व्यक्तींचे स्वातंत्र्य होय. समानता म्हणजे स्वातंत्र्यविकासाची समान संधी होय आणि बंधुत्व म्हणजे स्वातंत्र्य व समानता प्रत्यक्ष जीवनात ठरविण्याकरिता आणि अनुभवण्याकरिता लागणारी सार्वत्रिक प्रेमाची भावना होय. संसदीय लोकशाही म्हणजे प्रातिनिधिक लोकशाही, यात सार्वत्रिक प्रेमभावनेचे केवळ शाब्दिक रूप असते. स्वातंत्र्य आणि समता ही मूल्ये औपचारिक रीतीने लोकशाही कायद्याची मूळ तत्त्वे म्हणून स्वीकारली जातात.

संसदीय लोकशाही पश्चिमी देशांत प्रथम अस्तित्वात आली आणि विकसित झाली. या संसदीय लोकशाहीमधील मूलभूत मानवी हक्कांना औपचारिक स्वरूप आल्यामुळे आणि त्यांचे सामाजिक जीवनात प्रत्यक्ष प्रत्यंतर न येता प्रथम विशिष्ट वरिष्ठ वर्गांच्या हितसंबंधाचीच विशेष जपणूक झाल्यामुळे सामाजिक विषमता औद्योगिक क्रांतीनंतर 19 व्या शतकात फारच वाढत गेली. त्यामुळे समाजवादाचा ध्येयवाद प्रामुख्याने पुढे आला. समताप्रधान वर्गहीन आर्थिक समाजरचनेचा आदर्श समाजवादाच्या संदर्भात स्पष्ट झाला. त्यामुळे समाजवादी क्रांतीचे वारे वाहू लागले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी पहिल्या महायुद्धानंतर समाजवादी राजकीय क्रांत्यांचे युग सुरू झाले. रशियामध्ये क्रांती झाली.

त्यानंतर दुसऱ्या जागतिक युद्धानंतर चीनमध्ये आणि पूर्व युरोपात समाजवादी राज्यांची निर्मिती झाली. संसदीय किंवा प्रतिनिधीप्रधान लोकशाही राज्ये पश्चिम युरोपात आणि उत्तर अमेरिकेत गेल्या दोनशे वर्षांच्या कालखंडात निर्माण झाली; परंतु या समाजवादी आणि प्रातिनिधिक लोकशाहीवादी राष्ट्रांमध्ये प्रत्यक्ष सत्ताधारी शासक वर्ग आणि प्रत्यक्ष सत्ता हाती नसलेला शासित सामान्य बहुजन समाज असे भेद स्पष्ट व काही ठिकाणी प्रखर स्वरूपात पडलेले दिसतात. त्याचा अर्थ असा, की मूलभूत मानवी हक्क संपूर्णपणे भोगणारा संपूर्ण समाज कोठेच दिसत नाही किंवा लोक प्रत्यक्ष सत्ता वापरून शासन चालवीत आहेत; असे कोणतेही राज्य भूतलावर दिसत नाही. म्हणजे खरीखुरी लोकशाही किंवा खराखुरा समाजवाद कोठेच दिसत नाही. सगळेच प्रयोगावस्थेत आहेत.

प्रयोगावस्थेत असल्यामुळे लोकशाहीला व समाजवादाला गेल्या पन्नास वर्षांत सारखे धोके उत्पन्न होत आहेत. 'राष्ट्रीय समाजवाद' या फसव्या नावाखाली फॅसिझम आणि नाझिझम या नावाच्या राजकीय प्रतिक्रांत्या युरोपात झाल्या. भारतामध्येही संसदीय लोकशाही गेल्या अकरा वर्षांत धोक्यात आली. धोका तात्पुरता टळला आहे. पुन्हा धोका येऊ नये म्हणून जनता पक्ष प्रयत्न करीत आहे; परंतु तो तात्पुरताच ठरेल की काय अशी रास्त भीती उत्पन्न झाली आहे. कारण इंडियन नॅशनल काँग्रेसने पुढाकार घेऊन भारतात संसदीय लोकशाहीची स्थापना केली; परंतु तिच्याच पुढाकाराखाली अधिकारशाहीची स्थापना करण्याचा प्रयत्न झाला आहे. अधिकारशाही वा हुकूमशाही उत्पन्न होण्याचा धोका टाळण्याकरिता संपूर्ण क्रांतीचा आदर्श आणि कार्यक्रम आखून संपूर्ण क्रांतीचे आंदोलन लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी प्रारंभिले आहे.

संपूर्ण क्रांती म्हणजे काय, हे समजावून घेण्याच्या अगोदर क्रांती म्हणजे काय, सामाजिक क्रांती म्हणजे काय, ही क्रांतीची संकल्पना कशी व केव्हा आली, हे लक्षात घेतले पाहिजे. क्रांती म्हणजे वर्तमान समाजात व सामाजिक संस्थांमध्ये, संस्कृतीमध्ये व संस्कृतीच्या कला, विज्ञान व धर्म इत्यादी अंगांमध्ये मौलिक परिवर्तन होय. सामाजिक क्रांतीची संकल्पना मानवी इतिहासाच्या अध्ययनाने गेल्या दोनशे वर्षांत उत्पन्न झाली. मानवी इतिहासाचा खरा अर्थ उलगडला त्यावरून सामाजिक क्रांतीची संकल्पना निष्पन्न झाली. मानवच मानवी इतिहासाचा कारागीर आहे आणि स्वत:च्या जीवनाचा व भवितव्याचा निर्माता आहे. देव, दैव वा इतर कोणतीही अलौकिक शक्ती मानवी इतिहासाची घडण करीत नाही. असा उलगडा झाल्यावरच आपण इतिहास बदलू शकतो, आपण नवा समाज निर्माण करू शकतो असा आत्मविश्वास माणसांमध्ये निर्माण झाला. इतिहासाच्या शक्ती म्हणजे मानवांच्याच शक्ती होत, असे कळल्यामुळे माणसात आत्मविश्वास उत्पन्न झाला. आत्मविश्वास असलेली माणसेच क्रांतिकारक माणसे होत. अशा माणसांनाच लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, मानवी मूलभूत हक्क यांचे मन:चक्षुंसमोर दर्शन झाले. विज्ञान व

तंत्रविज्ञान प्रगल्भ दशेस आल्यानंतर आधुनिक मानसशास्त्र, मनोविलेषणशास्त्र अस्तित्वात आले आणि त्या शास्त्रानुसार लक्षात आले की देव, दैव किंवा अलौकिक शक्ती यांचाही जन्मदाता माणूसच होय. मनुष्याच्या आत्मविश्वासाचे स्वरूप म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा विकास होय. सद्‌गुण, कला, ज्ञानविज्ञान या स्वरूपातच मानवी विकास दृष्टिगोचर होतो, हेही लक्षात आले.

मानवाचा संपूर्ण आत्मविकास घडण्यास मर्यादा न घालता संपूर्ण अवसर देणारी सामाजिक व सांस्कृतिक क्रांती म्हणजेच संपूर्ण क्रांती होय. संपूर्ण क्रांतीचीच राजकीय क्रांती ही बाजू होय. संपूर्ण क्रांतीला अनेक बाजू आहेत. वैचारिक क्रांती, आर्थिक क्रांती, शैक्षणिक क्रांती, सांस्कृतिक क्रांती आणि राजकीय क्रांती. अशा प्रकारच्या अनेक मुख्य व अवांतर बाजू आहेत. वस्तूच्या अनेक बाजू या एकमेकांत मिळालेल्या असतात. त्या अलगपणे विचारात, लक्षात घेतल्या तरी त्या एकमेकींपासून वस्तुत: अलग नसतात. क्रांतिकारक माणसे क्रांतीस प्रवृत्त होतात, ते काही विशिष्ट नव्या सतत प्रगत होणाऱ्या विचारांनी! विचार हाच माणसाच्या हातून अर्थपूर्ण कृती घडवून आणतो. संपूर्ण क्रांतीच्या पाठीमागे तीन मूलभूत विचारसूत्रे गृहीत धरावी लागतात (१) मानवी जीवनात सत्य, स्वातंत्र्य व अन्य उच्च नैतिक मूल्ये हीच मार्गदर्शक व क्रांतीच्या कसोट्या होत. (२) सत्याचा शोध करीत असणारा स्वतंत्र मनुष्यच क्रांतिकार्यास समर्थ व कार्यक्षम असू शकतो. (३) मानवी स्पर्धेपेक्षा मानवी सहकार्यच माणसाची भौतिक आणि मानसिक संस्कृती अधिक विकसित करू शकते; सहकार्याने माणसाची शक्ती गुणित होते. या तीन विचारसूत्रांच्या आधारे राजकीय क्रांतीची संकल्पना आणि रचना संपूर्ण क्रांतीची एक बाजू म्हणून होऊ शकते. राजकीय क्रांती म्हणजे समाजाची नवी मौलिक राजकीय रचना होय. राज्य म्हणजे सामाजिक नियंत्रण वा शासन करणारी समाजसंघटना होय. ही नियंत्रणाची शक्ती म्हणजे राजकीय सत्ता होय. ही संघटना मानवी इतिहासात आतापर्यंत हुकूम आणि आज्ञा पाळणारा बहुजन समाज आणि हुकूम आणि आज्ञा देणारा वर्ग अशाच स्वरूपाची आहे. शास्य बहुजन समाज आणि शासक वर्ग अशा द्वैतावरच उभारलेली राज्ये जगात सगळीकडे दिसतात. जगात कोठेही हे द्वैत मिटलेले नाही. हे द्वैत दृढपणे नांदत आहे. एका वर्गात व एका पक्षात सत्तेच्या केंद्रीकरणाची प्रक्रिया सुरू राहते.

संपूर्ण क्रांतीच्या संदर्भात राजकीय क्रांती म्हणजे हे द्वैत मिटवून जनतेची शास्य व शासक अशा गटात विभागणी होऊ न देता प्रत्येक नागरिक सत्तेचा भागीदार करून सत्तेचे वितरण किंवा विकेंद्रीकरण झाले म्हणजे राजकीय क्रांती झाली, असे म्हणता येईल. सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणजे विसर्जन नव्हे; शासनराहित्य किंवा अराजक नव्हे. खालपासून वरपर्यंत, तळापासून शिखरापर्यंत, मुळापासून शेंड्यापर्यंत सत्तेचे स्तर निर्माण करणे म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण होय.

संसदीय लोकशाहीतील सत्ता प्रतिनिधी मंडळात आणि प्रतिनिधी मंडळाच्या प्रशासन कक्षेत केंद्रित झालेली असते. जनता किंवा लोक हे सार्वभौम सत्तेचे अधिष्ठान आहे. या लोकशाही तत्त्वाची अंमलबजावणी प्रतिनिधींच्या हाती निवडणुकीनंतर सत्ता सोपवण्यातच होते. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात सामान्य नागरिक हा प्रचंड शासनयंत्रणेचा लहानसा खिळा बनतो व पराधीन बनतो. आजच्या साम्यवादी व समाजवादी राष्ट्रांमध्ये एकपक्षीय राज्यपद्धती असल्यामुळे निवडणुकीच्या वेळी सामान्य नागरिकाला पर्यायी पक्षाच्या अभावी पर्यायी सत्ताधारी वर्ग बदलण्याचाही उपाय हाती नसतो. त्यामुळे तो अधिकच पराधीन राहतो आणि मूलभूत व्यक्तिस्वातंत्र्यापासूनही वंचित राहतो. संसदीय लोकशाहीच्या क्षेत्रातील नागरिकाला अनेक पक्षोपपक्षांपैकी कोणत्याही पक्षाला मत देण्याचे स्वातंत्र्य असते; परंतु लोकशाहीतील राजकीय पक्ष हेही सत्तावादीच असतात. त्यामुळे मूलभूत मानवी हक्कांची जाणीव व जोपासना करणारा बहुसंख्य नागरिक नसल्यास सत्तावादी राजकीय पक्ष क्रमाक्रमाने सत्ता बळकावून बसण्याचा धोका असतो.

सत्ताभिलाषी राजकीय पक्ष हे जनमनावर आणि पक्षीय सदस्यांवर कब्जा मिळवण्याकरिता सत्तावादाला नेतृत्ववादाचे रूप देतात, नेत्याची उच्च प्रतिमा निर्माण करतात आणि त्या प्रतिमेचे पूजन सुरू करतात. परंपरागत धर्माने देवपूजेचे संस्कार निर्माण केलेले असतात, ते खूप खोल असतात. गरिबीने पीडलेल्या किंवा प्रचंड समाजयंत्रणेमध्ये जीवन जगणाऱ्या माणसात पराधीनतेची भावना असते. त्या भावनेमुळे तो व्यक्तिपूजक बनतो. त्यामुळे सत्ताधारी पूज्य व्यक्तीच्या भजनांना चांगलाच रंग चढतो.

सत्तावाद म्हणजे दुसऱ्यावर सत्ता चालविणे. हेच अराजक टाळण्याचे व व्यवस्थित सामाजिक जीवन चालविण्याचे साधन होय. अशा श्रद्धेवर आधारलेली वासना व दृष्टिकोन होय. आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने अपूर्ण असलेल्या समाजातील माणसे स्पर्धाशील असतात. म्हणून त्यांच्यात कलह माजत असतो. निरनिराळ्या माणसात गुण व योग्यता यांचे तारतम्य असते, त्यामुळे गुणवान, हुशार व ताकदवान माणसे दुर्बलांना खाली ओढण्याचा आणि लुबाडण्याचा प्रयत्न करतात. म्हणून माणसांमधली ही स्पर्धा मर्यादित करण्याकरिता व कलह निवारण्याकरिता राजकीय सत्तेची गरज आहे असे समाजवादातील महत्त्वाचे तत्त्व आहे. ते हॉब्ज या राजकीय तत्त्ववेत्त्याने चांगले मांडले आहे. परंतु या बुद्धिवादी उपपत्तीपेक्षा सत्ताभिलाषा ही माणसात नैसर्गिक असल्यामुळे बलवान वा समर्थ लोक सत्ता बळकावण्याचा प्रयत्न करतात. हे करीत असताना आणि सत्ता बळकावल्यावर अजून नागरिक किंवा जनता सत्ता योग्य रीतीने वापरण्यास समर्थ नाही किंवा आमची सत्ता म्हणजे जनतेचीच सत्ता, असा युक्तिवाद करीत राहतात. काही सत्तावादी सामान्य जनतेच्या गरिबीचा, हालअपेष्टांचा मुद्दा उपस्थित करून आणि मूलभूत नैतिक मूल्ये आणि मानवी हक्क यांना तिलांजली देऊन सत्तेवर येतात व सत्ता राबवतात. गरिबीने गांजलेल्या जनतेला मूलभूत हक्कांची नीट जाणीव

नसते. त्यामुळे ती भावनाविवश होऊन नेत्याला शरण जाते. फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये असेच घडले. भारतातही गेल्या काही वर्षांत असेच घडत आहे.

संपूर्ण राजकीय क्रांती घडवून आणायची म्हणजे सत्तावादी राजकीय पक्ष व वर्ग राहणार नाहीत, अशी शास्य-शासक भावाचे द्वैत निरस्त करणारी राजकीय संघटना होय. यालाच मूलभूत लोकशाही म्हणतात. अशा मूलभूत लोकशाहीची स्थापना करणारी क्रांतिकारक माणसे म्हणजेच लोकशाहीचे शिक्षक होत. कार्ल मार्क्सने फायरबाखच्या थिसिसमध्ये म्हटले आहे की, 'शिक्षकांना शिक्षण दिले पाहिजे.' 'लोकशिक्षण हा लोकशाहीचा आधार होय' असे ॲरिस्टॉटलनेही म्हटले आहे. राजकीय पक्षही लोकशिक्षण करत असतात; परंतु ते लोकशिक्षणापेक्षा लोकमोहन असते. ती लोकांना भूल घालण्याची पद्धती असते. पक्ष हे खरेखुरे लोकशाहीच्या नागरिकाला मूलभूत मानवी हक्कांच्या मूल्यावर आधारलेली विवेकबुद्धी जागृत करून सारासार विचार देण्याचे कार्य करीत नसतात. राजकीय क्रांतीचा लोकशिक्षक हा सत्ताविमुखच असला पाहिजे. लोकांनी सहकार्याने आपली भौतिक समृद्धी व मानसिक संस्कृती निर्माण करावी आणि हे सहकार्य हाच जीवन समृद्ध करण्याचा मार्ग आहे, असा दृष्टिकोन देणाराच लोकशाहीचा खरा शिक्षक असतो. तो स्वत:ला सत्ता नाकारतो आणि नागरिकाला सर्व सामाजिक क्षेत्रांमध्ये सत्ता वापरण्याचे शिक्षण देतो. राजकीय सत्ता आपल्या बाहेर नाही, आपणच सत्तेचे भागीदार आहोत, आपणच सत्ता राबविणारे आहोत अशी नागरिकांमध्ये जाणीव उत्पन्न होईल, अशा तऱ्हेची सत्तास्थानांची किंवा सामाजिक संस्थांची बांधणी तो करतो.

हे लोकशिक्षण सामाजिक संस्थांमध्ये काम करीत असतानाच नागरिकाला लाभावे, असे नियोजन राजकीय क्रांतीच्या कार्यक्रमात अंतर्भूत होते. काम करीत असतानाच शिक्षण, हे जे महात्मा गांधींचे सूत्र, ते येथे लागू होते. शेतात राबणारा शेतकरी, बागेत राबणारा बागवान, कारखान्यात काम करणारा कामगार, शिक्षणसंस्थेत शिकविणारा शिक्षक, ग्रामपंचायतीत भाग घेणारा नागरिक आणि पंच, सहकारी ग्राहक आणि वितरक संस्थांमध्ये भाग घेणारे सदस्य इत्यादिकांना ती ती कार्ये करीत असतानाच लोकशिक्षकांनी शिक्षण देणे आवश्यक आहे. या मूलगामी लोकशाहीच्या दृष्टीने प्रत्येक आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांमध्ये ज्या ज्या व्यक्ती काम करतात, त्या व्यक्तींना आपले अधिकारी व प्रशासक निवडण्याचा हक्क मिळावा आणि ते हक्क विवेकबुद्धीने सर्व सदस्यांनी कसे वापरावे, याचे शिक्षण देण्याची तरतूद पाहिजे. याला 'पार्टिसिपेटरी डेमॉक्रसी' किंवा सहभागी लोकशाही म्हणतात.

या मूलगामी लोकशाहीची रचना पिरॅमिडसारखी व्हावयास पाहिजे. पिरॅमिडमध्ये पाया फार मजबूत असतो. मधले स्तर खालच्या स्तरावर अवलंबून असतात; परंतु मोठी राष्ट्रव्यापी राज्ये किंवा मोठे राजकीय पक्ष हे शासकीय धोरणासंबंधी किंवा कार्यक्रमासंबंधी

निर्णय घेतात आणि ते निर्णय खालच्या स्तरांना मान्य करावे लागतात. ही पद्धती साम्यवादी, समाजवादी किंवा संसदीय लोकशाहीवादी राष्ट्रांमध्ये आणि मोठमोठ्या राजकीय पक्षांमध्ये अवलंबिली जाते. याला 'डेमॉक्रॅटिक सेंट्रलिझम' म्हणजे केंद्रीकृत लोकशाही असे फसवे नाव दिले जाते. भारतीय राजकीय पक्षांचीही हीच पद्धती आहे. पक्षीय राजकारण आले म्हणजे तेथे एक प्रकारची पक्षीय हुकूमशाहीच असते. म्हणून पक्षीय लोकशाहीमध्ये राजकीय हुकूमशाहीचा धोका कायम असतो. असा धोका टाळण्याकरिता पिरॅमिडसारखी मूलभूत लोकशाहीची रचना आवयक आहे. उदा. खालच्या ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, सहकारी मंडळया या तथाकथित लोकशाही संस्था यांना आपापल्या क्षेत्रात कमी हक्क वा मतस्वातंत्र्य असते. आणखी असेही दिसेल, की पक्षीय हुकूमशाहीचे प्रतिबिंब ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदा यांच्यामध्ये पडलेले असते. दुबळया व प्रभावी अल्पसंख्याक व बहुसंख्य जातिजमाती यांच्या स्पर्धांचे क्षेत्र म्हणजे भारतातील राजकीय, सामाजिक व आर्थिक संस्था होत. मानवी समानतेचे तत्त्व या भारतीय समाजसंस्थेत कोठेच नाही, याचे हे दर्शक आहे. भारताची परंपरागत समाजरचना ही अधिकारशाहीच्या तत्त्वावर आधारलेली आहे. तीच समाजरचना शाबूत राहिल्यामुळे ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदा यांच्यामध्ये ग्रामीण नागरिक हे गावनेता किंवा जिल्हानेता यांचा नूर पाहूनच वागत असतात. एका अर्थी फॅसिस्ट संस्था असतात. त्यांचे स्वरूप बदलायचे, त्यांना शुद्ध लोकसमितीचे स्वरूप द्यावयाचे तर पक्षातील, स्वातंत्र्यवादी, सत्ताभिमुख लोकशिक्षकाचीच आवयकता आहे. संपूर्ण क्रांती हे फार मोठे भव्य ध्येय आहे. ते आश्चर्यमय दिवास्वप्न आहे. त्या ध्येयाकडे नेणारा ध्येयवादी शिक्षकवर्ग निर्माण करणे, हेच आजचे अत्यंत आवश्यक असे क्रांतिकार्य आहे. ज्याच्यामध्ये विचारक्रांती झाली नाही, असा माणूस क्रांतीचा शिक्षक होऊ शकणार नाही. म्हणून असा पक्षातील शिक्षक निर्माण करणे हे संपूर्ण क्रांतिवाद्यांचे पहिले कर्तव्य आहे.

**(आकाशवाणी पुणे केंद्र, दि. १० नोव्हेंबर १९७७)**

OOO

५१.

# हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास

*(मुंबई, एशियाटिक सोसायटी ग्रंथालयात ८ मे १९७८ ला कै. डॉ. पां. वा. काणे यांच्या वर्षदिनानिमित्त तर्कतीर्थांनी दिलेल्या इंग्रजी भाषणाचा त्यांनीच केलेला हा मोकळा अनुवाद -)*

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात धार्मिक व सामाजिक सुधारणांचा उपक्रम सुरू झाला. आधुनिक पश्चिमी संस्कृतीचा ज्यांच्या मनावर जोरदार प्रभाव पडला अशा भारतीय व्यक्तींपैकी पहिले मोठे विचारवंत म्हणजे राजा राममोहन रॉय होत. १८१३ साली राममोहन आणि त्यांचे मित्र यांनी एक सभा भरविली; हिंदू धर्मसुधारणेच्या आवश्यकतेसंबंधी विचारविनिमय केला. तेव्हापासून भारतीय विचारवंतांमध्ये वैचारिक संघर्ष सुरू झाला व तो नंतर वाढत गेला. परंपरागत यातु-धार्मिक विचारपद्धतीचा पोलादी पडदा फाटू लागला आणि ऐहिक मानवतावादी विचारांचा प्रकाशझोत पसरू लागून उच्चवर्गीय भारतीयांची झोप उडाली.

येथील सनातनी हिंदू, जैन व बौद्ध यांच्या मनावर परंपरागत धार्मिक पवित्र ग्रंथातील तथाकथित इतिहासाची पक्की पकड होती. कृत, त्रेता, द्वापर आणि कली यांचे देवप्रेरित कालचक्र फिरत राहते. मानवी इतिहास वा विश्वाचा इतिहास या कालचक्रात घडत असतो, हा इतिहास दैवी संकेताने अगोदरच ठरलेला असतो व त्या संकेतानेच घडत असतो, यापुढे मानवाचा इलाज चालत नाही, असा या इतिहासवादाचा मूळ सिद्धांत आहे. हा सिद्धांत ईश्वरप्रेरित ऋषींनी लिहिलेल्या धर्मग्रंथात सांगितला असल्यामुळे तो पूर्ण सत्य आहे, अशी श्रद्धा जनमनात पूर्ण रुजली होती. ईश्वरोक्त धर्मनियम हे मानवी बुद्धीने बदलता येत नाहीत म्हणून, धर्मग्रंथांच्या मर्यादा उल्लंघून कसलीही धार्मिक वा सामाजिक सुधारणा करणे, हे मोठे पाप आहे, असा या श्रद्धेचा आशय होता. राजा राममोहन रॉय यांच्यापासून आतापर्यंत जे हिंदूधर्मसुधारक झाले त्यांनी या श्रद्धेतून मुक्त झालेल्या विचाराचा मार्ग सांगितला व

चोखाळला. उक्त धार्मिक इतिहासवादाचा त्यांनी त्याग केला, तसा त्यांना त्याग करणे भाग पडले. कारण त्याशिवाय हिंदू समाजामध्ये कसलीही महत्त्वाची सुधारणा करणे अशक्य आहे, असे त्यांच्या लक्षात आले.

## इतिहासाचे दोन आकृतिबंध

जगातील उच्च अशा परंपरागत संस्कृतीमध्ये मानवी इतिहासाचे आणि विश्वेतिहासाचे चक्रनेमिक्रमयुक्त व सरळ रेषेतला असे मुख्यत: दोन आकृतिबंध आतापर्यंत मानले जातात. १८ व्या शतकापूर्वी हे दोन आकृतिबंध अपरिहार्य, पवित्र, दिव्य वा देवनियंत्रित म्हणून स्वीकारले होते. १८ व्या शतकापासून या दोन आकृतिबंधांना इहवादी दृष्टिकोनाचे इहवादी स्वरूप दिले. इतिहासाची चक्राकार गती आणि इतिहासाची सरळ रेषेतील गती असे हे दोन आकृतिबंध यहुदी धर्माच्या उपपत्तीपूर्वीच्या संस्कृतीमध्ये मान्य झाला होता. भारत, बॅबिलोनिया, ग्रीस व रोम यांच्या संस्कृतींमध्ये त्याचे निश्चित प्रत्यंतर मिळते. मुळात विश्व हे अव्यक्त अशा अवस्थेत असते, त्यातून ते निर्माण होते, वाढते, खचत जाते आणि अखेरीस लय पावून अव्यक्त अवस्थेत पुन्हा जाते. हा उत्पत्ती, स्थिती, प्रगती, अवनती आणि लय यांचा क्रम पुन्हा पुन्हा सुरू असतो, असा या कल्पनेचा थोडक्यात अर्थ आहे.

दुसरा सरळ रेषेतील इतिहासाचा आकृतिबंध सेमेटिक वंशाच्या धार्मिक संस्कृतीमध्ये रूढ झाला. यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम या धर्मांनी हा आकृतिबंध मानून आपले निरनिराळे विचार या आकृतिबंधात गोवले. या सेमेटिक दृष्टिकोनाप्रमाणे इतिहासक्रम असा- देवाने माणसाकरिता सृष्टी निर्माण केली; त्या सृष्टीच्या मध्यभागी म्हणजे पृथ्वीवर स्त्रीपुरुष रूपात माणूस निर्मिला. त्याचे पतन झाले. प्रेषितांतर्फे देवाने पापातून मुक्त होण्याचा मार्ग दाखविला म्हणजे धर्माचे प्रकटीकरण केले, भविष्यकाळी न्यायनिर्णयाचा अखेरचा दिवस उगवणार आहे, त्या दिवसापर्यंत जे पश्चात्तप्त धार्मिक किंवा पश्चात्तप्त नसलेले अधार्मिक मेलेले असतील, ते मातीतून बाहेर येतील; आणि जे धार्मिक असतील ते शाश्वत स्वर्गात निरंतर राहू लागतील आणि जे अधार्मिक असतील, ते शाश्वत यातनामय नरकात शाश्वत कालपर्यंत तळमळत राहतील. अखेरीस दृश्यविश्वाचा प्रलय होईल. असा हा उत्पत्ती, पतन, प्रकटीकरण, उत्थान यांचा सरळ रेषेतला क्रम वरील धर्मांनी सांगितला आहे. त्यात भारतीयांचा चक्राकार इतिहासवाद स्वीकारलेला नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी या धार्मिक-पारलौकिक दोन्ही ऐतिहासिक आकृतिबंधांना नवे रूप देण्यात आले. मानवी इतिहासाचे ऐहिक व बुद्धिवादी दृष्टीने परिशीलन करून पश्चिमी इतिहास संशोधकांनी त्याचे पारलौकिक व दैववादी रूप काढून टाकले.

प्राचीन भारतीयांनी हा ऐतिहासिक चक्राकार सिद्धांत विस्ताराने मांडला आहे. हा सिद्धांत म्हणजे ऐतिहासिक कल्पित मिथ्यकथा आहे, कल्पनाजाल आहे. या कालचक्रामध्ये

तालबद्धता आहे. एका मोठ्या चक्रात दुसरे लहान चक्र फिरत असते. या चक्राचे चार भाग असून प्रत्येक भागाला 'युग' ही संज्ञा आहे. दोन युगामधील काळाला 'संध्याकाल' म्हणतात. या संध्याकाळाने युगे जोडली जातात. चारी युगे मिळून 'महायुग' होते. कृत, त्रेता, द्वापर आणि कली अशा त्यांना क्रमाने संज्ञा असून प्रत्येक युगाचे कालमान निरनिराळे असते. कृतयुग ४,००० वर्षे; त्याचा उष:काल ४०० वर्षांचा आणि संध्याकाळ तितक्याच वर्षांचा आहे. त्यानंतर त्रेतायुग ३,००० वर्षे; त्याचा उष:काल आणि संध्याकाल प्रत्येकी ३०० वर्षाचे. त्यानंतरचे द्वापरयुग २,००० वर्षे; त्याचा उष:काल आणि संध्याकाल प्रत्येकी २०० वर्षाचा. त्यानंतर कलियुग १,००० वर्षे; त्याचा उष:काल आणि संध्याकाल क्रमाने प्रत्येकी एक शतकाचा. एकंदरीत अशा तऱ्हेने 'महायुग' १२,००० वर्षाचे (महाभारत ३.१८८). हीच महायुगाची वर्णने पुराणांमध्ये (उदा. विष्णुपुराण ३.२.४८) अतिदीर्घ, प्रचंड प्रमाणात वाढविली आहेत. कृतयुग १७,२८,००० वर्षे; त्रेतायुग १२,९६,००० वर्षे; द्वापरयुग ८,६४,००० वर्षे आणि कलियुग ४,३२,००० वर्षे. आपण हल्ली या महायुगातील कालक्रमणाप्रमाणे कलियुगात राहत आहोत. हे कलियुग इ.स. पूर्व १८ फेब्रुवारी ३१०२ ला सुरू झाले.

या सर्व कालचक्राची मूळ शक्ती महाविष्णू होय. त्यालाच महाकालही म्हणतात. साक्षात धर्म त्यात राहतो. कृतयुगामध्ये धर्म चारी पायांवर, त्रेतायुगात तीन पायांवर, द्वापरयुगात दोन पायांवर आणि कलियुगात एका पायावर उभा असतो. या धर्माला बैलाची उपमा दिली आहे; धर्म हा पवित्र बैलाच्या रूपकात कल्पिला आहे. कृतयुगात धर्म हा संपूर्णपणे आपोआप पाळला जातो; त्रेतायुगात त्याची चतुर्थांश शक्ती घटते; द्वापरयुगात पुण्य आणि पाप यांचा समभाग असतो आणि कलियुगात पाप फार आणि पुण्य अल्प असते. कलियुगात संपत्ती आणि सत्ता यांच्या योगानेच माणसाचे समाजातील स्थान ठरते, भ्रष्टाचार यशस्वी होतो, कामोपभोगाचा महिमा वाढतो. अशा या कलियुगात आपण राहत आहोत. त्यामुळे बुद्धी, सद्गुण आणि आयुर्मान हे प्रत्येक युगात पुढे पुढे घटत जाते. जीवन, बुद्धी, सद्गुण आणि समाजव्यवस्था यांचा युगमानाप्रमाणे ऱ्हास होत जातो असे पुराणे सांगतात.

ही पौराणिक इतिहासविषयक कल्पित मिथ्यकथा कर्मविपाक आणि आत्म्याचे अमरत्व या सिद्धांतावर आधारलेली आहे. त्यामुळे माणसांना पुढचा जन्म सत्कर्माच्या योगाने चांगला मिळू शकेल अशा आशेवर या जन्मातील दु:ख आणि अवनती सहन करता येते. दुसरे असे की, या मिथ्यकथेमध्ये एक प्रकारची भव्यता आहे. या कथेच्या चिंतनात विश्वनाटकाचा भव्य देखावा मनापुढे उभा राहतो.

सरळ रेषेतला ऐतिहासिक आकृतिबंध मुळात पश्चिमी सेमेटिक धार्मिक परंपरेने कल्पिला होता; त्याला आधुनिक पश्चिमी इतिहास-तत्त्वज्ञानांनी बुद्धिगम्य ऐहिक स्वरूप दिले. त्यातील ईश्वरी संकेत, आत्म्याचे अमरत्व, स्वर्ग व नरक या संबंधाच्या पौराणिक मिथ्य संकल्पना

बाजूला सारल्या. हा इहवादी ऐतिहासिक आकृतिबंध आधुनिक विद्याविभूषित भारतीयांनी आत्मसात केला व इतिहास संशोधनाची वैज्ञानिक पद्धती अंगीकारली.

आधुनिक बुद्धिवादी समीक्षेची पद्धत अंगीकारून प्रथम पश्चिमी पंडितांनी भारताचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली व त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून भारतीय इतिहाससंशोधकांनी वास्तविक पुराव्यांच्या आधारावर भारताचा इतिहास रचण्यास सुरुवात केली. पश्चिमी इतिहासपंडितांपैकी काहींनी इतिहासाच्या चक्राकार गतीचा सिद्धांत मान्य करूनच त्यातील मिथ्यकथा वा धार्मिक अंश वगळून इतिहासाची ऐहिक उपपत्ती मांडली आहे. विको (Vico), ओस्वाल्ड स्पेंग्लर, आर्नल्ड टॉयन्बी, सोरोकिन इत्यादिकांचा याच्यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो.

मनुस्मृती व महाभारत यांच्यामध्ये सांगितलेले १२,००० वर्षांचे महायुग धरून त्याच्या अनुसारे प्राचीन भारताच्या ऐतिहासिक घटनांचा तपशील, जो काही प्राचीन पुराणांमध्ये सांगितला असेल, तो काही आता उपलब्ध नाही. तो अतिशयोक्तीपूर्ण कल्पित, मिथ्यकथांमध्ये बुडाला आहे. लक्षावधी वर्षांची महायुग कल्पना कोणत्याही दृष्टीने मानवी इतिहासाला लागू पडू शकत नाही. म्हणून लक्षावधी वर्षांची महायुग कल्पनाही अनैतिहासिक ठरते. त्याला इतिहासकाल अशी संज्ञाच लागू पडू शकत नाही. पूर्वमीमांसेची धर्मशास्त्रविषयक उपपत्ती स्वीकारून धर्मविषयक विधिनिषेधाची ऐतिहासिक उपपत्ती लावता येत नाही. श्रुतिस्मृती आणि शिष्टांच्या रूढी म्हणजे धर्मशास्त्र होय. वेद हे कधी निर्माणच झाले नाहीत, असे पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा या दोन मीमांसा सांगतात, वेद हे अनादि व नित्य आहेत, ते ऋषींनी वा देवाने निर्मिलेले नाहीत; वेद हे अपौरुषेय आहेत. अपौरुषेय म्हणजे जीवात्मे किंवा परमात्मा यांच्यापैकी कोणीही निर्मिलेले नाहीत, येथे पुरुष शब्दाचा अर्थ आत्मा असा आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य व योग ही चार दर्शने वेद हे पौरुषेय आहेत, म्हणजे पुरुषनिर्मित आहेत, असे म्हणतात. परंतु त्यांच्या मते येथे पुरुष शब्दाचा अर्थ त्रिकालदर्शी, सर्वज्ञ, अमर, परमेश्वर किंवा नित्य सिद्ध-पुरुष होय. परमेश्वराने किंवा सर्वज्ञ सिद्ध पुरुषाने वेद हे शब्द रूपाने व्यक्त करून ऋषींना उपदेशिले. अर्थात वेद हे परमेश्वराच्या किंवा नित्य सिद्ध पुरुषाच्या ज्ञानाचाच विषय असल्यामुळे आणि ते ज्ञान अनादि असल्यामुळे वेद हे खऱ्याखुऱ्या अर्थाने निर्माण झालेलेच नाहीत, म्हणजे वेदांना इतिहास नाही. स्मृती आणि शिष्टाचार हे वेदमूलकच असल्यामुळे म्हणजे वेदांचाच अनुवाद करणारे असल्यामुळे तेही अनादिच आहेत. कोणत्या युगात कोणत्या स्मृती आणि कोणते शिष्टाचार प्रमाण मानावेत, हेही वेदांनीच ठरविलेले आहे. भिन्न भिन्न युगांमध्ये कोणत्या धर्मांचे आचरण करावे हे माणसांनी ठरवायचे नाही, हे वेदांवरूनच ठरते; असा पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा म्हणजे वेदान्त, न्याय, वैशेषिक, सांख्य आणि योग या आस्तिक षड्दर्शनांचा अभिप्राय आहे. तात्पर्य, नवा धर्म, नवी आचारपद्धती स्वत:च्या बुद्धीने ठरविण्याचा



वाय १७४–२९

माणसास अधिकार नाही. माणसे स्वतंत्रपणे धर्मपरिवर्तन करू लागली, तर ते परिवर्तन म्हणजे अधर्मच होय. म्हणून धर्मशास्त्रांचा म्हणजे वेद, स्मृती, पुराणे आणि शिष्टांच्या रूढी यांचा ऐहिक मानवी इतिहासाच्या दृष्टिकोनातून अभ्यास व अशा अभ्यासाचे निष्कर्ष हे पारंपरिक हिंदू धर्माच्या दृष्टीने अप्रमाण व अग्राह्य होत. माणसाला धर्मशास्त्र बाजूला ठेवून स्वत:च्या बुद्धीने समाजसुधारणा करण्याचा अधिकार नाही म्हणूनच ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत म्हटले आहे, की ''शास्त्राने म्हणजे धर्मशास्त्राने विष घेण्यास सांगितले तरी घ्यावे; ते विषही कल्याणकारक होय.''

परंपरागत हिंदू धर्म हा बंधनस्थ समाजपद्धतीचा धर्म आहे. त्यात व्यक्तीला, समाजाला किंवा राज्य संस्थेला यत्किंचितही परिवर्तन करण्याचा अधिकार नाही, कारण धर्मशास्त्र हेच, पाप कोणते आणि पुण्य कोणते, हे ठरवू शकते. पाप आणि पुण्य हे अदृष्ट असते. अदृष्ट म्हणजे मानवी स्वतंत्र बुद्धीस अनाकलनीय होय. स्वर्ग, नरक आणि एकंदरीत जीवाचे कल्याण व अकल्याण हे पापपुण्यांचेच फलित असल्यामुळे विहित कर्म कोणते व निषिद्ध कर्म कोणते, याबाबतीतला निर्णय धर्मशास्त्राच्या द्वारेच होऊ शकतो.

## ऐहिक बुद्धिवादाचा उदय

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी हा धर्मशास्त्राचा पोलादी पडदा फाटण्यास सुरुवात झाली. पश्चिमी बुद्धिवादी संस्कृतीकडून प्राप्त झालेल्या ऐतिहासिक व ऐहिक बुद्धिवादाच्या तीक्ष्ण, धारदार व भेदक अशा शस्त्राने हा पोलादी पडदा भेदून टाकणारे काही थोडे आधुनिक भारतीय धीर पुरुष पुढे आले. यांच्यामध्ये काही महिलाही सामील झाल्या. राजा राममोहन रॉय, त्यांचा ब्राह्मसमाज आणि प्रार्थनासमाज यांचे नेतृत्व यांची आघाडी ही कालक्रमाने पहिली होय. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ स्वामी दयानंद सरस्वती आणि त्यांचा आर्यसमाज, त्याचप्रमाणे महात्मा जोतीराव फुले आणि त्यांचा सत्यशोधक समाज यांनी परंपरेच्या विच्छेदनास सुरुवात केली. रॉय, स्वामीजी आणि फुले यांना या संदर्भात बंडखोर म्हणता येईल. बंडखोर न म्हणता क्रांतिकारक का म्हणू नये? याचे उत्तर असे, की अजून धार्मिक आणि सामाजिक क्रांती झाली नाही, ती व्हायची आहे. त्यांचे विचार हे क्रांतिकारक होत, हे मात्र निश्चितपणे म्हणता येईल. परंपरागत हिंदू धर्म आणि त्यांचे तत्त्वज्ञान त्यातून निर्माण झालेली परंपरागत हिंदू संस्कृती, हे सर्व अधिकारशाही समाजव्यवस्थेचे अधिष्ठान होय. विद्यमान भारतीय संस्कृती आणि समाजव्यवस्थासुद्धा अधिकारशाहीच्याच तत्त्वावर अधिष्ठित आहे. वर सांगितलेल्या श्रुतिस्मृतिपुराणांच्या प्रामाण्यपद्धतीमध्ये राजा राममोहन रॉय यांनी एक मूलगामी फरक केला. त्यांनी उपनिषदांचे संपूर्ण प्रामाण्य मान्य करून बाकीचे चारी वेद, स्मृती आणि पुराणे यांना दुय्यम ठरविले. त्यांचेच अनुयायी देवेंद्रनाथ ठाकूर यांनी उपनिषदांसह सर्व वेद, स्मृती व पुराणे ही सर्व मनुष्यबुद्धीने निर्मिलेली होत, असे जाहीर केले आणि धार्मिक व सामाजिक सुधारणेचा संपूर्ण अधिकार मनुष्याच्या विवेकबुद्धीकडे

सोपविला. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर इत्यादी प्रार्थनासमाजी विद्वान समाजसुधारकांनी मनुष्याची विवेकबुद्धी हेच धर्माधर्म ठरविण्याचे मुख्य प्रमाण होय, या सिद्धांताची स्थापना केली. डॉ. रा. गो. भांडारकर यांनी भारताच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय इतिहासाच्या रचनेमध्ये फार महत्त्वाचे योगदान केले आहे. त्यांचा प्रभाव इतर लो. टिळकांसारख्या तथाकथित परंपरावाद्यांवरही पडला. इहवादी इतिहासाचा दृष्टिकोन स्वीकारून लो. टिळकांनी वेद आणि भगवद्गीता यांचा काळ ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. यात इतिहासाचा पुराणोक्त चक्राकार इतिहासवादाचा मागमूसही सापडत नाही. वेद हे ऋषी नामक माणसांनीच केले आहेत, असे गृहीत धरून वेदांचा व गीतेचा काळ ठरविला आहे.

स्वामी दयानंद सरस्वती यांना जन्मसिद्ध, जातिबद्ध हिंदू-समाजव्यवस्था मोडायची होती आणि मूर्तिपूजेचे कर्मकांड नष्ट करावयाचे होते. म्हणून त्यांनी ज्या ज्या धर्मशास्त्र ग्रंथांमध्ये जातिभेद किंवा मूर्तिपूजा यांचे उल्लेख सापडतात किंवा जातिभेदाचा वास येत असेल, ते सगळे ऋषी नामक मनुष्याचे ग्रंथ ठरविले. केवळ मंत्ररूप वेदच ईश्वरप्रणीत वेद म्हणून मानले आणि ब्राह्मणरूप वेद वा स्मृती, पुराणे आणि शिष्टांच्या रूढी यांचे प्रामाण्य अमान्य केले. या वेदेतर धर्मशास्त्र ग्रंथामध्ये काही सत्य वेदविहित आहे आणि काही असत्य म्हणजे वेदविरुद्ध आहे, असा विचार धिटाईने मांडला.

महात्मा जोतीराव फुले यांनी वरील धर्मसुधारकांच्या पुढे आघाडी मारली. त्यांनी सर्वच हिंदूधर्मशास्त्र आणि परंपरागत सामाजिक रूढी हे मानवी दास्याचे आधार होत म्हणून अप्रमाण व अग्राह्य ठरविले. हिंदू समाजाची स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या मानवतावादी सिद्धांतावर नवी रचना केली पाहिजे, असा विचार 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात त्यांनी मोठ्या आवेशाने मांडला आहे. या पश्चिमेकडून आलेल्या मानवतावादाचा खोल प्रभाव पडूनच राजा राममोहन रॉयांपासून समाजसुधारणेचे आंदोलन सुरू झाले, असे म्हणता येते. सतीची चाल पाहून रॉय यांना मोठा धक्का बसला. रानटी समाजामध्ये माणसाला बळी देण्याची धार्मिक प्रथा होती. प्राचीन काळच्या अडीच हजार वर्षांपूर्वीच्या काही सुसंस्कृत समाजांमध्येसुद्धा नरयज्ञाची प्रथा होती. या नरबळी देण्याच्या प्रथेचे उदाहरण सतीची चाल होय. ही रानटी अवस्थेची प्रथा आहे. सतीच्या चालीच्या निषेधाकरिता काही धर्मशास्त्रातील वचनेही राजा राममोहन रॉय यांनी मांडली होती. या परंपरेतल्या समाजसुधारकांनी सतीच्या चालीचा आणि बालविवाहाचा निषेध केला. विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, घटस्फोट इ. सुधारणांचा पुरस्कार केला. कायद्याचेही पाठबळ मिळवले. याशिवाय आंतरजातिविवाह, जातिभेदविच्छेद, वेदपठणाचा सर्व माणसांना अधिकार, धर्मांतर केलेल्यांचे हिंदू धर्मात पुन:समावेशन, मूर्तिपूजानिषेध, अस्पृश्यता-निवारण इ. धार्मिक व सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम वरील धर्मसुधारकांनी हाती घेतला.

## धर्मशास्त्र, मीमांसापद्धती व इतिहासपद्धती

एकोणिसाव्या शतकापासून आतापर्यंत झालेल्या धर्मसुधारकांपैकी बऱ्याच विद्वानांनी सामाजिक सुधारणेला अनुकूल असलेले धर्मशास्त्रोक्त आधार दाखविण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आहे; परंतु सुधारणेच्या विरोधीही पुष्कळ आधार धर्मशास्त्रात सापडतात. त्यामुळे धर्मशास्त्रांमध्ये विसंगती दिसते. ही विसंगती टाळण्याकरिता पूर्वमीमांसेतील समन्वय पद्धती अंगीकारली पाहिजे असा सनातनी पंडितांचा दावा आहे. परंतु समन्वय पद्धती स्वीकारूनही विसंगती टळत नाही, हे सिद्ध होते. त्यामुळे ही समन्वयपद्धती उपयोगी पडत नाही हे पाहून आधुनिकांनी ऐतिहासिक पद्धतीचा अंगीकार केला. ऐतिहासिक पद्धतीप्रमाणे त्या त्या देशकालपरिस्थितीस अनुसरून निरनिराळ्या धर्मशास्त्रकारांनी परंपरागत आचारांमध्ये परिवर्तन करून नवे आचार सांगितले, असे सिद्ध होते. धर्मशास्त्रकार परलोकवादी असले, तरी ते काही त्रिकालज्ञ व सर्वज्ञ ऋषी नव्हते. अशा प्रकारचे सर्वज्ञ ऋषी केवळ कल्पनेने निर्माण केलेले असतात; खरे नसतात. या विचाराच्या आधुनिक धर्मसुधारकांना सनातनी पंडितांनी मीमांसापद्धती अनुसरून वेळोवेळी विरोध केला आहे. मीमांसा पद्धतीमध्ये असे गृहीत धरलेले असते, की धर्मशास्त्र वचनांमध्ये जो विरोध दिसतो, तो खरा नसतो. तो वरवर दिसणारा विरोध घालविण्याकरिता विरोधी वचनांचा समन्वय करावा लागतो. परंतु, हे म्हणणे सिद्ध करता येत नाही. कारण मीमांसापद्धती अनुसरणाऱ्या निबंधकारांमध्ये अनेक मुद्यांवर मतभेद झालेला आढळतो. धर्मशास्त्रातील मतभेदांच्या बाबतीत महाभारतकार व्यासदेखील निराश होऊन म्हणतात - ''धर्माचा निर्विवाद निर्णय होऊ शकत नाही; संशय शिल्लक राहतो, कारण वेदवचने परस्परविरोधी दिसतात, मुनींमध्ये मतभेद आढळतो. त्यामुळे कोणता एक मुनी प्रमाण मानावा, हे निश्चित करता येत नाही. म्हणून धर्माचे सत्यस्वरूप कायमचे गुहेत दडलेले आहे. मोठा समाज ज्या मार्गाने जातो तोच खरा मार्ग होय.'' मीमांसाशास्त्रकारांमध्येदेखील मीमांसेचे नियम निश्चित कोणते, याबद्दल मतभेद आढळतो. वेदांचा आणि वैदिक यज्ञ करण्याचा अधिकार शूद्रांना नाही, असे मीमांसासूत्रकार जैमिनी ऋषींचे मत आहे. त्याने उल्लेखिलेला त्याच्या पूर्वीचा मीमांसाकार बादरी या ऋषीच्या मताने सर्व माणसांना वेदपठनाचा आणि यज्ञाचा अधिकार आहे. मीमांसा - भाष्यकार शबर स्वामी यांच्या मते इंद्रादी देवांना शरीरे नाहीत, वेदमंत्र हीच देवांची शरीरे होत. याउलट वार्तिककार कुमारिलभट्ट म्हणतात की, देवांना शरीरे आहेत. शबरस्वामींच्या मते स्मृतिपुराणांच्या मध्ये जी देवादिकांची चरित्रे वर्णिली आहेत, ती खरी नाहीत. त्यांच्यामध्ये जे विश्वाचे स्वर्गपातालांसह वर्णन केलेले आहे, ते खरे मानण्याचे कारण नाही. त्याच्या उलट वर्णन आले आहे ते खरे आहे, असे कुमारिलभट्टांनी अर्थवादाधिकरणामध्ये म्हटले आहे. लहानमोठे अनेक मतभेद मीमांसकांमध्ये असलेले दाखवून देता येतात. उपनिषदे म्हणजे वेदान्त, अर्थात वेदांचा अखेरचा भाग होय. उपनिषदांचा समन्वय पद्धतीने सुसंगत अर्थ

लावणारे शंकराचार्य, रामानुजाचार्य वा मध्वाचार्य यांच्यामध्ये मूलगामी मतभेद आहेत. म्हणून तात्पर्य असे निघते, की मीमांसापद्धतीने धर्मशास्त्रांचा मतभेद मिटवून समन्वय करणे पूर्ण अशक्य ठरते, मतभेद राहतातच. परस्परविरोधी अनेक विधाने धर्मशास्त्रामध्ये खच्चून भरलेली दिसतातच; परंतु सत्य हे परस्परविरोधी असू शकत नाही. माणसांना सत्य अपूर्ण दिसते म्हणून त्यांच्यात मतभेद राहतो. म्हणून धर्मशास्त्र सांगणारी माणसेच होती, असे म्हटल्याशिवाय गत्यंतर राहत नाही. धर्मशास्त्रांतील मतभेदाबाबतीत ऐतिहासिक पद्धती हीच सत्यदर्शी ठरते.

ऐतिहासिक समीक्षा पद्धतीने विचार करीत असताना साधारणपणे असा निष्कर्ष निघतो, की मन्वादी धर्मशास्त्रे इ.स. पू. सहाव्या शतकापासून इ.स. च्या दहाव्या शतकापर्यंत निर्माण झाली आहेत. महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे यांनी 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' या पंचखंडात्मक प्रचंड ग्रंथात आतापर्यंत झालेल्या ऐतिहासिक संशोधनाच्या आधारे वरील निष्कर्ष काढला आहे. या दीर्घ कालखंडात हिंदूंच्या धार्मिक आणि सामाजिक आचार व विचारांमध्ये वारंवार परिवर्तने झाली आहेत. जुने आचारविचार बाद करून नवे आचारविचार स्वीकारले गेले आहेत. जातिसंस्था प्रथम शिथिल होती. कारण भिन्न वर्ण व जाती यांच्यामध्ये विवाह संबंध घडत व मान्य होत. हळूहळू जाती व पोटजाती यांचे भेद वाढत गेले. रोटीबेटी व्यवहारांमध्ये कडक निर्बंध उत्पन्न झाले. ब्राह्मण किंवा त्रैवर्णिक आर्य हे वेदकाली आणि स्मृतींच्या पहिल्या कालखंडात गोमांस आणि इतर प्राण्यांचे मांस खात असत. यज्ञ, श्राद्ध, धार्मिक मेजवान्या यांच्यामध्ये मांसाहार करणे हे पवित्र कर्म समजत. जैन व बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली आल्यावर पशुयज्ञ मागे पडला. गोमांस हे अपवित्र ठरले. पूर्वी विधवाविवाह आणि घटस्फोट ब्राह्मणांना व आर्यांना मान्य होता, हे धर्मशास्त्रांचे अवलोकन करताना लक्षात येते. कालांतराने पुढे तो निषिद्ध ठरला. वैदिक यज्ञसंस्था मागे पडली आणि मूर्तिपूजेचे महत्त्व फार वाढले.

इ.स. च्या दहाव्या शतकानंतर श्रुती आणि स्मृतींमध्ये विहित असलेले बरेच आचार विद्वानांनी वर्ज्य म्हणून ठरविले. यांची यादी कलिवर्ज्य प्रकरणात मिळते. हे प्रकरण कोणत्याही स्मृतीमध्ये किंवा सुप्रसिद्ध अठरा पुराणांमध्येही सापडत नाही. बाराव्या शतकातील धर्मशास्त्राच्या टीकाकारांनी आज उपलब्ध नसलेल्या आदिपुराणाचा संदर्भ दाखवून हे 'कलिवर्ज्य प्रकरण' उद्धृत केले आहे. त्यात धर्मशास्त्रोक्त ५५ चाली वर्ज्य केलेल्या आहेत. त्यापैकी महत्त्वाच्या अशा : (१) ज्येष्ठ पुत्राला म्हणजे सर्वात वडील मुलाला संपत्तीचा संपूर्ण वारसा किंवा मोठा भाग मिळण्याची तरतूद धर्मशास्त्राने केली होती. याला बंदी घातली आणि पुत्रांमध्ये समान वाटणीचा नियम केला. (२) पतीपासून संतती होत नसेल तर पत्नीने दिरापासून संतती प्राप्त करून घ्यावी, असा पूर्वीचा नियम होता. तो नियम अमान्य केला. या नियमास नियोगविधी म्हणतात. हा नियोगविधी वारंवार बदलत गेला, असे दिसते. उदा.

महाभारतात म्हटले आहे की, कुंती आणि माद्री यांना राजा पंडू या पतीपासून संतती प्राप्त झाली नाही. हे पाहून पंडूने त्यांना आज्ञा केली की, तुम्ही ब्राह्मणांपासून संततीची प्राप्ती करून घ्या. त्याच्या आज्ञेप्रमाणे पाच पांडवांची उत्पत्ती झाली. पुराणातील अनेक अपत्यरहित राजांनी आपल्या वंशाचे गुरू असलेल्या वसिष्ठ इ. ब्राह्मणांपासून आपल्या पत्नींच्या ठिकाणी पुत्र निर्माण करवून त्यांना राज्याचे वारस केले. (३) निरनिराळ्या स्मृतींमध्ये बारा प्रकारचे पुत्र सांगितले आहेत. या कलिवर्ज्य प्रकरणात त्यापैकी औरस व दत्तक एवढेच दोन पुत्र मान्य केले आहेत. (४) ब्राह्मण किंवा आर्य विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार या कलिवर्ज्य प्रकरणाने अमान्य केला आहे; परंतु पूर्वीच्या स्मृतींमध्ये हा अधिकार मान्य केलेला दिसतो. नवरा परागंदा झालेला, मृत, संन्यासी वा नपुंसक असेल वा जातिबहिष्कृत झाला असेल तर अशा पाच प्रकारच्या आपत्तींमध्ये पुनर्विवाहाची संमती नारद स्मृतींमध्ये दिली आहे. (५) आंतरजातिविवाह अमान्य केला. उदा. पूर्वी ब्राह्मणाला चार वर्णांपैकी कोणत्याही वर्णातील स्त्रीशी विवाह करण्याचा अधिकार होता. खालच्या वर्णाच्या स्त्रीशी वरच्या वर्णाच्या पुरुषाला विवाह करण्याचा अधिकार होता. यास अनुलोम विवाह म्हणतात. अनुलोम विवाह अमान्य करून सवर्णांचाच विवाह मान्य केला. (६) परदेशगमनाचा निषेध. द्विज किंवा ब्राह्मण, समुद्रयात्रा म्हणजे परदेशगमन करून आल्यास, त्याला प्रायश्चित्त देऊन परत स्वजातीत समाविष्ट करण्याची पद्धती होती, ही पद्धती बंद केली. प्रायश्चित्त घेतलेल्या परदेशगमन करणाऱ्याला बहिष्कृत ठरविले. (७) गोवधबंदी केली. तत्पूर्वी काही यज्ञांमध्ये गाय किंवा बैलाचा बळी दिला जात असे. अग्निष्टोम, गो-सव हे यज्ञ यांची उदाहरणे होत. नवरदेव, राजा, मित्र, विद्वान, ऋत्विज, आचार्य यांच्यापैकी कोणाचाही सत्कार करीत असताना त्याला द्यावयाच्या मेजवानीत, पाहुण्याची इच्छा असल्यास गायीच्या बछड्याचे मांस वाढत असत. आपस्तंब धर्मसूत्रात (२.७.१६). म्हटले आहे की, श्राद्धात ब्राह्मणांना गोमांसाचे भोजन दिल्याने पितर हे एक वर्षभर तृप्त राहतात. (८) शूद्राच्या घरी भोजन करणे ब्राह्मणास वर्ज्य होय. पूर्वीच्या स्मृतीप्रमाणे आपल्या घरचा शूद्र नोकर, आपला पशुपाल, आपला शूद्र कुलमित्र आणि आपला शूद्र शेतकरी याने निमंत्रण दिल्यास त्याच्या घरी भोजन करण्यास अनुमती होती. (९) ब्राह्मण आणि द्विज यांनी शूद्र स्वयंपाकी ठेवणे वर्ज्य होय. याच्या उलट आपस्तंब धर्मसूत्रात म्हटले आहे की, स्नान केलेले, शुद्ध वस्त्र नेसलेले, वेळच्या वेळी हजामत करणारे शूद्र हे स्वयंपाकी म्हणून ठेवावेत. (१०) संन्यासवर्ज्य. (११) अग्निहोमवर्ज्य. (१२) नरबली देणे वर्ज्य. (१३) अश्वमेध वर्ज्य. (१४) राजसूय यज्ञ वर्ज्य. (१५) जन्मभर ब्रह्मचर्य किंवा दीर्घकालीन ब्रह्मचर्य वर्ज्य. (१६) पशुयज्ञ वर्ज्य. (१७) त्रैवर्णिकांना म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांना मद्यपान वर्ज्य.

डॉ. पां. वा. काणे यांनी आपल्या 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' या ग्रंथात (खंड ३ पान ९६७) या कलिवर्ज्य प्रकरणावर सविस्तर चर्चा करून पुढे म्हटले आहे - ''पूर्वेकडील

देशांच्या इतिहासामध्ये महत्त्वाचा बदल झालेला दिसत नाही, (‘पूर्व बदलत नाही’) असे जे इतिहास संशोधक म्हणतात, त्याला कलिवर्ज्य प्रकरणाने परिणामकारक उत्तर देता येते. अत्यंत स्थितिशील समाजाच्या सामाजिक आचारविचारांमध्येही वेळोवेळी महत्त्वाचे बदल होत असतात. कलिवर्ज्य प्रकरण असे दाखविते, की सर्वश्रेष्ठ प्रमाण असलेले वेद आणि धर्मशास्त्रे यांना बाजूला सारून, त्यांची बंधने न जुमानता, हिंदू धर्मात बदल झाले आहेत. ज्यांना समाजपरिवर्तन करावयाचे आहे, सुधारणा करावयाच्या आहेत, विवाह, वारसा आणि अन्य रूढींमध्ये हिंदू समाजास आवश्यक असे बदल करावयाचे आहेत, त्यांना कलिवर्ज्य प्रकरण हे मार्गदर्शक ठरते. कलिवर्ज्य प्रकरणालाही न जुमानता मामे बहिणीशी विवाह, अग्निहोत्र, संन्यास, पशुयज्ञ इ. गोष्टी हिंदू समाजात अजूनही मान्य आहेत.”

डॉ. काण्यांच्या या विधानात पुष्कळ तथ्य आहे; परंतु या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे, की, ‘परिवर्तनरहित पूर्व; म्हणजे पूर्व - देशांच्या इतिहासात बदल झाले नाहीत, असे विधान आधुनिक पंडित करतात. त्याचा अर्थ अगदी वेगळा आहे. तो अर्थ असा की पूर्व-देशांतील समाजसंस्थांमध्ये क्रांत्या घडून मौलिक परिवर्तन झाले नाही. सुलतानशाही, अधिकारशाही व राजसत्ता कायम राहिली. मानवाचे जन्मजात समानत्व मान्य केलेली समाजसंस्था अस्तित्वात आलेली नाही. असा हा विसाव्या शतकापर्यंतच्या पूर्व देशांचा इतिहास आहे. आता या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मौलिक क्रांतीचा आदर्श पूर्वेकडील देशांपैकी काही देशांनी स्वीकारला आहे. चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली आहे आणि भारतामध्येही लोकसत्ताक राज्यपद्धती अस्तित्वात आली आहे.

**(पूर्वप्रसिद्धी : नवभारत, जुलै १९७८, पृ. ७ ते १३)**

○○○

५२

# लोकशाहीसाठी सत्तेवर अंकुश ठेवणारे गट हवेत

*(दैनिक सकाळ, पुणेचे संस्थापक डॉ. ना. भि. परुळेकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन होत असते. सन १९७८ मध्ये दि. २० सप्टेंबर रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'देशापुढील आव्हाने' या विषयावर भाषण झाले. ते दैनिक सकाळ, पुणेच्या कार्यालयात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी मादाम शांताबाई परुळेकर होत्या. स्वागत दैनिक सकाळ, पुणेचे तत्कालीन संपादक श्री. ग. मुणगेकर यांनी केले.)*

'सकाळ'च्या कार्यक्रमासाठी मुद्दाम वाईहून आल्याबद्दल संपादक श्री. मुणगेकर यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे आभार मानले. मादाम शांताबाई परुळेकर यांच्या हस्ते गुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांचे श्री. मुणगेकर यांनी आभार मानल्यानंतर सौ. सुनंदा फडके यांनी पसायदान म्हटले व कार्यक्रम संपला.

श्रोत्यांनी सभागृह भरले होते. काही मंडळी उभी होती. निमंत्रितांमध्ये प्रा. प्र. रा. दामले, महाराष्ट्र शासनाचे माजी सचिव श्री. एस. जी. राजवाडे, ब्रिगेडियर एन. व्ही. बाळ, श्री. निळूभाऊ लिमये, श्री. शिरूभाऊ लिमये, डॉ. बाबा आढाव, श्री. हरिभाऊ जोशी, श्री. यदुनाथ थत्ते, श्री. मुकुंदराव किर्लोस्कर, श्री. स. मा. गर्गे, श्री. चांदमल कटारिया, श्री. पोपटलाल शहा, श्री. हिरालाल किराड, 'सकाळ'च्या संचालक डॉ. बानूबाई कोनाजी, कर्नल वि. वा. जोशी, कु. लीना परुळेकर व इतर प्रतिष्ठित मंडळी होती.

'सत्तेपासून अलिप्त असणारे परंतु सत्तेवर अंकुश ठेवू शकणारे गट लोकशाहीच्या समर्थनासाठी आजच्या परिस्थितीत समाजात आवयक आहेत.' ते म्हणाले की, लोकशाही मूल्यासाठी लोक संघटित होणे आवश्यक आहे. यासाठी समाजात लोकशाही संस्था निर्माण होण्याची गरज आहे. असे झाल्यास लोकशाहीला कितीही मोठा धोका निर्माण झाला तरी त्याचा काही परिणाम होणार नाही.

आपण एक अतिशय आदर्श अशी घटना स्वीकारली; परंतु या घटनेसाठी लोक तयार नव्हते. तीन पिढ्या नेहरू घराण्याचे वर्चस्व आपण मानले. लोकांनी त्यांची पूजाच बांधली. आज एक गोष्ट चांगली झाली आहे की, व्यक्तिपूजा का करू नये याची कारणे मिळू लागली आहेत.

''पोटची मुले भ्रष्टाचारी झाली, सत्ताधाऱ्यांकडून खून पाडले जातात. बँका लुटल्या जातात. लैंगिक अनाचार होतात. जिवंत माणसाची पूजा बांधल्याने, त्याला देव ठरविल्यानेच हे अनाचार निर्माण होतात. निदान जिवंत माणसाला तरी देवपण देऊ नये.''

माणसात सर्व विकार असतात. अवास्तव महत्त्व त्याला देता कामा नये, शेवटी किती महत्त्व द्यावयाचे याची मर्यादा आपणच घालून घेतली पाहिजे.

''रशियामध्ये झारशाहीतून एकदम क्रांती झाली. त्यामुळे लोकशाहीचे मूळ घटक बनू शकणारे सोव्हिएट हुकूमशाहीचे घटक बनले. आपल्याकडे तसे झाले नाही. आपल्याकडे स्वातंत्र्य क्रमाक्रमाने व विनयाने आले. लोकमान्य टिळकांसारख्या लोकप्रिय नेत्याने आपण लोकांचे उद्धारकर्ते आहोत, ही वृत्ती कधी बाळगली नाही.''

शेवटी विचार आपल्या हृदयातून निघतात. कोणी नेता नाही, आपले विचारणेत हाच नेता ही परिस्थिती निर्माण होण्यास आज अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे मी आशावादी आहे.

''राजकीय पक्षात शिथिलता आलेली आहे. त्यांच्यात आपसात हेवेदावे निर्माण झालेले दिसतात; परंतु विविध दृष्टिकोनांचे पाच पक्ष एकत्र आले ही चांगली गोष्ट आहे. याबाबत जनता व काँग्रेस पक्ष बिंब-प्रतिबिंबासारखे आहेत. काँग्रेस पक्षातही गेली जवळजवळ १०० वर्षे भिन्न दृष्टिकोन असणारे गट आहेत.''

''आपल्या राजकीय पक्षांच्या संघटनेत लोकशाही मूल्ये रुजलेली नाहीत. यामुळेच एखादा जबरदस्त नेता वर येतो व पक्षाशी जमले नाही तर पक्ष मोडून टाकतो, असे आपल्याला दिसते. काँग्रेस पक्ष याच पद्धतीने निदान दोनदा तरी मोडला आहे.''

'जे घर सत्तेच्या ठिकाणी चालते त्याचेच प्रत्यंतर तळाच्या ग्रामपंचायतीपर्यंत दिसते. जिल्हा परिषदा, सहकारी संस्था येथेही एकाला धरून दुसरा राहतो. यामुळे लोकशाहीचा नुसता आराखडा अस्तित्वात आहे; परंतु लोकशाही जीवन प्रत्ययास येत नाही असे चित्र दिसते.'

आता नवीन ऋषी-महर्षी निर्माण झाले आहेत. हे शब्दही पारंपरिक संस्कारातून येतात. आपल्या पारंपरिक संस्कृतीचीही मूल्ये आपल्या गळ्याला चाप लावीत आहेत.

लोकशाहीच्या या आराखड्यात जीव ओतण्याचे काम राजकीय पक्ष करणे कठीण आहे. महात्मा गांधी, एम. एन. रॉय व जयप्रकाश यांच्यासारख्या द्रष्ट्यांनी आपल्याला सांगितले आहे की, सत्तेपासून अलिप्त असणारी तरीही सत्तेवर अंकुश ठेवू शकणारी माणसेच हे काम करू शकतील.

दलितांचा हा प्रश्न नामांतराच्या निमित्ताने एकदम उफाळून येतो. याचे कारण ते साठलेले संस्कार आहेत. हे संस्कार नीट पुसले गेले नाहीत तर लोकशाहीचा पाया येथे निर्माण होऊ शकणार नाही.

आपल्या समोरील प्रश्नांना विचारवंतांनी उत्तरे देऊन ठेवलेली आहेत. परंतु ती कार्यक्रमाच्या आधारे जेव्हा जीवनात उतरतील तेव्हाच प्रश्न सुटतील.

पक्ष फुटले व वेगवेगळे राहिले तर बेबंदशाही येईल. हुकूमशाही येण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. लोकशाहीची नैतिक मूल्ये समाजात रुजली नसल्याने हुकूमशाहीचेही स्वागत होण्याची शक्यता आहे.

**(दैनिक सकाळ, पुणे, गुरुवार दि. २१ सप्टेंबर, १९७८)**

ooo

५३

# अध्यक्षीय पद्धत भारताला उपयुक्त आहे का?

## महाराष्ट्र रॅडिकल ह्यूमॅनिस्ट अधिवेशन, सोलापूर

करमाळ्यातील नवमानवतावादी प्रबोधन शिबिराला मिळालेला उत्तम प्रतिसाद पाहून सोलापूरमध्ये अशा तऱ्हेचे चर्चासत्र व प्रबोधन शिबिर आयोजित करण्याच्या दृष्टीने मी, भाई ढोले, श्री. वा. रा. जवाहिरे, श्री. बा. र. सुंठणकर आदी मंडळींनी विचारविनिमय करून हा कार्यक्रम व्यापक प्रमाणात होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र रॅडिकल ह्यूमॅनिस्टचे अधिवेशन सोलापूरला घ्यावे, यादृष्टीने योजना आखून २४/१/१९८१ ही तारीख निश्चितच केली. त्याच सुमाराला भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्या स्मृतीदिनाच्या कार्यक्रमाची सांगड घालून दोन दिवसांचे अधिवेशन सोलापूरला आयोजित केले. सर्व रॉयवादी विचारवंताना निमंत्रित केले.

शनिवार, दि. २४/१/१९८१ रोजी या अधिवेशनाचे उद्घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. सुप्रसिध्द रॉयवादी ॲडव्होकेट श्री. एम. ए. राणे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. सुरुवातीला नाशिकचे श्री. दळवी यांनी राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन सुरुवात केली. प्रामुख्याने या विषयावरील चर्चेमध्ये अधिवेशनासाठी ठिकठिकाणाहून आलेल्या विचारवंतांनी, भारतीय लोकशाही रूढ पार्लमेंटरी पध्दती व अध्यक्षीय शासनपध्दतीवर आपली मते मांडली. या विषयाभोवतीच चर्चा केंद्रित झाली.

अध्यक्षीय पद्धत भारताला उपयुक्त आहे काय?

सायंकाळी साडेचार वाजता टिळक स्मारक मंदिरात वरील विषयावर मोठी उद्बोधक चर्चात्मक परिसंवाद आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रसिध्द विधिज्ञ श्री. विलास शहा होते. प्रमुख वक्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, न्यायमूर्ती व्ही. ए. नाईक हे होते. परिसंवादाचे प्रास्ताविक मी केले. भाई ढोले यांनी अनुमोदन दिले.

त्यावेळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले, 'रॅडिकल डेमॉक्रसी तत्त्वज्ञानाचे प्रणेते भाई एम. एन. रॉय यांची उद्या पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने ही परिषद घेण्यात आली आहे. लोकशाही जगात विलक्षण वाढली आहे. तिने निरनिराळे आकार घेतले. लोकशाहीने

निर्माण केलेल्या अधिकारामुळे लोकशाहीचाही धोका संभवतो. संसदीय अध्यक्षीय लोकशाही या दोन्ही पध्दतीला हा धोका संभवतो. दुसऱ्या महायुध्दापूर्वी काही शक्ती लोकशाही संपविणाऱ्या निर्माण झाल्या, म्हणून खंबीर मूलगामी लोकशाही निर्माण व्हावी. लोकप्रतिनिधी लोकांच्या ताब्यात राहून सत्ता राबविणारे संघटन निर्माण व्हायले हवे. सध्या मत टाकणे वा घरी जाणे, एवढाच लोकांचा संबंध. पाच वर्षे पुन्हा लोकांचा संबंध राहात नाही. ती लोकशाहीचा अधिष्ठाता असूनही प्रत्यक्षात हा अनुभव येतो. तो तसा बनला पाहिजे व तशी स्थिती निर्माण करण्याची गरज आहे. आज अशी परिस्थिती निर्माण होईल की नाही? अशी स्थिती आहे.'

'फ्रेंच राज्यक्रांती प्रथम झाली. परंतु, ती अयशस्वी होण्याचे कारण, दारिद्र्य नष्ट होण्यासाठी लोकांचा उठाव होता. नंतर तेथे हुकूमशाही प्रस्थापित झाली. म्हणून क्रांती ही नेहमी आपली पिले खात असते. सर्व जागतिक लोकशाहीपुढे प्रश्न उभा आहे. लोकशाही राबविण्यासाठी संघटित शक्ती हवी. अशी लोकशाहीवादी माणसे अनुभवातून निर्माण व्हायला हवीत. गरिबी हटाव असा संदेश सत्ताधाऱ्यांनी देऊन गरिबी हटणे शक्य नाही. त्यासाठी गरिबीला स्वतःची प्रेरणा हवी. गौतमबुध्द, महावीरांनी 'स्वतःच स्वतःचा उध्दार करा!' अशा उपदेशावर भर दिला. दारिद्र्यसागरात माणूस जगाच्या उत्पत्तीपासून गटांगळ्या खातो आहे. प्रत्येक काळात २५ ते ३० टक्के लोक वर येतात, इतर बुडतात. दुसरा दुसऱ्याचा उद्धार करणे अशक्य. भारतासारख्या लोकांमध्ये ही प्रेरणा संघटना अवश्यक ठरते. आता हा माणसा-माणसांमधला संबंध प्रश्न आहे. मार्क्सवादी कामगार संघटनेत दलित व उच्चवर्णीय कामगारांत एकवाक्यता कधीच निर्माण होऊ शकली नाही. हे प्रश्न खोलात जाऊन चर्चिले गेले पाहिजे. समजावून घेतले पाहिजेत. मुसलमान, ख्रिश्चन, हिंदू हितसंबंधांची समानतेची जाणीव होऊ शकलेली नाही. खेड्यातील मतदान जातीवार होते. त्यामुळे निवडणुकीने समानतेऐवजी जातीवार विषमता घट्ट बनविली. जगात अनेक राष्ट्रे एकधर्मीय आहेत. भारतात भिन्नधर्मीय प्रचंड संख्येने आहेत. भारतात हा प्रश्न सुटला तर जगातील सर्व राष्ट्रांतील हे प्रश्न सुटण्याची प्रक्रिया सुरू होईल. भारतात चौदा भाषा लिखित आहेत. त्यातून विपुल साहित्यनिर्मिती झाली आहे. एकराष्ट्रीयत्व टिकवायचे असेल, तर सत्तेचे विकेंद्रीकरण व प्रांतिक स्वायत्तता वाढली पाहिजे. ग्रामीण स्तरावरील गरीब व बलिस्ट गुंड यांचा प्रश्न उग्र, भयंकर बनला आहे. असे असले तरी भविष्यकाळ मनुष्य पाहू शकतो. उच्चतर शक्तीकडे नेण्याचा मार्ग त्याला सापडतो.'

'आम्ही रॅडिकल्स वयोवृद्ध झालोत. यासाठी तरुण हवेत. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व भवितव्यावर नितांत श्रद्धा असली पाहिजे. राजकीय पक्ष सत्ता स्पर्धेत जयापजयात गुंतले आहेत. लोकशाही पिरॅमिडसारखी पायापासून बांधलेली असावी. लोकशाही चिरंतन होईल, अशी कॉ. रॉय यांची श्रद्धा होती. सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात जाऊन

सत्ता निरपेक्षवृत्तीने उभी राहणारी कार्यकर्ते मंडळी निर्माण होण्याची गरज आहे. प्रत्यक्ष ज्ञानापेक्षा कुठलेही श्रेष्ठ ज्ञान नाही!'

**'(अनंत अमुचि ध्येयासक्ति,' अनंत केरोजी भोसले, प्रकाशक - सौ. शोभा जाधव, वरळी सागर हौसिंग सोसायटी, 'वैतरणा', १२०२, पोछखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८. पृ. १२५ ते १२९ (दि. २४/१/१९८१)**

○○○

५४

# विज्ञाननिष्ठ मानवतावाद हाच सत्याप्रत जाण्याचा मार्ग

## भाई मानवेंद्रनाथ रॉय स्मृतिदिन व्याख्यान

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी दि. २५/१/१९८१ रोजी एम. एन. रॉय यांचा स्मृतिदिन सोलापूरच्या टिळक स्मारक मंदिरात सायंकाळी सहा वाजता साजरा झाला. त्यानिमित्त झालेल्या सभेचे वक्ते होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. अध्यक्षस्थानी होते डॉ. निर्मलकुमार फडकुले. तीर्कतीर्थांच्या भाषणाचा विषय होता 'नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान!' प्रास्ताविक भाषणात भाई एम. एस. ढोले यांनी रॉय यांच्या जीवनाचा धावता आढावा घेऊन राजकीय कार्याचे समालोचन केले. 'राजकारण हे शास्त्र आहे. त्याचा अभ्यास केला पाहिजे,' हे सांगणारे पहिले राजकरणी भाई एम. एन. रॉय होत. रॉय यांचा शेवटचा सिध्दांत, 'लोकशाही यशस्वी होण्यासाठी पक्षपध्दती विसर्जित केली पाहिजे.' मान. नंतर सभेचे अध्यक्ष श्री. फडकुले अध्यक्षस्थान स्वीकारताना म्हणाले, 'कॉ. मानवेंद्रनाथ रॉयसारख्या महनीय की प्रवक्त्याच्या विचाराचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास न करताच मी अध्यक्ष झालो आहे. शास्त्रीजींच्या या विषयावरील अधिकार त्यांचे भाषण विचारप्रवर्तकच नव्हे, तर विचारप्रक्षोभक, विविध विषयांना स्पर्श करणारे आहे.'

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या भाषणात म्हणाले, 'आज रॉय यांचा स्मृतिदिन. रॉय हे कारागृहातून सन १९३६ मध्ये बाहेर आले. तेव्हा त्यांच्याशी चर्चा करण्याचा प्रत्यक्ष योग आला. त्यावेळी माझा वेष उपरणे, धोतर, डोक्याचा गरगरीत गोटा केलेला असा होता. मी सनातनी ब्राह्मण व रॉय जागतिक क्रांतिकारक. त्यांच्या कार्यात मी सामील झालो. सनातनी परंपरेत मी वाढलो तरीही वैदिक धर्माचा टीकाकार झालो. वैदिक संस्कृतीचा समीक्षक या नात्याने कोणताही धर्मग्रंथ असो तो माणसांनी केला आहे देवांनी नव्हे, असेच मी मानले. 'मार्क्सवादी झाल्यानंतर हा ग्रंथ श्रद्धेने नव्हे, तर विचारांच्या कसोटीवर त्याचे मूल्यमापन करतो.' असे म्हटल्यावर कॉ. रॉयनीही आपण असेच मार्क्सवादी कम्युनिस्ट आहोत असे म्हटले. कम्युनिस्टांची ही मार्क्सवादी व लेनिनवादी श्रध्दा आजच्या काळात

कालबाह्य ठरली असून, पोथीनिष्ठ पध्दतीने विचार मांडणे हे चुकीचे आहे. गेल्या शंभर वर्षांतील ज्ञानाचा विस्तार पाहता "Marx himself is not marxist" हे प्रत्ययाला आले असते. विचारांतील सतत होणारा बदल, विवेकवादी बुध्दीवादी दृष्टिकोन यांचा स्वीकार आवश्यक ठरतो. रॉय कम्युनिस्ट होते. स्टालीन, हिटलर अशी फॅसिस्ट कम्युनिस्ट प्रासंगिक युती, अशी एक अपेक्षा होती की, सर्व जगभर कम्युनिझमचा प्रसार व क्रांती झाली की युध्द संपेल. तेच वर्गयुध्द शेवटचे ठरेल. मानवाची युध्दपरंपरा संपेल. अशी मार्क्स व लेनिनला खात्री होती. दुसऱ्या युध्दाच्या शेवटी जपानवर अणुबॉम्ब टाकण्यात आला. अणुबॉम्बमुळे आता महान शक्ती हाती आली आहे. त्यायोगे पुन्हा युध्दाची तयारी कशी? जेथे कम्युनिस्ट क्रांती झाली. तेथेही आपसात तेढ निर्माण होते आहे. क्रांतीतून विश्व सामंजस्य दिसण्याची आशा न दिसता तेथे एकमेकांविरुध्द शत्रुत्वाच्या पवित्र्यात दिसतात. त्यामुळे मानवजातीचा उत्क्रांतीचा, विकासाचा मार्गच खुंटला आहे. आजही ही स्थिती कायम आहे. परंतु, त्यामुळे आजपर्यंत अनेक राष्ट्रे व मानव वंश नष्ट झाले आहेत. आता तर युध्द झाले तर मानवच नष्ट होऊन जाईल, अशी शंका वाटते. विध्वंसक शक्तीने जेता-नि-जित या दोघांचाही नाश घडवून आणला. आज अणुशास्त्रनिर्मिती स्पर्धेत इंग्लंड १ वेळ, रशिया ३ वेळा आणि अमेरिका ५ वेळा जग जाळण्याची शक्ती बाळगून आहेत. परंतु, एकदा जग जाळल्यावर दुसऱ्याला ते जाळण्याची संधी कशी मिळेल? जाळायला काही शिल्लक राहिले तरच ना! युध्दप्रेरणा ही मानवी हृदयातच आहे. हे बदलायचे असेल तर मानवतावादी दृष्टिकोनाचा स्वीकार आवश्यक ठरतो. धार्मिक भूमिकेवरून अनेक मानवतावाद आहेत. रॉयचा नवमानवतावाद विज्ञानवादी विज्ञानाच्या सहाय्याने मानवी जीवनाचा अर्थ सांगणारा न्यूटनचा शोध नि ज्योतिष, गणित, ग्रहणे, आदी सांगता येऊ लागली. न्यूटनच्या सिध्दांताने बुध्दीप्रामाण्य प्रौढ झाले. आकाशयान, गतिशास्त्रामध्ये संशोधन झाले. आईनस्टाईनने अणूच्या गर्भातील वेध होणारे संशोधन केले. विसाव्या शतकात विज्ञानाला गृहितकृत्याचे स्थान लाभले. डार्विनपासून वनस्पती व जीवशास्त्राला शुध्द अधिष्ठान प्राप्त झाले. जीवनिर्मिती ही रासायनिक प्रक्रिया आहे. हा सिध्दांत मानवतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. हा मानवतावादाचा प्रारंभ समजला पाहिजे. मनुष्यजातीत पेशी नाहीत. वर्णसंकराने मानवाला काही अपाय होत नाही. म्हणून सर्व मानव एक होत. भारतात जेवढे मानववंश तेवढे सर्व मिश्र आहेत. सर्व मानववंश भेसळीनंतर जाती जन्माला आल्या. फिजिकली पाहिले तर शरीरावरून जात ओळखता येत नाही. मानवाच्या खालच्या जातीचे प्राणी पाहिले तर त्यांच्यात प्रकार फार! मानवात फक्त जगण्याकरिता प्रेरणा हवी त्यासाठी सर्व मानवजात एकत्र येणे महत्त्वाचे आहे. त्यांच्यातील भेद संपले पाहिजे. गेल्या २०० वर्षांत माणूस शिक्षण व संस्काराने बदलला. विविध जाती, संस्कृती एकत्र आल्यानंतर त्यांचा विचारविनिमय देवाणघेवाणीतून मनुष्यजातीचे मनोमंडळ तयार करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आज जगातील- राष्ट्रांतील ताणलेले संबंध

निवळले पाहिजेत. भारतीय संत साक्षात्कारींनी अहिंसा, सर्व भूतांवरील प्रेम, शत्रूवरही प्रेम करा, अहंकाराला जिंका, उच्च दर्जाचे महान नैतिक सिध्दांत मानवतावादी भूमिकेवरून मांडले आहेत. धार्मिकदृष्ट्या ख्रिश्चन, हिंदू, मुसलमान आदी धर्म आपले ते देव प्रेरित बाकी पाखंड. नवमानवतावाद म्हणतो सर्व धर्म ग्रंथ मानवनिर्मित आहेत. त्याचा मानदंड माणूस आहे. तो नीतिमान, विवेकावादी, निसर्ग नियमबध्द त्यातूनच मानवी नैतिक दृष्टी, शुध्द नैतिकता कळते. सत्यशोधनाची प्रेरणा मानवात उपजतच आहे. जगण्याची जास्तीत जास्त क्षमता तो बाळगतो. सुख उपयुक्त माणसाला लागणारे अन्नघटक आजतागायत बदलत नाहीत. इतिहासात सर्व काही बदलते, हे म्हणणे खोटे. एक महत्त्वाचा सिध्दांत समान साधन आहे. व्यक्ती ही प्रधान आहे, हे रॉयने मांडले आहे. विकासाची प्रेरणा म्हणजे मानवाचा मेंदू आहे. मानव जीवन व समान संबंध अविभाज्य आहेत. कार्य नि कारण संबंध अतूट आहेत. माणसाकरिता समाज हे सूत्र मानवतावादी सूत्र आहे. त्यासाठी मानवी मनोमंडळ सुसंगत होण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. राष्ट्रवाद हा पुराणा जीर्णशीर्ण झालेला आहे. आज राष्ट्रवाद ताजातवाना होत आहे. म्हणून मानवजात धोक्यात आली आहे. मानवतावाद व त्याचे भवितव्य संबंध बुध्दिगम्य विज्ञाननिष्ठ वैज्ञानिक पध्दती, गॅलिलिओनंतर विज्ञान वाढले. पध्दती सापडली. व्यापक सिध्दांत सापडला. विज्ञानाचे तर्कशास्त्र प्रयोगाच्या आधाराने काही अपवाद सापडले तर त्यातून नवीन सिध्दांत प्रस्थापित झाले. ईश्वरवादी विश्वाचा पसारा ईश्वराने निर्माण केला, असा अहंकार बाळगतो. विज्ञान हे नम्र आहे. वैज्ञानिक अहंकारी असतो. विज्ञानपद्धती नम्रतेचा गाभा आहे. आम्ही सत्याकडे त्याच पद्धतीने जातो आहोत. कॉ. रॉयनी नवमानवतावादाच्या रूपाने याच तत्त्वांचे प्रकटीकरण केले आहे.'

डॉ. निर्मलकुमार फडकुले अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, ''तर्कतीर्थांनी विज्ञाननिष्ठ मानवतावादाचे अध्ययन करून आचार व्हावा यासाठी आपल्या प्रदीर्घ चिंतनशील भाषणात दोन सिद्धांत मांडले'', संघर्ष ही मानवाची प्रेरणा नव्हे, परस्पर सहाय्य प्रेम यातूनच मानवतेचा विकास होईल. संतांनीही अंतःप्रेरणेने हे सत्य सांगितले आहे. जगातील सर्व नद्यांचे पाणी मिसिसिपीसहीत सागरालाच मिळते. ज्ञानदेवांनी विश्वधर्माची संकल्पना मांडली. मानवी संस्कृती यातूनच विकसित होईल. व्यक्ती हे स्वयंभू मूल्य आहे. माणसाभोवती सर्व समाज व संस्था प्रदक्षिणा घालतात. माणूस हे साध्य व बाकी सर्व साधने. विज्ञाननिष्ठ मानवतावादाचा आचार हाच मानवतेच्या अंतिम कल्याणाचा अंतिम सत्याप्रत जाण्याचा मार्ग आहे.

**('अनंत अमुचि ध्येयासक्ती,' केरोजी भोसले, प्रकाशक - सौ. शोभा जाधव, वरळी सागर हौसिंग सोसायटी, 'वैतरणा', १२०२, पोछखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०१८. पृ. १३३ ते १३६ (दि. २५/१/१९८१)**

OOO

५५

# ज्ञान व वस्तुस्थिती समन्वयक आचरणाची सवय हवी

**(विचार प्रबोधन शिबिर, ग्रामीण विकास संशोधन केंद्र, करमाळा)**

सोलापूरच्या रॅडिकल ह्यूमॅनिस्ट असोसिएशनच्या अधिवेशनाला उपस्थित राहून रॉयवादी विचाराकडे आकर्षित झालेले श्री. आनंद कोठडिया यांनी करमाळा येथे पुढाकार घेऊन डॉ. पानाचंद गांधी, बबनकुमार मेहता, चुनीलाल जाधव, चंद्रसेन ननवरे आदींच्या मदतीने ग्रामीण विकास संशोधन केंद्र साथी नानासाहेब गोरे व डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या हस्ते सुरू केले. श्री. कोठडिया यांचा समाजसेवेचा उत्साह व क्षमता पाहून त्यांना डेहराडून येथे भरलेल्या रॅडिकल्सच्या शिबिरासाठी पाठविले, यामुळे प्रेरणा घेऊन श्री. कोठाडिया यांनी, डॉ. इंदुमती पारीख यांनी स्थापन केलेल्या प्रा. गोवर्धनदास पारीख मेमोरियल सेंटर फॉर स्टडी ऑफ सोशल चेंज या संस्थेच्या मदतीने करमाळा येथे जयप्रकाश नारायण सांस्कृतिक सभागृहामध्ये विद्यार्थी तरुणांचे विचारप्रबोधन शिबिर आयोजित करून त्यासाठी प्रमुख रॉयवादी नेत्यांना पाचारण केले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, न्यायमूर्ती वि. म. तारकुंडे, प्रा. मोकाशी, 'सकाळ'चे संपादक स. के. कुलकर्णी, डॉ. इंदुमती पारीख, भाई एम. एस. ढोले, श्री. रानपारखी, ॲड. काणे, भाई अ. के. भोसले, मॅगॅसेसे पारितोषिक विजेते डॉ. रजनिकांत आरोळे, आदी मान्यवरांनी या शिबिरामध्ये मार्गदर्शन केले. दि. ४ व ५ ऑक्टोबर, १९८१ या दोन दिवशी चाललेल्या शिबिराच्या पहिल्या दिवशीचे प्रास्ताविक ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने बबनकुमार मेहता यांनी करून संस्थेचा अहवाल सादर केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दीपप्रज्ज्वलन करून शिबिराचा शुभारंभ केला.

उद्घाटनाच्या भाषणात ते म्हणाले, 'प्रा. गोवर्धनदास पारीख स्मारक प्रबोधन संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यालयांतून अशी शिबिरे आयोजित करण्याचा प्रयत्न एवढ्याचसाठी करण्यात येतो की, सामान्य लोकांना विचार करण्याची संधी व सवय लागावी. आजच्या सामाजिक जीवनात नेते, धर्म व पुरोहितांनी सांगावे आणि त्याप्रमाणे आचरण

घडावे. त्यानुसार होणाऱ्या चुकांची जबाबदारी आपलीच ठरते. याबाबत जाणीवपूर्वक काम करणाऱ्यांचा आंतरिक आदेश व बाह्य आदेश तपासण्याची विचारशक्ती माणसाला जन्मत:च लाभलेली आहे. आजपर्यंतची आपली परंपरा सांगितले ते ऐकण्याचीच आहे. आपण विचार करून त्याच्या बाजू, कक्षा शोधण्याचा व त्यातील सत्य सापडले नाही, तर चुकीच्या मार्गाने केलेली कृती खड्ड्यात नेणारी ठरते. उपलब्ध ज्ञान व वस्तुस्थिती यांचा समन्वय साधून निष्कर्ष व त्यानुसार आचरण करण्याची सवय निर्माण झाली पाहिजे. इतिहासात मनुष्याला पहिले ज्ञान ज्योतिषशास्त्राचे झाले, फलज्योतिष नव्हे. आकाशातील चंद्र, तारे, सूर्य त्यांच्या दिशा व अंतराचे मोजमाप करण्यासाठी, काम करण्यासाठी निसर्गाने दिलेल्या हातांची दहा बोटे यांचा वापर प्रथम माणसाने केला. त्यातून दशांश पद्धती जन्माला आली.

जगनिर्मितीकामी माणसाने केलेल्या निर्मितीचे मोजमाप नसेल तर तेथे ज्ञान असणार नाही. आजचे ज्ञान, विज्ञान ज्यायोगे माणूस मोटार, विमान, अवकाशयाने चालवितो याचे ज्ञान माणसाला अंतर्गत होण्यासाठी काल, स्थल, मोजमाप या तीन गोष्टी माणसाला अवगत होण्याची गरज निर्माण करण्याची गरज आज भासते आहे. त्यादृष्टीने या शिबिराचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरते...'

**('अनंत अमुचि ध्येयासक्ती,' अनंत केरोजी भोसले, प्रकाशक - सौ. शोभा जाधव, वरळी, सागर हौसिंग सोसायटी, 'वैतरणा', १२०२, पोछखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०१८. पृ. ११६, ११७ (दि. ४/१०/१९८१)**

○○○

५६

# जीवविज्ञानात दिसणारा मानव

अध्यक्ष महाराज, प्रशासक आणि येथे उपस्थित असलेल्या बंधु-भगिनींनो,

आताच अध्यक्ष महाराजांनी सांगितल्याप्रमाणे आणि प्रशासकांनी सांगितल्याप्रमाणे माझा हा विषय जिव्हाळ्याचा आहे; परंतु अतिशय कठीण विषय आहे. कारण हा विषय माणसासंबंधी आहे आणि माणूस हा काय प्राणी आहे याचं ज्ञान माणसाला अजून पुरतं व्हायचं आहे. तर माणसाला स्वतःला माणूस दिसतच नाही. तो आरशात पाहावा लागतो. तो पाण्यात स्वतःला पाहू शकतो आणि पुष्कळ वेळा आपण आपल्याला पाण्यातच पाहतो. 'माणूस हा काय आहे हे पहिल्यांदा जाण', 'तू स्वतःला जाणून घे', (Know thyself.), असा आदेश जग जाणून लिहिण्याचा प्रयत्न करीत असतानाच थकलेल्या तत्त्ववेत्त्याने दिलेला आहे. सॉक्रेटीसने दिलेला आहे, ख्रिस्ताने दिलेला आहे, त्यांच्याही अगोदर उपनिषदाने दिलेला आहे. उपनिषदाने प्रश्न विचारलेला आहे : 'आत्मा म्हणजे मी, म्हणून ज्याची आम्ही उपासना सतत करतो, कधीच चुकत नाही, तो काय आहे ते माहिती आहे का ?' (कोऽयमात्मा इति वयं उपास्महे कतरः स आत्मा) असा प्रश्न विचारून आत्मचिंतनाला उपनिषदामध्ये सुरुवात झालेली आहे. आधुनिक तत्त्वज्ञानाचा पाया ज्याने घातला असं म्हटलं जातं, आधुनिक विज्ञानाला आवश्यक असं तर्कशास्त्र पहिल्यांदा ज्यान मांडण्याचा प्रयत्न केला, तो फ्रेंच तत्त्ववेत्ता देकार्त. यानेच कोणत्याही ज्ञानाचा, विचाराचा, तत्त्वज्ञानाचा आरंभ होत असताना तो कुठून करावा, असा प्रश्न उपस्थित केला आणि त्याचे उत्तर त्यानेच सामान्य रूपाने असे दिलेले आहे की, ज्या बाबतीत मुळीच शंका राहात नाही, अशा विचारापासून ज्ञानाला सुरुवात करावी. ज्या गोष्टीबद्दल शंका असते, ती गृहीत धरून कधीही विचार करू नये. कारण जे निःशंक आहे, ज्याबद्दल वाद होऊ शकत नाही, अर्थात असे तत्त्व, अशी वस्तू, असा पदार्थ कोणता ? तो म्हणतो- I think, therefore I am ! मी आहे हे निश्चित आहे. कारण विचार करायला लागलेला मी नसेन, तर विचार कसा करणार?

शंका उत्पन्न करणारा मी नसेन, तर शंका तरी कशी उत्पन्न होणार ? कोणत्याही प्रश्नाबद्दल अमुक एक विधान केल्यानंतर हे विधान बरोबर की चूक असा प्रश्न जो विचारतो, तो प्रश्न विचारणारा आहेच. असल्याशिवाय तो प्रश्न कसा विचारेल ? म्हणून 'मी'चं अस्तित्व निःशंक आहे. शंकराचार्यांनी आपल्या शारीरभाष्यात म्हटलं आहे की, प्रत्येकजण 'मी आहे' अशा तऱ्हेचा प्रत्यय घेत असतो. 'मी आहे की नाही ?' असा तो प्रश्न विचारू शकत नाही. अशा रीतीने आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल माणसाला शंकाच उत्पन्न होण्याचं कारण नाही, असं अनेक तत्त्ववेत्ते म्हणत आहेत; परंतु एवढ्याने प्रश्न सुटत नाही. माणूस हा काय आहे, याचं उत्तर मोठं कठीण आहे. आज तर फारच कठीण होत चाललेलं आहे. आज जी सगळ्या पृथ्वीवरती मानवजात आहे, ती जीव विज्ञानामध्ये एक जात आहे, असं मान्य करण्यात आलेलं आहे. त्याला म्हणतात होमो सेपिअन. त्याच्या पूर्वी दोन प्रकारचे मानववंश होऊन गेले, पण ते पृथ्वीच्या पाठीवरून उठून गेले आहेत. होमो सेपिअन या लॅटिन शब्दाचा अर्थ प्रगल्भ मनुष्य किंवा शब्दशः अर्थ म्हणजे - शहाणा माणूस! - Man the wise पण माणूस खरोखरीच शहाणा आहे की नाही, हे अजून ठरायचं आहे. कारण आज जी विज्ञानाची प्रगती झालेली आहे, त्याच्यामध्ये माणसांनी अशी काही शास्त्रे निर्माण केलेली आहेत, अस्त्रे निर्माण केलेली आहेत की ज्यांच्यामुळे मनुष्यजात धोक्यात आली आहे. जगातल्या ज्या सगळ्यांत वरिष्ठ सत्ता- सुपरपॉवर्स आहेत त्यांची वरिष्ठता सिद्ध झाली आहे, मान्य आहे; याचे कारण, विध्वंसक अस्त्रांमध्ये त्यांच्या तोडीची सत्ता जगात कोणतीही नाही. आता विध्वंसक शस्त्रास्त्रे ज्यांच्यापाशी जास्तीत जास्त आहेत, त्यांना तुम्ही वरिष्ठ सत्ता म्हणता. त्या वरिष्ठ सत्ता आणि त्यांना वरिष्ठ म्हणणारी माणसं यांच्या शहाणपणाबद्दल शंका उत्पन्न होते. या पृथ्वीवर हा मनुष्यप्राणी राहील की नाही, अशी शंका ज्यांच्यामुळे उत्पन्न होते, त्यांनाच वरिष्ठ सत्ता असं आपण म्हणतो. Man the wise हे या अर्थी म्हटलेले आहे, की तो खरोखर शहाणा आहे. पण तो खरोखर शहाणा आहे काय ? म्हणून माणूस हा काय प्राणी आहे. हा प्रश्न आज सगळ्यांत निकडीचा आणि जिव्हाळ्याचा आहे, कारण माणसाला माणूस काय हे अजून समजलं आहे का ? आधुनिक जीवशास्त्रांनी, जीवविज्ञानांनी माणूस हा या विश्वाच्या विकासाचा कळस आहे, विकासातील उच्चतम श्रेणी म्हणजे माणूस आहे, असं ठरविलेलं आहे. याच्या पलीकडची विकसित श्रेणी काव्यात सांगितलेली आहे, धर्मग्रंथांत सांगितलेली आहे; परंतु ती विज्ञानाला दिसत नाही. माहीत नाही. ती कल्पना आम्ही जादा निर्माण केलेली आहे, स्वैर कल्पनेने निर्माण केलेली आहे. उदा., तैत्तिरिय उपनिषद, बृहदारण्यक उपनिषद. ह्या उपनिषदांत, माणसाच्या आनंदापासून. सुरुवात केली आणि सर्वश्रेष्ठ आनंद कोणता आहे याच्या श्रेणी दाखविण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्यामध्ये मनुष्य, गंधर्व, देव, इंद्र, प्रजापती, बृहस्पती अशा माणसांच्या पलीकडच्या श्रेणी सांगितल्या आहेत. ते गंधर्व आणि त्या अप्सरा आपल्याला काही दिसत नाहीत. त्या आपण काव्यांत आणि पुराणांत

वाचतो, सगळया धर्मग्रंथांत वाचतो. नुसत्या हिंदूंच्याच नव्हे, जैनांच्या व बौद्धांच्याच नव्हेत; तर ख्रिश्चनांच्या मुसलमानांच्या यहुद्यांच्या आणि जगातील इतर धर्मग्रंथांमध्येही त्यांची वर्णने आपणाला सापडतील. निरनिराळया संतांनी त्यांचा उल्लेख केलेला आहे. पण ते सगळेच मनुष्यापेक्षा उच्च असलेले जीव हे कल्पित आहेत. माणूस हाच एक सर्वश्रेष्ठ उच्चतम श्रेणीतला जीव आहे ही गोष्ट वैज्ञानिकदृष्ट्या मानता येते. विज्ञानाला कल्पना चालत नाही. मराठीत जी एक म्हण आहे 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर'- अशा तऱ्हेने प्रत्यक्ष अनुभवाच्या क्षेत्रात तुम्ही ज्या ज्या अस्तित्वाबद्दल विधाने करता, त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध दाखविला पाहिजे आणि या दृष्टीने ही जी कल्पित सृष्टी आहे,- धर्मग्रंथांची, पुराणांची आणि काव्यांची ही काही विज्ञानाला प्रमाणभूत म्हणून स्वीकारता येत नाही; म्हणून मनुष्यप्राणी हा जीवविज्ञानामध्ये विकासाचा सर्वश्रेष्ठ बिंदू ठरवलेला आहे; कळस आहे. आणि हा विकास जो प्राण्यांचा, प्राणिवर्गाचा झाला, त्या प्राणिवर्गामध्ये स्थावर आणि जंगम या दोन्ही तऱ्हेचे प्राणी अंतर्भूत आहेत. स्थावर म्हणजे वनस्पती. त्यांना सुद्धा प्राण आहेच, म्हणून तो जीव ! आणि जंगम म्हणजे गतिशील, स्वतःहून हालचाल करणारे, फिरणारे, गतिशील, स्वयंगतिशील ! पण स्थावरांमध्येसुद्धा एक प्रकारची गती आहे. त्यांची जी मुळं आहेत, ती हळूहळू पसरत असतात. पाण्याच्या शोधाकरिता ती जमिनीमध्ये हिंडत असतात. ती जी सृष्टी आहे, वनस्पती सृष्टी आणि तिच्यावरची चल सृष्टी- चल प्राण्यांची सृष्टी- ज्यांच्यामध्ये गेल्या दोनशे वर्षांत जीवविज्ञानाने प्रतवारी लावलेली आहे. ती प्रतवारी जी आहे ती, जीवनक्षमता आणि त्या जीवित क्षमतेकरिता असलेली इंद्रियसंपत्ती यांच्या आधारावर लावलेली आहे आणि म्हणून एकपेशीय जीव, बहुपेशीय जीव, एकेंद्रिय जीव- बहुइंद्रिय असलेले जीव, अशा रीतीने श्रेणी लावलेल्या आहेत आणि या श्रेणींमध्ये एकपेशीय जीव अमीबासारखे आहेत. बॅक्टिरियासारख्या, व्हायरसेससारख्या आहेत; तेसुद्धा जीवच आहेत. व्हायरसेस हे जीव आहेत की नाहीत याबद्दल शंका उत्पन्न करतात; पण जीव म्हणून मानावेच लागते. तर विषाणू, जीवाणू ज्याला म्हणतात त्याच्यापासून वा अमीबापासून तो माणसापर्यंत अशी ही श्रेणी चढत गेलेली आहे. आणि या श्रेणीमध्ये मुख्यतः विकास जो होतो आहे तो विकास मोजायचं महत्त्वाचं असं तंत्र किंवा कसोटी म्हणजे जीवन संग्रामात विजय मिळवून देणारी शक्ती आणि साधनं; अशी शक्ती व साधनं ज्यांच्यापाशी अधिक आहेत, ते अधिक उच्च दर्जाचे; कमी शक्ती व साधनं ज्यांच्यापाशी आहेत, ते खालच्या दर्जाचे. अशा रीतीने श्रेणी लावलेल्या आहेत. जीवविज्ञानामध्ये क्रांती फार उशिरा झाली. पहिलं, सगळयांत प्रसिद्ध - विज्ञान, फार जुनं म्हणजे ज्योतिर्विज्ञान ज्योतिर्विज्ञान हे भौतिक विज्ञान आहे. ज्योतिर्विज्ञान हे जगातलं पहिलं विज्ञान आहे. भौतिक निर्जीव पदार्थाचे विज्ञान म्हणजे भौतिकी. हे पहिल्यांदा जगामध्ये प्रगल्भदशेत आलं आणि त्याची प्रगल्भदशा कशाने मोजली जाते ? ज्या विज्ञानातील नियमांच्या आधाराने विश्वातल्या घटनांचे भविष्य

अचूक वर्तवता येते ते विज्ञान प्रगल्भ होय. प्रथम असं विज्ञान जे झालं ते ज्योतिर्विज्ञान होय. ऋग्वेदकालामध्येसुद्धा चंद्र-सूर्य ग्रहणे केव्हा लागतात याचे अचूक भविष्य सांगत होते. ऋग्वेदात म्हटले आहे- 'अत्र यस्तमन्वविन्दन्।' ... अत्रिवंशातल्या लोकांना झाकलेला सूर्य बाहेर येईल हे लक्षात आले; त्यांना तो सापडला. 'अंधारात सापडलेला आहे' असं म्हटलेलं आहे. तरीही ग्रहणे वर्तवण्याची म्हणजे भविष्यकालीन ग्रहणं वर्तवणारी ही गोष्ट माणसाला तीन-चार हजार वर्षांपूर्वी कळली होती. म्हणजे नियम कळले असताना त्यांच्यावरून पुढे काय असते, शेकडो वर्षे, हजारो वर्षे, अनंत काळपर्यंत पुढे काय घडणार, हे त्या नियमांनी ठरविलं पाहिजे. हे नियम मनुष्याला पहिल्यांदा चांगले उत्तम व्यापक प्रमाणात सगळ्या निर्जीव भौतिक सृष्टीला व्यापतील अशा प्रमाणात सापडले.

भौतिकीमधला सर्वश्रेष्ठ असा विज्ञानवेत्ता, की ज्याने विज्ञानाच्या विश्वावर दोनशे वर्षे अधिराज्य केले, तो म्हणजे न्यूटन ! न्यूटनने जे नियम काढले, त्यामुळे भौतिकशास्त्र फार पुढे गेले. त्याच्यातूनच वैज्ञानिक क्रांती होऊन, यांत्रिक क्रांती होऊन औद्योगिक क्रांतीपर्यंत मनुष्य पोहोचला. भौतिकीविज्ञान- विशेषत:- निर्जीव भौतिकीविज्ञान- त्याच्यामध्ये सगळे ग्रहगोल येतात. आकाशातले पृथ्वीसह आणि दगड, माती, धातू इ. सगळी निर्जीव द्रव्येही त्याच्यामध्ये येतात. भौतिकी आज फारच विकसित झाली. आज अणुशक्तीपर्यंत तिने प्रवास केला. दुसरी विज्ञान पद्धती म्हणजे रसायनशास्त्र- केमिस्ट्री- ही त्याच्याबरोबरच विकसित होत गेली. -किमयागारीची - (ॲल्केमीची) कल्पना मिळाली आणि त्यानंतर ती अधिक विकसित झाली; १९ व्या शतकामध्ये संबंध प्राणिसृष्टीच्या आणि वनस्पतिसृष्टीच्या अभ्यासाला अधिक जोर आला. सगळी पृथ्वी नौकानयनाने आणि वाहतुकीच्या अत्यंत जलद महत्त्वाच्या साधनांनी माणसाला आपल्या पायाखाली आणता आली आणि ती आणत असताना जगातील सगळे जंगली प्रदेश, समुद्रातले निर्मनुष्य प्रदेश, जिथे वनस्पती नाही असे प्रदेश, वैराण प्रदेश हे सगळे त्याला पाहता आले आणि माणसांनी सगळी जीवसृष्टी शोधून काढली. तिचे मर्म, तिचे स्वभाव ओळखले आणि त्याच्यातून एक मोठा क्रांतिकारक असा शास्त्रज्ञ निघाला. तो म्हणजे डार्विन ! आणि त्या डार्विनने जीवसृष्टीमध्ये हा विकासवाद उत्क्रांतिवाद- (Theory of Evolution) हे हायपॉथेसिस म्हणजे गृहीतक सांगितले. विज्ञानामध्ये नेहमी व्यापक असा हायपॉथेसिस किंवा गृहीतक सापडले, - म्हणजे विज्ञानाला एकदम नवा वेग येतो. हे हायपॉथेसिस सापडले आणि त्याने असे ठरविले, की माणूस हा देवाने एकदम या पृथ्वीवर घडविलेला नाही, असे ख्रिश्चन धर्मशास्त्र सांगते; पण माणूस मनुष्यसदृश अशा नरवानरापासून विकसित झालेला आहे. त्याच्यात फरक झाला, त्याच्यामधील त्याची इंद्रियं काही प्रमाणात बदलली आणि माणूस उत्पन्न झाला. तो माणसाचा पूर्वज हा वानरसदृश आहे. उदाहरणार्थ, चिपाँझी आणि गोरीला. ती इतर प्राण्यांपेक्षा अधिक शहाणी आहेत, पण माणसाइतकी नाहीत. त्यांच्या

शहाणपणाचा अभ्यास झाला आहे आणि येथून मनुष्य आला, अशा तऱ्हेचा सिद्धान्त डार्विनने सांगितला. विकास म्हणजे गुणोत्कर्ष. प्राण्यांच्या श्रेणी मांडता येतात, असा विचार डार्विनने मांडला. त्याबरोबर जगात खळबळ माजली. विशेषतः ख्रिश्चन जगामध्ये फारच खळबळ माजली. ख्रिश्चन धर्मग्रंथांमध्ये म्हटले आहे की, देवाने माणूस निर्माण केला आणि माणसाकरिता सगळी सृष्टी -चंद्र, सूर्य, पृथ्वी, इतर प्राणीही निर्माण करून, नद्या, पर्वतही निर्माण केले. या धर्मग्रंथांना फारच प्रचंड धक्का बसला. अशा तऱ्हेचा धक्का भारतीय मनाला बसला नाही. १९ व्या शतकात डार्विनने हा शोध प्रसिद्ध केला तेव्हा येथेही शिक्षण आलंच होतं. ते कळल्यानंतर आमच्या येथील थोड्या मूठभर सुशिक्षितांना वाटलं, अरे वा फारच चमत्कारिक, आश्चर्यकारक पण मजेदार कल्पना ! पण ही विकासाची कल्पना ग्रीक आणि भारतीय यांच्यामध्ये काही एक स्वरूपात एका सामान्य रूपरेषेने मांडलेली आढळली. मनुस्मृती जरी डॉ. आंबेडकरांनी जाळलेली असली, तरी त्यातले काही भाग जळत नाहीत. त्यातला प्रथमाध्याय हा सिद्धान्त सांगतो. त्याच तऱ्हेचा सिद्धान्त ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटलने सांगितलेला आहे. पंचभूतांचे जे कण आहेत, त्यांच्यापेक्षा प्राणी हा वरचा. त्यांच्यामध्ये जीव आहे- स्वयं गती आहे. गतीच्या बाबतीत स्वातंत्र्य आहे. चालावं की नाही हे त्याच्या आतल्या प्रेरणेने ठरतं. साप स्वत:च्या इच्छेने बिळातून बाहेर येईल वा बिळात जाऊन दडून बसेल. कोणताही प्राणी हा स्वयंप्रेरणेने युक्त असतो. त्याच्यामध्ये हे स्वातंत्र्य प्रकटते. परंतु निर्जीव वस्तुमध्ये ते स्वातंत्र्य नसते. ढकलावं तसे ते ढकलले जातात. दगड कुठेही, कोणाच्याही बाजूला ढकलावा, फेकावा, ठेवावा तसं 'प्राणिनां बुद्धिजीविनः' प्राण्यांमध्ये बुद्धिजीवी अधिक वरचे आहेत. नुसत्या प्रेरणेने जगणारे पण काही प्राणी म्हणजे विशेषतः पक्षी आणि सस्तन (मॅमलस्) ह्यांची इंद्रिये अतिशय तल्लख असतात. फार दुरून उंचावरून, बारीक सूक्ष्म भक्ष्य-जीव पक्ष्यांना आकाशातून हेरता येतात; न्याहाळता येतात. सस्तन प्राण्यांना वस्तूचे स्वभाव वासाने कळतात. म्हणून कुत्रा चोरीच्या शोधाला फार उपयोगी पडतो. ही जी इंद्रियाची सूक्ष्मता, जाणण्याची शक्ती आहे, म्हणजे बुद्धिशक्ती ही 'बुद्धि जीवी' मध्ये असते. 'बुद्धिमतां नरः श्रेष्ठः ।'

बुद्धिवंतांमध्ये नर हा श्रेष्ठ आहे म्हणजे माणसं श्रेष्ठ आहेत. आणि पुढे अशाच तऱ्हेची श्रेणी त्यांनी सांगितलेली आहे. मी प्राणिविकासाच्या दृष्टीने या श्रेणी सहज सांगितल्या. उपनिषदांमध्ये असाच एक विचार आहे. अनेक प्राणी उत्पन्न झाले. ते पाच भौतिक देवतांतून. घोडा निर्माण केला, बैल निर्माण केला, पण तरी त्यांना समाधान वाटलं नाही. शेवटी मनुष्य निर्माण केला आणि त्याबरोबर त्या पाच भौतिक शक्तिदेवता म्हणाल्या, 'काय छान कृती निर्माण केली आहे !' माणूस म्हणजे सुंदर कृती आहे; असं उपनिषदांमध्ये म्हटलेलं आहे. ऐतरेय आरण्यकात म्हटलेलं आहे की, माणसाला उद्याचं काय ते कळतं. उद्या काय करावं आणि काय करू नये, हे तो अगोदरच ठरवतो. योग्य वर्तन व अयोग्य वर्तन काय, याचा

निर्णय त्याच्या बुद्धीला होऊ शकतो. सद्विवेक त्याच्या ठिकाणी आहे. म्हणून माणूस हा या पृथ्वीमधल्या प्राणिसृष्टीमध्ये श्रेष्ठ आहे, असं म्हटलं आहे. असा विचार प्राचीन काळच्या जगाला ज्ञात होता. पण आजच्या जीवविज्ञानाने एकपेशीजीवापासून तो माणसापर्यंत जीवांचं परिगणन केलं. या सजीव सृष्टीमध्ये एकपेशीय जीवापासून तो मनुष्यापर्यंत जो विकास झाला, तो पाहिला असताना या जीवाचं पृथक्करण सुरू झालं. मूळ घटक कोणता ? आश्चर्य असं की, या विसाव्या शतकामध्ये रसायनविद्येची वाढ झाली आणि या रसायनशास्त्राच्या द्वाराने सूक्ष्म-सूक्ष्म पृथक्करणे होऊन. निरनिराळ्या पदार्थांचे गुणधर्म कोणते आणि अनेक पदार्थांच्या संयोगाने काय घडतं आणि विघटन केलं असताना त्यांचे गुणधर्म काय असतात, याचा निर्णय करण्यात आला. विघटनात जी रसायने असतात, त्यांच्यापेक्षा अगदी उलटी, निराळी, विलक्षण संघटनेत येतात. मिठाचे पृथक्करण करून जी दोन द्रव्ये निघतात, त्यातले एक भयंकर विषारी आहे, घातक आहे. पण ती एकत्र केल्यानंतर जे मीठ उत्पन्न होते, ते जीवनोपयोगी वस्तू ठरलेले आहे. अशा तऱ्हेने संयुक्त द्रव्यामध्ये जे गुण असतात, ते काही निराळे असतात, म्हणजे रासायनिक द्रव्यांची संयुगे आणि रासायनिक द्रव्यांची विभक्त अशी द्रव्ये यांचे गुणधर्म सापडता सापडताना संबंध  जीवजातीचं पृथक्करण झालं. आज १९३२ सालानंतर अगदी नव्या जीवशास्त्रातला जीवविज्ञानाचा मुद्दा मी सांगतो. डॉगजॉन्स्की नावाचा अलीकडचा जीवविज्ञानी सांगतो, की एकपेशीय जीवापासून मनुष्यापर्यन्त पृथक्करण केले असताना, मूलभूत दोनच द्रव्ये सापडतात. त्यांना अम्ले (अॅसिड्स) म्हणतात. न्यूक्लिइक अम्ल आणि अॅमिनो अम्ल ! न्यूक्लिइक अम्लांचे चार आणि अॅमिनो अम्लांचे वीस प्रकार म्हणजे ही दोन चोवीस प्रकारची अम्ले. जो जीवाचा मुख्य घटक- जीव देहाचा आणि जीव-बीजाचा जो मुख्य घटक- तो म्हणजे न्यूक्लिइक अम्ल आणि अॅमिनो अम्ल ! या न्यूक्लिइक आणि ॲमिनो अम्लांच्या योगाने जीव म्हणजे बीज तयार होते. जनुकांची माला तयार होते. त्या जनुकांना विविध तऱ्हेचे रंग आहेत. म्हणून त्याला रंगसूत्रे म्हणजे क्रोमोसोम म्हणतात. त्यांच्यात प्राण्यांचे आनुवंशिक गुणधर्म साठलेले असतात. स्त्री- पुरुषांचा संयोग झाल्यानंतर बीजमालांचाही संयोग होऊन बीजमाला समुच्चय तयार होतो. मूळ स्वरूपात सगळ्या प्राण्यांमध्ये- अगदी एकपेशी जीवापासून तो मनुष्यापर्यंत एकच द्रव्य भरलेले आहे. एकाच प्रकारचे ! ते म्हणजे ही दोन अम्ले ! याची द्वीविध रचना होऊन बीज तयार होते. त्या बीजामध्ये जी नवी नवी माहिती मिळते, त्या माहितीमुळे वंश, धर्म आणि प्राण्यांची शरीरं तयार होतात. उदा., माणसाचा डोळा कसा बनवावा, याची माहिती. माणसाच्या जनुकामध्ये, जीनमध्ये, क्रोमोसोममध्ये म्हणजे रंगसूत्रांमध्ये असते. डोळ्याची रचना, देहाच्या आकाराची रचना, त्वचेचा रंग, हृदय इत्यादिकांची निर्मिती ह्या रंगसूत्रांतून होत असते. बीजामध्ये जी माहिती साठलेली असते, त्याप्रमाणे आनुवंशिक अनुभवाने देह बनतो आणि त्याप्रमाणे मेंदू बनतो आणि मेंदू हा अधिक माहिती घेण्याचं साधन बनतो. हे शास्त्र

आधुनिक आहे. १९३२ सालानंतर तयार झालेलं आहे आणि त्यामध्ये म्हणजे माहितीचा सिद्धान्त किंवा माहितीची उपपत्ती (Information Theory) म्हणून आलेली आहे. आणि त्या उपपत्तीप्रमाणे प्राण्याच्या बीजामध्ये- मग तो कोणताही प्राणी असो- रंगसूत्रामध्ये की जिथं बीजसूत्रं असतात त्यांमध्ये त्यांच्या सगळ्या जैविक प्रेरणा असतात. सामाजिक प्रेरणा असतात. त्या सगळ्या प्रेरणांची मुळं साचलेली असतात. पक्ष्यांच्या बीजामध्ये त्यांचे पंख कसे असावेत, त्यांचे डोळे कसे असावेत, त्यांचं शरीर हे किती वजनाचं असावं, हे सगळं तिथं ठरलेलं असतं. तिथं ते माहिती असतं. आणि या माहितीसंबंधाने अलीकडे शोध लागलेला आहे आणि त्याला म्हणतात जननिक संकेत (जेनेटिक कोड). हरगोविंद खोराना ह्यांनी डी. एन. ए. आणि आर. एन. ए. या न्यूक्लिइक अम्लांचा तसेच जनुके म्हणजे जीनांचा अभ्यास व संश्लेषणही केले. त्याचबरोबर अनेक पंडितांनी केला आणि जेनेटिक कोड- म्हणजे बीजामध्ये असलेली एका विशिष्ट भाषेची माहिती- तिचा शोध लावला. ही भाषा सगळ्या प्राण्यांच्या बीजामध्ये साठलेली असते. ही भाषा म्हणजे वर्णसंकेत किंवा सांकेतिक वर्ण ! आणि ते चारच वर्ण आहेत असे आपल्या संस्कृत भाषेप्रमाणे म्हणता येते. त्रिषष्टी: चतु:-षष्टिर्वा वर्णाः शंभुमते मताः । किंवा इंग्लिश जे वर्ण आहेत, अल्फाबेट्स आहेत ते २६ आहेत. ही जीवाणुतील विश्वात्म्याची वर्णमाला आहे. पण एक कल्पना येण्यासारखे चित्र उभे राहण्यासाठी मी अध्यात्मशास्त्रातील शब्द वापरत आहे. जीवाला जगण्याकरिता लागणारी, स्वतःचा जीव निर्माण करण्याकरिता त्याच्या बीजाला लागणारी, सगळी माहिती ही चार वर्णांमध्ये साठलेली असते. यासंबंधाने मी अधिक माहिती देत नाही; कारण मला पुढे जायचंय थोडसं.

तर ही जी माहिती आहे, ती माहिती त्या त्या प्राण्यांच्या जीवनक्षमतेप्रमाणे, इंद्रियरचनेप्रमाणे, गुणधर्माप्रमाणे असते. उदाहरण सांगतो की, मधमाशीच्या ठिकाणी मध गोळा करण्याकरिता जी इंद्रियं असतात, ती कुठे फुले आहेत, त्यांच्या दिशा ठरवितात. एकत्र जमतात. आपल्या जातीला एकत्र जमवतात. ते पोळं जे आहे, ते सुंदर रचतात. ती एक उत्कृष्ट अभियांत्रिकी म्हणजे 'इंजिनीअरिंग' आहे. मधमाशीचं जे पोळं आहे, त्याची रचना उत्कृष्ट इंजिनीअर्सनासुद्धा अभ्यसनीय अशी आहे. ही सगळी माहिती त्यांना जन्मजात मिळालेली आहे. त्या मधमाशीला, तिच्या बीजाला. घारीला जी माहिती मिळालेली आहे ती तिच्या बीजात आहे. सिंहाला जी माहिती मिळालेली आहे, ती त्याच्या बीजात आहे आणि माणसाला जी माहिती आहे ती त्याच्या बीजात आहे. पण त्याला माहितीची तीन केंद्रे आहेत. मेंदू असणाऱ्या इतर प्राण्यांना दोन केंद्रे आहेत. ज्यांना मेंदू नाही, त्यांना एकच केंद्र आहे- बीज, दुसरं म्हणजे त्याला हळूहळू मेंदू आला आहे. लहान बारका अगदी टाचणीच्या टोकाएवढ्यापासून तो माणसाच्या मेंदूएवढा. यांच्यामध्ये परंपरागत वांशिक माहितीही राहते आणि नवीनवी माहिती काढली जाते आणि तिसरं माहितीचं केंद्र माणसाचं बीज! म्हणजे

जेनेटिक ! ह्युमॅटिक्स म्हणजे नैतिक, आणि तिसरं केंद्र म्हणजे देहबाह्य एक्स्ट्रॉअॅटोमॅटिक ! देहबाह्य ! देहबाह्य केंद्र पहिलं कोणतं ? ज्यामध्ये मनुष्य आपलं ज्ञान साठवितो, नवी मिळविलेली माहिती - ही भाषा निराळी. कारण ध्वनीला निरनिराळे अर्थ दिलेले असतात. तर माणसाची भाषा ही सांकेतिक (सिंबॉलिक) आहे. पशुपक्ष्यांचे जे आवाज आहेत, त्यांना नैसर्गिक अर्थ आहे. प्राणी ओरडला, तर त्याचे निरनिराळे अर्थ आहेत. रडला तर ती दुःखाची 'साइन' झाली, विव्हळला तर तीही दुःखाची 'साइन' झाली, अशा रीतीने पक्षी आणि पक्षिणी एकमेकांना आवाहन करतात. ते नैसर्गिक असतं. त्या सूचना आहेत, परंतु भाषेमध्ये नुसत्या 'साइन्स' नाहीत. भाषेमध्ये संकेत आहे, की या शब्दाचा हा अर्थ- लाल फडकं पाहिलं की चालू नका हा सांकेतिक अर्थ आहे. नैसर्गिक अर्थ नाही. हिरवं फडकं पाहिलं म्हणजे चालायला लागा, म्हणजे रस्ता मोकळा आहे हा सांकेतिक अर्थ आहे. असा सांकेतिक अर्थ ध्वनींना भाषांनी आलेला आहे आणि या भाषांमध्ये माणसाचं ज्ञान, माणसाची माहिती साठलेली असते आणि ती माहिती वंशपरंपरागत माणूस एका पिढीतून दुसऱ्या पिढीस देतो.

अशी काही योजना, अशा तऱ्हेची तरतूद इतर प्राणिसृष्टीत नाही. इतर प्राणिसृष्टी शिकते, माहिती मिळविते आणि त्याप्रमाणे काम करते; पण आपल्या पुढच्या पिढीला ती माहिती देऊ शकत नाही. संक्रमित करू शकत नाही; कारण तिच्यापाशी संक्रमित करण्याची योजना व साधन नसते. म्हणून कुत्र्याच्या हजारो पिढ्या झाल्या तरी मागच्या कुत्र्याला जे ज्ञान मिळालेले आहे, ते ज्ञान पुढच्या कुत्र्याला येत नाही. पुढच्या पिढीला ते ज्ञान संपादन करावं लागतं. माणसाचं तसं नाही. हजार पिढ्यांपूर्वी माणसाला जे ज्ञान होतं, ते ज्ञान आताच्या माणसाला मिळालं आहे; पण प्रत्येक पिढीत जे जे ज्ञान माणसानं मिळविलं आहे, ते त्याने पुढच्या पिढीला दिले आहे, ते भाषांच्या द्वारा! मनुष्य हा सगळयांत अधिक शिक्षणक्षम प्राणी आहे. म्हणजे नवे शिकणारा प्राणी आहे. नवे नवे शिकणारा आणि नवे नवे शिकून ते साठविणारा प्राणी! इतर प्राणीसुद्धा शिकतात. घोडा शिकतो, कुत्रा शिकतो, बैल शिकतो, पक्षीसुद्धा काहीकाही शिकतात. पोपट शिकतो ना माणसाची भाषा! परंतु शिकल्यानंतर साठलेलं ज्ञान पुढच्या पिढीला मिळत नाही. माणसालाही ते पुढच्या पिढीला द्यायचं असेल, तर देहबाह्य साधन माणसाला जे कोणतं असेल, तर ती भाषा! आणि भाषेनंतर ग्रंथ! त्याला लिहिता येऊ लागले, त्यामुळे तो आपलं पाठीमागचं पिढ्यान् पिढ्यांचं ज्ञान पुढे लिहू शकतो. त्याचा संचय करू शकतो. हजार पिढ्यांचं ज्ञान एक पिढी ७-८-१० वर्षांत घेते. हजारो वर्षांचं असं जे साधनसामग्री निर्माण करण्याचं, वनस्पतीबद्दलचं, औषधाबद्दलचं ज्ञान हे माणूस पुढच्या पिढीला (एक पिढी १०/१२ वर्षे टिकते) - देतो.

कोणतंही शास्त्र घ्या, त्याचा इतिहास हजार वर्षांचा, दोन हजार वर्षांचा, चार हजार वर्षांचा; पण ते सबंध शास्त्र एक पिढी सबंध घेऊ शकते. ही माणसाची ताकद आहे. याचं

कारण माणसानं निर्माण केलेली भाषा आणि लेखन ! मनुष्य बोलू लागला, लिहू लागला, त्याचमुळे त्याची जीवनाची क्षमता वाढली. कारण रोग उत्पन्न झाल्यानंतर त्याचा प्रतिकार कसा करावा याचं ज्ञान- म्हणजे औषधी ज्ञान- मनुष्य साठवत गेला. काही मागासलेल्या लांबलांबच्या देशांत असलेल्या जमातींचा अभ्यास करत असताना, मागासलेल्या जमातींचा अभ्यास करताना असं आढळलेलं आहे की, काही देशांमध्ये जवळजवळ दीड हजार वनस्पती निरनिराळ्या गुणधर्माच्या आहेत. वन्य अशी सातशे-आठशे माणसे आहेत; त्यांची - जी स्त्री-पुरुषांची तरुण पिढी आहे, त्या सगळ्यांना - वनस्पतींचे गुणधर्म माहिती आहेत. आजचा कऱ्हाडचा - जो सुशिक्षित माणूस आहे, सुसंस्कृत मनुष्य आहे, त्याला कऱ्हाडच्या भोवती असलेल्या ज्या वनस्पती आहेत, त्यांच्यातील किती वनस्पतींचे गुणधर्म माहिती आहेत ? पण असा अर्थ सापडलेला आहे की, जितके जितके आदिमानवाचे गट पाहावेत, त्यांच्यामध्ये त्यांनी मिळविलेली जी विचारसामग्री, ती त्या प्रत्येक पिढीमध्ये साठविलेली, लक्षात ठेवलेली असते.

पण आता ज्ञान इतकं अपार झालेलं आहे; ते ज्ञान साठवायला एक माणूस, दहा माणसं, पन्नास माणसं, चारशे माणसं पुरत नाहीत. हजार माणसे पुरत नाहीत ! एवढं मोठं ज्ञान आहे, ते ग्रंथात सापडतं. तर हे जे ज्ञान आहे, या ज्ञानामध्ये वाढ झाली, मनुष्य जेव्हा मोजायला शिकला तेव्हा ! बोलायला शिकला त्याच्यापेक्षा मोजायला शिकला, त्यामुळे माणसाची ज्ञानसंपत्ती वाढली. तर असा हा माणूस या सृष्टीमध्ये यशस्वी झाला आहे. आतापर्यंत जगला आहे. याचं कारण त्याला भाषा आणि भाषेची सांकेतिक साधने मिळाली, आणि आपल्या ज्ञानाची परंपरा त्याला साठवता आली, एकत्र करता आली. एवढेच नाही, तर हजार पिढ्यांनी निर्माण केलेली ती ज्ञान संपत्ती अग्रक्रमाने विकास पावली. शोधपूर्वक - १०० - २०० - ४०० पंडितांनी पिढ्यान् पिढ्या संपादन केलेली माहिती एक पंडित १०-१२ वर्षांत साध्य करू शकतो आणि ती शिक्षणक्षमता माणसात आहे म्हणून मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षा वरच्या श्रेणीमध्ये येतो. त्या शिक्षण क्षमतेमुळे तो परिस्थितीवर कब्जा मिळवू शकतो. मी माणूस माणूस म्हणतो, याचा अर्थ सगळ्या सृष्टीचा माणूस एकच आहे. तुम्ही म्हणाल की, गोरी माणसं निराळी, आफ्रिकेतील काळी माणसं निराळी, चीनमधली पिवळी माणसं निराळी, आणखी कुठली पिंगट माणसं निराळी, भूमध्यसामुद्रिक निराळी, पाच किंवा सहा मानववंश आज जगामध्ये सापडतात. निरनिराळ्या प्रदेशांमध्ये वाढलेले हे मानववंश म्हणजे रेते ! या जाती माणसाच्या, कारण काळा हा काळाच राहतो. काळ्या आई-बापापासून काळेच निर्माण होतात. पिवळ्या आई-बापापासून पिवळेच निर्माण होतात. गोऱ्या आई बापापासून गोरे, एखादा अपवाद असतो. गोऱ्याच्या घरामध्ये एखादं बाळ काळं निघतं. काळ्यांच्या घरामध्ये पाळण्यात एखादं बाळ गोरं दिसतं. हे का? त्याचे उत्तर चार्वाकाने दिलेले आहे आणि वेदांनी दिले आहे. काय दिले आहे ? ‘अनादी खलु संसारे जागृति मकरध्वजे । कुले

च कामिनीमूलेका जातिपरिकल्पना' हा अनादी संस्कार कुल जे ठरते, वंश जो ठरतो, तो पुरुषामुळे नाही, बाईमुळे ठरतो. कारण बाळ तिला होते, पुरुषाला होत नाही. आणि 'जागृति मकरध्वजे' आणि हा स्त्री-पुरुषांचा आकर्षणाचा जो काही विलक्षण मनोधर्म, मनोभाव आहे, त्याला मकरध्वज म्हणतात; त्याचा वाण म्हणजे पुष्प आहे. फार नाजुक वाण आहे तो. जात जात म्हणून कसली म्हणता हो ? असा चार्वाकांनी जातिसंस्थेवर आक्षेप घेतला आहे.. असा आक्षेप जातिसंस्थेवर वनपर्वात युधिष्ठिराने घेतलेला आहे. वनपर्वामध्ये नहुष हा जो महासर्प झाला, त्याने भीमाला आवळलं, आणि आवळल्यानंतर त्याने जे अनेक प्रश्न विचारले, त्यात एक प्रश्न असा होता- वर्ण कसे ओळखावे ? चार वर्ण कसे ओळखावे ? सगळीकडे संकर दिसतो, तेव्हा युधिष्ठिरांनी म्हणजे धर्मराजाने सांगितले.

जातीचा निर्णय पाहून करता येत नाही-जाती ही ठरविणे ? - नाका- डोळयांवरून, वर्तनावरून ? कोणत्याचा संबंध कशाशी आहे ? सगळीकडे वर्णसंकर झालेला आहे, आणि तो का ? हा जो कामदेव आहे, याचं राज्य सगळया पृथ्वीवर सगळया जीवांवर आहे, असे त्यांनी सांगितले. हे मनुष्यामध्ये कसं घडलं याचं उत्तर अलीकडेच Physical Anthropology म्हणजे मानवशास्त्र काढण्याचा प्रयत्न करत आहे. आतापर्यंत वंशवाद्यांनी युरोपमध्ये कहर केला. नॉर्डिक गोरे हे आर्यश्रेष्ठ, यांच्यापेक्षा भूमध्यसामुद्रिक श्रेष्ठ, यांच्यापेक्षा कमी गोरे, कमी उंचीचे, एकंदर जे असतील ते. निळया डोळयांचे आणि सोनेरी केसांचे हे वरच्या दर्जाचे, काळया डोळयांचे, काळया केसांचे, गोरे लोक कनिष्ठ दर्जाचे, काळया रंगाचे लोक त्यापेक्षा कमी दर्जाचे, पिवळे लोक आणखी निराळया तऱ्हेने कमी दर्जाचे असा वंशवाद जो उठविला होता, तो सगळा खोटा ठरला. मी नेहमी सांगतो की, आपण जर भारतामधला वर्णसंस्थेचा इतिहास पाहिला, आणि भारतातील वर्णव्यवस्था पाहिली, तर वर्ण म्हणजे रंग लुप्त झाल्यानंतरच ही जातिव्यवस्था उत्पन्न झालेली आहे. जे उच्च द्विज ब्राम्हण म्हणवितात ते निराळे, ते दलितांपेक्षा निराळे कसे हे त्यांच्या कोणत्याच बौद्धिक, मानसिक किंवा शारीरिक लक्षणांवरून निश्चित करता येत नाही. पोशाखावरून सांगता येईल, भाषेवरून सांगता येईल, बोलण्यावरून सांगता येईल. पण ह्या सगळया कृत्रिम गोष्टी आहेत. चंचल गोष्टी आहेत. आचार-स्वभावधर्मावरून कोणतीही जात ओळखता येत नाही. म्हणून जात केव्हा गेली ? कधीच गेली. जातीचा उच्छाद निर्माण होण्याच्या अगोदरच जात गेली, असाच निष्कर्ष आज जीवशास्त्रज्ञांनी, जीवविज्ञानी मंडळींनी युरोपातल्या, अमेरिकेतल्या वंशांबद्दल काढलेला आहे. आणि वंशभेदाने माणूस निराळा आहे, स्वभावाने, गुणधर्माने त्याची जी माणुसकी आहे, ती निराळी असं सिद्ध होत नाही.

सर्व मानवाच्या माणुसकीचे वैशिष्ट्य एकच आहे. मग तो काळया निग्रोमधला माणूस असो, गोरा जर्मन नॉर्डिक वंशाचा माणूस असो, ब्रिटनमधला, चीनमधला, जपानमधला, गालाची हाडे वर आलेला, मिचक्या डोळयांचा, पिवळा माणूस असो, कोणीही असो !

त्याच्यामध्ये माणुसकी या दृष्टीने जे गुण पाहिजेत, ते म्हणजे सगळयांचं तर्कशास्त्र एकच आहे. तर्कशास्त्रामध्ये कोणीही लेचापेचा नाही. तर्कबुद्धी हे माणसाचं वैशिष्ट्य आहे. ती कोणाचीही कमी जास्त नाही. अर्थात, गोऱ्यांमध्ये उच्च तर्कबुद्धीचा जर एखादा सापडला, तर काळयांमध्येही तो तसा सापडू शकतो, हे लक्षात ठेवा. पिवळयांमध्येही सापडू शकतो. उच्च दर्जाचे हस्तकौशल्य जर तुम्हाला गोऱ्यात सापडले, तर काळयातही सापडेल, पिवळयात सापडेल, उच्च दर्जाचे संगीत गाण्याचे सामर्थ्य हे कुठेही सारखेच सापडू शकते. चित्रकला, कवित्वशक्ती अशा तऱ्हेची प्रतिभेची कार्ये कोणत्याही वंशात सापडतात. खालच्या वर्गात कोणत्याही वंशात सापडू शकतात आणि म्हणून माणुसकीचे जे गुणधर्म आहेत, जी वैशिष्ट्ये आहेत, ती म्हणजे उच्च दर्जाची बुद्धिमत्ता, उच्च दर्जाची प्रतिभा, उच्च दर्जाचे नैतिक सामर्थ्य, हे माणसाच्या माणुसकीचे सगळयांत अत्यंत श्रेष्ठ असे माणुसकीचे लक्षण आहे. ते जगातल्या कोणत्याही मानवात सापडू शकते. गोऱ्या माणसांमध्ये, बदमाश, पाजी, भ्रष्टाचारी माणसं असू शकतात. काळया माणसांमध्ये संत आणि श्रेष्ठ माणसे असू शकतात. असं काही म्हणता येत नाही, की संत कुठे सापडेल ? एखाद्या झोपडीत सापडेल, गरिबाच्या निःस्वार्थी, त्यागी, लोकहितरत सर्वभूतांठायी प्रेम असलेला आणि सर्वस्वाचा त्याग करून सोवळा झालेला कुठेही असू शकतो आणि म्हणून माणुसकी ही सगळीकडे आहे ! माणुसकीची वैशिष्ट्ये ही सगळया जातिजमातींना, वंशांना, धर्मांना त्या त्या सारखी भौगोलिक प्रदेशामध्ये रंग, रूप, डोळा, आकार, केसाचं स्वरूप, त्वचेचा रंग म्हणा, उंची वगैरे तिथल्या त्या भौगोलिक प्रदेशाने सिद्ध होतात, पण माणुसकी जी आहे ती भौगोलिक प्रदेशावर वाटलेली नाही. ती कुठेही वरच्या दर्जाची सापडू शकते. असा दृष्टिकोन आपण बघू शकतो.

**(यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला, कराड नगरपरिषद, कराडच्या सन १९८१च्या सत्रात 'विज्ञान व मानवी मूल्य' या विषयावील व्याख्यानत्रयीतील दुसरे पुष्प, दि. १२ मार्च,१९८१ * नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९९० पृ. ७३ ले ८०.)**

ooo

५७

# विज्ञान व संस्कृती

'जीवविज्ञानामध्ये माणूस कसा दिसतो' याचे जीवविज्ञानाच्या आधाराने काही स्पष्टीकरण केले. ते स्पष्टीकरण करत असताना जीवविज्ञानातला एक मूलभूत सिद्धांत असा सांगितला, की जीवाचा एकपेशी जीवापासून, जिवाणूपासून तो मानवापर्यंत जो विकास झालेला आहे, त्या विकासामध्ये, त्याच्या बौद्धिक संस्थेमध्ये माहिती साठत जाते. त्या माहितीमुळे त्याचा विकास होतो. ही माहिती आनुवंशिक रीतीने साठत जाते. ती देहात आणि विशेषत: मेंदूमध्ये. सगळ्याच जीवांना मेंदू नसतो, पण मेंदू आल्यापासूनचे जे जीव आहेत, ते नवी आलेली माहिती मेंदूत साठवतात. मनुष्य हा असा एक प्राणी आहे, की तो त्याची माहिती तीन ठिकाणी साठवितो. पहिली, सर्व जीवाला जी माहिती वंशपरंपरेने मिळालेली असते, ती बीजामध्ये साठलेली असते. नंतर देहात, विशेषत: मेंदूत साठलेली असते. तिला 'सोमॅटिक इन्फर्मेशन' असे म्हटले जाते. बैजिक व सोमॅटिक म्हणजे जेनेटिक इन्फर्मेशन. दुसरी सोमॅटिक इन्फर्मेशन म्हणजे मेंदूत साठलेली आणि तिसरी म्हणजे एक्स्ट्रासोमॅटिक आणि एक्स्ट्राजेनेटिक्स म्हणजे देहाबाहेर, बीजाबाहेर अशी माहिती साठलेली असते. आणि तीच  माहिती भाषेत असते. भाषा जेव्हा अक्षरांकडून होते, म्हणजे ग्रंथात लेखाच्या रूपाने निर्दिष्ट होते, नोंदली जाते तेव्हा तिला अधिक स्थैर्य येते. माणसाला फार मोठ्या प्रमाणात मिळालेली ही जी माहिती असते, ती वंशपरंपरागत रीतीने मनुष्य वापरत असतो.

जीवनाच्या कलहामध्ये यशस्वी होण्याकरिता नवी नवी इंद्रिये, नवे नवे अवयव निर्माण झाले. सरपटणाऱ्या स्थलचरी प्राण्यावर संकटे आली आणि त्यांना टाळून जाण्याची गरज प्राप्त झाली, तेव्हा त्यांना पंख प्राप्त झाले, म्हणजे नवा अवयव मिळाला. जे पदार्थ जीवनाला आवश्यक आहेत त्यांना चांगला वास असतो आणि जे जीवनाच्या विरुद्ध आहेत त्यांना दुर्गंध असतो. सुगंध व दुर्गंध ओळखण्याकरिता इंद्रिय निर्माण झाले. त्याला म्हणतात घ्राणेंद्रिय. शत्रू फार दूर आहे त्याची चाहूल घेण्यासाठी कान आले. अशा रीतीने मनुष्यप्राण्यापर्यंत जो

विकास होत गेला, आणि जीवनातल्या झगड्यामध्ये यश प्राप्त होत गेले, तो ही इंद्रियविकास आहे. म्हणजे जी साधने आली, ती देहात आली. डोळा, कान, नाक, जीभ, ही स्पर्शेंद्रिये देहात आली; परंतु अगणित अशा कार्याकरिता आणि अगणित अशा प्रकारची माहिती मिळण्यासाठी या देहात जे परिवर्तन होते त्याला कोट्यवधी वर्षे लागतात. थोडक्या काळात जीवनामध्ये यशस्वी होण्याकरता देहाच्या बाहेरची साधने मनुष्य मिळवू लागला. म्हणजे देहाबाहेरचे जे जग आहे त्याचा इंद्रियांसारखा उपयोग करू लागला. उदा. चष्मा, दुर्बीण, सूक्ष्मदर्शक यंत्र ही सगळी डोळ्यांसारखी आहेत. बाह्य जग हे इंद्रियांसारखे वापरणे ही गोष्ट माणसाला शक्य झाली. घोड्याला पळण्याकरिता दोन व चार खुरे होती. ते एक खूर निर्माण व्हायला कोटी वर्षे लागली. वेगाने पळण्याकरिता तसेच शत्रूपासून बचाव करण्याकरिता माणसाला घोडा पकडण्याची युक्ती साधली आणि घोडा पकडला. तो घोडा इतक्या वेगाने चालू लागला की, माणसाला शारीरिक श्रम न होता जास्तीत जास्त दूर जाण्याची शक्ती, प्रवास करण्याची शक्ती मिळाली. चाकाच्या शोधाने हेच घडले. म्हणजे चाक हे माणसाचे इंद्रिय आहे. ते इंद्रिय जवळ घेता येते, बाजूला करता येते. म्हणजे चाकापासून बनविलेला गाडा, गाडी हे सर्व जवळ ठेवता येते. बाजूला जपून ठेवले की झाले. घोडा बांधून ठेवला की झाले. अशा रीतीने हे बाह्य जग इंद्रियासारखे वापरणे ही जी शक्ती आहे, ती माणसाच्या ठिकाणी ज्या इंद्रियाच्या योगाने आणली ते महत्त्वाचे इंद्रिय म्हणजे मेंदू. माणसाएवढा मोठा मेंदू इतर प्राण्यांच्यात नाही; असे मी एक विधान करतो; पण प्राणिशास्त्राचा विद्यार्थी येऊन मला आव्हान देईल आणि म्हणेल की हत्ती किंवा व्हेल नावाचा जो माशासारखा समुद्रसंचारित प्राणी आहे त्याचा मेंदू माणसाच्या सव्वासहा पट वा साडेसहा पट आहे; पण त्याला हे विश्व इंद्रियासारखे वापरता येत नाही, माणसासारखा विश्वावर कब्जा करता येत नाही.

ॲरिस्टॉटलने प्राणिशास्त्राच्या आपल्या ग्रंथामध्ये 'प्राण्यांचे अवयव' या निबंधात म्हटलेले आहे, की मनुष्याचा मेंदू हा इतका जो उपयुक्त झाला, याचे कारण त्या मेंदूमध्ये आणि त्याच्या शरीराच्या वजनामधले जे अंतर आहे ते माणसाच्या शरीराचे वजन आणि मेंदूचे वजन यांच्या संदर्भात त्याची इतर प्राण्यांशी तुलना केली असता असे दिसते, की इतर प्राण्यांच्या मेंदूच्या वजनापेक्षा शरीराचे वजन जास्त असते. व्हेल माशाचा मेंदू जरी माणसाच्या मेंदूपेक्षा साडेसहा पट असला, तरी त्या मेंदूच्या वजनाच्या मानाने त्याचे शरीर फार अवजड आहे. तसे माणसाचे नाही. मेंदू आणि शरीर यांच्या तुलनात्मक वजनाचे मापन काढले, तर माणसाचा मेंदू त्याच्या शरीराच्या मानाने अधिक आहे, म्हणून तो अधिक ग्रहणक्षम, ज्ञानक्षम, तर्कक्षम आहे, अशा तऱ्हेचा विचार जीवविज्ञानामध्ये सांगितला आहे. ही जी माणसाच्या मेंदूची विलक्षण कार्यक्षम अशी शक्ती आहे, तिलाच मन असे म्हणतात. मेंदू आणि मन एक आहे का निराळे, याबद्दल वाद आहे. ही जी ज्ञानशक्ती आहे, वा मननशक्ती

किंवा मन आहे, त्यावरूनच मनुष्य हा शब्द संस्कृतमध्ये उत्पन्न झालेला आहे. मनन करू शकतो, विचार करू शकतो, तो मनुष्य आणि ते जे मन आहे ते देहाहून निराळे आहे. ते सूक्ष्म इंद्रिय आहे, अशा तऱ्हेचा विचार चार्वाकाशिवाय सर्व दर्शनकारांनी आणि जगातल्या सर्व धर्मांनी मानलेला आहे.

पण आता असा प्रश्न उत्पन्न झाला आहे, की मेंदूला कोणताही दोष उत्पन्न झाला की मनात दोष उत्पन्न होतो. मेंदूला धक्का बसला आणि मेंदूचे कार्य थांबले, म्हणजे मनाचे कार्य थांबते. म्हणजे मन आणि मेंदू हे वेगळे आहेत, यांना काही पुरावा नाही. म्हणून मेंदू आणि मन एकच असे मानणे बरे असे अनेक इंद्रियविज्ञानतज्ज्ञ म्हणतात. तथापि मेंदू आणि मन या वेगवेगळ्या गोष्टी आहेत असे म्हणणारे काही मनोविज्ञानी किंवा इंद्रियविज्ञानी आहेत. मात्र मेंदू आणि मन यांची कार्ये एकमेकांना धरून चालतात. मेंदूचे कार्य आणि मनाचे कार्य हे परस्परावलंबी आहे. मेंदूला धक्का बसला म्हणजे मनाला धक्का बसतो; आणि म्हणून त्या दोघांचे मिळून कार्य चालते असा एक विचार आहे. तात्पर्य, हा अजून वादाचा विषय आहे. या वादाच्या विषयात मी जात नाही. भौतिकवादी किंवा मटिरिआलिस्टस् जे आहेत, ते मन निराळे मानायला तयार नाहीत. आत्मा  निराळा मानायला तयार नाहीत. मेल्यानंतर काय होते? काही शिल्लक राहत नाही, असे म्हणणारे आहेत आणि असे हे फार प्राचीन काळापासून चालू आहे. 'कठोपनिषदा'मध्ये नचिकेताने यमाला प्रश्न विचारला, ती कथा फार प्रसिद्ध आहे. सुंदर आणि विश्वविख्यात कथा आहे.

वाजश्रवस नावाचे एक मुनी होते. त्यांनी सर्वमेध नावाचा यज्ञ केला. या यज्ञात सर्वस्व अर्पण करायचे असते. पूर्वी गोधन हे महत्त्वाचे मानीत. या मुनींनी त्यांच्यापाशी असलेल्या सर्व गायी दान करून टाकल्या. पण त्या गायी म्हाताऱ्या झाल्या होत्या. तेव्हा त्यांचा मुलगा नचिकेत हा सात, आठ-दहा वर्षांचा होता. त्याच्या मनात एकदम श्रद्धा प्रकट झाली. तो आपल्या पित्याला म्हणाला, ''अशा या थकलेल्या गायी दान म्हणून  देण्यापेक्षा माझेच दान करून टाका. मीसुद्धा तुमचीच संपत्ती आहे.'' 'ततकस्मै मां दास्यसि?' बाबा, तुम्ही मला कोणाला देणार? एकदा विचारले, दुसऱ्यांदा विचारले, तिसऱ्यांदा विचारले. वडील रागावून म्हणाले, 'जा मर.' म्हणजे मृत्यूला देऊन टाकतो. आता शब्द हा खराच केला पाहिजे वडिलांचा. काहीतरी आपली वातावाती करायची नाही. शब्दाचे सामर्थ्य सत्याने वाढते. हे जग सत्यावरच चाललेले आहे. म्हणून तो म्हणाला की, ''ठीक आहे, चाललो मृत्यूकडे.'' मृत्यूच्या म्हणजे यमाच्या दरबारात गेला. त्या वेळेस यम हा आपल्या महालात नव्हता. बाहेर खूप काम होते, त्यावेळी काहीतरी भयंकर साथीचे रोग असावेत. त्याला रात्रंदिवस काम होते, तो महालात नव्हता. तीन दिवस तिथे नचिकेताने वाट पाहिली. तिसऱ्या दिवशी शेवटी सगळे काम उरकून यमदेव आले. पाहतो तर हा मुलगा दरवाजात बसलेला होता. त्यांनी विचारले, ''अरे, अतिथी इथे आलेला आहे. किती दिवस इथे आहे?'' ''त्याला

झाले तीन दिवस." कुणीतरी सांगितलं, ''फार वाईट. असा भुकेलेला अतिथी दरवाजात बसणे हे भयंकर पाप आहे." लगेच त्यांनी आपल्या सेवकांना हाका मारून सांगितले की, ''याचे पाय धुवा. हा पवित्र अतिथी इथे आलेला आहे," आणि त्याची पूजा केल्यानंतर यमाने त्याला विचारले की, ''तीन दिवस तू इथे उपाशी राहिलास, तर तुला पाहिजे ते तीन वर माग." त्याने वर मागितले. पहिला असा, की ''वडील रागावले आहेत, त्यांचा राग शांत व्हावा." ''ठीक आहे" म्हणाले. दुसरा वर ''हे जे यज्ञयाग चालतात या यज्ञयागाचे रहस्य काय? अग्नीचे रहस्य काय आहे?" ते यमानं सांगितले आणि मग नचिकेताने तिसरा प्रश्न विचारला, की ''मनुष्य मरण पावल्यानंतर लोक चर्चाचिकित्सा करतात. कोणी हा आत्मा असतो असे म्हणतात तर कोणी नसतो असे म्हणतात. तेव्हा या संदर्भात तू मला उपदेश कर. हे मला तू सांगावेस आणि मी ऐकावे. कारण प्रत्यक्ष तू यम म्हणजे मृत्यू. यासंबंधीची माहिती तुला असणार की इतर कोणाला असणार? तुलाच असणार. मेल्यावर काय होते हे मृत्यूला कळणार का दुसऱ्याला कळणार?" असा नचिकेताने प्रश्न केला आणि तेव्हापासून ही दोन मते प्रसिद्ध आहेत. देहाहून, मेंदूहून मन निराळे नाही, इकडे अलीकडच्या विचाराचा कल आहे. पण ते काही का असेना, मेंदूचे जे कार्य आहे ते महत्त्वाचे आहे. ते कार्य कोणते? की नवीन नवीन माहिती गोळा करायची, सत्य जाणायचे, भोवतालचे जग जाणायचे आणि ते ज्ञान साठवत जायचे. कारण हे ज्ञान साठवत गेल्याने जीवनार्थ कलहामध्ये यश येऊ शकते.

मानवी संस्कृतीची जी रचना झालेली आहे ती माणसाने केलेली आहे. माणूस निसर्गामध्ये बदल केल्याशिवाय जगू शकत नाही. त्याला हा एक प्रकारचा शाप आहे, असे म्हणू या. माणूस आहे तसे विश्व भोगू लागला, तर त्याची वसती या जगामध्ये फार काळ टिकणार नाही. हे विश्व बदलून त्याच्यामध्ये भर घातली. आपल्या अकलेने, आपल्या शहाणपणाने तरच या जगात माणूस तरू शकेल म्हणून या जगावर संस्कार करून, याच्यात बदल करून स्वत:चे विश्व निर्माण करूनच विश्वात माणूस जगू शकतो. हा शाप आहे; आणि एका अर्थी तो वरही आहे. भर घातलीच पाहिजे. पण भर घालायची तर कशाने घालायची? ज्ञानशक्तीने, प्रज्ञाशक्तीने भर घालायची. हे जग जाण आणि जगाचा अर्थ समजून घे आणि जगाचा अर्थ समजला, त्याचा कार्यकारणभाव समजला म्हणजे हे जग तुला बदलता येते. या जगावर जबरदस्ती करून ते बदलता येणार नाही. वाऱ्यावर ताबा मिळवायचा तर वारा म्हणजे काय हे समजून घ्या. पृथ्वीवर ताबा मिळवायचा तर जादूने मिळवता येणार नाही. माणसाने मंत्र-तंत्राने, जादूने या जगावर कब्जा मिळविण्याचा प्रयत्न हजारो वर्षे केलेला आहे. जादू म्हणजे जबरदस्तीने मंत्र-तंत्राने, सृष्टीतल्या शक्ती वश करण्याची प्रवृत्ती. ही जी जादूविद्या आहे तिच्यामध्ये जबरदस्ती आहे, हुकूम करायचा आहे. हुकूम करून काही हे जग बदलायचे नाही. मंत्र-तंत्र म्हणजे हुकूम आहे. 'चले जाव' म्हणून म्हटले जाते. 'आव-आव' म्हणून याचना केली जाते. कोणी येत नाही, जात नाही अशी परिस्थिती असते. तर

मंत्र-तंत्राच्या जोरावर जग काही बदलता येणार नाही. सृष्टीशी नम्र होऊन तिचे रहस्य समजून घेतले पाहिजे. गोडवा पाहिजे आणि धीर धरला पाहिजे. सृष्टीची रहस्ये उघड नाहीत आणि ती उलगडायची तर या सृष्टीबद्दल एक प्रकारचे आकर्षण पाहिजे. सृष्टीमधल्या ज्या घटना आहेत त्या घटनांबद्दल मनामध्ये चमत्कृती उत्पन्न व्हावी लागते.

आइनस्टाईनने म्हटले आहे, की या विश्वातील घडामोडी पाहिल्याबरोबर या कशा चालतात याबद्दल एक प्रकारचे आश्चर्य उत्पन्न होते. युरोपातला एक थोर अध्यात्मवादी तत्त्ववेत्ता म्हणतो, ''दोन गोष्टी आश्चर्यकारक आहेत. एक म्हणजे तारांकित आकाश आणि दुसरी गोष्ट म्हणजे हृदयामधील नैतिक प्रज्ञा आणि विवेकशक्ती.'' या दोन्हीही आश्चर्यकारक आहेत. तर सृष्टीबद्दल आश्चर्य वाटत असेल, 'असे का होते?' हे जाणून घेण्याची प्रवृत्ती असेल तर सृष्टीची रहस्ये हळूहळू उलगडता येतात. या नम्रतेने त्या सृष्टीपुढे बसावे लागते. अहंकाराने काही होत नाही. सृष्टीचा कार्यकारणभाव हा गूढ असतो. अलीकडे विज्ञानपद्धतीमध्ये म्हटलेले आहे की, 'फॅक्टस्' ज्या आहेत, घटना ज्या आहेत, त्यांचे अवलोकन करा. अवलोकन करत गेलात म्हणजे त्यांच्यातील नियम तुम्हाला सापडतील. जंत्री करत जा. जंत्री कितीही केली तरी नियम फार गूढ असतात. तर अत्यंत विचित्र असे जे हे जग आहे, त्यातील घटनांमध्ये एखादा सूक्ष्म नियम असा असतो की, त्या नियमाच्या आधारे त्या विचित्र, शेकडो, अगणित घटनांचा अर्थ उलगडतो आणि याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे न्यूटनच आहे. त्याने जो एक सिद्धांत शोधला त्याच्या योगाने अगणित विचित्र घटनांचा उलगडा झाला. तो सिद्धांत काही डोळ्याने दिसत नाही.

न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत शोधण्याची प्रेरणा कशाने झाली, तर त्याच्या बागेमध्ये सफरचंदाचे झाड होते. त्या सफरचंदाच्या झाडावरून फळे पडताना दिसली आणि तो म्हणाला, की ''हे फळ खाली का जाते? त्या फळाला सगळया बाजूने जायला जागा आहे तरीही ते खालीच का जाते?'' पण एवढेच नाही, त्या झाडाच्या पलीकडे त्याला चांदोबा, चंद्र दिसत होता. 'हा चंद्र का नाही खाली येत?' प्रश्न पडला. हा चंद्र म्हणजे पृथ्वीभोवती प्रदक्षिणा करतो असे त्या वेळचे ज्योतिषशास्त्र सांगत होते. त्या वेळच्या ज्योतिषशास्त्रात असेही कळले होते, की पृथ्वी सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते आणि अनेक ग्रह सूर्याभोवती फिरतात; पण ही जी गती आहे ती काही ठिकाणी अवरुद्ध होते. हा दगड खाली पडला पण तिथेच थांबला आहे! का थांबला? आदळले, म्हणजे काय झाले? म्हणजे पदार्थाला निरनिराळ्या प्रकारच्या गती - सरळ गती, वाकडी-तिकडी गती असतील. चक्राकार गती, सारखी गतीच असणे, गतिरुद्ध होणे असे कितीतरी प्रकार आहेत. या सगळयांना व्यापणारी गुरुत्वाकर्षण म्हणून शक्ती आहे. तिचे स्वरूप आहे ते दिसते का?

कितीही 'फॅक्टस्' पाहिल्या तरी ते दिसते का? नाही दिसत. ती कल्पना आहे. म्हणजे कवीची कल्पनाशक्ती, कलाकाराची कल्पनाशक्ती, ती जितकी अतिशय मुक्त असावी

लागते तशी वैज्ञानिकांचीसुद्धा कल्पनाशक्ती विलक्षण असावी लागते. त्याशिवाय ती नियम शोधत नाही, म्हणून हा जो सृष्टीचा ज्ञानाच्या योगाने सृष्टी बदलण्याचा उपक्रम माणसाने पहिल्यापासून सुरू केला ही जी प्रक्रिया आहे, ती सृष्टीतील कार्यकारणभाव म्हणजे 'कशाने काय घडते' हे जाणून होते. पण ते नियम जे कळतात त्याला प्रतिभा लागते. कल्पनाशक्ती विलक्षण लागते म्हणून त्याला म्हणतात - कल्पनाशक्तीची सर्जनपरता! - क्रिएटिव्हिटी ऑफ इमॅजिनेशन ही जी सृजनशीलता आहे माणसाच्या मनाची, की जी कलाकारांना आणि विज्ञानसंशोधन करणाऱ्या अभ्यासूला सारखीच लागत असते, आणि त्यात एखाद्या अशा प्रतिभाशक्तीतून इकडे विज्ञान आणि इकडे कला निर्माण होत असते.

पहिला माणूस जो होता त्याच्यापाशी काही नव्हते. वस्त्र, पात्र काही नव्हते, घर नव्हते. आईच्या पोटातून बालके जशी जन्माला येतात तशाच तऱ्हेचे ते पहिले स्त्री-पुरुष होते. त्या स्त्री-पुरुषांना सृष्टीचा अर्थ समजून घेण्याची गरजच होती. कारण थंडीने कुडकुडून हृदयक्रिया बंद पडण्याची पाळी यायची. जेव्हा माणसापाशी घरदार काही नसते, वस्त्र नसतात, तेव्हा ती माणसे मरत असतात. तेव्हा ती सृष्टीचा विचार करू लागली, की थंडीपासून रक्षण कसे करावे? तर सृष्टीचा अर्थ बघावा. ही सृष्टी बदलावी लागते. ती बदलण्याकरिता तिचा स्वभावधर्म कळावा लागतो. स्वभावधर्म कळला म्हणजे सृष्टी बदलता येते. रानटी अवस्थेतून मनुष्य पहिल्यांदा सुसंस्कृत अवस्थेमध्ये जो आला, तो एका अर्थी एकदम आला आणि एका अर्थी क्रमाक्रमाने आला. कारण त्याला क्रमाक्रमाने सृष्टी कळू लागली. पण एखादा शोध असा लागतो, की त्याच्या योगाने संपूर्ण जीवनक्रम बदलून जात असतो. सगळी अर्थरचना बदलते. जनावरे पकडायची त्याला युक्ती सुचली. पशुसंवर्धन करू लागला. निसर्गामध्ये जी फळे पडायची ती तो गोळा करून उदरभरण करीत होता. ती जी फलसमृद्धी आहे, ती पुन्हा पुन्हा निर्माण करण्याकरता वीज आणि झाड यांचा कार्यकारणभाव त्याने शोधला, निवड केली. निवड करीत असताना केव्हा काय पिकते हे त्याला पहिल्यांदा कळले. निसर्गात आपोआप निर्माण झालेले खाऊन फस्त होत असे. ते साठवायला पाहिजे हे लक्षात आले आणि म्हणून तो हळूहळू पेरायला लागला, शेती करायला लागला. पण शेती म्हणजे कोणते क्षेत्र, कोणती जमीन, कोणते शेत काय पिकवते आणि काय पिकवत नाही याचाही विचार करावा लागला. निवड करावी लागली. कोणत्या हवामानात पिकते आणि कोणत्या हवामानात नाही. तर त्याला हवामान केव्हा कसे बदलते हे शोधावे लागले. तो आकाशाकडे पाहू लागला आणि कळले, की हवामानामधल्या बदलाचा आकाशातल्या सूर्यचंद्रादिकांच्या गतीशी संबंध आहे. म्हणून मी सांगितले, की पहिले विज्ञान जे माणसाला झाले ते ज्योतिर्विज्ञान झाले. कारण शेती ही संस्था पहिल्यांदा ज्या वेळी अस्तित्वात आली तेव्हा त्या शेतीला ऋतुचक्र जे आहे त्याचे ज्ञान आवश्यक आहे.

ऋतुचक्राच्या ज्ञानाशिवाय नियमितपणाने शेती करता येत नाही. नांगर धरणारा कोणी

अडाणी असेल, पण त्या अडाण्याला ऋतुचक्राचे ज्ञान लागते, तो त्या बाबतीत अडाणी राहू शकत नाही. म्हणून मनुष्यप्राणी हा असा आहे. सगळे प्राणी समोर पाहतात, खाली पाहतात, पण आकाशाकडे पाहून चालणारा प्राणी म्हणजे माणूस. त्याला आकाशाकडे पाहिल्याशिवाय जमिनीवर स्थिर राहता येत नाही आणि वस्ती करता येत नाही. आकाशातल्या ग्रहगोलाच्या गतीचे मोजमाप त्याला करावे लागते. म्हणजे ज्योतिर्ज्ञान पहिल्यांदा. म्हणजे असा हा कार्यकारणभाव, की ग्रहगोलाच्या गतीचा शेतीशी संबंध आहे, प्राणी आणि वनस्पती यांच्या उत्पत्तीशी संबंध आहे, वाढीशी संबंध आहे, हा कार्यकारणभाव त्याला कळला. हा कळल्याबरोबर क्रांती होऊ लागली.

या क्रांतीमध्ये अत्यंत महत्त्वाची क्रांती म्हणजे त्याला अग्नीचा शोध लागला. अग्नी त्याला दिसतच होता. आकाशात वीज चमकत होती. ती पडली म्हणजे काहीतरी जळतच असे. धक्का लागत असे. एकदम झाड जळून जायचे. वीज कोसळली म्हणजे जंगलाला आगी लागायच्या; परंतु घर्षणातून अग्नी उत्पन्न होतो, गतीतून अग्नी निर्माण होतो, हे त्याच्या लक्षात आले. दोन गारगोट्या एकमेकांवर आदळल्या की ठिणगी पडते आणि ती ठिणगी कापसासारख्या मऊ पदार्थावर टाकली, की तिथे लगेच जाळ उत्पन्न होतो, हे त्याला कळल्याबरोबर, हा कार्यकारणभाव कळल्याबरोबर, सृष्टीवर विजयाची खात्री झाली. अग्नी ताब्यात आला. वीज ताब्यात आल्यानंतर केवढी क्रांती झाली. वीज ही हजारो वर्षे सुसंस्कृत मनुष्य आकाशात पाहत होता. पण आता ताब्यात आल्याबरोबर केवढी क्रांती झाली. 'ग्लोबल व्हिलेज'ची कल्पना आहे. म्हणजे ही सबंध पृथ्वी वीज समजण्याच्या अगोदर म्हणजे १०० वर्षांपूर्वीच्या काळामध्ये केवढी तरी होती! आता सबंध पृथ्वी लहानशा खेड्यासारखी झालेली आहे.

माझा जन्म खेड्यातला आहे. धुळे जिल्ह्यात पिंपळनेरचा. मला लहानपणचे आठवते. १९१०-११ सालचे जीवन. दीड-दोनहजार वस्ती होती. या टोकावरून ओरडले की त्या टोकावर आवाज जात असे. हाकारल्यानंतर होकार येत असे. आता ही सगळी पृथ्वी अशी झालेली आहे. माझे पिंपळनेर जसे होते, १९१० साली दीड-दोन हजाराचे खेडे, तसे हे जग झाले आहे. कारण वाईत किंवा कऱ्हाडमध्ये एका लहानशा खोलीत बसून मी टेलिफोन लावतो. माझा मुलगा आणि मुलगी न्यूयॉर्कला आहेत. आठ हजार मैलावर मी टेलिफोन लावतो आणि ते माझे बच्चे माझ्याशी हळूहळू बोलतात. म्हणजे माझ्या खोलीत असताना जसे बोलतात. तसे बोलतात. इतक्या जवळून बोलतात. मित्र आणि मैत्रिणी आठ हजार मैलांवरून कानगोष्टी करतात. अगदी गुजगोष्टी करत असतात.

म्हणजे हा सगळा पृथ्वीचा गोल एक 'व्हिलेज' झालेला आहे. एक ग्राम बनलेले आहे. ही क्रांती विजेने झालेली आहे. तर पहिल्यांदा जेव्हा अग्नी सापडला, अग्नीचा कार्यकारणभाव सापडला, त्याबरोबर तो शत्रूवर अधिक मात करू लागला. अग्नीच्या योगाने तो धातुमिश्रित

अशी माती  गाळून धातू वेगळे करू लागला. ब्राँझची हत्यारे तयार करू लागला. पुढे त्याला लोखंड वेगळे करायला यायला लागले. पुढे त्याची हत्यारे तो करू लागला. म्हणजे अग्नी सापडल्याबरोबर सुसंस्कृत माणूस जो आहे तो या पृथ्वीच्या पाठीवर दिसायला लागला. असा हा अग्निशोधाचा फार मोठा महिमा आहे, म्हणून ग्रीक पुराणकथेमध्ये याचे फार सुंदर  सूचक रीतीने वर्णन केलेले आहे. प्रॉमिथिअस हा जो देवगणातला पुत्र, त्याने माणसाला अग्नी दिला. अग्नीचे गुपित सांगितले. त्याबरोबर झ्यूस हा जो त्यांचा इंद्र, म्हणजे देवांचा राजा, तो रागावला. त्याला वाटले, हे गुपित कळल्यामुळे आतापर्यंत देवापुढे नम्र असलेली, आहुती देणारी, प्रणाम करणारी, बळी देणारी ही माणसे माजतील की काय? एवढी मोठी ताकद तू दिलीस म्हणून त्याला एका उघड्या खडकाला बांधला आणि गिधाडे त्याचे काळीज खाऊ लागली. अशी भयंकर शिक्षा त्याला दिली. आपल्याकडे अग्निहोत्री असतात. अग्निहोत्राकरिता विस्तव लागतो. पिंपळाची दांडी छान, स्वच्छ घ्यायची. ती घुसळून घर्षणाच्या योगाने जो अग्नी निघेल तो होमाला वापरावयाचा असतो. अथर्वन् ऋषींनी अग्निमंथनाचा प्रचार केला, असे ऋग्वेदात म्हटले आहे.

म्हणजे तिकडे जसा प्रॉमिथिअस आहे तसा इकडे अथर्वन् ऋषी आहे. हे सहज जाताना मी सांगतो. पण अग्नीच्या निर्मितीची कथा ही मानवी इतिहासामध्ये मानवी संस्कृतीच्या प्रगतीचे एक पाऊल पुढे कसे पडले याची कथा. चाकाचा शोध झाला आणि यंत्रयुगाला प्रारंभ झाला. चक्र सापडल्याबरोबर माणसाच्या संस्कृतीला गती आली. म्हणजे ज्ञानाची जी वाढ झाली ती काळाच्या गरजेतून झालेली आहे. म्हणून ज्ञानी माणसे जे संशोधन करतात, ते काळाची गरज पाहून करतात असे काही लोक म्हणतात. ज्ञानाची उपासना कशाकरता करायची, विज्ञानाची कशासाठी करायची, तर काळाच्या गरजेप्रमाणे करायची; परंतु पुष्कळ वेळा काळाची गरज काहीही असली, तरी ज्ञानी माणसाची सत्यजिज्ञासा ओढ घेत असते. सत्य हे स्वयंसुंदर आहे. जे स्वयंसुंदर आहे, स्वयंपवित्र आहे, अंत:करणाला उल्हसित करणारे आहे त्याच्याकरता हा शोध घ्यायचा. हे कशाकरता? असे विचारायचे नसते. कमळाचे फूल जे आहे त्याला फळ नाही, पण ते सुंदर आहे. फळ नसले म्हणून काय झाले? कमळ हे आवडतेच माणसाला. गुलाबाच्या फुलाला फळ नसते. ते आवडते! चाफेकळी नाक जे आहे त्याचा काय उपयोग आहे कोणास ठाऊक. श्वासोच्छ्वासाला नाक कसेही असले तरी चालते, अगदी सांडग्यासारखे असले तरी चालते. तर सत्य हे स्वयंसुंदर, त्याची उपासना माणसे करीत असतात. आज ज्ञानाचा, विज्ञानाचा इतिहास पाहिला असता, हे आपल्या लक्षात येते, की ज्यांनी अत्यंत मौलिक क्रांतिकारक शोध केलेले आहेत ते शुद्ध ज्ञानोपासक होते.

न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला आणि दोनशे वर्षे न्यूटनने वैज्ञानिक जगावर साम्राज्य गाजविले. त्यानंतर फॅराडे त्याच सुमाराचा. फॅराडेने इलेक्ट्रिसिटी म्हणजे वीज आणि

मॅग्नेटिझम म्हणजे चुंबकशक्ती या दोन्ही शक्तींचा मेळ बसविण्याचा प्रयत्न केला. त्यात तो रमला होता. त्याच्या मानाने आज फार मोठी प्रगती झालेली आहे. पण न्यूटनच्या काळामध्ये आणि फॅराडेच्या काळामध्ये इंग्लंडला जगामध्ये व्यापार करून संपत्ती मिळवायची होती. ज्योतिषशास्त्राला अधिक सूक्ष्म ज्ञान लागते. म्हणून आपल्या गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत शोधून ज्योतिषशास्त्रावर न्यूटनने संस्कार केला. फॅराडेच्या काळामध्ये म्हणजे या १०० वर्षांच्या काळामध्ये एनर्जी, ऊर्जा याची गरज सगळ्याच जगाला, इंग्लंडलाही जास्त होती. त्या गरजेमुळे ही जी दोन ऊर्जेची स्वरूपे आहेत - मॅग्नेटिझम आणि इलेक्ट्रिसिटी - याचा सांधा आणि संबंध ओळखण्याचा आणि शोधण्याचा आणि त्याचा निकटपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न फॅराडेने केला आणि तो करत असताना रात्र-दिवस तो तन्मय होऊन गेला. समाधी लागत होती. कशाकरिता? त्याला कसलेही पेटंट मिळवायचे नव्हते. न्यूटनला कसलेही पेटंट मिळालेले नाही. उपयुक्त पदार्थ तयार करणारे जे वैज्ञानिक आहेत त्यांना पेटंट मिळत असतात. ज्याने विजेचा दिवा शोधला, टेलिफोन शोधला, तारयंत्र शोधले, जो अमेरिकेचा मोठा संशोधक झाला त्याला १२०० पेटंट मिळाले. काहींना काही मिळाले नाही तरी प्रश्न नसतो. अणुशक्तीचा अर्थ, तिचे स्वरूप शोधणारे जगातले तीन मोठे शास्त्रज्ञ होऊन गेले. आइन्स्टाईन हा त्यांच्यातला मोठा, दुसरा रुदरफोर्ड, तिसरा नील्स वोर. नील्स बोरने सांगितले की, अणू जे आहेत ते सूर्यमालेसारखे आहेत. त्यात ते सारखे फिरत असतात. हे जे त्यांनी स्वरूप ठरविले हे कल्पनाशक्तीने, कविशक्तीने ठरविले, कविप्रतिभेने ठरविले. अणू काही दिसत नसतो. अणूची रचनाही दिसत नसते. यंत्रातसुद्धा दिसत नाही. हे न दिसणारे सौख्य आहे. कवी जसा कल्पनाशक्तीने काही विलक्षण अशा रीतीने सांगत असतो आणि मग ते सगळ्यांना पटते, अगोदर काही माहीत नसते.

शेक्सपिअरचा मॅकबेथ आहे. तो त्याने लिहिल्यानंतर पटतो. रोमियो-जुलिएट वाचल्यानंतर पटतात. पण अगोदर आपणाला त्यांची काही कल्पना येत नाही. अशा तऱ्हेने विज्ञानवेत्ते जे शोध लावतात ते लागेपर्यंत त्यांचा काहीही अर्थ आपल्याला माहीत नसतो. ते त्यांनी कल्पनेने उत्पन्न केलेले असते. ते निर्माण झाल्यानंतर मग त्याची उपयुक्तता कळते. रात्री १-२ वाजेपर्यंत हे लोक काम करत असतात. टाइपिस्टना ते मजकूर देत असतात; पण ज्या वेळेस टाइपिस्ट घोरत असतात तेव्हा शांतपणे यांचे काम चाललेले असते. अशा रीतीने यांची उपासना रात्रंदिवस चाललेली असते. कारण त्यांना ज्ञानाचे वेड आहे. ज्ञानाचे प्रेम आहे. जगावर उपकार होवो न होवो, सत्य हेच सुंदर आणि शिव. अशा रीतीने त्यांची ती उपासना चाललेली असते. अशी ज्ञानाची उपासना करणारी माणसे जेव्हा संस्कृतीत उत्पन्न होतात तेव्हा अत्यंत मौलिक शोध होतात आणि संस्कृतीची शक्ती ही फार मोठी होते. अशा तऱ्हेची शक्ती पश्चिमी देशांमध्ये वाढविणारे केवळ शुद्ध ज्ञानोपासक झाले आहेत म्हणून असे म्हणता येईल, की ज्ञानाची वाढ व विज्ञानाची वाढ ही दोन पद्धतींनी होते. एक उपयुक्ततावाद.

म्हणजे उपयोग काय आहे त्या शोधाचा? असा प्रश्न करीत शोध करत जातात आणि दुसरा म्हणजे काही नाही. काय आहे रहस्य या सृष्टीचे? या घटनांचे? एवढेच जाणण्याचा हेतू. अशा रीतीने शोध लागलेले आहेत. कोणतेही पेटंट मिळवायचे नसतात त्यांना. पण त्या शोधातून संस्कृती पुढे जात असते. हा संस्कृतीचा आणि विज्ञानाचा फार महत्त्वाचा संबंध आहे आणि दोन्हीच्या पाठीमागे म्हणजे कला आणि विज्ञान यांच्या पाठीमागे जी शक्ती लागते, ती शक्ती सर्जनशक्ती, नवनिर्माणशक्ती लागते, प्रतिभा लागते. मग त्या प्रतिभेने सबंध समाजाला ते पुढे नेतात. त्या शोधाच्या आधाराने अर्थात हे जे शोध लागत असतात, ज्ञान वाढत असते, त्याला एक एक प्रतिभाशाली शक्ती जशी कारण असते, तसेच मागच्या पिढ्यांच्या अनेक माणसांचे व समकालीनांचे शोध कारण होत असतात. म्हणून संस्कृती जी निर्माण होत जाते तिच्यामध्ये सहकार्य हे फार मोठे तत्त्व आहे. स्पर्धेमुळे माणसे पुढे जातात. राष्ट्रे पुढे जातात. पण ज्ञानाचे क्षेत्र जर आपण पाहिले, तर त्याच्यामध्ये स्पर्धेचा काही उपयोग होत नाही. एकाने शोध केला, दुसऱ्याने केला, तिसऱ्याने केला, ते सगळे शोध एकत्र होतात. आणखी पाचवा शोध लागत असतो. अशा रीतीने सहकार्याने माणसाचे हे ज्ञान पुढे जात असते. म्हणून संस्कृतीची वाढ आणि रचना ही तिची जी मूलभूत प्रेरकशक्ती आहे ती सहकार्य आहे आणि सहकार्यानेच माणूस सारखा पुढे जात असतो.

आजपर्यंतच्या निरनिराळ्या संस्कृतीचा जर आपण अभ्यास केला तर हे लक्षात येईल, की मोठमोठ्या नगरसंस्कृतींचे विचित्र स्वरूप, रचना इतिहासामध्ये दिलेली आहेत. प्राचीन काळच्या फार मोठमोठ्या संस्कृती ज्या आहेत त्या वाढल्या महानद्यांच्या काठी. महानद्यांच्या काठी अपरंपार अशा तऱ्हेचे धान्य, जीवनपोषक द्रव्ये निर्माण होत असतात. कारण संस्कृतीची वाढ ही शिलकीवर होत असते. ज्यांच्यापाशी शिल्लक काही नाही त्यांची संस्कृती वाढत नाही. संस्कृती शिलकीवर वाढते. म्हणजे काही लोकांना पोसण्याची, त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी घ्यावी लागते. त्याशिवाय संस्कृतीची वाढ होत नाही. म्हणून महानद्यांच्या काठी संस्कृती वाढलेली आहे. धन-धान्य उत्पन्न होते, ते साठवावे लागते. साठविल्यावर त्याच्या योगाने जगातील दुसऱ्या प्रदेशातील जे धन आहे, वेगळ्या अशा प्रकारचा माल आहे तो आणावा लागतो. तो आणायचा, तर आपल्यापाशी काही असावे लागते, देण्यासारखे. तर हा देवघेवीचा प्रचंड असा प्रकार आहे. प्रचंड व्यवहार आहे. म्हणजे आर्थिक सुबत्ता जी आहे ती निर्माण व्हावी लागते. अशी आर्थिक सुबत्ता निर्माण होत असताना पुढे जाता येते. पुष्कळ वेळा लोक असे म्हणतात, की हे तुम्ही भौतिक संस्कृतीचे सगळे वर्णन करता आहात. आध्यात्मिक संस्कृतीचे काय झाले?

आध्यात्मिक संस्कृती ही भौतिक संस्कृतीवरच उभी असते. पंढरीचा विठोबा जसा विटेवरी उभा आहे तशी ही आध्यात्मिक शक्ती जी आहे, ती भाकरीवर उभी असते. ज्या लोकांना अन्न, वस्त्र, पाणी, गृह आणि कायमचे स्वास्थ्य मिळते तिथेच आध्यात्मिक संस्कृती

वाढत असते. महाभारत लिहिणारे व्यासादी मुनी आहेत. ते जर शेतातच काम करीत राहिले असते आणि बैलाच्या पाठीमागे नांगर चालविण्यामध्ये किंवा मोट हाकण्यामध्ये जर असते, तर त्यांना महाभारत लिहिता आले नसते. महाभारत लिहिण्याकरिता त्यांच्या पोषणाची जबाबदारी लागते. म्हणजे उसंत लागते. ती उसंत केव्हा देता येते? शिल्लक असेल तर! जो धान्य, वस्त्र, इतर वस्तू निर्माण करतो, त्याने या स्वत: भोगायच्या, त्याने आपल्या जीवनाला वापरायच्या; पण इतक्या उत्पन्न करायच्या, की त्या दुसऱ्यालाही द्यायच्या. अशा सहकार्याच्या योगाने संस्कृती ही पुढे जात असते. हा जो संबंध आहे, तो लक्षात घेतला पाहिजे. महाभारत, त्याच्यातील भगवद्‌गीता ही पाहिली असताना त्यांची भौतिक संस्कृती मोठी होती हे लक्षात येते. भौतिक संस्कृती जर नसती, तर हे शक्यच नाही. ही फार मोठी मंदिरे म्हणजे भौतिकच असतात. सुंदर अशी कृष्णाची, विष्णूची मूर्ती जर केली, तर ती भौतिक असते. त्याच्याकरिता लागणारी छिन्नी ही भौतिक असते. कला, काव्य, अभ्यास व चिंतन ही सगळी आध्यात्मिक संस्कृती आहे. पण त्यांच्या पाठीमागे भौतिक संस्कृतीचेच अधिष्ठान लागते. शरीराचे अधिष्ठान लागते. शरीरमाद्यम् खलु धर्म साधनम् असे म्हटलेले आहे. तर शरीराचे बळ लागते आणि शरीराचे बळ म्हणजे साहस बळ आहे. म्हणून आध्यात्मिक संस्कृती आणि बौद्धिक संस्कृती यांच्यात विरोध नाही. यांच्यामध्ये एक प्रकारचे तादात्म्य आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. हे जे तादात्म्य आहे त्याच्यामध्ये एक खूण लक्षात ठेवली पाहिजे, चिंतन केल्याशिवाय सत्याची नित्य उपासना करता येत नाही.

**(यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला, कराड नगरपरिषद, कराडच्या सन १९८१च्या सत्रात 'विज्ञान व मानवी मूल्य' या विषयावील व्याख्यानत्रयीतील दुसरे पुष्प, दि. १३ मार्च, १९८१ पूर्वप्रसिद्धी : नवभारत, फेब्रुवारी - मार्च १९९१, पृ. ८१ ते ८७)**

ooo

५८

# भारतीय संस्कृतीच्या विकासाची दिशा

बंधू भगिनींनो, भगिनी आहेत की नाहीत हे मात्र पहावे लागेल, म्हणून मध्ये थांबतो, भारतीय संस्कृतीच्या विकासाची दिशा ह्या विषयाकरिता ह्या विषयाच्या विस्ताराकरता आवश्यक ते चिंतन इथे झालेले आहे, तर ह्या चिंतनाकरता आवश्यक अशी जी माहिती लागते ती माहिती अगोदरच्या व्याख्यानातून आपल्याकडे आलेली आहे. भारतीय संस्कृती ही जगातील अत्यंत प्राचीन संस्कृतींच्यापैकी एक संस्कृती आहे. अनेक प्राचीन संस्कृती अस्ताला गेल्या, काही फार योगदान जगाच्या संस्कृतीला देऊन अस्ताला गेल्या, अशा अनेक संस्कृती गेल्यानंतर त्या संस्कृतीच्या काळातच विकास पावणारी, स्थिरावणारी अशी ही भारतीय संस्कृती अजून चालू आहे. दोनच अत्यंत प्राचीन संस्कृती अखंडपणे जगात सुरू आहेत, त्या म्हणजे चिनी संस्कृती आणि भारतीय संस्कृती. आपण तिला हिंदू संस्कृती भारतातल्या संस्कृतीला हिंदू संस्कृती का म्हणत नाही ? ह्याची चर्चा व्हायला पाहिजे होती. झाली असेल. हिंदू संस्कृती हा शब्द किंवा हिंदू शब्द हा आपल्याला हिंदूचे म्हणून जे धर्मग्रंथ आहेत, किंवा इतर ग्रंथ आहेत त्यामधे निर्देश सापडत नाहीत. हिंदू केव्हा म्हणायला लागले? भारतीय हिंदू हे स्वतःला याचाही नीट पत्ता लागत नाही. म्हणून 'भारतीय' हा शब्द वापरला हे आपण फार चांगले केले.

निदान एक त्याचा अर्थ स्पष्ट आहे की ह्या देशामध्ये सिंधू नदीपासून ते कन्याकुमारी पर्यंतचा किंवा हिमालया पासून कन्याकुमारी पर्यंतचा जो प्रदेश आहे तो निश्चित भारत म्हणून माहिती आहे आणि तो फार प्राचीन आहे. कारण भरत हा शब्द आणि भारत हा शब्द ऋग्वेदातही सापडतो. 'विश्वामित्रस्य रक्षाति ब्रह्मेऽदय् भारतम् जनम्' असे ऋग्वेदांत म्हटले आहे. विश्वामित्राचे स्तोत्र, ब्रह्म म्हणजे स्तोत्र हे ह्या भारतजनांचे रक्षण करीत आहे असा तिथे निर्देश आहे. ऋग्वेद गृहीत धरला म्हणजे लक्षात येते की, साहित्य रूपाने भारतीय

संस्कृतीचा आरंभ ऋग्वेदपासून म्हणून तेव्हापासून आतापर्यंतची ही संस्कृती आहे, आणि त्याच्या पूर्वीची पुन्हा संस्कृती, सिंधू संस्कृती तिला अलिकडे म्हणतात. हडप्पा आणि मोहनजोदडो इथे जे अवशेष प्राचीन एका संस्कृतीचे सापडले आहेत ती वेदपूर्व संस्कृती असण्याची फार शक्यता आहे आणि सर्वांचे ह्या बाबतीत एकमत आहे. ती संस्कृती ही 'नगर संस्कृती' होती हे निश्चित झालेले आहे. तर या भारतीय संस्कृतीचा इतिहास ५००० वर्षांचा आहे. जवळ जवळ असे आपण म्हणू. वेदांचा काळ, विशेषत: ऋग्वेदाचा काळ, पश्चिमी पंडितांनी जो ठरविलेला आहे, निश्चितपणे तो म्हणजे ऋग्वेदाची अलीकडची कालमर्यादा सांगितली आहे. ती म्हणजे इ. स. पूर्वी १२०० वर्षे आणखीन पाठीमागे जाऊ शकता. पण कमीत कमी इ.स. पूर्व १९०० वर्षे मानावेच लागते तर त्याच्या पूर्वीची इ. स. २००० पूर्वीची जवळ जवळ, ४००० वर्षांची संस्कृती म्हणजे 'सिंधू संस्कृती.' सिंधू नदीच्या काठची नगर संस्कृती. एवढा हा काळ गेलेला आहे. या संस्कृतीचे भौतिक आणि आध्यात्मिक स्वरुप हे दोन्हीही लक्षात घ्यावे लागते.

संस्कृती ही मनुष्य निर्माण झाल्यानंतर त्याने जे आपल्या भोवतालचे जग बदलण्यास सुरुवात केली. निर्माण करण्यास सुरुवात केली, तेव्हापासून आतापर्यंत मनुष्यप्राणी स्वतःच्या जगात म्हणजे संस्कृतीत जगत आला, संस्कृती वाचून जगणे त्याला अशक्य आहे. म्हणजे आपल्या समोरचे, भोवतालचे जे जग आहे, ते जाणून घ्यायचे, अनुभवायचे, ते अनुभव आणि जाणीव मनामध्ये साठवून घ्यायची आणि त्यात बदल करायचा. तो बदल होत असताना ते जाणीव आणि अनुभव हेही संपन्न होत असतात. आणि बदलत असतात. भोवतालचे जे जग आहे तेही माणूस बदलत असतो. बदलल्याशिवाय, संस्कार केल्याशिवाय म्हणजे त्याच्यात एक विशिष्ट तऱ्हेचा आपल्या जीवनास अनुकूल असा गुण (क्वालिटी) निर्माण केल्याशिवाय त्याला ते भोगता येत नाही. भोगलं तर रोगमय, 'भोगे रोगभय:' कच्चे अन्न खाल्ले, निसर्गात आले तर ते पचते? 'सर्व वान्वता, पथ्य' जे बलवान आहेत त्यांना सगळेच पचते. नाही असे नाही, नेहमी नाही अर्थात पचतं, पण काही काळ पचतं. अंगी बळ असलं की खाल्ले की पचतेच असे नाही पण जेव्हा त्यांच्या लक्षात आले की जे शिजलेले पदार्थ आहेत, अग्निसंस्कार झालेले पदार्थ आहेत, ते अधिक चांगल्या रितीने पचतात, मानवतात. तेव्हा त्यांनी अग्नी पकडला, अगोदर अग्नी पकडेला अग्नी पकडल्यापासून, वीज पकडण्यापर्यंत भौतिक संस्कृतीचा विकास झालेला आहे. चीज़ पकडता आता येऊ लागली आहे.

भौतिक शक्ती ताब्यात घेणे आणि त्यांना आपल्या जीवनाला अनुकूल अशात तऱ्हेने आकार देणे, ही मनुष्याची गरज आहे. उत्पादन प्रक्रिया म्हणजे पदार्थ उत्पादन करायचे म्हणजे निसर्गामध्येच ते पदार्थ निर्माण करायचे जे निसर्गात दिसतात त्याची वाढ करायची

जे जीवनानुकूल असतील ते, आणि जीवनाला प्रतिकूल असतील ते बाजूला करायचे, नष्ट करायचे. ही प्रक्रिया चाललेली आहे म्हणजे आर्थिक जीवनाची ही बाजू आहे. आणि आर्थिक जीवनाची जी बाजू आहे त्याची दुसरी बाजू म्हणजे आध्यात्मिक बाजू, म्हणजे मानसिक बाजू; मानसिक बाजू काय असते तर सृष्टी पाहून तिचा कार्य कारणभाव कळल्याशिवाय ती बदलता येत नाही. तिचा गुणधर्म कळल्याशिवाय ती बदलत नाही म्हणजे ही मानसिक बाजू झाली. मनुष्य जे पाहतो, त्याचा अर्थ करतो त्यातून कार्यकारण भाव पाहतो, आणि तो पाहिल्यानंतर तो बदलतो. की विस्तवामध्ये पदार्थ हे चांगले शिजतात. तर विस्तव पकडला पाहिजे. विस्तव पकडता आला तर शत्रूवर हल्ला नीटपणे करता येतो तो पकडला पाहिजे. विस्तवाच्या योगाने अनेक पदार्थं तयार करता येतात, अग्नीचा शोध हा मनुष्याच्या संस्कृतीमधे पहिला शोध आहे. म्हणून ऋग्वेदातील मनुष्य हा अग्नीपूजक आहे, अग्नीचा महिमा त्याला कळलेला आहे. अग्निपूर्वभिः ऋषीभिः इधः नूतनैःऋतः ।" अग्नी हा प्राचीन ऋषींनी स्तवलेला आहे, आराधिलेला आहे, आणि आधुनिक ऋषीही ते करतात. त्या अग्नीची आराधना अजून सुरूच आहे. 'हीट' ही सगळयाच गोष्टीला लागते. जिला अलीकडे 'ऊर्जा' असे म्हणतात. ऊर्जेचे रूपही अग्नीसारखे आहे आणि ऊर्जेची फारच गरज आहे तर त्या अग्नीचे स्तवन आराधन मनुष्य करायला लागल्यापासून आतापर्यंत चालू आहे. ही जी भौतिक संस्कृती आहे ती जगामधल्या सगळ्या संस्कृतीचे लक्षण आहे आणि आध्यात्मिक त्याची बाजू म्हणजे मानसिक बाजू की त्याच्याबद्दलचे त्याचे विचार,

विश्वाबद्दलचे विचार आणि मनुष्य पहिल्यांदा जो विचार करू लागला तो नुसता समोर काय आहे त्यांचा नाही, डोक्यावर काय आहे, पायाखाली काय आहे, जमिनीखाली काय आहे ? ह्याचा विचार करायला लागला. म्हणजे मनुष्याचे जे डोळे आहेत ते डोळे असे वर जातात. भोवतालचे जग पाहतो, त्याचा अर्थ करायचा प्रयत्न करतो अन् म्हणूनच जगतो. सबंध जग पाहिल्याशिवाय जगता येत नाही त्याला. म्हणून त्याला ऋतुचक्र ठरवावे लागले. जगातले पहिले विज्ञान जे आहे, ते ज्योतिर्विज्ञान ज्योतिष. कारण महिने तो मोजतो, ऋतु मोजतो म्हणजे त्याला शिकारही नीट करता येते आणि त्याला शेतीही नीट करता येते. शेती करता ऋतुचे ज्ञान लागतेच. नांगऱ्या आपल्या त्याला काय नांगर टाक. त्याला काय कळायचे? त्यालासुद्धा काही एका प्रमाणात विश्वाच्या चक्राचा विचार करावा लागतो. त्याला ऋतुज्ञान लागते, म्हणून फॉर्मुसने एकाने सांगितले एका ठिकाणी सांगितले. इथले जे खेडे आहे ते त्याला फार चांगले वाटले. म्हणून इथला कॅलेंडर वेअरर म्हणजेच पंचांग घेऊन जाणारा सांगत होता की आता पावसाळा येणार आहे. पावसाळा येणार हे अगोदरच कळवावे लागते म्हणजे शेतीची तयारी करायला येते. त्याचप्रमाणे निरनिराळ्या ऋतूंमध्ये निरनिराळे पक्षी, प्राणी, वनस्पती हे निसर्गाचे ज्ञान लागते. म्हणून ह्या दोन्ही गोष्टी, सृष्टीचा अर्थ समजणे, कार्यकारण भाव समजणे ही मानसिक संस्कृती आणि दुसरी सृष्टीमध्ये बदल

करण्याची शक्ती युक्ती असणे ही युक्ती अर्थात हातातून निघते म्हणून हस्त म्हणजे हात आणि मस्तक यांचा सांधा संस्कृतीमधे कायम राहतो. म्हणून त्या भौतिक आणि आध्यात्मिक ह्या दोन बाजू जगातल्या सगळ्या संस्कृतींना असतात.

आपले जग हे निर्माण करूनच त्याच्यात तू जग असा संकेत निर्माण करून दिला आहे. निसर्गाने माणसाला, तू आपले जग बदलल्याशिवाय, वाढवल्याशिवाय तुला जगता येणार नाही. शेती केल्याशिवाय तुला जगता येणार नाही. हत्यारे बाळगून, त्या हत्याऱ्यांच्या मदतीने वस्तू निर्माण केल्याशिवाय तुला जगता येणार नाही. तुला निसर्गाने घर दिलेले नाही. गुहा हे तुझे घर नाही. ते वाघाचे घर आहे. घर, झोपडी तू तयार कर, त्यात तू रहा. अशारितीने वाघाला नखं आहेत, तुझी नखं काही उपयोगाची नाहीत. एकमेकाला बोचकारतांनाही ती उपयोगी पडायची नाहीत. तुला नखं निर्माण केली पाहिजेत, म्हणजे धातूपासून साधनं निर्माण केली पाहिजेत. ‘अवजारे’, तुला नांगर निर्माण केले पाहिजे म्हणजे हे भोवतालचे जग तू बदलत जा त्याचा उपयोग करत जा. परंतु हा जो भाव आहे, विचार आहेत, हे निर्माण करण्याची निसर्गतःच माणसाला शक्ती दिली आहे. ती आणून सामाजिक माणसाचे ‘सामाजिकीकरण’ मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. एकटा राहू शकत नाही. जगात असा कोणताच प्राणी नाही की जो एकटा आहे. ‘थिंग्ज लिव्ह इन सोसायटी’ वस्तू ज्या राहतात त्या त्यांच्या समाजात राहत असतात. अहो, वाघ एकटे आणि सिंह एकटे फिरतात. हो परंतु आपण असे पाहतो की सौराष्ट्रामधे सिंहाचे वन आहे. सिंह आणि सिंहीणी लागतेच. ती रीतच आहे. प्रश्नच नाही आणि ते विहित असतात म्हणून त्यांचे कुटुंब असते म्हणून सामाजिकता जी मनुष्याला असते ती त्याच्या बोलण्याने, एकमेकांना सांगण्यात दृढ असते म्हणून भाषा ही जी आहे ती सामाजिकता दृढ करणारे साधन आहे. याच्याने एकमेकांचे आशय एकमेकांना पुरवले जातात, सांगितले जातात. अशी परिस्थिती आहे.

दुसरे म्हणजे माणसा-माणसांमधले जे आकर्षण आहे, ते स्त्री-पुरुषांमधील सामाजिकीकरणाची फार मोठी शक्ती आहे. ही सामाजिकीकरणाची शक्ती भाषेपेक्षाही फार प्रबळ आहे. कारण निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या आणि एकमेकांना न ओळखणाऱ्या स्त्री-पुरुषांची लग्ने होतात. भटजींनी जरी आशीर्वाद दिला नाही. भटजी तरी होतात. उदा. व्यासांचे वडील म्हणजे पराशरमुनी आणि ती कोळीण ह्यांचे लग्न झाले. तात्पुरते लग्न हो. आणि मुलगा झाला त्यांना. त्याला म्हणतात वेदव्यास. तो कसा झाला. तो एक वेदश्रेष्ठ ब्राम्हण आणि ती कोळीण, लग्न होऊन गेले आणखीन एक योगऋषी उत्पन्न झाला. आपण लक्षात घेतले पाहिजे निरनिराळ्या प्रदेशांतील स्त्री- पुरुष एकत्र आले म्हणजे आकर्षण वाटते आणि मिसळ होते. मिसळ झाल्यानंतर प्रजा उत्पन्न होते. आणि ठणठणीत होते. भिन्न जातीच्या प्रजा एकमेकांत मिसळल्या म्हणजे स्त्री- पुरुष की ठणठणीत! म्हणून चार्वाक, चार्वाकाचा अभ्यास करणारे आमचे मित्र इथे आहेत. विवाहित बहुधा गेले असतील आता.

तर साळुंखे साहेब यांना मी श्लोक सांगतो चार्वाकाचा.

**अनादौं खलु संसारे, जाग्रति मकर ध्वजै ।**
**कुलेच कामिनी मुले का जाती परि कल्पना ।**

कधी मनुष्यजात उत्पन्न झाली, मनुष्यजातीचा संसार कधी सुरू झाला हे काही सांगणे कठीण आहे. मकरध्वज म्हणजे कामदेव हा कधी झोपत नाही. तो आला म्हणजे झोप नाहीशी करतो तर हा जाग्रती तो तर जागाच असतो. कामदेव जागा असताना, कामिनीमुळे म्हणजे स्त्रीमुळे कूळ आहे. पुरुषामुळे कूळ नाही, बाईमुळेच होत असते. पुरुषाला होते हे फार उशिरा माणसाला कळले म्हणजे ते पुरुषाचे आहे. हे तर कुळेच कामिनी मुले कुळं हे बाईकडून सुरू असते. पुरुष काही बाळंतीण होत नाही.

तर अशा परिस्थितीत का जाती परिकल्पना! तर जाती जाती काय म्हणताय हो ! मनुस्मृती काढता आणि सांगता की देवाने चार वर्ण निर्माण केले. संकर करू नये. भगवद्गीतने म्हटले आहे, 'संकरौनरकायो:।' तर संकर होता कामा नये. भिन्न भिन्न जातींचे परंतु संकर होतच आले आणि भारत हे एक उदाहरण आहे. अमेरिकेत ब्लॅक माणि व्हाइट, गोरे आाणि काळे हे भाग आहेत. इथे गोरे आणि काळे हे भागच एक होऊन गेले आहेत. ब्राम्हण चेहऱ्याकडे पाहून ओळखता येणार नाही. माझ्या चेहऱ्याकडे पाहून ओळखता येणार नाही माझ्यासारखे छान छान अनेक महार, मी पाहिले आहेत. मांग पाहिले आहेत. तर मी सांगतो की मी ब्राम्हण आहे, भार्गव कुलोत्पन्न आहे, पंचप्रवरी आहे, मी यजुर्वेदी आहे असे मी सांगतो. म्हणून तुम्हाला हा ब्राम्ह्मण वाटतो. बरं वेद म्हटला म्हणजे ब्राह्मण असे सांगता येत नाही. कारण अनेक कुंभार अशी गोष्ट सांगतात, काशीला वेदाध्ययन करून इकडे आले अन् वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण म्हणून इकडे वंश सुरू केले. अशी कथा आहे. त्याचा अर्थ असा की ह्या देशामध्ये निसर्गतः वंश म्हणतात तसे नाही. सगळे वंश मिसळले आहेत. याचे कारण नरक नाही. ह्याच्याने स्वर्ग निर्माण होत असतो. भगवद्गीतेमध्ये म्हटले आहे नरक निर्माण होतो. म्हणून, पण स्वर्ग निर्माण होतो. स्वर्ग निर्माण होतो म्हणजे कसा होतो! ह्याची एक उपपत्ती आहे. ती म्हणजे अशी की भिन्न ठिकाणी राहणारे मानववंश, पूर्वी भिन्न भिन्न ठिकाणीच रहात होते. मंगोलियन म्हणजे हल्लीचे ते चिनी आहेत, किंवा मध्य एशियातील लोकजमाती आहेत, किंवा जपानी लोक किंवा इशान्येकडचे जे भारताबाहरचे लोक आहेत. ते मंगोलियन, ते निराळ्या तऱ्हेचे त्यांच्या नाकाची ठेवण, त्यांच्या कातडीचा रंग, त्यांचे डोळे, म्हणजे त्यांच्या कपाळाची ठेवण सगळी निराळी आहे. निग्रोंची निराळी आहे, युरोपियनांची निराळी आहे असे निरनिराळे मानव वंश निरनिराळ्या ठिकाणी वाढते गेले. इथल्या हवापाण्यांनी त्यांचे रंग, त्यांची ठेवण, केसांचा रंग, निराळ्या तऱ्हेचे झाला. परंतु ते एकत्र येत गेले, उदा. भारतामध्ये जगातल्या सगळ्या वंशांचे मिश्रण झाले. म्हणजे

संकरांचे निरनिराळया वंशांचे एकत्रीकरणाचे उदा. म्हणजे भारत. त्यामधे नॉर्डिक आले, म्हणजे सोनेरी केसांचे, उच्च, गुलाबी रंगाचे, गोरेपान लोक इथे आलेले आहेत. काही गाडगीळ, काही भावे असे सापडतील. पण ते नव्हेत तर नॉर्डिक आहेत. त्याचप्रमाणे मेडेटेरियन आहेत, आम्ही सगळे मेडिटेरियनसारखे आहोत. त्याचप्रमाणे पिवळे लोक आहेत. तुम्ही पहा नेपाळी लोक कसे आहेत, नेपाळी लोक हे भारतीय संस्कृतीतील बंगाली मध्येही आहेत, त्यांच्या गालाची, डोक्याची ठेवण, त्यामधे मंगोलियन वंश आहे. अशा त्या देशामधे सगळया संस्कृती मिसळल्या आहेत. त्याचे उद्दिष्ट काय आहे.

निसर्गामधे काही उद्दिष्टे भरलेली असतात. तर उद्दिष्ट काय आहे. तर भिन्न भिन्न मानववंश निरनिराळया ठिकाणी राहत असताना जीवनासाठी जी संस्कृती निर्माण करतो, ज्या कला साध्य करतात, जे ज्ञान मिळवतात, आणि ते जेव्हा एकत्र येतात, आणि एकत्र येण्याचा ओढा कशाने निर्माण होतो, ? स्त्री- पुरुषांच्या ओढ्याने हा ओढा मोठा विलक्षण असतो. हा ओढा कोणत्याही तऱ्हेने अडवता येत नाही. असा हा ओढा आहे. घडवलाय जातिसंस्थेने. पण मोडलाय तो. हळूच मोडला जातो, उघडही मोडला जातो. अशा रीतीने ह्या देशामधे अनेक मानववंश एक झालेले आहेत. ते झाल्यानंतर जातीसंस्था उत्पन्न झालेली आहे म्हणून ही पंचाईत आहे की चेहरेपट्टीवरून, नाकावरून, रंगावरून काही जात ओळखता येत नाही. बोलण्यावरून ओळखता येते. पण बोलणे बदलता येते. चांगल्या रीतीने म्हणजे ह्या ठिकाणी जाती ह्या नाटकातील पात्रच आहेत. ती काही निराळी नाहीत, त्या तऱ्हेचे पोषाख, आचार, विचार, बदलता येतात. ह्या देशामध्ये जातिसंस्था, वंशांचे सरमिसळ मिश्रण झाल्यानंतर निर्माण झाली आहे. म्हणजे निसर्गतः जाती मोडल्यानंतर ह्या देशामध्ये जातीसंस्था आलेली आहे आणि ती मनातून जातच नाही बिचारी. त्यामुळे आमच्या मनामधे गोंधळ उत्पन्न होतो. पण आता ह्यापुढे ही एक मोठी मानवजातीच्या संस्कृतीच्या विकासाची खूण आहे की भारतामध्ये सगळे मानव वंश मिसळलेले आहेत. आणि एकत्र राहिलले आहेत. ह्या ठिकाणी एक चांगली भौतिक संस्कृती निर्माण झाली आहे आणि त्याबरोबर मानसिक संस्कृती उत्पन्न झाली. मानसिक संस्कृती साहित्याच्या रूपाने चिरस्थायी झाली मी सांगितले.

जगातील दलित साहित्य धार्मिक रूपाने पहिल्यांदा जे अस्तित्वात आले ते ऋग्वेदाच्या रूपाने जगाचा इतिहास हे वैशिष्ट्य आहे. निसर्गाची सुप्त निसर्गांना देवाचे रूप दिलेले आहे, दिव्य शक्तीचे. त्या विलक्षण दिव्य आहेतच. त्यांचे सुंदर वर्णन, अतिशय प्रसन्न भाषेमध्ये शैलीमध्ये येते. आणि सुरेखपणा आहे आणि सुरेखपणा आहे, छंद आहे आणि म्हणजे त्याला वृत आहे. अशा तऱ्हेचे ते वेदामध्ये आहे चांगल्या रीतीने ते गायले जात होते. सामवेद त्याला म्हणतात. त्याला म्हणता येईल कलात्मक संस्कृती. भाषेच्या साहित्याच्या

दारांनी भारतामध्ये अखंडपणाने आतापर्यंत येत आलेली आहे. या संस्कृतीमध्ये ज्या काही महत्त्वाच्या प्रेरणा आहेत, या प्रेरणेमध्ये, त्या केवळ आध्यात्मिक नाहीत, असे जे सांगितले जाते की भारतीय संस्कृतीही आध्यात्मिक आहे आणि पश्चिमी संस्कृती भौतिक आहे, भौतिक संस्कृती म्हणजे हे जे भौतिक विश्व आहे, हा प्रकाश, ही जमीन, हे प्राणी, हे धातूपदार्थ, ह्या वनस्पती ह्या सगळ्या भौतिक आहेत. त्यांचा जीवनार्थी उपयोग कसा करावा ह्याच्या संबंधाने ज्ञान आणि कृती घडविलेली आहे. परंपरा आहे. सुतार हे नाव भौतिक संस्कृतीचे दर्शक आहे. कारण तो फार चांगल्या रीतीने आकार देतो. लाकडाला. लोहार है भौतिक संस्कृतीचे दर्शक आहे कारण ती धातू स्वच्छ करून त्याला निरनिराळे आकार देतो. सोनार अलंकार घडवितो, कोष्टी कपडे करतो अशा रितीने सर्व जाती जमातीची नावे तपासली तर हे लक्षात येते की भारतीय संस्कृती हिची एक बाजू भक्कम अशी भौतिक आहे आणि आध्यात्मिक आहे. आध्यात्मिक म्हणजे धार्मिक परलोकाचा विचार मेल्यानंतर काय होईल ही चिंता. अरे मी एक भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य सांगत असतो की मनाने भारतीय हा परलोकवासी असतो म्हणजे काय? मेल्यानंतर काय होईल? भवसागरातून सुटका कशी होईल? संसाराचे बंधन आहे म्हणजे जननमरणाची परंपरा आहे. अशा तऱ्हेचा इथे एक विचार आहे. त्याला कारणच असे आहे की भौतिक संस्कृती निर्माण करण्याला यश कमी आलेले आहे.

पश्चिमी संस्कृती पुढे गेलेली आहे. त्यांची ही भौतिक आहे. चिनी संस्कृती ही भौतिक आहे. आपली ही भौतिक आहे. कारण हा मनुष्य जगायचा म्हणजे त्यांचे भौतिक जीवन आलेच, त्यांचा देह ही बाजू आहे. देह हा भौतिक आहे. त्या देशात, घर, अन्न, वस्त्र लागते. शीतोष्णापासून बचाव करावा लागतो. सगळी ही भौतिक संस्कृती म्हणून भारताची संस्कृती आध्यात्मिक आहे. अहो, आम्ही ते करू पण आमचे सगळे लक्ष परलोकाकडे आहे, असे आपण म्हणतो. जिथे जिथे धर्म आहे. म्हणजे बायबल आहे तेथे तेथे परलोक आहे. ख्रिस्ताबद्दल सांगितले जाते की, त्याने मनुष्याच्या पाप मुक्तीकरता स्वतः आत्मयज्ञ केलेला आहे, असे विचार तिकडेही आहेत. म्हणजे स्वर्गाकडे त्यांचेही डोळे आहेत आणि नरक यातना चुकवण्याकरिता तिकडेही प्रयत्न आहेत. इस्लाममध्ये तर आहेच आहे. प्रश्नच नाही. आती फंडालिझम आला आहे. म्हणजे अगदी कुराणांत आणि कुराणाच्या बरोबर असलेले त्यांच्या धर्मगुरूंचे जे शब्द आहेत ते ज्या ग्रंथामध्ये लिहिलेले आहेत, ते सगळे कायदे अगदी खरे मानले पाहिजेत. आणि म्हणून बायकांनी सिनेमाला जाता कामा नये, असे आहे. पाप आहे. विरुद्ध आहेत त्या कायद्यांच्या विरुद्ध. प्रत्येकाच्या धर्मग्रंथामध्ये आणि परलोकाचा विचार, देव रागवू नये, हा विचार जगाच्या सगळ्या संस्कृतीत चाललेला आहे. हा विचार आता सुटलाय तो म्हणजे देव आहेत की नाही कुणास ठाऊक? इथून प्रश्न उत्पन्न झालेला आहे आणि मग़ चर्चमध्ये जातात. जर्मनीमध्ये, फ्रान्समध्ये तिकडे भौतिक संस्कृती

फार बोकाळली होती. भौतिक सामर्थ्य वाढले आहे. त्यांची शस्त्रास्त्र फार दूर पल्ल्याची आहेत. यंत्रनिर्मिती वाढली आहे. हातमागापेक्षा यंत्रमागावर पुष्कळ काम होते हे तुम्हाला इचलकरंजीकरांना कशाला सांगायला पाहिजे तर यांत्रिक संस्कृती ही आधुनिक तंत्रज्ञानावर उभारलेली संस्कृती ही उत्पादनक्षम अधिक असल्यामुळे मनुष्याचा समाजामध्ये उच्च-नीच, भाव आहे, विषमता आहे त्याच्या पाठीमागे मानसिक संस्कृतीचे बळ लागते ते कोणते ?

ह्या सगळ्या जाती- जमातीचे अंतिम हित म्हणजे विषमता नष्ट करून जाती- जमातींमध्ये साम्य निर्माण करणे त्याची गरज आहे. शोषण नष्ट करण्याची गरज आहे. शोषणाकरिता जी माणसे एकत्र येतात व भांडतात ते त्यांच्या मानसिक संस्कृतीचे लक्षण आहे. कारण हे न असणे, आपली उच्च उद्दिष्टे, त्यांच्याकडे जाणे, उदा. समाज प्रबोधन, समाजवादाचे प्रबोधन करणे ही मानसिक संस्कृती नवीन निर्माण होत आहे. ती कशामुळे उत्पन्न होते ? आशा उत्पन्न होते. कशामुळे ही आशा निर्माण झाली. तर ह्या त्या भौतिक गोष्टी आहेत त्याच्यामध्ये वरदान आहे. आणि ते वरदान असल्यामुळे ते वरदान बरोबर सौम्य निर्माण करणे आणि खाजगी मालकाकडून जे शोषण होते ते नष्ट करणे, ही त्याच्यामध्ये शक्यता आहे. ज्या काळामध्ये ते शक्य नव्हते तो काळ आणि हा काळ ह्यामध्ये जो बदल झाला आहे तो हा वस्तुतः साम्यवादी समाजामध्ये उच्चनिच भाव नको सगळे सारखे स्त्री पुरुष असले पाहिजे हा विचार जुना आहे त्याला 'इथियोपिया' म्हणतात. 'इथिओपिया' शब्दाचा अर्थ मूळ शब्दाचा अर्थ 'नो व्हेअर' कुठेच नाही. ते पुढे आणायचे भविष्य काळात नंतर आणायचे, कुठेच नाही. आतापर्यंत नव्हते ते आता पुढे आणायचे म्हणून इथे अशा तऱ्हेचे आदर्शवाद समाजामध्ये निर्माण होत असतात आणि ते मानसिक संस्कृतीमुळे उच्च संस्कृतीत असतात.

भारतीय संस्कृती ही जी आहे, ती उच्च दर्जाची समाजरचना निर्माण करण्याला ज्या प्रेरणा लागतात त्या प्रेरणा देऊ शकते कारण आता आपण आपल्या देशामध्ये फार मोठी उत्पादन शक्ती जी आहे त्यांची संघटना करू शकतो. आणि आपला ध्येयवाद कोणत्याही तऱ्हेने दूषित नसेल तर आपण उच्च दर्जाची प्रगती समाजाची करू शकतो तर ही संस्कृती भारतीय परंपरागत संस्कृती ही वर्गही जगाच्या संस्कृतीपेक्षा वेगळी आहे. अध्यात्मवादी आहे. ऐहिक भौतिक जीवनाबद्दल तिला आस्था नाही, तिच्याकडे पाठ करून उभी आहे. हा जो विचार आहे तो पराभूत मनाचा विचार आहे. अशा तऱ्हेचे, म्हणजे एक तऱ्हेची पराभूत मनोवृत्ती आणि दुसरी, सामान्य जन जे आहेत ते अशा रीतीने आहे त्या परिस्थितीत समाधान मानू लागले म्हणजे जे वर आहेत त्यांचे अधिक बरे चालते अशी त्यांची समजूत. म्हणून असा विचार सांगितला जातो. दोन्ही तऱ्हेने सांगितला जातो तर हा विचार आहे ह्या परिस्थितीत बदल केला पाहिजे, आहे ही समाजरचना बदलली पाहिजे. कारण हिच्यामध्ये अन्याय आहे. न्यायाची जी कल्पना, हल्लीची, सामाजिक न्यायाची कल्पना ती फार महत्त्वाची आहे आणि ती भारतीय संस्कृती मान्य करू शकते. जगातली सगळीच मानवसंस्कृती मान्य

करू शकते. समाजामध्ये ज्यांना विषमता दिसते, मानसिक अध:पात दिसतो, हताश, अपंग माणसांच्या झुंडीच्या झुंडी दिसतात. त्या ठिकाणी लक्षात येते की हे बदलले पाहिजे. मुंबई, पुण्यात गेले की लक्षात येते इथे आहे की नाही झोपडपट्टी मला माहीत नाही, असणारच, कारण जिथे जिथे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते, ज्यांना त्या उत्पादनामध्ये भागीदारी मिळत नाही ते कसेबसे जगणारे लोक येणारच तर ही विषम समाजरचना आहे. तंत्रज्ञानावर उभारलेली, अशी ती उत्पादन शक्ती मोठ्या महत्त्वाच्या आहेत; पण त्या उत्पादन शक्तीची न्याय्यपद्धतीने मांडणी केलेली नाही, त्या दृष्टीने कायदा झालेला नाही, त्या पद्धतीने राज्यरचना नाही. त्यामुळे ह्या ठिकाणी देशात, जगामध्ये अशी विषमता कायम आहे. ह्या विषमतेतून बाहेर काढण्याकरिता ज्या नैतिक प्रेरणा लागतात, न्यायाच्या जाणिवा लागतात, त्या भारतीय संस्कृतीमध्ये आहेत. भारतीय मनुष्यदेखील त्या न्याय-बुद्धीने जीवनाचा विचार करू शकतो. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपला गेल्या १५० वर्षांचा इतिहास पाहिला तर हे लक्षात येईल की हा १५० वर्षांचा इतिहास हा प्रबोधनाचा इतिहास आहे. प्रबोधनाचा इतिहास व्यापक अर्थाने युरोपच्या इतिहासामध्ये जे प्रबोधन झाले त्याच्यापेक्षा निराळे हे प्रबोधन २० व्या शतकाचे व्हायला पाहिजे.

युरोपच्या इतिहासामध्ये १४ व्या १५ व्या शकतात प्रबोधन झाले. ते कशामुळे झाले? परंपरागत जे ज्ञान, ज्या श्रद्धा होत्या, ज्या जाणिवा होत्या संकुचित अशा, त्या जाणिवांमध्ये भूतकाळातल्या दोन संस्कृती युरोपच्या इतिहासात घडून आल्या. त्या म्हणजे ग्रीक संस्कृती आणि रोमन संस्कृती. ग्रीक संस्कृती ही मुक्त विचारांची संस्कृती होती. त्या ठिकाणी भिन्न विचारांची तत्त्वज्ञाने निर्माण झाली. उत्कृष्ट साहित्य निर्माण झाले. विज्ञानाचा दृष्टीकोन आला ती ग्रीक संस्कृती. त्याचप्रमाणे रोमन संस्कृती राज्यशास्त्र, राज्यरचनेचे विचार, कायद्याचे विचार, आणि त्याचप्रमाणे उत्कृष्ट तऱ्हेचे काव्यही निर्माण झाले. ही जी फार जुनी संस्कृती होती की जी ख्रिश्चन मनुष्याला बहिष्कार्य वाटत होती. ख्रिश्चन धर्मगुरूंना बहिष्कार्य वाटत होती. १२ व्या शतकापर्यंत जो कोणी रोमन किंवा ग्रीक काव्य, साहित्य, तत्त्वज्ञान वगैरे वाचील तो पाप करतो आहे असे सांगितले जाई. हे पाप तो मनुष्य करायला लागला १० व्या शतकात. त्यातले जे उत्तम सुसंस्कृत होते त्यांनी रोमन साहित्य, रोमन कविता वाचण्यास सुरुवात केली. रोमन तात्त्विक चिंतन आहे ते घेतले. ग्रीक ॲरिस्टॉटल आणि प्लेटो ह्यांचेच विचार नाहीत. बाकीचे लोकांचे विचार वाचायला लागले. तेव्हा स्वतंत्र विचार केला पाहिजे, स्वतंत्र साहित्य निर्माण केले पाहिजे नुसत्या त्या जुन्या चाकोरीत राहता कामा नये म्हणून एकदम १४ व्या शतकात नवसाहित्य निर्माण होऊ लागले.

युरोपमध्ये राज्याचा नवीन विचार होऊ लागला. राज्य कसे चालते? राजा हा जो आहे ह्याच्या ठिकाणी दैवी शक्ती आहे असे मानत होते. नाही! राजामधे दैवी शक्ती नाही. बायबलमधे सत्य आहे, बाहेर सत्य नाही असा विचार येत होता. तर देवाचे हे ही पुस्तक

आहे, बायबल तितके महत्त्वाचे आहे. देवाचा आदेश आलेला आहे सृष्टी, हे विश्व हे बायबलच आहे, बायबल ओळखता येणाऱ्याला इथले नियम समजले पाहिजेत, देवाचे नियम आहेत, हे विश्व देवाने निर्माण केले आहे, आणि ते ज्या नियमांनी निर्माण केले ते देवाचे संकेत आहेत म्हणून ते जाणून घेतले पाहिजेत म्हणजे बायबल जाणून घेतले पाहिजे असा विचार आला. राज्य हे माणसाने निर्माण केलेले असते, राज्य निर्माण करणारे लोक असतात. ते परंपरागत नितीची उच्चनैतिक बंधने न पाळतांना आपली जी बुद्धिमत्ता आहे, मुत्सद्देगिरी आहे त्याचा वापर करून राज्य निर्माण करतात. आणि मग म्हणतात हे देवाने आम्हाला दिलेले सामर्थ्य आहे. ते राज्य कसे निर्माण होते, त्याचे संरक्षण कसे करावे, ते नष्ट कसे होते? ह्यांचा विचार केला. म्हणजे राज्यशास्त्र विचार झाला आणि गॅलिलिओ निर्माण झाला. अनेक अशा तऱ्हेच्या सृष्टीचा अभ्यास करणारे निघाले. त्यामध्ये गॅलिलिओ हा उत्पन्न झाला आणि तेव्हापासून विज्ञानाची अखंड प्रगती. अगोदर विज्ञान वाढतच होते पण प्रवाह खंडित होत होता. तो प्रवाह मर्यादितपणाने वाहत होता, शुष्क होत होता हे जगाचा इतिहासच सांगतो.

जगाचा इतिहास सगळ्या संस्कृतीमध्ये निसर्गाचे ज्ञान, माणसाने निसर्गावर कब्जा कशा प्रकारे करावा हे ज्ञान होते; पण ते मर्यादित होते त्याला मधूनमधून काही प्रगतीचे दिवस येत होते. पण ते खंडित होत होते. गॅलिलिओ आल्यानंतर कसे संशोधन करावे ह्याची संशोधन पद्धती निश्चित केली म्हणून गॅलिलिओपासून विज्ञान वाढले न्यूटन आला. त्याने गतीशास्त्र पूर्ण केले. त्यामुळे असे म्हटले जाते. न्यूटन हा त्याच्यानंतरच्या १०० वर्षांमध्ये सगळ्या ज्ञान-विज्ञानाचा ईश्वर ठरला. कारण न्यूटनने दिलेले जे गतिशास्त्राचे नियम, त्या नियमाप्रमाणे थांगविद्या निर्माण झाली. उत्कृष्ट दर्जाची आणि आज जे अंतरिक्ष यान जाते. विमान नुसते नव्हे, मोटार नुसती नव्हे, तर अंतरिक्षयान ज्या गणिताच्या साहाय्याने निर्माण करता येते ते न्यूटनचे गतिशास्त्राचे गणित आहे उदा. डायनॉमिक्स ते गणितशास्त्र. तर विज्ञानाची आतापर्यंत प्रगती अखंडित होत गेली. त्यामुळे माणसाचे सामर्थ्य पुढे होत गेले हे सगळें विज्ञान भारत स्वागत करीत आहे ह्याचे कारण भारतीय संस्कृतीचे जे संस्कार आहेत, ज्या मनावरच्या भावना आहेत त्या भावनांमधील ते अडथळे नाहीत. कोणत्याही तऱ्हेचे बायबलमध्ये अडथळा होता बायबलाविरुद्ध फार विज्ञान नेत्यांना झगडावे लागले. आपल्या इथे एकच अडथळा तो कोणता ? तर आम्ही अध्यात्मवादी आहोत. हे पाहिजे कशाला विश्व. आपण वैराग्यवादी आहोत. कारण शेवटी काय आहे, मरायचंच आहे आणि अनेक जन्मांची पुढची परंपरा आहे हे बंधन आहे. त्या बंधनातून बाहेर पडायचे आहे. ही जी आध्यात्मवादाची शिकवण आहे ही आम्हाला आमचे ऐहिक, भौतिक, वैज्ञानिक, तंत्रज्ञानिक जीवन समृद्ध करायला अडचण आहे. ती नाहीशी झाली तर भारतीय संस्कृती भविष्यकाळाकडे आपल्याला उत्तम तऱ्हेने नेऊ शकते. इथल्या प्रेरणा सगळयाच जगाच्या

संस्कृतीतील ह्या दोन प्रेरणा आहेत. भौतिक, मानसिक प्रेरणा आणि निर्मितीची प्रेरणा तर निर्मितीची प्रेरणा याच्यामध्ये दोन्ही आपल्या हाताने निर्माण करायचे, विचाराने निर्माण करायचे. म्हणजे विचाराने निर्माण केल्याशिवाय हाताने निर्माण करता येत नाही. मेंदू आणि हात यांचा अपरिहार्य संबंध आहे. कारण जीवशास्त्रीयदृष्ट्या मनुष्यप्राणी हा जो उभा राहिला आणि उभा ताठ चालू लागला तेव्हा त्याला उत्तम तऱ्हेने शिकार करता येऊ लागली. पदार्थ चांगले जमू लागले, हाताने तो चाचपू लागला, त्यांचे वजन पाहू लागला.

गार आहे की उष्ण आहे हे त्याला समजू लागले, हाताने पदार्थ घेतला की त्याला जवळ नेता येतो. त्याचा वास, रंग कळू लागला. त्यामुळे त्याची सगळी बुद्धीतील, मेंदूतील इंद्रिये कामाला लागू लागली. आणि अशा तऱ्हेने त्याचा मेंदू वाढला, ह्याला 'होमोसेपीयन' म्हणजे आजचा जगातला जो माणूस आहे, कुठलाही याला 'होमोसेपीयन' 'मॅन द वाइज' शहाणा माणूस असे म्हणतात, जीवशास्त्रदृष्ट्या तर हा जो माणूस या पृथ्वीवर आला, त्याच्या मेंदूची जी वाढ झाली. त्या वाढीचे स्वरूप हे असे आहे, की माणसाच्या मेंदूपेक्षा अधिक वजनदार मेंदू व्हेल माशांचा, देव माशांचा आहे. पण त्याचा देह फार मोठा, मेंदूचे वजन आणि देहाचे वजन ह्यामधील प्रमाण पाहिले असताना ज्या प्राण्याचे मेंदूचे वजन अधिक आहे देहाच्या

वजनाच्या मानाने असा एकच प्राणी आहे 'माणूस' आजचा माणूस म्हणून त्यांचा मेंदू हा त्याला हे जग जे आहे ते चांगल्यारितीने समजून घ्यायला मदत करीत असतो. आणि जग चांगल्यारितीने व्यवस्थितपणे यथार्थपणे कळले म्हणजे त्या जगावर, त्या निसर्गावर स्वार होता येते. तर असा हा जो मेंदू वाढला आहे; तो मनुष्य हाताने काय करीत होता, हाताने पदार्थ तपासत होता आणि म्हणून त्याचा मेंदू वाढला म्हणून हस्त आणि मस्तक ह्यांचा संबंध आपल्या जीवनात, शिक्षणात राहिला पाहिजे. शिक्षणात एकांगीपणे आलेला आहे. मी हताने काम न करणे हे उच्च दर्जाचे आहे म्हणजे उच्च समाजात उच्चस्थान कोणते की जर त्याला हाताने भांडे उचलावे लागत नाही तो, तुम्ही जर घरामधे कामे करू लागला.. चूलीपाशी भाकरी करू लागलात तर बायको काही तुम्हाला करू द्यायची नाही. ती म्हणेल तुम्हाला काय हे लांडे कारभार करायचे ? ती हाताने बाजूला करेल. कारण तुम्ही तिच्यापेक्षा श्रेष्ठ आहात. पुरुष म्हणजे वरिष्ठ. त्याने हाताने काम करायचे नाही. स्त्रिया हाताने काम करतात अजून, अर्थात वरच्या सरदारांच्या बायका सोडून द्या, बड्या श्रीमंताच्या. बहुतेक स्त्रियांना, नोकरी करू लागली तरी तिला घरामधे काम करावेच लागते. म्हणजे हे नोकरी करुन येतात. तीही नोकरी करुन येते पण हे नोकरी करुन आले की थकतात. आडवे पडतात, पण तिला पुन्हा कामं करावी लागतात. ह्यांना जेवायला घालावे लागते. म्हणजे स्त्री आणि पुरुष ह्यांच्यात उच्चनीच भेद आहे, परंतु समाजामधे जर आपण पाहिले, तर शिकलेले लोक ह्याना असे वाटते की हाताने काम करणे कमीपणाचे आहे, पण ही मानवी संस्कृती आहे तिच्यामधे अवनतीच्या शक्ती आहेत त्याचे हे दर्शन आहे. हाताने काम न करताना लिहायचे,

दुसऱ्यानेच लिहायचे, आपण नुसत्या सह्या करायच्या, अशा तऱ्हेची उच्च नीच दर्जाची जाणीव आहे, हा जो गड आहे ह्याच्या योगाने आपल्या संस्कृतीतील दोष लक्षात येतात.

जगातील सगळ्या संस्कृतीमध्ये दोष आहेत, हा जो उच्चनीच भाव आहे हा नाहीसा करून जगामध्ये सगळ्यांनी हातानं कामं केली पाहिजेत. त्या तऱ्हेची समानता निर्माण व्हायला पाहिजे. नाहीतर मनुष्याची अवनती होईल. सगळ्यांनी शारीरिक श्रम केले पाहिजेत. हा जो मनुष्याचा देह आहे, आजचा जो मनुष्य प्राणी आहे, तो श्रम करतो म्हणूनच तो जगतो. शारीरिक श्रमामधूनच तो असा झालेला आहे. त्याचे हे श्रम गेले की डायबिटीस झाला. आधुनिक संस्कृतीचा जो दोष आहे, त्यामध्ये बैठ्या लोकांमध्ये डायबिटीस, मधुमेह फार सापडू लागला आहे, वाढू लागला आहे तर हे रोगटपणाचे लक्षण आहे. संस्कृतीमध्ये हातानेही काम केले पाहिजे, डोक्यानेही काम केले पाहिजे. ह्यांचा समतोल राहिला पाहिजे. भारतीय संस्कृती ही तपासली पाहिजे. आणि त्या दृष्टीने समाजाची घडी बसवली पाहिजे. एवढे मी आपल्यापुढे सांगून भारतीय संस्कृतीमधे इतर जगातल्या संस्कृतीमधे जशा मनुष्याला वाचवण्याच्या शक्ती आहेत आणि माणसाला नाहीशा करण्याच्या शक्ती आहेत, तशा भारतीय संस्कृतीमध्येसुद्धा इथला माणूस जगावा तसेच तो मरावा या दोन्हीही प्रवृत्ती आहेत, त्या तपासल्या पाहिजेत. इथला माणूस मरावा, इथल्या संस्कृतीखाली जावा, इथला माणूस पराभूत व्हावा अशाही प्रवृत्ती आहेत. ह्याला म्हणतात फाईडने. फ्राईड हा नवीन मानसशास्त्रज्ञ झाला. त्याने मानसशास्त्रात क्रांती केली आहे. त्या क्रांतीमध्ये त्याने अंतर्मनाचे संशोधन केलेले आहे. त्याच्यामधे त्याला असे सापडले आहे की, माणसामधे आत्मघातक आणि आत्मतारक दोन्ही प्रवृत्ती आहेत. आत्मघातक प्रवृत्तीला त्याने म्हटलेले आहे 'निर्वाण प्रवृत्ती'. बौद्ध धर्मातला हा शब्द काढला आहे, मोक्षाकडे जाण्याची प्रवृत्ती. पण त्याला असे सांगायचे आहे की, हा जो निर्वाण आहे, तो जो भगवान बुद्धांनी निर्वाण सांगितला तो निर्वाण नव्हे तर इथल्या इथे लवकर संपायचे, मरायचे. उदा. अगदी छान तंबाखू माणसे १०-१२ वेळा खातात. तंबाखूच्या रोगाने कॅन्सर होतो माहिती आहे. हृदय दूषित होते, भूक कमी होते, माहिती आहे तरी का खातो माणूस? आपल्याला माहिती आहे कि अपचन झाले की इतर रोग वाढतात. तरीपण आपण भरपूर जेवतो, हात मारतोच. माणूसपण हात मारताना माणूस मरणाला जवळ बोलावतो हे त्याच्या लक्षात येत नाही. सांगितले तरी तो जवळ बोलावतो.

माणसाला जगण्याची वासना आहे. पण "विल टू डाय" मरण्याची वासनाही आहे. तर आपल्या संस्कृतीमध्ये जी मरणाची वासना आहे, ही नाहीशी करायची आणि जगण्याची वासना पुढे आणायची, अशा तऱ्हेची मूल्ये निर्माण करायला पाहिजेत. तरच आपण प्रगती करू शकतो. आजचे जे विज्ञान आहे ते फार पुढे गेलेले आहे. मनोविज्ञानही पुढे गेलेले आहे. ते आजचे मनोविज्ञान पाहिले पाहिजे आणि त्या दृष्टीने भारतीय संस्कृतीची रचना

केली पाहिजे. सगळ्या तऱ्हेचा आणि देहाचा अभ्यास अधिक केला पाहिजे. आत्म्याच्या अभ्यासापेक्षा देहाचा अभ्यास फार महत्त्वाचा आहे. कारण आत्मा कुठे कसा आहे हे गूढ आहे. तो सापडेल. नाही असे नाही. पण देहाचा अर्थ समजू शकतो म्हणून देहाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. जीवशास्त्राचा अभ्यास त्याकरता केला पाहिजे. पण हल्ली जीवशास्त्रामध्ये फार चांगले संशोधन चालू आहे. या संशोधनामध्ये अमेरिका जी आहे तिला तिच्याच शास्त्रज्ञांनी सांगितले आहे की तोन गोष्टींवर तुम्ही भर द्या. सगळ्या विद्या, सगळे तंत्रज्ञान, सगळे विज्ञान त्यांच्यामध्ये आपण सगळ्यांच्या पुढे जाऊ अशी अपेक्षा बाळगू नका. यश येणार नाही. आपली शक्ती विशिष्ट केंद्रातच मर्यादित करा असे सांगितले आहे; तसेच आपल्या भारतीयांना सांगितले पाहिजे की आपल्या ह्या शक्ती केंद्रित करत आत्म्याच्या शोधाऐवजी देहाचा शोध करा. पहिल्यांदा देहात्मवादी बना. चार्वाकानी सांगितले आहे की देहाचा विचार करा. देहाचा विचार केला आणि देह कसा राखावा, देहाचे आरोग्य कसे करावे याचा आरंभ याला जडवाद म्हणतात. पहिल्यांदा जडवादी बना आणि मग हळूहळू त्याच्या पलीकडचे सूक्ष्म आहे त्याचा शोध करा.

**(समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, जि. कोल्हापूर आयोजित कार्यकर्ता शिबिरात दि. ७ मार्च, १९८ रोजी दिलेले व्याख्यान)**

❍❍❍

५९

# विश्वधर्माशी समन्वित राष्ट्रीय एकात्मता

मित्रहो! ब्रिटिशांच्या राजकीय सत्तेच्या कालखंडात जे स्वातंत्र्याचे आंदोलन एका शतकापेक्षा अधिक कालपर्यंत चालले त्याची श्रेयस्कर परिणती म्हणजे भारताची राष्ट्रीय एकात्मता होय. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, यहुदी, शीख, आदिवासी इ. भिन्न भिन्न भाषांचे, भिन्न धर्मांचे आणि विविध पंथांचे लोक वा भिन्न भिन्न उच्च-नीच संस्कृतींच्या जातिजमाती यांना सामील करून घेणारे असे हे दीर्घकाल चाललेले आंदोलन होते. भारताची सुमारे पाच हजार वर्षांची जी परंपरा आहे तिच्यातील मानवी एकतेचे स्फुरण या आंदोलनाला लाभले आहे. मानवजातिशास्त्रज्ञ भारताचे वंशीय विश्लेषण करून असे सांगतात की, आज पृथ्वीच्या पाठीवर जेवढे मानववंश दिसतात ते सगळे मानववंश भारताच्या आश्रयास पुरातन काळापासून येत राहिले, एकमेकांत मिसळले आणि येथे स्थिरावले. शेजारधर्म हा त्यांचा मुख्य धर्म म्हणून सांगता येतो. हे वंशभेद वेगळे वेगळे दाखविता येत नाहीत. ब्राह्मण, मराठा, जाट, कायस्थ, माळी इत्यादी प्रत्येक जातीत कमीजास्त प्रमाणात हे वंश मिसळलेले दिसतात. येथील जातिभेद म्हणजे हे प्रसिद्ध वंशभेद नव्हेत. वंशभेदांचा संकर झाल्यावर जातिभेद वाढला. जातिभेद कडक बनला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय स्वातंत्र्याला जे मूर्तिमंत स्वरूप प्राप्त झाले, त्याच्यात ही भारताची राष्ट्रीय एकात्मता विश्वमानवाच्या एकात्मतेचे प्रतीक म्हणून आविष्कारली गेली आहे. मानवतावादाच्या दृष्टिकोनातून भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचे जे दर्शन होते, ते म्हणजे भारताच्या भौगोलिक मर्यादेमध्ये कार्यान्वित झालेली धर्मभेद, वंशभेद, संस्कृतिभेद यांना समाविष्ट करून उल्लंघून जाणारी विवेकबुद्धिनिष्ठ मानवी एकात्मताच होय. या पृथ्वीच्या पाठीवर मानवजात चिरकाल टिकण्याकरिता मानवी एकात्मता हे अनिवार्य ध्येय मानले पाहिजे हे जगातील राष्ट्रांच्या नेत्यांनी व विचारवंतांनी ध्यानात ठेवले पाहिजे. स्वतंत्र भारताचे संविधान या विधानास संपूर्ण पुष्टी देते.

स्वतंत्र भारताचे संविधान पाहा. जगातील लोकशाही राष्ट्रांच्या आजपर्यंत निर्माण

झालेल्या संविधानांच्यामध्ये ते एक उत्कृष्ट संविधान म्हणून संविधान शास्त्रज्ञांनी नावाजलेले आहे. हे संविधान जगातील लोकशाही राष्ट्रांच्या लिखित संविधानांमध्ये सर्वात विस्तृत असे संविधान आहे. हे संविधान केंद्र, राज्य आणि प्रदेश राज्ये यांच्या वेळोवेळी निर्माण होणाऱ्या व बदलणाऱ्या, भर पडत जाणाऱ्या कायद्यांचा मूलभूत कायदा आहे. हे संविधान म्हणजे सर्व भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे अंत:करण गोचर होणारे स्पष्ट चित्र आहे. हे भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क हे अंतिम मानवी मूल्यांचे मानचित्र आहे. हे चित्र रेखाटले आहे एका दलित पंडिताने; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी. हे त्यांची बंधमोचकता सिद्ध करते. म्हणून असे म्हणता येते की, भारतीय भौगोलिक मर्यादेत कार्यान्वित झालेली मानवी एकात्मता म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता होय.

या विसाव्या शतकातील ही भारतीय राष्ट्रीयता गेल्या अडीचशे वर्षांच्या जागतिक राष्ट्रवादाच्या इतिहासामध्ये एका परीने असाधारण म्हणजे अधिक व्यापक, भाषिक व धार्मिक समाजाच्या अहंकारी मानसिक मर्यादांना छेद देणारी अशी राष्ट्रीयता आहे असे मानावे लागते. कारण मानवजातीला अंतिम विनाशापासून वाचवण्याकरिता या विकसित राष्ट्रीयत्वाची आजची गरज आहे. राष्ट्रवादाचा इतिहास पाहिला असताना जगातील १८ व्या व १९ व्या शतकात निर्माण झालेली राष्ट्रवादी राज्ये ही बहुतेक एकधर्मी व एकभाषिक आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन, रशिया इ. युरोपियन राष्ट्रे, अमेरिकेची संयुक्त संस्थाने (यू.एस.ए.) ही एकधर्मी आणि एकभाषिक राष्ट्रे आहेत. युरोपात व अमेरिकेत इस्रायली म्हणजे यहुदी धर्म दिसतो; परंतु तेथील यहुद्यांची संख्या कोणत्याही राष्ट्रांमध्ये शेकडा सुमारे पाच वा दहापेक्षा अधिक नाही. कॅनडा व स्वीत्झर्लंड ही दोन अनेक भाषिक राष्ट्रे आहेत. स्वीत्झर्लंडमध्ये जर्मन, फ्रेंच व इटालियन या तीन भाषांचे भाषिक राहतात व कॅनडामध्ये इंग्लिश व फ्रेंच भाषेचे भाषिक राहतात; परंतु विशेष असा की, स्वीत्झर्लंडमधील नागरिक आपापल्या एकभाषिक राष्ट्रांमध्ये स्वीत्झर्लंडमधून फुटून विलीन होण्यास तयार नाहीत. कॅनडामध्ये मात्र ही फुटीरपणाची धुसफूस सुरू झाली आहे. या सर्व जागतिक भिन्न राष्ट्रांच्या राष्ट्रीयत्वापेक्षा किंवा राष्ट्रवादापेक्षा भारताचे राष्ट्रीयत्व हे अधिक व्यापक, सर्व वंश व सर्व धर्म यांचे समावेशक आहे. ते विश्वमानव धर्मानुसार निर्माण झाले आहे. भारताचे संविधान इहवादी आहे. त्याने नागरिकांच्या भिन्न भिन्न धर्मपरंपरांना बाजूस ठेवले आणि मानवधर्माने जगण्याचा अधिकार अर्पण केला आहे. सबंध संविधान हे इहवादी आहे. एखाद्या मोठ्या मुसलमानी राष्ट्राइतकी मुसलमानी प्रजा पाकिस्ताननिर्मितीनंतरदेखील भारतामध्ये नागरिकत्वाचे समान हक्क भोगत आहे. कोणत्याही मध्यम प्रतीच्या ख्रिश्चन राष्ट्राइतकी ख्रिश्चन प्रजा येथे असून ख्रिश्चन नागरिक हिंदू, मुसलमान इ. नागरिकांच्या इतकाच नागरिक हक्क भोगत आहे. युरोपातील कोणत्याही मोठ्या राष्ट्राइतकी लोकसंख्या असलेले येथील भाषिक प्रदेश आहेत. मराठी, गुजराती, हिंदी, बंगाली, पंजाबी, तेलुगू,

तमिळ, कन्नड, मल्याळी इ. भाषा या युरोपच्या राष्ट्रीय भाषांच्या इतक्याच प्रगल्भ व समर्थ आहेत; परंतु येथे भाषाभिमान हा स्वत:चे स्थान दुय्यम समजून राष्ट्राभिमानाला अधिक उच्च स्थान देऊन येथील राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना मन:पूर्वक करीत आहे. इथल्या बहुभाषिक व बहुधर्मी राष्ट्रीयतेची देवतेप्रमाणे उपासना येथील भिन्न भाषिक उच्च साहित्य करीत असून तिची जोपासना करीत आहे.

ही राष्ट्रीयता राष्ट्राभिमानाने राष्ट्रीय अर्हतेने आक्रमक बनणारी राष्ट्रीयता नाही. 'माझे राष्ट्र कसेही असले तरी सर्वश्रेष्ठ' अशा तऱ्हेचा अनेकांचा आक्रमक राष्ट्रवाद या शतकाच्या दुसऱ्या जागतिक युद्धापर्यंत मानवी संस्कृतीला आणि मानवी एकात्मतेला धोका देत होता. यामागील दोन शतकांतील राष्ट्रवादाने पश्चिमी साम्राज्यशाह्यांना जन्म दिला. अनेक लहानमोठे युद्धप्रसंग घडवून आणले. दोन जागतिक युद्धे पेटून मानवजात धोक्यात सापडली. भारतीय राष्ट्रीयता मात्र अंतिम मानवी मूल्यांवर आधारित असल्यामुळे आज जगाला आवश्यक असलेल्या सांस्कृतिक व राजकीय विश्वबंधुतेची उभारणी करत आहे. याचे ऐतिहासिक प्रत्यंतर म्हणजे गेल्या सुमारे दोनशे वर्षांच्या भारतीय धर्मसुधारणा व समाजसुधारणा यांचा इतिहास होय. या सामाजिक व धार्मिक सुधारणांचे प्रवर्तक, विचारवंत नेते हे जरी बहुसंख्य हिंदू होते तरी ते विश्वबंधू होते. त्यात काही थोर मुसलमान आणि ख्रिचन हेसुद्धा दृष्टिआड करता येत नाहीत. उदा. महंमद इक्बाल, अबूल कलाम आझाद, हकीम अजमलखान, टिळकमित्र बाप्तिस्टा, सी. एफ., अँड्रूयूज इत्यादी. विश्वबंधुत्वाचा संदेश त्यांना धर्मचिंतनातून मिळाला होता. पहिले विश्वबंधू समाजसुधारक व धर्मसुधारक राजा राममोहन रॉय होत. त्यांनी युनिव्हर्सल चर्च म्हणजे सर्व धर्मांचे व्यासपीठ स्थापन केले होते. दुसरे संत रामकृष्ण परमहंस, विवेकानंदांचे सद्गुरू. यांनी आपल्या उपासनेच्या साधनामध्ये इस्लाम, ख्रिश्चॅनिटी इ. भिन्न भिन्न धर्मांच्या साधनेचा अंतर्भाव केला होता. रवींद्रनाथ ठाकूर हे दिव्य मानवधर्माचे द्रष्टे कवी होते. लोकमान्य टिळक यांनी भगवद्गीतेतून आत्मौपम्य दृष्टीचे मानवतावादी नीतिशास्त्र गीतारहस्यात प्रतिपादिले. योगी अरविंद यांनी सर्व मानवांच्या दिव्य जीवनाचे युग या पृथ्वीवर उदयास येणार आहे आणि मानवी इतिहासाची यात्रा त्या युगाकडे चालली आहे, असे द्रष्टेपणाने सांगितले आहे. ही परंपरा म. गांधी, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंत येऊन पोचली आहे. हे धर्मसुधारक आणि समाजसुधारक यांनी आपली परंपरागत समाजरचना बदलली पाहिजे व पवित्र ग्रंथांचेही मंथन करून विवेकबुद्धीने मानवी एकात्मतेला पोषक एवढीच तत्त्वे शाश्वत तत्त्वे म्हणून स्वीकारली पाहिजेत, बाकी फेकली पाहिजेत, असा मूलगामी दृष्टिकोन संशोधनपूर्वक पुरस्कारिला आहे. सुधारकांचे अग्रणी आगरकर हे इहवादी होते. या इहवादी भारतीयांची परंपरा पं. जवाहरलाल नेहरूपर्यंत येऊन भिडते. हे इहवादी विचारवंत धर्मग्रंथाचे मूल्य मान्य करतात; परंतु 'बाबा वाक्यम् प्रमाणम्' या पद्धतीने धर्मग्रंथ हा देवाने दिला आहे, म्हणून

पूर्ण प्रमाण म्हणून त्याला शरण जात नाहीत. धर्मग्रंथाला प्रमाण न मानणारे असे अनेक विश्वबंधुत्ववादी हिंदू गेल्या दोनशे वर्षांच्या इतिहासात मार्गदर्शक म्हणून तळपले आहेत. त्यांतील महाराष्ट्रातला श्रेष्ठ धर्मसुधारक आणि समाजसुधारक म्हणजे जोतीराव फुले होय. जोतीराव फुले हे महाराष्ट्रातील बहुजन समाजाला देवाप्रमाणे पूजनीय म्हणून मान्य झाले आहेत. सर्वच धर्मसंस्था आणि धर्मग्रंथ तपासून त्यांच्यातील कालबाधित काय आहे आणि भविष्यकाळाला अनुकूल कल्याणकारक असे काय आहे याची समीक्षा या भारताच्या राष्ट्रीयत्वाचा पाया घालणाऱ्या नेत्यांनी केली आहे. याचे अत्यंत उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे देता येते. हे उदाहरण या देशातील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख इत्यादिकांनी आदर्श म्हणून स्वीकारले पाहिजे आणि आपापला धर्म किंवा धर्मपरंपरा आंबेडकरमार्गानेच संस्कारिली व परिष्कारिली पाहिजे.

डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म टाकून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या देशातून सहस्रावधी वर्षांच्या पूर्वी परागंदा झालेला बौद्ध धर्म स्वदेशी परत आणला व येथे त्याची स्थापना केली. हे कार्य करीत असताना त्या बौद्ध धर्माची, त्यातील धर्मग्रंथांची नीट तपासणी व छाननी आंबेडकरांनी केली. बौद्ध धर्मातील दु:खवाद किंवा निराशावाद, पुनर्जन्मवाद इ.आधुनिक मानवतावादाशी विसंगत असलेले सिद्धांत बाजूला सारले आणि शुद्ध व अंतिम नैतिक मानवी मूल्ये वेगळी काढून त्यांनी आपली स्वत:ची बुद्धधर्मविषयक संकल्पना विस्ताराने मांडली. जोतीराव फुल्यांनी हिंदू धर्माचे संस्करण व परिष्करण केले. ही धर्मसंस्करण व धर्मपरिष्करण करण्याची परंपरा डॉ. आंबेडकरांनी पुढे नेली. नव्या युगाच्या मानवी भवितव्याच्या उच्च नैतिक प्रेरणांशी सुसंगत अशी तत्त्वचर्चा व तत्त्वांची मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली. त्याकरिता त्यांना मनुस्मृती जाळावी लागली. धर्मग्रंथ विवेकबुद्धीने जाळल्यानंतर जे शुद्ध राहते तेच स्वीकारायचे. हे स्वीकारण्याला मार्गदर्शक अशी मूलभूत तत्त्वे म्हणजे अंतिम मानवी मूल्ये होत. मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता, मानवी बंधुता व सामाजिक न्याय होय. आंबेडकरांच्या मिरवणुकीत मनुस्मृती सामील होऊ शकत नाही. ती एक मोठी विसंगती होय, हे ध्यानात घेतले पाहिजे. मनुस्मृती हिंदू समाजाच्या सामाजिक संस्थांचा आणि विविध परंपरांचा इतिहास आहे; परंतु ती वर्तमानकाळाच्या गरजांशी वा मानवी भवितव्याशी विसंगत आहे म्हणून कालबाधित झाली आहे. नव्या समर्थ समताप्रधान भारतीय समाजव्यवस्थेशी मनुस्मृतीची सांगड घालता येत नाही. कोणत्याही धर्माचे चिंतन करीत असताना कालविसंगत गोष्टी सांगणारे ग्रंथ हे पदार्थसंग्रहालयाचे भूषण होऊ शकतात. सर्व गतकालाचा अवशेष असलेली मानवी निर्मिती असते. तिला ऐतिहासिक पदार्थसंग्रहालय हेच योग्य स्थान होय. आज भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला जे धोके उत्पन्न होत आहेत त्यांच्या मुळाशी परंपरेची आणि परंपरागत धर्मग्रंथांची आंधळी निष्ठा हे एक कारण आहे. या आंधळया निष्ठेचीच वेडात परिणती होते. त्यातूनच माथेफिरू, समाजद्रोही

निर्माण होतात.

आज भारतीय एकात्मतेला फार मोठे धोके उत्पन्न होत आहेत. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला आजच धोके निर्माण झाले आहेत असे नाही. तिचा विकासच धोक्यांमधून आतापर्यंत झाला आहे. 'दोन धर्म, दोन राष्ट्रे' अशा तऱ्हेचा द्विराष्ट्रवाद हाही फार मोठा धोका धक्का देऊन गेला आहे. या द्विराष्ट्रवादाची शल्ये अजून शिल्लक आहेत. त्याकरिता कोणताही उच्च धर्म उदा. हिंदू धर्म, मुसलमान धर्म व ख्रिश्चन धर्म हा विश्वबंधुतेचे बीजारोपण करून त्याचे पोषण करीत राहील, अशी मूलभूत भूमिका प्रत्येक धर्माने स्वीकारण्याची आज गरज आहे. भारतातील मुसलमान समाजाने हे मूलभूत मानवी मूल्यांचे तत्त्व स्वीकारले पाहिजे. त्याकरिता हिंदूंनी त्यांच्याशी सामाजिक सहकार्य केले पाहिजे आणि भारतीय संविधानाशी सुसंगत अशी कौटुंबिक जीवनाची पद्धती सर्व धर्मीयांनी स्वीकारली पाहिजे. स्त्री-पुरुष समानता हे तत्त्व या भारतीय राष्ट्रीय संविधानाचे मूलभूत तत्त्व आहे. विश्वबंधुत्व व स्त्री-पुरुष समानत्व या दोन तत्त्वांवर आधारलेले आंदोलन हे भारतातीलच नव्हे तर जगातील मुसलमान समाजांना व राष्ट्रांना नव्या मानवी जागतिक एकात्मतेच्या मार्गावर आणण्यास उपयुक्त ठरेल. भारतातील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन या समाजातील सर्वांनाच आंतरिक सामाजिक परिवर्तनाची गरज आहे. या गरजेची जाणीव मंदावते, त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेस पुन: पुन: धोका उत्पन्न होतो. परंपरागत धर्माच्या पलीकडे पाहिले तरच राष्ट्रीय व जागतिक समन्वय सिद्ध होऊ शकतो. कोणत्याही धार्मिक वा अन्य ध्येयवादांचा स्वीकार करीत असताना त्यांचा निकष विवेकबुद्धी हाच ठरविला पाहिजे. तो मुस्लिम विचारवंतांनी भारताच्या संविधानाशी सुसंगत रीतीने स्वीकारला तरच ते अंतर्गत सामाजिक सुधारणा करून अधिक समर्थ सामाजिक रचना करू शकतील. हीच गोष्ट हिंदुत्ववाद्यांनीही लक्षात ठेवली पाहिजे.

हिंदूंना मुसलमानांबद्दल व मुसलमानांना हिंदूंबद्दल विश्वास व बंधुतेची भावना निर्माण झाली तरच भारतातील यादवी टळेल. भारतातील मुसलमानाला माणूस या नात्याने जगण्याचा व उत्कर्ष करण्याचा अधिकार भारताबाहेर नाही. तीच गोष्ट हिंदूंची. म्हणून हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान इ. धर्म वैयक्तिक जीवनाची पद्धती म्हणूनच मर्यादेत ठेवणारी विवेकबुद्धी जागविली पाहिजे.

भारतीय राष्ट्रीय एकात्मतेला येथील ख्रिश्चन धर्मगुरुंकडून काही प्रदेशराज्यांमध्ये धोका उत्पन्न झाला आहे. ख्रिश्चन समाज ज्या प्रदेशात अधिक संख्येचा, त्या प्रदेशराज्यांना ख्रिश्चन धर्मगुरु फुटीरतेचा संदेश देत आहेत. तशा प्रकारची बंडे उत्पन्न करीत आहेत. हे कृत्य म्हणजे सरळ सरळ स्वधर्माचा म्हणजे ख्रिश्चन धर्माचा द्रोहच आहे. हे फूट पाडणारे ख्रिश्चन धर्मगुरु स्वधर्मद्रोहीच खरे! कारण ख्रिस्ताचा विश्वप्रेमी क्रॉस त्यांनी धुळीस मिळविला आहे.

गेल्या दीडशेपेक्षा अधिक वर्षांमध्ये जे हिंदू समाजसुधारक झाले त्यांनी सामाजिक

विषमतेच्या विरुद्ध जे बंड उभारले आहे, ते अजून यशस्वी झाले नाही. अजून गावकुसाच्या बाहेरच्या जातिजमाती गावकुसाच्या आतील जातिजमातींशी समरस झालेल्या नाहीत.

आधुनिक मानवी समानतावादी मूल्यांच्या आधारावरच भारतीय राष्ट्रीयता जगू शकेल. एवढेच नव्हे तर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख इ. जगू शकतील. त्यात सांस्कृतिक समन्वयाची आवश्यकता आहे. सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेली, पुढारलेली, विभक्त असलेली अनेक प्रदेशराज्ये भारतात दिसतात. नागालँड, मिझोराम इ. ईशान्य दिशेकडचे अथवा हिमालयातले सामाजिक गट हे अजून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रेरणेपासून वंचित झालेले आहेत. गेली अनेक वर्षे तेथे भारतापासून फुटून निघण्याचा सामुदायिक सशस्त्र उठावाचा प्रयत्न वारंवार होत आहे. त्या प्रदेशातील सामाजिक गटांना विवेकवादाच्या आधारावर वाढत असणाऱ्या आधुनिक संस्कृतीच्या परिवारामध्ये आणून सोडण्याचे काम आधुनिक शिक्षणपद्धती व नवी अर्थरचना करू शकेल.

**(पुणे येथे दि. २० मार्च १९८२ रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेले भाषण.)**

**पूर्वप्रसिद्धी : नवभारत, एप्रिल १९८२, पृ. १ ते ४)**

ooo

## ६०

# भविष्यकाळ घडविणारा माणूस दिसावा

लो. टिळक स्मारक संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाचे अध्यक्ष, माझे मित्र जयंतराव टिळक, प्रमुख पाहुणे मोहन धारिया, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलनाचे प्रतिनिधी, व्यासपीठावरील इतर मान्यवर व्यक्ती व बंधूभगिनींनो!

या संस्थेच्या सुवर्ण महोत्सव समारंभाचा स्वागताध्यक्ष म्हणून मी आपणांपुढे उभा आहे. याचे अगोदर संस्थेचे कार्यवाह श्री. अशोक भट यांनी संस्थेचा इतिहास फार सुरेख भाषेमध्ये सांगितला असून या ठिकाणी उपस्थित असलेल्या मान्यवरांचा परिचय संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. वसंतराव जोशी यांनी करून देऊन फार सुंदर रीतीने सर्वांचे स्वागत केले आहे. त्यामुळे स्वागताध्यक्ष म्हणून असणारे माझे काम अगोदरच झाले आहे.

आपणापुढे आता बऱ्याच वर्षांचा इतिहास सांगितला गेला. त्यातील ६० वर्षांचा इतिहास माझ्या डोळ्यासमोरच घडलेला आहे. मी वाईला १९१४ साली विद्यार्थी म्हणून आलो, तेव्हापासून मी वाई कधी सोडलीच नाही. वाईबद्दलचे विलक्षण असे आकर्षण मला पहिल्यापासून आहे. माझा जन्म येथून ३०० मैलावर खान्देशात झालेला असला तरी मी पूर्णांशाने वाईकरच आहे. या ठिकाणी थोडेसे आत्मनिवेदन करावयास हरकत नाही. १९३२-३३ साली बडोद्याचे सयाजीराव महाराज इकडे आले होते. मधल्या आळीच्या धर्मशाळेत त्यांची सभा झाली. तिथे माझे भाषण झाल्यावर ते मला बाजूस घेऊन म्हणाले की, ''तुम्ही बडोद्याला याल काय? तेथे मी तुम्हास महत्त्वाची जागा देईन.'' मी म्हणालो, ''विचार करून सांगेन.'' त्यानंतर त्यांनी मला महाबळेश्वरला बोलावून घेतले व पुन्हा विचारले. तेव्हा मी म्हटले, ''मला जमेलसे दिसत नाही, क्षमा करा.'' माझ्या गुरुजींना हे समजले आणि त्यांनी विचारले, ''का गेला नाहीस?'' त्यांना मी दिलेले उत्तर थोडे अहंकाराचे आहे, पण सांगतोच. मनुस्मृतीत एक वाक्य आहे.

''राजान्नं तेज आदत्ते''

राजाचे अन्न घेतले की, आपले तेज नष्ट होते. पण त्या राजाबद्दल तर मला अतिशय आदर होता. भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये ज्यांचे नाव फार महत्त्वाचे आहे, असा हा राजा होता आणि तेव्हा मी तर एक लहान माणूस होतो; परंतु त्यावेळी मी वाई सोडून गेलो नाही. वाईबद्दल अशा अनेक आठवणी सांगण्यासारख्या आहेत; परंतु ही एकच आठवण मी आपणास सांगितली आहे.

लोकमान्यांनी गीतारहस्य प्रसिद्ध केले, त्याच्या दोन प्रती येथे आल्या. त्यातील प्रत भाऊशास्त्री लेले यांच्याकडे आली. ते स्वत:ला लोकमान्यांचे शिष्य म्हणवीत व प्रथम त्यांनी गीतारहस्याला पाठिंबा दिलेला होता; परंतु नंतर त्यांनी तो काढून घेतला आणि गीतारहस्यावर हजार पानांची टीका लिहिली. महाराष्ट्रात अशी तीन - चार प्रचंड पुस्तके गीतारहस्याचे खंडनावर लिहिली गेली. कोल्हापूरला दोन पुस्तके प्रसिद्ध झाली. पुण्याला आचार्य बापट यांनीही खंडनात्मकच लिहिले. महामहोपाध्याय विरुपाक्षशास्त्री हे त्रिखंड पंडित होते. त्रिखंडात जो नावाजलेला असतो, तो त्रिखंड पंडित! पुढे ते शंकराचार्यांच्या आद्यपीठाचे शंकराचार्य झाल्यावर पुण्यात आले असता लोकमान्य टिळकांनी विरुपाक्षशास्त्रींच्या पायावर गीतारहस्य ठेवल्याचे मला आठवते.

गीतारहस्यावर एवढा वाद जो झाला, त्याचे कारण की ज्या निवृत्तिवादी विचारसरणीचा पगडा या देशावर गेली हजारो वर्षे होता, त्या निवृत्तवादाचे खंडन करून कर्मवादाचे मंडन लोकमान्यांनी केले होते. निवृत्तिवादाची विचारसरणी म्हणजे मनुष्याच्या जीवनामध्ये ऐहिक जीवन हे एक बंधन आहे आणि या ऐहिक जीवनाच्या बंधनातून बाहेर पडणे जरूर आहे हाच तो अध्यात्मवादी विचार. हा विचार फक्त भारतातच नव्हे तर जगामध्ये इतरत्रही फार प्राचीन कालापासून प्रचलित आहे. प्रपंचाच्या बंधनातून दूर गेले पाहिजे. याला संन्यासवाद म्हणतात. तो भारताप्रमाणे जगातही आहे. उदा. ख्रिस्त-ख्रिस्ताची पकड अजूनही पश्चिमी जगात आहे. ती ढिली झालेली नाही. तो संन्यासी होता आणि त्याने पाहिले की, ही पृथ्वी पापांच्या भाराने खाली जात आहे. जगाचा अंत जवळ येणार आहे. कारण पाप फार झाले आहे. गरिबी हटाव म्हणता येते; पण पाप हटल्याशिवाय गरिबी हटणार नाही आणि पाप तर हटत नाही. भगवान ख्रिस्ताला असे वाटले होते, की हे जग बुडणार आहे आणि म्हणून मनुष्यमात्राला पापातून मुक्त करण्याकरता ख्रिस्ताने आत्मयज्ञ केला. ही अशी निवृत्तिवादाची परंपरा आहे. असा हा मोठा विलक्षण निवृत्तिवाद आपल्याकडे तात्त्विक, सुंदर, तर्कशुद्ध आणि प्रभावी भाषेत मांडला तो आद्य शंकराचार्यांनी. ज्या भगवत्‌गीतेने अर्जुनाला युद्धाकरता प्रवृत्त केले, तिचे रहस्य सांगताना शंकराचार्य म्हणतात की, ब्रह्मचर्यानंतर विवाह न करताच संसारातून निवृत्त होऊन संन्यास घ्यावा तरच मोक्ष मिळतो. म्हणजे विवाहही करावयाचा नाही. तो गौण मार्ग सांगितला आहे, असा विचार शंकराचार्यांच्या गीताभाष्यात आहे.

आमचे गुरू केवलानंद सरस्वती हे लोकमान्यांच्या विचारांचा पुरस्कार करणारे होते.

त्यांच्या शिष्यांनीही या गीतारहस्याच्या अधिष्ठानावर मोठमोठी वैचारिक युद्धे केलेली आहेत. शंकराचार्यांचे विचार खंडित केले म्हणून जुन्या परंपरेच्या पंडितांना सात्त्विक संताप आला आणि त्यांनी गीतारहस्याच्या खंडनपर मोठमोठे ग्रंथ लिहिले. अर्थात हे फार चांगले झाले. कारण विचारांचा संग्राम व्हावा लागतो. विचार हा संग्रामानेच पुढे जातो. विचार एकांगी आहे का? हे त्याशिवाय कळत नाही. विचारांचे संशोधन व्हावे लागते आणि असे संशोधन महाराष्ट्रात अनेक वेळा झालेले आहे. होत आहे.

जोतीराव फुल्यांनी परंपरागत हिंदू संस्कृतीवर जो विलक्षण हल्ला केला, त्याविरुद्ध या महाराष्ट्रात मराठी गद्याला उंची देणारा प्रभावी विचार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी केला. विष्णुशास्त्र्यांनी विरोध केला याचे कारण ते विचारवंत होते. अत्यंत तात्त्विक, परंपरेचे समर्थन करणारी जी विचारवंत माणसे असतात, त्यांना विचारांचा सामना करावाच लागतो. म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे महाराष्ट्राच्या वैचारिक इतिहासात फार मोठे स्थान आहे असे मी जोतीराव फुल्यांचे सर्वार्थाने समर्थन करणारा असूनही मानतो. कारण त्यात विचारांचा संग्राम आहे.

लोकमान्यांनी जो असंतोष निर्माण केला तो नैतिक असंतोष आहे. परकीय राज्य, राज्यकर्ते हा एक भाग झाला; परंतु इथला माणूस जो आहे, त्याच्या माणुसकीचा उदय व्हावयाला पाहिजे, त्याचा आत्मविकास पुरा व्हायला पाहिजे, त्याचा मार्ग जो आहे, तो परमार्थाकडे गेला पाहिजे. म्हणजे मनुष्याचे मनुष्यत्वाच्या पलीकडे जे दर्शन होते तिकडे माणूस चालला पाहिजे. माणुसकीची बंधने घट्ट होतील इतका तो वर आला पाहिजे असा दृष्टिकोन टिळकांनी सांगितलेला आहे. योगी अरविंदांनी, न्यायमूर्ती रानडे यांनी भारतात भवितव्याचे दर्शन घडविले आहे असे सांगून लोकमान्यांना साक्षात्कारी पुरुषच म्हटले आहे.

लो. टिळक स्वत:ला कधी साक्षात्कारी म्हणत नसत. ते अत्यंत साधे होते. त्यांनी कधी कोणाला मंत्र दिला नाही, उपदेश दिला नाही. कसलीही कसोटी लावा त्यातून उत्तम असे सुवर्णच बाहेर येईल, असे त्यांचे पवित्र जीवन होते; आणि अशा या आदर्श मनुष्याने मानवी आदर्शाचा आध्यात्मिक विचार सांगितला तो गीतारहस्यात. टिळकांनी एक उच्च दर्जाचे नीतिशास्त्र लिहिले आहे. ज्ञानेश्वरीच्या उपसंहारात ही भगवंताची वाङ्मय मूर्ती आहे असे म्हटले आहे. म्हणजे भगवत्‌गीतेच्या योगाने भगवंत आपल्याला भेटत असतो, दिसत असतो. तसेच टिळक आपल्याला कशात दिसतात, तर ते गीतारहस्यात. तेथे ते अमर रूपाने उभे आहेत.

लोकमान्यांच्या या अमरत्वाचे स्मरण कशाकरता करावयाचे? या देशात जर राजनीती चालवावयाची असेल तर प्रथम नीती काय याचा विचार केला पाहिजे. हा विचार प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनीही मांडला आहे. ॲरिस्टॉटलने त्याच्या 'राज्यशास्त्रात' असे म्हटले आहे की, राज्यशास्त्र नीतिशास्त्राकडे पाहत आहे आणि नीतिशास्त्र राज्यशास्त्राकडे पाहत आहे.

म्हणूनच टिळकांनी संबंध आयुष्य राजनीतीला वाहिले; परंतु नीतीचा ध्यास कायम ठेवला. असा हा फार मोठा विचारवंत, तत्त्वज्ञ आणि मुक्त पुरुष आपल्याकडे होऊन गेला. त्यांना अंतिमाचा स्पर्श झालेला होता; परंतु त्यांनी ते कधी सूचितही केले नाही. त्यांनी एकच जप सांगितला आणि तो म्हणजे स्वातंत्र्य!

हा थोर आदर्श आपल्या डोळ्यासमोरून आता बाजूला झालेला आहे. राजनीती नीतीकडे बघेनाशी झाली आहे. ती आपल्या स्वत:च्याच स्वरूपात म्हणजेच सत्तेत मग्न झालेली आहे. ज्याप्रमाणे त्या नार्सिससने झऱ्याच्या स्वच्छ पाण्यात आपले रूप पाहिले आणि त्यातच तो निमग्न झाला, नसे सध्या राजनीतीचे झाले आहे. त्यामुळे राजनीतीचा जो आदर्श, तिकडे तिचे लक्ष नाही आणि त्यामुळेच विनाशाचा संभव आहे. फार मोठी नैतिक प्रेरणा इथे जागृत व्हायला पाहिजे आणि या जागृतीची साधने आपण टिकविली पाहिजेत आणि लोकमान्यांचे स्मरण म्हणजे या जागृतीचे एक साधन आहे.

स्वातंत्र्यपूर्व युग हे फार मोठे विलक्षण असे युग या देशात होऊन गेले. केवढी मोठमोठी माणसे इथे जन्माला आली आणि ब्रिटिश जर हा देश लवकर सोडून गेले नसते तर आणखी एक प्रचंड चैतन्यशक्ती इथे निर्माण झाली असती. त्या शक्तीचा एक सूचक माणूस म्हणजे सुभाषचंद्र बोस दिसत होते. अहिंसेच्या योगाने आपणाला स्वराज्य मिळाले; परंतु वैचारिक दृष्टीने कार्यकारणभावाकडे पाहिले तर अहिंसेने स्वराज्य मिळालेच असते असे नाही. तो एक इतिहासाचा अपघात आहे. अर्थात अहिंसात्मक लढा देताना उच्च दर्जाचे नैतिक आदर्श राखणाऱ्या महात्मा गांधींचे वैशिष्ट्यही फार मोठे आहे. आपला स्वातंत्र्यपूर्व इतिहास हा अत्यंत प्रेरक असा इतिहास झाला आहे आणि या इतिहासाचे अतिशय उत्कृष्ट, उच्चतम असे उदाहरण म्हणजे लोकमान्य टिळक आहेत. त्यांचे स्मरण आज या लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने होत आहे.

या ग्रंथालयात नवीन नवीन साधने वापरली जात आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात येथे रेडिओ आला. नंतर अलीकडे टेलिव्हिजनही आला. वाईचे टिळक मंदिर हे शहरातील बौद्धिक व सांस्कृतिक जीवनाचे मुख्य स्थान आहे. या मानवी जीवनात जी जास्तीत जास्त माहिती पाहिजे. ज्ञान पाहिजे. त्या ज्ञानाचे साधन असे हे ग्रंथालय बनावे व इथे भविष्यकाळ घडविणारा माणूस दिसावा अशी सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने मी इच्छा व्यक्त करतो आणि आजच्या या समारंभाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून माझे मित्र जयंतराव टिळक व मोहन धारिया येथे आले आहेत, त्यांचे व आपणा सर्वांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.

**(लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथालय, वाई, जि. साताराच्या दि. २८ ऑगस्ट, १९८२ रोजी संपन्न सुवर्णमहोत्सवात स्वागताध्यक्ष म्हणून केलेले भाषण, संदर्भ- सुवर्णमहोत्सव स्मरणिका, १९८२)**

○○○

६१

# संभवामि युगे युगे

भगवंताचे अवतार पृथ्वीवर प्रत्येक युगात होत असतात अशी हिंदू धर्माची निदान गेल्या दोन अडीच हजार वर्षांतील मूलभूत कल्पना आहे. या कल्पनेचे मूळ वेदकालापर्यंत पोचविता येते. अवतारतत्त्वाचे व्यवस्थित परंतु; संक्षिप्त विवरण प्रथम भगवद्गीतेमध्ये मिळते. भगवद्गीतेच्या चौथ्या अध्यायातील सहा व सात या श्लोकांत भगवान या मूलभूत कल्पनेचे उत्कृष्ट तात्त्विक विवरण करून सांगतात -

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

अर्थ : जेव्हा धर्माची ग्लानी होते व अधर्म बोकाळतो तेव्हा तेव्हा स्वत:ला मी निर्मितो. साधूंच्या परित्राणाकरिता व दुष्टांच्या विनाशाकरिता, त्याचप्रमाणे धर्माची स्थापना करण्याकरिता मी युगायुगाचे ठायी जन्म घेतो.

या दोन लोकांत भगवानाचे अवतारकार्य व अवताराचा समय सांगितला आहे. युग शब्दाचा अर्थ कृत, त्रेता, द्वापर व कली असा प्रसिद्ध आहे. त्याची भिन्न भिन्न वर्षगणना पुराणांमध्ये सांगितली आहे. वैदिक काली पाच वर्षे म्हणजे युग असा अर्थ होता. महाभारत व पुराणे यामध्ये युगाचे कालपरिमाण म्हणजे वर्षसंख्या निरनिराळी दिलेली आहे. काही ठिकाणी चार युगांची मिळून वर्षसंख्या हजार वा बाराशे, काही ठिकाणी बारा हजार व अलीकडे गेल्या बाराशे वर्षांच्या काळात अनेक लक्ष वर्षे मानलेली दिसते. परंतु भगवद्गीतेमध्ये सदर संदर्भात युग शब्दाचा अर्थ कृतादी चार युगे धरून करावयाचा नाही. ज्या ज्या वेळी धर्मग्लानी होते, अधर्म माजतो व दुष्ट प्रबळ होतात त्या त्या वेळी ईश्वर अवतार घेतो असे

म्हटले आहे. याचे स्पष्टीकरण असे करता येते : धर्मसंस्थापनेपासून धर्मग्लानीपर्यंतचा समय म्हणजे युग (Time-Unit) असा होतो आणि हा अर्थ हरिवंशादी पुराणांवरून बरोबर आहे असे सिद्ध होते. हरिवंशामध्ये अवतार शब्दाला प्रादुर्भाव हा शब्द पर्याय म्हणून दिला आहे. त्यात म्हटले आहे की,

**प्रादुर्भाव सहस्राणि अतीतानि न संशयः ।**
**भूयश्चैव भविष्यन्तीत्येवमाह प्रजापतिः ॥**

**(हरिवंश ३११ : ४१ : ११)**

अर्थ : हजारो प्रादुर्भाव म्हणजे अवतार होऊन गेले आहेत आणि भविष्यकाळीही व्हावयाचे आहेत, असे प्रजापतीने सांगितले आहे.

भगवद्गीतेमध्ये सुद्धा अर्जुना, तुझे आणि माझे पुष्कळ जन्म झाले आहेत, फरक एवढाच की ते तू जाणत नाहीस व मी ते सर्व जाणतो. अवतारतत्त्वाच्या संदर्भात भगवान सांगतात की, माझा पुन्हा पुन्हा होणारा जन्म व माझे कार्य हे दोन्हीही दिव्य आहेत. ही अशी तात्त्विक स्वरूपात जो जाणतो, त्याला मोक्ष प्राप्त होतो.

धर्मस्थापनेचा अर्थ काय व धर्म म्हणजे काय, यासंबंधी स्पष्टीकरण भगवद्गीतेत मिळते काय या प्रश्नाचे उत्तर भगवद्गीतेतूनच मिळावयास पाहिजे. कारण अवतारतत्त्वाचे विवरण त्यातच सापडते. धर्म म्हणजे मोक्षाकडे नेणारे कर्तव्य होय. साधूचे परित्राण करावयाचे म्हणजे केवळ त्यांच्या शरीराचे रक्षण करावयाचे असे नव्हे, तर या मानवी विश्वात साधुत्व कायम ठेवावयाचे. कारण साधुत्वाच्या योगानेच मनुष्यास मोक्षप्राप्ती होते. साधुत्व म्हणजे आदर्शभूत पवित्र आचरणाचा स्वभाव. हे सदाचरण करण्याकरिता लोकसंस्था व्यवस्थित असावी लागते. भगवद्गीतेप्रमाणे व्यवस्थित लोकसंस्था म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्था होय. समाजधारक कर्मे नीट चालली म्हणजे समाजधारणा होते. समाजधारक कर्मे व्यक्तींकडून होतात. व्यक्तींची कर्मे स्वभावानुसारी व समाजहितकारक व व्यक्तिहितकारक असली तरच त्यांना धर्म ही संज्ञा प्राप्त होते. ती निष्काम बुद्धीने व ईश्वरार्पण बुद्धीने केली तर चित्तशुद्धी होते. चित्तशुद्धीने तत्त्वज्ञान प्राप्त होऊन म्हणजे अंतिम सत्याचा साक्षात्कार होऊन मोक्षाचा लाभ होतो. या धर्ममार्गात जे स्थिर असतात त्यांनाच श्रेष्ठ, सज्जन किंवा साधू म्हणतात. सज्जन प्रभावी असले तर त्यांचेच अनुकरण इतरेजन म्हणजे सामान्य लोक करतात. साधूंचा आदर्श पुरुष म्हणजे पुरुषोत्तम होय. तोच धर्मसंस्थापक असतो. धर्मसंस्थापकच ईश्वराचा अवतार होय.

ईश्वरावतार असलेला पुरुषोत्तम कसा ओळखायचा याचे लक्षण प्रारंभीच उद्धृत केलेल्या अवतारविषयक लोकांत मिळते. दुष्टसंहार व धर्मसंस्थापना जो जो करतो तो तो अवतार होय. ही अवताराची कल्पना समर्थ रामदासांपर्यंत या देशात रूढ होती. समर्थ रामदासांनी

दासबोधात म्हटले आहे की, 'धर्मस्थापनेचे जे नर। ते ईश्वराचे अवतार। झाले आहेत, पुढे होणार। देणे ईश्वराचे ॥' धर्मस्थापनेकरिता आम्ही ऋषिमुनी पुन: पुन: जन्म घेतो असे संत तुकारामांनीही म्हटले आहे. नारदादी मुनी पुन: पुन: संतांच्या रूपाने अवतरतात व त्यापैकीच आम्ही आहोत असे तुकाराम महाराजांचे म्हणणे आहे.

शिव-विष्णू हे गेल्या अडीच हजार वर्षांतील हिंदू धर्माचे मुख्य देव होत. वैष्णव पुराणामध्ये व महाभारतात विष्णूच्या अवतारांच्या कथा आणि शैव पुराणात व महाभारतात शिवाच्या अवतारांच्या कथा आहेत. वैष्णव पुराणे हरिवंश, विष्णुपुराण, श्रीमद्भागवत इत्यादी होत. वायुपुराण, पद्मपुराण, स्कंद इत्यादी अनेक पुराणे ही शैव पुराणात समाविष्ट होतात. शैव व वैष्णव म्हणून नसलेली मार्कण्डेयादी पुराणे सुद्धा शिवाचे व विष्णूचे अवतार सांगतात. अवतार केवळ शिवाचे किंवा विष्णूचेच पुराणांनी सांगितलेले नाहीत. अन्य गणेशादी देव, ऋषिमुनी, गंधर्व, अप्सरा इत्यादिकांचेही अवतार पुराण-वाङ्मयात वर्णिले आहेत. शापभ्रष्ट होऊन देव, ऋषी, गंधर्व, अप्सरा इत्यादी भूलोकात जन्म घेतात किंवा काही विशिष्ट उच्च उद्देशांनीही जन्म घेतात, असे त्यामध्ये सांगितलेले असते; परंतु अवतारकल्पना ही मुख्यत: शिव-विष्णू यांच्या संबंधात महिम्यास प्राप्त झालेली आहे. शिवापेक्षाही विष्णूच्या अवतारात कल्पनेचा प्रभाव हिंदू मनावर व हिंदू धर्मावर सर्वात अधिक आहे.

लोकांमध्ये दशावतारांची कल्पना अत्यंत रूढ आहे. ते म्हणजे मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, दाशरथी राम, कृष्णवासुदेव, बुद्ध व कल्की हे होत. यापैकी मत्स्य, कूर्म, वराह व वामन या चार अवतारांचे मूळ वेदांमध्ये सापडते. वामनाचे मूळ स्वरूप ऋग्वेदातही सापडते. तीन पावलांत त्रैलोक्याला व्यापणारा त्रिविक्रम विष्णू ऋग्वेदात वर्णिला आहे. यज्ञसंस्था जेव्हा प्राचीन आर्यांच्यामध्ये वरिष्ठ ठरली त्या ऋग्वेदोत्तर काळात विष्णू हा यज्ञरूप व सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ म्हणून मान्यता पावला. ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणात देवांमध्ये अग्नी सर्वात खालचा व विष्णू हा सर्वात वरचा, असे म्हटले आहे.

ऐतिहासिक दृष्टीने अवताराची मूळ कल्पना विष्णूच्या वासुदेवभक्ती संप्रदायापासून सुरू झाली. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकरांनी वासुदेवभक्ती संप्रदाय हा इ.स. पू. चौथ्या शतकापर्यंत निश्चितपणे पोचविला आहे. तत्पूर्वीही तो या देशात प्रसिद्ध होता, असे अनुमान करता येते. पाणिनीच्या काळी म्हणजे इ.स. पू. चौथ्या शतकाच्या सुमारास वासुदेवकृष्ण व अर्जुन यांची जोडी प्रसिद्ध होती. वासुदेव हा अधिक पूजनीय म्हणूनही मान्यता पावला होता. वासुदेव हे नारायणाचे म्हणजे विष्णूचे मानवरूप होय. म्हणून तो विष्णूचा अवतार या स्वरूपात पूज्य झाला. वेदातील वामन हाही विष्णूचेच स्वरूप होय असे वैदिक काळापासून मानत होते. दशावतारातील बुद्ध व कल्की सोडल्यास बाकीचे अवतार विष्णूचे होत अशी कल्पना सर्वात प्राचीन असलेल्या पुराणांमध्ये वर्णिली आहे. हरिवंशात वराह, नरसिंह, वामन, दत्तात्रेय, परशुराम, दाशरथी राम, कृष्ण व कल्की हे आठ विष्णूचे अवतार होत

असे म्हटले आहे. महाभारताच्या शांतिपर्वात हंस, कूर्म, मत्स्य, वराह, वामन, परशुराम, दाशरथी राम, कृष्ण व कल्की असे नऊ अवतार गणले आहेत. महाभारतात अवतारांची संख्या व नामनिर्देश निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे आले आहेत. कपिल, दत्तात्रेय, धन्वंतरी, नरनारायण, ऋषभदेव इत्यादी अवतारही सांगितले आहेत. ऋषभदेव हे जैन धर्माप्रमाणे चोवीस तीर्थंकरांपैकी प्रथम तीर्थंकर होत. भारत, भागवत, स्कंद या पुराणांमध्ये या आदितीर्थंकराचा अवतार म्हणून समावेश केला आहे.

हिंदुस्थानात प्राचीन काळी असलेल्या सर्व धर्मांतील आद्य धर्मप्रवर्तकांचा हिंदू धर्मात समावेश करण्याची प्रवृत्ती फार प्राचीन काळापासून दृढमूल झाली आहे. याचे कारण, अवतार म्हणजे धर्मसंस्थापक हे तत्त्व स्वीकारले गेले, हे होय. त्यामुळे जैनांचा प्रथम तीर्थंकर ऋषभदेव साक्षात भगवानाचा अवतार होय, असे स्वीकारले गेले. दुसरा महान भारतीय संस्थापक म्हणजे भगवान गौतमबुद्ध होय. गौतमबुद्धाला विष्णूचा अवतार म्हणून महाभारताचे शांतिपर्व (३२६.७२), मत्स्यपुराण (४७), अग्निपुराण (१६.१-८), नृसिंहपुराण (३६.९), पद्मपुराण (उ. २५२) व श्रीमद्‌भागवत यांच्यामध्ये मान्यता दिलेली दिसते. ही मान्यता इ.स. च्या तिसऱ्या किंवा चौथ्या शतकामध्ये म्हणजे महायान संप्रदायाच्या प्रसारानंतर प्राप्त झाली असावी. कारण महायान बौद्ध धर्मात बुद्ध हा मुळामध्ये परब्रह्माप्रमाणे असलेल्या बोधिसत्त्वाच्या जगदुद्‌धारार्थ व धर्मचक्रप्रवर्तनार्थ झालेला अवतार होय, असा सिद्धांत स्वीकारला गेला होता. या परब्रह्माप्रमाणे असलेला विश्वाधिष्ठान किंवा विवकर्ता भगवान हा आदिबुद्ध होय, असे अद्वैतवादी महायान पंथ मानत होता. त्यामुळे प्रचलित सनातन हिंदू धर्मालाही गौतमबुद्धाचा अवतार म्हणून स्वीकारणे सहज शक्य झाले. भारतात २ हजार वर्षांपूर्वी ख्रिस्ती व महंमदी असते तर ख्रिस्त व महंमदही अवतार म्हणून मान्य झाले असते. इ.स. च्या बाराव्या शतकातील संस्कृत कवी जयदेव याने भगवान कृष्णाचे दशावतार सुंदर शैलीने वर्णिले आहेत. त्यात म्हटले आहे,

**निन्दसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं ।**
**सदयहृदयदर्शितपशुघातम् ।**
**केशव धृतबुद्धशरीर जयजगदीश हरे ॥**

**तात्पर्यार्थ :** बुद्धाचे शरीर धारण करणाऱ्या केशवा, जगदीशा, हे हरे, तुझा जय होवो. तू बुद्धशरीर धारण करून यज्ञविधी सांगणाऱ्या सर्व वेदांची निंदा केलीस, कारण त्या यज्ञविधीत पशुघात म्हणजे प्राण्यांची हिंसा होते. तुझे हृदय सदय असल्यामुळे तू ही निंदा केली आहेस.

श्रीमद्भागवताने कृष्णाच्या विविध लीला वर्णन करून सर्वोत्तम भक्ती म्हणजे कृष्णभक्ती म्हणून कृष्णाला श्रेष्ठ स्थान प्राप्त करून दिले आहे. त्यात दशावतार सांगितले नसून बावीस अवतार सांगितले आहेत व कृष्ण सर्वश्रेष्ठ पूर्णावतार म्हणून वर्णिला आहे. जयदेव कवीने

प्रत्यक्ष कृष्ण हा साक्षात भगवानच होय, तो अवतार नव्हे, असे गृहीत धरून दशावतार वर्णिले आहेत. त्यात बलराम हा आठवा अवतार मानला आहे. उत्तर हिंदुस्थानातील वैष्णव भक्तिसंप्रदायातील एक वैष्णव संप्रदाय कृष्णाच्या ऐवजी रामास पूर्णावतार मानतो; परंतु राम हा पूर्णावतार म्हणून उशिरा मान्यता पावला आहे. अगोदर मुळात वासुदेवकृष्ण हाच अवतार म्हणून प्रसिद्ध झाला. पुष्कळच नंतर अवतार म्हणून राम.

**(आकाशवाणी, पुणे केंद्र)**

ooo

६२

# महाभारतातील धर्मशास्त्र, प्रवृत्ती मार्ग, राजकारण व व्यवहार नीती

महाभारताचा मुख्य विषय भरतकुलाचा विशेषत: कौरव-पांडवांचा इतिहास हाच असला तरी राजधर्म हा विषयही त्यात प्रामुख्याने येतो. धर्मरक्षणद्वारा प्रजापालन करणे हा मुख्य राजधर्म असल्यामुळे धर्मशास्त्रही महाभारतात विस्ताराने सांगावे लागले आहे. मन्वादिस्मृतींना धर्मशास्त्र म्हणतात. मन्वादिस्मृतींमध्ये जे जे विषय आले आहेत ते ते सर्व काही संक्षेपत: वा काही विस्तारश: महाभारतात आले आहेत. स्मृतींमध्ये सांगितलेले जातकर्मादी सोळा संस्कार महाभारतात क्रमश: सविस्तर आले नसले तरी त्यांचाही प्रसंगानुरोधाने उल्लेख येतो. ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष, गांधर्व, असुर इत्यादी ८ वा ९ प्रकारच्या विवाहांचे स्पष्टीकरण अनेक ठिकाणी आले आहे. महाभारताने विवाहाची स्वयंवरपद्धती क्षत्रियांकरिता प्रशस्त मानली आहे. ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी या चार आश्रमांचीही चर्चा अनेक वेळा आली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्व व शूद्र या चार वर्णांच्या कर्तव्यांची, उत्पत्तीची व संकरजातींची चर्चाही वारंवार आली आहे. स्मृतींमध्ये श्राद्ध, भक्ष्या-भक्ष्य, स्पृश्यास्पृश्य, पवित्र व अपवित्र पदार्थ व त्यासंबंधी विधिनिषेध यांचे विवरण येते, तसेच महाभारताच्या शांती व अनुशासन पर्वात वेळोवेळी आलेले आहे. स्मृतीत पापकर्मे, प्रायश्चित्त व पुण्यकर्मे यांची चर्चा असते. तशीच महाभारतातही सापडते. (म. भा. शांती पर्व ३४, ३५, ३६).

याशिवाय पुराणांचे धर्मशास्त्रही महाभारतात आढळते. पुराणांच्या धर्मशास्त्रात तीर्थयात्रा, एकादशी इत्यादी व्रते, उपवास, दाने, गोदान, गोमहिमा, शिवलिंगपूजा, विष्णुपूजा इत्यादी विषय तपशीलवार सांगितलेले आहेत, तेही विषय महाभारतात सांगितले आहेत. विशेषत: महाभारताच्या वनपर्वातील तीर्थयात्रापर्व या उपपर्वात पुष्कर, प्रभास, आगस्त्य सरोवर, महाकाल, नर्मदा, द्वारका, सिंधू, सागरसंगम, काश्मीरमधील नागभवन व वितस्ता, कुरुक्षेत्र, ब्रह्मावर्त, प्रयाग, गया, गंडकी, काशी, व्यासस्थळी, सरस्वती, गोदावरी, कावेरी इत्यादी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतची तीर्थस्थाने, तेथील देवता, तेथे करावयाची दाने, श्राद्धे, व्रते व इतर पुण्यकर्मे यांचे सविस्तर वर्णन आले आहे.

स्मृती व पुराणे यांतील धर्मशास्त्र महाभारतात आलेले असले तरी महाभारतात धर्मशास्त्राची तात्त्विक व ऐतिहासिक विस्तृत उपपत्ती जशी आली आहे तशी स्मृती व पुराणे यांच्यात आलेली नाही, हे महाभारताच्या धर्मशास्त्राचे एक असाधारण वैशिष्ट्य आहे. वेद, स्मृती व सदाचार हे धर्माधर्मनिर्णयाचे प्रमाण होय, असे स्मृतीत व पुराणात म्हटले आहे व तसेच महाभारतातही म्हटले आहे. परंतु वेद, स्मृती व सदाचार यांच्याही पलीकडे महाभारताची धर्मविषयक प्रमाण मीमांसा गेली आहे. वनपर्वात यक्ष-युधिष्ठिर संवादात युधिष्ठिराने धर्मतत्त्व सांगताना म्हटले आहे की, 'तर्को प्रतिष्ठ: श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्य वच: प्रमाणम् । धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गत: स पंथा:॥' तर्क म्हणजे बुद्धिवाद, धर्माधर्म ठरविताना बुद्धिवादाने निश्चित मार्ग सापडणे कठीण जाते; श्रुती व ऋषींच्या स्मृती यांच्यात अनेक मतभेद सापडतात. म्हणून धर्माचे तत्त्व गूढ आहे. यासाठी महाजन म्हणजे संत किंवा शिष्ट ज्या मार्गाने जातो तोच मार्ग योग्य होय. शिष्टाचे म्हणजे संताचे लक्षण व त्याचा मार्ग याबद्दल वनपर्वात मिथिलावासी धर्मव्याधाने पुष्कळ ऊहापोह केलेला आहे. धर्मव्याध हा शूद्र व तुलाधार हा वैश्य हे धर्मप्रवक्ते त्यांनी वेदवेत्त्या ऋषींना धर्मशास्त्राचा उपदेश करावा, हे महाभारताचे वेगळे वैशिष्ट्य आहे. वस्तुत: धर्मशास्त्राचे उपदेशक ब्राह्मण व क्षत्रिय हेच परंपरेप्रमाणे पाहिजेत. धर्मप्रवचनाचा अधिकार विशिष्ट वंश वा जात यांनाच नाही, असे त्यामुळे सूचित होते. धर्मव्याधाने शिष्ट म्हणजे संत याची व्याख्या सांगितली ती अशी - 'कामक्रोधौ वशे कृत्वा दंभं लोभमनार्जवम्। धर्ममित्येव संतुष्टास्ते शिष्टा: शिष्टसंमता:॥' (वन २०७-६३). काम, क्रोध, दंभ, लोभ व वक्रता यांना वश करून केवळ कर्तव्य म्हणून जे समाधान पावतात तेच शिष्टमान्य शिष्ट होत. या शिष्टांच्या आचारात वडिलांची सेवा, ज्ञान, शांती व दान या चार गोष्टी नित्य असतात. वेदांचे रहस्य सत्य होय. सत्याचे रहस्य इंद्रियदमन होय आणि दमनाचे रहस्य त्याग होय. शिष्टांच्या आचारात हे नेहमी असते. असा आचार हाच संतांचा धर्म होय, असा आचार हे संतांचे लक्षण होय. सर्वभूतदयावंत असे संत, 'द्रोह करू नये, दान करावे, सत्य सदा बोलावे' या तीन नियमांचे पालन करतात ते संत, प्रज्ञाप्रासादावर आरूढ होऊन महाभयापासून मुक्त होतात ते संत, लोकयात्रा, कर्तव्य व आत्महित यांचा विचार करून सर्व शक्ती पणाला लावून सज्जनांना दान देतात. जाजली मुनीला तुलाधराने धर्मवेत्त्याचे लक्षण थोडक्यात असे सांगितले आहे : 'सर्वेषां य: सुहृन्नित्यं सर्वेषां च हिते रत:। कर्मणा मनसा वाचा स धर्मवेद जाजले ॥' (शांति २६१-९). हे जाजले, सर्वांचा सर्वदा मित्र, सर्वांच्या हितात कर्माने, मनाने व वाणीने नित्य रत जो तोच धर्मज्ञ होय. हाच अभिप्राय मनात आणून भीष्माने धर्मराजास म्हटले की, 'लोकसंग्रहसंयुक्तं विधत्रा विहित पुरा । सूक्ष्मधर्मार्थनियतं सतां चरितमुत्तमम्॥' (शांति २५८.२५) ''लोकसंग्रहकारक व सूक्ष्म धर्म पत्करावा हे सांगणारा संतांचा आचार ब्रह्मदेवाने प्रथम निर्माण केला.''

लोकयात्रा किंवा लोकसंग्रह ही शब्दावली महाभारतातील धर्मविवेचनात अनेकदा येते. लोकयात्रा किंवा लोकसंग्रह हे धर्माचे एक दृश्य प्रयोजन सांगितले आहे. लोकसंग्रहालाच ज्ञानेश्वरीत 'लोकसंस्था' असा उचित पर्याय दिला आहे. भीष्मांनी शांतिपर्वात स्पष्ट म्हटले आहे की, 'लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियम: कृत:। उभयत्र सुखोदर्क:...॥' या जगात लोकजीवन नीट चालावे म्हणूनच धर्मशास्त्र निर्माण केले आहे. त्यामुळे ऐहिक व पारलौकिक कल्याण लाभते. लोकजीवन नीट चालते. याचा अर्थ लोकांना धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थ नीट साधता येतात. या पुरुषार्थांना त्रिवर्ग अशी अगदी प्राचीन संज्ञा आहे. नंतर मोक्ष हा चौथा पुरुषार्थ या त्रिवर्गाला जोडून गणिला गेला तेव्हा चतुर्विध पुरुषार्थ असे म्हणू लागले. भीष्म व व्यास यांच्या मते अर्थ, काम व मोक्ष हे तिन्ही पुरुषार्थाचे मुख्य साधन धर्म होय. धर्मानेच अर्थ व काम यांची सिद्धी होते. त्याकरिता धर्माची उपेक्षा करण्याची आवश्यकता नाही. उलट अर्थ व काम यांचा ध्यास धरून धर्माची उपेक्षा केल्याने अर्थ व काम हे पुरुषार्थही धोक्यात येतात. म्हणून व्यासांनी महाभारतात म्हटले आहे : ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चित् शृणोति माम् । धर्मादर्थश्च कामश्च स धर्म: किं न सेव्यते ॥ मी हात वर करून ओरडत आहे, परंतु कोणी माझे ऐकत नाही, धर्मानेच अर्थ व काम यांची प्राप्ती होते. त्या धर्माचे आचरण का करीत नाही? धर्मादी चार पुरुषार्थांच्यामध्ये कोणता अधिक महत्त्वाचा यासंबंधी शांतिपर्वात विदुर, अर्जुन, नकुल, सहदेव, भीम व युधिष्ठिर यांची उद्बोधक चर्चा आली आहे (शांति १६७).

महाभारतात अनेक ठिकाणी (कर्णपर्व ६९.५९; शांति १०९.१२) धर्म शब्दाचा व्युत्पत्यर्थ सांगून धर्माची व्याख्या केली आहे : 'धारणात् धर्ममित्याहु: धर्मेण विधृता: प्रजा: । य: स्याद्धारण संयुक्त: स धर्म इति निश्चय:॥' ''धर्म हा शब्द धृ=धारण करणे या धातूपासून निघाला असून धर्मानेच सर्व प्रजा तारल्या आहेत. ज्याने धारण होते तो धर्म, असा निर्णय आहे.'' लोकसंस्था चालविण्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीची असते; म्हणून धर्मप्रधान व्यक्ती म्हणजे जी व्यक्ती स्वत:ला जे अहितकारक तेच सर्वांना अहितकारक होय असे मानते ती होय. स्वत:ला जे हितकारक तेच इतरांनाही हितकारक असते असे समजून वागणारी व्यक्ती म्हणजेच आत्मौपम्य दृष्टी असलेली व्यक्ती होय. आत्मौपम्य दृष्टी म्हणजे स्वत: व इतर यांना समान लेखणे. अर्थ किंवा काम पुरुषार्थाकडे ज्या व्यक्तीचे मन जास्त आकर्षिले जाते ती व्यक्ती जगाशी आत्मौपम्याने वागू शकत नाही. धर्माचे एकच सार महाभारतात भीष्माने सांगितले आहे ते म्हणजे जे स्वत:स प्रतिकूल ते इतरांनाही बाधू नये असे वर्तन म्हणजेच धर्म होय. इतर वर्तन म्हणजे कामप्रेरित वर्तन समजावे. आत्मौपम्य दृष्टी हेच धर्माधर्मनिर्णयाचे प्रमाण होय. (अनुशासन ११३-८, ९, १०)

धर्मशास्त्राचा इतिहास इतरत्र स्मृतींमध्ये इतिहास या दृष्टीने फारसा सांगितलेला आढळत नाही. युगभेदाने धर्मात परिवर्तन होते ही मूलभूत कल्पना स्मृतींमध्ये, पुराणांमध्ये व

महाभारतात सारखीच स्वीकारलेली आहे. परंतु पुराणांमध्ये व महाभारतामध्ये यासंबंधी स्मृतीपेक्षा एक निराळा युगधर्मविचार आढळतो. महाभारतात व पुराणांत म्हटल्याप्रमाणे कृत, त्रेता, द्वापार व कली हे युगचक्र सारखे फिरत असते. कृतादी युगक्रमाने धर्माचा ऱ्हास होत जातो, धर्माचे चार पाद म्हणजे चार विभाग धरून असे म्हटले आहे की, कृतयुगात संपूर्ण चतुष्पाद धर्म असतो. त्रेतायुगात त्रिपाद, द्वापारात द्विपाद आणि कलीमध्ये एकपाद धर्म म्हणजे चतुर्थांश धर्म शिल्लक राहतो. कृतयुगामध्ये एकच ब्राह्मण किंवा हंसवर्ण असतो, चातुर्वर्ण्य नसते, सर्व मानव समान असतात, वेद एकच असतो, चार वेद नसतात. हा कृतयुगातील एक वेद म्हणजेच ईश्वराचे नाव म्हणजे प्रणव हा शब्द. कृतयुगात सर्व लोक स्वभावत:च शुद्ध बुद्धीचे म्हणजे कामक्रोधाचे विकार जिंकलेले असतात. या शुद्ध नैतिक अवस्थेतून अध:पात झाल्यावर चार वेद व चार वर्ण उत्पन्न होतात. ही कल्पना स्मृतीमध्ये मान्य केलेली नाही. कारण स्मृतींमध्ये ऋग्वेदादी वेद हेच मुख्य प्रमाण होत. उलट महाभारत व भगवद्गीता यांच्या दृष्टीने शुद्ध बुद्धी हेच अंतिम धर्मप्रमाण होय. श्रुती, स्मृती व सदाचार ही दुय्यम प्रमाणे होत.

हिंदू धर्माचा आधुनिक ऐतिहासिक दृष्टीने इतिहासक्रम ठरविण्यास महाभारताचा व पुराणांचा उत्तम उपयोग होतो. श्रुतिस्मृत्युक्त यज्ञसंस्था ही हिंदू धर्मात प्रथम नव्हती. म्हणजे वैदिक आर्य येण्याच्या पूर्वी तीर्थ, व्रत, तप, दान व मूर्तिपूजा हाच सर्व वर्ण साधारण धर्म, म्हणजे सर्व वर्णांचा धर्म होता. भारताच्या हवामानाप्रमाणे येथे अग्नीपेक्षा जलाची गरज माणसांना अधिकच भासत असते. त्यामुळे भारताचा आद्यधर्म जलाशयांचे व नद्यांचे माहात्म्य धरूनच निर्माण झाला होता, असे म्हणण्यास हरकत नाही. गोमाहात्म्य महाभारतातील अनुशासन पर्वात अत्यंत विस्ताराने आले आहे. श्रुतिस्मृत्यक्त वैदिक धर्मात गाईबैलाचे व वासरांचे यज्ञ सांगितले आहेत. यज्ञात व अतिथी सत्कारप्रसंगी गोमांस भक्षण प्रशस्त मानले आहे. गोवध हे महापातक म्हणून स्मृतींमध्ये कोठेही सांगितलेले नाही; परंतु महाभारतात तसे स्पष्ट म्हटले आहे. महाभारत व पुराणे यांच्यातील विष्णुभक्ती व शिवभक्ती ही पूजाप्रधान असल्यामुळे पशुयज्ञाची भक्तिधर्मात गरज वाटत नाही. एवढेच नव्हे तर त्याचा निषेधही सांगितलेला आहे. पशुयज्ञ हा पापमय आहे असे वारंवार म्हटले आहे. शांतिपर्वात २६५ अध्यायांत गोयज्ञाचा स्पष्ट निषेध सांगितला आहे. एका बाजूला रोज दोन हजार गोवंशीय प्राण्यांची अतिथीकरिता कत्तल करून चर्मण्वती नदीला पावित्र्य आणणाऱ्या प्राचीन राजाचे वर्णन आले आहे, तर दुसऱ्या बाजूला म्हणजे वर निर्दिष्ट केलेल्या अध्यायात यज्ञात गोवधबंदी करणाऱ्या विचख्नु राजाची कथा आली आहे आणि असे स्पष्ट सांगितले आहे की, वेदवाक्यामध्ये सांगितलेला प्राणिवधाचा आचार अनाचार होय. यज्ञ, वृक्ष व यूप यांच्या उद्देशाने मानव मांसभक्षण करतात, केवळ व्यर्थ सुखाकरिता नव्हे, म्हणून तो धर्म होय, असे जे म्हटले जाते ते योग्य नाही. अमर्याद वर्तनाचे मूर्ख, नास्तिक व संशयात्मे लोक

यज्ञीय हिंसेची प्रशंसा करतात. यज्ञीय हिंसा ही धूर्तांनी म्हणजे लुच्च्यांनी प्रवर्तित केली आहे. जे खरे ब्राह्मण आहेत ते सर्व यज्ञांमध्ये दूध, फुले व समिधा यांच्या योगानेच भगवान विष्णूची पूजा करतात. वैदिक पशुयज्ञ, ज्यांच्यात सोमयाग, राजसूय, वाजपेय, अश्वमेध इत्यादिकांचा अंतर्भाव होतो ते सर्व, महाभारतात एकीकडे प्रशंसिले आहेत व दुसरीकडे निंदिले व निषिद्ध केले आहेत.

स्मृतींमध्ये वेदांच्या आधारे चार आश्रम व त्यांचे धर्म सांगितले आहेत; परंतु ब्राह्मणाशिवाय इतर वर्णांना ब्रह्मचारी व गृहस्थ हे दोनच आश्रम विहित केले आहेत. वानप्रस्थाची क्षत्रियास अनुमती दिली आहे. चार आश्रम केवळ ब्राह्मणांकरिताच सांगितले आहेत. महाभारतात त्रैवर्णिकांना चारी आश्रम सांगितले असून शूद्रांना वानप्रस्थासह तीन आश्रम सांगितले आहेत. क्वचित शूद्रांनाही संन्यासाची अनुमती दिली आहे. यातून असा निष्कर्ष निघतो की, चार आश्रमांचे वैश्य, शूद्रांना असलेले अधिकार स्मृतींनी काढून घेण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु स्मृतींचा निषेध असतानाही तो अधिकार एकंदरीत भारताचा इतिहास पाहताना कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने सर्व वर्णांमध्ये आजपर्यंत प्रचलित राहिला आहे. नाथसंप्रदाय किंवा इतर गोसावी संप्रदाय यांच्यामध्ये चारी वर्णांच्या व्यक्तींना वानप्रस्थ व संन्यास यांची दीक्षा देण्याची पद्धती आतापर्यंत प्रसिद्ध आहे. संन्यास किंवा वानप्रस्थ हे अवैदिक आहेत, असे एक मत गौतमसूत्रात मांडले आहे. एकंदर वैदिक वाङ्मय पाहता असे दिसून येते की, वानप्रस्थ व संन्यास हे मुनींचे आश्रम वैदिक आचार्यांनी अवैदिकांपासून स्वीकारले आहेत व त्यांचा वेदांच्या अखेरच्या भागात म्हणजे उपनिषदात आदरपूर्वक स्वीकार केला आहे.

विवाहधर्माचाही इतिहास महाभारतात तपशीलवार सापडतो. उद्दालक ऋषीचा पुत्र श्वेतकेतू याने परस्त्रीगमनाचा निषेध प्रथम घालून दिला. त्याच्यापूर्वी विवाहित स्त्रीला पतीच्या संमतीने दुसऱ्या पुरुषाला संततीची गरज असल्यास त्या पुरुषाशी गमन करण्याचा अधिकार होता, असे आदिपर्वात (अध्याय १२२) म्हटले आहे. श्वेतकेतूने परस्त्रीगमनाचा निषेध केला; परंतु त्याला एक अपवाद ठेवला. तो असा की, पतीस संतती नसेल तर पतीच्या अनुज्ञेने पत्नी अन्य पुरुषापासून पतीकरिता संतती उत्पन्न करू शकते. या श्वेतकेतू आख्यानात विवाहसंस्थेचा मूळपासूनचा इतिहास सांगितला आहे. भिन्न वर्णातील स्त्रीपुरुषांचे विवाहांचे नियम बदलत जाऊन प्रतिलोम विवाहाला प्रथम बंदी आली. नंतर अनुलोम विवाहाची अनुमती असतानाही त्याच्यातही क्रमाने कसे बदल झाले त्याचेही टप्पे महाभारतात सापडतात आणि अखेर एकाच वर्णात स्त्री-पुरुषांचा विवाह संमत होऊ शकतो येथपर्यंतचा म्हणजे जातिसंस्था प्रकट होईपर्यंतचा क्रमही त्यात सापडतो.

मद्यपानाचा निषेध प्रथम शुक्राचार्यांनी घालून दिला असे आदिपर्वाच्या ७६ व्या अध्यायात म्हटले आहे. मद्यपानाची शुक्राचार्यांनी घातलेली बंदी केवळ ब्राह्मणवर्णापुरतीच

होती. जो ब्राह्मण आजपासून मोहाने सुरापान करील तो धर्मभ्रष्ट होईल, या जगात तो निंद्य ठरेल आणि परलोकात त्याला सद्गती मिळणार नाही असे शुक्राचार्य म्हणतात. मनुस्मृतीमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिघांनाही सुरापान निषेध सांगितला आहे; परंतु क्षत्रिय, वैश्य यांना सुरानामक मद्याशिवाय इतर मद्याची अनुमती दिली आहे. अशा तऱ्हेची वाक्ये महाभारतात इतरत्रही सापडतात; परंतु कृष्ण व अर्जुन हे मद्यपान करून बेहोष झाल्याचेही वर्णन महाभारतात येते. मिताक्षरानामक याज्ञवल्क्य स्मृतीची प्रसिद्ध टीका आहे. आतापर्यंतचे सनातन धर्माचे आचार व विधिनिषेध याबाबतीत मिताक्षरेला सर्वत्र अधिक प्रमाण मानतात. या मिताक्षरेत सुरा म्हणजे मिठापासून तयार केलेली दारू, असा अर्थ सांगितला आहे व क्षत्रिय व वैश्य यांना मोहाची फुले, मध, द्राक्षे इत्यादी पदार्थांपासून तयार केलेले मद्य पिण्याचे स्वातंत्र्य ठेवले आहे; परंतु मद्यपाननिवृत्ती ही सर्व वर्णांना प्रशस्त आहे असे म्हटले आहे. असा सर्वसाधारण मद्यपान निषेध महाभारतात, पुराणात व स्मृतींमध्ये सांगितला आहे.

महाभारतातील धर्मशास्त्रासंबंधी सर्वात महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, महाभारतातील धर्मशास्त्र हे महाभारतात प्रथमपासून अखेरपर्यंत वारंवार जी भर पडत गेली त्यापैकी महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे त्यात बदलत्या काळाचे म्हणजे धर्मशास्त्रेतिहासाचे उत्कृष्ट चित्र निदर्शनास येते.

## महाभारतातील प्रवृत्तिमार्ग

भारतीय तत्त्वज्ञानात व ग्रीक तत्त्वज्ञानात प्रवृत्तिवाद व निवृत्तिवाद याबद्दल मोठा वाद आहे. या दोन वादांची साधकबाधक चर्चा उपनिषदांमध्ये केलेली आहे. यासंबंधी विस्तृत चर्चा महाभारतात व विशेषत: महाभारतातील भगवद्गीतेत आलेली आहे.

हा वाद, प्रवृत्ती की निवृत्ती? उत्पन्नच का व्हावा? वाद उत्पन्न झाला याचे कारण कर्म केले की कर्माचा पुण्य वा पाप हा परिणाम, कर्म जसे असेल त्याप्रमाणे होतोच. पुण्य व पाप यांचे फल भोगावेच लागते. या जन्मी कर्म केले तर त्याचे सुखदु:खानुरूप फल या जन्मी वा पुढील जन्मी भोगावे लागते. त्यातून कोणी सुटत नाही. कर्म हे बंधनकारक असते. कर्म बंधनकारक असते म्हणूनच त्याचा नाश कसा होईल, म्हणजे मोक्ष कसा मिळेल हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. प्रवृत्तिवाद की निवृत्तिवाद हा प्रश्न मोक्षाच्या उद्देशाने उत्पन्न झाला आहे. अर्थ व काम या पुरुषार्थाच्या सिद्धीकरिता म्हणजे माणसास या जगात जगण्याकरिता कर्माची वा प्रवृत्तीची आवश्यकता आहे. अर्थ व काम पुरुषार्थाकरिता निवृत्तीचा उपयोग नाही. प्रवृत्तियोग का निवृत्तियोग असा प्रश्न ऐहिक जीवनाच्या संदर्भात उत्पन्नच होऊ शकत नाही. प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग हे धर्म होत. या दोन धर्मांपैकी कोणता अधिक श्रेयस्कर? हा प्रश्न केवळ मोक्षाच्या संदर्भातच उत्पन्न होतो. या मार्गांपैकी मोक्षकारक कोणता? व दोन्ही

मोक्षदायक असल्यास अधिक लवकर म्हणजे झटिति मोक्षदायक कोणता, असा हा प्रश्न आहे.

महाभारताच्या शांतिपर्वात (२४०/६) शुकानुशासनप्रश्न या प्रकरणात व्यासांनी या दोन मार्गांचा उल्लेख केला आहे. ''द्वाविमावथ पंथानौ यस्मिन् वेदा: प्रतिष्ठिता:। प्रवृत्तिर्लक्षणो धर्म: निवृत्तिश्च विभाषित:॥'' ''ज्यांना वेदांचा एकसारखाच आधार आहे असे हे दोन मार्ग आहेत : एक प्रवृत्तिपर धर्माचा आणि दुसरा निवृत्तीचा म्हणजे संन्यासाचा.'' याज्ञवल्क्य मुनींनी आपले धन आपल्या दोन बायकांना देऊन अखेर संन्यास घेतला असे बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे. उपनिषदे व आरण्यके हा वेदान्त भाग सोडला तर सर्व वेद हे प्रवृत्तिधर्माचाच उपदेश करतात, हे जरी खरे असले तरी भारतामध्ये वेदपूर्वकालापासून विरक्त योग्यांचा निवृत्तिमार्ग प्रचलित होता, त्याचा स्वीकार वेदकालाच्या अखेरीस म्हणजे उपनिषत्काली वैदिकांनी केला, असा वेदसाहित्यावरून निष्कर्ष निघतो. शांतिपर्वात नारायणीय धर्म म्हणून काही अध्यायांचे प्रकरण आहे. त्यात श्रीकृष्ण ज्या वृष्णिकुलात उत्पन्न झाला त्या कुलात प्रचलित असलेली अध्यात्मविद्या सांगितली आहे (शांति ३३९, ३४० इ.). त्यात म्हटले आहे की, ब्रह्मदेवाने सृष्टी उत्पन्न केली. त्यानंतर सृष्टीतील प्रवृत्तिमार्ग चालविण्याकरिता मरीचि इत्यादी सप्तर्षी हे सात मानसपुत्र निर्मिले; त्या सप्तर्षींनी संन्यास न घेता सृष्टिक्रम चालू ठेवण्याकरिता आमरण प्रवृत्तिमार्गाचा अवलंब केला. दुसरा सनत्कुमारादी सात मानसपुत्रांचा गट उत्पन्न केला. ते जन्मत: विरक्त होते. त्यांचा मार्ग संन्यास वा निवृत्तिमार्ग होय. हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र दोन प्रकारचे. मरीचि इत्यादी सप्तर्षी प्रवृत्तिमार्गाचे आदर्श व सनत्कुमारादी सिद्धयोगी हे निवृत्तिमार्गाचे आदर्श. सृष्टीच्या प्रारंभीच हे आदर्श अस्तित्वात आले. याचा अर्थ हे दोन मार्ग मानवी प्रवृत्तीतून निर्माण झाले. मानवी स्वभावात या दोन्ही मार्गांचे आकर्षण आहे. या दोन्हींपैकी एकीकडे जाण्याचा स्वभाव आहे. भगवद्गीतेतील अध्यात्मविद्येचा संप्रदाय हा प्रवृत्तिमार्गी राजर्षींचाच होय, असे म्हणावे लागते. गीतेच्या तिसऱ्या अध्यायात कर्मयोगाचा म्हणजे प्रवृत्ती मार्गाचा उपदेश केल्यावर गीतेच्या चौथ्या अध्यायाच्या प्रारंभी भगवान अर्जुनास म्हणतात की, हा शाश्वत व अविनाशी असा कर्मयोग मी प्रथम विवस्वानाला म्हणजे सूर्याला सांगितला. असा हा परंपराप्राप्त कर्मयोग राजर्षींमध्ये प्रचलित होता. तो कर्मयोग कालांतराने नष्ट झाला. तोच मी तुला पुन: सांगितला. शांतिपर्वात नारायणीय धर्मात हाच कर्मयोगाचा इतिहास सांगून म्हटले आहे की, हा कर्मयोग लोकभृत्यर्थ म्हणजे समाजधारणेकरिता लोकसंस्था चालण्याकरिता आवश्यक असतो.

आद्य शंकराचार्यांनी भगवद्गीतेवरील भाष्यात, गीतेतील मुख्य प्रतिपाद्य संन्यासयोग म्हणजे निवृत्ती असून कर्मयोग हा संन्यासास पात्र नसलेल्या दुय्यम अधिकाऱ्याकरिता सांगितला आहे, असा निष्कर्ष काढला आहे. याच्या उलट लोकमान्य टिळक गीतारहस्यात

म्हणतात की, हा निष्कर्ष बरोबर नाही. गीतेचे मुख्य प्रतिपाद्य कर्मयोगच आहे व तोच उत्तम मोक्षाधिकारी माणसाकरिता सांगितला आहे. आद्य शंकराचार्यांपूर्वी जे गीतेचे भाष्यकार झाले ते गीतेचा कर्मयोगपर म्हणजे ज्ञानकर्मसमुच्चयपरच अर्थ लावत होते, असे शंकराचार्यांच्या भाष्याच्या प्रस्तावनेवरून व पुढे वारंवार केलेल्या खंडनमंडनावरून दिसते.

गीतेचा समग्र विचार करता गीतेत मुख्य संन्यासमार्ग सांगितलेला आहे असे पटत नाही. हे मात्र खरे की, कर्म हे बंधन आहे असे गीता मान्यच करते; परंतु कर्माची बंधनकारकता नष्ट कशी करावी, याचा विचार गीतेत प्राधान्य पावला आहे. कर्म हे प्राणिमात्रास अटळ आहे, कर्मावाचून क्षणमात्रही कोणीही प्राणी जगू शकत नाही; परंतु कर्म बंधनकारक आहे म्हणून त्याचा त्याग इष्ट होय. परंतु, त्याग तर अशक्य आहे. या बौद्धिक पेचप्रसंगातून कसे सुटायचे याची युक्ती गीतेत सांगितली आहे.

भगवद्‌गीतेच्या काळी तीन प्रकारच्या निष्ठा होत्या. एक ज्ञाननिष्ठा, दुसरी कर्मनिष्ठा आणि या दोन्हींचा समन्वय साधणारी योगनिष्ठा. या तीन निष्ठांचा उल्लेख महाभारतातील शांतिपर्वात सुलभा-जनक संवादात जनकराजाने केला आहे. जनक राजा सुलभेस सांगतो की, आपण मुक्तसंग होऊन, आसक्ती टाकून राज्य करीत आहोत. आपला एक हात चंदनाने माखला व दुसरा तासून टाकला तरी आपणास दोन्ही गोष्टी म्हणजे सुख-दु:खे सारखीच. म्हणून गीतेत म्हटले आहे की, जनकादी राजे कर्म करीतच सिद्धी पावले. भगवद्गीतेस प्रवृत्तिमार्ग व संन्यास हे दोन्ही मान्य आहेत; परंतु गीता प्रवृत्तिमार्ग हा संन्यासापेक्षा अधिक महत्त्वाचा मानते. कारण संन्यासाने मोक्ष मिळतो, परंतु समाजधारणा होत नाही. कर्मयोगाने मोक्षही मिळतो व इहलोकी समाजधारणाही होते. कर्म हे आसक्तीने म्हणजे फलाशेने केले तरच बंधनकारक ठरते, फलाची आसक्ती सोडून कर्म केले तर ज्ञानद्वारा मोक्षास कारण होते. आसक्तीरहित होऊन केलेली यज्ञ, दान, तप इत्यादी कर्मे पापनाशक व चित्तशुद्‌धिकारक होतात. चित्तशुद्धीशिवाय तत्त्वज्ञान होत नाही, म्हणून तत्त्वज्ञानासही समत्वबुद्धीने सुखदु:खाची पर्वा न करता कर्मे करीत राहिल्यास चित्त शुद्ध होते, म्हणजे चित्त काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी दोषांतून मुक्त होते. शुद्ध झालेले चित्त हे निर्मल आरशासारखे बनते व त्यात सन्निध असलेला परमात्मा प्रतिबिंबित होतो. तात्पर्य, प्रवृत्तिमार्ग हा एक अर्थी बंधनकारक असला तरी तोच मार्ग चित्तशुद्‌ध्यर्थ अनुसरल्यास बंधनाचा नाशक ठरतो.

महाभारतातील भगवद्गीता व शुकानुशासन ही दोन टोके होत. भगवद्गीता प्रवृत्तिमार्गावर भर देते तर शुकानुशासन निवृत्तिमार्गास प्राधान्य देते. शुकमुनी आपल्या पित्यास म्हणजे व्यासास प्रश्न विचारतो की, (शांति - २४०/१९)

**यदिदं वेदवचनं कुरु कर्म त्यजेति च ।**
**कां दिशां विद्यया याति कां च गच्छन्ति कर्मणा ॥**

''वेद कर्मे सोडण्यास सांगतो आणि कर्मे करण्यासही सांगतो. तर विद्येने म्हणजे कामाशिवाय ज्ञानाने आणि नुसत्या कर्माने कोणती गती मिळते, हे मला सांगा,'' या प्रश्नाचे उत्तर देताना व्यासांनी (शांती - २४०/७)

**कर्मणा बध्यते जन्तुः विद्यया तु प्रमुच्यते ।**
**तस्मात् कर्म न कुर्वन्ति यतयः पारदर्शिनः ॥**

''कर्माने प्राणी बांधला जातो व विद्येने मुक्त होतो म्हणून जे पारदर्शी यती किंवा संन्यासी आहेत ते कर्म करीत नाहीत,'' असे सांगितले आहे.

आता 'कर्मणा बध्यते' म्हणजे काय याचा विचार केला तर कर्म हे नुसते बंधन करीत नाही किंवा सोडतही नाही. मनुष्य फलाशेने म्हणजे सक्तीने कर्मात बद्ध होतो व आसक्ती सुटली म्हणजे नुसत्या बाह्य इंद्रियांनी कर्मे केली तरीही तो मुक्तच राहतो. ज्ञानाचा व कर्माचा विरोध आहे, म्हणून अश्वमेधपर्वातील (५१।३३) अनुगीतेत म्हटले आहे की, तस्मात् कर्मसु निस्नेहा ये केचित् पारदर्शिन: ।

'ज्ञानी पारदर्शी कर्माच्या ठिकाणी आसक्ती ठेवीत नाहीत.' वनपर्वात (२।७३) शौनकाने युधिष्ठिरास उपदेश करताना म्हटले आहे की, सर्व कर्मे अभिमान न धरता करा. शुकानुशासनात संन्यासास प्राधान्य असले तरी एक ठिकाणी म्हटले आहे की, ज्ञानी कर्मे करीतच सिद्धी प्राप्त करतात. जग ही कर्मभूमी आहे. येथे संन्यासी सुद्धा कर्मांवाचून जिवंत राहू शकत नाही, म्हणूनही प्रवृत्तिमार्ग अपरिहार्य आहे.

प्रवृत्तिमार्गी पुरुषांच्या तीन अवस्था शास्त्रात सांगितल्या आहेत. पहिली बद्धावस्था. बद्धावस्थेत सर्वच संसारी गृहस्थ माणसांना प्रवृत्तिमार्गानेच चालावे लागते. चातुर्वर्ण्याची सर्व कर्मे प्रवृत्तिमार्ग होय.

ब्राह्मणाची अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह, क्षत्रिय-वैश्य व शूद्र यांची अध्ययन, यज्ञ व दान व शूद्राचे सेवाकर्म. बद्धावस्थेत फलाशाही बळकट असते. मुमुक्षू ही दुसरी अवस्था. या अवस्थेत फलाशेचा त्याग करून कर्म हे कर्तव्य म्हणून पार पाडायचे. कुवतावस्था ही तिसरी. या अवस्थेत लोकोद्धारार्थ कर्मे करायची. ही स्थिती काल्पनिक नसून ती मनोनिग्रहाने इहलोकीच प्राप्त होते. ही स्थितप्रज्ञावस्था किंवा जीवन्मुक्तावस्था. ज्या पुरुषास ही परमावधीची अवस्था प्राप्त होते त्यास कार्याकार्याचे वा नीतिशास्त्राचे नियम घालून देण्याचे काहीच कारण नसते. त्याची परमावधीची शुद्ध, सम व पवित्र बुद्धी आपोआप योग्य रीतीने कर्तव्याकर्तव्याचा निर्णय करते. त्याला नीतिनियम लागू नसतात. शुद्ध बुद्धी हे नीतीचे सारसर्वस्वच त्याच्याजवळ असते. सूर्याला दिवा दाखविण्याची गरज नसते तशी नीतिशास्त्राची त्याला गरज नसते. सृष्टिकर्ता परमेश्वर सर्व कर्मे करूनही ज्याप्रमाणे पापपुण्यापासून अलिप्त असतो, तद्वत ब्रह्मज्ञ साधूपुरुषांची स्थिती नेहमीच पवित्र व निष्पाप

असते. हे सत्पुरुष विधिनिषेधात्मक नियमांचे जनक असतात, त्यामुळे त्यांना विधिनिषेधाचे निर्बंध लागू पडत नसतात. स्थितप्रज्ञाचे वर्तनच धर्माधर्माचा निर्णय करण्याचे प्रमाण बनते. अपूर्ण अवस्थेत भोवतालचा समाज असतो. दुष्ट व लोभी लोकांना अहिंसा, सत्य इत्यादी नीतिधर्म शुद्ध स्वरूपात पाळणे शक्य नसते. अशा स्थितीत त्यातल्या त्यात योग्य मार्ग कोणता याचा निर्णय शुद्ध बुद्धीच्या स्थितप्रज्ञालाच शक्य होतो. प्रवृत्तिमार्गाचे त्या त्या देशकाल व परिस्थितीला अनुरूप निर्णय करण्यास स्थितप्रज्ञाचेच मार्गदर्शन उपयोगी पडते. ज्यांची बुद्धी अहंतेमुळे आसक्त वा विकारवश होते अशा सामान्यजनांचा दीपस्तंभ हा स्थितप्रज्ञ कर्मयोगी होतो.

## महाभारतातील समाजकारण

महाभारतात माणसाच्या सामाजिक जीवनाचा विचार त्यातील प्रत्यक्ष कथाभाग सोडल्यास महत्त्वास पावला आहे. महाभारताच्या कथेचे विषय राजपुत्र असल्यामुळे राजधर्माचा विचार त्यात प्रामुख्याने अथवा कथेच्या वर्णनाच्या संदर्भात वारंवार येतो. प्रजारक्षण हा मुख्य राजधर्म असल्यामुळे प्रजेचे धर्म आणि राजाचे धर्म यांची संगती सांगणे हे क्रमप्राप्तच ठरते. शांतिपर्वातील राजधर्म पर्वात म्हटले आहे की, सगळ्या प्राण्यांची पावले जशी हत्तीच्या पावलात सामावतात त्याचप्रमाणे राजधर्मात सर्व धर्म म्हणजे सर्वांची कर्तव्ये सामावतात. धर्माची व्याख्याच समाजधारक कर्तव्ये अशी महाभारतात केली आहे. धर्म हा पारलौकिक कल्याणाचा मार्ग होय अशी जी सर्वसाधारण कल्पना आहे ती महाभारतातही मान्य आहे. परंतु पारलौकिक हित साधणारे कर्तव्य हे ऐहिक हिताच्या विरोधी नसले पाहिजे असाही विचार गृहीत धरलेला आहे. 'अहिंसार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम्' किंवा 'प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम्' असे भीष्म सांगतात. प्राण्यांचा नाश होऊ नये व प्राण्यांचा उत्कर्ष व्हावा याकरिता धर्माचे अनुशासन केलेले असते, असा त्याचा अभिप्राय आहे. मनुष्याला कुटुंब, कुल, जमात, गाव, राष्ट्र व विश्व यांच्यातच जगायचे असते म्हणून त्याची स्वत: संबंधाची जी कर्तव्ये असतात त्या कर्तव्यांमध्ये कुटुंब, कुल, जमात, गाव, राष्ट्र व विश्व यांच्याशी अविरोधी व जमवून घेण्याचे तत्त्व अंतर्भूत असावे लागते, तरच ती कर्तव्ये धर्म ठरतात.

माणसाच्या सामाजिक जीवनाच्या मुख्यत: दोन कक्षा गृहीत धरून महाभारतीय तत्त्वचिंतकांनी समाजाचा विचार केला आहे. एक कक्षा म्हणजे जन्मल्यापासून मृत्यूपर्यंतच्या वयाच्या अवस्था आणि दुसरी कक्षा म्हणजे समाजातील व्यक्तीचे स्थान व कर्तव्य कोणते हे निश्चित करणारा व्यक्ती स्वभाव ही होय. पहिल्या कक्षेच्या विचारापासून आश्रमव्यवस्था निर्माण झाली आणि दुसऱ्या कक्षेच्या विचारातून वर्णव्यवस्था सिद्ध झाली.

आश्रमव्यवस्था ही जीवनक्रमाची व्यवस्थित परिणती होण्याकरिता त्या त्या वयाच्या अवस्थेला अनुरूप अशी निश्चित केलेली क्रमबद्ध जीवनप्रणाली होय. आश्रमव्यवस्थेची

सविस्तर मांडणी स्मृतीतील धर्मशास्त्रात केलेली आढळते. मनुस्मृतीत विशेषत: त्याचा सविस्तर ऊहापोह केलेला आहे. स्मृतींच्या धर्मशास्त्रातील आश्रमव्यवस्थेपेक्षा महाभारतातील आश्रमव्यवस्था अधिक व्यापक दृष्टीने मानव जीवनाचा विचार करून सांगितलेली आहे. कारण स्मृतींमध्ये शूद्रांना वानप्रस्थ व संन्यास वर्ज्य आहेत तसे महाभारतात नाही. सर्वच सुसंस्कृत समाजात अशी कल्पना असते की, लहानपणी शिक्षण मनुष्याने घ्यावे, तरुणपणी उमेद असेपर्यंत पती व पत्नी या नात्याने कौटुंबिक कर्तव्ये पार पाडून चांगले जीवन जगावे, म्हातारपणी संसारातून निवृत्त होऊन संयमपूर्ण रीतीने देवभजनात किंवा कीर्तनात आयुष्य व्यतीत करावे. परंतु या कल्पनेला व्यवस्थित धार्मिक कर्तव्यांचे रूप प्राचीन भारतीयांनीच दिले.

आश्रम चार सांगितले आहेत. ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास. आश्रम तत्त्वाच्या मुळाशी ऋणतत्त्वांची कल्पना आहे. मनुष्य जन्मल्याबरोबरच देव, पितर व ऋषी यांचे ऋण घेऊन जन्माला येतो. ही तीन ऋणे फेडण्याकरिता पहिले दोन आश्रम सांगितले आहेत. ऋषीचे ऋण म्हणजे ऋषींनी निर्माण केलेल्या विविध विद्या होत. या विद्यांच्या योगानेच मनुष्याचे ऐहिक व पारलौकिक हित होते. ऋषींचे ऋण म्हणजे बौद्धिक संस्कृती होय. वेद, वेदांगे, धनुर्वेद, आयुर्वेद, संगीत इत्यादी कला हीच बौद्धिक संस्कृती होय. ही संस्कृती कायम ठेवणे व वाढविणे हे माणसाचे कर्तव्य होय. दुसऱ्याकडून घेतलेले धन त्याला सव्याज परत देणे हे जसे ऋणकोचे कर्तव्य असते तसेच माणसाचे विद्यारूप संस्कृती हे कर्तव्य ठरते. यालाच शिक्षण असे नाव आहे. विद्याध्ययनाने ऋषींचे ऋण फेडले जाते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या सर्वांनीच आपापल्या विद्यांचे संपादन ब्रह्मचर्यात करावयाचे असते. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या पुत्रांना वेदाध्ययन हे समान आहे. शूद्र पुत्रांनी आपापल्या व्यवसायासंबंधाची शिल्पविद्या संपादायची असते. बारा वर्षे किंवा अधिक काळ ब्रह्मचर्याश्रम पूर्ण केल्यानंतर गृहस्थाश्रम सर्वांनी स्वीकारावयाचा, तो इतरांचे व देवांचे ऋण फेडण्याकरिता. पितरांचे ऋण प्रजोत्पादनाने व श्राद्ध, तीर्थयात्रा इत्यादी कर्मांनी फिटते आणि देवांचे ऋण यज्ञ, पूजा, उपासना व भक्ती यांच्या योगाने फिटते. ब्रह्मचर्य संपवून गुरुची आज्ञा घेऊन गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा नियम असतो. विवाह करून प्रत्येकाने आपापला संसार निराळा करून देव, पितर, अतिथी, मनुष्ये व प्राणिमात्र यांच्यासंबंधाची कर्तव्ये पार पाडून कुटुंबाचे पोषण करावे असा गृहस्थाश्रमाचा मुख्य धर्म सांगितला आहे. गृहस्थाश्रम संपविल्यावर तिन्ही ऋणे फेडलेली असतात. देवांनी सृष्टी निर्माण केली व ती चालविली आहे. तिच्यात आपण जगतो म्हणून आपल्यावर देवांचे ऋण असते. ते ऋण पूजा, भक्ती व तत्त्वचिंतन यांच्या योगानेच फेडता येते. पितरांनी आपल्या कुटुंबाला म्हणजे आपल्या वंशाला अस्तित्वात आणले ते ऋण त्या वंशाचे सातत्य राखूनच फेडता येते.

वानप्रस्थ व संन्यास हे दोन आश्रम विरक्ताच्या दोन अवस्थांचे दर्शक आहेत. त्यांच्या योगाने माणसाने स्वत:चे स्वत:वरील ऋण फेडायचे. स्वत: आत्मा संसारचक्राच्या बंधनात सापडला आहे. त्या बंधनातून सुटणे हीही स्वत:ची जबाबदारी आहे. मुक्त होण्याकरिता हे दोन आश्रम आहेत. वानप्रस्थाश्रमात विरक्ती व तत्त्वचिंतनशीलता अंगी बाणवावयाची. त्याकरिता सर्व लौकिक व्यवहार व मुलेबाळे यांना बाजूला सारून वनात शिरायचे. काही वर्षे देहाचे क्लेश सोसण्याची या मनाची पक्की तयारी झाली म्हणजे चौथा आश्रम संन्यास स्वीकारावयाचा. या आश्रमात सर्व भूतांना म्हणजे प्राणिमात्राला अभयरूपी दक्षिणा देऊन प्रवेश करावयाचा असतो व अखेर मुक्त व्हावयाचे असते. या चार आश्रमांचे स्थूलपणे असे स्वरूप आहे.

महाभारतातील व उपनिषदांतील वर्णनावरून असे दिसते की, विद्यार्थी गुरुगृही जात व तेथे व्रतस्थ राहून विद्या संपादन करीत. गुरुगृहात सर्व प्रकारची शरीरकष्टाची कामे करावी लागत. श्रीकृष्णाने उज्जयनीस गुरुगृही राहून विद्याभ्यास केला, असे हरिवंशात वर्णन आहे. राजपुत्रास मात्र गुरुगृही राहण्याची सक्ती नसावी असे दिसते. पांडवांचा व कौरवांचा विद्याभ्यास घरीच झाला. द्रोणाचार्यांना त्यांना शिकविण्याकरिता ठेवले होते. धृतराष्ट्र, त्याची माता सत्यवती, पांडवांची माता कुंती व कौरवाची माता गांधारी या सर्वांच्या वानप्रस्थाश्रमाचे वर्णन महाभारतात आले आहे. वानप्रस्थाश्रमाचा व संन्यासाचा अधिकार शूद्रांना नाही असे जरी स्मृतींमध्ये म्हटले असले तरी महाभारताच्या शांतिपर्वात शूद्रासह सर्व वर्णांना सर्व आश्रम विहित आहेत असे म्हटले आहे (शांतिपर्व ६३). शूद्रांनी संन्यास घेताना राजाची अनुज्ञा मिळवावी, एवढाच निर्बंध तेथे सांगितला आहे.

महाभारतातील समाजकारणात आश्रमव्यवस्था हा एक महत्त्वाचा भाग दिसून येतो. वानप्रस्थ जीवन चालविणारे ऋषी व मुनी यांचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कण्वमुनीचा आश्रम होय. या आश्रमाचे वर्णन आदिपर्वात शकुंतलाख्यानात चांगले मिळते. या वानप्रस्थाश्रमातच गुरुगृही विविध विद्यांचे अध्ययन करणारे विद्यार्थीही दिसतात. अस्त्रविद्यांचे ग्रहण करणारे विद्यार्थीही दिसतात. आस्त्रविद्यांचे ग्रहण करण्याकरिता क्षत्रिय राजपुत्रांना वनात जावे लागत असे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे पाशुपतास्त्र मिळविण्याकरिता अर्जुनाला हिमालयात तपश्चर्या करावी लागली हे होय.

चातुर्वर्ण्य व्यवस्था ही मानवी स्वभावाच्या तात्त्विक चिंतनावर आधारलेली समाजव्यवस्था होय. महाभारतात या समाजव्यवस्थेचे तात्त्विक व ऐतिहासिक असे दोन्ही प्रकारचे वर्णन मिळते. आज भारतात हिंदू समाजात रूढ असलेली जातिसंस्था ही मुळात नव्हती. तिला क्रमाक्रमाने विद्यमान रूप प्राप्त झाले. याचे उत्कृष्ट प्रत्यंतर महाभारतावरून मिळते. विश्वामित्र हा क्षत्रिय असून तो कर्माने ब्राह्मण झाला हे एकच अपवादात्मक उदाहरण होय असे लोक मानतात; परंतु ते बरोबर नाही. महाभारतात असे स्पष्ट म्हटले आहे की,

शूद्रयोनिषु जायन्ते मुनयो वेदपारगाः । म्हणजे शूद्र वर्णामध्ये वेदपारंगत मुनी निर्माण होत असतात. हा वर्तमानकाळी प्रयोग आहे. चार वेदांची प्रथम व्यवस्था लावणारे व चार वेदाचार्यांचे आद्यगुरु व पांडवांचे पितामह कृष्णद्वैपायन व्यास यांचा जन्म मत्स्यगंधा या कोळिणीपासून झाला, असे आदिपर्वात म्हटले आहे. शंतनु या क्षत्रिय राजाचा सख्खा भाऊ देवापि हा ब्राह्मण म्हणजे पुरोहित बनला असेही म्हटले आहे. तात्पर्य, जातिबद्ध वर्णसंस्था ही महाभारताचा म्हणजे भरतकुलाचा इतिहास प्रत्यक्ष जेव्हा घडत होता तेव्हा त्या काळी अस्तित्वात नव्हती. वंशपरंपरागत वर्णव्यवस्थेबरोबरच तपश्चर्या व गुण यांच्या योगानेही वर्णव्यवस्थेत स्थान कौरव-पांडवांच्या काळी मिळत होते असे दिसते. एवढेच नव्हे तर ब्राह्मणवर्णात स्थान मिळविण्याकरिता किंवा ब्राह्मण वर्णास क्षत्रियांपेक्षा हीन स्थानात ढकलण्याकरिता चाललेला वर्णसंघर्ष हा महाभारताच्या प्रत्यक्ष इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आश्रम व्यवस्थेतील ब्रह्मचर्याश्रम हा ब्राह्मण आचार्यांच्या घरीच पाळावयाचा असल्यामुळे सर्व वर्णांचे गुरुत्व व अर्थात समाजनेतृत्व ब्राह्मणवर्गाला आपोआप आले. त्यामुळे वर्णव्यवस्थेतही ब्राह्मणवर्ण हा समाजाच्या अग्रस्थानी आला. त्यामुळे क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्यात ब्राह्मणवर्णात स्थान मिळविण्याची किंवा आपल्या वर्णापेक्षा वरच्या सामाजिक स्थानास पोचण्यासाठी अहमहमिका सुरू झाली. वसिष्ठ व विश्वामित्र यांची कथा या सार्वत्रिक अहमहमिकेची वर्णसंघर्षाची सूचक कथा आहे. भृगुकुल व हैहयकुल यांच्यातला संघर्षही असाच वर्णसंघर्षसूचक आहे. नहुषराजा व अगस्त्य ब्राह्मण यांच्यातला विरोध असाच वर्णसंघर्षसूचक आहे.

कर्णाने शल्याची निंदा करताना असे म्हटले की, पंजाबात ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्याचे शूद्र बनतात व उलट शूद्र, वैश्य व क्षत्रिय हेही ब्राह्मण बनतात. वंशपरंपरागत वर्णव्यवस्था दृढ झाल्यानंतरही पंजाबात ती पूर्वीप्रमाणेच गुणकर्मावर आधारलेली, जातिनिर्बंधमुक्त अशी वर्णव्यवस्था होती. प्रथम ब्राह्मणांना चारी वर्णांच्या स्त्रियांशी, क्षत्रियांना ब्राह्मणाशिवाय तिन्ही वर्णांच्या स्त्रियांशी, वैश्यांना ब्राह्मण व क्षत्रिय सोडून दोन्ही वर्णांच्या स्त्रियांशी व शूद्रांना सवर्णीय स्त्रियांशीच लग्न करण्याचा अधिकार होता आणि लग्न करणाऱ्या पुरुषाचा जो वर्ण तोच वर्ण अन्य वर्णीय स्त्रीपासून झालेल्या संततीचा मान्य केला जात असे. यानंतर हा निर्बंध अधिक घट्ट झाला. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांना शूद्र स्त्रीशी विवाह करण्याची बंदी; परंतु पितृसावर्ण्याचा सिद्धांत काही काळ मान्य होता. अनुशासनपर्व अध्याय ४४ यात असे सांगितले आहे की, त्रिषु वर्णेषु जातो हि ब्राह्मणात् ब्राह्मणो भवेत् । स्मृताश्च वर्णाश्चत्वारः पंचमो नाभिगम्यते ॥ ''ब्राह्मणापासून तीन वर्णांच्या स्त्रियांच्या ठिकाणी ब्राह्मणच जन्मतो. वर्ण चारच. पाचवा नसतो.'' हाही नियम पुढे बदलला व क्षत्रिय स्त्रीच्या ठिकाणी ब्राह्मणापासून झालेला ब्राह्मणच असतो; परंतु वैश्य स्त्रीच्या ठिकाणी जन्मलेला ब्राह्मणच नसतो (अनुशासन ४८-४). कालांतराने सवर्ण विवाहाचा नियम लागू होऊन

आज प्रसिद्ध असलेली जातिव्यवस्था तयार झाली. आज विद्यमान असलेली जातिसंस्था ही धर्मशास्त्रोक्त धर्माश्रमव्यवस्था नव्हे. वर्णाश्रमव्यवस्थेच्या निश्चित चौकटीत हिंदू समाज गेल्या अडीच हजार वर्षांमध्ये स्थिरावलाच नाही. याचे कारण सार्वभौम चक्रवर्ती राजसंस्था कधीच स्थिरावली नाही. नवव्या शतकात आद्यशंकराचार्य झाले. त्यांनी शारीरकभाष्यात देवतादेवताधिकरणात त्यांच्या वेळच्या भारतीय समाजासंबंधी दोन महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. ते म्हणजे (१) आज सार्वभौम चक्रवर्ती राजा नाही म्हणून भारतात चक्रवर्ती राजाचे राज्य झाले नाही असे म्हणता येत नाही. (२) आज वर्णाश्रमांची अव्यवस्था दिसते. म्हणून अशी स्थिती पूर्वी होती, असे म्हणता येणार नाही. तात्पर्य, भारतीय हिंदू समाज या चातुर्वर्ण्याने बांधलेला असा गेल्या अडीच हजार वर्षांमध्ये कधीच नव्हता असे ऐतिहासिकदृष्ट्या निश्चितपणे म्हणता येते.

आज प्रसिद्ध असलेल्या जातिव्यवस्थेला प्रारंभ झाल्यावर तिच्यावर आजचे समाजसुधारक ज्या प्रकारचे आक्षेप घेतात, त्या प्रकारचे आक्षेप दोन हजार वर्षांपूर्वी घेतले जाऊ लागले. याचे उत्कृष्ट उदाहरण वनपर्वातील अजगरपर्वात मिळते. अगस्त्य मुनीच्या शापाने नहुष राजा अजगर बनला. त्याने वनामध्ये भीमसेनाला आपल्या प्रचंड शरीराचा विळखा देऊन अडकवून टाकले. या विळख्यातून आपल्या भावाला सोडविण्याकरिता युधिष्ठिर धावला. त्या प्रसंगी अजगर बनलेला नहुष राजा व युधिष्ठिर यांच्यामध्ये एक महत्त्वाचा संवाद झाला. नहुष म्हणतो, ‘‘हे धर्मराजा, माझ्या प्रश्नाचा योग्य जवाब देशील तर मी तुझ्या भावास सोडतो.’’ नहुषाने विचारले, ‘‘ब्राह्मण कोणाला म्हणावे?’’ युधिष्ठिर म्हणाला, ‘‘सत्य, दान, क्षमा, शील, दया, तप व पापाची लाज ज्याच्या ठिकाणी दिसते तो ब्राह्मण होय.’’ यावर अजगर म्हणाला की, ‘‘हल्लीच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेशी हे जमत नाही, शूद्रामध्येदेखील सत्य, दान, शांती, तप, अहिंसा इत्यादी गुण दिसतात.’’ त्यावर युधिष्ठिराने निक्षून सांगितले की, ‘‘ही लक्षणे शूद्रात दिसली तर तो शूद्र ब्राह्मण होय व ब्राह्मणात न दिसली तर तो ब्राह्मण शूद्र होय.’’ यावर अजगर म्हणाला की, ‘‘मग जात ही व्यर्थ ठरते व कृतीच मुख्य ठरते.’’ यावर युधिष्ठिर म्हणाला, ‘‘खरी जात मनुष्यत्व हीच होय. चार वर्ण म्हणजे चार जाती सापडणे कठीण आहे. कारण सर्वत्र संकर दिसतो.’’ जातींचा संकर झालेला आहे असे प्रमाण वेदामध्येही मिळते. खरे म्हटले म्हणजे योग्य संस्कार व योग्य वर्तनक्रम यांच्यावरूनच कोणता वर्ण याचा निर्णय करावा. जातिभेद हा खोटा आहे.

### ‘महाभारतातील व्यवहारनीती’

धर्माचे किंवा नीतीचे मूलभूत सिद्धांत आणि ते सिद्धांत ज्या तत्त्वावर आधारलेले असतात ते आध्यात्मिक तत्त्व अनेक ठिकाणी महाभारतात विशेषत: भगवद्गीतेत सांगितलेले आहे. महाभारतातील अध्यात्मवादी नीतिशास्त्र व नैतिक आदर्श मनुष्याने जीवनात कसा उतरवावा व या बाबतीत तारतम्य विचार कशा पद्धतीने करावा याचे मार्गदर्शनही

महाभारतात केलेले आढळते. केवळ शास्त्रग्रंथाच्या आधारे मनुष्याला व्यवहारात वेळोवेळी आणि महत्त्वाच्या पेचप्रसंगी निर्णय घेता येत नसतो. याकरिता अत्यंत सूक्ष्म प्रज्ञा माणसाला लागते. व्यवहारनीतीचे वर्तन अशा नैतिक प्रज्ञेने म्हणजे कार्याकार्यविवेक करण्यास समर्थ प्रज्ञेनेच घडते. त्या प्रज्ञेचे स्पष्टीकरण राजधर्मपर्व, आपद्धर्म पर्व, व्याधगीता, विदुरनीती इत्यादी ठिकाणी मोठ्या मार्मिक रीतीने केलेले आहे.

भगवद्‌गीतेत सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती या संज्ञेने जो गुणसमुच्चय सांगितला आहे तो नैतिक आदर्श होय. अभय, अंत:करणाची शुद्धी, तत्त्वज्ञान, दान, दमन, यज्ञ, अध्ययन, तप, ऋजुता, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, निंदावर्जन, प्राणिमात्रावर दया, अलोलुपता, मार्दव, लज्जा, अचांचल्य, तेजस्विता, क्षमा, धैर्य, शुचिता, अद्वेष, नम्रता हा गुणसमुच्चय दैवी संपत्ती होय. हा आदर्श जीवनात उतरावयाचा कसा, यासंबंधाची मार्गदर्शक सूत्रे म्हणजे व्यवहारनीती विदुरनीतीमध्ये सांगितली आहे. व्यवहारनीती आपणास समर्थ रामदासांच्या दासबोधात विस्ताराने वाचावयास मिळते. दासबोधातील महंताची लक्षणे म्हणजे व्यवहारज्ञ संताची लक्षणे होत व मूर्खाची व पढतमूर्खाची लक्षणे ही व्यवहारज्ञान नसलेल्या माणसांची लक्षणे होत. दासबोधातील या प्रकारच्या प्रतिपादनावर महाभारतातील व्यवहारनीतीची व प्रामुख्याने विदुरनीतीची छाप पडलेली दिसते. विदुरनीतीमध्ये प्रथम पंडित लक्षणे व मूढ लक्षणे सांगितली आहेत. कौरव पांडवांच्या युद्धाच्या अगोदर विदुर व धृतराष्ट्र यांची भेट झाली असता विदुराने युद्ध टाळण्याकरिता धृतराष्ट्राला परोपरीने विनवणी करून जो हितोपदेश केला आहे त्यात प्रथम पंडित म्हणजे काय याचे विवेचन केले आहे.

पंडित म्हणजे विचारसंपन्न मनुष्य. देशकालपरिस्थिती, संस्कार, बलाबल इत्यादिकांचा विचार करून जो उपाय योजतो तो पंडित होय. यथाशक्ती म्हणजे शक्ती असेल त्याप्रमाणे जो काम करू इच्छितो, परिस्थितीचा अर्थ त्वरित जो जाणतो, केवळ भावनेच्या भरीस पडून जो काम करीत नाही, योग्य निर्णय करून जो कामास प्रारंभ करतो व हाती घेतलेले काम जो पूर्ण करतो तो पंडित होय. ज्याने मोठमोठी कामे हाती घेतलेली असतात, त्यासंबंधीचे निर्णय मात्र शत्रूंना अगोदर कळत नाहीत, कार्ये यशस्वी झाल्यानंतरच शत्रूंना कळतात, तो पंडित होय. असा पंडित तत्त्वज्ञ असतो, सर्व युक्ती जाणणारा असतो, सर्व उपाय लक्षात घेणारा असतो. हा तत्त्वज्ञ पंडित म्हणजे नुसता बैरागी निवृत्त साधू नव्हे. त्याला शत्रू व मित्र दोन्ही असतात. विदुराने नंतर लगेच मूर्खाची लक्षणे सांगितली आहेत. त्यातील एक प्रकारचा मूर्ख म्हणजे स्वार्थाकडे दुर्लक्ष करून शत्रूला उपयुक्त होतील अशी कामे करतो आणि मित्रांची वंचना करतो तो होय, असे म्हटले आहे.

ही पंडिताची व मूर्खाची लक्षणे धृतराष्ट्राला सांगत असताना धृतराष्ट्र मध्येच विचारतो, ''युद्धाच्या योगाने माझ्या पुत्रांचा विनाश होईल असे दिसते. त्यामुळे माझे हे मन उद्विग्न असते, उद्वेगरहित अशी स्थिती कोणती ते मला सांग.'' विदुर म्हणतो, ''विद्या, तप, इंद्रियनिग्रह

व लोभाचा त्याग केला तर उद्वेग नाहीसा होईल." कौरव आणि पांडव यांच्यामध्ये फूट पडली आहे अशा स्थितीत तुम्हाला केव्हाही स्वस्थ झोप मिळावयाची नाही. रात्री झोपताना मंजूळ वाद्ये वाजतात व प्रात:काळी उठताना मधुर स्तवने ऐकायला मिळतात हे जरी खरे असले तरी सुखाचा स्त्री-समागम तुम्हाला मिळू शकत नाही. ज्यांच्यात फूट पडते त्यांना धर्म, सुख, महत्त्व, शांती वगैरे काही मिळत नसते. ज्यांच्यात फूट नाही त्या समाजांचाच योगक्षेम चालतो. मैदानामध्ये असलेला प्रचंड महावृक्ष कितीही बलवान व स्थिर असला तरी वादळाच्या तडाख्यात क्षणात उन्मळून पडतो. परंतु ज्या ठिकाणी असंख्य वृक्ष दाटीने स्थिरावलेले असतात ते एकमेकांच्या आश्रयाने झंझावाताला तोंड देऊन निभावतात. एकमेकांच्या साहाय्याने एकमेकांना आधार देऊन, एकमेकांचा आश्रय घेऊन सरोवरातल्या कमळांप्रमाणे उत्कर्ष होत असतो. क्रोध येतो हे खरे; परंतु क्रोध हे सज्जनांचेच औषध आहे, दुर्जनांचे नव्हे. म्हणजे क्रोधरूपी कडू, डोक्याला भडकवणारे, तीक्ष्ण, उष्ण, प्रखर असे हे औषध शांत करून म्हणजे निववून सज्जनांनी गिळून टाकावे. नेहमी गोड बोलणारे पुष्कळ मिळतात; परंतु हितकारक असे अप्रिय बोलणारा वक्ता व ते ऐकणारा श्रोता दुर्लभ असतो. द्यूताच्या वेळी मी द्यूत खेळू नका असे निक्षून सांगितले, तरी तुम्ही द्यूत टाळू शकला नाही. आता युद्ध टाळण्याचा मी उपदेश करीत आहे, दुर्योधन ऐकत नाही, ऐकत नसेल तर दुर्योधनाचा त्याग करा असे मी पुन: सांगत आहे. कुलाकरिता एका व्यक्तीचा त्याग करावा, गावाकरिता कुलाचा त्याग करावा, राष्ट्राकरिता गावाचा त्याग करावा आणि आत्महितार्थ पृथ्वीचाही त्याग करावा; परंतु अशा त्यागाची पाळी येऊ नये. तुझे शतपुत्र, कर्ण व पाच पांडव हे सगळे मिळून अखिल पृथ्वीचे राज्य करू शकतात. वन आणि व्याघ्र हे एकमेकांचे साहाय्यक असतात. कौरव हे वन होत तर पांडव हे व्याघ्र. वनावाचून व्याघ्र जगत नसतात व व्याघ्रावाचून वनाचा महिमा टिकत नाही.

या संदर्भात विदुराने पाच प्रकारची बले सांगितली आहेत. बाहुबल हे कनिष्ठ व पहिले, अमात्यबल हे दुसरे, धनबल हे तिसरे, कुलाची कुलीनता हे चौथे व प्रज्ञा हे पाचवे बल होय. प्रज्ञाबल हाच सर्व बलांचा आधार असून तेच सर्वात श्रेष्ठ होय. दोन तऱ्हेची समृद्धी असते. गुणसमृद्धी व धनसमृद्धी. गुणसमृद्धांना जवळ करावे व गुणहीन धनिकांना दूर ठेवावे. ज्या तात्पुरत्या समृद्धीने शेवटी नाश होतो ती दूर सारावी व जो समृद्धिनाश अखेर समृद्धिकारक ठरतो त्याचा स्वीकार करावा. प्रज्ञेचे कार्य गुण व दोष यांची परीक्षा करून गुणाचे रक्षण व दोषांचे परिवर्जन करणे हे होय. प्रज्ञेचा नाश कसा होतो याचे विवरण विदुर करतो, ते असे : माणसाची पाच इंद्रिये आहेत. ते प्रत्येक इंद्रिय प्रज्ञेचा स्राव म्हणजे लोप करणारे छिद्र होय. या छिद्रातून पखालीतून पाणी वाहून जाते त्याप्रमाणे प्रज्ञा वाहून जाते. सहा दोष उत्पन्न होतात. ते टाळावेत. निद्रा, आलस्य, भय, सुस्ती व दीर्घसूत्रता. या सहा गुणांचे पालन करावे. सत्य, दान, उत्साह, अमात्सर्य, क्षमा व धैर्य हे ते होत. या सहा गुणांच्या योगाने संपत्ती,

आरोग्य, प्रियभार्यावश असलेला पुत्र व अर्थकारी विद्या, ही सहा सुखे प्राप्त होतात. ही जितेंद्रिय पुरुषालाच प्राप्त होतात. प्रज्ञेच्या योगाने धर्माचे स्वरूप कळते. धर्माचा अष्टविध मार्ग आहे. त्यातील पहिले चार प्रकार ढोंगी मनुष्याच्या ठिकाणीसुद्धा सापडतात व दुसरे चार प्रकार केवळ महात्म्याच्या ठिकाणीच दिसतात. पहिले चार प्रकार म्हणजे यज्ञ, विद्या, दान व तप होय. ते दांभिकाच्या ठिकाणीसुद्धा असतात. धर्माचे दुसरे चार प्रकार म्हणजे सत्य, क्षमा, पापाची लाज व लोभ. हे केवळ महात्म्याच्या ठिकाणी असतात.

विदुराने व्यवहारबुद्धीची फार सुरेख सुभाषिते सांगितली आहेत. ही सुभाषिते म्हणजे चिरंतन वाङ्मय होय. ते मानवी अनुभवांचे सार आहे. त्यातील काही उद्धृत करतो. सुवर्णपुष्पां पृथ्वीं चिन्वन्ति पुरुषास्त्रय: । शूरश्च कृतविद्यश्च यश्च जानाति सेवितुम् ॥ पृथ्वीला सोन्याची फुले येतात. ती फुले तीन प्रकारची माणसे वेचतात : शूर, विद्वान व आस्वादकुशल म्हणजे रसिक हे होत. पूर्वे वयसि तत्कुर्यात् येन वृद्ध: सुखं वसेत् । यावज्जीवेन तत्कुर्यात् येन प्रेत्य सुखं वसेत् ॥ तारुण्यात ते करावे की ज्याच्याने म्हातारपणी सुखाने जगता यावे. जन्मभर ते करावे की ज्याच्याने मृत्यूनंतरही सुख लाभते; अशी शेकडो सुभाषिते विदुरनीतीत आहेत.

महाभारतात विदुरनीतीच्या शिवाय अन्यत्र वारंवार व्यवहारनीती आली आहे. त्यात सत्य व अहिंसा या शाश्वत नीतितत्त्वांची व्यवहाराशी सांगड कशी घालावी याबद्दलही महत्त्वाचे विवेचन आले आहे. कोणत्याही प्राण्याची हिंसा करू नये व सर्व प्राण्यांचे सुख हे आपले सुख मानावे, हा सिद्धांत मान्य असला तरी त्याला व्यवहारात मुरड पडते. 'अहिंसा परमो धर्म:' हे तत्त्व इतर धर्मांप्रमाणेच वैदिक धर्मातही मुख्य गणले आहे; परंतु महाभारतात (शांति १५-२६) अर्जुन म्हणतो की, डोळयांनी न दिसणारे; परंतु तर्काने ज्याचे अस्तित्व समजते असे सूक्ष्म जंतू या जगात इतके भरले आहेत की, आपण आपल्या डोळयांच्या पापण्या हलविल्या तरी त्यांचे हातपाय मोडून पडतील. म्हणून हिंसा अटळ आहे. महाभारतात मांसविक्रय करणाऱ्या परममातृपितृभक्त अशा व्याधाची कथा आहे. तो म्हणतो, हिंसा संपूर्ण टाळायची तर कोणालाही जगता येणार नाही. 'जीवो जीवस्य जीवनम्' हा सृष्टीचा नियम आहे. स्वकुलाचा नाश टाळण्याकरिता अर्जुन भारतीय युद्ध टाळू पाहत होता; परंतु भगवान श्रीकृष्णाने युद्ध हा क्षात्रधर्म आहे असे सांगून युद्धास प्रवृत्त केले. कारण क्षात्रधर्माशिवाय राज्य चालत नाही व राज्याशिवाय समाज चालत नाही.

सत्य हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. नास्ति सत्यात् परो धर्म: (शांति १६२-२४). 'सत्यापरता नाही धर्म' असे महाभारतात अनेक ठिकाणी आले असूनही काही अपवादप्रसंगी अनृतही एकंदरीत कल्याणाचा विचार करून बोलावे लागते असे शांतिपर्वात (शांति १०९-१५, १६) भीष्माने युधिष्ठिरास सांगितले आहे. असा काही पेचप्रसंग येतो की, सत्य बोलल्यास सर्वनाश होतो म्हणून सत्याची व्याख्याही भीष्माने बदलली आहे. यद् भूतहितम् अनृतं एतद् सत्यं मतं मम । (शांति ३२९-१३). जे प्राण्यास अत्यंत हितकारक तेच सत्य होय, अशी सत्याची

व्याख्या महाभारतात अनेक ठिकाणी आली आहे. व्याध म्हणतो की, 'यद् भूतहितम् अनृतं तत् सत्यमिति धारणा' (वन. २०८-४). युधिष्ठिर सत्यप्रतिज्ञ होता; परंतु युद्धामध्ये द्रोणासारख्या शूराला शस्त्रत्याग करून स्वस्थ बसविण्याकरिता म्हणजे युद्धात स्वत:च्या पक्षास विजय मिळावा म्हणून त्याने निक्षून सत्य सांगावयाचे टाळले. द्रोणाचार्यांचा प्रश्न होता की अश्वत्थामा मेला, की अश्वत्थामानामक हत्ती मेला...? या प्रश्नाचे उत्तर द्रोणाचार्यांना संशयित वाक्यात युधिष्ठिराने दिले की, हत्ती किंवा मनुष्य असेल. काही ठिकाणी महाभारताची व्यवहारनीती घसरलीसुद्धा आहे. असे म्हटले आहे - 'न नर्मयुक्तं वचनं हिनस्ति न स्त्रीषु राजन् न का विवाहकाले । प्राणात्यये सर्वधनापहारे पंचानृतान्याहुरपातकानि ॥' थट्टेत, बायकांशी, विवाहकाली, जिवावर बेतले असता सर्व धन चोरले जात असता अशा पाच प्रसंगी असत्य हे पातक नाही. प्राण वाचविण्याकरिता किंवा सर्व धनाची चोरी होत असता असत्य हे क्षम्य असले तरी थट्टा, बायका व विवाहकाल हे सत्याचे अपवाद म्हणजे शुद्ध व्यवहारनीतीच होय. त्याला नीती तरी का म्हणावे? म्हणूनच महाभारतात दुसरीकडे 'आत्महेतो: परार्थे वा नर्महास्याश्रयात्तथा । ये मृषा न वदन्तीह ते नरा: स्वर्गगामिन:'॥ (अनुशासन १४४-१९). 'स्वार्थाकरिता, परहितार्थ किंवा थट्टेतही जी माणसे या जगात खोटे बोलत नाहीत तीच स्वर्गात जातात.'

तात्पर्य असे की, शुद्ध नीतितत्त्वांना नीतिभिन्न कारणांनी मुरड पडू नये. संपत्ती व इंद्रियसुखे यांच्याकरिता नीतितत्त्वांना मुरड घातल्यास अखेरीस पापमय जीवन बनते व नाश होतो; परंतु जेव्हा नैतिकदृष्ट्या समर्थनीय अशा विरुद्ध बाजूंपैकी कोणती बाजू धरावी असा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा तारतम्य विचाराने निर्णय करावा लागतो. उदाहरणार्थ सत्य बोलल्यास आत्मनाश किंवा अन्य जीवाचा नाश होतो व असत्य भाषण केल्यास आत्मरक्षण व अन्यजीवरक्षण होते. अशा वेळी दोन्ही विरुद्ध बाजू नैतिकच असतात. अशा वेळी नैतिकदृष्ट्या अधिक बळकट बाजू कोणती हे प्रज्ञेने ठरवावे लागते. यासच व्यवहारनीती असे म्हणतात, असा महाभारतीय नीतिशास्त्रांचा निर्णय आहे.

**(आकाशवाणी, पुणे केंद्र)**

०००

६३

# भारत : राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया

(पूर्वार्ध-उत्तरार्ध)

भारत या राष्ट्राची निर्मिती व उभारणी होऊ लागली ती ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या बंधनात सापडल्यावर. त्यापूर्वी ज्ञात इतिहासकालात एका सार्वभौम छत्राखाली समग्र भारत कधीच आला नव्हता. आधुनिक पश्चिमी शिक्षणाच्या योगाने सुसंस्कृत झालेले काही भारतीय राज्यव्यवस्था कशी असावी याचा विचार करू लागले. त्यांना ब्रिटिशांच्या राज्यव्यवस्थेत व शासनपद्धतीत गुण जसे दिसू लागले तसे दोषही त्यांच्या लक्षात येऊ लागले. आपली समाजव्यवस्था, आपल्या सामाजिक चालीरीती, रूढिनिष्ठ व अंधश्रद्धेने ग्रस्त सामाजिक मन त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे येथील सामाजिक संस्था धार्मिक अंधश्रद्धेच्या बंधनामध्ये गुरफटल्या गेल्यामुळे सबंध समाज दुर्बळ होऊन राजकीय व आर्थिक दृष्ट्या विपन्न स्थितीत जगत आहे हेही त्यांच्या ध्यानात आले. पश्चिमी संस्कृतीच्या संपर्कामुळे नव्या सामाजिक प्रबोधनाची गरज दिसू लागली. भारताबाहेरचे जग येथील माणसाला, उच्च, मध्यम आणि नीच स्तरावरील समाजाला पूर्ण अज्ञात होते ते विशाल जग एकदम झक्क प्रकाश पडून पहिल्या थोठ्या शिक्षितांच्या दृष्टिपथात येऊ लागले. त्यामुळे तुलनात्मक विचार करून आपल्या सर्वांगीण अधःपाताचीही येथील आधुनिक विद्याविभूषित थोड्या तत्त्वचिंतकांनी आणि समाजसुधारकांनी मीमांसा सुरू केली.

### एकराष्ट्रीयत्वाचे सूत्र

धार्मिक, सामाजिक व राजकीय अशा तिन्हीही सांस्कृतिक क्षेत्रामध्ये नव्या विचारांच्या प्रेरणांचा उन्मेष होऊ लागला. ख्रिश्चन धर्म आणि ख्रिश्चन धर्मप्रचारक हे ख्रिश्चन सत्ताधाऱ्यांच्या पाठिंब्याने येथील हिंदुधर्मावर आणि विशेषतः मूर्तिपूजेवर प्रखर टीका करू लागल्यामुळे धर्मविषयक साधकबाधक चर्चेला धार येऊ लागली. त्यामुळे भारतातील हिंदू- मुसलमान ख्रिश्चन बौद्ध धर्माची साधकबाधक चर्चा करून जगातील सर्वच धर्मामध्ये काही एक अंतिम

सत्य आहे, ते सत्य म्हणजे एकेश्वरवाद होय असा निर्णय झाला आणि अंतिम नैतिक मूल्ये मानवी जीवनाचा सर्वव्यापी सर्वश्रेष्ठ आधार होय, अशा तऱ्हेचा विचार निर्माण होऊन जगातील सर्व धर्मांमध्ये सहकार्याने एकत्र जगण्याची प्रवृत्ती निर्माण करणे ही गोष्ट आवश्यक आहे हे निश्चित झाले. म्हणून सर्व धर्मांचे एक पीठ सर्व धर्मीयांच्या विचारविनिमयाकरता राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्म समाज या संस्थेच्या रूपाने निर्माण केले. भारताच्या एकराष्ट्रीयत्वाच्या प्रेरणेचे हे धार्मिक सूत्र ठरले. राजा राममोहन रॉय, रवींद्रनाथ ठाकूर आणि महात्मा गांधी या महान व्यक्ती या सर्वधरसर्वधर्मसमन्वयाच्या सिद्धांताचा पुरस्कार करणारे द्रष्टे क्रमाने निर्माण झाले. भारतामध्ये जेवढे काही उच्च स्तरावरचे हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान इ. धर्म आहेत व त्या त्या धर्मावर अधिष्ठिलेल्या समाजसंस्था आहेत त्यांच्यातील परस्पर विसंगती व विग्रह नष्ट करून हे भिन्न भिन्न धार्मिक समाज हे एका इहवादी राज्यसंस्थेचे म्हणजे राष्ट्राचे अविभाज्य घटक बनावे, अशी धारणा या सर्वधर्मसमन्वयाच्या सिद्धांताच्या मुळाशी गृहीत धरलेली आहे.

### इहवादी पाया

भारताच्या इहवादी राष्ट्रीयत्वाचा पाया घालण्याचे काम धर्मनिरपेक्ष आधुनिक शिक्षणाने सुरू केले. त्याचा हेतू इथल्या प्रत्येक नागरिकाला आधुनिक उदार शिक्षणाच्या योगाने समान नागरिक म्हणून स्वावलंबी जीवनपद्धती निर्माण करता यावी, हा ठरला. मुख्यत: परंपरागत अंद्धश्रद्धांचा नाश होऊन विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टी निर्माण व्हावी, हा या शिक्षणाचा मूळ उद्देश आहे. हे शिक्षण सगळ्या आधुनिक जगात साधारणपणे एकच प्रकारचे आहे. खगोल, भूगोल, तंत्रज्ञान, वैद्यक, शरीरविज्ञान, पदार्थविज्ञान, रसायन, वनस्पतिसृष्टी, प्राणिसृष्टी हे विषय जसे एक आहेत तसेच अगदी जरी नसले, तरी समाजविज्ञान, मानसविज्ञान, राज्यशास्त्र, कायदा इ. विषय काही प्रमाणात सगळ्या आधुनिक जगात समान आहेत.

आधुनिक शिक्षणाच्या योगाने सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया येथे सुरू झाली. स्त्रियांना पुरुषांबरोवर आणि दलित वर्ग आणि शूद्र यांना उच्च वर्ग्रीयांबरोबर समान हक्क असले पाहिजेत, याची जाणीव होऊ लागली. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न हा स्त्रियांच्या कुटुंबातील आणि समाजातील स्थानाशी निगडित असल्यामुळे त्यांना बंधमुक्त होण्याच्या दृष्टीने सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू झाली. सतीची चाल बंद झाली, स्त्रियांच्या पुनर्विवाहाचा हक्क मान्य केला गेला, घटस्फोटाच्या कायद्याला मान्यता मिळाली व स्त्रियांचा संपत्तीवरचा वारसाहक्क विस्तार पावला. स्त्री- पुरुषांच्या विवाहाची मर्यादा वाढविण्यात येऊन बालविवाह बंद झाले. अस्पृश्यता- निवारणाच्या आंदोलनाचा प्रारंभ होऊन त्यासंबंधी संघर्षाला तेज प्राप्त झाले. आंतरजातीय विवाह आणि भिन्नधर्मीय विवाह यांना कायद्याने

अनुमती मिळाली. अशी ही अनेक बाजूंनी सामाजिक परिवर्तनाची व सुधारणेची प्रक्रिया मंद गतीने झाली.

## तीन राजकीय प्रवाह

१८५७ सालच्या बंडानंतर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या ३० वर्षांत ब्रिटिशांच्या राजकीय सत्तेला आव्हान देण्यात येऊ लागले. नागरिकांच्या हक्कांचा प्रश्न महत्त्वाचा ठरला. ब्रिटिशांच्या राजकीय धोरणामध्ये साम्राज्यशाही शोषणाचे जे मुख्य सूत्र होते तिकडे येथील राजकीय व सामाजिक विचारवंतांचे लक्ष केंद्रित होऊ लागले. विशेषतः दादाभाई नवरोजी यांनी आणि भारताच्या आर्थिक इतिहासाच्या पंडितांनी, ब्रिटिश साम्राज्यशाही येथील उद्योगधंदे नष्ट करून व्यापाराच्या द्वारे कसे शोषण करीत आहे, त्यामुळे दारिद्र्य पराकाष्ठेला पोहोचले आहे याचे स्पष्टीकरण करून स्वराज्याशिवाय या राष्ट्राचे प्रश्न सुटणार नाहीत या निर्णयापर्यंत येऊन पोहोचले. या निर्णयाच्या प्रभावाखाली तीन प्रकारचे राजकीय पक्ष निर्माण झाले. एक ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदारमतवादी राजकीय तत्त्वज्ञानावर विसंबून त्यांना येथील परिस्थिती समजावून देऊन जनतेच्या मागण्या त्यांच्यापुढे मांडाव्यात व त्यांचे मतपरिवर्तन करावे अशा मताचा नेमस्त पक्ष उत्पन्न झाला. गोपाळ कृष्ण गोखले हे त्यांचे मुख्य ध्येयवादी नेते होते. दुसरा पक्ष अगदी दुसऱ्या टोकाला जाऊन सशस्त्र क्रांतीशिवाय हे परकीय पारतंत्र्य नष्ट होणार नाही, या निश्चयाने संघटना बांधू लागला. तिसरा मध्यम मार्गीय पक्ष. प्रचलित कायद्याच्या मर्यादेचे शक्य तो उल्लंघन न करता सामान्य जनतेचे आंदोलन निर्माण करून जनतेमध्ये असंतोष व क्षोभ निर्माण करून स्वराज्याचे आंदोलन घडवून आणणारा असा हा पक्ष निर्माण झाला. हा पक्ष परकीय राज्यकर्त्यांच्या राजकीय धोरणावर प्रखर टीका करून व जनतेच्या संघटना बांधून आंदोलन करू लागला; याचे सर्वश्रेष्ठ नेते लो. टिळक होत. हा पक्ष सर्वांत सामान्य जनांच्या तळापर्यंत पोहोचला. याच पक्षाला इंडियन नॅशनल काँग्रेस हे रूप प्राप्त झाले. पहिल्या महायुध्दानंतर १९९८ सालानंतर म. गांधींचे नेतृत्व उदयास आले आणि त्यांनी अहिंसक लढ्याचा आणि कायद्याच्या आत किंवा बाहेर राहून असहकारितेचा, सामुदायिक सत्याग्रहाचा कार्यक्रम आखून देशभर राष्ट्रव्यापी आंदोलन निर्माण केले. हे निःशस्त्र प्रतिकाराचे आंदोलन होते; त्यामुळे त्याच्या मध्ये भारतातील सर्व थरातील व वर्गातील स्त्रिया सामील झाल्या. सत्याग्रहात व कायदेभंगाच्या आंदोलनात आघाडीवर लक्षावधी महिलांनी भाग घेतला. कारावास व लाठीमार सहन केला. त्यामुळे हा मागासलेला देश असूनही राजकारणात कोणत्याही पाश्चात्त्य देशापेक्षा अधिक स्त्रिया भाग घेऊ लागल्या. १९२०-२१, १९३०-१९३२ आणि १९४२-१९४५ हे तीन महत्त्वाचे कालखंड म्हणजे एकापाठीमागून एक देशव्यापी वादळी आंदोलनाचे कालखंड होत. त्यामुळे दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरीस ब्रिटिश सताधाऱ्यांनी आपली साम्राज्यशाही विसर्जित केली आणि भारत स्वतंत्र होऊन जगातील पश्चिमी साम्राज्यशाह्यांचा अंत झाला.

## लोकशाहीचे अधिष्ठान

भारताच्या राष्ट्रीय निर्मितीच्या व उभारणीच्या प्रक्रियेमध्ये सर्वधर्मसमन्वय, इहवादी समाजपरिवर्तन, मूलभूत मानवी हक्क, सामाजिक न्याय, आर्थिक समता व प्रचार स्वातंत्र्य हे घटक ध्यानात घ्यावे लागतात. या अधिष्ठानावर संसदीय लोकशाहीची उभारणी झाली आहे. ते घटक लक्षात घेतले म्हणजे स्वतंत्र भारताच्या संविधानाची वा राज्यघटनेची जयप्रकाशप्रोक्त समग्र सामाजिक क्रांतीकडे नेणारी पार्श्वभूमी लक्षात येते. भारताच्या राष्ट्रवादाची मीमांसा करीत असताना हा राष्ट्रवाद एका भावी इहवादी समतावादी, लोकशाही समाजवादी अशा राष्ट्रनिर्मितीच्या उच्चतम उद्देशाने सिद्ध झालेला राष्ट्रवाद आहे. हा हिंदुराष्ट्रवाद नाही; कारण वेद- स्मृती- पुराणे इ. धर्मग्रंथांच्या अधिष्ठानावर जी समाजरचना गेली हजारो वर्षे या ठिकाणी स्थिरावलेली आहे, जिच्यात जन्मसिध्द उच्चनीच जातिभेद, स्पृश्यास्पृश्य जातिभेद चातुर्वण्याच्या तत्त्वावर आधारलेले मानले गेले आहेत त्यांना भारताच्या संविधानाने किंवा राज्यघटनेने अप्रमाण ठरविले आहे. नागरिकाचे समान हक्क हे तत्त्व उच्चनीच, स्पृश्यास्पृश्य जातिभेदाच्या तत्त्वाशी मूलतःच विरुध्द आहे. स्त्री-पुरुषांची विषमता परंपरागत हिंदुधर्मशास्त्रात प्रतिपादिलेली आहे. स्त्रियांना संपत्तीचा वारसाहक्क अमान्य केला आहे; पुरुषांना अनेक बायका करण्याची परवानगी हिंदुधर्मशास्त्राने दिली आहे. हे सर्व स्त्रीपुरुषसमानतेच्या तत्त्वाविरुध्द आहे. मनुस्मृती मानायची असेल, तर हिंदुराष्ट्रवादही त्याच्या आधारावर निर्माण होऊ शकत नाही; कारण कोणत्याही समर्थ आधुनिक राष्ट्रामध्ये नागरिकांची समानता ही अपरिहार्य आवश्यक बाब म्हणून स्वीकारलीच पाहिजे. मनुस्मृती मानणाऱ्यांना स्पर्शास्पर्शभेद मानलाच पाहिजे. म्हणून सबंध दलित समाज मनुस्मृतीनिष्ठ राष्ट्रवादाच्या कक्षेत समाविष्ट होऊ शकत नाही. शूद्रांना वेदाधिकार नाकारणाऱ्या मनुस्मृतीच्या हिंदुराष्ट्रवादात सत्तर टक्के हिंदू समाजाला हीन-नीच दर्जाचा नागरिक म्हणूनच स्थान राहते. एकतर धर्मनिरपेक्ष इहवादी राष्ट्रवाद तरी मान्य केला पाहिजे किंवा हिंदू समाजाची दृढ एकता तरी विसरली पाहिजे. कारण हा हिंदू समाज ऐहिक मानवी समान हक्कांच्या तत्त्वांवरच समरस आणि एकात्मक बनू शकतो.

## राष्ट्रवादाचे सिंहावलोकन

राष्ट्रवाद हा विचार राजकीय ध्येयवादामध्ये सतराव्या शतकात मॅकियाव्हेली या राज्यशास्त्रज्ञाने पहिल्यांदा प्रतिपादिला. इटली हा देश अनेक गणराज्यांमध्ये व सरदारांच्या राज्यांमध्ये विभागला होता. त्याला एकराष्ट्र हे स्वरूप प्राप्त व्हावे अशी तळमळ मॅकियाव्हेलीला लागली होती. एकोणिसाव्या शतकात काउंट काव्हूर, गॅरिबाल्डी आणि जोसेफ मॅझिनी या तीन देशभक्तांच्या नेतृत्वाखाली इटालियन राष्ट्राभिमानाचा पूर्ण आविष्कार झाला. युरोपात व अमेरिकेत अठराव्या शतकापासून राष्ट्रीय राज्यांची अधिक

विस्ताराने निर्मिती आणि उभारणी झाली. विशिष्ट धर्म किंवा विशिष्ट संस्कृतीपेक्षा विशिष्ट सामाजिक गटाबद्दल आणि त्या गटाच्या राज्यव्यवस्थेबद्दल आत्मीयता उत्पन्न होऊन या राजकीय, सामाजिक गटाचे हितसंबंध हे आपलेच हितसंबंध होत अशा जाणिवेने भरलेली व्यक्तीची अस्मिता म्हणजे राष्ट्रीय वृत्ती होय, हे निश्चित झाले. नागरिकांच्या सामाजिक व राजकीय हितसंबंधाची जोपासना करणारा विशिष्ट प्रादेशिक समाज म्हणजे राष्ट्र होय. हीच राष्ट्राची व्याख्या तंतोतंत जरी नव्हे तरी बहुतांशाने राष्ट्र म्हणून निर्माण झालेल्या युरोपातल्या आणि अमेरिकेतल्या देशांना लागू पडते. राष्ट्रवाद हा ऐहिक ध्येयवाद आहे. त्यात राजकीय व सामाजिक आशय आहे. विशिष्ट प्रादेशिक मर्यादेतल्या समाजाच्या राज्यसंस्थेविषयी सामान्यपणे त्या त्या प्रदेशातील स्त्री-पुरुष नागरिकांच्या मनात निष्ठा वा भक्तिभाव असतो. त्या प्रदेशाच्या बाहेरच्या नागरिकांबद्दल किवा माणसांबद्दल एक प्रकारची परकीयत्वाची भावना (अशा भक्तिभावामुळे) उत्पन्न झालेली असते. मग तो परकीय स्वधर्मीय असला, तरी त्याच्याशी राष्ट्रीय भावनेने भरलेली समरसता प्राप्त होऊ शकत नाही. अशा प्रकारचा राजकीय, ऐहिक ध्येयवाद अठराव्या शतकापासून अधिक मोठ्या प्रमाणात पश्चिमी देशांच्या राजकीय, ऐतिहासिक घडामोडींमध्ये स्पष्ट होऊ लागला. अशा प्रकारच्या राजकीय अस्मितेचा पाया भारतामध्ये ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या दडपणाखाली निर्माण होऊ लागला. विसाव्या शतकात राजकीय स्वातंत्र्याच्या जनसंग्रामात त्याची परिणती झाली आणि भारत स्वतंत्र झाला.

युरोपातील राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रवाद बनला. हा पश्चिमी राष्ट्रवाद अठराव्या शतकापासून बलिष्ट होत जाऊन एकोणिसाव्या शतकात अनेक प्रकारच्या पश्चिमी साम्राज्यशाह्यांच्या रूपाने जगभर विस्तारत गेला आणि त्या पश्चिमी साम्राज्यशाह्यांच्या आर्थिक व राजकीय शोषणातून मुक्त होण्याकरिता भारतासारखे देश प्रयत्नशील झाले. त्यांनी पश्चिमी राष्ट्रवादापेक्षा निराळी राष्ट्रवादी रूपे धारण केली. विसाव्या शतकामध्ये या पश्चिमी आक्रमक राष्ट्रवादाला अधिक उग्र रूप प्राप्त झाले. इटलीतील मुसोलिनीचा फॅसिझम व जर्मनीतील हिटलरचा नात्सिझम ही त्याची आसुरी रूपे होत. हिटलरच्या नात्सिझमच्या असुराने आर्य वंश हाच जगाचे आधिपत्य करण्याकरता निर्माण झाला असून इतर राष्ट्रांनी त्या आर्यवंशांच्याच ताबेदारीत जगले पाहिजे, कारण बुध्दिमतेचा व प्रज्ञेचा खराखुराविकास आर्यमानवातच होतो. हे सूत्र धरून दुसऱ्या महायुद्धात जग आक्रमणाचा पवित्रा जर्मनीने घेतला. इटलीमधील फॅसिझमचा मुख्य प्रवक्ता मुसोलिनी याने सांगितले की, व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली लोकशाही पध्दती ही राष्ट्राला दुर्बल करते. व्यक्ती ही राष्ट्राकरता असते. राष्ट्राकरताच तिने जगले पाहिजे व मेले पाहिजे. तात्पर्य, त्याने राष्ट्र हाच अंतिम मानवी आदर्श प्रतिपादिला. हिटलरच्या नात्सिझममध्ये हाच हुकूमशाही ध्येयवाद

प्रतिपादिला आहे. युरोपातील राष्ट्रवादाच्या दोन आसुरी प्रवृत्ती मानवी इतिहासात आधुनिक युगात दिसून आल्या. त्या म्हणजे साम्राज्यशाही आणि हुकूमशाही या होत.

भारताचा राष्ट्रवाद हा विश्वमानवतावादाशी संवादी स्वरूपात निर्माण झाला आहे. त्याचा आरसा भारताचे संविधान होय. त्यामध्ये धर्मनिरपेक्षता आणि मूलभूत मानवी मूल्ये ही भारतीय कायद्याची मूळ तत्त्वे म्हणून स्वीकारली आहेत. युरोपमधील कोणतेही राष्ट्र पाहिले, तर हे लक्षात येईल की तेथे (संबंध युरोपमध्ये) एकच मुख्य धर्म म्हणजे ख्रिश्चन धर्म आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक मुसलमानी राष्ट्रे पश्चिम एशियामध्ये अस्तित्वात आली. तेथे एकच इस्लाम हा धर्म आहे. उलट, भारतासारख्या देशात जगातील सगळे विद्यमान धर्म व त्यावर अधिष्ठित समाज नागरिकत्त्वाच्या हक्काने नांदत आहेत. युरोपातील स्वित्झर्लंड व अमेरिकेतील कॅनडा ही दोन राष्ट्रे सोडली तर जगातील बहुतेक मोठी व मध्यम राष्ट्रे ही एक धर्म व एक भाषा असलेलीच राष्ट्रे आहेत. तात्पर्य, गेल्या ३०० वर्षांतील राष्ट्रवादाचा इतिहास पाहिला असताना भारत हे एकच असे मोठे राष्ट्र आहे की ज्यामध्ये हिंदू, बौद्ध, जैन, इस्लाम, ख्रिश्चन, यहूदी इ. धर्मांवर आधारलेले समाज समाविष्ट झाले आहेत. युरोपातील एकेका मोठ्या राष्ट्राइतके मोठे १४ भाषिक प्रदेश या एका राष्ट्रात समाविष्ट झाले आहेत. भारत हे राष्ट्र जागतिक संस्कृतीच्या व विश्वमानवी समाजाच्या समरसतेचा आणि एकात्मतेचा प्रयोग करणारी प्रयोगशाळा बनली आहे. भावी विश्वमानव समाजाच्या उभारणीची पूर्वतयारी कशी करावी याचा प्रयोग भारतात सुरू आहे, असे म्हणावे लागेल.

भारताबाहेरच्या मुसलमान समाजांना जागतिक मानवसमाजाच्या परिवारामध्ये समरस होण्याला त्यांचा धर्मनिष्ठ राष्ट्रवाद हा मोठाच अडथळा आहे.

पाकिस्तानची निर्मिती मुसलमानांच्या धर्मनिष्ठ राष्ट्रवादाच्या अभिमानाने निर्माण झाली आहे. एकंदरीत मुसलमानी राष्ट्रांमध्ये परंपरागत मुस्लीम धर्मशास्त्राचा खोल प्रभाव पडत आहे व पसरत आहे. त्यामुळे आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीला आवश्यक असलेले बौद्धिक स्वातंत्र्य म्हणजे सामर्थ्य त्यांना मिळणे कठीण आहे. युरोपाशी तुलना करता ही गोष्ट स्पष्ट होते, की भारतातील प्रत्येक भाषिक प्रांत हे एक राष्ट्रच म्हणावे लागते. १९५६ पासून भारतामध्ये भाषिक राज्याची रचना होऊ लागली; ही गोष्ट लोकशाही जीवनपद्धतीला पोषक अशीच झालेली आहे. वयात आलेल्या स्त्री-पुरुष मतदारांना मतदानाच्या अधिकाराचा हक्क प्राप्त झाला असून त्यानुसार नागरिक मतदान करत असतात.

## भाषेचे सामर्थ्य

या नागरिकाचे सामाजिक जीवन त्याच्या प्रादेशिक मातृभाषेतून चालत असते. भाषा ही मानवामानवांची मानसिक समरसता निर्माण करणारी, एकमेकांचे मनोगत एकमेकांना जवळ घेऊन समजावून देणारी माणसाची आत्मशक्ती आहे. सामाजिकता निर्माण करणारी

ती प्रधान शक्ती आहे. म्हणून सगळे विचार हे सामान्यपणे प्रत्येक व्यक्ती मातृभाषेतूनच करीत असते. विचारांचा, भावनांचा किंवा संपूर्ण मनाचा आविष्कार मुख्यतः मातृभाषेतूनच होऊ शकतो. त्यामुळे भाषा ही राजकीय शक्ती बनते. ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेपासून तो विधानसभा किंवा विधानपरिषदांतून निवडून आलेल्या स्त्री-पुरुष नागरिकाला आपले विचार मातृभाषेत मांडण्याची संधी मिळते, तेव्हाच नागरिकाच्या ठिकाणी असलेल्या सार्वभौम राज्यशक्तीला कायद्याचे व कायदेशीर व्यवहाराचे रूप येऊ शकते. राज्यकर्ता वा राज्यशासनकर्ता हा जनतेतूनच निवडून येतो; त्याची मातृभाषा जनतेचीच मातृभाषा असते. म्हणून प्रत्येक भाषिक प्रदेश ही राज्यसंस्था बनते. भारतात १४ भाषिक राज्ये आहेत. त्या राज्यांची उभारणी संपूर्ण लोकशाहीपद्धतीवर होण्याकरता एक प्रकारची स्वयपूर्ण होण्याइतकी त्यांची स्वायंत्तता मान्य केली पाहिजे.

## ध्येय व मार्ग

वस्तुवादाकडून वस्तुवादाच्या आधारे ध्येयवादाकडे जाणे हाच व्यवहार्य मार्ग ठरतो. भारत हे संपूर्ण सत्तेच्या केंद्रीकरणाकडे जाऊ लागले आणि प्रांतांच्या (प्रादेशिक राज्यांच्या) स्वायत्ततेला ते अधिकाधिक मर्यादा घालू लागले तर प्रादेशिक राज्यांचा सर्वांगीण विकास होण्याची प्रक्रियाच खुंटेल. राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणापेक्षा विकेंद्रीकरणामुळेच प्रदेशराज्यांचे आणि केंद्रराज्याचे सामर्थ्य वाढू शकेल. स्वावलंबन हीच माणसाच्या आत्मविकासाची पहिली पायरी आहे. माणसाचा आणि त्याने निर्माण केलेल्या सामाजिक संस्थेचा विकास बाहेरच्या बंधनापेक्षा अंतःप्रेरणेनेच अधिक मुक्तपणे होऊ शकतो. याकरता समाजाच्या आणि समाजसंघटनेच्या सर्वांत खालच्या मूलभूत घटकापर्यंत राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याची आवश्यकता मान्य केली पाहिजे. गावे आणि नगरे यांचे प्रशासन त्या त्या गावांनी आणि त्या त्या नगरांनी चालविल्यानेच या देशातील अफाट दारिद्र्याचा, निरक्षरतेचा, बेकारीचा आणि मानसिक दैन्याचा असे विविध अक्राळविक्राळ प्रश्न सोडवता येतील. केंद्रीय व प्रादेशिक राज्यांनी ह्या ग्रामराज्यांना व नगरराज्यांना अधिकाधिक स्वायत करून समर्थ होण्याकरता कायदेशीर तरतुदी केल्या पाहिजेत. ग्रामराज्य व नगरराज्यापासून तो केंद्रराज्यापर्यंत दृढ असा पिरॅमिड निर्माण करणे ही येथील संसदीय लोकशाहीची मुख्य जबाबदारी आहे. या संसदीय लोकशाहीकडून लोकशाही समाजवादाकडे जाण्याचे उद्दिष्ट हे या राष्ट्राचे एक प्रधान उद्दीष्ट आहे. ते मूलगामी लोकशाहीशिवाय साध्य होणार नाही.

आज जगामध्ये मार्क्सवादाच्या मार्गाने समाजवादी क्रांती झालेली सोव्हिएट रशिया, चीन, पूर्व युरोपियन इत्यादी राष्ट्रे दिसतात. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने जाणारी तथाकथित भांडवलशाही राष्ट्रे म्हणजे ब्रिटन, फ्रान्स, प. जर्मनी, इटली, स्वित्झर्लंड, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क इ. आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका, जपान इ. देश दिसतात. दुसऱ्या महायुद्धानंतर आशियातील व आफ्रिकेतील अनेक राष्ट्रे भारताबरोबरच मुक्त

झाली. या नवमुक्त राष्ट्रांच्या परंपरेत भारत हे एक लोकशाहीच्या आधारावर निर्माण झालेले विशाल राष्ट्र दिसते. आर्थिकदृष्ट्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संपन्न झालेली उत्तरेची राष्ट्रे आणि आर्थिकदृष्ट्या विपन्न झालेली दक्षिणेकडची राष्ट्रे असेही वर्गीकरण करतात. आर्थिकदृष्ट्या विपन्न असलेल्या राष्ट्रांमध्ये भारत हे एकच राष्ट्र आहे की जे संसदीय लोकशाहीच्या अधिष्ठानावर समाजवादी ध्येयाच्या रचनेने प्रेरित झाले आहे. म्हणून जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा याला असलेली जुनी व नवी अशी अनेक आव्हाने आहेत. जुनी आव्हाने उग्र रूप धारण करीत आहेत. नवी आव्हाने या देशातील राज्यसंस्था अस्थिर करून दुबळी करतील की काय, अशा तऱ्हेचा प्रश्न आज भेडसावत आहे. या जुन्या-नव्या आव्हानांचा अर्थ समजून घेतला पाहिजे.

## जनताच सार्वभौम

भारताच्या संसदीय लोकशाहीचा जन्म जनआंदोलनातून झाला. या आंदोलनाच्या कालावधीमध्ये ऐंशी टक्के प्रजा निरक्षर होती. तरी जनतेला स्वतःच्या दुःस्थितीचे विशेषत: साम्राज्यशाहीच्या शोषणातून निर्माण झालेल्या दुःस्थितीचे- भान करून देणारे सुशिक्षित नेतृत्व वर आले व भारतीय जनता पहिल्यांदाच राजकीय समाज बनू लागला. जनतेने क्रांती करून राज्य निर्माण करावे हे आधुनिक मानवी इतिहासाचे वेगळे वैशिष्ट्य आहे. फ्रेंच राज्यक्रांतीपासून जनता व राज्य यांच्या संघर्षाला अर्थपूर्ण दिशा मिळाली. या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात साम्राज्यशाह्यांच्या वसाहतींमध्ये जनता विरुद्ध राजकीय सत्ता यांचा संघर्ष निर्माण झाला. भारतामध्ये झालेले राजकीय सत्तासंक्रमण शांततेच्या, अहिंसेच्या मार्गाने झाले असले, तरी त्यात जनतेने आक्रमक भूमिका घेतलीच. या जनतेच्या लढ्याचे नेतृत्व अखेर ज्या मोठ्या संघटनेने केले, तिच्याच हाती सत्तासंक्रमणाच्या वेळी राजकीय सत्तेची सूत्रे प्राप्त झाली. जनता पक्षाच्या सुमारे अडीच वर्षांच्या राजवटीचा मधला अपवाद सोडल्यास इंडियन नॅशनल काँग्रेस हीच संविधान समितीच्या स्थापनेपासून राजकीय पक्ष या नात्याने गेली ३६ वर्षे केंद्रसत्तेच्या ठिकाणी विराजमान झाली आहे. शासकीय क्षेत्राच्या बाहेर दीर्घकाळपर्यंत किंबहुना अनेक पिढ्या इंडियन नॅशनल काँग्रेसच्या नेतृत्वाखाली अगणित कार्यकर्ते जनतेत काम करीत राहिले म्हणूनच जनतेने त्यांच्या हाती वारंवार राजकीय सत्ता समर्पित केली. अलीकडे आता अशा, जनतेमध्ये कार्य करणाऱ्यांची संख्या फारच रोडावत चालली आहे.

संसदीय लोकशाहीची विचारस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य आणि संघटनास्वातंत्र्य या तीन स्वातंत्र्यांवर श्रद्धा असते, कारण जीवनातील सत्य स्वतंत्रपणे केलेल्या विचार-विनिमयाशिवाय सापडू शकत नाही. संपूर्ण सत्य कधीच सापडत नाही. म्हणून सत्य हे व्यक्तीने, समुदायांनी संघटनांनी, संस्थांनी सतत शोधणे योग्य ठरते. सत्तापिपासू सत्ताधाऱ्याला वाटू लागते की, आपल्याला सत्य सापडले आहे म्हणून सत्तेच्या बाहेर असलेल्याला

धमकावण्याचा प्रयत्न तो करीत असतो. सत्ताधाऱ्याला सत्य सापडले की नाही याचा निर्णय अखेर सत्ताधाऱ्याच्या कृतीवरून सार्वभौम सत्तेचा अधिकार असलेली जनता निवडणुकांच्या पर्वणीमध्ये लावते. कारण उघड आहे. सत्य हे आचरणाच्या कसोटीवरच अखेर निश्चितपणे प्रत्ययास येते. म्हणून सत्ताधारी बदलण्याचा अधिकार लोकशाही पद्धतीमध्ये जनतेला प्राप्त झालेला असतो. निरनिराळे राजकीय पक्ष-उपपक्ष आपापली विचारसरणी, ध्येयधोरण व ध्येयधोरणावर आधारलेला कार्यक्रम ठरवून सामाजिक जीवनामध्ये वावरत असतात. त्यांना विचार, प्रचार व संघटनास्वातंत्र्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो.

लोकांच्या राजकीय शिक्षणावरच लोकशाहीचे भवितव्य ठरत असते. बुद्धिप्रामाण्यवादी शिक्षणामुळे राजकीयदृष्ट्या समंजस झालेला नागरिकच लोकशाहीचे खरे अधिष्ठान बनू शकतो. म्हणून लोकशाहीवर व मानवी मूलभूत मूल्यांवर निष्ठा असलेल्या राजकीय पक्षाचे लोकशिक्षण देऊन लोक जागृती करणे आणि लोकांना स्वतःचे मूलभूत हक्क सांभाळण्याचे शिक्षण देणे हे कर्तव्य ठरते. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही संस्थांचा भारतात सतत विस्तार होत गेला आहे. हा विस्तार होत असताना अनेक राजकीय पक्षोपपक्षांचाही विस्तार झाला, स्थित्यंतरे झाली व होत आहेत. डावे-उजवे आणि मधले असे राजकीय पक्ष उत्पन्न होत आहेत, बदलत आहेत. परंतु निरोगी व समर्थ लोकशाही दृढमूल होण्याच्या दृष्टीने प्रगती होत आहे की नाही, याबद्दल दिवसेंदिवस चिंताजनक परिस्थिती निर्माण होत आहे. लोकशाही राज्यपद्धतीला आवश्यक असलेला लोकशाही जीवनपद्धतीचा सामाजिक पाया निर्माण होत आहे की नाही हा प्रश्न भेडसावू लागला आहे. जुने व नवे अनेक धोके डोकी वर काढत आहेत.

भारताच्या संविधानाप्रमाणे इहवादी धर्मनिरपेक्ष सार्वत्रिक शिक्षण दिले जात आहे. या शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, समरस राष्ट्रीय समाजरचना हे आहे. परंतु ब्रिटिश काळात जो शिक्षणाचा पाया रचला गेला आणि धोरण आखले गेले, त्याच्यात मौलिक बदल झालेला नाही. उलट शिक्षणाचा गुणात्मक कसही घसरला आहे. १९५०-५१ साली ५४२ महाविद्यालये होती. १९७६-७७ साली ती ३२५३ झाली. १९५०-५१ मध्ये २७ विद्यापीठे होती, १९७६-७७ सुमाराला ती १०५ झाली. त्यामानाने विद्यार्थ्यांची संख्यांही विस्तारली. आज ५० हजारापेक्षा अधिक प्राथमिक शाळा, ७ कोटीपेक्षा अधिक त्यात विद्यार्थी आहेत. लाखापेक्षा अधिक माध्यमिक विद्यालये, २ कोटीपेक्षा अधिक विद्यार्थी त्यात आहेत. सुमारे ५५ हजार उच्च माध्यमिक विद्यालये आहेत आणि त्यात १ कोटीपेक्षा अधिक विद्यार्थी आहेत. इतका हा सगळा शिक्षणसंस्थांचा विस्तार होत असूनही एकंदरीत निरक्षरांची संख्या त्यामानाने कमी होत नाही. सुमारे ७५ टक्के निरक्षर स्त्रिया आहेत आणि ६० टक्के निरक्षर पुरुष आहेत. लक्षावधी सुशिक्षित बेकार नोकरीची भिक्षा मागत जिकडेतिकडे हिंडताना आढळतात. कार्यक्षमता व स्वावलंबन निर्माण व्हावे म्हणून शिक्षणाची पद्धती आमूलाग्र

बदलण्यास व नवी बनविण्यास अजून शासनाला यश येत नाही. म्हणून आर्थिक प्रश्न गेल्या २५ वर्षाच्या नियोजनानंतरही अधिक कठीण बनत आहे. आर्थिक जीवन आणि शिक्षण यांचा योग्य समन्वयच अजून साधलेला नाही.

## नियोजनातील काळे-गोरे

गेल्या २५ वर्षांच्या नियोजनानंतर भारताचे जे आर्थिक चित्र निर्माण झालेले दिसते ते फारसे आशादायक नाही. एका बाजूला आर्थिक वाढ, धंद्यांचा व उद्योगांचा विस्तार एकदम मनात भरतो, जगातील औद्योगिक क्रांती झालेल्या देशांच्या तुलनेने तंत्रज्ञ, उद्योजक, आणि कारागीर यांची संख्या आकर्षक वाटते. परंतु दुसऱ्या बाजूला फलनिष्पत्ती मात्र नाऊमेद करते. भारत सरकारचा नियोजन आयोगाचा प्रबंध पहावा, तो म्हणतो- 'गेल्या २५ वर्षांच्या अवधीत परंपरागत खुरटलेली आणि परावलंबी अर्थव्यवस्था बदलून नवीन, आधुनिक, स्वावलंबी अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे, ही योग्य अभिमानाची गोष्ट मानली पाहिजे' शेतीचे उत्पन्न वाढीस लागले आहे. विशेषत: अन्नधान्यांच्या बाबतीत जवळजवळ स्वावलंबन प्राप्त झाले आहे. परंतु गेल्या तीन वर्षांत देशाबाहेरून पुनः अन्नधान्याची आयात करावी लागत आहे. त्यामुळे मन अस्वस्थ होत आहे. माणशी अन्नाचा पुरवठा वाढला आहे. भारताची औद्योगिक क्षमता विविध स्वरूपात प्रकट होत आहे, विस्तारत आहे. याचे दर्शक नवे शेकडो मोठे उद्योग व हजारो मध्यम उद्योग अस्तित्वात आले आहेत. ही उद्योगांची वाढ सतत ठेवणेही शक्य झाले आहे. उदा. कपडा, अन्नप्रक्रिया, सिमेंट, रसायने, धातू आणि अभियांत्रिकीसंबंधी उद्योग, वाहतूक यांची वाढ धिमेपणाने सुरक्षितपणे चालावी, अशा तरतुदी केल्या जात आहेत. आयातीचे प्रमाण शक्यतो कमी करण्यात येऊ लागले आहे. बँकव्यवहार, विमायोजना, व्यापार आणि वाहतूक या बाबतीत प्रगती निश्चितपणे होत आहे. जनतेचा आयुर्दायही वाढला आहे. या शतकाच्या पूर्वार्धात सरासरी वयोमान ३२ होते, ते आता ४६ च्या पुढे गेले आहे.

ह्या आशादायक बाजूपेक्षा निराशादायक बाजू अधिक मोठी आहे. सार्वजनिक व खाजगी उद्योगधंद्यांमध्ये उधळ-माधळ, अकुशलता आणि अकार्यक्षमता फार दिसून येते. बेकारीचे प्रमाण तर दिवसेंदिवस वाढतच आहे. बेकारीला मर्यादाच घालणे कठीण आहे. भारतसरकारचा नियोजन आयोगाचा प्रबंध म्हणतो. 'माणसाला प्रतिदिन किती अत्यावश्यक अन्नांश लागतो याचा विचार केला असताना लक्षात येते की, १९७७-७८ ला ४८ टक्के ग्रामीण लोक आणि ४१ टक्के नागर लोक दारिद्र्यरेषेखाली जगत होते. या व्याख्येप्रमाणे जवळजवळ २९ कोटी लोक दैन्यात सापडलेले आढळले. त्यातील ७७ टक्के दारिद्र्यरेषेखाली कायम रुतलेले दिसतात.'

कोणत्या उद्योगांना किंवा उत्पादक व्यवसायांना सामाजिक गरजांच्या दृष्टीने अग्रहक्क द्यावे आणि कोणत्या उद्योगांना वा उत्पादक व्यवसायांना खालच्या क्रमात स्थान द्यावे,

या संबंधीचे पक्के धोरण भारतीय नियोजनपद्धतीला अंमलात आणणे शक्य झाले नाही. सामाजिक जीवनाच्या प्राथमिक गरजा किंवा अपरिहार्य गरजा निर्माण करणाऱ्या उद्योगांना प्राधान्य देऊन जास्तीत जास्त उत्पादन करून सामान्य माणसांना परवडेल अशा भावात पुरवठा करणे हे काही भारतीय आर्थिक नियोजनपद्धतीला अजून तरी जमले नाही. स्वतः नियोजन आयोगप्रबंध दाखवून देतो :- "शेकडा ३० टक्के असलेल्या उच्च मिळकतवाल्या वर्गीयांच्या जीवनमानाचा स्तर उंचावून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तो सुरक्षित ठेवण्याकरता उपलब्ध साधनसामुग्रीचा जास्त मोठा भाग अविचाराने गुंतविला जातो. एका लहानशा उच्च वर्गाच्या चैनीच्या राहणीकरता वरच्या दर्जाची इमारतबांधणी, नागरिक सुखसोयी, प्रवासाच्या आणि यात्रेच्या विमानासह उच्च दर्जाच्या साधनांचा पुरवठा, टेलिफोन सेवा इत्यादिंकरिता हल्लीच्या उद्योगरचनेचा मोठा भाग सुरक्षितपणे सांभाळला आहे." दैन्यात जगणारे जनतेचे मोठे स्तर, शेतमजूर, अल्पजमीनधारक शेतकरी, हस्तोद्योगी, हरिजन, गिरिजन, भटक्या जमाती यांच्याकरिता ध्यानात भरण्यासारखे असे काहीही केले जात नाही. आसरा, प्राथमिक शिक्षण, पिण्याचे व धुण्याचे पाणी, सुगम रस्ते वगैरे सोयी बऱ्याच प्रमाणात दुर्लक्षिल्या जातात. वरचा ३० टक्के असलेला समाजाचा गट सबंध समाजाच्या दैन्याकडे पाठ करून आरामात रहात आहे. भोवती झोपडपट्ट्यांच्या रांगा आणि मधून दिसणाऱ्या आलिशान इमारती हे दृश्य देशाच्या भवितव्याबद्दल निराश करीत आहे. वरच्या वर्गाच्या सुखसोयींच्या उद्योगांतील भरभराटीला एकदम धोका पोचण्याचा संभव अशा परिस्थितीत कायम राहतो, तो उद्योगसमूहच अखेरीस कोलमडतो.

## अंतर्गत विरोध

भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपण या भारतीय क्रांतीला एक अपूर्व ऐतिहासिक घटना म्हणून निर्दिष्ट करीत होतो. साम्यवादी क्रांतीच्या देशांमध्ये सामाजिक न्याय स्थापन करण्याचे प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाले. परंतु त्या ठिकाणी व्यक्तिस्वातंत्र्याला वाव राहिला नाही. एकोणिसाव्या शतकात नागरिकांना मर्यादित संख्येत मतदानाच्या हक्काची सवलत देणारी अनेक मोठमोठी पश्चिमी राष्ट्रे प्राथमिक संस्थांच्या विकासाने संपन्न झाली. त्याबरोबरच सामाजिक न्यायही कार्यान्वित झाला. तेथे मतदानाचा हक्क एकदम इतका व्यापक नव्हता. तो हळूहळू विस्तारत गेला. भारताची गोष्ट या सगळयांपेक्षा वेगळी आहे. येथे वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क स्वराज्यप्राप्तीच्या क्षणीच प्राप्त झाला. भारताने जो मार्ग आक्रमण्यास प्रारंभ केला तो म्हणजे सामाजिक न्याय आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या समन्वयाचा मार्ग होय. ३३ वर्षे होऊन गेली. आता धोके अधिक उग्र रूप धारण करू लागले आहेत.

येथे लोकशाही स्वातंत्र्य असल्यामुळे राजकीय विविध शक्तींना मोकळे मैदान मिळाले आहे. या राजकीय शक्ती निरनिराळ्या हितसंबंधांच्या प्रतिनिधीभूत आहेत. निरनिराळ्या

ध्येयवादांच्या धोरणाने राजकीय संघर्ष चालवीत आहेत. विविध सामाजिक गटांच्या व पक्षांच्या स्पर्धेचे राजकारण चालू आहे. सामान्यपणे समाजरचना परंपरागत मध्ययुगीन मूल्यांच्या आधारावर अधिष्ठित आहे. एक प्रकारची अधिकारशाही विचारसरणी या समाजरचनेच्या मुळाशी आहे. त्यामुळे ही संसदीय लोकशाही आणि परंपरागत समाजरचना यांच्यातील अंतर्विरोध या राजकीय लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आणण्याची शक्यता आहे.

जन्मसिद्ध जातीभेदाची उच्च-नीच भावमूलक रचना आणि त्या रचनेचेच अत्यंत हीन स्वरुप म्हणजे शेकडो अस्पृश्य किंवा दलित जमाती ! हे बदलून मानवी समानतेच्या तत्त्वावर याची रचना व्हावी या दृष्टीने भारताचे संविधान म्हणजे मूलभूत कायदा तयार झाला आणि त्यानंतर आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास संमती देणारा कायदा झाला. अस्पृश्यता नष्ट झाली आहे असे संविधानाने उद्घोषित केले आहे. यास प्रतिकूल असा विचार राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा मुमूर्षु वर्णाश्रम स्वराज्य संघ यांचा अपवाद सोडल्यास स्वातंत्र्योत्तर कालात कोणत्याही राजकीय किंवा सांस्कृतिक संघटनेने व्यक्त केला नव्हता. विशेषत: जे भिन्नभिन्न जातींचे गट व त्यांचे सदस्य असलेले नागरिक जातिभेद मनापासून पाळतात आणि अस्पृश्यताही तशीच पाळतात, त्यांनी कधीही या वर निर्दिष्ट केलेल्या समाजसुधारणेच्या कायद्यांना आतापर्यंत सभा संमेलनांमध्ये वैचारिक विरोध दर्शविलेला नाही. परंतु या प्रतिगामी शक्ती मुकाट्याने म्हणजे मौन धारण करून समाजसुधारणेचा व अस्पृश्यतानिवारणाचा कृतीने पराकाष्ठेचा प्रतिकार करत आहेत. असे एक प्रदेशराज्य नाही की जेथे मधूनमधून वारंवार हरिजनांचा वा दलितांचा छळ होत नाही. असा एक गाव, वा अर्धा तालुका या देशात आढळणार नाही की जेथे स्पृश्य व अस्पृश्यांची वस्ती अस्पृश्यता नष्ट करण्याच्या उद्देशाने एकमेकात सरमिसळीने निर्माण झालेली आहे. गाव कुसवाबाहेरच्या अस्पृश्य वस्ती स्वातंत्र्य प्राप्त होऊन ३६ वर्षे झाली तरी जशाच्या तशा वेगळया आहेत. अस्पृश्यांना सर्वत्र स्पृश्यांच्य मेहेरनजरेखालीच जीवन जगावे लागत आहे. त्या त्या लोकवस्तीतील स्पृश्यांची संमती नसेल तर अस्पृश्य हे तसेच बहिष्कृत व दलित अवस्थेतच जगण्याकरता धडपडत आहेत आणि यासंबंधात या देशातला कोणताही राजकीय पक्ष किंवा त्याचे महत्त्वाचे कार्यकर्ते ग्रामपरिवर्तनाचा आणि सामाजिक समरसता निर्माण करण्याचा विधायक धडाक्याचा कार्यक्रम व्यापक प्रमाणात अंमलात आणत नाहीत, ही गोष्ट स्पष्ट आहे. सर्व सेवा संघाचे लोक हे गाईबैलांचा बचाव करण्याकरिता सत्याग्रह व उपवास करण्यास निरंतर सज्ज आहेत परंतु अस्पृश्यतेच्या उच्छादनाचा मानवधर्म स्थापित करण्याकरिता त्यांच्या पदयात्रा निघत नाहीत. हा सगळयात सामाजिकदृष्ट्या जिव्हाळयाचा प्रश्न; स्पृश्यांच्या मदतीवर अवलंबून असलेले राजकीय पक्ष तिकडे दुर्लक्ष करीत आहेत. या अस्पृश्यतेचा आणि वेठबिगारीचा झाकलेला म्हणजे प्रच्छन्न संबंध आहे. हा लक्षात

घेतला म्हणजे आर्थिक शोषण हे त्याचे स्वरुपही लक्षात येते. पाप-पुण्याची अंधश्रद्धामूलक कल्पनाही या अस्पृश्यतेच्या मुळाशी आहे. त्यावर अंधश्रद्धा नष्ट करणारे बुद्धीप्रामाण्यवादी शिक्षण हाच एक महत्त्वाचा उपाय म्हणून दिसून येतो.

## केवळ भाषेचे भूषण

ज्या ज्या राजकीय पक्षांची लोकशाही मूल्यांवर निष्ठा आहे, त्यांना ग्रामपंचायतीपर्यंत आपल्या कार्यकर्त्यांना पाठविता येणे शक्य आहे, तेच ग्रामपंचायतीस सामाजिक परिवर्तनाचा आणि सामाजिक क्रांतीचा कार्यक्रम शिकवू शकतात. त्याला आर्थिक नियोजनाच्या कार्यक्रमाचीही जोड देणे जरूर आहे. सामाजिक परिवर्तन हे केवळ वैचारिक शिक्षणाने घडू शकणार नाही. त्याकरिता आर्थिक जीवन बदलण्याचा कार्यक्रम त्याबरोबर कार्यवाहीत आणला पाहिजे. या सगळ्या भारतीय ग्रामीण जातीजमाती एका अर्थव्यवस्थेचे भाग आहेत. ती अर्थव्यवस्था बदलण्याचा कार्यक्रम अंमलात आणत असतानाच नवा विचारही शिकविता येतो.

येथील आर्थिक नियोजनामध्ये निरनिराळे उद्योग कशायोग्य क्रमाने, तारतम्याने वाढवायचे यासंबंधाच्या तात्त्विक ध्येयवादी धोरणाला उच्चवर्गीय व उच्चस्तरीय हितसंबंध बाधक ठरत आहेत. त्यामुळे इथल्या लोकशाही संस्था अकार्यक्षम बनून केवळ बाह्यात्कारी बनत चालल्या आहेत. म्हणून सर्वांगीण आर्थिक विकासाला फार महत्त्वाच्या मर्यादा पडत आहेत. येथील सामाजिक न्याय हा आर्थिक दुरवस्थेमुळे दुरावला गेला आहे, केवळ भाषणाचे भूषण बनला आहे. येथे दारिद्र्यरेषेखाली जगणारा ४० टक्के समाज हा असंघटित राहिल्यामुळे तो मुका राहिला आहे. त्याला व्यक्तिस्वातंत्र्याचा म्हणजे प्रचार व विचारस्वातंत्र्य याचा यत्किंचितही उपयोग नाही. त्याचे हे स्वातंत्र्य पोकळ आहे. फार मोठा समाज आज सगळ्या प्रकारच्या प्रत्यक्ष मूर्तिमंत स्वातंत्र्यापासून वंचित झाला आहे. म्हणून ही संसदीय लोकशाही निर्बळ बनण्याचा सगळयात मोठा धोका निर्माण झाला आहे.

## राजकीय साधनांची जडण घडण

राष्ट्रव्यापी राजकीय पक्षाची अवनती वेगाने सुरू झाली आहे. १९७७ साली जनता पक्षाची केंद्रसत्ता स्थापन झाली. ती संघटनाच तकलादू असल्यामुळे अडीच वर्षांच्या अवधीत तिची कारकीर्द संपली. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली १९८० च्या जानेवारीत काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेवर आला. त्याला गेल्या १९८३ च्या ५ जानेवारीला एक अभूतपूर्व धक्का बसला. आंध्र आणि कर्नाटकमध्ये ३३ वर्षे काँग्रेसची सत्ता टिकली होती. ती ढासळली. दक्षिणेकडे तामिळनाडूमध्ये प्रांतवादी पक्ष दीर्घकाळ सत्तारुढ झाला आहे. केरळमध्ये काँग्रेस कधीच स्थिरावली नाही. आता आसाम व पंजाबमध्ये प्रांतवादी बंड सुरू आहे. काँग्रेसच्या प्रदेशवार व केंद्रवर्ती संघटनेच्या रीतसर होणाऱ्या निवडणुका गेली

११ वर्षे स्थगित झाल्यामुळे निरनिराळया स्तरावरची निवडून आलेल्या पक्षप्रतिनिधींची व कार्यकर्त्यांची मंडळे इत्यादी प्रकारची जी वर्षानुवर्षे चालत आलेली व्यवस्था होती ती आता ढासळली आहे. काँग्रेसच्या ध्येयवादावर व कार्यक्रमावर निष्ठा किती आहे हा प्रश्न महत्त्वाचा राहिला नाही. इंदिरानिष्ठा हा निकष मानला जाऊ लागला आहे. परंतु हा निकष वस्तुतः फार थोड्यांच्या मनात अस्तित्वात असू शकतो. इंदिरा गांधींच्या सत्ताशाही वलयाचे ते आकर्षण आहे, व्यक्तीच्या विशिष्ट प्रतिमेचे ते आकर्षण आहे; व्यक्ती कायम बाजूला झाली तर राजकीय पक्षाच्या अस्तित्वाचा आधारच गेला असा होईल; विशिष्ट व्यक्तींच्या अभावीही टिकून राहण्याची हमी प्रत्यक्ष सामाजिक संघटनेच्या गाभ्यात असणे ही गोष्ट तिची निरंतर उपयुक्तता शाबीत करते. खालपासून वरच्या स्तरापर्यंत जे कांग्रेसजन जमलेले आहेत, त्यांच्यात परस्परांचे ध्येयवादामुळे उत्पन्न होणारे प्रेम वा सहकार्याची भावना नसेल तर पक्षाला अस्तित्व नाही, असे म्हणावे लागते. ही ध्येयवादी सहकार्याची शक्ती परस्परांच्या बंधुप्रेमानेच कार्यप्रवर्तक होत असते. आज काँग्रेसमध्ये दिसतात ते यादव दिसतात. अशां स्थितीत दीर्घकाल टिकलेला दुसरा देशव्यापी पक्ष या देशात स्थिरावलेला दिसत नाही. काँग्रेस पक्ष हा आतून विदीर्ण झालेला. त्यामुळे देशव्यापी पर्यायी पक्षाच्या अभावी केंद्रीय संसदीय सत्तेला भावी दिवस कसे येतील याबद्दल मन साशंक होते.

केंद्रसत्ता मजबूत रहावी हा सिद्धांत भारताच्या राष्ट्रीय एकतेच्या दृष्टीने अत्यंत इष्ट असा सिद्धांत आहे. परंतु प्रादेशिक राज्ये ही अधिक स्वावलंबी होऊन मजबूत झाली तर केंद्र हे दुबळे होऊ लागेल, हे अनुमान मात्र निःसंशय चुकीचे आहे. खालच्या स्तरांच्या मजबुतीवरच वरच्या स्तराची मजबुती अवलंबून असते. हीच गोष्ट प्रादेशिक राज्यांनाही लागू आहे. जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, नगरपरिषदा हे खालखालचे स्तर मजबूत असले तरच प्रदेश राज्ये सामर्थ्यशाली राहू शकतात.

आज असे अनेक राजकीय पक्ष या देशात आहेत की त्यांना प्रादेशिक राज्यासारखे स्तर दुबळे राहिले तरच केंद्राची मजबूती साधता येते असे वाटते. हे राजकीय पक्ष अशा प्रकारच्या मोठ्या भयंकर भ्रमात सापडलेले आहेत. या भ्रमामुळे प्रादेशिक राज्ये विरुद्ध केंद्रीय राज्यसत्ता यांचा विग्रह वाढीस लागेल. या संदर्भात हेही लक्षात ठेवले पाहिजे की भारतातील प्रादेशिक राज्ये ही प्रकृतितः, स्वभावतः एकेक राष्ट्र बनण्याच्याच योग्यतेची आहेत. परंतु या विसाव्या शतकातील दूरध्वनी, तारायंत्रे, बिनतारायंत्रे, दूरदूर प्रदेशात पोचणारी दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्रे, दळणवळणाची अन्य वेगवान साधने यांच्यामुळे भारताची स्वातंत्र्याची चळवळ सर्वव्यापी व एकमुखी बनली. भिन्न भिन्न भाषिक प्रदेश एका परकीय सार्वभौम सत्तेखाली आली त्याचा परिणाम भारत हे एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले. हे सर्व विचारात घेतले तर लक्षात येईल की, भारताची केंद्रवर्ती सत्ता ही प्रादेशिक राज्यांच्या स्वायत्ततेवरच टिकू शकेल. प्रांतिक स्वायत्ततेतून विभक्त होण्याची

प्रवृत्ती वाढण्याचा धोका आज नाही. हा धोका त्यांची केंद्रपरावलंबित. वाढीस लागल्यानेच वाढू शकेल. आर्थिकदृष्ट्या सगळी भारतीय प्रादेशिक राज्ये ही परस्परसहकार्याने विकास करू शकतील आणि हे परस्परसहकार्य साधणारी महत्त्वाची राजकीय यंत्रणा म्हणजे केंद्रवर्ती संघराज्य होय.

**(• केशव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगाव (प), मुंबई- ४०००६२.
दि. २ फेब्रुवारी, १९८३.)**

❍❍❍

64

# भारतीय संस्कृति और भारतीय राष्ट्रीयता का निर्माण

इसमें संदेह नहीं कि भारतीय संस्कृति की रचना का विशाल चित्र इन दो खंडों के महान समर्थ चिंतक विद्वानों के लेखों द्वारा बारीकी से पाठकों के विचक्षण मनःचक्षु के सामने गोचर होगा। इसी महान संस्कृति के ऐतिहासिक अधिष्ठान पर भारतीय राष्ट्रीयता प्रकट हुई है। भारत राष्ट्र की निर्मिति को प्रक्रिया समझने के लिए इस संस्कृति के सुंदर और महान चित्रका अंतःकरण में प्रतिबिंबित होना आवश्यक है।

अंग्रेज साम्राज्य के बंधनों के जकडने पर भारत राष्ट्र की निर्मिति और गठन प्रारंभ हुआ। इसके पहले ज्ञात इतिहासकाल में समग्र भारत कभी एक सार्वभौम छत्र के नीचे नहीं आया था। लेकिन वेदकाल से यह इच्छा व्यक्त होती रही है कि समग्र भारत एक छत्र के नीचे आ जाय। यद्यपि ऐतरीय ब्राह्मण में ऐसा निर्देश आया है कि मरुत्त सम्राट समुद्र तक पृथ्वि का ईश था। लेकिन यह कहना कठिन है उसे ऐतिहासिक घटना कहे या न कहे। कौटिलीय अर्थशास्त्र में विजिगीषु राजा के विक्रमण का क्षेत्र समग्र भारत बताया गया है। "देश: पृथिवी तस्यां हिमवत्समुद्रान्तरमुदीचीनं योजनसहस्त्रपरिमाणं तिर्यक् चक्रवर्तिक्षेत्रम्" (९।१).

अंग्रेजी सत्ता की स्थापना के बाद तुरंत ही उन्नीसवी सदी के उत्तरार्ध में आधुनिक पश्चिमी शिक्षा के कारण सुसंस्कृत बने कुछ भारतीय इस बात का विचार करने लगे कि राज्यव्यवस्था किस तरह की हो। अंग्रेजी राज्यव्यवस्था और शासनपद्धति के गुणों के साथ उनके ध्यान में दोष भी आने लगे। अपनी समाजव्यवस्था, अपने सामाज कि रस्मोरिवाज, रूढिनिष्ठ तथा अंधश्रद्धा से ग्रस्त सामाजिक मन उनकी समझ में आ गया। इससे यह भी समझ में आ गया कि यहाँ की सामाजिक संस्थाएँ धार्मिक अंधश्रद्धा के बंधनों से जकडी जाने के कारण संपूर्ण समाज कमजोर होकर आर्थिक दृष्टि से विपन्न अवस्था में जी रहा है। पश्चिमी संस्कृति के संपर्क के कारण नये सामाजिक प्रबोधन की आवश्यकता महसूस होने लगी। यहाँ के मनुष्य को उच्च, मध्यम और निम्न स्तर के समाज को भारत के बाहर का विश्व अज्ञात था। वह

विशाल विश्व एकदम पूर्ण प्रकाश में आकर प्रारंभ में कुछ शिक्षितों को दृष्टि में आने लगा। यहाँ के आधुनिक विद्याविभूषित कुछ तत्त्वचिंतकों ने और समाज सुधारकों ने अपने संपूर्ण अधःपतन की मीमांसा प्रारंभ की।

धार्मिक, सामाजिक और राजनीतिक इस प्रकार तीनों सांस्कृतिक क्षेत्रों में नये विचारों की प्रेरणाओं का उन्मेष होने लगा। इसाई- धर्मप्रचारक इसाई सत्ताधारियों की सहायता से यहाँ के हिंदु धर्म और विशेषतः मूर्तिपूजा की तीव्र आलोचना करने लगे जिससे धर्मविषयक अनुकूल-प्रतिकूल चर्चा प्रखर रूप में होने लगी। इससे भारत में हिंदु, मुस्लिम, ईसाई, बौद्ध आदि धर्मों की अनुकूल- प्रतिकूल चर्चा होने लगी। कई भारतीय श्रेष्ठ प्रज्ञाशाली सज्जन इस सिद्धान्त तक पहुँचे :- विश्व के सभी धर्मों में कुछ एक अंतिम सत्य है अर्थात् वह एकेश्वरवाद निश्चित हुआ और अंतिम नैतिक मूल्यों को मानवी जीवन का सर्वव्यापी सर्वश्रेष्ठ आधार मानने का विचार निर्माण हुआ और यह तय हुआ कि विश्व के सभी धर्मों में सहकारिता के साथ जीने की प्रवृति निर्माण करने की आवश्यकता है। अत: सभी धर्मों का एक मंच धर्मों के विचारविनिमय के हेतु राजा राममोहन राय ने ब्राह्मसमाज रूप में स्थापित किया। भारत की एक राष्ट्रीयता की प्रेरणा का यह धार्मिक सूत्र बन गया। इस सर्वधर्म समन्वय के सिद्धांत का स्वीकार करनेवाले द्रष्टा के रूप में राजाराम मोहन राय, रवींद्रनाथ ठाकूर और महात्मा गांधी जैसे महान् पुरुष क्रमश: निर्माण हुए। सर्वधर्मसमन्वय के सिद्धांत के मूल में यह माना गया है कि भारत में जितने उच्च स्तरपर हिंदु, ईसाई, मुसलमान आदि धर्म है और उन धर्मोपर अधिष्ठित समाज संस्थाए हैं, उनके परस्पर असंगत और विग्रह नष्ट कर, ये विभिन्न धार्मिक समाज एक इहवादी राज्यसंस्था के अर्थात राष्ट्र के अविभाज्य घटक बनें।

भारत के इहवादी राष्ट्रीयत्व की नींव डालने का काम धर्मनिरपेक्ष आधुनिक शिक्षा ने प्रारंभ किया। इसका हेतु यह माना गया कि यहाँ के प्रत्येक नागरिक को आधुनिक उदार शिक्षा से समान नागरिक के रूप में स्वावलंबी जीवन पद्धति का निर्माण करने का अवसर मिले। इस शिक्षा का मूल उद्देश्य यह था कि प्रधानत: परंपरागत अंधश्रद्धाओं का नाश होकर विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टि का निर्माण हो। आधुनिक विश्व में सामान्यतः यह शिक्षा एकही प्रकार की है। खगोल, भूगोल, तंत्रज्ञान, वैद्यक, शरीरविज्ञान, पदार्थविज्ञान, रसायन, वनस्पतिसृष्टि, प्राणीसृष्टि आदिविज्ञानों को सभी राष्ट्रों में समान रूप से मान्यता प्राप्त हुई है। समाजविज्ञान, मानसविज्ञान, राज्यशास्त्र, कानून आदि विषयों को भी सभी राष्ट्रों में कुछ हदतक समान मान्यता प्राप्त हुई है। यहाँ आधुनिक शिक्षा के कारण सामाजिक परिवर्तन की प्रक्रिया प्रारंभ हुई। इससे यह प्रतीति होने लगा कि स्त्रियों को पुरुषों के साथ तथा दलित वर्गों और शूद्रों को उच्च वर्गों के साथ समान हक मिलने चाहिए। स्त्री शिक्षा का प्रश्न स्त्रियों के पारिवारिक और सामाजिक स्थान से जुड़ा होने के कारण उन्हें बंधमुक्त कराने की दृष्टि से सामाजिक सुधार के आंदोलन शुरू हुए। सती की प्रथा बंद हुई, स्त्रियों के पुनर्विवाह के हक को सार्वत्रिक

मान्यता प्राप्त हुई, संबंधविच्छेद के कानून को मान्यता मिली और स्त्रियों का संपत्ति पर उत्तराधिकार विस्तृत हुआ। स्त्रीपुरुषों के विवाह की मर्यादा बढ़ाकर बालविवाह बंद हुए। अस्पृश्यतानिवारण के आंदोलन का प्रारंभ होकर उस संबंधी संघर्ष तीव्र हुआ। आंतरजातीय विवाह तथा भिन्नधर्मीय विवाह को कानून की अनुमति प्राप्त हुई। इस प्रकार अनेक पहलुओं से सामाजिक परिवर्तन और सुधार की प्रक्रिया धीरे धीरे शुरू हुई।

अठारह सौ सतावन के स्वतंत्रता आंदोलन के बाद उन्नीसवीं शताब्दी के अंतिम तीस वर्षों में अंग्रेजी राजसत्ता को ललकारा जाने लगा। नागरिकों के हक का प्रश्न महत्त्वपूर्ण बना। अंग्रेजी राजनीतिक रवैये में साम्राज्यवादी शोषणका जो प्रधान सूत्र था उसकी ओर यहाँ के राजनीतिक और सामाजिक तत्त्वचिंत कों का ध्यान केंद्रित होने लगा। इस बातको दादाभाई नवरोजी तथा अन्य भारतीय आर्थिक इतिहास के विद्वानों ने सिद्ध किया कि अंग्रेजी सत्ता कैसे यहाँ के उद्योग नष्ट करके व्यापा रद्वारा कैसे शोषण कर रही है जिससे यहाँ की दरिद्रता पराकाष्ठा पर पहुँची है। इसका स्पष्टीकरण करते हुए इस निर्णय तक वे आ पहुँचे कि स्वराज्य के बिना इस राष्ट्र के प्रश्न हल नहीं हो सकते। इस निर्णय के प्रभाव में तीन प्रकारके राजनीतिक पक्ष निर्माण हुए; एक पक्ष वह बना जो अंग्रेजी राज्यकर्ताओं के उदारमतवादी राजनीतिक तत्त्वज्ञान पर भरोसा कर उन्हें यहाँ की परिस्थिति को समझाकर जनता की मांग उनके सामने रखकर उनका मतपरिवर्तन करने की अपेक्षा करता रहा। उसका नाम नेमस्त पक्ष। उनका प्रधान आदर्शवादी नेता गोपालकृष्ण गोखले थे। दूसरा पक्ष बिलकुल दूसरे सीरे पर जाकर इस निश्चय से पक्ष संघटन करने लगा कि सशस्त्र क्रांति के बिना यह पारतंत्र्य नष्ट नहीं होगा। तीसरा मध्यम मार्गीय पक्ष था, प्रचलित कानून की मर्यादा का यथासंभव उल्लंघन न करते हुए सामान्य जनता का आंदोलन निर्माण कर, जनता में असंतोष और क्षोभ पैदा कर स्वराज्य के आंदोलन की रचना करना यह उस पक्ष का उद्दिष्ट था। यह पक्ष विदेशी शासकों के राजनीतिक रवैये की प्रखर आलोचना करते हुए तथा जनता का संगठन करते हुए आंदोलन करने लगा। प्रारंभ में इसके सर्वश्रेष्ठ नेता लोकमान्य तिलक थे। सभी पक्षों में यह पक्ष सामान्य जनता की तह तक पहुंचा। इसी पक्ष को 'इंडियन नैशनल काँग्रेस' का रूप प्राप्त हुआ। पहले विश्वयुद्ध के बाद सन उन्नीस सौ अठारह के अनंतर महात्मा गांधी का नेतृत्व उदित हुआ और उन्होंने अहिंसात्मक लडाई का असहकार का, सामुदायिक सत्याग्रह का कार्यक्रम तैयार कर के देश में राष्ट्रव्यापी आंदोलन का निर्माण किया। इसका आधार प्राचीन आध्यात्मिक अहिंसक संस्कृति ही थी। यह निःशस्त्र प्रतिकार का आंदोलन था इसी कारण इसमें सभी स्तरों की और वर्गों की भारतीय महिलाएं शामिल हुई। सत्याग्रह तथा सविनय कानूनभंग के आंदोलन में लाखों महिलाओंने भाग लेकर कारावास तथा लाठीमार को सहा। इसलिए यह पीछड़ा हुआ देश होने पर भी किसी भी पाश्चात्त्य देश की अपेक्षा राजनीति में अधिक महिलाओं ने हाथ बटाना शुरू किया। उन्नीस सौ बीस से इक्कीस, उन्नीस सौ तीस

से बत्तीस और उन्नीससौ बयालीस से उन्नीस सौ पैंतालिस तक स्वातंत्र्य आंदोलन के तीन महत्त्वपूर्ण कालविभाग हैं अर्थात् एक के बाद एक देशव्यापी तूफानी आंदोलन के ये काल विभाग है। इसीसे दूसरे विश्वयुद्ध के अंत में अंग्रेजी सत्ताधारियों ने अपना साम्राज्य विसर्जित किया और भारत के स्वतंत्र हो जानेपर विश्व के पश्चिमी साम्राज्यवाद का अंत हुआ।

भारत के राष्ट्रीय निर्मिति की रचना प्रक्रिया में सर्वधर्मसमन्वय, इहवादी समाजपरिवर्तन, मूलभूत मानवी हक, सामाजिक न्याय, आर्थिक समता और प्रचारस्वातंत्र्य इन बातों को ध्यान में लेना पडता है। इसी अधिष्ठान पर संसदीय लोकतंत्र की स्थापना हुई है। उन घटकों को ध्यान में लेने से स्वतंत्र भारत के संविधान की या राज्यघटना की जयप्रकाश प्रोक्त समग्र सामाजिक क्रांति की ओर ले जानेवाली पृष्ठभूमि ध्यान में आती है। भारत के राष्ट्रवाद की मीमांसा करते समय यह धर्माधिष्ठित राष्ट्रवाद नहीं है या परंपरागत संस्कृतिनिष्ठ राष्ट्रवाद भी नहीं है वरन यह राष्ट्रवाद एक इहवादी, समतावादी, लोकतंत्र समाजवादी राष्ट्रनिर्मिति के उच्चत्तम उद्देश्य से सिद्ध हुआ राष्ट्रवाद है। यह हिंदुराष्ट्रवाद नहीं है क्योंकि वेद-स्मृति-पुराण आदि धर्मग्रंथों के आधा रपर जो समाजरचना यहाँ हजारो वर्षो से स्थित हुई है, जिसमें जन्मसिद्ध ऊँच नीच जातिभेद, स्पृश्यास्पृश्य जातिभेद चातुर्वण्य के तत्त्वों पर आधारित माने गये है उन्हें भारत के संविधान ने या राज्यघटना ने अप्रमाणित किया है। नागरिक के समान हकवाला तत्त्व ऊँच- नीच, स्पृश्यास्पृश्य जातिभेद के तत्त्व से मूलतः विरोधी है। परंपरागत हिंदुधर्मशास्त्र में स्त्री-पुरुषों की विषमता बतायी गयी है। स्त्रियों का संपत्ति का उत्तराधिकार बहुतही सीमित रखा है। हिंदुधर्म ने पुरुषों को अनेक विवाह करने की अनुमति दी है। यह सब स्त्री-पुरुष समानता के तत्त्व के विरुद्ध है। अगर मनस्मृति को मानना है तो उसके आधारपर हिंदु राष्ट्रवाद का निर्माण नहीं हो सकता क्योंकि समर्थ राष्ट्रीयत्व के लिए नागरिकों की समानता अपरिहार्य बात के रूप में स्वीकारनी ही होगी। मनुस्मृति माननेवालों को स्पर्शास्पर्श भेद मानना ही होगा। अतः भारत का संपूर्ण दलित समाज मनुस्मृतिनिष्ठ राष्ट्रवाद की सीमा में समाविष्ट हो नहीं सकता। शूद्रों को वेदाधिकार से इन्कारने वाली मनुस्मृति के हिंदु राष्ट्रवाद में भारत के सत्तर प्रतिशत हिंदु शूद्र समाज को हीन-नीच स्तर के नागरिक का ही स्थान मिलता है। हमें या तो धर्मनिरपेक्ष इहवादी राष्ट्रवाद को मानना चाहिए या हिंदु समाजकी दृढ एकता को भूल जाना चाहिए। यह हिंदु समाज ऐहिक मानवी समान अधिकारों के तत्त्वों पर ही समरस और एकात्मक बन सकता है।

सत्रहवीं शताब्दी में मैकियाव्हेली नामक राज्यशास्त्रज्ञ ने प्रथम राजनीतिक आदर्शवाद में राष्ट्रवाद के विचार का प्रतिपादन किया। इटली देश सैकडों गणराज्यों में और सरदारों के राज्यों में विभाजित हुआ था। मैकियाव्हेली उसे एक राष्ट्र के रूप में देखना चाहता था। उन्नीसवीं शताब्दी में काउंट काव्हूर, गॅरिबाल्डी और जोसेफ मैझिनी इन तीन देशप्रेमियों के नेतृत्व में इटालियन राष्ट्राभिमान पूर्ण आविष्कृत हुआ। यूरप और अमरिका में अठारवीं

शताब्दी से राष्ट्रीय राज्यों की अधिक विस्तार से निर्मिति और रचना हुई। तब यह तय हुआ कि विशिष्ट धर्म या विशिष्ट संस्कृति की अपेक्षा विशिष्ट सामाजिक गुट के लिए और उसकी राज्यव्यवस्था के प्रति आत्मीयता रखना राष्ट्रीय वृत्ति मानी गयी। नागरिकों के सामाजिक और राजनीतिक समान हितकी रक्षा करनेवाला विशिष्ट प्रादेशिक समाज ही राष्ट्र है। राष्ट्र की यह परिभाषा पूर्णतः न सही अधिकांश रूप में राष्ट्र के रूप में निर्मित यूरोप और अमरिका के देशोंपर लागू होती है। राष्ट्रवाद ऐहिक आदर्शवाद है। उसमें राजनीतिक और सामाजिक आशय है। विशिष्ट प्रादेशिक भाषिक समाज के राज्यसंस्था के लिए साधारणत: उस प्रदेश के स्त्री-पुरुष नागरिकों के मन में निष्ठा या भक्तिभाव रहता है। इस भक्तिभाव के कारण उस प्रदेश के बाहर के नागरिकों के संबंध में या लोगों के बारे में एक प्रकार की परायेपन की भावना उत्पन्न होती है। फिर वह विदेशी स्वधर्मीय हो तो भी उसके साथ राष्ट्रीय भावनायुक्त समरसता प्राप्त नहीं हो पाती। इस तरह का राजनीतिक ऐहिक आदर्शवाद अठारहवीं शताब्दी से अधिक मात्रा में जागतिक, राजनीतिक, ऐतिहासिक घटनाओं में स्पष्ट होने लगा। इस प्रकार की राजनीतिक अस्मिता की नींव अंग्रेजी साम्राज्यशाहीकी सत्ता के विरोध में भारत में निर्माण होने लगी। बीसवीं शताब्दी में राजनीतिक स्वतंत्रता के जनसंग्राम में उसकी परिणती हुई और भारत स्वतंत्र हुआ।

यूरोप का राष्ट्रवाद आक्रामक राष्ट्रवाद बना। यह पश्चिमी राष्ट्रवाद अठारहवीं शताब्दी से फैलता हुआ उन्नीसवीं शताब्दी में अनेक प्रकार के पश्चिमी साम्राज्यवादों के रूप में विश्व में विस्तृत होता गया और उस पश्चिमी साम्राज्यवादों के आर्थिक और राजनीतिक शोषण से मुक्त होने के लिए भारत जैसे देश प्रयत्न में लगे और उन्होंने पश्चिमी राष्ट्रवाद की अपेक्षा अलग राष्ट्रवाद को अपनाया। बीसवीं शताब्दी में इस पश्चिमी आक्रमक राष्ट्रवाद ने अधिक उग्र रूप धारण किये। इटली के मुसोलिनी का फॅसिझम और जर्मनी के हिटलर का नात्सिझम उसके भयानक रूप है।

हिटलर के नात्सिझम के अनुसार आर्यवंश विश्व भर आधिपत्य करने के लिए निर्माण हुआ है और अन्य राष्ट्रों को उस आर्यवंश की अधीनता में रहना होगा क्योंकि बुद्धिमत्ता का और प्रज्ञा का वास्तविक विकास आर्य मानव में ही होता है। इस सूत्र के आधार पर दूसरे महायुद्धमें विश्व आक्रमण का पैंतरा हिटलर के जर्मनी ने अपनाया। इटली के फॅसिझम के प्रधान प्रवक्ता मुसोलिनी का दृष्टिकोन ऐसा था कि व्यक्तिस्वातंत्र्य पर आधारित लोकतंत्र पद्धति राष्ट्र को कमजोर बनाती है; व्यक्ति राष्ट्र के लिए होता है; राष्ट्र के लिए ही उसे जीना या मरना चाहिए, इस प्रकार का अंतिम मानव आदर्श राज्यसंस्था या राजनीति क सामाजिक संस्थाओं में प्रकट होना चाहिए। हिटलर के नात्सीझम में यही तानाशाही आदर्शवाद बनाया है। युरोप के राष्ट्रवाद की दो भयानक प्रवृत्तियाँ - साम्राजवाद और तानाशाही मानवी इतिहास के आधुनिक युग में दिखाई पडीं।

भारत का राष्ट्रवाद विश्वमानवतावाद की दिशा में विकसित हो सकता है। भारतीय संविधान में उसका प्रतिबिंब देखने मिलता है। उसमें भारतीय विधि के मूल तत्त्वों के रूप में धर्मनिरपेक्षता और मूलभूत मानवी मूल्यों को स्वीकारा गया है। यूरोप के किसी भी राष्ट्र को देखें तो यह ध्यान में आता है कि वहां (संपूर्ण यूरप में) एक ही प्रधान धर्म अर्थात् इसाई धर्म है। दूसरे महायुद्ध के बाद पश्चिम एशिया में अनेक मुसलमान राष्ट्र निर्माण हुए। वहाँ इस्ला मही एक धर्म है। भारत में दुनिया के सभी धर्म और उसपर अधिष्ठित समाज नागरिकत्व के हक से टिके हैं। यूरोप के स्वित्झर्लंड और अमरिका के कनाडा को छोडकर दुनिया के प्राय: बडे और मध्यम राष्ट्र एक धर्म और एक भाषाके ही राष्ट्र है। तात्पर्य बीते तीन सौ वर्षों का राष्ट्रवाद का इतिहास देखने पर भारत ही एक ऐसा बड़ा राष्ट्र मिलता है जिसमें हिंदू, बौद्ध, जैन, इस्लाम, इसाई, यहुदी आदि धर्मोपर आधारित समाज समाविष्ट हुए हैं। यूरोप के एकेक बडे राष्ट्र जैसे विशाल चौदह भिन्न भाषिक प्रदेश इसी एक ही राष्ट्र में समाविष्ट हुए हैं। इस दृष्टिसे भारत यह राष्ट्र दुनिया की संस्कृति का और विश्वमानव समाज की समरसता का और एकात्मता का प्रयोग करनेवाली प्रयोगशाला बनी है। कहना पडता है कि भारत में भावी विश्वमानव समाजरचना की पूर्व तैयारी कैसे करें इसका प्रयोग शुरू हुआ है।

भारत के बाहर के मुस्लिम समाजों कों जागतिक मानवसमा जके परिवार में तदाकार होने के लिए उनका धर्मनिष्ठ राष्ट्रवाद ही महान बाधा बना है। पाकिस्तान की निर्मिति मुसलमानों के धर्मनिष्ठ राष्ट्रवाद के अभिमान से हुई है। कुल मिलाकर मुसलमान राष्ट्रों में परंपरागत मुस्लिम धर्मशास्त्र का गहरा प्रभाव पड रहा है और बढ रहा है। इसलिए आधुनिक विज्ञान को प्रगति के लिए आवश्यक बौद्धिक स्वातंत्र्य अर्थात् सामर्थ्य उन्हें प्राप्त होना कठिन है। यूरोप के साथ तुलना करने पर यह बात स्पष्ट होती है कि भारत के प्रत्येक भाषिक प्रांतको एक राष्ट्र ही कहना पडेगा। सन उन्नीस सौ छप्पन से भारत में भाषिक राज्यरचना होने लगी, जो लोकतंत्र जीवनपद्धति के लिए पोषक ही हुई है। बालिग हुए स्त्री-पुरुष मतदाताओं को मतदानका हक अधिकार से मिला है तथा उसीके अनुसार नागरिक मतदान भी करते रहते हैं।

नागरिक का सामाजिक जीवन उसकी प्रादेशिक मातृभाषा में ही चलता है। भाषा मानव मानव में सामाजिकता निर्माण करनेवाली, एक दूसरे के मनोभाव एक दूसरे के पास लाकर समझानेवाली मनुष्य की आत्मशक्ति है। वह सामाजिकता निर्माण करनेवाली प्रधान शक्ति है। अतः सामान्यतया प्रत्येक मनुष्य अपने सभी विचार मातृभाषा में ही करता है। प्रधानतः मातृभाषा द्वारा ही विचारों का, भावनाओं का या संपूर्ण मनका आविष्कार हो सकता है। इसीसे भाषा राजनीतिक शक्ति बनती है। ग्रामपंचायत या नगरपालिका से विधानसभा या विधानपरिषदो में निर्वाचित स्त्री-पुरुष नागरिक को अपने विचार मातृभाषा में रखने का अवकाश मिलता है, तभी नागरिक को सार्वभौम राज्यशक्ति को विधि का और विधिवत् व्यवहारका रूप आ सकता है। राज्यकर्ता या राज्यशासनकर्ता जनताद्वारा निर्वाचित होता है,

उसकी मातृभाषा जनता की ही मातृभाषा होती है। अतः प्रत्येक भाषिक प्रदेश राज्यसंस्था बनता है। भारत में चौदह भाषिक राज्य है। उन राज्यों की रचना संपूर्ण लोकतंत्रकी पद्धति पर होने के लिये एक प्रकार की स्वयंपूर्ण होने योग्य उनकी स्वायत्तता माननी होगी।

वस्तुवाद से वस्तुवाद के सहारे आदर्शवाद को ओर जाना ही व्यवहार्य मार्ग है। अगर भारत सत्ता का ज्यादा से ज्यादा केन्द्रीकरण करने लगा, प्रांतों की, प्रादेशिक राज्यों की स्वायत्तता को अधिकाधिक मर्यादित करने लगा तो प्रादेशिक राज्यों की सर्वांग विकास की प्रक्रिया ही समाप्त होगी। राजनीतिक सत्ता की केंद्रियता की अपेक्षा विकेंद्रीयता से ही प्रदेश राज्यों का और केंद्र राज्यों का सामर्थ्य विकसित होगा। मानव के आत्मविकास में स्वावलंबन पहली सीढी है। मनुष्य का और उसके द्वारा निर्मित सामाजिक संस्था का विकास बाहर के बंधनों की अपेक्षा अंतःप्रेरणा से ही अधिक मुक्त रूप में हो सकता है। इसके लिए यह स्वीकार करने की आवश्यकता है कि समाज के और समाजसंघटन के सबसे निम्न मूलभूत घटक तक राजनीतिक सत्ता का विकेंद्रीकरण होने की जरूरत है। गाँव और नगरों का प्रशासन उन गाँवों और नगरों द्वारा चलाने से ही इस देश के अनंत दारिद्रय, निरक्षरता, बेरोजगारी और मानसिक दैन्य का इस तरह के विविध भयानक प्रश्नों का हल किया जा सकेगा। केंद्रीय और प्रादेशिक राज्यों को इन ग्रामराज्यों तथा नगरराज्यों को अधिकाधिक स्वायत्त करके समर्थ बनाने के लिए विधिवत् सहायता देनी चाहिए। यहाँ के संसदीय लोकतंत्र की यह प्रधान जिम्मेदारी है कि ग्रामराज्य तथा नगरराज्य से केंद्र राज्यतक दृढ पिरॅमिड निर्माण करें। इस राष्ट्र का प्रधान उद्देश्य इस संसदीय लोकतंत्र से, लोकतंत्रीय समाजवाद की ओर जाना है। यह मौलिक (रॅडिकल) लोकतंत्र के बिना साध्य नहीं होगा।

आज विश्व में मार्क्सवाद के मार्ग से समाजवादी क्रांति सोविएट रूस, लाल चीन, पूर्व यूरोप आदि राष्ट्रों में दिखायी देती है। संसदीय लोकतंत्र मार्ग से जानेवाले तथाकथित पूंजीवादी ब्रिटन, फ्रान्स, प. जर्मनी, इटली, स्वित्झर्लंड, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क आदि राष्ट्र तथा यूनायटेड स्टेट्स ऑफ अमरिका, जपान आदि देश हैं। दूसरे महायुद्ध के बाद एशिया तथा आफ्रिका के अनेक राष्ट्र भारत के साथ मुक्त हो गये। इन नवमुक्त राष्ट्रों की परंपरा में भारत लोकतंत्र के आधार पर निर्मित सब से विशाल राष्ट्र दिखायी देता है। ऐसा भी वर्गीकरण किया जाता है कि आर्थिक दृष्टि से आधुनिक तंत्रज्ञान से संपन्न उत्तर के राष्ट्र और आर्थिक दृष्टि से विपन्न दक्षिण के राष्ट्र। आर्थिक दृष्टि से विपन्न राष्ट्रों में भारत भी एक राष्ट्र है जो संसदीय लोकतंत्र के आधार पर समाजवादी ध्येय की रचना से प्रेरित हुआ है। अतः दुनिया के अन्य किसी भी राष्ट्र की अपेक्षा इसे पुराने तथा नये आव्हान हैं। पुराने आव्हान उग्र रूप धारण कर रहे हैं। डर लग रहा है कि नये आव्हान इस देश की राज्यसंस्था को अस्थिर बनाकर कमजोर तो नहीं बनायेंगे। इन नये पुराने आव्हानों का अर्थ समझ लेना चाहिए।

इस समय यदि कोई यह पूछे कि भारत के राष्ट्र निर्मिति की चर्चा का यह प्रसंग संबद्ध है क्या तो उसका ठीक उत्तर 'हाँ' ही देना होगा। इस बीसवीं शताब्दी में यूरोप में जो राजनीतिक भयानक न उथल पुथल हुई उसकी पृष्ठभूमि पर 'राष्ट्रीय संस्कृति' की संकल्पना की चर्चा हुई है। मूलतः विश्व को राष्ट्रीय संस्कृतियाँ एक मानवी संस्कृति के ही विविध आविष्कार है। आज दुनिया के सभी राष्ट्र बहुत निकट आये हैं। उनका संघर्ष नष्ट होकर उनमें भगवान बुद्ध द्वारा बतायी गयी सार्वभौम मैत्री- पारमिता की नितांत आवश्यकता है। अन्यथा इस पृथ्वी की मानव जाति संकट से घिरकर नष्ट होने का डर आज उत्पन्न हुआ है। भारतीय राष्ट्रवाद का आकृतिबंध नये एकात्म मानव संस्कृति की निर्मिति का आश्वासन दे सकती है। वह आश्वासन भारतीय संस्कृति दे सकती है। इसके आकलन के हेतु ही खंडद्वयात्मक इस महान ग्रंथ का विमोचन हुआ है। भारतीय संस्कृति संसद संस्थाने इस खंडद्वयात्मक ग्रंथ के निर्मिति द्वारा व्यापक मानव संस्कृति की निर्मिति की प्रक्रिया को एक प्रकार से महान प्रेरणा ही दी है। अतः इस संसद का मनःपूर्वक अभिनंदन करना उचित है। मैं अभिनंदन करते हुए अपना भाषण समाप्त करता हूँ।

**(* भारतीय संस्कृति संसद, कलकत्ता ग्रंथ विमोचन समारोह,**
**अध्यक्षीय अभिभाषण. दि. 3 मार्च, 1985.)**

ooo

६५.

# धार्मिक पुनरुज्जीवन व त्याचे परिणाम

धर्म हे समाजाची संघटना निर्माण करणारे तत्त्व आहे. ही गोष्ट इस्राइली किंवा यहुदी समाज, ख्रिश्चन समाज, मुसलमान समाज, शीख समाज, इत्यादी संज्ञांवरून लक्षात येते. मूलतः धार्मिक समाज ही राजकीय संघटना नसते. उदा.ः ख्रिश्चन समाजाचा इतिहास पहा. पहिल्यांदा मानवाला पापातून मुक्त करणारा, घरदार नसणारा असा येशू ख्रिस्त परमेश्वर न्यायी व करुणामय असून, या जगात त्याला शरण जाऊन त्याची भक्ती करीत उच्च नैतिक जीवन जगण्याचा संदेश देवाचा संदेश म्हणून लोकांना देतो. कॉन्स्टंटीन ह्या रोमन बादशहाने ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली आणि त्यानंतर धर्मगुरूंची चर्च ही संस्था समाजसंघटना करीत असतानाच तिचे राजकीय संघटनेत रूपांतर झाले. इस्राएल किंवा यहुदी समाज हा मुळापासूनच एक राष्ट्र होते. तो समाज त्यांच्या मते देवाला अधिक प्रिय असलेला समाज होता; म्हणून यहुद्यांचे सामाजिक जीवन हे 'राजकीय जीवन' होते. आम्ही हिंदू समाजाचे उदाहरण प्रथमच द्यावयास पाहिजे; परंतु का दिले नाही, याचे कारण असे की, इतिहासपूर्व काळी म्हणजे बुद्धपूर्व काळी वैदिकधर्मीय समाज ज्या प्रदेशात संघटित झाला होता तो आर्यावर्त एक राष्ट्र म्हणून, म्हणजे एका राजसत्तेमध्ये असलेला प्रादेशिक समाज म्हणून नांदत होता की नाही, याबद्दल निश्चित काही सांगता येत नाही.

धर्म हे समाजसंघटनेचे जगाच्या प्राचीन इतिहासातील मूलभूत तत्त्व आहे. त्याच्या संघटनेच्या ज्ञात इतिहासात प्रतीत होणाऱ्या दोन पद्धती अशा -

(१) परंपरागत भिन्न-भिन्न धार्मिक प्रथांचा बीमोड करून किंवा बीमोड करण्याचा प्रयत्न करून भिन्न-भिन्न धार्मिक प्रथांचा सामाजिक गटांना एकत्रित समरस करण्याचा यशस्वी प्रयत्न करणारा धर्म. उदा.ः ख्रिश्चन धर्म याणि इस्लाम. यहुदी धर्माचीसुद्धा हीच पद्धती होती. भिन्न-भिन्न देवतांची आणि मूर्तींची पूजा करणारे पश्चिम आशियातील अनेक सामाजिक गट निराकार एकाच जँहोवा-नामक परमेश्वराच्या दहा आज्ञांच्या आदेशाखाली समरसपणे

नांदणारा समाज म्हणून इ. स. पू. सुमारे ६०० वर्षांपूर्वी अस्तित्वात आला, असे इतिहास सांगतो. या पद्धतीमध्ये परधर्मीय समाजाबद्दल असहिष्णुता आणि परकेपणाची भावना अत्यंत खोल असते; त्यामुळे यांच्यामध्ये वैर कायम धुमसत असते आणि त्या वैराचा विशिष्टप्रसंगी उद्रेक होऊन सशस्त्र युद्धाच्या ज्वाळा भडकतात. या पद्धतीतील धर्म म्हणजे धार्मिक समाज आक्रमक असतात. जे जबरदस्तीने किंवा अन्य मतपरिवर्तनाच्या मार्गाने धर्मांतर घडवून आणतात. धर्मांतर घडविण्याची चिरमहत्त्वाकांक्षा हे यांचे कायमचे वैशिष्ट्य असते. यांच्यामध्ये अंतर्गत फुटीची प्रवृत्ती कित्येक वेळा तीव्र बनत असते. उदा.ः कॅथलिक संप्रदाय आणि प्रॉटेस्टंट संप्रदाय. या संप्रदायांचा वैचारिक संग्राम होऊनच हे संप्रदाय थांबले नाहीत, तर सशस्त्र दीर्घकालीन युद्धेही भडकत राहिली. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म यांचे वैर अजूनही प्राणांतिक वैरच आहे. याचे उदाहरण लेबनॉनमध्ये चाललेला दीर्घ सशस्त्र संघर्ष होय; परंतु जेव्हा या आक्रमक पश्चिमी धर्मांपैकी कोणता तरी एक धर्म किंवा त्या धर्माचा समाज पुढारलेली संस्कृती व संघटना निर्माण करतो आणि दुसरा परंपरागत आक्रमक धर्म या पुढारलेल्या धार्मिक समाजापुढे निर्बळ ठरतो, तेव्हा हा निर्बळ ठरलेला धर्म म्हणने धार्मिक समाज त्या वरचढ समाजापुढे त्याचे वर्चस्व खाली मान घालून मान्य करतो. उदा., गेल्या दोन शतकांतील पश्चिमी साम्राज्याचा इतिहास. या साम्राज्यशाह्यांपुढे आक्रमक इस्लाम कुर्निसात करून अजिजी करत जगला; परंतु इस्लाममध्ये काही महत्त्वाची परिवर्तने करावीत आणि आधुनिक जीवनदृष्टी स्वीकारावी, अशा विचाराचे धर्मसुधारक इस्लामने कधीही मान्य केले नाहीत.

(२) धर्माची दुसरी संघटनेची पद्धती म्हणजे परंपरागत खालच्या अवस्थेत असलेल्या धार्मिक प्रथांना व त्या प्रथांच्या समाजांना एका मोठ्या सामाजिक संस्थेमध्ये समाविष्ट करणे आणि समावेशक अशा तात्त्विक व नैतिक विचारसरणीने भिन्न-भिन्न गटांना जीवन जगण्याचे आश्वासन देणे. याची दोन उत्कृष्ट उदाहरणे म्हणजे बौद्ध धर्म आणि हिंदुधर्म होय. बौद्ध धर्म इ. स. पू. तिसऱ्या शतकापासून भारताबाहेर अर्ध्या मानवी विश्वात, विशेषतः ईशान्य व पौर्वात्य देशांमध्ये पसरत गेला; परंतु स्थानिक धार्मिक प्रथांना नष्ट करण्याचा अहंकार त्याच्यापाशी नव्हता; त्यामुळे सत्ता आणि शस्त्र यांचा वापर ख्रिश्चन व इस्लाम धर्मांप्रमाणे बौद्ध धर्माने इतिहासात केव्हाही केला नाही. हीच गोष्ट हिंदू धर्माची. वेदपूर्व मूर्तिपूजक सिंधू संस्कृतीला वेदधर्मीयांनी हळूहळू आत्मसात केले. वैदिक संस्कृतीतील धर्म हा यज्ञधर्म होय. अग्निमंदिर हे त्या समाजाचे व गृहसंस्थेचे केंद्र होते. मूर्तिपूजकांचा धर्म या वैदिक आर्यांनी स्वीकारला. वेदोत्तर काळात या मूर्तिपूजक धर्माचे तात्त्विक उन्नयन झाले. ख्रिश्चन धर्म हा तत्त्वज्ञानासह आला नाही किंवा इस्लाम हा तत्त्वज्ञानासह उदयास आला नाही. त्यांनी तत्त्वज्ञाने कालांतराने स्वीकारली; परंतु वेदोत्तर धर्म हे स्वतःच्या भिन्न-भिन्न बौद्धिक विविध तत्त्वज्ञानांसह उदयास आले. याचे कारण मूळच्या वैदिक धर्माचीच वेदान्त

तत्त्वज्ञानात परिणती झाली होती. हे वेदान्त तत्त्वज्ञान अजूनही मोठ्या उत्साहाने विश्वामध्ये शांती निर्माण करण्याच्या उद्देशाने उभे आहे.

इतिहासात ख्रिश्चन व इस्लाम धर्म हे विश्वधर्म होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे धर्म आपल्या राजकीय शक्तीनिशी एकमेकांच्या समोरासमोर येऊन आतापर्यंत रखडत व झगडत राहिले. आहेत. ते आपसांतही अजून रक्तपाती सशस्त्र लढाया लढत आहेत. उदा.ः आयर्लंड व लेबनॉन. त्याचप्रमाणे इराण आणि इराक. इराण शियापंथी आणि इराक सुन्नीपंथी. इस्लामी जगामध्ये धार्मिक पुनरुज्जीवन विचार मूलपरंपरावादाच्या (फंडामेंटॅलिझम) रूपाने मानवी जीवनमूल्यांच्या आधुनिक विश्वव्यापी संस्कृतीला विरोध करण्याकरिता राजकीय शक्तीच्या रूपाने उभा राहिला आहे. आधुनिक पश्चिमी संस्कृतीशी त्याचा संघर्ष सुरू आहे.

धार्मिक पुनरुज्जीवन व धार्मिक नवजीवन अशा दोन सामाजिक प्रवृत्ती विज्ञानपूर्व इतिहासात त्याचप्रमाणे आधुनिक इतिहासात दिसून येतात. धार्मिक नवजीवनवादामध्ये परंपरागत धर्माच्या विविध रूढींमध्ये मूलगामी परिवर्तन सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर व मूलभूत मानवतावादी नीतितत्त्वांच्या आधारे करण्याचा जेव्हा सुधारक प्रयत्न करतात, तेव्हा त्यास ‘धार्मिक नवजीवन आंदोलन’ असे म्हणता येते. अशा तऱ्हेच्या आंदोलनामध्ये सर्व मानवांची समानता आणि स्त्री-पुरुषांची समानता ही मूलभूत नैतिक तत्त्वे अंतर्भूत होत असतात. पश्चिमी संस्कृतीचा सर्वांगीण संपर्क हिंदू समाजास होऊ लागला तेव्हा या मूलभूत नैतिक तत्त्वांच्या आधारे धर्मसुधारणेचा आणि समाजसुधारणेचा कार्यक्रम घेऊन पुढे आलेले धर्मसुधारक व समाजसुधारक दिसतात. असे धर्मसुधारक व समाजसुधारक ख्रिश्चन धर्मातही गेल्या ३०० वर्षांच्या काळात निर्माण झाले. धर्मग्रंथांच्या बंधनात न राहता विवेकबुद्धीच्या आधाराने जीवनाकडे व विश्वाकडे पाहिले, तर ईश्वराचे संकेत मानवी बुद्धीस प्रत्ययास येतात. असा विचार रुसोसारखे तत्त्वज्ञ आणि गटेसारखे महाकवी सांगू लागले. सगळ्या ख्रिश्चन संप्रदायांच्या ऐक्याचा पुरस्कार या विसाव्या शतकात अधिक जिद्दीने होऊ लागला आहे आणि कॅथलिक धर्मगुरू पोपच्या पीठावरूनही सर्वधर्मसहिष्णुतेचा सिद्धान्त प्रतिपादित करीत आहेत. हिंदुधर्मामध्ये राजा राममोहन रॉय आणि जोतीराव फुले यांच्यासारखे विश्वमानवतावादी धर्मसुधारक आणि समाजसुधारक हिंदूंच्या धार्मिक समाजाने आता अत्यंत शुद्ध बुद्धीने स्वीकारले आहेत. महात्मा गांधींसारखे आधुनिक राजकीय संत आणि रामकृष्ण परमहंसांसारखे श्रेष्ठ यती सर्वधर्मसमतेचा पुरस्कार करू लागले आणि त्यांना सर्व हिंदू समाज मोठ्या पूज्य बुद्धीने मान्यता देऊन त्यांचे वैचारिक व धार्मिक नेतृत्वही मान्य करू लागला आहे; परंतु अशा विश्वमानवतावादी नेतृत्वाचा उदय इस्लाममध्ये झाला असूनही भारत, पाकिस्तान, बांगला देश आणि अन्य मुस्लीम राष्ट्रे यांना विश्व मानवतावादाच्या आधारावर निर्माण झालेला धार्मिक नवजीवन दृष्टिकोन व त्याचे तत्त्वज्ञान पूर्णपणे अमान्य झाले आहे. भारतामध्ये मिर्झा गुलाम अहंमद यांचा अहमदिया

संप्रदाय पंजाबमध्ये अलीकडे उदयास आला. हा संप्रदाय सर्वधर्मसमन्वय आणि मानवी एकता या ध्येयवादाचा पुरस्कार करतो व तो इस्लामी धार्मिक परंपरेशी विच्छेद अपेक्षित करीत नाही; परंतु पाकिस्तान आता या संप्रदायास बहिष्कृत करीत आहे. उलट, हिंदुधर्माच्या वेदादी ग्रंथांशी पूर्ण विच्छेद करून उभ्या राहिलेल्या, वेदस्मृतिपुराणे यांच्यावर जबरदस्त हल्ला करणाऱ्या सत्यशोधक समाजाचे महाराष्ट्राने स्वागतच केले. त्याची परिणती ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादात मध्यंतरीच्या काळात झाली. तो वाद व समाज आता जवळजवळ लुप्तप्राय झालेला आहे; परंतु सामाजिक समतेचे तत्त्व प्रत्यक्ष राज्यघटनेच्या व कायद्यांच्या स्वरूपात निर्माण होण्यास अशा व्यापक प्रवृत्तींचा उपयोग झालेला आहे.

पाकिस्तान आणि भारत हे विभाजन इस्लामच्या पुनरुज्जीवनवादाचीच पूर्वतयारी म्हणून इतिहासाने ठरवली आहे. पाकिस्तानमध्ये हिंदूला आणि शिखाला कसलेही नागरी हक्क प्राप्त नाहीत. तीच गोष्ट नव्याने निर्माण झालेल्या बांगला देशाची. तेथे हिंदू शांततेने व समाधानाने नांदू शकत नाहीत. हिंदूंचे तांडे पूर्व पाकिस्तानातून व आता बांगला देशातून सतत भारतात आश्रयार्थ येत आहेत. या मुस्लिम पुनरुज्जीवनाचे नवे नाव मूलपरंपरावाद (फंडामेंटॅलिझम) होय. इस्लाममध्ये मुळातच परधर्माबद्दलची असहिष्णुता आणि धार्मिक गर्व (धार्मिक वेड कायम खिळलेले) अशा तऱ्हेच्या प्रवृत्ती आहेत. त्याचा परिणाम या मूलपरंपरावादात होत आहे. हाच परंपरावाद मानवाच्या सामाजिक मनात शिरलेल्या इतर अनेक अहंतांचे नकळत पोषण करत असतो उदा., पाकिस्तानमध्ये शिरलेला लढाऊ भाषावाद होय.

धर्मगर्व हा जसा सामाजिक गटगर्व निर्माण करतो, त्याचप्रमाणे भाषा हीसुद्धा धार्मिक एकतेला न जुमानता गटगर्व निर्माण करते. १९४७ मध्ये धर्मनिष्ठ द्विराष्ट्रवादाने भारत आणि पाकिस्तान अशी फाळणी केली; परंतु १९७२ मध्ये पुन्हा दुसरी फाळणी निर्माण झाली. पूर्व पाकिस्तान बांगला देश बनला. बंगाली भाषिक मुसलमानांनी स्वयंनिर्णयाचा हक्क सशस्त्र बंड करून स्थापित केला. पूर्व पाकिस्तान सबंध पाकिस्तानमधील लोकसंख्येने अधिक मोठा भाग होता. एवढेच नव्हे पूर्व पाकिस्तानमधले बंगाली मुसलमान म्हणत होते की, पहिल्यांदा आम्ही पाकिस्तानी व नंतर बंगाली आहोत. ह्याच लोकांनी नंतरच्या दोन दशकांमध्ये मरणाची खाई पेटविली आणि ३० लक्ष लोक मृत्युमुखी पडले. आता प्रश्न असा पडतो की, धार्मिक पुनरुज्जीवनाने निर्माण झालेले पूर्व पाकिस्तान व यानंतरचा बांगला देश यांमध्ये धार्मिक एकता महत्त्वाची ठरते भाषिक की एकता महत्त्वाची ठरते ? पाकिस्तानिर्मितीमध्ये बंगाली मुसलमानांचा पंजाबी मुसलमानांपेक्षा अधिक पुढाकार होता. पाकिस्ताननिर्मितीकरिता पूर्व बंगालमध्ये दंगे झाले; परंतु पाकिस्तान निर्मितीनंतर पश्चिमी पाकिस्तानी म्हणू लागले की, पूर्व पाकिस्तानी मुसलमान हे कमदर्जाचे मुसलमान आहेत; कारण ते अधिक अधिकार मागू लागले आणि पश्चिमी पाकिस्तानी यांच्या सत्तेमधील वरिष्ठ स्थानास आव्हान देऊ लागले. आता पश्चिम पाकिस्तानमध्ये वेगळे अनेक भाषिक वर्ग आपले वेगळे वैशिष्ट्य



वाय १७४–३६

स्थापित करू इच्छित आहेत. त्यांना अधिक स्वायत्तता पाहिजे आहे. सिंधी भाषिक, बलुची भाषिक आणि पुश्तू भाषिक पंजाबी भाषिकांच्या सत्तेला आव्हान देऊ लागले आहेत. या उदाहरणांवरून लक्षात येते की, धार्मिक ऐक्यभावना, भाषिक ऐक्यभावना, इ. ऐक्यभावना इतिहासामध्ये केव्हा एकमेकांविरुद्ध उफाळून येतील किंवा दबून राहतील याचा नियम सांगवत नाही. भिन्नभिन्न सामाजिक गटांतील आर्थिक किंवा राजकीय हितसंबंधांतील स्पर्धा, विरोध वा पक्षपात अशा तऱ्हेची कारणे संघर्ष निर्माण करतात, असे सामान्यपणे म्हणता येते. भारतामध्येसुद्धा असेच घडत आहे.

पहिल्यांदा पंजाबी भाषिक सुभ्याची म्हणजे पंजाबी सुभ्याची मागणी वेगाने पुढे आली. त्यामुळे पंजाब आणि हरयाणा अशा प्रदेश राज्यांची विभागणी झाली. त्यानंतर अलीकडे नवीन धर्मगर्व उफाळून वर आला. शीख धर्म हा वस्तुतः हिंदुधर्माचाच अवांतर संप्रदाय आहे, ही गोष्ट शीख धर्माचे तत्त्वज्ञान आणि शीख धर्माचे कर्मकांड पाहता लक्षात येते. पंजाबमधल्या नुकत्याच घडलेल्या किंवा अजून घडत असलेल्या सशस्त्र बंडाचे मूळ शीख धर्माचा पुनरुज्जीवनवाद होय. धार्मिक पुनरुज्जीवनवाद हा परंपरागत बंधनांच्या अंधश्रद्धांच्या अधिष्ठानावर उभा असतो. त्यात तत्त्वदर्शन हे मागे पडते; कारण सामान्यजन हा कर्मकांडाला महत्त्व देतो. मूलभूत तत्त्वदर्शन त्याला नीट अवगत होत नसते. म्हणून शीख समाजाने धार्मिक कर्मकांडी मागण्यांना महत्त्व दिले. कृपाणधारण, दाढी राखणे, कंगवा, फेटा इ. गोष्टींना ते फार महत्त्व देऊ लागले. ग्रंथसाहिबापेक्षा आणि पहिल्या दहा थोर गुरूंपेक्षा राजकारणी, सत्तालोभी तथाकथित संतांचे नेतृत्व त्यांनी वाढविले किंवा उलट असेही म्हणता येते की, या सत्तालोभी संतांना पंजाबच्या आर्थिक विकासाचे भव्य दर्शन झाल्यावर आपली वेगळी सत्ता स्थापन करूया, अशा तऱ्हेच्या मोहाने त्यांना घेरले आणि फाळणीची मागणी सुरू केली. द्विराष्ट्रवादाने पाकिस्तान निर्माण झाला. नवा धार्मिक द्विराष्ट्रवाद आला व निराळ्या खलिस्तानाची (शीखस्थानाची) मागणी सुरू केली. याचे मूळ कारण धार्मिक पुनरुज्जीवनवाद हे होय. या पुनरुज्जीवनवादामध्ये ग्रंथसाहिबाकडे व त्यातील तत्त्वज्ञानाकडे जाणूनबुजून पूर्ण दुर्लक्ष केले गेले आहे. ग्रंथसाहिबात कबीर, नामदेव, सूरदास, इ. परंपरागत हिंदू संतांच्याही उक्ती भरल्या आहेत आणि हिंदू तत्त्वज्ञानातील एकेश्वरवाद व गुरू नानकांपासून गुरू गोविंदसिंगपर्यंतच्या गुरूंनी सांगितलेला पुनर्जन्मवाद व मानवी ऐक्याचा संदेशही आहे, हे सर्व दुर्लक्षित केले जात आहे.

भारतीय इस्लाममध्येदेखील ही पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती इतकी दृढ झाली आहे की, त्यामुळे माजी न्यायमूर्ती ए. ए. ए. फैजी, एम. आर. बेग, हमीद दलवाई यांच्यासारखे थोर मानवतावादी समाजसुधारक पूर्णपणे बहिष्कृत झाले आहेत. भारताची एकराष्ट्रीयता, एक उच्च इहवादी एकराष्ट्रीयता भारतीय मुसलमान मान्य करू इच्छित नाहीत. वस्तुतः सुमारे एक सहस्र वर्षे भारतीय मुसलमान आणि हिंदू एकत्र जीवन जगत आहेत; परंतु मुसलमानांना

त्यांचा धार्मिक गर्व हिंदूंशी राष्ट्रीयतेच्या उच्च ध्येयवादाने समरस होऊ देत नाही. तो मूळ परंपरावादीच राहिला आहे. याची महत्त्वाची दोन कारणे : एक - भारतातील हिंदूंच्या धर्मसुधारणावादी आणि समाजसुधारणावादी नेतृत्वाचे सखोल दर्शन भारतीय मुसलमानी नेतृत्वाला कधीही घडले नाही. आधुनिक विज्ञाननिष्ठ मानवतावादी संस्कृतीशी हिंदूंचे नेतृत्व हे सुसंवादी झाले आणि त्यांनी स्वातंत्र्याचे व्यापक आंदोलन केले. त्यामुळे स्वतंत्र भारत, स्वतंत्र पाकिस्तान व स्वतंत्र बांगला देश स्थापन झाले. दोन- स्वातंत्र्याचा लढा खऱ्या जिद्दीने शीख आणि हिंदू लढले. भारताच्या स्वातंत्र्यात शिखांचा जो वाटा आहे, तो अत्यंत महत्त्वाचा आहे. मुसलमानी सामान्य जनता मात्र या स्वातंत्र्यलढ्यात सामील झाली नाही; परंतु दुर्दैव हे की, एवढे विशाल लोकशाही राष्ट्र निर्माण करण्यात ज्यांचा मोठा वाटा होता, त्या शिखांमध्ये फुटीर आत्मघातकी वाद निर्माण झाला.

मुसलमानांमध्ये बद्रुद्दीन तैय्यबजी, हकीम अजमल खान, अबुल कलाम आझाद यांसारखे व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोनाचे थोर विचारवंत निर्माण झाले, तरी भारतीय मुसलमान समाजाचे ते नेतृत्व करू शकले नाहीत, त्यामुळे फाळणीनंतरही भारतात हिंदू समाज व मुसलमान समाज यांच्या स्वतंत्र अस्मितांनी भारतीय एकराष्ट्रीयत्वाला आव्हान दिले आहे.

बहुसंख्य हिंदू समाजाला मुसलमान समाजाबरोबर एकत्र शांततापूर्ण जीवन जगण्याची हजार वर्षांची खोल रुजलेली सवय आहे; परंतु मुसलमान समाजाने, त्यांच्या धार्मिक-राजकीय खऱ्याखुऱ्या नेतृत्वाने हिंदू समाजाबरोबर शांततापूर्ण जीवन जगायचे की नाही, हे निश्चितपणे अजून ठरवलेले दिसत नाही. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे मधूनमधून उफाळणारे दंगेच असे आम्ही म्हणत नाही. असे म्हणण्याची अनेक कारणे आहेत. पाकिस्ताननिर्मितीपूर्वी १९०५ सालापासून मुस्लीम समाज आणि नेते यांनी फुटीरवादाचा पाठपुरावा केला. १९१६ साली लखनौ करार झाला. त्यातच या फुटीरवादाची बीजे उघड झाली. मूळ परंपरावादातून तुर्कस्तान मुक्त झाले आणि खिलाफत हे मुस्लिम धर्मपीठ नष्ट झाले. खिलाफतीच्या पुनरुद्धाराची चळवळ महात्मा गांधींच्या आशीर्वादाने भारतात उफाळून आली. दुसऱ्या महायुद्धाच्या समयास काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिल्यानंतर पाकिस्ताननिर्माता नेता जिना यांच्या नेतृत्वाखाली मुक्तिदिन साजरा केला. आज भारतात पाकिस्तान व बांगला देश यांच्यापेक्षा मोठया संख्येने असलेल्या मुसलमान समाजाने पाकिस्ताननिर्मितीचा लढा अधिक दिला. पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर भारतीय मुसलमानांची जीवनदृष्टी बदलणे आवश्यक होते; परंतु ती जुनी परंपरागत दृष्टी खोलवर रुजलेली आहे. याची अशुभ चिन्हे वारंवार प्रकट होत आहेत. त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, इ. सर्व धर्मियांना समाविष्ट करणारा इहवादी दृष्टिकोन असलेला हिंदू समाज आपली ही इहवादी राष्ट्रीयता बाजूला करील की काय, अशी मोठी भीतिग्रस्त परिस्थिती निर्माण होत आहे. त्याचे लक्षण म्हणजे विश्वहिंदू परिषदेचे हिंदू एकताभियान होय. सुमारे ६० वर्षांपूर्वीच भारतातील इतर

धार्मिक समाजांना दुय्यम सामाजिक स्थान देऊ पाहणारा हिंदू राष्ट्रवाद काही अल्पसंख्य हिंदूंच्या मनामध्ये प्रकट झाला.

या हिंदू राष्ट्रवादाच्या दोन प्रवृत्ती - (१) धार्मिक पुनरुज्जीवनवाद व (२) इहवाद. धार्मिक पुनरुज्जीवनवादामध्ये राजकारण असतेच. उदा. : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. तो प्रथमतः कट्टर पुनरुज्जीवनवादी होता. त्यामुळे त्याची वाढ महाराष्ट्रातील ब्राह्मण, इ. उच्चवर्णीयांमध्ये काही प्रमाणात झाली, तरी त्याची वेगाने वाढ उत्तर हिंदुस्थानात झाली. गांधीहत्येनंतर त्याला काही प्रमाणात अल्प काळ उतरती कळा लागलेली दिसली, तरी धिमेपणाने तो आता कमी-जास्त प्रमाणात भारतभर पसरत आहे. श्री. देवरस या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली त्याचा पहिला कट्टर पुनरुज्जीवनवाद शिथिल होत असून त्याच्यामध्ये हिंदू उदारमतवाद वाढत आहे; यात शंका नाही. किंबहुना सर्वच भारतीय हिंदू आहेत; मग ते ख्रिश्चन मुसलमान असोत, असाही विचार मांडला जात आहे. परंतु हिंदू आभियानाच्या पहिल्या उद्रेकामध्ये असे दिसले की, हिंदूतील या जातिजमाती, उच्चवर्णीय सवर्ण, आदिवासी आणि दलित सगळेच उत्साहाने अभियानात सामील होतात. याचा खोल अर्थ होतो की, हजारो वर्षांची वैविध्यपूर्णता असूनही एकत्वाची अव्यक्त अशी जाणीव खूप खोलात सर्वत्र मुरलेली आहे. सामाजिक विषमतेचा हजारो वर्षांचा अन्याय या जाणिवेला मंद करू शकला नाही; परंतु यात धोका असा आहे की, परंपरागत सामाजिक अन्याय नष्ट करणारी भारतीय धर्मसुधारकांची व समाजसुधारकांची जी उदात्त परंपरा निर्माण झाली व त्यातून भिन्नभिन्न धार्मिक समाजांना समाविष्ट करणारे अनन्यसामान्य राष्ट्रीयत्व भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात निर्माण झाले; त्याचे काय होणार, हा खरा भेडसावणारा मूलगामी प्रश्न उत्पन्न झाला आहे. हे हिंदू एकता अभियान भारतीय विश्वव्यापी तत्त्वज्ञानापासून दुरावून आणि मानवी सामाजिक न्यायाच्या तत्त्वांची उपेक्षा करून वाढीस लागले, तर या विशाल असामान्य राष्ट्रीयत्वाला क्षीण करू शकेल. आम्ही म्हणतो की, हे असामान्य व अलौकिक राष्ट्रीयत्व आहे. याचे कारण जगात २४ भिन्नभाषिक प्रदेश राज्यांना समाविष्ट करणारे व जगातील सर्व धर्मांना शांततेचे स्थान म्हणून नांदवणारे हे राष्ट्रीयत्व जगात कुठेही नाही, ते भारतातच आहे व त्याच्या मुळाशी भारतीय उच्च संस्कृतीचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान आहे. त्या तत्त्वज्ञानाला आधुनिक इहवादाची व वैज्ञानिक दृष्टिकोनाची साथ आहे. हिंदू-मुसलमान द्वैत जर शांत झाले नाही, तर हे राष्ट्रीयत्वच दुर्बल होत जाईल. त्यामुळे एकात्मिक भारताचे भवितव्य धोक्याचे ठरण्याचा संभव आहे.

**( टाउन हॉल, हिराबाग, पुणे. शताब्दी व्याख्यानमाला, वर्धापनदिन व्याख्यान, दि. २८ जून, १९८४.)**

ooo

६६

# बौद्ध धर्म व भारतीय संस्कृती

*(सारनाथ (वाराणसी) येथे दि. १८/२/८७ रोजी, लालमणि स्मृती व्याख्यानमालेत झालेल्या हिंदी व्याख्यानाचा मराठी अनुवाद.)*

बौद्ध धर्माचा उदय प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये झाला. भारतीय संस्कृतीमध्येच भगवान बुद्धाला बुद्धत्वप्राप्ती झाली आणि भारतीय संस्कृतीमध्येच भगवान बुद्धाने उत्तर भारतात वारणसीजवळ, धर्मचक्रप्रवर्तन केले. परंपरागत वैदिक संस्कृतीवर, भारतावर, सर्व भारतातील उच्च, मध्यम व कनिष्ठ सामाजिक वर्गावर भगवान बुद्धाच्या आर्य अष्टांगमार्गाचा म्हणजे शुद्ध सदाचार वा उच्चतम नीतिसिद्धांताचा प्रभाव पडला. परंपरागत भारतीय षड्दर्शनांवर प्रतित्यसमुत्पाद तत्त्वज्ञानाचा खोल परिणाम झाला. मौर्य साम्राज्याच्या स्थापनेनंतर सम्राट अशोकाच्या कारकीर्दीचा विस्तार भारताबाहेर धर्मचक्रप्रवर्तनात झाला. श्रीलंका, बर्मा, सयाम, व्हिएतनाम, चीन, जपान, मंगोलिया आणि तिबेट इत्यादी दक्षिण, पूर्व आणि उत्तर आशिया खंडात बुद्ध धर्मचक्रप्रवर्तन झाले म्हणजे भारतीय संस्कृतीच बौद्ध धर्माच्या रूपाने आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक संस्कृती बनली.

बौद्ध धर्माच्या उदयापूर्वी प्राचीन आरण्यके आणि प्राचीन उपनिषदे यांच्यामध्ये बौद्ध धर्माचा उष:काल दिसून येतो. वेदांची संस्कृती मुख्यत: यज्ञप्रधान आणि गृहस्थाश्रमावर आधारित होती. या वैदिक संस्कृतीबरोबरच अवैदिक श्रमण संस्कृती भारतात प्रचलित होती. ही श्रमण संस्कृती वेदपूर्वकालिकही असण्याची शक्यता आहे. बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे की, ‘एतमेव प्रवाजिनो लोकमिच्छन्त: प्रव्रजन्ति । एतद्ध स्म वै तत्पूर्वे विद्वांस: प्रजां न कामयन्ते किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्मायं लोक इति । ते ह स्म पुत्रैषयायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थाय अथ भिक्षाचर्य चरन्ति।’ (बृहदारण्यकोपनिषद् ४।४।२२)

(या विज्ञानमय अज महान आत्म्याचा जो हा इंद्रियांमध्ये, प्राण्यांमध्ये, हृदयाच्या आत आकाशरूप प्रदेश आहे. त्याच्यात राहणारा सर्वांचा स्वामी, नियंता, सर्वेश्वर, भूतांचा पालक हे जग अस्ताव्यस्त, विस्कळीत व उद्ध्वस्त न होऊ देणारा आत्मा आहे) ''त्याच्या प्राप्तीकरता संन्यासदीक्षा (भिक्षुदीक्षा) घेतात. प्राचीन विद्वान प्रजेची इच्छा करीत नव्हते म्हणजे गृहस्थाश्रमाचा स्वीकार करीत नव्हते. कारण प्रजा निर्माण करून आम्ही काय करणार? हा लोक म्हणजे हा जनसमुदाय हाच आमचा आत्मा होय. म्हणून ते प्राचीन विद्वान पुत्राची एषणा म्हणजे इच्छा, संपत्तीची इच्छा आणि या जगात जगण्याची इच्छा यांपासून अलिप्त राहून भिक्षाचरण करीत होते.'' पुढे बृहदारण्यकात म्हटले आहे की, ''ब्राह्मणाचा महिमा अविनाशी, नित्य असतो. तो कर्माने वाढत नाही किंवा कमी होत नाही. ते ब्राह्मणाचे आचरण जाणून घ्यावे. त्यामुळे पापकर्माचा लेप लागत नाही. म्हणून हे जाणून घेणारा शांत, इंद्रियदमन करणारा, विरक्त, क्षमाशील आणि एकाग्रचित्त होऊन आत्म्यातच आत्म्याचे दर्शन घेतो. सर्व विव आत्मरूप पाहतो. पापाचा त्याला ताप होत नाही. पापच जळून जाते. तो विकाररहित होतो. त्याला संशय राहत नाही. तो ब्राह्मण होतो. (बृहदारण्यक उपनिषद ४।४।२३). निर्भय ब्रह्माची प्राप्ती करून घेणारे श्रमण ऋग्वेदातदेखील क्वचित उल्लेखिले आहेत. यांनाच मुनी अशी संज्ञा ऋग्वेदात (१०।१३६।२) दिली आहे. 'मुनयो वातरशना:' अंगावर वायूशिवाय कसलेही वस्त्र नसलेले हे मुनी वेदपूर्वकालापासून भारतामध्ये विहार करीत होते; परंतु वैदिक संस्कृतीवर या श्रमण संस्कृतीचा प्रत्यक्ष विशेष प्रभाव वेदान्तकाली म्हणजे इ.स. पूर्व ८-९ व्या शतकात बुद्धपूर्वकाली पडू लागला. त्याचे स्पष्ट चित्र, यज्ञसंस्कृतीचा मोठा प्रवक्ता याज्ञवल्क्य ऋषी यांच्या चरित्रात दिसते. त्याने भगवान बुद्धापूर्वी भगवान बुद्धाप्रमाणेच गृहस्थाश्रमाचा त्याग केला आणि संन्यास म्हणजे परिव्रज्या स्वीकारली. ती कथा अशी - (बृहदारण्यकात म्हटले आहे) ''याज्ञवल्क्याला मैत्रेयी आणि कात्यायनी नावाच्या दोन भार्या होत्या. मैत्रेयी ब्रह्मवादिनी होती; परंतु कात्यायनी सामान्य स्त्री जशी शहाणी असते तशी म्हणजे स्त्रीप्रज्ञा होती. याज्ञवल्क्याने निराळा आचरणमार्ग स्वीकारण्याचे ठरवून तो मैत्रेयीला म्हणाला, ''मैत्रेयी, अगं, मी प्रव्रज्या (संन्यास) घेऊ इच्छितो. म्हणून मी माझी संपत्ती तुला आणि कात्यायनीला वाटून टाकतो.''

तेव्हा मैत्रेयी उत्तरली, ''हे भगवन्, ही सर्व पृथ्वी माझ्याकरता संपत्तीने भरून टाकली तरी त्याचे मी काय करणार? त्याने मी अमर होईन काय?''

याज्ञवल्क्याने उत्तर दिले, ''नाही, नाही. एवढेच होईल की सुसंपन्न लोकांचे जसे जीवन असते तसेच तुझे जीवन होईल; परंतु संपत्तीपासून अमरत्वाची आशा करताच येत नाही.''

त्यावर मैत्रेयीने विचारले की, ''संपत्तीने मी अमर होणार नाही, ती संपत्ती घेऊन मी काय करू? तुम्हाला जे ज्ञान झाले आहे तेच मला सांगा.''

तेव्हा याज्ञवल्क्याला मैत्रेयीबद्दल पुन्हा उच्च भावनेने भारलेला प्रेमाचा भाव प्राप्त झाला. याज्ञवल्क्य म्हणतो,

''खरोखर तू प्रिय आहेस : म्हणून असे प्रिय बोलून प्रीती वाढवलीस. मला जे ज्ञान प्राप्त झाले आहे त्याचे स्पष्टीकरण करतो.''

त्या स्पष्टीकरणाचे थोडक्यात सार असे की, पत्नी, पती, पुत्र, वित्त, पशू, ब्राह्मण, क्षत्रिय इतर जन, देव, वेद, प्राणिमात्र, वस्तुमात्र आणि सर्व जे जे माणसाला प्रिय होते ते ते केवळ आत्म्यावरच्या प्रेमामुळे प्रिय होते. म्हणून आत्म्याचे दर्शन करावे, श्रवण करावे, मनन करावे, निदिध्यासन करावे. आत्मदर्शनाने, श्रवणाने, मननाने विशेष जाणल्याने सर्वज्ञान होते. हे सर्व जग आत्म्याबाहेर नाही. दुंदुभीचे सगळे ध्वनी दुंदुभीतच असतात, तसे सर्व विश्व आत्म्यातच आहे. त्या एका शाश्वत आत्मतत्त्वाचेच विश्वातील सर्व वस्तू हे नि:श्वास आहेत. तो आत्मा अप्रमेय आहे. त्याच्यात द्वैत राहत नाही. अद्वैत हेच अमरत्व होय.

कौषितकी ब्राह्मणोपनिषदात म्हटले आहे की, वृद्धापकाळी मरण टळले तर पुत्राच्या ऐश्वर्यामध्ये पित्याने वसती करावी किंवा परिव्रज्या स्वीकारावी. परिव्रज्या गृहस्थाश्रम टाळूनही ब्रह्मचर्यातूनच स्वीकारण्याची प्रेरणा भगवान बुद्ध आणि महावीर मुमुक्षूला देतात. ब्रह्मचर्यातूनच संन्यास स्वीकारणे हा मोक्षाचा उत्तम मार्ग होय, असे आद्य शंकराचार्यांचे मत आहे.

त्यांनी भगवद्गीता भाष्यामध्ये ते मांडले आहे. ब्रह्मसूत्रामध्ये या विचाराला बीजभूत असे सूचक वाक्य मिळत नाही. ब्रह्मसूत्रांचा कल गृहस्थाश्रमाकडेच विशेष दिसतो; परंतु आद्य शंकराचार्यांनी याज्ञवल्क्याच्याच नावाने प्रसिद्ध असलेल्या जाबालोपनिषदाचा आधार घेतला आहे. ब्रह्मचर्यातूनच संन्यास मुख्यत: मोक्षदायक आहे, असा विचार जाबालोपनिषदात मांडला आहे तो असा :

अथ हैनं जनको वैदेहो याज्ञवल्क्यमुपेत्योवाच, भगवन् संन्यासं ब्रूहीति । स होवाच याज्ञवल्क्य: । ब्रह्मचर्य समाप्य गृही भवेत् । गृही भूत्वा वनी भवेत् । वनी भूत्वा प्रव्रजेत् । य दि वेतरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् गृहाद्वा वनाद्वा । ... यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत् (४)

अर्थ - या याज्ञवल्क्याकडे वैदेह जनक येऊन म्हणाला, ''भगवन्, संन्यासाबद्दल बोला.'' तो याज्ञवल्क्य म्हणाला, ''ब्रह्मचर्य संपून गृहस्थ व्हावे, गृहस्थ झाल्यावर वनवासी व्हावे, वनवासी झाल्यावर संन्यासी व्हावे किंवा निराळ्या प्रकाराने ब्रह्मचर्यातूनच अथवा गृहस्थाश्रमातूनच किंवा वनातूनच संन्यासी व्हावे. तात्पर्य, ज्या दिवशी वैराग्य येईल त्याच दिवशी संन्यास घ्यावा.''

चार आश्रमांची अशी ही व्यवस्था समुच्चयाने व विकल्पाने भारतीय संस्कृतीमध्ये आणि वैदिक संस्कृतीमध्ये वेदान्तकालापासूनच मान्य व प्रचलित झाली.

कालक्रमाप्रमाणे बृहदारण्यकाच्या पूर्वीचे छांदोग्य उपनिषद होय. त्यामध्ये गृहस्थाश्रमातूनच अखेर ब्रह्मलोकप्राप्ती सांगितली आहे आणि संसारसमाप्ती किंवा मोक्ष गृहस्थाश्रमातूनच मिळतो, असे निश्चितपणे म्हटले आहे. त्यात जी अद्वैत आत्मविद्या सांगितली आहे त्या विद्येचा उपदेश ब्रह्मदेवाने प्रजापतीला, प्रजापतीने मनुला आणि मनुने जनतेला केला, असे म्हटले आहे. लगेच पुढे जाऊन सांगितले आहे की, आचार्य कुलामध्ये गुरुशुश्रूषापूर्वक वेदाध्ययन करून समावृत्त व्हावे, कुटुंबात राहून पवित्र स्थानावर बसून स्वाध्यायाचे अध्ययन करीत राहावे. धार्मिक कर्मे आचरावीत, सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवावे. यज्ञाव्यतिरिक्त प्राणीहिंसा करू नये. असे वर्तन जन्मभर चालवावे, त्यामुळे ब्रह्मलोकाची प्राप्ती होते. संसारात पुन्हा परतत नाही. (छांदोग्य उपनिषद ८/१५)

परंतु यज्ञसंस्थेतील द्रव्ययज्ञाला आणि पशुयज्ञाला टाळून मानसिक उपासना आणि शुद्ध नैतिक सदाचरण म्हणजेच यज्ञ होय. असे यज्ञाचे अधिक विकसित स्वरूप प्राचीन उपनिषदांच्या काळीच निर्माण होऊ लागले होते. छांदोग्य उपनिषदाने पशुहिंसेला यज्ञात परवानगी दिली आहे, हे वर आलेच आहे; परंतु त्याच उपनिषदात यज्ञाचे आध्यात्मिक, नैतिक उपासनेचे स्वरूप, म्हणजे उदा. सोमयज्ञाचे रूपक पुरस्कारिले आहे, ते असे - (छांदोग्य उपनिषद ३-१६, १७)

''माणूस (पुरुष) हाच यज्ञ (सोमयाग) आहे. त्याची आयुष्याची पहिली जी २४ वर्षे ते प्रात:सवन होय. हे प्रात:सवन म्हणजे गायत्री छंदच होत. गायत्री छंदाची अक्षरे २४ असतात. या सवनामध्ये वसुदेव उपस्थित असतात. वसुदेव म्हणजे प्राण, अर्थात सर्व इंद्रिये. ती इंद्रिये हे सर्व जीवन स्थिर ठेवतात. माणसाला जेव्हा या वयात कशाचा ताप होतो तेव्हा माणसाने म्हणावे, 'हे प्राणरूप वसुदेव हो, हे माझे प्रात:सवन माध्यंदिन सवनापर्यंत चालू ठेवा. वसुदेवांमध्ये असताना माझा यज्ञ माझ्या हातून खंडित होऊ नये.'

खरोखर असे म्हटल्यावर तो व्याधिरहित होतो. पुढची मानवी आयुष्याची जी ४४ वर्षे ते माध्यंदिन सवन होय. या सवनात प्राणरूप रुद्रदेव उपस्थित असतात. रुद्रदेव म्हणजे प्राण, अर्थात इंद्रियेच होत. माध्यंदिन सवनच त्रिष्टुपछंद होय. त्रिष्टुपछंदाची ४४ अक्षरे असतात. इंद्रियेच या सगळ्या जगाला रुदन करायला लावतात. या वयात या माणसाला काही ताप झाला तर त्याने म्हणावे की, ''हे रुद्रदेव हो, हे माझे माध्यंदिन सवन तृतीय सवनापर्यंत नेऊन पोचवा. रुद्रदेव उपस्थित असताना मध्येच माझा हा यज्ञ खंडित होऊ नये.'' लगेच ताप नाहीसा होतो. तो माणूस व्याधिरहित होतो. यापुढे मानवी आयुष्याची ४८ वर्षे राहतात. ते तृतीय सवन होय. जगतीछंद हे त्याचे स्वरूप होय. जगतीछंदाची ४८ अक्षरे असतात. या तृतीय सवनात आदित्य देव, म्हणजेच प्राण उपस्थित असतात. हे आदित्यदेव हे सर्वकाही परत घेतात. त्या माणसाला या वयात काही ताप झाला तर त्याने म्हणावे, ''हे प्राणरूप आदित्यदेव हो, हे माझे तृतीय सवन, आयुष्य संपेपर्यंत अखंड चालू ठेवा. प्राणरूप आदित्य

उपस्थित असताना माझा हा यज्ञ मध्येच खंडित होऊ नये.” लगेच तो उपासक माणूस व्याधिरहित होतो. त्याच्यापासून ताप दूर होतो. महिदास ऐतरेय हा विद्वान असे म्हणाला, ‘‘हे व्याधे, मला का त्रास देतोस? मी या त्रासाने मरणार नाही.”

तो ऋषी ११६ वर्षे जगला. जो अशी उपासना करतो तोही असेच ११६ वर्षे जगतो. या जीवनरूप यज्ञामध्ये भूक, तहान लागते, जीव अस्वस्थ होतो, ही दीक्षा होय. मनुष्य खातो, पितो, रमतो ते म्हणजे उपसदांप्रमाणेच तो वागतो (उपसद हा आनंदोत्सव सोमयागात होत असतो). या जीवनात हसतो, खातो, मैथुन करतो, ते स्तुतशास्त्रनामक विधीप्रमाणेच तेव्हा घडत असते. जीवनात तप, दान, ऋजुता, अहिंसा आणि सत्यवचन यांचे आपण आचरण करतो. ती या जीवनयज्ञाची दक्षिणा होय. मृत्यू हेच या जीवनयज्ञाचे अवभृथ स्नान होय. ही उपासना घोर आंगिरस ऋषीने देवकीपुत्र कृष्णाला उपदेशिली. तो तृष्णारहित झाला.

अशाच तऱ्हेचा मानसिक उपासनात्मक यज्ञ अन्यत्रही उपनिषदांमध्ये विहीत केला आहे. तैत्तिरीय आरण्यकात शेवटच्या नारायणोपनिषद या भागात (८०) ‘‘ओंकार मंत्राने आत्मचिंतन करणारा मनुष्य हाच यज्ञ असून आत्मा हा यजमान, श्रद्धा ही पत्नी, शरीर हे इंधन, कामविकार हे आज्य, क्रोध हा पशू, तप हा अग्नी, दम (इंद्रियसंगम) हा पशूचा म्हणजे क्रोधरूप पशूचा वध करणारा शमयिता, एक ऋत्विज, इ. प्रकारचे रूपक सांगितले आहे.” आणि पुढे ‘‘हे ज्ञानी उपासकाचे जीवन म्हणजेच जरा येऊन मरण येईपर्यंत चालणारे अग्निहोत्र, हेच सत्र होय” असे म्हटले आहे.

जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याचे भगवान बुद्धांनी खंडन केले आहे आणि शांत, संयमी सर्वभूतरत मनुष्यच निर्वाणपदाला योग्य होय आणि तोच ब्राह्मण होय, असे भवागन बुद्धाने अनेक ठिकाणी म्हटले आहे. त्याचाही प्रारंभ प्राचीन उपनिषदांत झाला आहे. ‘‘विपापो विरजोऽविचिकित्सो ब्राह्मणो भवति।” ‘‘पापरहित, विकाररहित, रागद्वेषमुक्त व संशयमुक्त (माणूस) ब्राह्मण होतो,” (बृहदारण्यक ४-४-२३) असे सांगितले आहे.

कूटदंतसुत्तातील कूटदंताच्या कथेत (दीघनिकायवग्ग-१) बुद्धाचा यज्ञविषयक विचार स्पष्ट झाला आहे. ती कथा अशी - एके समयी बुद्धगुरु मगध देशात संचार करीत असता खाणुमत नावाच्या ब्राह्मणग्रामी आला. हा गाव मगध देशाच्या बिंबिसार राजाने कूटदंत नावाच्या ब्राह्मणाला दान दिला होता. बुद्ध तेथे पोहोचला. त्यावेळी त्या ब्राह्मणाच्या घरी एक मोठा यज्ञ होणार होता. ७०० बैल, ७०० घोडे, ७०० कालवडी, ७०० बकरे आणि ७०० मेंढे यज्ञात मारण्यासाठी आणले होते. बुद्ध आपल्या गावात आल्याचे वर्तमान ऐकताच खाणुमत गावातील ब्राह्मण एकत्र जमून बुद्धदर्शनाला निघाले. कूटदंत या ब्राह्मणाने ही गर्दी कोठे जाते याची चौकशी केली. बुद्धाच्या दर्शनाला मंडळी चालली आहेत हे समजल्यावर कूटदंतही बुद्धदर्शनाला निघणार असे या मंडळींना समजले. तेव्हा ते ब्राह्मण कूटदंताला म्हणाले, ‘‘अरे तू थोर आहेस, बुद्धानेच तुझ्याकडे यावयास पाहिजे. तुझे कुळ

उत्तम, संपत्ती मोठी, पांडित्य प्रकांड, सुंदर शील, पुष्कळांचा आचार्य, मोठा शिष्यगण या सर्व गोष्टी तुझ्यापाशी आहेत. गौतमापेक्षा तू वयाने मोठा आहेस. म्हणून गौतमानेच तुला भेटावयास यावे.'' तेव्हा कूटदंत उत्तरला, ''श्रमण गौतम उच्चकुलीन आहे, त्याने मोठ्या संपत्तीचा त्याग केला आहे. तरुणवयातच त्याने संन्यास घेतला आहे. तो तेजस्वी, सुशील व मधुरभाषी आहे. त्याचा उपदेश कल्याणप्रद असतो. तो पुष्कळांचा आचार्य आणि प्राचार्य आहे. कामासक्तीपासून मुक्त होऊन शांत झाला आहे. तो क्रियावादी आहे. सर्व राष्ट्रांतील लोक त्याचे धर्मवाक्य श्रवण करण्यासाठी येत असतात. तो सम्यक् संबुद्ध, विद्याचरणसंपन्न, लोकवेत्ता, दम्य पुरुषांचा सारथी व देवमनुष्यांचा शास्ता आहे. बिंबिसार राजा आपल्या अमात्यांसह त्याचा शिष्य झाला आहे, तसाच कोसल देशाचा पसेनदी राजादेखील त्याचा शिष्य झाला आहे. तो ब्राह्मणांनाही पूज्य आहे. विशेष म्हणजे तो आपला अतिथी आहे म्हणून त्याचा सत्कार करणे आम्हाला योग्य आहे.'' त्या ब्राह्मण मंडळींना हे कूटदंताचे बोलणे एकदम पटले आणि ते म्हणाले, ''शंभर योजने जाऊनदेखील त्याचे दर्शन घेणे योग्य. चला, आपण सर्वच त्याच्या दर्शनाला जाऊ.'' तेव्हा कूटदंत त्या सर्व ब्राह्मण समुदायासह आम्रयष्टी नावाच्या वनामध्ये बुद्ध राहत होता तेथे आला.

बुद्धाला कुशल प्रश्नादिक विचारून कूटदंत एका बाजूला बसला. तेही ब्राह्मण कूटदंताप्रमाणेच वागले, नंतर कूटदंत भगवानाला म्हणाला, ''आपणाला यज्ञविधी उत्तम माहीत आहे, असे मी ऐकले आहे. आपण आम्हाला समजावून सांगाल तर चांगले होईल.'' प्राचीन काळचा एक इतिहास सांगून योग्य यज्ञविधी म्हणजे काय याचा उलगडा भगवान बुद्धाने केला. ती कथा अशी - बुद्ध म्हणाला, ''प्राचीन काळी महाविजित नावाचा एक मोठा राजा होऊन गेला. एकांतामध्ये एके दिवशी तो राजा बसला असता त्याच्या मनात विचार आला की, आपण एखादा महायज्ञ करावा. हा विचार त्याने आपल्या पुरोहिताला कळविला. तो पुरोहिताला म्हणाला, ''हे ब्राह्मणा, महायज्ञ करावयाची माझी फार इच्छा आहे. तो कोणत्या रीतीने केला असता माझे हित होईल ते मला सांग.''

पुरोहित म्हणाला, ''महायज्ञास ही वेळ अनुकूल नाही. सध्या आपल्या राज्यात शांतता नाही. गावे आणि शहरे लुटली जात आहेत. लोकांना चोरांपासून फार उपद्रव होत आहे, अशा स्थितीत जर आपण लोकांवर कर बसवाल तर कर्तव्यापासून विन्मुख व्हाल. फाशी, तुरुंग, निंदा, हद्दपारी यापैकी कोणत्याही उपायाने चोरांचा बंदोबस्त करता येईल. परंतु अंदाधुंदी चालूच राहील. बंडे पुन: पुन्हा उद्भवतील.''

आता ही बंडाळी मोडण्याचा खरा उपाय म्हटला म्हणजे शेतकऱ्यांना बी-बियाणे द्या, व्यापाऱ्यांना भांडवल द्या, सरकारी नोकरी करू इच्छितील त्यांना योग्य वेतन देऊन योग्य त्यांच्याकडे काम सोपवा. अशा रीतीने सर्व माणसे आपणाला आवडणाऱ्या कामात गुंतली म्हणजे राज्यात बंडाळी माजणार नाही. वेळोवेळी करवसुली होईल. आपल्या तिजोरीची

अभिवृद्धी होईल. दरवाजे उघडे ठेवून मोठ्या निर्भयपणे लोक मुलाबाळांचे कोडकौतुक पुरवीत नांदू लागतील.

पुरोहित ब्राह्मणाने सांगितलेला बंडाळीच्या बंदोबस्ताचा उपाय महाविजित राजाला पसंत पडला. शेतकरी, व्यापारी, नोकरवर्ग यांना योग्य मदत करून त्याने कामाला लावले. शांतता स्थापित झाली. गुन्हेगारी संपली. राष्ट्र समृद्ध झाले.

एके दिवशी महाविजित राजाने पुरोहिताला बोलावून म्हटले, ''आपल्या राष्ट्रात सर्वत्र आबादीआबाद आहे. आता महायज्ञ करावयाची माझी इच्छा आहे.''

तेव्हा पुरोहित म्हणाला, ''महायज्ञ करावयाचा तर त्याकरिता प्रजेची अनुमती घेतली पाहिजे. लोकांची संमती मिळवा.''

सर्व लोकांनी राजाला यज्ञ करण्याविषयी आपले अनुकूल मत कळविले. तेव्हा पुरोहिताने यज्ञाची सर्व सिद्धता केली. तो राजाला म्हणाला, ''यज्ञात संपत्तीचा मोठा व्यय होणार आहे. त्याबद्दल मन अस्वस्थ होऊ देऊ नका. यज्ञात सज्जन व दुर्जन दोन्ही प्रकारचे लोक येतील. सत्पुरुष येतील. त्यांच्याकडे आदरबुद्धीने पाहावे व चित्त आनंदित ठेवावे.''

महाविजिताच्या यज्ञामध्ये गाई, बकरे, मेंढे इ. प्राणी मारण्यात आले नाहीत. झाडे तोडून त्यांचे यूप करण्यात आले नाहीत. दासांना आणि मजुरांना वेठबिगारीने कामाला धरले नाही. ज्यांची इच्छा होती त्यांनीच कामे केली. तूप, तेल, लोणी, दही, मध आणि गूळ एवढ्या पदार्थांनीच तो यज्ञ परिपूर्ण करण्यात आला. राष्ट्रातील श्रीमंत लोक मोठमोठे नजराणे घेऊन आले. ते नजराणे राजाने स्वीकारले नाहीत. त्या धनाढ्य लोकांनी ते द्रव्य खर्चून अनाथ लोकांसाठी महाविजित राजाच्या यज्ञशालेच्या चारी दिशांना धर्मशाळा बांधल्या, गोरगरिबांना दानधर्म केला.

बुद्धाने सांगितलेली महाविजित राजाची ही गोष्ट ऐकून कूटदंत व त्याच्याबरोबर आलेले ब्राह्मण उद्गारले,

''फारच चांगला यज्ञ!''

बुद्धाने कूटदंत ब्राह्मणाला आपल्या धर्माचा म्हणजे अष्टांग आर्यमार्गाचा विस्ताराने उपदेश केला. तेव्हा कूटदंत ब्राह्मण म्हणाला, ''भो गौतम, मी गोळा केलेले सर्व पशू मोकळे करतो. त्यांना मी जीवदान देतो.'' कूटदंत ब्राह्मणाने दुसऱ्या दिवशी आपल्या घरी बुद्धाला बोलावून त्याचा आदरसत्कार केला.

मुंडकोपनिषदामध्ये यज्ञविधी सांगणारी विद्या व अंतिम तत्त्वाचा उपदेश करणारी विद्या असे विद्येचे दोन भाग केले. यज्ञविद्येला अपरा म्हणजे खालची विद्या आणि अंतिम तत्त्व सांगणारी ती परा विद्या म्हणून म्हटली आहे. ती एक प्रकारची विद्या म्हणण्यापेक्षा अविद्याच होय. मुंडकोपनिषदात यज्ञाबद्दल पुढील उद्गार काढले आहेत - यज्ञरूप या नौका अदृढ आहेत. यज्ञात श्रेय आहे असे जे मूढ लोक मोठ्या आनंदाने सांगतात ते जरा-मृत्यूच्या

फेऱ्यांत पुन: पुन्हा सापडतात. स्वत:ला बुद्धिमान व पंडित मानणारे हे लोक अविद्येमध्येच राहतात आणि आंधळ्याने आंधळ्यांना मार्गदर्शन करावे त्याप्रमाणे ते फेऱ्या घालत असतात. त्या अज्ञान्यांना वाटते की, आपण कृतार्थ झालो आहोत; परंतु ते स्वर्गाच्या पृष्ठावर आरूढ झाले तरी पुण्य संपल्यावर पुन्हा या जगात किंवा त्यापेक्षा खालच्या जगात शिरतात. परंतु जे शांत, विद्वान अरण्यामध्ये तपाने आणि श्रद्धेने भिक्षाचर्येवर राहून जीवनयात्रा करीत असतात, ते रागद्वेषरहित व निष्पाप होऊन अमर अशा शाश्वत आत्म्याकडे सूर्यद्वाराने प्रयाण करतात. यज्ञकर्माने प्राप्त झालेली सद्गती अशाश्वत असते. त्याबद्दल वैराग्य उत्पन्न व्हावयास पाहिजे. शाश्वत सत्याच्या ज्ञानाकरता विद्वान ब्रह्मनिष्ठ गुरुलाच सेवाव्रत घेऊन शरण जावे. नम्र, प्रशांतचित्त, रागद्वेषरहित अशा त्या शिष्याला तो ज्ञानी गुरू उपदेश देतो. अविनाशी सत्य आत्म्याचे तत्त्व म्हणजे ब्रह्मविद्या त्याला प्राप्त होते (मुंडक १.२).

भगवान बुद्धाला जो तत्त्वसाक्षात्कार झाला त्यामध्ये आर्यसत्ये आणि प्रतीत्यसमुत्पाद असे दोन महत्त्वाचे सिद्धांत त्याला दिसले. आपस्तंब धर्मसूत्रात (१.२०) धर्माचे लक्षण सांगितले आहे. त्यात आर्य हा शब्द फार महत्त्वाचा आहे. ते लक्षण असे

''यं त्वार्या: प्रशंसन्ति स धर्म:, यं गर्हन्ते सोऽधर्म:, सर्वजनपदेषु एकान्तसमाहित आर्याणां वृत्तम्। सम्यग्विनीतानां वृद्धानामात्मवतां अलोलुपानां अदाम्भिकानां वृत्तसादृश्यं भजेत.''

अर्थ - ''ज्याचे आचरण करीत आर्य प्रशंसा करतात तो धर्म होय आणि ज्या आचरणाची निंदा करतात तो अधर्म होय. सर्व देशांमध्ये निरपवादपणे जे आचरण आर्यांना मान्य असते तो धर्म होय. ते आर्य म्हणजे सम्यक् विनयसंपन्न, वृद्ध, संयमी, कोणत्याही विषयाची लालसा नसलेले आणि दांभिक नसलेले आर्य होत. त्यांच्यासारखे आचरण करावे.''

येथे आर्य शब्द जातिवाचक नसून सुशीलवाचक आहे. त्या त्या प्रदेशांचे, जमातींचे जे जे भिन्न भिन्न रूढ आचार असतात, ते येथे धर्म शब्दाने गृहीत धरलेले नाहीत. सर्व राष्ट्रांमध्ये सज्जनांना संमत होणारा आचार म्हणजे धर्म होय.

भगवान बुद्धाच्या आर्य अष्टांगिक मार्गाचा महाभारत आणि भगवद्गीता यांच्यावर खोल प्रभाव पडला आहे. परंपरेप्रमाणे चारी वर्णांचा गुरू ब्राह्मण आहे; परंतु महाभारतामध्ये धर्मव्याध हा खाटिक शूद्र व तुलाधार हा वैश्य धर्मोपदेश करीत आहे. तत्त्वज्ञानाचे उपदेशक क्षत्रिय भीष्म आणि शूद्र विदुर हे आहेत. याचा अर्थ प्राचीन भारतीय संस्कृतीवर भगवान बुद्धाच्या जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यावरच्या टीकेचा प्रभाव पडलेला दिसतो. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याची मीमांसा मज्झिमनिकायात (अस्सलायनसुत्त व वासेट्ठसुत्त)आली आहे. (मज्झिमनिकाय पण्णासक-२, वग्ग ५; सूत्त - निपात, वग्ग ३)

शूद्रासह चारी वर्णांना मोक्षाचा अधिकार आहे, हे बुद्धमत वैदिक संस्कृतीमध्ये काही आचार्यांचेही होते; परंतु अनेक आचार्य शूद्राला मोक्षाचा अधिकार नाही, अशा मताचे होते. हे मत बादरायण आचार्याच्या ब्रह्मसूत्रामध्ये अपशूद्राधिकरणात (१.३.९) स्पष्टपणे मांडले

आहे; परंतु ते मत आद्य शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात अखेरीस खोडले आहे. त्यांनी म्हटले आहे की, इतिहास-पुराणांच्या आधाराने चारी वर्णांना मोक्षाचा अधिकार प्राप्त होऊ शकतो :- 'श्रावयेत् चतुरो वर्णान् इतिह चेतिहासपुराणाधिगमे चातुर्वर्ण्यस्य अधिकारस्मरणात् । वेदपूर्वकस्तु नाधिकार: शूद्राणामिति स्थितम् ।' (१.३.३८).

अर्थ - ''चारी वर्णांना इतिहास-पुराणांचे श्रवण करू द्यावे, असे विधिवाक्य असल्यामुळे चातुर्वर्ण्याला अधिकार आहे; परंतु शूद्रांना वेदाध्ययनपूर्वक अधिकार नाही, असा निर्णय होतो.''

अस्सलायनसुत्तात अशी गोष्ट सांगितली आहे - एके समयी बुद्धगुरु श्रावस्तीमध्ये अनाथपिंडकाच्या आश्रमात वसती करून होता. त्या वेळी निरनिराळ्या देशांतून ५०० ब्राह्मण काही कारणास्तव श्रावस्तीला आले होते. त्या ब्राह्मणांमध्ये असा एक प्रश्न उपस्थित झाला, की हा श्रमण गौतम चारही वर्णांना मोक्ष आहे, असे प्रतिपादन करतो. त्याच्याबरोबर या मुद्यासंबंधाने वाद करण्यास कोण समर्थ आहे? त्या मंडळीत आश्वलायनकुमार हा समर्थ आहे, असे त्या मंडळींना वाटले. षडंगांसह चारी वेदांमध्ये आवलायनकुमार पारंगत होता तरी तो जाणून होता की, श्रमण गौतमाशी वाद करणे कठीण आहे. तो त्या ब्राह्मणांना म्हणाला, ''मी वाद करण्यास समर्थ नाही.''

ते ब्राह्मण आश्वलायनाला म्हणाले, ''तू परिव्राजक धर्मांचा अभ्यास केला आहेस. म्हणून विद्यापारंगताने अशा वादयुद्धातून परावृत्त होणे योग्य नाही.''

आश्वलायन त्यावर म्हणाला, ''हे कठीण काम आहे; पण तुमच्या आग्रहास्तव वाद करणे पत्करतो.''

आश्वलायनकुमार ब्राह्मणसमुदायासह बुद्धगुरुजवळ गेला. कुशल समाचारादी विचारून एका बाजूला बसला आणि म्हणाला, ''हे भगवन, या ब्राह्मणांचे म्हणणे असे की, ब्राह्मण वर्णच श्रेष्ठ आहे, इतर वर्ण हीन आहेत. ब्राह्मणांनाच मोक्ष मिळतो, इतरांना नाही. ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखापासून झाले आहेत. ते त्याचे औरस पुत्र आहेत. ते त्याचे दायाद आहेत. या मुद्यासंबंधी आपले म्हणणे काय आहे?''

यावर बुद्ध म्हणाला, ''हे आश्वलायना, ब्राह्मणांच्या बायका ऋतुमती होऊन गरोदर होतात, प्रसूत होतात. बाळांना दूध पाजतात. ब्राह्मणांची संतती इतर वर्णांप्रमाणेच मातेच्या उदरातून जन्मते. म्हणूनच ब्राह्मणांनी आपण ब्रह्मदेवाच्या मुखातून उत्पन्न झालो असे म्हणावे हे आश्चर्य नव्हे काय?''

त्यावर आवलायन म्हणाला, ''भो गौतम, आपले म्हणणे काहीही असो; परंतु आपण ब्रह्मदेवाचे दायाद म्हणजे वारस आहोत, यावर ब्राह्मणांचा पूर्ण विश्वास आहे.''

बुद्ध म्हणाला, ''हे आश्वलायना, योन, कंबोज व इतर सरहद्दीवरील प्रदेशात आर्य व दास असे दोनच असून कधी कधी आर्यांचा दास होतो व दासांचा आर्य होतो. ही गोष्ट तुझ्या ऐकण्यात आली आहे काय?''

''होय, असे मी ऐकले आहे.'' आश्वलायनाने उत्तर दिले.

बुद्ध म्हणाला, ''असे जर आहे तर ब्रह्मदेवाने ब्राह्मणांनाच स्वत:च्या मुखापासून उत्पन्न केले व ते सर्व वर्णांत श्रेष्ठ आहेत या म्हणण्याला आधार काय?''

आश्वलायन म्हणाला, ''आपले म्हणणे काही असो. परंतु ब्राह्मणांची अशी बळकट समजूत आहे की ब्राह्मण श्रेष्ठ व इतर वर्ण हीन आहेत.''

बुद्ध म्हणाला, ''क्षत्रियाने, वैश्याने वा शूद्राने चोरी, व्यभिचार केला, खोटे भाषण केले, चहाडी केली, वृथा बडबड केली, लोकांच्या धनावर दृष्टी ठेवली, द्वेषबुद्धी वाढवली, नास्तिकपणा अंगीकारला तर तोच काय तो नरकाला जाईल, पण ब्राह्मणाने ही कर्मे केली असता देहत्यागानंतर तो नरकाला जाणार नाही असे तुला वाटते काय?''

आश्वलायन म्हणाला, ''भो गौतम, कोणत्याही वर्णांच्या मनुष्याने ही पापे केली असता तो नरकाला जाईल. ब्राह्मण काय अथवा अब्राह्मण काय, सर्वांना आपल्या पापाचे प्रायश्चित्त भोगावेच लागणार.''

बुद्ध म्हणाला, ''एखादा ब्राह्मण जर प्राणघातापासून निवृत्त झाला, चौर्यकर्मापासून, व्यभिचारापासून निवृत्त झाला, असत्य भाषणापासून, शिवीगाळीपासून, घरधनाच्या लोभापासून, द्वेषापासून व नास्तिकतेपासून निवृत्त झाला तर तोच काय तो देहावसानानंतर स्वर्गलोकाला जाईल. पण इतर वर्णांचे लोक या पापकर्मापासून निवृत्त झाले तर ते स्वर्गलोकाला जाणार नाहीत असे तुला वाटते काय?''

आश्वलायन म्हणाला, ''कोणत्याही वर्णांचा मनुष्य या पापकर्मापासून निवृत्त झाला की स्वर्गाला जाईल. पुण्याचरणाचे फल ब्राह्मण व ब्राह्मणेतरांना सारखेच मिळणार आहे.''

बुद्ध म्हणाला, ''या प्रदेशात ब्राह्मणच काय तो द्वेषवैरविरहित मैत्रीभावना करू शकतो. क्षत्रिय, वैय व शूद्र करू शकणार नाहीत असे तुला वाटते काय?''

आश्वलायन म्हणाला, ''चारीही वर्णांना मैत्रीभावना करणे शक्य आहे.''

बुद्ध म्हणाला, ''एखाद्या क्षत्रिय कुमाराने ब्राह्मण कन्येबरोबर शरीरसंबंध केला व त्या संबंधापासून जर त्याला पुत्र झाला तर तो पुत्र आईसारखा आणि बापासारखा मनुष्य होईल असे तुला वाटत नाही काय? त्याचप्रमाणे एखाद्या ब्राह्मण कुमाराने क्षत्रिय कन्येशी शरीरसंबंध केला तर त्यापासून होणारा पुत्र त्या दोघांसारखा न होता भलत्याच जातीचा होईल असे तुला वाटते काय?''

आश्वलायन म्हणाला, ''अशा मिश्रविवाहाने जो मुलगा होईल तो त्याच्या आईबापांप्रमाणे मनुष्यच होईल. त्याला ब्राह्मण म्हणता येईल किंवा क्षत्रियही म्हणता येईल.''

बुद्ध म्हणाला, ''पण आवलायन, एखाद्या घोडीच्या आणि गाढवाच्या संबंधापासून जे शिंगरू होईल त्याला त्याच्या आईसारखे किंवा बापासारखे म्हणता येईल काय? त्याला घोडाही म्हणता येईल किंवा गाढवही म्हणता येईल काय?''

आश्वलायन म्हणाला, ''भौ गौतम, त्याला घोडा किंवा गाढव म्हणता येणार नाही. तो एक तिसऱ्याच जातीचा प्राणी होतो. त्याला आपण खेचर असे म्हणतो; परंतु ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या संबंधापासून झालेल्या मुलामध्ये असा प्रकार आढळून येत नाही.''

बुद्ध म्हणाला, ''हे आश्वलायन, दोघा ब्राह्मण बंधूंपैकी एक वेदपठण केलेला चांगला सुशिक्षित असेल व दुसरा अशिक्षित असेल तर त्यात ब्राह्मण कोणत्या भावाला श्राद्धामध्ये किंवा यज्ञामध्ये प्रथम आमंत्रण करतील?''

आश्वलायन म्हणाला, ''जो सुशिक्षित असेल तो जरी वयाने लहान असला तरी त्यालाच यज्ञयागात प्रथम आमंत्रण केले जाईल.''

बुद्ध म्हणाला, ''आता असे समज की, त्या दोघा भावापैकी एकजण मोठा विद्वान आहे, पण अत्यंत दुराचारी आहे. दुसरा फारसा विद्वान नाही, पण अत्यंत सुशील आहे. तेव्हा त्यात प्रथमत: कोणाला आमंत्रण दिले जाईल?''

आश्वलायन म्हणाला, ''भो गौतम, जो शीलवान असेल त्यालाच प्रथमत: आमंत्रण दिले जाईल. दुराचारी मनुष्याला दिलेल्या दानापासून काय फल मिळणार आहे?''

बुद्ध म्हणाला, ''हे आश्वलायन, प्रथमत: तू जातीला महत्त्व दिलेस, नंतर वेदपठणाला महत्त्व दिलेस आणि आता तर तू शीलाला महत्त्व देत आहेस. अर्थात, मी चातुर्वर्ण्याची जी मीमांसा  करतो तिचा तूही अंगीकार केलास.''

हाच विषय म्हणजे चातुर्वर्ण्यमीमांसा वासेट्ठसूत्त (मज्झिमनिकाय पण्णासक २. वग्ग ५, सुत्तनिपात वग्ग ३) या प्रकरणात अधिक स्पष्ट रीतीने केली आहे. ती अशी : एके समयी बुद्धगुरू इच्छानंगल नावाच्या गावाजवळ त्याच नावाच्या उपवनात राहत होता. त्या काळी पुष्कळ प्रसिद्ध ब्राह्मण त्या गावी राहत होते. एके दिवशी वासिष्ठ आणि भारद्वाज या दोन तरुण ब्राह्मणांमध्ये असा वाद उपस्थित झाला की, 'मनुष्य जन्माने श्रेष्ठ होतो किंवा कर्माने श्रेष्ठ होतो?'

भारद्वाज आपल्या मित्राला म्हणाला, ''भो वासिष्ठ, ज्याच्या आईच्या बाजूला आणि बापाच्या बाजूला सात पिढ्या शुद्ध असतील, ज्याच्या कुळात सात पिढ्यांपर्यंत वर्णसंकर झाला नसेल तोच ब्राह्मण श्रेष्ठ होय.''

वासिष्ठ म्हणाला, ''भो भारद्वाज, जो मनुष्य शीलसंपन्न व कर्तव्यदक्ष असेल त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.''

पुष्कळ वादविवाद झाला; तथापि ते दोघे परस्परांचे समाधान करू शकले नाहीत, तेव्हा वासिष्ठ म्हणाला, ''भो भारद्वाज, आपला हा वाद येथे तुटावयाचा नाही.  हा श्रमण गौतम आपल्या गावाजवळ राहत आहे. तो बुद्ध, पूज्य आणि सर्व लोकांचा गुरू आहे अशी त्याची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. आपण त्याच्यापाशी जाऊन त्याला आपला मतभेद कळवू व तो जे सांगेल ते मत मान्य करू.''

तेव्हा ते दोघे बुद्धापाशी गेले व बुद्धाला कुशल प्रश्नादी विचारून एका बाजूला बसले.

वासिष्ठ म्हणाला, ''भो गौतम, आम्ही दोघे सुशिक्षित ब्राह्मणकुमार आहोत. आमच्यात जातिभेदासंबंधाने विवाद आहे. आमच्यापैकी कोणाचे म्हणणे खरे आणि कोणाचे म्हणणे खोटे आहे हे आपण आम्हाला समजावून द्यावे.''

बुद्ध म्हणाला, ''वासिष्ठ, तृण, वृक्ष इ. वनस्पतींमध्ये निरनिराळया जाती आढळल्यास तशाच त्या किडे, मुंग्या इ.बारीकसारीक प्राण्यांमध्येही आढळतात. सर्पाच्या जाती अनेक आहेत. श्वापदांच्या जातीही अनेक आहेत. पाण्यात राहणाऱ्या मत्स्यांमध्ये व आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांमध्येदेखील अनेक जाती आढळून येतात. निरनिराळया जातींचे चिन्ह या सर्व प्राण्यांमध्ये स्पष्ट दिसून येते; पण तसे मनुष्यामध्ये आढळून येत नाही. कान, डोळे, तोंड, नाक, ओठ, मान, पोट, पाठ, हात, पाय, केस, भिवया इ. सर्व अवयवांनी एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याहून जाती या अर्थाने वेगळा होऊ शकत नाही. सर्व मनुष्यांचे अवयव जवळजवळ सारख्याच आकाराचे असल्यामुळे मनुष्यामध्ये आकारावरून जातिभेद ठरविणे शक्य नाही; परंतु कर्मावरून मनुष्याची जाती ठरविता येणे शक्य आहे. एखादा ब्राह्मण गोपालन करून निर्वाह करीत असेल तर त्याला गवळीच म्हटले पाहिजे. ब्राह्मण म्हणता कामा नये. जो कोणी शिल्पकलेने उपजीविका करतो तो कारागीर, जो व्यापार करतो तो वाणी, जो दूताचे काम करतो तो दूत होय, जो चोरीवर उपजीविका करतो तो चोर, जो युद्धकलेवर उपजीविका करतो तो योद्धा, जो यज्ञयाग करून उपजीविका करतो तो याजक आणि जो राष्ट्रावर स्वामित्व गाजवितो तो राजा होय; परंतु हे सगळे जन्माने ब्राह्मण असले तरी त्यांना ब्राह्मण म्हणता येणार नाही.

''सगळी संसारबंधने छेदून जो कोणत्याही प्रापंचिक दु:खाला भीत नाही, कोणत्याही गोष्टीची ज्याला आसक्ती नाही, त्याला मी ब्राह्मण म्हणतो. दुसऱ्याने दिलेल्या शिवीगाळी, वध, बंध सहन करतो, क्षमा हेच ज्याचे बळ आहे त्याला मी ब्राह्मण म्हणतो. कमलपत्रावरील उदकबिंदूप्रमाणे जो इहलोकीच्या विषयसुखापासून अलिप्त राहतो त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

जन्मामुळे ब्राह्मण होत नाही किंवा अब्राह्मण होत नाही. कर्मानेच ब्राह्मण होतो व कर्मानेच अब्राह्मण होतो. कर्मानेच हे सगळे जग चालले आहे. आसावर जसा रथ चालतो तसे सर्व प्राणी आपल्या कर्मावर अवलंबून असतात.''

या बुद्धोपदेशाचा प्रभाव भारतीय संस्कृतीवर कायम पडत होता याचे उदाहरण महाभारत होय. महाभारतात वनपर्वात युधिष्ठिर आणि यक्ष यांचा संवाद आहे. त्यात यक्षाने अनेक प्रश्न युधिष्ठिराला अडवून विचारले. युधिष्ठिर यक्ष प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देऊ शकला म्हणून त्याचे बाकीचे मेलेले चार बंधू जिवंत होऊ शकले. इतके त्या युधिष्ठिराच्या उत्तरांचे महत्त्व आहे. यक्षाचा एक प्रश्न असा ''राजा, ब्राह्मण्य कशामुळे प्राप्त होते? कुलाने, आचरणाने, अध्ययनाने की विद्वत्तेने? हे मला सुनिश्चित सांग.''

युधिष्ठिर म्हणाला, ''यक्ष, ब्राह्मणत्वाला कारण कुल, अध्ययन किंवा विद्वत्ता नाही. केवळ सदाचरणच कारण आहे, यात शंका नाही. ब्राह्मणाने विशेषेकरून सदाचरण संरक्षित करावे. ज्याचे आचरण क्षीण होत नाही तो क्षीण होत नाही; परंतु आचरणाने जो नष्ट झाला तो नष्टच झाला. शिक्षक, शिष्य, अनेक शास्त्रचिंतक हे सर्व मूर्ख, व्यसनी होत. जो क्रियावान असतो तोच पंडित होय. दुराचरणी चतुर्वेदी विद्वान शूद्रापेक्षा अत्यंत खालचा होय. जो संयमी अग्निहोत्री तो ब्राह्मण होय.'' (महाभारत, वनपर्व ३१३)

द्रव्ययज्ञ, पशुयज्ञ यांच्यापेक्षा मानसिक, सात्त्विक उपासना आणि सत्य-अहिंसादी विश्वव्यापी नीतिधर्माचे आचरण यांना भगवान बुद्धाने महत्त्व दिले. याचा महाभारताच्या मौलिक धर्मचिंतनावर प्रभाव पडलेला दिसतो. सार्वत्रिक मैत्री, करुणा, मुदिता आणि पापी माणसाच्या पापाची उपेक्षा या चार भावनांच्या योगाने मनुष्याचे चित्त शुद्ध होते असे पातंजल योगसूत्रात म्हटले आहे. कालामसुत्तात (अंगुत्तरनिकाय, तिकनिपात, पण्णासक २, वग्ग २) भगवान बुद्धाने कालाम नावाच्या क्षत्रियांना अंतिम नैतिक मूल्यासंबंधी फार महत्त्वाचा उपदेश केला. आर्य अष्टांगिक मार्ग का स्वीकारावा, लोभ, द्वेष आणि मोह यांचा त्याग का करावा याचे अत्यंत शुद्ध विवेकबुद्धीने समर्थन केले आहे. परलोक आहे की नाही किंवा परमेश्वर आहे की नाही, पुनर्जन्म आहे की नाही, या दार्शनिक प्रश्नांपासून मूलभूत नीतिधर्माला भगवान बुद्धाने अलग केले आणि त्या धर्माचे स्वयंमूल्य, स्वयंइष्टता दाखवून दिली. त्यामुळे भिन्न भिन्न दार्शनिक विचारसरणी ज्यांची आहे त्या सर्वांना ही भूमिका मान्य करणे भाग आहे. कारण कोणत्याही दर्शनाशी अथवा परंपरागत धर्मग्रंथाशी किंवा शब्दप्रामाण्याशी भगवान बुद्धाने आपला धर्मविचार गुंतवून ठेवला नाही. जगातील सर्व राष्ट्रे आणि सर्व धर्मसंस्था यांना स्वीकार्य ठरावा असा हा भगवान बुद्धाचा धर्मसिद्धांत आहे. कालामसुत्तात सांगितलेली मार्मिक कथा अशी आहे :

एकदा बुद्धगुरु धर्मप्रचारासाठी कोसल देशामध्ये फिरत असता कालाम नावाच्या क्षत्रियांच्या गावी आला. भगवंताच्या आगमनाची वार्ता ऐकून कालामांचा मोठा समुदाय त्याच्या दर्शनाला गेला. त्या समुदायाने बुद्धाला कुशल प्रश्नादिक विचारले. त्या कालामांपैकी जाणते लोक बुद्धाला म्हणाले, ''भगवन्, आमच्या गावी पुष्कळ श्रमण ब्राह्मण येत असतात. स्वत:च्या मताची प्रशंसा करतात, दुसऱ्याच्या मताची निंदा करतात. अशा वेळी आम्हाला अशी शंका येते की या सर्वात कुणाचे मत खरे व कुणाचे खोटे? या श्रमण ब्राह्मणांमध्ये सत्यवादी कोण व असत्यवादी कोण?''

बुद्धगुरु म्हणाला, ''कालाम हो, मी जे काही सांगणार आहे ते तुमच्या पूर्वपरंपरेला धरून आहे म्हणून खरे मानू नका. ते पवित्र ग्रंथात आहे म्हणूनही खरे मानू नका. ते अनुमानाने सिद्ध करता येते किंवा ते लोकरूढीला धरून आहे म्हणून, किंवा ते सुंदर दिसते आहे म्हणून किंवा श्रद्धेला जुळते म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. मी प्रसिद्ध संन्यासी आणि तुम्हा सर्वांना पूज्य

आहे म्हणूनही माझ्या भाषणावर विश्वास ठेवू नका. तुमच्या विवेकबुद्धीला माझा उपदेश मान्य झाला तरच तो स्वीकारा. मनुष्याच्या अंत:करणावर लोभाचा, द्वेषाचा किंवा मोहाचा पगडा बसतो त्यावेळी त्याला आत्महित किंवा परहित समजणे शक्य आहे काय?''

कालाम म्हणाले, ''नाही भगवन्.''

बुद्ध पुढे म्हणाला, ''आता कालाम हो, मी तुम्हाला असे विचारतो की, मनुष्याचे अंत:करण जर लोभरहित, द्वेषरहित आणि मोहरहित झाले तर त्यापासून हित होईल, अहित होणार नाही हे तुम्हाला मान्य आहे. असा मनुष्य प्राणघात करीत नाही, चोरी करीत नाही, व्यभिचार करीत नाही, असत्यभाषण करीत नाही व तसे करण्यास दुसऱ्यालाही उत्तेजन देत नाही. लोभ, द्वेष आणि मोह ही तीन पापाची मुळे होत. यामुळे आत्मघात होतो आणि जगाचे दु:ख वाढते. आत्महित आणि परहित होईल असे मनोधर्म वाढवा. जगामध्ये अशा मनोधर्माने सुखाची अभिवृद्धी होते म्हणून असे मनोधर्म पूर्णतेला जातील असा प्रयत्न करा. लोभ, द्वेष आणि मोह या मनोवृत्ती नष्ट झाल्या म्हणजे मनुष्य चारी दिशांतील प्राणिमात्रांवर मैत्रीभावना करण्यास समर्थ होतो. करुणा, मुदिता आणि पापाची उपेक्षा या भावनांचाही त्यामुळे सहज लाभ होतो. चित्त सर्व प्रकारच्या वैरांपासून मुक्त होते. १) परलोक जर असेल तर अशा सत्कर्मामुळे सुगतीच प्राप्त होणार. २) परलोक जर नसेल तर या जगामध्ये निर्वैर बुद्धीने तो मनुष्य मोठ्या आनंदाने राहतो. ३) पाप न झाल्यामुळे पापाचा दंड भोगण्याचा प्रसंग येत नाही. ४) आपल्या सदाचरणामुळे स्वत:चे आणि इतर जनांचेही कल्याणच होते.''

कालाम क्षत्रियांनी हा उपदेश श्रवण केल्यानंतर ते आनंदी होऊन बुद्धाचे उपासक बनले.

या बुद्धोपदेशाचा प्रतिध्वनी महाभारताच्या शांतिपर्वात तुलाधार - जाजली संवादात उमटला आहे. जाजली हा ब्राह्मण ऋषी आणि तुलाधार हा किराणा मालाचा विक्रेता वैय होय.

जाजली हा ब्राह्मण ऋषी दीर्घकालपर्यंत उग्र तपश्चर्या करीत होता. त्या तपश्चर्येची सिद्धी त्याला प्राप्त झाली. त्यामुळे त्याला अहंकार उत्पन्न झाला. त्याला वाटले की, धर्म सिद्ध झाला आहे. तेव्हा अंतरिक्षात त्याला आकाशवाणी ऐकू आली ती अशी की, 'वाराणसीमध्ये महाप्रज्ञ तुलाधार राहतो. त्यालासुद्धा धर्म सिद्ध झाला अशी भाषा बोलण्याचे साहस करवत नाही. पण तू तसे साहस करतोस.' ही आकाशवाणी या जाजली मुनीने ऐकल्यावर तो जाजली दीर्घ मार्ग आक्रमण करीत वाराणसी नगरीला पोहोचला. तुलाधाराला भेटला. तुलाधाराने त्याचे स्वागत करून आनंदाने सत्कार केला. यानंतर जाजलीने त्या ज्ञानाने तृप्त झालेल्या धर्मतत्त्वज्ञ वैश्याला विचारले, तू सर्व रस, सर्व गंध, वनस्पती, धान्ये आणि फळेमुळे विकून निर्वाह करतोस. तुला ही उच्च दर्जाची प्रज्ञा कशी मिळाली?''

तेव्हा जाजलीला तुलाधार म्हणाला, ''हे जाजले, सर्व भूतांचे हित ज्यात आहे असा प्राचीन सनातन धर्म त्याच्या रहस्यासह मी जाणतो. प्राण्यांचा ज्यात द्रोह होत नाही, झाला

तर अत्यल्प होतो असाच व्यवसाय करून मी जगत आहे आणि प्रामाणिकपणाने एकीकडून माल विकत घेऊन दुसरीकडे विकतो. मद्य मात्र विकत नाही. सर्वांचा जो नित्य मित्र असतो, सर्वांच्या हितामध्ये जो कायावाचामनेकरून रत असतो तोच धर्मज्ञ होतो. दुसऱ्यांची कर्मे मी स्तवित नाही अथवा निंदित नाही. आकाशाप्रमाणे अलिप्त होऊन या जगाच्या वैचित्र्याकडे पाहत असतो. प्रेम आणि द्वेष या विकारांपासून मी अलिप्त आहे. सर्व प्राणिमात्रांविषयी माझी बुद्धी सम आहे. म्हणून माझी हातातील तुला (तराजू) सम राहते. मी नि:स्पृह आहे. अर्थ आणि कामोपभोग यांची इच्छा नष्ट झाली आहे. ज्याला लोक भीत नाहीत आणि लोकांना जो भीत नाही असा मनुष्यच ब्राह्मण होतो. प्राणिमात्राबद्दल ज्याला पापबुद्धी नसते त्यालाच ब्रह्मप्राप्ती होते. सर्व प्राणिमात्रांना अभयदान हे सर्वात श्रेष्ठ होय. प्राण्यांच्या अहिंसेपेक्षा दुसरा श्रेष्ठ धर्म नाही. प्राण्यांच्या कल्याणाकरताच धर्मोपदेश करावयाचा असतो. लोकांमध्ये रूढ आचार काय आहेत याची पर्वा करू नये. त्या आचारांच्या मुळाशी असलेला युक्तिवाद किंवा बुद्धिवाद तपासणे आवश्यक असते. उपपत्तियुक्त, यती आणि धर्मशील यांनी सतत कुशलतेने आचारलेला आणि विचारशीलांनी प्रशंसिलेला धर्मच स्वीकारावा.'' (महाभारत, शांतिपर्व २५६).

काम म्हणजे इंद्रियांच्या विषयांचे आकर्षण. काम मनुष्याच्या विवेकाला दूषित करतो. त्यामुळे सत्याचा निर्णय करण्यास बुद्धी असमर्थ होते. काममुक्त मनाला खरी शांती लाभते आणि सत्याचा प्रकाश प्राप्त होतो. हा विचार प्राचीन उपनिषदांमध्येच स्पष्ट रूपाने मांडलेला आहे. भगवान बुद्धाचा 'प्रतीत्यसमुत्पाद' हा संसारसिद्धांत व मोक्षसिद्धांत आहे. त्याच्यामध्ये अविद्या व तृष्णा ही संसाराचे मुख्य कारण म्हणून निर्दिष्ट केली आहेत. तृष्णा म्हणजे विषयभोगाची तीव्र इच्छा. हा संसारसिद्धांत प्रथमत: बृहदारण्यक उपनिषदात विस्ताराने मांडला आहे. कामनेने संकल्पनिर्वाण होतो, संकल्पाने कर्म घडते, कर्म जसे घडते तसे फळ मिळते. पुण्यकर्माने म्हणजे सत्कर्माने सुस्थिती प्राप्त होते. पापकर्माने दु:स्थिती प्राप्त होते; परंतु जो काममुक्त होतो, निष्काम बनतो, तो संसारापासून मुक्त होतो. तेव्हा मनुष्य अमर होतो आणि येथेच त्याला ब्रह्मप्राप्ती होते असे बृहदारण्यक उपनिषदात (४।४।५ ते ७) म्हटले आहे.

तेथेच (४।३।३३) विद्वान, निष्पाप आणि अकामनहत म्हणजे कामाच्या माऱ्यातून सुटलेला म्हणजे निष्काम माणूस हाच ब्रह्मलोक होय, परम आनंदन होय, असे म्हटले आहे. हा सिद्धांत तैत्तिरीय उपनिषदात (२।८) जवळजवळ त्याच शैलीत मांडलेला आहे. विद्वान, बलवान, उत्साहसंपन्न अशा माणसाला पृथ्वीवर संपत्ती प्राप्त व्हावी या स्थितीतला आनंद म्हणजे मानवी आनंद होय. या आनंदापेक्षा शतपट मनुष्य गंधर्वाचा आनंद असतो. तसाच काममुक्त विद्वानाचा आनंद असतो. मनुष्यगंधर्वापेक्षा देवगंधर्वाचा, त्यांच्यापेक्षा दीर्घकाल स्वर्गात राहणाऱ्या पितरांचा, त्यांच्यापेक्षा जन्मसिद्ध देवांचा, त्यांच्यापेक्षा कर्मदेवांचा,

त्यांच्याहीपेक्षा इंद्राचा, इंद्रापेक्षा बृहस्पतीचा, बृहस्पतीपेक्षा प्रजापतीचा, प्रजापतीपेक्षा ब्रह्माचा आनंद शतपट असतो. तितकाच आनंद विद्वान निष्काम मनुष्याचा असतो, असे गणित तैत्तिरीय आणि बृहदारण्यक उपनिषदांमध्ये मांडले आहे.

भगवान बुद्धाच्या चरित्रकथेत काम हा महासामर्थ्ययुक्त राक्षसी पापपुरुष 'मार' म्हणून कल्पिला आहे. सिद्धार्थ गौतम व मार यांच्या संघर्षाची ही कथा हे एक रूपक आहे. ते असे : भगवान बुद्धाला बोधिवृक्षाखाली साक्षात्कार होऊन बुद्धत्व प्राप्त होण्याची वेळ आली आहे. त्या प्रसंगी मार (काम) या आसुरी पापपुरुषाला सिद्धार्थ गौतम हा बुद्ध होणार आणि मुक्त होणार हे मुळीच आवडले नाही. त्याला अतिशय वाईट वाटले. सिद्धार्थ राजकुमार बुद्ध होण्याच्या बेतात आहे, हे पाहून मार फार अस्वस्थ झाला होता. त्याच सुमारास सुजाता नावाच्या एका सुंदर तरुणीने पुत्रलाभ झाल्यामुळे आनंदी होऊन बोधिसत्त्व सिद्धार्थाला वनदेवता समजून पायस म्हणजे खिरीने भरलेले ताट अर्पण केले; परंतु थोड्याच वेळात सुजातेच्या लक्षात आले, हा कोणीतरी महान तपस्वी आहे. ती सिद्धार्थ गौतमाला म्हणाली,

''आपल्यासारख्या साधूपुरुषाने या नैवेद्याचे ग्रहण केले तर माझी देवता माझ्यावर प्रसन्न होईल.''

बोधिसत्त्वाने ते अन्न स्वीकारले, मितभोजन केले, सुजातेला आशीर्वाद दिला आणि नदीतीरावर फिरत फिरत एका अवत्थ वृक्षाजवळ आला. तेथे गवत गोळा केले. गवताचे आसन तयार केले आणि झाडाच्या पूर्वेस त्या आसनावर ध्यानस्थ बसला. मार हा राक्षसी पापपुरुष टपला होताच. तो आपल्या मनाशी म्हणाला, ''हा तरुण राजकुमार मोठा दृढनिश्चयी दिसतो. मला झिडकारून माझ्यापासून स्वतंत्र होण्याचा मोठा खटाटोप याने चालविला आहे. माझ्या तावडीतून कोणताही श्रमण किंवा ब्राह्मण सुटत नाही. याच वेळी याचे दमन केले पाहिजे नाहीतर माझ्याविरुद्ध बंड करावयाला इतर लोकांनाही हा प्रवृत्त करील.''

असा विचार करून माराने आपली सर्व सेना त्वरित सिद्ध केली व सिद्धार्थाला चारी बाजूंनी वेढून त्याच्यावर तुटून पडावयाला आपल्या योद्ध्यांना हुकूम केला. सिद्धार्थ लवकरच बुद्ध होणार या आशेने ब्रह्मादिक देवगण बुद्धपूजा करण्यासाठी बोधिवृक्षाखाली जमले होते; परंतु जेव्हा त्यांनी चारी बाजूंनी वातवेगाने धावत येणारी ती मारसेना पाहिली तेव्हा त्यांचे सर्व धैर्य गळून गेले. एकदेखील देव त्या ठिकाणी राहू शकला नाही. देवराज शुक्र आपला विजयशंख घेऊन पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला जाऊन दडून बसला. ब्रह्मदेवाने बुद्धपूजा करण्यासाठी 'वेत'च्छत्र आणले होते ते सुमेरू पर्वताच्या पायथ्याशी टाकून तोदेखील ब्रह्मलोकी जाऊन स्वस्थ बसला. इतर देव तर दशदिशांना पळत सुटले. सिद्धार्थापाशी त्याच्या रक्षणाला त्याचे स्वत:च्या तपश्चर्येने प्राप्त करून घेतलेले पुण्यच राहिले होते.

माराने आपल्या सैन्याला पुढे पाठविले व गिरिमेखल नावाच्या हत्तीवर आरूढ होऊन तो मागोमाग निघाला. माराच्या सेनेने सिद्धार्थाचा पराजय करण्याची पराकाष्ठा केली.

शस्त्रास्त्रांचा निरंतर वर्षाव चालवला; परंतु त्या तीक्ष्ण शस्त्रास्त्रांची फुले बनून बोधिसत्त्वाच्या पायापाशी पडत राहिली. माराला जय मिळण्याची आशा राहिली नाही. त्याने आपल्या शक्तीने भयंकर तुफान उठवले. वृक्ष तटातट उन्मळून पडू लागले. आकाश धुळीने भरून गेले. पशुपक्ष्यादिकांचा एकच आक्रोश सुरू झाला; परंतु बोधिसत्त्वाची समाधी तीळमात्र ढळली नाही आणि बोधिवृक्षाचे एकदेखील पान हलले नाही. हे पाहून मार अधिक संक्षुब्ध झाला. त्याने प्रचंड पर्जन्यवृष्टी सुरू केली; परंतु बोधिसत्त्वाला आणि त्याच्या आसनाला पाण्याचा स्पर्शही झाला नाही. नंतर पाषाणवृष्टी, तप्त अंगारसृष्टी, तप्त भस्मवृष्टी, तप्त वालुकावृष्टी आणि तप्त पंकवृष्टी अशा सहा वृष्ट्या उत्पन्न केल्या तरी बोधिसत्त्वाची समाधी ढळली नाही. मार फारच खिन्न झाला. त्याने भयानक अंधकार उत्पन्न केला. वस्तुत: ती वैशाख शुद्ध पौर्णिमेची रात्र होती. शुभ्र चंद्रिका जिकडेतिकडे पसरण्याची वेळ; परंतु तरी घनदाट अंधकार पसरला. घुबडांनाही दिसेना. परंतु बोधिसत्त्व हा ज्ञानरवी होता. त्याच्या समाधीला मुळीच व्यत्यय आला नाही. माराने आपली सर्व शक्ती वेचली आणि दु:खी होऊन तो बोधिसत्त्वाजवळ आला आणि म्हणाला, ''येथून मुकाट्याने चालता हो नाही तर तुझा क्षणार्धात नाश होईल.''

बोधिसत्त्व म्हणाला, ''हे मार, तुझ्या सैन्याची मला चांगली परीक्षा आहे. सुखोपभोगाच्या, चैनीच्या नाना प्रकारच्या वस्तू, हे सगळे इंद्रियांचे सुखद विषय हे तुझे सैन्याचे पुढे जाणारे पथक आहे. त्याच्या मागोमाग अरति, तृष्णा, भूक, आळस, कुशंका, गर्व, कीर्तीची आशा, आत्मस्तुती व परनिंदा हे तुझ्या सैन्याचे अनेक विभाग आहेत. पण मला तुझ्या या सर्व सेनेची मुळीच पर्वा वाटत नाही. कच्च्या मातीचे भांडे दगडाने सहज फोडता येते तसे माझ्या प्रज्ञेच्या योगाने तुझ्या सेनेचा पराभव सहज करता येईल.''

मार म्हणाला, ''तू ज्या आसनावर बसला आहेस ते आसन माझे आहे. तेथून उठून ताबडतोब चालता हो.''

बोधिसत्त्व म्हणाला, ''मारा, हे आसन तुझे आहे याला पुरावा काय?''

माराच्या फौजेतील पुष्कळ योद्धे पुढे सरसावले आणि 'हे आसन माराचे आहे याला आम्ही साक्षी आहो' असे म्हणू लागले.

तेव्हा मार बोधिसत्त्वाला म्हणाला, ''हा पाहा माझा पुरावा. तुझा पुरावा काय आहे तो दखव.''

बोधिसत्त्व म्हणाला, ''हे मार, मी अनेक जन्मी दानपारमिता परिपूर्ण केल्यामुळे या आसनावर बसण्यास अधिकारी झालो आहे.''

मार म्हणाला, ''पण तू दानपारमिता पूर्ण केलीस याला साक्षी कोण?''

बोधिसत्त्व आपल्या उजव्या हाताने पृथ्वीला स्पर्श करून म्हणाला, ''हे मार, माझ्या पुण्यकर्माला दुसरा कोणी जिवंत साक्षी येथे मिळणे कठीण आहे. कारण जे कोणी अगोदर

होते ते सर्व दशदिशांना निघून गेले आहेत. ही सर्वसहा वसुंधरा माझ्या पुण्यकर्माबद्दल साक्ष देईल.''

बोधिसत्त्वाने हे शब्द उच्चारल्याबरोबर पृथ्वीच्या पोटातून एक सुंदर देवता प्रकट झाली व ती माराला म्हणाली, ''मारा, सिद्धार्थ कुमाराने पूर्वजन्मी अनेक प्रसंगी महादान दिल्याबद्दल मी साक्षी आहे. याने याचकांच्या हातावर सोडलेल्या पाण्याने भिजलेले हे माझे केस अजून ओले आहेत.''

असे बोलून पृथ्वीदेवतेने आपले केस पिळून त्यातून पाणी काढले. त्या दानजलाचा प्रवाह इतका मोठा होता की, मार, त्याची सेना आणि त्याचा गिरिमेखल हत्ती हे सर्व कोठल्या कोठे वाहून गेले. मारसेनेची दुर्दशा झाल्यावर ब्रह्मादी देवलोक बोधिवृक्षाभोवती जमले व सिद्धार्थावर दिव्य पुष्पवृष्टी करून त्यांनी त्याचा जयजयकार केला.

ब्रह्मा, इंद्र इत्यादी देवगणांनी सिद्धार्थाचा जयजयकार करून दिव्य पुष्पवृष्टीने त्याची पूजा केली. ब्रह्मादी देवगण नंतर आपापल्या ठिकाणी गेले. त्यानंतर सिद्धार्थ ध्यानस्थ बसला आणि रात्रीचा पहिला प्रहर संपण्यापूर्वी जीवनात जे माणसाने जाणले पाहिजे, जे जाणल्याने मनुष्य दु:खमुक्त होतो अशा सत्याचा साक्षात्कार सिद्धार्थाला झाला. दु:खाचा उगम कसा होतो आणि निरोध कसा होतो हे सिद्धार्थाला समजले. या सिद्धांताला प्रतीत्यसमुत्पाद असे म्हणतात. त्याबरोबरच त्याच्या ज्ञानदृष्टीमध्ये चार आर्यसत्ये आणि तदंतर्गत आर्य अष्टांगिक मार्ग प्रतीत झाला. मनुष्य प्राण्याचे हिताहित कशात आहे, याचे आता त्याला स्पष्ट ज्ञान झाले. तेव्हा तो आपणाशीच उद्गारला, ''ध्यानस्थ ब्राह्मणाला मोठ्या प्रयत्नाने जेव्हा सद्धर्माचा साक्षात्कार होतो तेव्हा त्याच्या सर्व कुशंका विलयाला जातात. का, की कार्यकारण परंपरेचे त्याला नीट ज्ञान झालेले असते.'' त्या रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी आणि पुन्हा त्या रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी बुद्धाने प्रतीत्यसमुत्पादाचे पुन: समालोचन करून उद्गार काढले की, ''ध्यानस्थ ब्राह्मणाला मोठ्या प्रयत्नाने जेव्हा सद्धर्माचा साक्षात्कार होतो तेव्हा त्याच्या सर्व कुशंका विलयाला जातात आणि अंतरिक्षात प्रकाशणाऱ्या सूर्याप्रमाणे मारसेनेचा विध्वंस करून तो प्रकाशत राहतो.''

बुद्ध त्याच आसनावर सात दिवसपर्यंत विमुक्तिसुखाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसला. आठव्या दिवशी त्या आसनावरून उठून तो वटवृक्षाखाली गेला व तेथेही तो सात दिवसपर्यंत ध्यानस्थ बसला. तेथे एक ब्राह्मण येऊन त्याला म्हणाला, ''हे गौतम, कोणत्या गोष्टीमुळे मनुष्याला ब्राह्मण म्हणता येईल? ब्राह्मणाचे कर्तव्य काय?''

हे ऐकून बुद्धाने उत्तर दिले, ''ज्याने पापाला आपल्या अंत:करणातून काढून टाकले आहे, गर्वमल ज्याच्या अंत:करणाला शिवू शकत नाही, ज्याचे ब्रह्मचर्य परिपूर्ण आहे, ज्याला इहलोकीच्या कोणत्याही गोष्टीविषयी तृष्णा नाही, तोच आपणाला सत्यत्वाने ब्राह्मण म्हणू शकेल.''

पुढच्या आठवड्यात बुद्ध मुचिलिंद वृक्षाखाली गेला व तेथेही एक सप्ताह ध्यानस्थ बसला. त्या वेळी अकालिक मेघ उत्पन्न होऊन मोठी वृष्टी झाली तेव्हा बुद्धाला वृष्टीची बाधा होऊ नये म्हणून एक नागराजा बुद्धाच्या मस्तकावर फणा धरून उभा राहिला. त्याचे नाव मुचिलिंद होते. तो नागलोकातून बाहेर निघाला होता. काही काळानंतर पाऊस थांबला. आकाश स्वच्छ झाले. मुचिलिंद नागराजा आपले स्वरूप पालटून कुमार वेषाने हात जोडून बुद्धासमोर उभा राहिला. त्याला पाहून बुद्धगुरु उद्गारला, ''धर्माचे ज्ञान संपादून जो त्यातील रहस्य जाणून संतुष्ट होतो त्याला एकांतवास सुखावह होतो; आणि प्राणिमात्रावर मैत्री केल्याने सुख कसे होते हे त्याला समजते. इहलोकी कामवासनेचे उल्लंघन करून वैराग्याचा लाभ होणे सुखकारक आहे; पण याच्याही पलीकडे अहंकार नष्ट होणे ही खरोखर सुखाची परमावधी समजली पाहिजे.''

त्यानंतर बुद्ध मुचिलिंद वृक्षाखालून राजायतन वृक्षाखाली गेला आणि तेथे विमुक्तिसुखाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसला. त्यावेळी तपुस्स आणि भल्लिक नावाने दोन व्यापारी बुद्धगुरुजवळ आले. बुद्धाची गंभीर व प्रसन्न मुद्रा पाहूनच त्या दिवसापासून ते त्याचे शिष्य झाले. बुद्धाच्या उपासकांत म्हणजे गृहस्थशिष्यांत हेच दोघे पहिले उपासक होत. त्यानंतर एक सप्ताह समाप्त झाल्यावर बुद्ध पुन: वटवृक्षाखाली येऊन बसला. तेथे त्याच्या मनात असा विचार आला की, ''मला जे धर्मज्ञान झाले आहे त्याचा बोध प्रपंचामध्ये आसक्त होऊन गढून गेलेल्या माणसाला होणे शक्य नाही. मी जरी धर्मोपदेश केला तरी लोकांना माझ्या धर्माचे नीट आकलन होणार नाही. म्हणून आता कायमच एकांतामध्येच कालक्रमण करावे हे बरे.''

हे बुद्धाचे मनोगत तत्क्षणी ब्रह्मदेवाने जाणले आणि तो स्वत:शीच उद्गारला, ''सम्यक संबुद्धाचे मन एकांतवासाच्या सुखात रमून गेले आहे. त्याने जगाला धर्मोपदेश केला पाहिजे, नाही तर जगाची मोठी हानी होणे अटळ आहे.''

तेव्हा ब्रह्मदेव त्वरित ब्रह्मलोकामधून भूलोकी बुद्धासमोर प्रकट झाला व बुद्धाला हात जोडून म्हणाला, ''हे बुद्धगुरु, तुझ्या अमृततुल्य धर्माचा लोकांना उपदेश कर. या जगामध्ये ज्यांच्या ज्ञानावर अज्ञानपटल घट्ट बसले नाही, असे पुष्कळ प्राणी आहेत. केवळ तुझे धर्मवाक्य त्यांच्या कानी न पडल्यामुळे त्यांची हानी होत आहे. तू जर उपदेश करशील तर त्यातील रहस्य जाणणारे पुष्कळ लोक या जगात सापडतील. हे बुद्धगुरु, आजपर्यंत या मगध देशात जे धर्म प्रचलित झाले ते परिशुद्ध नव्हते. कारण मलिन अंत:करणाच्या माणसांनी त्यांचा प्रसार चालविलेला होता. मलरहित अंत:करणाने जाणलेला हा तुझा धर्म लोकांना ऐकू दे. हे अमृताचे द्वार तू सामान्य जनांकरिता उघडे कर. पर्वतशिखरावर राहून जसे आपण खालच्या प्रदेशातील लोकांकडे पाहतो तसा प्रज्ञेच्या शिखरावर चढून तू या जन्मजरादिक दु:खांनी पीडित झालेल्या लोकांकडे निर्भयपणे पाहा. हे शूरवीर, माराशी युद्ध करून तू विजय

मिळविला आहेस. हे लोकनायक, तू सर्व ऋणांतून मुक्त झाला आहेस. आता लोकांमध्ये संचार करून तुझ्या धर्माचा प्रसार कर. तुझा धर्म जाणणारे पुष्कळ लोक तुला भेटल्यावाचून राहणार नाहीत.'' बुद्धाने ब्रह्मदेवाची विनंती मान्य केली.

बुद्ध हळूहळू प्रवास करीत करीत ऋषिपतनाला आला. वाराणसीजवळ ऋषिपतन नावाच्या या उपवनामध्ये त्याला पाच तपस्वी भेटले. या पाच तपस्व्यांनी आपसात ठरविले की, आपण तथागत गौतमाचा कोणत्याही रीतीने आदरसत्कार करू नये; परंतु बुद्ध त्यांच्या आश्रमाच्या दाराशी आल्याबरोबर त्या पाच तपस्व्यांचा बेत आपोआपच ढासळला आणि एका श्रेष्ठ अतिथी-अभ्यागताप्रमाणे बुद्धाची त्यांनी पूजा केली. बुद्धाने त्यांना आपला धर्मोपदेश ऐकण्याकरता अवधान देण्यास सांगितले. बुद्ध सांगू लागला, ''भिक्षु हो, कामोपभोगामध्ये सुख मानणे हा एक अंत आहे; परंतु हा अंत हीन, ग्राम्य, अज्ञजनसेवित, अनार्य आणि अनर्थावह आहे. देहदंडन करणे हा दुसरा अंत आहे. हादेखील दु:खकारक, अनार्य आणि अनर्थावह आहे. तपस्व्याने हे दोन्ही अंत टाळावे. तथागताने या दोन अंतांच्या मधल्या मार्गाचा म्हणजे मध्यमा प्रतिपदेचा शोध केला आहे.

''भिक्षु हो, जन्म, जरा व्याधी, मरण, अप्रिय वस्तूचा समागम आणि प्रिय वस्तूंचा वियोग इ. गोष्टींमुळे मनुष्याला इहलोकी दु:ख होते. हे जे राजापासून रंकापर्यंत सर्वसाधारण दु:ख होत असते त्याला मी पहिले आर्यसत्य म्हणतो. या सर्व दु:खांचा उगम तृष्णेमध्ये होत असतो. इहलोकीच्या वस्तूंची इच्छा ही तृष्णा, स्वर्गलोकीच्या वस्तूंची उत्पन्न होणारी तृष्णा, यथेच्छ सुख भोगल्यावर जग सोडून जाण्याची तृष्णा या तीन तृष्णांमुळे मनुष्यप्राणी अनेक पापे आचरतो आणि दु:ख भोगतो. म्हणून तृष्णेला दु:खाचे मूळ समजले पाहिजे. हे दुसरे आर्यसत्य होय. यास मी दु:खसमृदय म्हणतो. तृष्णेचा निरोध केला तरच निर्वाणाचा लाभ होतो. हा तिसरा सिद्धांत होय. याला मी दु:खनिरोध नामक आर्यसत्य म्हणतो. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मांत, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी हा तो मी नवीन शोध काढलेला मधला अष्टांग मार्ग होय. दु:खाचा निरोध याच मार्गाने होणार आहे. व्रते आणि उपोषणे करून दु:खाचा निरोध व्हावयाचा नाही. हा चौथा सिद्धांत होय. याला मी दु:खनिरोधगामिनी मध्यमा प्रतिपदा (आर्यसत्य) असे म्हणतो. या ज्ञानामुळे मी सम्यक् संबुद्ध या पदाला पोहोचलो आहे.''

त्या पाच ब्राह्मण तपस्व्यांपैकी कौडिन्य ब्राह्मणाला प्रथमत: बुद्धाच्या धमपदेशाचे रहस्य समजले म्हणून त्याला अज्ञात कौडिन्य (ज्ञानी कौडिन्य) असे नाव पडले. बाकीच्या चौघांनाही धर्मबोध झाला. ते पाचही तपस्वी अर्हन्त झाले. त्यांनी लगेच दीक्षा देण्यासाठी बुद्धाला विनंती केली. तेव्हा बुद्ध म्हणाला, ''भिक्षु हो, माझ्या धर्माचा अंगीकार करा. ब्रह्मचर्याचे पालन करा. भवदु:खाचा अंत करा.'' बुद्धाची ही तीन वाक्ये म्हणजेच त्या पाच तपस्व्यांचा प्रव्रज्याविधी होय (महावग्ग).

ब्रह्मा, इंद्र इत्यादी वैदिक देवांनी भगवान बुद्धाचा माराच्या पराभवानंतर जयजयकार केला आणि त्याच्यावर पुष्पवृष्टी केली. याचा गर्भितार्थ असा की, भारतीय संस्कृतीमध्ये निर्माण झालेला बुद्धधर्म हा सुसंगत असा ऐतिहासिक परिणाम होता. वैदिक धर्माहून आणि वैदिक संस्कृतीहून त्यात काही अंशी वैचित्र्य होते; परंतु विसंगती नव्हती. तोही एक पर्यायी धर्ममार्ग म्हणून किंवा धर्मपंथ म्हणून प्रथमपासूनच प्राचीन भारतीयांनी स्वीकारला. याचे प्रत्यंतर श्रीमत्‌भगवद्गीतेमध्ये स्पष्टपणे मिळते. भगवद्गीतेमध्ये ब्रह्मनिर्वाण ही संज्ञा अंतिम नि:श्रेयसाला म्हणजे मोक्षाला अनेक वेळा दिलेली दिसते. विशेषत: गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या अखेरीस स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णिली आहेत. ती भगवान बुद्धाच्या मारविजयाशी आणि तृष्णात्यागाच्या सिद्धांताशी मिळतीजुळती आहेत. स्थितप्रज्ञाच्या लक्षणांतील शेवटचे दोन श्लोक असे -

**''विहय कामान् य: सर्वान् पुमांश्चरति निस्पृह: ।**
**निर्ममो निरंहकार: स शान्तिमधिगच्छति ॥**
**एषा ब्राह्मी स्थिति: पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥"**

**अर्थ -** माणूस सर्व कामनांचा परित्याग करून नि:स्पृह, निर्मम आणि निरहंकार बनून आचरण करतो तेव्हा त्याला शांती मिळते. ही ब्राह्मी स्थिती होय. ही स्थिती प्राप्त झाली असता मोहाची बाधा होत नाही. अखेरच्या वयातही या स्थितीत राहिल्याने ब्रह्मनिर्वाणाची प्राप्ती होते.

निर्वाण हे पद बौद्ध धर्मातील आणि बौद्ध तत्त्वज्ञानातील मोक्ष या अर्थी पारिभाषिक पद आहे आणि भगवद्गीतेत हे पद वारंवार उपयोगात आणले आहे.

बुद्धाच्या वरील चातुर्वर्ण्य मीमांसेचा भगवद्गीतेवर प्रभाव पडलेला दिसतो. महाभारतावर तो कसा पडला याची उदाहरणे वर दिलीच आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र हे कर्माने ठरतात, जन्माने नव्हे, असे गीतेतील चातुर्वर्ण्यविवरणावरून स्पष्ट होते-

**''शमो दमस्तप: शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥**
**शौर्य तेजो धृतिदक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥**
**कृषिगोरक्षवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥"**

**(गीता १८।४८,४९, ५०) ।**

**अर्थ :** शम म्हणजे निर्विकार मन, इंद्रियदमन, तप, शुचिता, क्षमाशीलता, सरलता, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिक्य हे ब्राह्मणाचे स्वभावजन्य कर्म आहे. शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धातून पराङ्मुख न होणे, दानाच्या बाबतीत मुक्तहस्त असणे आणि प्रभुत्वाची शक्ती प्रगट होणे हे क्षत्रियाचे स्वभावजन्य कर्म आहे. कृषिकर्म, गोरक्षण म्हणजे पशुपालन, वाणिज्य हे वैश्याचे स्वभावजन्य कर्म आणि शुश्रूषा हे शूद्राचे स्वाभाविक कर्म होय."

तात्पर्य, या कर्मावरून वर्णनिश्चय करता येतो, जन्माने नव्हे, असे भगवद्गीतेला सुचवायचे आहे. भगवद्गीतेच्या १६ व्या अध्यायामध्ये मानवी गुणांचे मोक्षकारक दैवी संपत आणि बंधनकारक आसुरी संपत असे विभाग सांगितले आहेत. हे विभाग भगवान बुद्धाने वारंवार केलेल्या उपदेशाशी अत्यंत जुळणारे आहेत, की भगवान बुद्धाचाच उपदेश निराळ्या संदर्भात गीतेने मांडलेला आहे, असे वाटावे.

भारतीय संस्कृतीमध्ये विशेषत: प्राचीन हिंदू धर्मामध्ये सगळ्या मोक्षवादी दर्शनांनी प्रतीत्य - समुत्पादावरून निष्पन्न होणारा मोक्षाचा तर्कशुद्ध कार्यकारणभाव मान्य केला. त्यामुळे प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये मोक्ष पुरुषार्थ या अंतिम जीवनमूल्याबद्दल ऐकमत्य राहिले, सुसंवाद राहिला.

प्रतीत्यसमुत्पादाचाच अक्षपाद गौतमाने न्यायसूत्रात संक्षेपाने निर्दोष व रेखीव असा अनुवाद केला आहे तो असा : दुखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये तदन्तरापायादपवर्ग: । मिथ्या ज्ञान, दोष (राग, द्वेष, मोह), प्रवृत्ती (धर्म अधर्म), जन्म आणि दु:ख यांचा क्रमाने नाश होतो. मिथ्या ज्ञान म्हणजेच प्रतीत्यसमुत्पादातील अविधा होय. ती संसारदु:खाचे, आद्य कारण; अविद्या नाशाने क्रमाने दोष, प्रवृत्ती, जन्म व दु:ख यांचा नाश होऊन अपवर्ग = मोक्ष सिद्ध होतो. आद्य शंकराचार्यांनी प्रशंसापूर्वक या न्यायसूत्राचा उल्लेख केला आहे (ब्रह्मसूत्रभाष्य १-१-४).

परंतु विश्वविषयक तत्त्वज्ञाने किंवा दर्शने ही विकल्पाने किंवा पर्यायाने भारतीय संस्कृतीमध्ये प्रतिष्ठित झाली. न्याय, वैशेषिक, सांख्य, रामानुज, माध्व, जैन, सौत्रांतिक, वैभाषिक इत्यादी द्वैतवादी दर्शने यांना विकल्पाने मान्यता प्राप्त झाली. त्याचप्रमाणे शांकर मायावाद, प्रत्याभिज्ञादर्शन, योगाचारांचा विज्ञानवाद आणि माध्यमिकांचा शून्यवाद ही अद्वैतवादी दर्शने तर अधिकच मान्य झाली. भौतिकवादी चार्वाक दर्शनाला लोकायत म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. सांख्य, योग आणि लोकायत या तीन दर्शनांना आन्वीक्षिकी अशी संज्ञा देऊन एक श्रेष्ठ विद्या म्हणून कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये राजपुत्राने अध्ययन करण्याच्या विषयांत समावेश करण्यात आला. भारतीय संस्कृतीत असा सर्व दर्शनांचा आदर सिद्ध होण्याचे कारण, दर्शनांना सांस्कृतिक उच्च मूल्य प्राप्त होण्याचे कारण, भगवान बुद्धाने विश्वदर्शनापासून मोक्षमार्ग अलग केला हे होय. चार आर्यसत्यांमध्ये अष्टांगिक मार्ग सांगितला. अष्टांगिक मार्ग म्हणजे सर्व मानवजातीला संमत होऊ शकणारे उच्च नीतिशास्त्रच

होय. या उच्च नीतिशास्त्राचा यहुदी, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांनी ईश्वराशी सैद्धांतिक संबंध स्थापित केला. ईश्वरावरील श्रद्धेवाचून उच्च नीतिधर्माचे पालन होऊ शकणार नाही, असा दृष्टिकोन यहुदी, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांनी स्वीकारला. त्यामुळे इतिहासात असे दिसते की, इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांनी धर्मप्रसारामध्ये शुद्ध मानवी विवेकबुद्धीला आव्हान देण्याऐवजी ईश्वरविषयक श्रद्धेला आव्हान देऊन धर्मप्रसार केला. त्यामुळे प्रसंगी त्यांच्याकडून जुलूम-जबरदस्तीचा, तलवारीचा आणि राजशक्तीचा धर्मप्रसारार्थ उपयोग करण्यात आला. बौद्ध धर्माचा प्रसार भारताबाहेर अर्ध्या मानवी विश्वात केवळ शांततेच्या मार्गानेच होऊ शकला. याचे कारण शुद्ध मानवी विवेकबुद्धीलाच आवाहन करणारा आणि आव्हान देणारा बौद्ध भिक्षुसंघ धर्मप्रचार करीत राहिला.

भगवान बुद्धाने असे सांगितले की, अहिंसा, विश्वव्यापी मैत्री, विश्वव्यापी करुणा, शील, प्रज्ञा आणि समाधी ही मानवी उद्दिष्टे माणसाला मोक्षामध्ये नेऊन सोडतात. ही अंतिम उद्दिष्टे होत. ईश्वर आणि परलोक यासंबंधीच्या प्रश्नांचा कधीच निश्चितपणे निर्णय होण्यासारखी स्थिती नाही. हे प्रश्न कायम अनिर्णीतच राहणार. अंतिम नैतिक मूल्येच मनुष्याच्या ऐहिक जीवनात शांती आणि समृद्धी निर्माण करू शकतात. आत्मविषयक आणि विश्वविषयक तत्त्वज्ञानांच्या संघर्षातून बुद्धाने नैतिक तत्त्वज्ञान वेगळे काढले, ही बुद्धाची जगाला आणि विशेषत: भारतीय संस्कृतीला निखालस श्रेष्ठ देणगी आहे. या संदर्भात बुद्धाचे अनेक संवाद, धर्मचक्रप्रवर्तनातील अनेक उपदेश आणि तत्त्वचर्चा मार्गदर्शक ठरतात. त्या संवादांपैकी बुद्धाचा शिष्य मालुंक्यपुत्र नावाचा भिक्षु आणि स्वत: भगवान यांचा संवाद विशेष लक्षात ठेवण्यासारखा आहे, तो असा :

बुद्धगुरु श्रावस्तीमध्ये अनाथपिंडिकाच्या उद्यानात राहत असता मालुंक्यपुत्र त्याच्यापाशी आला आणि त्याला नमस्कार करून एका बाजूला आसनावर बसला. नंतर भगवंताला म्हणाला, ‘‘भदंत, एकांतात बसलो असताना माझ्या मनात असा प्रश्न उत्पन्न झाला, की हे जग नित्य आहे की अनित्य आहे? शरीर, आत्मा एक आहेत की भिन्न आहेत? मरणोत्तर तथागत असतो की नसतो? या प्रश्नांचे भगवंताने उत्तर दिलेले नाही. तेव्हा मनात आले की, या मुद्यांसंबंधी आपणापाशी येऊन चर्चा करीन. आपण त्या मुद्यांचे निश्चित समाधानकारक उत्तर दिले तरच मी आपला शिष्य होईन. यासंबंधी आपणास काही माहीत नसेल तर तसे स्पष्ट सांगा. हाच सरळ मार्ग होय.’’

भगवान बुद्ध म्हणाला, ‘‘मालुंक्यपुत्र, तू माझा शिष्य होशील तर या मुद्यांचे स्पष्टीकरण करून सांगेन असे मी तुला कधी सांगितले होते काय?’’

‘‘नाही भदंत’’ मालुंक्यपुत्र म्हणाला.

बुद्ध म्हणाला, ‘‘मला कधीतरी म्हणालास काय, की जर तुम्ही मला या सर्व मुद्यांचे स्पष्टीकरण करून सांगितले तर मी तुमच्या भिक्षुसंघात येईन?’’

''नाही भदंत'' मालुंक्यपुत्र म्हणाला.

बुद्ध म्हणाला, ''तर मग आता हे मुद्दे स्पष्ट करून सांगितल्याशिवाय मी तुमचा शिष्य होणार नाही या म्हणण्यात काय अर्थ?''

''मालुंक्यपुत्र, एखाद्या मनुष्याच्या अंगामध्ये बाणाचे विषारी शल्य शिरून तो तळमळत असता त्याचे आप्त-इष्ट शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्याला बोलावून आणतील, तेव्हा तो रोगी त्या वैद्याला असे म्हणेल काय, की हा बाण कोणी मारला? ज्याने मारला तो ब्राह्मण होता की क्षत्रिय होता की वैश्य होता की शूद्र होता? काळा होता की गोरा होता? त्याचे धनुष्य कोणत्या प्रकारचे होते? धनुष्याची दोरी कशाची केली होती? इत्यादी सर्व गोष्टी जोपर्यंत तुम्ही मला समजावून देणार नाही तोपर्यंत मी या जखमेला हात लावू देणार नाही. मालुंक्यपुत्र, अशा प्रसंगी त्या माणसाला या सर्व प्रनांची उत्तरे मिळणार नाहीत, मिळण्याच्या अगोदरच तो मरून जाईल. त्याचप्रमाणे जो साधक असा हट्ट धरील की, मला हे जग नित्य आहे की अनित्य आहे, आत्मा आणि शरीर एक आहे की भिन्न आहे इत्यादी सर्व मुद्दे समजल्यावाचून मी ब्रह्मचर्याचा अभ्यास करणार नाही, तर त्याला हे मुद्दे समजल्यावाचूनच मरण येईल. ब्रह्मचर्य दूरच राहील. मी या मुद्यांना अव्याकृत असे म्हणतो. धार्मिक आचरणाला त्यापासून मदत होईल असे नाही. जरा, मरण, शोक, पश्चात्ताप, चिंता यांच्यापासून त्या मुद्यांच्या ज्ञानामुळे मुक्तता होईल, असे नाही. शरीर आणि आत्मा एक आहे किंवा शरीर आणि आत्मा भिन्न आहेत इत्यादी गोष्टींबद्दल काहीही निश्चित मानले तरी जन्म, जरा, मरण, शोक, परिवेदना यांच्यापासून मुक्ती होणार नाही. या गोष्टींच्या वादविवादाने ब्रह्मचर्याला कोणत्याही प्रकारे स्थैर्य येण्याचा संभव नाही, वैराग्य उत्पन्न होणार नाही, पापाचा निरोध व्हावयाचा नाही, शांती, प्रज्ञा, संबोध आणि निर्वाण यांचा लाभ व्हावयाचा नाही. पण मालुंक्यपुत्र, हे दु:ख आहे, हा दु:खाचा समुदय आहे, हा दु:खाचा निरोध आहे आणि हा दु:खाचा मार्ग आहे हे मी स्पष्ट करून दाखविले आहे; का की ही चार आर्यसत्ये ब्रह्मचर्याला स्थैर्य आणणारी आहेत. यांच्यामुळे वैराग्य येते. पापांचा निरोध होतो. शांती, प्रज्ञा, संबोध आणि निर्वाण यांचा लाभ होतो. म्हणून हे मालुंक्यपुत्र, ज्या गोष्टींची मी चर्चा केली नाही त्या गोष्टींची चर्चा न करणे बरे. ज्या गोष्टींचे मी स्पष्टीकरण केले आहे त्या गोष्टी स्पष्टीकरणाला योग्य आहेत असे समजा.'' बुद्धगुरु असे बोलल्यावर मालुंक्यपुत्राने त्याच्या भाषणाचे अभिनंदन केले (चूलमालुंक्यपुत्तसुत्त, मज्झिमनिकाय, पण्णासक २, वग्ग १).

आर्य अष्टांगिक मार्ग हे चौथे आर्यसत्य आहे. हाच मध्यम मार्ग होय. सम्यक दृष्टी इत्यादी आठ अंगे या मार्गाची आहेत. १) सम्यक् दृष्टी - दु:ख, दु:खाचे कारण, दु:खनाशाचे स्वरूप आणि दु:खनाशाची साधने यांचे निश्चित असे ज्ञान. २) सम्यक् संकल्प - एकांतवासाची आवड म्हणजे नैष्कर्व्यसंकल्प होय; प्राणिमात्रांवर शुद्ध प्रेम म्हणजे अव्यापादसंकल्प होय. आपणापासून दुसऱ्याला त्रास होऊ नये म्हणजे अविहिंसा संकल्प होय. या तीन संकल्पनास

सम्यक् संकल्प म्हणतात. ३) सम्यक् वाचा - असत्य न बोलणे, चुगलखोरी न करणे, कठोर शब्द न उच्चारणे आणि व्यर्थ भाषण न करणे या नियमांना सम्यक् वाचा म्हणतात. ४) सम्यक् कर्मान्त - प्राण्याचा घात न करणे, चौर्य न करणे, परस्त्रीगमन न करणे. ५) सम्यक् आजीव - उपजीविका योग्य साधनांनीच करणे. ६) सम्यक् व्यायाम - कुविचार वर्ज्य करण्याचा मनाने नित्य प्रयत्न करणे. ७) सम्यक् स्मृती - उच्च विचार न विसरणे, ते विचार नित्य जागृत ठेवणे. ८) सम्यक् समाधी - चार प्रकारचे ध्यान, सर्व कामवासनांचा आणि दुष्ट मनोवृत्तींचा निरोध करून ध्यान संपादन करणे, चित्ताची प्रसन्नता आणि एकाग्रता राखणे, वितर्क आणि विचार यांनी युक्त ध्यान करणे म्हणजे प्रथम ध्यान संपादन करणे. चित्ताची पूर्ण एकाग्रता साधल्यावर वितर्क विचाररहित मन करून त्यात रमणे, हे द्वितीयध्यान संपादन होय. अंतर्बाह्य मन:स्थितीची उपेक्षा करण्यात सुख उत्पन्न होणे हे तृतीय ध्यान संपादित करणे. सुख आणि दु:ख यांची उपेक्षा आणि शुद्ध ज्ञानप्रवाह साधणे हे चतुर्थ ध्यान होय. या चारी ध्यानाच्या पायऱ्यांवर मन स्थिरावले म्हणजे सम्यक् समाधी होय.

समाधियोग हा भारतीय संस्कृतीतील उच्च दर्जाचा विश्वव्यापी होणारा क्रियायोग होय. बौद्ध धर्माचा भारताच्या बाहेर जो प्रसार झाला त्यात भारतीय संस्कृतीने केलेले महत्त्वाचे मानवी मानसिक उन्नतीचे उत्कृष्ट साधन समाधियोग होय. भारतीय संस्कृतीमध्ये योगी हा आदर्श मानव म्हणून मान्य झालेला आहे. त्याचा भारतीय कलाक्षेत्रामध्ये उच्च कलात्मक आविष्कार झाला आहे. सिंधू संस्कृती वगळल्यास वर्तमानकालीन अत्यंत प्राचीन भारतीय कलेचे जे उच्च दर्जाचे अवशेष भग्न किंवा पूर्ण रूपात उपलब्ध होतात, त्यात ध्यानस्थ बुद्ध हा एक सर्वात महत्त्वाचा प्रकार होय.

भारतीय दर्शनांच्या इतिहासात बौद्ध न्याय आणि आक्षपाद गौतमाचे न्यायदर्शन यांचा परस्परांच्या विकासावर परिणाम झाला आहे. बौद्ध न्याय आणि वैदिकांचा अक्षपाद गौतमप्रणीत न्याय यांचा वैचारिक संघर्ष एक सहस्र वर्षेपर्यंत चालला होता. नागार्जुनाची मध्यमककारिका न्याय-वैशेषिकांच्या पदार्थांचे खंडन करते. अक्षपाद गौतमाच्या न्यायसूत्रात आणि न्यायभाष्यात माध्यमिक शून्यवादाचा विचारविमर्श केला आहे. अक्षपाद आणि वात्स्यायन यांच्या प्रमाण लक्षणांचा प्रतिवाद आपल्या प्रमाणसमुच्चय आणि न्यायप्रवेश या ग्रंथात दिङ्नाग करतो. त्यानंतर न्यायवार्तिककार उद्योत दिङ्नागाच्या विचारांचे खंडन आणि न्यायभाष्यकारांचे समर्थन करतो. उद्योतकाराच्या वार्तिकातील बौद्ध न्यायावरील आक्षेपांचे सविस्तर उत्तर धर्मकीर्ती या बौद्ध आचार्याने आपल्या 'प्रमाणवार्तिक' या ग्रंथात दिले आहे. धर्मकीर्तीचा सविस्तर विचारविमर्श एक श्रेष्ठ दार्शनिक वाचस्पतिमिश्र याने आपल्या न्यायवार्तिकतात्पर्यटीका व न्यायकणिका या ग्रंथात केला आहे. बौद्ध तत्त्वज्ञानावरचा अखेरचा वैचारिक हल्ला उदयनाचार्यांनी आपल्या 'आत्मतत्त्वविवेक' या ग्रंथात केला आहे. भारतीय वैदिक षड्दर्शनांचा दोन सहस्र वर्षांचा इतिहास हा मुख्यत: बौद्ध

दर्शन आणि वैदिकांची षड्‌दर्शने यांचा वैचारिक संघर्षच होय. हा संघर्ष भारतीय दर्शनिक विचारांच्या विकासाची प्रेरक शक्ती बनला आहे, असे ध्यानात भरते. त्यामध्ये कालांतराने जैन अनेकांतवादाने दीर्घकालापर्यंत भाग घेऊन योगदान केले आहे.

भारतीय कलेतिहासात हिंदू धर्म, बौद्ध धर्म आणि जैन धर्म या तिन्ही धर्मांच्या प्रेरणा समर्थपणे सफल झालेल्या दिसतात. संस्कृत साहित्य या तिन्ही धर्मांनी समृद्ध बनले आहे. रामायण, महाभारत, हरिवंश, विष्णुपुराण, अनेक शिवपुराणे, वैष्णव भागवत आणि देवीभागवत यांच्या योगाने काव्य, नाटक, मंदिरकला, मूर्तिकला व चित्रकला यांची जशी अभिवृद्धी झाली, तशीच त्रिपिटक इत्यादी पाली भाषेतील ग्रंथ आणि सद्धर्मपुंडरीक इत्यादी संस्कृत ग्रंथ यांनी प्राचीन भारतीय साहित्याला आणि मूर्ती-मंदिर-चित्र इ. कलांना नवीन नवीन आकृतिबंध निर्माण करण्याची स्फूर्ती अर्पण केली आहे. भास, कालिदास, भवभूती इत्यादी कवींच्या परंपरेमध्ये अवघोषाचे स्थानही प्रशंसिले जात असते. शाकुंतल नाटकातील कण्वाश्रम हा मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार ब्रह्मविहारांचा उत्कट, भव्य व रमणीय असा आविष्कार म्हणून लक्षात भरतो. काश्यप कण्व हे अभिधान भगवान बुद्धाच्या प्रथम शिष्यांपैकी उरूवेल काश्यप या काश्यपाच्या आश्रमाची आठवण करून देते. शाकुंतलात कण्वाचा निर्देश वारंवार काश्यप असाच केलेला आढळतो.

**(पूर्वप्रसिद्धी : नवभारत, मे/जून १९८८)**

०००

६७

# बुद्धिप्रामाण्यवादी चळवळ निर्माण करण्याचे कर्तव्य

इतिहास हे एक सामाजिकशास्त्र आहे. मानव जातीच्या इतिहासाचा पद्धतशीर अभ्यास केल्यास असे आढळते की मानव संस्कृतीचा इतिहास ६००० वर्षांचा आहे. या ६००० वर्षांत जगामध्ये अनेक संस्कृती उदयास आल्या आणि ऱ्हास पावल्या. चिनी आणि भारतीय संस्कृती या सलग ५००० वर्षांचा इतिहास असलेल्या संस्कृती आहेत. इतिहासकार काळाचे जे मोजमाप करतात. ते भरभक्कम पुराव्यावर आधारलेले असते. भारतीय पुराणात दिसणारे गतकाळाचे मोजमाप समजुतीवर आधारलेले आहे. काल्पनिक आहे. म्हणून भारतीय पुराणांना इतिहास म्हणता येणार नाही.

पाच हजार वर्षांची सलग परंपरा असलेल्या आपल्या देशात विचारांचे परिवर्तन झाले पाहिजे हे मौलिक परिवर्तन केवळ विचारांच्या पातळीवरच होऊन भागणार नाही, तर लोकांच्या प्रत्यक्ष आचारामध्ये मौलिक परिवर्तन व्हायला पाहिजे. कारण भारतातील समाजाच्या परंपरागत रचनेमध्ये मूलभूत बदल झाला पाहिजे. असा बदल जर झाला नाही तर देशाला भवितव्य नाही.

भारतामध्ये गेली १५० वर्षांपासून मन्वंतर सुरू झाले आणि या मन्वंतराची परिणती म्हणून ४० वर्षांपासून देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. फार मोठ्या अवनतीच्या चक्रातून राजकीयदृष्ट्या देश बाहेर आला. पण लोक अजून परंपरागत विचारातून आणि अंधश्रद्धातून मुक्त झालेले नाहीत. लोकांना वैचारिकदृष्ट्या मुक्त करण्याचे काम सामाजिक कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. ही वैचारिक मुक्तीची चळवळ कित्येक वर्षे चालूच राहिली पाहिजे. देशातील सामान्य लोकांना वैज्ञानिक संस्कृतीतून दिसणारे सत्य पारखून घ्यायला शिकवलं पाहिजे. आधुनिक भारताची निर्मिती हे इतिहासाने दिलेले आव्हान आहे. हे आव्हान स्वीकारले तर देश प्रगती करू शकेल. हे आव्हान स्वीकारून वैचारिक मन्वंतर घडले नाही तर आपला देश पुन्हा एकदा भूतकाळाच्या स्पर्धेत फेकला जाईल.

वैचारिक क्रांती झाली नाही तर समाज बदलायचा नाही. समाज बदलला नाही तर भारतीय संघराज्य विस्कळीत होऊन जाईल. सध्या जातीयवाद पेटतो आहे. मानवी जीवनातील समरसता, मानवी ऐक्याची निष्ठा निर्माण व्हायला पाहिजे, बळकट व्हायला पाहिजे. आज सर्वदूर जातीयवाद वाढतो आहे, पेटतो आहे. या जातीयवादाचा समर्थपणे मुकाबला केला पाहिजे. कारण जातीय भेदभाव पतनाला कारणीभूत होईल. धार्मिक भावना मानव तेवढा एक या कल्पनेच्या आड येईल तर त्याची पर्वा करता कामा नये. संकुचित भावना चेतवणाऱ्या धर्माला धर्म म्हणता येणार नाही. त्याला अधर्मच म्हणावे लागेल. गीतेत म्हटले आहे, ''अधर्माला धर्म म्हणणे हे तामसी वृत्तीचे लक्षण आहे.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभू रामचंद्रावर लिहिलेल्या लेखाच्या विरोधात दोन दिवसापूर्वी सचिवालयावर नेलेला मोर्चा हे तामसी वृत्तीचे, अधर्माचे लक्षण आहे. सर्व मानव एक हा विज्ञानावर आधारलेला नवा विचार आहे. मानवांमध्ये भेदाभेद आहेत हा परंपरागत विचार आहे. या विचाराला वैज्ञानिक आधार नाही. ती एक अंधश्रद्धा आहे. परंपरागत विचार सर्व काळ लागू असणारे सत्य आहे असे मानता येत नाही. परंपरागत विचार तपासावे लागतात आणि विज्ञानाच्या निकषावर ते टिकत नाहीत असे टिकल्यास ते बदलावे लागतात. महात्मा ज्योतिबा फुल्यांनी परंपरागत विचारांवर फार प्रखर हल्ले केले आहेत. फुल्यांचे विचार काहींना आता गैरसोयीचे वाटायला लागलेत. पण महाराष्ट्राच्या भूमीत त्यांचे विचार खोलवर रुजले आहेत. महाराष्ट्राचे हे फार मोठे भाग्य आहे. नवा जातीवादी विचार ज्योतिरावांच्या शिकवणुकीला मारक ठरेल. म्हणून सामाजिक कार्यकर्त्यांनी वैचारिक प्रबोधनाचा वारसा जपून त्याचा फैलाव केला पाहिजे. परंपरा बदलल्या नाही तर इतिहास पुढे जाणार नाही. काळाचे आव्हान आपण स्वीकारले नाही तर काळ आपणाला खाऊन टाकेल.

प्रबोधनाचे कार्य हे वैचारिक नेतृत्वाचे कार्य आहे. मानवी विकासामध्ये वैचारिक विकासाला महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. मानवी विकासाचे भौतिक किंवा आर्थिक विकास हे एक अंग आहे. ते सर्वस्व नव्हे. विकास कार्यकर्त्यांनी वैचारिक विकासाकडे पुरेपूर लक्ष दिले पाहिजे. त्यांनी आपापल्या भागातील लोकांना वैचारिक नेतृत्व दिले पाहिजे. या प्रबोधनातून प्रत्येक गाव म्हणजे एक समाज, एक कुटुंब अशी भावना, असा विचार रुजला पाहिजे. समाजकार्य करणाऱ्यांनी नव्या ज्ञानाचा वसा स्वीकारला पाहिजे. काया, वाचा, मने आणि कृतीत स्वीकारला पाहिजे. सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारी फार मोठी आहे. त्यांच्या समोरील आदर्श विलक्षण आहेत. नव्या जगाचा वेध घेणारे आहेत.

दोन दिवसांपूर्वी झालेला शिवसेनेचा मुंबईतील मोर्चा एक भयानक संकटाचे चिन्ह आहे. समाजाला दोन हजार वर्षे मागे रेटणारे संकट आहे. ते परकीय आक्रमणांपेक्षा भयानक आहे. हे संकट परतवून लावण्यात तुम्हाला यश मिळाले नाही तर तुमच्या सर्व प्रेरणांची राख होऊन जाईल.

‘‘विसाव्या शतकातील उच्च दर्जाच्या प्रेरणा आहेत. त्या लोकमानसामध्ये रुजवण्याचे व्रत स्वीकारा.’’ मानवी विकासाचा अंतिम हेतू अखिल मानव जातीच्या क्रांतीचा असला पाहिजे. विज्ञानाने मानव जातीला अतिशय जवळ आणले आहे. पण मनाने मानवजात एकजीव झालेली नाही.

शेवटी शास्त्रीजी म्हणाले, पुराणांच्या भाकड कथांवर जगू नका. दोन दिवसापूर्वीचा सचिवालयावरील मोर्चा म्हणजे पुराणांतील भाकड कथांना जिवंत करण्याचा प्रयत्न आहे. या प्रयत्नांचा मुकाबला करण्यासाठी नेरला विकास प्रकल्पांच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसावी. बुद्धिप्रामाण्यवादी चळवळ निर्माण करणे हे समाजसेवकांचे पहिले कर्तव्य आहे.

**(दैनिक राष्ट्रशक्ती, सांगली (दि. १६ जानेवारी १९८८)**

OOO

६८

# उच्च शिक्षणाचे तत्त्वज्ञान

शिक्षणाचे तत्त्वज्ञान' हा शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचाच एक भाग आहे. शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाच्या मुळाशी जी काही महत्त्वाची प्रमेय आणि महत्त्वाचे सिद्धांत आहेत, ते सगळे गृहित धरूनच उच्च शिक्षणाचा विचार करणं योग्य आहे. माणसाची जी काही मूळची मौलिक योग्यता आहे, माणूस म्हणून जी काही नैसर्गिक सामर्थ्ये आहेत; त्या सामर्थ्याचा योग्य असा विचार करून ती व्यक्ती 'पुरुषार्थी' व्हावी, हा शिक्षणाचा मूलभूत उद्देश आहे. शिक्षणाचा वैय्यर्थ किंवा त्याची सार्थकता, शैक्षणिक उद्दिष्ट किती साधलं आहे, याच्यावरूनच मोजता येते. माणसाच्या ठिकाणी कौशल्यं दिलेली आहेत. निरनिराळ्या माणसांमध्ये निरनिराळी सामर्थ्ये असतात सर्व माणसांची म्हणून जी समान सामर्थ्ये असतात, म्हणजे निरोगी व अव्यंग माणसाची जी सामर्थ्य आहेत, त्या सामर्थ्यांचा विकास शिक्षणानंच होतो. प्राणीसृष्टीमध्ये मनुष्य हा असा एकच प्राणी आहे की, जो सतत शिकू शकतो मात्र तो शिकतोच, असं नव्हे.

हल्लीचं शिक्षणाचं तत्त्वज्ञान म्हणून जे तत्त्वज्ञान प्रचलित आहे; त्यानुसार व्यक्तीचं शिक्षण आईच्या गर्भाशयात असल्यापासूनच सुरू होतं, असं मानलं जातं. म्हणजे शिक्षणाचा प्रारंभ तिथून आहे. व्यक्ती आईच्या गर्भात असेपर्यंत आईनंच विशिष्ट तऱ्हेनं वर्तन करायचं असतं, आहार घ्यायचा असतो, स्वतःची म्हणजे पर्यायानं गर्भाची काळजी घ्यायची असते. आई आणि व्यक्ती यांच्यात भेद नसतो. जन्माला आल्यापासून माणसाचा पहिला शिक्षक त्याची आई असते. म्हणून उपनिषदांमध्ये 'मातृदेवो भव' असं म्हटलंय. मग 'पितृदेवो भव' व त्यानंतर 'आचार्य देवो भव' आणि यापुढे 'अतिथी देवो भव'! माता हा पहिला देव आहे. कारण, माता हा पहिला शिक्षक आहे. व्यक्तीच्या ठिकाणी असलेली जी सरस्वती आहे (म्हणजे भाषा); मनुष्यजातीनं जो मिळवलेला अनुभव आहे तो भाषेत उतरलेला असतो. म्हणून पिढ्यान्पिढ्या जे साठलेलं असतं, ते आईच्या द्वारे माणसाला प्रथम मिळतं. भाषेत संकल्पना असतात. प्रत्येक शब्द हा संकल्पनात्मक असतो. भाषा ही पृथक्करणात्मक

असते. किंबहुना आजचं भाषातत्त्वज्ञान म्हणतं की, सृष्टी कशी आहे ते भाषेवरून कळतं. वाक्याचा अर्थ म्हणजे सृष्टीचा अर्थ असा सिद्धांत आहे. म्हणून मातेपासून शिक्षणाला सुरुवात होत असते. त्यानंतर ते मूल मातेच्या मांडीवरून उतरतं आणि आचार्यांपुढे जाऊन उभं राहतं. अशा तऱ्हेनं त्या मुलाचा शिक्षणप्रवास सुरू होतो.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणात प्रवेश करताना व्यक्तीत ज्ञानाची, कलेची गोडी असेल तर ती वाढते. ज्ञान हे स्वयंमधूर आहे की नाही, हा प्रश्न निराळा. परंतु ते साधनही आहे. ज्ञान हे जसं साध्य आहे, इष्ट आहे तसं मुख्यतः ते साधन आहे. विज्ञानाची पद्धती ज्यानं प्रथम मांडली, तो इंग्लिश तत्त्ववेत्ता म्हणतो, 'नॉलेज इज पॉवर.' ज्ञान ही शक्ती आहे. ज्ञान हे सामर्थ्य आहे. म्हणजे ते साधन आहे. त्याच्या योगानं जीवन आणि जीवनाची साधनं निर्माण करता येतात.

उच्च शिक्षणात ज्ञानाची गोडी असेल, ज्ञान हे चांगलं आहे- सुंदर आहे, हा भाव जर अनुभवसिद्ध असेल तर उच्च शिक्षणात प्रवेश करणं योग्य आहे. असा प्रवेश करणारा 'विद्यार्थी' आहे. नाहीतर तो परीक्षार्थी असतो. फार महत्त्वाची अशी जी सामाजिक कर्तव्यं आहेत, त्या सगळया सामाजिक कर्तव्यांत असं लक्षात येतं की, ही कर्तव्यं सुशिक्षितच पार पाडत असतात. ही सगळी कर्तव्यं आणि सामाजिक जबाबदाऱ्या या सुशिक्षितांच्या अपेक्षेत असतात. समाजातल्या ज्या जबाबदाऱ्या आहेत, जी कर्तव्यं आहेत; ती नीट पार पडतात की नाही, ती कशी पार पडतात, याची परीक्षा होते. त्यांचं स्वरूप पाहिल्यास तुमचं शिक्षण- उच्च शिक्षण कसं आहे, ते लक्षात येतं. कार्यावरून कारणाची कल्पना येते.

एखाद्या उद्यानात गेलो तर फळं, फुलं, पत्रं आणि त्यांची मांडणी यांच्यावरून तिथं वनस्पती-सेवा कशी चालली आहे, हे लक्षात येतं. याप्रमाणे समाजात जे घडत आहे व जे घडवायचं आहे, त्याचा बोध शिक्षणाच्या स्थितीवरून होतो. शिक्षणाचा सगळा संबंध कृतीशी आहे, कर्माशी आहे. जीवन म्हणजे ज्ञान कर्मसमुच्चय होय. ज्ञान आणि कर्म मिळून लोकयात्रा चाललेली असते. आजचा शिक्षणसंबंध पाहिला तर उच्च शिक्षणामध्ये जे महत्त्वाचं उद्दिष्ट आहे, ते द्वंद्वात्मक उद्दिष्ट आहे. सुसंस्कृत, पुरुषार्थी मनुष्य निर्माण करणं आणि तो सामाजिक कर्तव्यांमध्ये भागीदारी करणारा, नेतृत्व करणारा असणं, हे शिक्षणाचं उद्दिष्ट आहे.

मोठा गणिती तत्त्ववेत्ता व्हाईटेड यानं म्हटलंय की, जगाकडे म्हणजे 'थिंग्ज' करणारे लोक आहेत आणि त्या व्यावसायिकाची काही सामाजिक कर्तव्य आहेत. ही कर्तव्यं पार पाडणारे त्या त्या क्षेत्रातील लोक, त्यांचं व्यक्तिमत्त्वं आणि त्यांची सामाजिक जाण ही त्या क्षेत्राची प्रतिष्ठा असते. तेव्हा व्यक्ती महत्त्वाची असतेच.

समजा एखादा उत्तम डॉक्टर असेल तर तो समाजाचा असतो. तो जर निर्मिती करत असेल तर ती समाजाकरता असते. म्हणून प्रत्येक शिक्षिताला सगळी सामाजिक कर्तव्यं

लक्षात ठेवावी लागतात. त्यासाठी आवश्यक असणारी भूमी नांगरण्याचं कार्य उच्च शिक्षण करतं. उच्च शिक्षणाचा हा फार महत्त्वाचा कार्यात्मक भाग लक्षात घ्यावा लागतो.

उच्च शिक्षणात शिक्षक असतो. उच्च शिक्षणामध्ये जे विशिष्ट प्रकारचं ज्ञान स्वीकारायचं असतं; त्यासाठी त्यावेळेस हे ज्ञान जितकं पुढं गेलंय, तितकं ते दयावं लागतं. ते ज्ञान म्हणजे नुसतं लक्षात ठेवायचं नाही तर ते ज्ञान तपासण्याची योग्यता व्यक्ती/यंत्रणा यांच्या ठायी असावी लागते. त्या ज्ञानापासून कल्पनाशक्ती व कल्पकता वाढावी लागते. भविष्यकाळ म्हणजे निर्मितीचा काळ. आपण रोज काहीतरी काम करतो, म्हणजे निर्मिती करतो. उच्च शिक्षणाच्या योगानं निर्मितीची जी जबाबदारी आलेली असते ती निर्मिती गुणात्मक असते. त्या निर्मितीच्या दृष्टीनं जेव्हा आपण पाहतो, तेव्हा शिक्षणानं दोन गोष्टी सिद्ध व्हाव्या लागतात. त्या दोन गोष्टी म्हणजे त्या व्यक्तीचं ज्ञान चांगलं, व्यवस्थित व शुद्ध व्हायला पाहिजे आणि त्या ज्ञानाची सीमा जाणणारा शिक्षक असला पाहिजे. त्या ज्ञानाची उपयुक्तता, महती ही विद्यार्थ्याला- विद्यार्थिनीला व्यवस्थित रीतीनं पटवून देणं, हे शिक्षकाचं काम आहे. रसेलनं शिक्षणशास्त्रावर विचार केला आणि एके ठिकाणी असं म्हटलं की, 'शिक्षकाची गरज काय? पुस्तकं आहेत की!' रसेलचं म्हणणं तसं बरोबर आहे. पण विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या मनात काही प्रश्न उपस्थित झाले तर पुस्तकावरून त्याचं उत्तर शोधायला वेळ लागतो. शिक्षक ताबडतोब प्रश्नाचं उत्तर देऊ शकतो. म्हणून शिक्षकाचा विद्यार्थ्याशी संबंध विचारविनिमयाचा आहे. म्हणजे त्यांच्यात डायलॉग असला पाहिजे. दोघांमध्ये संवाद असला पाहिजे. आपल्या देशात ८०-१०० विद्यार्थ्यांपुढे भाषण द्यायचं आणि ४५ मिनिटं झाली की निघून जायचं ही रूढ आणि मान्य पद्धत असल्यानं आपल्याकडे मोनोलॉग आहे. चर्चाच घडू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्या उच्च शिक्षणात जे वैगुण्य आहे, ते हे की, इथं तपासणी होत नाही.

उच्च शिक्षणामध्ये 'उहापोह सामर्थ्य' आलं पाहिजे. 'राजाचं शिक्षण' यावर कौटिल्यानं एक अध्याय लिहिला आहे. त्यात त्यानं बुद्धीचा विकास कसा होतो. बुद्धीसामर्थ्य कसं विकसित होतं, याची प्रक्रिया सांगितली आहे. ती कशी पहा-शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, हरण, उहापोह. शुश्रूषा म्हणजे श्रोतृम् इच्छा. शुश्रूषा म्हणजे ऐकण्याची तीव्र वासना. ती नसेल तर काही उपयोग नाही. म्हणून मग विद्यार्थी वर्गात ऐकतो. जर त्याचे कान त्या विचारानं-ज्ञानानं पकडले गेले नाहीत तर मग विद्यार्थी ऐकत नाहीत. असे थोडेच शिक्षक असतात की, जे लक्ष वेधून घेतात. लक्ष वेधून न घेणारे शिक्षक दोन तऱ्हेचे- त्यांची विद्याच पक्व नसते, पक्व असली तरी त्यांना नीट तऱ्हेनं तिचं प्रतिपादन करता येतंच, असं नाही. याबद्दल 'मालविकाग्निमित्र' यात कालिदासानं म्हटलंय की,

**शिष्टा प्रिया कस्यचित् आत्मसंस्था संक्रातिरम्यस्य विशेषयुक्ता।**
**यस्योभयं साधु स शिक्षकाणां अग्रेस्थापनीय एवं धुरिस्थापनीय ।।**

म्हणजे, शिक्षणाची एखाद्याची क्रिया स्वतः ग्रहण करू शकतो; पण दुसऱ्याला देता येत नाही. एखाद्याला ती देताही येते व घेताही येते. असा जो शिक्षक तो शिक्षकांचा खरा धुरीण होय.

यादृष्टीनं, कित्येकांना विषय चांगला कळलेला असतो; पण सांगता येत नाही. प्रतिपादन करता येत नाही. ती योग्यता शिक्षकात असावी लागते. अशी योग्यता असलेले शिक्षक पुस्तकांबरोबरच मार्गदर्शक ठरतात. म्हणून त्यांना 'दिशिक' असं नाव आहे. दिशिक म्हणजे दिशा दाखवणारा. ज्ञान हे स्वतःच घ्यायचं असतं. शिक्षणशास्त्राचं सामान्यपणे जे तत्त्वज्ञान आहे, त्याच तत्त्वज्ञानातले सिद्धांत उच्च शिक्षणातही लक्षात ठेवावे लागतात.
त्यापैकी एक सिद्धांत म्हणजे, मनुष्य जर स्वतःचा शिक्षक असेल तरच आचार्य, माता, पिता व भोवतालचं जग शिकू शकतं. स्वतःच स्वतःला तो शिकवणारा नसेल तर काही उपयोग नाही. म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी, आत काही राहत नाही! स्वतःला शिकवण्याची त्याची तयारी लागते. ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. त्यामुळे आपल्याला असं आढळतं की, जे स्वतःला शिकवत राहतात, त्यांच्यामधूनच संशोधक निर्माण होतात. उच्च शिक्षणात जेव्हा राष्ट्र, समाज पुढं जायचा असतो, तेव्हा त्यात संशोधनाचं क्षेत्र फार महत्त्वाचं ठरतं. या क्षेत्रात कोण शिरू शकतो? जो सारखा स्वतःला शिकवत असतो तोच! तो शिक्षक असो वा नसो; पण जो जाणून घेण्याचा, स्वतःला शिकवण्याचा प्रयत्न करतो, असा शिक्षक, असा विद्यार्थी संशोधनाच्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो.

अलीकडे पाश्चिमात्त्य देशांमध्ये उच्च शिक्षणाबाबत जे काही अत्यंत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झालेले आहेत, तिकडे मी आपलं लक्ष वेधतो. १५-२० वर्षांपूर्वी साहित्यक्षेत्रात काम करणारा इंग्लंडमधला एका तज्ज्ञानं 'टू कल्चर्स' किंवा दोन संस्कृतीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. जे विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात असतात, त्यांना शेक्सपिअरचा पत्ता नसतो. 'डिक्लाइन ऑफ रोमन एम्पायर' याची त्याला कल्पना नसते. म्हणजे ज्याला 'मानव्यविद्या' म्हणतात, त्यापासून हा तंत्रज्ञान क्षेत्रातला मनुष्य बाजूला पडलेला असतो. मानव्य क्षेत्रातल्या ज्यांना उत्तम तऱ्हेचं काव्य माहिती आहे; त्या काव्याची जो संगती जाणतो जो रसिक असतो, त्याला विज्ञानात काय घडतंय, कोणत्या उलाढाली होत आहेत, यांचा पत्ता नसतो. असे हे ज्ञानसंस्कृतीत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्या त्या राष्ट्रातल्या वैज्ञानिक आणि मानव्यविद्यात्मक संस्कृती जुळल्या पाहिजेत. पण हे जुळवणं उच्च शिक्षण क्षेत्रातल काम नाही. हे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणक्षेत्रातलं काम आहे. कारण प्राथमिक व पूर्व- प्राथमिक शिक्षणात जर चांगली कविता म्हणता आली. चांगली गोष्ट सांगता आली, इतिहासातल्या चांगल्या घटना सांगता आल्या तर मग हा जो विज्ञानातला माणूस आहे, तो साहित्य सोडायचा नाही. मात्र दोन्ही संस्कृतीचं एकत्र राहणं गरजेचं आहे.

उच्च शिक्षणातला महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, ज्ञानाची वाढ वेगानं होते आहे, स्फोटक रीतीनं होते आहे. फार महत्त्वाची क्रांती घडते आहे. भौतिकीतली क्रांती संपली, असं म्हणतात. पण गेल्या २५ वर्षात जीवशास्त्रात मोठी क्रांती व्हायला लागली आहे. या क्रांतीपासून मानव्यविद्यातला माणूस लांब आहे. डी.एन.ए. नावाची जी पेशी सापडली आहे; जिच्यात सगळं ज्ञान भरलेलं असतं! याला इनफॉर्मेशन म्हणतात. या पेशीत ही माहिती असते, आजचा माणूस हा जन्मजात माहिती घेऊन आलेला आहे. माणसात एक मोठं ग्रंथालय आहे, असं म्हणतात! दुसरी माहिती ही भाषा, गणित यांतून मनुष्य घेतो आणि तो प्रगती करतो आहे. अशा तऱ्हेच्या ज्ञानाची गरज आहे. म्हणून दोन संस्कृती वेगवेगळ्या राहता कामा नयेत. हे जोडण्याचं काम उच्च शिक्षणक्षेत्रातल्या विद्यापीठांचं आहे. त्यासाठी फार महत्त्वाची साधनं उपलब्ध करून देता आली पाहिजेत.

शिक्षक आवश्यक आहेत कारण पुस्तकं महाग झाली आहेत. आजच्या शासनाचं हे कर्तव्य आहे की, विद्यालयांना उत्तम ग्रंथ दिले पाहिजेत. इतके द्यायला पाहिजेत की, सर्व विद्यार्थ्यांना ते पुरले पाहिजेत. असं केलं तरच उच्च शिक्षणाचा निभाव लागणार आहे. ग्रंथालय ही सर्व शिक्षण क्षेत्रांतल्या विभागांची गरज आहे. पुस्तक हे संस्कृतीचं मस्तक आहे! ते पुस्तक हातात धरूनच शेतकऱ्यानं शेती केली पाहिजे. तो पुस्तकावाचून शेती करतो, म्हणून शेती मागासलेली आहे. ज्ञानाच्या आधारावर शेती केली पाहिजे. तरच आपली प्रगती होऊ शकेल. शिक्षणातून तीन गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत- एक म्हणजे ज्ञान मिळवण्याची ईर्षा निर्माण झाली पाहिजे, दुसरी म्हणजे त्या ज्ञानातून कल्पकता निर्माण झाली पाहिजे. पण ती नुसती अद्भुतरम्य कल्पकता नको, तर वस्तुस्थितीशी सुसंगत अशी कल्पकता पाहिजे व तिसरी गोष्ट म्हणजे निर्मितीचा उत्साह पाहिजे. या तीन गोष्टी समाजात असतील तर उच्च शिक्षण सफल झालं, असं म्हणता येईल.

आपल्या देशात उच्च ज्ञानावर व कल्पकतेवर अवलंबून असलेली जी सगळी क्षेत्रं आहेत, त्यांच्यात व्यथा आहेत, अडचणी उत्पन्न झाल्या आहेत; ज्याला 'स्टॅगनेशन' म्हणतात ते झालं आहे, त्यांची गती रुद्ध होऊ लागली आहे. याचं कारण आपल्या उच्च शिक्षणामध्ये न्यूनता आहे. महाविद्यालय हे उच्च शिक्षणाचं क्षेत्र आहे आणि त्यात मोठी अडचण उत्पन्न झाली आहे. आज देशात संकटावस्था आहे. ही अवस्था कोणीही सोडवू शकणार नाही - राजकीय नेते नाहीत. पक्षही नाहीत. राजकीय नेत्यांविषयी अशी अपेक्षा होती की, ते लोकशिक्षण देणारे नेते ठरतील; पण राजकीय पक्ष लोकशिक्षण देऊ शकत नाहीत. दोनशे वर्षांचा इतिहास आहे की, राजकीय पक्ष लोकांना भडकवणारे, थापा देणारे, भलत्या मार्गाने नेणारेच असतात. म्हणून राजकीय पक्ष काही करू शकत नाहीत. शिक्षणक्षेत्रातला जो शिक्षक आहे, तो आशास्थान आहे. कार्ल मार्क्सनं जे म्हटलंय की, 'एज्युकेटर्स ! आर टू बी एज्युकेटेड' शिक्षक हे पुन्हा चांगल्या रीतीनं जागृत होऊन, आपली विद्या चांगल्या रीतीनं तेजस्वी होईल याच्या प्रयत्नात राहिले पाहिजेत. हे महत्त्वाचं आहे.

आजचं युग असं आहे की, जिथं ज्ञान पदोपदी वाढत आहे. म्हणून विद्यार्थी राहिला पाहिजे; निरंतर विद्यार्थी राहिला पाहिजे. ही आजच्या काळाची आणि शिक्षणाची गरज आहे. म्हणजे आपलं भवितव्य, देशाचं भवितव्य हे शिक्षकाच्या हातात आहे, हे लक्षात ठेवलं पाहिजे आणि सगळे प्रश्न तिथं गुंतलेले आहेत; मात्र तिथं अडचणी आहेत, त्यांच्यातून देश बाहेर आला पाहिजे. तो कसा बाहेर येईल, हे शिक्षणतज्ज्ञांनी ठरवायचं आहे.

**(शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचालित**
**विष्णुशास्त्री चिपळूणकर स्मृती व्याख्यानमाला**
**रामनारायण रूईया महाविद्यालय, मुंबई.**
**दि. ३ जानेवारी १९८८.)**

ooo

६९

# धर्म आणि नीती

पृथ्वीच्या पाठीवर असा एकही मानवसमाज नाही, की ज्यामध्ये धर्मसंस्था नाही. गेल्या दोनशे वर्षांत वाहतुकीची साधने वेगाची आणि सर्वगामी उपलब्ध झाल्यामुळे जेथे जेथे मनुष्यवस्ती आहे, तेथे तेथे जगाचे प्रवासी पोचले आहेत. असंस्कृत, अर्धसंस्कृत, सुसंस्कृत, आधुनिक औद्योगिक क्रांती झालेले असे संस्कृतीच्या निरनिराळ्या पातळयांवर जगणारे समाज हे एका अर्थी धार्मिक समाज आहेत. युरोप आणि अमेरिका येथे वैज्ञानिक क्रांती होऊन दोनशे वर्षे झाली, तरी तेथील राष्ट्रे ही ख्रिश्चन राष्ट्रे आहेत. धर्मसंस्थेचा प्रभाव तेथे कमी झाला आहे; परंतु चर्च ही ख्रिश्चन संस्था अजून पक्की आहे. ढासळलेली नाही. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामध्ये रविवार या पवित्र मानलेल्या दिवशी सामुदायिक प्रार्थनेमध्ये स्त्री-पुरुष सामील होतात. सोव्हिएत युनियनमध्ये, म्हणजे रशियात सरकार निधर्मी आहे. शिक्षणामध्ये धर्मशिक्षणाला बंदी आहे; परंतु धर्म न मानणाऱ्यांची संख्या शेकडा दहा-बारा टक्केच आहे. जगात ख्रिश्चनधर्मीय लोकसंख्या इतर धर्मीयांपेक्षा अधिक आहे. त्याच्या खालोखाल मुसलमानांची लोकसंख्या आहे. मुसलमानांपेक्षा जगात तिसरा क्रमांक हिंदू धर्मीयांचा आणि जवळजवळ तितकाच बौद्धांचा लागतो. चीनमध्ये आणि जपानमध्ये क्रमाने कन्फ्युशस, लाओत्से आणि शिंतो यांचे धर्म प्रचलित आहेत. जगात सगळ्यात अल्पसंख्य परंतु अत्यंत प्रभावी धर्म म्हणजे यहुदी धर्म आहे.

धर्मसंस्थांच्या योगाने समाज निराळे बनतात. गेल्या अडीचशे वर्षांत समाजाची राजकीय संघटना राष्ट्रवादाच्या ध्येयवादाने निर्माण होऊ लागली आहे, राष्ट्रवादाच्या योगाने नागरिक इहवादी बनत आहेत; परंतु ही गोष्ट इस्लामी राष्ट्रांना लागू पडत नाही. तेथे राष्ट्रवाद आणि धर्मसंस्था या दोघांचाही सारखाच जबरदस्त प्रभाव आहे. धर्मसंस्थेच्या योगाने समाज संघटित होण्याची प्रवृत्ती मानवी समाजात फार प्राचीन काळापासून एक सामाजिक संघटनेची मूलभूत प्रवृत्ती म्हणून मानवी इतिहासात दिसून येते. भिन्न धर्मसंस्था भिन्न समाजसंस्थांची निर्मिती

करतात. तीनशे वर्षांपूर्वीपर्यंत हा धार्मिक समाजांचा भेद भिन्न भिन्न संस्कृतीच्या निर्मितीला कारण झाला. परंतु अलीकडे आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे भिन्न भिन्न खंडांत दूरदूरवर राहणारी राष्ट्रे आणि शतकानुशतके एकमेकांपासून सर्वथा अलग राहिलेली राष्ट्रे ही एकमेकांच्या फार जवळ आली आहेत. त्यामुळे आर्थिक आणि सांस्कृतिक दळणवळण निर्माण झाले आहे. सर्व प्रकारची देवघेव आणि सहकार्य अविच्छिन्न रीतीने सुरू झाले आहे. त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाची धोरणे बदलली गेली आहेत. शिक्षण हे संस्कृती निर्माण करणारे महत्त्वाचे व मूलभूत साधन आहे. तेही फार मोठ्या प्रमाणात सगळ्या विकसित राष्ट्रांच्या आणि विकसनशील बनत असलेल्या राष्ट्रांच्या समान होऊ लागले आहे. त्यामुळे एक नवी आधुनिक ज्ञानविज्ञानावर आधारलेली धर्मातीत वा धर्मनिरपेक्ष संस्कृती निर्माण होऊ लागली आहे. समाजरचनेच्या तत्त्वांवरही त्याचा परिणाम होऊ लागला आहे. मूलभूत मानवी हक्क यांचे उच्चतम नैतिक मूल्य प्रस्थापित होण्याचा काळ प्रभावी होतो आहे. अशा स्थितीत जुन्या परंपरागत धर्मसंस्थांवर आधारलेल्या राष्ट्रीय संस्कृतींच्या अंतरंगांमध्ये एक नवी मानवव्यापी संस्कृती वाढू लागली आहे, विकास पावत आहे. त्यामुळे भिन्न भिन्न राष्ट्रांना आणि समाजांना एकमेकांपासून मनाने, भावनांनी आणि श्रद्धांनी विलग व विरोधी ठेवणाऱ्या प्रवृत्तींचा विचारांनी मुकाबला करणे आवश्यक आहे. सगळ्या मानवसमाजांना या पृथ्वीवर, या भूतलावर अविरोधाने आणि सहकार्याने जगण्यास प्रेरणा देणारे नीतिशास्त्र हे परंपरागत धर्मापासून वेगळे करण्याची आणि परंपरागत सामाजिक अहंकाराची, मी मुसलमान, मी ख्रिश्चन, मी हिंदू, मी बौद्ध म्हणून एकमेकांपासून दूर सारणाऱ्या अहंकाराची तीव्रता कमी करणारे नवे मानवतावादी नीतिशास्त्र आवश्यक आहे आणि परंपरागत धर्म अशा व्यापक नीतिशास्त्राचे समर्थन करू शकेल, अशी त्यांची त्या त्या धर्माच्या पुरस्कर्त्यांनी नवी मांडणी करणे आवश्यक आहे.

भाषा ही मानवाची नैसर्गिक देणगी आहे; परंतु मानवसमाजाने एकमेकांपासून प्रादेशिक दूरतेमुळे भिन्न भिन्न भाषा निर्माण केल्या. त्यामुळे जगात हजारो भाषा आजपर्यंत निर्माण झाल्या. हीच गोष्ट धर्मालाही लागू आहे. धर्मदृष्टी ही माणसाला निसर्गत: जीवनाचा आणि विश्वाचा विचार करीत असताना प्राप्त होते. या दृष्टीने तो विशिष्ट आचार व नियम-निर्बंध प्रचलित करतो. सामाजिक जीवन त्या धर्मदृष्टीमुळे आणि नियम-निर्बंधांमुळे संघटित होते. व्यक्ती, कुटुंब आणि समाज आणि त्याचप्रमाणे विविध सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक संस्था संघटित होत असतात. धार्मिक दृष्टी आणि प्रेरणा ही माणसांना सर्वांना समान असली तरी त्यांचे आविष्कार भिन्न झाले आहेत. समाजाच्या विकासाच्या भिन्न भिन्न पातळ्यांवर धार्मिक विचार आणि आचार यांचेही भिन्न प्रकारचे आविष्कार झाले आहेत. भाषांना ज्याप्रमाणे इतिहास आहे त्याप्रमाणे धर्मांनाही आहे. भाषा बदलतात त्याप्रमाणे धर्महीं बदलतात. कारण सर्वच अस्तित्व, सर्व मानवी जीवन इतिहासबद्ध आहे. जगातील

विकासाच्या खालच्या-वरच्या पातळीवरील सर्व धर्मांचा अभ्यास केला असता हे सिद्ध होते, की धर्मपरिवर्तन आणि धर्मसुधारणा, किंबहुना धर्माचा मौलिक बदल वा धार्मिक क्रांती इतिहासात वारंवार अधूनमधून झालेली आढळून येते.

वैदिक, यहुदी, ख्रिश्चन, इस्लाम, जैन, बौद्ध, पारशी, कन्फ्युशस धर्म, ताओधर्म, शिंतोधर्म इत्यादी आज विद्यमान असलेल्या धर्मपरंपरांचे अध्ययन केले असताना त्यांचे काहीएक समान स्वरूप निश्चित करता येते. धर्म आणि अधर्म या दोन पदांची समंजस अशी व्याख्या सांगता येते.

निसर्गातीत वा निसर्गात भरलेली पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबद्ध, जीवन व विश्व यांची नियंत्रक अशी एक अलौकिक शक्ती आहे किंवा अशा अनेक अथवा अगणित शक्ती आहेत, अशी माणसांची श्रद्धा असते. त्या शक्तीचा वा शक्तींचा आपल्या आत्म्याशी अनुकूल, घनिष्ठ व पवित्र संबंध स्थापित करणारी वाणी, मन व देह यांची प्रवृत्ती म्हणजे धर्म (रिलिजन) होय, आणि त्या शक्तीशी वा शक्तींशी प्रतिकूल अशी मन, वाणी व देह यांची प्रवृत्ती म्हणजे अधर्म होय. काही धर्मचिंतक तत्त्वज्ञांचे असेही मत आहे, की अशा उच्चतम शक्तीकडे मानवाची प्रवृत्ती निसर्गत:च वळलेली असते. भावना, इच्छा आणि ज्ञान या प्रवृत्तीतून निर्माण होतात. अशा उच्चतम शक्तीचा विशिष्ट अनुभव काही थोड्या माणसांना येत असतो. या अनुभवामध्ये या शक्तीबद्दल आश्चर्य, विलक्षण भय, नितांत प्रेम, कित्येकदा अपरंपार शांती, अहंकारनिवृत्ती, नम्रता, शरणागती इत्यादी भावना निर्माण होतात.

त्या शक्तीला मनुष्य अनुकूल किंवा वश करण्याचा प्रयत्न करतो किंवा तन्मय होण्याकरता, किंवा त्या शक्तीत आत्मविसर्जन करण्याकरता प्रयत्नशील असतो किंवा शाश्वत सलगी व्हावी म्हणून झटत असतो. त्याकरता ध्यान, जप, प्रार्थना, यज्ञ, पूजा, व्रतपरिपालन इ. प्रकारचे आचरण मनुष्य व्यक्तिश: किंवा सामुदायिक रीतीने करतो आणि प्रतिकूल मनोवृत्ती व आचरण टाळतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे, इष्टप्राप्त्यर्थ व अनिष्ट निवारणार्थ अलौकिक शक्तीची साधना किंवा आराधना म्हणजे धर्म होय. ही अलौकिक शक्ती व्यक्तीत असते अथवा अनेक व्यक्तींमध्ये असते, ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती कल्पित असतात, अथवा वास्तविक असतात, अथवा कल्पित आणि वास्तविक यांचा विलक्षण समन्वयही असतो. अलौकिक म्हणजे निसर्गातीत. निसर्गाचे व जीवनाचे नियमन करणारी, निसर्गाला अंतर्बाह्य व्यापणारी, कित्येकांच्या मते निसर्गरूप असणारी शक्ती होय. म्हणूनच तिला परमसत्य मानतात. अलौकिक म्हणजे अतींद्रिय असाही अर्थ करता येतो. ती शक्ती दृश्य वस्तुरूप आणि व्यक्तिरूपही असते आणि केव्हा केव्हा इंद्रियांना अगम्य आणि मनालाही एकपरी अगम्य होऊ शकते, अशी श्रद्धा धार्मिक आचरणाच्या मुळाशी असते. ती शक्ती म्हणजे एक शाश्वत आणि उच्चतम सत्य होय, असे धर्मसंकल्पनेत गृहीत धरलेले असते. मानवाचे अथवा जीवात्म्याचे उच्चतम ध्येय वा आदर्श आणि परम अंतिम शाश्वत

सत्य हे त्या शक्तीचेच स्वरूप होय, असे जगातील धर्म मानतात. त्या शक्तीच्या संपूर्ण अनुग्रहाने किंवा कृपेने उच्चतम शाश्वत ध्येयाची प्राप्ती होते, असेही उच्च धर्म मानतात. म्हणून जागतिक उच्च धर्माची व्याख्या अशी करता येते -

''जीवन परिपूर्ण व कृतार्थ करणारी, हे अपरिपूर्ण, दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी अशी उच्चतम ध्येयाच्या म्हणजे दिव्यत्वाच्या प्राप्तीची पद्धती म्हणजे धर्म होय.'' एकेश्वरी धर्माप्रमाणे परमपवित्र सर्वसमर्थ ईश्वर, अद्वैतवादाप्रमाणे परमात्मा आणि प्राथमिक बौद्ध धर्माप्रमाणे निर्वाण म्हणजे शाश्वत सत्य व उच्चतम ध्येय होय.

सर्व प्राथमिक वा उच्च धर्म अलौकिक शक्तीचे दोन प्रकार मानतात : (१) पवित्र, तारक वा उपकारक. उदा. माना, करिज्म, पुण्य, तीर्थंकर, बोधिसत्त्व, प्रज्ञापारमिता, देव, अहुरमज्द, ताओ, परमात्मा, अल्ला, गॉड इ. आणि त्याच्या उलट (२) अपवित्र, पतनकारक अथवा अपकारक उदा. असुर, राक्षस, पाप, सैतान, मार इत्यादी शब्दांनी त्या अपवित्र शक्तीचे वर्णन करता येते. अपवित्र शक्तीचा संसर्ग होणार नाही असे वर्तन करणे, हे माणसाचे कर्तव्य ठरते.

धर्माचे संस्थारूप व वैयक्तिक असे दोन प्रकार धर्मतत्त्वज्ञ पाडतात. प्रार्थना, यज्ञ वा पूजा म्हणजे कर्मकांड, देवविद्या, सण व उत्सव, पुरोहित संघटना, पवित्र स्थाने इ. गोष्टी संस्थारूप धर्मात मुख्यत: अंतर्भूत होतात. देवाची वा देवांची कृपा संपादन करण्याची कला, असे संस्थारूप धर्मास म्हणता येते. वैयक्तिक धर्म हा व्यक्तीच्या हृदयाचा धर्म असतो. हा हृदयाचा हृदयाशी संबंध असतो. ऋषी, सिद्ध, बुद्ध, ख्रिस्त, महंमद किंवा पंथप्रवर्तक साधूसंत यांचाच हा वैयक्तिक धर्म होय. अनन्यभक्त किंवा योगी मनानेच देवाशी संबंध प्रस्थापित करतो. कित्येकदा भक्ताच्या असेही लक्षात येते की, देवच स्वत:हून माझ्यापाशी आला व मला जवळ केले, मला हे कधीच जमले नसते. एकांतात दिव्यत्वाबद्दल आलेले अनुभव व घडणारे वर्तन, या धर्माचे स्वरूप होय. हे अनुभव म्हणजे तार्किक विचार नव्हेत.

भारतीय तत्त्ववेत्त्यांनी धर्माच्या अनेक व्याख्या सांगितल्या आहेत. स्वत:प्रमाण अशा चोदना म्हणजे विधिवाक्य वा आज्ञा हे धर्माचे ज्ञान करून देणारे प्रमाण होय. विधिवाक्याने आज्ञापिलेले कर्म म्हणजे धर्म होय. कर्म म्हणजे आचरण आणि निषेधवाक्याने निषिद्ध केलेले कर्म म्हणजे अधर्म होय. ही पूर्वमीमांसेतील व्याख्या होय. ही व्याख्या जगातील सगळ्या ग्रंथ, गुरू आणि प्रेषित यांच्यावर आधारलेल्या धर्मांना लागू आहे. बायबल, कुराण, वेद, गुरुग्रंथसाहेब इ. पवित्र ग्रंथ म्हणजे चोदना; देवाची, सर्वज्ञमुनीची, प्रेषिताची वा गुरुची आज्ञा म्हणून असे म्हणता येते, की प्रेषित, धर्मसंस्थापक, धर्माचार्य, पंथसंस्थापक यांचे जेवढे जगातले आज धर्म आहेत वा पूर्वी होते, त्या सर्वांना ही जैमिनी मुनींच्या पूर्वमीमांसेतील 'चोदना लक्षणार्थो धर्म:' ही व्याख्या नीट लागू पडते. बायबलचा जुना करार हा अनेक प्रेषितांच्या उपदेशाने भरलेला आहे. मोझेसला देवाने केलेला उपदेश बायबलच्या जुन्या करारात आहे. येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र. देवाच्या मनातील आदेश माणसाला देण्याकरता

पृथ्वीवर अवतरला. माणसांच्या पापांचे प्रायश्चित्त म्हणून त्याने क्रूसावर स्वत:ला बळी जाऊ दिले, अशी ख्रिस्ती धर्मीयांची श्रद्धा आहे. गॅब्रिएल या देवदूतातर्फे पवित्र ग्रंथ रसूल महंमद याला देवाकडून प्राप्त झाला, अशी जगातील मुसलमानांची श्रद्धा आहे. वेद हे देवापाशी होते, ते देवाने ऋषींना दिले, अशी वैदिक हिंदूंची श्रद्धा आहे. देवाकडून आलेल्या आज्ञा म्हणजे बायबल, वेद, कुराण इ. धर्मग्रंथ होत, अशी त्या त्या धर्मानुयायांची श्रद्धा आहे, अशीही धार्मिकांची श्रद्धा असते. पण त्याला म्हणजे देवाच्या अस्तित्वाला आणि त्याच्यापाशी असलेला पवित्र ग्रंथ त्याने माणसाला दिला. याला श्रद्धेशिवाय काही आधार नाही. म्हणून आधुनिक चिकित्सक युगात या भिन्न भिन्न धर्मपरंपरांना मर्यादित अर्थानेच प्रामाण्य दिले पाहिजे. मानवसमाजांचा, भिन्न भिन्न राष्ट्रांचा व भिन्न भिन्न धार्मिक समाजांचा या पृथ्वीवरील व्यवहार सामंजस्याने व सहकार्याने चालावा याकरिता भिन्न धर्मीयांनी भिन्न धर्मीयांचा संबंध व्यापक अशा मानवी बंधुत्वाच्या तत्त्वावरच स्थापन करणे आज मानवी समाजाला हितप्रद आहे. भिन्न भिन्न धार्मिक समाजांचे संबंध सहकार्याचे आणि बंधुत्वाचे झाले, तर या पृथ्वीवरील जीवन हे कल्याणप्रद होईल, यात शंका नाही. याचा आधार कोणताही धर्मग्रंथ नव्हे, तर केवळ मूलभूत मानवी हक्कच होत, असे मान्य करणे आज मानवी भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. जे जे धर्मसंप्रदाय आपणाहून भिन्न संप्रदायांना कमी लेखतील, ते मानवी जीवनाला धोकादायक ठरतील. आग्रही धार्मिक अहंकार हा अंतिम नैतिक मूल्याच्या दृष्टीने उच्च धार्मिक विवेकबुद्धीच्या आधारे निषिद्धच मानला पाहिजे.

जगातील विद्यमान धर्मसंस्था मुख्यत: तीन तत्त्वांवर आधारलेल्या आहेत. जीवात्म्याचे अमरत्व म्हणजे मृत्यूनंतरची स्थिती, सर्व विश्वाच्या निर्मात्याचे व शास्त्याचे म्हणजेच ईश्वराचे अस्तित्व आणि मनुष्याच्या आचरणाचे विधिनिषेध ही तीन तत्त्वे होत; परंतु प्रत्येक विद्यमान, प्रसिद्ध धर्म हा दुसऱ्या प्रसिद्ध धर्माहून अनेक बाबतीत वेगळा आहे. त्याचे विधिनिषेध निराळे आहेत. मृत्यूनंतरच्या स्वर्ग-नरकाबद्दलच्या कल्पना वेगळ्या आहेत, पाप-पुण्याच्या कल्पना वेगळ्या आहेत. एवढेच नव्हे तर ख्रिश्चन धर्म अन्य धर्मीयांना उच्चतम स्वर्गीय जीवन मिळणार नाही असे मानतो तसेच हिंदूंबद्दल मुसलमान मानतो व मुसलमान ख्रिश्चनांबद्दल मानतो. आपलाच धर्म श्रेष्ठ आहे व अन्य धर्म अंतिम उच्च सद्गतीला वा कल्याणाला उपयुक्त नाहीत अशीच त्या त्या धर्मसंस्थांची श्रद्धा असते. सर्व धर्मांचा समन्वय होऊ शकतो, असे काही उदार मनाचे धर्मतत्त्वज्ञ व साधूसंत मानतात. आधुनिक युगामध्ये असे सर्वधर्म समन्वयवादी तत्त्वज्ञ प्रभाव पाडीत आहेत; परंतु सर्वसामान्य तद्धर्मीय जनतेचा दृष्टिकोन, सांप्रदायिक व अर्थात एका अर्थी संकुचितच राहतो. कुराणातीलच विचार श्रेष्ठ आहेत किंवा वेदांतीलच श्रेष्ठ आहेत अथवा बायबलमधील विचारच अधिक प्रमाणभूत आहेत, अशा तऱ्हेची श्रद्धा त्या त्या धर्माच्या सर्वसामान्य जनतेच्या मनावर प्रभाव गाजवीत असते आणि

त्यासंबंधी जे युक्तिवाद असतात ते एकांगी असतात. संपूर्ण समाधान करणारा आपापल्या धर्मश्रद्धेचा युक्तिवाद अजून कोणालाही सांगता आला नाही. कोणतीच विद्यमान धर्मसंस्था सर्वमान्य म्हणजे आधुनिक पुढारलेल्या संस्कृतीच्या सर्व मानवसमाजांना मान्य होण्याची शक्यता नाही. ईश्वराच्या स्वरूपासंबंधी, जीवात्म्याच्या मृत्यूनंतरच्या अस्तित्वासंबंधी वा स्वर्ग-नरकासंबंधी एकमेकांच्या संकल्पना अगदी वेगळ्या आहेत. त्या श्रद्धा त्या त्या समाजापुरत्याच दृढमूल झालेल्या असतात. त्या संकल्पना लहानपणापासून बिंबविलेल्या असतात. भौतिकी, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी विज्ञानातील सिद्धांत ज्याप्रमाणे प्रत्यक्ष आणि अनुमानप्रमाणावर निश्चितपणे आधारलेले असतात आणि ती निश्चित प्रमाणे मान्य करणे न करणे हे जिज्ञासू विद्यार्थ्यांच्या विवेकबुद्धीवर अवलंबून असते, तसे धार्मिक श्रद्धांच्या बाबतीत मुळीच नसते. धर्मशिक्षण हे बौद्धिक सारासार विवेकावर आधारलेले नसते. त्यात चिकित्सक पद्धती वापरलेली नसते. होम-हवन का करावे? पूजा का करावी? तीर्थयात्रेला का जावे? प्रार्थना का करावी? यासंबंधी पटविण्यासारखा युक्तिवाद धर्मगुरुंपाशी आणि धर्मग्रंथांपाशी नसतो. धर्माचे मानसशास्त्र मनुष्याच्या भावनांचे मानसशास्त्र आहे. ऐहिक आणि पारलौकिक हितहितांसंबंधी निरंतर उत्पन्न होणाऱ्या वासनांच्या प्रभावाने मनुष्याचे कल्पनाविश्व निर्माण होत असते. त्या कल्पनांनी निर्माण केलेल्या देवदेवतांच्या संबंधात मनुष्य आपल्या विहित व निषिद्ध आचरणाच्या पद्धती ठरवितो. या विहित आणि निषिद्ध आचरणाचा ऐहिक आणि पारलौकिक असा दुहेरी प्रभाव मानलेला असतो. श्रद्धायुक्त धर्माचरण केवळ पारलौकिकाकरिता नसते. मानवी समाज सुसंस्कृत अवस्थेला पोचल्यावर, स्थिर समाजसंस्था निर्माण झाल्यावर पारलौकिक आणि ऐहिक दोन्ही प्रकारच्या हिताहितांशी संबद्ध अशी धर्माचरणाची पद्धती निर्माण झाली. प्राथमिक अवस्थेतील समाजांमध्ये ऐहिक हितच महत्त्वाचे ठरते. आर्थिक संबंध अधिक महत्त्वाचे असतात. यज्ञ, पूजा, प्रार्थना, प्रायश्चित्त, उपवास, यात्रा, ध्यान, जप, सामुदायिक अर्चा, उत्सव, अन्नसंतर्पण या सगळ्या गोष्टी, हे सगळे धर्माचार मुख्यत: ऐहिक हिताहितांशी संबद्ध असतात. सृष्टीतील घडामोडींचा माणसाच्या आर्थिक जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध असतो. निसर्गाच्या अनुकूल शक्ती, अखंड प्रवाहाची महानदी, जमिनीची सुपीकता, आलेल्या संकटांवर मात करणारी परिस्थिती यांच्या योगाने तो उत्साहित होतो व दैवी शक्तींवर प्रेम करतो, भक्ती करू लागतो. निसर्गावर विजय मिळविणारी विज्ञान व तंत्र ही साधने विज्ञानयुगापूर्वीच्या स्थितीत वारंवार अपुरी पडत. त्यामुळे विवंचना आणि भय याने तो वारंवार ग्रस्त होत असे. अनुकूल वा प्रतिकूल महत्त्वाच्या घटनांचा निश्चित कार्यकारणभाव विज्ञानपूर्व युगात ध्यानात भरत नाही. तेव्हा भयातून पार पडण्याकरिता व उमेद वा उत्साह वृद्धिंगत करण्याकरिता अलौकिक, सचेतन शक्तीची किंवा तत्त्वांची कल्पना करून आराधना करू लागतो. नैसर्गिक व सामाजिक घटनांना, पौराणिक, अद्भुत व असंभवनीय कथा रचून उलगडा करण्याचा

प्रयत्न करतो. जीवात्मे, मृतात्मे, पितर, अनुकूल असलेली किंवा झपाटणारी भुते, राक्षस वा असुर, अनेक देव किंवा एक देव सजीव व निर्जीव वस्तूंतील पवित्र व अपवित्र सामर्थ्ये इत्यादिकांची मानसिक चित्रे निर्मितो व त्यांच्यावर श्रद्धा ठेवतो. ही श्रद्धा अंधश्रद्धा असते, असे आपण म्हणतो, परंतु मनुष्याच्या ठिकाणी असलेली बुद्धिवादी प्रवृत्तीच अंधश्रद्धांना जन्म देत असते. जीवनातील व विश्वातील घटनांच्या कार्यकारणभावाची उत्पत्ती लावण्याकरिता निर्माण केलेला युक्तिवादच शेवटी अंधश्रद्धेचे रूप धारण करतो.

सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, परमदयामय असा ईश्वर आहे आणि त्याचे साहाय्य, सान्निध्य किंवा तादात्म्य प्राप्त करून घेता येते. त्यातच जीवनाची पूर्णता होते, असे एकेश्वरवादी धर्माने गृहीत धरलेले आहे. नास्तिक मानसशास्त्रज्ञ मरणोत्तर जीवन, अमरत्व आणि ईश्वर यांच्याबद्दलच्या संकल्पना या भ्रमात्मक आहेत असे मानतात. या संकल्पनांच्या भ्रमांमध्ये मानव का सापडला? याचा उलगडा बुद्धिवादी मानसशास्त्रज्ञ अनेक प्रकारांनी करण्याचा प्रयत्न करतात. शुद्ध बुद्धिवादाने म्हणजे युक्तिवादाने आत्म्याचे अमरत्व, परलोकाचे अस्तित्व आणि ईश्वर सिद्ध करता येत नाही, ही गोष्ट खरी आहे. मग ईवराच्या आणि अमरत्वाच्या कल्पनेचा मनुष्याच्या जीवनावर, मनावर इतका सार्वत्रिक व खोल पगडा का बसला आहे, याचे उत्तर देण्याचा काही नास्तिक भौतिकवादी प्रयत्न करतात. लुंडविग फायरबाख या जर्मन तत्त्ववेत्त्याचा १९ व्या शतकात युरोपियन विचारपद्धतीमध्ये चांगला प्रभाव पडला होता. ईश्वर ही कल्पना मानवी मनाचे बहि:प्रक्षेपण आहे, असे तो म्हणतो. तो म्हणतो की, मनुष्याला ज्ञान व सुख अपुरे असते. त्याला निसर्गाचे भय असते. निसर्गावर पूर्ण ताबा मिळविण्याची शक्ती नसते; परंतु सर्व विश्वाचे ज्ञान व्हावे, निरंतर आनंद मिळावा, संपूर्ण विश्वावर ताबा मिळावा अशी अदम्य इच्छा असते. भयनिवारणशक्ती व जीवनसाधने निर्माण करण्याची शक्ती प्राप्त करून घेण्याकरिता तो धडपडत असतो. वारंवार वैफल्य येते. क्लैब्याची म्हणजे असामर्थ्याची व अपूर्णतेची जाणीव त्याला डाचत असते. या जाचातून बाहेर पडण्याचा प्रयत्न म्हणजे सर्वज्ञ व सर्वशक्तिमान, आपल्यावर नियंत्रण करणाऱ्या वेगळ्या ईवराची कल्पना होय. हेच बहि:प्रक्षेपण होय. स्वत:च्या अपूर्ण आत्म्याचे पूर्ण रूपातले प्रक्षेपण होय. फायरबाखच्या या विचाराचे कार्ल मार्क्स याने स्वागत करून त्याचे सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून मूल्यमापन केले आहे. त्याच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे : देवाच्या इच्छेनेच सर्व काही घडत असते; देवाची कृपा झाली म्हणजे सर्व तऱ्हेची दु:खे, संकटे वा हालअपेष्टा टळतात असा धर्मसंस्थेचा एक महत्त्वाचा मूलभूत सिद्धांत आहे. धर्मसंस्था ही उच्च, धनिक सत्ताधारी वर्गाने निर्माण केलेल्या विचारसरणीतून निर्माण झालेली संस्था आहे. आजपर्यंतची समाजरचना शोषक व शोषित अशा वर्गाची रचना आहे. शोषित वर्गानेही विषम समाजरचना बिनतक्रार मान्य करून जगावे, वरिष्ठ सत्ताधारी शोषक वर्गाच्या विरुद्ध बंड करून उठू नये, शांतता कायम राखावी, याकरिता समाजातील

विषमतेची व सुखदु:खांची सर्व जबाबदारी देवावर टाकली व ती देवाची संकल्पना शोषित वर्गांनी खरी मानली. तात्पर्य, धर्म म्हणजे शोषित बहुजन समाजाला चटक लागलेली अफूची गोळी ठरते. या अफूच्या नशेत राहून शोषित वर्ग निमूटपणे शोषणजन्य दु:खे सहन करू शकतो. धर्म हा परमशांतीचा मार्ग होय. या सिद्धांताचा हा गर्भितार्थ आहे. शोषित व शोषक अशी समाजरचना बदलून साम्यवादी समाजरचना स्थापित झाली म्हणजे अशा तऱ्हेच्या अफूच्या गोळीची गरज राहणार नाही. कारण समाजात शोषित वर्गच राहणार नाही. संघटित शोषित वर्गच साम्यवादी समाजरचना क्रांतीच्या द्वारे करू शकेल. या क्रांतीच्या पूर्वतयारीच्या स्थितीत शोषित वर्गाच्या बुद्धीचा विकास होतो. आपल्या दु:स्थितीला कारण सत्ताधारी वर्गाचे राजकारण व अर्थकारण आहे, त्याचे कारण देव नाही असा सिद्धांत लक्षात घेऊन दलितवर्ग समाजवादी व साम्यवादी क्रांतीकरता सिद्ध होतात.

आधुनिक मनोविश्लेषणवाद्यांनी मानवी समाजातील युगानुयुगे दृढ असलेल्या धर्मसंस्थेचा मानसशास्त्रदृष्ट्या शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. वर सांगितलेला लुंडविग फायरबाख याचा बहि:प्रक्षेपण सिद्धांत एक प्रकारचे मनोविश्लेषणच आहे; परंतु मनोविश्लेषणाच्या सिद्धांताप्रमाणे अबोध (अन्कॉन्शस) मनाचे स्पष्टीकरण सिग्मंड फ्राइड आणि युंग या मानसशास्त्रज्ञांनी दोन विरुद्ध बाजूंनी केले आहे. फ्राइड नास्तिक आणि निरीश्वरवादी आहे व युंग आस्तिक आहे. या दोघांनी भिन्न धर्म-उपपत्ती सांगितल्या आहेत.

फ्राइडच्या मते धर्म हा भावनाग्रस्त मनाच्या विकृतीतून निर्माण झालेला आहे. जन्मापासूनच माणसाच्या सहज प्रवृत्तींवर कुटुंबाची वा कुटुंबाधिपतीची वा वडीलधाऱ्या माणसांची बंधने सारखी पडत असतात. स्वाभाविक प्रवृत्ती दडपल्या जातात. त्यामुळे कुटुंबावर स्वामित्व गाजविणाऱ्या माता-पिता इत्यादी व्यक्तींबद्दल माणसाला जसे प्रेम वाटते तसेच त्यांच्या दडपणामुळे द्वेषही उत्पन्न होतो. भयही वाटत असते. मज्जातंतूंवर त्यामुळे सारखा ताण पडून मनोग्रंथी रोगट बनतात. दडपलेल्या त्याच्या मनोभावना स्वप्नात उफाळून येतात. विविध प्रकारची स्वप्ने पडतात. 'लिविडो' म्हणजे कामुक ऊर्जा. ही सर्व मानवी प्रवृत्तीचे अधिष्ठान असते. मज्जेचे कार्य हे तिचेच कार्य असते. मन:प्रवृत्तीवरील बंधने म्हणजे तिच्याचवरील बंधने होत. स्वप्नातील आविष्कार हे तिचेच आविष्कार असतात. जागृतीत देखील या कामुक ऊर्जेमुळेच विलक्षण कल्पनाजाल (फँटसी) निर्माण होते. हे कल्पनाजाल म्हणजे अनुभवच असतात. पण हे अनुभव आभासात्मक असतात. इच्छा, द्वेष आणि अन्य भावना हे त्या कल्पनाजालाचेच स्वरूप असते. वास्तव जीवनातील अडचणींमुळे इच्छांचा सारखा विघात होत असतो. तरी त्या अदम्यच असतात. या अदम्य वासना अबोध मनामध्ये साठलेल्या असतात. त्यांच्यातूनच कल्पनाजाल तयार होते. देव, असुर, पिशाच, पाप-पुण्य इत्यादिकांची कल्पनाजालात निर्मिती होते व ते कल्पनाजाल खरे वाटू लागते. म्हणजे मनाने जे कल्पिलेले असते, ज्यांचा आभास होतो त्यांचे बहि:प्रक्षेपण होते. स्वप्नातला स्त्री-पुरुष

संभोग हे त्याचेच एक उदाहरण होय. देव, राक्षस, पिशाच, भुते माणसांना अंधारात, दरीत, विजनस्थानात दिसतात, हेही बहि:प्रक्षेपणाचेच उदाहरण आहे. वास्तव साधनांनी जी इच्छा तृप्त होत नाही ती इच्छा हट्टाने, दुराग्रहाने मनुष्य कल्पनाजालांच्या साहाय्याने पुरी करतो. कल्पित साधने निर्माण करतो. धार्मिक आचरण, कर्मकांड वा यातुविद्या ही कल्पित साधने होत. जीवनात अनपेक्षित रीतीने जे घडते त्याचा अर्थकारणभाव कल्पनाजालाच्या साहाय्याने मनुष्य कल्पितो. सगळ्या धार्मिक संकल्पना या अशाच कल्पनाजालाची रूपे होत. अस्वस्थ व रोगी अशा सामाजिक मनाची धार्मिक संकल्पना ही सृष्टी असते. मरणाची भीती असते. मरण टाळावेसे वाटते. जीवनेच्छा अदम्य असल्यामुळे मनुष्य मरणोत्तर स्थिती वा अमरत्व कल्पनाजालातून पाहतो. ते खरे वाटते आणि अमरत्वाची इच्छा तृप्त होते. प्राथमिक समाजातील कुटुंबाचा पिता हा संरक्षक असतो. तसा कुटुंबाचा तो दंडाधिकारीही असतो. ईश्वर म्हणजे अतिभाविक, अतिरंजित अशी वास्तव पित्याचीच कल्पना असते. पित्याबद्दल प्रेम व भय वाटते तसेच ईश्वराबद्दलही वाटत असते. कल्पनाजालनिर्मित धर्मसंस्था ही सुधारलेल्या समाजांमध्येसुद्धा समाजशास्त्यांनासुद्धा आवश्यक वाटते. याचे कारण केवळ राजशासनाने आणि समाजशक्तीने व्यक्ती पूर्णपणे नियंत्रित करता येत नाही. जोपर्यंत निर्बंधप्रधान समाजसंस्थेतील माणसे भावनातिरेकग्रस्त मनोविकृतीतून मुक्त होणे कठीण दिसते, तोपर्यंत भ्रमात्मक धर्मसंस्थेची आवश्यकता ही राहीलच.

समाजातील सर्व माणसे जन्मापासून सामाजिक निर्बंधांच्या कारागृहात वावरत असतात. म्हणून ती सर्व भावनाग्रस्त मनोविकृतीने पछाडलेली असतात, हा फ्राइडचा सिद्धांत अनेक मनोविश्लेषणशास्त्रज्ञांना मान्य होत नाही. कारण अनेक सामाजिक निर्बंध हे सुरळीत सामाजिक व्यवहाराचेही मार्ग असतात. हा अनुभव समाजात वावरणाऱ्या सर्व व्यक्तींना कमी-जास्त प्रमाणात येतो. सुव्यवस्था असह्य असतेच असे नव्हे. मनुष्य हा विवेकी व बुद्धिवादी प्राणी असल्यामुळे सुव्यवस्थेचा सुपरिणाम दैनंदिन व्यवहारात प्रत्ययास येतोच. दुसरे असे की पूजा, ध्यान, प्रार्थना इत्यादी धार्मिक साधनांनी माणसांचे मानसिक आणि शारीरिक रोगही बरे करता येतात. धर्म ही रोगट मनोवृत्ती असेल तर धार्मिक साधनांनी, भजन-पूजनांनी व भक्तिमार्गातील कथा-कीर्तनांनी मन अधिक दुबळे व्हायला पाहिजे. तसे होत नाही म्हणून धार्मिक साधने दुर्बळ करणारी कोणती आणि सामर्थ्य देणारी कोणती यांची नीट तपासणी आणि मांडणी करणे जरूर आहे. कल्पनाजाल हे रोगट जसे असू शकते तसे निरोगीही असू शकते. निरोगी कल्पनाजालाला कल्पनाविलास म्हणावे. जडीबुटी, मंत्रतंत्र इत्यादी साधनांनी मनुष्य रोग बरे करण्याचा प्रयत्न करतो. या त्याच्या प्रयत्नांमुळेच कल्पित आणि भ्रामक उपाय मागे पडून आश्चर्यकारक रीतीने रोग बरा करण्याची औषधे मनुष्य निर्माण करू लागला. मनुष्य हा दृश्य वास्तवाच्या पलीकडे कल्पनेने पाहतो. म्हणूनच जीवनाची नवी नवी साधने निर्माण करू शकतो. नवीन अधिक सामर्थ्याची साधने सापडली

म्हणजे कमी सामर्थ्याची साधने टाकून देतो.

धर्मकल्पना किंवा धर्मभावना यांच्या योगाने माणसात धैर्य निपजते, शौर्याने कामे करण्याचा उत्साह निर्माण होतो, असेही दिसून येते. धार्मिक उपासना, विचारपूर्वक निर्माण केलेल्या साधनपद्धतीचे उपांग बनू शकते. धार्मिक पंडित व्याकरण, न्याय, दंडनीती इत्यादी शस्त्रे निर्माण करू शकेल. अनेक शूरवीर धार्मिक श्रद्धेच्या बळावर युद्धे जिंकू शकतात. कवी, कलाकार आणि शिल्पकार धार्मिक श्रद्धेच्या सामर्थ्याने महनीय कृती निर्माण करतात. विवेकशक्तीच्या प्रबोधनामुळे मनुष्य देववादी जरी बनला तरी दैववादी बनत नाही. धार्मिक श्रद्धेमुळे माणसे नीतिनिष्ठही बनतात. अपार संपत्तीचे वैभव लोकोपकारार्थ अर्पण करणारे धार्मिक दानवीर समाजात आढळतात. राष्ट्रावर संकट आले असता सर्वस्वाचा त्याग करून जीवित समर्पण करण्याची शौर्यपूर्ण कृती धार्मिक भावनेच्या अधिष्ठानावर घडू शकते.

विसाव्या शतकाच्या या अंतिम कालखंडात जगातील भिन्न भिन्न व दूरदूरचे मानवसमाज आणि राष्ट्र यांचे परस्परसंबंध जुळून त्यांच्यातील दळणवळण अतूटपणे सुरू झाले आहे. आर्थिक आणि राजकीय दृष्टीने जगातील सगळी राष्ट्रे परस्परावलंबी बनू लागली आहेत. हिंदू, ख्रिस्ती, मुसलमान, यहुदी, बौद्ध इत्यादी धार्मिक समाज आपापल्या पवित्र धर्मग्रंथांच्या आज्ञांच्या अनुरोधाने जीवनक्रम चालवितात; परंतु हे पवित्र धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत आहेत, अशी सार्वत्रिक श्रद्धा निर्माण करण्याइतका समर्थ युक्तिवाद सापडू शकत नाही. वेद हिंदूंपुरते किंवा भगवद्गीता हिंदूंपुरती, बायबल ख्रिस्ती आणि यहुदी यांच्यापुरती, कुराण मुसलमानांपुरती ईश्वराची वाणी ठरते. जगातील सगळ्या राष्ट्रांना आणि समाजांना एकत्र सहकार्याने जगता येईल, सामाजिक समरसता उत्पन्न होईल, मानवी एकतेचा प्रत्यय येईल अशा तऱ्हेच्या विवेकबुद्धीला पटणाऱ्या नीतिधर्मांच्या योगाने यापुढील मानवसमाजाचे या पृथ्वीवरील जीवन सुसह्य होऊ शकेल. आपापल्या परंपरागत धर्मांना, आपापल्या अंतर्गत व्यवहारापुरतेच मर्यादित ठेवून व्यापक अशी नवी सर्व मानवसमाजाची जीवनमूल्ये आत्मसात करण्याची आवश्यकता आहे आणि आजची जी मानवी संस्कृतीची, विशेषत: सुधारलेल्या राष्ट्रांची सांस्कृतिक पातळी आहे ती लक्षात घेतली असताना एकात्मक मानवसमाजाचे भवितव्य सुरक्षित होईल, अशी आशा करता येते.

मानवी जीवशास्त्रदृष्ट्या शुद्ध, विवेकनिष्ठ व पवित्र धर्मग्रंथांच्या आधाराची गरज नसलेला व्यापक, मानवव्यापी प्रेमावर आधारलेला निरपवाद मित्रतेचा धर्म प्रत्ययास येऊ शकतो. या धर्माच्या कसोटीवर पवित्र धर्मग्रंथांनी घातलेल्या मर्यादांच्या पलीकडे विवेकबुद्धी पोचू शकते. हिंदू अहिंदूला, मुसलमान मुसलमानेतराला, ख्रिश्चन ख्रिश्चन नसलेल्याला, यहुदी यहुदी नसलेल्याला अपवित्र समजतात; परंतु व्यापक मानवी मैत्रीवर आधारलेली विवेकबुद्धी हे मान्य करू शकत नाही. आज जागतिक शांतता, सहकार्य आणि समृद्धी यांच्या मार्गावर स्थिर राहावयाचे तर वरील पक्षपात किंवा भेदभाव अयोग्य होय, असा

दृष्टिकोन निर्माण होण्याची गरज आहे; आणि या दृष्टिकोनाला पोषक अशी मनुष्याच्या ठिकाणी निसर्गत:च असलेली निरपेक्ष व्यापक प्रेमभावना मदत करू शकते. दुसरी गोष्ट अशी की, स्वार्थापेक्षा परोपकारांनी मानवी व्यवहार सर्वमान्य होऊ शकतात. जातिभेद, धर्मभेद व राष्ट्रभेद यांना उल्लंघून जाणाऱ्या वैद्यकसंस्था सुसंस्कृत वा असंस्कृत अशा सगळ्याच स्तरांवरील मानवांना मान्य होतात. दुष्काळात सापडलेल्या पृथ्वीवरील कोणत्याही राष्ट्राला मदत करणारी राष्ट्रे ही जागतिक प्रशंसेस पात्र होतात. मोठमोठ्या यशस्वी खाजगी किंवा सार्वजनिक उद्योजकांना आंतरराष्ट्रीय मदत देणाऱ्या अर्थसंस्था आणि बँका यांच्या कार्याची आजच्या मानवी समाजांना अपरिहार्यपणे आवश्यकता भासते. ज्ञान आणि शिक्षण यांचे वितरण जगातील सर्व विद्यार्थ्यांना करणाऱ्या संस्था, आजच्या मानवी संस्कृतीचे संवर्धन करणारी केंद्रस्थाने मानली जातात. तात्पर्य, परंपरागत व संकुचित पवित्र धर्मग्रंथांच्या नियंत्रणाखाली चालणाऱ्या व्यवहारांपेक्षा सर्व मानवजातीला उपकारक असे व्यवहार चालविणाऱ्या संस्था आणि पद्धती सर्वमान्य होऊ लागल्या आहेत. पवित्र धर्मग्रंथांच्या शब्दप्रामाण्यापेक्षा विवेकबुद्धीने परलोक, ईश्वर, अमरत्व इत्यादी अलौकिक मूल्यांकडे पाठ फिरविणाऱ्या इहवादी नैतिक तत्त्वज्ञानाला आजच्या जागतिक शिक्षणव्यवस्थेत अग्रस्थान प्राप्त करून देणे नितांत आवश्यक ठरते व तसे घडू लागले आहे.

परंपरागत धार्मिक सिद्धांतांची समीक्षाही निरंतर चालविणे मानवी हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. हिंदू धर्मामध्ये उच्च-नीच जातिसंस्था आणि अस्पृश्यतेची चाल या अनिष्ट गोष्टी आहेत. या दृष्टीने हिंदूंनी स्वधर्मसुधारणेचा प्रयत्न नेटाने चालविलेला आहे. उदा. महात्मा गांधींनी अस्पृश्यता हा हिंदू धर्माचा कलंक आहे, असे मोठ्या उच्च धैर्याने उद्घोषित केले. त्यामुळे मानवव्यापी समतेच्या तत्त्वाचे अवलंबन करण्यात हिंदू समाजाचे एक पाऊल पुढे पडले आहे. उच्च अशा हिंदूंच्या मोक्षशास्त्राप्रमाणे अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य ही मूल्ये आचरणात आणणारी प्रत्येक व्यक्ती ही कोणत्याही धर्माची असली तरी श्रेष्ठच ठरत असते. ही व्यक्ती हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन किंवा कोणत्याही अन्य धर्माची असो, ती पवित्र व वंदनीय असते. हा विचार हिंदू संतांनी गेली अनेक सहस्र वर्षे मान्य करून पुरस्कारिला आहे व तो जागतिक मानवी मूल्यांच्या दृष्टीने बौद्ध धर्माने अडीच हजार वर्षांपूर्वीच फार मोठे प्रगतीचे पाऊल टाकले आहे. विवेकबुद्धीचे प्रामाण्य धर्मग्रंथापेक्षा अधिक आहे, ही गोष्ट भगवान बुद्धाने मोठ्या कुशलतेने स्पष्ट केली आहे.

भगवान बुद्ध धर्मसाक्षात्कारानंतर चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळपर्यंत देशोदेशी फिरून धर्मप्रचार करत होते. एकदा भगवान बुद्ध धर्मप्रचारासाठी कोसल देशामध्ये फिरत असता कालाम नावाच्या क्षत्रियांच्या गावी आले. भगवंतांच्या आगमनाची वार्ता ऐकून कालामांचा मोठा समुदाय त्यांच्या दर्शनाला गेला. कालामांपैकी जाणते लोक भगवंतांना अनेक प्रश्न विचारून आपल्या संशयाचा निरास करू लागले. त्यांनी एक महत्त्वाचा प्रश्न

विचारला, ''भगवन्, आमच्या गावी पुष्कळ श्रमण ब्राह्मण येत असतात. ते आपापल्या मतांची वाखाणणी करतात व दुसऱ्याच्या मतांची निंदा करतात. अशा वेळी आम्हाला अशी शंका येते की, या सर्वांमध्ये कोणाचे मत खरे? आणि कोणाचे खोटे? या श्रमण ब्राह्मणांमध्ये सत्यवादी कोण? असत्यवादी कोण?'' यावर बुद्धगुरु उत्तरले, ''कालाम हो, मी जे काही सांगणार आहे ते परंपरेने ऐकत आलो आहोत म्हणून खरे मानू नका. आपली पूर्वपरंपरा अशी आहे, म्हणून खरे मानू नका. हे आपल्या पवित्र ग्रंथांतही आहे म्हणून खरे मानू नका. हे अनुमानाने सिद्ध करता येते म्हणूनही खरे मानू नका. लोक मानतात म्हणूनही खरे मानू नका. हे सुंदर दिसते किंवा श्रद्धेला जुळते म्हणूनही विवास ठेवू नका. हा सांगणारा प्रसिद्ध श्रमण आहे वा आपणाला पूज्य आहे म्हणूनही त्याच्या भाषणावर विश्वास ठेवू नका. जेव्हा तुमच्या विवेकबुद्धीने माझा उपदेश तुम्हाला खरा वाटेल, तेव्हाच तुम्ही त्याचे ग्रहण करा. मनुष्याच्या अंत:करणावर लोभाचा, द्वेषाचा किंवा मोहाचा ज्यावेळी पगडा बसतो त्यावेळी आत्महित किंवा परहित समजणे शक्य आहे काय?'' कालामांनी उत्तर दिले, ''नाही''. बुद्धगुरु पुढे म्हणाले, ''आता कालाम हो, मी तुम्हाला विचारतो की, मनुष्याचे अंत:करण परोपकारबुद्धीने भारून गेले. मैत्रीने आणि विचाराने उत्साहित झाले तर त्यापासून हितच होईल, अहित होणार नाही. कालाम हो, ज्याचे अंत:करण लोभाने पराभूत झालेले नाही, तो मनुष्य प्राणघात करीत नाही, चोरी करीत नाही, व्यभिचार करीत नाही, असत्य बोलत नाही, आणि ही पापे करण्यास दुसऱ्यास उत्तेजन देत नाही. लोभ, द्वेष आणि मोह ही पापाची मुळे आहेत. ही तीन पापे आत्मघात आणि परघाताला कारण होतात. या पापांमुळेच जगातील दु:ख वाढते आहे. लोभ, द्वेष आणि मोह यांच्यातून मुक्त जगामध्ये शांतिसुखाची अभिवृद्धी होते. हे तुमच्या बुद्धीला खात्रीने पटेल, तेव्हा मनाची शुद्धी पूर्णतेला जाईल असा प्रयत्न करा. कालाम हो, ज्या आर्य श्रमणाच्या मनातून लोभ, द्वेष आणि मोह या तीन मनोवृत्ती नष्ट झाल्या तो चारी दिशांतील प्राणिमात्रावर मैत्रीभावना करावयाला समर्थ होतो. आपल्या मैत्रचित्ताने चोहो दिशांमधील प्राण्यांवर तो प्रेम करतो. करुणा, मुदिता आणि उपेक्षा या भावनांचाही त्याला सहज लाभ होतो. कालाम हो, सर्वव्यापी मैत्री, सर्वांप्रती करुणा, सर्वांच्या सुखाबद्दल मुदिता (आनंद) आणि दुसऱ्याच्या पापाची उपेक्षा या चार भावनांच्या योगे वैरापासून मन मुक्त होते, धैर्य उत्पन्न होते. परलोक असेल तर माझ्या या सुकर्मामुळे मला सुगतीच मिळाली पाहिजे, परलोक नसेल तर याच जगामध्ये त्यामुळे मी मोठ्या आनंदाने राहतो. जर पापी मनुष्याला याबद्दल शिक्षा भोगावी लागते, हा सिद्धांत खरा असेल तर मला शिक्षा भोगण्याचा प्रसंग येणार नाही. जर आपल्या पापाचे वा पुण्याचे फळ आपणाला मिळतेच असे नसून ते दुसऱ्या कोणाला तरी भोगावे लागते, हा सिद्धांत खरा असेल तर माझ्या सदाचरणामुळे मी माझेच नव्हे तर इतर जनांचेही कल्याण करतो.''

भगवान बुद्धांनी कालामांना केलेला हा उपदेश नैतिक मूल्यांचे उत्कृष्ट समर्थन होय. असे

क्वचितच दुसरीकडे वाचावयास मिळेल.

प्रत्येक धर्मामध्ये काही कर्मकांड असते, काही आचारधर्म असतात. प्रत्येक धर्माचे कर्मकांड निराळे असते. मुसलमान पाच वेळा मक्का क्षेत्राकडे तोंड करून, गुडघे टेकून प्रार्थना करतात. ख्रिश्चन, यहुदी आणि मुसलमान आठवड्यातून एक दिवस सुटीचा दिवस पाळतात. दिवसातून पाच प्रार्थना हिंदू करीत नाहीत किंवा आठवड्याचा सुटीचा दिवस पाळत नाहीत. मक्केकडे तोंड करून प्रार्थना का करावी, याचे सयुक्तिक उत्तर हिंदूंना आणि ख्रिश्चनांना मिळू शकत नाही. आठवड्याचा सुटीचा एक दिवस पाळला नाही तर पाप लागते, ही कल्पना हिंदूंना मान्य होण्याचे कारण नाही; परंतु आठवड्यातून एक दिवस सुटीचा पाळणे हे उचितही ठरेल आणि विसंगत ठरणार नाही. मुसलमान आणि हिंदू देवाला प्राण्यांचा बळी देतात. हे कर्म ख्रिश्चन किंवा भागवतधर्मी हिंदू अपवित्र मानतात आणि ते खरोखरच अयोग्य आहे, ही गोष्ट आजच्या सुसंस्कृत विवेकी मनुष्याला पटण्यासारखी आहे.

भगवान बुद्धांनी कर्मकांड, यज्ञयाग या धर्माचारांपेक्षा स्तोत्र, पूजा, भजन, तीर्थयात्रा यांच्यापेक्षा मनोवृत्तीचे यथार्थ अवलोकन करून कामविकार, द्वेषबुद्धी, आळस, अस्वस्थता आणि संशय ही पाच ज्ञानाची आवरणे नष्ट करण्याचा प्रयत्न करणे याला खरा धर्म म्हटले आहे. प्राणघात, चौर्यकर्म, व्यभिचार, असत्य भाषण, गालिप्रदान, वृथालोभ, परधनाचा लोभ यातून निवृत्त होण्याला महत्त्व दिले. शील, समाधी ज्याच्या योगाने वाढतात तोच धर्म आणि यांचा ऱ्हास ज्याच्या योगाने होईल तो अधर्म. अशा तऱ्हेचा सूत्ररूप मूलभूत सिद्धांत भगवान बुद्धांनी वारंवार सांगितला आहे.

परंपरागत हिंदू धर्मामध्ये भगवान बुद्धांचा जन्म झाला; परंतु यज्ञसंस्था आणि जन्मजात चातुर्वर्ण्य यांच्यावर भगवान बुद्धांनी हल्ला केला. हा हल्ला म्हणजे एक उत्कृष्ट युक्तिवादच होय. भगवान बुद्धांच्या धर्माचा भारतात आणि भारताबाहेर जो प्रचार झाला त्यात प्रचारक भिक्षूंचे सदाचरण आणि प्रचारक भिक्षूंचा बुद्धिप्रामाण्यवाद ही दोन मुख्य धर्मप्रचाराची साधने प्रभावी ठरली. इस्लामने युक्तिवादाबरोबरच शस्त्राचाही धर्मप्रचाराकरिता वापर केला. ख्रिश्चन धर्म मुळात नीतिप्रधान धर्म, अहिंसाप्रधान धर्म आहे. परंतु, ख्रिश्चन धर्मातही हिंसेचा मोठ्या प्रमाणात वापर केल्याचे इतिहास सांगतो. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यावर भगवान बुद्धांनी वैचारिक हल्ला केला. तेव्हा समाजामध्ये प्रतिष्ठा, मानमान्यता आणि अधिकार प्राप्त झालेल्या वर्गावरच एका परीने वैचारिक हल्ला केला; परंतु जबरदस्त नैतिक प्रेरणा यशस्वी झाल्या. मनुष्यातील जातिभेद नैसर्गिक नाहीत. मनुष्य जन्माने श्रेष्ठ नसतो, कर्माने श्रेष्ठ होतो हा विचार त्या वेळच्या समाजरचनेला जबरदस्त धक्का देणारा होता. यज्ञसंस्थेच्या योगाने समाजातील सत्ताधारी आणि धनिक वर्ग यांची प्रतिष्ठा वाढत असे. हिंदुस्थानातील मुसलमानपूर्व राजकीय इतिहास पाहिला, तर त्यात असे आढळते की, अनेक राजांनी आणि सम्राटांनी राजसूय, अश्वमेध इत्यादी मोठमोठे यज्ञसमारंभ घडवून आणून आपली सत्तेवरील

पकड दृढ केली. भगवान बुद्धांच्या नंतर अनेक शतके यज्ञसंस्थेचा प्रभाव हिंदू समाजावर होता तो हळूहळू क्षीण होत गेला. हिंदू धर्मावर भगवान बुद्धाच्या नैतिक विचारसरणीचा खोलवर परिणाम झालेला दिसून येतो. हिंदू धर्मात मौलिक धर्ममंथन सुरू झालेले भगवद्गीतेवरून आणि महाभारतातील शांतिपर्वावरून लक्षात येते. भगवद्गीतेतील दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती ही मानवी आचरणाची विभागणी नैतिक विवेकबुद्धीच्या कसोटीवरच झालेली लक्षात येते. मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचे दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती हे दोन आविष्कार ठरतात. ''अभय, सत्त्वसंशुद्धी, ज्ञाननिष्ठा, योगयुक्तता, दान, दम, यज्ञ, अध्ययन, तप, सरलता, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, परदोषाची उपेक्षा, प्राणिमात्रांबद्दल दया, इंद्रियसंयम, मृदुता, लज्जा, अचांचल्य, तेज, क्षमा, धृती, शुचिता, अद्रोह, अतिमानतेचा अभाव ही दैवी संपत्ती होय. त्याच्या उलट आसुरी संपत्ती वर्णिली आहे. धार्मिकतेचा टेंभा म्हणजे दंभ, गर्व, अतिमान, क्रोध, कठोरता आणि अज्ञान ही आसुरी संपत्ती होय. दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती ही विभागणी आणि त्यांचे भगवद्गीतेतील विवरण उच्च दर्जाच्या नैतिक जीवनावर उत्कृष्ट प्रकाश पाडू शकते.

भगवद्गीतेवर बौद्ध धर्माचा अत्यंत गंभीर परिणाम झालेला स्थितप्रज्ञाच्या विवरणावरून लक्षात येतो. या स्थितप्रज्ञाच्या विवरणामध्ये भक्तियोग, कर्मयोग किंवा ज्ञानयोग यांचे विवरण मुख्यत: नसून निर्विकार आणि शुद्धचित्त हीच स्थितप्रज्ञावस्था होय, असा एक मूलगामी विचार भगवद्गीतेने पुरस्कारिलेला आहे. या स्थितीला ब्राह्मीस्थिती किंवा ब्रह्मनिर्वाण अशी संज्ञा दिली आहे. हा एक प्रकारचा उपनिषदातील वेदान्त आणि भगवान बुद्धांचा निर्वाण सिद्धांत यांचा समन्वय आहे.

विवेकबुद्धीला आणि आजच्या व्यापक अशा नव्या मानव संस्कृतीला सर्व मानवांची समता आणि एकता निर्माण करणाऱ्या नीतिधर्माचे अधिष्ठान निर्माण होणे आवश्यक आहे; आणि जगातील न्यायसंस्थेचे तेच अधिष्ठान म्हणून स्वीकारले जाणे आवश्यक आहे.

**(श्री. भानुभाई अध्वर्यू स्मारक व्याख्यान श्रेणी, अहमदाबाद येथे**
**दि. २१-२-१९८८ रोजी झालेल्या हिंदी व्याख्यानाचा मराठी अनुवाद**
**पूर्वप्रसिद्धी : नवभारत, फेब्रुवारी १९८८ पृ. १ ते १०)**

OOO

७०

# वैश्विक जाणिवेवर आधारलेली संस्कृती हवी

हा सत्कार समारंभाचे अध्यक्ष, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, संघटक माझे मित्र बाबा आढाव, माझ्याबरोबरच ज्यांचा सत्कार झाला ते माझे सहकारी, दीर्घकालीन. मित्र रामभाऊ चव्हाण, अण्णासाहेब शिंदे व उपस्थित बंधुभगिनींनो!

सत्कार समारंभ चालले आहेत. आताच विनायकराव म्हणाले की शाल देत नाही ते बरंय. त्यांना धोतर द्या. शालीची गोष्ट सांगतो. माझ्या मुलीची दोन मुले. एक २२ वर्षांचा व एक ९ वर्षांचा. माझ्या पत्नीने ती आता नाही. दहा वर्षापूर्वी ती वारली. तिने वडिलधाऱ्या नातवाला शाल काढून दिली. तो म्हणाला, "आजी, ही इतकी महाग शाल कशाला देतेस मला?" धाकटा म्हणाला, "अरे घे. आजीपाशी शालीचे दुकान आहे." त्यामुळे धोतरजोडी दिली हे फार चांगले झाले. माझा सत्कार समता प्रतिष्ठानने करणे हे अपरिहार्य आहे. कारण माझ्या आयुष्यात मी साम्यवादी झालो ही माझ्या जीवनातील एक क्रांती आहे. साम्यवादी विचारांची मी तपासणी करीत राहिलो. कोणताही विचार स्वीकारला म्हणजे तो पुनः पुन्हा तपासावा लागतो. कारण विचार हा जीवनामध्ये बदल करण्यासाठी असेल, जीवनाचा अर्थ समजून, जीवनाची जी उद्दिष्टे आहेत, त्या उद्दिष्टांचा अर्थ समजून वागण्याकरिता तो विचार असेल, तर तो सारखा तपासला पाहिजे. ही माणसाची जबाबदारी आहे. माणूस हा श्रद्धामय आहे. हो. पण श्रद्धा तीन प्रकारची असते. राजस, तामस, सात्विक. कुठे राजस आहे, कुठे तामस आहे, कुठे सात्विक आहे. हे शोधायला पाहिजे. नाही तर जे तामस आहे तेच स्वीकारतो. जगातील धर्माचा इतिहास पाहिला तर धर्मामध्ये अंधश्रद्धा फार शिरलेल्या असतात. त्या अंधश्रद्धांच्या बाहेर पडून तत्त्वं शोधायची असतात व अंधश्रद्धा शोधण्यासाठी नुसते शब्दप्रामाण्य नाही चालणार, ग्रंथप्रामाण्य नाही चालायचे. विवेक आपला जो आहे, विवेकाचे बीज आज माणसात ठेवलेले आहे. महादेव गोविंद रानडे यांचे वाक्य आहे. हे माझे मित्र ब्राह्मो समाजातील आहेत. ब्राह्मो समाजाचे ते महान पुरस्कर्ते होऊन गेले.

भारतामध्ये जे प्रबोधन युग सुरू झाले, त्याचा पहिला थोर प्रवर्तक म्हणजे राजा राममोहन रॉय. राजा राममोहन रॉयपासून शब्दप्रामाण्याच्या बाहेर विवेकप्रामाण्य, ती विवेकबुद्धी जी आहे तो काही निर्णय देईल त्याप्रमाणे कृती घडायला पाहिजे असा हा खरा दृष्टीकोण आहे.

जगामध्ये आजचे जे अनेक प्रश्न आहेत, त्यात धर्मक्षेत्रातला Fundamentalism हा मोठा प्रश्न आहे. परंपरावाद. त्याला मौलिकतावाद म्हणतात. शब्दश: भाषांतराने त्यातला अर्थ कळत नाही. परंपरा जशीची तशी मानायची हा एक दृष्टीकोण असतोच व परंपरा जी आहे, ती पुढे जाणारे जे आहेत, त्यांना अडवत असते. त्यांना अडचण उत्पन्न करीत असते, म्हणून हा जो परंपरावाद व विवेकवाद यात जो संघर्ष आहे, तो संघर्ष भारतामध्ये फार चांगल्या रीतीने सुरू झालेला आहे व त्याला फार महत्वाचे असे द्रष्टे मिळालेले आहेत. जगाला नवे राजकीय दर्शन देणारा नेता कोणत्याही ठिकाणी निर्माण झाला नाहीं, भारतात झाला. स्वातंत्र्य संग्रामात, तो म्हणजे महात्मा गांधी. न्यूयॉर्कमध्ये पुढच्या वर्षापासून गांधी जयंती साजरी व्हावयाची आहे. सापडला त्यांना माणूस. आजचे जे जगाचे सर्व प्रश्न आहेत. ते मानवाच्या ऐक्यत्वावर आधारलेले असे आहेत. ते याच तऱ्हेने सुरू करतात... मानवाची ऐक्यता ही शस्त्रास्त्राने नाही सिद्ध होणार. ती व्हायची हृदय परिवर्तनाच्या तपश्चर्येने, हृदय बदल, मी झगडणार हृदय बदलण्याकरिता, आत्मत्याग करणार हृदय बदलण्याकरिता. हा जो एक महान विचार जगाला व माणसाला म. गांधींनी दिला तो फार मोठा विचार आहे व भारताला जर काही भवितव्य असेल, तर तो मार्ग. या मार्गामध्ये देह पडलेला आहे. तो मार्ग आहे गांधींचा ज्या मार्गात देह पडला आहे, तो माणसा तुझा मार्ग आहे. माणसाला मार्गदर्शक अशा तऱ्हेचा माणूस मिळाला. तत्त्व नुसती नाहीत. ज्याच्या जीवनात तत्त्वाचे दर्शन आहे, तत्त्वाचे उदाहरण आहे. असा मोठा माणूस. असा मोठा माणूस भारताला मिळाला आहे. जगाला मिळाला आहे. आजचा जो माणूस आहे त्याला कळले पाहिजे की मी हिंदू की मुसलमान? हे सगळे जुन्या जगातले अहंकार आहेत. मानव संस्कृती निर्माण होत आहे हे आपण पहात नाही. आत्मवंचना चालली आहे. हे जे विज्ञान आहे, ह्या विज्ञानाचा, एक महत्त्वाचा पंडित येथे बसलेला आहे. विज्ञान हा एक प्रकाश आहे. हा प्रकाश म्हणजे भारतीय विज्ञान, सोव्हियत-अमेरिकन विज्ञान, असा काही प्रकार नाही.

विज्ञान हे सगळ्या जगाचे विज्ञान असते. वैज्ञानिक क्रांती गॅलिलिओपासून सुरू झाली. न्यूटनच्या वेळेस वैज्ञानिक क्रांती स्थिरावली. न्यूटनबद्दल एका कवीने फार सुंदर तऱ्हेचे उद्गार काढले आहेत. All things of a nature were hidden at night. God said, ‘Let there be Newton and It was all light’ सगळे जग जे आहे, निसर्ग होता तो सगळा अंधारामध्ये रात्रीने झाकला. ऋग्वेदातील एका सूत्रात म्हटलेले आहे, “हे सगळे अंधाराने भरलेले होते. अंधार आहे की नाही हे सुद्धा माहित नव्हते. सगळा निसर्ग हा अंधाऱ्या रात्रीने, काळोखाने झाकला होता. बायबलमध्ये पहिल्या अध्यायात सृष्टी कशी

निर्माण झाली हे सांगताना, God said, "Let there be light and there was light." या वाक्याच्या पद्धतीने कवी म्हणतो, God said let Newton be असे म्हटल्यावर न्यूटनं अस्तित्वात येणारच. and it was all light. ही क्रांती तर हे विज्ञान, हे सत्य जागतिक झालंय. जागतिक विज्ञान व तंत्रज्ञान ही जागतिक संस्कृती आहे. त्या संस्कृतीत आपण गुंडाळलो गेलो आहोत. त्या ह्या संस्कृतीच्या बाहेर आपण राहत नाही. आपले प्रत्येक पाऊल त्या वैज्ञानिक तंत्रज्ञानामध्ये आहे. तुही जेव्हा रुग्णालयात जाता व शास्त्रक्रिया होते, ती जुन्या ग्रंथांच्या आधारावर होत नाही. नवे ज्ञान असते. शरीराची स्थिती काय आहे याचे नवे bio-chemistry, जीवाचे जे रसायनशास्त्र आहे ते पाहून सर्जरी होते. तुम्हाला मोठी व्याधी झाली असेल की नवे विज्ञान तुमच्या सहाय्याला येते व तुम्हाला बरे करीत असते. बरे करतेच असे नाही पण झाला बरे तर ते नव्या ज्ञानाने. तुमचे सर्व अस्तित्व नव्या टेक्नॉलॉजीने, नव्या ज्ञानाने. आजचा जो तुमचा भूगोल आहे, आकाशाचे जे नवे ज्ञान आहे ते सगळे, नव्या दुर्बिणी ज्या आहेत त्याने मिळवलेले आहे. आकाशगंगा केवढी आहे? किती अशा आकाशगंगा आहेत? सूर्यमाला आहेत? हे जग एवढे मोठे आहे? ते आधुनिक ज्ञानामुळे समजते. हे जे आधुनिक ज्ञान आहे म्हणून मानवी संस्कृती एक होते आहे म्हणून दळणवळण शास्त्र ज्याला म्हणता येईल त्याचा पंडित, ज्याने, चंद्रावर वाहून जाण्यास मदत केली, त्याने म्हटले,

"Humanity lives in a global village" मानवजात पृथ्वी नावाच्या खेड्यात आहे म्हणजे इतके आपण जवळ आलो. खेड्यामध्ये १५० वर्षापूर्वी या टोकापासून त्या टोकापर्यंत माणसे ओरडून बोलत होती. आता ८००० मैलांवर माणसे हळू बोलतात व ते ऐकू येते. ओरडूनसुद्धा बोलावे लागत नाही. म्हणजे तुमचे जर ठरले असेल दोघांचे तर - तू तिच्याशी ८००० मैलावरून गुप्तगू करू शकतो. कोणी ऐकत नाही असे आपण जवळ आलो आहोत. पण माणसे मनाने वैरी झाली आहेत.

एकमेकापासून वेगळी झाली आहेत. ही जी नवी संस्कृती येते आहे त्या संस्कृतीने ज्या भावना द्यायला पाहिजेत, ज्या जाणीवा निर्माण करावयास पाहिजेत, नैतिक जाणिवा - त्या उच्च दर्जाच्या मानवतावादी. माणूस हिंदू नाही, मुसलमान नाही: आजचा माणूस हा मानव आहे म्हणजे त्याची जी संस्कृती आहे, ती एक आहे. संत साहित्याने मानवाला संदेश दिला आहे, तो हा आहे. जेव्हा आपण पसायदान म्हणतो. ज्ञानेश्वरांचे त्यात गांधीवाद आहे. खळांची व्यंकटी सांडो. तया सत्कर्मी रति वाढो. याचा अर्थ काय? दुष्ट जो आहे त्याचा वाकडेपणा नष्ट होऊ दे. त्याचे सत्कर्मावर प्रेम जडू दे. हे विश्वचि माझे घर. म्हणजे मानव हे कुटुंब आहे. डी जी उच्च दर्जाची जाणीव, याची आज गरज आहे. या जाणिवेवर आधारलेली अशी मानव संस्कृती आवश्यक आहे. आजचे राष्ट्रीयत्व जे आहे, त्याच्याबाहेरच्या अशा आंतरराष्ट्रीय भावना असल्या पाहिजेत. राष्ट्रीयत्व हा त्याचा अवांतर भाग. संकुचित अखिल मानवी

एकता ही आजची निष्ठा झाली पाहिजे. ही असली तरच आजच्या माणसाला भवितव्य आहे, नाही तर आजच्या माणसाला भवितव्य नाही. याची जाणीव आजच्या रॅशियन क्रांतीच्या, आजच्या नेत्याला झाली. त्याला पश्चाताप होतोय. ॲटमबॉम्बच्या विरोधी बोलतोय. कशासाठी हा वेडेपणा? असे हे जग बदलतंय. अशा या बदलत्या जगाची जाण आपण घेतली पाहिजे व आपली जी भारतीय राष्ट्रीय संस्कृती आहे, तिच्यामध्ये कुठलाही गर्व असता कामा नये. तो गर्व नाश केला पाहिजे. मानवी एकतेची अशी व्यापक जाणीव असली पाहिजे, तरच पुढील प्रवास नीट होईल. नाहीतर सर्वनाश. हा दृष्टीकोण हा जो मानवतावादी दृष्टीकोण आहे, हा धरून राहिले पाहिजे. ही विश्वव्यापी संस्कृती आहे. त्या संस्कृतीत मी आहे. माझ्या ज्या परंपरा, संस्कार आहेत, त्या माझ्याबरोबर आहेत यात शंका नाही. पण त्या परंपरांची अनेक बंधने तोडून टाकली पाहिजेत. त्यापैकी एक विलक्षण बंधन आहे जातपातीचे. ते मोडलेच पाहिजे. भटक्या विमुक्त जातींचे साहित्य मी वाचलेय. त्यात मला सापडलंय की त्यांच्यातील जाती अधिक दुर्बल आहेत! जातपंचायतीचे जे जबरदस्त बंधन या देशात होते- महादेव गोविंद रानड्यांना प्रायश्चित्त घ्यावे लागले ही इथली कथा आहे. चहा ते प्यालेसुद्धा नाही, त्या किरिस्तावाकडे. नुसता हात लावला होता. पण त्यांच्या मुलाबाळांना, त्यांना जात त्रास द्यायला लागली, घेतो प्रायश्चित्त. काय बिघडलंय ? त्यांनी प्रायश्चित्त घेतले. असे जातीचे

भयंकर दडपण होते ते आता गेलंय. वरच्या समाजात जातिय दडपण गेलंय ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. बदल होतोय. वेगाने होत नाही. पण होतोय. कुठली तरी भौतिक सत्ता असते, तिच्यामुळे परंपरा टिकतात. भारतीय समाजात जात व जातपंचायत ही जबरदस्त भयानक संस्था होती. त्या संस्थेने इथली जात टिकवली आहे. म्हणून मी नेहमी म्हणतो की मनातून जात नाही ती जात. जात सहज जाऊ शकते असे वातावरण आहे. कायदा झाला. जातमोडीला कायदा हे बिनतोड साधन झालंय. जात जाऊ शकते.

महर्षी शिंदे यांचा उल्लेख रामभाऊ चव्हाणांनी केला. त्यांची गोष्ट सांगतो. ते १९३४ साली वाईला आले. त्यावेळी माझ्या घरात मांगाचा मुलगा राहत होता. अण्णांनी म्हणजे भाऊराव पाटील यांनी आणला होता. मला म्हणाले, याला वेदातले काही संस्कृत उतारे नीट समजत नाहीत. समजून सांगाल का? मी हो म्हटले. महिना दीड महिना राहावे लागेल. तो मांगाचा मुलगा माझ्यापाशी राहू लागला. अण्णांनी मला विचारले, "याच्या जेवणाखाण्याचे काय?" मी म्हटले, "माझ्या इथे जेवेल" ही ३४ सालची गोष्ट. तो मुलगा माझ्या घरात जेवू लागला. अण्णांनी त्या मांगाच्या मुलाला विचारले, "तू जेवतोस कुठे?" तो म्हणाला, "शास्त्रीजीकडे" हे बिंग फोडले पाहिजे असे त्यांना वाटले. ब्राह्मो समाजाची सार्वजनिक सभा होती. त्याला मीही हजर होतो. त्यात अण्णा म्हणाले, "हे शास्त्रीबुवा काही काही गोष्टी लपवतात. यांच्या घरात मांगाचे पोर यांच्या टेबलापाशी जेवते व हे जगाला माहित नाही." अण्णांनी

(महर्षी शिंदे) त्यावेळी वाईत हे सांगितले. ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. जातिसंस्था आपण मोडू शकतो. त्यानंतर माझ्या पत्नीने घरात पाहुणेरावळे फार म्हणून सेवेला बाई आणून ठेवली. ती मेणवलीची महारवाड्यातील. ती अजून आहे माझ्याकडे फार लोक येतात. तिथे माझी सून असली तरी मदतीला बाई लागतेय. तर माझ्या स्वयंपाकघरात महाराची सून काम करते आहे हे मी मुद्दाम सांगतो. वाईसारख्या सनातनी ठिकाणी असे दाखवाल, तेव्हा काहीतरी बदलेल. हे बदलण्याचा प्रयत्न मी माझ्या परीने करतो आहे. आपण माझा चांगला सत्कार केला. चांगली भाषणे झाली. बाबा व समता प्रतिष्ठानचा मी आभारी आहे...

**• साहित्य अकादमी महदत्तर सदस्यत्व (फेलोशिप) प्राप्तीबद्दल सत्कारास उत्तर**
**• महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे, दि. २३ मार्च, १९८९**
**संदर्भ • तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
**परंपरा, प्रबोधन आणि परिवर्तन**
**पृ. १९५ ते १९९**

❍❍❍

७१

# एकाच प्रकाराच्या विचाराने भारत रशिया होईल

*(महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी), पुणे यांच्या विद्यमाने ३ फेब्रुवारी १९९२ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे त्या संस्थेचे संपादक प्रा. विश्वनाथ कराड यांचा ५१वा वाढदिवस. त्या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र 'माई एमआयटी पुणे जर्नल' चे प्रकाशन 'पद्मविभूषण' पदवीबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा सत्कार व त्यांचे भाषण असा भरगच्च कार्यक्रम पार पडला. या समारंभाचे अध्यक्ष राष्ट्रीय एकात्मता समितीचे अध्यक्ष बाळासाहेब भारदे होते.*

*या समारंभात प्रा. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त जमविण्यात आलेला ५१ हजार रुपयांचा निधी त्यांनी देहू-आळंदी परिसर विकासाच्या कार्यासाठी देऊन टाकला. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. सुरेश घैसास, ख्यातनाम पखवाजवादक शंकरबापू आपेगावकर, किसनमहाराज साखरे, ज्येष्ठ पत्रकार व नाटककार विद्याधर गोखले यांची यावेळी प्रा. कराड यांना गौरव करणारी भाषणे झाली. प्रा. कराड यांच्या सत्कारानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'गरुडझेप' या खास अंकाचे प्रकाशन श्री. भारदे यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष रामभाऊ जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. भास्करराव आव्हाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विजय ए. राव यांनी त्रैमासिकाची माहिती सांगितली. समारंभाला माजी कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे, डॉ. पां. वा. सुखात्मे, जिल्हाधिकारी श्रीनिवास पाटील, माधवराव सूर्यवंशी, डॉ. सुरेंद्र बारलिंगे व अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रा. एस. जे. भिडे यांनी आभार मानले.)*

''श्रेष्ठ विचार संपत नसतो. त्यातून विचार जन्माला येतो. विचाराच्या स्वातंत्र्यातून सत्याचे दर्शन घडत असते. त्यामुळे सगळे विचार तपासूनच घेतले पाहिजेत. अन्यथा एकाच

विचाराला धरून बसलो तर भारताची अवस्था आजच्या रशियासारखी झाल्याशिवाय राहणार नाही.''

''शांत रस हा साहित्यातला अंतिम रस आहे. सगळया उच्च दर्जाच्या साहित्याच्या शेवटी शांती येते. शांतीचेच दर्शन घडते. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करण्यात समाजाचे हित नाही. हे जाणून महात्मा गांधींनी जगाला राजकारणाचा शांतीप्रदान मार्ग दिला. त्यांनी व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाला अर्पण केलेल्या या महान संदेशाच्या आधाराने आपल्याला चालावे लागेल.''

''विज्ञानवाद्यांनी आत्मज्ञानवादी बावळट आहेत आणि आपण सर्वज्ञ आहोत असा जो अहंकार चालविला आहे तो सोडला पाहिजे,'' असे सांगून बाळासाहेब भारदे म्हणाले, ''विज्ञानाचा किरकोळ व्यापार हा लोकांना सुख देण्याचा व ठोक व्यापार ठार करण्याचा आहे. विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड असावी लागते. आत्मज्ञान, विज्ञान व करुणेवरच मानवी जीवनाची यशस्वीता अवलंबून आहे. विज्ञानाचा मूळ आशय हा विलासी असेल तर मूठभर लोकांचा विलास हा अनेकांचा आणि त्यांचा स्वत:चाही विनाश करणारा आहे. स्वयंप्रज्ञा नसेल तर शास्त्राचा उपयोग होणार नाही. अडाणी मनुष्य देहवादी, सामान्य मनुष्य संदेहवादी आणि संत हा विदेहवादी असून शास्त्राला अध्यात्माची जोड द्यावीच लागेल.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. ४ फेब्रुवारी १९९२,**
**भाषण, दि. ३ फेब्रुवारी १९९२)**

○○○

७२

# मानवतावादी समाज निर्मितीसाठी वृत्तपत्राने झटावे

*(साप्ताहिक अंबर, तळेगाव दाभाडे, पुणे यांच्या द्वितीय वर्धापन दिनाचे प्रमुख वक्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. प्रमुख पाहुणे दैनिक 'सकाळ'चे संपादक विजय कुवळेकर होते.*

*तळेगाव जनरल हॉस्पिटलच्या रिक्रिएशन हॉलमध्ये पार पाडलेल्या या कार्यक्रमास नगराध्यक्ष अजितसिंह दाभाडे, अन्य नगरसेवक, बालमोहन शिक्षण संस्था, उद्योगधाम, स्नेहवर्धक मंडळ वगैरे संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. 'अंबर'चे संपादक सुरेश साखवळकर, सहसंपादक सुशील सौंदाणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सुस्मिता विठ्ठल जोशी हिच्या सुरेल पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.)*

''मानवतावादी दृष्टिकोनातून समाजपरिवर्तन करण्यासाठी, एकात्म समाजनिर्मितीसाठी वृत्तपत्रांनी कार्य करणे आवश्यक आहे,'' असे मत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी साप्ताहिक 'अंबर'च्या द्वितीय वर्धापनदिन समारंभात व्यक्त केले.

○○○

७३

# वर्णाधारित उच्चनीचतेस आव्हान आवश्यक

*('स्नेहमंच' पुणे आयोजित व्याख्यानमालेच्या उद्घाटनाचा समारंभ दि. ११ एप्रिल १९९२ रोजी पुण्यात संपन्न झाला. उद्घाटक म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेल्या भाषणाचा सारांश.)*

''वर्णाधारित उच्च-नीचतेची कल्पना जपणाऱ्या परंपरेला आव्हान दिल्याखेरीज देशाचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आदी धर्मांची शास्त्रे देवांनी निर्माण केली आहेत. हा समज म्हणजे एक प्रकारे अंधश्रद्धाच आहे. वस्तुत: सगळे धर्म मानवनिर्मित असल्यामुळे त्यात बदल करण्याचादेखील माणसांना अधिकार आहे, तो आपण वापरला पाहिजे.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. १२ एप्रिल १९९२,**
**भाषण, दि. ११ एप्रिल १९९२)**

○○○

७४

# हुंडा निर्मूलनामुळे स्त्रियांचा सन्मान

*(अखिल भारतीय महिला सुरक्षा महासंघ - सातारा, युवा अभिमन्यू संघटना - पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सिल्व्हर ग्रुप, सातारा यांच्या सहकार्याने टाऊन हॉल, पाचगणी येथे १६ ऑगस्ट १९९२ रोजी 'हुंडा निर्मूलन मेळावा' योजण्यात आला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उद्घाटक म्हणून केलेल्या भाषणाचा सार.)*

''हुंडा निर्मूलन ही स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा मान राखण्याची चळवळ आहे. समाजाला कलंक असलेली हुंड्याची प्रथा नष्ट करून स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा मान राखला पाहिजे. स्त्रियांचा मान म्हणजे मातांचा मान आहे. या मातेचा हुंड्यामुळे अपमान झाला आहे. ही परंपरा समाजाने नष्ट करावी. लोभापायी काही लोक ही परंपरा सोडण्यास तयार होत नाहीत. आपल्या संस्कृती युक्त देशातील संसदीय प्रणालीमध्ये सर्वांना मतदानाचा हक्क आहे. स्त्रियांचा दर्जा पुरुषांइतकाच आहे व लोकशाही टिकविण्यासाठी स्त्रियांना समानता मिळालीच पाहिजे व मानवतेच्या मूल्यांची जपणूक करून स्त्रीला उच्च दर्जा दिला पाहिजे.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. १७ ऑगस्ट १९९२)**

ooo

७५

# मंदिर- मशीद प्रश्नावरील डोकेफोड हा निर्बुद्धपणा

*(भूगोलतज्ज्ञ डॉ. सी. डी. देशपांडे यांच्या ८१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'भूगोल दिनी' दि. १४ जानेवारी १९९३ रोजी महाराष्ट्र भूगोल दिन समितीच्या वतीने पुणे येथे आयोजित समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणाचा गोषवारा.)*

''महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून आयोध्येतील मंदिर-मशिदीच्या विषयावर भांडण्याचा प्रकार म्हणजे संबंधितांचा निर्बुद्धपणाच आहे. देव हा केवळ मंदिर वा मशिदीत नसतो तर हे सारे विश्व त्याचेच घर आहे. प्रत्येक अणू-रेणूत तो सामावलेला आहे. अशा परिस्थितीत मंदिर-मशीद हा भांडणाचा विषय कसा काय होऊ शकतो? ज्यांचा मेंदू नीट काम करीत नाही, अशा लोकांनी हा वाद उकरून काढला आहे. या प्रकारचे खोटे वाद हृदयातून काढून टाकले पाहिजेत.

देशात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे. वारेमाप जंगलतोड करून मानवाने पृथ्वीची एकप्रकारे उपेक्षाच केली आहे. त्याने स्वत:च्याच विरोधात केलेला हा फार मोठा गुन्हा आहे हे विदारक चित्र बदलण्यासाठी वृक्षारोपण करून पृथ्वीची शक्ती पुन्हा वाढविण्याची गरज आहे.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. १५ जानेवारी १९९३)**

ooo

७६

# आर्थिक जीवन मजबूत करणे महत्त्वाचे

*(दैनिक सकाळ, पुणेमधून प्रा. दीपक ताटपुजे यांनी 'व्यवसाय मार्गदर्शन' सदरात लेखन केले. त्यावर आधारित 'शिक्षण व्यवसायाच्या वाटा' पुस्तकाचा प्रकाशन समारंभ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हस्ते दि. ७ फेब्रुवारी १९९३ रोजी पुणे येथे पार पडला. अध्यक्षस्थानी 'सकाळ'चे संपादक किशोर कुलकर्णी होते. याप्रसंगीच्या तर्कतीर्थांच्या भाषणाचा हा विचारसार.)*

''नवीन मानवी संस्कृती निर्माण करण्याचा काळ जवळ आला आहे, त्यासाठी आर्थिक जीवन मजबूत करणे महत्त्वाचे आहे. आपला समाज हजारो वर्षे रडतखडत चालला आहे, तो कुंठित झाला आहे. प्रगती ज्या वेगाने व्हायला हवी होती, त्या वेगाने झाली नाही. वैज्ञानिक दृष्टीने सिद्ध होणाऱ्या तत्त्वज्ञानावर समाजव्यवस्था उभी राहिली पाहिजे. पाश्चात्त्य राष्ट्रांनी यांत्रिक युग निर्माण केले. आपण त्याचे अनुकरण केले; परंतु मुख्य वैज्ञानिक संस्कृती आहे ती विश्व संस्कृती व्हावी. सर्व मानव एक आहे, असे मानले जात असून उच्च दर्जाची नैतिक, वैज्ञानिक संस्कृती आत्मसात करण्याची पात्रता आज सर्वांची आहे. आधुनिक शिक्षणात जे पुढे जातील, ते विश्वसंस्कृतीचे कर्ते ठरतील. भारत हे काम करू शकेल.

देशाचा आर्थिक प्रश्न कठीण आहे. प्रजा किती आहे, त्यामानाने अर्थव्यवस्था असावी. आज प्रजा जास्त झाली आहे आणि पुरेसा अर्थविकास झालेला नाही, ही आजची अडचण आहे. स्त्रिया अर्थव्यवसायापासून बाहेर आहेत. त्यामुळे त्यांचे पारतंत्र्य अधिक पक्के होत आहे. अर्थव्यवस्थेत त्यांना स्वातंत्र्य मिळेल तेव्हा त्यांची पारतंत्र्याची गाठ मोकळी होईल. आर्थिक जीवन व्यक्तीच्या ताकदीचे नसेल तर त्याला वाकावे लागते. वाकण्याची पाळी

येणे ठीक नाही. देशात आज बेकार खूप आहेत; परंतु हे पुस्तक बेकार राहणार नाही. ‘शोधा म्हणजे सापडेल’ या आत्मविश्वावासाने व्यवसाय शोधता येईल असे आश्वावासन देणारे हे पुस्तक आहे.”

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. ८ फेब्रुवारी १९९३)**

ooo

७७

# राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्याची जरुरी

*(सकाळ विश्वस्त संस्था, पुणे आणि आकाशवाणी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ मार्च १९९३ रोजी सातारा येथील शाहू कलामंदिरात 'राष्ट्रीय एकात्मता : सद्य:स्थितीतील आव्हाने' या विषयावरील परिसंवाद झाला. त्याचे उद्घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. परिसंवादाचे अध्यक्षस्थान न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी भूषविले होते. परिसंवादात सर्वश्री अरुण टिकेकर, 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक सदा डुंबरे, पुणे आकाशवाणी केंद्राच्या संचालिका उष:प्रभा पागे, 'सकाळ'चे विश्वस्त डॉ. शरच्चंद्र गोखले, डॉ. सत्यरंजन साठे प्रभृती मान्यवरांनी विचार व्यक्त केले. त्याप्रसंगीच्या तर्कतीर्थांच्या भाषणाचा सार संक्षेप.)*

''राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढायला हवी. त्यासाठी मानवी स्वातंत्र्याची मूलभूत प्रेरणा उदात्त व उत्कट असली पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेला पहिल्यापासूनच आव्हाने असून ती कायमची धोक्यात आहे. ब्रिटिशांच्या काळात भारत एकात्म दिसत होता; परंतु आज त्याची तीन राष्ट्रे झाली आहेत. हा धोका वाढता कामा नये.''

**(दैनिक सकाळ, दि. ७ मार्च १९९३)**

❍❍❍

७८.

# सर्वधर्म समभावाची गरज

गेली ७५ वर्षे जी प्राज्ञपाठशाळा म्हणून नांदत आली, जिच्या अमृतमहोत्सवाचा शुभारंभ आज आपण साजरा करीत आहोत, ती प्रथम १०० वर्षांपूर्वी स्थापन झाली. केना सरस्वतीच्या गुरूंनी म्हणजे प्रज्ञानंदस्वामींनी ती सुरू केली. ही वेदान्त पाठशाळा होती. प्रस्थानवमी अध्यापन प्रज्ञानंदस्वामी करीत होते. कोकणातून नारायणशास्त्री मराठे हे आईस वेदान्तं शिक्षण घेण्याकरिता आले. बरेचसे शिक्षण झाल्यावर त्यांनी स्वतःच अध्यापनाची जबाबदारी पत्करली आणि प्राज्ञपाठशाला अस्तित्वात आली.

भारतात व महाराष्ट्रात धार्मिक परंपरेमध्ये सुधारणा करावी अशा तऱ्हेचा विचारप्रवाह जवळजवळ १०० वर्षे सुरू होता. देशकालपरिस्थिती बदलली म्हणजे परंपरागत बाजारपद्धतीही बदलली पाहिजे असा धर्मसुधारणेचा दृष्टिकोन भारतात विशेषतः महाराष्ट्रात पसरत होता. आगरकर हे सुधारणेचा पुरस्कार करीत होते. सामाजिक संबंध हे बदलले पाहिजेत आणि राजकीय सुधारणाही तितक्याच महत्त्वाने निर्माण झाली पाहिजे, असा दृष्टिकोन महाराष्ट्रातील सुधारक मोठ्या बौद्धिक, वैचारिक पद्धतीने प्रतिपादन करीत असत. काही शास्त्री-पंडितही अशा या नव्या सुधारणांचे समर्थन करू लागले होते.

सन १९२७ साली धुळे जिल्ह्यात सोनगीर येथे धार्मिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी विज्ञतपरिषद भरली. त्यात नारायणशास्त्री मराठे, सिद्धेश्वरशास्त्री चिग़ाव, गीतावाचस्पती भिडे, म. म. पाठकशास्त्री, इत्यादी शास्त्री मंडळींनी धार्मिक सुधारणांचा पुरस्कार केला. जातिभेदाचे कडक परंपरागत आचारधर्म वर्तमान परिस्थितीत योग्य नाहीत, मुलींच्या विवाहाचा काळ बालपणाचा असता कामा नये, मुलींना आपला पती कोण असावा यासंबंधी विचार करता येण्याइतकी प्रौढावस्था आल्यावरच त्यांचा विवाह व्हावा, आठव्या, १० व्या वर्षी मुलींचा विवाह आणि १२ व्या, १५ व्या वर्षी मुलांचा विवाह करण्याची पद्धती बदलली पाहिजे, समंजसपणा आल्यावरच विवाह व्हावा. १७-१८ वर्षांच्या वयापूर्वी मुलामुलींची लग्ने होणे अयोग्य होय. अशा तऱ्हेच्या धार्मिक सुधारणा होणे आवश्यक आहे.

बालविधवांचा पुनर्विवाह मान्य केला पाहिजे. ब्राह्मण वगैरे पांढरपेशावर्गात बालविधवांचा पुनर्विवाह होणे आवश्यक आहे. चुकून वाकडे पाऊल पडले तर त्या बाबतीत क्षमा केली पाहिजे. ब्राह्मण पोटजातींची परस्परांत लग्ने होत नाहीत, ती होणे आवश्यक आहे. जाती पोटजातींमध्ये भेदांमुळे समाजात एकजीवपणा राहत नाही. खरेखुरे सामाजिक प्रेम राहात नाही. त्याकरिता जाती-पोटजातींचे भेद मोडले पाहिजेत, असा मध्यम प्रतीच्या सामाजिक सुधारणांचा विचार सुरू झाला. असे सुधारणावादी शास्त्री-पंडित प्राज्ञपाठशाळेत व्याकरण, न्याय, वेदान्त, इ. शास्त्रे शिकवीत होते.

प्राज्ञपाठशाळामंडळाचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे धर्मकोशाचे. धर्मकोश हा प्राज्ञपाठशाळेचा दीर्घकाळ चाललेला उपक्रम आहे. आजमितीस धर्मकोशाची चार पांडे प्रकाशित झाली आहेत. या धर्मकोशाच्या योगाने सनातन हिंदुधर्माचा दीर्घकालचा इतिहास उपलब्ध होणार आहे.

सध्या भारतीय सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास आणि त्यावर आधारलेले साहित्य प्रकाशित करणे याची जबाबदारी प्राज्ञपाठशाळामंडळाने स्वीकारली आहे.

आपल्या राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने आज सर्वांत अधिक गरज जर कशाची असेल तर ती सर्व धर्म समभावाच्या वृत्तीची आहे. ही वृत्ती सर्व जनतेत, सर्व जातिधर्मांच्या लोकांत फैलावणे आणि दृढ होणे आज अत्यंत आवश्यक आहे. भारतातील सर्व जमातींनी परस्परांशी गुण्यागोविंदाने वागले पाहिजे; पण त्याबरोबरच प्रत्येक धार्मिक जमातीने समता आणि न्याय ह्या तत्त्वांना अनुसरून आपापल्या परंपरेत सुधारणा केली पाहिजे. ज्या सर्वांचे मिळून भारतीय राष्ट्र बनले आहे. त्यांच्या प्रगतीसाठी सर्वांनी एक होऊन झटले पाहिजे. प्राज्ञपाठशाळामंडळाने हिंदुधर्माच्या आणि समाजाच्या सुधारणेसाठी आपल्या शक्तीनुसार प्रयत्न केले. आता आपल्या देशाच्या नद्या नवीन पर्वात सर्वधर्मसमभाव वृद्धिंगत करण्याच्या कार्याला ती वाहून घेईल.

आतापर्यंत महाराष्ट्राच्या सुबुद्ध जनतेच्या पाठिंब्यामुळे आणि सहकार्यामुळे प्राज्ञपाठशाळामंडळ आपले कार्य करू शकली. ते आमचे बळ आहे. हे आमचे बळ टिकून राहील आणि वाढेल, जनतेचे आणि शासनाचे साहाय्य आम्हाला वाढत्या प्रमाणात लाभत राहील, अशी माझी खात्री आहे.

आजचे आपले अध्यक्ष आणि आजचे प्रमुख पाहुणे ह्या दोघांनी ह्या संस्थेविषयी जी आपुलकी आणि जिव्हाळा दाखविला आहे, त्यामुळे हा भरवसा बळावला आहे.

**[(प्राज्ञपाठशाळामंडळ, वाईच्या अमृतमहोत्सव शुभारंभप्रसंगीचे दि. २५ जानेवारी, १९९४ रोजी दिलेले भाषण. अध्यक्ष - मा. सुधाकरराव नाईक (माजी मुख्यमंत्री), प्रमुख पाहुणे - मा. शरदराव पवार (मुख्यमंत्री)]**

OOO

७९

# भारतीय तत्त्वज्ञानात विश्वव्यापक विचार

*(भारतीय तत्त्वज्ञान महाकोश मंडळाचे संचालक ख्यातनाम प्राच्य विद्यापंडित डॉ. रा. ना. दांडेकर यांनी लिहिलेल्या 'भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास' प्रथम खंडाचे प्रकाशन दि. २४ एप्रिल १९९४ रोजी पुण्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते झाले. शुभदा-सारस्वत प्रकाशन, पुणेच्या सुमारे साडेचार हजार पृष्ठांच्या नि बारा खंडांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या प्रारंभीचे तर्कतीर्थांचे मनोज्ञ मनोगत.)*

''जीवनाचे अंतिम प्रश्न निकालात काढणे जवळजवळ अशक्य आहे. म्हणून आपण ते श्रद्धेने सोडवितो. या श्रद्धाही आपण तपासून घ्यायला हव्यात. कारण श्रद्धांमध्ये आंधळेपणा असता कामा नये. भारतीय तत्त्वज्ञान याबाबत बहुदिशांनी मार्गदर्शन करते.

विचार आणि विवचिंतन यांना यज्ञसंस्थेमध्ये सुरुवात झाली. तेव्हाच असा प्रश्न निर्माण झाला की, हे विश्व कुठून निर्माण झाले? पण त्याचे उत्तर कोणीच देऊ शकले नाही. म्हणून हा प्रश्न देवांना विचारायचे ठरले. पण देवही त्याचे उत्तर देऊ शकले नाहीत. कारण आधी सृष्टीची उत्पत्ती झाली आणि नंतर देव निर्माण झाले. अंतिम आकाश हे अनंत आणि विलक्षण आहे. त्याचे चिंतन करताना ऋषींच्या असे लक्षात आले की, त्याचे आकलन मोठे कठीण आहे. म्हणूनच या प्रश्नाचे उत्तर श्रद्धेवर सोपविण्यात आले.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. २५ एप्रिल १९९४)**

ooo

८०

# उच्च मूल्यांच्या चिंतनाची गरज

*(बहुधा हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनातील शेवटचा सार्वजनिक समारंभ असावा. तर्कतीर्थ आयुष्यभर व्याख्याते, विचारवंत, तत्त्वचिंतक म्हणून जगले. त्यांच्या या वशाचे वारसदार झालेल्या प्राचार्य शिवाजीराव भोसले लिखित 'दीपस्तंभ' चरित्रमालेच्या ग्रंथाचे प्रकाशक तर्कतीर्थ असणे हे कालसूचक. दि. २५ एप्रिल १९९४ रोजी झालेल्या या समारंभाचे प्रमुख पाहुणे सकाळ वृत्तपत्र समूहाचे संपादक विजय कुवळेकर आणि डॉ. शं. ना. नवलगुंदकर होते. अक्षरब्रह्म प्रकाशन आयोजित या समारंभ प्रसंगीचे तर्कतीर्थांचे अंतिम सार्वजनिक उद्गार!)*

''समाजात उच्च जीवनमूल्यांचे चिंतन होण्याची आज सर्वाधिक गरज आहे. समाजातील ज्यांच्या अस्तित्वामुळे माणसांना कर्तव्यस्फूर्ती होते, अशांच्या या 'दीपस्तंभा'ची आज विशेष गरज आहे. माणसे एकमेकांना मदत करतात, उत्साह देतात, मार्गदर्शन करतात, हे चित्र एका बाजूने दिसते. तसेच माणसे एकमेकांपुढे अडचणी निर्माण करतात, परस्परांचे पाय ओढतात, हे चित्रही दुसऱ्या बाजूला आढळते. अशा प्रकारच्या समाजजीवनात आदर्शांची जाणीव निर्माण करण्याचे काम 'दीपस्तंभ'सारख्या ग्रंथांमुळे होऊ शकेल. जीवन क्षणभंगुर आहे, असे नुसते म्हणून चालणार नाही, तर जीवनाचा अर्थ उलगडून सांगण्याचे कार्यही सतत घडत राहिले पाहिजे. समाजात विविध प्रकारचे कर्तृत्व गाजविणारी माणसे असतात. त्यांचे हे वैविध्यही समाजाला समजावयास हवे. जीवनाची एकंदरीत श्रेष्ठता हे वैचित्र्य आहे आणि विचारसंपत्ती कळते ती यामुळे.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. २६ एप्रिल १९९४)**

OOO

८१

# ‘जो तत्त्वभ्रष्ट, तो पदभ्रष्ट असे समीकरण साधले पाहिजे’

राजसत्ता ही तत्त्वनिष्ठांच्या हाती असली पाहिजे आणि सत्ताधारी तत्त्वभ्रष्ट झाला तर तो पदप्रष्ट झाला पाहिजे. जो तत्त्वभ्रष्ट तो पदभ्रष्ट असे समीकरण जीवनात साधले पाहिजे, असे खणखणीत विचार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाबळेश्वर येथे अलीकडेच एका शिबिरात केलेल्या भाषणात मांडले. त्यांनी केलेले हे शेवटचेच जाहीर भाषण म्हणता येईल.

समाजकल्याणमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने आपल्या कार्यकर्त्यासाठी दोन दिवसांचे राज्यव्यापी शिबिर दि. २० व २१ मे १९९४ पारशी जिमखाना, महाबळेश्वर (जि. सातारा) येथे आयोजित केले होते. तर्कतीर्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून शिबिराचे उद्घाटन केले. याप्रसंगी विधानसभेचे माजी अध्यक्ष त्र्यं. शि. भारदे व्यासपीठावर होते.

तर्कतीर्थांच्या हस्ते दि. २० मे रोजी दुपारी १२ वाजता शिबिराचे उद्घाटन होणार होते; परंतु त्याच दिवशी सकाळी महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी वाई येथे जाऊन तर्कतीर्थांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी श्रीमती अकम्मा अलेक्झांडर, खासदार प्रतापराव भोसले, आमदार मदन पिसाळ प्रभुती हजर होते. या कार्यक्रमानंतर तर्कतीर्थ जोशी महाबळेश्वर येथे आले व दुपारी ४ वाजता त्यांचे शिबिरार्थींना मार्गदर्शन करणारे भाषण झाले. तर्कतीर्थ खुर्चीवर बसून बोलले, त्यांचा आवाज खणखणीत होता, उच्चार स्पष्ट होते.

राज्य कसे असावे याचा विचार करावा, सत्ता असावी पण ती तत्त्वनिष्ठांच्या हातात असली पाहिजे, असे सांगून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुढे म्हणाले की, अलीकडे निवडणुकांमध्ये पैशाचा वापर होतो आणि मतदार हा पैशाचा वापर करतो, हे फार वाईट आहे. आपली विवेकबुद्धी बाजूला ठेवली जाते. तात्पुरता- दीडदमडीचा स्वार्थ आडवा

येतो आणि तुम्ही मतदान करता. हे पैशाचे राजकारण तुडविले पाहिजे. बाजूला काढले पाहिजे. त्याकरिता विवेकबुद्धी अतिशय साफ असली पाहिजे आणि जीवनामध्ये ध्येयवाद असला पाहिजे. असा ध्येयवाद नसेल तर आपले जीवन नेहमी कोणत्या तरी पापाने खराब होत राहील म्हणून विवेक भ्रंशाचा म्हणून धोका संभवतो. तसे होता कामा नये. विवेकबुद्धी चांगली राखावी, चांगले उच्च दर्जाचे शिक्षण दिले पाहिजे. उच्च दर्जाचे चांगले शिक्षण कसे मिळेल याचाही विचार केला पाहिजे.

तर्कतीर्थ जोशी म्हणाले की, आपण लोकशाही स्थापन केलेली आहे. आपण ही लोकशाही दर ५ वर्षांनी बदलतो, हे चांगले आहे. त्यामुळे एकदा सत्तेवर आलेला कार्यकर्ता कायम राहात नाही. पूर्वीची जी राजसत्ता होती ती वेशपरंपरागत होती. राजा कसाही असला तरी लोक मानायचे. तसा काळ आता नाही. हा काळ अधिक चांगला आहे. प्राचीन युगापेक्षा हे युग अधिक चांगले आहे. याची जी खास महती आहे ती आपण कायम राखली ठेवली पाहिजे.

तर्कतीर्थ जोशी यांनी आपल्या भाषणाच्या आरंभीच नेल्सन मंडेला यांच्या विजयाचे स्वागत केले. ते म्हणाले, आज जो मानवी स्वातंत्र्याचा इतिहास घडत आहे, त्या दृष्टीने हे वर्ष जागतिक इतिहासामध्ये फार महत्त्वाचे आहे. मंडेला हा दक्षिण आफ्रिकेमध्ये एका मोठ्या, गोऱ्या नि काळ्या लोकांच्या राज्याचा प्रधान झालेला आहे, ही गोष्ट फार विलक्षण आहे. काळ्या-गोऱ्यांचा हा फार मोठा इतिहास आहे. काळ्यांना मतदानाचासुद्धा हक्क नव्हता. निवडून येण्याचा हक्क नव्हता, इतकी स्थिती वाईट होती. परंतु एकंदर मानवी स्वातंत्र्याचा इतिहास पुढे जात आहे, असे इतिहासाचे तत्त्वज्ञ म्हणाले आहेत. हेगेल नावाचा फार मोठा मानवी इतिहासाचा तत्त्वज्ञ होऊन गेला. या इतिहासाला मानवी आत्म्याची प्रेरणा आहे. मानवी आत्म्याची शक्ती ही विवेकबुद्धीने भरलेली आहे, असेही ते म्हणाले.

अलीकडे धर्मचा विचार होतो, हे महाभारतातील पंक्तींचा हवाला देत तर्कतीर्थ जोशी म्हणाले की, धर्माचे तत्त्व गूढ आहे. काय त्याचा अर्थ करावा, ही मोठी पंचाईत आहे. इस्लाम बरोबर आहे की ख्रिश्चनिटी बरोबर आहे की हिंदुइझम ? याचा काही विचार शेवटपर्यंत जाणार नाही; परंतु जो मनुष्य विवेकी आहे त्याचा विचार हा खरा विचार आहे. असाच दृष्टिकोण घेऊन आम्ही चालले पहिजे. मानव जातीने एकत्र यायचे हा सर्वात महत्त्वाचा विचार आहे. एकत्र आलोच आहोत, फार दूरदूर होतो. सगळे धर्म, सगळ्या संस्कृती एकत्र आलेल्या आहेत. फार जवळ आल्या आहेत. म्हणून परंपरागत संस्कृतीची नीट छाननी करायला हवी. तिच्यातले जे लोकभ्रम आहेत ते टाकले पाहिजेत, त्यातील संकुचित निष्ठा टाकल्या पाहिजेत. अशा रीतीने विवेकयुक्त असे जीवन जगले पाहिजे.

भिन्न भिन्न संस्कृती एकत्र येण्याचा आजचा काळ आहे. हे युग मागील युगापेक्षा वेगळे युग आहे- सगळ्या मानव जातींना एकत्र आणणारे आहे, असे सांगून तर्कतीर्थ जोशी म्हणाले

की, आपल्याला उच्च आणि उदास संस्कृती निर्माण करायची आहे आणि परंपरागत सगळ्या संस्कृतींचे विसर्जन केले पाहिजे. जातीभेदाची संस्कृती विसर्जित करावी लागेल. जात व्यक्तीला बांधून टाकत आहे. भारतामध्ये गेल्या ३-४ हजार वर्षांत जात टिकली कुठे, का व केव्हा ? याचा विचार केला पाहिजे. मला आठवते की, जातीचे निर्बंध मोडणाराला त्याची जात बहिष्काराची शिक्षा करीत असे. एका जातीने बहिष्कार केला तर इतर जातीही त्या बहिष्कृताला बहिष्कृत करीत. अशा या महत्त्वाचे बंधन या देशात होते. आता ती जात कायद्याने गेली आहे. फार चांगल्या रीतीने हा समतेचा नियम अमलात आणत आहे.

**(शब्दांकन : वसंत शिंदे)**

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अखेरचे भाषण)**

OOO

# समारोप

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'व्यक्ती आणि विचार' केंद्र करून केलेल्या या ७९ भाषणांच्या संग्रहाचे विहंगमावलोकन करत असताना लक्षात येते की, व्यक्तिविषयक त्यांची अधिकांश भाषणे पूर्वसुरींच्या जीवन व विचाराची मीमांसा करतात. तर्कतीर्थांना आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य, रामदास यांचे आकर्षण ते पुरातनास नव्या विचारांची जोड देतात म्हणून. महात्मा फुले यांचे आकर्षणही सुधारवादी समाजसेवक म्हणूनच. महात्मा गांधी स्वातंत्र्य, समता, बंधुतेचे समर्थक. म्हणून तर्कतीर्थ त्यांचे अनुयायी बनतात नि स्वातंत्र्य आणि समतेच्या लढ्यात सक्रिय राहतात. आचार्य प्र. के. अत्रे समकालीन पण महाराष्ट्र निर्मितीत ते छातीचा कोट करतात म्हणून आकर्षण. या सर्वांचे आपण देणे लागतो या कृतज्ञ भावनेने ते भाषणांद्वारे आदरांजली वाहतात.

विचारकेंद्री काही भाषणे स्वातंत्र्यपूर्व काळातील. ती अधिक तर नव्या विचारांचा धांडोळा घेणारी. स्वातंत्र्योत्तर काळातील भाषणात विचार नि विषयवैविध्य दिसून येते. भाषणांमधून समाजाला नवा दृष्टिकोन, विचार देण्याची धडपड असल्याने ते पूर्वाभ्यास करून योगदानाचे नियोजन करतात. सतत समाजाशी संपर्क ठेवण्याची, संवाद करण्याची तर्कतीर्थांची असोशी हा त्यांच्या समाजशील व्यक्तिमत्त्वाचा भाग होय. सतत समाज, राज्य, राष्ट्राचा विचार करणारे तर्कतीर्थ त्यांच्या व्यक्तीचे पूर्णत: समाजात विसर्जन झाल्याचे दिसून येते. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास, विचार, विस्तारामुळे शक्य झाला. विश्वातील सर्व ज्ञान-विज्ञानाविषयी चिरंतन जिज्ञासा धारण करणारे तर्कतीर्थ प्रथम ज्ञानार्थी आहेत नि नंतर वक्ते. आपल्याकडचे सर्वस्व समाजधन मानून ते भाषणांतून आपले सर्वतोपरी ज्ञान समाजास देण्याची त्यांची धडपड एका निरपेक्ष ज्ञानतपस्वीची ज्ञान समाजास लाभलेली देणगी होय.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**

संपादक

ooo

# लेखांची पूर्वप्रकाशनसंबंधी संदर्भ सूची

## १) व्यक्तीसंबंधी भाषणे

१) **ज्योति निबंध** (१८, १९ व २० जून, १९४६), सत्यशोधक समाज, वाई, रौप्यमहोत्सवी व्याख्यानमाला

२) **गांधी आणि ख्रिस्त** (१५ मे, १९४९), सुबोधपत्रिका, प्रार्थना समाज, मुंबई

३) **महात्मा गांधी** (ऑक्टोबर, १९४९), गांधी स्मारक निधी, नागपूर, कार्यकर्ता शिबिर व्याख्यानमाला; नवभारत मासिक, वाई- जानेवारी १९४९.

४) **श्रद्धाशील बुद्धिवादी : मानवेंद्रनाथ रॉय** (३० जानेवारी, १९५४), मानवेंद्रनाथ रॉय श्रद्धांजली सभेतील भाषण, मुंबई, शब्दांकन - श्री. ग. मळेकर, शारदाश्रम, बोर्डी; प्रसिद्धी - नवभारत मासिक, एप्रिल १९५४.

५) **काश्मिरकवी राजानक रत्नाकर** आकाशवाणी पुणे, प्रतिष्ठान, फेब्रुवारी, १९५५, पृ. १७ ते २२

६) **रामदासांचे जीवनकार्य** (२७ मार्च, १९५८), कै. पुं. म. लाड व्याख्यानमाला, मुंबई आकाशवाणी केंद्र; 'साहित्याचे तर्कशास्त्र' - संपा. सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, २०१२ - पृ. १८८ ते २१२

७) **बागलाण सिंह : नरहर गोपाळशेठ नामपूरकर** (जून, १९५९) नरहर गोपाळशेठ नामपूरकर चरित्र प्रकाशन सोहळा उन्नती मासिक, जून, १९५९ - पृ.१२ ते १४.

८) **मांगल्याचे प्रकाशाचे दरवाजे उघडणारे : साने गुरुजी** (२१ जून, १९७५) साप्ताहिक साधना, शनिवार दि. २१ जून, १९७५

9) **M. N. Roay : A tribute,** The Radical Humanist, may, 1978

**१०) आचार्य अत्रे : विनोद सामर्थ्याची प्रचिती** (१३ ऑगस्ट, १९८०), आचार्य अत्रे पुतळा अनावरण समारंभ, मुंबई), 'सभेत कसे बोलावे ?' - माधव गडकरी, रोहन प्रकाशन, पुणे, मे, १९८४, पृ.१०२ ते १०

**११) शंकराचार्य** (११ ऑगस्ट, १९८७), विदर्भ साहित्य संघ, नागपूर आयोजित 'साहित्याचार्य कै. बाळशास्त्री हरदास व्याख्यानमाला, 'दक्षिणेतील दोन आचार्य' - संपा. प्राचार्य राम शेवाळकर, प्रकाशक - विदर्भ साहित्य संघ, नागपूर, १९८७, पृ. १ ते २

**१२) रामानुजाचार्य** (१२ ऑगस्ट, १९८७), विदर्भ साहित्य संघ, नागपूर आयोजित कै. शिवदास कृष्ण बारलिंगे स्मृती व्याख्यानमाला; 'दक्षिणेतील दोन आचार्य', संपा. प्राचार्य राम शेवाळकर, प्रकाशक - विदर्भ साहित्य संघ, नागपूर - १९८७, पृ. २२ ते ३१

**१३) भारतातील संगीताला नवा मार्ग दाखवणारा कलाकार : कुमार गंधर्व** (८ मे, १९८८), कुमार गंधर्व षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ, देवास (मध्यप्रदेश), 'कालजयी' स्मरणिका, पृ. २३ व २४.

## २) वैचारिक भाषणे

### अ) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भाषणे (१९२६ ते १९४७)

**१४) भारतीय तर्कशास्त्राची वाढ** (२५ मे, १९२६), वसंत व्याख्यानमाला, पुणे. साप्ताहिक केसरी, ८ जून १९२६ - पृ. ११.

**१५) धर्मशास्त्र विरुद्ध समाज सुधारणा (१९३०)**
(नागपूर येथे दिलेल्या काही व्याख्यानांपैकी दोन व्याख्याने)
पूर्वप्रकाशन नवा : मनू, ९ एप्रिल, १९३०

**१६) धर्मनिर्णयाचे साधन : मीमांसा पद्धती आणि बौद्धिक पद्धती (१९३०)**
(* संदर्भ - 'धर्मनिर्णयस्वरूप - पं. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे, परचुरे पुराणिक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई- ४ प्रथमावृत्ती - २७ नोव्हेंबर, १९३३, पृ ३३६ ते ३५२)

**१७) महाराजा सयाजीराव गायकवाड सत्कार समारंभ प्रसंगीचे स्वागतपर भाषण** (१४ एप्रिल, १९३३), श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा महाराष्ट्रातील सत्कार (निवेदन), संपा. रा. शा. पाटील, प्रकाशक - सरकारी छापखाना, बडोदे, प्रकाशन - २८ एप्रिल, १९३३.

**१८) हिंदू धर्मविकास व सर्वधर्मांचा समन्वय** (२ मार्च, १९३६), कीर्तिमंदिर, बडोदे (गुजरात) येथील व्याख्यात मूळ टंकलिखित, सुधारित प्रत.

१९) **महात्मा फुले पुण्यतिथी व्याख्यान** (२७ नोहेंबर, १९३७), पुणे शहर काँग्रेस कमिटी व इतर संस्था आयोजित सभेत शनिवार वाडा, पुणे येथील व्याख्यान, अध्यक्ष - रा. न. वि. गाडगीळ, प्रकाशक - १) ज्ञानप्रकाश, २) साप्ताहिक 'राष्ट्रवीर', बेळगाव. दि. ७ डिसेंबर १९३७.

२०) **मानसशास्त्रातील आधुनिक दोन संप्रदाय** (सप्टेंबर, १९४२), 'भिषग्विलास', वर्ष-४१, अंक ६, पृ. २०१ ते २०६, सप्टेंबर १९४२.

### ब) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भाषणे (१९४८ ते १९९४)

21) **All India Conference of the Radical Democratic Party :** Presidential Address, (26th December, 1948), Culcutta. pub- Radical Democratic Party, December 1948 Printed at S.D. Press, 45, Amherst street, Culcutte, Pages - 30.

२२) **नवमानवतावादाची गरज**(२६ डिसेंबर, १९४८), उपरोक्त इंग्रजी भाषणाचे मराठी भाषांतर. भाषांतरकार - प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे

23) **From a Party to a Moment -** (30th December, 1948), concluding speech Culcutta; Pub. Independent India, Mumbai, (16th, January, 1948)

२४) **आत्मशुद्धीच्या कामाला लागा** (२२ जानेवारी, १९४९), साप्ताहिक साधना, मुंबई / शनिवार, दि. २२ जानेवारी, १९४९, पृ. १०

२५) **मानवी बंधुत्व हाच नव्या राजनीतीचा पाया हवा** (१७ फेब्रुवारी, १९४९), नवयुग व्याख्यानमाला, सोलापूर, दैनिक 'काळ', पुणे, शनिवार, दि. १९ फेब्रुवारी १९४९, दैनिक 'लोकसत्ता', मुंबई, शनिवार, दि. १९ फेब्रुवारी ११४९

२६) **निधर्मी राज्य** (२८ एप्रिल, १९४९), अमरहिंद मंडळ, मुंबई आयोजित वसंत व्याख्यानमालेतील 'निधर्मी राज्य' विषयावरील व्याख्यान; दैनिक 'प्रभात', मुंबई, दि. ३० एप्रिल, १९४९ - पृ. २, ३

२७) **विविध संस्कृतींचा संगम आवश्यक** (२८ ऑगस्ट, १९४९), गणेशोत्सव व्याख्यानमाला, शिवाजी मंदिर, पुणे येथे 'हिंदुधर्म व सांस्कृतिक चळवळीची दिशा' या विषयावरील व्याख्यान. साप्ताहिक विवेक, सोमवार, दि. १९ सप्टेंबर १९४९) पृष्ठ २ व ८

२८) **ब्राह्मणेतर चळवळींचे उत्तर पर्व : शुद्ध सामाजिक चळवळच आता हवी** (२० ते २३ सप्टेंबर, १९५२), गजेंद्र गडकर व्याख्यानमाला, मु.म. ग्रं.संग्रहालय २० ते

२३ सप्टेंबर, १९५२, साप्ताहिक मौज, २४, सप्टेंबर, १९५२, पृ. १, ३, १०

२९) **भारतीय राष्ट्रीयत्व** (१४ मार्च, १९५३), गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स संस्थेच्या १९५३ च्या स्थापनादिनी 'भारतीय राष्ट्रीयत्व' विषयावर दिलेले व्याख्यान; प्रकाशन- नवभारत मासिक, वाई, जून १९५३, पृ.१ ले १०

३०) **भारताचा इतिहास आणि इतिहास तत्त्व** (१२ जुलै, १९५३), भारतेतिहास संशोधन मंडळ, पुणे या संस्थेच्या वर्षदिनाच्या निमित्ताने दिलेले व्याख्यान; अलका, दिवाळी, १९५३, पृ. ७ ते ११

३१) **विकेंद्रित लोकशाही** (१६ जानेवारी, १९५४) उत्तर सातारा जिल्हा ग्रामपंचायत परिषद, अध्यक्षीय भाषण, प्रकाशन- ३० सप्ताहिक साधना, पुणे, शनिवार, दि. १६ जानेवारी, १९५४, पृ. ३, १०

३२) **मराठवाडा विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ हवे** (७ नोव्हेंबर, १९५४), मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद यांच्या वतीने १ ऑक्टोबर, १९५४ ला ३७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याप्रित्यर्थ सरस्वती भुवन हायस्कूल, औरंगाबाद येथे झालेल्या सत्कार प्रसंगीचे भाषण; प्रसिद्धी - अर्धसाप्ताहिक मराठवाडा, हैदराबाद, रविवार, दि.१४ नोव्हेंबर १९५४

३३) **भारतीय नीतिविकास : वेदकालीन नीती** (२१ जुलै, १९५६) अखिल भारतीय नभोवाणी सौजन्य, प्रकाशन - साप्ताहिक साधना, पुणे, शनिवार, २१ जुलै, १९५६, पृ. ९, १०

३४) **प्राचीन भारतातील वादविद्या** (१४ सप्टेंबर, १९५७), आकाशवाणी केंद्र, मुंबई प्रक्षेपित व्याख्यान, प्रकाशन, साप्ताहिक साधना, पुणे, शनिवार, १४ सप्टेंबर १९७५, पृ. ७, ८

३५) **लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य'** (१ ऑगस्ट, १९६०), लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित व्याख्यान.

३६) **आमच्या काळाने आम्हास घडवले** (४ नोहेंबर, १९६०), आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित व्याख्यान

37) **प्राज्ञ पाठशाला की राष्ट्रीय एवं धार्मिक परंपरा** (१३ डिसेंबर, १९६०), ब्राह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर उद्घाटन समारोह का स्वागत पर भाषण, वाई, १३ डिसेंबर, १९६०

३८) **भारताच्या ऐक्याची घडण व हिंदू धर्म** (२३ ऑक्टोबर, १९६१), आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित व्याख्यान

३९) **पंचांग विद्या सर्वांगीण बनली जावी** (२५ नोव्हेंबर, १९६१), ज्योतिर्विद्या मंडळ, मुंबई आयोजित महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदेच्या सन १९६१

मध्ये संपन्न वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण

४०) **अमेरिकेतील लोकशाहीचा यशस्वी प्रयोग** (३० ऑगस्ट, १९६४), अमेरिका दौऱ्यावरून परतल्यावर महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली येथे केलेले भाषण. प्रसिद्धी- दैनिक केसरी, 'लाल किल्यावरून' दि. ३० ऑगस्ट, १९६४ पृ. ३ व ५.

४१) **लोकशाही आणि समाजवाद** (२४ एप्रिल, १९६५), लोकशाही अभ्यास मंडळ, पुणे आयोजित महाराष्ट्रा प्रादेशिक अभ्यास शिबिरात दि. २४ एप्रिल, १९६५ रोजी शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे येथे दिलेले भाषण)

४२) **गोवध बंदी कायदा : गरीब शेतकऱ्यांवर भार** (९ फेब्रुवारी, १९६७), गरीब शेतकऱ्यांवर भार-मलकापूर येथील जाहीर सभेतील भाषण

४३) **शिक्षणाला वैज्ञानिक अधिष्ठान हवे** (डिसेंबर, १९६७), मराठी विज्ञान परिषद आयोजित दुसरे संमेलन पुणे येथे संपन्न झाले. त्याप्रसंगी 'वैज्ञानिक प्रेरणा व वैज्ञानिक प्रगती' विषयावर दिलेले उद्‌घाटक भाषण

४४) **भारतीय संस्कृती : शोध व बोध** (ध्वनिमुद्रण दि. २० मे, १९७०) आकाशवाणी पुणे केंद्रामार्फत प्रक्षेपित भाषण

४५) **हिंदुधर्म : तत्त्व आणि व्यवहार (१९७१)**
आंतरभारती युवक स्नेहमिलन शिबिर, पुणे, सत्र १ ले, दि. ५ मे, १९७१

४६) **लोकशाहीचे तात्त्विक अधिष्ठान** (२६ जून, १९७४), लोकशिक्षण व्याख्यानमाला विचार मंथन, संपा. मा. प. मंगुडकर , c/o. श्री शाहूमंदिर महाविद्यालय, पुणे (१९६०-६३)

४७) **मी परिवर्तनवादी शास्त्री** (१५ फेब्रुवारी, १९७५), अमृत महोत्सव सत्कार सोहळा, वाई, सत्कारास उत्तरादाखल भाषण, प्रकाशक - श्री. राम कोल्हटकर, कार्यवाह, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अमृत महोत्सव समिती वाई.

४८) **श्रमातून येणारे जग मोलाचे** (१५ फेब्रुवारी, १९७५), वाणिज्य व मानव्य महाविद्यालय, वाई (सध्याचे किसन वीर महाविद्यालय)च्या वतीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अमृत महोत्सव साजरा करण्याता आला. त्याप्रसंगीचे तर्कतीर्थांचे सत्कारास उत्तर देणारे भाषण. (प्रसिद्धी- १५ फेब्रुवारी, १९७५, साप्ताहिक साधना, पुणे.)

49) **Freedom and Social Responsibility** (26th Dec., 1975), Inaugural Address at the open session of the All-India Radical Humanist Association Conference, Ahemdabad

५०) **संपूर्ण राजकीय क्रांती** (१० नोव्हेंबर, १९७७), आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित भाषण

५१) **हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास** (८ मे १९७८), एशियाटिक सोसायटी मुंबई यांच्या वतीने त्यांच्याच ग्रंथालयात संपन्न कै. डॉ. पां. बा. काणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दिलेल्या मूळ इंग्रजी भाषणाचा मोकळा मराठी अनुवाद, प्रसिद्धी - नवभारत मासिक, जून १९७८ - पृ. ७ ते १३

५२) **लोकशाहीसाठी सत्तेवर अंकुश ठेवणारे गट हवेत** (२० सप्टेंबर, १९७८), दैनिक सकाळ, पुणेचे संस्थापक डॉ. ना. भि. परूळेकर जयंतीनिमित्त 'देशापुढील आव्हाने' विषयावरील भाषण.

५३) **अध्यक्षीय पद्धत भारताला उपयुक्त आहे का?** (२४ जानेवारी, १९८१), अनंत अमुचि ध्येयासक्ती अनंत केरोजी भोसले, प्रकाशक- सौ. शोभा जाधव, वरळी सागर हौसिंग सोसायटी, वैतरणा, १२०२, पोछखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८. पृ. १२५, १२९

५४) **विज्ञाननिष्ठ मानवतावाद हाच सत्याप्रत जाण्याचा मार्ग** (२५ जानेवारी, १९८१), अनंत अमुचि ध्येयासक्ती, अनंत केरोजी भोसले, प्रकाशक- सौ. शोभा जाधव, वरळी सागर हौसिंग सोसायटी, वैतरणा, १२०२, पोछखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८. पृ. १३३, १३६

५५) **ज्ञान व वस्तुस्थिती समन्वयक आचरणाची सवय हवी** (४ ऑक्टोबर, १९८१), अनंत अमुचि ध्येयासक्ती, अनंत केरोजी भोसले, प्रकाशक- सौ. शोभा जाधव, वरळी सागर हौसिंग सोसायटी, वैतरणा, १२०२, पोछखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८. पृ. ११६, ११७

५६) **जीवविज्ञानात दिसणारा मानव** (१२ मार्च, १९८१), यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला, कराड नगरपरिषद, कराडच्या सन १९८१ च्या सत्रात 'विज्ञान आणि मानवी मूल्ये' या विषयावरील व्याख्यान त्रयी, प्रथम पुष्प, प्रसिद्धी- नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९९१, पृ. ७३ ते ८०

५७) **विज्ञान व संस्कृती** (१३ मार्च, १९८१), यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला कराड नगरपरिषद, कराड आयोजित सन १९८१ च्या सत्रात 'विज्ञान आणि मानवू मूल्ये' या विषयावरील व्याख्यान त्रयी, दुसरे पुष्प; प्रसिद्धी- नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९९१, पृ. ८१ ते ८७

५८) **भारतीय संस्कृतीच्या विकासाची दिशा** (७ मार्च, १९८२), समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, जि. कोल्हापूर आयोजित कार्यकर्ता शिबिरातील भाषण; प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, ५ मे, १९८२.

५९) **विश्वधर्माशी समन्वित राष्ट्रीय एकात्मता** (२० मार्च, १९८२), राष्ट्रीय एकात्मता परिषद, पुणेमध्ये दिलेले अध्यक्षीय भाषण; नवभारत मासिक, एप्रिल १९८२. पृ. १ ते ४

६०) **भविष्यकाळ घडविणारा माणूस दिसावा** (२८ ऑगस्ट, १९८२), लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथालय, वाईच्या सुवर्ण महोत्सवात स्वागताध्यक्ष म्हणून दिलेले भाषण; सुवर्ण महोत्सव स्मरणिका, १९८२.

६१) **संभवामि युगे युगे** (काळ अप्राप्त), आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित व्याख्यान; तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह, खंड १- श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८२, पृ. २५८ ते २६१.

६२) **महाभारतातील धर्मशास्त्र, प्रवृत्ती मार्ग, राजकारण व व्यवहार नीती -** (काळ अप्राप्त), आकाशवाणी, पुणे केंद्रावरून प्रक्षेपित व्याख्यान; तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह, खंड - १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२,
पृ. २७६ ते २८९

६३) **भारत : राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया- (पूर्वार्ध-उत्तरार्ध)** (१, २ फेब्रुवारी, १९८३), केशव गोरे स्मारक ट्रस्ट व्याख्यान; केशव गोरे स्मारक ट्रस्ट प्रकाशन, मुंबई, १ एप्रिल, १९८३.

64) **भारतीय संस्कृति और भारतीय राष्ट्रीयता का निर्माण-** (३ मार्च, १९८३), ग्रंथ विमोचन समारोह, अध्यक्षीय अभिभाषण

६५) **धार्मिक पुनरुज्जीवन व त्याचे परिणाम (१९९४)**
टाऊन हॉल, हिराबाग, पुणे (शताब्दी व्याख्यानमाला, वर्धापनदिन व्याख्यान)
दि. २८ जून, १९८४

६६) **बौद्ध धर्म व भारतीय संस्कृती** (१८ फेब्रुवारी, १९८७), लालमणी जोशी स्मृतिव्याख्यानमाला, १९८६, सारनाथ (वाराणसी) येथे दिलेल्या हिंदी भाषणाचे मराठी भाषांतर, नवभारत, मे-जून, १९८८, पृ. ८१ ते ९७

६७) **बुद्धिप्रामाण्य चळवळ निर्माण करण्याचे कर्तव्य** (१६ जानेवारी, १९८८), वेरळा विकास प्रकल्प, सांगली निर्मित नूतन वास्तूच्या 'डॉ. वि. कृ. गोकाक भवन' नामकरण समारंभ प्रसंगीचे प्रमुख पाहुणे म्हणून दिलेले भाषण; प्रसिद्धी - दैनिक राष्ट्रशक्ती, सांगली, दि. २० जानेवारी १९८८

६८) **उच्च शिक्षणाचे तत्त्वज्ञान** (२३ जानेवारी, १९८८) शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित विष्णुशास्त्री चिपळूणकर स्मृतिव्याख्यानमाला, रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई, दि. २३ जानेवारी, १९८८

६९) **धर्म आणि नीती** (२१ फेब्रुवारी, १९८८), श्री. भानुभाई अध्वर्यु स्मारक व्याख्यान श्रेणी, अहमदाबाद (गुजरात) येथील हिंदी भाषणाचे मराठी भाषांतर; प्रसिद्धी- नवभारत, फेब्रुवारी १९८८, पृ. १ ते १०

७०) **वैश्विक जाणिवेवर आधारलेली संस्कृती हवी** (२३ मार्च, १९८९), साहित्य

अकादमी महत्तर सदस्यत्व प्राप्तिप्रीत्यर्थ सत्कारास उत्तर; महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे; तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन आणि परिवर्तन, संपा. रमेश चव्हाण, २०१०, पृ. १९५ ते १९९

७१) **एकाच प्रकाराच्या विचाराने भारत रशिया होईल** (३ फेब्रुवारी, १९९२), महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे यांच्यावतीने 'पद्मभूषण' मिळाल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभातील उत्तरादाखल भाषण; प्रसिद्धी- दैनिक सकाळ, पुणे, दि. ४ फेब्रुवारी, १९९२

७२) **मानवतावादी समाजनिर्मितीसाठी वृत्तपत्राने झटावे** (२६ फेब्रुवारी, १९९२) साप्ताहिक 'अंबर', तळेगाव दाभाडेच्या द्वितीय वर्धापनदिनी प्रमुख पाहुणे म्हणून दिलेले व्याख्यान; प्रसिद्धी - दैनिक सकाळ, पुणे, दि. २६ फेब्रुवारी, १९९२

७३) **वर्णाधारित उच्चनीचतेस आव्हान आवश्यक** (१० एप्रिल, १९९२), स्नेहमंच, पुणे आयोजित व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगीचे भाषण; प्रसिद्धी- दैनिक सकाळ, पुणे, दि. १२ एप्रिल, १९९२

७४) **हुंडा निर्मूलनामुळे स्त्रियांचा सन्मान** (१६ ऑगस्ट, १९९२), अखिल भारतीय महिला सुरक्षा महासंघ, सातारा युवा अभिमन्यू संघटना, पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सिल्वर ग्रुप, सातारा यांच्या सहकार्याने आयोजित टाऊन हॉल पाचगणी येथे संपन्न 'हुंडा निर्मूलन मेळावा' उद्घाटनप्रसंगीचे भाषण; प्रसिद्धी - दैनिक सकाळ, पुणे, दि. १७ ऑगस्ट, १९९२

७५) **मंदिर-मशीद प्रश्नावरील डोकेफोड हा निर्बुद्धपणा** (१४ जानेवारी, १९९३), महाराष्ट्र भूगोल दिन समिती आयोजित 'भूगोल दिन' आणि 'भूगोलतज्ज्ञ डॉ. सी. डी. देशपांडे सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा' प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून केलेले भाषण, प्रसिद्धी- दैनिक सकाळ, पुणे, दि. १५ जानेवारी, १९९३

७६) **आर्थिक जीवन मजबूत करणे महत्त्वाचे** (७ फेब्रुवारी, १९९३), प्रा. दीपक ताटपुजे लिखित 'शिक्षण व्यवसायाच्या वाटा' ग्रंथ प्रकाशन सोहळ्यात केलेले भाषण, प्रसिद्धी- दैनिक सकाळ, पुणे, दि. ८ फेब्रुवारी, १९९३

७७) **राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्याची जरुरी** (६ मार्च, १९९३), 'सकाळ' विश्वस्त संस्था, पुणे आणि आकाशवाणी केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शाहू कला मंदिर, सातारा येथे संपन्न 'राष्ट्रीय एकात्मता : सद्य:स्थितीतील आव्हाने' या विषयावरील परिसंवादातील भाषण, प्रसिद्धी- दैनिक सकाळ, पुणे, दि. ७ मार्च, १९९३

७८) **भारतीय तत्त्वज्ञानात विश्वव्यापक विचार** (२४ एप्रिल, १९९४), डॉ. रा. ना. दांडेकर लिखित ग्रंथ 'भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास'च्या प्रकाशन

सोहळ्यातील भाषण; प्रसिद्धी - दैनिक सकाळ, पुणे, दि. (२६ एप्रिल १९९४)

७९) **सर्वधर्म समभावाची गरज (१९९४)**
प्राज्ञपाठशाळा अमृतमहोत्सव शुभारंभ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रास्ताविक/ स्वागत भाषण) अध्यक्ष : मान. सुधाकरराव नाईक (माजी मुख्यमंत्री), प्रमुख पाहुणे : मान. शरदराव पवार (मुख्यमंत्री), प्रकाशक : प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (जि. सातारा), दि. २५ जानेवारी, १९९४

८०) **उच्च मूल्यांच्या चिंतनाची गरज** (२५ एप्रिल, १९९४),
प्राचार्य शिवाजीराव भोसले लिखित ‘दीपस्तंभ’ ग्रंथ प्रकाशन सोहळ्यातील भाषण; प्रसिद्धी - दैनिक सकाळ, पुणे, दि. २६ एप्रिल, १९९४

८१) **जो तत्त्वभ्रष्ट, तो पदभ्रष्ट असे समीकरण साधले पाहिजे** (२० मे, १९९४), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कार्यकर्ता शिबिर, पारशी जिमखाना, महाबळेश्वर.

OOO

# परिशिष्टे

## परिशिष्ट - १

# ऋणनिर्देश

*'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पासाठी आवश्यक संदर्भ, माहिती, मार्गदर्शन, साधने, संपर्कसूत्र इ. चे साहाय्य करून खालील व्यक्ती व संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय अनवधानाने नोंद घ्यावयाची राहिलेल्या इतरांचेही मी स्मरण करतो आणि सर्वांप्रती विनम्र कृतज्ञता व्यक्त करतो.*

* मा. शरद पवार, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* मा. राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश, लखनऊ.
* मा. मंत्री, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. सचिव, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. बाबा भांड, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. आणि संचालक, संस्थापक, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद.
* मा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* मा. डॉ. सौ. मीनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, संपादक, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. अरुंधती खंडकर, सिंगापूर.
* मा. वासुदेव जोशी, वाई, जि सातारा.
* मा. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. संजय कृष्णाजी पाटील, माजी सचिव, (अ.का.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

* मा. प्रा. डॉ, राजा दीक्षित, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* डॉ. शामकांत देवरे, सहा. सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. रवीन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. सरोजकुमार मिठारी, विद्याव्यासंगी सहायक मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* डॉ. जगतानंद भटकर, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* मा. अध्यक्ष, लोकमान्य ग्रंथालय, वाई.
* मा. शरद साठे (भा. प्र. से.), सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* श्री. मोहनराव डकरे, सचिव, प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कऱ्हाड.
* मा. अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि सातारा.
* श्री. अनिल जोशी, सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि. सातारा.
* मा. ग्रंथपाल, मराठी विश्वकोश ग्रंथालय, वाई, जि सातारा.
* मा. अध्यक्ष, करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* मा. ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* मा. खासदार प्रा संजय मंडलिक, कोल्हापूर.
* श्री. दत्ता क्षीरसागर, संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, पुणे.
* मा. अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे.
* मा. प्रा डॉ प्रसाद जोशीं, कुलगुरू, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* श्री. गोपाळ अवटी, संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे.
* श्री. श्रीराम पवार, समूह संपादक, सकाळ वृत्तपत्र समूह, पुणे.
* श्री सम्राट फडणीस, संपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* श्री. माधव गोखले, उपसंपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* मा. स्वप्नील पोरे, संपादक, दैनिक केसरी, पुणे.
* प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, महावीर विद्यालय, कोल्हापूर.
* श्री. शाम जोशी, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर.
* प्रा. डॉ सौ आशाताई गुर्जर, पुणे.
* डॉ. एच व्ही देशपांडे, माजी प्राचार्य, आजरा महाविद्यालय, आजरा, जि कोल्हापूर.
* डॉ. दिनकरराव पाटील, प्राचार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता करवीर, जि. कोल्हापूर.
* सौ. मनीषा शेणाई, ग्रंथपाल, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. पंडित टापरे, वाई जि. सातारा.

* श्री. रमेश रा. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, जि सातारा.
* प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठा कोल्हापूर.
* प्रा. डॉ. शिवाजी मोटेगावकर, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
* मान. विनोद शिरसाठ, संपादक, साप्ताहिक साधना, पुणे.
* श्री सुदाम सानप, महाराष्ट्र ज्ञानमंडळ, पुणे.
* श्री. समीर दिलावर शेख, साधना साप्ताहिक, पुणे.
* डॉ. राजेंद्र प्रभुणे, वाई, जि सातारा.
* श्री. भालचंद्र मोने, प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, जि सातारा.
* प्रा. सागर कांबळे, न्यू कॉलेज, कोल्हापूर .
* डॉ. आर. डी. पोतदार, अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे मुंबई .
* प्रा. डॉ. प्रदीप देवी, सार्वजनिक वाचनालय, नाशिक.
* प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा. प., पुणे.
* मा. ग्रंथपाल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* मा. ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
* श्री. सुरेश रासकर व सौ. दिप्ती रासकर, मुंबई.
* डॉ. अशोक वेणीमाधवशास्त्री जोशी, अमेरिका.
* श्री. व. सौ. डॉ. शुभदा अरविंद पटवर्धन, मुंबई.
* प्रा. डॉ. व्यंकटेश कोटबागे, बेळगाव.
* श्री विजय एकशिंगे व श्री संजय कळके, कोल्हापूर,
* श्री श्रीकांत भागवत, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* डॉ. सौ. मोनिका गजेंद्रगडकर, संपादक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* श्री. मिलिंद जोशी, व्यवस्थापक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* Hon. Maxion Barlet, Bibliotheque de France, Paris.
* मा. ग्रंथपाल श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा जि. कोल्हापूर.
* मान.- संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, (मुंबई)
* प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. कृष्णा पाटील, अधिव्याख्याता, दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* सर्व कर्मचारी, सहयोगी, साकेत प्रकाशन प्रा .लि., औरंगाबाद.

* श्री. अमेय जोशी, अक्षर दालन, कोल्हापूर.
* सौ. / श्री. तनुजा व निहाल शिपूरकर, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
* श्री गौरीश सोनार, कोरिएंडर ग्राफिक्स, कोल्हापूर.
* श्री. अशोक पाटील, छायाचित्र विकासक, कोल्हापूर.
* श्री. विश्वनाथ यादव, दैनिक लोकमत, कोल्हापूर
* श्री. विवेक जोशी, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर
* श्री. भरत बुटाले, उपसंपादक, दैनिक लोकमत, कोल्हापूर.
* सौ. वीणा पाटील, अक्षर दालन, कोल्हापूर.
* श्री. राजेश दुबे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* श्री. महेश मोधे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* सौ. यशवंती अरूण शिंदे, कोल्हापूर.
* सौ. शुभांगी मोहन भगत, विश्ववेद ग्राफिक्स, कोल्हापूर.

ooo

## परिशिष्ट - २

परिचय

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(२७ जानेवारी, १९०१ - २७ मे, १९९४)

महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जन्म. वडिलांचे नाव बाळाजी आणि आईचे चंद्रभागा. त्यांचे वडीलबंधू वेणीमाधवशास्त्री आयुर्वेदाचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आले. लक्ष्मणशास्त्री वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय-वेदांतादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञाने यांचा स्वप्रयत्नाने त्यांनी सखोल व्यासंग केला. १९२७ मध्ये मुल्हेरच्या (नाशिक जिल्हा) पंडित घराण्यातील सत्यवती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली असून, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर हे अमेरिकेत गणकयंत्रनिर्मिती करणाऱ्या 'इंटरनॅशनल बिझनेस मशिन्स' या उद्योग संस्थेत संशोधन व्यवस्थापक या पदावर होते. वाई येथेच राहून शास्त्रीजींनी प्राज्ञ पाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य आणि आपला व्यासंग अखंडपणे चालू ठेवला होता.

प्राज्ञ पाठशाळेचे वातावरण सनातनी पढीक पांडित्याचे नव्हते; ते पुरोगामी/चिकित्सेचे व राष्ट्रीय स्वरूपाचे होते. परिणामतः राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेण्याची प्रेरणा या वातावरणातून शास्त्रीजींना लाभली. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यास शास्त्रीजींनी हिंदू धर्मशास्त्राचे पूरक भाष्य तयार करून दिले. १९३० ते १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावासही तीनदा भोगावा लागला. १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्याचे सदस्य होते. १९४० पर्यंत व पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाशी ते एक विचारवंत भाष्यकर म्हणून निगडित होते.

तर्कतीर्थांच्या नेतृत्वाने प्राज्ञ पाठशाळेला एका व्यापक सांस्कृतिक कार्यकेंद्राचे स्वरूप लाभले. वाईमध्ये हरिजन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, हातबनावटीचा कागद कारखाना, अद्ययावत मुद्रणालय इ. उपक्रम त्यांनी यशस्वीपणे अमलात आणले. वाईच्या महाविद्यालयाचेही ते संस्थापक-सदस्य होते. प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य त्यांनी हाती घेतले. या कोशाचे २५ खंड प्रसिद्ध झाले असून, त्यांत कुटुंबसंस्था, हिंदू संस्कार, जाती, विवाह, मालमत्ता त्याचप्रमाणे हिंदू धर्मविधी, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान इ. विषयांसंबंधी प्राचीन शास्त्रांतील ग्रांथिक माहिती व्यवस्थितपणे संकलित केलेली आहे. पहिल्या १९ खंडांचे संपादन तर्कतीर्थांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून म्हणजे १९६० पासून ते १९८० पर्यंत शास्त्रीजी अध्यक्ष होते. मंडळातर्फे भाषा-साहित्यविषयक अनेक योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख प्रकल्प वीस खंडीय मराठी विश्वकोषाचा आहे. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून विशद करण्याचे हे मौलिक कार्य शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली चालू होते.

शास्त्रीजींनी व्याख्याने, परिषदा इ. निमित्ताने भारतभर प्रवास केला. अमेरिका, ब्रह्मदेश, रशिया तसेच युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकी देशांनाही त्यांनी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून किंवा स्वतंत्रपणे निमंत्रित म्हणूनही भेटी दिल्या आहेत (१९५१). कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषद (१९२५) व वाराणसीचे अखिल भारतीय संस्कृत पंडितांचे संमेलन (१९२९) यांत भाग घेऊन शास्त्रीजींनी धर्मसुधारणेचे सभाष्य समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९५४). याखेरीज अनेक विभागीय व प्रादेशिक मराठी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली.

शास्त्रीजींची ग्रंथसंपदा मोजकी; पण मौलिक आहे. शुद्धिसर्वस्त्रम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत दिलेली तीन व्याख्याने, १९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य १९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, द्वितीय आवृत्ती १९७४), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३) हे त्यांचे ग्रंथ मान्यता पावले आहेत. राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) हे त्यांनी संपादिले आहेत. हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीने त्यांनी केली आहे. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे' या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला आहे. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात केलेली आढळते. या प्रबंधाचे

इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले आहे (१९४८). 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा एक प्रचंड प्रबंध आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होत (१९४९). त्यांत वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्माचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे व म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते. असा पुरस्कार लाभलेला हा पहिला मराठी ग्रंथ.

इतिहासाचार्य राजवाडे आणि लो. टिळक यांचे नमुनेदार लेखसंग्रह संपादित करून शास्त्रीजींनी त्यांना अभ्यासपूर्ण व अत्यंत विचारप्रवर्तक प्रस्तावना लिहिल्या आहेत. आधुनिक मराठी साहित्य व त्याची समीक्षा, संस्कृतातील रससिद्धांत, मराठी संतांचे कार्य यासंबंधीही त्यांनी अनेक लेखांतून नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. रा. ग. जाधव यांनी शास्त्रीजींच्या निवडक लेखांचा संग्रह 'विचारशिल्प' या नावाने संपादित केला आहे (१९७५). गांधीयुगातील एक नमुनेदार कर्मयोगी विचारवंत या नात्याने त्यांच्या विचारकार्याची मीमांसा संपादकाने या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे.

महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंतांची एक थोर परंपरा आहे. बाळशास्त्री म. जांभेकर, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, लो. टिळक, वि. दा. सावरकर, महर्षी शिंदे इ. विचारवंतांच्या परंपरेतच शास्त्रीजींचे कार्य मोडते. प्राचीन आचार्यपरंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानांचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचारप्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या परंपरेचे विशेष होत.

छोट्या शाळा-मंडळांपासून राष्ट्रीय संस्था-संघटनांपर्यंत सर्वप्रकारच्या व्यासपीठांवर दिलेली विचारप्रवर्तक भाषणे हा शास्त्रीजींच्या सामाजिक सेवाव्रताचाच एक अविभाज्य भाग होय. अशी कितीतरी मौलिक विचारांची भाषणे ग्रंथरूपात संग्रहित झालेली नव्हती. उदा. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर दिलेले भाषण किंवा पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली वाचलेला 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉडस्' हा शोधनिबंध. शास्त्रीजींनी शेकडो व्याख्यानांच्या रूपाने व लेखनद्वारा केलेले विचारकार्य प्रकाशात आल्यास हा महाराष्ट्राचा एक बहुमोल असा ठेवा मानला जाईल. १९७५ साली त्यांनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण

केले. त्यानिमित्त स्थापन झालेल्या अमृत महोत्सव समितीने त्यांच्या समग्र लेखनाचे खंड प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. पैकी एक लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. याच वर्षी मुंबई विद्यापीठाने एलएल्.डी. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथोचित गौरव केला. 'संस्कृत पंडित' म्हणून १९७३ मध्ये, 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये, तर 'पद्मविभूषण' म्हणून १९९२ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले. त्यांचा मृत्यू २७ मे १९९४ रोजी महाबळेश्वर येथे झाला. त्यांची अनेक चरित्रे व ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध आहेत. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची काही भाषणे संपादित करून प्रकाशित झाली आहेत.

**(मराठी विश्वकोश खंड-६, पृ. ६०७, ६०८)**

(**टीप :** वरील परिचय अद्यतन करून सुधारित संदर्भ म्हणून इथे देण्यात आला आहे.)

OOO

परिशिष्ट - ३

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा**

१) **आनंदमीमांसा** (मराठी प्रबंध)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई/पुस्तकमाला, पुष्प ६वे
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०) मूल्य ६ आणे / पृष्ठे - ७०

२) **शुद्धिसर्वस्वम्** (संस्कृत प्रबंध)
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे / पृष्ठे - ३७

३) **भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्** (संस्कृत निबंध)
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९३३ / पृष्ठे - १६

४) **जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** (मराठी प्रबंध)
प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३ / १५, सदाशिव पेठ, पुणे.
वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)
प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर, १९४१ / किं. सव्वा रुपया / पृष्ठे - १०३

५) **हिंदुधर्माची समीक्षा** (भाषणसंग्रह)
श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ,
नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर १९४१
प्रकाशक - प्राज्ञशाळामंडळ, वाई
द्वितीय आवृत्ती, १ मे, १९४२ / मूल्य २ रुपये / पृष्ठे - १४०

६) **ज्योति - निबंध**
भाषण / प्रस्तावना - रा. ना. चव्हाण
मुद्रक व प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
प्रथमावृत्ती - १९४७, मूल्य १२ आणे, पृष्ठे - ३५

७) **वैदिक संस्कृतीचा विकास** (भाषणसंग्रह)
श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९)
पुणे विद्यापीठ, पुणे
प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा
प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध ६, शके १८७३ (१९५१), मूल्य ६ रुपये / पृष्ठे - २८६

८) **भारतस्य संविधानम्**
भारतीय राज्यघटना (१९५२) - संस्कृत भाषांतर.
प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - १९५२ / मूल्य २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे - २९५

९) **राजवाडे - लेखसंग्रह** (लेखसंग्रह)
प्रकाशक - साहित्य अकादेमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती १९५८/मूल्य १२ रुपये / पृष्ठे - २९४

१०) **लोकमान्य टिळक लेखसंग्रह** (लेखसंग्रह)
प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट, १९६९ / मूल्य - १२ रुपये / पृष्ठे - ४५९.

11) **Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts.**
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June 1970, Pages - 717 / Price - 50/-

12) **Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II )**
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June 1970, Pages - 720-1361 / Price - 50/-

१३) **आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत** (भाषणसंग्रह)
व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला पुष्प ८ वे, १९७२
प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ - क, शनिवार पेठ, पुणे - ३०
मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे - ९
पहिली आवृत्ती - सप्टेंबर १९७२ / मूल्य ६ रुपये / पृष्ठे - ११८

१४) **सर्वधर्मसमीक्षा** (भाषणसंग्रह)
सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १
प्रथमावृत्ती - १९८४ / रु.९५/- / पृष्ठे - ८८

१५) **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १ )**
लेखसंग्रह (संकीर्ण)
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट १९८२ / मूल्य-५५५/- / पृष्ठे - ५९०

**१६) शिखांचा पंथ व इतिहास** (भाषणसंग्रह)

कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १९८४

प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे - ३०

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा

प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर १९८४ / किंमत - ७ रुपये / पृष्ठे - ६०

**१७) ज्योतिचरित्र** (चरित्र)

प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - १

मुद्रक -

प्रथमावृत्ती - शके-१९१४ (१९९२) / किं. ३० रु. / पृष्ठे - १०७

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संपादन कार्य

**१८) धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)**

व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)

उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४ )

संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६ )

राजनीतिकाण्डम् (भाग १ ते ६ )

वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

**१९) मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६५ ते १९९४)**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६५ - १९८०)

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८०-१९९४)

**२०) श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृत महोत्सव )**

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती)

प्रकाशन - मार्गशीर्ष शुद्ध ४ शके-१८७४ / पृष्ठे - २७२

**२१) श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका**

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६० / मूल्य १ रु. / पृष्ठे - २५

**२२) श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ**

प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर

(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ )

मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४

प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च १९६१ / पृष्ठे - १००.

**२३) मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ**

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४

प्रकाशन - २ एप्रिल १९६५ (गुढीपाडवा) / पृष्ठे - १२१

**२४) मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ**

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

मुद्रक - शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे - १

प्रथमावृत्ती - २००३ / मूल्य-रु.१५०/- / पृष्ठे - २५८

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे**

**25 ) A critique of Hinduism**

By tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by G. D. Parikh

Publisher - Modern Age Publication Navasari Chembers,

Outram Road, Fort, Bombay-1

Printer - N. E. Chinwalla, Manager,

British India Press, Mazagaon, Bombay

First Edition - Market, 1948 / Price.Rs.5/- / Pages-131

**26) हिंदू धर्म की समीक्षा**

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - नथूराम प्रेमी

प्रकाशक - नथूराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,

हिराबाग, गिरगाँव, बम्बई -4

पहली बार - दिसंबर 1948 / पृष्ठ संख्या - 172

**27) जडवाद और अनीश्वरवाद**

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार

प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगाँव,

बम्बई - 4

मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, 6, केलेवाडी, बम्बई - 4

पहली बार - मार्च 1950 / पृष्ठ संख्या - 112

**28) वैदिक संस्कृति का विकास**

मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर
प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली - 110001
प्रथम संस्करण - 1957. / पृष्ठ संख्या - 360
मूल्य 200 रु.

**29) राजवाडे लेखसंग्रह**

मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादक - वसंत देव
प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि., आगरा
मुद्रक - युनिवर्सल आर्ट प्रेस, आगरा
प्रथम संस्करण - 1964/ मूल्य 12 रु.50 पै. / पृष्ठ संख्या - 224.

**30) Jotirao Phule**

Tarkteerth Laxmanshastri Joshi
Translator - Daya Agrawal
Publisher - National Book Trust, India
First Edition - 1996 / Price - Rs. 75/- / Pages - 94

**31) Critique of Hinduism And Other Religions**

Tarkteerth Laxmanshastri Joshi.
Translated by Suman Oak.
Publisher - Popular Prakashan, 35, C,
Pandit Madan Mohan Malviya Marg, Popular Press Building, Tardeo, Bombay - 400 034 First Published - 1996 / pages - 205

**32) Development of Indian Culture : Vedas to Gandhi**

Tarkteerth Laxmanshatri Joshi
Translated by - S. R. Nene
Published by - Lok Vangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan, 85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai - 400 025
Printed by - New Age Printing Press, Mumbai - 2
First Edition - 2001/ Price - 200 Rs. / Pages - 555

33) **Spiritual Materialism**

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by - Arundhati Khandkar

Publisher - Lokvangmay Griha, Mumbai - 2

Printer - New Age Printing Press, Mumbai - First Edition - November 2004 / Price - 250 Rs. / Pages - 171

### तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ

३४) **विचारशिल्प** (निबंधसंग्रह)

संपादक - प्रा. रा. ग. जाधव

प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ३

मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रथमावृत्ती - १९७५ / किंमत ५० रु. / पृष्ठे - १४८

३५) **आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार** (भाषणसंग्रह)

संपादक - डॉ. अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेडकर मार्ग, मुंबई - ३१

प्रथमावृत्ती - २७ मे १९९७ / किं. ८० रु. / पृ. - ९५

३६) **साहित्याचे तर्कशास्त्र** (साहित्यिक भाषणांचा संग्रह)

संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.

प्रथमावृत्ती - २०१२ / मूल्य-७५० रु. / पृष्ठे - ४३७

## संदर्भ ग्रंथ सूची

१. **श्री सोमनाथ तीर्थ**

लेखक - त्र्यंबक रघुनाथ ( गौतमबुवा) पाठक

प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)

मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा

प्रथमावृत्ती - जुलै १९५९ / किंमत ५ रु. / पृष्ठे - १७२

२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक, नवभारत मासिक**
फेब्रुवारी-मार्च, १९८१
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई / किं. ५ रु. / पृष्ठे - ९५

३. **प्रज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे
प्रथमावृत्ती - २० जानेवारी १९८५ / किं. १२५ रु. / पृष्ठे - ३४७

४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - सौ. मालती देशपांडे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - जानेवारी, १९९२ / किं. ५० रु. / पृष्ठे - ७५

५. **प्रज्ञानंद : अमृत महोत्सव स्मरणिका**
संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रकाशन - २५ जानेवारी १९९४ / पृष्ठे - ९८

६. **शास्त्रीजी (चरित्र)**
लेखक - रा. ग. जाधव
प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती - २४ ऑगस्ट १९९४ / किं. ७० रु. / पृष्ठे - १५६

७. **तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**
लेखिका - अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई
प्रथमावृत्ती - २७ मार्च १९९५ / किंमत - २७० रु. / पृष्ठे - २६०

८. **तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**
कवी - गोविंद नरहर कुलकर्णी
प्रकाशक - गो. न. कुलकर्णी, ‘दवबिंदू’, वाई
मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१०, रविवार पेठ, वाई
प्रकाशन - १ एप्रिल १९९५ / पृष्ठे - ५०

९. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
संपादन - वसंत पळशीकर
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९६ / किं. २०० रु./ पृष्ठे - १६४

१०. **प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा**
संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे. पुं. रेगे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६ / किं. २५ रु. / पृष्ठे - २३८

११. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत् चरित्राची साधने**
लेखक - अशोक भट
प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,
मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई
प्रकाशन - १३ ऑक्टोबर १९९९ / विनामूल्य / पृष्ठे - ४२

१२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक**
कार्यकारी संपादक - यशवंत कळमकर
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी २००१ / मूल्य - २०० रु. / पृष्ठे - ८४

१३. **संवाद : तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - २६ मे २००१ / किं-१५० रु. / पृष्ठे - १५८

१४. **महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर.
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोअर परळ, मुंबई
प्रथमावृत्ती - एप्रिल २००३/ किं.४० रु./ पृष्ठे - ८४

**१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन**
रा. ना. चव्हाण / संपादन - रमेश चव्हाण
प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ / ६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे
मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे
प्रथमावृत्ती - जुलै, २०१० / किं. २५० रु. / पृष्ठे - २६४

**१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)**
अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्री. गंधर्व - वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर, २०१० / किं. - १८०रु. / पृष्ठे - १७८

**१७. प्राज्ञप्रबोध (प्राज्ञपाठशाळामंडळ शताब्दी ग्रंथ)**
संपादक - श्री. मा. भावे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई
प्रथमावृत्ती - डिसेंबर, २०१६ / किं. २५० रु. / पृष्ठे - २४७

**१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : आठवणी आणि विचार**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, 'कृष्णा', पत्रकारनगर, पुणे - ४११०१
मुद्रक - के. सागर ग्राफिक्स अँड प्रिंटर्स, वाई
प्रथमावृत्ती - ९ मार्च, २०१९ / किं.-२०० रु. / पृष्ठे - १७१

**१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा तात्त्विक अभ्यास**
संशोधिका - स्वाती बापूराव भोंगळे / • मार्गदर्शक - डॉ. सदानंद मोरे
संशोधन प्रबंध, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
जुलै, २०१९, पृष्ठे- ३१७

**20. Swimming Upstream (Biography)**
Author - Arundhati C. Khandkar/Ashok C. Khandkar
Publisher - Oxford University Press, India.
Printer - Nutech Print Services, New Delhi
First Edition - 2019 / Price-Rs.-1,195/- / Pages - 193

**२१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन**
लेखक / संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे
प्रकाशक - अक्षरदालन, २१४१ बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ०१२
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी, २०२३, पृष्ठे- ३२६, किं. ५०० रु.

OOO

**परिशिष्ट - ४**

## परिचय

# डॉ. सुनीलकुमार लवटे

जन्म ११ एप्रिल, १९५०ला वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर येथे. बालपण व इयत्ता ३री पर्यंतचं प्राथमिक शिक्षण तेथेच. नंतर चौथी ते पदवी शिक्षण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालगृह (रिमांड होम), कोल्हापूरमधून. सन १९६७ला शालान्त परीक्षा उत्तीर्ण. उच्चशिक्षणार्थ श्री मौनी विद्यापीठ, गारगोटीच्या 'कर्मवीर हिरे ग्रामभारती'मध्ये प्रवेश. तिथे सन १९६७ ते १९७१ या काळात 'डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस (एज्युकेशन)' ही बी.ए.,बी.एड. समकक्ष पदविका प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय ग्रामभारतीत सर्वप्रथम. त्याप्रीत्यर्थ भारत सरकारचा 'रोल ऑफ ऑनर', 'बेस्ट सोशल वर्कर', 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' संपादनाची 'हॅट्-ट्रिक'.

पदवी संपादनानंतर 'आंतरभारती शिक्षण मंडळ'च्या विविध शाळांमधून विविध विषयांचे सन १९७१ ते १९७९ या काळात अध्यापन. समांतरपणे शिक्षण संघटना कार्य. एम.ए., पीएच.डी. (हिंदी) शिक्षणाची पूर्तता. सन १९७९ ते २०१० या काळात हिंदी अधिव्याख्याता व सन २००५ ते २०१० या काळात प्राचार्य म्हणून महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापन, संशोधन, प्रशासन, मार्गदर्शन कार्य. सन १९८० ते २०१० या काळात समांतरपणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या हिंदी अधिविभागात एम.ए., एम.फिल., पीएच.डी. स्तरावर अध्यापन, संशोधन व मार्गदर्शन कार्य.

सन १९८० पासून आजतागायत अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बंदी बांधव, वेश्या, कुमारी माता, परित्यक्ता, वृद्ध इ. च्या संगोपन, संरक्षण, शिक्षण, सुसंस्कार, पुनर्वसन कार्याशी निगडित वंचित विकास कार्यास समर्पित. अशा संस्थांचं राज्यशासननियुक्त अध्यक्षपद कार्य, 'समाज-सेवा' त्रैमासिक संपादन. या संबंधीच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय वंचित विकास, मानवाधिकार कार्य संदर्भातील राज्यस्तरीय, राष्ट्रीय धोरण निर्धारण व योजना विकास कार्य

याचाच भाग म्हणून भारतीय शिष्टमंडळातून युरोप, आशिया, आफ्रिका खंडांतील १६ देशांचे अभ्यास दौरे. (१९९० ते २०११)

महाविद्यालयीन जीवनापासून लेखन, वाचनात रुची. मराठी-हिंदीत समांतर लेखन, भाषांतर, समीक्षा, संशोधन, संपादन कार्य. आजवर शंभराहून अधिक ग्रंथ प्रकाशित. ग्रंथांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय शासन व अन्य संस्थांचे पुरस्कार. त्यात उत्तर प्रदेश सरकारच्या हिंदी संस्थान, लखनऊचा 'सौहार्द सन्मान' (रुपये दोन लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), महाराष्ट्र सरकारच्या राज्य हिंदी अकादमीचा 'जीवन गौरव महाराष्ट्र भारती सन्मान' (रुपये एक लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), राष्ट्रभाषा प्रचार/प्रसार कार्याचा 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार', (रु. पन्नास हजार, सन्मानपत्र); 'खाली जमीन, वर आकाश' आत्मकथेस महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिकेचा 'अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार.' या आत्मकथेचे विविध आकाशवाणी केंद्रांवरून अभिवाचन प्रक्षेपण, विविध भाषांत अनुवाद, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून अंतर्भाव व संशोधन.

वि. स. खांडेकर समग्र अप्रकाशित, असंकलित साहित्याचे संपादन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय संपादन. डॉ. नरेंद्र दाभोळकर समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर प्रकल्पाचे प्रधान संपादक. वि.स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, शिवाजी विद्यालय कोल्हापूर व शिरोडे; यशवंतराव चव्हाण स्मृतिसंग्रहालय, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतिसंग्रहालय, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी येथे निर्मिती.

विविध सामाजिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याची नोंद घेऊन 'कोल्हापूर भूषण', 'नागरी सत्कार', 'सुधारककार' गोपाळ गणेश आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार, अंनिस डॉ. भीमराव कुलकर्णी साहित्यिक कार्यकर्ता पुरस्कार (मसाप), विविध सीमाभाग, पश्चिम महाराष्ट्र येथे आयोजित साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद. रेडिओ, दूरदर्शन, व्याख्यानमाला, आभासी संवाद इत्यादी माध्यमांतून अनेक मुलाखती, व्याख्याने, मार्गदर्शन, समुपदेशन कार्य.

वरील कार्य, पुरस्कार, लेखन, मानधन इत्यादी पोटी आजवर प्राप्त सर्व रक्कम समाज संकल्पित धन मानून विविध व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांना देणगी म्हणून समर्पित.

○○○


वाय-१७४ (११०५ पुस्तके)-६-२०२४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

''अहंकार आज जात किंवा प्रादेशिकतेवर आधारित अराजक, पिसाटवृत्ती निर्माण करीत आहे. त्याची परिणती अधोगतीत होण्याची शक्यता आहे. हे सर्व भारतीय समाज कुंठित, अप्रवाही, साचेबंद राहिल्यामुळे होते आहे. म्हणून आता बौद्धिक चळवळीची गरज निर्माण झाली आहे. तात्त्विक क्षेत्रातील क्रांती ही काळाची गरज बनली आहे. ही क्रांती तथाकथित राष्ट्रीय एकात्मतेची नसेल. कारण, राष्ट्रीय एकात्मता ही पारंपरिक अंधश्रद्धेवर आधारित आहे, त्यामुळे सामूहिक अहंकाराला बळी पडून आत्मसमर्पणास तयार असणाऱ्या माणसांची फळी तयार होऊ शकते. आज खरी गरज आहे ती शांततापूर्ण, सृजनशील, तर्कशुद्ध, सर्वधर्मीय आधुनिक समाजरचनेची, अशा स्वतंत्र वातावरणाची की ज्यात व्यक्तीला आपल्या बौद्धिक व नैतिक व्यक्तिमत्त्वांचा सर्वोच्च विकास करता येईल.''

**– तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

(अखिल भारतीय रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या
२६ डिसेंबर, १९४८ मध्ये कलकत्ता येथे संपन्न अंतिम अधिवेशनाच्या
अध्यक्षीय इंग्रजी भाषण अंशाचे मराठी भाषांतर)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई